श्रीसमर्थ

# रामदासांचे समग्र ग्रंथ

वैराग्यभाग्य भरलें असतां अनन्या ।
आल्या जयाप्रति चतुर्विध मुक्तिकन्या ॥
चौथी तयांत वरिली उरल्या न पाहे ।
तो आमुचा गुरु समर्थ समर्थ आहे ॥ १ ॥

रघुनाथ पंडित

मुद्रक व प्रकाशक

शंकर नरहर जोशी.

'चित्रशाळा स्टीम प्रेस', ८१८ सदाशिव पेठ, पुणें शहर.

शा. श. १८४०

सन १९१८ इसवी

किंमत अडीच रुपये.

# प्रकाशकाचे दोन शब्द.

जो एकतांच गर्व गळे । का ते भ्रांतीच मावळे ॥
नातरी एकसरी वोळे । त्या नांव ग्रंथ ॥ १ ॥
जेणें होय उपरति । अवगुण अवघे पालटती ॥
जेणें चुके अधोगति । त्या नांव ग्रंथ ॥ २ ॥
जेणें धारिष्ट चढे । जेणें परोपकार घडे ॥
जेणें विषयवासना मोडे । त्या नांव ग्रंथ ॥ ३ ॥

रामदास.

श्रीसमर्थांनीच केलेल्या ग्रंथाच्या या व्याख्येशीं महाराष्ट्रांत सध्या निघणारे व मागें निघालेले ग्रंथ ताडून पाहिले तर, ज्यांना ' ग्रंथ ' असें अन्वर्थक नांव देतां येईल, असे फारच थोडे ग्रंथ मराठींत झाले आहेत असें म्हणावें लागतें. ही समर्थांची ' ग्रंथ ' शब्दाची व्याख्या त्यांच्या ग्रंथांना तंतोतंत लागू पडते म्हणून आम्ही त्यांचेच समग्र ग्रंथ आज महाराष्ट्र वाचकांना सादर करीत आहोंत. आजपर्यंत ' श्रीसमर्थांचे समग्र ग्रंथ ' दोघांतिघां प्रकाशकांनीं छापिले आहेत. देशाच्या चालू स्थितींत सर्व साक्षरांनीं मननपूर्वक वाचण्याजोगा हा एक ग्रंथ असल्यामुळें आम्ही त्याची ही एक आणखी आवृत्ति काढिली आहे. इच्यांतील विशेष इतकाच आहे कीं दासबोधावर हरिभक्तिपरायण रा. रा. माधवराव देशमुख यांजकडून भरपूर टीपा देवविल्या आहेत, व अशुद्ध पाठ दुरुस्त करविले आहेत.

---

प्रकाशक.

# अनुक्रमणिका.


| विषय | पृष्ठ |
|---|---|
| १ अन्वयव्यतिरेक | १ |
| १ अन्वय १ | |
| २ व्यतिरेक ५ | |
| २ नित्यनैमित्तिकसंग्रहसोपान | १४ |
| १ ध्यान करण्याचे पूर्वीचा विचार | १४ |
| २ सगुणध्यान | १५ |
| ३ निर्गुणध्यान | १९ |
| ४ मानसपूजा प्र० १ | २५ |
| '' प्र० २, ३, ४ | २६ |
| '' प्र० ५, ६ | २७ |
| '' प्र० ७, ८ | २८ |
| '' प्र० ९, १० | २९ |
| '' प्र० ११, १२, १३ | ३० |
| भूपाळ्या, | ३१ |
| आरत्या, | ३२ |
| ५ पूर्वारंभ ग्रंथ | ३२ |
| ६ जुनाट पुरुष ग्रंथ | ३४ |
| ७ अंतर्भाव | ३६ |
| ८ आत्माराम | ४० |
| ९ पंचसमासी | ४७ |
| १० जनस्वभाव गोसावी | ५२ |
| ११ भीमरूपी स्तोत्र | ५४ |
| १२ आरती | ५५ |
| १३ करुणाष्टकें | ५५ |
| १४ सवाया | ५९ |
| १५ आरत्या | ५९ |
| १६ पदें | ६० |
| १७ अभंग ( वारांचे ) | ६१ |
| १८ धावा | ७१ |
| १९ भजनाचा उपसंहार | ७१ |
| २० विडा | ७३ |
| २१ शेजारती | ७३ |
| २२ रामनवमीची उत्साहपद्धति | ७५ |
| २३ अभंग ( बालक्रीडा ) | ९६ |
| २४ वैराग्यशतक | ९८ |
| २५ ज्ञानशतक | १०० |
| २६ उपदेशशतक | १०२ |
| २७ सगुणनिर्गुण० | १०५ |
| ३८ भक्तिपर अभंगपंचक | १०७ |
| ४८ कलियुगपंचक | १०९ |
| ५ मूर्खपणपंचक | १०९ |
| ६ भ्रांतिपंचक | १११ |
| ७ अभिमानपंचक | ११२ |
| ८ उन्मत्तपंचक | |
| ९ आळसपंचक | ११३ |
| १० पराधीनपंचक | ११५ |
| ११ प्रास्ताविकपंचक | ११६ |
| १२ वेडसरपंचक | ११८ |
| १३ क्षोभपंचक | ११९ |
| १४ वोसणपंचक | १२० |
| १५ विविधपंचक | १२१ |
| १६ वैराग्यपंचक | १२२ |
| १७ संशयपंचक | १२४ |
| १८ नीतिपंचक | १२६ |
| १९ उपासनापंचक | १२७ |
| २० भक्तिपंचक | |

| विषय | पृष्ठ |
| --- | --- |
| २१ कथापंचक | १२९ |
| २२ निष्ठापंचक | १३० |
| २३ शिकवणपंचक | |
| २४ निश्चयपंचक | १३१ |
| २५ अलिप्तपंचक | |
| २६ ज्ञानपंचक | १३२ |
| २७ ध्यानपंचक | |
| २८ सख्यपंचक | १३३ |
| २९ संवादपंचक | १३४ |
| ३० अर्थसार्थपंचक | |
| ३१ सुंदरपंचक | १३५ |
| ३२ व्यर्थपंचक | |
| ३३ होळीपंचक | १३६ |
| ३४ वादपंचक | १३७ |
| ३५ भ्रमपंचक | |
| ३६ झडपणीपंचक | १३८ |
| ३७ गंधपंचक | |
| ३८ संतपंचक | १३९ |
| ३९ स्फुट अभंग | |
| ४० पंचीकरण | १४२ |
| ४१ रामायण | १८० |
| १ किष्किंधाकांड | ” |
| २ सुंदरकांड | १९१ |
| ३ युद्धकांड | १९७ |
| ४२ मनाचे श्लोक | २७९ |
| ४३ षड्रिपुविवरण | २९५ |
| १ कामनिरूपण | २९५ |
| २ क्रोधनिरूपण | “ |
| ३ मदनिरूपण | २९६ |
| ४ मत्सरनिरूपण | २९७ |
| ५ दंभनिरूपण | “ |
| ६ प्रपंचनिरूपण | २९८ |
| ४४ भीमरूपी स्तोत्रें | २९९ |

| विषय | पृष्ठ |
| --- | --- |
| ४५ प्रासंगिक कविता | ३०६ |
| १ भूतचेष्टा | ३०६ |
| २ आत्मचरित्र | ३०६ |
| ३ डफगाणें | ३०७ |
| ४ श्रीशिवछत्रपतीस पत्र | ३०८ |
| ५ राजधर्म | ३०८ |
| ६ क्षात्रधर्म | ३०९ |
| ७ श्रीविठ्ठलदर्शन | ३१२ |
| ८ मातुःश्रीस पत्र | ३१२ |
| ९ श्रेष्ठांस पत्र | ३१३ |
| १० बागप्रकरण | ३१३ |
| ११ कारखानेप्रकरण | ३१४ |
| १२ श्रेष्ठांस पत्र २ रें | ३१५ |
| १३ सावधानप्रकरण | ३१६ |
| १४ उद्धव गो० पत्र | ३१८ |
| १५ शिष्यपरीक्षा | ३१८ |
| १६ आरती | ३१९ |
| १७ डफगाणें | ३१९ |
| १८ श्रेष्ठांचे मु० पत्र | ३१९ |
| १९ भवानीस्तोत्र | ३२० |
| २० संभाजीस पत्र | ३२१ |
| ४६ जुना दासबोध | ३२२ |
| ४७ दासबोध | |
| **प्रथम दशक** | १ |
| १ ग्रंथारंभनिरूपण | १ |
| २ गणेशस्तवन | ३ |
| ३ शारदास्तवन | ५ |
| ४ गुरुस्तवन | ७ |
| ५ संतस्तवन | ८ |
| ६ श्रोतृस्तवन | ९ |
| ७ कवीश्वरस्तवन | ११ |
| ८ सभावर्णन | १२ |
| ९ परमार्थस्तवन | १३ |

| विषय | पृष्ठ |
|---|---|
| १० नरदेहप्रशंसा | १५ |
| **दशक दुसरा** | **१८** |
| १ मूर्खलक्षणनिरूपण | १८ |
| २ उत्तमलक्षणवर्णन | २१ |
| ३ कुविद्यालक्षणकथन | २३ |
| ४ भक्तिनिरूपण | २५ |
| ५ रजोगुणनिरूपण | २६ |
| ६ तमोगुणनिरूपण | २८ |
| ७ सत्त्वगुणनिरूपण | २९ |
| ८ सद्विद्यानिरूपण | ३३ |
| ९ विरक्तलक्षणनिरूपण | ३५ |
| १० पढतमूर्खलक्षण | ३६ |
| **दशक तिसरा** | **३८** |
| १ जन्मदुःखनिरूपण | ३८ |
| २ प्रथमसंबंधनिरूपण | ४१ |
| ३ द्वितीयसंबंधनिरूपण | ४४ |
| ४ संपत्तिवेधनिरूपण | ४६ |
| ५ कांताहरण | ४८ |
| ६ आध्यात्मिक ताप | ५० |
| ७ आधिभौतिकताप | ५३ |
| ८ आधिदैविकताप | ५८ |
| ९ मृत्यु निरूपण | ५९ |
| १० वैराग्यलक्षणनिरूपण | ६२ |
| **दशक चवथा** | **६५** |
| १ श्रवणभक्तिनिरूपण | ६५ |
| २ कीर्तनभजननिरूपण | ६७ |
| ३ नामस्मरणनिरूपण | ६९ |
| ४ पादसेवनभक्तिनिरू० | ७० |
| ५ अर्चनभक्तिनिरू० | ७१ |
| ६ वंदनभक्तिनिरू० | ७३ |
| ७ दास्यभक्तिनिरू० | ७५ |
| ८ सख्यभक्तिनिरू० | ७५ |
| ९ आत्मनिवेदननिरू० | ७७ |

| विषय | पृष्ठ |
|---|---|
| १० मुक्तिचतुष्टयनिरू० | ७८ |
| **दशक पांचवा** | **८०** |
| १ गुरुनिश्चयनिरू० | ८० |
| २ सद्गुरुलक्षणनिरू० | ८२ |
| ३ शिष्यलक्षणनिरू० | ८५ |
| ४ उपदेशलक्षणनिरू० | ९० |
| ५ बहुधाज्ञाननिरू० | ९२ |
| ६ शुद्धज्ञानलक्षणनिरू० | ९३ |
| ७ बद्धलक्षणनिरू० | ९७ |
| ८ मुमुक्षुलक्षणनिरू० | ९९ |
| ९ साधकलक्षणनिरू० | १०० |
| १० सिद्धलक्षणनिरू० | १०३ |
| **दशक सहावा** | **१०५** |
| १ देवशोधननिरू० | १०५ |
| २ ब्रह्मप्रतिपादन | १०६ |
| ३ मायोद्भवनिरू० | १०८ |
| ४ ब्रह्मनिरू० | ११० |
| ५ मायाब्रह्मनिरू० | १११ |
| ६ सृष्टिकथननिरू० | ११३ |
| ७ सगुणभजननिरू० | ११४ |
| ८ दृश्यनिरसन निरू० | ११६ |
| ९ सारशोधननिरू० | ११९ |
| १० अनिर्वाच्यनिरू० | १२० |
| **दशक सातवा** | **१२३** |
| १ मंगलाचरणनिरू० | १२३ |
| २ ब्रह्मनिरू० | १२५ |
| ३ चतुर्दशब्रह्मनिरू० | [illegible] |
| ४ विमलब्रह्मनिरू० | १३[illegible] |
| ५ द्वैतकल्पनिरू० | १३[illegible] |
| ६ बद्धमुक्तनिरू० | १३३ |
| ७ साधनप्रतिष्ठा | १३६ |
| ८ श्रवणनिरू० | १३९ |
| ९ ,, | १४१ |

| विषय | पृष्ठ |
| --- | --- |
| १० देहातीतनिरू० | १४३ |
| **दशक आठवा** | **१४६** |
| ज्ञानदशक | |
| १ देवदर्शननिरू० | १४६ |
| २ आशंकानिरू० | १४८ |
| ३ सूक्ष्मशंकानिरू० | १५१ |
| ४ सूक्ष्मपंचभूतनिरू० | १५३ |
| ५ आकाशभूतनिरू० | १५६ |
| ६ दुश्चिनलक्षणनिरू० | १५९ |
| ७ मोक्षलक्षणनिरू० | १६१ |
| ८ आत्मनिदर्शननिरू० | १६४ |
| ९ सिद्धलक्षणनिरू० | १६७ |
| १० शून्यत्वनिरू० | १६९ |
| **दशक नववा** | **१७२** |
| गुणरूप | |
| १ आशंकानिरू० | १७२ |
| २ ब्रह्मनिरू० | १७४ |
| ३ निःसंदेहनिरू० | १७५ |
| ४ जाणपणनिरू० | १७७ |
| ५ अनुमाननिरसन | १७९ |
| ६ गुणरूपनिरू० | १८१ |
| ७ विकल्पनिरसन | १८३ |
| ८ देहातीतनिरू० | १८५ |
| ९ संदेहवारण | १८७ |
| १० अलिप्तस्थिति | १८८ |
| **दशक दहावा** | **१९०** |
| जगज्योति. | |
| १ अंतःकरणनिरूपण | १९० |
| २ देहाशंकानिरू० | १९१ |
| ३ ,, | १९२ |
| ४ बीजलक्षणनिरू० | १९३ |
| ५ पंचमलयनिरू० | १९५ |
| ६ भ्रमनिरू० | १९६ |
| ७ सगुणभजन | १९८ |
| ८ प्रचीतिनिरू० | १९९ |
| ९ प्रकृतिपुरुषनिदर्शन | २०१ |
| १० चळाचळनिरू० | २०२ |
| **दशक अकरावा** | **२०५** |
| भीमदशक | |
| १ सिद्धांतनिरू० | २०५ |
| २ चत्वारदेवनिरू० | २०७ |
| ३ शिक्षानिरू० | २०९ |
| ४ विवेकनिरू० | २१० |
| ५ राजकारणनिरू० | २११ |
| ६ महंतलक्षणनिरू० | २१२ |
| ७ चंचलनदीनिरू० | २१३ |
| ८ अंतरात्मविवरण | २१४ |
| ९ उपदेशनिरू० | २१५ |
| १० निःस्पृहवर्तन | २१६ |
| **दशक बारावा** | **२१७** |
| विवेकवैराग्य. | |
| १ विमललक्षणनिरू० | २१७ |
| २ प्रत्ययनिरू० | २१८ |
| ३ देवभक्तनिरू० | २१९ |
| ४ विवेकवैराग्य | २२० |
| ५ आत्मनिवेदन | २२१ |
| ६ सृष्टिक्रमनिरू० | २२२ |
| ७ विषयत्यागनिरू० | २२४ |
| ८ कालनिरूपण | २२५ |
| ९ यत्नशिक्षा | २२६ |
| १० उत्तमपुरुषनिदर्शन | २२८ |
| **दशक तेरावा** | **२२९** |
| नामरूप | |
| १ आत्मानात्मविवेक | २२९ |
| २ सारासारनिरू० | २३१ |
| ३ उभारणी—निरू० | २३२ |

| विषय | पृष्ठ |
|---|---|
| ४ प्रलयनिरू० | २३३ |
| ५ काहाणी–निरू० | २३४ |
| ६ लघुबोध | २३५ |
| ७ प्रत्ययनिरू० | २३६ |
| ८ कर्तृनिरू० | २३७ |
| ९ आत्मविवरण | २३९ |
| १० बोधनिरू० | २४१ |
| **दशक चवदावा** | **२४२** |
| अखंडध्यान | |
| १ निःस्पृहलक्षणनिरू० | २४२ |
| २ भिक्षानिरूपण | २४५ |
| ३ कवित्वलक्षण | २४६ |
| ४ कीर्तनलक्षण | २४८ |
| ५ हरिकथानिरू० | २५० |
| ६ चातुर्यलक्षणनिरू० | २५१ |
| ७ युगधर्म निरू० | २५३ |
| ८ अखंडध्याननिरू० | २५४ |
| ९ शाश्वतनिरू० | २५७ |
| १० मायानिरू० | २५८ |
| **दशक पंधरावा** | **२५९** |
| आत्मदशक | |
| १ चातुर्यनिरू० | २५९ |
| २ निःस्पृहलक्षण | २६० |
| ३ श्रेष्ठअंतरात्मनिरू० | २६२ |
| ४ शाश्वतब्रह्मनिरू० | २६३ |
| ५ चंचललक्षणनिरू० | २६४ |
| ६ चातुर्यलक्षणनिरू० | २६६ |
| ७ अधोर्ध्वनिरू० | २६७ |
| ८ सूक्ष्मजीवनिरू० | २६९ |
| ९ पिंडोत्पत्तिनिरू० | २७० |
| १० सिद्धांतनिरू० | २७२ |
| **दशक सोळावा** | **२७३** |
| सप्ततिन्वय | |
| १ वाल्मिकस्तवन | २७३ |
| २ सूर्यस्तवन | २७४ |
| ३ पृथ्वीस्तवन | २७५ |
| ४ आपनिरूपण | २७६ |
| ५ अग्निस्तवनिरू० | २७८ |
| ६ वायुस्तव | २७९ |
| ७ महद्भूतस्तव | २८० |
| ८ अंतरात्मनिरू० | २८२ |
| ९ उपासनानिरू० | २८३ |
| १० गुणभूतनिरू० | २८४ |
| **दशक सतरावा** | **२८६** |
| प्रकृतिपुरुष | |
| १ देवबलात्कार | २८६ |
| २ शिवशक्तिनिरू० | २८७ |
| ३ श्रवणोपदेशनिरू० | २८८ |
| ४ अनुमाननिरू० | २८९ |
| ५ अजपानिरू० | २९१ |
| ६ देहात्मनिरू० | २९२ |
| ७ जगर्ज्जीवननिरू० | २९३ |
| ८ तत्त्वविवरण | २९४ |
| ९ तनुचतुष्टयनिरू० | २९६ |
| १० टोणपसिद्धनिरू० | २९७ |
| **दशक अठरावा** | **२९८** |
| बहुजिनसी | |
| १ बहुदेवस्थान निरू० | २९८ |
| २ सर्वज्ञसंगनिरू० | २९९ |
| ३ निःस्पृहनिरू० | ३०० |
| ४ देहदुर्लभनिरू० | ३०१ |
| ५ करंटपरीक्षानिरू० | ३०३ |
| ६ उत्तमपुरुषनिरू० | ३०४ |
| ७ जनस्वभावनिरू० | ३०५ |

| विषय | पृष्ठ |
| --- | --- |
| ८ अंतर्देवनिरू० | ३०६ |
| ९ निद्रानिरू० | ३०७ |
| १० श्रोतावलक्षणनिरू० | ३०८ |
| **दशक एकोणिसावा** | **३१०** |
| शिकवण. | |
| १ लेखनाक्रियानिरू० | ३१० |
| २ विकरणनिरू० | ३११ |
| ३ करंटलक्षणनिरूपण | ३१२ |
| ४ सदैवलक्षणनिरू० | ३१३ |
| ५ देहमान्यानिरू० | ३१५ |
| ६ बुद्धिवादानिरू० | ३१६ |
| ७ यत्नानिरू० | ३१७ |
| ८ उपाधिनिरू० | ३१९ |
| ९ राजकारणनिरूपण | ३२० |
| १० विवेकलक्षणनिरू० | ३२१ |
| **दशक विसावा** | **३२२** |
| १ पूर्णापूर्णनिरू० | ३२२ |
| २ विविधसृष्टिनिरू० | ३२४ |
| ३ सूक्ष्मनाभिधाननिरू० | ३२५ |
| ४ आत्मानिरू० | ३२६ |
| ५ चत्वारजिन्नसनिरू० | ३२८ |
| ६ आत्मनिरू० | ३२९ |
| ७ ,, | ३३० |
| ८ देहक्षेत्रनिरू० | ३३१ |
| ९ सूक्ष्मानिरू० | ३३३ |
| १० विमलब्रह्मनिरू० | ३३४ |

# रामदासकृत अन्वयव्यतिरेक.

## अन्वय.

श्रीगणेशाय नमः ॥ जय जयाजी लंबोदरा । सर्वसिद्धिगुणसागरा । सकल विद्यार्णवगरा । आदिपुरुषा ॥ १ ॥ सर्व कर्तृत्वासी आरंभ । आदिमूर्ती मूळारंभ । उपाधिहीन निरावलंब । स्वरूप तुझें ॥ २ ॥ ऐक्यभावें नमन । करूं निजध्यासें नमन । हें ह्मणतांचि नमन । माझें तुज ॥ ३ ॥ सर्वमंगल मंगला मूर्ती । वर्णजननी मूळस्फूर्ती । सर्वाक्षरीं वर्तती । व्यापकपणें ॥ ४ ॥ जी वेदमाता गायत्री । त्रिपदा सावित्री । ब्रह्मदुहिता धात्री । हंसवाहिनी ॥ ५ ॥ सकळपरा संजीवनी । अर्धमात्रा षड्गुणी । प्रणवात्मकै चतुर्थ वाणी । नमन माझें ॥ ६ ॥ आतां वंदीन देवाधिदेवो । सर्वश्रेष्ठ स्वामीरावो । तया निजपदीं ठावो । निवांत मज ॥ ७ ॥ जें जें करावें स्तवन । तें तें स्वामीरावोचि जाण । स्वामीरावो अधिष्ठान । तेचि ते गमावे ॥ ८ ॥ नमस्कारूनि स्वामीचे चरण । मग केलें कृपावलोकन । तेणें आलें समाधान पूर्ण । अभयकरें ॥ ९ ॥ स्वामीकृपेचा लोट आला । तो माझे हृदयीं सामावला । येन्हवीं मज मंदमतीला । योग्यता कैंची ॥ १० ॥ आतां वंदीन कुळदैवत । लीलाविग्रही रघुनाथ । जो असे प्रतिपाळित । आपल्या भक्तां ॥ ११ ॥ सकळ कुळासी पालक । सर्व शरीरांस चालक । ब्रह्मादिकांचा जनक । दैवतनाथ ॥ १२ ॥ आत्माराम सकलांचा । देवदानवं मानवांचा । तोचि श्रीराम आमुचा । कुळस्वामी ॥ १३ ॥ आत्माराम सर्व देहीं । तोचि माझिये निजहृदयीं । सीता प्रकृति पुरुष पाही । राम झाला ॥ १४ ॥ तंव शिष्यें विनविलें । जी आताचि हें बोलिलें । प्रकृति ऐसें नाम ठेविलें । कोण्या पदार्थासी ॥ १५ ॥ आणि पुरुष तो कवण । तयाचें स्वरूप किंलक्षण । सगुण किंवा निर्गुण । निश्चयेंसी ॥ १६ ॥ माया ईश्वर अनिर्वाच्य । सृष्टिउद्भव निर्वाच्य । कोणें केला विसंच । मागुता स्वामी ॥ १७ ॥ जीव तो कवण । तयासी कैसें जन्ममरण । आणि सायुज्यमुक्तीचें ज्ञान । मज निरूपावें ॥ १८ ॥ ऐसें शिष्यें विनविलें । धरिलीं सदृढ पाउलें । सद्गदित होतां आले । अश्रुपात दुःखें ॥ १९ ॥ बहुत भोगिल्या पुनरावृत्ती । त्रिविधतापांची विपत्ती । चुकवूनि सायुज्यमुक्ती । दिधली पाहिजे ॥ २० ॥ ऐसीं करुणेचीं वचनें । भवगजपंचाननें । ऐकोनि कृपावलोकनें । अभय दिधलें ॥ २१ ॥ व्यतिरेक अन्वय हे दोनी । अष्ट देहांची उभवणी । त्यासि बोलिजे वचनीं । अन्वय ऐसें ॥ २२ ॥ उद्भवाचा संहार । ज्ञानप्रलय निरंतर । त्यासि बोलिजे साचार । व्यतिरेक ऐसें ॥ २३ ॥ गुरुशिष्यांचा संवाद । पंचीकरण महावाक्यबोध । जेणें तुटे भवबंध । श्रवणमात्रें ॥ २४ ॥ तेंचि पुढें निरूपण । अन्वयाचें लक्षण । सांगितलें तरी सावधान । होईं आतां ॥ २५ ॥ इतिश्री अन्वय । केलाचि करूं निश्चय । प्रचीतीनें सांपडे सोय । स्वस्वरूपाची ॥ २६ ॥

इति श्रीमद्रामदासविरचिते अन्वयव्यतिरेके प्रथमः समासः ॥ १ ॥

---

१ गणपते. २ विद्यासमुद्राचें सार अशा. ३ ओंकाररूप. ४ लीलायुक्त आहे विग्रह-शरीर ज्याचें असा. ५ असुर. ६ जन्ममरणाचे फेरे. ७ संसाररूपी हत्तीला सिंहासारखा जो त्यानें.

श्रीराम समर्थ ॥ ॥ मुळीं ब्रह्म निराकार । निराभास परात्पर । निर्गुण वस्तु निराधार । असतचि असे ॥ १ ॥ जेथें जाणणें ना नेणणें । जेथें उपजणें ना मरणें । तेथें येणें ना जाणें । अक्षेचिना ॥ २ ॥ उपाधिविणें जें आकाश । तेंचि ब्रह्म निराभास । तये निराभासीं मूळमायेस । जन्म जाहला ॥ ३ ॥ अरे जें मुळीं जालेंचि नाहीं । त्याची वार्ता सांगों कायी । प्रबोधनिमित्त कांहीं । बोलणें लागे ॥ ४ ॥ मुळीं ब्रह्म निराकार । तेथें स्फूर्तिरूपें अहंकार । तो पंचभूतांचा विस्तार । ज्ञानदशकीं बोलिला ॥ ५ ॥ अहं ब्रह्मास्मि ऐसें स्फुरण । महावाक्यचतुष्टय जाण । हरिसंकल्प हे प्रमाण । बोलिलें अन्त्रयीं ॥ ६ ॥ तें स्फुरण जाणीवरूप । जाणीवेआंगीं वायुस्वरूप । ऐसे हे दोनी प्रकार एकरूप । असती सदा ॥ ७ ॥ जाणीवरूप स्फुरण जालें । त्यातें अनिर्वाच्य बोलिलें । त्यातें ईश्वर ऐसें नाम ठेविलें । मायागुणें ॥ ८ ॥ जोंवर असतेपण मूळमायेसी । तंववरी साक्षित्व ब्रह्मासी । जाणीव ईश्वर तयासी । नांव पडिलें ॥ ९ ॥ मूळ प्रकृति महाकारण । देह सर्वेश्वराचें जाण । त्यांत पंचभूतें जाण । सूक्ष्म असती ॥ १० ॥ वायु प्रकृति जाणीव पुरुष । दोनी मिळोनि अंतरात्मा विशेष । तोचि सकळांचा ईश मायागुणें ॥ ११ ॥ सृष्ट्यादिक इच्छा जाली । तेचि अव्याकृती बोलिली । गुणत्रयातें प्रसवली । ह्मणोनि गुणक्षोभिणी बोलिजे ॥ १२ ॥ ऐसा हा दुसरा देह । कारण सर्वेश्वराचा निःसंदेह । तेथूनि हिरण्यगर्भ देवतामय । निर्माण जालें ॥ १३ ॥ सत्वगुणीं पंचक । रजोगुणीं पंचदशक । तमोगुणीं पंचभूतिक । तन्मात्रा जाल्या ॥ १४ ॥ ऐसे पंचवीस प्रकार । मिळोनि हिरण्यगर्भ साचार । तिसरा देह निरंतर । बरा पाहों ॥ १५ ॥ भूतें जडत्वा पावलीं । तेव्हां देवीं शरीरें धरिलीं । त्यासी विराटकाया बोलिली ॥ ईश्वराची ॥ १६ ॥ पुढें चत्वारी खाणी जाली । कर्त्यानें निर्माण केली । पुढें पंचीकरणें बोली । सावध ऐका ॥ १७ ॥ ऐसे देह चत्वार । सर्वेश्वराचे साचार । त्यांचे निराभासी सार । अनिर्वाच्य असे ॥ १८ ॥ मूळमाया अव्याकृती । हिरण्यगर्भ देवतामय असती । चौथे विराट हे जड स्थिती । ब्रह्मांडाची ॥ १९ ॥ महाकारणरूप ज्ञान । कारणरूप अज्ञान । लिंगदेह वासनात्मक जाण । वायु असे ॥ २० ॥ ज्ञान अज्ञान वासनात्मक । तिन्ही मिळोनी रूप एक । प्रकृतिपुरुषांचे अंशक । असती येथें ॥ २१ ॥ अंतःकरण मन बुद्धि चित्त अहंकार । आकाशपंचकाचा विचार । मूळपुरुषाचे अंश हे निर्धार । पांचहि एक ॥२२॥ एक अंतरात्म्याचिया । असती पांचहि क्रिया । ह्मणोनि आकाश तया । ह्मणिजेत असे ॥ २३ ॥ प्राण अपान व्यान उदान समान । हे मूळ वायूचे अंश जाण । पांचहि नांवें भिन्न जाण । क्रियापरत्वें ॥ २४ ॥ श्रोत्रं त्वचा चक्षु जिव्हा घ्राण । हें तेजपंचक ज्ञानेंद्रिय जाण । कर्मेंद्रियपंचक सांगेन । सावध ऐका ॥ २५ ॥ वाचा पाणी पाद । शिश्न आणि गुद । हे आपांशे प्रसिद्ध । ओळखणें ॥ २६ ॥ शब्द स्पर्श रूप रस गंध । हे पंच विषय पृथ्वीचे विशंद । ये गोष्टीचा संवाद । प्रांजळ ऐका ॥ २७ ॥ ऐसीं हीं पांच पंचकें । तीन असती क्रियारूपकें । दोन्ही प्रचीतीसी ओळखे । अंतःकरण प्राण ॥ २८ ॥

१ उपदेशानिमित्त. २ विकाररहित माया. ३ गुणांना प्रगट करणारी. ४ खरोखर. ५ चार. ६ नाशामध्यें. ७ कान. ८ नाक. ९ उदकाचे अंश. १० स्पष्ट.

अंतःकरण जाणीवरूप । प्राणवायु मायारूप । दोन्ही मिळोनि एक । अंतरात्मा तो ॥ २९ ॥ निखिल जाणीव ब्रह्मांश । जीव बोलिजे तयास । मायायोगें विशेष । अंतरात्मा ह्मणती ॥ ३० ॥ तिन्ही पंचकें क्रियारूप । दोन्ही जिन्नस मायास्वरूप । पांचहि मिळोनि लिंगदेहरूप । सूक्ष्म असे ॥ ३१ ॥ अंतःकरणपंचक जाणतें । प्राणपंचक चेतवितें । इंद्रियद्वारें भरोनि करावितें । विषयक्रिया ॥ ३२ ॥ जड चंचळ निश्चळ । त्रिपुटीयोगें क्रिया सबळ । वियोग होतां केवळ । कर्तृत्व कैंचें ॥ ३३ ॥ दशेंद्रियें स्थूळीं असती । क्रियारूपें सूक्ष्मीं वर्तती । देहात्मयोगें उठती । नाना क्रिया ॥ ३४ ॥ सूर्य सूर्यकांत आणि कापूस । चौथा अग्नि होय दृश्य । ह्मणऊनि कर्तृत्व विशेष । संयोगाचें ॥ ३५ ॥ तैसें अंतःकरण निश्चळ । प्राणयोगें चंचळ । इंद्रिययोगें केवळ । कर्तृत्व भासे ॥ ३६ ॥ असो हे कथा । स्थूळदेहाची व्यवस्था । निरूपण कीजेल आता । अवधानें यावें ॥ ३७ ॥ अस्थि मांस त्वचा नाडी रोमें । हे पृथिवीचे गुण सुगम । प्रत्यक्ष शरीरीं वर्में । प्रचीत पाहतां ॥ ३८ ॥ लाळ मूत्र शुक्रें शोणित स्वेदें । हे आपांश प्रसिद्ध । अग्निगुण विशद । सावध ऐका ॥ ३९ ॥ क्षुधा तृषा आलस्य निद्रा मैथुन । हे अग्नीचे अंश जाण । या तत्त्वाचें विवरण । केलेंचि करावें ॥ ४० ॥ चळण वळण आकुंचन । प्रसारण आणि निरोधन । हे वायूचे विशेष गुण । प्रसिद्ध असती ॥ ४१ ॥ काम क्रोध शोक मोह भय । हें आकाश निःसंशय । ये गोष्टीचा प्रत्यय । सावध ऐका ॥ ४२ ॥ आकाशादि आपपर्यंत । चारी पंचकें जीं असत । ते देहात्मयोगें वर्तत । जडदेहीं ॥ ४३ ॥ देहआत्म्याची संगती । तोंवरी चारी पंचकें दिसती । वियोग होतां प्रचीती । एक उरे ॥ ४४ ॥ ह्मणोनि पृथ्वी अधिष्ठान स्थूलदेहाचें । अंतरात्मा अधिष्ठान लिंगदेहाचें । देहात्मयोगें त्रेताळीसाचें । कर्तृत्व उठे ॥ ४५ ॥ तें कर्तृत्व ह्मणसी कैसें । चित्त ठेऊन ऐक अंमळसें । परी हे प्रचीती विश्वासें । अंतरीं धरी ॥ ४६ ॥ तरी अंतःकरणपंचक । चत्वारी क्रिया जाणीव एक । तैसेंचि प्राणपंचक । त्याचि सारखें ॥ ४७ ॥ इंद्रियदशक विषयपंचक । देहात्मयोगें क्रियारूपक । पंचदश अंशक । क्रियालिंगीं ॥ ४८ ॥ स्थूळीं चार पंचकें । लिंगींचीं तेवीस नेमकें । दोनीहि मिळोनि विवेकें । त्रेताळीस जालीं ॥ ४९ ॥ ह्मणोनि जाणीव वायु लिंगदेह । जीव अंतरात्मा निःसंदेह । वायुनिरासें होय । जीव ब्रह्म ॥ ५० ॥ स्थूळ देह पृथ्वीरूपक । लिंगदेह वायु वासनात्मक । कारण महाकारणाचें कौतुक । याचमध्यें ॥ ५१ ॥ सूक्ष्म कारण महाकारण । दोन्ही मिळोनि एक सान । ऐसे दोन्ही देह जाण । प्रचीतिरूप ॥ ५२ ॥ ऐसेचि देहद्वय ईश्वराचे । असे प्रचीतिरूपाचे । विराट हिरण्यगर्भ साचे । निश्चयात्मक ॥ ५३ ॥ तरी तो निश्चय केला कैसा । तुज निरोपिजेल ऐसा । अनुमान भ्रमाचा वळसा । सांडूनि यावा ॥ ५४ ॥ विराट जड पृथ्वीरूप । जितुकें दृश्याचें कौतुक । आप अग्नि द्वय एक । तिन्ही भूतें ॥ ५५ ॥ तिन्ही भूतें दृश्य जड । वायु आकाशें चंचळ अजड । प्रकृति अव्याकृति हा पवाड । दोन्हीचमध्यें ॥ ५६ ॥ भूतें दैवतें देवी देव । वायुचक्रीं असती सर्व । कार्यामुळें अवेवें । दाखविती ॥ ५७ ॥ आकाश अंतःकरण जाणीव ।

---

१ लक्ष. २ केंस. ३ रेत. ४ रक्त. ५ घाम. ६ आश्रयस्थान. ७ चार. ८ पराक्रम. ९ अवयव.

तोहि वायूचा स्वभाव । आकाश वायू निरावेव । एकचि रूप ॥ ५८ ॥ मूळप्रकृती अव्याकृती । हिरण्यगर्भ देवतामय असती । तिन्ही मिळोनी प्रचीती । द्वयभूतिक ॥ ५९ ॥ त्रय भूतें अधिष्ठान विराटाचें । द्वयभूतें अधिष्ठान हिरण्यगर्भाचें । गुणसाम्य गुणक्षोभिणीचें । तेंचि रूप ॥ ६० ॥ ह्मणोनी ईश्वरीं देह । द्वय असती निःसंदेह । तिन्ही भूतें अविद्यामय । द्वयें मायेचीं ॥ ६१ ॥ देहद्वयाचें बंधन । जीवासि ह्मणती विवेकी जन । तैसेंचि सर्वेश्वरीं जाण । तत्प्रकारेंचि ॥ ६२ ॥ ऐसीं पिंडीं दोन ब्रह्मांडीं दोन । चत्वारी देह प्रचीति प्रमाण । यावेगळें अनुमानज्ञान । बोलोंचि नये ॥ ६३ ॥ इतिश्री अन्वय । केलाचि करूं निश्चय । प्रचीतीनें सांपडे सोय । स्वरूपाची ॥ ६४ ॥ इति द्वितीयः समासः ॥ २ ॥

श्रीराम समर्थ ॥ ॥ चत्वारी देहांचिया । असती बत्तीस क्रिया । तेहि सांगों यथान्वया । प्रचीतीनें ॥ १ ॥ जागृति स्वप्न सुषुप्ती तुर्या । चत्वारी अवस्था चौं देहांचिया । विवरोनी पाहतां संशया । वेगळें होईजे ॥ २ ॥ उत्पत्ति स्थिति संहार । सर्वसाक्षिणी निरंतर । ऐशा अवस्था चत्वार । ईश्वराच्या ॥ ३ ॥ विश्व तैजस प्राज्ञ । प्रत्यगात्मा अभिमान । चौं देहांचे चारी जाण । ब्रह्मा विष्णु त्रिनयन । चौथा सर्वेश्वर ॥ ४ ॥ नेत्रस्थान कंठस्थान । हृदयस्थान मूर्धिनस्थान । कैलास सत्यलोक वैकुंठस्थान । चौथें निरावलंब ॥ ५ ॥ स्थूलभोग प्रविविक्तभोग । आनंदभोग आनंदावभासभोग । ऐसे हे चत्वार भोग । चौंदेहांचे ॥ ६ ॥ स्थूळशरीरीं जें भोगिजे । त्यासि स्थूळभोग बोलिजे । स्वप्नभोक्तृत्व घडलें जें । त्यासि प्रविविक्तभोग ह्मणिजे ॥ ७ ॥ सुषुप्तीमध्यें जो भोग । त्यासि ह्मणावें आनंदभोग । तिहीं भोगांचा साक्षित्वयोग । आनंदावभास भोग तो ॥ ८ ॥ अकार उकार मकार, । अर्धमात्रा निर्धार । चारी मात्रा विस्तार । चौं देहांचा ॥ ९ ॥ रजोगुण सत्वगुण । तमोगुण शुद्धसत्वगुण । ऐसे चत्वार गुण । चौं देहांचे ॥ १० ॥ क्रियाशक्ती इच्छाशक्ती । द्रव्यशक्ती ज्ञानशक्ती । ऐशा चत्वार शक्ती । असती उभयतां ॥ ११ ॥ परा पश्यंती मध्यमा वैखरी । चौं देहांच्या वाचा चारी । ईश्वरीं ह्मणती वेद चारी । परी ते काल्पनिक ॥ १२ ॥ ते काल्पनिक ह्मणसी कैसे । तरी स्थिरचित्तें एक अंमळसें । प्रचीतीनें विश्वासें । हृदयीं धरी ॥ १३ ॥ स्वरूपीं परारूप स्फुरण । तेंचि प्रणवरूप जाण । यामध्यें मात्रा एकावन्न । त्या तत्पदत्वें ॥ १४ ॥ वेद ह्मणिजे प्रत्यक्ष वैखरी । वैखरी जडशरीरीं । नाद ध्वनी ह्मणसी जरी । तेहि तंरी देहात्मयोगें ॥ १५ ॥ मुळीं जडदेह कैंचा । उच्चार व्हावया शब्दाचा । अथवा विचार नादध्वनींचा । तोहि नसे ॥ १६ ॥ पुढें विराट स्थूलदेह जाहले । ब्रह्मयानें शरीर धरिलें । तेव्हां सर्वहि प्रगटलें । मातृकाजातें ॥ १७ ॥ ओंम्पिंडीं परा प्रणव । तोचि वायूचा स्वभाव । देहयोगें सावेव । मात्रा उठती ॥ १८ ॥ परेपासोनी पश्यंती मध्यमा । ध्वनी नादाचा महिमा । कंठीं आले जन्मा । षोडश स्वर ॥ १९ ॥ तो प्रणवनाद मुखासि आला । अक्षराचा उच्चार जाला । पंचतीस मातृका तयाला । म्हणती बीज ॥ २० ॥ आदिबीज प्रणव । षोडश स्वर शाखा पल्लव । पंचतीस फळें सावेव । भवटक्ष

---

१ अज्ञानमय. २ क्रमपूर्वक. ३ चतुर्थावस्था. ४ शंकर. ५ गाढ झोपेमध्यें. ६ ओंकाररूप. ७ चवथी वाणी. ८ देहामुळें. ९ अक्षरसमूह. १० सोळा.

हा ॥ २१ ॥ ऐसिया बावन्न मात्रामात्रें । तेथुनी जालीं वेदशास्त्रें । पुढें ऋषिमुखें पवित्रें । पुराणें जालीं ॥ २२ ॥ अशा ह्या बत्तीस क्रिया । दों देहांच्या त्रेताळीस क्रिया । ऐसिया मिळोनियां पंचाहत्तर क्रिया । वेगळ्या दोनी ॥ २३ ॥ ज्ञान अज्ञान या दोन । सत्याहत्तरी जाल्या मिळोन । देहात्मयोगें जाण । कर्तृत्व उठे ॥ २४ ॥ सातांची सत्याहत्तरी ऐसी । त्यांत त्याची प्रचीती ऐसी । विचारूनियां मानसीं । जाण तुजसी निरोपिली ॥ २५ ॥ नामरूप क्रिया । सांगीतल्या यथान्वया । आत्मशास्त्रगुरुप्रत्यया । निश्चय केला ॥ २६ ॥ इतुकें जाणोनि निरास करणें । तरीच स्वसुख लाधणें । ह्मणोनि आधीं विवरणें । ग्रंथांतरीं ॥ २७ ॥ इतिश्री अन्वय । केलाचि करूं निश्चय । स्वामिकृपें निःसंशय । होइजे येथें ॥ २८ ॥ इति तृतीयः समासः ॥ ३ ॥ इति अन्वयः समाप्तः ॥

## व्यतिरेक

॥ श्रीराम समर्थ ॥ ॥ ऐसा हा अन्वय जाला । स्वल्प संकेतें बोलिला । न्यून पूर्ण क्षमा केला । पाहिजे संतीं ॥ १ ॥ पुढें व्यतिरेक निरूपण । निरोपिजेल जाण । येथें श्रोतीं सावधपण । अर्थ पाहावा ॥ २ ॥ व्यतिरेक ऐसें ह्मणिजे । अन्वयेंचि ओळखिजे । येथें मूळमाया न साजे । येथें शब्द कैंचा ॥ ३ ॥ दोरीचा सर्प जालाचि नाहीं । तेथें अन्वय कैचा कांहीं । संसार तो मुळींच नाहीं । ह्मणूनियां ॥ ४ ॥ स्वरूपीं कांहीं जालें असतें । तरी तयासी संहारिजेतें । पूर्वीं कांहीं जालेंचि नाहीं तें । काय मारावें ॥ ५ ॥ नसोनि जालेंसें वाटलें । ह्मणोनि उद्भवासि बोलिलें । नसतें अज्ञान देखिलें । अन्वयें येथ ॥ ६ ॥ जें लटिकें उद्भवलें । तयापरी संहारिलें । तयासी नांव ठेविलें । व्यतिरेक ऐसें ॥ ७ ॥ उद्भवासी पंचप्रळय बोलिले । शास्त्रीं असे निरोपिलें । तेंहि पाहिजे परिसविलें । स्वानुभवेंसी ॥ ८ ॥ पिंडीं दोन्ही ब्रह्मांडीं दोन्ही । पांचवा जाणिजे ज्ञातेजनीं ॥ हीच कथा मुळींहुनी । सावध ऐका ॥ ९ ॥ प्राणी जेव्हां निजेला । तेव्हां जागृतीव्यापार राहिला । स्वप्न अथवा सुषुप्ती त्याला । प्राप्त होय ॥ १० ॥ यासि बोलिजे निद्राप्रळय । जागृतीचा होतो क्षय । पुढें देहांतसमय । ह्मणिजे मृत्यु ॥ ११ ॥ देह आत्मयाचे संगती । सुटतां होय मृती । प्राप्ती तो मृत्युप्रळय श्रोतीं । पिंडीं ओळखावा ॥ १२ ॥ जोंवरी अज्ञान न नासे । तोंवरी जन्ममृत्यू न निरसे । ह्मणोनी स्वरूपज्ञाना ऐसें । सार नाहीं ॥ १३ ॥ चत्वारी युगें सहस्र होती । ब्रह्मयाची निद्रा प्राप्ती । तोचि लघुप्रळय श्रोतीं । ब्रह्मांडीं ओळखावा ॥ १४ ॥ चत्वारी खाणी नासती । पंचभूतें तैसींचि असती । ब्रह्मयाची उठतां संसृती । खाणीस होय ॥ १५ ॥ ऐसा लघुप्रळय । ब्रह्मांडींचा निःसंशय । तिहीं देवांचें वेंचे वय । तो महाप्रळय बोलिजे ॥ १६ ॥ शत वर्षे मेघ जाती । तेणें प्राणी मृत्यु पावती । वायुचक्रीं असती । देह सांडोनी ॥ १७ ॥ शत वर्षे मेघ गेले । तेणें प्राणी मृत्यु पावले । वायुचक्रीं वास्तव्य केलें । देह सोडोनियां ॥ १८ ॥ बारा कळीं सूर्यमंडळ । किरणापासाव निघती ज्वाळ । शत संवत्सर हा भूगोळ । दहन होय ॥ १९ ॥ शंभर वर्षे मेघ नाहीं । पृथ्वी शुष्क

---

१ एका गोष्टीच्या नास्तित्वावर दुसऱ्या गोष्टीचें नास्तित्व अवलंबून असणें. २ मरण. ३ आश्रय, आधार.

जाली सर्वेही । सूर्य जाळी तेही । पाताळपर्यंत ॥ २० ॥ शेषाच्या फणा पोळल्या । त्या हळहळोनि गरळा वमिल्या । तेणें अग्नीनें जाळिल्या । पाताळव्यक्ती ॥ २१ ॥ शेषकूर्म जळाले । मेरूचे कडे कोसळले । तेव्हां देवीं सांडिले । स्थूल देह ॥ २२ ॥ पृथिवी अवघी तप्त जाली । जळोनी विरी सांपडली । आवैरणोदकीं कालविली । तियेची रक्षा ॥ २३ ॥ स्वर्ग मृत्यु पाताळ । तिहीं लोकींचीं शरीरें सकळ । नासोनि उरलीं केवळ । लिंगरूपें प्रभंजनीं ॥ २४ ॥ त्यावरी महावृष्टि जाली । मेघीं गर्जना मांडिली । नानापरीचा उठली । ध्वनी विद्युल्लतांची ॥ २५ ॥ पर्वतांतून पडती गारा । असंभाव्य सुटतो वारा । निबिड तया अंधकारा । तया उपमा कैंची ॥ २६ ॥ नया समुद्र एकवटले । आवरणवेढे मोकळे जाले । उदकरूप जालिया खवळे । प्रळयपावक ॥ २७ ॥ समुद्रींचा वडवानळ । शिवनेत्रींचा नेत्रानळ । सूर्य आणि विद्युल्लतेचा मेळ । आणि वनाग्नि ॥ २८ ॥ अग्नि मात्र एक झाले । तेणें उदक शोषिलें । तया वन्हीस झडपिलें । प्रळयवातें ॥ २९ ॥ तो जैसा दीप मावळला । तैसा प्रळयाग्नि विझाला । पुढें निखिल वायु उरला । आकाशपंथें ॥ ३० ॥ जोंवरी आस्तिक्य वायूसी । तोंवरी आकाशत्व ब्रह्मासी । तया वायूचे विनाशीं । नभत्व कैंचें ॥ ३१ ॥ सूक्ष्म भूतें त्रिगुण । महत्तत्व मूळमाया जाण । वायूरूपें विवरण । करूनि पाहावें ॥ ३२ ॥ तो वायु जेव्हां विराला । तेव्हां नाश झाला त्रिगुणांला । महत्तत्त्व मूळमायेला । तयाचिसारिसा ॥ ३३ ॥ मूळमायेचेनि गुणें । ईश्वर ब्रह्मासी ह्मणणें । तिचा नाश होतां कोणें । ईश्वर ह्मणावें ॥ ३४ ॥ जोंवरी मायेसी असतेपण । तोंवरी ईश्वरीं जाणपण । तिच्या निरासीं पूर्ण । जाणीव कैंचीं ॥ ३५ ॥ द्रष्टा साक्षी सत्ता । हे गुण मायेचिकरितां । जाणीव ईश्वर तत्त्वतां । तियेसीचि म्हणिजे ॥ ३६ ॥ ब्रह्म ऐसें जें म्हणणें । तेंहि तियेच्या गुणें । ते जाणीव नसतां कोणें । शब्द बोलावा ॥ ३७ ॥ ह्मणूनि जें अनिर्वाच्य । तेथें कैंचें नाम निर्वाच्य । ऐसेंहि बोलणें आहाच । कैंचें तेथें ॥ ३८ ॥ ऐसे हे प्रळय चारी । निरोपिले अवधारी । पुढें पांचव्याची परी । सावध ऐका ॥ ३९ ॥ परी ज्ञानेंविण लया गेले । ते मागुती उद्भवले । याकारणें निरासिलें । पाहिजे अज्ञान ॥ ४० ॥ ह्मणोनि ज्ञानप्रळय श्रेष्ठ । चहूं प्रळयांहूनि वरिष्ठ । येणें चुके अरिष्ट । जन्ममृत्यूंचें ॥ ४१ ॥ तेंचि पुढें निरूपण । पंच प्रळयांचें लक्षण । स्वामीविरहित कोण । पावूं शके ॥ ४२ ॥ इतिश्री व्यतिरेक । याचा करावा निश्चय विवेक । स्वामिकृपें निश्चयात्मक । मोक्ष होय ॥ ४३ ॥ इति चतुर्थः समासः ॥ ४ ॥

॥ श्रीराम समर्थ ॥ तंव स्वामी ह्मणती शिष्यातें । आतां परिस एकाचित्तें । साधन नाहीं श्रवणापरतें । श्रेष्ठ जनीं ॥ १ ॥ तें श्रवणसाधन कोणतें । जनीं असती बहुत मतें । त्यांत थोर अध्यात्मनिरूपण तें । मोक्षदातें ॥ २ ॥ मायाब्रह्म ओळखावें । अध्यात्म तयासी ह्मणावें । अन्वयव्यतिरेकाचें जाणावें । रूप आधीं ॥ ३ ॥ ईश्वर नांव कोणासी । पडिलें कोण्या कार्यासी । जीवत्व परमात्मयासी । काय निमित्त ॥ ४ ॥ आपण कोण देव कोण । कैसी त्याची ओळखण । विचारावें त्या नांव ज्ञान । मनन

१ विषाला. २ ओकल्या. ३ आच्छादनरूप उदकामध्यें. ४ वायूमध्यें. ५ विजांची. ६ प्रलयकाळचा अग्नि. ७ नेत्रांतील अग्नि. ८ आत्मज्ञानविषयक कथन.

बोलिजे ॥ ५ ॥ स्वरूपीं सदा सावधपण । त्या नांव निदिध्यासन । तुटतां द्वैतानुसंधान । साक्षात्कार तो ॥ ६ ॥ ऐसें चत्वार ऐक्य होतां । तेव्हांचि होय सायुज्यता । नुसतें शब्दज्ञान बोलतां । मोक्ष कैसा ॥ ७ ॥ बोलूनि शब्दज्ञान । क्रिया घडेना तत्प्रमाण । तरी तें जाण विपरीत ज्ञान । निश्चयेंसी ॥ ८ ॥ ज्ञान बोलतां वाटे सोपें । परी आचरल्यावीण होती सोपे । शब्द क्रिया एकरूपें । असतां बरें ॥ ९ ॥ जसें मुखें ज्ञान बोले । तैसी स्वयें क्रिया चाले । तयाचीं वंदीन पाउलें । साष्टांगभावें ॥ १० ॥ तया नांव श्रवणसाधन । तुवां करावें तेंचि जाण । तंव शिष्यें केला प्रश्न । करुणावचनें ॥ ११ ॥ ह्मणे स्वामी सर्वेश्वरा । माया निरसोनि मोहरा । जीवत्वा करीं विश्वंभरा । पूर्ण ब्रह्म ॥ १२ ॥ देखोनि शिष्याचा आदरू । बोलते झाले सद्गुरु । करूनि कृपा अभयंकरू । संप्रदायक्रमें ॥ १३ ॥ अरे तूं कोण कोठूनि आलासी । तुझें नांव कोण निश्चयेंसि । ग्राम कोण कोण देशीं । वस्ती तुझी ॥ १४ ॥ पुढां जाणें कोठवरी । स्थूल सूक्ष्म कारण शरीरीं । किंवा महाकारण अवधारीं । मिरासी तुझी ॥ १५ ॥ विराट हिरण्यगर्भ अव्याकृती । किंवा मुळींची मूळप्रकृती । पुरुष ऐसा ह्मणती । तो तुझा काय ॥ १६ ॥ प्रकृति आणि पुरुष । या दोनींस जेथें निरास । तेथें पुसते विशेष । निवांत झाले ॥ १७ ॥ ऐसें ऐकोनि वचन । शिष्य जाला सावधान । करूनि स्वामीस नमन । बोलता जाला ॥ १८ ॥ ह्मणे समर्थ कृपा करोनी । अन्वय सांगितला मुळींहूनी । तेथूनि येथवरी येउनी । भ्रांत जाले ॥ १९ ॥ येथवरी आलों हें कळे । मूळासी जावें हें नकळे । जीव स्वरूपीं मिळे । ऐसें करावें ॥ २० ॥ जाणणें नेणणे मिश्रित जालें । त्यासी रजोगुण ऐसें सांगीतलें । त्याचिये गुणें नरदेहा आलें । विपरीत ज्ञान ॥ २१ ॥ आतां मार्गीं चालवावें । जेथील तेथें नेऊन घालावें । जन्मभूमीसी ठेवावें । अमर करोनी ॥ २२ ॥ इति श्री व्यतिरेक । केलाचि करावा विवेक । स्वामीकृपा समर्थ एक । सेवकावरी ॥ २३ ॥ इति पंचमः समासः ॥ ५ ॥

श्रीराम समर्थ । तंव स्वामी ह्मणती बहु बरें । श्रवण कीजे अत्यादरें । प्रज्ञावंता निर्धारें । धारणा धरी ॥ १ ॥ तूं नव्हेसी स्थूळ शरीर । ऐसा पाहे पां विचार । तूं स्वरूप निर्विकार । महावाक्यार्थ बोलिजे ॥ २ ॥ महावाक्यें तत्त्वमसि । तें ब्रह्म तूं आहेसी । ह्मणून तूं नव्हेसी । स्थूल देह ॥ ३ ॥ जड पांचभौतिक शरीर । पंचविसांचा निर्धार । येथें बत्तीस क्रिया निरंतर । अंतरात्म्याचिया ॥ ४ ॥ तेणें जेव्हां देह सोडिलें । एक पंचक उरलें । तें जडत्व भासलें । पृथ्वीरूपें ॥ ५ ॥ ऐसें मागें निरूपण । सांगीतलें जाण । ह्मणोनि स्थूल देह आपण । नव्हेसी सत्य ॥ ६ ॥ जागृती विश्वेश्वर रजोगुण । क्रियाशक्ति वैखरी वचन । अकार मात्रा स्थूल प्रयोग जाण । जन्मस्थान ॥ ७ ॥ या अष्टहि क्रिया । असती स्थूल देहाचिया । ऐसें ह्मणती परी यया । देहात्मयोगें ॥ ८ ॥ देह आत्म्याची संगती । अष्ट क्रिया उठती । वियोग होतां प्रचीती । एक उरे ॥ ९ ॥ जें स्थान स्थूल शरीर । नव्हेसी तूं स्वरूप निर्विकार । तूंचि पाहे विचार । ज्ञानदृष्टीं ॥ १० ॥ चर्मदृष्टीनें देखिलें । तें जडभूत निरसिलें । त्रयभूतें आकारिलें । दृष्टी देखणें ॥ ११ ॥ यत् दृष्टं तन्नष्टं हें वचन । श्रुती बोलली हें प्रमाण । ह्मणोनि स्थूल देह आपण । नव्हेसी

---

१ त्याप्रमाणें. २ पुढें. ३ नाश. ४ बुद्धि, ग्रहणशक्ति. ५ तें तूं आहेस. ६ दिसणारें तें सर्व नाशवंत.

सत्य ॥ १२ ॥ तूं तरी ऐसें ह्मणसी । स्थूलदेहाचे निरासीं । स्वस्वरूप सत्य निश्चयेंसी । ऐसें असे ॥ १३ ॥ तरी लिंगदेहाचा विचारू । सांगेन धरी निर्धारू । तेंचि स्वरूप प्रांजळ करूं । स्वामीचेनि प्रतापें ॥ १४ ॥ इति श्री व्यतिरेक । ज्ञानप्रळय निश्चयात्मक । पुढें कथेचें कौतुक । सावध ऐका ॥ १५ ॥ इति षष्ठः समासः ॥ ६ ॥

॥ श्रीराम समर्थ ॥ ॥ ऐकें प्राज्ञा प्रबळा । तूं लिंगदेहावेगळा । असती निश्चळा । स्वस्वरूप स्वयें ॥ १ ॥ लिंगदेहाच्या पंचकाचें । तूं नव्हेसी स्वस्वरूप साचें । वासनात्मक वायूचें । अधिष्ठान असे ॥ २ ॥ अंतःकरणपंचक प्राणपंचक । इंद्रियदशक विषयपंचक । इतुकें मिळोनि देह लिंग एक । तूं नव्हेसी ॥ ३ ॥ जड चंचळ निश्चळ । तीनहि योगें कर्तृत्व प्रबळ । वियोग होतां निवळ । वस्तूचि तूं ॥ ४ ॥ विषयकर्तृत्व इंद्रिय जड । प्राणपंचक अंतःकरण जड । इतुकें मिळोनी कैवाडं । लिंगदेह बोलिजे ॥ ५ ॥ दश इंद्रियें स्थूळीं असती । परी सूक्ष्मरूपें लिंगीं वर्तती । हे मागें उपपत्ती । सांगितली तुज ॥ ६ ॥ प्राण प्रकृतीचा अंश । वायू बोलिजे तयास । अंतःकरण पुरुष विशेष । आत्मरूपें ॥ ७ ॥ प्रकृतियोगें पुरुष जाण । माया निरसितां तोचि निरावेव । असा व्यतिरेक अनुभव । निवळोनि पाहातां ॥ ८ ॥ तैसाचि पिंडीं अंतरात्मा । अवघा त्याचा कर्तृत्वमहिमा । विद्या कळा गुणसीमा । कोणें करावी ॥ ९ ॥ जोंवरी चंचळत्व प्राणासी । तोंवरी जाणपण अंतःकरणासी । तया चंचळाचे विनाशीं । तेंचि ब्रह्म ॥ १० ॥ कोणी एक प्राणी दोघेजण । एक अंध त्यासी करचरण । परी निःकारण । नेत्रेंवीण झाला ॥ ११ ॥ दुसरा डोळस असे । पाद पाणी मुळींच नसे । चंचळत्वाचें पिसें । जसें तेथ ॥ १२ ॥ अंध डोळस स्कंधीं घेऊन । उभयतां करिती मार्ग गमन । एका अंधत्व एका चळण । आरंभिलें ॥ १३ ॥ निश्चळपण जाणे । प्राण चंचळ परी न जाणे । उभयतां मिळोनि करणें । सर्व कांहीं ॥ १४ ॥ तेथें वीस क्रिया उठती । मागें सांगितल्या तुजप्रती । आणीक अष्टधा असती । त्या सावध ऐका ॥ १५ ॥ लिंगदेह अवस्था प्रभ । इच्छाशक्ती सत्वगुण । उकार मात्रा प्रविविक्त भोग जाण । मध्यमा वाचा ॥ १६ ॥ कंठस्थान अभिमान तैजसु । क्रिया अष्टक जाणिजेसु । देहात्मयोगें आभासु । उठतसे ॥ १७ ॥ संगती देह आत्मयाची । प्रतिमा दिसे आव्हाची । वियोगें राहे प्रचीतीची । एक क्रिया ॥ १८ ॥ राहिला तैजस अभिमान । विष्णूचा अंश जाण । ऐसें लिंगदेहाचें विवरण । करूनि पाहिलें ॥ १९ ॥ तेहतीस तत्त्वें मिळोन । लिंगदेह ह्मणिजेत जाण । तूं तयासी विलक्षण । स्वरूपें सत्य ॥ २० ॥ तंव शिष्यें विनविलें । देहद्वय निरसिलें । कारण महाकारण राहिलें । कोणे स्थळीं ॥ २१ ॥ स्थूळ जड लिंग चंचळ । देहद्वया वेगळ । लिंगनिरासीं तात्काळ । राहिलें कोठें ॥ २२ ॥ ऐसें ऐकूनि विज्ञापन । स्वामी देती प्रतिवचन । ह्मणती तुवां प्रश्न । उत्तम केला ॥ २३ ॥ कारण महाकारणाचें स्थळ । लिंगदेहामध्यें प्रबळ । त्याच्या विनाशीं केवळ । देहद्वय कैंचें ॥ २४ ॥ कारण ह्मणजे अज्ञान । महाकारणरूपी ज्ञान । ज्ञान अज्ञानासी अधिष्ठान । लिंगदेह असे ॥२५॥ कारण महाकारणाचिया । असती षोडश क्रिया । त्याहि निरसोनी यथान्वया । प्राचितीनें ॥२६॥ इति श्रीव्यतिरेकनिरूप-

१ आश्रयस्थान. २ बाजू, पक्ष. ३ युक्ति, स्थिति.

ण । देहद्वयाचें निरसन । ज्ञानप्रळयो जाण । यासी बोलिजे ॥ २७ ॥ इति सप्तमः समासः ॥७॥

॥ श्रीराम समर्थ ॥ तूं नव्हेसी कारण । तयाचें रूप अज्ञान । अज्ञानयोगें जाण । जीवित्व तुज ॥ १ ॥ अविद्यायोगें जीवित्वदशा । आली असे परमपुरुषा । ह्मणूनि अज्ञाननिरासा[१] । वीण मोक्ष नाहीं ॥ २ ॥ स्वरूपासी नेणिजे । त्या नांव अज्ञान बोलिजे । आपुलें निजरूप वळखिजे । त्या नांव ज्ञान ॥ ३ ॥ ज्ञानाज्ञान जेथूनि झालें । पुन्हां तेथींचि निमालें । कारणमहाकारणावेगळें । स्वरूप तुझें ॥ ४ ॥ याकारणें देहाचिया । असती अष्ट क्रिया । त्याही ओळखोनि सांडाव्या । सांगणें आतां ॥ ५ ॥ सुषुप्ती[२] अवस्था प्राज्ञ अभिमान । आनंद भोग तमोगुण । मकार मात्रा हृदयस्थान । द्रव्यशक्ती ॥ ६ ॥ पश्यंती वाचा आठवी । कारण क्रिया जाणावी । इतक्या न लागती नरावेवीं । सत्यस्वरूप तूं ॥ ७ ॥ क्रियासहित अज्ञान । तूं नव्हेसी जाण । अथवा ह्मणसी महाकारण । तूं त्यावेगळा ॥ ८ ॥ महाकारणरूप ज्ञान । जें स्वरूपाचें अनुसंधान । तरी तूं त्या विलक्षण । सहजचि अससी ॥ ९ ॥ अनुभव आणि अनुभविता । दोन जाले प्रत्यक्ष पाहतां । ह्मणोनियां सर्वथा । ज्ञानावेगळाचि तूं ॥ १० ॥ महाकारण देह । अष्टक्रिया निःसंदेह । तोचि आतां अभिप्राय । सावध ऐका ॥ ११ ॥ तूं या अवस्था प्रत्यगात्मा अभिमान । ज्ञानशक्ती शुद्धसत्वगुण । परा वाचा मूर्ध्नि[३]स्थान । अर्धमातृका ॥ १२ ॥ आनंदावभास भोग । अष्टक हे समयोग । ज्ञानात्मक अंतरंग । एकरूप ॥ १३ ॥ तूं ज्ञानाज्ञानावेगळा । जन्मकर्मानिराळा । सकळीं असोनि सकळा । सारिखा नव्हेसी ॥ १४ ॥ तूं बाह्य व्यापक । तूं अनेकीं एक । एकपण अलोलिक[४] । न साहे तुज ॥१५॥ तूं वर्णव्यक्तिरहित । ऐविशेसी[५] विशेसी विनिर्मुक्त । नाशवंतीं शाश्वत । स्वरूप तुझें ॥ १६ ॥ तूं स्थूळ ना सूक्ष्म । ज्ञानाज्ञान मनोधर्म । तुझ्या स्वरूपाचें वर्म । सद्गुरु कृपा ॥ १७ ॥ समर्थ स्वामीकृपेवीण । नकळे नकळे स्वरूपज्ञान । तेंचि आतां परिसीन । करूं आतां ॥ १८ ॥ तंव शिष्य ह्मणे स्वामी । चौं देहांवेगळा स्वरूप मी । देहीं असे जीव नामी । तो किं[६]लक्षण ॥ १९ ॥ तंव स्वामी ह्मणती ऐक आतां । स्थूळदेह जड तत्वतां । त्याचें स्वरूप पाहों जातां । केवळ पृथ्वी ॥ २० ॥ दुसरा लिंगदेह चंचळ । तें चंचळीं असे निश्चळ । तो ब्रह्मांश केवळ । जीव बोलिजे ॥ २१ ॥ विषयक्रिया इंद्रिय जड स्वरूप । प्राण चंचळ वायु मायास्वरूप । त्या वायूमध्यें जाणीव अमूप[७] । तो जीव ब्रह्मांश ॥ २२ ॥ ते जाणीव अमूप । जाणिवेचें निश्चळ रूप । दृश्याभासा अमूप । अनंत ब्रह्मांडव्यापिनी ॥ २३ ॥ निश्चळपण तें न मोडे । चंचळ वायु त्रैलोक्य थोकडें । वायु तें किती बापुडें । चैतन्यापुढें ॥ २४ ॥ वायु कठिणासी आडतो । जाणिवेनें पर्वत फुटतो । फुटे ह्मणावें तरी तो । छेदहि नाहीं ॥ २५ ॥ जो त्रैलोक्याचें दर्पण[८] । सकल बिंब अणुप्रमाण । सर्वसाक्षी केवळ जाणीवेवीण । असेचिना ॥ २६ ॥ दर्पणें स्थूळींहूनि न हाले । परी सर्वहि तेथेंचि बिंबलें । बिंबलें परी नसे निघालें । दर्पणामध्यें ॥ २७ ॥ पिंडीं तुर्या[९] ब्रह्मांडीं सर्वसाक्षिणी । अनिर्वाच्या ईश्वरत्व जयेचेनि । पिंडीं असे

---

१ अज्ञानाचा नाश झाल्यावांचून. २ गाढ झोंप. ३ मस्तक. ४ अलौकिक. ५ अज्ञानाला. ६ कोणत्या लक्षणाचा. ७ पुष्कळ. ८ आरसा. ९ चवथी अवस्था.

अभिमानी । प्रत्यगात्मा तो ॥ २८ ॥ अंतरात्मा जीवरूप । जाणिवे आंगीं वायु आरोप । अनंत नामांचा अरूप । तयासीच ह्मणावें ॥ २९ ॥ तूं ह्मणसी तेथें कैंची जाणीव । तो ऐक याचा अभिप्राव । ईश्वरी महाकारण देहीं सर्व । साक्षिणी अवस्था ॥ ३० ॥ अर्धनारीनटेश्वर । प्रकृतिपुरुषाचा निर्धार । निवळ पाहतां विचार । दोन्ही एकची ॥ ३१ ॥ वायु मायेचें चळण । तोंवरी ईश्वरा जाणपण । तें निरसितां मिथ्या भान । जाणीव कैंची ॥ ३२ ॥ ती जाणीव जेथें विराली । तेथें अनिर्वाच्य बोलिली । श्रुतीसी मौन्यमुद्रा पडली । तियेसमयीं ॥ ३३ ॥ जोंवरी असतेपण मायेसी । तोंवरी ईश्वरत्व ब्रह्मासी । हरिसंकल्प जाणिवेसी । अधिष्ठान आहे ॥ ३४ ॥ अहं ब्रह्मास्मि ऐसें स्फुरण । तेंचि प्रकृतीचें लक्षण । सबळ ब्रह्म जाणीव साक्षपण । त्यासीच बोलिजे ॥ ३५ ॥ जोंवरी सत्यत्व प्रकृती वायूसी । तोंवरी जाणीव सबळ ब्रह्मासी । तये मायेच्या विनाशीं । तेंचि अनिर्वाच्य ॥ ३६ ॥ ह्मणोनि पिंडीं जाणीवलक्षण । तो ब्रह्मांश अंतःकरण अज्ञान । अज्ञानयोगें जीवित्वलक्षण । ब्रह्मांशासी ॥ ३७ ॥ ह्मणोनि जाणीव पुरुषाचा अंश । प्राणपंचक मायेचा विलास । उभययोगें विशेष । अंतरात्मा तो ॥ ३८ ॥ येथें प्रश्न हा फिटला । विचार पाहतां प्रत्ययो आला । पुढें समजोनि बोला । कोणी तरी ॥ ३९ ॥ तंव शिष्य मोक्षपाणी[१] । विचारें झाला ब्रह्मज्ञानी । तो देहाच्या प्रयाणीं[२] । कोठें मिळाला ॥ ४० ॥ ऐसें ऐकोनियां वचन । स्वामी ह्मणती सावधान । देहीं असतां ब्रह्म पूर्ण । जावें जेणें ॥ ४१ ॥ ब्रह्म एक आत्म एक । ऐसी असतां वेगळीक । तरी जावयाचा विवेक । कैसा येता सुखें ॥ ४२ ॥ ज्ञानियाचा देह पडिला । तेथें वायु निघाला । तोहि वितळोनि गेला । जेथिंचा तेथें ॥ ४३ ॥ जोंवरी आस्तिक्य वायूसी । तोंवरी जाणीव अंतःकरणासी । तया प्राणियाच्या निरासीं । जाणीव मालवे ॥ ४४ ॥ दिवा होता सोंकल्या घटीं । विझाला तो घटस्फोटीं । तैसी जाली गोष्टी । आत्मयाची ॥ ४५ ॥ पदार्थी असावें उदास । सकल विषयीं पूर्ण त्रास । यावरी ब्रह्म ज्यास । ब्रह्मचि करी ॥ ४६ ॥ आकाशीं आकाश मिळालें । हें बोलणेंचि अप्रमाण झालें । तैसें स्वरूपीं स्वरूप आलें । सहावया ॥ ४७ ॥ तेथें गंधर्वनगर आलें । तें तेथींचे विरालें । तैसें जाणिवेसी जालें । नवल मोठें ॥ ४८ ॥ जेणें स्वरूपनिश्चय केला । तोचि पाहतां ब्रह्म जाला । तेथें द्वैताचा गलबला । गेला विरोनी ॥ ४९ ॥ हेंचि सद्गुरूचें झालेंपण । देहीं असोनि ब्रह्म पूर्ण । समर्थ स्वामीस उपमान । यावया कैचें ॥ ५० ॥ शिष्याची जाली तन्मयता । अमृतवचनीं ऐक्यता । मग चरणीं ठेविला माथा । साष्टांगभावें ॥ ५१ ॥ पुढें मागुती विनविलें । जीवत्व हें धन्य झालें । ईश्वर कैसे लया गेले । सांगा स्वामी ॥ ५२ ॥ तेचि पुढें कथा । ईश्वराची अनिर्वाच्यता । निरोपिजेल श्रोता । अवधान यावें ॥ ५३ ॥ इतिश्री व्यतिरेक । ज्ञानप्रळयो निश्चयात्मक । स्वामीकृपा समर्थ एक । सेवकावरी ॥ ५४ ॥ ॥ इति अष्टमः समासः ॥ ८ ॥

॥ श्रीराम समर्थ ॥ विराट देह ईश्वराचे । असे जड पंचभूतांचे । सत्वस्वरूप नव्हे साचें । दृश्य ह्मणूनि ॥ १ ॥ पृथिवी आप अनळ[३] । तिनी भूतें दृश्य सकळ ॥ दोनी

---

१ ज्याला मोक्ष करतलवत् आहे असा. २ जाण्याच्या वेळेला. ३ अग्नि.

भूतें केवळ। भासरूप ॥ २ ॥ शरीरांतचि स्पर्शे । परी नेत्रासी न दिसे । द्वयभूतांसी मनोभासें । ऐसें बोलिजे ॥ ३ ॥ त्रयभूत अधिष्ठान विराटाचें । अंश प्रचीतरूपाचे । द्वयभूत सूक्ष्माचें । कर्तृत्व असे ॥ ४ ॥ विराट जड देह ईश्वराचा । ब्रह्मा अभिमानी तेथींचा । उत्पत्ती अवस्था अकार मात्रेचा । प्रचीत पाहतां ॥ ५ ॥ इतुकें ज्याचें करणें । ह्मणोनि स्वरूप न कळे पूर्णपणें । हिरण्यगर्भ सावधपणें । सांगतों ऐक ॥ ६ ॥ हिरण्यगर्भ ईश्वराचा लिंगदेह । सूक्ष्म पंचभूतांचा निःसंदेह । त्यामध्यें प्रचीत पाहे । असे द्वयभूतांचा ॥ ७ ॥ वायु आकाश हे दोन । हिरण्यगर्भाचें अधिष्ठान । आकाश-पंचक सांगेन । सावध ऐका ॥ ८ ॥ अंतःकरण विष्णु मन चंद्रमा । बुद्धि ब्रह्मा चित्त नारायणनामा । रुद्रअहंकार तुह्मां । सांगों पुढें ॥ ९ ॥ नाग कूर्म ककश । देवदत्त धनंजय विशेष । हे पंचप्राण अंश । प्रभंजनांचे ॥ १० ॥ श्रोत्र दिशा त्वचा अनिळ । चक्षु सूर्य जिव्हा जळ । घ्राण अश्विनीदेव सकळ । विचार पाहावा ॥ ११ ॥ वाचा वन्हि पाणी सुरपति । पाद उपेंद्र शिश्न प्रजापति ॥ गुद इंद्रिय नैर्ऋति । असे निरोपिली ॥ १२ ॥ शब्द स्पर्श रूप रस । गंध पृथ्वीचा अंश । या पंचमात्रा विषयविलास । उभयतां असती ॥ १३ ॥ ऐसे पंचवीस प्रकार । मिळोनि हिरण्यगर्भ साचार । येथें मातृका उकार । अभिमानी विष्णु ॥ १४ ॥ स्थिति अवस्था प्रतिपाळणें । विष्णु अवतार घेणें । धर्मरक्षणाकारणें । ह्मणूनियां ॥ १५ ॥ स्वरूप निर्गुण निर्विकार । तेथें कैसा हो विकार । ह्मणूनियां तो प्रकार । वेगळाचि असे ॥ १६ ॥ अव्याकृति मूळप्रकृति । तेथें जाऊनि बसली वृत्ती । तेचि व्हावया निवृत्ती । पुढें परिसावें ॥ १७ ॥ इतिश्री व्यतिरेक । ज्ञानप्रळयो निश्चयात्मक । स्वामी कृपा समर्थ एक । सेवकावरी ॥ १८ ॥ इति नवमः समासः ॥ ९ ॥

॥ श्रीराम समर्थ ॥ अव्याकृति कारणदेह । ईश्वराचे निःसंदेह । तूं नव्हे परमात्मा अक्रिय । निश्चयेंसी ॥ १ ॥ महतत्त्व गुणक्षोभिणी । अष्टधा प्रकृति त्रिगुणी । पंचभूतें ज्यापासुनी । प्रगट जाहलीं ॥ २ ॥ इच्छा सृष्ट्यादिक कर्मांची । तेही दशा अव्याकृतीची । तेथें अवस्था प्रळयाची । शास्त्रीं बोलिली ॥ ३ ॥ अभिमानी त्रिनयन । महाकारण मात्रा तमोगुण । जें केवळ विस्मरण । स्वरूपाचें ॥ ४ ॥ स्वरूप विसरलेपणें । जियेसी लागे जडत्व येणें । त्यासी स्वरूप निर्गुणें । कैसें ह्मणावें ॥ ५ ॥ पृथ्वीपासोनि महत्तत्त्ववरी । प्रळयो द्वय अवधारी । तें स्वरूप निर्धारीं । कैसें ह्मणावें ॥ ६ ॥ ह्मणूनि अव्याकृतीवेगळा । आतमा जन्मकर्मानिराळा । तेचि कथा प्रांजळ प्रबळा । सावध ऐका ॥ ७ ॥ जे मुळींची मूळप्रकृति । ईश्वराची ज्ञानशक्ति । तोचि महाकारण व्यक्ति । वेगळा आत्मा ॥ ८ ॥ अहंब्रह्मास्मि ऐसें ज्ञान । महाकारणदेहाचें लक्षण । अर्धमात्रा शुद्धसत्वगुण । ईश्वर अभिमानी ॥ ९ ॥ सर्वसाक्षी अवस्था । प्रत्यक्ष पाहा विचारितां । निर्गुणावेगळें अनुभवितां । अनिर्वाच्य तें ॥ १० ॥ ह्मणून अष्टदेहांवेगळा । तूं ब्रह्म अनिर्वाच्य निर्मळा । महावाक्यार्थ अवलीळा । बोलिला असे ॥ ११ ॥ सोहं हंसा तत्त्वमसी । तूं ब्रह्म तें आहेसी । अष्टदेहांच्या निरासीं । अनिर्वाच्य ॥ १२ ॥ चत्वार देह जिवाचे । असती चारी ईश्वराचे । निरसितां स्वरूप उभयतांचें । अनिर्वाच्य ॥ १३ ॥ तंव शिष्य

१ अनुभव. २ वायूचे. ३ अक्षर. ४ मी ब्रह्म आहें. ५ तो मी, मी तो, तें तूं आहेस. ६ चार.

ह्मणे स्वामी समर्था । प्रकृतिपुरुषांसी अभिन्नता । निरूपिली तत्त्वतां । स्वमुखेंसी ॥ १४ ॥ ईश्वर माया एकरूपता । ऐसें आपणाचि सांगतां । मागुती असें ह्मणतां । प्रकृतिवेगळा ॥ १५ ॥ आणिक एक पुसत । पंचम प्रकार नासत । ऐसा बोलिला निश्चितार्थ । शास्त्रसिद्धांतीं ॥ १६ ॥ या चहूंवेगळें पांचवें । नास्तिक शून्य तयातें ह्मणावें । आणि स्वामी बोलिलें स्वभावें । चतुर्थ देहातीत ॥ १७ ॥ ऐसी सूक्ष्म आशंका । पाहतां प्रश्न केला निका । सावध होऊनि ऐका । विचार याचा ॥ १८ ॥ पुरुष प्रकृति एक होय । ऐसा नियमचि अहे । परि हें सांगूं नये । साधकासी ॥ १९ ॥ त्यासी प्रत्यक्ष माया हे । झाली ऐसी वाटली आहे । ह्मणूनि सांगणें होय । मायेवेगळा देव ॥ २० ॥ माया ब्रह्म एक ह्मणतां । बुडेल सत्य स्वरूपाची वार्ता । ब्रह्मज्ञान स्वरूपसत्ता । कोण पुसे ॥ २१ ॥ माया ब्रह्म एक जालें । तरी संतसंगें काय केलें । वेदशास्त्रीं साधन बोलिलें । माया निरसावयाकारणें ॥ २२ ॥ रज्जूचा सर्प नाहीं झाला । भ्रमें झालासा वाटला । ह्मणूनियां अज्ञान्याला । ज्ञानदीप पाहिजे ॥ २३ ॥ तैसी माया मुळीं जाहालीच नाहीं । केवळ वस्तूचि असे पाहीं । हरिसंकल्प तोही । समूळ मिथ्या ॥ २४ ॥ जैसी माया नांथिली । तैसी ईश्वरत्व हे बोली । ऐसी अनिर्वाच्य खोली । जाणती स्वानुभवी ॥ २५ ॥ मायेचें खरेपण वाटलें । ह्मणूनि ईश्वरसाक्षी ह्मणितलें । जाणीव इच्छा बोलिलें । बहुतां प्रकारें ॥ २६ ॥ वायु प्रकृति जागीव ईश्वर । असा प्रबोधप्रकार । साक्षी सत्ता निर्धार । तयासी ह्मणिजे ॥ २७ ॥ ते माया निरसितां । निरसे साक्षी जाणतां । अनुभव आणि अनुभविता । दोन्ही नाहीं ॥ २८ ॥ प्रकृति आणि पुरुष । दोन्ही मायेचा विलास । ते निरसितां द्वयभास । अनिर्वाच्य ॥ २९ ॥ ऐसी एकी आशंका । फिटली आतां तुह्मी ऐका । सावध होऊनि विवेका । अवलोकावें ॥ ३० ॥ इतिश्री व्यतिरेक । ज्ञानप्रळय निश्चयात्मक । स्वामीकृपा समर्थ एक । सेवकावरी ॥ ३१ ॥ इति दशमः समासः ॥ १० ॥

॥ श्रीराम समर्थ ॥ स्थूळ सूक्ष्म कारण । आणि अविद्यात्मक अज्ञान । सत्यत्व तोंवरी महाकारण । चवथें ज्ञान साक्षी ॥ १ ॥ विपरीत ज्ञान अज्ञान । निरसितां हें मिथ्या भान । चवथें तेंचि निर्गुण । अनिर्वाच्य ॥ २ ॥ विराट हिरण्य महत्तत्व । तोंवरी मूळ प्रकृति साक्षित्व । अविद्यात्मक निरसोत । अनिर्वाच्य ॥ ३ ॥ जागृती स्वप्न सुषुप्ती । अविद्यामय असती । निरसितां देहत्रय प्रचीती । तुर्या अनिर्वाच्य ॥ ४ ॥ उत्पत्ती स्थिति संहार । सत्यत्वें सर्वसाक्षी निरंतर । निरसितां त्रय अविद्याव्यवहार । चवथें अनिर्वाच्य ॥ ५ ॥ विश्व तैजस प्राज्ञ । प्रत्यगात्मा सत्यत्वें अभिधान । त्रय निरसितां अज्ञान । चवथें अनिर्वाच्य ॥ ६ ॥ रज सत्व तमोगुण । चवथा शुद्धसत्व जाण । निरसितां तेथींचें भाषण । चतुर्थ अनिर्वाच्य ॥ ७ ॥ अकार उकार मकार । अर्धमात्रा ॐकार । निरसितां तिन्ही प्रकार । पुढें अनिर्वाच्य ॥ ८ ॥ जोंवरी अविद्यात्रयकर्तृत्व । तोंवरी माया ईश्वरत्व । निरसितां त्रयकर्तृत्व । ईश्वर अनिर्वाच्य ॥ ९ ॥ जेव्हां द्वैत नासलें । तेव्हांच एकपण विरालें । उपरी बोलणें खुंटलें । निवांत

१ बरोबर. २ खोटी. ३ अज्ञानमय. ४ अनुभव. ५ चवथी अवस्था.

होय ॥ १० ॥ पृथिवी आप तेज पवन । तोंवरी आत्मयास आकाशपण । जड चंचळ नासतां पूर्ण । अनिर्वाच्य ॥ ११ ॥ दृश्यभास आटलें । मग उर्वरित जें उरलें । त्यासि नांव नाहीं ह्मणितलें । महापुरुषीं ॥ १२ ॥ सकल आशंकानिवृत्ति । कल्पनामात्र नासती । तेथें नामरूपस्थिती । कोणें बोलावी ॥ १३ ॥ निवृत्ति विज्ञान उन्मनी । हेचि मायेची करणी । ते मुळींच नसतां वदनीं । कसें वदावें ॥ १४ ॥ आत्मनिवेदन नववी भक्ती । हेहि मायेची उत्पत्ति । ते मुळीं जालीच नव्हती । तरी हेहि कैंची ॥ १५ ॥ दुजेवीण अनुभव । अनुभवचि समूळ वाव । येथें नसे नास्तिक्यभाव । ह्मणोनियां ॥ १६ ॥ आस्तिक नास्तिक हे दोन्ही । न घडे मायानिरसनीं । तेथें शब्दाची कडसणी । निरसोनि गेली ॥ १७ ॥ दिवस ना रजनी । संध्यारागहि नसोनी । ऐसिये निर्वाणीं । शब्द कैंचा ॥ १८ ॥ वैखरी मध्यमा पश्यंती । ह्मणोनि परा ऐसें ह्मणती । उठती जेथें तिनी वृत्ती । तेथें काय ह्मणावें ॥ १९ ॥ शब्द मौन्य दोनी । उद्भवती जेथूनी । ते मुळींच नसतां वाणी । कैसें वदावें ॥ २० ॥ जें जें वाचें बोलावें । जें जें मनीं अनुभवावें । हीं दोनी स्वभावें । जेथूनि जालीं ॥ २१ ॥ तें मुळीं जालेंचि नाहीं । ह्मणूनि अनिर्वाच्य पाहीं । ऐसें सांगणें तेंही । निवांत जालें ॥ २२ ॥ असीं स्वामींचीं वचनें । ते ऐकोनि परम निर्वाणें । सच्छिष्य तियेचि क्षणें । पावता झाला ॥ २३ ॥ काया वाचा मनोभावें । साष्टांगें नमिलें शिष्यदेवें । मग उचलोनि देवादिदेवें । आलिंगन दीधलें ॥ २४ ॥ ऐसा अनुग्रहो केला । उभयतां आनंद जाला । तो मज मंदमतीला । बोलवेल कैंचा ॥ २५ ॥ परी स्वामींचे कृपागुणें । वाटे ब्रह्मांड ठेंगणें । ह्मणोनि हें वचनें । निरोपिलें ॥ २६ ॥ आधीं अन्वय बोलिला । उपरी व्यतिरेक निरोपिला । येथींचा विचार पाहिला । पाहिजे संतीं ॥२७॥ जाणत नेणत बोलिलें । चुकत वाकत आठवलें । न्यूनपूर्ण क्षमा केलें । पाहिजें श्रेष्ठीं ॥२८॥ स्वामी कृपा समर्थ सार । सीताराम हे अक्षर । वंदूनियां अत्यादरें । नमस्कार घाली ॥ २९ ॥ इति श्रीव्यतिरेक । ज्ञानप्रळय निश्चयात्मक । स्वामी कृपा समर्थ एक । सेवकावरी ॥ ३० ॥ इति एकादशः समासः ॥ ११ ॥

---

१ बाकी, शिल्लक. २ अनुभव. ३ आत्मसमर्पण. ४ रात्र. ५ कृपा.

अन्वयव्यतिरेक समाप्त.

# रामदासकृत नित्यनैमित्तिक विधिसंग्रहसोपानें[1].

श्रीगणेशाय नमः ॥ ॥ प्रातःकाळीं चवथ्या प्रहरीं उठोन, हस्त पाद प्रक्षाळण करून भूपाळी ह्मणावी ती ॥ प्रातःकाळीं प्रातःस्नान । घडे केलिया स्मरण । महादोषांचें[2] दहन । महिमा गहन पुराणीं ॥ ध्रु० ॥ गंगा यमुना सरस्वती । कृष्णा वेण्या भागीरथी । पूर्ण फल्गु भोगावती । रेवा गौतमी वैतरणी ॥ १ ॥ कुंदा वरदा माहेश्वरी । तुंगभद्रा आणि कावेरी । गणिका तप्ती मलापहारी । दुरितें हरी जान्हवी ॥२॥ काळी कालिंदी किंकिणी । कपिलायणी इंद्रायणी । नलिनी आर्चिनी धर्मिणी । ताम्रपर्णी नर्मदा ॥ ३ ॥ मणिकर्णिका भोगावती । ककुद्मती हेमावती । सीता प्रयाग मालती । हरिद्वती गंडिका ॥ ४ ॥ भीमा वरदा मंदाकिनी । महापगा पुनःपुनी । वज्रा वैष्णवी कुमुदिनी । अरुणा वरुणा नारदी ॥ ५ ॥ शरयू गायत्री समुद्रा । कुरुक्षेत्र सुवर्णभद्रा । दास ह्मणे पुण्यक्षेत्रा । नाना नद्या गोविंदीं ॥ ६ ॥

॥ भूपाळी रामाची ॥ राम आकाशीं पाताळीं । राम नांदे भूमंडळीं । राम योगियांचे मेळीं । सर्वकाळीं तिष्ठत ॥ १ ॥ राम नित्य निरंतरीं । राम सबाह्य अभ्यंतरीं । राम विवेकाचे घरीं । भक्तीवरी सांपडे ॥ २ ॥ राम भावें ठायीं पडे । राम भक्तीशीं आंतुडे[3] । राम ऐक्यरूपीं जोडे । मौन पडे श्रुतीसी ॥ ३ ॥ राम योग्यांचें मंडन । राम भक्तांचें भूषण । राम आनंदाचा घन । करी रक्षण दासाचें ॥ ४ ॥

## ध्यान करण्याचे पूर्वीचा विचार.

॥ श्रीराम समर्थ ॥ ॥ सकळ जीवां जीवन । सकळिकां समान । त्रैलोक्याचें महिमान । उदकापाशीं ॥ १ ॥ नदीचें उदक वाहत गेलें । तें निरर्थक चालिलें । जरी बांधोनि काढिले । नाना तीरीं कालवे ॥ २ ॥ उदक निगेनें वर्तविलें । नाना जिनसीं पीक काढिलें । पुढें उदकचि झालें । पीक सुवर्ण ॥ ३ ॥ तैसें हें आपुलें वय । विवेकें-विण व्यर्थ जाय । विवेकी ते यथान्वय[4] । स्वहित साधिती ॥ ४ ॥ नाना उंच आम्रफळें । अंजीर ऊंस द्राक्षें केळें । नाना पिकें यत्नजळें । निर्माण झालीं ॥ ५ ॥ तैसें आयुष्य आपुलें । विवेकें सार्थक केलें । कां जें शोधूनि पाहिलें । सारासार ॥ ६ ॥ गयाळीपणें[5] मूर्खपणें । संसारांत दिसे उणें । विवेकीजनें याकारणें । स्वहित करावें ॥ ७ ॥ इहलोक परलोक । उभय लोकीं सार्थक । शुद्ध ज्ञान शुद्ध विवेक । यासि ह्मणावें ॥ ८ ॥ लोकीं संसार करावा । नाना यत्नें आटोपावा । लोकांमध्यें मिरवावा । पुरुषार्थ आपुला ॥ ९ ॥ कन्या पुत्र योग्य झाले । समर्थ सोयरे पाहिले । ब्राह्मण्यविधियुक्त[6] जाले । स्वाहास्वधा

---

१ विधि—आचार, त्याचा संग्रह हाच कोणी सोपान—पायरी. २ पातकें. ३ प्राप्त होती. ४ अनुक्रमानें. ५ गचाळपणानें ६ ब्राह्मणधर्माला योग्य अशा विधीनें युक्त.

॥ १० ॥ लोक ह्मणती भला भला । यानें इहलोक साधिला । परलोकहि आणिला । पाहिजे मना ॥ ११ ॥ जेणें सकळ निर्माण केलें ॥ त्यासि पाहिजे ओळखिलें । मुख्य देवास चुकले । त्यांस परलोक कैंचा ॥ १२ ॥ मागील जन्म आठवेना । पुढील काय तें कळेना । उगाच प्राणी अनुमाना । मध्यें पडला ॥ १३ ॥ तो अनुमान कामा नये । अनुमानें कैंचा जय । पिंडब्रह्मांड ग्रंथान्वयें । विवेकें शोधावें ॥ १४ ॥ वेद शास्त्र पंचीकरण । तेथें घालावें अंतःकरण । बरें करावें विवरण । प्रत्ययाचें ॥ १५ ॥ विधीनें सकळ निर्मिलें । विधीस कोणीं निर्मिलें । विष्णूनें सकळांस पाळिलें । विष्णूस पाळिता कोण ॥ १६ ॥ रुद्र सकळां संहारी । त्यास कोण संहारी । ऐसा विचार अंतरीं । बरा शोधावा ॥ १७ ॥ कर्ता देव बहु ह्मणती । त्याची कैंची स्वरूपस्थिती । सगुण निर्गुण आदिअंतीं । कैसा ह्मणावा ॥ १८ ॥ निर्गुणा नाहीं कर्तृत्वहेत । सगुण तरी नाशिवंत । याकारणें सिद्धांत । विवेकें पहावा ॥ १९ ॥ पुनर्जन्म नाहीं चुकलें । जन्मास येवोनि काय केलें । पुढें लिगाड लांबलें । जन्ममृत्यूचें ॥ २० ॥ अवचट नरदेह जोडला । पूर्वपुण्यें प्राणियाला । विचार पाहिजे केला । उत्तम गती ॥ २१ ॥ मागें केलें व्यर्थ गेलें । पुढें नाहीं अनुमानलें । येणें करितां मूळ झालें । जन्ममृत्यूचें ॥ २२ ॥ ऐसें झालें न पाहिजे । कोणे एकें स्वहित कीजे । परमेश्वरास पाविजे । ह्मणजे बरें ॥ २३ ॥ देवाचे सृष्टींत राहावें । देवें निर्मिलें तें पाहावें । नाना वैभव भोगावें । देवाकरितां ॥ २४ ॥ त्या देवास चुकावें । तेणें सर्वस्वास मुकावें । ऐसें न करावें तुकावें । कर्तृत्व आपुलें ॥ २५ ॥ भ्रूकुटीं उदकाचें लवणें । पृथ्वी अंतरिक्षीं धरणें । हें मनुष्याचें करणें । नव्हे सर्वथा ॥ २६ ॥ सामर्थ्य कळों येतें मना । देव पाहतां दिसेना । परंतु याची विवंचना । पाहिली पाहिजे ॥ २७ ॥

## सगुणध्यान.

श्रीराम समर्थ ॥ ॥ आतां वंदीन कुलदैवता । लीलाविग्रही भगवंता । जो संकटीं सांभाळिता । आहे निजदासा ॥ १ ॥ एकवचनी एकबाण । एकपत्नी अभंग ठाण । अजिंक्य राक्षसां निर्वाण । कर्ता समर्थ एकू ॥ २ ॥ धार्मिक पुण्यपरायण । शांत लावण्यसुलक्षण । जेणें त्र्यंबक परम कठीण । भग्न केलें ॥ ३ ॥ जो लावण्याचा जनक । जो सौंदर्याचा नायक । जो मार्तंडकुळदीपक । चातुर्यनिधी ॥ ४ ॥ ऐसा राम राजीवनयन । साधुजनांचें भूषण । त्या प्रभूचें ध्यान । वर्णीन हळू हळू ॥ ५ ॥ टवटवीत रसाळ । निमासुरवदन वेल्हाळ । लावण्य साजिरें केवळ । आनंदाचें ओतिलें ॥ ६ ॥ सुरेख भ्रूलता वेंकट । सरळ सतेज नासापुट । नीट नेपाळलें लल्लाट । तेथें त्रिवळी ॥ ७ ॥ केशर ऊर्ध्वपुंड्र लल्लाटीं । वरी कस्तूरी दुबोटी । सुरंग अक्षता त्रिपुटी । शोभायमान ॥ ८ ॥ रत्नजडित मनोहरें । कुंडलें मकराकारें । श्रवण कोमल भारें । लंबित झाले ॥ ९ ॥ सुरंग लावण्य विचित्र । कोमल तीक्ष्ण पद्मपत्र । तैसे आकर्ण विशाळ नेत्र । अर्धोन्मीलित ॥ १० ॥ अनर्घ्य रत्नें शुद्ध हेमीं[११] । रत्नखचित कांकती रेशमी ।

---

१ ब्रह्मदेवानें. २ शंकर. ३ लचांड. ४ लीलेनें ह्मणजे क्रीडेनें शरीर धारण करणाऱ्या. ५ नाश. ६ शंकराचें धनुष्य. ७ सूर्यकुलांत श्रेष्ठ. ८ कमलनयन. ९ मौल्यवान्. १० सोन्याचीं. ११ किरण.

मघवा जैसा वर्षतां व्योमीं । प्रगटे विद्युल्लता ॥ ११ ॥ तैसेंच कीरटीं तेजाळ । पीत रक्त फांकती कीळ । विलेपनसाहित्यें भाळ । प्रकाशलें ॥ १२ ॥ अभ्यंग केला चंपकतैलें । कुरळीं गुंफिलीं फुलें । तेणें परिमळें लोधलें । मानस मधुकराचें ॥ १३ ॥ तया कुसुमाचेनि वेधें । रुंजी करिताती षट्पदें । अंतराळीं झुंकारशब्दें । प्रीतीनें पांगुळती ॥ १४ ॥ दिव्यांबराचा चेपून पट्टा । मस्तकीं वेष्टिला लपेटा । वरी नक्षत्रांऐसा गोमटा । घोंस मुक्ताफळांचा ॥ १५ ॥ नाना सुमनांचिया माळा । मुगुटा वेष्टित घातला पाळा । विविध परिमळ आगळा । नेतसे सुवायो ॥ १६ ॥ सर्वकाळ आनंदवदन । मंदहास्यें झमकती दर्शन । कृपादृष्टीं अवलोकन । करी निजदासा ॥ १७ ॥ प्रवाळवल्ली परम कठीण । सुरंगचि परि पाषाण । कोमल अधर दृष्टांतहीन । बोलोंचि नये ॥ १८ ॥ कोटि मदन मयंक । उपमे नये श्रीमुख । पूर्णत्वाचें पूर्ण बीक । लावण्यशोभा ॥ १९ ॥ चुबुकसाजिरी हनुवटी । मुक्तामाळा डोलती कंठीं । मुरडींव दोर्दंड बाहुवटीं । रत्नकिळा फांकती ॥ २० ॥ शोभे विशाळ वक्षस्थळ । उदरीं त्रिवळी सरळ । तेथें नाभी जन्ममूळ । चतुराननाचें ॥ २१ ॥ रत्नखचित पदक गळां । शोभती पुष्पांचिया माळा । कटिप्रदेशीं मेखळा । जघन सिंहाकृती ॥ २२ ॥ पीतांबर मालगुंठी । काम काशिली गोमटी । क्षुद्रघंटांची दाटी । गर्जती झणत्कारें ॥ २३ ॥ नाना सुगंधपरिमळ । सर्वांगीं उटी पातळ । रुळे वैजयंती माळ । आपादपर्यंत ॥ २४ ॥ करपल्लवी रत्नभूषणें । आजानुबाहु वीरकंकणें । कीर्तिमुखें सुलक्षणें । केयूरें दंडीं ॥ २५ ॥ आपादपर्यंत पीतांबर । न कळे जानुजंघांचा विचार । चरणीं ब्रीदाचा तोडर । दैत्यपुतळे रुळती ॥ २६ ॥ गुल्फ वर्तुळ घोंटींव निळी । मुरडींव वांकी खळाळी । अंदुलिंग रत्नें झळाळी । प्रभा तयांची ॥ २७ ॥ पातळ पाउलें कोमळें । पद्पल्लवीं दशांगुळें । नख तेंचि उजळलें । ब्रह्मांड नेणों ॥ २८ ॥ कीं उगवल्या चंद्ररेखा । तैसी शोभा दिसे नखा । सुरंग वर्तुळ टांचा । अरुणोदयासारिख्या ॥ २९ ॥ तळवे सुरंग सतेज । ऊर्ध्वरेखा आणि ध्वज । वज्र अंकुश तेजःपुंज । पद्म झळाळी ॥ ३० ॥ ज्ञानमुद्रा सव्य हातीं । पाऊल मांडीवरी एक क्षितीं । तेथें पावली उत्तम गती । अहिल्या शिळा ॥ ३१ ॥ ऐशी सर्वांगीं सुंदर । सांवळी मूर्ती मनोहर । राजवेष अति सुकुमार । शोभे सिंहासनीं ॥ ३२ ॥ परिमळद्रव्य उधळलें । तेणें श्रीमुख रजवटलें । सतेज कीरटींचें जाळें । करी चित्त तेज मंद ॥ ३३ ॥ सकळ वनितांचें मंडण । परम लावण्य सुलक्षण । जे कां अवनीगर्भरत्न । विश्वमाता ॥ ३४ ॥ ते जानकी जनकतनया । वामांगीं शोभे मूळमाया । दक्षिणे निकट सुबाह्यां । उभा लक्ष्मण ॥ ३५ ॥ भरत शत्रुघ्न लावण्यखाणी । तैसाचि शोभे गदापाणी । हास्यमुखें सुरळीत वाणी । बोलती परस्परें ॥ ३६ ॥ पित्यापरीस अधिक गती । जयावरी रघुनाथाची प्रीती । पुढें सन्मुख मारुती । उभा कर जोडुनी ॥ ३७ ॥ भगवद्दासांचें मंडण । कपिकुळाचें भूषण । सकळ वानरांचे प्राण । रक्षिले जेणें ॥ ३८ ॥ परम प्रतापें आगळा । दिसे जैसा पर्वत निळा । सिंधू उडोनि अवलीळा । जानकी शोधिली ॥ ३९ ॥ स्वयंभ सुवर्णकासोटी । उभा उदित जगजेठी । आदरें सन्मुख दृष्टी । रघुनाथपदां-

---

१ इंद्र. २ पुष्पांच्या. ३ दांत. ४ चंद्र. ५ सौंदर्य. ६ हातांमध्यें. ७ पृथ्वी. ८ स्त्रियांचें. ९ विशेष.

बुर्जी ॥ ४० ॥ रत्नजडित मनोहर । दिव्य सिंहासन सुंदर । वरी आरूढला पवित्र । राजा अयोध्येचा ॥ ४१ ॥ मेघडंबेडें छत्रें चामरें । देव ढिंढेळती अपारें । एका करीं शेसपात्रें । संनिध उभे ॥ ४२ ॥ एक सुगंध चर्चिती । एकें विंझणे जाणविती । उदकपात्रें एका हस्तीं । एक तांबूलधारी ॥ ४३ ॥ खचित पादुका एका करीं । एक सुरंग वेत्रधारी । उभे राहिले उभय हारीं । आज्ञा इच्छिती ॥ ४४ ॥ ऐसे अपार सेवकजन । आपुलाले कामीं सावधान । धूर्त तार्किक गुणसंपन्न । कार्यकर्ते ॥ ४५ ॥ खचित मंडप विशाळ । नीळ गोमेद पाच प्रवाळ । नाना रत्नें पुंजाळ । फांकती राजांगणीं ॥ ४६ ॥ चांदवे बांधले विशेष । मुक्ताफळांचे घोस । जैसें तारागणीं आकाश । लगडलें दिसे ॥ ४७ ॥ सुवर्णपोटरे स्वयंभ । उभारिले मंडपस्तंभ । रचना पहातां सुलभ । अमरावतीची ॥ ४८ ॥ महाविस्तीर्ण मंडप । खणोखणीं रत्नदीप । किरणें फांकती अमूप । बालसूर्याऐशीं ॥ ४९ ॥ तया मंडपाभीतरीं । दिव्य सिंहासनावरी । बैसला शोभे कैवारी । सुरवरांचा ॥ ५० ॥ वेष्टित ऋषींचा पाळा । वेदाध्ययनघोष आगळा । संतसज्जनांचा मेळा । ठायीं ठायीं ॥ ५१ ॥ गण गंधर्व विद्याधर । सनकादिक नारद तुंबर । भक्त मिळाले अपार । जयजयकारीं गर्जती ॥ ५२ ॥ ब्रह्मचारी विरक्त तापसी । ज्ञाते दिगंबर संन्यासी । सिद्ध योगेश्वर साधनाशीं । बैसले ठायीं ॥ ५३ ॥ बैसले पंडित पुराणिक । बैसले कवीश्वर अनेक । बैसले प्रेमळ सात्विक । साधुजन ॥ ५४ ॥ बैसलीं ब्रह्मवृंदें निर्मळें । स्नानसंध्या आचारशीळें । धोत्रें पवित्रें सोज्ज्वळें । लंबायमान ॥ ५५ ॥ योगवटे टिळे माळा । नाभिपर्यंत रुळती गळां । भाविक सात्विक लीळा । परम धार्मिक ॥ ५६ ॥ नाना उपकरणें देवतार्चनें । चंबू गडवे दर्भासनें । नाममुद्रा गोपीचंदनें । साहित्यशोभा ॥ ५७ ॥ एक देवतार्चनें करिती । घंटा घणघणा वाजविती । पुढें मांडून ध्यानमूर्ती । ध्यानस्थ झाले ॥ ५८ ॥ एकीं अंतरीं गरुडध्वजा । सांग मांडिली मानसपूजा । एक लाविती सहजा । अनुसंधान ॥ ५९ ॥ एका मुखीं नामोच्चार । प्रदक्षिणा नमस्कार । नित्य नेम निरंतर । करिती एक ॥ ६० ॥ एक एकांतासी गेले । तेथें ध्यानस्थ बैसले । एक योगाभ्यासी भले । अभ्यास करिती ॥ ६१ ॥ मुद्रा साधिती आसनें । एक मंत्र आवर्तनें । एक स्तोत्रें स्तुतिस्तवनें । अध्ययनें करिती ॥ ६२ ॥ एकीं त्यागिलें अन्न । एक करिती पयःपान । एक ते पर्णें सेवून । राहिले योगी ॥ ६३ ॥ पुरश्चरणी एक तपी । महासाधनें सांक्षेपी । एक ते लावण्यरूपी । योगाभ्यासें ॥ ६४ ॥ एक निरूपणा बैसले । ब्रह्मज्ञानी महा भले । श्रोते वक्ते आनंदले । आत्मबोधें ॥ ६५ ॥ अद्वैतनिरूपणें डुल्लती । उपनिषदें वेदश्रुती । पदें फोडूनि वाखाणिती । महानुभाव ॥ ६६ ॥ एक ऐकती पुराणें । सगुणमूर्तींचीं विंदाणें । एक गाती अभिन्नपणें । गुण सर्वोत्तमाचे ॥ ६७ ॥ वेदशास्त्रीं संपन्न । बैसले करिती व्याख्यान । श्रवण करितां श्रोतेजन । संतुष्ट होती ॥ ६८ ॥ एक साधु ब्रह्मनिष्ठ । सर्वसाक्षित्वें वरिष्ठ । एक ते मानसीं तुष्ट । संदेह नाहीं ॥ ६९ ॥ अन्वय आणि व्यतिरेक । एक देहीं जाहले मुक्त । एक मानि-

---

१ उंच छत्र्या. २ वारितात. ३ पुष्कळ. ४ समुदाय. ५ ब्राह्मणसमुदाय. ६ पाणी पिणें. ७ प्रयत्न करणारे. ८ कौशल्य.

ती अयुक्त । सर्व चर्चा ॥ ७० ॥ एक तत्त्वविशोधन । करी महा विचक्षण । चतुष्टय देह विलक्षण । ह्मणती आत्मा ॥ ७१ ॥ एक पिंडज्ञानबळें । शोधिती अष्टदळ कमळें । एक ध्वनीचेनि मेळें । मिळोनि जाती ॥ ७२ ॥ एक दृश्यातें ह्मणती देव । एकीं देवाचि केला वाव । एक ह्मणती भाव । भगवंतीं असावा ॥ ७३ ॥ एक ह्मणती मिथ्या माया । एक ह्मणती पाहिजे क्रिया । एक ह्मणती भक्ति केलिया । पाविजे देव ॥ ७४ ॥ एक ह्मणती कर्म करावें । एक ह्मणती वैराग्य धरावें । एक ह्मणती नाम घ्यावें । सर्वकाळ ॥ ७५ ॥ जे जे जेथें विश्वासले । ते ते तेथेंचि राहिले । अनुभव वेगळाले । सिद्धांत एक ॥ ७६ ॥ ऐसे अपार साधुजन । केलें अष्टविधा भजन । आत्मारामीं सावधान । भक्ति नवविध पावले ॥ ७७ ॥ नवमी आत्मनिवेदन[1] । सायुज्यमुक्तीचें साधन । एके स्थळीं समाधान । पावती सर्व ॥ ७८ ॥ असो ऐसा समुदाय । महामंडपीं बैसले सर्व । सिंहासनीं देवराव । शोभत असे ॥ ७९ ॥ सुधापानें संतृप्त[2] जाले । तैसे सर्व मिळाले । तंव ते हरिदास आले । सर्वोत्तमाचे ॥ ८० ॥ देवापुढें सावेड भक्त । गाती नाचती लज्जारहित । देहभाव विसरोनि चित्त । सर्वोत्तमीं मिळाले ॥ ८१ ॥ कुशळ गायक किन्नर । नृत्य करिती अपार । तेणें वेढिलें राजद्वार । पुढें रीघ न फावे ॥ ८२ ॥ टाळघोळ मृदंग । ब्रह्मविणे वाजती उपांग । हरिदास मिळाले रंग । तुंबळ लागले ॥ ८३ ॥ गर्जती मृदंग काहळें । आनंदें गाती उसाळें । क्षणोक्षणीं धूसर उसळे । रक्त श्वेत सुगंध ॥ ८४ ॥ साहित्य मृदंग टाळी । सर्वत्र वाजविती करताळी । क्षणोक्षणां नामकल्लोळी । गर्जती सर्व ॥ ८५ ॥ रुळती सकळांचिया गळां । जाईजुईचंपकमाळा । नाना सुगंधपरिमळा । कर्दम जहाला ॥ ८६ ॥ पताका गरुडटके अपार । तेणें आच्छादिलें अंबर । मेघडंबरें मनोहर । थडकती ठायीं ठायीं ॥ ८७ ॥ पूर्ण चंद्राकार छत्रें । व्राहाटलीं चित्रविचित्रें । गरगरां फिरती अपारें । नाना वर्णें ॥ ८८ ॥ भोंही निशाणें तळपती । दादा[3] विक्राळ झळकती । डौल पाहतां थरकती । रोमांच अंगीं ॥ ८९ ॥ बहु दाटती सुर्यपानें[5] । फटफट वाजती निशाणें । वाद्यें गर्जती त्राणें । दीर्घस्वरें ॥ ९० ॥ टाळ मृदंग शंख भेरी । वाद्यें वाजती अंबरीं[6] । नाना वाद्यांची भरोवरी । गर्जती डंके ॥ ९१ ॥ ध्वज फडकती प्रचंड । वाद्यें वाजती उदंड[7] । तेणें घोषें ब्रह्मांड । संपूर्ण झालें ॥ ९२ ॥ नाना रत्नांची फांकली प्रभा । तेणें डवरली सकळ सभा । लावण्यें लाजली शोभा । देखोनि ते काळीं ॥ ९३ ॥ झाली अत्यंत दाटणी । तेणें होतसे मंडपघसणी । उभे वारिती वेत्रपाणी । सभा घनवटली ॥ ९४ ॥ सर्वही टकमकां पाहती । पडली देहाची भ्रांती । सकळिकांच्या मनोवृत्ती । वेधल्या रामचंद्रीं ॥ ९५ ॥ वदती वक्ते अनुभवाचे । मस्तक डोलती श्रोत्यांचे । तल्लीन सादर सर्वांगाचे । श्रोते केले ॥ ९६ ॥ दिव्य सिंहासनीं रामचंद्र । परम प्रतापी नरेंद्र । सन्मुख उभा भीम कपींद्र । वज्रदेही ॥ ९७ ॥ देवास आरती आरंभिली । सकल सभा गडबडली । असंभाव्य वाद्यें लागलीं । मर्यादेवेगळीं ॥ ९८ ॥ रत्नदीप हेमताटीं । नीरांजनें लक्ष कोटी । थाटें चालली दाटी । असंभाव्य झाली ॥ ९९ ॥ दीप लागले अपार । बंबाळ जळती

१ आत्मसमर्पण. २ अमृत पिऊन. ३ भोळे. ४ मोठीं, उंच. ५ अब्दागिरी. ६ आकाशांत. ७ बहुत.

कर्पूर । स्थळोस्थळीं मनोहर । रंगमाळा शोभती ॥ १०० ॥ चंद्रज्योतीचे उमाळे । तेणें दिशाचक्र ढवळे । पूर्ण चंद्र तये वेळे । राहाटले जैसे ॥ १ ॥ धूसर उडवले अपार । तेणें ढवळलें अंबर । मुखें तेजवटलीं थोर । उत्साह झाला ॥ २ ॥ सकळ वाद्यें एक वेळा । नामघोष गजर आगळा । आच्छादिलें भूमंडळा । धूसरें तेणें ॥ ३ ॥ रत्नकिळा भूमंडळीं । मुक्तें झळकती अंतराळीं । सप्तरंग सभामंडळीं । उमटते झाले ॥ ४ ॥ रामाचेनि स्वामीपणें । मी ब्रह्मांड मानीं ठेंगणें । त्रैलोक्यहि वाटे उणें । महिमा वर्णितां ॥ ५ ॥ राम सर्वांगसुंदर । राम करुणेचा सागर । दीन अनाथांचा उद्धार । श्रीराम कर्ता ॥ ६॥ राम जीवींचा जिव्हाळा । राम मनींचा कोवळा । राम जाणे अंतरकळा । निजदासांची ॥ ७ ॥ राम पुण्यपरायण । राम त्रैलोक्याचा प्राण । रामें दास बिभीषण । चिरंजीव केला ॥ ८ ॥ राक्षस केले देशधडी । देव सोडिले तेहतीस कोडी । राज्यीं स्थापिले आवडीं । शरणागत ॥ ९ ॥ राम सुरवरां कोंवसा[1] । राम मंडण सूर्यवंशा । रामजप भवानीशा । सप्रचीती रामनामें ॥ १० ॥ नामें तरले पाषाण । नामें पतित पावन । नामें मुक्त विश्वजन । शिवाचे उपदेशें ॥ ११ ॥ शुकमिषें रामवाणी । म्हणतां पावन कुंटिणी । अंतकाळीं सकळ प्राणी । रामनामें उद्धरती ॥ १२ ॥ हो कां ज्ञाते विरक्त भक्त । हो कां साधु जीवन्मुक्त । हो कां भाविक साबडे[2] भक्त । नामेंविण वृथा ॥ १३ ॥ सकळांमध्यें थोर । तो नाम जपे शंकर । तेथें मानव किंकर । बापुडे किती ॥ १४ ॥ नामें होय चित्तशुद्धि । नामें तुटे देहबुद्धि । नामें होय कार्यसिद्धि । निजध्यासें ॥ १५ ॥ नामें स्वहित फावे । नामें निश्चयो दृढावे । नामस्मरणें शीघ्र पावे । देवाधिदेव ॥ १६ ॥ ऐसें हें रामनाम । परमगुह्य विश्रामधाम । मंथूनि काढिलें वर्म । शतकोटींचें ॥ १७ ॥ सावध ऐका श्रोतेजन । परम गुह्य महागहन । नाममात्रें होत दहन[3] । पापराशी ॥ १८ ॥ यदर्थीं जो संशय धरी । तो महापापी दुराचारी । त्यासी प्राप्त यमपुरी । विकल्पें होय ॥ १९ ॥ इति सगुणध्यान समाप्त ॥ श्रीरामचंद्रार्पणमस्तु ॥ शुभं भवतु ॥ श्रीराम समर्थ ॥

# निर्गुण ध्यान.

॥ श्रीराम समर्थ ॥ ॥ जेथूनि निर्माण विद्या । तेथें विद्या ना अविद्या[4] । ऐक्यरूपें तया आद्या । नमन भावें ॥ १ ॥ जे निराकारीं जन्मली । जन्ममूळा प्रवर्तली । इच्छा द्रुमा धांवली । उभय भागीं ॥ २ ॥ जेथें भंगपणें हेत । तें माया नसतां निवांत । तया निवांताचा प्रांत । सद्गुरु स्वामी । ३ ॥ तया सर्वांगें नमन । तैसेच संत सज्जन । आतां आठवूं ध्यान । सर्वोत्तमाचें ॥ ४ ॥ असंगासी जडे संग । आकाशीं उमटे तरंग । तरी अभंगासी भंग । वर्णूं शके ॥ ५ ॥ अघटितहि सोक्षेपें[5] । घडे स्वामीचे प्रतापें । जैसे अयोध्येचे नृपें । सिंधू पालाणिला[6] ॥ ६ ॥ तैसी सद्गुरुकृपा ओल । तेथें मुकेपणाचे बोल । मुणे बुझतां सखोल । अर्थ लाभे ॥ ७ ॥ तया लाभाचेनि गुणें । जालें ब्रह्मांड ठेंगणें । सद्गुरुकृपास्फुरणें । वाचा वदों लागे ॥ ८ ॥ सहज स्थितीत न मोडे । जोडलेंचि मागुतें

---

[1] रक्षणकर्ता. [2] भोळे. [3] जळून भस्म. [4] अज्ञान. [5] प्रयत्नानें. [6] वेढला.

जोडे । रिघत ठायीं पवाडे । निःशब्द शब्द[१] ॥ ९ ॥ तये विवेचें रत्न । न जोडे केलिया प्रयत्न । तें श्रवणें जोडे यत्न । केला पाहिजे ॥१०॥ जें पुरुष ना प्रकृती । जें मूर्ती ना अमूर्ती । जेथें श्रुती स्मृती । निवांत जाल्या ॥ ११ ॥ दृश्य कुळातें पाळित । म्हणोनि नामें कुळदैवत । दृश्यविगळें स्वतंत्र । आपण आहे ॥ १२ ॥ तो हा जाणिजे आत्माराम । सगुण निर्गुण पूर्णकाम । जयाच्या स्वरूपाचा नेम । न कळे सर्वथा ॥ १३ ॥ जैसे कर्पूराचे बंबाळ । नेमून सांगणें बाष्कळ । ज्ञातेपणाची पुष्पावळ । आत्माराम वर्णिती ॥ १४ ॥ परंतु याचे कृपेस्तव । मीपणाचा पुसे ठाव । न वदोन वक्तृत्वभाव । सहजचि आहे ॥ १५ ॥ बोलत असतां न बोलणें । हे खूण जयासी बाणे । तेचि श्रोते वक्ते शहाणे । स्वहितविषयीं ॥ १६ ॥ आतां वर्णीन रामराव । जो शंकराचा अंतरभाव । त्याच्या स्वरूपाकडे धांव । घेतली मनें ॥ १७ ॥ रत्नखचित पादुका । तेथें खुंटती आशंका । जयापासोनि विवेका । पुढें रीघ नाहीं ॥ १८ ॥ पादुकांमध्यें विवेकबळ । करी असंभाव्य तुंबळ । जैसें उष्णामध्यें जळ । हेलावू[२] लागे ॥ १९ ॥ जैसें द्वैत आहे तोंवरी । विवेक नाना युक्ती करी । अपार तर्क नानापरी । आणून दावी ॥ २० ॥ मीनांचें चाळकपण । जंव तें जळ आहे संपूर्ण । जळ सोडितां आपण । मृत्यु पावे ॥ २१ ॥ तैसी द्वैतापैलीकडे । विवेकाची हांव मोडे । मीनासारिखें मुरडे । अक्षोभ जळीं ॥ २२ ॥ पद प्राप्त झाल्यावरी । विवेकाची कैशी उरी[३] । निर्बुजोनियां माघारी । वृत्ति मुरडे ॥ २३ ॥ निजपदीं विवेकासी । मार्ग फुटेना जावयासी । पद पादुका संधीसी । आनंद पावे ॥ २४ ॥ जेथें मीपण सोडिती । सज्जन पुढें पवाडती । जाणीव सोहूनियां श्रुती । गौप्य झाल्या ॥ २५ ॥ जेथें अत्यंत सांकडी । मन संगती सोडी । तर्क जाणीव बापुडी । उभीच विरे ॥ २६ ॥ वेदें जाणोनि मौन धरिलें । तें अनुभवा आलें । अनुभवासि अनुभविलें । अनुभवेंविण ॥२७॥ जो मार्ग परम कठीण । न चले भोयाळेविण । स्वामीविरहित कोण । पावों शके ॥ २८ ॥ जेथ नांव रूप हें झडे । आनंद आनंदीं बुडे । जेथ निःशेष फुंज मोडे । निजसुखाचा ॥२९॥ जेथें विषयसुख आटे । आनंद प्रगटोनि तुटे । जैसा कर्पूरदीप झटे । उजळोनि मुरे ॥ ३० ॥ पदाऐलीकडील गोष्टी । जेथें पडली विवेकदृष्टी । विवेकबळें तर्क वेष्टी । सीमा पादुकांची ॥ ३१ ॥ राम निजपदीं दृष्टी पडतां । कैंचा उरेल वर्णितां । जयास वर्णावें तत्वतां । तोचि आपण ॥ ३२ ॥ निवांत विश्रांतिस्थळ । उभा विराला ब्रह्मगोळ । निर्मळ स्वरूप निखळ[६] । कोंदाटलें ॥ ३३ ॥ अवघें तेंचि उदंड । वाटे बुडालें ब्रह्मांड । अंधार तुटला निबिडें । रामरूप प्रगटलें ॥ ३४ ॥ वर्णितां रघुनाथचरण । अद्भुत भासलें निरूपण । वाटे परंतु परम हीण । पदीं न साहे ॥ ३५ ॥ पदापासोनि साकार । सृष्टि झाली चराचर । तेंचि ध्यान मनोहर । वर्णीन आतां ॥ ३६ ॥ निजपदीं नाम ठेविलें । तीं साजिरीं दोनी पाउलें । जेथें मुनी रंगले । अनुभवें ॥ ३७ ॥ मोक्षध्वज ऊर्ध्वरेखा । ते सायुज्यमुक्ती देखा । वज्र तें अंकुर सुखा । अंकुश शोभे ॥ ३८ ॥ निजसुखाची नवाळी । ते पदीं पद्म झळाळी । दिव्य चक्षूची

१ ऐकल्यानें. २ माशाचें. ३ स्थिति. ४ शिरतात. ५ संकट. ६ सर्व. ७ दाट. ८ आश्चर्यकारकता.

न्याहळी। दिपोनि ठेली ॥ ३९ ॥ ज्ञानसूर्य बाळप्रभा । ते टांचांची दिव्यशोभा। गुल्फ नीळ तेणें नभा। नीळिमा आली ॥ ४० ॥ पदीं पद महानुभाव। ते पदाचे पदपल्लव। साजिरे शोभती लाघव। मुक्तीचे राहिले ॥ ४१ ॥ शून्यत्र नखाग्रें फोडिलीं। सजीव सतेजें उरलीं। पाहों जातां दिसे बिंबली। स्वरूपस्थिती ॥ ४२ ॥ निज पदांपें निवृत्तिगंगा। निघाली भवतापभंगा। श्रवणें निववी जगा। सज्जनसंगें ॥ ४३ ॥ विशाळ ओघ प्रगटला। तिहीं लोकीं प्रगटला। मुमुक्षू उंपेगा आला। ओंकार भगीरथ ॥ ४४ ॥ तये गंगेसी भावार्थी। मननें स्नानें करिती। ते सायुज्यता पावती। निजध्यासें ॥ ४५ ॥ तये गंगेतीरीं स्नानंदें। मिळालीं ब्रह्मवृंदें। स्नानें अद्वैतबोधें। बुब्या देती ॥ ४६ ॥ अनंत जन्मांचा मळ। क्रिया पालटे तत्काळ। ऐसें पवित्र गंगाजळ। कर्णद्वारें सेविती ॥ ४७ ॥ जया प्रत्यहीं स्नान घडे। दिवसेंदिवस मळ झडे। अभ्यंतरीं कैवल्यपद जोडे। मननेंकरोनि ॥ ४८ ॥ वासनावस्त्र मळीण झालें। प्रपंचसंग स्नेह लागलें। तें असंगजळें धुतलें। शुद्धता पावे ॥ ४९ ॥ ब्रह्मनिष्ठा तेचि वस्त्रें। प्रत्यहीं क्षाळिती धोत्रें। ह्मणोनि तीं परम पवित्रें। सर्वकाळ ॥ ५० ॥ जरी झाला थोर ब्राह्मण। केलें पाहिजे क्षाळण। क्षाळण न करितां मळीण। अमंगळ ॥ ५१ ॥ अहंतेचे डाग पडले। बहुतांचे निघोनि गेले। प्राणी शुद्धतेनें पावले। अक्षय पद ॥ ५२ ॥ एक स्नान करिती। परि मळ ठेविती। ऐशा स्नानें फळश्रुती। होणार नाहीं ॥ ५३ ॥ जे संसारउष्णें पोळले। ते गंगाजळें निवाले। परम विश्रांती पावले। सत्संगें शीतळ ॥ ५४ ॥ जे अखंतप्त संसारीं। ते मळीण बैसले भीतरीं। हुडहुडी अंगावरी। महामोहाची ॥ ५५ ॥ भाविक गंगेंत पडले। ते वाहतचि उगमा गेले। गंगेसहित प्रवेशले। श्रीरामपदीं ॥ ५६ ॥ उगमाहूनि गंगा पडे। तेथोनि धांवे उगमाकडे। मागें जावोनि पडे। जेथील तेथें ॥ ५७ ॥ गंगे पुढें आणि मागें। अवघा उगम निजांगें। उगमेंचि व्यापिलें गंगे। सबाह्य उगम ॥ ५८ ॥ जे जे उगमासि गेले। ते उगम होवोनि राहिले। सदां सर्वांगीं निवाले। आनंदरूप ॥ ५९ ॥ गंगोदक कर्णीं भरलें। तें सुखें उचंबळलें। पुन्हां उपेगा आलें। भाविकासी ॥ ६० ॥ माहेमा गोदावरीचा। मार्ग दाखवी मोक्षाचा। श्रीरामपदांबुजाचा। अगाध महिमा ॥ ६१ ॥ आतां असो हा खूण। मागें राहिलें निरूपण। ध्यान रामाचें श्रवण। श्रोतीं करावें ॥ ६२ ॥ स्वरूपीं मुरडे वृत्ती। तैशा वाकी खळाळिती। मुरडल्या परी असती। जेथील तेथें ॥ ६३ ॥ कामक्रोधादि निशाचर। त्यांचा करोनियां संहार। तोचि निजपदीं तोडर। गजे प्रतापें ॥ ६४ ॥ जानुपर्यंत पीतांबर। न कळे जानुजंघाविचार। जैसा आकार निराकार। आच्छादिला ॥ ६५ ॥ बुद्धि ताम्रपर्णीचे जळें। स्वरूपसागरीं मिळाले। तया संगमीं मुक्ताफळें। मुक्तपणें होतीं ॥ ६६ ॥ देहबुद्धीचे शिंपले। ज्ञानदृष्टीं विकासले। जीवन पडतां बुडाले। कठीणपणें ॥ ६७ ॥ तया शिंपल्याकरितां। आली कठिणता। जीवन परी ऐक्यता। तुटोनि गेली ॥ ६८ ॥ उकलोनि पाहिलें। जीवन निःशेष गेलें। तें पाषाणरूप झालें। संगागुणें ॥ ६९ ॥ जें दुर्लभ जगासी। परंतु झालें एकदेशी। ऐक्य-

१ चरणापासून. २ उपयोगाला. ३ प्रतिदिवशीं. ४ मोक्षपद. ५ धुतात. ६ राक्षस. ७ ताम्रपर्णी नामक नदी.

रूपें जीवनासी । मिळों नेणे ॥ ७० ॥ मुक्तपण अंगीं जडलें । तें‍ह्यांचि वेगळें पड-लें । अभिन्नत्व विघडलें । वेगळेपणें ॥ ७१ ॥ सगुणपल्लवीं जडतां । त्यासी होय सार्थकता । सगुणीं जडलें नसतां । व्यर्थचि गेले ॥ ७२ ॥ जें सगुणपल्लवीं जडे । तें सर्वथा भिन्न न पडे । ऐसीं मुक्तें अपाडें । तळपती पल्लवाग्रीं ॥ ७३ ॥ प्रबोधसिंह विवेकबळें । भवगजांचीं गंडस्थळें । विदारित संसारसळें । महाबळी ॥ ७४ ॥ तया सिंहाचें मुख्य मान । तैसे शोभे सान जघन । जेथें असे गुह्यस्थान । तें बोलतांचि नये ॥ ७५ ॥ जें गुरूचें निज गुह्य । कळल्याहि बोलों नये । तेथील सुख जानकीगुह्य । सज्जन विचारी ॥ ७६ ॥ असो ऐसें गुह्यस्थान । आच्छादूनियां वसन । वेष्टित शोभे जघन । काशिग जेणें ॥ ७७ ॥ तयावरी कटिसूत्र मेखळा । क्षुद्र घंटिका सोज्ज्वळा । जैशा बोधमयूखांच्या कळा । फांकती रश्मी ॥ ७८ ॥ क्षुद्र दृष्टीचा वांटा । ह्मणोनि नामें क्षुद्रघंटा । त्या अधोमुखें द्रष्टा । ह्मणोनि आहेती ॥ ७९ ॥ भ्रम हा निःशेष उडे । तेचि शोभती पत्रांडे । समाधानीं प्रीती जडे । तैशा जडती किंकिण्या ॥ ८० ॥ निरावलंबीं जी अवलंबिली । नसोन इच्छा उभारिली । तेचि नलिनी प्रगटली । मूळमाया ॥ ८१ ॥ जें निर्मळ स्वानंदजळ । आदि अंतीं एकचि निखळ । तेथें इच्छारूप कमळ । प्रगटलें बळें ॥ ८२ ॥ तयापासून कळा । पूर्वीं होता संकोचला । तो गुणक्षोभें विकासला । रहस्यरूपें ॥ ८३ ॥ तया अभ्यंतरीं पत्रें । सुकुमारें चित्रें विचित्रें । सुरंग रंगांवीं अपारें । नानावर्णें ॥ ८४ ॥ तेंचि साजिरें नाभिकमळ । जें ब्रह्मदेवाचें जन्ममूळ । तया कमळाचा तळ । त्याचा अंत न लागे ॥ ८५ ॥ विधि जन्मे नाभिकमळा । मनीं आवेश आगळा । पाहीन ह्मणे जन्ममूळा । तर्कानळाचे बळें ॥ ८६ ॥ त्या मूळा शोध न करी । तो लागे दुरिचा दूरी । निबुंजोनियां मावारी । वृत्ती मुरडे ॥ ८७ ॥ तेथोनि निघाला । आपुलेस्थानासी आला । कांहीं न स्मरे बुडाला । शून्यत्वडोहीं ॥ ८८ ॥ तेथें मन निबुंजलें । स्वामीचें स्तवन केलें । सद्भाव देखोनि संभाळिलें । सद्गुरुराजें ॥ ८९ ॥ प्रगटला स्वामीरावो । हंसरूपें देवदेवो । ज्ञान देवोनियां ठावो । फेडी अज्ञानाचा ॥ ९० ॥ ह्मणोनि जन्ममूळाचा ठाव । मीपणें घेईन हें वाव । निबुंजला ब्रह्मदेव । इतर ते किती ॥ ९१ ॥ शोध घ्यावा हांव जेथें । मीपण लपोनि बैसे तेथें । मीपण योगियासी पंथें । मार्ग न चले ॥ ९२ ॥ संग सोडीना मीपण । ह्मणोनि परमार्थ कठीण । मीपण सोडितां खूण । बाणे अनुभवाची ॥ ९३ ॥ जंव जंव कमळ वाढे । तंव तंव कठिणता चढे । कठिणपणें नातुडे । जन्ममूळा ॥ ९४ ॥ जीवनापासोनि झालें । जीवनासी अंतरलें । जीवनीं परी स्पर्शिलें । नाहीं जीवनासी ॥ ९५ ॥ या नांव स्वानंदजळ । तें ऐलीकडे सकळ । सांडूनियां गेला नळ । भूमीच्या पाठीं ॥ ९६ ॥ जीवन आणि नलिनी । मिळोनियां कमळिणी । कमळिणी चाळक धणी । त्या स्वामित्व नलगे ॥ ९७ ॥ मूळमायेचें पिसें । आलें घरपणाचे मिसें । पिसेपणीं आपैसें । पूर्णत्वपण ॥ ९८ ॥ पूर्णा अपूर्णपणाचा कळंक । अपूर्णपणें लाविती लोक । अपूर्णपूर्ण विवेक । कमळकोशीं ॥ ९९ ॥ विवेकाचा परिमळ । घेती संत षट्पदकुळ । गुणगुणिती

१ उपमा देतां येत नाहीं अशा रीतीनें. २ लहान. ३ वस्त्र ४ किरण. ५ पराक्रम. ६ विशेष. ७ भिऊन गेलें.

सकळ । लाधले विवेका ॥ १०० ॥ परिमळ घेऊन निघाला । तयास विवेक पावला । विवेकेंसी अडकला । तयास बंधन ॥ १ ॥ यापरी नाभिकमळ । उदरीं ब्रह्मांडगोळ । मायोपाधी सकळ । होत जात ॥ २ ॥ सत् चित् आणि आनंद । हे त्रिपुटी जीवें मंद । तेंचि सुखानंद दोंद । शोभे उत्तमाकृती ॥ ३ ॥ शिव शक्ती ऐक्य दिसे । देखणें स्वयंभ असे । विशाळ वक्षःस्थळ तैसें । शोभे दो अंगीं ॥ ४ ॥ वामांगाचि मायशक्ती । दक्षिण ते पुरुष व्यक्ती । दोनी मिळोनि आदि अंतीं । एकचि अंग ॥ ५ ॥ विदेहीपणाचें कोदंडें । भग्न केलें महा प्रचंड । तेंचि मुरडींव दोर्दंड । ज्ञानशक्ती ॥ ६ ॥ तया कोदंडाचे बळें । रजोगुणें क्षत्रियमुळें । छेदोनि ब्रह्मकुळें । सुखी केलीं ॥ ७ ॥ ब्रह्मनिष्ठ ब्राह्मण केवळ । विधियुक्त आचारशीळ । विवेकसंयुक्त निर्मळ । भ्रांतीवेगळे ॥ ८ ॥ सत्वगुणाचे आधारें । भजती हर्षें थोर । तैसीं नसती पामरें । रजोगुणी ॥ ९ ॥ रजोगुणी क्षत्रिय जाले । ब्राह्मण राज्यभ्रष्ट केले । अवघे आपणाचि झाले । अधर्मी दुरात्मे ॥ १० ॥ माझें माझें करीत धांवती । सात्विक पळोनि जाती । सावकाश राज्य करिती । रजोगुण क्षत्रिय ॥ ११ ॥ ह्मणोनि षष्ठावतार । महाप्रतापी विचार । तेणें रजोगुणसंहार । बळें केला ॥ १२ ॥ राज्य दिलें ब्राह्मणांसी । आनंद झाला सात्विकांसी । पुनःपुनः क्षत्रियांसी । देशधडी केलें ॥ १३॥ जगीं क्षत्रिय महाक्रूर । परम प्रतापी अनावर । तयां निर्दाळूनि विचार । आनंद मानी ॥ १४ ॥ तया विचाराचें ज्ञातेपण । तें कोदंड महाकठीण । अभंग जाणोनि पण । विदेहें केला ॥ १५ ॥ सकळ पृथ्वीचे ठायीं । कोदंड भंगीसा नाहीं । परम प्रतापी तेही । साशंक झाले ॥ १६ ॥ रामीं शरण अनन्यभावें । तेंहि स्वयें रामचि व्हावें । राम जालिया स्वभावें । भंगे धनुष्य ॥ १७ ॥ परंतु हें महाप्रचंड । भंगलें न जाय कोदंड । कठीण ज्ञातेपणाचें बंड । भंगणार नाहीं ॥ १८ ॥ ऐसें जें कां अनावर । गुणीं लावून केलें चूर । तेंचि दोर्दंड अपार । ज्ञानशक्ती जेथें ॥ १९ ॥ तये शक्तीचेनि बळें । रणा आलीं महा दिसाळें । क्रूर तामसें विखाळें विक्राळवाणीं ॥ २० ॥ गुणीं लावूनियां शर । कुबुद्धीताटिकाशीर । तोडूनियां ऋषीश्वर । सुखी केले ॥ २१ ॥ जे कुपात्रामाजीं भूषण । निर्दाळिले खर दूषण । कपटरूपें ये हरिण । तोहि पिटला ॥ २२ ॥ मकरध्वज महाबळी । देवां आणि दानवां बळी । जेणें घातिलें पायांतळीं । महानुभाव ॥ २३ ॥ अजिंकपणाचे माजें । अभिलाषिलें अनुजभाजे । देहाभिमानफुंजें । बंधु दवडिला ॥ २४ ॥ ऐसा जो परम प्रतापी । बळिया वितंडरूपी । तोहि निर्दाळिला कपी । दोर्दंडबळें ॥ २५ ॥ वर्णावया दोर्दंडशक्ती । इतुकी मज कैंची मती । आदि करोनि सुरपती । अमर मुक्त केले ॥ २६ ॥ निजशक्ती वानितां हरिखें । सज्जन संतोषती सुखें । तेचि शोभती कीर्तिमुखें । वेद वाखाणिती ॥ २७ ॥ दोर्दंडवेष्टित बाहुवटें । साहित्य प्रतापें गोमटें । जेथें शत्रुकुळ आटे । अहंकारादि ॥ २८ ॥ दुस्तर जे महाबळी । त्यांची करोनि रवंदळी । शोधूनि रणमंडळीं । निर्मूळ केलें ॥ २९ ॥ दुष्ट

१ धनुष्य २ दुष्ट. ३ हद्दपार. ४ नाहींसें करून. ५ दोरीला. ६ मदन. ७ असुरांना. ८ हर्षानें. ९ पायाखालीं तुडवणें.

वीरांची संपली उठी । तेचि वीरकंकणें गोमटीं । रत्नजडित मनगटीं । प्रतापकिरणें ॥ ३० ॥ सुख पाविजे अभयकरें । रत्नभूषणें मनोहरें । नवविधा भजनद्वारें । फांकती किरण ॥ ३१ ॥ जेथें आटती सर्व रंग । तेंचि साजिरें सर्वांग । अति सकुमार संग । सुमनांचा न साहे ॥ ३२ ॥ सगुण निर्गुण न कळे । शुद्ध भावार्थें आकळे । लावण्यरूप सांवळें । सुनीळ शोभा ॥ ३३ ॥ सत्व चंदनाचा गाळ । लाविली उटी पातळ । शांती वैजयंती माळ । आपादपर्यंत ॥ ३४ ॥ मूळ तंतु जो ओंकार । मातृका सुमनहार । नाना पुष्पांचे अपार । रुळती गळां ॥ ३५ ॥ नित्य मुक्त मुक्ताफळें । स्वप्रकाशें तीं सोज्ज्वळें । मुक्तपणाचे विटाळे । स्पर्शलीं नाहींत ॥ ३६ ॥ ऐसी मुक्तामाळा साजिरी । अखंड हृदयावरी । अति आदरें धरी । देवाधिदेव ॥ ३७ ॥ तया मुक्तांच्या निजवृत्ती । किरणासारिख्या फांकती । ऐक्यरूपें मिळोनि जाती । निजपदकीं ॥ ३८ ॥ आकाशींचें चंद्रमंडळ । केवळ पूर्णपणें वर्तुळ । परम लावण्य शीतळ । अमृतमय जें ॥ ३९ ॥ तयासारिखें वदन । जें मंडळ काळाहीन । तयासि अपूर्णपण । कळंक लागला ॥ ४० ॥ मागां वर्णिलें शरीर । त्या शरीराचें निजसार । तेंचि वदन मनोहर । आनंदमय ॥ ४१ ॥ कीं आनंदाचें ओतिलें । कीं तें स्वरूप मुसावलें । लावण्यासी लावण्य आलें । जयाचेनि ॥ ४२ ॥ शब्द निवतां हास्यवदन । शरणागतां आश्वासन । तेणें झमकती दशनें । डाळिंबबीजाऐसे ॥ ४३ ॥ एकीं अनेक ऐक्य आलें । तें तांबूल मिश्रित झालें । एकपणें रंगोनि गेलें । अभिन्नत्वें ॥ ४४ ॥ अधर प्रवाळवल्ली । मी म्हणतां ऐक्या आली । तेणें मिठी पडली । निवांत शब्दीं ॥ ४५ ॥ अंत न कळे शब्दाचा । तेथें उत्पन्न चारी वाचा । वेदशास्त्रपुराणांचा । विस्तार झाला ॥ ४६ ॥ निज शब्दांचें अंतर । शब्दीं तयाचा विचार । लब्ध होय निजसार । स्वानुभवें ॥ ४७ ॥ वक्तृत्वें त्रिपुटी आटे । तेंचि श्रीमुख गोमटें । हनुवटी चुबुक प्रकटे । मंद मंद श्मश्रु ॥ ४८ ॥ समता भ्रुकुटीचा प्रकार । सरळ नासिक मनोहर । जेथें स्वयमेव विढार । विश्रांती घेत ॥ ४९ ॥ मागें वर्णिलें पद्मपत्र । तेथील देखणें विचित्र । लावण्य विशाळ नेत्र । लक्षिले न वचती ॥ ५० ॥ द्रष्टेपणाची त्रिपुटी । लक्ष अलक्ष मूळ तुटी । तेणें गुणें प्रकाशदाटी । प्रकाशाविण ॥ ५१ ॥ चक्षूचें देखणें सरे । ज्ञानदृष्टी पावोनि विरे । देखणेपणेंविण उरे । सर्वांगदेखणा ॥ ५२ ॥ अखंड चक्षु अर्धोन्मीलित । सकळ देखण्याचा प्रांत । जेथें अगोचरासहित । मुद्रा आटती ॥ ५३ ॥ श्रवण मनन निजध्यास । साक्षात्कारें जडे विश्वास । परमानंद सावकाश । होइजे स्वयें ॥ ५४ ॥ मुमुक्षू साधक सिद्ध झाले । तेहि येणेंचि मार्गें गेले । निखळ सुखें सुखावले । महानुभाव ॥ ५५ ॥ योगी वितरागी उदास । चतुर्थाश्रम जो संन्यास । दिगंबर नाना तापस । येणेंचि मार्गें ॥ ५६ ॥ जोगी जंगम आणि सोपी । फकीर कलंदर नानारूपी । येणेंचि मार्गें स्वरूपीं । पावती सकळ ॥ ५७ ॥ ऋषी मुनी आणि सुरवर । आदिकरूनियां हरिहर । येणेंचि मार्गें पैलपार । पावती सकळ ॥ ५८ ॥ असो ऐका श्रवणपुटें । श्रोतव्य त्रिपुटी आटे । परम गुह्य प्रकटे । अनिर्वाच्य ॥ ५९ ॥

१ फुलांचा. २ दांत. ३ महाश्रेष्ठ. ४ वैराग्यशील.

तेचि कुंडलें मनोहरें । रत्नजडित मकराकारें । तळपती श्रोत्रभारें । लंबित झाले ॥ ६० ॥ शुद्ध स्वरूपीं शुद्ध ज्ञान । आहेचि तैसें विलेपन । मृगमदमिश्रित चंदन । नाना परिमळ ॥ ६१ ॥ मनोमृगातें मारूनी । काढिली कस्तूरी उन्मनी । हेतुरूपें विलेपनीं । ऐक्यता झाली ॥ ६२ ॥ शुद्ध स्वानुभवाचीं फुलें । तीं मस्तकीं चर्चिलीं तैसें । तेही मस्तकीं जिरालें । ऐक्यरूपें ॥ ६३ ॥ तेणें बळें चांचर कुरळ । बाहेर आलें प्रबळ । जेथें बद्धपणाचा मळ । निःशेष नाहीं ॥ ६४ ॥ अति सूक्ष्मीं सूक्ष्म दृष्टी । तेचि साजिरी वीरगुंठी । पाहातां तर्ककला मोठी । मागें राहिली ॥ ६५ ॥ जेथें तर्कजाणीव गळाली । तीच किरीटीं झळाळी । जेथोनि फांकती कपाळीं । रम्य किळा ॥ ६६ ॥ जे इतुक्यांचा शेवट । तोचि मस्तकीं मुगुट । जेथोनि सर्वेही खटपट । निवांत झाली ॥ ६७ ॥ ऐशीं सर्वांभूतीं भूषित । स्वयंभ मूर्ती आदि अंत । सृष्टिरचना होत जात । द्वारां तयाच्या ॥ ६८ ॥ राम लक्ष्मण सीता । भरत शत्रुघ्न हनुमंता । सकलिकां भक्तांसी ऐक्यता । भेटी झाली ॥ ६९ ॥ मागां जाहले आतां होती । होऊनि नाहीं पुनरावृत्ती । ऐसी अभंग ऐक्यस्थिती । वर्तल्यासहित ॥ ७० ॥ सकळ भक्त मिळाले । हरिहर ब्रह्मादि आले । ऐक्यरूपें राम झाले । रामेसहित ॥ ७१ ॥ जितुकें दृश्य साकार । आहे अनमेय अपार । तेचि उधळले धूसर । रक्त श्वेत सुगंध ॥ ७२ ॥ पंचभूतीं कर्पूरगौळ । ज्ञानरूपें झाला प्रबळ । ओवाळूनियां सकळ । निवांत झाले ॥ ७३ ॥ गेला कर्पूर जळोनी । राहिल्या अनुहतध्वनी । ऐक्यरूपें समाधानीं । सकळ राहिले ॥ ७४ ॥ चार देहांची कुरवंडी । द्वास ओवाळूनि सांडी । श्रोते वक्ते आवडीं । ओवाळिले ॥ ७५ ॥ इति श्रीनिर्गुणध्यानं संपूर्णम् ॥

## मानसपूजा.

## प्रकरण १.

॥ श्रीराम समर्थ ॥ संगीत स्थळें पवित्रें । तिकड्या वोळंबे सूत्रें । निवती विस्तीर्णे स्वतंत्रें । उपसाहित्याचीं ॥ १ ॥ तुळसीवनें वृंदावनें । सुंदर सडे संमार्जनें । ओटे रंगमाळा आसनें । ठाईं ठाईं ॥ २ ॥ गवाक्षें खिडक्या मोऱ्या । चकदरबार पाहिऱ्या । सोपे माड्या ओहऱ्या । ठाईं ठाईं ॥ ३ ॥ ध्वज गोपुरें शिखरें । भुयारें तळघरें विवरें । मंडप राजांगणें गोपुरें । दोरेंवटे दाळजा ॥ ४ ॥ देवालयें रंगशिळा । चित्रविचित्र दीपमाळा । पोहिया पादुका निर्मळा । आड बावी पुष्करणी ॥ ५ ॥ विशाळ तळीं सरोवरें । मध्यें तळपती जळचरें । ब्रह्मकमळें मनोहरें । नाना रंगें विकासती ॥ ६ ॥ गोमुखें पाट कालवे । सांधूनि बांधूनि आणावे । स्थळोस्थळीं खळवाते । नळ टाकीं कारंजीं ॥ ७ ॥ पुष्पवाटिका वृक्ष वनें । नानाप्रकारचीं धनें । पक्षी श्वापदें गोधनें । ठाईं ठाईं ॥ ८ ॥ सभामंडप चित्रशाळा । स्वयंपाकगृहें भोजनशाळा । सामग्रीगृहें धर्मशाळा । मठ मढ्या नेटक्या ॥ ९ ॥ एकांतगृहें नाट्यशाळा । देवगृहें होमशाळा । नाना गृहें नाना शाळा । नाना प्रकारीं ॥ १० ॥ ऐसीं स्थळें परोपरी । नाना युक्ती कळाकुसरी निःकामबुद्धी जो करी । धन्य तो साधू

---

१ कस्तुरीयुक्त. २ मुकुटावर. ३ तेज. ४ झरोके. ५ द्वारप्रदेश. ६ विहिरी. ७ बगीचे.

॥ ११ ॥ इति श्रीमानसपूजा । मनें पूजावें वैकुंठराजा । साधकें अगत्य आत्मकाजा । करीत जावी ॥ १२ ॥

## प्रकरण. २

॥ श्रीराम समर्थ ॥ ॥ आतां पारिपत्य ऐकावें । उत्तम गुणाचें आघवें । जयांस देखतां मानवे । विश्वलोक[1] ॥ १ ॥ धीर उदार सुंदर । दक्ष व्युत्पन्न चतुर । सकळ प्रयत्नीं तत्पर । अत्यादरें ॥ २ ॥ दूरदृष्टी दीर्घप्रयत्नी । समय प्रसंग जाणे चिन्हीं । नासला फड नेटका वचनीं । बोलोन करिती ॥ ३ ॥ जाणती दुसऱ्याचें अंतर । सावधानता निरंतर । नेमस्त न्यायाचें उत्तर । बाष्कळ नाहीं ॥ ४ ॥ पवित्र वासनेचे उदास । केवळ भगवंताचे दास । सारासारविचारें वास । हृदयीं केला ॥ ५ ॥ अगाध अव्यग्र धारणा । मिळोनि जाती राजकारणा । कार्यभागाची विचारणा । यथायोग्य योजिती ॥६॥ न्याय नीति मर्यादेचा । स्नान संध्या पवित्र तेजा । सत्यवादी बहुत ओजा । अन्याय क्षमित ॥ ७ ॥ चुकणें विसरणें असेना । मत्सर पैशून्य[2] दिसेना । कोप क्षणिक असेना । निरंतर ॥८॥ हरिकथानिरूपण । तेथें प्रेमळ अंतःकरण । पाहों जातां उत्तम लक्षण । उत्तम असे ॥ ९ ॥ ऐशा प्रकारचें पारपत्य । करूं जाणती सकळ कृत्य । धन्य धन्य कृतकृत्य । निःकामतेनें ॥ १० ॥ ऐसे भले परमार्थी । श्रवण मनन अर्थाअर्थी । जे परलोकींचे स्वार्थी । परोपकारी ॥ ११ ॥ ॥ इति श्रीमानस० ॥

## प्रकरण ३.

श्रीराम समर्थ ॥ ॥ आतां ऐका स्वयंपाकिणी । बहु नेटक्या सुगरिणी । अचूक जयांची करणी । नेमस्त दीक्षा ॥ १ ॥ शुचिष्मंत बाह्य निर्मळ । साक्षेपपणीं बहु चंचळ । नेमक निष्टंक[3] केवळ । उमा रमा ॥ २ ॥ ज्यांची भगवंतीं आवडी । श्रीहरिभजनाची गोडी । मनापासोनि आवडी । कथाकीर्तनाची ॥ ३ ॥ शक्ति युक्ती बुद्धि विशेष । नाहीं आळसाचा लेश । कार्यभागाचा संतोष । अतिशयेंसी ॥ ४ ॥ कदा न आवडे अनर्गळ । वस्त्रें पात्रें झडफळ । नेमक करणें दसाळ । यथातथ्य ॥ ५ ॥ गोड स्वादिष्ट रुचिकर । एकहृदयतत्पर । न्यूनपूर्णाचा विचार । कदापि न घडे ॥ ६ ॥ रोगी अत्यंत खंगलें । तेणें अन्न भक्षिलें । भोजनरुचीनें गेलें । दुखणें तयाचें ॥ ७ ॥ तेथें उत्तमचि आघवें । काय घ्यावें काय सांडावें । जेवीत जेवीत जेवावें । ऐसें वाटे ॥ ८ ॥ उत्तम अन्नें निर्माण केलीं । नेणों अमृतें घोळिलीं । अगत्य पाहिजेत भक्षिलीं । ब्रह्मादिकीं ॥ ९ ॥ सुवासेंचि निवती प्राण । तृप्त चक्षु आणि घ्राण । कोठुन । आणिलें गोडपण । कांहीं कळेना ॥ १० ॥ भव्य स्वयंपाक उत्तम । भोजनकर्ते सर्वोत्तम । दास ह्मणे भोक्ता राम । जगदंतरें[5] ॥ ११ ॥ इति श्रीमानस० ॥

## प्रकरण ४.

श्रीराम समर्थ ॥ ॥ लोणचीं रायतीं वळवटें । वडे पापड मेतकुटें । मिरकुटें डांगरकुटें । मिरे घाटे सांडगे ॥ १ ॥ नाना प्रकारच्या काचऱ्या । सांडया कुरवड्या उसऱ्या ।

---

1 सर्वलोक. २ दुष्टपणा, चहाडी. ३ स्वच्छंद. ४ नाक. ५ जगतांत सर्वत्र.

कोशिंबिरीच्या सामोग्र्या । नानाजिनसी ॥ २ ॥ सुरण नेटके पचविले । आंबे आंवळे घातले । आलें लिंबें आणिले । घोंस मिऱ्यांचे ॥ ३ ॥ कुइऱ्या बेलें माईनमुळें । भोंकरें नेपत्ती सारफळें । कळकें कांकडी सेवगमुळें । सेंदण्या वांगीं गाजरें ॥ ४ ॥ मेथी चाकवत पोकळा । माठ शेपू बसळा । चंचवळी चवळा वेळवेळा । चिवळ घोळी चिमकुरा ॥ ५ ॥ वांगीं शेंगा पडवळीं । दोडके कारलीं तोंडलीं । केळीं भोंपळे कोहाळीं । गंगाफळें काशी फळें ॥ ६ ॥ कणकी सोजी सांजे सपिठें । नाना डाळी धुतलीं मिठें । रवे कण्या पिठी पिठें । शुभ्रवर्णे ॥ ७ ॥ बारीक तांदूळ परिमळिक । नाना जिनसींचे अनेक । गूळ साखर राव पाक । तूप तेल मध राव ॥ ८ ॥ दूध दहीं दाट साय । ताक लोणी कोण खाय । नाना शिखरिणींचे उपाय । आरंभिले ॥ ९ ॥ हिंग जिरें मिरें सुंठी । कोथिंबीर आंवळकाठी । पिकलीं लिंबें सदेठीं । मेथ्या मोहऱ्या हळदी ॥ १० ॥ द्रोण पानें पत्रावळी । ताटें दुरड्या वरोळी । सुपें हारे विचित्र पाळीं । नाना उपसामग्री ॥ ११ ॥ इति श्री० ॥

## प्रकरण ५.

॥ श्रीराम समर्थ ॥ ॥ रांजण मांदण रेडे घागरी । कुंडालें मडकीं तोवरी । तवल्या दुधाणीं अडघरीं । मोघे गाडगीं करोळे ॥ १ ॥ ऐसीं नानाजिनसी मडकीं । कामा न येती थोडकीं । लहान थोर अनेकीं । एकचि नांव ॥ २ ॥ हंडे चरव्या तपेलीं पाळीं । काथवट्या ताह्मणें मुदाळीं। तांबे गंधाळें वेळण्या पाळीं । झाऱ्या चंबू पंचपात्र्या ॥ ३ ॥ धातु कळशा बहुगुणी । पूर्वीं खेळविलें पाणी । गुंडग्या झांकण्या कासरणीं । बहुविधा ॥ ४ ॥ विळ्या पळ्या पाटे वरोटे । काहला तवे मोठे मोठे । थोंवर तेलतवे कढई मोठे । सामोग्रीचे ॥ ५ ॥ चुली भोंणस ओंवील । तिसऱ्या थाळी ओतळ । शुभा काष्ठें बहुसाल । पाट चाटू खोरणीं ॥ ६ ॥ पोळपाट लाटणीं घाटणीं । परळ वेळण्या दिवेलावणीं । कंदील रोवणीं दिवेलावणीं । सरक्या वाती काकडे ॥ ७ ॥ स्वयंपाकगृहें बोललीं । सडा संमार्जनें केलीं । सोंवळीं वाळू घातलीं । आणिलीं अग्रोदकें ॥ ८ ॥ इकडे सामुग्र्या सिद्ध केल्या । तिकडे चुली पेटल्या । अंगें धुवूनी बैसल्या । स्वयंपाकिणी ॥ ९ ॥ पात्रें धुवून पाहिलीं । पुन्हां धुतलीं धुवविलीं । उदकें गाळूनि घेतलीं । सोंवळ्यामध्यें ॥ १० ॥ पुढें आरंभ स्वयंपाकाचा । समुदाव स्वयंपाकिणींचा । नैवेद्य मांडला देवाचा । सावकाश ॥ ११ ॥ ॥ इति श्रीमानस० ॥

## प्रकरण ६.

॥ श्रीराम समर्थ ॥ इकडे स्वयंपाक चाली लाविले । पारपत्य स्नान करोनि आले । देवदर्शन घेऊनि समर्पिले । खाद्य नैवेद्य ॥ १ ॥ तोचि प्रसाद घेवोनि आले । पारपत्य फराळा बैसले । कित्येक ब्राह्मणहि मिळाले । निराश्रयी ॥ २ ॥ इकडे धर्मशाळा असती । तेथें घातल्या पंगती । न्यायनीतीनें वाढती । दीर्घपात्रीं ॥ ३ ॥ लवण शाखा कोशिंबिरी । सांडगे पापड मिरघाटे हारी । मेतकुटें नेलचटें परोपरी । नाना काचऱ्या ॥ ४ ॥ फेण्या फुग्या

---

१ नानाप्रकारच्या. २ रुंद तोंडाचें मातीचें भांडें. ३ ओगराळी. ४ मोठे पळे. ५ चुलीचा मागील भाग. ६ नैल.

गुरवळ्या वडे । घारघे गुळत्रे दहिंवडे । लाडू तिळत्रे मुगवडे । कोडबोळीं अनारसे ॥ ५ ॥ उदंड दुधें आणविलीं । तक्रें रुचिकरें करविलीं । दाट दह्यें सिद्ध केलीं । पात्रें भरूनी ॥ ६ ॥ ओळी द्रोणाच्या ठेविल्या । नाना रसीं पूर्ण केल्या । साई शर्करा घातल्या । नाना सोजा ॥ ७ ॥ थिजलीं आणि विघुरलीं । घृतें उदंड रिचविलीं । उदकें भरोनि ठेविलीं । निर्मळ शीतळ सुवासें ॥ ८ ॥ सुंठ भाजली हिंग तळिला । कोथिंबिरी वांटूनि गोळा केला । दधीं तक्रीं कालविला । लवणेंसहित ॥ ९ ॥ बारीक परिमाळिक पोहे कुट्टा । उत्तम लाह्यांचा सुंदर कुट्टा । उत्तम दधी घालून चोखटा । मुद्दा केल्या ॥ १० ॥ यथासाहित्य फलाहार केले । चूळ भरून विडे घेतले । पुन्हा मागुते प्रवर्तले । कार्यभागासी ॥ ११ ॥ इति श्रीमानस० ॥

## प्रकरण ७.

॥ श्रीराम समर्थ ॥ ॥ सकळ शाखा सिद्ध केल्या । निसल्या धुतल्या सांभाळिल्या । पात्रीं भरोनी ठेविल्या । चुलीवरी ॥ १ ॥ पुरणाचे हंडे चढविले । कणीक ढीग भिजविले । सांजे उकडोनी सिद्ध केले । भक्षायाकारणें ॥ २ ॥ काणिक धबधबा कांडिती । शुभ्र लवण मिश्रित करिती । कित्येक पुरणें वांटिती । चमत्कारें ॥ ३ ॥ तवे तेलतवे चढाविले । एक तेलें एक तुपें भरिले । तप्त होतां सणसणले । असंभाव्य ॥ ४ ॥ एक भक्षें लाटिती । एक वरणें घाटिती । एक कणिकी मळिती । मांडे पुऱ्या ॥ ५ ॥ मांडे रांजणां घातले । तवे तेलतवे भरले । कडकडूं ते लागले । सणसणाटें ॥ ६ ॥ वडे तेलवऱ्या सांजवऱ्या । घारगे मांडे गुळवऱ्या पुऱ्या । पोळ्या पुरणपोळ्या झारोळ्या । नानापरी ॥ ७ ॥ उखऱ्या रोट्या कानवले । धिरडीं वेडण्या कानवले । पात्या आइते खांडव्या केले । दिवे दाकेळे उंबरे ॥ ८ ॥ कण्या कोथिंबिरी घातल्या । फेंडण्या नेमस्त दिधल्या । शाखा शिजल्या उतरल्या । तेलातुपाऱ्या ॥ ९ ॥ नाना क्षीरी सिद्ध केल्या । उदंड दुधें आळिल्या । नाना शर्करा आणिल्या । शोधूनि पात्रीं ॥ १० ॥ शुभ्र ओदनें सुवासें । सुगंध उठला नानारसें । रुचिर कथिका सावकाशें । स्वयंपाक झाला ॥ ११ ॥ इति श्रीमानसपूजा० ॥

## प्रकरण ८.

॥ श्रीराम समर्थ ॥ ॥ दुधें तुपें आणविलीं । दध्यें तक्रें आणविलीं । लोणचीं रायतीं काढिलीं । मेतकुटें ॥ १ ॥ नाना काचऱ्या तळिल्या । कोशिंबिरी सिद्ध केल्या । नाना शिखरिणी झाल्या । द्रोण पानें पत्रावळी ॥ २ ॥ ब्राह्मण स्नान करोनि आले । एक देवार्चना बैसले । एक ते करूं लागले । वेदघोष ॥ ३ ॥ चित्रविचित्र सोवळीं । सुरंग नेसले प्रावर्णें केलीं । कित्येकीं देवार्चनें मांडलीं । ठाईं ठाईं ॥ ४ ॥ एक ध्यानस्थ बैसले । एकीं जप आरंभिले । एक करिते झाले । प्रदक्षिणा नमस्कार ॥ ५ ॥ पंचामृतें सांग पूजा । ब्राह्मणीं आरंभिली ओजा । राम त्रैलोक्याचा राजा । अर्पिते झाले ॥ ६ ॥

---

१ भाज्या. २ भात. ३ कढी. ४ दही. ५ पांघुरणें. ६ उत्तम रीतीनें.

नाना सुगंधिक तेलें । मंगळस्नान आरंभिलें । अंग पुसोनि नेसविलें । पीत वस्त्र ॥ ७ ॥ नाना वस्त्रें अलंकार । गंध क्षता कुंकुम केशर । उटी देवोनि माळा हार । उदंड घातले ॥ ८ ॥ उदंड उधळिलीं धूसरें । वाद्यें वाजती मनोहरें । गर्जती जयजयकारें । करताळी नामघोष ॥ ९ ॥ धूप आरती आरंभिली । उदंड नीरांजनें चालिलीं । भक्तजनें सुखी केलीं । दानपत्रें ॥ १० ॥ जितुकीं अन्नें सिद्ध केलीं । तितुकीं देवांपुढें ठेविलीं । उदकें ठेवोनि सोडिलीं । पट्टकूलें ॥ ११ ॥ इति श्रीमानस० ॥

## प्रकरण ९.

श्रीराम समर्थ ॥ ॥ देव वासाचा भोक्ता । सुवासें होय तृप्तता । एरवीं त्या समर्था । काय द्यावें ॥ १ ॥ विडे होते सिद्ध केले । अवघे देवापुढें ठेविले । कित्येक ढीग झाले । उत्तम फळांचे ॥ २ ॥ द्रव्य ओवाळून टाकिलें । नानाप्रकारें दान केलें । मंत्रपुष्प समर्पिलें । भक्तजनीं ॥ ३ ॥ देवें केलें सुखासन । आतां ब्राह्मणभोजन । पारपत्य स्नान करोन । सिद्ध होती ॥ ४ ॥ बैसविल्या ब्राह्मणांच्या ओळी । द्रोण पानें पत्रावळी । पात्रें प्रोक्षून सकळी । वाढिते झाले ॥ ५ ॥ तिकडे वाढण चालतें । हिकडे होती गंधाक्षतें । ब्राह्मणांचीं घेवोनि तीर्थें । पुढें पूजन आरंभिलें ॥ ६ ॥ गंधाक्षता चालविती । एक सुगंध चर्चिती । एक धूसर टाकिती । घालिती माळा ॥ ७ ॥ एक आरती धुपारती । पूजा यथासांग करिती । ब्राह्मणां सांग घालिती । नमस्कार ॥ ८ ॥ उत्तम पानें साग्र सरळीं । लांब रुंद आणि कोंवळीं । शाखा लवण मोक्या ओळी । तेथें दाटल्या ॥ ९ ॥ लवण मेथकुटें कोशिंबिरी । डांगर रायत्याच्या परी । सांडगे कुरवड्या हारी । चटण्या असती ॥ १० ॥ ऐसीं सर्व भक्ष्यें केलीं । तितुकीं यथान्वयें वाढिलीं । शुभ्र ओदनें शोभलीं । मध्यभागीं ॥ ११ ॥ इति श्रीमानस० ॥

## प्रकरण १०.

॥ श्रीराम समर्थ ॥ ॥ वाढिलीं नाना परमान्नें । सुवासें शोभती वरान्नें । दूध दहीं द्रोणें । भरून ठेविले ॥ १ ॥ नाना शिखरिणी वाढिल्या । उदंड शर्करा घातिल्या । ऊन कथिका ओतिल्या । आणि वडे ॥ २ ॥ रुचिकर वडे वाढिले । तुपें द्रोण भरिले । पुढें भक्त उभे राहिले । संकल्प सांगती ॥ ३ ॥ मग संकल्प सोडिला । तेणें मोठा आनंद झाला । नामस्मरणें घोष केला । भोजन आरंभिलें ॥ ४ ॥ आपोशनें केलीं समस्तीं । मग घेती प्राणाहुती । शिखा सोडूनि वामहस्तीं । नेत्रस्पर्श करिती ॥ ५ ॥ उदंड अन्नें वाढोनि गेले । आवडीसारिखे जेवूं लागले । पुनः पुनः वाढिते झाले । सप्रवृत्तें ॥ ६ ॥ भक्ष्यें मोडितां गुदगुल्या होती । तुपामध्यें बुडविती । वरपवरपों जेविती । कितीएक ॥ ७ ॥ आंबट तिखट खारट तुरटें । शाखा सांबारीं नेलचटें । तोंडीं लाविती यथेष्टें । यथान्वयें ॥ ८ ॥ पात्रामध्यें वाढिती । होतां सर्वेंचि वाढिती । कित्येक आग्रह करिती । परस्परें ॥ ९ ॥ उदकें शीतळ सुवासें ।

---

१ क्रमानें २ भात. ३ बहुत. ४ कढी. ५ शेंडी. ६ लोणकढें तूप.

घेऊं लागले सावकाशें । कितीएक पुनः भक्षें । जेऊं लागले ॥ १० ॥ किती जेविती प-रमान्नें । किती टाकिती अन्नें । पुनः घेती अन्नें । उदंड वाढिती ॥ ११ ॥ इति श्रीमानस० ॥

## प्रकरण ११

॥ श्रीराम समर्थ ॥ ॥ शिखरिणी वरपिती सरारां । कढी वरपिती फरारां । ढेकर देती डरारां । सावकाशें ॥ १ ॥ एक ते गुचक्या देती । उदकें मागुती सेविती । हात टेकोनि जेविती । कितीएक ॥ २ ॥ भोजनें कंठमर्याद झालीं । मग द-ध्योदनें आणविलीं । तक्रें वोघारूनि घेतलीं । द्रोणामध्यें ॥ ३ ॥ गद्य पद्य प्रबंध श्लोक । नामस्मरणें जेविती लोक । ब्राह्मणमुखें जगन्नायक । संतुष्ट झाला ॥ ४ ॥ एकीं ठाव शुद्ध केले । एक अर्धें अन्न जेविले । एक ते विसरोनि गेले । पदार्थ ठाईंचे ॥ ५ ॥ समस्तांचीं भोजनें झालीं । उत्तरापोशनें घेतलीं । सर्वेंचि उदकें दीधलीं । आंचवाया ॥ ६ ॥ तांबूल भाग बहुत । पानें सुपारी चुना कात । पत्री लवंग क-र्दळीसुत[1] । वेळा कंकोळ जायफळें ॥ ७ ॥ विडे दक्षिणा पावल्या । मंत्राक्षता दी-धल्या । ब्राह्मणमंडळ्या चालल्या । मंडपामध्यें ॥ ८ ॥ नाना दानांचिया राशी । उदंड दि-धल्या ब्राह्मणांसी । पशु वस्त्रें द्रव्यासी । नेम नाहीं ॥९॥ ऐशा उदंड पंक्ती झाल्या । पारपत्यस्वयं-पाकिणी जेविल्या । मग पंक्ती आरंभिल्या । इतर लोकांच्या ॥ १० ॥ सकळ लोक तृप्त झाले । समस्तांसि विडे दिल्हे । अस्तमानहि झालें । मंडपीं दीप लागती ॥११॥ इति श्रीमानस० ॥

## प्रकरण १२.

॥ श्रीराम समर्थ ॥ ॥ नाना बैठका सिद्ध केल्या । नाना समया पाजळल्या । नाना पदार्थीं ठेविल्या । ठाईं ठाईं ॥ १ ॥ खंदील रोवण्या लामगदिवे । दिवट्या हिलालांचे थवे । देव-द्वारीं चालिले आघवे[2] । सायंकाळीं ॥ २ ॥ पारपत्य मंडळी आली । सायंकाळपूजा मांडली । ब्राह्मणांची दाटी झाली । उदंड तेथें ॥ ३ ॥ पारपत्य वेत्रधारी । उभे राहिले उभय हारीं । नाना वाद्यें वाजंत्री । वाजविती ॥ ४ ॥ जाई जुई सेवंती । बटमोगरे मालती । इत्यादि पुष्पजाती । सिद्ध केल्या ॥ ५ ॥ हारमाळा कळेमाळा । नानारंग जिनसमाळा । नाना तुरे दीर्घमाळा । आपादपर्यंत ॥ ६ ॥ झेले झपके मोकळीं फुलें । ब्राह्मणीं सांग पूजन केलें । मग मंत्रपुष्प वाहिलें । पुष्पांजुळीं ॥ ७ ॥ पूजा करोनि बाहेर आले । पडदे एकीकडे केले । नाना घोषें गजर झाले । साष्टांग नमस्कार ॥८॥ देव सिंहासनीं शोभे । दुरस्तां लोक राहिले उभे । पुण्य पुरुषासी लाभे । कांहींएक ॥ ९ ॥ धुपारतीची वेळ आली । अवघी सभा गजबजली । मर्यादेवेगळीं लागलीं । नीरांजनें ॥ १० ॥ ॥ समस्त हरिदास मिळाले । तुरेमाळांनीं पूजिले । धूसर टाकोनि केले । नमस्कार ॥ ११ ॥ इति श्रीमानस० ॥

## प्रकरण १३.

॥ श्रीराम समर्थ ॥ ॥ टाळ घोळ मृदंग । नाना वाद्यें वाजती चांग[3] । पवज हुडुक

---

१ कापूर. २ सर्व. ३ चांगल्या रीतीनें.

उपांग । टिपऱ्या टाळया चिपोळया ॥ १ ॥ हरिदास गाती मानें । तालबद्ध रागज्ञानें । आनंद पाहातां मनें । कल्पवेना ॥ २ ॥ साहित्य संगीत गायनकळा । चपळांगें वाद्यकळा । नटनाट्य नृत्यकळा । धाटी मुद्रा प्रबंध ॥ ३ ॥ अर्थ जाड दृष्टांत वाड । रंग झुळुक अत्यंत गोड । नाना नवरसिक पवाड । भक्ति ज्ञान वैराग्य ॥ ४ ॥ छत्र्या छत्रें मेघडंबरें । माही निशाणें चामरें । विंझणे कुंचे मनोहरें । सूर्यपानें थरकती ॥ ५ ॥ नाना यानें सुखासनें । दिंड्या पताका निशाणें । ढाला ध्वजा गुड्या तोरणें । रवि शशि कीर्तिमुखें ॥ ६ ॥ चवघडे दमामे नगारे । कर्णे बंके तुतारे । गगनामध्यें भरण भरे । नाना ध्वनें व्यंकटा ॥ ७ ॥ शंख भृंगे काहाल भेरी । ढोल डफडे पावे मोहरी । खाल्लू बुरंग वाजंत्री । बहुविध ॥ ८ ॥ दिवट्या हिलाल चंद्रजोती । बाण हवया झळकती । नळे चिचुंद्र्या धांवती । चंचळत्वें ॥ ९ ॥ फुलबाजा बंदुका खजिने । पट्टे दांड भेदिती बाणें । अभिनव कीर्ती वाखाणे । भाट गर्जती ॥ १० ॥ झेंडके चोंडके डौरकर । नागसर नफेदार । किनऱ्या दंड्या एकतार । रबाब कमाच सारंग्या ॥ ११ ॥ अवघी रात्र सरों आली । पुढें देवें विश्रांती केली । भक्तमंडळी चालली । स्वस्थानासी ॥ १२ ॥ ऐसी मानसपूजा करावी । मूर्ति अंतरीं धरावी । दास ह्मणे विवरावी । उपासना ॥१३॥ इति श्रीमानसपूजा समाप्त ॥

## भूपाळ्या.

उठि उठि बा रघुनाथा । विनवी कौसल्या माता । प्रभात झालीसे समस्तां । दाखवी आतां श्रीमुख ॥ १ ॥ कनकताटीं आरतीया । घेवोनि क्षमा शांती दया । आली जनकाची तनया । ओवाळाया तुजलागीं ॥ २ ॥ जीव शिव दोघेजण । भरत आणि तो शत्रुघ्न । भाऊ आला लक्षुमण । मन उन्मन होऊनियां ॥ ३ ॥ विवेक वसिष्ठ सद्गुरु । संत महंत मुनेश्वरु । करिती हरिनामें गजरु । हर्षें निर्भर होऊनियां ॥ ४ ॥ सुमंत सात्विक प्रधान । घेवोनि नगरवासी जन । आला वायूचा नंदन । श्रीचरण पाहावया ॥ ५ ॥ माझ्या जीवींचा जिव्हाळा । दीनबंधू दीनदयाळा । भक्तजनांचिया वत्सला । देईं दयाळा दर्शन ॥ ६ ॥ तंव तो राजीवलोचन । राम जगत्रयजीवन । स्वानंदरूप होवोन । दासा दर्शन दीधलें ॥ ७ ॥

राम सर्वांगें सांवळा । हेमअळंकार पींवळा । नाना रत्नांचिया कळा । अळंकार फांकती ॥ १ ॥ पिंवळा मुगूट कीरिटी । पिंवळें केशर लल्लाटीं । पिंवळ्या कुंडलांच्या थाटी । पिंवळ्या कंठीं वनमाळा ॥ २ ॥ पिंवळें पदक करभूषणें । बाहुवटीं करकंकणें । पिंवळ्या मुद्रिकांचें लेणें । पिंवळें करीं शर चाप ॥ ३ ॥ पिंवळा कासे पीतांबर । पिंवळया ब्रिदाचा तोडर । पिंवळया घंटांचा गजर । पिंवळ्या वांक्या वाजती ॥ ४ ॥ पिंवळा मंडप विस्तीर्ण । मध्यें पिंवळें सिंहासन ॥ राम सीता लक्षुमण । दास गुण गातसे ॥ ५ ॥

## भूपाळी शंकराची.

धवळे भोळे चक्रवर्ती । धवळे अळंकार शोभती । धवळे धाम उमापती । सदा चित्तीं स्मरावें ॥ १ ॥ धवळ्या जटा गंगाजळ ॥ धवळा मयंक निर्मळ । धवळे कुंडलांचा लोळ ।

---

१ पुष्कळ. २ पराक्रम. ३ मोठीं छत्रें. ४ अब्दागिरी. ५वाहनें. ६कमलनेत्र. ७ तिनीलोकांला आश्रयभूत.

शंखपाळा लोंबती ॥ २ ॥ धवळी स्फटिकांची माळ । धवळे गळां उलथे व्याळ । धवळें हातीं नरकपाळ । धवळा त्रिशूळ शोभतसे ॥ ३ ॥ धवळा सर्वांगें आपण । धवळें विभूतीचें लेपन । धवळें गात्र धवळें वसन । धवळें वहन नंदीचें ॥ ४ ॥ धवळें कैलासभुवन । धवळें मध्यें सिंहासन । धवळें शंकराचें ध्यान । दास चिंतन करितसे ॥ ५ ॥

## आरती.

कांकडे आरती परमात्मया श्रीरघुपती । जिवीं जिवां ओवाळीन निजीं निज आत्मज्योती ॥ १ ॥ त्रिगुण कांकडा द्वैतघृतें तिंबिला । उजळिली आत्मज्योती तेणें प्रकाश झाला ॥ २ ॥ काजळी ना मैस अवघें तेज डळमळ । अवनी ना अंबर अवघें निघोट निश्चळ ॥ ३ ॥ उदय ना अस्त जेथें बोध प्रातःकाळीं । रामीं रामदास सहजीं सहज ओंवाळीं ॥ ४ ॥

## महानैवेद्याचे वेळची आरती.

सुरवरदायिनी सुरहरसुखसदना । परतःपरवासिनी अरिरिपुकुळकदना । व्यापक सर्वांघटीं जननी हे मदना । करुणासागररूपें नादः शशिवदना । जय देवि जय देवि जय विश्वंभरिते । आरती ओंवाळूं तुज कृपावंते ॥ १ ॥ सकळां संजीवनी मुनिजनमनमोहिनी । जनमनमज्जन-सज्जनविज्जनतमशमनी । दासा अभ्यंतरीं मानस मृदु शयनी । राघववरदा सुंदर लाघव मृगनयनी ॥ २ ॥ जय० ॥

## अथ पूर्वारंभ ग्रंथ.

॥ श्रीराम समर्थ ॥ ॥ जय जय सद्गुरु गोसावी । मज जें आठवलें जीवीं । तें तें पुसोन फेडावी । आशंका माझी ॥ १ ॥ शिष्य बोले लडिवाळपणें । स्वामी संसार घेतला कोण्या गुणें । मज हें दुःख भोगणें । किंनिमित्त घडे ॥ २ ॥ विषयलोभें भगवंता । नेणोनि झालासी दुःखिता । तेणें गुणें मागुता । आलासी जन्मा ॥ ३ ॥ तरी हा जन्म कैसा तुटे । मज भगवंत कैं भेटे । भवसागर वोहटे । कोण्या गुणें ॥ ४ ॥ जन्म तुटे संतसंगें । देव भेटे अंतरंगें । दृढ भक्तीचेनि योगें । भवसिंधू आटे ॥ ५ ॥ दृढ भक्ति करूं कैसी । काय धरावें मानसीं । सांगा स्वामी अज्ञानासी । मार्ग कांहीं ॥ ६ ॥ सद्गुरूसी जावें शरण । मनीं धरावें वचन । तेणें तुझें अज्ञान । जाईल बापा ॥ ७ ॥ सद्गुरु कैसा ओळखावा । तो मज दातारें सांगावा । कवण उपदेश घ्यावा । तयापाशीं ॥ ८ ॥ ऐकें सद्गुरुल-क्षण । क्रियेसह ब्रह्मज्ञान । आशारहित निरभिमान । तया मोक्ष मागावा ॥ ९ ॥ मोक्ष कवणासि म्हणावें । हें मज स्वामीनीं सांगावें । दयासिंधू देवाधिदेवें । उपेक्षूं नये ॥ १० ॥ अधिकाराविण सांगणें । अलभ्य होय तेणें गुणें । म्हणोनि आधीं शहाणे । अधिकार पाहाती ॥ ११ ॥ त्या अधिकाराची खूण । मज करावी श्रवण । ऐक बापा लक्षण । अधिकाराचें ॥ १२ ॥ जेथें विश्वास विरक्ती । नाहीं संसारीं आसक्ती । ज्या आवडे गुरुभक्ती । अंतरापासूनी ॥ १३ ॥ तें अधिकाराचें स्थळ । ज्ञान उपजे प्रांजळ ।

---

१ सर्प. २ वस्त्र. ३ आटतो. ४ दाट्यानें. ५ ठेपतें; प्राप्त होतें.

फिटे भ्रांतीचें पडळ । सद्गुरुबोधें ॥ १४ ॥ स्वामी पतितपावनें । ऐकोनि आलों शरण । न विचारतां दोषगुण । मज बोध करावा ॥ १५ ॥ ऐका बोधाचें लक्षण । बोध मागसी तूं कोण । पाहें आपुली ओळखण । आपणामध्यें ॥ १६ ॥ तुझें शरीर चालवितो । कवण तुज बोलवितो । सकळ कळा जाणवितो । तो कोण आहे ॥ १७ ॥ अंतरीं शरीर चालविता । तो एक देव पाहतां । आत्माराम निघोनि जातां । देह पडे ॥१८॥ आत्मा निघोनि गेला । देह अचेतन पडला । अचेतनीं आत्मा व्यापिला । आहे किंवा नाहीं ॥ १९ ॥ आत्मा निबिड पूर्णपणें । ऐसें बोलती शहाणे । तेणें असे स्थळ उणें । हें तों न घडे ॥ २० ॥ शिष्य विचारूनि बोले । देहीं काय निघोनि गेलें । शरीर अचेतन पडलें । कोण्या गुणें सांग पां ॥ २१ ॥ शिष्य विचारूनि अंतरीं । ह्मणे प्राण प्रयाणें करी । प्राण नसतां शरीरीं । चेतना नाहीं ॥ २२ ॥ तंव बोले गुरुराव । प्राण वायूचें नांव । तया वायू तोचि देव । ह्मणतोसी ॥२३॥ शिष्य बोले जी भगवंता । बहुत बोलती ऐसी वार्ता । परमात्मा देह चालविता । तेणेंविण अचेतन ॥ २४ ॥ विचारें पाहतां देह वाव । चाळी तयासी कैंचा ठाव । हा इतर दृष्टीचा स्वभाव । आत्मा चाळक ऐसा ॥ २५ ॥ आत्म्यासि चाळकपण । हें तों निर्गुणासि गुण । बळेंचि लाविती ते खूण । चुकले आत्म्याची ॥ २६ ॥ निर्गुणापासोनि चराचर । झाले सृष्ट्यादि व्यापार । ऐसें बोलती अपार । ज्ञाते पुरुष ॥ २७ ॥ माया सत्य जयां वाटे । त्याचें ज्ञान परम खोटें । मायिक दृष्टीनें भेटे । परमात्मा केवीं ॥२८॥ माया मिथ्या कैसी ह्मणावी । प्राणिमात्रासि वेड लावी । सकळ रूप आपुलें दावी । प्रत्यक्ष आतां ॥ २९ ॥ प्रत्यक्षास प्रत्यक्ष दिसे । अप्रत्यक्ष कोठें असे । अप्रत्यक्षेंविण नसे । पूर्ण समाधान ॥३०॥ पूर्ण समाधान कोण । माया मिथ्या लक्षण । ऐसें मज निरूपण । केलें पाहिजे ॥३१॥ अभिन्न तेंचि समाधान । मायेचें मिथ्या लक्षण । आत्मनिवेदनीं खूण । पावसी बापा ॥ ३२ ॥ सद्गुरुवचन अंजन त्याला । माया भयानेंक न दिसे त्याला । अभिन्नपणें आत्म्याला । सर्वत्र देखे ॥३३॥ सर्वत्रीं आत्मा देखे कवण । ऐसा केला शिष्यें प्रश्न । ह्या प्रश्नाचें लक्षण । ऐसें असे ॥३४॥ देखे तोहि जाण आत्मा । सर्वांतरीं जो सर्वात्मा । ज्याच्या स्वरूपासि उपमा । देतांचि नये ॥३५॥ निरुपम तो निर्गुण । जाणपणा हे तो गुण । ह्मणोन सगुण निर्गुण । जाणिजे आत्मा ॥ ३६ ॥ सगुण निर्गुण पुसे काय । आत्मा नेमिला न जाय । नेमातीत असंभाव्य भाविला न वचे ॥३७॥ जो नातुडे भावनेसी । त्याची प्राप्ती घडे कैची । ऐसा आक्षेप स्वामीसी । शिष्यें केला ॥ ३८ ॥ त्याची प्राप्ति त्यासी घडे। येरां सर्वथा नातुडे । जयाचें वेगळेपण मोडे । तोचि आत्मा ॥३९ ॥ जो गगनाची गवसणी । गवसणीचाहि धनी धनीपणाची कडसणी । जेथें नाहीं ॥४०॥ जें ब्रह्मांडापैलीकडे। मनबुद्धीस नातुडे । जेथें चपळपण मोडे । बापुड्या मनाचें ॥ ४१ ॥ त्याचे शेवटीं तेंच आहे । आपुला अंत होवोनि राहे । आतां पैलपार पाहें । तेंचि अवघें ॥ ४२ ॥ चहूंकडे सारखेंची । एकजिनसी आपणची । अमूप सीमा स्वरूपाची । करितां नये ॥ ४३ ॥ जेथें मनाची धांव पुरे । पैलीकडे उदंड उरे । मन माघारें फिरे । आले वाटें ॥ ४४ ॥ पाहूं जाय जे दिशेसी । ती घालोनि पाठीसी । सन्मुख धांवे प्रयासीं । अंत न लगे ॥ ४५ ॥ अष्ट दिशा पाहोनि आलें । मग तें ऊर्ध्वपंथें उडालें । गगन भेदोनियां

१ पाप्यांना पवित्र करणारा. २ जाणें. ३ खोटा. ४ भयंकर. ५ प्राप्त होत नाहीं. ६ शंका. ७ इतरांना. ८ बहुत.

गेलें। पैलीकडे ॥ ४६ ॥ बहुत लंघिली पोकळी। भोंवतें फिरे अंतराळीं । ऊर्ध्वमुखें तये वेळीं । अवलोकिते झाले ॥ ४७ ॥ निरावलंब वेगळें । सूक्ष्म रूपें तें पांगुळें । असंभाव्य देखोनि गळे । अशंका पोटीं ॥ ४८ ॥ आले आपुले स्थळीं । बुडी मारिली पाताळीं । सप्त पाताळांचे तळीं । अंत पाहे ॥ ४९ ॥ तें अत्यंत सखोल । बुडी दिल्ही बहुसाल । ठाव नाहीं व्याकूळ । ऐसें झालें ॥ ५० ॥ तेथोनियां उफाळे । ऊर्ध्वमुखें अंतराळें । बहु शिणलें न कळे । अंत स्वरूपाचा ॥ ५१ ॥ अंत स्वरूपार्णव फिरून आलें । तेणें बहुत निर्बुजलें । हीन होवोनि पडलें । अचेतन ॥ ५२ ॥ गेलें ज्याच्या शुद्धीसी। पाहे तें आपणासी । तें विस्मित मानसीं । आश्चर्य करी ॥ ५३ ॥ जया इतुकें धुंडिलें। तें जवळचि देखिलें। आपणा पाहों गेलें । तेंचि आपण ॥ ५४ ॥ लवण सिंधू जालें । तैसें स्वरूपीं विरालें । तेणें गुणें जोडलें । धनासि धन ॥ ५५ ॥ ऐसी स्वरूपाची स्थिती। स्वानुभवी जाणती । हे वस्तूची प्राप्ती। सद्गुरुबोधें ॥ ५६ ॥ ऐसें हें स्वरूपज्ञान। याही पर समाधान। त्या साक्ष आपुलें मन । अनिर्वाच्य तें ॥ ५७ ॥ जो स्वयं तृप्त झाला। तो सर्वांगें निवाला। निःशब्दीं स्वानंदाला । सांगतां नये ॥ ५८ ॥ जें सांगतां नये बोलें। तें बोलेंचि प्राप्त झालें। गुरुकृपेच्या सखोलें। अबाध वचनें ॥ ५९ ॥ गुरुवचनीं विश्वास । धरितां तुटे भवपाश। विनवी रामीं रामदास। लडिवाळपणें ॥ ६० ॥ इति श्रीपूर्वारंभः ॥ समाप्तः ॥

# जुनाट पुरुषग्रंथ

श्रीराम समर्थ ॥ ॥ सकळ संत साधूजन। भूत भविष्य वर्तमान । तयां सकळांस नमन। साष्टांगभावें ॥ १ ॥ झालें सकळांस नमन। नमस्कारोनि श्रोतेजन। आतां कथानुसंधान। सावकाश ऐका ॥२॥ जुनाट पुरुषाची कथा। नेमस्त मिळवी परमार्था । जीसमागमें महत्तीर्था । पाविजेत ॥ ३ ॥ पवनाचेनि तारूं । लंघोने जाय सागरू । श्रवणें तैसा विश्वंभरु। पाविजे तो ॥४॥ जाणीवेरहित ज्ञानी। तोचि योग्य निरूपणीं। जैसा क्षुधित भोजनीं। तृप्त होय ॥५॥ बहुसाल व्युत्पत्ती आली। कां बुद्धी क्षीण झाली। तरी समाधानाची किल्ली। वेगळीच आहे ॥६॥ ती कैसी आहे सांगा स्वामी । ऐसा आक्षेप केला तुह्मीं। सुचित होवोनि अंतर्यामीं। ऐका सांगतों ॥ ७ ॥ नव्हे रेटमकाहाणी। दाटून लावूं लावणी। चंचळ मनें श्रवणीं। बैसों नये ॥८ जें सावधास न कळे। तें चंचळा कैसें कळे। ज्ञानेंसहित मावळे। विज्ञान जेथें ॥ ९ ॥ हातींचें रत्न जळीं गेलें । खडूळ होतां तें नाढळे। निवांत जळ निवळे । तरीच लाभे ॥ १० ॥ तैसें शुद्ध निरूपण। एकाग्र करावें श्रवण । तेणें करितां बाणे खूण। समाधानाची ॥ ११ ॥ होतां अद्वैत निरूपण । पडे देहाचें विस्मरण । ऐसें एकाग्र लक्षण। श्रोतयांचें ॥ १२ ॥ वृत्ती स्वरूपीं भरे । आपेंआप विस्तारे । एक नसतां दुसरें। आठवेल कैचें ॥ १३ ॥ जेव्हां आपुला ध्यास तुटे। आशंका मात्र तेव्हां फिटे। मग समाधान लिगटे। बळेंचि अंगीं ॥ १४ ॥ शब्द टाकोनि अंगीं । अर्थी धांवों लागे वेगीं। दृढ अर्थाचे संगीं। निःसंग होय ॥ १५ ॥ अहं सोहं आपण । याहीवेगळें मीपण । मीपण गेलिया खूण । समाधानाची ॥ १६ ॥ समूळ अहंता विराली । ही

१ आकाशांत. २ भिऊन गेलें. ३ शंका. ४ स्वस्थ. ५ अंतःकरणामध्यें. ६ अनुभवयुक्तज्ञान. ७ चिकटतें.

समाधानाची किल्ली । जेथं व्युत्पत्तीशीं निमाली । तीक्ष्ण बुद्धी ।। १७ ।। बुद्धि जाऊं न पवे जेथें । व्युत्पत्ति काय करी तेथें । सद्गुरुकृपेचें भातें । अंगीं रमलें पाहिजे ॥१८॥ स्वरूपज्ञान जया झालें । त्याचें निर्मूळ नाहीं झालें । तोंवरी समाधान बारे । घडेना सर्वथा ॥१९॥ असो हें बोलणें आतां । अवधानें यावें श्रोतां । जुनाट पुरुषाची कथा । सांगिजेल ॥ २० ॥ सकळांचा महापुरुष । जो ब्रह्मादिकांचा ईश । शिवादिक असती अंश । तो हा अनामी ॥ २१ ॥ सकळ सृष्टीचा व्यापक । जो मूळमायेचा जनक । तो हा पुरुष कोणीएक । बहु दिवसांचा ॥ २२ ॥ जयाचे आज्ञेप्रमाणें । ब्रह्मादिकांस वर्तणें । चंद्र सूर्य तारांगणीं । जयाची सत्ता ॥ २३ ॥ मही¹ अचळ² मेघामाळा । नाना सरिता³ सिंधूजळा । मर्यादा चाले अवलीळा⁴ । जयाचेनी ॥ २४ ॥ ऐशा ब्रह्मांडमाळा अनंत । इच्छामात्रें होत जात । तरी जयाचा एकांत । मोडलाच नाहीं ॥ २५ ॥ आपण एकला सर्वकाळ । कन्या खेळे नाना खेळ । एकटी असे लडिवाळ । नाना छंदें ॥ २६ ॥ तये गलवला नावडे । म्हणोनि खेळे एकीकडे । ब्रह्मादिक केले वेडे । तये कुमारीनें ॥ २७ ॥ अनंत ब्रह्मांडें उतरंडीं । खेळ मांडिला परवडीं । काळ करी कडाफोडी । पुत्र तयाचा ॥ २८ ॥ शीण पावे कुमारी । नावेक निद्रा करी । तेणें खेळा बोहरीं । होवोनि जाय ॥ २९ ॥ कन्या परम सुलक्षण । राहीना पित्याविण । पिता तयेचा निर्गुण । माता असेना ३० ॥ ते क्षणीं उठोनि पाहे । तों खेळ मोडिला आहे । पुनरपि लवलाहें । खेळ मांडी ॥ ३१ ॥ ऐसी निरंजनीं एकट । करी खेळाची खटपट । खेळ खेळतां वीट । मानूं नेणे ॥ ३२ ॥ खेळ मांडिला विचित्र । उतरंडीचें एक पात्र । तें हें ब्रह्मांड स्वतंत्र । जाणिजे तुवां ॥ ३३ ॥ खेळ खेळे महा सबळ । अत्यंत वाढली प्रबळ । वेड लाविलें सकळ । प्राणिमात्रांसी ॥ ३४ ॥ नकळे तयेचें लाघव⁵ । बहुत पाडिले मानव । पात्रीं सांठविले जीव । कोट्यानकोटी ॥ ३५ ॥ बहुत लोभाची आवडी । घातली इच्छेची बेडी । ऐशा बहुत उतरंडी । संपूर्ण केल्या ।। ३६ ॥ प्राणी जाऊं नेदी बाहेरी । जिवत्रून मागुते मारी । चुकों नेदी वेरझारी । वासनासूत्रें ।। ३७ ।। बहुत प्राणी केले गोळा । लाविला विषय टकळा । तेणें येती पूर्वस्थळा । स्वेच्छ प्राणी ॥ ३८ ॥ ऐसें गोंविलेंच गोवी । मारून मागुता जन्म दावी । तयेपासून सोडवी । तो विरळा कोणी ।। ३९ ॥ पळोन जावें दिगंतरा । तेथे आहे ते सुंदरा । त्यासांगातीं दुसरा । कोणीच नाहीं ॥ ४० ॥ संतान वाढलें लक्षावरी । तरी ते ठाईंची कुमारी । नांव ठेवितां उदरीं । पिता आला ॥ ४१ ॥ पिता उदरास आला । तरी तो नाहीं जन्मला । भर्ता स्वयें आपला । होवोनि ठेली ॥ ४२ ॥ भतारास प्रसवली । मग ती माय राणी झाली । सासू माता आपुली । आपणचि ॥ ४३ ॥ वायु फुंकोन केला वन्ही⁶ । पोटीं लाविलें पाणी⁷ । आपांपासून धरणी⁸ । कळों आली ॥ ४४ ॥ ऐसी खेळास गुंतली । तेणें पिता विसरली । ते पाउलीं भ्रुरडली । मागुती मागें ॥ ४५ ॥ जन्मभूमी वास पाहे । बाप म्हणोनि आस वाहे । मागुती निवांत राहे । स्तब्ध होवोनी ॥४६॥ पिता न दिसे डोळां । म्हणोनि शोक करी बाळा । भोंवतीं पाहे वेळोवेळां । अष्ट दिशांतें ॥ ४७ ॥ वेध पित्याचा लागला । मग खेळ मोडोनि गेला । उतरंडी फोडून पळाला । काळपुत्र ॥ ४८ ॥ पिता

---

१ लक्ष, २ पर्वत. ३ नद्या. ४ लीलेनें. ५ चातुर्यानें. ६ अग्नि. ७ उदकापासून. ८ पृथ्वी.

पाहतां खेळ मोडे । खेळ पाहतां पिता दडे । पाहती झाली दोहींकडे । उभी राहोन ॥ ४९ ॥ मग ते लोभें झळंबली । पित्याकडे चालली । खेळ विसरोन गेली । जन्मस्थाना ॥ ५० ॥ आपणा विसरोन पाहे । तंव पिता पुढें आहे । ऐसें देखोन लवलाहें । भेटती झाली ॥ ५१ ॥ पिता तापसी जैसा वन्ही । तया निःसंगाची मिळणी । कन्या नासली तत्क्षणीं । पित्यादेखतां ॥ ५२ ॥ तंव पिता झळंबला । कंठ सद्गदित झाला । म्हणे आज संग सोडला । कुमारीनें ॥ ५३ ॥ ऐसा नावेक वरी । विलाप पिता करी । पाहे तंव अभ्यंतरीं । कन्या उभी ॥ ५४ ॥ मग तयेसी भेटला । उभयतां आनंद झाला । मागुता खेळ मांडला । तये कुमारीनें ॥ ५५ ॥ इति जुनाट पुरुषग्रंथ समाप्त ॥

# अंतर्भाव.

## समास १.

॥ श्रीराम समर्थ ॥ ॥ जय जय सद्गुरु समर्था । जय जय पूर्णमनोरथा । चरणीं ठेवोनि माथा । प्रार्थीतसें ॥ १ ॥ मी ये संसारीं गुंतला । स्वामीपदीं वियोग झाला । तेणें गुणें आळ आला । जीवपणाचा ॥ २ ॥ इच्छाबंधनीं गुंतलों । तेणें गुणें अंतरलों । आतां येथूनि सुटलों । पाहिजे दातारा ॥ ३ ॥ प्रपंचीं संसारउद्वेगें । क्षणोक्षणा मन भंगे । कुळाभिमानें डगे । समाधानासी ॥ ४ ॥ जेणें समाधान चळे । विवेक उठोनि पळे । बळेंचि वृत्ती दांसळे । संगदोषें ॥ ५ ॥ स्वामी प्रपंचाचे गुणें । परमार्था आणिलें उणें । ईश्वरआज्ञेप्रमाणें । क्रिया न घडे ॥ ६ ॥ दुःख शोक आला चित्तीं । समाधान करावें किती । विक्षेपें होतां चित्तवृत्ती । दंडळों लागे ॥ ७ ॥ प्रपंचें केलें कासाविस । घेऊंच नेदी उमसें । तेणें गुणें उपजे त्रास । संसाराचा ॥ ८ ॥ आतां पुरे हा संसार । झाले दुःखाचे डोंगर । अंतरसाक्ष विचार । सर्व जाणती ॥ ९ ॥ तरी आतां काय करावें । कोणे समाधानें असावें । मज दातारें सांगावें । कृपा करोनी ॥ १० ॥ ऐशी शिष्याची करुणा । ऐकोनि बोले गुरुराणा । केली पाहिजे विचारणा । पुढिले अध्यायीं ॥ ११ ॥ इति श्रीअंतर्भाव । जन्ममृत्यू समूळ वाव । रामदासीं सद्गुरुराव । प्रसन्न झाले ॥ १२ ॥

## समास २.

॥ श्रीराम समर्थ ॥ ॥ ऐक शिष्या सावध । सिद्ध असतां निजबोध । मायिक हा देहसंबंध । तुज बाधी ॥ १ ॥ बद्धकें कर्में केलीं । तीं पाहिजेत भोगिलीं[१] । देहबुद्धी दृढ झाली । म्हणोनियां ॥ २ ॥ मागें जें जें संचित केलें । तें तें पाहिजे भोगिलें । क्षुद्रें शेत जरी टाकिलें । तरी बाकी सुटेना ॥ ३ ॥ हा तों देहबुद्धीचा भाव । स्वस्वरूपीं समूळ वाव । परंतु प्राप्तीचा उपाव । सुचला पाहिजे ॥ ४ ॥ स्वस्वरूप लंकापुरी । सुवर्णविटा त्या दुरी । देहबुद्धीच्या सागरीं । तरलें पाहिजे ॥ ५ ॥ ॥ वि-

---

१ लवकर. २ संसारसंबंधी दुःखानें. ३ देहाभिमानानें. ४ अडथळा. ५ विसावा, विश्रांति. ६ खोटा.

घयमोळ्या वाहों सांडी । त्यास कोण ह्मणे कावाडी । तैसी पदार्थी गोडी । सांडितां आत्मा ॥ ६ ॥ देहबुद्धीचें लक्षण । दिसेंदिस होतां क्षीण । तदुपरी बाणे खुण । आत्मयाची ॥ ७ ॥ सर्वात्मा असें बोलतां । अंगीं बाणेना सर्वथा । साधनेंविण ज्ञानवार्ता । बोलों नये ॥ ८ ॥ दसऱ्याचें सोनें वांटलें । तेणें काय हातासी आलें । रायें विनोदें आलें । सुखासना । ९ ॥ तैसें शब्दें ब्रह्मज्ञान । बोलतां नये समाधान । ह्मणोनि आधीं साधन । केलें पाहिजे ॥ १० ॥ शब्दीं जेवितां तृप्ती झाली । हे तों वार्ता नाहीं ऐकली । पाकनिष्पत्ती पाहिजे केली । साक्षेपें स्वयें ॥ ११ ॥ कांहीं तरी एक कारण । कैसें घडे यत्नेंविण । ब्रह्मज्ञान परम कठीण । साधनावांचूनि ॥ १२ ॥ शिष्य ह्मणे जी सद्गुरु । साधन मी काय करूं । तेणें पाविजे पैलपारू । महादुःखाचा ॥ १३ ॥ आतां पुढील समासीं । स्वामी सांगती साधनासी । सावध श्रोतीं कथेसी । अवधान द्यावें ॥ १४ ॥ इति श्रीअंतर्भाव० ॥

## समास ३.

॥ श्रीराम समर्थ ॥ ॥ प्राप्त झालें ब्रह्मज्ञान । बाणलें पाहिजे पूर्ण । ह्मणोनि । हें निरूपण । सावध ऐका ॥ १ ॥ कांहींच नेणे तो बद्ध । समूळ क्रिया अबद्ध । भाव वाढविला शुद्ध । मुमुक्षु जाणावा ॥ २ ॥ कर्में त्यजोनि बाधक । शुद्ध वर्ते तो साधक । क्रिया पालटे विवेक । निष्कलंक तेव्हां ॥ ३ ॥ तये क्रियेचें लक्षण । आधीं स्वधर्मरक्षण । पुढें अद्वैतश्रवण । केलें पाहिजे । ४ ॥ नित्यनेम दृढ चित्तीं । तेणें शुद्ध चित्तवृत्ती । होवोनि भगवंतीं । मार्ग फुटे ॥ ५ ॥ नित्यनेमें भ्रांती फिटे । नित्यनेमें संदेह तुटे । नित्यनेमें लिगटे । सामाधान अंगीं ॥ ६ ॥ नित्यनेमें अंतर शुद्ध । नित्यनेमें वाढे बोध । नित्यनेमें बहु खेद । प्रपंचीं तुटती ॥ ७ ॥ नित्यनेमें सत्व चढे । नित्यनेमें शांती वाढे । नित्यनेमें थारा मोडे । देहबुद्धीचा ॥ ८ ॥ नित्यनेमें दृढभाव । नित्यनेमें भेटे देव । नित्यनेमें पुसे ठाव । अविद्येचा ॥ ९ ॥ नित्यनेम करूं कोण । ऐसा शिष्यें केला प्रश्न केलें पाहिजे श्रवण । प्रत्ययाचें ॥ १० ॥ मानसपूजा जप ध्यान । एकाग्र करोनियां मन । त्रिकाळ घ्यावें दर्शन । मारुती सूर्याचें ॥ ११ ॥ हरिकथानिरूपण । प्रत्यहीं करावें श्रवण । निरूपणीं ऊणखूण । केली पाहिजे ॥ १२ ॥ संकटीं श्रवण न घडे । बळात्कारें अंतर पडे । तरी अंतरस्थिती मोडे । ऐसें न कीजे ॥ १३ ॥ अंतरींच पांच नामें । ह्मणत जावीं नित्यनेमें । ऐसें वर्ततां श्रमें । बाधिजेना ॥ १४ ॥ ऐसी साधकाची स्थिती । साधकें रहावें या रीतीं । साधनेंवीण ज्ञानप्राप्ती । होणार नाहीं ॥ १५ ॥ तंव शिष्य ह्मणे जी ताता । जन्म गेले साधन करितां । कोणे वेळे पावों आतां । समाधान ॥ १६ ॥ कैसें येईल सिद्धपण । केव्हां आतुडेल समाधान । मुक्तदशा सुलक्षण । मज केवीं प्राप्त ॥ १७ ॥ आतां याचें प्रत्युत्तर । श्रोतीं व्हावें सादर । ऐका पुढें सविस्तर । आदरें करोनी ॥ १८ ॥ इति श्रीअंतर्भाव० ॥

---

१ ग्लानीनें. २ देहाभिमानाचा. ३ अज्ञानाचा. ४ प्रतिदिवशीं. ५ प्राप्त होईल.

## समास. ४

॥ श्रीराम समर्थ ॥ ॥ सिद्ध होऊन बैसला । दृष्टी नाणी साधनाला । सादर अशन शयनाला । अत्यादरें ॥ १ ॥ ऐसा असे विषयासक्त । अत्यंत विषयीं आसक्त । सिद्धपणें आपला घात । तेणें केला ॥ २ ॥ जो सिद्धांचा मस्तकमणी । महातापसी शूळपाणी । तोहि आसक्त श्रवणीं । जपध्यानपूजेसी ॥ ३ ॥ अखंड वाचें रामनाम । अनुष्ठान हेंच परम ज्ञानवैराग्यसंपन्नकाम । सामर्थ्यसिंधू ॥ ४ ॥ तोहि ह्मणे मी साधक । तेथें मानव पुढें रंक बापुडे सिद्धपणाचें कौतुक । केवीं घडे ॥ ५ ॥ ह्मणोनि साधनाशीं जो सिद्ध । तोचि ज्ञाता परम शुद्ध । येर ते जाणावे अबद्ध । अप्रमाण ॥ ६ ॥ साधनेंवीण वाष्कळता । तीच जाणावी बद्धता । तेणें अनर्गळता । आसक्तरूपें ॥ ७ ॥ मन सुखावलें जिकडे । अंग टाकिलें तिकडे । साधन उपाय नावडे । अंतरापासोनी ॥ ८ ॥ चित्तीं विषयाची आस । साधन ह्मणतां उपजे त्रास । नेम धरितां कासावीस । परम वाटे ॥ ९ ॥ दृढ देहाची आसक्ती । तेथें कैंची विरक्ती । विरक्तीवीण भक्ती । केवीं घडे ॥ १० ॥ ऐक शिष्यटिळका । नेम नाहीं साधका । तयालागीं धोका । नेमस्त आहे ॥ ११ ॥ तंव शिष्य ह्मणती । अंतीं मति तीचि गती । ऐसें सर्वत्र बोलती । मी काय करूं ॥ १२ ॥ अंतीं कोण अनुसंधान । कोठें ठेवावें मन । कैसें करावें साधन । अंतसमयाचें ॥ १३ ॥ समय येईल कैसा । हा न कळे भरंवसा । प्राप्त कोण दशा । हें श्रोत नाहीं ॥ १४ ॥ आशंका घेतली मनें । बोलतों करुणावचनें । याचें उत्तर भीतेजनें । सावध ऐकावें ॥ १५ ॥ इति श्रीअंतर्भाव० ॥ ४ ॥

## समास ५.

॥ श्रीराम समर्थ ॥ ॥ ऐक शिष्या सावधान । एकाग्र करोनि । मन । पुससी अनुसंधान । अंतसमयींचें ॥ १ ॥ अंत कोणास झाला । कोण मृत्यु पावला । हा तुवां विचार केला । पाहिजे आतां ॥ २ ॥ अंत आत्मयाच्या माथां । हें तों न घडे सर्वथा । स्वरूपीं मरणाची वार्ता बोलोंच नये ॥ ३ ॥ स्वरूपीं अंत नाहीं । येथें पाहणें नलगे कांहीं । मृगजळाचे डोहीं । बुडों नको ॥ ४ ॥ आतां मृत्यु देहास घडे । अचेतन बापुडें । शवास मृत्यु न घडे । कदा कल्पांतीं ॥ ५ ॥ आतां मृत्यु कोठें आहे । बरें शोधूनि पाहे । शिष्य विस्मित होवोनि राहे । एक क्षण निवांत ॥ ६ ॥ मग पाहे स्वामीकडे । ह्मणे हा देह कैसा पडे । चालविता कोणीकडे । निघोनि गेला ॥ ७ ॥ देह चालविता कोण । हे मज सांगा खूण । एक ह्मणती हा प्राण । पंचधारूपें ॥ ८ ॥ प्राणासी कोण चालविता । येरू ह्मणे स्वरूपसत्ता । सत्तारूपें तत्त्वतां । वाया जाण ॥ ९ ॥ मायेची मायिकें स्थिती । ऐसें सर्वत्र बोलती । माया पाहतां आदिअंतीं । कोठें नाहीं ॥ १० ॥ अज्ञानास भ्रांती आली । तेणें दृष्टी तरळली । तेणें गुणें आढळली । नसतीच माया ॥ ११ ॥ शिष्या होई सावचित्त । मायेचा जो शुद्ध प्रांत । तोचि चौदेहांचा अंत ।

---

१ भोजन. २ शिष्यश्रेष्ठा. ३ अंतकालची बुद्धि. ४ खरोखरी. ५ लटकी. ६ भ्रम पावली.

सद्‌गुरुबोधें ॥ १२ ॥ चार देहाच्यां अंतीं । उरे शुद्धस्वरूपस्थिती । तेणें गुणें तुझी प्राप्ती । तुजला झाली ॥ १३ ॥ जन्मलाचि नाहीं अनंत । तयासी कैंचा येईल अंत । आदि अंतीं निवांत । तोचि तूं अवघा ॥ १४ ॥ स्वामी ह्मणती शिष्यासी । आतां संदेह धरिसी । तरी श्रीमुखावरी खासी । निश्चयेंसी ॥ १५ ॥ देहबुद्धीचेनि बळें । शुद्धज्ञान झांकोळे । भ्रांती हृदयीं प्रबळे । संदेहरूप ॥ १६ ॥ ह्मणोनि देहातीत जें सुख । त्याचा करावा विवेक । तेणें गुणें अविवेक । बाधूं न शके ॥ १७ ॥ तुटलें संशयाचें मूळ । देहचि मिथ्या समूळ । तयासि अंत हें केवळ । मूर्खपण ॥ १८ ॥ जें जन्मलेंचि नाहीं । त्यासी मृत्यु कैंचा काई । मृगजळाच्या डोहीं । बुडों नको ॥ १९ ॥ मनाचा करोनियां जयो । स्वरूपाचा करावा निश्चयो । दृढनिश्चयें अंतसमयो । होवोनि गेला ॥ २० ॥ आदि करोनि देहबुद्धी । देह टाकिला प्रारब्धीं । आपण देहाचा संबंधी । मुळींच नाहीं ॥ २१ ॥ असतें करोनि वाव । नसत्याचा पुसोनि ठाव । देहातीत अंतर्भाव । असो खुणेनें ॥ २२ ॥ हें समाधान उत्तम । असतेपणाचें जें वर्म । देहबुद्धीचें कर्म । तुटे जेणें ॥ २३ ॥ आतां तुटली आशंका । मार्ग फुटला विवेका । अद्वैतबोधें रंका । राज्यपद ॥ २४ ॥ तंव शिष्यें आक्षेपिलें । आतां स्वामी दृढ झालें । तरी हें ऐसेंच बाणलें । पाहिजे कीं ॥ २५ ॥ निरूपणीं वृत्ति गळे । शुद्धज्ञान तें प्रबळे । उठोनि जातां मावळे । वृत्ति मागुती ॥ २६ ॥ सांगा यासी काय करूं । मज सर्वथा नसे धीरू । ऐका सावध विचारू । पुढील अध्यायीं ॥ २७ ॥ इति श्रीअंतर्भाव० ॥

## समास ६.

श्रीराम समर्थ ॥ ॥ शिष्या परम गुह्यज्ञान । जेणें घडे समाधान । ऐसें मागें निरूपण । केलें तुज ॥ १ ॥ तें निरूपण पाहतां । अभ्यंतरीं तृप्त होतां । आशंकेसी सर्वथा । उरी नाहीं ॥ २ ॥ आतां असो तें प्रस्तुत । देहास मांडतां अंत । तेव्हां साधकें निश्चित । काय करावें ॥ ३ ॥ निरालंबीं चित्त न्यावें । तरी राहेना स्वभावें । ऐक्यतेच्य नांवें । शून्याकार ॥ ४ ॥ निरावलंबीचें साधन । देह असतां सावधान । केलें पाहिजे समाधान । सत्संगें विवेकें ॥ ५ ॥ अनुसंधान अंतकाळीं । कैसें राहे तें निर्मळीं । अनुसंधानमिसें जवळी । मीपण उठे ॥ ६ ॥ ऐसें स्वरूपानुसंधान । अंतकाळीं न घडे जाण । आतां करावें ध्यान । सगुण मूर्तीचें ॥ ७ ॥ ध्यानासी कारण चित्त । तेंचि झालिया दुश्चित । कैसें घडे सावचित्त । ध्यान अंतीं ॥ ८ ॥ आतां करावें रामचिंतन । वासना करी प्रपंचध्यान । प्रपंचीं गुंतलें मन । तें सुटलें पाहिजे ॥ ९ ॥ पडोनि कूपांतरीं । प्राणी नाना विचार करी । परी तें न घडे जोंवरी । बाहेर न ये ॥ १० ॥ तैसें मन हें गुंतलें । वासनाविषयीं नेलें । वरी वरी नाम स्मरलें । याचें कोण काम ॥ ११ ॥ तरी आतां काय करावें । कोणते उपायें तरावें । तेंचि आतां स्वभावें । सांगा स्वामी ॥ १२ ॥ दीनदयाळ गुरुराव । पूर्वींच रचिला उपाव । अंतीं चळे अंतर्भाव । ह्मणोनियां ॥ १३ ॥ तरी त्या उपायाची खूण । केलें पाहिजे श्रवण । उपाय रचिला कोण ।

---

१ तत्त्वमसि इत्यादि महावाक्यें त्यांच्या उपदेशांनें. २ विहिरीमध्यें.

सद्गुरुनाथें ॥ १४ ॥ ऐका उपायाचें वर्म । दृढ लाविला नित्यनेम । हेंचि उपायवर्म । समयीं अंतींच्या ॥ १५ ॥ पूर्वी पडला अभ्यास । तोचि अंतीं निजध्यास । ह्मणोनियां सावकाश । नेम करावा ॥ १६ ॥ जयासी ठाईंची सेवे । तयास नलगे सांगावें । ह्मणोनि नित्यनेमासी जीवें । विसंबों नये ॥ १७ ॥ नित्यनेम पूर्वीं कथिला । पुनः पाहिजे ऐकिला । जो मार्तें निरोपिला । तोचि आतां ॥ १८ ॥ एकाग्र करोनियां मन । अंतरीं करावें ध्यान । सर्व सांग पूजाविधान । प्रत्यहीं कीजे ॥ १९ ॥ नित्य नेमिला जो जप । त्रिकाळ दर्शन साक्षेप । आदित्य मारुतीचें रूप । अवलोकावें ॥ २० ॥ हरिकथानिरूपण । प्रत्यहीं करावें श्रवण । हीच जाणावी खूण । नित्यनेमाची ॥ २१ ॥ अशक्त होवोनि प्राणी पडे । नित्यनेम त्यास न घडे । तेणें बळेंचि नेमाकडे । चित्त न्यावें ॥२२॥ नित्यनेमाचा अभ्यास । तोचि लागे निजध्यास । चुकतां कासावीस । अंतसमयीं ॥२३॥ अहा देवा जप राहिला । मारुती नाहीं देखिला । प्राणी योगभ्रष्ट झाला । निजध्यासें ॥ २४ ॥ ऐसें नित्यनेमें कोडें । मन लागे देवाकडे । अंतकाळीं बळें घडे । निजध्यास ॥ २५ ॥ खुंटतां अंतर पडे । अंतरींच जप घडे । स्वामी आधींच सांकडें । फेडीत गेले ॥ २६ ॥ जें वाल्मीकासी आधार । जें शतकोटींचें सार । उमेसहित शंकर । जपे जया ॥ २७ ॥ जेणें धन्य काशीपुरी । प्राणिमात्रासी उद्धरी । अंतकाळीं पृथ्वीवरी । उच्चार जयाचा ॥ २८ ॥ तेंचि अंतरीं धरावें । तेणें संकटीं तरावें । कैलासपती सदाशिवें । उपाव केला ॥ २९ ॥ इति श्रीअंतर्भाव समाप्त ॥

# आत्माराम·

## समास १.

श्रीराम समर्थ ॥ जयासि लटिका आळ आला । जो मायागौरीपासून झाला । जाला नाहीं तया अरूपाला । रूप कैचें ॥ १ ॥ तेथें स्तवनाचा विचार । न घडे निर्गुण निर्विकार । तैसियासीच नमस्कार । भावबळें माझा ॥ २ ॥ जयाचेनि वेद शास्त्रें पुराणें । जयाचेनि नाना निरूपणें । जयाचेनि सुख लाधणें । शब्दीं निःशब्द ॥ ३ ॥ जें शब्दासी आकळेना । शब्देंविण तें कळेना । ऐसेंहि घडेना । जये स्वरूपीं ॥ ४ ॥ ऐसें सर्वत्र संचलें । तर्का न जाय अनुमानलें । तें जयेचेनि प्राप्त झालें । आत्मरूप ॥ ५ ॥ नमन तियेचे निजपदा । माया वाग्देवी शारदा । जिचेनि प्रवर्तती संवादा । संत महानुभाव ॥ ६ ॥ वंदीन सद्गुरु स्वामी । जेथं राहिलें मी तो तो मी । निवारिलीं निजधामीं । पांचही जणें ॥ ७ ॥ तया निजपदापैलीकडे । आनंदें वृत्ती वोवडे । पद लाधलिया जोडे । तद्रूप होवोनि ॥ ८ ॥ स्वामिकृपेचा लोट आला । मानससरोवरीं सामावला । पूर्ण होतां उचंबळला । आनंदउद्गार माझा ॥ ९ ॥ सद्गुरुकृपेचें बळ । माझे ठायीं जालें तुंबळ । तेणें गुणें स्वानंदजळ । हेलावूं लागे ॥ १० ॥ आतां नमस्कारीन राम । जो योग्यांचें निजधाम । विश्रांतीचा निजविश्राम । जयेठायीं ॥ ११ ॥ जो नांवरूपां वेगळा । जो मायेहून निराळा । जेथें जाणिवेची कळा । सर्वथा न चले ॥ १२ ॥ जेथें

---

संचय. २ सूर्य. ३ संकटः ४ महाश्रेष्ठ. ५ शिरते.

भांबावला तर्क । जेथें पांगुळला विवेक । तेथें शब्दाचें कौतुक । केवीं घडे ॥ १३ ॥ जयाकारणें योगी उदास । वनवासी फिरती तापस । नाना साधनें सायास । ज्याकारणें करिती ॥ १४ ॥ ऐसा सर्वात्मा श्रीराम । सगुण निर्गुण पूर्णकाम । उपमाचि नाहीं निरुपम । रूप जयाचें ॥ १५ ॥ आतां वंदीन सज्जन श्रोते । जे कृपाळू भावाचे भोक्ते । माझीं वचनें प्राकृतें । सांगेन तयांसी ॥ १६ ॥ तयांचें वर्णावें स्वरूप । तरी ते स्वरूपाचे बाप । जें वेदास सांगवेना रूप । तें ज्यापासोनी प्रगटे ॥ १७ ॥ आतां शिष्या सावधान । ऐक सांगतों गुह्य ज्ञान । तेणें तुझें समाधान । अधिक होय ॥ १८ ॥ तूं आशंका नाहीं घेतली । परी चिंता मज लागली । जे तुझी भ्रांती फिटली । नाहीं अद्यापि ॥ १९ ॥ दासबोधींचे समासीं । निर्मूळ केलें मीपणासी । त्या निजपर्णी वृत्तीसी । पालट दिसेना ॥ २० ॥ ह्मणोनि न पुसतां सांगणें । घडलें शिष्या तुजकारणें । आतां तरी सोय धरणें । श्रवण मननीं ॥ २१ ॥ चातकपक्षी वरचेवरी । चंचू पसरोनि थेंब धरी । जीवनें सर्वेही अव्हेरी । भूमंडळींचें ॥ २२ ॥ तैसा शब्दवर्षाव होतां । असोन दावी व्यग्रता । श्रवणपुटीं सामावितां । मनन करावें ॥ २३ ॥ लाग जाणोनि शब्दाचा । आवांका धरावा मनाचा । शब्दांतील गर्भाचा । सांठा धरावा ॥२४॥ अरे तूं कोणाचा । कोठून आलासि कैंचा । ऐसा विचार पूर्वीचा । घेईं बापा ॥ २५ ॥ अरे तुवां जन्मांतर घेतलें । काय मानितोसि आपुलें । ऐसें त्वां विचारिलें । पाहिजे आतां ॥ २६ ॥ येथें तुझें कोणी नाहीं । भुलला आहेस काई । चुकोनि आलासी जाई । जेथील तेथें ॥ २७ ॥ तूं समर्थाचें लेकरू । अभिमानें घेतला संसारू । तो टाकितां पैलपारू । पावसी बापा ॥ २८ ॥ ईश्वरापासोनि झालासी । परंतु त्यास चुकलासी । ह्मणोनि हें दुःख भोगिसी । वेगळेपणें ॥ २९ ॥ आणि विश्वाससी या बोला । तरी मी घालीन रे तुजला । लावसी सकळ वैभवाला । जेथींचा तेथें ॥ ३० ॥ तुझें अढळपद गेलें । तुज मायेनें वेड लाविलें । तें जरी तुझें तुज दिधलें । मज काय देशी ॥ ३१ ॥ जितुकें कांहीं नासोन जाईल । जें अशाश्वत असेल । तुजसमागमें न येईल । तितुकें देईन ॥ ३२ ॥ मजहि तें कासया व्हावें । तुजपासूनि टाकावें । तुवां टाकिलें तरी न्यावें । तुजसमागमें ॥ ३३ ॥ भूषण भिक्षेचें टाकिलें । अमरपद प्राप्त झालें । तरी तुझें काय गेलें । सांग बापा ३४॥ नाशिवंत तितुकें देशी । तरी पद प्राप्त निश्चयेंसीं । यामध्यें लालची करिसी । स्वहित न घडे ॥ ३५ ॥ तों शिष्य ह्मणे जी दिधलें । स्वामी ह्मणती पद लाधलें । आतां तूं आपलें । मानूंचि नको ॥ ३६ ॥ इतुकें स्वामी बोलले । अज्ञान घेऊन निघाले । तंव शिष्यें आक्षेपिलें । विनीत होवोनि ॥ ३७ ॥ आतां पुढिलिये समासीं । संवाद होईल उभयांसीं । तेणें स्वानंदसिंधूसी । भरितें दाटे ॥ ३८ ॥ इति श्रीआत्माराम । रामदासीं पूर्णकाम । ऐका सावध धर्म । सांगिजेल ॥ ३९ ॥

## समास २.

॥ श्रीराम समर्थ ॥ ॥ जयजय सच्चिदानंदा । जयजयाजी निजबोधा । जयजयाजी आनंदकंदा । परमपुरुषा ॥ १ ॥ अनंत ब्रह्मांडें दिसाळें । मायेनें रचिलें विशाळें । तुमचे कृपेचेनि बळें । विरती स्वानंदडोहीं ॥ २ ॥ आतां स्वामीनें जें इच्छिलें तें

१ उदक. २ कानामध्यें. ३ नाश पावणारें. ४ शंका काढिली. ५ नम्र. ६ मोठमोठे, विशाळ.

पाहिजे अंगिकारिलें । शरणागत आपुलें । उपेक्षूं नये ॥ ३ ॥ नाशिवंत काय टाकावें । तें मज स्वामींनीं सांगावें । मज दातारें करावें । आपणाऐसें ॥ ४ ॥ ऐकोनि शिष्याचें बोलणें । स्वामी ह्मणती सावध होणें । अवधान देऊनि घेणें । आनंदपद ॥ ५ ॥ शिष्या बहुत मन घालीं । आतां बाष्कळता राहिली । येथें वृत्ती चंचळ केली । तरी बुडशी ॥ ६ ॥ अग्निसंगें लोह पिटे । पिटतां तयाचा मळ तुटे । परिसासि झगडतां पालटे ॥ लोहपण तयाचें ॥ ७ ॥ जयाचा मळ जळेना । अभ्यंतरहि वळेना । तरी तें सहसा पालटेना । मृत्तिकारूपें ॥ ८ ॥ नाशिवंत तितका मळ । तुवां त्यजावा अमंगळ । तो गेलिया तूंचि सकळ । आहेसि बापा ॥ ९ ॥ नाशिवंत तूं जाण माया । मायिकें जाईल विलया । ते मायाचि प्राणसखया । ऐक सांगतों ॥ १० ॥ अहं ऐसें जें स्फुरण । तेंचि मायेचें लक्षण । मायेपासून त्रिगुण । गुणांपासोनि भूतें ॥ ११ ॥ पृथ्वी आप तेज वायु आकाश । सृष्टि रचिली सावकाश । एवं दृश्य आणि अदृश्य । सकळ माया ॥ १२ ॥ एक माया दों ठायीं वांटिली । प्रकृति आणि पुरुषें झाली । जैसी दो दिवसांची बोली । एकचि परवा ॥ १३ ॥ माया ज्ञाता ज्ञेय ज्ञान । माया ध्येय ध्याता ध्यान । माया हेंचि समाधान । योगियांचें ॥ १४ ॥ ऐशी माया सच्चिदानंद । माया आनंदाचा कंद । माया हेचि निजबोध । शब्दरूपें ॥ १५ ॥ आत्मा ब्रह्मस्वरूप । हें मायेचें निजरूप । रूप आणि अरूप । सकळ माया ॥ १६ ॥ जीव शिव आणि ईश्वर । हाहि मायेचा विस्तार । शिवरूप विश्वंभर । अवघी माया ॥ १७ ॥ माया मनासी चाळक । माया बुद्धीस व्यापक । माया अनेकीं एक । ऐसें बोलणें ॥ १८ ॥ माया देहास चालवी । माया शब्दास बोलवी । माया द्रष्ट्यास दाखवी । नेत्रीं रिघोनियां ॥ १९ ॥ मायेनें माया चाले । मायेनें माया बोले । मायेनें माया हाले । वायुरूपें ॥ २० ॥ तंव शिष्य ह्मणे जी तात । माया चाले स्वरूपसत्ता । अरे सत्ता ती तवरैतां । माया जाण ॥ २१ ॥ तरी मायेनें स्वइच्छा असावें । स्वरूपसत्तेनें नसावें । मनास आलें तैसें करावें । हें कैंवीं घडे ॥ २२ ॥ लटिक्यावरी खरें[1] चाललें । लटिकें मर्यादेनें राहिलें । तें गर्भांधें[2] देखिलें । हे अघटित वार्ता ॥ २३ ॥ तैसी माया ही मानिली । स्वरूपसत्तेनें चालली । तुवां गर्भांधें देखिली । हे वार्ता सांगसी ॥ २४ ॥ जें झालेंचि नाहीं सर्वथा । तयावरी निर्गुणाची सत्ता । ऐसें हें ज्ञातेपणें बोलतां । तुज लाज नाहीं ॥ २५ ॥ सकळ माया ह्मणतां । आणि झालीच नाहीं ही सांगतां । तरी म्यां काय करावें आतां । सांगा स्वामी ॥ २६ ॥ अरे जें जें मनास अनुभवलें । तें तें मायिक नाथिलें । तितुकें तुवां टाकिलें । पाहिजे स्वानुभवें ॥ २७ ॥ सकळहि माया नाथिली । स्वरूपीं नाहीं राहिली । एवं नाहीं हे बोली । माया जाणावी ॥ २८ ॥ एवं सांगतों तें ऐकावें । मायिक मायेतें[3] जाणावें । आतां मनन करावें । सावध होवोनि ॥ २९ ॥ मायेकरितां माया दिसे । मायेकरितां माया भासे । मायेकरितां लाभ असे । परमार्थाचा ॥ ३० ॥ माया भवसिंधूचें तारूं । माया पाववी पैलपारू । मायेवीण उद्धारू । प्राणियांसि नाहीं ॥ ३१ ॥ मायेकरितां देवभक्त । मायेकरितां ज्ञाते विरक्त[4] । मायेकरितां जीवन्मुक्त । होती स्वानुभवें ॥ ३२ ॥ मायेकरितां वेद श्रुती । मायेकरितां वित्पत्ती।

---

१ खोटी, लटकी. २ गद्धा. ३ खरोखर. ४ वैराग्यशील.

मायेकरितां होती। मूढ ते विवेकी॥३३॥ माया परमार्थाचें अंजन। मायेकरितां जोडे निधान। मायेकरितां सावधान। साधक स्वरूपीं॥ ३४ ॥ मायेकरितां स्वहित घडे। मायेकरितां भ्रांती उडे। मायेकरितां विघडे। प्रपंचभान॥ ३५ ॥ मायेवीण ज्ञान कैंचें। माया जीवन सकळांचें। मायेविण साधकाचें। कार्य न चले॥ ३६ ॥ मायेवीण परमार्थ जोडे। ऐसें हें कधींच न घडे। मायेवीण सहसा नातुडे। गूज योगियांचें॥ ३७ ॥ माया योग्यांची माउली। जेथील तेथें नेऊन घाली। कृपाळूपणें नाथिली। आपण होय॥ ३८ ॥ सकळ मायेचें रूप झालें। त्यांत तुझेंहि रूप आलें। हें इतुकेंहि आपुलें। मानूंचि नको॥ ३९ ॥ आतां मागतों तुज म्हणून। त्वां नाशिवंत केलें मदर्पण। आतां करिशील हलकेपण। तरी मज शब्द नाहीं॥ ४० ॥ संग तितुका नाशवंत। निःसंग शब्द अशाश्वत। म्हणोनि संगानिःसंगातीत। होवोनि राहें॥४१॥ पुढिले अध्यायीं निरूपण। आदरें करावें श्रवण। संगातीत होईजे ते म्हणून। सांगिजेल पुढें॥ ४२ ॥ इति श्रीआत्माराम। रामदासीं पूर्णकाम। योगी पावती विश्राम। जयेठायीं॥ ४३ ॥

## समास २.

॥ श्रीराम समर्थ ॥ ॥ संग तितुका नाशिवंत। सोडून राहावें निवांत। एकपणाचा अंत। झालिया समाधान॥ १ ॥ एकपणाचा उमसे। काढितां त्रिपुटी सावकाश। होत आहे म्हणोनि ध्यास। एकपणाचा नसे॥ २ ॥ तो मी आत्मा ऐसा हेतू। हें नाशिवंत टाकी तूं। उन्मनी अवस्थेचा प्रांतू। तें स्वरूप तुझें॥ ३ ॥ ऐसा जो अनुभव झाला। तोहि नाशिवंतामध्यें आला। अनुभवावेगळा राहिला। तो तूं आत्मा॥ ४ ॥ हेंहि न घडे बोलणें। आतां पाल्हेरा किती देणें। वेद शास्त्रें पुराणें। नासोनि जाती॥ ५ ॥ ग्रंथमात्र जितका बोलिला। आत्मा त्यावेगळा राहिला। हे मायेचा स्पर्श जाला। नाहींच त्यासी॥ ६ ॥ स्वरूप निर्मळ निघोट। स्वरूप शेवटा शेवट। जिकडे तिकडे नीट। सन्मुख आहे॥ ७ ॥ जें बहु दूरीच्या दूरी। निकट जवळी अंतरीं। दुरी आणि अभ्यंतरीं। घटणी नाहीं॥ ८ ॥ जें सकळांपरीस मोठें॥ जेथें हें सकळ आटे। अकस्मात एकसरां तुटे। मूळ मायेचें॥ ९ ॥ जें सकळांहून मृदु कोंवळें। सकळांहून अत्यंत जवळें। जें सकळांमध्यें परि निराळें। अलिप्तपणें॥ १० ॥ जें हाले ना चाले। जें बोले ना डोले। अवघें आपण संचलें। एकटेंचि तें॥ ११ ॥ आकाश बाहेर भरलें। आकाश जेथें मुरालें। आकाश मुरूनि उरलें। एकजिनसी॥ १२ ॥ जें चळे ना ढळे। अग्नीमध्यें न जळे। जें जळीं परि निराळें। उदकीं बुडेना॥ १३ ॥ ज्यास कोणी नेईना। चोरूं जातां चोरवेना। कल्पांतहि वेचेना। अणुमात्र जें॥ १४ ॥ चक्षूनें लक्षिलें नवजाय। जेथें आकाश भस्मोनि जाय। सांगितलें तें साकार होय। सांगणें न घडे॥ १५ ॥ ऐसें जरी न बोलावें। तरी म्यां काय करावें। न बोलतां कळावें। तुज कैसें॥ १६ ॥ बोलणें तितुकें व्यर्थ जातें। बोलतां अनुभवा येतें। अनुभव सांडितां तें। आपण होइजे॥ १७ ॥ मायारूप मूळ तयाचें। शोधूं जातां कैंचें। मग लाभ झालिया

१ ठेवा. २ आधार. ३ सांपडत नाहीं. ४ देहाभिमान रहित. ५ विसांवा. ६ घनदाट. ७ वेगळेपणानें.

दुःखाचें। मूळ तुटे ॥ १८ ॥ अहं ब्रह्मास्मि ही गाथा। आली देहबुद्धीच्या माथां। देहबुद्धीनें परमार्था। कानेंकोंडें होईजे ॥ १९ ॥ देहबुद्धी हे टाकावी। हेहि मायेची उठाठेवी। ह्मणोनी काय अंगीकारावी। अंगीकारूं न घडे ॥ २० ॥ मायेचे बळें ब्रह्मज्ञान। मायेकरितां ब्रह्मसाधन। मायाचि गोंवी बंधन। तोडी तेहि माया ॥ २१ ॥ माया आपणासी गोंवी। आपआपणा वेड लावी। प्राणी दुःखी होत जीवीं। अभिमानेंकरूनी ॥ २२ ॥ जैसा सारीपाट खेळती। सारी एकाच्या मागोन आणिती। खेळों बैसतां वांटोन घेती। आपुलाल्या ॥ २३ ॥ नसतां अभिमान माथां। सारी मरतां परम व्यथा। डाव येतां सुखस्वार्था। दोघेहि पडिले ॥ २४ ॥ फांशासी दे दे ह्मणती। एक ते रडी खाती। क्रोधें पेटल्या घेती। जीव एकमेकांचे ॥ २५ ॥ तैशा कन्या पुत्र नारी। वांटून घेतल्या सारी। अभिमान वाहती शिरीं। पांग प्रपंचाचा ॥ २६ ॥ इतुकीं वेडें लाविलीं। ते माया खेळे एकली। ते मायेनेंच विराली। पाहिजे माया ॥ २७ ॥ माया मोडितां अधिक जडे। ह्मणोनि धरिती ते वेडे। धरितां सोडितां नातुडे। वर्म कळल्यावांचूनी ॥ २८ ॥ जैसें चक्रगृहाचें उगवणें। बाहेर येऊन आंत जाणें। कां अंतरीं जाऊन येणें। अकस्मात बाहेरी ॥ २९ ॥ त्या कवाडीच्या कळ्या। गुंतगुंतों उगवाव्या। तैसी जाण ही माया। गुंतोनि उगवावी ॥ ३० ॥ माया कैशी झाडावी। तोडोनि कैशी टाकावी। येथें विचारें पहावी। नाथिलीचे हे ॥ ३१ ॥ बहुनाटक हे माया। मीपणें न जाय विलया। विचार पहातां इया। ठावचि नाहीं ॥ ३२ ॥ वर्म हेंचि माया मायिक। इचा करावा विवेक। विवेक केलिया अनेक। एकीं मुरे ॥ ३३ ॥ एकी अनेक मुरालें। एकपण अनेकांस वेगळें। उपरी जे निःसंग उरलें। तें स्वरूप तुझें ॥ ३४ ॥ तुझें स्वरूप नाकळे। तें जया साधनें आकळे। तें साधन एक सोहळे। भोगिसी स्वानंदें ॥ ३५ ॥ इति श्रीआत्माराम। सांगिजेल पुढें साधनवर्म। जेणें भिन्नत्वाचा भ्रम। तुटोनि जाय ॥ ३६ ॥

## समास ४.

॥ श्रीराम समर्थ ॥ ॥ जें सकळ साधनाचें सार। जेणें पाविजे पैलपार। जेणें साधनें अपार। साधक सिद्ध झाले ॥ १ ॥ तें हें जाणारे श्रवण। करावें अध्यात्म निरूपण। मनन करितां समाधान। निजध्यासें पाविजे ॥ २ ॥ संतसज्जन महानुभवी। परमार्थचर्चा करीत जावी। हयगयही न करावी। ज्ञातेपणेंकरोनी ॥ ३ ॥ परमार्थउठाठेवी करितां। लाभचि होय तत्त्वतां। दिवसेंदिवस जाणतां। पालट होय ॥ ४ ॥ नित्य नवें श्रवण मनन। त्या ऐसें नाहीं साधन। ह्मणोनि हें नित्य नूतन। केलें पाहिजे ॥ ५ ॥ जैसें ग्रंथीं बोलिलें। तैसें पाहिजे केलें। क्रियेच्या माथां आलें। निश्चितार्थें ॥ ६ ॥ जे ग्रंथीं जो विचार। वृत्ती होय तदाकार। ह्मणोनि निरूपण सार। भक्ति ज्ञान वैराग्य ॥ ७ ॥ शिष्य ह्मणे जी सर्वज्ञा। सत्य करावी प्रतिज्ञा। नाशिवंत घेत साधना। वरपडें न करावें ॥ ८ ॥ अरे शिष्या मन घालावें। नाशिवंत तूं ओळखावें। साधन लागे करावें। प्रतिज्ञाच आहे ॥ ९ ॥ प्रतिज्ञा करावी प्रमाण। ऐसें बोलतो हा कोण। नाशिवंत केलें

---

१ संकुचित. २ नाहींशी झाली. ३ खोटी, लटकी. ४ आत्मज्ञानाविषयक. ५ महाश्रेष्ठ.

मद्र्पण । यामध्यें तो आला ॥ १० ॥ तूं ह्मणसी जें दिलें । घ्यावया कोण उरलें अरे उरलें तें झुरलें । माझेकडे ॥ ११ ॥ तूं नाशिवंतामध्यें आलासी । आपणास कांरे चोरितोसी । नाशिवंत देतां कचकतोसि । फट्रे पढतमूर्खा ॥ १२ ॥ शिष्य विचारून बोले। स्वामी कांहीं नाहीं उरलें । अरे नाहीं बोलणें आलें। नाशिवंतामध्यें ॥ १३ ॥ आहे ह्मणतां कांहीं नाहीं। नाहीं शब्द गेला तोही । नाहीं नाहीं ह्मणतां कांहीं। उरलें कीं ॥ १४ ॥ येथें शून्या निरास झाला। आत्मा सदोदित संचला । पाहों जातां साधकाला । ठावचि नाहीं ॥ १५ ॥ अभिन्न ज्ञाता तोचि मान्य । साधक साध्य होतां धन्य। वेगळेपणें वृत्ती शून्य। पावती प्राणी ॥ १६ ॥ वेगळेपणें पाहों जातां । मोक्ष न जोडे सर्वथा । आत्मा दिसे नामता । वरपंडे होती ॥ १७ ॥ आपुल्या डोळां देखिलें । तें नाशिवंतामध्यें आलें । ऐसें जाणोनि धरिलें। ते नाडले प्राणी ॥ १८ ॥ जो पंचभूतांचा दास । तया पंचभूतीं वास । भोगी नीच नवी सावकाश। पुनरावृत्ती ॥१९॥ तों शिष्यें विनंती केली। ह्मणे आशंका उद्भवली । पंचभूतांची सेवा केली । बहुतीं कीं ॥ २० ॥ सकळ सृष्टीमध्यें जन। संत साधू आणि सज्जन। करिती भूतांचें भजन । धातू पाषाणमूर्ती ॥ २१ ॥ कोणी नित्यमुक्त झाले । तेहि धातु पुजूं लागले । परंतु ते पुनरावृत्ती पावले । किंवा नाहीं ॥ २२ ॥ ऐसा शिष्याचा अंतर्भाव। जाणोनि आनंदे गुरुराव । ह्मणे शीघ्रचि अनुभव । पावेल आतां ॥ २३ ॥ ऐसें विचारूनि मनीं । कृपादृष्टी न्याहाळूनी। शिष्याप्रती सुवचनीं। बोलते झाले ॥ २४ ॥ प्राणी देह सांडून जाती । वासनाशरीरें असती । पुनरावृत्ती[3] भोगिती। वासना उरलिया॥ २५ ॥ मूळमाया स्थूलदेहाचें । लिंगदेह वासनात्मकाचें । राहाणें तया लिंगदेहाचें । अज्ञानडोहीं ॥ २६ ॥ कारण देह अज्ञान। ज्ञान तो आत्मा जाण। तया नांव महाकारण । बोलिजे तें ॥ २७ ॥ जरी मनाचा थारा तुटला। ह्मणजे भवसिंधू आटला । प्राणी निश्चितार्थे सुटला । पुनरावृत्तीपासोनी ॥ २८ ॥ हेंचि जाण भक्तीचें फळ । जेणें तुटे संसारमूळ। निःसंग आणि निर्मळ । आत्मा स्वयें ॥ २९ ॥ संगातीत ह्मणजे मोक्ष। तेथें कैंचें देखणें लक्ष । लक्ष आणि अलक्ष । दोहींस ठाव नाहीं ॥ ३० ॥ आत्मा ह्मणोनि देखण्यास मिठी। घालूं जातां मोक्ष तुटी । ह्मणोनियां उठाउठी । आत्मनिवेदन करावें ॥ ३१ ॥ प्राप्त झालें अद्वैत ज्ञान। अभिन्नपणें जें विज्ञान । तोंचि जाण आत्मनिवेदन। जेथें मी तूं नाहीं ॥ ३२ ॥ ऐसी स्थिति जया पुरुषाची। तया पुनरावृत्ती कैंची ॥ जाणोनि भक्ती केली दास्याची। देवासी अत्यंत ॥ ३३ ॥ पूर्वी दास्यत्व होतें केलें। त्याचें स्वामित्व प्राप्त झालें। आणि तयाचें महत्व रक्षिलें । तरी थोर उपकार ॥ ३४ ॥ आतां असो हें बोलणें। नाशिवंताचा विचार करणें। आणि मजपाशीं सांगणें । अनुभव आपुला ॥ ३५ ॥ आतां पुढिलिये समासीं । शिष्य लाधेल अनुभवासी। दृढ करोनियां तयासी । सांगती स्वामी ॥ ३६ ॥ इति श्रीआत्माराम। रामदासीं पूर्णकाम। ऐका साधनवर्म। आत्मज्ञानाचें ॥ ३७ ॥

१ नाश. २ गुंतलेले. ३ जन्ममृत्यूच्या येरझारा. ४ आत्मसमर्पण ५ अनुभवजन्य ज्ञान.

## समास ५.

॥ श्रीराम समर्थ ॥ जी जी स्वामी सर्वेश्वरा ॥ आह्मां अनाथांचिया माहेरा । सार्थक झालें जी दातारा । कृपाकटाक्षें ॥ १ ॥ या मनाचे संगतीं । जन्म घेतले पुनरावृत्ती । माया मायिक असोनि भ्रांती । वरपडा झालों होतों ॥ २ ॥ मी मानवी किंकर । एकाएकीं झालों विश्वंभर । संदेह तुटला थोर । यातायाती ॥ ३ ॥ मी संसाराहून सुटलों । मीच सकळ देहीं विस्तारिलों । जन्मदुःखापासूनी मुकलों । सर्वांभूतीं ॥ ४ ॥ मी करून अकर्ता । मी भोगूनि अभोक्ता । मजमध्यें वार्ता । मीपणाची नाहीं ॥ ५ ॥ ऐसें जें कां निजबीज । गाळींव मीपणाचा फुंज । तो मुरलिया सहज । सिद्धचि आहे ॥ ६ ॥ ऐसा शिष्याचा संकल्पू । ह्मणोनि बोले भवरिपूं[१] । संसारसर्प भग्नदर्पू । केला जेणें ॥ ७ ॥ जें स्वामीच्या हृदयीं होतें । तें शिष्यास बाणलें अवचितें । जैसें सामर्थ्य परिसाचें तें । लोहाअंगीं ॥ ८ ॥ स्वामिपरिसाचा स्पर्श होतां । शिष्य परीस झाला तत्त्वतां । गुरुशिष्याची ऐक्यता । झाली स्वानुभवें ॥ ९ ॥ गुज स्वामीच्या हृदयींचें । शिष्यासी वर्म तयाचें । प्राप्त झालें योग्याचें । निजबीज जें ॥ १० ॥ बहुतां जन्मांच्या शेवटीं । झाली स्वरूपाची भेटी । एका भावार्थासाठीं । परब्रह्म जोडलें ॥ ११ ॥ जो वेदशास्त्रांचा भावगर्भ । निर्गुण परमात्मा स्वयंभ[२] । तयाचा एकसरां लाभ । झाला सद्भावें ॥ १२ ॥ जें ब्रह्मादिकांचें माहेर । अनंत सुखाचें भांडार । जेणें हा दुर्गम संसार । सुखरूप होय ॥ १३ ॥ ऐसें ज्यासी ज्ञान झालें । तयाचें बंधन तुटलें । येरें[३] नसोनि पाउलें । दृढ अविवेकें ॥ १४ ॥ संदेह हेंचि बंधन । निःशेष तुटलें तेंचि ज्ञान । निःसंदेहीं समाधान । आपैसें[४] होय ॥ १५ ॥ प्राणियासी माया सुटेना । अभिमानें त्रिपुटी तुटेना । वृत्ती स्वरूपीं फुटेना । स्फूर्तिरूपें ॥ १६ ॥ मायाजाळीं जे पडले । ते ईश्वरासि चुकले । ते प्राणी सांपडले । वासनाबंधनीं ॥ १७ ॥ ज्याचें दैव उदेलें । तयास ज्ञान प्राप्त झालें । तयाचें बंधन तुटलें । निःसंगपणें ॥ १८ ॥ सर्वसाक्षी तुर्यावस्था[५] । तयेचाहि तूं जाणता । ह्मणोनि तुज निःसंगता । सहजचि आली ॥ १९ ॥ आपणासी तूं जाणसी । परी तूं तें नव्हेसी । तूंपणाची कायसी । मात स्वरूपीं ॥ २० ॥ जाणता आणि वस्तू । निमाली या उर्वरितें[६] तूं । तूंपणाचीहि मातू । सहजचि वाव ॥ २१ ॥ असो हा शब्दपाल्हाळ । तुझें तुटलें जन्ममूळ । कां जें नाशिवंत सकळ । मदर्पण केलें ॥ २२ ॥ जें जें जाणोनि टाकिलें । तें तें नाशिवंत राहिलें । तुझें तुज प्राप्त झालें । अक्षय पद ॥ २३ ॥ ऐसें बोले मोक्षपाणी[७] । ऐकोनि शिष्य लोटांगणीं । निःसंगस्वरूपमिळणीं । दोघे एकचि झाले ॥ २४ ॥ ऐसा कृपाळू स्वामिराव । आदिपुरुष देवाधिदेव । शिष्यासी निजपदीं ठाव । ऐक्यरूपें दिल्हा ॥ २५ ॥ जो स्वामीस शरण गेला । तेणें जन्म सार्थक केला । संदेहवेगळा झाला । जो देवा दुर्लभ ॥ २६ ॥ ग्रंथ संपतां स्तुती उरे । बोलिजेती अपारें । अर्थासी कारण येरें । चाड नाहीं ॥ २७ ॥ इति श्रीआत्माराम । रामदासीं पूर्णकाम । साधकें पाहतां भ्रम । बाधिजेना ॥ २८ ॥ इति श्री आत्माराम संपूर्ण ॥

---

१ संसाराचा शत्रु. २ स्वतःसिद्ध. ३ इतर. ४ आपोआप. ५ चवथी अवस्था. ६ शिल्लक. ७ मोक्ष हातांत आहे ज्याच्या असा.

# पंचसमासी.

## समास १.

॥ श्रीराम समर्थ ॥ गणेश शारदा सद्गुरु । संत सज्जन कुळेश्वरु । माझा सर्वेहि रघुवीरु। सद्गुरुरूपें ॥१॥ माझें आराध्य दैवत । परम गुह्य गुह्यातीत । गुह्यपणाची मात । न चले जेथें ॥ २ ॥ जें स्पर्शेल नाहीं वेदवाणी । जे वर्णवेना सहस्रफणी । जेथें अनुभवाची कइसणी । आटोनि गेली ॥ ३ ॥ जें शब्दासी अचोज । जें निःशब्दाचें निजबीज । जें शंकराचें निजगूज । समाधिशोभा ॥ ४ ॥ जो वेदाचा अंतरभाव । सायुज्यमुक्तीचा ठाव । भावनेचा अभाव । अभावेंसहित ॥ ५ ॥ जो शब्द बाहेर पडे । तें त्या शब्दापलीकडे । जें अनुभवितां मोडे । धांव मनाची ॥ ६ ॥ असें तेंचि आदिअंत । माझें आराध्यदैवत । जेथें सर्व मनोरथ । पूर्ण होती ॥ ७ ॥ जें साराचें निजसार । जें आनंदाचें भांडार । जें मोक्षाचें विढार । जन्मभूमी ॥ ८ ॥ जें निर्विकल्प तरूचें फळ । अनुभवें पिकलें रसाळ । तया रसाचे गळाळ । घेती स्वानुभवी ॥ ९ ॥ झालिया रसाचे विभागी । अमरत्व जडे अंगीं । संगातीत महायोगी । होइजे स्वयें ॥ १० ॥ ऐसा जो कां परमपुरुष । निर्विकल्प निराभास। शुद्ध बुद्ध स्वयंप्रकाश । आत्मारामू ॥ ११ ॥ ऐशा जी सद्गुरु रामा । अगाध तुमचा महिमा । ऐक्यरूपें अंतर्यामा । मूळपुरुषा ॥ १२ ॥ तुझ्या कृपेचे उजेडें । तुटे संसारसांकडें । दृश्य मायेचें मढें । भस्मोनि जाय ॥१३॥ तुझे कृपेचा प्रकाश । करी अनाशाचा नाश । भाविक भोगिती सावकाश । अक्षयीं पद ॥ १४ ॥ क्षयचि नाहीं कल्पांतीं । एक स्वयें आदिअंतीं । ऐसें सुख कृपामूर्ती । प्रकट कीजे ॥ १५ ॥ जें साधनाचें निजसाध्य । निगमागमप्रतिपाद्य । योगेश्वरांचें सद्य । विश्रांतिस्थळ ॥ १६ ॥ जें सकळ श्रमाचें सार्थक । जें भाविका मोक्षदायक । तुमच्या हृदयीं अलौकिक । परम गुह्य ॥ १७ ॥ जें महावस्तूचें साधन । जें अद्वैतबोधाचें अंजन । जेणें पावती समाधान । महायोगी ॥१८॥ जेथें दुःखाचा दुष्काळ । निखळ सुखचि अर्बुमाळ । जें निर्मळ आणि निश्चळ । तेंचि तें अववें ॥ १९ ॥ ऐसें जें महा अगाध । योगेश्वराचें स्वतःसिद्ध । आत्मज्ञान परम शुद्ध । पाषांडावेगळें ॥२०॥ नाना मतें मतांतरें । सृष्टींत चाललीं अपारें। तयांमध्यें ज्ञान खरें । वेदांतमतें ॥२१॥ जें शास्त्रबाह्य घडलें । संता महंता बिघडलें । तें ज्ञानाचि परी पडिलें । पाषांडमतीं ॥ २२ ॥ असो सर्व प्रकारें शुद्ध । जें सर्वांमध्यें प्रसिद्ध । तया ज्ञानाचा प्रबोध । मज दीना करावा ॥ २३ ॥ दुस्तर भवसागरू । स्वामी बुडत्याचें तारूं । मज दीनासी पैलपारू । पाववावें ॥ २४ ॥ ऐशीं करुणावचनें । बोलला म्लानवदनें । ऐकोन स्वामी आश्वासनें । बुझावितें झाले ॥ २५ ॥ आतां प्राप्तीचा समयो । होईल अज्ञानाचा लँयो । मोक्षसाधनाचा जयो । होय श्रवणें ॥ २६ ॥ पुढील समासीं पूर्ण । ऐसें आहे निरूपण । श्रोतीं करावें श्रवण । सावध होवोनी ॥ २७ ॥

## समास २.

॥ श्रीराम समर्थ ॥ सर्वांगाचे करोन कान । तुम्हीं व्हावें सावधान । पहिले

---

१ चौकशी, परीक्षा. २ न कळणारें. ३ गोड. ४ मधुर धारा. ५ वेदशास्त्रांनीं प्रतिपादन करण्यास योग्य. ६ विस्तृत. ७ नाश.

अध्यायीं प्रश्न । शिष्यें केला ॥ १ ॥ तया प्रश्नाचें उत्तर । आतां ऐका तत्पर । सांगि-
जेल सविस्तर । येच क्षणीं ॥ २ ॥ जेणें निरसे हें अज्ञान । तया नांव ब्रह्मज्ञान । तया
ज्ञानाचें लक्षण । ऐसें असे ॥ ३ ॥ स्वरूपीं सावधपण । हेंचि ज्ञानाचें लक्षण । अर्धीं
पडे विस्मरण । हे अज्ञानदशा ॥ ४ ॥ स्वरूपीं भुली पडतां । बहु लागे मोहममता ।
तेणें गुणें देहअहंता । दृढ होय ॥ ५ ॥ माझी माता माझा पिता । माझा पुत्र माझी कांता ।
माझा बंधू माझी सुता । जामात माझे ॥ ६ ॥ माझें घर माझा संसार । माझी जन्म-
भूमी सार । माझे सोयरे अपार । शेत वाडे पशु ॥ ७ ॥ माझें शरीर माझी संपत्ती ।
माझें वैभव माझी संतती । सर्वांचा अभिमान चित्तीं । दृढ झाला ॥ ८ ॥ ऐसें माझें
माझें ह्मणतां । अभिमानानें ओझें वाहतां । आयुष्य वेंचलें अवेचितां । मरोन गेला
॥ ९ ॥ गोवून संसारीं वासना । अभिमानें भोगी यातना । विषयीं गुंतला चुकेना ।
जन्ममृत्यू ओझें ॥ १० ॥ नश्वर जाणोनि ह्मणे माझें । व्यर्थाचि अभिमानें फुंजे । माथां प्रपं-
चाचें ओझें । कुटुंबकाबाडी ॥ ११ ॥ जें जयाचें मनोगत । तया होय तेंचि प्राप्त ।
ह्मणोनि विषयीं सक्त । तया स्वहित नाहीं ॥ १२ ॥ चुकोनि आत्मज्ञान । धरिलें विषयीं
ज्ञान । याला ह्मणिजे अज्ञान । नेमस्त शिष्या ॥ १३ ॥ आतां हें अज्ञान । तया निरसी
तें ज्ञान । तया ज्ञानाचें लक्षण । ऐक सांगतों ॥ १४ ॥ मी आत्मा ऐसें जाणिजे । तया
नांव ज्ञान बोलिजे । हें ज्ञान सहज बोलिजें । अज्ञान कैचें ॥ १५ ॥ आत्मा पावाव-
याची खूण । आधीं पाहावें मी कोण । आपणासी पाहतां पूर्ण । समाधान बाणे ॥ १६ ॥
देह माझें जो जाणतो । तरी देहावेगळाचि तो । धनी गुरु माझे ह्मणतो । तो गुरु नव्हे ॥ १७ ॥
सर्व पदार्थ धनी जाणे । तरी तो पदार्थ होऊं नणे । तैसा आत्मा सकळ जाणे । तो
तयावेगळा ॥ १८ ॥ मी कोण ऐसें पाहतां । देहाची मायिक वार्ता । आपण आपला शोध
घेतां । आपण मिथ्या ॥ १९ ॥ देहीं शोधितां मीपण उडे । मार्ग लागला आणिकीकडे ।
मूळासी जातां बापुडें । तो कोठें नाहीं ॥ २० ॥ देहसंगें वृत्ती मळे । शुद्ध ज्ञान तें झांकोळे ।
आपणा नेणतां आरंबळे । जीव दुःखें ॥ २१ ॥ आपली शुद्धी घेवों जातां । आपण
आत्माचि तत्वतां । बंधनचि नाहीं मुक्तता । होईल कैंची ॥ २२ ॥ जन्म मृत्यु मायिक
भ्रांती । हें आलें आत्मप्रचीती । अजन्मा तो आदिअंतीं । आपणचि आहे ॥ २३ ॥ अनु-
भावितां आत्मस्थिती । मुळी नाहीं पुनरावृत्ती । या नांव सायुज्यमुक्ती । जाण शिष्या
॥ २४ ॥ जेथें शिणली वेदवाणी । तो तूं आत्मा पूर्णपणीं । सायुज्यमुक्तीचा धनी ।
तूंचि एक ॥ २५ ॥ ऐकोनि शिष्य आनंदला । ह्मणे जन्म सार्थक जाहला । माझा संशय
फेडिला । सद्गुरुरायें ॥ २६ ॥ नमस्कारोनि पुढती । बोलता झाला स्वामीप्रती । होंचि
दृढ माझे चित्तीं । बैसवा स्वामी ॥ २७ ॥ पुढिलिये समासीं । दृढ होईल शिष्यासी ।
श्रोतीं सावध कथेसी । अवधान यावें ॥ २८ ॥ इति श्री० ॥

## समास ३.

॥ श्रीराम समर्थ ॥ ॥ मागिले अध्यायीं निरूपण । निरोपिलें आत्मज्ञान । तेंचि आतां

---

१ देहाभिमान. २ एकाएकीं. ३ फुगतो. ४ नाशकरी. ५ खोटी, लटकी. ६ आत्मानुभवाला. ७ लक्ष्

दृढीकरण । केलें पाहिजे ॥ १ ॥ जें ब्रह्मादिकां दुर्लभ । तें मानवांसी सुलभ । ऐसा हा अलभ्य लाभ ॥ सद्गुरुवचनें ॥ २ ॥ परी हें बाणलें पाहिजे अंगीं । तरी होइजे धन्य जगीं । जेणें समाधान योगी । महानुभावां ॥ ३ ॥ हें समाधान उत्कट । अंगीं बाणतां संकट । कां जें प्रपंचासि निकट । संबंध आहे ॥ ४ ॥ बहुतां दिसांची भ्रांती । देहबुद्धीची संगती । आणि भगवंताची प्राप्ती । सांप्रत झाली ॥ ५ ॥ अनंत जन्मींचा काटं जडला । अभ्यासचि पडोनि गेला । तो तितुकाहि झाडिला ॥ पाहिजे कीं ॥ ६ ॥ सकळ सृष्टीचा दंडक । लोभें व्यापला एकेक । तयामध्यें हा विवेक । आठवेल कैंचा ॥ ७ ॥ आपुला संसार करितां । जीव सर्वकाळ दुश्चिता । तेणें गुणें भगवंता । अंतर पडे ॥ ८ ॥ क्षणभरहि प्राणयास । माया घेवूं नेदी उमस । मिथ्या लोभासाठीं आयुष्य । व्यर्थ गेलें ॥ ९ ॥ उपाय होतां दिसेना । प्रपंचीं गुंतली वासना । तेणें गुणें समाधाना । अंतर पडे ॥ १० ॥ अनंत जन्मीं अभ्यास । तोचि आतां निजध्यास । लागला असे जगदीश । केंवीं जोडे ॥ ११ ॥ मळीण वस्त्र धुतां धुतां । तेणेंचि तें पावे शुद्धता । कैसा साधक तो भगवंता । साधनें पावे ॥ १२ ॥ साधनेंवीण ब्रह्मज्ञान । तेणें बुडे समाधान । अंगीं जडे देहाभिमान । वाचाळपणें ॥ १३ ॥ शब्दज्ञान हातां आलें । मी सिद्ध ऐसें कल्पिलें । बळेंच्चि धारिष्ट धरिलें । सिद्धपणाचें ॥ १४ ॥ तें धारिष्ट अंतीं उडे । प्राणी महासंशयीं पडे । शेवटीं जन्म मृत्यु घडे । भोगणें संशयें ॥ १५ ॥ ह्मणोनि जाणते पुरुषीं । सांडूं नये साधनासी । भांडूं नये आपणासी । सिद्धपणें सर्वथा ॥ १६ ॥ जो सिद्धाचाहि सिद्ध । ज्ञानवैराग्यप्रसिद्ध । सामर्थ्यसिंधू अगाध । कैलासराणा ॥ १७ ॥ तो सिद्ध करी साधन । सर्वकाळ रामचिंतन । ध्यान धारणा अनुष्ठान । चुकों नेदी ॥ १८ ॥ ऐसे अपार महामती । झाले ते साधन करिती । तरी तेथें मानव किती । बापुडे किंकर ॥ १९ ॥ राज्यपदाचे गुणें । रासभारूढ होणें । हें लोकीं लाजिरवाणें । निपटचि झालें ॥ २० ॥ मी सिद्ध ऐसें कल्पुनी । नित्यनेम न धरी मनीं । तत्पर अशनशयनीं । आत्महत्यारी ॥ २१ ॥ ज्ञानें भाव पालटला । देवाचा पाषाण झाला । ज्ञानें संत सज्जनाला । भौतिक भावी ॥ २२ ॥ जप कोणाचा करावा । नेम कोणाचा धरावा । सर्वात्मा भजावा । कोण सद्गुरु ॥ २३ ॥ स्त्रयें धर्म न करिती । पुढिलां वेड लाविती । भेद गेला नाहीं ह्मणती । वाचाळ ज्ञानी ॥ २४ ॥ सहज सोडूनि उपाधी । तें तया नेमस्त बाधी । ह्मणोनि भजनविधी । चुकों न यावा ॥ २५ ॥ बिढार नाहीं भक्तीचें । तेथें समाधान कैंचें । भिंतीवरील भस्माचें । झालेपण ॥ २६ ॥ भक्तीवीण जें ज्ञान । तेंचि सोलीव अज्ञान । तेणें कांहीं समाधान । होणार नाहीं ॥ २७ ॥ समाधानीं जो आगळा । तेथें भक्तीचा जिव्हाळा । जैसी ते गृहाची कळा । आंगण सांगे ॥ २८ ॥ भक्तीवीण देव जोडे । ऐसें कल्पांतीं न घडे । भक्तीकरितां साधक जडे । भगवंतीं ॥ २९ ॥ आतां भक्ती ते कैसी । दृढ व्हावया ज्ञानासी । हेंचि पुढिले समासीं । बोलिजेल ॥ ३० ॥ इति श्री० ॥

१ लेप. २ संप्रदाय. ३ विश्रांति. ४ शेवटीं. ५ गाढवावर बसणें. ६ अत्यंत. ७ भोजन व शयन यांमध्यें.

## समास ४.

॥ श्रीराम समर्थ ॥ मागां बोलिलें निरूपण । केलें पाहिजे साधन । तया साधनाचें लक्षण । ऐसें असे ॥ १ ॥ व्हावया ज्ञानाची प्राप्ती । आधीं केली पाहिजे भक्ती । भक्ती घडलिया मुक्ती । पाठी लागे ॥ २ ॥ मोक्षभुवन अतिसुंदर । आनंदरूप मनोहर । तेथें जावया विचार । ऐक बापा ॥ ३ ॥ तेथें नऊ पायऱ्या उत्तम । ऐक पायरी प्रथम । जी चढतां तुटे श्रम । निःशेष जीवांचा ॥ ४ ॥ तें तूं जाण गा श्रवण । करावें नित्यनिरूपण । तया निरूपणाची खूण । ऐसी असे ॥ ५ ॥ सज्जन आणि कृपाळू । ज्यास ज्ञान परिमळू । तया संगतीनें मळू । तुटे अज्ञानाचा ॥ ६ ॥ अद्वैतचर्चा अखंड । जेथें नाहीं पाषांड । तये संगतीनें बंड । तुरे[१] मीपणाचें ॥ ७ ॥ श्रवण करावे ते ग्रंथ । जेथें बोलिला परमार्थ । शृंगारश्रवणीं अनर्थ । नेमस्त आहे ॥ ८ ॥ ह्मणोनि तें त्यजावें । जेथें नाना युक्तिलाघव । भक्ति ज्ञान वैराग्य भावें । घ्यावें आदरें ॥ ९ ॥ नाना कथा चमत्कार । नवरसिक अपार । तें त्यजूनिया सार । अद्वैत घ्यावें ॥ १० ॥ श्रवण केल्याचें फळ । क्रिया पालटे तत्काळ । तेणें करितां प्रांजळ । आत्मज्ञान होय ॥ ११ ॥ सगुण सर्वोत्तमाचें ध्यान । करावें गुणानुवादन । हरिकथानिरूपण । करीत जावें ॥ १२ ॥ या नांव दुसरी भक्ती । ऐक तिसरीची स्थिती । सर्वकाळ आदरें चित्तीं । नाम असावें ॥ १३ ॥ चवथी पादसेवन । पांचवी असे अर्चन । सकळांचें करावें पूजन । विधीप्रमाणें ॥ १४ ॥ सकळवंदन सहावी । दास्यत्व हीं सातवी । आतां ऐका आठवी । भक्ति कैशी ॥ १५ ॥ सखा देवाचि मानावा । अखंड तोचि आठवावा । भार आभार घालावा । तयावरी ॥ १६ ॥ नववी ते अद्वैत जाणं । करावें आत्मनिवेदन । विचार घेतां अभिन्न । मुळींच आहे ॥ १७ ॥ हें नवविध भजन । सायुज्यमुक्तिसाधन । तेणेंकरितां शुद्ध ज्ञान । प्राण्यास होय ॥ १८ ॥ शुद्ध ज्ञानाचे बळें । अंतरीं वैराग्य प्रबळे । तेणें लिंगदेह मोकळें । होय वासनेसी ॥ १९ ॥ लागे स्वरूपानुसंधान[२] । नाठवे देहाभिमान । विश्रांतीतें देखे मन । तद्रूप होय ॥ २० ॥ आदिपुरुष एकला । नाहीं द्वैताचा गलबला । संगत्यागें[३] अवलंबिला । शुद्ध एकांत ॥ २१ ॥ तेथें मन पांगुळलें । आपणास विसरलें । आपणास भुलोन गेलें । स्वरूपबोधें ॥ २२ ॥ मी कोण हें नकळे । अवघा आत्मा प्रबळे । तेणें बळें मन मावळे । कर्पूरन्यायें ॥ २३ ॥ तेथें शब्द कुंठित झाला । अनुभव अनुभवीं निमाला । आतां असो हा गलबला । कोणीं करावा ॥ २४ ॥ वाटे एकांतासी जावें । पुनः हें अनुभवानें । उगें निवांत असावें । कल्पकोटी ॥ २५ ॥ नको वक्तृत्वउपाधी । पांगुळली स्वरूपीं बुद्धी । लागली सहज समाधी । हेतुरहित ॥ २६ ॥ गुरु शिष्य एक झाले । अनुभवबोधीं बुडाले । त्यांचे शुद्धीस जे गेले । तयां तीच गती ॥ २७ ॥ तुटला संसारबंधू । आटोनि गेला भवसिंधू[४] । बुडाला बोधीं प्रबोधू । विवेकबळें ॥ २८ ॥ ज्ञानाग्नि प्रगट झाला । मायाकर्पूर जळाला । विवेकें अविवेक ग्रासिला । तये ठायीं ॥ २९ ॥ झालें साधनाचें फळ । चुकलें जन्माचें मूळ । निष्कलंक आणि निर्मळ । तोचि आत्मा ॥ ३० ॥

---

१ उरत नाहीं. २ परब्रह्मस्वरूपाचे ठिकाणीं एकाग्रता. ३ देहाभिमान टाकून. ४ संसारसमुद्र.

दृढ बाणली आत्मस्थिती। मिथ्यत्वें मुरडली वृत्ती। सांगिजेल वर्तनगती। पुढील समासीं॥३१॥

## समास. ५

॥ श्रीराम समर्थ ॥ ॥ आतां शिष्या सावधान । मागील कथानुसंधान । झालिया आत्मनिवेदन । आली वृत्ती मिथ्यत्वें ॥ १ ॥ धन पाहोनि लोभी आलें । परी मन तेथेंचि बैसलें । शरीरप्रकृती प्रवर्तले । भ्रांतापरी ॥ २ ॥ कार्य करी, प्रपंचाचें । ध्यान लागलें धनाचें । अंतर गुंतलें तयाचें । द्रव्याकडे ॥ ३ ॥ ऐसें परम झालें मन । ध्यानीं आठवे धन । पिसें लागलें स्वप्न । तैसेंचि देखे ॥ ४ ॥ तो ज्ञाता समाधानीं । प्रारब्धयोगें वर्ते जनीं । परी अनुसंधान मनीं । वेगळेंची ॥ ५ ॥ वृत्ती गुंतली स्वानुभवें । जनीं तेंचि भासे आघवें । सबाह्य व्यापिलें देवें । ब्रह्मांड अवघें ॥ ६ ॥ वृत्ति मुळाकडे पाहे । त्यास राम दिसताहे । स्तब्ध होवोनियां राहे । रामचि दिसे ॥ ७ ॥ मन मुरडे आटे । तंव मार्गीं राम भेटे । मागें पुढें प्रगटे । रामाचि अवघा ॥ ८ ॥ दाही दिशा अवलोकितां । रामचि भासे तत्त्वतां । वदन चुकवूं जातां । सन्मुख राम ॥ ९ ॥ राम झालिया सन्मुख । कल्पांतीं नव्हे विन्मुख । नेत्र झांकितां अधिक । रामचि दिसे ॥ १० ॥ मग विसरोनि पाहिलें । तंव तें रामचि झालें । जीव सर्वस्वें वेधिले । संपूर्ण रामें ॥ ११ ॥ मग आपणा पाहे । तंव रामचि झाला आहे । उभयसाक्षी जो राहे । तोचि राम ॥ १२ ॥ रामेंविण सर्वथा कांहीं । अणुमात्र रितें नाहीं । दृश्य द्रष्टा दर्शन तेंही । रामचि भासे ॥ १३ ॥ प्रपंच सारिला मानसें । दृढ लागलें रामपिसें । देह वर्ते भ्रमिष्ट जैसें । पिशाचवत् ॥ १४ ॥ रामरूपीं वेधलें मन । तेणें राहे कुलाभिमान । पूर्व दशेचें लक्षण । पालटोनि गेलें ॥ १५ ॥ धरूनि रामरूपीं आवडी । प्रपंच गेला ताडातोडीं । माया राहे बापुडी । न चले कांहीं ॥ १६ ॥ प्रत्यक्ष जन प्रगटला । दृश्य पदार्थ बोधिला । असतच नाहींसा झाला । सद्गुरुप्रतापें ॥ १७ ॥ ऐसें नाहीं हेंगे तेंगे । ऐसें तैसें पुढें मागें । पूर्वस्थिति बोलणें लागे । ऐसिया परी ॥ १८ ॥ स्वरूप बोलिलें नव जाये । बोलिल्यावीण हातां नये । म्हणोनि शब्द उपाये । रचिला देवें ॥ १९ ॥ शब्दाचे उदरीं अगाध । सांठवला नीतिबोध । अर्थ पहातां स्वानंद । तुंबळे बळें ॥ २० ॥ शब्दमथन शब्दें केलें । अर्थ नवनीत प्रगटलें । मथनकर्त्यासी भक्षिलें । त्या नवनीतें ॥ २१ ॥ प्रपंचतक्राअंतरीं । नवनीत वास्तव्य करी । तक्र आटोनि पात्रभरी । नवनीत झालें ॥ २२ ॥ अवघें नवनीत दाटलें । तेणें बळें पात्र फुटलें । नवनीतें संपूर्ण झालें । ब्रह्मांड अवघें ॥ २३ ॥ तेथेंहि दाटलें उदंड । तेणें उतटलें ब्रह्मांड । सकळ लोपोनि उदंड । तेंचि तें झालें ॥ २४ ॥ नवनीत प्राप्त व्हावयासी । जातां तयासि तेंचि ग्रासी । सकळ पदार्थमात्रासी । नवनीतें सेविलें ॥ २५ ॥ सेविलें आपणा आपण । हे अनुभवाची खूण । ग्रंथ झाला संपूर्ण । पंचसमासी ॥ २६ ॥ सद्गुरूसी जातां शरण । शीघ्र तुटे जन्ममरण । सर्व मनोरथ पूर्ण । होती वचनमात्रें ॥ २७ ॥ देह नासे क्षणांतरीं । जाणोनि सार्थक करी । तो एक धन्य

---

१ खरोखर. २ लोणी. ३ प्रपंचरूपी ताकामध्यें, ४ पुष्कळ. ५ फाटलें.

संसारीं। सत्संगेंचि ॥ २८ ॥ उपजला प्राणी तो नासे। आपणा तो मार्ग असे। ह्मणोनि दृढ विश्वासें। सद्गुरुपाय धरावे ॥ २९ ॥ चालवीत असतां आश्रम। जे होइजे आत्माराम। ऐसा हा सत्समागम। महिमा कोटिगुणें ॥ ३० ॥ श्रोतीं सावध होणें। अंतकाळीं लागे जाणें। येथील राहाती सजणें। आणि संपत्ती ॥ ३१ ॥ बहु जन्मांचे शेवटीं। नरदेह पुण्यकोटी। ह्मणोनि भगवंता भेटी। होती सत्संगें ॥ ३२ ॥ ऐशी खूण सकळांस। सांगोनि गेला रामदास। सत्संगें जगदीश। नेमें भेटे ॥ ३३ ॥ अरुख बोबडी वाणी। भावें पूजिला कोदंडपाणी। न्यून पूर्ण संतजनीं। क्षमा केली पाहिजे ॥ ३४ ॥ पंचसमासी ग्रंथ संपूर्ण ॥

## जनस्वभाव-गोसावी.

श्रीराम समर्थ ॥ ॥ अनीती अविवेकी अन्यायी। अभक्त अधम लंडाई। वेदशास्त्र करील काई। तया मूर्खासी ॥ १ ॥ कर्माच्या ठायीं अनादर। नाहीं सगुण साक्षात्कार। ज्ञान पाहतां अंधार। निश्चय नाहीं ॥ २ ॥ उग्याच गोष्टी ऐकिल्या। मना आल्या त्या धरिल्या। रत्नें सोडून एकवटिल्या। शुभा[1] जैशा ॥ ३ ॥ फाल्गुनमासींचा खेळ। जैसा अवघा बाष्कळ। तेथें पाहोनि निर्मळ। काय घ्यावें ॥ ४ ॥ प्रत्ययेंज्ञानेंविण। करी अ-नुमानाचा शीण। शत्रु आपणासी आपण। होऊन राहे ॥ ५ ॥ त्यासी कोणें उमजावें। मानेल तिकडे न्यावें। आंधळें गुरूं स्वभावें। धांवे चहूंकडे ॥ ६ ॥ जिकडे तिकडे ज्ञान झालें। उदंड गोसावी उठले। तयांचे संगती झाले। बाष्कळ प्राणी ॥ ७ ॥ भ्रष्ट ओंगळ अनाचारी। कुकर्मी अनुपकारी। विचार नाहीं अविचारी। जेथें तेथें ॥ ८ ॥ गर्भांधा कैंची परीक्षा। दीक्षाहीनासि दीक्षा। प्रमाण मानी प्रत्यक्षा। विवेकहीन ॥ ९ ॥ कशापासून काय झालें। ब्रह्मांड कोणें निर्मिलें। कांहीं न कळतां भुंकलें। गा-ढव जैसें ॥ १० ॥ जें वेदशास्त्रीं मिळेना। अध्यात्म कांहीं कळेना। माजला बोका आकळेना। रेडा जैसा ॥ ११ ॥ कोण दीक्षा आहे कैसी। अविवेक स्थिती ऐशी। न पहातां वसवसी। श्वान जैसें ॥ १२ ॥ ऐसे प्रकारींचे जन। चित्तीं अवघा अनुमान। प्रतीतीविण ज्ञान। उगेंच बोले ॥ १३ ॥ लक्षण नेणे अवलक्षण। भाग्य नेणे करंट-पण। ज्ञान नेणे अज्ञान। परम अन्यायी ॥ १४ ॥ एक उपदेश घेती। देवतार्चन टा-कून देती। धर्मनीति बुडविती। महापापांडी ॥ १५ ॥ ह्मणती आमुचा गुरु। तयाचा अगाध विचारु। तेथें अवघा एकंकारु। भेद नाहीं ॥ १६ ॥ एक ह्मणती गुरु आमुचा। करी अंगीकार विष्ठेचा। तयासारिखा दुजा कैंचा। भूमंडळीं ॥ १७ ॥ एक ह्मणती एकचि तो। अखंड ओक वर्पितो। बरें वाईट पाहे तो। गोसावी कैंचा ॥ १८ ॥ अंगीकार करी सौख्याचा। तो गोसावी कशाचा। पाहा गोसावी आमुचा। गुहाईत लोळे ॥ १९ ॥ वोक नरक आणि मूत। निःशंक घटघटा घेत। लोकांमध्यें मोठा महंत। तया ह्मणावें ॥ २० ॥ वोंगळपणाची स्थिती। स्वयें ओंगळ करीती। शुचिष्मंत महापंडितीं। मा-निजेना ॥ २१ ॥ बरें जैसें जैसें मानलें। तैसें तैसें घेतलें। येथें आमुचें काय गेलें।

---

१ धनुर्धारी. २ हरामपणा. ३ शेणी. ४ अनुभवज्ञानावांचून. ५ मदोन्मत्त झाले, फुगले.

होईना कां ॥ २२ ॥ एक ह्मणती अर्गळा । भूताळा आणि देवताळा । जनांमध्यें आग्या वेताळा । चेतऊं जाणे ॥ २३ ॥ ह्मणती आमचा गुरू । जाणे चेटकाचा विचारू । भूतें घालून संहारू । समर्थ असे ॥ २४ ॥ ह्मणती आमुच्या घरीं । मोठी विद्या पंचाक्षरी । चेडे चेटकी नानापरी । लोकांमध्यें ॥ २५ ॥ अखंड राहे स्मशानीं । सटवी मेसको मायराणी । नाना कुजंत्रें येथुनी । शिकोनि जावीं ॥ २६ ॥ एक ह्मणती गोसावी । गारुड्यास वेड लावी । त्याचे सर्पची पळवी । चहूंकडे ॥ २७ ॥ कुसळी विद्या दृष्टिबंधन । तत्काळ सभामोहन । उच्चाटन आणि खिळण । मोहनी विद्या ॥ २८ ॥ आमुचे गोसावी महायोगी । औषधें देती जगालागीं । नपुंसक वनिता भोगी । चमत्कारें ॥ २९ ॥ आमुचे गोसावी संक्षेपें । अखंड करिती सोनें रुपें । अंजन साधन त्यापें । काय उणें ॥ ३० ॥ मोठा बडिवार गुरूचा । विंचू उतरी ठाईंचा । तैसाचि उतार सर्पाचा । ठाईंचा होय ॥ ३१ ॥ जंबुक मुसके खिळवी । चोरटीं करावीं वोणवीं । अखंड भूतें राबवावीं । नानाजिनसीं ॥ ३२ ॥ आमुचा गुरु गुप्त होतो । दुजे दिवशीं उमटतो । अचेतन चालवितो । मोठा ज्ञानी ॥ ३३ ॥ व्याघ्रावरी निःशंक । हातीं सर्पाचा चाबूक । वांचले होतें सहस्र एक । सामर्थ्यबळें ॥ ३४ ॥ दांत पडोनि निघाले । पांढरे केश काळे झाले । किती आले आणि गेले । गोसाव्या देखतां ॥ ३५ ॥ धारबंद नजरबंद । नाना घुटके कामबंद । पारे मोहरे नाना बंद । नाना प्रकारें ॥ ३६ ॥ अग्नीमध्यें परी जळेना । लोकांमध्यें परी कळेना । देखतां देखतां अस्माना । वेंघून जाय ॥ ३७ ॥ जाणे दुसऱ्याचे जीवींचें । वांझपण फेडिलें वांझेचें । मन विघडी दंपत्याचें । एकही करी ॥ ३८ ॥ त्याचें मोठें नवल कीं गा । मृत्तिकेच्या करी लवंगा । ब्राह्मण समंध अंगा । आणून दावी ॥ ३९ ॥ मातीची साखर केवळ । ढेंकळाचा करी गूळ । धोत्र्याच्या बोंडांचीं केवळ । वाळकें करी ॥ ४० ॥ श्वास कोंडी दिशा कोंडी । पाडी तिडकेनें मुरकुंडी । धडा माणसाची मान वांकडी । करून मोडी ॥ ४१ ॥ ऐशापरीच्या करामती । भोंपळे पोटांत चढविती । मनुष्याचे पशु करिती । निमिषमात्रें ॥ ४२ ॥ गुरु भविष्य सांगती । रेड्याकरवीं वेद ह्मणविती । गधड्याकरवीं पुराणें सांगविती । सामर्थ्यबळें ॥ ४३ ॥ कुतऱ्याकरवीं रागोद्धार । कोंबड्याकरवीं तत्त्वविचार । खेचर आणि भूचर । सकळ बाधी ॥ ४४ ॥ घुटका घटकेनें करावा । फुटका कवडा वेचों न द्यावा । उदंड बचनाग साधावा । एकाएकीं ॥ ४५ ॥ वाळलीं काष्ठें हिरवाळलीं । आंधळीं डोळसें झालीं । पांगुळें धांवों लागलीं । चहूंकडे ॥ ४६ ॥ गर्भिणीस कन्या कीं पुत्र । हें ठाऊकें आहे यंत्र । गोसाव्यांनीं विद्या मात्र । अभ्यासिली ॥ ४७ ॥ भांडविद्या अभ्यासिली । तस्करविद्या कळों आली । विचारें पाहिली । वसुंधरा ॥ ४८ ॥ आमुचा गुरु अधिक गुणें । डोईचें करी रांधणें । लोकांचें नवस पुरविणें । नाना प्रकारें ॥ ४९ ॥ मेले प्राणी उठविले । साकरेचें मीठ केलें । गटगटा अग्नीस गिळिलें । काय सांगों ॥ ५० ॥ गोसावी समाधीस बैसला । दुसरे वेळ उघडून पाहिला । पूर्वेचा पश्चिमेस गेला । अकस्मात ॥ ५१ ॥ लिंगाचे तुकडे तोडिती । कोटिलिंगें एकचि करिती ।

---

१ स्त्री. २ प्रयत्नानें ३ कोल्हे. ४ आकाशाला. ५ आलिंगून. ६ क्षणांत. ७ पृथ्वी.

मोजवून दाळी चारिती । पाषाणनंदी ॥ ५२ ॥ आसन घातलें जळावरी । पाहातां तों पैलतीरीं । आमुचा गुरु समुद्रावरी । चालत जातो ॥ ५३ ॥ पुरुषाची करी वनिता । वनितेचा पुरुष मागुता । अन्न खाऊन तत्त्वतां । दिशा नाहीं ॥ ५४ ॥ नानाजिनसी अन्न खाणें । परी उदक नाहीं घेणें । शापूनि भस्माचि करणें । ऐसा गुरु ॥ ५५ ॥ अन्न उदंडेंचि खाणें । किंवा उपवास करणें । गोमुखतोंडें जेवणें । यथासांग ॥ ५६ ॥ गुरु वाघासी भेटला । वाघें चरचरा चाटिला । वस्त्रें बांधोनि आणिला । घरास वाघ ॥ ५७ ॥ गोसावी वाघ होतो । दुसऱ्या वाघासि मारितो । भुंकभुंकोंचि मरतो । उतार नाहीं ॥ ५८ ॥ साधी बाळंतिणीची खापरी । वोहरें साधी नानापरी । तूप घे घागरीच्या घागरी । गुरु आमुचा ॥ ५९ ॥ मेल्या माशा उठविती । तुळसी देवावरी पाडिती । ऐशा नाना करामती । भूमंडळीं ॥ ६० ॥ आमुच्या गुरूची मोठी महंती । नाना अभक्ष भक्षिती । लोकांदेखतां फुलें करिती । मद्यमांसाचीं ॥ ६१ ॥ एक गोसावी पृथ्वीवरी । त्याची कोणी न पंवे सरी । जेथें बैसे तेथें वोहरी । सावकाश करी ॥ ६२ ॥ एक गोसावी महा भला । पोरीं वाळवंटीं पुरिला । एक तो पडोनिच राहिला । कित्येक दिवस ॥ ६३ ॥ एक गोसावी भाग्य देती । एक गोसावी पुत्र देती । गोसाव्यानें नवस चालती । नानाप्रकारें ॥ ६४ ॥[१] जें जें मनामध्यें चिंतावें । तें तें गोसाव्यांनीं जाणावें । चुकलें ठेवणें काढून द्यावें । नानाप्रकारें ॥ ६५ ॥ खडक्यामध्यें लाह्या भाजिती । थोड्या द्रव्याचें उदंड करिती । पराचीं खत्रें नाचविती । नानाप्रकारें ॥ ६६ ॥ हरपलें सांपडून द्यावें । चोरटें तात्काळ धरावें । थोडें अन्न पुरवावें । बहुत जनांसी ॥ ६७ ॥ ऐसें वर्ततें लोकीं । येणें सार्थक नव्हे कीं । अध्यात्मविद्या[६] विवेकीं । जाणिजेते ॥ ६८ ॥ पिंडज्ञान तत्त्वज्ञान । आत्मज्ञान ब्रह्मज्ञान । पिंडब्रह्मांड सकळ शोधून । राहिले जे ॥ ६९ ॥ पदार्थज्ञानाचा बडिवार । त्याहून थोर ईश्वर । ऐसें प्राणी लहान थोर । सकळ जाणिती ॥ ७० ॥ इति श्रीजनस्वभाव गोसावी ग्रंथ संपूर्ण ॥

दशक ४, दासबोध याचें श्रवण, मनन, निरूपण भोजनोत्तर करावें. नंतर सायंसंध्येचे पूर्वीं किंवा मग श्रीहनुमद्दर्शन घेऊन श्रीसमर्थकृत भीमरूपी स्तोत्र ह्मणत अकरा प्रदक्षिणा घालाव्या. नंतर आरती ह्मणावी.

## ॥ भीमरूपीस्तोत्र—अनुष्टुप् छंद ॥

॥ श्री ॥ भीमरूपी महारुद्रा वज्रहनुमान मारुती । वनारी अंजनीसूता रामदूता प्रभंजना ॥ १ ॥ महाबली प्राणदाता सकळां उठवी बळें । सौख्यकारी शोकहर्ता धूर्त वैष्णवगायका ॥ २ ॥ दीननाथा हरीरूपा सुंदरा जगदंतरा । पातालदेवताहंता भव्य सिंदूरलेपना ॥ ३ ॥ लोकनाथा जगन्नाथा प्राणनाथा पुरातना । पुण्यवंता पुण्यशीला पावना परितोषका ॥ ४ ॥ ध्वजांगें उचली बाहो आवेशें लोटला पुढें । कालाग्नि कालरुद्राग्नि देखतां कांपती भयें ॥ ५ ॥ ब्रह्मांड माईलें नेणों आंवळे दंतपंगती । नेत्राग्नी

---

१ स्त्री. २ खरोखर ३ शौचविधी. ४ बहुत. ५ तुलना पावत नाहीं. ६ वे दांतविद्या. ७ शरीरज्ञान ८ मोठेपणा. ९ रावणाच्या वनाचा शत्रु—मोडणारा.

घालिल्या ज्वाळा भृकुटी त्राटिल्या बळें ॥ ६ ॥ पुच्छ तें मुर्डिलें माथां किरीटी कुंडलें वरी । सुवर्णकटि कांसोटी घंटा किंकिणि नागरा ॥ ७ ॥ ठकारें पर्वताऐसा नेटका सडपातळू । चपळांग पाहतां मोठें महाविद्युल्लतेपरी ॥ ८ ॥ कोटिच्या कोटि उड्डाणें झेंपावे उत्तरेकडे । मंदरासारिखा द्रोणू क्रोधें उत्पाटिला बळें ॥ ९ ॥ आणिला मागुता नेला गेला आला मनोगतीं । मनासि टाकिलें मागें गतीसी तुळणा नसे ॥ १० ॥ अणुपासून ब्रह्मांडाएवढा होत जातसे । तयासि तुळणा कैंची ब्रह्मांडीं पाहतां नसे ॥ ११ ॥ ब्रह्मांडाभोंवतें वेढे वज्रपुच्छें घालूं शके । तयासि तुळणा कैंची मेरुमंदर धाकुटे ॥ १२ ॥ आरक्त देखिलें डोळां गिळिलें सूर्यमंडळा । वाढतां वाढतां वाढे भेदिलें शून्यमंडळा ॥ १३ ॥ भूतप्रेतसमंधादि रोग व्याधि समस्तही । नासती तूटती चिंता आनंदें भीमदर्शनें ॥ १४ ॥ हे धरा पंधरा श्लोकीं लाभली शोभली भली । दृढ देहो निसंदेहो संख्याचंद्रकळागुणें ॥ १५ ॥ रामदासीं अग्रगण्यू कपिकुळासि मंडणू । रामरूपीं अंतरात्मा दर्शनें दोष नासती ॥ १६ ॥ इति श्रीसद्गुरुरामदासविरचितं भीमरूपी स्तोत्रं संपूर्णम् ॥

## आरती.

कोटीच्याकोटी गगनीं उडाला । अचपळ चंचळ द्रोणाचळ घेवोनि आला । आला गेला आला कामा बहुतांला । वानरकटका चुटका लाउनिया गेला । जयदेव जयदेव जयजय बलभीमा । आरति ओवाळूं सुंदर गुणसीमा । जयदेव जय० ॥ १ ॥ उत्कट बळ तें तुंबळ खळबळली सेना । चळवळ करितां त्याशीं तुळना दीसेना । उदंड कीर्ती तेथें मन हें बसेना । दास ह्मणे नकळे मोठा कीं साना । जयदेव जयदेव० ॥ २ ॥

नंतर अकरा नमस्कार घालून दहा अवतारांचीं दहा नांवें व महारुद्रहनुमते नमः असें ह्मणावें व नंतर करुणाष्टकें ह्मणावीं.

## करुणाष्टकें.

॥ १ ॥ अनुदिनिं अनुतापें तापलों रामराया । परम दिनदयाळा नीरसी मोहमाया । अचपळ मन माझें नावरे आवरीतां । तुजविण शिण होतो धांव रे धांव आतां ॥ १ ॥ भजनरहित रामा सर्वही जन्म गेला । स्वजनजनधनाचा व्यर्थ म्यां स्वार्थ केला । रघुपति मति माझी आपलीसी करावी । सकळ त्यजुनि भावें कास तुझी धरावी ॥ २ ॥ विषयजनितसूखें सूख होणार नाहीं । तुजविण रघुनाथा वोखटें सर्व कांहीं । रघुकुळटिळका रे हीत माझें करावें । दुरित दुरि हरावें स्वस्वरूपीं भरावें ॥ ३ ॥ तनु मन धन माझें राघवा रूप तूझें । तुजविण मज वाटे सर्व संसार ओझें । प्रचलित न करावी सर्वथा बुद्धि माझी । अचळ भजनलीला लागली आस तूझी ॥ ४ ॥ चपळपण मनाचें मोडितां मोडवेना । सकळस्वजनमाया तोडितां तोडवेना । घडि घडि विघडे

१ सुंदर. २ उपटून काढला. ३ अलंकार. ४ प्रत्येक दिवशीं. ५ पश्चात्तापानें. ६ वाईट. ७ शरीर.

हा निश्चयो अंतरींचा । ह्मणवुनि करुणा हे बोलतों दीनवाचा ॥ ५ ॥ जळत हृदय माझें जन्म कोट्यानुकोटी । मजवरि करुणेचा राघवा पूर लोटी । तळमळ निववी रे राम कारुण्यसिंधू[1] । षड्रिपुकुळ माझें तोडिं यांचा समंधू ॥ ६ ॥ तुजविण करुणा हे कोण जाणेल माझी । शिणत शिणत पोटीं पाहिली वाट तूझी । झडकरि झड घाली धांव पंचननारे[2] । तुजविण मज नेती जंबुकी वासना रे ॥ ७ ॥ सबळ जनक माझा राम लावण्यपेटी । ह्मणवुनि मज पोटीं लागली आस मोठी । दिवस गाणित बोटीं ठेवुनि प्राण कंठीं । अवचट मज भेटी होत घालीन मीठी ॥ ८ ॥ जननिजनकमाया लेंकरूं काय जाणे । पय न लगत मूखीं हाणितां वत्स नेणे । जलधरकण आशा लागली चातकासी । हिमकर अवलोकी पक्षिया भूमिवासी ॥ ९ ॥ तुजविण मज तैस जाहलें रामराया । विलग विषमकाळीं सांडिती सर्व माया । सकळजनसखा तूं स्वामि आणीक नाहीं । विषय वमन जैसें त्यागिलें सर्व कांहीं ॥ १० ॥ स्वजनजनधनाचा कोण संतोष आहे । रघुपतिविण आतां चित्त कोठें न राहे । जिवलग जिव घेती प्रेत सांडून जाती । विषय सकळ नेती मागुता जन्म देती ॥ ११ ॥ सकळ जन भवाचे आखिले वैभवाचे । जिवलग मज कैंचे चालतें हेंचि साचें । विलग विषमकाळीं सांडिती सर्व माळी । रघुविर सुखदाता सोडवी अंतकाळीं ॥ १२ ॥ सुख सुख ह्मणतां हें दुःख ठाकोनि आलें । भजन सकळ गेलें चित्त दुश्चीत झालें । भ्रमित मन कळेना हीत तें आकळेना । परम कठिण देहो देहबुद्धी गळेना ॥ १३ ॥ उपरति मज रामीं जाहली पूर्ण कामीं । सकळजनविरामीं राम विश्रामधामीं । घडि घडि मन आतां रामरूपीं भरावें । रघुकुळटिळका रे आपुलेंसें करावें ॥ १४ ॥ जळचर जळवासी नेणती त्या जळासी । निशिदिनिं तुजपासीं चूकलों गुणराशी । भूमिधरनिगमांसी[3] वर्णवेना तयांसी । सकळभुवनवासी भेटि दे रामदासीं ॥१५॥ जयजय रघुवीर समर्थ ॥

॥ २ ॥ असंख्यात ते भक्त होऊन गेले । तिहीं साधनांचे बहु कष्ट केले । नव्हे कार्यकर्ता भुमीभार झालों । तुझा दास मी व्यर्थ जन्मासि आलों ॥ १ ॥ बहु दास ते तापसी तीर्थवासी । गिरीकंदरीं भेटि नाहीं जनासी । स्थिती ऐकतां थोर विस्मीत झालों । तुझा दा० ॥ २ ॥ सदा प्रेमळासी तया भेटलासी । तुझ्या दर्शनें स्पर्शनें पुण्यराशी । अहंतामदें शब्दज्ञानें बुडालों । तुझा दा० ॥ ३ ॥ तुझ्या प्रीतिचे दास निर्माण झाले । असंख्यात ते कीर्ति बोलोनि गेले । बहु धारणा थोर चकीत झालों । तुझा दा० ॥ ४ ॥ बहूसाल देवालयें हाटकांचीं[4] । रसाळा कळा लाघवें नाटकाचीं । पुजा देखतां जाड जीवीं गळालों । तुझा दा० ॥ ५ ॥ कितीएक देहे त्यागिले तूजलागीं । पुढें जाहलों संगतीचा विभागी । देहेदुःख होतांच वेगीं पळालों । तुझा दा० ॥ ६ ॥ किती योगमूर्ती किती पुण्यमूर्ती । किती धर्मसंस्थापना अन्नशांती । पस्तावलों कावलों तप्त झालों । तुझा दा० ॥ ७ ॥ सदा सर्वदा राम सोडोनि कामीं । समर्था तुझे दास आह्मी निकामी । बहु स्वार्थबुद्धी नुरे कष्टवीलों । तुझा दा० ॥ ८ ॥ जयजय रघुवीर स० ॥

---

१ करुणेच्या सागरा. २ सिंहा. ३ शेष व वेद यांस. ४ सोन्याचीं.

॥ ३ ॥ नसे भक्ति ना ध्यान ना ज्ञान कांहीं । नसे प्रेम हें राम विश्रामं नाहीं । असा दीन अज्ञान मी दास तुझा । समर्था जनीं घेतला भार माझा ॥ १ ॥ रघूनायका जन्मजन्मांतरींचा । अहंभाव छेदोनि टाकी दिनाचा । जनीं बोलती दास या राघवाचा । परी अंतरीं लेश नाहीं तयाचा ॥ २ ॥ रघूनायका दीन हातीं धरावें । अहंभाव छेदोनियां उद्धरावें । अगूणीत यालागिं गूणी करावें । समर्थे भवसागरीं उतरावें ॥ ३ ॥ किती भार घालूं रघूनायकाला । मजकारणें शीण होईल त्याला । दिनानाथ हा संकटीं धाव घाली । तयाचेनि हे सर्व काया निवाली ॥ ४ ॥ मला कायसा राम कैवल्यदाता । तयाचेनि हे फीटली सर्व चिंता । समर्था तया काय उत्तीर्ण व्हावें । सदा सर्वदा नाम वाचें वदावें ॥ ५ ॥ दिनाचें उणें दीसतां लाज कोणा । जनीं दास दीसे तुझा दैन्यवाणा । शिरीं स्वामि तूं राम पूर्णप्रतापी । तुझा दास पाहे सदा शीघ्रकोपी ॥ ६ ॥ जयजय रघुवीर समर्थ ॥

॥ ४ ॥ उदासीन हे वृत्ति जीवीं धरावी । अती आदरें सर्व सेवा करावी । सदा प्रीति लागो तुझे गूण गातां । रघूनायका मागणें हेंचि आतां ॥ १ ॥ तुझें रूपडें लोचनीं म्यां पहावें । तुझे गूण गातां मनेंशी रमावें । उठो आवडी भक्तिपंथेंचि जातां । रघूनाय० ॥ २ ॥ मनीं वासना भक्ति तूझी करावी । कृपाळूपणें राघवें पूरवावी । वसावें मदीयांतरीं नाम घेतां । रघूनाय० ॥ ३ ॥ सदा सर्वदा योग तूझा घडावा । तुझे कारणीं देह माझा पडावा । उपेक्षूं नको गूणवंता अनंता । रघूनाय० ॥ ४ ॥ नको द्रव्य दारा नको येरझारा । नको मानसीं ज्ञानगर्वे फुगारा । सगूणीं मला लावि रे भक्तिपंथा । रघूनाय० ॥ ५ ॥ भवें तापलों प्रीतिछाया करावी । कृपासागरें सर्व चिंता हरावी । मला संकटीं सोडवावें समर्था । रघूनाय० ॥ ६ ॥ मनीं कामना कल्पना ते नसावी । कुबुद्धी कुडी वासना नीरसावी । नको संशयो तोडि संसारवेथा । रघूनाय० ॥ ७ ॥ समर्थापुढें काय मागों कळेना । दुराशा मनीं बैसली हे ढळेना । फुटे संशयी नीरसी सर्व चिंता । रघूनाय० ॥ ८ ॥ ब्रिदाकारणें दीन हातीं धरावें । ह्मणे दास भक्तांसि रे उद्धरावें । सुटे ब्रीद आह्मांसि सोडोनि जातां ॥ रघूनाय० ॥ ९ ॥ जयजय रघु० ॥

॥ ५ ॥ युक्ति नाहीं बुद्धि नाहीं विद्या नाहीं विवंचितां । नेणता भक्त मी तूझा बुद्धि दे रघुनायका ॥ १ ॥ बोलतां चालतां येना कार्यभाग कळेचिना । बहु मी पीडिलों लोकीं बुद्धि दे रघुनायका ॥ २ ॥ तुझा मी टोणपा झालों कष्टलों बहुतां परी । सौख्य तें पाहतां नाहीं बुद्धि दे रघुनायका ॥ ३ ॥ नेटकें लिहितां येना वाचितां चूकतों सदा । अर्थ तो सांगतां येना बुद्धि दे रघुनायका ॥ ४ ॥ प्रसंग वेळ तर्केना सुचेना दीर्घसूचना । मैत्रिकी राखितां येना बुद्धि दे रघुनायका ॥ ५ ॥ संसार नेटका नाहीं उद्वेग वाटतो जिवीं । परमार्थ हा कळेना कीं बुद्धि दे रघुनायका ॥ ६ ॥ उदास वाटतें जीवीं आतां जावें कुणीकडे । तूं भक्तवत्सला देवा बुद्धि दे रघुनायका ॥ ७ ॥ कायावाचामनोभावें तुझा मी ह्मणवीतसें । हे लाज तुजला माझी बुद्धि दे रघुनायका ॥ ८ ॥ मुक्त केल्या देवकोटि भूभार फेडिला बळें । भक्तासि आश्रयो मोठा बुद्धि दे रघुनायका ॥ ९ ॥ उदंड भक्त

---

१ विसांवा. २ संसारसमुद्रामधून. ३ मोक्षसुख देणारा. ४ स्त्री. ५ दूर करावी. ६ बाणा असल्यामुळें.

तुह्माला आह्मांला कोण पूसतें । ब्रीद हें राखणें आधीं बुद्धि दे रघुनायका ॥ १० ॥ उदंड ऐकिली कीर्ती पतीतपावना प्रभो । मी एक रंक निर्बुद्धी बुद्धि दे रघुनायका ॥ ११ ॥ आशा हे लागली मोठी दयाळूत्रा दया करी । आणखी न लगे कांहीं बुद्धि दे रघुनायका ॥ १२ ॥ रामदास ह्मणे माझा संसार तुज लागला । संशयो वाटतो पोटीं बुद्धि दे रघुनायका ॥ १३ ॥ जय जय रघुवीर समर्थ ॥

॥ ६ ॥ समाधान साधूजनाचेनि योगें । परी मागुतें दुःख झालें वियोगें । घडीनें घडी शीण अत्यंत वाटे । उदासीन हा काळ कोठें न कंठे ॥ १ ॥ घरें सुंदरें सौख्य नानापरींचें । परी कोण जाणेल तें अंतरींचें । मनीं आठवीतांचि तो कंठ दाटे । उदा० ॥ २ ॥ बळें लावितां चित्त कोठें जडेना । समाधान तें कांहिं केल्या पडेना । नव्हे धीर डोळां सदा नीर[१] लोटे । उदा० ॥ ३ ॥ अवस्था मनीं लागली काय सांगूं । गुणीं गुंतलों हेत कोणासि सांगूं । बहूसाल भेटावया प्राण फूटे । उदा० ॥ ४ ॥ कृपाळूपणें भेटरे रामराया । वियोगें तुझ्या सर्व व्याकूळ काया । जनांमाजि लौकीक हाही न सूटे । उदा० ॥ ५ ॥ अहारे विधी हें असें काय केलें । पराधीनता पाप माझें उदेलें । बहूतांमध्यें तूकतां[३] तूक तूटे । उदा० ॥ ६ ॥ समर्था मनीं सांडि माझी नसावी । सदा सर्वदा भक्तचिंता असावी । घडेना तुझा योग हा प्राप्त कोठें । उदा० ॥ ७ ॥ अखंडीत हे सांग सेवा घडावी । न होतां तुझी भेट काया पडावी । दिसेंदीस आयुष्य हें व्यर्थ लोटे । उदा० ॥ ८ ॥ भजों काय सर्वा परी हीन देवा । करूं काय रे सर्व माझाचि ठेवा । ह्मणों काय मी कर्मरेखा न लोटे । उदा० ॥ ९ ॥ ह्मणे दास मी वास पाहें दयाळा । रघूनायका भक्तपाळा भुपाळा । पहावें तुला हें जिवीं आर्त मोठें । उदा० ॥ १० ॥ जयजय रघुवीर समर्थ ॥

॥ ७ ॥ उदासीन हा काळ जातो गमेना । सदा सर्वदा थोर चिंता शमेना । उठे मानसीं सर्व सोडोनि जावें । रघूनायका काय कैसें करावें ॥ १ ॥ जना बोलतां बोलतां वीट वाटे । नसे अंतरीं सूख कोठें न कंठे । घडीनें घडी चित्त कीतीं धरावें । रघूनाय० ॥ २ ॥ बहू पाहतां अंतरीं कोंड होतो । शरीरास तो हेत सांडोनि जातो । उपाधीस देखोनि वाटे सरावें । रघूनाय० ॥ ३ ॥ अवस्था मनीं होय नानापरींची । किती काय सांगूं गती अंतरींची । विवेकेंचि या मानसा आवरावें । रघूनायका० ॥ ४ ॥ ह्मणे दास ऊदास झालों दयाळा । जनीं व्यर्थ संसार हा वायचाळा । तुझा मी तुला पूसतों प्रीय भावें । रघूनायका० ॥ ५ ॥ जय जय रघुवीर समर्थ ॥

॥ ८ ॥ तुझिया वियोगें जीवत्व आलें । शरीरयोगें बहु दुःख झालें । अज्ञान दारिद्र्य माझें सरेना । तुजवीण रामा मज कंठवेना ॥ १ ॥ परत्रीं[६] जिणें दीन कंटूं किती रे । उदास माझ्या मनिं वाटतें रे । ललाटरेखा तरि पालटेना । तुजवी० ॥ २ ॥ जडली उपाधी अभिमान साधी । विवेक नाहीं बहुसाल बाधी । तुझिया वियोगें पळही गमेना । तुजवी० ॥ ३ ॥ विश्रांति नाहीं अभिमान देहीं । कुळाभिमानें पडलों प्रवाहीं । स्वहीत होतां मजला दिसेना । तुजवी० ॥ ४ ॥ विषयी जनानें मज लाजवीलें । प्रपंचसंगें आयुष्य गेलें ।

---

१ उदक. २ चिंता. ३ तुलना केली असतां. ४ नवल. ५ आवड. ६ परलोकामध्यें.

समर्थी बहु क्रोध शांती भरेना । तुजवी० ॥ ५ ॥ संसारसंगें बहु पिडलों रे । कारुण्यसिंधू मज सोडवी रे । कृपाकटाक्षें सांभाळि दीना । तुजवी० ॥ ६ ॥ सदृढ झाली देहबुद्धि पाही । वैराग्य कांहीं हें नांव नाहीं । अपूर्ण कामीं मन हें विटेना । तुजवी० ॥ ७ ॥ निरूपणीं हे सद्बुद्धि होती । फलत्याग होतां सर्वेचि जाती । काय करूं रे क्रिया घडेना । तुजवी० ॥८॥ जयजय दयाळा त्रैलोक्यपाळा । भवसिंधुहारी मज तारि हेळां । स्वामीवियोगें पळही गमेना । तुजवी० ॥ ९ ॥ आह्मां अनाथां तूं एक दाता । संसारचिंता चुकवी समर्था । दासा मनीं आठव वीसरेना । तुजवी० ॥ १० ॥ जयजय रघुवीर समर्थ ॥

## सवाया.

तुझा भाट मी वर्णितों रामराया । सदा सर्वदा गाय श्रीदें सवाया । महाराज दे अंगिचें वस्त्र आतां । बहु जीर्ण झाली देहबुद्धिकंथा[1] ॥ १ ॥

॥ सवाई ॥ १ ॥ रामदूत वायुसुत भीमगर्भ उत्पती । जो नरांत वानरांत भक्ति प्रेम विरप ती । दास दक्ष स्वामिपक्ष नीजकाजसारथी । वीरजोर शीरजोर धक्कधिंग मारुती । ह्मणावा जयजयराम ॥

॥ सवाई ॥ मारुतीची ॥ जब हनुमंत जनकदुहिता शुद्ध लेनेकू गभार दौर दौर आये है । तब कंठ गुरगुरगुरीत नेत्र गरगरगरीत रोम थरथरथरीत पुच्छ झारे ! तब लंका घरघरघरीत बनमो दरदरदरीत सीता शोक हरत झरझरझरीत बन उफारे ।तब कंठ कुचकुचकुचीत इंद्रजीत चकचकचकीत रावण थकथकथकीत कर नगर ज्यार ज्यार मखमखमखीत दास लियो जयतु राम मिले तब कपि भुःभुःकारे ॥ १ ॥ ह्मणावा जयजयराम ॥

॥ जोहार ॥ १ ॥ परमसुंदररूप श्यामल । इंद्रनीलकीलकांतिकोमल । भयनिवारण भक्तवत्सल । वरपराक्रम कीर्तिविमल । भुवनकंटकदैत्यमारक । अमरमोचक[3] । दैन्यहारक । दुरितनाशक[4] पुण्यकारक । हरित संकट दासतारक । विकटविषतालछेदक । वरनखर दैत्यभेदक । दशमुखादिकशिरच्छेदक । ऋषिजनमुनिचित्तवेधक । अमरभूषण उत्तमोत्तम । भुवनपालक हा रघूत्तम । वीर वीरांतक हा वीरोत्तम । असुरांतक हा सुरोत्तम । बहुतपीडकदैत्यभंजन । ऋषिमुनिजनयोगिरंजन । दुरितदानवदुष्टगंजन । अतुलकीर्तिव्यक्तव्यंजन । जयजय मार्तंडवंशावतंस । जयजय कैवल्यधाम । जयजय भरताग्रज । जयजय सीताराम । जयजय सिंहासनाधीश्वर । जयजय सुरराजविराजितपद । नमस्ते नमस्ते । सीताकांतस्मरण जयजयराम ॥

नंतर श्रीची पंचोपचारें पूजा आणि कर्पूरआरती करावी.

## आरत्या.

॥ आरती गणपतीची ॥ सुखकर्ता दुःखहर्ता वार्ता विघ्नाची । नुरवी पुरवी प्रेम कृपा जयाची । सर्वांगीं सुंदर उटि सेंदुराची । कंठीं झळके माळ मुक्ताफळांची । जयदेव० ॥ १ ॥ लंबोदर पीतांबर फणिवरबंधना । सरळशुंड वक्रतुंड त्रिनयना । दास रामाचा वाट पाहे सदनीं[5] । संकटीं पावावें सुरवरवंदना । जयदे० ॥ २ ॥

---

१ देहाभिमान. २ क्षणांत, सत्वर. ३ देवांची मुक्ती करणारा. ४ पापाचा नाश करणारा. ५ घरीं.

॥ आरती रामचंद्राची ॥ साफल्या निजवल्लभ्या कौसल्या माता । भूकन्या अनन्या मुनिमान्या सीता । खेचर वनचर फणिवर भरता निजभ्राता । दशरथ नृपनायक धन्य तो पीता । जयदेव जयदेव जय रघुकुळटिळका । आरती ओवाळूं त्रिभुवननायका । जयदेव जयदेव ॥ १ ॥ आचार्या गुरुवर्या कार्याचें फळ । रविकुळमंडण खंडण संसारमूळ । सुरवर मुनिवर किन्नर[१] ध्याती सकळ । धन्य तो निजदास भक्त प्रेमळ । जयदे० ॥ २ ॥

॥ आरती मारुतीची ॥ सत्राणें उड्डाणें हुंकार वदनीं । करि डळमळ भूमंडळ सिंधूजळ गगनीं । कडाडिलें ब्रह्मांड धोका त्रिभुवनीं । सुरवर नर निशाचर[३] त्यां जाल्या पळणी । जयदेव जयदेव जयजय हनुमंता । तुमचेनि प्रतापें न भिये कृतांता[४] । जयदे० ॥ १ ॥ दुमदुमिलें पाताळ उठला पडशब्द । धगधगिला धरणीवर मानीला खेद । कडाडिले पर्वत उडुगण[५] उच्छेद । रामीं रामदासा शक्तीचा शोध । जयदेव० ॥ २ ॥

॥ आरती गुरूची ॥ सुखसहिता दुःखरहिता निर्मळ एकांता । कलिमलदहना गहना स्वामी समर्था । नकळे ब्रह्मादिकां अंत अनंता । तो तूं आह्मां सुलभ जय कृपावंता । जयदेव जयदेव जय करुणाकरा । आरती ओवाळूं सद्गुरु माहेरा । जय० ॥ १ ॥ मायेविण माहेर विश्रांती ठाव । शब्दीं अर्थलाभ बोलणीं वाव । सद्गुरुप्रसादें सुलभ उपाव । रामीं रामदासा फळला सद्भाव । जय० ॥ २ ॥

॥ आरती श्रीरामसमर्थांची ॥ ब्रह्माविष्णुहरादिक मानसीं ध्याती । सुरवर किन्नर नारिद तुंबर कीर्तनीं गाती । आगम निगम शेष स्तवितां मंदली मती । तो तूं आह्मां पूर्णकाम मानवां प्राप्ती । जयजय आरती श्रीगुरुस्वामी समर्था । दयाळा स्वामी समर्था । काया वाचा जीवें भावें ओंवाळिन आतां ॥ १ ॥ ऋषीश्वर मुनिवर किन्नर देवा तुझे स्थापिले । षडदर्शनी मत्त गुमानी पंथ चालिले । अपरंपरा परात्परा पार न कळे । पतीत प्राणी पदा लागुनी कल्याण झालें । जयजय० ॥ २ ॥

॥ अच्युतं केशवं रामनारायणम् कृष्णदामोदरं वासुदेवं हरिं । श्रीधरं माधवं गोपिकावल्लभं जानकीनायकं रामचंद्रं भजे ॥ १ ॥ हरे राम हरे राम राम राम हरे हरे । हरे कृष्ण हरे कृष्ण कृष्ण कृष्ण हरे हरे ॥ १ ॥ पुंडलीकवरदा हरिविठ्ठल । पार्वतीपते हरहर महादेव । सीताकांतस्मरण जयजय राम ॥

## पदें.

वदन सुहास्य रसाळ हा राघव । सर्वांगीं तनु सुनीळ हा राघव ॥ १ ॥ मृगनाभी[६] रेखिला टीळा हा० । सर्वांगीं सुमनमाळा[६] हा० ॥ २ ॥ साजिरी वैजयंती हा० । पायीं तोडर गर्जती हा० ॥ ३ ॥ सुंदर लावण्यखाणी हा० । उभा कोदंडपाणी[७] हा० ॥ ४ ॥ सकल जीवांचें जीवन हा० । रामदासासी प्रसन्न हा० ॥ ५ ॥

त्रिविधतापहारक[८] हे गुरुपाय । भवसिंधूसी तारक हे गुरुपाय ॥ १ ॥ स्वात्मसुखाचें बीज हे० । ज्ञानाचें निजगुज हे गुरुपाय ॥ २ ॥ भक्तिपंथासी लाविती हे० । नयनीं श्रीरा-

---

१ गंधर्व. २ आकाशांत. ३ राक्षस. ४ यमाला, काळाला. ५ नक्षत्रसमूह. ६ पुष्पांचे हार ७ धनुर्धारी. ८ अधिदैविक, आधिभौतिक व आध्यात्मिक तापांचें हरण करणारे.

म दाविती हे० ॥ ३ ॥ सहज शांतीचें आगर हे गु० । पूर्ण कृपेचे सागर हे० ॥ ४ ॥ रामदासाचें जीवन हे० । सकळ जीवांसि पावन हे गुरुपाय ॥ ५ ॥ सीताकांतस्मरण जय० ॥

नंतर भोजनाचे पूर्वी अथवा मग मनोबोधाचे नित्य १३ श्लोक वाचावे. ( रामदासकृत मनाचे श्लोक प्रकरण पहा. ) नंतर दासबोधाचे दोन समास नित्य वाचावे. निरूपणपूर्वक चाले असल्यास नियम नलगे. महारुद्र हनुमते श्रीसद्गुरु सीतारामाय नमः । गणेशः शारदा चैव सद्गुरुः सज्जनस्तथा । आराध्यदैवतं गुह्यं सर्वं मे रघुनंदनः ॥ १ ॥ गणेश शारदा सद्गुरु । संतसज्जन कुळेश्वरु । सर्वहि माझा रघुवीरु । सद्गुरुरूपें ॥ २ ॥ माझें आराध्यदैवत । परम गुह्य गुह्यातीत । गुह्यपणाची मात । न चले तेथें ॥ ३ ॥

नंतर पंचपदी करावी । सद्गुरूचें ध्यान । ब्रह्मानंदं परमसुखदं केवलं ज्ञानमूर्तिं द्वंद्वातीतं गगनसदृशं तत्त्वमस्यादिलक्ष्यं । एकं नित्यं विमलमचलं सर्वधीसाक्षिभूतं भावातीतं त्रिगुणरहितं सद्गुरुं तं नमामि ॥ १ ॥ नामावळी ॥ विमळ वाचा देरे राम । विमळ करणी देरे राम । प्रसंग ओळखी देरे राम । धूर्तकळा मज देरे० । हितकारक देरे० । जनसुखकारक० । अंतरपारख० । बंधुजनमैत्री ० । विद्यावैभव० । उदासीनता० । मागों नेणें तें० । मज न कळे तें० । तुझी आवडी ० । दास ह्मणे मज० । जयजय० ॥ २ ॥ संगीत गायन देरे राम । आलापगोडी० । धातमात मज० । अनेक धाटी० । रसाळ मुद्रा० । जाड कथा० । हस्तकटाळी० । नृत्यकळा० । प्रबंधसरळी० । शब्द मनोहर० । सावधपण मज० । बहुत पाठांतर० । दास ह्मणे मज० । जयजय० ॥ ३ ॥ पावन भिक्षा० । दीन दया मज० । अभेद भक्ती० । आत्मनिवेदन० । तद्रूपता मज० । अर्थारोहण० । सज्जनसंगति० । अलिप्तपण मज० । ब्रह्मानुभव० । अनन्य सेवा० । मजविण तूं मज० । दास ह्मणे० ॥ ४ ॥ जयजय रघुवीर समर्थ ॥ ॥ रामा हो जय रामा हो । पतीतपावन[२] पूर्णकामा हो ॥ १ ॥ नाथा हो दीनानाथा हो । तुझिये चरणीं राहो माथा हो ॥ २ ॥ बंधू हो दीनबंधू हो । रामदास ह्मणे कृपासिंधू हो ॥ ३ ॥

# अभंग.

॥ १ ॥ राम गावा राम ध्यावा । राम जीवींचा विसावा ॥ १ ॥ कल्याणाचें जें कल्याण । रघुरायाचें गुणगान ॥ २ ॥ मंगळाचें जें मंगळ । राम कौसल्येचा बाळ ॥ ३ ॥ राम कैवल्याचा दानी । रामदासा अभिमानी ॥ ४ ॥

॥ २ ॥ छत्रसुखासनीं अयोध्येचा राजा । नांदतसे माझा मायबाप ॥ १ ॥ माझा मायबाप त्रैलोकीं समर्थ । सर्व मनोरथ पूर्ण करी ॥ २ ॥ पूर्ण प्रतापाचा कैवारी देवांचा । नाथ अनाथांचा स्वामी माझा ॥ ३ ॥ स्वामी माझा राम योगियां विश्राम । सांपडलें वर्म थोर भाग्यें ॥ ४ ॥ थोर भाग्य ज्यांचें राम त्यांचे कुळीं । संकटीं सांभाळी भावबळें ॥ ५ ॥ भावबळें जेणें धरिला अंतरीं । तया क्षणभरी विसंबेना ॥ ६ ॥ विसंबेना कदा आपुल्या दासांसी । रामीं रामदासीं कुळस्वामी ॥ ७ ॥

॥ ३ ॥ रत्नजडित सिंहासन । वरी शोभे रघुनंदन ॥ १ ॥ वामांगीं ते सीताबाई । जगज्जननी माझे आई ॥ २ ॥ पश्चाद्भागीं लक्ष्मण । पुढें अंजनीनंदन[३] ॥ ३ ॥ भरत

१ खाणी. २ पतितांस पवित्र करणाऱ्या. ३ मारुती.

शत्रुघन भाई । चौरे[1] ढाळिती दोन्ही बाहीं ॥ ४ ॥ नळ नीळ जांबुवंत । अंगद सुग्रीव बिभि-षण भक्त ॥ ५ ॥ देहेंबुद्धी[2] नेणों कांहीं । दास अंकित रामापायीं ॥ ६ ॥

॥ भजन ॥ रघुपति राघव राजाराम । पतीतपावन सीताराम ॥

# निरनिराळ्या वारीं ह्मणावयाचीं गीतें.

॥ रविवार ॥ अभंग ॥ धन्य सूर्यवंश पुण्यपरायण । सर्वेही सगूण समुदाव ॥ १ ॥ समुदाव काय सांगूं श्रीरामाचा । अंतरीं कामाचा लेश नाहीं ॥ २ ॥ लेश नाहीं तया बंधू भरतासी । सर्वेहि राज्यासी त्यागियेलें ॥ ३ ॥ त्यागियेलें अन्न केलें उपोषण । धन्य लक्ष्मण ब्रह्मचारी ॥ ४ ॥ ब्रह्मचारी धन्य मारुती सेवक । श्रीरामीं सार्थक जन्म केला ॥ ५ ॥ जन्म केला धन्य वाल्मीक ऋषीनें । धन्य तीं वचनें भविष्याचीं ॥ ६ ॥ भविष्य पाहतां धन्य बिभीषण । राघवीं शरण सर्व भावें ॥ ७ ॥ सर्व भावें सर्व शरण वानर । धन्य ते अवतार विबुधांचे[3] ॥ ८ ॥ विबुधमंडण राम सर्वगुण । अनन्या श-रण रामदास ॥ ९ ॥ ॥ भजन ॥ रामा रामा हो रामा ॥

॥ अभंग ॥ दासाची संपत्ती राम सीतापती । जिवाचा सांगाती राम एक ॥ १ ॥ राम एक माता राम एक पिता । राम एक भ्राता सहोदर ॥ २ ॥ सहोदर विद्या वैभव कांचन । सर्व हा स्वजन राम एक ॥ ३ ॥ राम एक स्वामी राम हा कैवारी । लाभ या संसारीं राम एक ॥ ४ ॥ राम एक ज्ञान राम एक ध्यान । राम समाधान रामदासीं ॥ ५ ॥

॥ भजन ॥ तूं माय मी लेंकरूं । राघवा नको विसरूं रे नको विसरूं ॥

## आरत्या

॥ आरती रामाची ॥ किरीट कुंडलें माळा वीराजे । झळझळ गंडस्थळ घननीळ तनें साजे । घंटा किंकिणि अंबर अभिनव गति साजे । अंदू वांकी तोडर नूपुर ब्रिद गाजे । जयदेव जयदेव जय रघुवीरेशा । आरती निर्जरवर ईशा जगदीशा । जय० ॥ १ ॥ राजिव-लोचन मोचन सुरवर नरनारी । परतर पर अभयंकर शंकरवरधारी । भूषण मंडित उभा त्रिदशकैवारी[5] । दासा मंडण खंडण भवभय अपहारी ॥ २ ॥ जयदेव० ॥

॥ आरती बहिरोबाची ॥ दक्षिणदेशामाजीं भैरव तो देव । क्षेत्रपाळ वंदी लोकत्रय भाव । भक्तासी देखूनि चरणीं दे ठाव । देवाचा तारक भैरव देव । जयदेव जयदेव जय भैरव देवा । सद्भावें आरती करितों मी देवा ॥ जय० ॥ १ ॥ वामांगीं जोगेश्वरि शोभे सुंदर । कासे पीतांबर वाद्यांचा गजर । भक्तासि देखोनि हरि कृपाकर । रामदास चरणीं त्या मागे थार ॥ जयदेव० ॥ २ ॥

॥ आरती खंडोबाची ॥ पंचानन हयवाहन सुरभूषण लीला । खंडामंडित दंडित दानव[6] अवलीळा । मणिमल्ल मर्दूनी धूसर जो पिंवळा । करिं कंकण बाशिंगें सुमनांच्या[7] माळा । जयदेव जयदेव जय जय मल्हारी । वारी दुर्जन वारी निंदक अपहारी ॥ जय०

---

१ चवऱ्या. २ देहाभिमान. ३ देवांचे. ४ शरीर. ५ देवांचा कैवारी. ६ असुर. ७ फुलांच्या.

॥ १ ॥ सुरवर सैंवर दे मज नाना देवा । नाना नामें गाइन घडे तुझी सेवा । अगणित गुण गावया वाटतसे हेवा । फणिवर स्मरला जेथें नर पामर केवा ॥ जय० ॥ २ ॥ रघुवीरस्मरणें शंकर हृदयीं नीवाला । तो हा मदनांतक अवतार झाला । यालागीं आवडीं भावें वर्णिला । रामीं रामदासा जिवलग भेटला ॥ जयदेव० ॥ ३ ॥

॥ आरती कृष्णाची ॥ करुणाकर गुणसागर गिरिवरधर देवें । लीलानाटक वेष धरिला स्वभावें । अगणितगुणलाघव हें कवणा ठावें । व्रजनायक सुखदायक काय वर्णावें । जयदेव जयदेव जय राधारमणा । आरती ओंवाळूं तुज नारायणा ॥ धृ० ॥ जय० ॥ १ ॥ वृंदावन हरिभुवन नूतन तनु शोभे । वक्रांगें श्रीरंगें यमुनातटिं शोभे । मुनिजनमानसहारी जगजीवन ऊभे । रविकुळटीळकदास पदरज त्या लाभे ॥ ज० ॥ २ ॥

॥ आरती केदाराची ॥ जयदेव जयदेव जयजी केदारा । दासा संकट वारा भवभय अपहारा ॥ धृ० ॥ भागीरथिमूळ शीतळ हिमाचळवासी । न लागत पळ दुर्जन खळ संहारी त्यासी । तो हा हिमकेदार करवीरापाशीं । रत्नागिरिवरि शोभे कैवल्यरासी ॥१॥ जयदेव० ॥ उत्तरेचा देव दक्षिणे आला । दक्षिणकेदारसें नाम पावला । रत्नासुर मर्दुनि भक्तां पावला दास ह्मणे थोरा दैवें लाधला ॥ २ ॥ जयदेव० ॥

॥ सोमवार ॥ दंडडमरूमंडित पिनाकपाणी ॥ धृ० ॥ पांच मुखें पंधरा डोळे । गळा साजूक सिसाळें ॥ दंड० ॥ १ ॥ हिमालयाचा जामात । हातीं शोभे सरळ गात । दंड० ॥ २ ॥ मस्तकीं वाहे गंगाजळ । कंठीं शोभे हळाहळ ॥ दंड० ॥ ३ ॥ माथां मोठा जटाभार । अंगीं फुंकती विखार[३] ॥ दंड० ॥४॥ रामीं रामदास स्वामी । चिंतितसे अंतर्यामीं ॥५॥

॥ आरती सांबाची ॥ लवथवती विक्राळा ब्रह्मांडमाळा । विषें कंठ काळा त्रिनेत्रीं ज्वाळा । लावण्य सुंदर मस्तकीं बाळा । तेथूनियां जळ निर्मळ वाहे झुळझुळां । जयदेव जयदेव जय श्रीशंकरा । आरती ओवाळूं तुज विश्वंभरा ॥ जय० ॥ १ ॥ कर्पुरगौर भोळा नयनीं वीशाळा । अर्धांगीं पार्वती सुमनांच्या माळा । भस्माचें उधळण शितिकंठ नीळा । ऐसा शंकर शोभे उभा वेल्हाळा ॥ जय० ॥ व्याघ्रांबर फणिवरधर सुंदर मदनारी । पंचानन मुनिजनमनमोहन सुखकारी । शतकोटीचें बीज वाचें उच्चारी । रविकुळटीळक रामदासा अंतरीं ॥ जय दे० ॥ ३ ॥

॥ मंगळवार ॥ अभंग ॥ सदां आनंदभरीत । रंगसाहित्यसंगीत ॥ १ ॥ जगन्माता जगदीश्वरी । जगजननी जगदुद्धारी ॥ २ ॥ त्रिभुवनींच्या वनिता[४] । बाळ तारुण्य समस्ता । ॥ ३ ॥ वसे आकाशीं पाताळीं । सर्वकाळ तिन्हीकाळीं ॥ ४ ॥ जिच्या वैभवाचे लोक । हरिहर ब्रह्मादिक ॥ ५ ॥ सर्व देहा हालविते ॥ चालविते बोलविते ॥ ६ ॥ मूळमाया विस्तारली । सिद्ध साधकाची बोली ॥ ७ ॥ भक्ति मुक्ति योगस्थिती । आदि अुक्ती सहजस्थिती ॥ ८ ॥ मुळीं राम वरदायिनी । रामदास ध्याता ध्यानीं ॥ ९ ॥

१ शंकर. २ विष. ३ विषसर्प. ४ स्त्रिया.

॥ पद ॥ सुंदर रामाबाई । सबराभरित सर्वांठायीं हो । निगमा पार नाहीं । ते म्यां वर्णावी ते काई हो । सुंदर रामाबाई ॥ ध्रु० ॥ शरयूतीरवासिनी वेधक मुनिमानसमोहिनी हो । सुरवर संजीवनी कैसी शोभत पद्मासनीं हो । उदार एकवचनी दुर्लभ तापसी तपसाधनीं हो । दशरथनृपनंदिनी प्रगटे ऋषिवचनालागुनी हो ॥ सुंदर० ॥ १ ॥ निजमस्तकीं वीरजगुंठी त्रिपुंड्र रेखिला लल्लाटीं हो । सुरेख सदटा भृकुटी तेणें सतेज नासापुटी हो । नव वानर गोमटी श्रवणीं कुंडलांची थाटी हो । लावण्याची पेटी उपमे न पुरे मन्मथकोटी हो ॥ सुंदर० ॥ २ ॥ कटितटीं सोनसळा माजीं सौदामिनीचा मेळा हो । सुवास नाभीकमळा तेणें पडे मधुकरपाळा हो । वामे धरणीबाळा वनितामंडित ते वेल्हाळा हो । चरणस्पर्शें शिळा अहिल्या उद्धरिली अवलीला हो ॥ सुंदर० ॥ ॥ ३ ॥ विशाळ वक्षस्थळीं विराजित उटी चंदन पातळी हो । कंठीं एकावळी माजी कौस्तभमणी झळफळी हो । अधरीं प्रवाळपाळी मध्यें शोभे दंतावळी हो । रसना रसकल्लोळीं वाचा बोलत मंजुळी हो । सुंदर० ॥ ४ ॥ आजानुबाहु सरळ सुनीळ गगनाहुनी कोमळ हो । सुपाणि रम्य स्थळ देखुनि रवितेज सोज्ज्वळ हो । मुद्रिका फांकती कीळ तेणें सतेज ग्रहमंडळ हो । शरकार्मुक सह मेळे शोधित असुर तरुचीं मुळें हो ॥ ५ ॥ चिद्गगनाचा गाभा तैसी सुनीळ अंगप्रभा हो । देखोनि चिद्घनशोभा जैसी कांती चढली नभा हो । रतिनायकवल्लभा देखुनि नागर सांडी दंभा हो । प्रथमारंभ स्तंभाभरणें भूषित शामल शोभा हो ॥ सुंदर० ॥ ६ ॥ भरत बिभीषण पृष्ठीं सवितां गुण मानित उत्कंठीं हो । जोडोनि करसंपुष्टी ध्यानीं मारुतीगानवेष्टी हो । देखुनियां सुखपुष्टी झाली प्रेमरसाची वृष्टी हो । सुख संतुष्टें हर्षें परमेष्टी कोंदे कमळा सृष्टी हो ॥ ७ ॥ नव पंकजलोचनी विस्मित करुणामृतसिंचनी हो । शिवसंकटमोचनी दुर्धर रजनीचरभंजनी हो । भवभयसंकोचनी भक्तां निर्भयपदसूचनी हो । रघुकुळउल्हासिनी भोजें विलसत चंद्राननी हो ॥ ८ ॥ अव्यक्त पार जीचा विचार खुंटे सहा अठरांचा हो । सुकाळ स्वानंदाचा यावा अंतरला दुःखाचा हो । जगदुद्धार मातेचा उत्तीर्ण नव्हे मी हे वाचा हो । रामदासीं भेदतरंग तुटोनि गेला साचा हो ॥ ९ ॥

॥ चाल भुरयाची ॥ ब्रह्मीं माया उदो । त्रिगुण काया उदो । तत्त्वछाया उदो । चारी खाणी उदो ॥१॥ चारी वाणी उदो । अनंत योगी उदो । विद्या बुद्धी उदो । नाना विधी उदो । कारण सिद्धी उदो । आगम निगम उदो । साधन सुगम उदो । ज्ञान संगम उदो ॥ ३ ॥ देवां भक्तां उदो । योगी मुक्तां उदो । अनंत सिद्धां उदो । उदो दासा उदो ॥ ४ ॥

॥ आरती ॥ अजरामर पन्नगधर वैश्वानर भाळीं । रसाळ वदनें विशाळ नयनांजन भाळीं । झळी वेष्टित सुरवर किन्नर ते काळीं । हाटक करुणाटक करुणाकल्लोळीं । जयदेवी जयदेवी जय वेदमाते । आरती ओंवाळूं तुळजे गुणसरिते ॥ जय० ॥ १ ॥ हंसासन जगजीवन मनमोहन माता । पवनाशन चतुरानन थकित गुण गातां । अमृतसंजीवनी अंतसुखसरिता । दासा पालन करितां त्वरिता गुणभरिता ॥ ज० ॥ २ ॥ रामाबाई माझे आई । करुणा तुला येऊं दे ॥

---

१ आंतबाहेर व्यापक. २ मस्तकावर. ३ विजेचा. ४ जिव्हा. ५ सूर्य. ६ धर्मशास्त्र. ७ वेद. ८ अग्नि.

॥ बुधवार ॥ अभंग ॥ येथें उभा कां श्रीरामा । मनमोहन मेघश्यामा ॥ धृ० ॥ काय केली सीताबाई । येथें राही रखुमाई ॥ १ ॥ काय केली अयोध्यापुरी । तेथें वसविली पंढरी ॥ २ ॥ काय केली शरयू गंगा । येथें आणिली चंद्रभागा ॥ ३ ॥ धनुष्य बाण काय केले । कर कटावरि ठेविले ॥ ४ ॥ काय केलें वानरदळ । येथें मिळविले गोपाळ ॥ ५ ॥ रामीं रामदासीं भाव । तैसा होय पंढरिराव ॥ ६ ॥

॥ अभंग ॥ राम कृपाकर विठ्ठल साकार । दोघे निराकार एकरूपें ॥ १ ॥ आम्हचिये घरीं वस्ती निरंतरीं । हृदयीं एकाकारी । राहियेलें ॥ २ ॥ रामदास ह्मणे धरा भक्तिभाव । कृपाळू राघव पांडुरंग ॥ ३ ॥ जयजय पांडुरंग हरी ॥

॥ अभंग ॥ समचरणाचा हाचि भावो । भक्तां दाखवावया ठावो । उभें राहाया अभिप्रावो । भक्त खांद्या घ्यावया ॥ १ ॥ विठोबा हे आम्हची जननी । भीमातीरनिवासिनी । भक्त पुंडलिकालागुनी । वैकुंठींहुनि पातली ॥ २ ॥ श्रीवत्साची हे खूण । तें भक्ताचें कृपादान । आजानुबाहु यालागून । भक्तां आलिंगन द्यावया ॥ ३ ॥ शोभे सुहास्यवदन । नाभी नाभी हें वचन । पूर्ण आकर्णनयन । साधुजन पहाया ॥ ४ ॥ भ्रुकुटीं मयूरपत्रें त्रिवळी । विटे नीट असे ठाकली । रामदासाची माउली । भक्तालागीं उभी असे ॥ ५ ॥

॥ आरती ॥ निर्जरेश्वर स्मरहरधर भीमातिरवासी । पीतांबर जघनीं कर दुस्तर भवनाशी । शरणागत वत्सल पालक भक्तांसी । चाळक गोपीजनमनमोहन सुखरासी । जयदेव जयदेव जय पांडुरंगा । निरसी मम संगा निःसंगा भवभंगा ॥ जय० ॥ १ ॥ अणिमा लघिमा गरिमा नेणति तव महिमा । नीलोत्पलदलविमला वननिलतनु श्यामा । कंटकभंजन साधूरंजन विश्रामा । राघवदासा विगलितकामा निःकामा ॥ जय० ॥ २ ॥

॥ गुरुवार ॥ अभंग ॥ आदिनारायण सद्गुरु आम्हुचा । शिष्य झाला त्याचा महाविष्णू ॥ १ ॥ तयाचा जो शिष्य तो जाणावा हंस । तेणें ब्रह्मयास उपदेशिलें ॥ २ ॥ ब्रह्मदेवें केला उपदेश वसिष्ठा । तेथें धरा निष्ठा शुद्ध भावो ॥३॥ वसिष्ठ उपदेशी श्रीरामरायासी । रामें रामदासीं उपदेशिलें ॥ ४ ॥

॥ अभंग ॥ उपदेश देवोनि दिधला मारुती । स्वयें रघुपती नीरवीता ॥ १ ॥ निरवितां तेणें झालों रामदास । संसारीं उदास ह्मणोनियां ॥ २ ॥ ह्मणोनी आम्हुचे कुळीं कुळदैवत । राम हनुमंत आत्मरूपीं ॥३॥ आत्मरूपीं झाला रामीं रामदास । केला उपदेश दीनोद्धारा ॥४॥

॥ अभंग ॥ भाविका भजना गुरुपरंपरा । सदा जप करा राममंत्र ॥ १ ॥ राममंत्र जाणा त्रयोदशाक्षरी । सर्व वेदशास्त्रीं प्रगटचि ॥ २ ॥ प्रगटचि राममंत्र हा प्रसिद्ध । तारीतसे बद्ध जडजीवां ॥ ३ ॥ जडजीवा तारी सकळ चराचरीं । देह काशीपुरीं येणें मंत्रें ॥ ४ ॥ येणेंमंत्रें जाणा बद्ध तो मुमुक्षु । साधक प्रसिद्ध सिद्ध होय ॥५॥ सिद्ध होय रामतारक जपतां । मुक्ति सायुज्यता रामदासीं ॥ ६ ॥ भजन ॥ नारायण विधि वसिष्ठ राम रामदासकल्याणधाम ॥

१ वानरसैन्य. २ देवश्रेष्ठ. ३ मदनाचा नाश करणारा त्याचें ध्यान करणारा.

॥ पद ॥ श्रीगुरुचें चरणंकंज[1] हृदयीं स्मरावें ॥ धृ० ॥ निगम निखिल साधारण सुलभाहूनी सुलभ बहू । इतर योग याग विषम पंथिं कां शिरावें ॥ १ ॥ नरतनुदृढनावेसी[2] बुडवूनि अति मूढपणें । दुष्ट नष्ट कुकर सूकर तनु कां फिरावें ॥२॥ रामदास विनवी तुज अजुनि तरी समज उमज । विषयवीष पेडनियां फुकट कां मरावें । श्रीगुरु० ॥ ३ ॥

॥ शुक्रवार ॥ अभंग ॥ कांहो राममाये दुरि धरियेलें । कठीण कैसें झालें चित्त तूझें ॥ १ ॥ देऊनि आलिंगन प्रीतिपेंडीभरें[3] । मुख पीतांबरें पुसशील ॥२॥ घेउनि कडिये धरूनि हनुवटी । कई गुजगोष्टी सांगसील ॥ ३ ॥ रामदास ह्मणे केव्हां संबोखिसी । प्रेमपान्हा देशी जननिये ॥ ४ ॥ भजन ॥ येईं धांवत रामाबाई । दासासी दर्शन देईं ॥

॥ पद ॥ येईं हो रामाबाई । माझे येईं हो रामाबाई ॥ धृ० ॥ अनंतरूपें व्यापें दानवदर्पें पूर्णप्रतापें । तव नामें कळिकाळ कांपे ॥ १ ॥ तुझा छंद लागलागे माये निशिदिनिं या जोवासी । तुजविण मी परदेशी ॥ २ ॥ रामीं रामदासीं आराम करणें हेंचि तुला उचित । ह्मणी उपेक्षिसी काय आतां उरला माझा अंत ॥ ३ ॥

॥ पद ॥ लो लो लागला लो । आदिशक्तीचा लागला लो । अंतरिं लो बाहिर लो । जिकडे तिकडे लागला लो ॥ १ ॥ अडंज लो जारज लो । स्वेदज लो उद्भिज लो । देवा लो दानवा लो । सिद्ध साधका लागला लो ॥२॥ दास ह्मणे तोचि जाणे । सद्गुरुवचनीं सुख बाणे ॥ ३ ॥

॥ आरती व्यंकटेशाची ॥ अघहरणी[4] पुष्करणी अगणित गुणखाणी । अगाध महिमा स्तवितां न बोलवे वाणी । अखंड तीर्थावळी अचपळ सुखदानी । अभिनव रचना पाहतां तन्मयता नयनीं ॥ जयदेव जयदेव जय व्यंकटेशा । आरती ओवाळूं स्वामी जगदीशा ॥ जय० ॥ १ ॥ अति कुसुमालय देवालय आलय[5] मोक्षाचें । नानानाटकरचना हाटकवर्णाचें । थकित मानस पहातां स्थळ भगवंताचें । तुळणा नाहीं तें हें भूवैकुंठ साचें ॥ जय० ॥ २ ॥ दिव्यांबरधर सुंदरतनु कोमल नीला । नानारत्नें नाना सुमनांच्या[6] माळा । नानाभूषणमंडित वामांगीं बाळा । नाना वाद्यें मिनला दासांचा मेळा ॥ जय० ॥ ३ ॥

॥ आरती कृष्णेची ॥ सुखसरिते गुणभरिते दुरितें[7] नीवारी । निःसंगा भवभंगा चिद्गंगा तारी । श्रीकृष्णे अवतार जलवेषधारी । जलमय देहें निर्मल साक्षात हरी ॥ जयदेवी जय-देवी जय माये कृष्णे । आलों तुझिया उदरा निरसी मम तृष्णे ॥ जय० ॥ १ ॥ हरिहर सुंदर ओघ ऐक्यासी आले । प्रेमानंदें बोधें[8] मिळणीं मीळाले । ऐशिया संगमीं मिसळोनि गेले । रामदास त्यांचीं वंदी पाऊलें ॥ ज० ॥ २ ॥

॥ शनिवार ॥ ॥ अभंग ॥ बाप माझा ब्रह्मचारी । मातपरी अवघ्या नारी ॥ १ ॥ उपजतां बाळपणीं । गिळूं पाहे वासरमणी ॥ २ ॥ अंगीं सिंदुराची उटी । जया सोन्याची कासोटी ॥ ३ ॥ रामकृपेची साउली । रामदासाची माउली ॥ ४ ॥ भजन ॥ सीताशोक-विनाशनें[9] चंद्रा । जय बलभीमा महारुद्रा ॥

॥ पद ॥ मारुतीचें ॥ मारुती सख्या बलभीमा हो ॥ धृ० ॥ अंजनीचें वचनांजन लेऊनि ।

---

१ चरणकमल. २ मानवी शरीररूपी दृढ नौकेला. ३ प्रीतीच्या आधिक्यानें. ४ पापहारक. ५स्थान. ६ फुलांच्या. ७ पापें. ८ सूर्य. ९ सीतेचा शोक घालविणाऱ्या.

दाखविशी बलसीमारे ॥ १ ॥ वज्रतनु बलभीमपराक्रम । संगीतगायनसीमारे ॥ मा० ॥ २ ॥ दास ह्मणे हो रक्षी आह्मां । त्रिभुवनपालनसीमारे ॥ मा० ॥ ३ ॥ भजन ॥ मारुतिराया बलभीमा । शरण आलों मज या प्रेमा ॥

॥ पद ॥ सामर्थ्याचा गाभा । अहो भीम भयानक[१] उभा । पाहतां सुंदर शोभा । लांचावे मन लोभा ॥ १ ॥ हुंकारे भुभुःकारे । काळ ह्मणे अरे बारे । विघ्न तगेना थारे । धन्य हनुमंतारे ॥ २ ॥ दास ह्मणे वीर गाढा । घसरित घनसर दाढा । अभिनव ह्याचि पवाडा । न दिसे जोडा ॥ ३ ॥

॥ पद ॥ कैंपक्षी भीमराया । निगमांतर विवराया । ब्रह्मानंद वराया । चंचळ मन आदराया ॥ १ ॥ संकट विघ्न हराया । मारकुमार कराया । गुरुपदरेणु धराया । भाविकजन उद्धराया ॥ २ ॥ रघुपतिचा कैवारी । संकट विघ्न निवारि । भजन पूजन मंदवारीं । कल्याण जनहितकारी ॥ ३ ॥ भजन ॥ राम लछुमन जानकी । जय बोलो हनुमानकी॥

आरती मारुतीची ॥ जयदेव जयदेव जय महारुद्रा । आरत भेटीचें दीजे कपींद्रा । जय० ॥ ध्रु० ॥ भीम भयानक रूप अद्‌भुत । वज्रदेही दिसे जैसा पर्वत । टेंकारूनि नेत्रें रोम थरथरित । स्थिरता नाहीं[२] चंचळ झाला उदीत ॥ जय० ॥ १ ॥ हुंकारूनी बळें गगनीं उसळला । अकस्मात जानकीस भेटला । वन विध्वंसूनि अखया मारिला । ततूक्षणें लंकेवरि चौताळिला । जय० ॥ २ ॥ आटोपेना वानर हटवादी धीट । प्रज्वाळिला जाळू पाहे त्रीकूट । मिळोनि रजनीचर[३] करती बोभाट । धडाडिला वन्हीं शिखा तांबट । जय० ॥ ३ ॥ कडकडित ज्वाळा भडका विशाळ । भुभुःकारें करुनी भोंवाडि लांगूळें[४] । थोर हलकल्लोळ पळती सकळ । वोढवला वाटे प्रळयकाळ । जय० ॥ ४ ॥ तृतीय भाग लंका होळी पैं केली । जानकीची शुद्धी श्रीरामा नेली । देखोनी आनंदें सेना गजबजली । रामीं रामदासा निजभेटी झाली ॥ जय० ॥ ५ ॥ ही आरती भजनाच्या आधीं किंवा धुपारतीनंतर ह्मणावी.

॥ अभंग ॥ मुकुट किरीट कुंडलें । तेज रत्नांचें फांकलें ॥ १ ॥ ऐसा राम माझे मनीं । सदा आठवे चिंतनीं ॥ २ ॥ किर्तिमुखें बाहुवटे । दंडीं शोभती गोमटे ॥ ३ ॥ जडितरत्नांचीं भूषणें । दशांगुळीं विरकंकणें ॥ ४ ॥ कासे शोभे सोनेसळा । कटीं सुवर्णमेखळा ॥ ५ ॥ पायीं नपुरांचे मेळे । वांकी गर्जती खळाळें ॥ ६ ॥ राम सर्वांगीं सुंदर । चरणीं ब्रीदाचा तोडर ॥ ७ ॥ सुगंधपरिमळ धूसर । झेपावती मधूकर ॥ ८ ॥ गळां पुष्पांचिया माळा । वामे शोभे भूमीबाळा ॥ ९ ॥ स्वयंभ सुवर्णाची कास[५] । पुढें उभा रामदास ॥ १० ॥

॥ अभंग ज्ञानपर ॥ १ ॥ एक देव आहे खरा । माया नाथिला पसारा ॥ १ ॥ हेंचि विचारें जाणावें । ज्ञान तयासी ह्मणावें ॥ २ ॥ साच ह्मणों तरि हें नासे । मिथ्या ह्मणों तरि हें दिसे ॥ ३ ॥ पाहों जातां आकारलें । मुळीं कांहीं नाहीं झालें ॥ ४ ॥ कैसा देहीं देहातीत । कैसें अनंत अनंत ॥ ५ ॥ रामदासाचें बोलणें । स्वप्नामाजि जाईजेणें ॥ ६ ॥

---

१ भयंकर. २ टिकत नाहीं. ३ राक्षस. ४ शेंपूट. ५ पिंवळा पीतांबर.

॥ अभंग ॥ २ ॥ पूर्वी पाहतां मी कोण । धुंडूं आपणा आपण ॥ १ ॥ स्वयें आपुला उगव । जाणे तोचि महानुभाव ॥ २ ॥ कोण कर्म आचारला । कैसा संसारासी आला ॥ ३ ॥ आले वाटे जो मुरडे । देव तयासी सांपडे ॥ ४ ॥ आली वाट ती कवण । मायेचें जें अधिष्ठान ॥ ५ ॥ रामदासाची उपमा । ग्राम नाहीं कैंची सीमा ॥ ६ ॥

॥ अभंग ॥ ३ ॥ गेला संदेहाचा मळ । तेणें निःसंग निर्मळ ॥ १ ॥ बाह्य गंगाजळस्नान । चित्तशुद्धि ब्रह्मज्ञान ॥ २ ॥ सर्वकाळ कर्मनिष्ठ । सर्वसाक्षित्वें वरिष्ठ ॥ ३ ॥ रामदासीं स्नानसंध्या । सुत करी माता वंध्या ॥ ४ ॥

॥ अभंग ॥ ४ ॥ सृष्टी दृष्टीसी नाणावी । आत्मप्रचीत जाणावी ॥ १ ॥ दृश्यविरहीत देखणें । दृश्य नुरे दृश्यपणें ॥ २ ॥ सृष्टीविगळा निवांत । देवभक्तांचा एकांत ॥ ३ ॥ राम अनुभवा आला । दासा विवाद खुंटला ॥ ४ ॥

॥ अभंग ॥ ५ ॥ आत्मारामाविण रितें । स्थान नाहीं अणुपरतें ॥ १ ॥ पाहतां मन बुद्धि लोचन । रामेंविण नसे आन ॥ २ ॥ संधी नाहीं तीर्थगमना । रामें व्यापिलें भुवना ॥ ३ ॥ रामदासीं तीर्थां भेटी । तीर्थ रामेंहुनी उठी ॥ ४ ॥

॥ अभंग ॥ ६ ॥ रूप रामाचें पाहतां । मग कैंची रे भिन्नता ॥ १ ॥ द्रष्टा दृश्यासी वेगळा । राम जीवींचा जिव्हाळा ॥ २ ॥ वेगळीक पाहतां कांहीं । हें तों मुळींच रे नाहीं ॥ ३ ॥ रामदासीं राम होणें । तेथें कैंचें रे देखणें ॥ ४ ॥

॥ अभंग ॥ ७ ॥ देव जवळी अंतरीं । भेटि नाहीं जन्मवरी ॥ १ ॥ मूर्ती त्रैलोकीं संचली । दृष्टि विश्वाची चुकली ॥ २ ॥ भाग्यें आले संतजन । झालें देवाचें दर्शन ॥ ३ ॥ रामदासीं योग झाला । देहीं देव प्रकटला ॥ ४ ॥

॥ अभंग ॥ ८ ॥ कल्पनेचा देव कल्पनेची पूजा । तेथें कोणी दूजा आढळेना ॥ १ ॥ आढळेना देव आढळेना भक्त । कल्पनेरहित काय आहे ॥ २ ॥ आहे तैसें आहे कल्पना न साहे । दास ह्मणे पाहे अनुभव ॥ ३ ॥

॥ अभंग ॥ ९ ॥ करीं घेतां नये टाकितां न जाये । ऐसें रूप आहे राघवाचें ॥ १ ॥ राघवाचें रूप पाहतां न दिसे । डोळां भरलेंसे सर्वकाळ ॥ २ ॥ सर्वकाळ भेटी कदा नाहीं तूटी । रामदासीं लुटी स्वरूपाची ॥ ३ ॥

॥ अभंग ॥ १० ॥ स्वानुभवाचे पालवें । शून्य गाळिलें आंघवें ॥ १ ॥ सघनीं हरिलें गगन । सहज गगन सघन ॥ २ ॥ शुद्धरूप स्वप्रकाश । अवकाशाविण आकाश ॥ ३ ॥ रामीं रामदास ह्मणे । स्वानुभवाचिये खुणे ॥ ४ ॥

॥ अभंग ॥ ११ ॥ संतलक्षण ॥ पांचां लक्षणीं पूरता । धन्य धन्य तोच ज्ञाता ॥ १ ॥ विवेकवैराग्य सोडिना । कर्ममर्यादा सांडिना ॥ २ ॥ बाह्य बोले शब्दज्ञान । अंतर्यामीं समाधान ॥ ३ ॥ रामीं रामदास कवी । न्यायनीतीनें शीकवी ॥ ४ ॥

---

१ महाश्रेष्ठ. २ स्थान. ३ दुसरें. ४ पाहणारा. ५ सांठविली. ६ पदरानें. ७ सर्व. ८ हृदयांत.

॥ अभंग ॥ १२ ॥ अंतर्यामीं समाधान । बाह्य सगुणभजन ॥ १ ॥ धन्य धन्य तेंचि ज्ञान । अंतर्यामीं समाधान ॥ २ ॥ निरूपणें अंतरत्याग । बाह्य संपादी वैराग्य ॥ ३ ॥ रामीं रामदास ह्मणे । ज्ञान स्वधर्म रक्षणें ॥ ४ ॥

अभंग ॥ १३ ॥ जीवन्मुक्त प्राणी होवोनियां गेले । तेणें पंथें चाले तोचि धन्य ॥ १ ॥ जाणावा तो ज्ञानी पूर्ण समाधानी । निःसंदेह मनीं सर्वकाळ ॥ २ ॥ मिथ्या देहभान प्रारब्धाअधीन । राहे पूर्णपणें समाधानीं ॥ ३ ॥ आवडीनें करी कर्म उपासना । सर्वकाळ मना ध्यानारूढ ॥ ४ ॥ पदार्थाची हानी होतां नये कानीं । जयाची करणी बोलाऐसी ॥५॥ धन्य तेचि दास संसारीं उदास । तयां रामदास नमस्कारी ॥ ६ ॥

॥ अभंग ॥ १४ ॥ भाव धरी संतांपायीं । तेणें देव पडे ठायीं ॥ १ ॥ नाना देवांचें भजन । तेणें नव्हे समाधान ॥ २ ॥ सकळ देवांमध्यें सार । आहे अनंत अपार ॥३॥ रामीं रामदास ह्मणे । अवघे देव केले जेणें ॥ ४ ॥

॥ अभंग ॥ १५ ॥ शरण जावें संतजनां । सत्य मानावें निर्गुणा ॥ १ ॥ नानामतीं काय चाड[1] । करणें सत्याचा नीवाडे[2] ॥ २ ॥ ज्ञानें भक्तीसी जाणावें । भक्त तयासी ह्मणावें ॥ ३ ॥ रामीं रामदास सांगे । सर्वकाळ संतसंगें ॥ ४ ॥

॥ अभंग ॥ १६ ॥ सगुणाकारितां निर्गुण पाविजे । भक्तिविणें दुजें सार नाहीं ॥ १ ॥ साराचें हें सार ज्ञानाचा निर्धार । पाविजे साचार भक्तियोगें ॥ २ ॥ वेदशास्त्रीं अर्थ शोधोनि पाहिला । त्यांहि निर्धारिला भक्तिभाव ॥ ३ ॥ रामीं रामदासीं भक्तिच मानली । मनें वस्ती केली रामपायीं ॥ ४ ॥

॥ वैराग्यपर अभंग ॥ अंतीं एकलेंचि जावें । तरी राघवीं भजावें ॥ १ ॥ माता पिता बंधु जन । कन्या पुत्रही सोडून ॥ २ ॥ जन्मवरी केला भार । सेवीं सांडोनि जोजार[3] ॥३॥ ह्मणे रामीं रामदास । सर्व सोडोनियां आस ॥ ४ ॥

॥ अभंग ॥ २ ॥ काम क्रोध खवळले । मद मत्सर मातले ॥ १ ॥ त्यांचे आधीनची होणें । ऐसें केलें नारायणें ॥ २ ॥ लोभ दंभ अनावर । झाला गर्व अहंकार ॥३॥ दास ह्मणे सांगों किती । पडली ऐशीयांची संगती ॥ ४ ॥

॥ अभंग ॥ ३ ॥ देवें जन्मासि घातलें । नाना सुख दाखविलें ॥ १ ॥ त्यासि कैसें विसरावें । पुढें कैसेनी तरावें ॥ २ ॥ कुळ समूळ सांभाळिलें । नाना प्रकारीं पाळिलें ॥ ३ ॥ दास ह्मणे देवावीण । दुजा सांभाळीतो कोण ॥ ४ ॥

॥ अभंग ॥ ४ ॥ पुढें होणार कळेना । समाधान आकळेना[4] ॥ १ ॥ मना सावधान व्हावें । भजन देवाचें करावें ॥ २ ॥ ऋणानुबंधाचें कारण । कोठें येईल मरण ॥ ३ ॥ रामीं रामदास ह्मणे । भजनें अमरचि होणें ॥ ४ ॥

---

१ गरज. २ निर्णय. ३ खटपट, जंजाळ. ४ प्राप्त होत नाहीं.

॥ करुणापर अभंग ॥ कष्टी झाला जीव केली आठवण । पावलें किरण मारुतीचें ॥ १ ॥ संसारसागरीं आकांत वाटला । भुभुःकार केला मारुतीनें ॥ २ ॥ मज नाहीं कोणी मारुतीवांचूनी । चिंतितां निर्वाणीं उडी घाली ॥ ३ ॥ माझें जिणें माझ्या मारुती लागलें । तेणें माझें केलें समाधान ॥ ४ ॥ उल्हासलें मन पाहातां स्वरूप । दास ह्मणे रूप राघोबाचें ॥ ५ ॥

॥ अभंग ॥ २ ॥ ठकाराचें ठाण करीं चापबाण । माझें ब्रह्मज्ञान ऐसें असे ॥ १ ॥ मुखीं रामनाम जीवीं मेघश्याम । होताहे विश्राम आठवीतां ॥ २ ॥ रामरूपीं देहो झाला निःसंदेहो । माझें मनीं राहो हाचि भावो ॥ ३ ॥ रामदास ह्मणे रामरूपावरी । भावें भक्ती चारी ओवाळीन ॥ ४ ॥

॥ अभंग ॥ ३ ॥ ध्यान लागलें रामाचें । दुःख हरपलें जन्माचें ॥ १ ॥ रामपदांबुजावरी । वृत्ति गुंतेच मधुकरी ॥ २ ॥ रामवदनमयंकीं । चक्षुचकोर झाले सुखी ॥ ३ ॥ तनू मेघश्याम मेळें । चित्तचातक निवाले ॥ ४ ॥ कीर्तिगंधतरूवरी । कुजे कोकिळा वैखरी ॥ ५ ॥ रामीं रामदासस्वामी । चिंतिताहे अंतर्यामीं ॥ ६ ॥

॥ अभंग ॥ ४ ॥ रामा तुझ्या स्वामीपणें । मानीं ब्रह्मांड हें ठेंगणें । तुजवीण कोण जाणे । अंतर आमुचें ॥ १ ॥ तुजवीण मज माया । नाहीं नाहीं रामराया । आह्मां अनाथां कासया । उपेक्षिसी ॥ २ ॥ तुज समुदाय दासांचा । परी आह्मां स्वामी कैंचा । तुजसाठीं जिवलगांचा । संग सोडिला ॥ ३ ॥ सगुण रघुनाथ मुद्दल । माझें हेंचि भांडवल । दासा धरूनि पारपैल । टाकीं या भवाचे ॥ ४ ॥

॥ अभंग ॥ ५ ॥ पतीतपावना । जानकीजिवना । अरविंदनयेना । रामराया ॥ १ ॥ आका गांवा गेली । मज व्यथा झाली । कृपाळा राहेली । नवमी तुझी ॥ २ ॥ आका गांवा जातां । निरविलें समर्था । भाक रघुनाथा । साच करीं ॥ ३ ॥ नवमीचा उत्सव । होऊं द्या बरवा । मग देह राघवा । जाऊं राहूं ॥ ४ ॥ ऐकोनि करुणा । अयोध्येचा राणा । मूर्तीच्या नयना । अश्रु आले ॥ ५ ॥ ऐकोनि वचन । जानकीजीवन । कृपेचें पावन । वेणेवरी ॥ ६ ॥

॥ पद ॥ निदान पहाशी किती । दयाळा निदान पाहासी किती । रामराया निदान० ॥ धृ० ॥ धांव धावगा सीतापती । तुजवेगळी नाहीं गती । नानाशास्त्रें मौनावती । नाम तारक वेद बोलती ॥ १ ॥ जळीं पाषाण तारिले जड । मी काय तुझ्या त्याहूनि जड । आतां पुरवीं जीवींचें कोड । मनीं घेतला विषयीं मोड ॥ २ ॥ तुझ्या भेटीचें आर्त मोठें । मज न गमे कांहीं केल्या कोठें । तुजवांचोनि सर्वही खोटें । दीन बालक तुझें

१ उडी. २ अखेरीला. ३ रामाच्या चरणकमलावर. ४ रामाचे मुखचंद्रीं. ५ कमलनयना. ६ आवडती गोष्ट.

धाकुटें ॥ ३ ॥ वृत्ती जडली पायांपाशीं । जेवीं गुळाशीं गुंतली माशी । देहीं असोनि गुप्त कां होशी । दास उदास देहभावाशीं ॥ ४ ॥

## धांवा.

॥ धांव रे रामराया किती अंत पाहाशी । धांव रे रामराया० ॥ ध्रु० ॥ प्राणांत मांडिलासे नये करुणा कैसी । पाहीन धणिवरी चरण झाडीन केशीं । नयन शीणले बा आतां केधवां येशी । धांव रे० ॥ १ ॥ मीपण अहंकारें अंगीं भरला ताठा । विषयकर्दमींत लाज नाहीं लोळतां । चिळस उपजली ऐसें झालें बा आतां ॥ धांव रे० ॥ २ ॥ मारुतीस्कंधभागीं शीघ्र बैसोनि यावें । राघवें वैद्यराजें कृपाऔषध द्यावें । दयेचे पद्महस्त माझे शिरीं ठेवावे ॥ धांव रे० ॥ ३ ॥ या भेवीं रामदास थोर पावतो व्यथा । कौतुक पाहातोसी काय जानकीकांता । दयाळा दीनबंधु भक्तवत्सला आतां ॥ धांव रे० ॥ ४ ॥

## भजनांचा उपसंहार.

॥ समर्थ निर्याण अभंग ॥ ॥ आज्ञेप्रमाणें परमार्थ । केला जाण त्यां यथार्थ ॥ १ ॥ आतां देहाचा कंटाळा । आला असे जी दयाळा ॥ २ ॥ आतां एकचि मागणें । कृपा करूनियां देणें ॥ ३ ॥ ज्याची दर्शनाची आशा । त्याची पुरवावी इच्छा ॥ ४ ॥ ऐक सखया वचन । त्याशीं देईन दर्शन ॥ ५ ॥ तेरा अक्षरी मंत्राचा । जप करील जो साचा ॥ ६ ॥ गणना होतां तेरा कोटी । त्यासी भेटेल जगजेठी ॥ ७ ॥ भय न धरावें मनीं । बहु बोलिलें ह्मणुनी ॥ ८ ॥ नलगे आसनीं बैसावें । नलगे अन्नही त्यागावें ॥ ९ ॥ येतां जातां धंदा करितां । जप संख्या मात्र होतां ॥ १० ॥ तेरा कोटी गणना तेची । पापें निरसती जन्मांतरिंचीं ॥ ११ ॥ त्यासी देईन दर्शन । तात्काळचि मुक्त होणें ॥ १२ ॥ ऐसा वर होतां जाण । दास झाला सुखसपन्न ॥ १३ ॥

॥ अभंग ॥ २ ॥ उतावेळ चित्त भेटीची आरत । पुरवी मनोरथ मायबापा ॥ १ ॥ रात्रंदिस मज लागलासे सोस । भेटी द्यावी असे उचाट हा ॥ २ ॥ पराधीन जिणें नको करूं रामा । नेई निजधामा आपुलीया ॥ ३ ॥ तुजवीण रामा मज कोण आहे । विचारूनि पाहें मायबापा ॥ ४ ॥ रामीं रामदास बहु निर्बुजेला । मीतूंपणा ठेला बोळवूनी ॥ ५ ॥

॥ अभंग ॥ ३ ॥ माझा देह तुजदेखत पडावा । आवडी हे जीवा फार होती ॥ १ ॥ फार होती परी पुरली पाहतां । चारी देह आतां हारपले ॥ २ ॥ हारपले माझे सत्य चारी देह । आतां निःसंदेह देहातीत ॥ ३ ॥ निःसंदेह झालों देवा देखतांचि । चिंतिलें आतांचि सिद्ध झालें ॥ ४ ॥ सिद्ध झालें माझे मनींचें कल्पिलें । दास ह्मणे आलें प्रत्ययासी ॥ ५ ॥

॥ अभंग ॥ ४ ॥ जन्मोनियां तुज भजों याच बुद्धी । प्राणत्यागसंधी सांभाळिशी ॥ १ ॥ उचित न चुके अचिंत्य श्रीरामा । स्वस्वरूपीं आह्मां ठाव देई ॥ २ ॥ जन्मवरी तूज धरिलें हृदयीं । आतां या समयीं पावे तूं बा ॥ ३ ॥ निष्काम ती तूज सेवायाची आशा । अंतीं रामदासा सांभाळावें ॥ ४ ॥

---

१ विषयरूपी चिखलांत. २ कंटाळा. ३ संसारांत. ४ परलोकीं जाण्याचे वेळचे. ५ घाबरला. ६ अनुभवाला.

॥ अभंग ॥ १ ॥ अपराधी अपराधी । आह्मां नाहीं दृढबुद्धी ॥ १ ॥ माझे अन्याय अगणीत । कोण करील गणीत ॥ २ ॥ मज सर्वस्वें पाळावें । प्रतीतीनें सांभाळावें ॥ ३ ॥ माझी वाईट करणी । रामदास लोटांगणीं ॥ ४ ॥

॥ भजन ॥ सज्जनगडनिवासी माझे रामदास माये ॥ नंतर सर्वांनीं प्रदक्षिणा करून यथाशक्ति करण्याचें भजन ॥ जयजय राम राम राम । सीताराम राम राम ॥

॥ आरती ॥ जयदेव जयदेव आत्मया रामा । निगमागम शोधितां न कळे गुणसीमा ॥ जय० ॥ १ ॥ नानादेहीं देव एक विराजे । नाना नाटकलीला सुंदर रुप साजे । नानातीर्थीं क्षेत्रीं अभिनव गति माजे । अगाध महिमा पिंडब्रह्मांडीं गाजे ॥ ध्रु० ॥ २ ॥ बहुरूपी बहुगूणी बहुता काळाचा । हरिहर ब्रह्मादिक देव सकळांचा । युगानयुगीं आत्माराम आमुचा । दास ह्मणे महिमा न बोलवे वाचा ॥ ३ ॥ जय० कायेन वाचा मनसा इत्यादिपासून जयजयकार केल्यावर महारुद्र हनुमानकी जय ह्मणून बसावें व प्रार्थनेचे श्लोक ह्मणावे तेः—

॥ श्लोक ॥ दुःखानळें मी संतप्त देहीं । तुजविण रामा विश्रांति नाहीं । आधार तुझा बहु मी विदेशी । श्रीरामराया कधिं भेट देशी ॥ १ ॥ प्रारब्ध खोटें अभिमान आला । स्वामी समर्थासि वियोग झाला । तेणें बहु खेद वाटे जिवासी । श्रीरामराया० ॥ २ ॥ तुझिया वियोगें बहु वेदना रे । विवेक नाहीं आह्मां दिनां रे । पडिला समंध या दुर्जनासी । श्रीरामराया० ॥ ३ ॥ संसारचिंता मज वाटती रे । रामा प्रपंचीं मन जातसे रे । संसर्ग आहे इतरां जनांसी । श्रीरामराया० ॥ ४ ॥

। हिनाहूनि मी हीन जैसें भिकारी । दिनाहूनि मी दीन नानाविकारी । पतीतांसि रे आणि हातीं धरावें । समर्था तुझें काय उत्तीर्ण व्हावें ॥ १ ॥ समर्थे दिलें सौख्य नानापरीचें । सदा सर्वदा जाणसी अंतरींचें । लळे पाळिले त्वां कृपाळुस्वभावें । समर्था तुझें काय० ॥ २ ॥ जनीं भक्तिनाहीं मनीं भाव नाहीं । मला युक्तिना बुद्धि कांहींच नाहीं । कृपाळूपणें राज्य रंकासि यावें । समर्था तुझें काय० ॥ ३ ॥ बहुसाल अन्याय कोट्यानकोटी । रघूनायकें घातले सर्व पोटीं । किती काय गूणासि म्यां आठवावें । समर्था तुझें काय० ॥ ४ ॥ दिनानाथ हें ब्रीद त्वां साच केलें । ह्मणे दास भक्तांसि रे उद्धरीलें । सुखें सांडणें या देहाचें करावें । समर्था तुझें० ॥ ५ ॥

॥ पद ॥ अनाथ मी हीन दीन दरिद्री भजन नेणें कांहीं । तुजविण मज या जगीं पाहतां कोणीच नाहीं ॥ १ ॥ ज्ञान कळेना ध्यान कळेना मन वळेना देवा । विद्या नाहीं वैभव नाहीं ऐसा पूर्विल ठेवा ॥ २ ॥ युक्ति असेना बुद्धि असेना शांति वसेना अंगीं । रामदास ह्मणे दयाळा ऐसा मी भवरोगी ॥ ३ ॥

॥ ओवी ॥ हनुमंत आमुची कुळवल्ली । राममंडपीं वेली गेली । श्रीरामभक्तीनें फळली । रामदास बोले ॥ १ ॥ आमुचे कुळीं हनुमंत । हनुमंत आमुचें दैवत । तयावीण आमुचा परमार्थ । सिद्धीतें न पावे कीं ॥ २ ॥ साह्य आह्मांसी हनुमंत । आराध्यदैवत श्रीरघुनाथ । गुरु श्रीराम समर्थ । उणें काय दासासी ॥ ३ ॥ दाता

---

१ वेदशास्त्रें. २ यच्चयावत् शरीरामध्यें. ३ दुःखरूपी अग्नीनें. ४ संबंध. ५ पाप्याला.

एक रघुनंदन । वरकड लंडी देई कोण । हे त्यागोन आह्मी जन । कोणाप्रती मागावें ॥ ४ ॥ ह्मणोनि आह्मी रामदास । रामचरणीं विश्वास । कोसळोनि पडो हें आकाश । आणीकाची वास न पाहूं ॥ ५ ॥ स्वरूपसंप्रदाय अयोध्या मठ । जानकी देवी रघुनाथ दैवत । मारुती उपासना नेमस्त । वाढविला परमार्थ रामदासीं ॥ ६ ॥

॥ अभंग ॥ ध्यान करूं जातां मन हारपलें । सगुण तें झालें गुणातीत ॥ १ ॥ जेथें पाहे तेथें राघोबाचें ठाण । करीं चापबाण शोभतसे ॥ २ ॥ राम माझे मनीं राम माझे ध्यानीं । शोभे सिंव्हासनीं राम माझा ॥ ३ ॥ रामदास ह्मणे विश्रांती मागणें । जीवींचें सांगणें हितगूज ॥ ४ ॥ जयजय रघुवीर समर्थ ॥

॥ आरती ॥ बाळा मुग्धा यौवना प्रौढा सुंदरी । आरत्या घेवोनियां करिं आल्या त्या नारी ॥१॥ श्यामसुंदर रामा चरणकमळीं । ओवाळूं आरती कनकगंगाळीं ॥ २ ॥ चौथी ह्मणती शेजे चला मंदीरा । नव त्या इच्छिति सेवा श्याम सुंदरा ॥ ३ ॥ दास ह्मणे सुमनशेजे चला श्रीहरी । क्षण एक विश्रांती घ्याहो अंतरीं ॥ ४ ॥

॥ अभंग ॥ सकळां तांबूल पुष्पमाळा । भक्तांचा सोहळा पुरविला ॥ १ ॥ धृ० ॥ स्वामी चलाहो निजमंदिरा । रघुवीरा सुखशेजेसी ॥ २ ॥

॥ अभंग ॥ भक्ताभि पालक ब्रह्मांडनायक । श्रीरघुटिळक स्तविती दास ॥ १ ॥ जनकात्मजा अहो रघुराजा । तिष्ठतसे तुझा मार्ग लक्षी ॥२॥ झाली वाढरात्री अहो रघुपती।मार्ग सोडविती बंदीजन ॥ ३ ॥ उठले जगजीवन सिंहासनीहून । वेगीं लिंबलोण ऊतरीलें ॥ ४ ॥

## विडा.

॥ विडा घ्याहो रामराया । महाराज राजया ॥ धृ० ॥ रत्नजडित पानदान । आली जानकी घेवोन । विडा देती करोनियां । दीनबंधू रामराया । विडा घ्या० ॥ १ ॥ सुगंध रंगेरी पानें । मुक्त मोतीयांचा चूना । सुपारी कातगोळया । भक्तिभावें मेळविल्या । विडा घ्या० ॥ २ ॥ जायपत्री जायफळ । विडा जाहला सुफळ । सीता रामालागीं देत । केशरकस्तुरीयुक्त । विडा घ्या० ॥ ३ ॥ सीता राम विडा घेतां । ऐक्यभावें एकात्मता । रंगली ऐक्यरंगीं । रामदास पायांलागीं । विडा घ्या० ॥ ४ ॥

## सेजारती.

॥ आर्ती आरत ऐक्यभावें ओवाळूं । प्रकाश स्वयंज्योती निजतेजें बंबाळूं ॥धृ० ॥ परमात्मा श्रीराम महामाया जानकी । विश्रांति पावली गजर न कीजे सेवकीं ॥ १ ॥ स्नेह ना भाजन नाहीं वाती पावक । सबाह्यांतरीं अवघा निघोट दीपक ॥ २ ॥ ऐक्याचे सुमनसेजें आत्मा रघुपती राजाराम रघुपती । वाचा पारुषली शब्द न बोलवे पुढती॥ ३ ॥ राम आणि दास चैतन्य पहुडले रामीं । हेंही बोलाया दुजा नुरे धामीं ॥ ४ ॥

रामा रामा रामा रामा रघुनंदना रघुनंदना । रामा रामा रामा रामा कुळभूषणा ॥ १ ॥
रामा रामा रामा रामा जानकीपते जानकीपते । रामा रामा रामा रामा विमळमते ॥ २ ॥

---

१ वाट. २ पुष्पांची बिछायत तीवर. ३ जनकाची कन्या सीता. ४ भाट. ५ आंतबाहेर. ६ विश्रांति पावली. ७ शुद्धबुद्धीच्या.

रामा रामा रामा रामा दीनवत्सला भक्तवत्सला । रामदास ह्मणे तुझी अगम्य लीला ।। ३ ।।
रामा रामा रामा रामा रामा हो रामा हो । तारी तारी तारी तारी आह्मां हो ।। ४ ।।
तोडी तोडी तोडी तोडी भवपाश भवपाश । अनन्यशरण रामी रामदास ।। ५ ।।
राम राम राम जप सिताभिराम सिताभिराम । राम राम राम जप सिताभिराम ॥ १ ॥

## श्लोक.

कृपाळूपणें भेटि दे रामराया । वियोगें तुझ्या सर्व व्याकूळ काया । जनामाजि लौकीक हाही न सूटे । उदासीन हा काळ कोठें न कंठे ॥ १ ॥ सदा सर्वदा प्रीति रामीं धरावी । दुःखाची स्वयें सांड जीवीं करावी । देहदुःख तें सूख मानीत जावें । विवेकें सदा स्वस्वरूपीं भजावें ।।२।। सदा चक्रवाकासि मार्तंड जैसा । उडी घालितो संकटीं स्वामि तैसा । हरीभक्तिचा घाव घाली निशाणी । नुपेक्षी कदा रामदासाभिमानी ।।३।। भवाच्या भयें काय भीतोसि लंडी। धरींरे मना धैर्य धाकासि सांडीं । रघूनायकासारिखा स्वामि शीरीं । नुपेक्षी कदा कोपल्या दंडधारी ।। ४ ।। स्वधामासि जातां महाराजराजा । हनुमंत तो ठेविला याचि काजा । सदा सर्वदा रामदासासि पावे । खळें गांजिल्या ध्यान सोडानि धांवे ।। ५ ।। राम राम राम राम सिताराम सिताराम । नंतर ज० ।।

## श्रीरामनवमीची उत्सवपद्धती.

१. पूर्वदिवशीं सर्व तयारी करावी. २ पहांटेस भूपाळ्या झाल्यावर दार उघडावें, तिलकधारण, कांकडआरती हुद्यांसहित, कांकडआरती झाल्यावर सुवासिनींकडून पंचारती करणें. हुद्यांचा तपशीलः–मोरचेलें २, चवऱ्या २, रुमाल २, धनुष्यें २, दिवट्या २, काठ्या २. अबदागिरी २, छत्र १ याप्रमाणें मध्यान्हकालीं, सायंकालीं व कथेचे अंतीं. ३. पूजेचे आरंभीं ध्वज लावावा व उत्साहमूर्ती मारुतीची आणावी व गांवांत नऊ दिवस अक्षत देणें, नैवेद्याचें सामान दररोज रुजू करणें, रांगोळी गालिचा काढणें. ४ नित्य पूजा, रामायण संहिता वाचणें. आरती छबीना, गांवच्या मारुतीस नेणें व प्रदक्षणा तेरा करणें; त्या करते वेळीं आरत्या तेरा ह्मणाव्या त्या १ गणपतीची, २ वेदमातेची, ३ सद्गुरूची, ४ श्रीरामाची, ५ मारुतीची, ६ शंकराची, ७ राधारमणाची, ८ नारायणाची ९ विठोबाची, १० कृष्णेची, ११ त्रिश्वंभरितेची, १२ व्यंकटेशाची, १३ मारुतीची, याप्रमाणें आरत्या करणें. नंतर तीर्थ व पुराण, वसंतपूजा, महानैवेद्य, ब्राह्मणभोजन. ५ सायंकालीं करुणाष्टकें, पंचपदी, सवाया, आरती, छबीना, कौल; मनाचे श्लोक २१ व दासबोध दशक चवथा यांतील एक समास क्रमानें वाचणें. कीर्तन झाल्यानंतर प्रसाद वांटणें, व पुढ मानाचे विडे प्रत्येक दिवशीं वांटणें. ६ जन्मदिवशीं पुराण, पुराण झाल्यानंतर कीर्तनाचा जन्म करावा. ७ दशमीस आरतीच्या पूर्वीं भिक्षा करावी. ८ एकादशीस सूर्योदयीं रथोत्सव नंतर ललित, राज्याभिषेक वर्णन करणें, तीर्थप्रसाद उभें राहून घ्यावा. ९ माघ वद्य नवमीस याप्रमाणेंच पुराण सुंदरकांड, दशमीस रथ. १० हनुमानजयंतीस सूर्योदयीं जन्म व पूजा नैवेद्य गूळ फुटाणे यांचा व महानैवेद्य दहीं वडे यांचा.

---

१ सानेला रमविणारा. २ परब्रह्मस्वरूपीं.

# कौल.

॥ श्लोक ॥ दिली भेटि भ्रतांसि[1] उत्साह गाजे । रघूराज राज्याभिषेकीं विराजे । पहाया सुखें लोक भूपाळ[2] आले । रघूराज आज्ञे[3] महीपाळ गेले ॥ १ ॥ नमस्कार केला सुरेंद्रें महेन्द्रा । प्रभूनें अनुज्ञा दिली देव इंद्रा । पुजामान पावूनी संतुष्ट झाले । सर्व देव तेतीस कोटी मिळाले ॥ २ ॥ तया रावणाचे भयें लोक गेले । सुवर्णाचळाचे[4] दरीं[5] वास केले । पर्थी देखिलें दैन्यवाणें प्रजांशीं । उभा राहिला इंद्र सांगे तयांशीं ॥ ३ ॥ प्रजाही पळाल्या जयाच्या भयानें । तया रावणा मारिलें राघवानें । सुरांच्या[6] बळ फोडिल्या बंदिशाळा[7] । गुढी रामराज्यीं जना सौख्यवेळां ॥ ४ ॥ पटीं बैसला राम कल्याणराजा । दुराही फिरे रे गरीबा नवाजा । अरे लोकहो जाहली एक छत्री । रघूराज राजा विराजे धरित्रीं[8] ॥ ५ ॥ जनाची पिडा पाप संताप गेला । प्रभूराम हा भाग्यसूर्यो उदेला । खडाणा गऊ जाहल्या कामधेनू । वनीं वेलि कल्पतरू काय वानूं ॥ ६ ॥ खडे सर्व चिंतामणी तेचि गोटे । मला देखतां थोर आश्चर्य वाटे । प्रजा हो तुह्मीं शीघ्र आतांचि जावें । समस्तांसि कल्याण राजा पहावें ॥ ७ ॥ तुह्मीं भोगिले कष्ट आरण्यवासीं । तयाचीं फळें प्राप्त झालीं स्वदेशीं । अपेक्षेहुनी आगळें सर्व जें जें । सुखें रामराजीं जना सामरा जें ॥ ८ ॥ महोत्साह उत्साह पाहोनि आलों । अयोध्यापुराहूनि आतां निघालों । समस्तां जनां थोर आनंद झाला । सुरीं मानवीं जयजयोकार केला ॥ ९ ॥ अरे लोक हो क्लेश सांडूनि यारे । रघूराजपादांबुजीं जा पहारे । स्थळा आपुल्या इंद्र सांगोनि गेला । गुरें वासुरें लोक सैरा निघाला ॥ १० ॥ प्रजा कष्टल्या चालिल्या शीण सांगों । अयोध्यादिशा राघवा कौल मागों । गुरें वासरें लेंकरें गर्द झाला । अयोध्यासमीपे बहू लोक आला ॥ ११ ॥ रघूनाथजी सांगती दूतवार्ता । प्रजालोक बाहेर आले समर्था । रघूनायकें सर्वही आणवीले । सभामंडपीं ते असंभाव्य नेले ॥ १२ ॥ प्रभू देखिला जयजयोकार केला । नमस्कार साष्टांग घालूं निघाला । कृपासागरें पाहिलें त्या प्रजांशीं । उठारे उठा राम बोले तयांशीं ॥ १३ ॥ रघूराज सिंहासनीं सौख्यदाता । प्रजा कौल मागावया त्या उदीता । प्रभू बोलिला रे अपेक्षीत मागा । नका हेत ठेवूं समस्तांसि सांगा ॥ १४ ॥ बहू कष्टलों पावलों जी स्वदेशा । प्रजा बोलती कौल दे राघवेशा । भुमीनें कदा पीक सांडूं नयेरे । वदे राम लक्ष्मूमणा हें लिहीं रे ॥ १५ ॥ मनासारिखी मेघवृष्टी न व्हावी । जया पाहिजे ते प्रसंगीं पडावी । समर्था प्रभू रोगराई नको रे । वदे राम लक्ष्मूमणा हें लिहीं रे ॥ १६ ॥ पिकें देखता सर्व चिंता निवाली । असावीं गृहीं संग्रहीं पेंव पालीं । बिजें बीज कोणासि मागूं नये रे । वदे राम लक्ष्मू० ॥ १७ ॥ मनाची अपेक्षा गुरें बैल गाडे । घरीं दूभती कामधेनूच पाडे । रघूनायजी भाग्य यथेष्ट देरे । वदे राम लक्ष्मू० ॥ १८ ॥ मनासारिखीं पुत्रकन्याकलत्रें[10] । अभीवृद्धि वाढो पवित्रें विचित्रें । सखीं पारखीं सोयरीं प्रीति देरे । वदे राम लक्ष्मू० ॥ १९ ॥ कुरूपी विरूपी कदांही नसावें । नको वृद्ध काया तरूणी असावें । दिनानाथजी सर्व सौख्यास देरे । वदे राम लक्ष्मू० ॥ २० ॥ नको दुःख आह्मां नको शोक आह्मां । तुझें राज्य तों मृत्यु नकोचि आह्मां

---

१ भरताला. २ राजे. ३ परवानगी. ४ मेरू पर्वताचे. ५ गुहेमध्यें. ६ देवांच्या. ७ कैदखाने. ८ पृथ्वीवर ९ इच्छित असेल तें १० स्त्रिया.

रघूनाथजी शक्ति ऊदंडे देरे । वदे राम लक्ष्मू० ॥ २१ ॥ ग्रह सर्व रासीं शुभाईक व्हावे । सखे मित्र तैसेचि तेही असावे । दिनानाथजी विघ्नवार्ता नको रे । वदे राम लक्ष्मू० ॥ २२ ॥ सदा वासना धर्मपंथीं असावी । दयाशीळ चातुर्यता श्रेष्ठ द्यावी । समर्था प्रभू पापबुद्धी नको रे । वदे राम लक्ष्मू० ॥ २३ ॥ प्रितीनें प्रजा पाळि रे रामराया । नको दैन्यवाणें करीं दिव्य काया । शरीरीं कदा रोगराई नको रे । वदे राम लक्ष्मू० ॥ २४ ॥ कुडें खोडि कापट्य कांहीं नसावें । सबाह्य[१] शुचिर्धर्मंत तैसें असावें । तुझ्या दर्शना आडकाठी नको रे । वदे राम लक्ष्मू० ॥ २५ ॥ प्रभू क्लेश घेऊनि विश्रांति द्यावी । देहे तोंवरी भक्ति तूझी वडावी । विणी स्वामिणी कौल ऐसाचि देरे । वदे राम लक्ष्मूमणा हें लिहीं रे ॥ २६ ॥

## नवविधाभक्तीचे अभंग.

॥ श्रवणपर ॥ अभंग ॥ ॥ रामनाम कथा गंगा । श्रवणें पावन करी जगा ॥ १ ॥ तिशीं प्रेमपूर आला । शंकरहृदयीं समावला ॥ २ ॥ रामदासाची माउली । आळशावरी गंगा आली ॥ ३ ॥

॥ कीर्तनपर अभंग ॥ धन्य धन्य तें नगर । जेथें कथा निरंतर ॥ १ ॥ गुण गाती भगवंताचे । तेचि मानावे दैवाचे ॥ २ ॥ स्वयें बोले जगजीवन । थोर कलियुगीं कीर्तन ॥३॥ रामदास ह्मणे भले । हरिभक्तीं उद्धरिले ॥ ४ ॥

॥ स्मरणपर अभंग ॥ ॥ रात्रंदिवस मन राघवीं असावें । चिंतन नसावें कांचनाचें ॥ १ ॥ कांचनाचें ध्यान परस्त्रीचिंतन । जन्मासी कारण हींचि दोन्ही ॥ २ ॥ दोन्ही नको धरूं नको निंदा करूं । तेणें हा संसारू तरसील ॥ ३ ॥ तरसील भवसागरीं बुडतां । सत्य या अनंताचेची नामें ॥४॥ नामरूपातीत जाणावा अनंत । दास ह्मणे संतसंग धरा ॥५॥

॥ अर्चनपर अभंग ॥ ॥ पूजा देवाची प्रतिमा । त्याचि नकळे महिमा ॥ १ ॥ देव भक्तांचा विश्राम । त्यासि नेणे तो अधम ॥ २ ॥ नाना स्थानें भूमंडळीं । कोणि सांगावीं आगळीं ॥ ३ ॥ ज्याचे चरणींचे ऊदकें । धन्य होती विश्वलोकें ॥ ४ ॥ याचीं चरित्रें ऐकतां । जनीं होय सार्थकता ॥ ५ ॥ रामीं रामदास ह्मणे । धन्य होईजे स्मरणें ॥ ६ ॥

॥ वंदनपर अभंग ॥ ॥ प्रेमाचिया सन्निधानें । देव आले साभिमानें ॥१॥ आतां आनंद आनंद । देवभक्तां नाहीं भेद ॥ २ ॥ मुख्य पूजापरंपरा । केला दासासि अधिकारा ॥ ३ ॥ दास पाउल वंदितो । पदासन्निध रहातो ॥ ४ ॥

॥ दास्यपर अभंग ॥ ॥ रामदास्य आणि हें वायां जाईल । ऐसें न घडेल कदाकाळीं ॥१॥ कदाकाळीं राम दासा उपेक्षीना । रामउपासना ऐशी आहे ॥ २ ॥ ऐशी आहे सार राघोबाची भक्ती । विभक्तीची शक्ती जेथें नाहीं ॥ ३ ॥ जेथें नाहीं कांहीं वाउगें मायिक । रामउपासक दास ह्मणे ॥ ४ ॥

॥ सख्यपर अभंग ॥ ॥ देव असतां पाठीराखा । त्रैलोक्याचा कोण सखा ॥ १ ॥ नाना उद्योग वाढती । नाना चिंता उद्भवती ॥ २ ॥ स्वस्थ वाटेना अंतरीं । नाना व्यवधान करी ॥ ३ ॥ रामदास ह्मणे भावें । भजन देवाचें करावें ॥ ४ ॥

---

१ बहुत. २ आंतबाहेर. ३ पवित्र. ४ सोन्याचें. ५ संसारसमुद्रामध्यें. ६ विशेष.

॥ आत्मनिवेदनपर अभंग ॥ १ ॥ आत्मनिवेदन नववें भजन । जेणें संतजन समाधानी ॥ १ ॥ समाधानी संत आत्मनिवेदन । ज्ञानें मीतूंपण सांडवलें ॥ २ ॥ सांडवलें सर्व ॥ मायिका संगासी । रामीं रामदासीं निःसंगता ॥ ३ ॥ निःसंगतां झाली विवेकानें केली । मुक्तिहि लाधली सायुज्यता ॥ ४ ॥

## न्हाणी.

न्हाणी न्हाणी रामातें अरुंधती । ऋषिपत्न्या पाहुनि संतोषती । रामलीला सर्वत्र मुनी गाती । स्नान उदक यमुना सरस्वती ॥ १ ॥ ज्याच्या चरणीं कावेरी कृष्णा वेणी । ज्याच्या स्नेहें कपिलादि ऋषी मुनी । त्या रामातें न्हाणिलें प्रीतीकरूनी ॥ २ ॥ ज्याच्या नामें उपदेश विश्वजना[1] । ज्याच्या स्मरणें काळादि करिती करुणा । ज्याच्या प्राप्तीस्तव करिती अनुष्ठानां[2] । त्या रामातें न्हाणूनी फुंकी कर्णा ॥ ३ ॥ रमती योगी स्वरूपीं आत्मराम । निशिदिनीं चरणीं असावा नित्यनेम । त्या रामाचा पाळखं[3] विश्वधाम । दास ह्मणे भक्तींचें देईं प्रेम ॥ ४ ॥ न्हाणी० ॥

## पाळणा.

हळूहळू गाई निजरे बाळा । मोठा जटाधारी गोसावी आला । खरचरभूजा जारे फकीरा । निजला माझा पालखीं हीरा । हळूहळू गा० ॥ १ ॥ नको येउंरे बागुलबावा । निजला माझा पालखीं रावा । सगुण गुणाचें बाळक माझें । कोणी दावा हो यासम ये दूजें । हळूहळू गा० ॥ २ ॥ लागली दृष्टी कोण्या पापिणीची । उतरे प्रभा मुखचंद्राची । हालवी कौसल्या प्रेमपान्हा । दास ह्मणे आला वैकुंठराणा । हळूहळू गा० ॥ ३ ॥

॥ जोजोजोजोरे श्रीरामा । निजसुखगुणविश्रामा । जोजो० ॥ ध्रु० ॥ ध्याती मुनि योगी तुजलागीं । कौसल्या वोसंगीं ॥ १ ॥ जोजो० ॥ वेदशास्त्रांची मति जाण । स्वरूपीं झाला लीन ॥ २ ॥ जोजो० ॥ चारी मुक्तींचा विचार । चरणीं पाहाती थोर ॥ ३ ॥ जोजो० ॥ भोळा शंकर निशिदिनीं । तुजला जपतो मनीं ॥ ४ ॥ जोजो० ॥ दास गातसे पाळणा । राम लक्ष्मण ॥ ५ ॥ जोजो० ॥

# ललीत.

## पदें.

॥ रामा तुज कल्याण मागणें । तुज कल्याण मागणें ॥ ध्रु० ॥ तूं जगजीवन तूं मनमोहन । कोण आहे तुजविणें । रामा० ॥ १ ॥ आह्मी हरिजन तूं जनपावन । बोलती वेदपुराणें । रामा० ॥ २ ॥ देवही आले भक्त मिळाले । आनंदें तुझे गुणें । रामा० ॥ ३ ॥ भक्त सुखी ऋषि सुखी । दास ह्मणे तुझें देणें । रामा० ॥ ४ ॥

॥ जय हो महाराज गरीब नवाज । बंदकमीना कहना के तूं साहेब तेरीही लाज । हो

---

१ विश्वांतील-पृथ्वीवरील-सर्व लोकांना. २ धार्मिक क्रियाकर्म. ३ पाळणा.

महाराज० ॥ १ ॥ मैं सेवक बहु सेवा मागूं । इतना है सब काज । हो महाराज० ॥ २ ॥छत्रपती तुम शेकदार सिव । इतना हमारा अर्ज ॥ महाराज० ॥ ३ ॥

॥ कपि सकळही प्रयाणकाळीं । प्रेमें वोसंडिती दोहीं डोळीं । नित्य आठवे सुखाची नव्हाळी । ह्मणती रामा तुझी सवे लागली । रामा० ॥ १ ॥ जो तूं अगोचर ब्रह्मादिकां । ध्यानीं नातुडसी पंचमुखा । तो तूं आह्मां झालासी निजसखा । प्रेम दिधलें वायुसुता । रामा० ॥ २ ॥ तुझ्या ओळगे सुरांसी न लगे हो ठावो । आह्मी वानरें निकट उभीं राहों । न्याहार धरूनि वदन तुझें पाहों हो । परि धालो नाहीं आमुचा भावो । रामा० ॥ ३ ॥

॥ रामा कृपा बहुत असों देणें । आह्मी धन्य जाहलों तुझे गुणें ॥ ध्रु० ॥ रामा गोड लागती तुझ्या गोष्टी । हर्षे गुदगुल्या होताती पोटीं । जणुं सांपडली चाणियाची मुठी । वाटे धरावी तुझी हनुवटी । रामा० ॥ १ ॥ आलिंगोनी सप्रेमें बोले । तुह्मीं मजलागीं हे कष्ट केले । सुखी करोनि सव गौरविलें । रामदासीं हनुमंत ठेले । रामा० ॥ २ ॥

## श्लोक.

सिंहासनावरि रघूत्तम मध्यभागीं । बंधू तिथे परम सुंदर पृष्ठभागीं । वन्हीसुता निकट शोभत वामभागीं । वीलासतो भिम भयानक पूर्वभागीं ॥ १ ॥ कपी सुग्रिवा अंगदा जांबुवंता । गजा मारुता आणि नैर्ऋत्यनाथा । समस्तांसि सन्मानिलें रामचंद्रें । सुधाउत्तरें तोषवीलें नरेंद्रें ॥ २ ॥ तुरे आणिले घातल्या पुष्पमाळा । कितीएक त्या रत्नमाळा सुढाळा । करीं कंकणें मुद्रिका लेववीलें । यथासांग संपूर्ण सर्वांस दीलें ॥ ३ ॥ अळंकार चीरें बहू सिद्ध केलीं । असंभाव्य दिव्यांबरें आणवीलीं । बहू भूषणांचे बहू ढीग केले । जगन्नायकें ते कपी गौरवीले ॥ ४ ॥ सभामंडपीं फांकल्या रत्नकीळा । समस्तांसि ते जाहली सौख्यवेळा । कितीएक सांगीतल्या कानगोष्टी । महावीर आनंदले सर्व सृष्टीं ॥ ५ ॥ मुखीं बोलिजे वैद्यराजासि देवें । कपी तूज ऊचित म्यां काय द्यावें । वरू दीधला रामचंद्रें उचीतीं । तुझ्या दर्शनें लोक आरोग्य होती ॥ ६ ॥ समस्ताकडे पाहिलें राघवानें । तयांसी रोमांच आले स्फुराणें । नमस्कारिलें स्वामि देवाधिदेवा । ह्मणे राम तो लाभ आतां असावा ॥ ७ ॥ असंभाव्य केली स्तुति राघवाची । वदों लागली मंडळी प्रेमळांची । कपी बोलती सत्य कारुण्यवाचा । स्तुती ऐकतां राम सिंधू सुखाचा ॥ ८ ॥ अजयो नको रे जयवंत हो रे । कापव्यकर्मी सहसा नको रे । निर्वाणचिंता चुकवी अनंता । शरणागता हे बहु घातमाता ॥ ९ ॥ स्मरणीया वयं राम न स्मरामि अहो कपे । स्मरणं चेतसो धर्मः तत् चित्तं हारितं मम ॥ १० ॥

जनीं जाहलीं पूर्ण हे रामनवमी । कृपें तोषला स्वामि हा नित्यनेमीं । यशस्वी दयानंद कल्याणमस्तु । तथास्तु तथास्तु तथास्तु तथास्तु ॥ १ ॥ घडो सर्वदा भक्ति या राघवाची । जळो कामना दुःख चिंता भवाची । यशस्वी दयानंद कल्याणमस्तु । तथास्तु० ॥ २ ॥ सदा सर्वदा चिंतितां देव पावो । सदा वृत्ति दे शुद्ध निःसंग राहो । यशस्वी दयानंद कल्याणमस्तु । तथास्तु० ॥ ३ ॥ विकल्पाचिया मंदिरीं दीप नाहीं । सदा शुद्धसंकल्प देहात्मगेहीं । यशस्वी दयानंद कल्याणमस्तु । तथास्तु० ॥ ४ ॥

---

१ टाकतात. २ सांपडत नाहींस. ३ महादेवाला. ४ मारुतीला. ५ तृप्त झाला. ६ गोड भाषणानें. ७ मोठमोठ्या. ८ वर्खे. ९ रत्नप्रभा. १० संसाराची.

## पद

रघुराजके दरबार घंमडी गाजतुहै ॥ ध्रु० ॥ तथैथैथै पकवाज वापतु है । सुरवर मुनिवर देखण आवतु है ॥ १ ॥ नारद तुंबर किंन्नर[1] सुरवर गावतु है । शंख भेरी सुनके रोंमं[2] थरकतु है ॥ २ ॥ लाल भुसर तवके उडावतु है । रामदास तहां बालि ज्यावतु है ॥ ३ ॥ रघु० ॥ ललित प्रकरण समाप्त ॥

## पदें

॥ १ ॥ कृपाळू रघुवीरें खादलीं भिलटी बोरें । उच्छिष्ट आदरें अंगिकारी रे ॥ ध्रु० ॥ वैभवीं नाहीं चाड[3] । देवातें भावचि गोड । पुरवितो कोड[4] । अनन्याचें रे ॥ १ ॥ दुर्लभ ब्रह्मादिकांसी । सुलभ वानरांसी । काय तयापासीं । भावेंवीण रे ॥२॥ रामीं रामदास ह्मणे । देव हा दयाळूपणें । उठवितो रणें । वानरांचीं रे ॥ ३ ॥

॥ २ ॥ जन्मलाचि नाहीं तो मरेल काई । जीर्ण मरणें दोन्हीं नाहीं रे ॥ ध्रु० ॥ जनीं जीवन्मुक्त वर्ततात हरिभक्त । सद्गुरुबोधें ते अच्यूत रे ॥ १ ॥ जिणें आणि मरणें येणें आणि जाणें । साधू तो अचळ पूर्णपणें रे ॥ २ ॥ सेवितां साधूचे चरण बाधीना दक्षिणायन । रामीं रामदासीं निजखूण रे ॥ ३ ॥

॥ ३ ॥ रघुवीर सुरवरदानीं । भक्तांचा अभिमानी । योगी मुनिजन ध्यानीं । राहाती समाधानीं ॥ ध्रु० ॥ भूषण मंडित माळा । तेजाचा उमाळा । सुंदर सुमनमाळा[5] । भोंवता मधुकरपाळा[6] ॥ १ ॥ पीतवसन घन साजे । मुरडींव वाक वाजे । वर तोडरी ब्रीद गाजे । कीर्ति विशाळचि माजे ॥ २ ॥ अभिनव कार्मुक[7] पाणीं । निगम गाती पुराणीं । विगलित होते वाणी । समजतसे शूळपाणी ॥ ३ ॥ राम सकळ जन पाळी । भक्तांला सांभाळी । जन्ममरण दुःख टाळी । अगणित सौख्य नव्हाळी ॥ ४ ॥ दास ह्मणे मज हित । माझें कुळदैवत । जे जन होती रत । ते सकळहि तरत ॥ ५ ॥

॥ ४ ॥ समर्थाचा गाभा । भीम भयानक उभा । पाहतां सुंदर शोभा । लांचावे मन लोभा ॥ ध्रु० ॥ हुंकारे भुभुःकारे । काळ ह्मणे अरे बारे । विघ्न तगेना थारे[8] । धन्य हनुमंता रे ॥ १ ॥ दास ह्मणे वीर गाढा । घर्षित घनसर दाढा । अभिनव हाचि पवाडा । पाहतां दिसे जोडा ॥ २ ॥

॥ ५ ॥ रावण सीता दडवी । भीम निशाचर बडवी । अघटित तें घडवी । वर रजनीचरें[9] ते रडवी ॥ ध्रु० ॥ जाउनि सीता शोधी । सकळांचा विरोधी । वानर मोठा क्रोधी । त्रिकुटीं जन रोधी ॥ १ ॥ मोठी आली धाडी । पुच्छानें पछाडी । होती ताडातोडी । कंठीं झोडाझोडी ॥ २ ॥ दैत्यीं केले चाळे । सुरवर बंदीशाळे । त्या रागें उफाळे वन्हीचे उबाळे ॥ ३ ॥ बनीं बनें कडकावी । बळकट शिक्षा लावी । भुजाबळें भडकावी । लंकेतें धडकावी ॥ ४ ॥ सीता शोधून गेला । हलकल्लोळ केला । भेटे राघवाला । दास्यत्वें निवाला ॥ ५ ॥

---

१ गंधर्व. २ रोमांच. ३ आवड. ४ कौतुक. ५ पुष्पमाला. ६ भ्रमरसमूह. ७ धनुष्य. ८ टिकत नाहीं. ९ राक्षस.

॥ ६ ॥ एकतालपंचक ॥ वेध लागला रामाचा । सुरवर विश्रामाचा ॥ ध्रु० ॥ तेथें सुरवर नर किंनर विद्याधर गंधर्वांचा मेळा ॥ तेथें न्यूनें कोकिळा मंजुळकिळा । झुळकी रम्य रसाळा ॥ तेथें गायनकळा रंग आगळा । वाहे अमृतवेळा । तो सुखसोहळा । देखुन डोळा । लाचावे मनमेळा ॥ १ ॥ एकताल मृदांगें श्रुतिउपांगें । गाती नवरसरंगें ॥ एकरंग सुरंगें दाविती संगें । सप्तस्वरांचीं अंगें ॥ एक अनेक रागें आलापयोगें । विकट ताल सुधांगें ॥ एक झकिट किटकिट थरिक थरिक । वाजती चपळांगें ॥ २ ॥ तेथें खणखणखणखण टाळ वाजती । झणझणझणझण यंत्रें ॥ तेथें दणदणदणदण मृदंग मंजुळ । तालबद्ध परतंत्र ॥ तेथें चणचणचणचण शब्द बोलती । वाणी चपळ सत्पात्रें ॥ तेथें घणघणघणघण घंटा वाजती । अनुहाते शुळमंत्रें ॥ ३ ॥ तेथें झगझगझगझग झळकति रत्नें । खचित बैसे शोभा ॥ तेथें धगधगधगधग तेज आगळें । लावण्याचा गाभा ॥ तेथें घमघमघमघम सुगंध परिमळ । षटपद येति लोभा ॥ पवनतनुज दासाचे मंडण । निकट राहिला उभा ॥ ४ ॥

॥ ७ ॥ रामा चालेर झडकरी । त्रिभुवन हरुषे भारी ॥ ध्रु० ॥ शरयूनदीतिरीं अयोध्यापुरी । रमणीय रचिली भारी ॥ तीसीं प्रतिमल्ल सरी ऐसीच दुसरी । नाहीं पृथ्वीवरी ॥ ते वैकुंठ मंदिरीं गमन सुंदरीस । त्यामध्यें थोरी ॥ ऐसें जाणोनी श्री कौसल्योदरीं । आनंद सचराचरीं ॥ १ ॥ तेथें ऋषिकूळ सकळ नांदति निर्मळ । उत्साहाचेनि उसळे ॥ तेथें धोमें सोज्वळें झेलिती करतळें विभूतीचे गोळे ॥ ते ध्यानीं नाकळे मना नाढळे । तें रूप पाहती डोळे ॥ आणि क्रूर विशाळें वधिलीं दिसाळें । पावोनि यत्नें फळें ॥ २ ॥ तेथें ब्रह्मनंदिनी श्रापबंधिनी । असतां निजपति व वनीं ॥ ते रामा गमनीं ऐकत क्षणीं । हरुषत अंतःकरणीं ॥ ह्मणे त्या श्री चरणीं होतां मिळणी । पालटेन पाषाणी । ऐसें चिंतुनि दिवसरजनीं । पथा पाहतां लोचनीं ॥ ३ ॥ तेथें सुरवर नाचति वाद्यें वाजती पुष्पें जमुनि वरुषाति ॥ तेथें बंध वातगती नेत दिगंतीं घ्राणा होतसे तृप्ती ॥ तेथें दिशा झळकती सफळ वनस्पती । पद शुभ बोलती ॥ आला ह्मणती राम सीतापती जयजयकारें गर्जती ॥ ४ ॥ तेथें दशरथमानसीं रामश्रवणशशी । तुंबळ सुखसिंधुसी ॥ तेथें जनकसरितेसि मिळणी कैसी । होताहे गजरेंसि ॥ तेथें भक्तचकोरासी आनंद अहर्निशीं । पाहताती उदयासी ॥ ऐसें देखुनी भक्ती नवमीसी । प्रगट रामदासीं ॥ ५ ॥ फरफरफरफर वोढिती कुंजर । धनुष्य आणिलें भूपें ॥ हरहरहरहर अति पण दुष्कर । सुंदर रघुपति रूपें ॥ वरवरवरवर रघुपति वोढित । दशमुख संतापे ॥ करकरकरकर शर करारे । थरथरथरथर भू कंपे ॥ ६ ॥

॥ ८ ॥ रामें सज्जीलें त्रितंड परम प्रचंड । रामें उचलिलें त्र्यंबक कौशिकऋषि पुलकांक ॥ रामें ओढिलें शिवधन सीतेचें तनुमनु । रामें भंगिलें भवचाप अद्वरां सुटला कंप ॥ १ ॥ कडकडकडकड भग्न कडाडे । तडतडतडक फुटे ॥ गडगडगडगड गगन कडाडी । धडधडधड धडक उठे ॥ भडभडभडभड रविरथ चुके । धडधडीत अऱ्हाटे ॥ खडखडखडखड खचित दिग्गज । चाळितकूळाचळ फुटे ॥ २ ॥ दुमदुमदुमदुमदुमित

---

१ गंधर्व. २ विशेष. ३ मारुती. ४ हत्ती. ५ शंकराचें धनुष्य.

भुगोले । स्वर्गमृत्यु पाताळें ॥ धुमधुमधुमधुम धुमकट कर्णी । विधीस बैसले टाळे ॥ हळहळहळहळ अतिकोल्हाळ । हरसी पंचक डोले ॥ खळखळखळखळ उचंबळत । जळसिंधूसी मोहो आंदोळे ॥ ३ ॥ धकधकधकधक धकीत धरणी । धराबधिर झाले नयन ॥ चकचकचकचक चकीत निशाचर । करविलें दीर्घ शयन ॥ थकथकथकथक थकीत सुरवर वरुषती पुष्पें तसे ॥ लखलखलखलखलख रत्नमालिका । जनवकालिक लग्न ॥ ४ ॥ जयजयजयजय जयति रघुराजवीरा गर्जती जयकारें । धिमधिमधिमधिम नृपदेवर्दुंदुभि । गगन गर्जलें गजरें । तरतरतरतरमंगळतुरें विविध वाद्यें सुंदरें । समरसरसरस दासा मानसीं रामसीता वधूवरें ॥ ५ ॥

॥ ९ ॥ रंगीं नाचतो त्रिपुरारी लीलानाटकधारी । मंदरजावर त्रिपुरसुंदर अर्धनारी नटेश्वर । नाचे शंकर झुकळ कळाकर । विश्वासी आधार ॥ ध्रु० ॥ झुळझुळझुळझुळ शिरीं गंगाजळ । झळझळ मुगुटीं किळ । ललललललल ललित कुंडलें । भाळीं इंदुज्वाळ । सळसळसळसळ सळकती रसना । वळवळवळिती व्याळ । हळहळहळहळ कंठीं हळाहळ । गायनस्वर मंजुळ ॥ १ ॥ थबथब थबथब गळती सद्या रुंडमाळिका कंठीं । चपचपचपचप हस्तक लवती । दस्तक धरी धूर्जटी । खडखडखडखड व्याघ्रांबर गजचर्म परवंटी । भडभडभडभडभड धूसर उधळत । चिताभस्म निजउटी ॥ २ ॥ किणिकिणिकिणिकिणिकिणि वाजति किंकिणि । घणघणघण खणाणी । झणझणझणझण वाकी चरणीं । दणदणदण धरणी । खणखणखणखण टाळ उमाळे । रुणुझुणु वेत्रें पाणी । गुणगुणगुणगुण वर्णिति वाणी । खुणखुणखुण निर्वाणीं ॥ ३ ॥ टिमिटिमिटिमिटिमि मृदंग गंभीर । डिमिडिमिडिमिडिमि डिमर । धिमिधिमिधिमिधिमि दुंदुभि गर्जे । झिमिझिमि झिमिझिमि झल्लर । घुमघुमघुमघुम येत्रजगमकत । दुमदुमदुम अंबर । ततथै ततथै धिक्टि धिक्टि । ह्मणती विद्याधर ॥ ४ ॥ थरथरथरथर कंपित गमके । गरगरगरगर भ्रमर । सर सरसरसर कंपित चमके । धुरधुरधुरधुर गंभीर । परपरपरपर ह्मणती सुरवर । हरहर हरहर शंकर । वरवरवरवर दासा दिधला । तरतरतरतर दस्तुर ॥ ५ ॥

॥ १० ॥ आठवे मनीं आठवे मनीं । आठवे मनीं सदा राम चिंतनीं ॥ ध्रु० ॥ मुगुटीं किरीटी । वक्रभृकुटी । रम्य गोमटी । नयनांबुजें ॥ १ ॥ मकरकुंडलें । ठाण दंडलें तेज खंडलें । मेघदामिनी ॥ २ ॥ बाणलीं उटी । कास गोमटी । किंकिणी कटीं । क्षुद्र घंटिका ॥ ३ ॥ पदक मेखळा । फांकती कीळा । रुळती गळा । मुक्तमाळिका ॥ ४ ॥ ते सुलक्षणें । रत्नभूषणें । वीरकंकणें । शोभती करीं ॥ ५ ॥ रम्य रंगलें । चाप चांगलें । सैन्य भंगलें । त्रिकूटाचळीं ॥ ६ ॥ आंदु नेपुरें वांकी गजरे । तीं मनोहरें । पाउलें बरीं ॥ ७ ॥ हृदय कवळी । मूर्ती सांवळी । दास न्याहळी । कुळदैवत ॥ ८ ॥

॥ ११ ॥ नवमी करा नवमी करा । नवमी करा भक्ति नवमी करा ॥ ध्रु० ॥ अष्टमी परी नवमी बरी । तये दुसरी न पवे सरी ॥ १ ॥ राम प्रगटे भेद हा तुटे । अभेद उमटे तेचि नवमी ॥ २ ॥ शीघ्र नवमी येतसे ऊर्मी । रामदास मी आपेली रामीं ॥ ३ ॥

---

१ पृथ्वी. २ राक्षस. ३ नगारे. ४ शंकर. ५ जगताला. ६ मस्तकावर. ७ सर्प. ८ शोभा.

॥ १२ ॥ दीनबंधू रे दीनबंधू रे दीनबंधू रे । राम दयासिंधु रे ॥ धृ० ॥ भिलटीफळें भक्तवत्सलें । सर्व सेविलीं दास प्रेमळें ॥ १ ॥ चरणीं उद्धरी दिव्य सुंदरी । शापबंधनें मुक्त जो करी ॥ २ ॥ वेदगर्भ जो शिव चिंतितो । वानरा रिसा गूज सांगतो ॥ ३ ॥ राघवीबिजे रावणानुजे । करुनि पावला निजराज्य जें ॥ ४ ॥ पंकजाननें दैत्यभंजनें । दास पाळिले विश्वमोहनें ॥ ५ ॥

॥ १३ ॥ मांबुजाननं मांबुजाननं मांबुजाननं मांबु देहि मे ॥ धृ० ॥ योगिरंजनं चापभंजनं । जनकजापतिं विश्वमोहनं ॥ १ ॥ विबुधकारणं शोकहारणं । अरिकुलांतकं भयनिवारणं ॥ २ ॥ जयकृपालयं दासपालयं । चरणपंकजं देहि मे लयं ॥ ३ ॥

॥ १४ ॥ ऐसें ध्यान समान न दिसे राम निरुपमलीळा । सांवळें सुंदर रूप मनोहर शोभति सुमनमाळा ॥ धृ० ॥ मुगुटकिरीटीं कुंडले मंडित गंडस्थळावरी शोभा । केयूरदंड उदंड विभूषण लावण्याचा गाभा ॥ १ ॥ सरळ कुरळ नयन कमळदळश्याम सकोमळ साजे । झळके इंद्रनीळ तळपे रत्नकिळ मुनिजनध्यानीं विराजे ॥ २ ॥ भाळ विशाळ रसाळ विलेपन परिमळ अनिळविलासी । मृगमद केशर धूसर आंगीं हसितवदन सुखरासी ॥ ३ ॥ कटितट वेंकट कासे पीतपट मिरवत उटी सुगंधें । रुळत कल्लोळ सुढाळ माळिका डोलती तेणें छंदें ॥ ४ ॥ जडितपदक वीरकंकण किंकिणी आंदु नेपुर वाजे । सकळ रिपुकुळ निर्मळ ऐसें वांकी तोडर ब्रीद गाजे ॥ ५ ॥ करिं शरचाप विलाप दानवां काळरूप मनिं भासे । दास ह्मणे रणकर्कश रामें अंतक तोही त्रासे ॥ ६ ॥

॥ १५ ॥ मिरासीचा ठाव मिरासीचा ठाव मिरासीचा ठाव धरा रे । जेथुनि आले तिथेंचि जाउनि मागुति वास करा रे ॥ धृ० ॥ अज्ञानदारिद्र्य निरसिलें ज्ञानलक्ष्मीतें कोण पुसे । आपणचि सर्वही अहंकार गोत्रजघातघेषा तेथ नेतसे । एकपद तेथें विपट नाहीं सर्वही सिद्धी विलसे । ऐसी हे मिरासी टाकियेली थोर मस्तकीं अभिमानपिसें ॥ १ ॥ संतसनकादिक नारद तुंबर वृत्ती तेही लक्षिली । नागवे उघडे आपदा भोगुनि जीवेंसीं सदृढ धरिली । वडिलांची जन्ममृत्युभूमी तेही सर्वकाळ यत्न केली । धिगीधिगी तें जिणें पूर्वजांची वृत्ति असोनि हातींची गेली ॥ २ ॥ एकला एकला मी रामदास वृत्तीलागीं होय पिसा । तनु मन धनु सर्वही अर्पुनी सोडिली जीवित्वआशा । निःकामता कोणी पाठीसी नाडले एकाचि थोर कोंवसा । हे वृत्ती रक्षिल माझा राम त्याचा मज भरंवसा ॥ ३ ॥

॥ १६ ॥ आलिया अंगीचि होइजे देव । कोंदाटला ब्रह्मकटाव ॥ धृ० ॥ भवसिंधूचें जळ आटलें । संसाराचें मूळ तुटलें ॥ १ ॥ निजधनाची लाधली ठेवी । रंक पावले राजपदवी ॥२॥ अरे काळाची वेळ चुकली । आनंदाची लुटी फावली ॥ ३ ॥ जे मायेनें जन्म दाविला । ते मायेचा ठाव पुसिला ॥ ४ ॥ रामदासासि राम भेटला । थोर संदेह हा तूटला ॥ ५ ॥

॥ १७ ॥ वेडिया स्वामीच होउनि राहें हे उपाधी तुज न साहे ॥ धृ० ॥ अरे तुझाचि तूं सकळ । तरी वायांचि कां तळमळ ॥ १ ॥ स्वामी सेवकपण हें वाव । अभिमानासी कैंचा ठाव ॥ २ ॥ अमंगळें जाणसी सार्चे । काय भूषण सांगसी त्याचें ॥ ३ ॥ मीपणाचें मूळ तुटावें । आनंदाचें सुख लुटावें ॥४॥ रामदासचि नांव हें फोला । तेथें कायसे लागती बोल ५

१ भिल्लिणीचीं बोरें. ५ कमळपत्राप्रमाणें कृष्ण वर्णाचे. ३ सुगंध. ४ कस्तुरी. ५ असुर.

॥१८॥ देवाची करणी ऐसी ही ॥धृ० पहा दशगुणें आवरणोदकीं । तारियेली धरणी ॥ १ ॥ सुरवर पन्नग निर्मूनियां जग । नांदवी लोक तिन्ही ॥ २ ॥ अंडज जारज स्वेदज उद्भिज । निवडिलीया खाणी ॥३॥ रात्रीं सुधाकर तारा उगवती । दिवसा तो तरणी ॥ ४ ॥ सत्तासूत्रें वर्षत जळधर । पीक पिके धरणीं ॥५॥ आपण तरी क्रिये निज निर्गुण । दासा हृदयभुवनीं॥६॥

॥ १९ ॥ गुरुदातारें दातारें । अभिनव कैसें केलें ॥ धृ० ॥ एकाचि वचनें न बोलत बोलूनि । मानस विलया नलें ॥ १ ॥ भूतसंगें कृतनेश्वर आम्हें । निजबोधें उतरीलें ॥ २ ॥ दास ह्मणे मज मीपणाविरहित । निजपदीं नांदविलें ॥ ३ ॥

॥ २० ॥ भावबळें तरले मानव ॥ धृ० ॥ सारासारविचार विलोकुनि । भव हा निस्तरले ॥ १ ॥ रामनाम निरंतर वाचे । निजपदीं स्थिरले ॥ २ ॥ दास ह्मणे सुख सागर डोहीं । ऐक्यपणें विरालें ॥ ३ ॥

॥ २१ ॥ देह दंडिसी मुंड मुंडिसी । भंड दाविसी नग्न उघडा ॥ धृ० ॥ भस्मलेपनें तृण आसनें । माळभूषण सोंग हें मूढा ॥ १ ॥ अन्नत्याग रे हृदययोग रे फट कायरे हिंडसी वनीं ॥ २ ॥ ऐक सांगतों रामदास तो । ज्ञानयोग रे साधितां बरें ॥ ३ ॥

॥ २२ ॥ हें काय तें काय । योग काय भोग काय ॥ धृ० ॥ बाहेर जटाभार काय अंतरीं संसार काय ॥ १ ॥ बाहेर काषाय दंड काय । आंत अवघें भंड काय ॥ २ ॥ बाहेर सात्विक ध्यान काय । आंत मद्यपान काय ॥३॥ रामदास ह्मणे पाहे । व्यर्थ भगलें करून काय ॥४॥

॥ २३ ॥ मिश्रित सारासार ! अरे निवडी तोचि चतुर ॥ धृ० ॥ ब्रह्मनिरंजन अद्वय सत्य । माया जनपर द्वैत अनित्य ॥ १ ॥ मेळविलें जळ अमृत दोनी । हंस जसा पय घे निवडोनि ॥ २ ॥ पारखीविण खरें निवडेना । मूढ कसें जनहित कळेना ॥ ३ ॥ दास ह्मणे निजकौतुक मोठें । अनुभव बोलती शाब्दिक खोटें ॥ ४ ॥

॥ २४ ॥ पळापळा ब्रह्मपिसा येतो जवळी । रामनामें हाक देउनी डोई कांडोळी ॥ धृ० ॥ वृत्तिसेंडी बंधनेविण सदा मोकळी । संसाराची धुळी करूनि आंगीं उधळी ॥ १ ॥ प्रपंचउकरड्यावरी बैसणें ज्याचें । भोंवता पाळा फिरोनि पाहे जन हे अविद्येचे ॥ २ ॥ धाउनि बैसे उठोनि पळे दृश्य वाटतें । अदृश्य याचें राहणें घेतां नचले कवणाचें ॥ ३ ॥ आउट हात गज नवां ठाईं उतळले । दहावा ठाव ह्मणऊन तेथें ठिगळ दिधलें ॥ ४ ॥ ऐसें मन हें चंचळ निवृत्तीसी गुंतलें । परतूनियां आलें ह्मणऊनि जीवेंचि मारिलें ॥ ५ ॥ मीपणाचें शहाणपण जळालें माझें । कोण वाहे देहबुद्धी वज्रांचें ओझें ॥ ६ ॥ नलगे आह्मां मानअपमानाचें ओझें । तुह्मी शुद्धि घेतां गेलें मीपण माझें ॥ ७ ॥ आह्मी जन धन देखुनि विचार करितों । आपण ऐसे पिसें ह्मणउनि उमज धरितों ॥८॥ अर्थें भेटों येती त्यांस वेड लावितों । रामीं रामदास ऐसें अबद्ध बोलतो ॥९॥

॥ २५ ॥ कल्याणधामा । रामा कल्याणधामा ॥ धृ० ॥ दुःखनिवारण नायक सखा । सुखमूर्ति गुणग्रामा । रामा० ॥१॥ दास उदास करी तव कृपा । अभिनव नामगरिमा । रामा० ॥२॥

---

१ आच्छादनरूपी उदकामध्यें. २ चंद्र. ३ सूर्य. ४ मेघ. ५ खोट्या गोष्टी. ६ दूध. ७ देहाभिमान. ८ कल्याणाचें स्थान अशा.

॥ २६ ॥ तूं येरे रामा । काय वर्णूं महिमा ॥ध्रु०॥ सोडविले देव तेतीस कोटी । तेवीं सोडवी आह्मां ॥ १ ॥ राम लक्ष्मण भरत शत्रुघ्न । पुढें उभा हनुमान ॥ २ ॥ दास ह्मणे भवबंध निवारीं । राम गुणधामा ॥ ३ ॥

॥ २७ ॥ हे राघवा देईं तुझें भजन ॥ ध्रु० ॥ अनुताप त्यावरी भक्तियोग । मानिती हे सज्जन ॥ १ ॥ कीर्तन करावें नामें उद्धरावें । अंतरीं लागो ध्यान ॥२॥ दास ह्मणे मन आत्मनिवेदन[1] । सगुण समाधान ॥ ३ ॥

॥ २८ ॥ नाम मंगळधाम हरीचें हो । संतसज्जना विश्राम ॥ ध्रु० ॥ सकळ धर्म अचळ अर्थकाम । स्मरणें स्वानंदाभिराम ॥ १ ॥ गरळचाळशम शिवमनोरम । दास उदास पूर्णकाम ॥ २ ॥

॥ २९ ॥ संगत साधूची मज जाहली । अक्षय पदवी आली ॥ ध्रु० ॥ सर्व मी सर्वात्मा ऐसी । अंतरीं दृढमती झाली । जागृतीसहित अवस्था तुर्या[2] । स्वरूपीं समूळ विराली ॥१॥ बहुजन्मांची जपतपसंपत्ती । विमळ फळासि आली । मी माझें हे सरली ममता । समुळीं भ्रांतीं निमाली ॥ २ ॥ रामीं अभिन्न दास ऐसी हे जाणीव समूळही गेली । नचळे न ढळे अचळ कृपा हे । श्रीगुरुरायें केली ॥ ३ ॥

॥ ३० ॥ अणुपासूनि जगदाकार । ठाणठकार रघुवीर ॥ ध्रु० ॥ रामाकार जाहली वृत्ती । दृश्यादृश्य न ये हातीं ॥ १ ॥ रामीं हारपलें जग । दास ह्मणे कैंचें मग ॥ २ ॥

॥ ३१ ॥ शतशतकरवंशीं अवतरणा । दशमुखकुळसंहरणा । दशशतवदनाग्रजरूप मदना । दशरथनृपनंदन गुणसदना ॥ ध्रु० ॥ कौसल्यात्मज निजसुखकरणा । कौशिकमखपालन शिवस्मरणा । राजीवलोचन जानकीरमणा । भवचिंताहरणा ॥ १ ॥ निजचरणीं अहल्या-उद्धरणा । भार्गवीरक्षितिपाळाहरमर्दना । वालीकार्मुकधरणा । अंजनिसुतसेवित तव चरणा ॥ २ ॥ दशदिशाव्यापक गुणसगुणा । आत्माराम समस्ताभरणा । जीवकदंबक-पोतसंस्मरणा । रामदास वंदित तव चरणा ॥ ३ ॥

॥ ३२ ॥ रामा विसरावें मग कासया जियावें । स्वहित दुरी तेव्हां दुःख पालवीं घ्यावें । रौरवें[3] कुंभीपाक[4] अहोरात्र भोगावे । तेथवां कोण सोडी धर्म न पडे ठावें ॥ ध्रु० ॥ भजनीं कानकोंडें राम न ह्मणे तोंडें । आदळे दुःख आंगीं भोग भोगितां रडे । कर्तृत्व आपुलेंचि कैसें नाठवे एवढें । देवासी बोल ठेवी केवीं स्वसुख जोडे ॥ १ ॥ विषयीं चित्त गोवी हृदयस्थ नाठवी । कामक्रोधलोभसंगें त्रास नुपजे जीवीं । ममता दुःख परी आपणातें वाहवी[5] । विनवी रामदास भवसागर तरवीं ॥ २ ॥

॥ ३३ ॥ साजिरें हो रामरूप साजिरें हो ॥ ध्रु० ॥ रूप प्रगटलें लावण्य लाजिलें मानसीं बैसलें ॥ १ ॥ सर्वांगें सुंदर ठाण मनोहर । दासाचा आधार ॥ २ ॥

॥ ३४ ॥ देखिला हो राघव देखिला ॥ ध्रु० ॥ रूप रामाचें लावण्य साचें । ध्यान विश्रामाचें ॥ १ ॥ चंचळ मानस वाहे वोस । रामीं रामदास ॥ २ ॥

---

१ देहसमर्पण. २ चवथी अवस्था. ३ रौरव, नरक. ४ कुंभीपाक नांवाचे नरक. ५ वाहे.

॥ ३५ ॥ शरण मी राघवा हो ॥ ध्रु० ॥ अंतरध्याना गुणनिधाना मज । पहा हो ॥ १ ॥ भजन कांहीं घडत नाहीं । हें साहा हो ॥ २ ॥ रामदास धरून कास । एक भावो ॥ ३ ॥

॥ ३६ ॥ रे मानवा उगीच आमुची जिणी । आह्मां ध्यानीं भेटिची शिराणी ॥ ध्रु० ॥ नरापरीस वानर भले । जिहीं डोळां राम देखियेलें । ज्यासी रघुराज हितगुज बोले । कोण्या भाग्यें भगवंत भेटले ॥ १ ॥ रामीं मिनले ते असो नीचयाती । त्यांच्या चरणाची वंदीन माती । नित्य नव्हाळी गाऊनि करूं किर्ती । तेणें रघुनाथीं उपजेल प्रीती ॥ २ ॥ रामीं रामदास ह्मणे ऐका करूं । थोर आह्मी तैसाचि भाव धरूं । भक्तिप्रेमाचा दाऊं निर्धारू । तेणें आह्मां भेटेल रघुवीरू ॥ ३ ॥

॥३७॥ कैचें घर कैचें दार । मिथ्या सकळही व्यापार । अंतीं सोइरा रघुवीर । कां भुललसी ॥ १ ॥ कोणी नव्हेति रे कोणीचीं । सकळही सांगातीं देवाचीं । धरीं साई त्या रामाची । कां भुल० ॥ २ ॥ बहु अवघड आहे घाट । कैसी नकळे उरकेल वाट । होई रघुविरजाचा भाट[३] कां भुल० ॥ ३ ॥ फिर माघारां परतोन पाहें । एकधर्माच होउनि राहे । धन जोडिल न राहे । कां भुल० ॥ ४ ॥ ऐसी करावी बा जोडी । राहे एथें तेथें गोडी । सोडी मिथ्या प्रपंचावोढी । कां भुल० ॥ ५ ॥ केव्हां जाईल न कळे श्वास । राहे तें घर पडेल वोस । य कुडीया उपजेल त्रास । कां भुल० ॥ ॥ ६ ॥ सावध होईरे बा ऐसा । वोढा जळत घरिंचा वासा । स्मर माझ्या रमाधीशा । कां भुल० ॥ ७ ॥ संसार पाण्याचा बुडबुडा । याचा नको करूं ओढा । तूं समजसी ना मूढा । कां भुल० ॥ ८ ॥ करीं सीताराम मंत्र । होईल देह तुझा पवित्र । वरकड भिंतीवरील चित्र । कां भुल० ॥ ९ ॥ कां रे बैसलास निश्चळ । करिशिल अनर्थास मूळ । सांडुनी विश्रांतिचें स्थळ । कां भुल० ॥ १० ॥ मुख्य असूं द्यावी दया । नाहीं तर सर्वही जाईल वांयां । मिठी घाली रामपाया । कां भुल० ॥ ११ ॥ करिशील डोळ्याचा अंधार । पाहे जनासी निर्वैर । सांडि धनसंपत्तीचें वारें । कां भुल० ॥ १२ ॥ अंगीं धनसंपत्तीचें वारें । खाया मिळतील भुतें पोरें । कामा नयेत रे निर्धारें । कां भुल० ॥ १३ ॥ रामदासाचें जीवन । तूं कां न करीसी साधन । राम तोडिल भवबंधन । कां भुललासी ॥ १४ ॥

॥ ३८ ॥ चातुर चातुरसे चटका ॥ ध्रु० ॥ एकएकगुणपरवडी डारूं । तन मेरी तोरींगये तटका ॥ १ ॥ सुनत देखत गुण प्रगट लोकनमें । अजब लागे चटका ॥ २ ॥ रामदास साही सब घटव्यापक । आनंदकी घटका ॥ ३ ॥

॥ ३९ ॥ बाई मी हो मी हो जाहली खरी । खरी गुरुदास । अखिल पदार्थीं उदास ॥ ध्रु० ॥ इह पर नश्वर जाणुनि हृदयीं । आलासे बहु त्रास ॥ १ ॥ नित्यानित्य विवेक विचारुनि । सेवितों ब्रह्मरसास ॥ २ ॥ तुर्या उल्लंघुनि उन्मनी सेउनी । स्वस्वरूपीं निजवास ॥ ३ ॥ निजतृप्तीसी देउनि तृप्ती । केला अनुभवग्रास ॥ ४ ॥ रामदास प्रभु नित्य उदास । सद्गुरणीं विश्वास ॥ ५ ॥

१ आवड, २ सोबती, ३ स्तुतिपाठक, ४ खरोखर, ५ परब्रह्मस्वरूपीं,

॥ ४० ॥ आवडतो प्रिय परी गवसेना ॥ धु० ॥ स्वजनाहुनि प्रिय देह आपुला । तोहि विटे परी आपण विटेना ॥ १ ॥ ज्यावरी धांवती इंद्रिय मनही । सर्वेहि दाउनि आपण दिसेना ॥ २ ॥ श्रीगुरु दास्य अनन्य घडे जरी । अनुभवतंतू कधीं तुटेना ॥ ३ ॥

॥ ४१ ॥ कोण मी मज कळतचि नाहीं । सारासारविचार शोधूनि पाही ॥ १ ॥ नारी ह्मणों तरी नरची भासे । नर ह्मणों तरी समूळ विनासे ॥ २ ॥ दास ह्मणों तरी रामचि आहे । राम ह्मणों तरी नाम न साहे ॥ ३ ॥

॥ ४२ ॥ आतां तरि जाय जाय जाय । धरीं सद्गुरुचे पाय ॥ धृ० ॥ संकल्प विकल्प सोडूनि राहें । दृढ धरुनी पाय पाय पाय ॥ १ ॥ नामस्मरण ज्या मुखीं नाहीं । त्याणें वाचुनी काय काय काय ॥ २ ॥ मानवतनु ही नये मागुती । बरें विचारुनि पाहें पाहें पाहें ॥ ३ ॥ आत्मानात्मविचार न करितां । व्यर्थ प्रसवली माय माय माय ॥ ४ ॥ सहस्र अन्याय जरी त्वां केले । कृपा करील गुरुमाय माय माय ॥ ५ ॥ रामदास ह्मणे नामस्मरणें । भिक्षा मागुनि खाय खाय खाय ॥ ६ ॥

॥ ४३ ॥ अरे नर सारविचार कसा ॥ धृ० ॥ क्षीरे[2] नीरे[3] एक हंस निवडिती । काय कळे वायसां[4] ॥ १ ॥ माया ब्रह्म एक संत जाणती । सारांश घेती तसा ॥ २ ॥ दास ह्मणे वंद्य निंद्य वेगळे । कर्मानुसार ठसा ॥ ३ ॥

॥ ४४ ॥ अरे मन पावन देव धरी । अनहित न करी ॥ धृ० ॥ नित्यानित्यविवेक करावा । बहुजना उद्धरीं ॥ १ ॥ आत्मा कोण अनात्मा कैसा । परपार उतरीं ॥ २ ॥ दास ह्मणे तुझा तूंची सखा रे । हित तुझें तूं करीं ॥ ३ ॥

॥ ४५ ॥ अरे नर सारविचार करीं । मन बरें विवरीं ॥ धृ० ॥ सारासारविचार न येतां । वाहसी भवपुरीं ॥ १ ॥ सकळ चराचर कोठुनि जालें । कोठें निमालें तरी ॥ २ ॥ दास ह्मणे जरी समजसी तरी । मुळींची सोय धरी ॥ ३ ॥

॥ ४६ ॥ भूतकाळीं कर्म केलें वर्तमानीं आलें । त्याचें सुख मानुनियां भोगितो आपुलें॥धु० सुखदुःखभोग जाला तोचि मागिल ठेवा । आतां दुःख मानू नको करी रामसेवा ॥१॥ बाईल मेली पोर मेलें द्रव्य नाहीं गांठीं । तळमळ लागली जीवीं कां रे होशी कष्टी ॥ २ ॥ जें जें दुःख होतें जिवा तेंचि मागिल कर्म । आतां त्याचें सुख मानी स्मर राम नाम ॥३॥ नामाविण राहूं नको असा फजित होशी । पुन्हां घडी नये बापा नरकामध्यें जाशी ॥ ४ ॥ भविष्याचा धोका तुझे हातामध्यें आहे । पळभर विसरूं नको नाहिं कोणी साह्य ॥ ५ ॥ सावध होईं सावध होईं किती सांगू तुजला । परिणाम कठीण मोठा शरण जाईं गुरुला ॥ ६ ॥ दास ह्मणे जालें तें तरी होउनियां गेलें । नको नको ह्मणतांहि भोगवितें केलें ॥ ७ ॥ भूतकाळीं० ॥

॥ ४७ ॥ एकला जगदंतर जाहला । आणीक कोणीच नाहीं तयाला ॥ १ ॥ चारी खाणी चारी वाणी । हालवी बोलवी चालवी त्याला ॥ २ ॥ एक धरी एक त्यागीत आहे । आपणा आपण भोगवीत आहे ॥ ३ ॥ दास ह्मणे हा बहुविध तमासा । पाहिल तो मग होइल तैसा॥४॥

॥ ४८ ॥ ज्या ज्या वेळे जें जें होईल तें तें भोगावें । विवेकाला विसरुनि आपण

---

१ एकनिष्ठतेनें. २ दूध. ३ उदक. ४ कावळ्याला. ५ शाश्वत व अशाश्वत गोष्टीचा विचार.

कष्टी कां व्हावें ॥ धृ० ॥ एकदां एक वेळ बहु सुखाची गेली । एकदां एक वेळ जिवा बहु पीडा झाली ॥ १ ॥ एकदां मागूं जातां मिळती षड्रस पक्कान्नें । एकदां मागूं जातां न मिळे भाजीचें पान ॥ २ ॥ सुकृत दुष्कृत दोन्ही पूर्वदत्ताचें फळ । ऐसें प्राणी जाणेना तो मूर्खचि केवळ ॥ ३ ॥ देह दुःखास मूळ ऐसें बरवें जाणोन । सुखदुःखाविरहित रामदास आपण ॥ ४ ॥ ज्या ज्या० ॥

॥ ४९ ॥ घटका गेली पळें गेलीं तास वाजे झणाणा । आयुष्याचा नाश होतो राम कां रे ह्मणाना ॥१॥ एक प्रहर दोन प्रहर तीन प्रहर गेले । विषयाच्या संगामुळें चारी प्रहर गेले ॥२ रात्र कांहीं झोंप कांहीं स्त्रीसंगें गेली । ऐशी आठा प्रहरांची वांसलाद झाली ॥ ३ ॥ दास ह्मणे तास वाजे सकळां स्मरण देतो । वेळोवेळां राम ह्मणा ह्मणोनि झणकारितो ॥ ४ ॥

॥ ५० ॥ अंजनीगीत ॥ लंकेहूनि अयोध्ये येतां राम लक्ष्मण सीता । हनुमंतें अंजनी माता । दाखविली रामा ॥ १ ॥ चवघें केला नमस्कार । काय बोले रघुवीर । तुझ्या कुमरें आह्मां थोर । उपकार केला ॥ २ ॥ सीताशुद्धी येणें केली । लक्ष्मणाची शक्ती हरिली । लंका जाळूनि निर्दाळीली । राक्षससेना ॥ ३ ॥ अहिरावण महिरावण ॥ घात करिती आमुच्या प्राणा । देवीरूपें दोघांजणां । रक्षिलें माते ॥ ४ ॥ अठरा पद्में वानरभार । श्रमें युद्ध केलें फार । शिळा सेतू सागर । समाप्त केला ॥ ५ ॥ माते तुझ्या उदरीं जाण । हनुमान जन्मला रत्न । एवढें माझें रामायण । याचेनि योगें ॥ ६ ॥ ऐकून पुत्राची ही स्तुति । माता तुच्छ मानी चित्तीं । व्यर्थ कां बा रघुपती । वाहसी भार ॥ ७ ॥ हा कां माझ्या उदरीं आला । गर्भांहूनि नाहीं गळाला । आपण असतां कष्टविला । श्रीराम माझा ॥ ८ ॥ माझिया दुग्धाची प्रौढी । कळिकाळाची नरडी मुरडी । रावणादिक हे बापुडीं । घुंगुरटीं तेथें ॥ ९ ॥ असत्य रामा वाटेल बोली । दुग्धधारा सोडियेली । शैला उदरीं खोचविली । त्रिखंड तेव्हां ॥ १० ॥ वेणी दंड परताळिला । लंकेलागीं वेढा दिधला । आणुनी रामासी दाखविला । अंजनी मातें ॥ ११ ॥ सीता बोले अंजनीसी । कां कोपशी बाळकाशीं । रामें आज्ञा हनुमंतासी । दिधली नव्हती ॥ १२ ॥ आश्चर्य वाटलेंसे रामा । ह्मणे माते धन्य महिमा । पादपद्में चवघांजणां । वंदिलें भावें ॥ १३ ॥ अत्यंत जिवलग सखा । हनुमंत भक्त निका । रामदास–पाठिराखा । महारुद्र तो ॥ १४ ॥

॥ ५१ ॥ गणपति गणराज धुंडिराज महाराज । चिंतामणि मोरेश्वर याविण नाहीं काज ॥ धृ० ॥ अकार उकार मकार तुझी शुंडा अनिवार । ब्रह्मा विष्णु महेश हे तरि तुझेच अवतार ॥ १ ॥ त्रिगुण तूं [६]गुणातीत नामरूपाविरहित । पुरुषनाम प्रकृतींत अंत नाहीं हा ॥ २ ॥ सच्चिदानंद देवा । आदि अंत तुलाचि ठावा । दास ह्मणे वरद भावा । कृपादृष्टीं हा ॥ ३ ॥

॥ ५२ ॥ प्रगट निरंजन प्रगट निरंजन प्रगट निरंजन आहे । [७]आगमनिगम संतसमागम सद्गुरुवचनें पाहे ॥ धृ० ॥ ॥ आत्मविचारें शास्त्रविचारें गुरुविचारें बोध । मीपण तूंपण

---

१ पुण्य. २ व्यवस्था, वाट. ३ नाश केला. ४ उत्तम. ५ सोंड. ६ सत्व, रज, तमादि गुणांच्या पलीकडे. ७ वेदशास्त्रें.

शोधूनि पाहतां आपण आपणा शोध । प्रगट० ॥ १ ॥ जडाशि चंचळ चालविताहे चंचळ स्थिर न राहे । प्रचीतें आहे शोधूनि पाहे निश्चळ होऊनि राहे ॥ २ ॥ भजनीं भजन आत्मनिवेदन श्रवणमनन साधा । दास ह्मणे निजगुज शोधितां होत नसे भवबाधा ॥ ३ ॥

॥ ५३ ॥ पाहा पाहा या जगांत राम आहे । राम आहे राम आहे राम आहे ॥ ध्रु० ॥ जग हें अवघें रामच सारा । अंतरीं पाहे करी विचारा ॥ १ ॥ एक सुवर्णीं बहु अळंकारा । तैद्वत पाही सर्व पसारा ॥ २ ॥ विना कचळू नाहीं थारा । रामच रामही घे घे सारा ॥ ३ ॥ दास ह्मणे हा रामच भरला । भरला उरला बोलच खुंटला ॥ ४ ॥

॥ ५४ ॥ गुरुदातारें दातारें । अभिनव कैसें कैसें केलें ॥ ध्रु० ॥ एकाचि वचनें न बोलत बोल्हानें । मानस विलया नेलें ॥ १ ॥ भूतसंगें कृत नैश्वर ओझें । निजबोधें उतरिलें ॥२॥ दास ह्मणे मज मीपणविरहित । निजपदीं नांदविलें ॥ ३ ॥

॥ ५५ ॥ मिश्रित सारासार । अरे निवडी तोचि चतुर ॥ ध्रु० ॥ ब्रह्म निरंजन अद्वय सत्य । माया जनपर द्वैत अनित्य ॥ १ ॥ पारखीवीण खरें निवडेना । मूढ कसें जनहित कळेना ॥ २ ॥ मेळविलें जळ अमृत दोनी । हंस जसें पय घे निवडोनी ॥ ३ ॥ दास ह्मणे निज कौतुक मोठें । अनुभव बोलतां शाब्दिक खोटें ॥ ४ ॥

## अभंग.

॥ १ ॥ एक घाय दोन खंड । ऐसें बोलावें रोकडें ॥ १ ॥ जेणें उठती संशय । तें बोलणें कामा नये ॥ २ ॥ बहुविधा झालें ठावें । सत्य कोणीही जाणावें ॥ ३ ॥ रामीं रामदास ह्मणे । एक निश्चयें बोलणें ॥ ४ ॥

॥ २ ॥ तोंवरी तोंवरी डगमगीना कदा । देहाची आपदा झाली नाहीं ॥ १ ॥ तोंवरी तोंवरी परमार्थ स्वयंभे । जंव पोटीं लोभ आला नाहीं ॥ २ ॥ तोंवरी तोंवरी अत्यंत सद्भाव । विशेषें वैभव आलें नाहीं ॥ ३ ॥ तोंवरी तोंवरी सांगे निरभिमान । देहाशीं अभिमान झाला नाहीं ॥ ४ ॥ तोंवरी तोंवरी धीरत्वाची मात । प्रपंचीं आघात झाला नाहीं ॥ ५ ॥ रामदास ह्मणे अवघेची गाबाळी । ऐसा विरळा बळी धैर्यवंत ॥ ६ ॥

॥ ३ ॥ प्रपंच त्यागियेला बुद्धि । जडली परमार्था उपाधी ॥ १ ॥ मना होई सावचित्त । त्याग करणें उचित ॥ २ ॥ संप्रदाय समुदाव । तेणें जडे अहंभाव ॥ ३ ॥ रामदास ह्मणे नेम । भिक्षा मागणें उत्तम ॥ ४ ॥

॥ ४ ॥ प्रपंच केला तडातोडी । पडली परमार्थजीवडी ॥ १ ॥ सावधान व्हावें जीवा । त्याग केलाची करावा ॥ २ ॥ काम क्रोध राग द्वेष । अंगीं जडले विशेष ॥ ३ ॥ रामदासें बरें केलें । अवघें जाणुनी त्यागिलें ॥ ४ ॥

---

१ अनुभव. २ देहसमर्पण. ३ त्याप्रमाणें. ४ तात्काल. ५ स्वतःसिद्ध. ६ गोष्ट. ७ अडथळा.

॥ ५ ॥ नको ओळखीचे जन । अंगीं वाजे अभिमान ॥ १ ॥ आतां तेथें जावें मना । जेथें कोणी ओळखेना ॥ २ ॥ लोक ह्मणती कोण काय । पुसतांही सांगों नये ॥ ३ ॥ रामदास ह्मणे पाही । जेथें कांहीं चिंता नाहीं ॥ ४ ॥

॥ ६ ॥ तुह्मां आह्मां मुळीं झाली नाहीं तुटी । तुटीवीण भेटी इच्छीतसां ॥ १ ॥ इच्छीतसां योग नसतां वियोग । तुह्मां आह्मां योग सर्वकाळ ॥ २ ॥ सर्वकाळ तुह्मी आह्मी एक स्थळीं । वायां मृगजळीं बुडों नका ॥ ३ ॥ बुडों नका आतां सावध असावें । रूप ओळखावें जवळींच ॥ ४ ॥ जवळींच आहे नका धरूं दूरीं । बाह्य अभ्यंतरीं असोनियां ॥ ५ ॥ असोनि सन्निध वियोगाचा खेद । नसोनियां भेद लावूं नये ॥ ६ ॥ लावूं नये भेद मायिक संबंधीं । रामदास बोधीं भेटी झाली ॥ ७ ॥

॥ ७ ॥ अनंताचा अंत पाहावया गेलों । तेणें विसरलों आपणासी ॥ १ ॥ आपणा आपण पाहतां दिसेना । रूप गवसेना दोहींकडे ॥ २ ॥ दोहींकडे देव आपणचि आहे । संग हा न साहे माझा मज ॥ ३ ॥ माझा मज भार जालहा बहुत । देखतां देखत कळों आलें ॥ ४ ॥ कळों आलें भार देखतां विचार । पुढें सारासारविचारणा ॥ ५ ॥ विचारणा झाली रामीं रामदासीं । सर्वही संगासी मुक्त केलें ॥ ६ ॥ मुक्त केलें मोक्षा मुक्तीची उपेक्षा । तुटली अपेक्षा कोणी एक ॥ ७ ॥

॥ ८ ॥ शाहणे ह्मणवितां ब्रह्मज्ञानेंवीण । संसाराचा शीण करोनीयां ॥ १ ॥ करोनि संसार रात्रंदिवस धंदा । कैसे हो गोविंदा चुकलेती ॥ २ ॥ चुकलेती वायां तुह्मी कां बंधुहो । अंतरीं संदेहो जन्मवरी ॥ ३ ॥ जन्मवरी ओझें वाहिलें वाउगें । व्यर्थ कामरंगें रंगोनिया ॥ ४ ॥ रंगोनिया कामीं अंतरावें रामीं । दास ह्मणे ऊर्मी कामा नये ॥ ५ ॥

॥ ९ ॥ ज्ञान झालें भक्तजना । सांडूं नये उपासना ॥ १ ॥ ऐका साराचेंहि सार ॥ मुख्य सांगतों विचार ॥ २ ॥ हेंचि सर्वांचें कल्याण । मानूं नये अप्रमाण ॥ ३ ॥ दास ह्मणे अनुभवल । भजन भगवंताचें भलें ॥ ४ ॥

॥ १० ॥ प्रवृत्ति सासुरें निवृत्ति माहेर । तेथें निरंतर मन माझें ॥ १ ॥ माझे मनीं सदा माहेर तुटेना । सासुरें सुटेना काय करूं ॥ २ ॥ काय करूं मज लागला लौकिक । तेणें हा विवेक दुरी जाय ॥ ३ ॥ दुरी जाय हित मजचि देखतां । प्रयत्न करूं जातां होत नाहीं ॥ ४ ॥ होत नाहीं यत्न संत संगाविण । रामदास खुण सांगतसे ॥ ५ ॥

॥ ११ ॥ ओळखतां ज्ञान ओळखी मोडली । भेटी हे जोडली आपणासी ॥ १ ॥ आपणासी भेटी झाली बहुतां दिसां । तुटला वळसा मीपणाचा ॥ २ ॥ मीपणाचा भाव भावें केला वाव । दास ह्मणे देव प्रगटला ॥ ३ ॥

॥ १२ ॥ दिसतें नासेल सर्वत्र जाणती । या बोला वित्पत्ति काय काज ॥ १ ॥ कार्य कारण हा विवेक पाहिजे । तरीच लाहिजे शाश्वतासी ॥ २ ॥ शाश्वतासी येणें जाणेंचि न घडे। साकार हें मोडे दास ह्मणे ॥ ३ ॥

---

१ देहाभिमान. २ हयगय. ३ इच्छा. ४ विषयांमध्यें. ५ खोटें ६ अर्थज्ञान.

॥ १३ ॥ मन हें विवेकें विशाळ करावें । मग आठवावें परब्रह्म ॥ १ ॥ परब्रह्म मनीं तरीच नीवळे । जरी बोधें गळे अहंकार ॥ २ ॥ अहंकार गळे संतांचे संगतीं । मग आदि अंतीं समाधान ॥ ३ ॥ समाधान घडे स्वस्वरूपीं राहतां । विवेक पाहतां निःसंगाचा ॥ ४ ॥ निःसंगाचा संग दृढ तो धरावा । संसार तरावा दास ह्मणे ॥ ५ ॥

॥ १४ ॥ आह्मीं सावधान गावें । तुह्मीं सावध ऐकावें ॥ १ ॥ सकळ सृष्टीचा गोसांवी । त्याची ओळख पुसावी ॥ २ ॥ स्वयें बोलिला सर्वज्ञु । ज्ञानेंविण अवघे पशु ॥ ३ ॥ दास ह्मणे नाहीं ज्ञान । तया नरकीं पतन ॥ ४ ॥

॥ १५ ॥ जेणें ज्ञान हें नेणवें । पशु तयासि ह्मणावें ॥१॥ जेणें केलें चराचरें । कोण विश्वासि आधार ॥ २ ॥ ब्रह्मादिकांचा निर्मिता । कोण आहे त्यापरता ॥ ३ ॥ अनंत ब्रह्मांडांच्या माळा । विचित्र भगवंताची कळा ॥ ४ ॥ रामदासाचा विवेक । सर्वां घटीं देव एक ॥ ५ ॥

॥ १६ ॥ देह आरोग्य चालतें । भाग्य नाहीं त्यापरतें ॥ १ ॥ लाहो घ्यावा हरिभक्तीचा । नाहीं भरंवसा देहाचा ॥ २ ॥ देह आहे क्षणभंगुर । तुह्मी जाणतां विचार ॥ ३ ॥ रामीं रामदास ह्मणे । अकस्मात लागे जाणें ॥ ४ ॥

॥ १७ ॥ ज्याचेनि जितासी त्यासि चुकलासी । व्यर्थचि झालासि भूमिभार ॥ १ ॥ भूमिभार जिणें तुझें गुरुविणें । वचनें प्रमाणें जाण बापा ॥ २ ॥ जाणें तूं हे गती गुरुविण नाहीं । पडसी प्रवाहीं मायाजाळीं ॥ ३ ॥ मायाजाळीं वायां गुंतलासि मूढा । जन्मवरी वोढा तडातोडी ॥ ४ ॥ कांहीं तडातोडीं कांहीं देव जोडीं । आयुष्याची घडी ऐसी वेंची॥ ५ ॥ ऐशी वेंची बापा आपुली वयसा । दास ह्मणे ऐशा काळीं घाली ॥ ६ ॥

॥ १८ ॥ काय करितें हें मन । साक्ष आपुला आपण ॥ १ ॥ काय वासना ह्मणते । आपणास साक्ष येते ॥ २ ॥ मन असे बेरगळ । केल्या होतसे विव्हळ ॥ ३ ॥ सोडीना हें संसारिक । कांहीं पाहावा विवेक ॥ ४ ॥ दास ह्मणे सावधान । पदरीं बांधलें मरण ॥ ५ ॥

॥ १९ ॥ करुनि अकर्ते होऊनियां गेले । तेणें पंथें चाले तोचि धन्य ॥ १ ॥ तोचि धन्य जनीं पूर्ण साधनांनीं । जनीं आणि वनीं सारिखाचि ॥ २ ॥ सारिखाचि जेथ तेथें पालटेना । नये अनुमाना कोणी एक ॥ ३ ॥ कोणीएक लोक देहासी पाहाती । अंतरींची गती कोण जाणे ॥ ४ ॥ कोण जाणे काय सांगतां मनींचें । जनासि जनाचें कळतसे ॥ ५ ॥ कळत असे परि अंतर शोधावें । मनासि बोधावें दास ह्मणे ॥ ६ ॥

॥ २० ॥ तुह्मी आह्मी करूं देवाचा निश्चय । जया नाहीं लय तोचि देव ॥ १ ॥ देव हा अमर नित्य निरंतर । व्यापूनि अंतर देव आहे ॥ २ ॥ ज्ञान देहीं वसे तया देव दिसे । अंतरीं प्रकाशे ज्ञानदृष्टीं ॥ ३ ॥ ज्ञान देहीं होतां पाविजे अनंता । हा शब्द तत्त्वतां दास ह्मणे ॥ ४ ॥

॥ २१ ॥ बोलवेना तें बोलावें । चालवेना तेथें जावें ॥ १ ॥ नवल स्वरूपाच्या योगें । जीवपणाचे वियोगें ॥ २ ॥ वाट नाहीं तेथें जावें । जाणवेना तें जाणावें ॥ ३ ॥ रामदासीं दृढबुद्धि । होतां सहज समाधी ॥ ४ ॥

---

१ स्थावरजंगमात्मक अखिल सृष्टी. २ सर्व देहामध्यें. ३ खर्चे करतो. ४ आयुष्य. ५ अनिवार. ६ हृदय. ७ खरोखर.

॥ २२ ॥ गेलों वस्तूशा भेटाया । तिकडे ब्रह्म इकडे माया ॥ १ ॥ दोहींमध्यें सांपडलों । मीच ब्रह्म ऐसें बोलों ॥ २ ॥ वस्तु निर्मळ निश्चळ । माया चंचळ चपळ ॥ ३ ॥ रामीं रामदास ह्मणे । अवघें मनाचें करणें ॥ ४ ॥

## दिवटा.

हुशार भाई हुशार । अवघीं असावें खबरदार । काळोखें पडतें फार । एकाशीं एक दिसेना ॥ १ ॥ चोराचे कळप फिरती । अवचित दगा करिती । निजों नका जागविती । मी दिवटा साहेबाचा ॥ २ ॥ मी हराम नव्हे साहेबाचा । नेकर[1] इतबाराचा[2] । मज रातीं जागावयाचा । हुद्दा दिधला ॥ ३ ॥ मी सारे रात जागतों । अठरा महालांची खबर घेतों । साही नजरेनें राखतों । मनीं धरितों चहूंचे गुण ॥ ४ ॥ मी सकळिकांचें करितों बरें । परि मज मानिती अहंकारें । घोरों लागती झोपेंच्या घोरें । ते समूळ नागविती ॥ ५ ॥ जे मजला मानिती । माझ्या विचारें वर्तती । तरि हरगीस्त झोला न पवती । ते नाडेनात जी ॥ ६ ॥ जे जे झोपेनें पिडले । ते ते अवघेचि नाडले । यमयातनेशी जुडले । पाहुणेर यावयाकारणें ॥ ७ ॥ जे मदभरें जडले । जन्ममरणा रहाटीं जोडले । सुटिका नव्हती पाडिले । बांधोनियां जी ॥ ८ ॥ अरे जागा स्वरूपीं[3] जागा । मुक्तीचा सोहोळा भोगा । कर्म आपलें अंगा । लागोंच नेदावें ॥ ९ ॥ अरे हुशार भाई हुशार । झोपेनें नाडले थोर थोर । म्यां जे जे केले खबरदार । ते कडेशीं पडिलेजी ॥ १० ॥ महादेव निजेनें भ्रमला । विषें तळमळों लागला । मग म्यां खबरदार केला । तो वांचला दों अक्षरीं ॥ ११ ॥ स्वामी कार्तिक निजेनें भ्रमला । बळेंचि परस्त्री भोगूं लागला । मातृगमन पडावें त्याला । तो म्यां खबरदार केला ॥ १२ ॥ विष्णु निजेनें भ्रमला । परस्त्रीचे मोहें जोगी झाला । तो म्यां खबरदार केला । मोहो दवाडिला शक्तीचा ॥ १३ ॥ ब्रह्मा निजेनें भ्रमला । चोरांनीं समूळ नागविला । सकळ धर्म बुडविला । दुकाळ पडला मोठा जी ॥ १४ ॥ मग म्यां खबरदार केला । तो बाबातें स्मरला । तेणें जाऊनि चोर मारविला । लेंकाचें वित्त दिधलें ॥ १५ ॥ नारद निजेनें भ्रमला । बायको होउनी साठ लेंक व्याला । तो म्यां खबरदार केला । मग पावला पहिला वेष ॥ १६ ॥ इंद्रें मानिलें नाहीं मजला । सहस्र भोकें पडलीं त्याला । शुक्रें डोळा फोडोनि घेतला । न मानी मजला ह्मणवूनी ॥ १७ ॥ चंद्रें नाहीं मानिलें मजला । अभिमानें सुखें निजला । तो क्षयरोगी जाहला । नाडला आपले करणीनें ॥ १८ ॥ दक्ष निजेनें भ्रमला । मानिलें नाहीं मजला । पूर्वशिराशी मुकला । जाहला जी तो बोकडमुखी ॥ १९ ॥ गुरूनें नाहीं मानिलें मजला । बाईल गमवुनी बैसला । यम निजेनें व्यापिला । झाला केवळ दासीपुत्र ॥ २० ॥ रावण निजेनें भ्रमला । कुलक्षय करूनि शोकीं पडला । मग म्यां खबरदार केला । मग जाला रामरूपी ॥ २१ ॥ ऐसे ऐकोनि दृष्टांत[4] । सावध करोनी करा स्वहित । तरि आपुलें फळ भोगा समस्त । मी सांगतों जी ॥ २२ ॥ मी सांगतों उतराई । कोणापाशीं कांहीं मागत नाहीं । परोपकारास्तव पाहा । हुशार करितों

---

१ नोकर. २ इमानाचा. ३ परब्रह्मस्वरूपीं. ४ उपमा.

॥ २३ ॥ ऐसें खिवटा जाय बोलोनि । घरटी घाली हाक देवुनि । दास म्हणे दिवट्या मानी । तोचि तरला मोहरानीं ॥ २४ ॥

## पिंगळा.

॥ भाकणूक ॥ वीर हनुमंतासी दुवा । महंमायासी दुवा । संतांचे सभेसी दुवा । धर्माचे सभेशी दुवा । राजमुद्रा देवमुद्रा । ज्ञानमुद्रा ते धुरेशी दुवा हो । वेदांत सिद्धांत दुवा । धादांत तें मज पिंगळयाचें बोलणें गायरायनहो ॥ १ ॥ ऐसें सर्वही सरेल । परि अविनाशी वस्तु एक उरेल । तें सज्ञान जाणतील । गायरायनहो ॥ २ ॥ या पृथ्वीस प्रळय होईल । महाकाल पडेल । सकळ जीवन आटेल । हा मी पिंगळा बोलूनि जातों ॥ ३ ॥ शत वरुषें पाऊस जाईल । तेणें जीवसृष्टी मरेल । सूर्यों बारा कळीं तपेल । तेणें पर्वतासहित पृथ्वी जळेल । गाय० ॥ ४ ॥ पोळती शेषाचिया फडा । तो विष वमी भडभडा । पाताळ जळती धडधडा । ऐशी ब्रह्मांडींची राखोंडी होईल । गायरायनहो ॥ ५ ॥ पाऊस पडेल शुंडाधारीं । तेणें बुडेल धात्री । अग्नि प्रगटेल अंबरीं । तो करील बोहेरी तया पाणियाची । तेथें सुटेल वावधान । तेणें विझेल तो अग्न । वारियासी गिळितां गगन । गगनासी राहे खाऊ । तो तामस अहंकार गायरायनहो ॥ ६ ॥ राजस बुडवील तामस अहंकारास । सात्विक बुडवील राजस अहंकारास । गुणमाया गिळील गुणास । अहंमाया करील गायरायनहो ॥ ७ ॥ गुणक्षोभिणी माये पोटीं । माया मूळमाया पोटीं । मूळमाया स्वरूपा पोटीं । लीन हो गायरायनहो ॥ ८ ॥ विघ्न मोठें गायरायनहो । कांहीं शांति करा हो । कांही त्याग कराहो । उत्तम पाहा राजा गायरायनहो ॥ ९ ॥ धुरेची रासी कोण । बापाची राशी कोण । म्यां खबर खोत मिथुन कर्क सिंह कन्या तूळ वृश्चिक धन मकर कुंभ मीन ॥ १० ॥ मीनाचा मी रोग बरा लाभ आहे गायरायनहो । थोरल्या पुस्तकाचा शकुन पाहें । मज पिंगळयाचे हातेन गाय० ॥ ११ ॥ बुद्धि कांडी खोविली वरी । निघाली रंकाशीं राज्यपदवी । तुम्ही हरपली सांपडेल ठेवी । तरी मज पिंगळयाला विसरोन । रामीं रामदास सर्वदा भाकून गेला निजपदा । त्याचिया नेमाची शब्दा । जतन करा गायरायनहो ॥ १२ ॥

॥ जोगीच्छंद ॥ काळ बहिरी ससाणा । बंधु तुळज्याचा जाणा । काळ पिळियेला घाणा । बहिरी कुर्भुजी नाणा । बहिरी जोग बोलणी बोलती ॥ १ ॥ निळया घोड्याचा राउत । हातीं त्रिशूळ संगीत । कावे घेतो लखलाखित । उंच कास तखतखीत । ताघडोबेडसति ॥ २ ॥ तेथें बहिरीची प्रचिति । नागखंडें झोंबती । तेथें बहिरीचि प्रचिति । नागखंडें झोंबाति । तेथें बहिरीचि प्राचिति ॥ ३ ॥

पहिला देव तो बद्धाचा । दुसरा देव तो मुमुक्षूचा । तिसरा देव तो साधकाचा । चवथा देव तो वेगळा । अगम्य त्याची लीळा ॥ १ ॥ पहिला गुण महेशाचा । दुसरा गुण तो ब्रह्मयाचा । तिसरा गुण तो विष्णूचा । चौथ गुण तो वेगळा । अगम्य त्याची लीळा ॥ २ ॥

---

१ ओकतो. २ पृथ्वी. ३ आकाशांत ४ नाश. ५ मोठा पूर. ६ गुणांना प्रकट करणारी. ७ भिकाऱ्याला. ८ अनुभव.

पहिला भक्त तो कायेचा । दुसरा भक्त तो वाचेचा । तिसरा भक्त तो मनाचा । चौथा भक्त तो वेगळा । अगम्य त्याची लीळा ॥ ३ ॥

॥ दोहरे ॥ कानफाट्या । आलेख जागे । आलेख आलेख सब कोहु कहे । आलेख आलेख सो न्यारा । जैसी कीणीही वैसी रहणी । सोई नाथका प्यारा ॥ १ ॥ आलेख जागे । साई आलेख जागे आलेख पायाकहणी आया उसकी बात झुटी ॥२॥ गोरख गोरख सब कोहु कहे । गोरख नबुजे कोहे । जोगींद्रकु जो कोई रखे सोई गोरख होय ॥ ३ ॥ नवाककेनवतुकरे ज्योरे प्राण लियो हेगा । कंथा छोड कंठ लगाय जोगी रहता नंना ॥ ४ ॥ जनमो सीगी मनमो त्यागी जनमो बद्धा जनमो मुक्ता । कथनी कहते लोक ट-फावे सोहि ज्ञानका अंधा ॥ ५ ॥ जोगी भीतर मडिया पैठे करवे भीतर बाई । जीवनमें जीय देखन गया जोगीकी सुरत पायी ॥ ६ ॥ फेरी करते घरघर फीरे कीनरी बज्याई तारा । कंथा आवे कंथा जावे जोगी रहाता न्यारा ॥ ७ ॥ सिंगी बाजे बाबगाजे माई-रसंडी बाडे । नाथ नबुझे गुतगुतमेर नाथ बुझे सो छुटे ॥ ८ ॥ मुद्रा फारी कानमो डारी आपसे न फारी कोये । आपसे फोर मुद्रा पैठी सोई गोरख होय ॥ ९ ॥ जोगे न जानु जुगुत न जानु न जानु आसन ध्यान । रामकी कृपा दास न पाई आलख हुवा परिपूर्ण ॥१०॥

## अभंग.

॥ १ ॥ प्रश्न ॥ नमो वागेश्वरी शारदा सुंदरी । श्रोता प्रश्न करी वक्तयासी ॥ १ ॥ वक्तयासी पुसे जीव हा कवण । शिवाचें लक्षण सांगा मज ॥ २ ॥ सांगा मज आत्मा कैसा तो परमात्मा । बोलिजे अनात्मा कवण तो ॥ ३ ॥ कोणता प्रपंच कोणें केला संच । मागुता विसंच कोण करी ॥४॥ कोण ते अविद्या सांगावी ते विद्या । कैसें आहे आद्या स्वरूप तें ॥ ५ ॥ स्वरूपीं ती माया कैशी मूळमाया । इशी चाळवाया कोण आहे ॥ ६ ॥ आहे कैसें शून्य कैसें तें चैतन्य । समाधान अन्य कवण तें ॥ ७ ॥ कवण ज-न्मला कवणा मृत्यु आला । बद्ध मुक्त झाला कवण तो ॥८॥ कवण जाणता कवणाची सत्ता । मोक्षही तत्त्वतां कोण सांगा ॥ ९ ॥ सांगा आह्मां खूण सगुण निर्गुण । पंचवीस प्रश्न दास करी ॥ १० ॥

॥ २ ॥ उत्तर ॥ नमो वेदमाता नमो त्या अनंता । सांगों प्रश्न आतां श्रोतयांचे ॥ १ ॥ श्रोतयांचा प्रश्न जीव तो अज्ञान । जया सर्वज्ञान तोचि शिव ॥२॥ शिवापर आत्मा त्यापर-परमात्मा । बोलिजे अनात्मा । अनिर्वाच्य ॥३॥ वाचा हा प्रपंच मायिक जाणावा । घडी मोडी देवापासोनियां ॥ ४ ॥ विषय अविद्या त्याग तो सुविद्या । निर्विकल्प आद्या स्वस्वरूप ॥ ५ ॥ कल्पना हे माया सत्व मूळमाया । इशी चाळवाया चैतन्य तें ॥ ६ ॥ नकार तें शून्य व्यापक चैतन्य । ईश्वर अनन्य समाधान ॥ ७ ॥ जीव हा जन्मला जिवा मृत्यु आला । बद्ध मुक्त झाला तोची जीव ॥ ८ ॥ ईश्वर जाणता ईश्वराची सत्ता । मोक्ष हा तत्त्वतां ईश्वरचि ॥ ९ ॥ ईश्वर निर्गुण चेतवी सगुण । हेचि ब्रह्मखूण दास ह्मणे ॥ १० ॥ दास ह्मणे सर्व मायेचें करणें । रूप सर्व जाणे अनुभवी ॥ ११ ॥

---

१ अज्ञान. २ खरोखर.

॥ ३ ॥ प्रश्न ॥ संतसंगें तुज काय प्राप्त झालें । सांग पां वेहिलें मजपाशीं ॥ १ ॥ मजपाशीं सांग कोण मंत्र तूज । काय आहे गूज अंतरींचें ॥ २ ॥ अंतरींचें गुज काय समाधान । मंत्र जप ध्यान कैसें आहे ॥ ३ ॥ कैसें आवाहन कैसें विसर्जन । कैसें पिंडज्ञान सांगे मज ॥ ४ ॥ सांग मज कोण तुझी उपासना । मुद्रा ते आसना सांगें मज ॥ ५ ॥ सांग पंचीकरण चित्तचतुष्टय । कैसें तें अद्वय जीव शिव ॥ ६ ॥ जीव शिव ऐक्य झालें कोणे रीतीं । सांग मजप्रती अष्टदेह ॥ ७ ॥ अष्टदेह पिंडब्रह्मांडरचना । तत्वविवंचना सांगे मज ॥ ८ ॥ सांग मज भक्ती कैशी ते विरक्ती । सायुज्यता मुक्ती कवण ते ॥ ९ ॥ कोण तें साधन कोण तें बंधन । ऐसे केले प्रश्न रामदासें ॥ १० ॥

॥ ४ ॥ उत्तर ॥ संतसंगें मज काय प्राप्त झालें । सांगतों वेहिलें तुजपाशीं ॥ १ ॥ मंत्र हा तारक रामनाम एक । गूज हरादिक चिंतिताती ॥ २ ॥ ज्ञान समाधान सगुणाचें ध्यान । निर्गुणीं अभिन्न आपणचि ॥ ३ ॥ दृश्य आवाहन दृश्य विसर्जन । तेथें पिंडज्ञान आढळेना ॥ ४ ॥ उपासना हरि मुद्रा अगोचरी । सिद्धासनावरी समाधान ॥ ५ ॥ पंचीकरण पिंडब्रह्मांड आवरण । साक्षी तो आपण एकलाची ॥ ६ ॥ जीव शिव ऐक्य झालें येणें रीतीं । प्रकृतीच्या अंतीं द्वैत कैंचें ॥ ७ ॥ अष्टदेह स्थूळ सूक्ष्म कारण । चौथा देह जाण महाकारण ॥ ८ ॥ विराट हिरण्य आणि अव्याकृती । आठवा प्रकृती मूळमाया ॥ ९ ॥ एक तत्व जाण त्याचें नांव भक्ती । जाणावी विरक्ती संगत्याग ॥ १० ॥ सायुज्यता मुक्ती तेचि ते अचळ । साधनाचें मूळ गुरुदास्य ॥ ११ ॥ गुरुदास्यें चुके संसारयातना । जाणतील खुणा अनुभवी ॥ १२ ॥ अनुभवेंवीण होय सर्व शीण । निरसले प्रश्न दास ह्मणे ॥ १३ ॥

॥ ५ ॥ अहो सद्गुरूची कृपा । तेणें दाखवी स्वरूपा ॥ १ ॥ तो हा गुरु परब्रह्म । जेणें केलें स्वयें ब्रह्म ॥ २ ॥ धरा सद्गुरुचरण । जेणें चुके जन्ममरण ॥ ३ ॥ अहो सद्गुरु तोचि देव । दास ह्मणे धरा भाव ॥ ४ ॥

॥ ६ ॥ शिरीं आहे रामराज । औषधाचें कोण काज ॥ १ ॥ जो जो प्रयत्न रामावीण । तो तो दुःखासी कारण ॥ २ ॥ शंकराचें हळाहळ । जेणें केलें सुशीतळ ॥ ३ ॥ आह्मां तोचि तो रक्षिता । रामदासीं नाहीं चिंता ॥ ४ ॥

॥ ७ ॥ अंतरीं गुरुवचन । बाह्य नापिका वपन ॥ १ ॥ अंतर्बाह्य शुद्ध झालों । रामदर्शनें निवालों ॥ २ ॥ मन मुंडिल्या उन्मन झालें । शिर मुंडिल्या काय केलें ॥ ३ ॥ दासें तीर्थविधि केला । रामीं पिंड समर्पिला ॥ ४ ॥

॥ ८ ॥ माझे मनीं सर्व सुख व्हावें तुज । ह्मणोनियां गूज सांगतसें ॥ १ ॥ सांगतसें हित त्वां जीवीं धरावें । भजन करावें राघवाचें ॥ २ ॥ राघवाचें प्रेम जें करी विश्राम । येरें सर्व भ्रम जाण बापा ॥ ३ ॥ जाण बा वचन हें माझें प्रमाण । वाहतसें

१ लवकर. २ शरीरज्ञान. ३ वैराग्य. ४ देहाभिमानाचा त्याग. ५ वृत्तिरहित. ६ इतर.

आण राघवाची ॥४॥ राघवाची भक्ती ते माझी विश्रांती । असों द्यावी चित्तीं दास ह्मणे ॥५॥

॥ ९ ॥ ज्याचें नाम घेशी तेंचि तूं आहेसी । पाहे आपणापासीं शोधोनियां ॥ १ ॥ शोधितां शोधितां मीपणाची नाहीं । मीपणाचें पाहीं मूळ बरें ॥ २ ॥ मूळ बरें पाहा नसोनियां राहा । आह्मां तैसे आहां सर्वगत ॥ ३ ॥ सर्वगत आत्मा तोचि तो परमात्मा । दास अहमात्मा सांगतसे ॥ ४ ॥

॥ १० ॥ जो कां भगवंताचा दास । तेणें असावें उदास ॥ १ ॥ काय देतिल तेंचि घ्यावें । कोणा कांहीं न मागावें ॥ २ ॥ आशा कोणाची न करावी । बुद्धि भगवंतीं लावावी ॥ ३ ॥ सदा श्रवणमननें । आणि इंद्रियदमनें ॥ ४ ॥ नानापरी बोधूनि जीवां । आपुला परमार्थ साधावा ॥ ५ ॥ रामदासीं पूर्णकाम । बुद्धि दिली हे श्रीराम ॥ ६ ॥

॥ ११ ॥ बोलवेना तें बोलावें । चालवेना तेथ जावें ॥ १ ॥ नवल स्वरूपाच्या योगें । जीवपणाचे वियोगें ॥ २ ॥ वाट नाहीं तेथें जावें । जाणवेना तें जाणावें ॥ ३ ॥ नसोनियां भेटी घ्यावी । तुटी असोनि पाडावी ॥ ४ ॥ रामदासीं दृढबुद्धी । होतां सहज समाधी ॥ ५ ॥

*

# रामदासस्वामीकृत अभंग.

## बाळक्रीडा.

नमस्कार माझा हा विघ्ननाशना। शारदा[1] आननामाजीं[2] राहो ॥ १ ॥ राहो सर्वकाळ गोविंदाचें नाम। कीर्तन उत्तम यादवाचें[3] ॥ २ ॥ यादवाचे कुळीं गोकुळीं गोविंद। आनंदाचा कंद अवतरला ॥ ३ ॥ अवतरला पूर्ण अवतारी अच्युत। आयुधें मंडित चतुर्भुज ॥ ४ ॥ चतुर्भुज हरी डोळस सांवळा। वैजयंतीमाळा पीतांबर ॥ ५ ॥ पीतांबरधारी प्रकटे मुरारी। मथुरेमाझारीं कारागृहीं[4] ॥ ६ ॥ कारागृहीं माता पिता वसुदेव। तेथें आले देव सोडवणें ॥ ७ ॥ सोडवणें आला वैकुंठींचा राव। येतांचि लाघव थोर केलें ॥ ८ ॥ थोर केलें कर्म सर्वां भुलवीलें। स्वयें आच्छादीलें निजरूप ॥ ९ ॥ निजरूप देवें सोडुनी कौतुक। जहाला बाळक नंदजीचें ॥ १० ॥ नंदजीचें बाळ करि पंथ मोकळा। जावया गोकुळा विश्रांतीसी ॥ ११ ॥ विश्रांतीसी आलें स्थळ पालटलें। नवल जाणवलें कंसराया ॥ १२ ॥ कंसराय जाय मारूं आपटोनी। मन गडबडोनी उसळली ॥ १३ ॥ उसळली ह्मणे कंसा तुझा वैरी। गोकुळामाझारीं वाढतसे ॥ १४ ॥ वाढतसे वैरी नंदाची कुमारी। बोलोनी अंबरीं[5] गुप्त झाली ॥ १५ ॥ झाली तळमळ ऐकतां कंसासी। लागली मानसीं थोर चिंता ॥ १६ ॥ थोर चिंता करी ह्मणे माझा वैरी। वाढतसे मारी कोण आतां ॥ १७ ॥ कोण आतां तरी करावा उपाय। वैरीया अपाय होय जेणें ॥ १८ ॥ होय जेणें मत्यू तया बाळकासी। तंव आले जोशी ह्मावळभट ॥ १९ ॥ ह्मावळभट आले रायें सन्मानीले। तयाप्रती बोले कांहीं एक ॥ २० ॥ कांहीं एक भटो मांडिलें संकट। तंव येरें पट[6] उकलीला ॥ २१ ॥ उकलीला पट पाहिला मुहूर्त। ह्मणे चिंता व्यर्थ कां करितां ॥ २२ ॥ कां करितां चिंता तया बाळकाची। वधूनि शीघ्रचि येतों आतां ॥२३॥ येतों आतां ऐसें बोलोनि वचन। शीघ्रचि गमन आरंभीलें ॥ २४ ॥ आरंभीलें तेणें ब्रह्मांडगमन। पावला भुवनं[7] नंदजीचें ॥ २५ ॥ नंदजीचें बाळ आलें मुळावरी। बैसऊनि नारी सांगतसे ॥ २६ ॥ सांगतसे ह्मणे हें तुह्मां वाईट। कुळाचा शेवट करूं आलें ॥ २७ ॥ करूं आलें घात सर्वांचें अनहित। वोखटें बहुत दिसतसे ॥ २८ ॥ दिसतसे दुष्ट सांगतों मी स्पष्ट। बुद्धीनें वरिष्ठ आह्मीं आह्मी ॥ २९ ॥ आह्मां तुह्मी माझे कीं हो यजमान। ह्मणोनि सांगणें लागे आह्मां ॥ ३० ॥ लागे आह्मां शब्द ऐसें न करावें। सत्वर वधावें लेंकुरासी ॥ ३१ ॥ लेंकुरासि क्रोध ऐकूनि वचन। मग पीडेदान आरंभीलें ॥ ३२ ॥ आरंभीलें थोर कठिण द्विजासीं[8]। उठोनि त्वरेसीं पळतसे ॥३३॥ पळतसे पुढें मागें पीडेदान। पृष्ठीचें कंदन[9] तें होतसे ॥३४॥ होतसे ताडन काष्ठाचें चहुंकडून। कष्टला ब्राह्मण पळतसे ॥ ३५ ॥ पळतसे भय भरलें अंतरीं। ह्मणे हरी हरी नारायणा ॥ ३६ ॥ नारायणें मज रक्षीलें जीवेसीं। दावी रायापासीं पृष्ठभाग ॥ ३७ ॥ पृष्ठभागीं थोर झालेंसे ताडण। भटो बहु शीण पाव-

---

१ सरस्वती. २ तोंडामध्यें. ३ कृष्णाचें. ४ बंदीशाळेंत. ५ आकाशांत. ६ पंचांग. ७ गृह, घर. ८ ब्राह्मणाला. ९ ताडण. मार.

लेती ॥ ३८ ॥ पावली ती पूतना ह्मणे काय झालें । बाळकें मारिलें ब्राह्मणासी ॥ ३९ ॥ ब्राह्मणासी जेणें दिल्हें पीढेदान । तयासी मारीन शीघ्रकाळें ॥ ४० ॥ शीघ्रकाळें विषें भरी पयोधर । पावली मंदिर पूतना ते ॥ ४१ ॥ पूतना मावशी होय गोविंदासी । ह्मणोनी वेगेंसी पाहों आली ॥ ४२ ॥ पाहों आली परी कपट अंतरीं । भाव वरीवरी दावीतसे ॥ ४३ ॥ दावीतसे भाव शब्दाचें लाघव । जाणीयेली मात्रें बालकानें ॥ ४४ ॥ बाळकासी पुढें घेऊनि चुंबन । देत स्तनपान आदरेंसी ॥ ४५ ॥ आदरेंसी हरी स्तनपान करी । पूतना अंतरीं जाजावली ॥ ४६ ॥ जाजावली ह्मणे पुरे बापा आतां । जाऊं दे अनंता सोड वेगीं ॥ ४७ ॥ सोड वेगीं होतें लोटिलें श्रीमुख । निघेना बाळक शोषीतसे ॥ ४८ ॥ शोषिली पूतना आक्रंदे मानसीं । मुकली प्राणासी कृष्णमुखें ॥ ४९ ॥ कृष्णमुखें रिठासूर रगडीला । लातीं विदारीला शकटासुर ॥ ५० ॥ शकटासुर लातीं हाणे बाळपणीं । वृक्ष उन्मळोनी सांगतसे ॥ ५१ ॥ सांगतां सांगतां देवें गिळियेला । उदरीं दाविला विश्वलोक ॥ ५२ ॥ विश्वलोक नांदे जयाचे अंतरीं । गाई राखे हरी गौळियांच्या ॥ ५३ ॥ गौळियांच्या गाई राखी तये वेळीं । खेळे चेंडूफळी गोपाळांसी ॥ ५४ ॥ गोपाळांसीं चेंडू खेळतां । उडाला । जाउनी बुडाला डोहामध्यें ॥ ५५ ॥ डोहामध्यें कृष्णें टाकियेली उडी । पहाताती थडी सवंगडे ॥ ५६ ॥ सांगताती कृष्ण बुडाला तुमचा । जेथें काळीयाचा डोहो आहे ॥ ५७ ॥ डोहो आहे तेथें दाविती गोपाळ । मिळाले सकळ विश्वजन ॥ ५८ ॥ विश्वजन सर्व पहाती गोविंदा । आक्रंदे यशोदा दीनरूप ॥ ५९ ॥ दीनरूप माता करीते रोदन । संबोखिती[३] जन यशोदेसी ॥ ६० ॥ यशोदेसी ठाव दाविला गोपाळीं । मोडली डाहाळी कळंबाची ॥६१॥ कळंबाची छाया दिसे जळावरी । बुडाला श्रीहरी तये ठाईं ॥६२॥ तयेठाईं माता घालूं पाहे उडी । धरिती देवगडी नगरलोक ॥ ६३॥ नगरलोक सर्व गोपाळ रुदती । गाई हंबरती कृष्णालागीं ॥ ६४ ॥ कृष्णालागीं सर्व जन आक्रंदती । मग संबोखिती येरयेरां ॥ ६५ ॥ येरयेरां संबोखूनियां निघाले । कृष्णें काय केलें डोहामाजीं ॥ ६६ ॥ डोहामाजीं क्रूर काळिया विखार[४] । परस्परें थोर युद्ध झालें ॥ ६७ ॥ युद्ध झालें थोर काळिया नाथिला[५] । गोकुळासी आला कृष्णनाथ ॥ ६८ ॥ कृष्णनाथें अघबक विभांडिले । धेनुका मारिलें आपटूनी ॥ ६९ ॥ आपटूनी मांडी खेळती गोपाळ । घुमरी कल्लोळ पावयांचे ॥ ७० ॥ पावयांचे नाद वाजती मोहरी । तेणें नगरनारी लुब्ध होती ॥७१॥ लुब्ध होती पक्षी नर वनचर । यमुनेचें नीर तुंबळलें ॥७२॥ तुंबळले गोप लागला वणवा । गिळूनियां अश्वा-वधीयेलें ॥ ७३ ॥ वधीयेलें कृष्णें पन्नग आवर्ता । दुष्ट तृणावर्ता मारियेलें ॥ ७४ ॥ मारीयेला गर्व थोर ब्राह्मणाचा । जाहाला सर्वांचा समुदाय ॥ ७५ ॥ समुदाय सर्व गोपाळ स्वजन । बळें गोवर्धन उचलीला ॥७६॥ उचलीला तळीं राखिलें गोकुळ । इंद्राचा सकळ गर्व नेला ॥ ७७ ॥ नेलें मथुरेसी अक्रूरें कृष्णासी । मल्ल चाणूरासी वधीयेलें ॥ ७८ ॥ वधीयेला कंस घातलें आसंन । तेथें उग्रसेन बैसवीला ॥ ७९ ॥ बैसवीला उग्रसेन नृपासनीं । चैद्यासी[६] त्रासुनी मारियेलें ॥ ८० ॥ मारी शिशुपाळ आणि भौमासुर । वधीला असुर जरासंध ॥ ८१ ॥ जरासंध काळयवन महासुर । मारीले असुर थोर थोर ॥ ८२ ॥ थोर ख्याती केली अर्जुना रक्षीलें । सर्वें

१ स्तन. २ कपट. ३ समजूत घालतात. ४ सर्प. ५ नाहींसा केला. ६ शिशुपाळाला.

साह्य केलें पांडवांचें ॥ ८३ ॥ पांडवांचा सखा सर्व साहाकारी । संकटीं कैवारी द्रौपदीचा ८४ द्रौपदीचा सखा द्वारकेभीतरीं । सोळा सहस्र नारी गोपांगना ॥ ८५ ॥ गोपांगना राधा रु-क्मिणी सुंदरी । सुखें राज्य करी यादवांसी ॥ ८६ ॥ यादवांसी शाप दिल्हा ऋषीश्वरीं । मांडिली बोहरी तेणें मिसें ॥ ८७ ॥ तेणें मीसें सर्व आटले यादव । ते काळीं उद्धव उपदेशिला ॥ ८८ ॥ उपदेशिला दास श्रीकृष्णें आपुला । अवतार झाला पूर्ण आतां ॥ ८९ ॥

# वैराग्यशतक.

नमन योगिया स्वामी दत्तात्रया । गाईन ओविया संसारींच्या ॥ १ ॥ संसारींचें दुःख आ-ठविलें मनीं । मागें नाना योनी भोगियेल्या ॥ २ ॥ भोगीयेल्या परी नाहीं आठवण । दुःख तें कठीण विसरलों ॥ ३ ॥ विसरलों राम चित्तीं दृढ काम । तेणें गुणें श्रम थोर झाला ॥४॥ झालों कासावीस थोर गर्भवासीं । नको त्या दुःखासी सांगवेना ॥ ५ ॥ सांगवेना शीण अ-त्यंत कठीण । रामा तुजवीण दुःख झालें ॥ ६ ॥ दुःख झालें भारी मातेच्या उदरीं । नवमास वरी कोंडीयेलें ॥ ७ ॥ कोंडीयेलें मज अत्यंत सांकडीं । रामा कोण सोडी तुजवीण ॥ ८ ॥ तुजवीण मज जाहलें बंधन । जठरीं शयन जननीचे ॥ ९ ॥ जननीचें जठर संकोचित थोर । विष्ठा आणि मूत्र नाकीं तोंडीं ॥ १० ॥ नाकीं तोंडीं जंत वांती आणि पित्त । निर्बुजलें चित्त वायु नाहीं ॥ ११ ॥ वायु नाहीं जेथें वन्हीचा उबारा । तेणें या शरीरा दुःख होय ॥१२॥ दुःख होय थोर सर्वांग आहाळे । तेणें गुणें पोळे अस्थिमात्र ॥ १३ ॥ अस्थिमात्र पंजर शिरीं वेटा-ळिला । नाहीं गुंडाळीला मेदमांसें ॥ १४ ॥ मेदमांस कृमी कुत्सित कातडी । गळती आंतडीं लवथवीत ॥ १५ ॥ ऐसें अमंगळ अत्यंत कुश्चीळ । प्राण हा व्याकूळ होय दुःखें ॥ १६ ॥ दुःखें आला त्रास तेणें कोंडे श्वास । कोंडिलें उबेस घेतां नये ॥ १७ ॥ नये नये येतां सर्वथा बाहेरी । ऐसी दाटी थोरी उकडीलों ॥ १८ ॥ उकडीतां प्राणी करी तळमळ । तंव जन्मकाळ आला पुढें ॥ १९ ॥ आलें पुढें अंत काळींचें संकट । कष्टावरी कष्ट थोर झाले ॥ २० ॥ थोर झाले कष्ट मातेच्या उदरीं । शीणलों श्रीहरी दास तुझा ॥ २१ ॥ दास्य मी करीन ऐसें होतें ध्यान । जन्मकाळीं प्राण गेला माझा ॥ २२ ॥ गेला माझा प्राण झालें विस्मरण । स्वामीचे चरण विसरलों ॥ २३ ॥ विसरलों सोऽहं मग ह्मणे कोऽहं । जन्मकाळीं बहु दुःख झालें ॥ २४ ॥ दुःखें दुखावलों ह्मणे आहा आहा । जन ह्मणे टाहा फोडीयेला ॥ २५ ॥ फोडीयेला टाहो पडतां भूमीवरी । दिव-सेंदिवस हरी विसरलों ॥ २६ ॥ विसरलों बुद्धि स्वहिताची शुद्धि । अज्ञानाची वृद्धि होत असे ॥ २७ ॥ होत असे वृद्धी दृढ देहबुद्धि । तुज कृपानिधी अंतरलों ॥ २८ ॥ अंतरलों सुख तुज विसंबेतां । विषय भोगीतां दुःख झालें ॥ २९ ॥ दुःख झालें फार ऐसा हा संसार । पुढें षड्विकार उद्भवले ॥ ३० ॥ उद्भवले तेणें सुख दुःख कळे । प्राण हा आंदोळे दुःख होतां ॥ ३१ ॥ दुःख होय देहीं माता नेणे कांहीं । मज

१ नाश. २ संकटामध्यें. ३ घाबरलें. ४ पोळलें. ५ टाकतां. ६ होणें, असणें, वाढणें, परिणाम पावणें क्षीण होणें, मरणें हे सहा विकार.

वाचा नाहीं काय करूं ॥ ३२ ॥ काय करूं दुःखें पोळे अभ्यंतर । मातेसी अंतर जाणवेना ॥ ३३ ॥ जाणवेना माझें दुःख मी अज्ञान । मग मी रोदन करीं देवा ॥ ३४ ॥ करी देवा आतां माझी सोडवण । दुःख हें दारुण भोगवेना ॥ ३५ ॥ भोगवेना दुःख संसारीचें आतां । धांव बा अनंता पाव वेगीं ॥ ३६ ॥ पाव वेगीं दास सोडवी आपुले । लोभेंचि वाहिले मायाजाळीं ॥ ३७ ॥ मायाजाळीं झालें दृढ माझें मन । रामा तुझें नाम आठवेना ॥ ३८ ॥ आठवेना चित्तीं स्वहिताचें ज्ञान । मायबापें लग्न केलें लोभें ॥ ३९ ॥ लोभें लग्न केलें मानीली आवडी । पायीं ओविली बेडी बंधनाची ॥ ४० ॥ बंधनाची बेडी प्रबळला काम । मग कैंचा राम आठवेना ॥ ४१ ॥ आठवेना राम स्वामी त्रैलोक्याचा । झालों कुटुंबाचा भारवाही ॥ ४२ ॥ भारवाही झालों रामा अंतरलों । बंधनीं पडलों काय करूं ॥ ४३ ॥ काय करूं मज कामाचें सांकडें । संसाराचें कोडें उगवेना ॥ ४४ ॥ उगवेना मन आठवे कांचन । सर्वकाळ ध्यान प्रपंचाचें ॥ ४५ ॥ प्रपंचाचें ध्यान लागलें मानसीं । चिंता अहर्निशीं दुश्चंचळ ॥ ४६ ॥ चंचळ मानस संसारउद्वेगें । क्षणक्षणीं भंगे चित्तवृत्ती ॥ ४७ ॥ वृत्ती कांता धन पाहे जनमान । इच्छेनें बंधन दृढावलें ॥ ४८ ॥ दृढावलें वोस प्रपंचाच्या माथा । तेणें गुणें व्यथा थोर झाली ॥ ४९ ॥ थोर होय व्यथा तारुण्याच्या भरें । कामाचें का[१]रें आवरेना ॥ ५० ॥ आवरेना क्रोध तेणें होय खेद । वृत्तीचा उच्छेद करूं पाहे ॥ ५१ ॥ करूं पाहे घात थोर पुढीलाचा । मार्ग स्वहिताचा अंतरलों ॥ ५२ ॥ अंतरलों भक्ती ठाकेना वि[२]रक्ती । देवा तुझी प्राप्ती केवीं घडे ॥ ५३ ॥ केवीं घडे प्राप्ती मज पतितासी । झाल्या पापराशी सांगूं किती । ५४ ॥ सांगूं किती दोष झाले लक्ष कोटी । पुण्य माझे गांठीं आढळेना ॥ ५५ ॥ आढळेना पुण्य पापाचे डोंगर । करितां संसार माझें माझें ॥ ५६ ॥ माझी माता पिता माझे बंधू जन । कन्या पुत्र धन सर्व माझे ॥ ५७ ॥ सर्व माझें ऐसा मानिला भरंवसा । तुज जगदीशा वीसरलों ॥ ५८ ॥ वीसरलों तूज वैभवाकरितां । शे[३]वटीं माता पिता राम[४] झालीं ॥ ५९ ॥ राम झाली माता देखत देखतां । तरी म्हणे कांता पुत्र माझे ॥ ६० ॥ माझे पुत्र माझे स्वजन सोयरे । दृढ देहीं भरे अहंभाव ॥ ६१ ॥ अहंभावें मनीं दुःख आच्छादूनी । वर्ततसें जनीं अभिमानें ॥ ६२ ॥ अभिमान माथां वाहे कुटुंबाचा । अंतरीं सुखाचा लेश नाहीं ॥ ६३ ॥ नाहीं नाहीं सुख संसारीं पहातां । पुरे देवा आतां जन्म नको ॥ ६४ ॥ नको नको आतां घालूं या संसारीं । पोळलों अंतरीं काय करूं ॥ ६५ ॥ काय करूं माझें नेणती स्वहित । आपुलालें हित पहातात ॥ ६६ ॥ पहातात सुख वैभवाचीं सर्वी । कोणी मज शेवटीं कामा नये ॥ ६७ ॥ कामा नये कोणी तुजवीण रामा । नेई निजधामा माहीयेरा ॥ ६८ ॥ माहेरई माझें अंतरलें दुरी । लोभें दुराचारीं गोवीयेलें ॥ ६९ ॥ गोवीयेलें मज आपुलीया हिता । माझी कोणी चिंता केली नाहीं ॥ ७० ॥ केली नाहीं चिंता लोभें गुंडाळीलें । पि[५]ळूनी घेतलें सर्व माझें ॥ ७१ ॥ सर्व माझें गेलें झालें निःकारण । स्वामीचे चरण अंतरलों ॥ ७२ ॥ अंतरलों देवा आयुष्य वेंचलें । अंतर पडलें काय करूं ॥ ७३ ॥ काय करूं

१ वेड. २ वैराग्य. ३ शेवटीं. ४ मेलीं. ५ खाचिलें.

साह्य केलें पांडवांचें ॥ ८३ ॥ पांडवांचा सखा सर्व साहाकारी । संकटीं कैवारी द्रौपदीचा ८४ द्रौपदीचा सखा द्वारकेभीतरीं । सोळा सहस्र नारी गोपांगना ॥ ८५ ॥ गोपांगना राधा रुक्मिणी सुंदरी । सुखें राज्य करी यादवांसी ॥ ८६ ॥ यादवांसी शाप दिल्हा ऋषीश्वरीं । मांडिली बोहरी तेणें मिसें ॥ ८७ ॥ तेणें मीसें सर्व आटले यादव । ते काळीं उद्धव उपदेशिला ॥ ८८ ॥ उपदेशिला दास श्रीकृष्णें आपुला । अवतार झाला पूर्ण आतां ॥ ८९ ॥

# वैराग्यशतक.

नमन योगिया स्वामी दत्तात्रया । गाईन ओविया संसारींच्या ॥ १ ॥ संसारींचें दुःख आठविलें मनीं । मागें नाना योनी भोगियेल्या ॥ २ ॥ भोगीयेल्या परी नाहीं आठवण । दुःख तें कठीण विसरलों ॥ ३ ॥ विसरलों राम चित्तीं दृढ काम । तेणें गुणें श्रम थोर झाला ॥४॥ झालों कासावीस थोर गर्भवासीं । नको त्या दुःखासी सांगवेना ॥ ५ ॥ सांगवेना शीण अत्यंत कठीण । रामा तुजवीण दुःख झालें ॥ ६ ॥ दुःख झालें भारी मातेच्या उदरीं । नवमास वरी कोंडीयेलें ॥ ७ ॥ कोंडीयेलें मज अत्यंत सांकडीं । रामा कोण सोडी तुजवीण ॥ ८ ॥ तुजवीण मज जाहलें बंधन । जठरीं शयन जननीचे ॥ ९ ॥ जननीचें जठर संकोचित थोर । विष्ठा आणि मूत्र नाकीं तोंडीं ॥ १० ॥ नाकीं तोंडीं जंत वांती आणि पित्त । निर्बुजलें चित्त वायु नाहीं ॥ ११ ॥ वायु नाहीं जेथें वन्हीचा उबारा । तेणें या शरीरा दुःख होय ॥१२॥ दुःख होय थोर सर्वांग आहाळे । तेणें गुणें पोळे अस्थिमात्र ॥ १३ ॥ अस्थिमात्र पंजर शिरीं वेटाळिला । नाहीं गुंडाळीला मेदमांसें ॥ १४ ॥ मेदमांस कृमी कुत्सित कातडी । गळती आंतडीं लवथवीत ॥ १५ ॥ ऐसें अमंगळ अत्यंत कुश्चीळ । प्राण हा व्याकूळ होय दुःखें ॥ १६ ॥ दुःखें आला त्रास तेणें कोंडे श्वास । कोंडिलें उबेस घेतां नये ॥ १७ ॥ नये नये येतां सर्वथा बाहेरी । ऐसी दाटी थोरी उकडीलों ॥ १८ ॥ उकडीतां प्राणी करी तळमळ । तंव जन्मकाळ आला पुढें ॥ १९ ॥ आलें पुढें अंत काळींचें संकट । कष्टावरी कष्ट थोर झाले ॥ २० ॥ थोर झाले कष्ट मातेच्या उदरीं । शीणलों श्रीहरी दास तुझा ॥ २१ ॥ दास्य मी करीन ऐसें होतें ध्यान । जन्मकाळीं प्राण गेला माझा ॥ २२ ॥ गेला माझा प्राण झालें विस्मरण । स्वामीचे चरण विसरलों ॥ २३ ॥ विसरलों सोऽहं मग ह्मणे कोऽहं । जन्मकाळीं बहु दुःख झालें ॥ २४ ॥ दुःखें दुखावलों ह्मणे आहा आहा । जन ह्मणे टाहा फोडीयेला ॥ २५ ॥ फोडीयेला टाहो पडतां भूमीवरी । दिवसेंदिवस हरी विसरलों ॥ २६ ॥ विसरलों बुद्धि स्वहिताची शुद्धि । अज्ञानाची वृद्धि होत असे ॥ २७ ॥ होत असे वृद्धी दृढ देहबुद्धि । तुज कृपानिधी अंतरलों ॥ २८ ॥ अंतरलों सुख तुज विसंबेतां । विषय भोगीतां दुःख झालें ॥ २९ ॥ दुःख झालें फार ऐसा हा संसार । पुढें षड्विकार उद्भवले ॥ ३० ॥ उद्भवले तेणें सुख दुःख कळे । प्राण हा आंदोळे दुःख होतां ॥ ३१ ॥ दुःख होय देहीं माता नेणे कांहीं । मज

---

१ माश. २ संकटामध्यें. ३ घाबरलें. ४ पोळलें. ५ टाकतां. ६ होणें, असणें, वाढणें, परिणाम पावणें क्षीण होणें, मरणें हे सहा विकार.

वाचा नाहीं काय करूं ॥ ३२ ॥ काय करूं दुःखें पोळे अभ्यंतर । मातेसी अंतर जाणवेना ॥ ३३ ॥ जाणवेना माझें दुःख मी अज्ञान । मग मी रोदन करीं देवा ॥ ३४ ॥ करी देवा आतां माझी सोडवण । दुःख हें दारुण भोगवेना ॥ ३५ ॥ भोगवेना दुःख संसारीचें आतां । धांव बा अनंता पाव वेगीं ॥ ३६ ॥ पाव वेगीं दास सोडवी आपुले । लोभेंचि वाहिले मायाजाळीं ॥ ३७ ॥ मायाजाळीं झालें दृढ माझें मन । रामा तुझें नाम आठवेना ॥ ३८ ॥ आठवेना चित्तीं स्वहिताचें ज्ञान । मायबापें लग्न केलें लोभें ॥ ३९ ॥ लोभें लग्न केलें मानीली आवडी । पायीं ओविली बेडी बंधनाची ॥ ४० ॥ बंधनाची बेडी प्रबळला काम । मग कैंचा राम आठवेना ॥ ४१ ॥ आठवेना राम स्वामी त्रैलोक्याचा । झालों कुटुंबाचा भारवाही ॥ ४२ ॥ भारवाही झालों रामा अंतरलों । बंधनीं पडलों काय करूं ॥ ४३ ॥ काय करूं मज कामाचें सांकडें । संसाराचें कोडें उगवेना ॥ ४४ ॥ उगवेना मन आठवे कांचन । सर्वकाळ ध्यान प्रपंचाचें ॥ ४५ ॥ प्रपंचाचें ध्यान लागलें मानसीं । चिंता अहर्निशीं दुश्चंचळ ॥ ४६ ॥ चंचळ मानस संसारउद्वेगें । क्षणक्षणीं भंगे चित्तवृत्ती ॥ ४७ ॥ वृत्ती कांता धन पाहे जनमान । इच्छेनें बंधन दृढावलें ॥ ४८ ॥ दृढावलें वोस प्रपंचाच्या माथा । तेणें गुणें व्यथा थोर झाली ॥ ४९ ॥ थोर होय व्यथा तारुण्याच्या भरें । कामाचें का[१]वरें आवरेना ॥ ५० ॥ आवरेना क्रोध तेणें होय खेद । वृत्तीचा उच्छेद करूं पाहे ॥ ५१ ॥ करूं पाहे घात थोर पुढीलाचा । मार्ग स्वहिताचा अंतरलों ॥ ५२ ॥ अंतरलों भक्ती ठाकेना विरक्ती । देवा तुझी प्राप्ती केवीं घडे ॥ ५३ ॥ केवीं घडे प्राप्ती मज पतितासी । झाल्या पापराशी सांगूं किती । ५४ ॥ सांगूं किती दोष झाले लक्ष कोटी । पुण्य माझे गांठीं आढळेना ॥ ५५ ॥ आढळेना पुण्य पापाचे डोंगर । करितां संसार माझें माझें ॥ ५६ ॥ माझी माता पिता माझे बंधू जन । कन्या पुत्र धन सर्व माझे ॥ ५७ ॥ सर्व माझें ऐसा मानिला भरंवसा । तुज जगदीशा वीसरलों ॥ ५८ ॥ वीसरलों तूज वैभवाकरितां । शेवीं माता पिता रामें झालीं ॥ ५९ ॥ राम झाली माता देखत देखतां । तरी म्हणे कांता पुत्र माझे ॥ ६० ॥ माझे पुत्र माझे स्वजन सोयरे । दृढ देहीं भरे अहंभाव ॥ ६१ ॥ अहंभावें मनीं दुःख आच्छादुनी । वर्ततसें जनीं अभिमानें ॥ ६२ ॥ अभिमान माथां वाहे कुटुंबाचा । अंतरीं सुखाचा लेश नाहीं ॥ ६३ ॥ नाहीं नाहीं सुख संसारीं पहातां । पुरे देवा आतां जन्म नको ॥ ६४ ॥ नको नको आतां घालूं या संसारीं । पोळलों अंतरीं काय करूं ॥ ६५ ॥ काय करूं माझें नेणती स्वहित । आपुलालें हित पहातात ॥ ६६ ॥ पहातात सुख वैभवाचीं सखीं । कोणी मज शेवीं कामा नये ॥ ६७ ॥ कामा नये कोणी तुजवीण रामा । नेईं निजधामा माहीयेरा ॥ ६८ ॥ माहेरई माझें अंतरलें दुरी । लोभें दुराचारीं गोवीयेलें ॥ ६९ ॥ गोवीयेलें मज आपुलीया हिता । माझी कोणी चिंता केली नाहीं ॥ ७० ॥ केली नाहीं चिंता लोभें गुंडाळीलें । पिळूनी घेतलें सर्व माझें ॥ ७१ ॥ सर्व माझें गेलें झालें निःकारण । स्वामीचे चरण अंतरलों ॥ ७२ ॥ अंतरलों देवा आयुष्य वेंचलें । अंतर पडलें काय करूं ॥ ७३ ॥ काय करूं

१ वेड. २ वैराग्य. ३ शेवटीं. ४ मेलीं. ५ खाचेंलें.

आतां शरीरही गेलें । मज वोसंडिलें जीवालागीं ॥ ७४ ॥ जीवालागीं मज मोकळीक देवा । काय करूं हेवा प्रारब्धाचा ॥ ७५ ॥ प्रारब्धाचा ठेवा प्रपंचीं रंगला । देहांतीं खंगला वृद्धपणीं ॥ ७६ ॥ वृद्धपणीं माझें चळलें शरीर । श्रवण बधिर नेत्र गेले ॥ ७७ ॥ नेत्र गेले मज पहातां दिसेना । स्वयें उठवेना पाय गेले ॥ ७८ ॥ पाय गेले तेणें दुःख होय भारी । तेथेंचि बाहेरी जाववेना ॥ ७९ ॥ जाववेना तेणें झालें अमंगळ । अत्यंत कुश्चीळ वातपित्त ॥ ८० ॥ वात पित्त जन देखोनी पळती । दुर्गंधी गळती नवनाळीं ॥ ८१ ॥ नवनाळीं वाहे दुर्गंधी न साहे । वांती होऊं पाहे देखतांची ॥ ८२ ॥ देखतां सकळ सुटले पाझर । मळ मूत्र धीर धरवेना ॥ ८३ ॥ धरवेना क्षुधा निद्रा आणि तृषा । परधनीं आशा प्रबळली ॥ ८४ ॥ प्रबळली आशा झाली अनावर । चिंता तृष्णातुर सर्वकाळ ॥ ८५ ॥ सर्वकाळ चित्तीं थोर लोलंगता । खायासी मागतां नेदी कोणी ॥ ८६ ॥ नेदी कोणी कांहीं क्षीण झालों देहीं । जीवलग तेहीं वोसंडीले ॥ ८७ ॥ वोसंडीलें मज वैभव गेलीया । देह खंगलिया दुःख झालें ॥ ८८ ॥ दुःख झालें थोर क्षुधा आवरेना । अन्नही जिरेना वांति होय ॥ ८९ ॥ वांति होय तेणें निर्बुजे वासना । स्वादिष्ट चावेना दांत गेले ॥ ९० ॥ दांत गेले तेणें जिव्हेसी बोबडी । कंठ गडगडी बोलवेना ॥ ९१ ॥ बोलवेना अंतकाळींच्या विपत्ती । सर्वही ह्मणती मरेना कां ॥ ९२ ॥ मरेना कां आतां कासया वांचला- देवा वीसरला नेणोनियां ॥ ९३ ॥ नेणोनियां याची मर्यादा खुंटली । सकळां लागली चिंता मनीं ॥ ९४ ॥ चिंता मनीं वाटे कृत्याची सकळां । सर्वांसी कंटाळा आला थोर ॥ ९५ ॥ आला थोर त्रास जिवलग बोलती । देवा याची माती उचलावी ॥ ९६ ॥ उचलावी माती सर्वांचे अंतरीं । सुखाचीं सोयरीं दुरी ठेलीं ॥ ९७ ॥ दुरी ठेले सर्व दुःखाचीं चोरटीं । कोणीच संकटीं सोडवीना ॥ ९८ ॥ सोडवीना कोणी श्रीरामावांचूनी। संकटीं धांवणी राम करी ॥ ९९ ॥ राम करीतसे दासाचा सांभाळ । भक्तांचा स्नेहाळ राम माझा ॥ १०० ॥

## ज्ञानशतक.

संतांचे संगतीं काय प्राप्त होतें । तें आह्मां निरुतें सांगईन ॥ १ ॥ सांगईन परी मानसीं धरावें । मग उद्धरावें या संसारीं ॥ २ ॥ संसारींचें सार जया नाश नाहीं । तेंचि पडे ठाईं संतसंगें ॥ ३ ॥ संतसंगें चुके जननीजठर । दुस्तर संसार मायाजाळ ॥ ४ ॥ मायाजाळ तुटे तरी देव भेटे । संतसंगें आटे भवसिंधू ॥ ५ ॥ भव भयानक बुडवी सकळां । त्याहूनि वेगळा साधुसंग ॥ ६ ॥ साधुसंग साधी असाध्य वस्तूसी । जेथें आहे त्यासी वाट नाहीं ॥ ७ ॥ वाट नाहीं जेथें जावया इतरा । अभाविक नरा पापबुद्धी ॥ ८ ॥ पापबुद्धी झडे संतांचे संगतीं । नाहीं अधोगती गर्भवास ॥ ९ ॥ गर्भवास संतसंगें मुक्त होय । वेगीं धरी सोय आलीया रे ॥ १० ॥ आलीया संसारीं स्वहित विचारी । एके भावें धरीं संतसंग ॥ ११ ॥ संतसंग धरी धन्य तो संसारी

१ सोडलें. २ आसक्ती. ३ देत नाहीं. ४ जन्म घेणें. ५ संसारसागर. ६ नरकवास.

बोलिले श्रीहरी भागवतीं ॥ १२ ॥ भागवत गीता सार निरूपण । त्याचें विवरण संतसंगें ॥ १३ ॥ संतसंगें कळे सर्व शास्त्रभाग । आणि ज्ञानयोग अप्रयासें ॥ १४ ॥ प्रयासें साधितां कधीं नये हाता । तें लाभे तत्त्वतां साधुसंगें ॥ १५ ॥ साधूचेनी संगें अलभ्याचा लाभ । मुक्ती हे सुलभ होत आहे ॥ १६ ॥ आहे एक देव परी तो वळेना । जयासी मिळेना संतसंग ॥१७॥ संतसंग नाहीं जयालागीं जनीं । तया कां जननी प्रसवली ॥ १८ ॥ प्रसवली माता शीणचि उरला । पुत्र नाहीं झाला हरिभक्त ॥ १९ ॥ हरिभक्त नर वंशाचें मंडण । दोषाचें खंडण करीतसे ॥ २० ॥ करीतसे भक्ती संताचे संगतीं । सायुज्यतामुक्ती पावावया ॥ २१ ॥ पावावया मुक्ती हरीचें भजन । श्रवण मनन सर्वकाळ ॥ २२ ॥ सर्वकाळ होय सार्थक श्रवणें । ब्रह्मनिरूपणें संतसंगें ॥ २३ ॥ संतसंगें ब्रह्मपद ओळखावें । विवेकें पावावें निरंजन ॥ २४ ॥ निरंजना आतां नाहीं जन वन । अंत्राळीं गमन एकाएकीं ॥ २५ ॥ एकाएकीं देव निर्मळ निश्चळ । आतुंडे प्रांजळ दुजेवीण ॥ २६ ॥ दुजेवीण देव एकला एकट । उभा घनदाट मागें पुढें ॥२७॥ मागें पुढें सर्व देवांचा नायक । सांपडे विवेक झालीयानें ॥२८॥ झालीयानें कृपा संतसज्जनांची । मग विवेकाची वाट फुटे ॥ २९ ॥ वाट अवघड पाहांता दिसेना । जेथें नाहीं मना समागम ॥ ३० ॥ समागमें जातां वाटचि फुटेना । संशय तुटेना बहुविध ॥ ३१ ॥ बहुविध पंथ कोणें तो धरावा । दुजेपणीं देवा पावीजेना ॥ ३२ ॥ पावीजेना देव संतसंगावीण । मार्ग हा कठीण विवेकाचा ॥ ३३ ॥ विवेकाचा मार्ग विवेकें चालावा । मनाचा त्यागावा संग सर्व ॥३४॥ सर्व त्याग करी पावसी श्रीहरी । परी एक धरी संतसंग ॥ ३५ ॥ संतसंगावीण त्याग हा घडेना । श्रीहरी पडेना कदा ठायीं ॥ ३६ ॥ ठाव सज्जनाचा सज्जन जाणती । तेथें नाहीं गती मीपणाची ॥३७॥ मीपणाची गती संगाचें लक्षण । ठाउकी ही खूण सज्जनाची ॥३८॥ सज्जनाचें वर्म सज्जनाला तुटे । उतारा कुवाटे मायाजळ ॥३९॥ मायाजाळ पाहों जातां आढळेना । सर्वथा कळेना न पाहतां ॥ ४० ॥ पाहतां संसार माईकें वेव्हार । परी निरंतर लागलासे ॥ ४१ ॥ लागला दिसेना परी निरसेना । माईक वासना सत्य झाली ॥ ४२ ॥ सत्य झाली असे विवेकें निरसे । निरसोनी वसे जवळीच ॥ ४३ ॥ जवळीच आहे अंतरीं चोरटा । आतां कोण्या वाटा धांवसील ॥४४॥ धांवसील परी वासना सरेना । सर्वथा मरेना साधूवीण ॥ ४५ ॥ साधूवीण प्राणी पडती आटणीं । तप तीर्थाटणीं नाना कर्मीं ॥ ४६ ॥ नाना कर्मीं देव चुकोनी राहिला । सज्जनीं पाहिला अनुभवें ॥ ४७ ॥ अनुभव सर्व देहीं वेगळाले । कोण झाले भले संतजन ॥ ४८ ॥ संतजन परी कोण ओळखावे । कैसे ते जाणावे साधूजन ॥ ४९ ॥ साधूची वोळखी साधू वोळखीला । येर भांबावला माया धरी ॥५०॥ माया धरी प्राणी जवळी चूकले । नाहीं वोळखीले साधूजन ॥ ५१ ॥ साधूजन कोण कसें वोळखण । तेंचि निरूपण सांगितलें ॥५२॥ सांगितलें आहे मागें थोरथोरीं । तेंचि अवधारी आलीया रे ॥५३॥ आलीया रे साधू जाणावा कवणें । तयाचीं लक्षणें असंख्यात ॥ ५४ ॥ असंख्यात परी ओळखीकारणें । साधू पूर्णपणें सारिखाची ॥ ५५ ॥ सारिखाची दिसे जनाचीयापरी । परी तो अंतरीं वेगळाची ॥ ५६ ॥ वेगळाची ज्ञानें पूर्ण समाधानें । स्वस्वरूपीं मनें वस्ती केली ॥५७॥ वस्ती

१ अप्रमावांचून. २ सफलता. ३ सांपडतो. ४ खूण. ५ लटका. ६ इतर. ७ ध्यानांत घे. ८ ब्रह्मस्वरूपीं.

केली मनें निर्गुणीं सर्वदा । मीपणें आपदा तया नाहीं ॥ ५८ ॥ तया नाहीं काम तया नाहीं क्रोध । तया नाहीं खेद स्वार्थबुद्धी ॥ ५९ ॥ बुद्धी निश्चयाची स्वरूपीं तयाची । कल्पना ठाईंची निर्विकल्प ॥ ६० ॥ निर्विकल्प मद मत्सर सारीला । आणि संहारीला लोभ दंभ ॥ ६१ ॥ दंभ हा लौकीक विवेकें सांडला । दुरी वोलंडला अहंकार ॥ ६२ ॥ अहंकार नाहीं दुराशा अंतरीं । ममता ही दोरी मोकळली ॥ ६३ ॥ मोकळली भ्रांती शरीरसंपत्ती । वैभवसंगतीं लोलंगता ॥ ६४ ॥ लोलंगता नसे ज्ञानें धालेपणें । ऐसीं हीं लक्षणें सज्जनांचीं ॥ ६५ ॥ सज्जनलक्षणें सांगेन पुढतीं । आर्त चित्तवृत्ती लांचावली ॥ ६६ ॥ लांचावली वृत्ती सज्जन सांगतां । होय सार्थकता जयांचेनी ॥ ६७ ॥ जयांचेनी ज्ञानें तरती अज्ञान । साधूसंगतीनें समाधान ॥ ६८ ॥ समाधानें शांती क्षमा आणि दया । रंक आणि राया सारिखाची ॥ ६९ ॥ सारिखाची शोध तेथें नाहीं भेद । सर्वांसी अभेद सर्व काळ ॥ ७० ॥ सर्व काळ गेला श्रवणें मननें । सत्क्रिया साधनें हरिभक्ती ॥ ७१ ॥ हरिभक्ति करी जन तारावया । स्वधर्मा विलया जाऊं नेदी ॥ ७२ ॥ जाऊं नेदी भक्ति जाऊं नेदी ज्ञान । अनुतापीं मन निरंतर ॥७३॥ निरंतर भाव सगुणीं भजन । येणें बहुजन उद्धरती ॥ ७४ ॥ उद्धरती जन करितां साधन । क्रियेचें बंधन आचरतां ॥ ७५ ॥ आचरतां साधुजना होय बोधू । लागतसे वेधू भक्तिभावें ॥ ७६ ॥ भक्तिभावें देवप्रतिष्ठा पूजन । कथा निरूपण महोत्सव ॥ ७७ ॥ महोत्सव साधुभक्तीचें लक्षण । करी तीर्थाटणें[2] आदरेंसी ॥ ७८ ॥ आदरेंसी विधी करणें उपाधी । लोकांतें सद्बुद्धी लागावया ॥ ७९ ॥ लागावया बुद्धी सत्क्रिया भजन । करितो सज्जन मुक्तिदाता ॥ ८० ॥ मुक्तिदाता साधू तोचि तो जाणावा । जेणें संपादावा लोकाचार ॥ ८१ ॥ लोकाचार करी तो जना उद्धरी । ज्ञाता अनाचारी कामा नये ॥८२॥ नये नये निंदूं जनीं जनार्दन । ह्मणोनि सज्जन क्रियावंत ॥ ८३ ॥ क्रियावंत साधू विरक्त विवेकी । तोचि तो लौकिकीं मान्य आहे ॥८४॥ मान्यता सत्क्रिया लौकीक सोडीला । तोचि उद्धरिला जनीं नाहीं ॥ ८५ ॥ जनीं नाहीं मान्य तो सर्व अमान्य । ह्मणोनियां धन्य क्रियावंत ॥ ८६ ॥ क्रियावंत तेणें लौकिक सोडावें । आणि वसवावें ब्रह्मारण्य ॥ ८७ ॥ ब्रह्मारण्य सेवी साधू तो एकला । जना नाहीं आला उपेगासी[3] ॥ ८८ ॥ उपेगासी येणें जना पूर्णपणें । तयाचीं लक्षणें निरूपीलीं ॥ ८९ ॥ निरूपिलीं येणें लक्षणें जाणावा । साधू वोळखावा मुमुक्षूनें[4] ॥ ९० ॥ मुमुक्षूनें गुरू क्रियाभ्रष्ट केला । तरी अंतरला दोहीं पक्षीं ॥ ९१ ॥ दोहीं पक्षीं शुद्ध तया ज्ञानबोध । येर तें अबद्ध अनाचार ॥ ९२ ॥ अनाचार करिसा कोण आहे जनीं । परी निरूपणीं बोलिजेतें ॥ ९३ ॥ बोलिजे साचार सत्य निरूपणीं । घडे ते करणी सुखें करूं ॥ ९४ ॥ करूं नये कदा मिथ्या निरूपण । करितां दूषण लागों पाहे ॥ ९५ ॥ पाहें पाहें बापा साधी ते शोधुनी । ठाकेना ह्मणोनी निंदूं नको ॥ ९६ ॥ निंदूं नको शास्त्र निंदूं नको वेद । तरीच स्वानंद पावसील ॥ ९७ ॥ पावसील राम जिवाचा विश्राम । अहंतेचा श्रम सांडितांचि ॥ ९८ ॥ सांडितां विवेकें मिथ्या अभिमान । तरी समाधान पावसील ॥ ९९ ॥ पावसील गती शुद्ध निरूपणें । रामदास ह्मणे क्षमा करी ॥ १०० ॥

---

१ तृप्तीनें. २ पुण्य क्षेत्रांच्या यात्रा करणें. ३ उपयोगाला. ४ मोक्ष इच्छिणाऱ्यानें.

# उपदेशशतक.

उपदेशरीती आतां सांगईन । होईं सावधान आलीया रे ।। १ ।। आलीया रे सांग तूं कोण आहेसी । वेगीं आपणासी ठाईं पाडी ॥ २ ॥ ठाईं पाडी तूज तूंचि चुकलासी । देहाचा धरीसी अभिमान ।। ३ ।। अभिमान देहीं कोण वाहे यांचा । पांचां पंचकांचा स्थूळदेह ॥ ४ ॥ स्थूळदेह दृश्य याचा तूं जाणता । देह मी ह्मणतां जीवदशा ।। ५ ॥ जीवदशा गेली साक्षित्वें वर्ततां । ईश्वर तत्त्वतां याचें नांव ॥ ६ ॥ नांव रूप देहीं साक्षी तो विदेही । या विवेकीं नाहीं देहबुद्धी ।। ७ ॥ देहबुद्धी भाव या स्थूळदेहाचा । उरे संदेहाचा लिंगदेह ॥ ८ ॥ लिंगदेह मन वासनेची वृत्ती । होतसे निवृत्ती साक्षीरूपें ॥ ९ ॥ साक्षिरूपें पांच पंचकें राहिलीं । जाणोनी सांडीलीं कर्णादिकें ।। १० ॥ कर्ण प्राण आणि विषयपंचक । इंद्रियदशक पंचवीस ॥ ११ ॥ पंचवीस तत्वें या लिंगदेहाचीं । साक्षी वेगळाची अनुभवें ।। १२ ॥ अनुभवें साक्षी स्थूलसूक्ष्माचा । जागृतीस्वप्नाचा जाणता तूं ॥ १३ ।। जाणता तूं कोण सांग ओळखण । नेणतां आपण आपणासी ॥ १४ ॥ आपणासी नेणें स्वामीनें सांगावें । अज्ञान जाणावें रूप तूझें ।। १५ ।। तुझें तूंची बापा नेणें ह्मणतोसी । तेंचि निश्चयेंसी रूप तूझें ॥ १६ ॥ रूप तूझें तुज दृश्य होत आहे । नेणपण पाहें साक्षिरूप ।। १७ ॥ साक्षिरूपें मज कळेना ह्मणसी । तो तूं निश्चयेंसी वेगळाचि ।। १८ ।। वेगळाचि तीहीं देहांविलक्षण । वर्ततो आपण साक्षीरूपें. ।। १९ ॥ साक्षिरूपें सर्व पदार्थ जाणता । तो कांहीं तत्त्वतां आत्मा नव्हे ।। २० ।। आत्मा नव्हे जाण जाणे अंतःकरण । नाहीं जाणपण आत्मरूपीं ।। २१ ।। आत्मरूपीं मन बुद्धी अगोचर । आठव विसर तेथें नाहीं ।। २२ ॥ तेथें नाहीं वृत्ती सर्वही निवृत्ती । जाणती नेणती वृत्ती बापा ॥ २३ ॥ वृत्तिरूप आत्मा हें केवीं घडावें । तेव्हां बिघडावें निवृत्तीसी ॥ २४ ।। निवृत्ती उन्मनी निःशब्द विज्ञान । ऐसें समाधान अनिर्वाच्य ॥ २५ ॥ अनिर्वाच्य येथें नाहीं जाणपण । आपुलें आपण पुरातन ॥ २६ ।। पुरातन एक प्रपंच माईक । मिथ्याचि अनेक भासमात्र ॥ २७ ॥ भासमात्र कांहीं नसोनियां आहे । विचारूनी पाहे अनुभवें ।। २८ ।। अनुभवावीण उडे जाणपण । जाणणें तो शीण वाऊगाची ।। २९ ॥ वाऊगाचि शीण करीतसे मन । आत्मज्ञान घन ह्मणोनियां ।। ३० ।। ह्मणोनियां मूळीं अज्ञानचि नाहीं । तेथें ज्ञान कांहीं वाऊगेंचि ।। ३१ ॥ वाऊगेंचि ज्ञान मनाची कल्पना । निर्विकल्प जाणा कल्पूं पाहे ।। ३२ ॥ कल्पूं पाहे मन कल्पनाविषय । तरी आत्मा काय विषयी ऐसा ।। ३३ ।। ऐसा नव्हे आत्मा मनासी आकळे । मनचि मावळे पाहूं जातां ॥ ३४ ॥ पाहूं जातां ज्यासी क्षय आहे त्यासी । ह्मणोनि मानसीं अगोचर ।। ३५ ।। अगोचर मना तें कैसें पाहावें । मीपणासी ठावें कदा नव्हे ।। ३६ ।। नव्हे जाण तैसें ऐसेंचि जाणावें । मना होय ठावें समाधान ।। ३७ ॥ समाधान तें तूं वाक्य तत्त्वमसी । सोहं हंस ऐसी मात ।। ३८ ।। आहे अहं ब्रह्म ऐसेंसि वचन । ब्रह्म सनातन तूंचि बापा ॥ ३९ ॥ तूंचि बापा ब्रह्म येरें सर्व भ्रम । दृढ धरी वर्म अंतरींचें ।। ४० ।। अंतरींचें वर्म अंतरीं धरावें । विचारें करावें

१ खरोखर. २ देहाभिमान. ३ परब्रह्मस्वरूपीं. ४ अनुभवज्ञान. ५ कल्पनाविरहित. ६ तें तूं आहेस. ७ तो मी, मी तो. ८ मी ब्रह्म. ९ इतर.

दृढतर ॥ ४१ ॥ दृढतर होय श्रवण मननें । अद्वैतचि मनें विचारावें ॥ ४२ ॥ विचारावें जना भक्तीचें लक्षण । वैराग्य तें कोण कैसें आहे ॥ ४३ ॥ आहे भक्ती कैसी विवेकें जाणावी । आवडी धरावी शाश्वताची ॥ ४४ ॥ शाश्वताची प्रीती विषयीं विरक्ती । नाशवंत चित्तीं जाणोनीयां ॥ ४५ ॥ जाणोनीयां सर्व नाशवंत ऐसें । शाश्वतीं विश्वासे मन बुद्धी ॥ ४६ ॥ बुद्धीचा निश्चय स्वरूपीं जाहला । प्राणी विश्वासला स्वस्वरूपीं ॥ ४७ ॥ स्वस्वरूपीं आसे क्रिया तेचि भक्ती । पहातां विभक्ती जेथें नाहीं ॥ ४८ ॥ जेथें नाहीं देहबुद्धीचें अज्ञान । तया नांव ज्ञान बोलीजेती ॥ ४९ ॥ बोलिजेती ज्ञानें सर्वसाक्षी-भूत । जाणावें अद्वैत तेंचि ज्ञान ॥ ५० ॥ ज्ञान आणि भक्ति एकचि असती । वैराग्याची स्थिती बोलिजेल ॥ ५१ ॥ बोलिजे वैराग्य त्यागाचें लक्षण । साक्षी विलक्षण जाणोनियां ॥ ५२ ॥ जाणोने माईक सर्वहि त्यागिलें । मन सुखावलें संगत्यागें ॥ ५३ ॥ संगत्याग केला निःसंग जाहला । सर्वेहि एकला एकरूप ॥ ५४ ॥ एकरूप झालें भक्ती आणि ज्ञान । बुडालें साधन वैराग्याचें ॥ ५५ ॥ वैराग्यावांचून सर्व खंडे ज्ञान । त्यागाचें लक्ष-ण जेथें नाहीं ॥ ५६ ॥ नाहीं भक्तिभाव सगुणाचें ठाईं । शब्दज्ञान कांहीं बोलोनियां ॥ ५७ ॥ बोलोनीयां मुखें तैसी क्रिया करी । धन्य तो संसारीं ब्रह्मज्ञानी ॥ ५८ ॥ ब्रह्मज्ञानी भला वर्तणुके नासी । कोरड्या शब्दांसी कोण पुसे ॥ ५९ ॥ कोण पुसे बापा ज्ञान हें शाब्दिक । क्रिया अलोलीक सत्य जाण ॥ ६० ॥ सत्य जाणा भक्ती शरीरें करावी । आवडी धरावी सगुणाची ॥ ६१ ॥ सगुणीं आदरें देहा झीजवावें । भजन करावें नवविधा ॥ ६२ ॥ नवविधा म्हूण श्रवण कीर्तन । नामाचें स्मरण सर्व काळ ॥ ६३ ॥ सर्वांचें जीवन तें पादसेवन । करावें पूजन यथासांग ॥ ६४ ॥ यथासांग पूजा देव ब्राह्मणांची । प्रीती वंदनाची सर्वकाळ ॥ ६५ ॥ सर्वकाळ दासमानसीं आवडे । सख्यचि रोकडें सर्वांभूतीं ॥ ६६ ॥ सर्वांभूतीं मन आत्मनिवेदन । ऐसें हें भजन नवविधा ॥ ६७ ॥ नवविधा भक्ती हा देह चालतां । करावी सर्वथा सर्वभावें ॥ ६८ ॥ सर्वभावें सदा सगुणीं भजावें । कोरडें त्यागावें शब्दज्ञान ॥ ६९ ॥ शब्दज्ञानें भक्ती संसारीं आसक्ती । या नांव विभक्ती सत्य जाण ॥ ७० ॥ सत्य जाण मनें आधार घेतला । सुखें सुखावला विषयासी ॥ ७१ ॥ विषयाचें सुख चोरूनी अंतरीं । त्याग दुराचारी उच्छेदिती ॥ ७२ ॥ उच्छेदिती ऐशी भक्ती सगुणाची । वाट साधनाची मोडतसे ॥ ७३ ॥ मोडतो आचार कुळ कर्माचार । करी भ्रष्टाकार पापरूपी ॥ ७४ ॥ पापरूपी नर जाणावा साचार । करी एकाकार शब्दज्ञानें ॥ ७५ ॥ शब्दज्ञान गातां अहंतेच्या माथा । तेणें तो सर्वथा आवरेना ॥ ७६ ॥ आवरेना तोंडीं धारितां पाषांडी । वेदआज्ञा मोडी तोंडबळें ॥ ७७ ॥ तोंडबळें बापा क्रिया न सांडावी । आसक्ती दंडावी वीतरागें ॥ ७८ ॥ वीतरागें मन मोकळें करावें । सुख न धरावें संसारींचें ॥ ७९ ॥ संसारींचें सुख नाशवंत आहे । जाई ह्मणे पाहे विचारूनी ॥ ८० ॥ विचारूनि पाहें अशक्ती मनाची । दुर्दशा ज्ञानाची करूं नको ॥ ८१ ॥ करूं नको मुक्त क्रियेचा निश्चय । तेणें होतो क्षय साधनाचा ॥ ८२ ॥ साधन सोडितां सिद्धपण गेलें । साधनेंचि भलें सिद्धपण ॥ ८३ ॥ सिद्धपण आंगीं आदळो न

---

१ वैराग्य. २ ब्रह्मस्वरूपीं. ३ आशा. ४ देहाभिमानाचें. ५ अर्धवट. ६ नऊ प्रकारचें. ७ वैराग्यशील अज्ञानें.

यावें । जाणपण यावें सोडूनियां ॥ ८४ ॥ सोडूनी जाणीव जाणोनी नेणता । सिद्धपणें स्वतां साधक तो ॥ ८५ ॥ साधक तो आहे ब्रह्मा विष्णु हर । साधनीं तत्पर सर्वकाळ ॥ ८६ ॥ सर्वकाळ त्याग करूनी उदास । योगी ते तापस दिगंबर ॥ ८७ ॥ दिगंबर हरू साधनीं सादर । त्याहुनियां थोर जीव काय ॥ ८८ ॥ काय ते चुकले उदासीन झाले । त्याहूनि हे भले शब्दज्ञानी ॥ ८९ ॥ शब्दज्ञानी भला तोचि तो जाणावा । स्वयें पालटावा झालेपणें ॥ ९० ॥ झालेपणें भाव भजावें सगुणा । भक्ती उपासना जप ध्यानीं ॥ ९१ ॥ जप ध्यान मन भोगीं उदासीन । स्वधर्मरक्षण यथाशक्ती ॥ ९२ ॥ शक्तीहूनि वाडें ज्ञान बोलूं नये । सोय सांडूं नये सगुणाची ॥ ९३ ॥ सगुणाची सोय सांडुनी एकदा । तर्थि क्षेत्र सदा आवडावें ॥ ९४ ॥ आवडावें सदां स्वयें निरूपण । श्रवण मनन निजध्यास ॥ ९५ ॥ निजध्यासें होय अंतरींचा त्याग । बाह्य वीतराग उदासीन ॥ ९६ ॥ उदासीन वृत्ति कोठें गुंडाळेना । उपाधी जोडेना बाह्यात्कारीं ॥ ९७ ॥ बाह्य अभ्यंतरीं त्याग निरंतरीं । वैराग्य यापरी आचरावें ॥ ९८ ॥ आचरावें कर्म ज्याचा जो स्वधर्म । आणि नित्यनेम साधनाचा ॥ ९९ ॥ साधनाची वाट वोस पाडूं नये । बोलावी हे सोय निरूपणीं ॥ १०० ॥ निरूपणीं सत्य तेंचि प्रतिष्ठावें । मग आचरावें यथाशक्ति ॥ १०१ ॥ शक्ती सार स्वयें जसा आचरतो । तेंचि प्रतिष्ठितो मूढजन ॥ १०२ ॥ मूढजन तरे साधनीं लावितां । पाविजे अनंता भक्तिपंथें ॥ १०३ ॥ भक्तिपंथें जातां होय सायुज्यता । वाक्य हें तत्त्वतां दास ह्मणे ॥ १०४ ॥

## सगुणनिर्गुणसंवादशतक.

करीं चाप बाण माहेश्वरीं ठाण । रूप हें सगुण राघवाचें ॥ १ ॥ राघवाचें रूप निर्गुण जाणावें । सगुण स्वभावें नाशवंत ॥ २ ॥ नाशवंत देव कदा ह्मणों नये । निर्गुणासि काये पहाशील ॥ ३ ॥ पाहतां निर्गुण देवासी दुर्लभ । त्याचा होय लाभ पूर्वपुण्यें ॥ ४ ॥ पूर्वपुण्यें लाभ ब्रह्मादिकां झाला । कैवारी जोडला रामचंद्र ॥ ५ ॥ रामचंद्र नाम रूप हें माईक । बोलिला विवेक वेदशास्त्रीं ॥ ६ ॥ वेदशास्त्रीं भक्ती राघवाची सार । तेणें पैलपार पाविजेतो ॥ ७ ॥ पाविजेतो पार आत्मनिवेदनें । भक्तीचीं लक्षणें नवविध ॥ ८ ॥ नवविध भक्ति करितां तरले । जीव उद्धरले नेणों किती ॥ ९ ॥ नेणोनियां देव मायिक भजतां । मुक्ती सायुज्यता अंतरली ॥ १० ॥ अंतरली मुक्ती भक्ति मार्गें धांवे । राघवाचीं नांवें निरंतर ॥ ११ ॥ निरंतर देव अंतरों न यावा । विवेक पहावा सज्जनाचा ॥ १२ ॥ सज्जनासंगतीं चुके अधोगती । राम सीतापती ज्याचें नाम ॥ १३ ॥ नाम ज्याचें घ्यावें त्यास ओळखावें । देवासी धुंडावें आदरेंसी ॥ १४ ॥ आदरेंसी जपे रामनाम वाणी । स्वयें शूळपाणी महादेव ॥ १५ ॥ महादेवें गुरुगीता निरूपिली । तेथें मन घाली आलीयारे ॥ १६ ॥ आलीया संसारीं रामनाम तरी । दुजें पृथ्वीवरी आढळेना ॥ १७ ॥ आढळेना परी संतसंग धरी । तेणें तूं अंतरीं निवसील ॥ १८ ॥ निवालें अंतर रामासी भजतां । दुजें कांहीं आतां आवडेना ॥ १९ ॥ आवडेना जया संतांची संगती । तया अधोगती गर्भवास ॥ २० ॥ गर्भवास माझे

१ अधिक. २ उपसर्ग, संबंध. ३ आंत बाहेर. ४ लटकें. ५ नऊ प्रकारचीं. ६ नरकपतन.

राम चुकवील । मज सोडवील अनाथासी ॥ २१ ॥ अनाथाचा नाथ पतितपावन । तया संतजन दाखविती ॥ २२ ॥ दाखविती संत वाटे निजधामीं । माझें मन रामीं विश्वासलें ॥ २३ ॥ विश्वासलें परी रामासी नेणवे । तो राम जाणवे संतसंगें ॥ २४ ॥ संतसंग करी निसंग होइजे । मग तो जाणिजे राम केवीं ॥ २५ ॥ रामासी मिळतां संतांचे मिळणीं । मग दुजेपणीं उरी नाहीं ॥ २६ ॥ उरी त्या रामाची जन्मोजन्मीं असे । मन हें विश्वासे रामापायीं ॥ २७ ॥ रामापायीं मन होतसे उन्मन । तेथें भिन्नाभिन्न ऐक्यरूप ॥ २८ ॥ ऐक्यरूप ज्ञान तें मज नावडे । गाईन पवाडे राघवाचे ॥ २९ ॥ राघवासी गुण नाहीं तो निर्गुण । ठाईं पडे खूण संतसंगें ॥ ३० ॥ संतसंगतीचा निर्गुण पवाडे । मज वाटे गोड रामकथा ॥ ३१ ॥ कथा निरूपण श्रवण मनन । होय समाधान संतसंगें ॥ ३२ ॥ संतसंगें बोध होय निर्गुणाचा । मोडे सगुणाचा भक्तिभाव ॥ ३३ ॥ भक्तिभाव करीं निर्गुण पावावें । मग काय व्हावें सांग बापा ॥ ३४ ॥ बाप माय राम विश्वाचा आधार । भक्ता निरंतर सांभाळी तो ॥ ३५ ॥ सांभाळीतो काय प्रारब्धावेगळें । होणार न टळे ब्रह्मादिकां ॥ ३६ ॥ ब्रह्मादीकां मान्य तो नव्हे सामान्य । असावें अनन्य सगुणासी ॥ ३७ ॥ सगुणासी ठाव उदेना कल्पांतीं । ह्मणोनि सांगती संतजन ॥ ३८ ॥ संतजन ज्ञानी पूर्ण समाधानी । तेही जपध्यानीं सर्वकाळ ॥ ३९ ॥ सर्वकाळ ध्यान करीती सज्जन । परी तें निर्गुण ध्यान त्यांचें ॥ ४० ॥ ध्यानीं आकळेना मनासी कळेना । तयासी कल्पना केवीं धरी ॥ ४१ ॥ धरीला विश्वास साधूचे वचनी । अवस्था उन्मनी तेणें गुणें ॥ ४२ ॥ गुणेंचि निर्गुण कळे सर्व खूण । ह्मणोनी सगूण देव धरी ॥ ४३ ॥ धरावा सगुण निर्गुणाकारणें । तयाविण येणें चाड नाहीं ॥ ४४ ॥ चाड नाहीं ऐसें कासया ह्मणावें । सगुणें पावावें निर्गुणासी ॥ ४५ ॥ निर्गुणासी पावे निर्गुणाकारितां । सगुण पाहतां तेथें नाहीं ॥ ४६ ॥ नाहीं कां ह्मणसी सद्गुरु सगुण । आणि निरूपण बहुविध ॥ ४७ ॥ बहुविध रूप नव्हे सद्गुरूचें । निर्गुण बा याचें जाण बापा ॥ ४८ ॥ जाण आतां बापा तूं तरी सगुण । झालासी शरण सद्गुरूसी ॥ ४९ ॥ सद्गुरूसी गेला जो कोणी शरण । तयासी सगुण कोण ह्मणे ॥ ५० ॥ ह्मणसील काय सगुणावांचोनी । सर्वही करणी सगुणाची ॥ ५१ ॥ सगुणाची नव्हे निर्गुणाची सत्ता । निर्गुण करितां सर्व झालें ॥ ५२ ॥ सर्व झालें जेव्हां निर्गुणाकारितां । तेव्हा सगुणता निर्गुणाची ॥ ५३ ॥ निर्गुणाची लीला वांझेची कुमारी । बोलतां अंतरीं मानीजेना ॥ ५४ ॥ मानीजेना तरी सृष्टीस रचील । सर्व कोणें केलें तयावीणें ॥ ५५ ॥ तयावीणें दुजें काय सत्य आहे । अनुभवें पाहें आपुलीया ॥ ५६ ॥ आपुला विचार निर्गुणीं सर्वदा । निर्गुणासी कदा विसंबेना ॥ ५७ ॥ विसंबेना घडे सत्संग नसतां । संग विचारीतां सगुण कीं ॥ ५८ ॥ सगुणाचा संग ज्ञानीयासी नाहीं । ज्ञानीया विदेही पुरातन ॥ ५९ ॥ पुरातन देही तरीच विदेही । देहावीण नाहीं विदेहता ॥ ६० ॥ विदेहता बोले स्वभावें लागली । निर्गुणाची खोली कोण जाणे ॥ ६१ ॥ जाणे सुख दुःख जाणे गुणागुण । तयासि निर्गुण बोलवेना ॥ ६२ ॥ बोलवेना परी निर्गुण कळावें । विवेकें मिळावें निर्गुणासी ॥ ६३ ॥ निर्गुणीं सगुणीं मिळतां संकट । व्यर्थ खटपट कां करीसी ॥ ६४ ॥ कां करीसी भक्ती

---

१ वृत्तिविरहित. २ पराक्रम कीर्ति. ३ महिमा. ४ सोडीत नाहीं.

सगुणदेवाची । तुज निर्गुणाची शुद्धी नाहीं ॥ ६५ ॥ शुद्धी नाहीं झाली जया आनंदाची । तयां विवादाची उरी नाहीं ॥ ६६ ॥ उरी नाहीं कदा निर्गुणीं भजतां । निर्गुण तत्त्वतां सार आहे ॥ ६७ ॥ सार तें साकार भक्तीचा निर्धार । भक्ती पूर्वापार सगुणाची ॥ ६८ ॥ सगुणाची भक्ती अज्ञानें धरावी । सज्ञानें करावी निर्गुणाची ॥ ६९ ॥ निर्गुणाची भक्ती या नांव अभक्ती । अव्यक्तासी व्यक्ती लावूं नये ॥ ७० ॥ लावूं नये भाव सगुण देवासी । व्यर्थ पाषाणासी काय काज ॥ ७१ ॥ काय कारण हा विवेकें पाहिजे । भावार्थे लाहीजे सर्व कांहीं ॥ ७२ ॥ सर्व कांहीं नाहीं जैसें मृगजळ । वायां खळबळ कां करीसी ॥ ७३ ॥ कां करिसी सर्व देहाचा संबंध । जरी झाला बोध निर्गुणाचा ॥ ७४ ॥ निर्गुणाचा बोध संसार निरसी । तेथें अज्ञानासी रीघ नाहीं ॥ ७५ ॥ रीघ नाहीं जया भावार्थ भजनीं । तया हृदयधूनी शून्याकार ॥ ७६ ॥ शून्याकार होय विवेकवासना । मग समाधाना काय उणें ॥ ७७ ॥ उणें झालें दुणें निर्गुणाच्या गुणें । अभाविकां कोणें उद्धरावें ॥ ७८ ॥ उद्धरावें एका सज्जनसंगती । ऐसें वेदश्रुती बोलताती ॥ ७९ ॥ बोलताती परी नाहीं आठवण । ह्मणोन सगुण आवडेना ॥ ८० ॥ आवडेना मिथ्या मायिक भजन । असत्यासी मन विश्वासेना ॥ ८१ ॥ विश्वासेना मन सगुणासी जरी । तयासी कैवारी देव कैंचा ॥ ८२ ॥ कैंचा देवभक्त कल्पना आपुली । ते सर्व नाथिली ज्ञानियांसी ॥ ८३ ॥ ज्ञानीयांसी देव दुरी अंतरला । संदेहीं पडला अंतकाळीं ॥ ८४ ॥ अंतकाळ कैंचा अनंत ठाईंचा । संदेह देहाचा मिथ्याभूत ॥ ८५ ॥ मिथ्याभूत शब्दज्ञानें माया जाणा । अभक्त तरेना मायापूरीं ॥ ८६ ॥ मायामोहपूर दुस्तर संसार । अद्वैत विचार जंव नाहीं ॥ ८७ ॥ जंव नाहीं भावें श्रीहरी अर्चिला । तंव नव्हे भला ज्ञानगर्वी ॥ ८८ ॥ ज्ञानगर्वी नव्हे ज्ञान त्या दुर्लभ । जयाचेनी लाभ स्वरूपाचा ॥ ८९ ॥ स्वरूप रामाचें मनीं आठवावें । नाम उच्चारावें रात्रंदिवस ॥ ९० ॥ दिवस ना रजनी मनीं ना उन्मनीं । ज्ञाता जनीं वनीं सारिखाचि ॥ ९१ ॥ सारिखाचि भाव तया भेटे देव । येर सर्व वाव शब्दज्ञान ॥ ९२ ॥ ज्ञानावीण सर्व व्यर्थचि जाणावें । जंव नाहीं ठावें आत्मज्ञान ॥ ९३ ॥ ज्ञाता दाता हरी मनीं दृढ धरी । तोचि यमपुरी चुकवील ॥ ९४ ॥ चुकवील ज्ञान सर्वही अज्ञान । पाविजे विज्ञान संतसंगें ॥ ९५ ॥ संतसंगें जरी सगुणीं भजन । स्वधर्मसाधन क्रिया कर्म ॥ ९६ ॥ क्रिया कर्म कैंचें ज्ञानियाचे अंगीं । मुक्त ज्ञानी जगीं विचरतां ॥ ९७ ॥ विचारी जे देही तो कीजे सर्वही । क्रिया कर्म कांहीं सोडूं नये ॥ ९८ ॥ सोडूं नये भक्ती स्वधर्मविरक्ती । ब्रह्मज्ञानप्राप्ती रामदासीं ॥ ९९ ॥ रामदास ह्मणे रामउपासकां । भक्ति सोडूं नका राघवाची ॥ १०० ॥

## भक्तिपर अभंगपंचक.

॥ १ ॥ भक्ति नलगे भाव नलगे । देव नलगे आह्मांसी ॥ १ ॥ आह्मी पोटाचे पाईक । आह्मा नलगे आणीक ॥ २ ॥ आह्मी खाऊं ज्यांची रोटी । त्यांची कीर्ती करूं मोठी ॥ ३ ॥ रामीं रामदास ह्मणे । ऐशीं मूर्खांचीं लक्षणें ॥ ४ ॥

---

१ स्थिति. २ खरोखर. ३ साकारपणा. ४ कारण. ५ शिरकावं. ६ हृदय हीच कोणी नदी. ७ पूजिला. ८ रात्र. ९ अनुभवयुक्तज्ञान. १० नोकर.

॥ २ ॥ आह्मां अन्न झालें पुरे । अन्नावीण काय नुरे ॥ १ ॥ पोटभरी मिळे अन्न । आह्मां तेंचि ब्रह्मज्ञान ॥ २ ॥ अन्नावांचून दुसरा । देव आहे कोण खरा ॥ ३ ॥ भगवंताची नाहीं गोडी । काय ह्मणे ते बापुडी ॥ ४ ॥ रामीं रामदास ह्मणे । मूर्ख बोले दैन्यवाणें ॥ ५ ॥

॥ ३ ॥ अन्न व्हावें पोटभरी । मग ते ज्ञानचर्चा करी ॥ १ ॥ ऐसें बोलती अज्ञान । ज्यांसि नाहीं समाधान ॥ २ ॥ आधीं अन्न तें पाहिजे । मग ध्यानस्थ राहिजे ॥ ३ ॥ अन्नावीण तळमळ । अन्न करितें सकळ ॥ ४ ॥ कैंचा राम कैंचा दास । अवघे पोटाचे सायास ॥ ५ ॥

॥ ४ ॥ अन्न देणार श्रीहरी । तोचि प्रतीपाळ करी ॥ १ ॥ ज्या देवाचे आज्ञेवरी । मेघ वर्षती अंबरीं ॥ २ ॥ तयासि चुकलीं बापुडीं । अन्न अन्न करिती वेडीं ॥ ३ ॥ रामदास ह्मणे ऐक । आदि अंतीं देव एक ॥ ४ ॥

॥ ५ ॥ देव तारी देव मारी । देव सर्व कांहीं करी ॥ १ ॥ अन्नोदक देवें केलें । सर्व तेणेंचि निर्मिलें ॥ २ ॥ तयासि चुकलीं बापुडीं । अन्न अन्न करिती वेडीं ॥ ३ ॥ रामदास ह्मणे ऐक । देव त्रैलोक्यनायक ॥ ४ ॥

॥ ६ ॥ देव घालितो संसारीं । देव सर्व कांहीं करी ॥ १ ॥ लक्ष चौऱ्यांशीं हिंडतां । तेथें देव सांभाळिता ॥ २ ॥ तयासि चुकलीं बापुडीं । अन्न अन्न करिती वेडीं ॥ ३ ॥ दास ह्मणे हो अंतर । देव कृपेचा सागर ॥ ४ ॥

॥ ७ ॥ देव एका भाग्य देतो । एका भीकेसि लावितो ॥ १ ॥ न कळे भगवंताचें करणें । राव रंक ततक्षणें ॥ २ ॥ तयासि चुकलीं बापुडीं । अन्न अन्न करिती वेडीं ॥ ३ ॥ रामदास ह्मणे पाही । देवावीण कांहीं नाहीं ॥ ४ ॥

॥ ८ ॥ माया लाविली माईक । आदि अंतीं देव एक ॥ १ ॥ देव संकटीं पावता । देव अंतीं सोडविता ॥ २ ॥ तयासि चुकलीं बापुडीं । अन्न अन्न करिती वेडीं ॥ ३ ॥ रामदास नवल परी । देव सर्वांचे अंतरीं ॥ ४ ॥

॥ ९ ॥ क्षुधा लागतांचि अन्न । तृषा लागतां जीवन ॥ १ ॥ निद्रा लागतां शयन । आळस येतां चुके मन ॥ २ ॥ मळमूत्र संपादणें । शौच आचमन करणें ॥ ३ ॥ खाणें लागे नानापरी । सर्वकाळ भरोवरी ॥ ४ ॥ अवघा धंदाचि लागला । दिवसंदिवस काळ गेला ॥ ५ ॥ रामीं रामदास ह्मणे । देह सुरवाडा करणें ॥ ६ ॥

॥ १० ॥ हात धुणें पाय धुणें । नाना उपचार करणें ॥ १ ॥ सर्वकाळ लोभासंगें । करणें लागे हो अभ्यंगें ॥ २ ॥ वस्त्रें अलंकार पाहतां । पुढती घालीतां काढितां ॥ ३ ॥ सदा इंद्रिय गळतां । त्यासि करावी शुद्धता ॥ ४ ॥ अवघा धंदाचि लागला । दिवसेंदिवस काळ गेला ॥ ५ ॥ रामदास ह्मणे हित । कैसें घडावें स्वहित ॥ ६ ॥

॥ ११ ॥ शीतकाळींच हुताश । उष्णकाळीं वारावास ॥ १ ॥ आले पर्जन्याचे दिवस । केले घराचे सायास ॥ २ ॥ नाना व्याधींचीं औषधें । पथ्य करावें निरोधें ॥ ३ ॥

---

१ देह. २ रक्षण. ३ आकाशांत. ४ खोटी. ५ उदक. ६ सुखी. ७ पूर्ण. ८ अग्नि.

विषयी जनासि आदर। करणें लागे निरंतर ॥ ४ ॥ अवघा धंदाची लागला। दिवसेंदिवस काळ गेला ॥ ५ ॥ दास ह्मणे सांगों किती। ऐसी देहाची संगती ॥ ६ ॥

॥ १२ ॥ धनाधान्याचें संचित । करणें लागे सावचित ॥ १ ॥ अर्था जातो एकला रे। कलह करावे आदरें ॥ २ ॥ नाना पशूंनें पाळावीं। नाना कृत्यें सांभाळावीं ॥ ३ ॥ सार विचार जतन। करणें लागे सावधान ॥ ४ ॥ अवघा धंदाची लागला। दिवसेंदिवस काळ गेला ॥५॥ रामदास ह्मणे देवा। जीव किती हा घालावा ॥६॥

॥ १३ ॥ पोटधंदा जन्मवरी। करूं जातां नाहीं पुरी ॥ १ ॥ करितां संसारीं सायास। नाहीं क्षणाचा अवकाश ॥ २ ॥ अन्न निर्माण कराया। सर्वकाळ पीडी काया ॥ ३ ॥ काम करितां दिवस थोडा। ऐशा कष्टा नाहीं जोडा ॥ ४ ॥ अवघा धंदाचि लागला। दिवसेंदिवस काळ गेला ॥ ५ ॥ दास ह्मणे सावधान। झालें सदृढ बंधन ॥ ६ ॥

॥ १४ ॥ शिंक जांभई खोकला। तितुका काळ व्यर्थ गेला ॥ १ ॥ आतां ऐसें न करावें। नाम जीवीं तें धरावें ॥ २ ॥ श्वास उश्वास निघतो। तितुका काळ व्यर्थ जातो ॥ ३ ॥ पात्या पातें नलगत। तितुकें वय व्यर्थ जात ॥ ४ ॥ लागे अवचित उचकी। तितुकें वय काळ लेखी ॥ ५ ॥ ह्मणे रामीं रामदास। होतो आयुष्याचा नाश ॥ ६ ॥

## कलियुगपंचक.

॥ १ ॥ आलें भगवंताच्या मना। तेथें कोणाचें चालेना ॥ १ ॥ जैसा कलिराजा आला। धर्म अवघाचि बुडाला ॥ २ ॥ नीति मर्यादा उडाली। भक्ति देवाची चुकली ॥ ३ ॥ दास ह्मणे पाप झालें। पुण्य अवघेंचि बुडालें ॥ ४ ॥

॥ २ ॥ विप्रीं सांडिला आचार। क्षेत्रीं सांडिला विचार ॥ १ ॥ मेघवृष्टी मंदावली। पिकें भूमीनें सांडिलीं ॥ २ ॥ बहुवृष्टी अनावृष्टी। दास ह्मणे केली सृष्टी ॥ ३ ॥

॥ ३ ॥ लोक दोष आचरती। तेणें दोषें भस्म होती ॥ १ ॥ जनीं दोष जाहले फार। तेणें होतसे संहार ॥ २ ॥ रामदास ह्मणे बळी। दिसेंदिसें पापें कळीं ॥ ३ ॥

॥ ४ ॥ नाहीं पापाचा कंटाळा। येतो हव्यास आगळा ॥ १ ॥ जना सुबुद्धी नावडे। मन धांवे पापाकडे ॥ २ ॥ रामीं रामदास ह्मणे। पुण्य उणें पाप दुणें ॥ ३ ॥

॥ ५ ॥ पुण्यक्षेत्रें तीं मोडावीं। आणि ब्राह्मणें पीडावीं ॥ १ ॥ पुण्यवंत ते मरावे। पापी चिरंजीव व्हावे ॥ २ ॥ रामदास ह्मणे वाँड। विघ्नें येती धर्मा आड ॥ ३ ॥

॥ ६ ॥ लोक मिणधेचि चालती। त्यांसि होताती विपत्ती ॥१॥ धर्मप्रवृत्ती बुडावी। शास्त्रमर्यादा उडावी ॥ २ ॥ रामदास ह्मणे देवें। बौद्ध होऊनी बैसावें ॥ ३ ॥

## मूर्खपणपंचक.

॥ १ ॥ येथें काय रे वाजतें। कोठें काय गजबजतें ॥ १ ॥ उगा करीती कोल्हाळ। मार्गें

---

१ शरीर. २ एकाएकीं. ३ सर्व. ४ ब्राह्मणांनीं. ५ अवर्षण. ६ नाश. ७ पुष्कळ.

उठलें कपाळ ॥ २ ॥ हाका मारूनि वरडती । टाळ अवघेचि कुटिती ॥ ३ ॥ कोठें कैंचे आले लुटे । वायां झाले टाळकुटे ॥ ४ ॥ वेडी संसार सांडिला । व्यर्थ गलबला मांडिला ॥ ५ ॥ दास ह्मणे या मूर्खाला । हरिकथेचा कंटाळा ॥ ६ ॥

॥ २ ॥ हरिकथेचा आला राग । खेळ होतां घाली त्याग ॥ १ ॥ ऐसे प्रकारचे जन । नाहीं देवाचें भजन ॥ २ ॥ कळावंताचें तें गाणें । ऐकतांचि जीव माने ॥ ३ ॥ करिती लग्नाचा उत्सव । नाहीं देव महोत्सव ॥ ४ ॥ भूतदया नाहीं पोटीं । खाती लोभाचीं चोरटीं ॥ ५ ॥ रामीं रामदास ह्मणे । देव धर्म कोण जाणे ॥ ६ ॥

॥ ३ ॥ स्वार्थ केला जन्मवरी । लोभें राहिला श्रीहरी ॥ १ ॥ धन धान्य अहर्निशीं[1] । गाई महिषी घोडे दासी ॥ २ ॥ शेत वाडे घर ठावो । प्राणी जीवीं धरी हांवो[2] ॥ ३ ॥ माता पिता बहिणी भ्राता । कन्या पुत्र आणि कांता[3] ॥ ४ ॥ व्याही जावई आपुले । इष्ट मित्र सुखी केले ॥ ५ ॥ दास ह्मणे हो शेवटीं । प्राप्त झाली मसणवटी ॥ ६ ॥

॥ ४ ॥ जन्मवरी शीण केला । अंतकाळीं व्यर्थ गेला ॥ १ ॥ काया स्मशानीं घातली । कन्या पुत्र गुरडलीं[4] ॥ २ ॥ घर वाडा तो राहिला । प्राणी जातसे एकला ॥ ३ ॥ धन धान्य तें राहिलें । प्राणी चर्फडित गेले ॥ ४ ॥ इष्ट मित्र आणि सांगाती[5] । आपुलाले घरा जाती ॥ ५ ॥ दास ह्मणे प्राणी मेले । कांहीं पुण्य नाहीं केलें ॥ ६ ॥

॥ ५ ॥ दैन्यवाणा झाला प्राणी । चंद्री लागली नयनीं ॥ १ ॥ ह्मणती उचला ऊचला । आतां भूमीभार झाला ॥ २ ॥ घोर लागला अमूप[6] । प्राणी झाला प्रेतरूप ॥ ३ ॥ दांतखिळ बसली वाणी । ताठा भरला करचरणीं ॥ ४ ॥ डोळे विक्राळ दिसती । झांका झांका मूलें भीती ॥ ५ ॥ रामीं रामदास ह्मणे । अवघीं सुखाचीं पीसुनें ॥ ६ ॥

॥ ६ ॥ एक ह्मणतीं कां पळावें । एक ह्मणती कां बैसावें ॥ १ ॥ लोक बोलती मत्सरें । काय मानावें तें खरें ॥ २ ॥ एक ह्मणती कां सोडावें । एक ह्मणती कां मोडावें ॥ ३ ॥ दास ह्मणे हो तत्वतां । जाण अवघी बाष्कळता ॥ ४ ॥

॥ ७ ॥ नाहीं ज्ञानाचा विचार । केला अज्ञानें संचार ॥ १ ॥ मना आलें तें बोलती । चालों नये तें चालती ॥ २ ॥ अवघा स्वधर्म बुडाला । देह प्रपंचीं लाविला ॥ ३ ॥ रामीं रामदास ह्मणे । अविद्येचीं[7] हीं लक्षणें ॥ ४ ॥

॥ ८ ॥ स्नान नाहीं संध्या नाहीं । देव नाहीं धर्म नाहीं ॥ १ ॥ उगाच बसुनीयां घरीं । सज्जनाची निंदा करी ॥ २ ॥ तीर्थ नाहीं क्षेत्र नाहीं । दान नाहीं पुण्य नाहीं ॥ ३ ॥ तप नाहीं शास्त्र नाहीं । मंत्र नाहीं गायत्री नाहीं ॥ ४ ॥ पोटीं नाहीं निस्पृहता । नाहीं विद्येनें पूरता ॥ ५ ॥ रामदास सांगे खुणें । पापी सर्वांपरी उणे ॥ ६ ॥

॥ ९ ॥ कपटी कुटिल आळसी । घरीं मिळेना खायासी ॥ १ ॥ उगाच धरितसे ताठा । पापी दरिद्री करंटा ॥ २ ॥ पोरें ह्मणती काय खावें । स्त्रिया ह्मणती कोठें जावें ॥३॥ रामीं रामदास ह्मणे । अवघीं हासतीं पीसुनें ॥ ४ ॥

---

१ रात्रंदिवस. २ इच्छा, आशा. ३ स्त्री. ४ परतून गेलीं. ५ सोबती, ६ पुष्कळ, ७ सूचक, ८ अज्ञानाचीं,

॥ १० ॥ स्वयें आचरावें पाप । विशेष निंदा वज्रलेप ॥ १ ॥ निद्रा मत्सर टवाळी । मायबापाशीं ढवाळी ॥ २ ॥ अनाचारी परद्वारी[1] । मना आलें तेंचि करी ॥ ३ ॥ रामीं रामदास ह्मणे । असे जितांचि मरणें ॥ ४ ॥

---

# भ्रांतिपंचक.

॥ १ ॥ गळा बांधिला पाषाण । आत्मलिंग जाणे कोण ॥ १ ॥ जिवाशिवाचें स्वरूप । कोण जाणे कैसें रूप ॥ २ ॥ लिंग चुकलें स्वयंभ[2] । धरी पाषाणाचा लाभ ॥ ३ ॥ रामीं रामदास ह्मणे । भेद जाणती शाहाणे ॥ ४ ॥

॥ २ ॥ पृथ्वी अवघी लिंगाकार । अवघा लिंगाचा विस्तार ॥ १ ॥ आतां कोठें ठेऊं भाव । जेथें तेथें महादेव ॥ २ ॥ अवघा देव विस्तारला । ऐसें देवचि बोलिला ॥ ३ ॥ रामदासा विसरला । अवघा देवचि भरला ॥ ४ ॥

॥ ३ ॥ एकविस स्वर्ग विस्तारला । देव संपुष्टीं घातला ॥ १ ॥ केलें देवासी बंधन । तेंचि पावला आपण ॥ २ ॥ देव ठाईंचा अनंत । त्यासि ह्मणती अंतवंत[3] ॥ ३ ॥ रामदास ह्मणे भावें । जैसें द्यावें तैसें घ्यावें ॥ ४ ॥

॥ ४ ॥ अंत नाहीं तो अनंत । त्यासि दोरी करी भ्रांत ॥ १ ॥ ऐसें जनाचें करणें । कैसा संसार तरणें ॥ २ ॥ देव व्यापक सर्वांसी । त्यासि ह्मणती एकदेशी ॥ ३ ॥ रामदासीं देव पूर्ण । त्यासि ह्मणती अपूर्ण ॥ ४ ॥

॥ ५ ॥ देव पाषाण भाविला[4] । तोचि अंतरीं दाविला ॥ १ ॥ जैसा भाव असे जेथें । तैसा देव वसे तेथें ॥ २ ॥ दृश्य बांधोनियां गळा । देव जाहला नीराळा ॥ ३ ॥ दास ह्मणे भावातीत । होतां प्रगट अनंत ॥ ४ ॥

॥ ६ ॥ अवघे पाषाण मांडिले । कोण ह्मणती आपुलाले ॥ १ ॥ सर्व घटीं[5] देव एक । भेदें भाविला अनेक ॥ २ ॥ देव निर्मळ निश्चळ । पाहती पाषाणाची खोळ ॥ ३ ॥ रामदासाचें अंतर । देवापासीं निरंतर ॥ ४ ॥

॥ ७ ॥ धान्य अवघेंचि टाकिती । बळ देखतां तोंडीं माती ॥ १ ॥ देव सर्वांचें अंतरीं । सोई जातां तैसी परी ॥ २ ॥ तूप सांडूनि आपण । खाऊं पाहे सांठवण ॥ ३ ॥ दास ह्मणे ते राउळा । सोडून पूजिती देउळा ॥ ४ ॥

॥ ८ ॥ सांठवणेवीण धान्य । धान्येंवीण सांठवण ॥ १ ॥ एकावीण एक काय । कामा नये वायां जाय ॥ २ ॥ ज्ञानेंवीण उपासन । उपासनेवीण ज्ञान ॥ ३ ॥ रामीं रामदासावीण । करी तुस्तोंचि भजन ॥ ४ ॥

---

१ परस्त्रीगमन करणारा. २ स्वतःसिद्ध. ३ नाशवंत. ४ कल्पिला. ५ देहांमध्यें.

## अभिमानपंचक.

॥ १ ॥ संसाराचें दुःख आलें । गाणें अवघेंचि बुडालें ॥ १ ॥ आतां आठवेना कांहीं । पडिलों चिंतेच्या प्रवाहीं ॥ २ ॥ गाणें नाचणें सुखाचें । जिणें[1] जहालें दुःखाचें ॥ ३ ॥ ह्मणे रामीं रामदास । कोण करीतो सायास ॥ ४ ॥

॥ २ ॥ नाना प्रकारींचें गाणें । मीच बाळपणीं जाणें ॥ १ ॥ काय जाहलें कळेना । एतेंही आठवेना ॥ २ ॥ मज पाठांतर होतें । तितुकें कोणासी नव्हतें ॥ ३ ॥ रामदास ह्मणे आतां । जीव जहाले दुश्चिता ॥ ४ ॥

॥ ३ ॥ वोढवलें पूर्वपाप । नानाप्रकारें संताप ॥ १ ॥ तेणें शुद्धीच उडाली । नीती अवघीच बुडाली ॥२॥ केली क्रिया ते कळेना । मन विवेकें वळेना ॥३॥ भरीं भरलेसे मन । अवघें तेंचि तें कारण ॥ ४ ॥ झोंबे विकल्पाचें[2] श्वानें[3] । देहबुद्धी[4] घेत रान ॥ ५ ॥ रामीं रामदास ह्मणे । अवघीं झालीं कुलक्षणें ॥ ६ ॥

॥ ४ ॥ सांत पांच गांववाट । अवघा एकचि चौहाट ॥ १ ॥ तेथें कोणेकडे जावें । अवघी वाटचि स्वभावें ॥ २ ॥ कोण दिसेना वेळेसी । वाट पुसावी कोणासी ॥ ३ ॥ रामीं रामदास ह्मणे । तैसें संशय बोलणें ॥ ४ ॥

## उन्मत्तपंचक.

॥ १ ॥ रामीं विसरला प्राणी । कामलोभें केली हानि ॥ १ ॥ कामधेनु मोकलिली । घरीं गाढवी बांधिली ॥ २ ॥ उपटूनी कल्पतरू । केला शेराचा आदरू ॥ ३ ॥ सांडूनियां चिंतामणी । वेंची दहिंवराचें पाणी ॥ ४ ॥ गेलें हातींचें निधान । केलें कवडीचें साधन ॥ ५ ॥ परिस रागें हुंडारिला[6] । हातीं पाषाण घेतला ॥ ६ ॥ सार अमृत सांडिलें । दैन्यवाणें कांजी प्याले ॥ ७ ॥ सोनें सांडुनी आदरें । वेंचूं लागला खापरें ॥ ८ ॥ रत्न सांडूनियां खडे । गेले ह्मणून दुःखें रडे ॥ ९ ॥ केली साखर परती । सुखें तोंडीं घाली माती ॥ १० ॥ ह्मणे रामी रामदास । तोंडीं संसाराची आस ॥ ११ ॥

॥ २ ॥ शांति माता मारिली । भ्रांति तेथें प्रतिष्ठिली ॥ १ ॥ ऐसे लोक कलियुगींचे । भय न धरिती पापाचें ॥ २ ॥ विवेकगुरु तो मारिला । तेथें क्रोध प्रतिष्ठिला ॥ ३ ॥ नीतिअमृत सांडिलें । असत्यमद्यपान केलें ॥ ४ ॥ दया बहिण संहारिली । निंदामातंगी पाळिली ॥ ५ ॥ पुत्रविचार दवडिला । दासीपुत्र प्रतिष्ठिला ॥ ६ ॥ सत्य ब्राह्मण मारिला । दोषी ढीवर पाळिला ॥ ७ ॥ ज्ञान पक्वान्न सांडिलें । मोंघ अज्ञान सेविलें ॥ ८ ॥ भक्ति लक्ष्मी त्यागिली । अभक्ति अवदसा घेतली ॥ ९ ॥ मित्र विश्वास मोडिला । शत्रु विकल्प जोडिला ॥ १० ॥ भेदचोरटे पाळिले । अभेदराजे दुराविले ॥ ११ ॥ रामीं रामदास ह्मणे । जळो अभक्तांचें जिणें ॥ १२ ॥

---

१ जीवित. २ संशयाचें. ३ कुत्रें. ४ देहाभिमान. ५ ठेवा. ६ टाकून दिला. ७ निंदारूपी मांगीण. ८ कोळी. ९ उडीद.

॥ ३ ॥ जेणें संसारीं घातिलें । पापी त्यासी विसरले ॥ १ ॥ श्रीसी सांडोनियां दारा । भजे दासींच्या डिंगरा ॥ २ ॥ मायबापें दुरावलीं । चोरें आपुलीं मानिलीं ॥ ३ ॥ फोडोनीयां शालिग्राम । वेश्या सेवितां अधम ॥ ४ ॥ रामीं रामदास ह्मणे । जळो अभक्तांचें जिणें ॥ ५ ॥

॥ ४ ॥ ज्याच्या उदरासी आला । त्यासी फिरोनि पडला ॥ १ ॥ तोचि जाणावा चांडाळ । देवब्राह्मणाचा काळ ॥ २ ॥ झाला स्त्रियेसी लंपट्ट । मायबापांसी उद्धट्ट ॥ ३ ॥ भय पापाचें न धरी । सज्जनाची निंदा करी ॥ ४ ॥ नेणे माय कीं मावशी । कोणें सांगावें तयासी ॥ ५ ॥ रामीं रामदास ह्मणे । यम केला त्याकारणें ॥ ६ ॥

॥५॥ प्राणी संसाराची आला । परि तो देवासी चूकला ॥१॥ तगे तोचि तो अज्ञान । नेणे भगवंताचें ज्ञान ॥ २ ॥ देह आपुला मानिला । शेवीं सांडोनीयां गेला ॥ ३ ॥ जें जें कांहीं अशाश्वत । तें तें मानिलें शाश्वत ॥ ४ ॥ देवीं ब्राह्मणीं अभाव । तेथें वर्णागाचा भाव ॥ ५ ॥ रामदासाचें स्वहित । जेणें मानिलें अनहित ॥ ६ ॥

## आळसपंचक.

॥ १ ॥ श्रोतीं व्हावें सावधान । मना आलें तें गाईन ॥ १ ॥ ताल जाती एकीकडे । माझें गाणें भलतीकडे ॥ २ ॥ शेंडा मूळ तें नकळे । माझें गाणेंचि मोकळें ॥ ३ ॥ रामीं रामदास ह्मणे । जेणें गुंतती शहाणे ॥ ४ ॥

॥ २ ॥ राग मूर्छना कळेना । ताळ धृपद वळेना ॥ १ ॥ त्यावेगळें सर्व ठावें । श्रोतीं सावधान व्हावें ॥ २ ॥ अर्थप्रबंधविचार । नकळे नाहीं पाठांतर ॥ ३ ॥ भक्तिज्ञानाचा विश्वास । नाहीं ह्मणे रामदास ॥ ४ ॥

॥ ३ ॥ निरूपणीं जागवेना । काम क्रोध त्यागवेना ॥ १ ॥ इतुक्यावेगळें साधन । सांगा अवघेंची करीन ॥ २ ॥ आतां करवेना अभ्यास । तोडवेना आशापाश ॥ ३ ॥ रामीं रामदास ह्मणे । रामनाम उच्चारणें ॥ ४ ॥

॥ ४ ॥ आह्मी देवाचे आळशी । कांहीं नकळे आह्मांसीं ॥ १ ॥ गोड गोड हो जेवणें । आठ दिवसां एक नाहाणें ॥ २ ॥ मज पलंग सुषुप्ती । निद्रा पाहिजे पुरती ॥ ३ ॥ दास ह्मणे लोभाविणें । करूं साक्षेप भांडणें ॥ ४ ॥

॥ ५ ॥ आह्मी भगवंताचे भोळे । बाह्य अंतरीं मोकळें ॥ १ ॥ क्रोध आला तो साहवेना । उणें उत्तर पहावेना ॥ २ ॥ आह्मां बोलों सके कोण । बोलासाठीं वेंचूं प्राण ॥ ३ ॥ दास ह्मणे नीघोत्तरीं । दुःख वाहूं जन्मवरी ॥ ४ ॥

॥ ६ ॥ आह्मी भगवंताचीं वेडीं । नेणों बोलाची परवडी ॥ १ ॥ आह्मां द्यावें ऐसें कळे । फिरोनि यावें हें नकळे ॥ २ ॥ द्यावें एकाचें बुडवावें । तेथें वाईटपण यावें ॥ ३ ॥ ज्याचे तोंडावरी यावें । तेणें फिरोनि पडावें ॥ ४ ॥ दास ह्मणे सांगों किती । लोक पाठींच लागती ॥ ५ ॥

---

१ मुलांना. २ शेवटीं. ३ गाढ झोंप. ४ खर्च करूं. ५ भेद, प्रकार.

॥ ७ ॥ पहा कलियुगाचे जन । कैसे अवघेच दुर्जन ॥ १ ॥ आम्ह ह्मणे मारूं जातां । त्यास वाटे परम व्यथा ॥ २ ॥ पाय देतां मानेवरी । सुखें डोळेचि वटारी ॥ ३ ॥ रामदास ह्मणे मूर्ख । नेणे पराव्याचें दुःख ॥ ४ ॥

---

## बंधनपंचक.

॥ १ ॥ सर्वकाळ शेंडा मूळा । येत जातसे मुंगळा ॥ १ ॥ तैशा कां करिसी येरझारा । शरण जावें रघुवीरा ॥ २ ॥ हातीं धरूनियां सूत । खालीं वरती येत जात ॥ ३ ॥ दास ह्मणे जळावरी । जैसी फिरती कीं भिंगोरी ॥ ४ ॥

॥ २ ॥ पायीं लाउनीया दोरी । भोंगा बांधिला लेंकुरीं ॥ १ ॥ तैसें पावसी बंधन । मग तुजला सोडील कोण ॥ २ ॥ एक धरोनि वानर । हिंडविती दारोदार ॥ ३ ॥ रामदास ह्मणे पाहे । रीसें धापा देत आहे ॥ ४ ॥

॥ ३ ॥ नको करूं अभिमान । होणार तें देवाधीन ॥ १ ॥ बहु द्रव्यानें भुलले । काळें सर्वेहि ग्रासिले ॥ २ ॥ जे ह्मणती मी शक्त । तेणें जाहले आसक्त ॥ ३ ॥ रामदास सांगे वाट । कैसा होईल शेवट ॥ ४ ॥

॥ ४ ॥ डोळां अज्ञान झांपडी । पायीं देहबुद्धी बेडी ॥ १ ॥ असे अज्ञान पशुजना । जुंपियेले संसारघाणा ॥ २ ॥ खांदीं ओझें विषयाचें । पाठीं फटके सुखदुःखाचे ॥ ३ ॥ रामीं रामदास ह्मणे । व्यर्थ गेलें त्याचें जिणें ॥ ४ ॥

॥ ५ ॥ आलें संसाराचें ज्ञान । तेणें झालें समाधान ॥ १ ॥ सकळ साराचेंहि सार । ऐसा माझा हा संसार ॥ २ ॥ कैंचा देव कैंचा धर्म । तीर्थयात्रा कैंचा भ्रम ॥ ३ ॥ कैंचें ज्ञान कैंचें ध्यान । अन्न हेंचि समाधान ॥ ४ ॥ व्यर्थ गेला रे लौकिकीं । येणें पोट भरेना कीं ॥ ५ ॥ रामीं रामदास भले । आम्हां सौख्य हो मानलें ॥ ६ ॥

॥ ६ ॥ कल्पनेचे बरोबरी । मन सर्वकाळ करी ॥ १ ॥ स्वप्न सत्यचि वाटलें । दृढ जीवेंसीं धारिलें ॥ २ ॥ अवघा माईक विचार । नानामंदिर सुंदर ॥ ३ ॥ तोचि मानिला साचार । दिव्यांबर मनोहर ॥ ४ ॥ जीव सुखें सुखावला । थोर आनंद मानिला ॥ ५ ॥ रामदास ह्मणे मंद । लिंगदेहाचा आनंद ॥ ६ ॥

॥ ७ ॥ कांहीं कळेना विचार । अवघा झाला शून्याकार ॥ १ ॥ उमजेना संसारिक । आठवेना परलोक ॥ २ ॥ अंध विचारीं पडियेले । अंधकारीं सांपडले ॥ ३ ॥ मायाजाळें गुंडाळले । वासनेनें वेंटाळिले ॥ ४ ॥ कामक्रोधें जाजावले । मदमत्सरें पीडिले ॥ ५ ॥ रामीं रामदास ह्मणे । अज्ञानाचीं हीं लक्षणें ॥ ६ ॥

॥ ८ ॥ अंध अंधारीं बैसले । त्यांसि हातें पालविलें ॥ १ ॥ त्यांसि कळेना कळेना । त्यांचि वृत्ती निवळेना ॥ २ ॥ संतसंगाचें बोलणें । संसारीक काय जाणे ॥ ३ ॥ ह्मणे रामीं रामदास । केला नसता अभ्यास ॥ ४ ॥

---

१ दुसऱ्याचें. २ अस्वल. ३ देहाभिमान. ४ आयुष्य. ५ लटका. ६ त्रासले. ७ बोलाविलें.

॥ ९ ॥ केला संसार अभ्यास । झाला आयुष्याचा नाश ॥ १ ॥ सदा उठतां बसतां । रामाविण केली चिंता ॥ २ ॥ नाहीं साक्षेपांचा वेग । उगाच मांडिला उद्योग ॥ ३ ॥ रामीं रामदास ह्मणे । ऐसें जीतचि मरणें ॥ ४ ॥

# पराधीनपंचक.

॥ १ ॥ मुंगसाचे कानीं बाळी । मुंगुस हिंडे आळोआळीं ॥ १ ॥ तरी तें पाळिलें जाणावें । पराधीनाचि स्वभावें ॥ २ ॥ वेडें आलेंसे पाहुणें । तरि तें जगाचें मेहुणें ॥ ३ ॥ कार्यकर्ता कीर्तिवंत । त्यासी जाणती समस्त ॥ ४ ॥ कार्यकर्ता तो झांकेना । वेध लावी विश्वजना ॥ ५ ॥ दास ह्मणे कुटुंबाचा । तोचि पुरुष दैवाचा ॥ ६ ॥

॥ २ ॥ निज सलगीचें जाणेना । पुढें कोणासी मानेना ॥ १ ॥ आळसी निकामी माणुस । पुढें होत कासावीस ॥ २ ॥ उगेंच नाचतें मुरडतें । कोण पुसतें तयातें ॥ ३ ॥ आपणास अवकाळिलें । ज्याचें त्यास कळों आलें ॥ ४ ॥ आधिं कष्टावें रगडावें । कार्य बहुतांचें करावें ॥ ५ ॥ बहुतांसी मिळों जाणे । त्यासि मानिती शहाणे ॥ ६ ॥ बहुतां मानला तो ल्याख । वरकड जाणावे नल्याख ॥ ७ ॥ आहे प्रगट उपाय । दास ह्मणे सांगों काय ॥ ८ ॥

॥ ३ ॥ कष्ट करितां मनीं विटे । तरि तो कळेल शेवटें ॥ १ ॥ कष्टें उदंड आटोपावें । तरि मग पुढें सुखी व्हावें ॥ २ ॥ असतां परधन वेडें । काय निवेल बापुडें ॥ ३ ॥ शहाणे उदंड कष्टती । वडिल उपकारें दाटती ॥ ४ ॥ बहुत राखिले लौकिक । त्यांचें जिणें अलौकिक ॥ ५ ॥ ज्यास त्यास पाहिजे तो । जनीं वाटपास येतो ॥ ६ ॥ मनोगत जाणे सूत्रें । जेथें तेथें जगमित्रें ॥ ७ ॥ न सांगतां काम करी । ज्ञान उदंड विवरी ॥ ८ ॥ स्तुती कोणाची न करी । प्राणिमात्रा लोभ करी ॥ ९ ॥ कदा विश्वास मोडेना । कोणी माणूस तोडीना ॥ १० ॥ जनीं बहुतचि साहतो । कीर्तिरूपेंचि राहतो ॥ ११ ॥ दास ह्मणे नव्हे दुःखी । आपण सुखी लोक सुखी ॥ १२ ॥

॥ ४ ॥ आळसें पिंडाचें पालन । परि अवघें नागवण ॥ १ ॥ देह केलें तैसें होतें । वंचले जे करीना तें ॥ २ ॥ शक्ति आहे तों करावें । विश्व कीर्तीनें भरावें ॥ ३ ॥ पुण्यवंत तो साक्षेपी । आळशी महालोकीं पापी ॥ ४ ॥ आपलाची घात करी । सदा कठोर वैखरी ॥ ५ ॥ माणुस राजी राखों नेणें । त्यासि न मानीति शहाणे ॥ ६ ॥ गुणें माणुस भोगतें । अवगुणें थितें जातें ॥ ७ ॥ दास ह्मणे भला भला । जेथें तेथें पवाडा केला ॥ ८ ॥

॥ ५ ॥ सुंदर आळसाची बाईल । पुढें काळ रे खाईल ॥ १ ॥ ज्याचे वडिल आळसी । कोणें शिकवावें तयासी ॥ २ ॥ घरीं खाया ना जेवाया । नाहीं लेया ना नेसाया ॥ ३ ॥ पत्नी उदंडची खाती । आळसी उपवासी मरती ॥ ४ ॥ दास ह्मणे सांगों काय । होतां प्रगट उपाय ॥ ५ ॥

॥ ६ ॥ ऐसें कैसें रे भजन । करिताती मूर्ख जन ॥ १ ॥ गधड्यासी नमन केलें । तेणें थोबाड फोडिलें ॥ २ ॥ उंच नीच सारिखेची । दास ह्मणे होत छी छी ॥ ३ ॥

---

१ जीवंत असतांच. २ सर्वांना. ३ अपमान केला. ४ खरा. ५ बहुत. ६ शरीराचें. ७ जग. ८ उद्योगी. ९ वाणी.

## मलिनपंचक.

॥ १ ॥ महादर्पण खतलें । तेणें मुख आच्छादिलें ॥ १ ॥ तैसी वृत्ति हे मळिन । होतां बुडे समाधान ॥ २ ॥ धातुवरी आला मळ । तेणें लोपलें निर्मळ ॥ ३ ॥ शेतीं न जातां आडत । तेणें आच्छादलें शेत ॥ ४ ॥ मुखें न होतां उच्चार । तेणें बुडे पाठांतर ॥ ५ ॥ नाहीं दीपाचा विचार । दास ह्मणे अंधकार ॥ ६ ॥

॥ २ ॥ आत्मज्ञानी आहे भला । आणि संशय उठला ॥ १ ॥ त्यासि नामचि कारण । नामें शोकनिवारण ॥ २ ॥ नानादेश केले जनीं । अनुताप आला मनीं ॥ ३ ॥ रामीं रामदास ह्मणे । जया स्वहित करणें ॥ ४ ॥

---

## प्रस्ताविकपंचक.

॥ १ ॥ डोळे चिरींव चांगले । वृद्धपणीं सरक्या झाले ॥ १ ॥ ओले मातीचा भरंवसा । काय मानीसी माणसा ॥ २ ॥ मुख रसाळ चांगलें । पुढें अवघें सुकूतलें ॥ ३ ॥ रम्य नासीक सरळें । सर्वकाळ पाणी गळे ॥ ४ ॥ कर्ण भूषणें सुंदर । पुढें जाहालीं बधिर ॥ ५ ॥ बरवी दंताची पंगती । परी ती उन्मळूनी पडती ॥ ६ ॥ बरवे कर आणि चरण । परि ते झाले निष्कारण ॥ ७ ॥ अंगकांती होती बरी । झाली चिरगुटाचे परी ॥ ८ ॥ केस होताती पांढरे । लाळ गळतां ना धरे ॥ ९ ॥ बहुसाल होतें बळ । पुढें जाहलें निर्बळ ॥ १० ॥ देह होतें जें निर्मळ । तेंचि झालें अमंगळ ॥ ११ ॥ सर्व तारुण्यें चांगला । प्राणी दीनरूप झाला ॥ १२ ॥ रामीं रामदास ह्मणे । आतां सावधान होणें ॥ १३ ॥

॥ २ ॥ थोटे पांगुळे बाधिर । आतां तरी होती नर ॥ १ ॥ नाहीं देहाचा भरंवसा । शरण जावें जगदीशा ॥ २ ॥ कोड कुश्चळ सर्वांगीं । एक झाले क्षयरोगी ॥ ३ ॥ एक प्राणी अंध होती । एका समंध लागती ॥ ४ ॥ नाना रोगांचे उमाळे । काय होईल न कळे ॥ ५ ॥ रामदास ह्मणे भावें । वेगीं सार्थक करावें ॥ ६ ॥

॥ ३ ॥ वेगीं व्हावें सावधान । ऐसें आहे वृद्धपण ॥ १ ॥ डोळे जाती कान जाती । दांत अवघेची पडती ॥ २ ॥ हात गेले पाय गेले । देह पाझरों लागलें ॥ ३ ॥ दास ह्मणे शक्ती गेली । मती अवघीच खुंटली ॥ ४ ॥

॥ ४ ॥ ऐसें आहे सर्व कांहीं । चिरंजीव कांहीं नाहीं ॥ १ ॥ युक्ती जाते बुद्धि जाते । क्रिया तेही पालटते ॥ २ ॥ धीर विचार बुडाला । होता विवेक तोही गेला ॥ ३ ॥ रामीं रामदास ह्मणे । वृद्धपणाचीं लक्षणें ॥ ४ ॥

॥ ५ ॥ अंतीं एकलेंचि जावें । ह्मणोनि राघवीं भजावें ॥ १ ॥ मातापिता बंधूजन । कन्या पुत्रही सोडून ॥ २ ॥ जन्मवरी केला भार । शेखीं सोडूनी जोजार ॥ ३ ॥ ह्मणे रामीं रामदास । सर्व सांडुनीयां आस ॥ ४ ॥

---

१ मोठा आरसा. २ मळून गेला. ३ पश्चात्ताप. ४ हात. ५ पुष्कळ. ६ खटपट.

॥ ६ ॥ काळ जातो क्षणक्षणा । मूळ येईल मरणा ॥ १ ॥ कांहीं धांवाधांव करी । जंव तो काळ आहे दुरी ॥ २ ॥ देह आहे जाइजर्णे । सुटकासी कवण्या गुणें ॥ ३ ॥ मायाजाळीं गुंतलें मन । परि हें दुःखाचें कारण ॥ ४ ॥ सत्य वाटलें सकळ । परी जातां नाहीं वेळ ॥ ५ ॥ रामीं रामदास ह्मणे । आतां सावधान होणें ॥ ६ ॥

॥ ७ ॥ झालें देह हो गळित । आलें संसार लंछित ॥ १ ॥ सावधान सावधान । पुढें नाहीं व्यवधान ॥ २ ॥ आतां मन आटोपावें । आपुल्या निजधामा जावें ॥ ३ ॥ राहे देवाचें स्मरण । रामीं रामदास ह्मणे ॥ ४ ॥

॥ ८ ॥ पुण्य पहावया कारणें । देव धाडी बोळावणें[1] ॥ १ ॥ वाट चांगली धरावी । पुण्यसामोग्री करावी ॥ २ ॥ वाटे वेच नाहीं जाया । पुढें सुख कैंचें तया ॥ ३ ॥ रामीं रामदास ह्मणे । बुद्धिवंत ते शहाणे ॥ ४ ॥

॥ ९ ॥ अंतकाळ येतयेतां । पुढें नये चूकवितां ॥ १ ॥ अकस्मात लागे जावें । कांहीं पुण्य आचरावें ॥ २ ॥ पुण्यावीण जातां प्राणी । घडे यमाची जाचणी ॥ ३ ॥ रामदास ह्मणे जना । काठिण यमाची यातना ॥ ४ ॥

॥ १० ॥ अभक्त भोगीत यातना । देव राखे भक्तजना ॥ १ ॥ देव भक्त दोन्ही एक । यम देवाचा सेवक ॥ २ ॥ भक्तें देव केला सखा । तोचि त्याचा पाठीराखा ॥ ३ ॥ रामीं रामदास ह्मणे । भक्ति करा याकारणें ॥ ४ ॥

॥ ११ ॥ लक्ष्मी आहे रे चंचळ । इस[2] जातां नाहीं वेळ ॥ १ ॥ सत्य मानावें उत्तर । देव नित्य निरंतर ॥ २ नानावैभव समस्त । येती जाती अकस्मात ॥ ३ ॥ ह्मणे रामीं रामदास । काय देहाचा विश्वास ॥ ४ ॥

॥ १२ ॥ नाना व्यथा उद्भवती । प्राणी अकस्मात जाती ॥ १ ॥ मृत्यु बांधला पदरीं । होती आयुष्याची भरी ॥ २ ॥ काळ लागला सन्निधी[3] । एक घडी लागों नेदी ॥ ३ ॥ रामदास ह्मणे खुणें । भेद जाणती शहाणे ॥ ४ ॥

॥ १३ ॥ नदी मर्यादा सांडिती । उष्णकाळीं[4] वोस होती ॥१॥ तैसा तारुण्याचा भर । सर्वांचि होतसे उतार ॥ २ ॥ भाग्य चढों लागे वेगें । सर्वेंचि प्राणी भीक मागे ॥ ३ ॥ रामदास ह्मणे काळ । दानीं दिवस पर्वकाळ ॥ ४ ॥

॥ १४ ॥ पुरें पट्टणें[5] वसती । एक वेळे वोस होती ॥ १ ॥ तैसें वैभव सकळ । येतां जातां नाहीं वेळ ॥ २ ॥ बहु सृष्टीची रचना । होय जाय क्षणक्षणा ॥ ३ ॥ दास ह्मणे सांगों किती । आले गेले चक्रवर्ती[6] ॥ ४ ॥

॥ १५ ॥ सेवकासी भाग्य चढे । त्याचे अधीन होणें पडे ॥ १ ॥ देव करील तैसें व्हावें । काय करील तें पहावें ॥ २ ॥ वर्तमान घडे जैसें । उगेंच व्हावें लागे तैसें ॥ ३ ॥ दास ह्मणे वेळ कैसी । राज्य जाहलें कलीसी ॥ ४ ॥

---

१ बोलावणें. २ संपत्ती. ३ जवळ. ४ उन्हाळ्यामध्यें. ५ शहरें. ६ सार्वभौम.

॥ १६ ॥ काम क्रोध खवळले । मद मत्सर मातले ॥ १ ॥ त्यांचे अधीनें लागे होणें । ऐसें केलें नारायणें ॥ २ ॥ लोभ दंभ अनावर । जहाला गर्व अहंकार ॥ ३ ॥ दास ह्मणे सांगों किती । पडली ऐशांची संगती ॥ ४ ॥

॥ १७ ॥ ऐसें कैसें रे सोंवळें । शिवतां होतसे ओंवळें ॥ १ ॥ स्नानसंध्या टिळे माळा । पोटीं क्रोधाचा उमाळा ॥ २ ॥ नित्य दंडीतोसी देह । तरी फिटेना संदेह ॥ ३ ॥ बाह्य केली झळफळ । देहबुद्धीचा विटाळ ॥ ४ ॥ नित्यनेम खटाटोप । मनीं विषयाचा जप ॥ ५ ॥ रामदासीं दृढभाव । तेणेंविण सर्व वाव ॥ ६ ॥

॥ १८ ॥ देह विटाळाचा गोळा । कैसा होतसे सोंवळा ॥ १ ॥ तुज कळेना विचारू । ऐसेंयासि काय करूं ॥२॥ दृढ केला अभिमान । तेणें साधणें बंधन ॥ ३ ॥ रामदासीं स्वामी-विण । केला तितका होय शीण ॥ ४ ॥

॥ १९ ॥ गेला संदेहाचा मळ । तेणें निःसंग निर्मळ ॥ १ ॥ बाह्य गंगाजळस्नान । चित्तशुद्धि ब्रह्मज्ञान ॥ २ ॥ सर्वकाळ कर्मनिष्ठ । सर्वसाक्षित्वें वरिष्ठ ॥ ३ ॥ रामदासीं स्नानसंध्या । सुत करी माता वंध्या ॥ ४ ॥

॥ २० ॥ सर्वकाळ संतृप्तता । तृप्त केली लोलंगता ॥ १ ॥ फळ जाहलें तर्पणीं । संसारासी पडिलें पाणी ॥ २ ॥ देवराव तृप्त केले । भावें आत्म निवेदिलें ॥ ३ ॥ रामदासाचे तर्पणीं । सर्व केलें रामार्पणीं ॥ ४ ॥

॥ २१ ॥ अनित्याचा भ्रम गेला । शुद्ध नित्य नेम केला ॥ १ ॥ नित्यानित्य हा विचार । केला स्वधर्म आचार ॥२॥ देहबुद्धी अनर्गळ । बोधें फिटला विटाळ ॥ ३ ॥ रामदासीं ज्ञान झालें । आणि स्वधर्म रक्षिले ॥ ४ ॥

---

## वेडसरपंचक.

॥ १ ॥ पडसादासीं करी वाद । खळाळाशीं तो विवाद ॥ १ ॥ तेथें चालेना मीपण । शीण पावावा आपण ॥ २ ॥ सावधानासवें जावें । प्रतिबिंबेंसीं भांडावें ॥ ३ ॥ रामदास ह्मणे भावें । समुद्रासीं गडगडावें ॥ ४ ॥

॥ २ ॥ संत बोलले बहुविध । तेथें कैंचें ह्मणूं सिद्ध ॥ १ ॥ कोणें कोणासीं भांडावें । कोण्या पंथासीं मोडावें ॥ २ ॥ बहु यात्रा पृथ्वीवरी । बहु शब्द नानापरी ॥ ३ ॥ नाना सैन्य नाना पुरें । दास ह्मणे ते उत्तरें ॥ ४ ॥

॥ ३ ॥ माया अविद्येचें बंड । नानाप्रकारीं थोतांड ॥ १ ॥ अवघें सांडुनीयां यावें । एक भगवंता पहावें ॥ २ ॥ पंचभूतांचा मेळावा । दृश्य पदार्थ अघवा ॥ ३ ॥ ह्मणे रामीं रामदास। दृश्य भासे मनोभास ॥ ४ ॥

॥ ४ ॥ आमचे वंशीं कैंचा राम । एक पिंडींचें निःकाम ॥ १ ॥ रामदास्य आलें हातां । अवघा वंश धन्य आतां ॥ २ ॥ बापें केली उपासना ॥ आह्मी लाधलों त्या धना ॥ ३ ॥

---

१ स्वाधीन. २ बाहेरून. ३ आसक्ति. ४ स्वछंद. ५ प्रतिध्वनीबरोबर. ६ अज्ञानाचें बंड.

वेधु अभिलाषा टेंकला । वाट घेउनि भिन्न झाला ॥ ४ ॥ पोर सकळां संकोचले । एक सुखा उधळले ॥ ५ ॥ रामीं रामदासीं स्थिती । पाहिली वडिलांची रीती ॥ ६ ॥

॥ ५ ॥ मांजीं बांधावा भोंपळा । तैशी बांधों नये शिळा ॥ १ ॥ सारासार निवडावें । तैसें जाणोनीयां घ्यावें ॥ २ ॥ रत्न खडे येर खडे । सगट देतां प्राणी रडे ॥ ३ ॥ एका ठायीं सोनें लाख । लाख देतां मारी हाक ॥ ४ ॥ मनुष्य गोड घांस घेतें । कडु अवघें सांडितें ॥ ५ ॥ दास ह्मणे भक्तिसारा । नको अभक्ता गव्हारा ॥ ६ ॥

॥ ६ ॥ गगन आडतचि नाहीं । तैसें निरंजन पाहीं ॥१॥ चंचल गुणें सगुणें । विकार आड तो पावणें ॥ २ ॥ सारासारनिवड नाहीं । प्रत्ययानें पाहें कांहीं ॥ ३ ॥ कडु विख आणि वावडें । तया लिगडोनि पडे वेडें ॥ ४ ॥ तैसें संसाराचें सुख । आदि अंतीं अवघें दुःख ॥ ५ ॥ सुखासारिखें दिसतें । उदंड दुःख आहे तेथें ॥ ६ ॥ दास ह्मणे हा वैळसा कोणें सोसावा गळसा ॥ ७ ॥

॥ ७ ॥ भगवंताचे भक्तिसाठीं । थोर करावी आटाआटी ॥ १ ॥ स्वेदबिंदु आले जाण । तेंचि भागिरथीचें स्नान ॥ २ ॥ वोळंगता देवराव । सहज होतसे उपाव ॥ ३ ॥ सकळ लोकांचें भाषण । देवासाठीं संभाषण ॥ ४ ॥ जें हरवलें सांडलें । देवावीण कोठें गेलें ॥ ५ ॥ जठराग्नीस अवदान । लोक ह्मणती भोजन ॥ ६ ॥ एकवीस सहस्र जप । होतो करितां साक्षेप ॥ ७ ॥ दास ह्मणे मोठें चोज । देवीं सहजीं सहज ॥ ८ ॥

॥ ८ ॥ माजीं बांधावा भोंपळा । तैसी बांधों नये शिळा ॥ १ ॥ घेऊं नये तेंचि घ्यावें । येरें अवघेंचि सांडावें ॥ २ ॥ विषवल्ली अमरवल्ली । अवघी देवेंचि निर्मिली ॥ ३ ॥ अवघी सृष्टीची लगट । करूं नये कीं प्रगट ॥ ४ ॥ अवघेंची केलें देवें । जें जें माने तेंचि घ्यावें ॥ ५ ॥ अवघें सगट सारिखेंचि । वाट मोडे साधनाची ॥ ६ ॥ दास ह्मणे हरिजन । धन्य जाणे तो सज्जन ॥ ७ ॥

॥ ९ ॥ वेधें भेदावें अंतर । भक्ति घडे तदनंतर ॥ १ ॥ मनासारिखें चालावें । हेतु जाणोनी बोलावें ॥ २ ॥ जनीं आवडीचे जन । तेचि होती हो सज्जन ॥ ३ ॥ बरें परीक्षावें जना । अवघे सगट पिटवेना ॥ ४ ॥ दास ह्मणे निवडावें । लोक जाणोनीयां घ्यावें ॥ ५ ॥

॥ १० ॥ यथातथ्य आठवेना । कांहीं हीत तें घडेना ॥ १ ॥ कांता ज्याचे बंदिखाना । नव महिने पतना ॥ २ ॥ बारा वर्षे बाळपण । आंगीं होतें मूर्खपण ॥ ३ ॥ पुढें तारुण्याचे भरें । आलें कामाचें विखारें ॥ ४॥ पुढें आलें वृद्धपण । सवें पातलें मरण ॥ ५ ॥ दास ह्मणे रात्रंदिवस । नाहीं मराया अवकाश ॥ ६ ॥

॥ ११ ॥ देवें जन्मासि घातलें । नाना सुख दाखविलें ॥ १ ॥ त्यासि कैसें विसरावें । पुढें कैसेनि तरावें ॥ २ ॥ कूळ समूळ सांभाळिलें । नानाप्रकारीं पाळिलें ॥ ३ ॥ दास ह्मणे देवावीण । दुजा सांभाळितो कोण ॥ ६ ॥

---

१ कंबरेला. २ अनुभवानें. ३ फेरा. ४ गळपाश. ५ घामाचे बिंदु. ६ आश्चर्य. ७ इतर. ८ एकसारखें. ९ मदनाचें.

॥ १२ ॥ रात्रंदिवस दुश्चित्त । चारी घटिका सावचित्त ॥ १ ॥ होऊन कीर्तीनें बैसावें । भावें भगवंतासि गावें ॥ २ ॥ सदा संसारकथन । क्षण एक सावधान ॥ ३ ॥ दास ह्मणे वारंवार । बहुसाल खबरदार ॥ ४ ॥

॥ १३ ॥ रात्रंदिवस गव्होर । फिरतसे दारोदार ॥ १ ॥ आपलें मन आटोपावें । नाहीं तरी फजित व्हावें ॥ २ ॥ कल्पनेचे भरोवेरीं । करूं नये तेंचि करी ॥ ३ ॥ दास ह्मणे हें वाढोळ । आटोपिना तो चांडाळ ॥ ४ ॥

॥ १४ ॥ काय करीतें हें मन । साक्ष आपुला आपण ॥ १ ॥ हित आपुलें करावें । नाहीं वीर्यलोका जावें ॥ २ ॥ काय वासना ह्मणते । आपणास साक्ष येते ॥ ३ ॥ मन असे बरगळ । केल्या होतसे विव्हळ ॥ ४ ॥ सांडिना हें संसारिक । कांहीं पाहावे विवेक ॥ ५ ॥ दास ह्मणे सावधान । पदरीं बांधलें मरण ॥ ६ ॥

---

## क्षोभपंचक.

॥ १ ॥ करितां सांभाळ आपुला । दुःखें जीव भांबावला ॥ १ ॥ पाहों जातां सारासार । कांहीं कळेना विचार ॥ २ ॥ लोभें वृत्ती लांचावली । क्षोभें वृत्ती जाजावेली ॥ ३ ॥ रामीं रामदास ह्मणे । कोण उपाय करणें ॥ ४ ॥

॥ २ ॥ संग स्वार्थाचा धरिला । तेणें काम बळावला ॥ १ ॥ थोरपणें हे मातले । तेणें अव्हाटीं घातलें ॥ २ ॥ कामामागें आला क्रोध । क्रोधें केला बहु खेद ॥ ३ ॥ लोभ दैभाचें कारण । मोहें केलें विस्मरण ॥ ४ ॥ कामीं लांचावलें मन । झालें बुद्धीचें पतन ॥ ५ ॥ दास ह्मणे हो सकळ । अवघे अविवेचें मूळ ॥ ६ ॥

॥ ३ ॥ गेला प्रपंच हातींचा । लेश नाहीं परमार्थाचा ॥ १ ॥ दोहींकडे अंतरलों । थोरपणें भांबावलों ॥ २ ॥ गेली अवघी निस्पृहता । नाहीं स्वार्थही पूरता ॥ ३ ॥ पूर्ण झाली नाहीं आस । इकडे बुडाला अभ्यास ॥ ४ ॥ दास ह्मणे क्रोधें केलें । अवघें लाजिरवाणें झालें ॥ ५ ॥

॥ ४ ॥ उगमीं विषें कालवलें । तेंचि प्रवाहीं पडलें ॥ १ ॥ आतां कोणेकडे जावें । कोण्या प्रकारें असावें ॥ २ ॥ होता भूषणाचा ठावो । तेथें जहाला अभावो ॥ ३ ॥ मूळ अंतरीं तें वेडें । जहालें अवघेंचि वांकडें ॥ ४ ॥ छाया शांतीची नावडे । क्रोधवणवा आवडे ॥ ५ ॥ रामदास ह्मणे जल्पें । झाला अंतरीं विकल्प ॥ ६ ॥

॥ ५ ॥ सन्निपाताचें लक्षण । अवघें झालें कुलक्षण ॥ १ ॥ जन कोणीच नावडे । प्राणी विकल्पें वावडे ॥ २ ॥ आसवाची बडबडी । होऊं पाहे देशोधडी ॥ ३ ॥ प्राणी क्रोधें पिसाळलें । त्यास कोण ह्मणे भलें ॥ ४ ॥ मना आलें तें करावें । बळेंचि अव्हाटीं भरावें ॥ ५ ॥ रामदास ह्मणे खरें । ज्याचें त्यासी वाटे बरें ॥ ६ ॥

---

१ अप्रयोजक मनुष्य. २ भरी पडून. ३ त्रासली. ४ बडबड. ५ कल्पना. संशय. ६ भटकती.

॥ ६ ॥ अधिक बोलोंचि नेदिती । धरूनि जीभचि कापिती ॥ १ ॥ तेथें चालेना कीं ताठा । पोटासाठीं देशवटा ॥ २ ॥ हात पाय ते कापिती । कर्ण नासिक छेदिती ॥ ३ ॥ नानाप्रकारीं यातना । अवघें श्रुत आहे जना ॥ ४ ॥ दास ह्मणे सेवाचोर । साहेबाचे हरामखोर ॥ ५ ॥

## वोसणपंचक.

॥ १ ॥ वोसणरे वोसणरे । वोसणरे राग वोसणरे ॥ १ ॥ आढळेना आढळेना । आढळेना । संत आढळेना ॥ २ ॥ उमजेना उमजेना । उमजेना पंथ उमजेना ॥ ३ ॥ कोण जाणे कोण जाणे । कोण जाणे रामदास जाणे ॥ ४ ॥

॥ २ ॥ चालवेना चालवेना । चालवेना पंथ चालवेना ॥ १ ॥ दुःख वाटे दुःख वाटे । दुःख वाटे देहबुद्धी लोटे ॥ २ ॥ सुख नाहीं सुख नाहीं । सुख नाहीं भवसुख नाहीं ॥ ३ ॥ जड जातो जड जातो । जड जातो सत्य जड जातो ॥ ४ ॥ धरवेना धरवेना । रामदास ह्मणे पण करवेना ॥ ५ ॥

॥ ३ ॥ संतापलें संतापलें । संतापलें मन संतापलें ॥ १ ॥ झिजलागे झिजलागे । झिजलागे देह झिजलागे ॥ २ ॥ सोसवेना सोसवेना । सोसवेना शीण सोसवेना ॥ ३ ॥ धीर नाहीं धीर नाहीं । दास ह्मणे अंतर पाहीं ॥ ४ ॥

॥ ४ ॥ त्यागवेना त्यागवेना । त्यागवेना भाग्य त्यागवेना ॥ १ ॥ बुद्धि नाहीं बुद्धि नाहीं । बुद्धि नाहीं देहबुद्धी नाहीं ॥ २ ॥ धरवेना सोडवेना । तोडवेना मन वोढवेना ॥ ३ ॥ दास ह्मणे दास ह्मणे । पोटिंचा निश्चय कोण जाणे ॥ ४ ॥

॥ ५ ॥ मोकल रे मोकल रे । मोकल रे मना मोकल रे ॥ १ ॥ योग्य नाहीं योग्य नाहीं । त्याग नाहीं वितरांग नाहीं ॥ २ ॥ भक्ति नाहीं युक्ति नाहीं । देव नाहीं सानुकूळ नाहीं ॥ ३ ॥ जप नाहीं तप नाहीं । गुण नाहीं निर्गुण नाहीं ॥ ४ ॥ ज्ञान नाहीं ध्यान नाहीं । लय नाहीं साधन नाहीं ॥ ५ ॥ शम नाहीं दम नाहीं । बाह्यांतरीं मन नाहीं ॥ ६ ॥ इष्ट नाहीं मित्र नाहीं । धारिष्ठ नाहीं वरिष्ठ नाहीं ॥ ७ ॥ दान नाहीं पुण्य नाहीं । कर्म नाहीं स्वधर्म नाहीं ॥ ८ ॥ तीर्थ नाहीं व्रत नाहीं । शांति नाहीं विश्रांति नाहीं ॥ ९ ॥ न्याय नाहीं नीति नाहीं । दास ह्मणे कांहींच नाहीं ॥ १० ॥

॥ ६ ॥ साधिल रे साधिल रे । साधिल रे भाव साधिल रे ॥ १ ॥ काम आहे क्रोध आहे । मद आहे मत्सर आहे ॥ २ ॥ लोभ आहे दंभ आहे । क्षोभ आहे क्षेमं आहे ॥ ३ ॥ भेद आहे खेद आहे । वाद आहे उच्छेद आहे ॥ ४ ॥ पाप आहे दोष आहे । अंतरीं पहातां द्वेष आहे ॥ ५ ॥ अर्थ आहे स्वार्थ आहे । मान्य तें करणें अर्थ आहे ॥ ६ ॥ जाणवेना जाणवेना । दास ह्मणे खूण सांगवेना ॥ ७ ॥

## विवेकपंचक.

॥ १ ॥ एक देव आहे खरा । माया नाथिला पसारा ॥ १ ॥ हेंचि विचारें बा-

---

१ देहाभिमान. २ संसारसुख. ३ पाठवून दे. ४ वैराग्य. ५ कल्याण.

णावें । ज्ञान तयासी ह्मणावें ॥ २ ॥ साच ह्मणों तरि हें नासे । मिथ्या ह्मणों तरि हें दिसे ॥ ३ ॥ पाहों जातां आकारलें । मुळीं कांहीं नाहीं झालें ॥ ४ ॥ कैसा देहीं देहातीत । कैसे अनंत अनंत ॥ ५ ॥ रामदासाचें बोलणें । स्वग्रामार्जी जाईजणें ॥ ६ ॥

॥ २ ॥ पूर्वी पहातां मी कोण । धुंडूं आपणा आपण ॥ १ ॥ स्वयें आपुला उगव । जाणे तोचि महानुभाव[1] ॥ २ ॥ कोण कर्म आचरला । कैसा संसारासी आला ॥ ३ ॥ आले वाटे जो मुरडे[2] । देव तयासि सांपडे ॥ ४ ॥ आली वाट ती कवण । मायेचें जें अधिष्ठान[3] ॥ ५ ॥ रामदासाची उपमा । ग्राम नाहीं कैंची सीमा ॥ ६ ॥

॥ ३ ॥ पांचा लक्षणीं पूरता । धन्य धन्य तोचि ज्ञाता ॥ १ ॥ विवेक वैराग्य सोडीना । कर्म मर्यादा सांडीना ॥ २ ॥ बाह्य बोले शब्दज्ञान । अंतर्यामीं समाधान ॥ ३ ॥ रामीं रामदास कवी । न्याय नीतीनें शिकवी ॥ ४ ॥

॥ ४ ॥ अंतर्यामीं समाधान । बाह्य सगुण भजन ॥ १ ॥ धन्य धन्य तेंचि ज्ञान । अंतर्यामीं समाधान ॥ २ ॥ निरूपणें अंतरत्याग । बाह्य संपादी वैराग्य ॥ ३ ॥ रामीं रामदास ह्मणे । ज्ञान स्वधर्मलक्षणें ॥ ४ ॥

॥ ५ ॥ कौलें झाला रघुनाथाचा । मेळा मिळाला भक्तांचा ॥१॥ अहंभाव वरचेवरी । बळेंचि घातला बाहेरी ॥ २ ॥ क्षेत्रीं विवेक जहाला । क्रोध देशोधडी केला ॥ ३ ॥ काम देहींचा कोंडिला । मद मत्सर पाडिला ॥ ४ ॥ लोभ दंभ नागविला । अहंकार बुडविला ॥ ५ ॥ कुत्रें मीपण पळालें । उगेंच अज्ञान गळालें ॥ ६ ॥ फितव्‍र्वखोर होता द्वंद्वं । त्याचा केला शिरच्छेद ॥ ७ ॥ तिरस्कार दावेदार । त्यास बोधें केला मार ॥ ८ ॥ मन चोरटें धारिलें । नित्यनेमें जर्जर केलें ॥ ९ ॥ आळस साक्षेपें घेतलें । पायीं धरूनि आपटिलें ॥ १० ॥ दुश्चितपण अकस्मात । निरूपणीं केला घात ॥ ११ ॥ कपट मैंद सांपडलें । उभें सर्वांगीं तोडिलें ॥ १२ ॥ बंड पाखांड तुटिलें । बळेंचि धरूनि कुटिलें ॥ १३ ॥ शब्द बांधोनी पाडिला ॥ निःशब्द तेथें प्रतिष्ठिला ॥ १४ ॥ गर्वताठा विटंबिला । वाद विवेकें झाडिला ॥ १५ ॥ जेणें भावार्थ उडविला । धरूनि विकल्प बुडविला ॥ १६ ॥ करूनि अभावाचा नाश । राहे रामीं रामदास ॥ १७ ॥

---

# वैराग्यपंचक.

॥ १ ॥ प्रपंच सांडुनीयां बुद्धी । जडली परमार्थ उपाधी ॥ १ ॥ मना होईं सावचित्त । त्याग करणें हा उचित ॥ २ ॥ संप्रदाय समुदाव । तेणें जड अहंभाव ॥ ३ ॥ रामदास ह्मणे नेम । भिक्षा मागणें उत्तम ॥ ४ ॥

॥ २ ॥ प्रपंच केला ताडातोडी । जडली परमार्थाची बेडी ॥ १ ॥ सावधान होईं जीवा । त्याग केलाचि करावा ॥ २ ॥ काम क्रोध राग द्वेष । अंगीं जडले विशेष ॥ ३ ॥ रामदासें बरें केलें । अवघें जाणोनी त्यागिलें ॥ ४ ॥

---

१ मोठा अनुभवी. २ परततो. ३ ठिकाण, स्थान. ४ आज्ञा. ५ हद्दपार. ६ फितुरी. ७ तंटा, भांडण. ८ संशय, कल्पना, ९ सावध.

॥ ३ ॥ कोण कैंचा रे भिकारी । भीक मागे दारोदारीं ॥ १ ॥ ऐसें ह्मणे तेथें जावें । सुखें वैराग्यें फिरावें ॥ २ ॥ आहे ब्राह्मण विदेशी । नाहीं ठाऊक आह्मांसी ॥ ३ ॥ रामीं रामदास ह्मणे । कोण आहे कोण जाणे ॥ ४ ॥

॥ ४ ॥ नको ओळखीचे जन । अंगीं वाजे अभिमान ॥ १ ॥ आतां तेथें जावें मना । जेथें कोणी वोळखीना ॥ २ ॥ लोक ह्मणती कोण काये । पुसों जातां सांगों नये ॥ ३ ॥ रामदास ह्मणे पाहीं । तेथें कांहीं चिंता नाहीं ॥ ४ ॥

॥ ५ ॥ देह जावो अथवा राहो । रामें फेडिला संदेहो ॥ १ ॥ रामालागीं देशवटा । संसाराच्या बारा वाटा ॥ २ ॥ जीवालागीं आदि अंतीं । एक रामाची संगती ॥ ३ ॥ रामदासीं रामरावो । नाहीं आणीक उपावो ॥ ४ ॥

॥ ६ ॥ सांज वोसरतां सात । वायां करावा आकांत ॥ १ ॥ तैसीं सर्वां जीवलगें । जाती एकमेकांमागें ॥ २ ॥ चार दिवस यात्रा भरे । सर्वेचि मागुती वोसरे ॥ ३ ॥ पूर्ण होतां महोत्सवो । फुटे अवघा समुदावो ॥ ४ ॥ बहुत वराडी मिळाले । जैसे आले तैसे गेले ॥ ५ ॥ एक येती एक जाती । नाना कौतूक पाहाती ॥ ६ ॥ बंधु बहिणी माता पिता । कन्या पुत्र आणि कांता ॥ ७ ॥ ऋणानुबंधाचें कारण । वायां शोक निःकारण ॥ ८ ॥ एक बहुसाल जिती । एक वेळ वरी जाती ॥ ९ ॥ बहु साले दासदासी । नाना पशु गाई महिषी ॥ १० ॥ धन धान्याचें संचित । कांहीं होत कांहीं जात ॥ ११ ॥ रामीं रामदास ह्मणे । संसारासी येणें जाणें ॥ १२ ॥

॥ ७ ॥ कोणी पुत्र कामां नये । मित्र करी तो उपाये ॥ १ ॥ कैंचें आपुलें पैरावें । अवघें ऋणानुबंधें द्यावें ॥ २ ॥ जीवलगाचिये परी । मातेहुनी लोभ करी ॥ ३ ॥ आहे कोण जाणे कैंची । परी ते जिवाचे जीवींची ॥ ४ ॥ जीवलग जीव घेती । त्यासि परावीं रक्षिती ॥ ५ ॥ रामीं रामदास ह्मणे । न कळे देवाचें करणें ॥ ६ ॥

॥ ८ ॥ जे जे संसारासी आले । ते ते तितुकेही एकले ॥ १ ॥ वायां आपुलीं मानिलीं । शेखीं दुरी दुरावलीं ॥ २ ॥ सर्वां सांडूनियां देशीं । मृत्यु पावलीं विदेशीं ॥ ३ ॥ खाती व्याघ्र आणि लांडगे । तेथें कैचीं जीवलगें ॥ ४ ॥ जीवलग जीव घेती । त्यासि परावीं रक्षिती ॥ ५ ॥ रामीं रामदास ह्मणे । अवघीं जाणावीं पिशुनें ॥ ६ ॥

॥ ९ ॥ देह बहुतांचें खाजें । मूर्ख ह्मणे माझें माझें ॥ १ ॥ विंचु विखारें अजगर । नाना श्वापदें अपार ॥ २ ॥ नाना पक्षी गीध काक । श्वान मार्जार जंबुक ॥ ३ ॥ लाव लासी भुत खेत । सांगों जातां असंख्यात ॥ ४ ॥ किती सांगों वारंवार । जीव जीवाचा आहार ॥ ५ ॥ ह्मणे रामीं रामदास । कैंचा देहाचा विश्वास ॥ ६ ॥

॥ १० ॥ घात करूनी आपुला । काय रडसी पुढिला ॥ १ ॥ बहु मोलाचें आयुष्य । विषय लोभें केला नाश ॥ २ ॥ नाहीं ओळखिलें सत्या । तेणें होते आत्महत्या ॥ ३ ॥ नरदेहाची संगती । गेली गेली हातोहातीं ॥ ४ ॥ नाहीं देहाचा भरंवसा । गेली गेलीरे वयसा ॥ ५ ॥ रामीं रामदास ह्मणे । भुलूं नको मूर्खपणें ॥ ६ ॥

---

१ नाश पावते. २ ठेवा, सांठवण. ३ दुसऱ्याचें. ४ शेवटीं. ५ सर्प. ६ कोल्हे. ७ आयुष्य.

॥ ११ ॥ कोणें कोणासी रडावें । एकामागें एकें जावें ॥ १ ॥ एक वेळ गेली माता । एक वेळ गेला पिता ॥ २ ॥ द्रव्य दारा जाती पुत्र । जीवलगें आणि मित्र ॥ ३ ॥ प्राणी संसारासी आला । तितुका मृत्युपंथें गेला ॥ ४ ॥ पूर्वज गेले देवापासीं । तेचि वाट आपणासी ॥ ५ ॥ रामदास ह्मणे लोक । करी गेलियांचा शोक ॥ ६ ॥

॥ १२ ॥ ज्याचें होतें तेणें नेलें । तेथें तुझें काय गेलें ॥ १ ॥ वेगीं होईं सावधान । करी देवाचें भजन ॥ २ ॥ गती नकळे होणाराची । हे तंत्र इच्छा भगवंताची ॥ ३ ॥ पूर्वसंचिताचीं फळें । येती दुःखाचे हेलाळे ॥ ४ ॥ पूर्वीं केलें जें संचित । तें तें भोगावें निश्चित ॥ ५ ॥ दास ह्मणे पूर्व रेखा । प्राप्त न टळे ब्रह्मादिकां ॥ ६ ॥

॥ १३ ॥ वाटे संसार दुस्तर । होती दुःखाचे डोंगर ॥ १ ॥ तरी श्रवण करावें । तेणें दुःख विसरावें ॥ २ ॥ पुढें काय करूं आतां । वाटे संसाराची चिंता ॥ ३ ॥ येतां उभंड भरेना । मायाजाळ आवरेना ॥ ४ ॥ दुरी जाउमी विवेक । आणि आदळतो शोक ॥ ५ ॥ रामीं रामदास ह्मणे । दुःख जीतें धरी उणें ॥ ६ ॥

॥ १४ ॥ काम क्रोध मद मत्सर । जरि झाले अनावर ॥ १ ॥ त्यांसि करावें साधन । सदा श्रवण मनन ॥ २ ॥ बोला ऐसें चालवेना । जीवभ्रांती हालवेना ॥ ३ ॥ दृढ लौकिक सांडेना । ज्ञान विवेक मांडेना ॥ ४ ॥ पोटीं विकल्प सुटेना । नष्ट संदेह तुटेना ॥ ५ ॥ दास ह्मणे निर्बुजलें । मन संसारीं बुडालें ॥ ६ ॥

## संशयपंचक.

॥ १ ॥ गेलों काशी विश्वेश्वरा । सेतुबंध रामेश्वरा ॥ १ ॥ तरी संशय तुटेना । पूर्व गुण पालटेना ॥ २ ॥ भागीरथी गोदावरी । केली कृष्णा आणि कावेरी ॥ ३ ॥ राम अयोध्येचा पती । केली कृष्णद्वारावती ॥ ४ ॥ बद्रि ओढ्या जगन्नाथ । केला स्वामी त्रिमल्लनाथ ॥ ५ ॥ मातापूर तुळजापुर । सप्तशृंगी कोल्हापूर ॥ ६ ॥ केली पंढरी नरहरी । शंभू पाहिला शीखरीं ॥ ७ ॥ मोरेश्वर भुलेश्वर । ज्वालामुखी हरेश्वर ॥ ८ ॥ सिद्ध मैराळ मारुती । देव केले नेणों किती ॥ ९ ॥ बारा लिंगें या वेगळीं । तीर्थें केलीं भूमंडळीं ॥ १० ॥ रामदास ह्मणे भावें । तरी हें मन पालटावें ॥ ११ ॥

॥ २ ॥ तेणें संशय तुटती । पूर्व गुण पालटती ॥ १ ॥ एक उपासना धरी । भक्ति भावें त्याची करी ॥ २ ॥ सर्व नश्वर जाणून । वृत्ति करी उदासीन ॥ ३ ॥ सत्य वस्तू तें साचार । त्याचा करावा विचार ॥ ४ ॥ त्यागूनियां अनर्गळ । सदा असावें निर्मळ ॥ ५ ॥ ध्यानें आवरावें मन । आणि इंद्रियदमन ॥ ६ ॥ अखंड वाचे रामनाम । स्नान संध्या नित्यनेम ॥ ७ ॥ दास ह्मणे सर्व भाव । जेथें भाव तेथें देव ॥ ८ ॥

॥ ३ ॥ कुळय पूजा परंपार । एकाहूनि एक थोर ॥ १ ॥ आतां कोठें ठेऊं भाव । जेथें तेथें महादेव ॥ २ ॥ माझे कुळींचें दैवत । पाहों जातां असंख्यात ॥ ३ ॥ राम कृष्ण महादेव । बनशंकरी खंडेराव ॥ ४ ॥ माता सटवाई आपण । स्वामी लक्ष्मी नारायण ॥ ५ ॥

१ स्त्री. २ उमाळे. ३ संशयवृत्ती. ४ श्रमलें. ५ क्षणभंगुर. ६ स्वच्छंद वर्तन.

वीर बैसविला देव्हारां । मांझी माता एकवीरा ॥ ६ ॥ माय राणी पांडुरंग । मुंजा नरसिंग झोटिंग ॥ ७ ॥ महालक्ष्मी खवळिया । कुळदैवत मोरया ॥ ८ ॥ मातापुरीची यमाई । सप्तशृंगी चंडाबाई ॥ ९ ॥ तुळजापुरीं तुकाबाई । घाटमाथाची नवलाई ॥ १० ॥ दंडपाणी जोगेश्वरी । माता कामाक्षी कावेरी ॥ ११ ॥ म्हैसबाई नारायण । आग्या वेताळ कारण ॥ १२ ॥ मुंजा जोगिणी मांगिणी । बहुसाल मानविणी ॥ १३ ॥ धोपेश्वर कोपेश्वर । सिद्धेश्वर सोमेश्वर ॥ १४ ॥ सात पांच रंगनाथ । त्र्यंबकेश वैजनाथ ॥ १५ ॥ अन्नपूर्णा शालिग्राम । हयग्रीव मेघश्याम ॥ १६ ॥ परशुराम कोटेश्वर । नानाशक्ती परमेश्वर ॥ १७ ॥ महिकावती भोगावती । आम्हुच्या देव्हारां बैसती ॥ १८ ॥ रानदेवी नारायण । म्हैसासुर मल्लिकार्जुन ॥ १९ ॥ अग्निसारिखें दैवत । आणि मुख्य प्राणनाथ ॥ २० ॥ देव तांबडे अनेक । बहुसाल केला टांक ॥ २१ ॥ लांबे देव ते नर्मदे । देव दाटले तुसदे ॥ २२ ॥ सोमकांत सूर्यकांत । नाग आणि चक्रांकित ॥ २३ ॥ औटहात मृत्तिकापूजन । नाना देवांचें लेखन ॥ २४ ॥ डाउ पूजावे अनंत । गौरी आणि कपोईत ॥ २५ ॥ रामदासीं देव एक । येरे सर्वही माईक ॥ २६ ॥

॥ ४ ॥ भाव धरी संतापायीं । तेणें देव पडे ठायीं ॥ १ ॥ नाना देवांचें भजन । तेणें नोहे समाधान ॥ २ ॥ सकळ देवांमध्यें सार । आहे अनंत अपार ॥ ३ ॥ रामीं रामदास म्हणे । अवघे देव केलें जेणें ॥ ४ ॥

॥ ५ ॥ आतां कोणा शरण जावें । सत्य कोणाचें मानावें ॥ १ ॥ नाना पंथ नाना मतें । भूमंडळीं असंख्यातें ॥ २ ॥ जपी तपी नाना हटी । मंत्रावळी लक्ष कोटी ॥ ३ ॥ एक मुद्रा हे लाविती । एक आसन घालिती ॥ ४ ॥ एक दाविती देखणी । एक अनस्यूतध्वनी ॥ ५ ॥ एक नासाग्रीं लक्षिती । एक हृदयीं दाविती ॥ ६ ॥ पिंडज्ञानी तत्त्वज्ञानी । योगाभ्यासी सिद्ध ज्ञानी ॥ ७ ॥ पंचाक्षरी धूम्रपानी । गोरांजन उपोषणी ॥ ८ ॥ दुग्धाहारी निराहारी । फळाहारी पर्णाहारी ॥ ९ ॥ एक औषधीप्रयोग । एक देती धातुमार्ग ॥ १० ॥ एक विभूती लाविती । एका प्रिय द्वारावती ॥ ११ ॥ दंडधारी जटाधारी । एक बाळब्रह्मचारी ॥ १२ ॥ मौनी नग्न दिगंबर । पंचाक्षरी योगेश्वर ॥ १३ ॥ एक जोशी आणि वैदिक । एक पंडित पुराणिक ॥ १४ ॥ साधु संत मुनीश्वर । ऋषीश्वर कवीश्वर ॥ १५ ॥ गाती हरिदास बागडे । नृत्य करिती देवापुढें ॥ १६ ॥ एक म्हणती अवघे वाव । एक म्हणती अवघे देव ॥ १७ ॥ एक कळोंचि नेदिती । एक दाऊनी सांगती ॥ १८ ॥ एक कर्मीच तत्पर । एक कर्मी अनादर ॥ १९ ॥ एक मानिती सगुण । एक मानिती पाषाण ॥ २० ॥ एकें केला सर्व त्याग । एक म्हणती राजयोग ॥ २१ ॥ रामदास सांगे खूण । भक्तीवीणें सर्व क्षीण ॥ २२ ॥

॥ ६ ॥ शरण जावें संतजना । सत्य मानावें निर्गुणा ॥ १ ॥ नानामतीं काय

१ इतर. २ सांपडती. ३ सारखा ध्वनि करणारे. ४ शरीरज्ञानी. ५ व्यर्थ.

चोर । करणें सत्याचा निवाड ॥ २ ॥ ज्ञान भक्तीसी जाणावें । भक्त तयासी ह्मणावें ॥ ३ ॥ रामीं रामदास सांगे । सर्वकाळ संतसंगें ॥ ४ ॥

॥ ७ ॥ संत कैसेनी जाणावे । साधु कैसे ओळखावे ॥ १ ॥ बहुत गोसावी असती । भले अवघेचि दीसती ॥ २ ॥ एक संसारीं गुंतले । एकें वेष पालटिले ॥ ३ ॥ रामीं रामदास ह्मणे । कैसीं संतांचीं लक्षणें ॥ ४ ॥

॥ ८ ॥ तेचि जाणावे सज्जन । जयां शुद्ध ब्रह्मज्ञान ॥ १ ॥ जंववरी देहाची संगती । तंववरी सगुणीं भजती ॥ २ ॥ जाणोनियां सारासार । सदा श्रवणीं तत्पर ॥ ३ ॥ बाह्यत्याग संपादणें । अंतरत्याग निरूपणें ॥ ४ ॥ कर्म करिती आवडीं । फळाशेची नाहीं गोडी ॥ ५ ॥ शांती क्षमा आणि दया । सर्वसख्य मानी जया ॥ ६ ॥ हरिकथानिरूपण । सदा श्रवण मनन ॥ ७ ॥ बोलासारिखें चालणें । तींच संतांचीं लक्षणें ॥ ८ ॥ एकनिष्ठ उपासना । अति तत्पर भजना ॥ ९ ॥ स्वार्थ सांडुनीयां देणें । नित्य तेंचि संपादणें ॥ १० ॥ ह्मणे रामीं रामदास । जया नाहीं आशापाश ॥ ११ ॥

---

## नीतिपंचक.

॥ १ ॥ कामक्रोधें खवळला । तेणें सन्निपात झाला ॥ १ ॥ त्यास औषध करावें । पोटीं वैराग्य धरावें ॥ २ ॥ कुपथ्य अवज्ञेचें झालें । मग तें पुढें उफाळलें ॥ ३ ॥ मर्यादेनें निर्बुजलें । वारें अभिमानें घेतलें ॥ ४ ॥ दडपणाचा घाम आला । प्राणी उठोनि पळाला ॥ ५ ॥ रामदास ह्मणे भले । लोक ह्मणती पिसाळले ॥ ६ ॥

॥ २ ॥ झालें होऊनीयां गेलें । आतां कैसें होय भलें ॥ १ ॥ यासि सांगतों साधन । जेथें होय समाधान ॥ २ ॥ दिवसेंदिवस व्यथा सरे । अंगीं आरोग्यता भरे ॥ ३ ॥ अनुताप दुरी गेले । कांहीं किंचित उरले ॥ ४ ॥ व्यथा हरली विशेष । अल्पमात्र उरला दोष ॥ ५ ॥ रामदास ह्मणे जन्मवरी । पुढें विकार नानापरी ॥ ६ ॥

॥ ३ ॥ मर्यादेचे वाटे जावें । अनीति अंव्हाटे त्यजावें ॥ १ ॥ एक राम आहे खरा । तिकडे गुरुपरंपरा ॥ २ ॥ एकाकडे आहे जन । एकाकडे ते सज्जन ॥ ३ ॥ पुढें विवेकें वर्तावें । मार्गें मूळ सांभाळावें ॥ ४ ॥ उदंड झाले समुदाये । तरी आदि सोडूं नये ॥ ५ ॥ रामीं रामदास ह्मणे । जगीं मान्य तें बोलणें ॥ ६ ॥

॥ ४ ॥ अभक्तांसी निंदी जन । गुरुद्रोहीया सज्जन ॥ १ ॥ याकारणें वाटे जावें । लागे अवघेंचि करावें ॥ २ ॥ सगुण भजतां ज्ञान मोडे । ज्ञानें सगुण आवडे ॥ ३ ॥ कर्में होतसे उपाये । कर्मठपण कामा नये ॥ ४ ॥ शब्दें होय समाधान । कामा नये शब्दज्ञान ॥ ५ ॥ रामीं रामदास ह्मणे । किती सांगों मी लक्षणें ॥ ६ ॥

॥ ५ ॥ धरितां देवासीं अभाव । तोंडघशी पाडी देव ॥ १ ॥ याकारणें वाटे जावें । लागे अवघेंचि रक्षावें ॥ २ ॥ आहे देवासी उपाये । गुरुक्षोभ कामा नये ॥ ३ ॥

---

१ गरज. २ आत्मस्वरूपज्ञान. ३ पश्चात्ताप. ४ आडवाट. ५ पुष्कळ. ६ गुरूशीं क्रोध.

होतां क्रिया अमंगळ । त्यासि निंदिती सकळ ॥ ४ ॥ एक वैराग्य त्यागितां । अंगीं वाटे लोलंगतां ॥ ५ ॥ रामीं रामदास ह्मणे । सर्व नीतीनें करणें ॥ ६ ॥

## उपासनापंचक.

॥ १ ॥ ज्ञातेपण आधीं सांडी । जाणत्या नावडे पाषांडी ॥ १ ॥ देव पतितपावन । त्यासि करी अभिमान ॥ २ ॥ ध्रुव प्रन्हाद आपुले । भक्त जेणें उद्धारिले ॥ ३ ॥ बहुसाल भूमंडळीं । तारी भक्तांची मंडळी ॥ ४ ॥ जड मूढ सांगों किती । ज्यांचि नामें असंख्याती ॥ ५ ॥ रामीं रामदास ह्मणे । अंतकाळीं सोडवणें ॥ ६ ॥

॥ २ ॥ पूजा देवाची प्रतिमा । त्याची न कळे महिमा ॥ १ ॥ देव भक्तांचा विश्राम । त्यासि नेणे तो अधम ॥ २ ॥ नाना स्थानें भूमंडळीं । कोणीं सांगावीं आगळीं ॥ ३ ॥ ज्याचे चरणींचे उदकें । धन्य होती विश्वलोकें ॥ ४ ॥ ज्याचीं चरित्रें ऐकतां । जनीं होय सार्थकता ॥ ५ ॥ रामीं रामदास ह्मणे । धन्य होईल स्मरणें ॥ ६ ॥

॥ ३ ॥ देव भक्तांचा कैवारी । रक्षितसे नानापरी ॥ १ ॥ काय स्तंभीं प्रगटला । तेणें प्रन्हाद रक्षिला ॥ २ ॥ तये द्रौपदीकारणें । वस्त्रें दिल्हीं नारायणें ॥ ३ ॥ महासंकटीं रक्षिलें । गजेंद्रासी सोडवीलें ॥ ४ ॥ कूर्मरूपें धरिली धरा । झाला वराह दुसरा ॥५॥ जाणे दासाचें अंतर । लाखा जोहरी वीवर ॥ ६ ॥

॥ ४ ॥ भक्तालागीं पावे नेटें । वारी भक्तांचीं संकटें ॥ १ ॥ देव भावें लाचावला । त्यासि अभिमान लागला ॥ २ ॥ आपुल्या भक्तांचें जें उणें । साहेना तें कोटी गुणें ॥ ३ ॥ दास ह्मणे नानापरी । देव भक्तांचा कैवारी ॥ ४ ॥

## भक्तिपंचक.

॥ १ ॥ सोडी संसाराची आस । धरी भक्तीचा हैव्यास ॥ १ ॥ दुःखमूळ हा संसार । तयांमध्यें भक्ति सार ॥ २ ॥ ग्रंथ पहातां लक्ष कोटी । जेथें तेथें भक्ति मोठी ॥ ३ ॥ जन्मा आलियाचें फळ । दास ह्मणे तें सकळ ॥ ४ ॥

॥ २ ॥ राम दासाचा कैवारी । सेवकांचा अंगीकारी ॥ १ ॥ अंगीकारिले वानर । त्यांची ख्याती झाली थोर ॥ २ ॥ स्वयें निजधामा जाणें । राज्य कीजे बिभीषणें ॥ ३ ॥ भक्ता उणें देखे जेथें । स्वयें धांव घाली तेथें ॥ ४ ॥ तया वैर केलें साहे । परी भक्तांचें न साहे ॥५॥ रामीं रामदास ह्मणे । निजभक्तांचेनि गुणें ॥ ६ ॥

॥ ३ ॥ भक्ती रामाची करावी । वंशावळी उद्धरावी ॥ १ ॥ तन मन आणि धन । सर्व लौकिक सोडून ॥ २ ॥ पांचा पंचकाचे भरें । सर्वकाळ अत्यादरें ॥ ३ ॥ रामीं रामदास ह्मणे । दृढ भक्तीचेनि गुणें ॥ ४ ॥

॥ ४ ॥ अरे मनुष्यें काय यावें । एक रघुवीरा मागावें ॥ १ ॥ उपमन्यें धांवा केला । क्षीरसिंधू त्या दीधला ॥ २ ॥ धरु शरण चक्रपाणी । अढळ शोभा तारांगणीं ॥ ३ ॥

१ आसक्ति. २ विशेष. ३ सर्व लोक. ४ पृथ्वी. ५ सोकावला. ६ छंद.

राम ह्मणतां वदनीं । गणिका बैसली विमानीं ॥ ४ ॥ बाळ मित्र निष्कांचन । त्याचें दरिद्र विच्छिन्न ॥ ५ ॥ कुब्जा खंगली ह्मातारी । केली लावण्यसुंदरी ॥ ६ ॥ शुकमिषें रामवाणी । ह्मणतां पावन कुंटिणी ॥ ७ ॥ शरणागत निशाचर । राज्य देऊनी अमर ॥ ८ ॥ होता बंधूनें गांजिला । तो सुग्रीव राजा केला ॥ ९ ॥ तया अंबऋषीकारणें । दहा जन्म येणें जाणें ॥ १० ॥ रामदासीं रामराव । निजपदीं दिधला ठाव ॥ ११ ॥

॥ ५ ॥ शिरीं आहे रामराज । औषधांचें कोण काज ॥ १ ॥ जो प्रयत्न रामावीण । तो तो दुःखासी कारण ॥ २ ॥ शंकराचें हळाहळ । जेणें केलें सुशीतळ ॥ ३ ॥ आह्मां तोचि तो रक्षिता । रामदासीं नाहीं चिंता ॥ ४ ॥

॥ ६ ॥ विषें शंकरा जाळिलें । ज्याच्या नामें शीतळ झालें ॥ १ ॥ रामनामाची औषधी । जेणें तुटे भवव्याधी ॥ २ ॥ शिवें केली काशीपुरी । विश्व नामें मुक्त करी ॥ ३ ॥ रामनामें पुरे कोड । न मने त्यासि घाली होड ॥ ४ ॥ रामदासीं दृढ भाव । संदेहासि केली माव ॥ ५ ॥

॥ ७ ॥ दास आपुले मानावे । माझे गुण पालटावे ॥ १ ॥ काम क्रोध मद मत्सर। माझे ठायीं तिरस्कार ॥ २ ॥ राग द्वेष लोभ दंभ । नांदे अंतरीं स्वयंभ ॥ ३ ॥ रामदास ह्मणे आतां । देवा तुझे गुण गातां ॥ ४ ॥

॥ ८ ॥ धन्य धन्य ते वानर । जवळी राम निरंतर ॥ १ ॥ ब्रह्मादिकां नातुडे ध्यानीं । राम वानरगोठणीं ॥ २ ॥ वेद श्रुती नेणे माहिमा । तो गुज सांगे प्लवंगमा ॥ ३ ॥ वानरवेष धरी देव । भाग्यें लाधला केशव ॥ ४ ॥ दास ह्मणे ते देवाचे । आवडते रघुनाथाचे ॥ ५ ॥

॥ ९ ॥ टाळ वाजे मंद मंद । मुखीं हरिनाम छंद ॥ १ ॥ फडके टाळी ऐके वेळे । घोषें नाचे हे आगळें ॥ २ ॥ रंगीं हरिनाम मातले । नामघोषें आनंदले ॥३॥ उभे हरिदास रंगणीं । रामदास लोटांगणीं ॥ ४ ॥

॥ १० ॥ राज्य आलें रघुनाथाचें । भाग्य उदेलें भक्तांचें ॥ १ ॥ कल्पतरू चिंतामणी । कामधेनूची दुभणी ॥ २ ॥ परिस जहाले पाषाण । अंगीकार करी कोण ॥ ३ ॥ नाना रत्नांचे डोंगर । अमृताचें सरोवर ॥ ४ ॥ पृथ्वी अवघी स्वर्णमय । कोणीकडे न्यावें काय ॥ ५ ॥ ब्रह्मादिकांचे कैवारी । रामदासाचे अंतरीं ॥ ६ ॥

॥ ११ ॥ एकादशी नव्हे व्रत । वैकुंठींचा महापंथ ॥ १ ॥ परी रुक्मांगदाऐसा । व्हावा निश्चय मानसा ॥ २ ॥ एकादशी उपोषणें । विष्णुलोकीं ठाव घेणें ॥ ३ ॥ रामीं रामदास ह्मणे । काय प्रत्यक्ष प्रमाणें ॥ ४ ॥

॥ १२ ॥ रुक्मांगद होता नर । आह्मी काय आहों खर ॥ १ ॥ देव भक्तवेळाईत । राव रंक नाहीं तेथ ॥ २ ॥ तेणें नेला अवघा गांव । आह्मी स्वयें तरी जावं ॥ ३ ॥ रामीं रामदासीं काज । धरा एकामेकां लाज ॥ ४ ॥

---

१ राक्षस, बिभीषण. २ स्वतःसिद्ध. ३ सांपडत नाहीं. ४ वानरांला. ५ टाळी. ६ सोन्याची. ७ गाढव. ८ भक्ताची वेळ राखणारा.

॥ १३ ॥ ज्यासी हरीची प्राप्ती व्हावी । तेणें हरिदिनीं करावी ॥ १ ॥ एकादशी त्याजिल्या अन्न । प्राप्त वैकुंठभुवन ॥ २ ॥ रामीं रामदास ह्मणे । हरिजागर उपोषणें ॥ ३ ॥

॥ १४ ॥ एकादशीच्या अन्नाखालीं । भय पातकें लपालीं ॥ १ ॥ कां जीं संतीं अव्हेरिलीं । ह्मणूनि तेथें थारावलीं ॥ २ ॥ ह्मणे रामीं रामदास । घडे अंगीकारी त्यास ॥ ३ ॥

॥ १५ ॥ दीनानाथांचा सेवक । आह्मां स्वामीहूनि अधिक ॥ १ ॥ शरणागत राघवाचे । परि शरण दारिद्राचे ॥ २ ॥ जें देवास दुःसह । तेंचि आह्मां सुखावह ॥ ३ ॥ रामीं रामदास ह्मणे । रामकृपेचेनि गुणें ॥ ४ ॥

॥ १६ ॥ जेथूनिया प्रबळता । केली तेथेंचि अहंता ॥ १ ॥ तरी ते सर्वेही जाणार । पुढें घातचि होणार ॥ २ ॥ होताहे भवाचा भार । झाली वृत्ती अनावर ॥ ३ ॥ दास ह्मणे एकाकार । पडे देवासी कातर ॥ ४ ॥

॥ १७ ॥ सकळ कळा हातीं आल्या । रिद्धिसिद्धीही वोळल्या ॥ १ ॥ तरि आदि सांडूं नये । देवा भक्तांचा उपाये ॥ २ ॥ मनोसिद्धि वाचासिद्धि । जाहली उदंड उपाधी ॥३॥ दास ह्मणे राज्य झालें । इंद्रपद हाता आलें ॥ ४ ॥

॥ १८ ॥ आत्मज्ञानपारंगत । झाला बोलका महंत ॥ १ ॥ गुरुपद हाता आलें । भूमंडळीं सत्ता चाले ॥ २ ॥ दास ह्मणे ज्ञान झालें । सर्व मिथ्या[1]सें कळलें ॥ ३ ॥

॥ १९ ॥ ज्ञान झालें भक्तजना । सांडूं नये उपासना ॥१॥ एका साराचेंहि सार । सर्व सांगतों विचार ॥२॥ हेंचि सर्वांचें कल्याण । मानूं नये अप्रमाण ॥ ३ ॥ दास ह्मणे अनुभवलें । भजन भगवंताचें भलें ॥ ४ ॥

॥ २० ॥ देव असतां पाठीराखा । त्रैलोक्याचा कोण लेखा ॥ १ ॥ नाना उद्योग वाढती । नाना चिंता उद्भवती ॥ २ ॥ स्वस्थ वाटेना अंतरीं । नाना व्यवधान करी ॥ ३ ॥ रामदास ह्मणे भावें । भजन देवाचें करावें ॥ ४ ॥

---

## कथापंचक.

॥ १ ॥ धन्य धन्य तें नगर । जेथें कथा निरंतर ॥ १ ॥ गुण गाती भगवंताचे ॥ तेचि मानावे देवाचे ॥ २ ॥ स्वयें बोले जगजीवन । थोर कलियुगीं कीर्तन ॥ ३ ॥ रामदास ह्मणे भले । हरिभक्तीं उद्धरले ॥ ४ ॥

॥ २ ॥ रामनामाविणें कांहीं । अंतीं सोडवण नाहीं ॥ १ ॥ गंगातीरीं योगेश्वर । अथवा प्रपंचीं ई[2]श्वर ॥ २ ॥ थोरपणें धरितां तांठा । तरि तो नागवे करं[3]टा ॥ ३ ॥ बहुत पूजिलीं दैवतें । योग याग नाना मतें ॥ ४ ॥ धौती[6] पौती हो भुंजंगी । लोकीं कर्म करितां योगी ॥ ५ ॥ विनवी रामीं रामदास । नाना साधनीं सायास ॥ ६ ॥

॥ ३ ॥ सकळ साधनांचें फळ । रामनामचि केवळ ॥ १ ॥ जप जप अनुष्ठान । अंतीं नामचि प्रमाण ॥२॥ नाना मंत्र मंत्रावळी । सोडवीना अंतकाळीं ॥३॥ महापातकी पतित ।

१ मीपणा. २ संसाराचा. ३ साधु. ४ खोटें. ५ उद्योग. ६ योग्यांचे शरीरशुद्धि करण्याचे मार्ग.

नामें तारिले अनंत ॥ ४ ॥ नाम साराचेंहि सार । नाम सकळांसी आधार ॥ ५ ॥ दास ह्मणे सांगों किती । नामावीण नाहीं गती ॥ ६ ॥

## निष्ठापंचक.

॥ १ ॥ ब्रीद आपुलें राखावें । आह्मां भक्तां सांभाळावें ॥ १ ॥ बहु नाहीं वाडाचार । आतां एकचि निर्धार ॥ २ ॥ एथें कांहीं नाहीं व्यस्त । आतां बोलतो नेमस्त ॥ ३ ॥ रामदास ह्मणे एक । आतां धरावा नेमक ॥ ४ ॥

॥ २ ॥ नेणों धक्ति नेणों भाव । आह्मी नेणों दुजा देव ॥ १ ॥ राघवाचे शरणागत । आह्मीं रामनामांकित ॥ २ ॥ मुखीं रामनामावळी । काळ घालूं पायांतळीं ॥ ३ ॥ रामदासीं रामनाम । बाधूं नेणे काळ काम ॥ ४ ॥

॥ ३ ॥ राम अनाथांचा नाथ । आह्मां कैवारी समर्थ ॥ १ ॥ वनीं शिळा मुक्त केली । गणिका विमानीं वाहिली ॥ २ ॥ राम दीनाचा दयाळ । देव सोडिले सकळ ॥ ३ ॥ रामीं रामदास ह्मणे । आतां आह्मां काय उणें ॥ ४ ॥

॥ ४ ॥ भूत भविष्याचें ज्ञान । जयां अमृतभोजन ॥ १ ॥ रे या देवांचा कैवारी । तोचि आमुचा सहाकारी ॥ २ ॥ कल्पतरु चिंतामणी । कामधेनूचीं दुभणीं ॥ ३ ॥ नानारत्नांचे डोंगर । दिव्य भोग निरंतर ॥ ४ ॥ रामदासाची आवडी । अवघे देव तेहतिस कोडी ॥ ५ ॥

## शिकवणपंचक.

॥ १ ॥ काम क्रोध आवरावे । मद मत्सर वारावे ॥ १ ॥ सांडोनियां कुलक्षणें । शुद्ध धरावीं लक्षणें ॥ २ ॥ लोभदंभांसी लुटावें । मीपणासी आटोपावें ॥ ३ ॥ विवेक वैराग्य विश्वास । धरणें ह्मणे रामदास ॥ ४ ॥

॥ २ ॥ हो कां मुमुक्षु अथवा मुक्त । आहे विशेष आसक्त ॥ १ ॥ विवेक वैराग्यसंग्रह । करणें लागे यावदेह ॥ २ ॥ रामीं रामदास ह्मणे । शांति ज्याच्या दृढपणें ॥ ३ ॥

॥ ३ ॥ मना तूंचि शिकविसी । शेखीं तूंचि नायकसी ॥ १ ॥ काय सूचसि पाहेरा । शरण जावें रघुवीरा ॥ २ ॥ कांति साचाचिये परी । करिसी शब्द भरोवरी ॥ ३ ॥ रामीं रामदास ह्मणे । जळो बहिर्मुखाचें जिणें ॥ ४ ॥

॥ ४ ॥ खोडी वाउगीच वोळी । एक राम नामावळी ॥ १ ॥ प्रेम सोडी देहबुद्धी । मांडी श्रवणीं समाधी ॥ २ ॥ रामीं रामदास ह्मणे । अकस्मात लागे जाणें ॥ ३ ॥

॥५॥ ईश्वरासी कानकोंडें ! अंतीं जाईल कोण्या तोंडें ॥१॥ लाजे हरीच्या रंगणीं । जावयासि कोटांगणीं ॥ २ ॥ धर्म न करी दुराचारी । नागविलें राजद्वारीं ॥ ३ ॥ ना दे फुटका कवडा । चोरें घातला दरवडा ॥ ४ ॥ ह्मणे रामीं रामदास । प्राणी नागवला सुखास ॥ ५ ॥

---

१ दुसरा. २ मोक्ष इच्छिणारा. ३ देह असेपर्यंत. ४ शेवटीं. ५ टाकून दे ६ देहाभिमानाचे ठिकाणीं.

॥६॥ पूर्व भूमिका सोडिली । जीव झाला दिशाभुली ॥१॥ ऐसें भ्रमाचें लक्षण । भुले आपणा आपण ॥ २ ॥ द्रव्य आपण ठेविलें । त्याचें त्यासि चूकलें ॥ ३ ॥ रामदास ह्मणे घरीं । वाट चुकले आंधारीं ॥ ४ ॥

## निश्चयपंचक.

॥ १ ॥ देह चिरकाळ राहो । अथवा शीघ्रकाळ जावो ॥ १ ॥ आह्मीं वस्ती केली रामीं । नाहीं आस्था देहधामीं ॥ २ ॥ देहा होऊं उत्तम भोग । अथवा पडो दुःखयोग ॥ ३ ॥ रामीं रामदास मानिला । देह दुःखावेगळा झाला ॥ ४ ॥

॥ २ ॥ आह्मी मोक्षलक्ष्मीवंत । भवदारिद्र कैंचें तेथ ॥ १ ॥ श्रीपतीचे परिजन । आह्मी स्वानंदसंपन्न ॥ २ ॥ समाधान तें सभाग्य । असमाधान तें अभाग्य ॥ ३ ॥ रामीं रामदासीं देव । सख्यासहित स्वानुभव ॥ ४ ॥

॥ ३ ॥ मोक्षश्री ते आह्मांपाशीं । द्रव्यासिद्धी जिच्या दासी ॥ १ ॥ आह्मी परमार्थसंपन्न । अर्थ काय परिच्छिन्न ॥ २ ॥ रामीं रामदास्यभाग्य । चढतें वाढतें वैराग्य ॥ ३ ॥

॥ ४ ॥ समर्थांचे दरिद्री सुत । त्यांचें करणें विपरीत ॥ १ ॥ परी समर्थ लक्षण । सर्व काळ समाधान ॥ २ ॥ समर्थांच्या विद्येलागीं । मधुकरी मागे जगी ॥ ३ ॥ तैसें रामीं रामदासी । ब्रह्मविद्येच्या सायासीं ॥ ४ ॥

## अलिप्तपंचक.

॥ १ ॥ सृष्टि दृष्टीसी नाणावी । आत्मप्रचीत जाणावी ॥ १ ॥ दृश्यविरहित देखणें । दृश्य तुरे दृश्यपणें ॥ २ ॥ सृष्टी वेगळा निवांत । देव भक्तांचा एकांत ॥ ३ ॥ राम अनुभवासि आला । दासविवाद खुंटला ॥ ४ ॥

॥ २ ॥ मायेभोंवतें भोंवावें । तरि तिनें कुरवाळावें ॥ १ ॥ संत एकटा एकला । एकपणाहि मुकला ॥ २ ॥ त्यासि माया असोनि नाहीं । आपपर नेणे कांहीं ॥ ३ ॥ रामीं रामदास गाय । व्याली नाहीं चाटिल काय ॥ ४ ॥

॥ ३ ॥ होता वृक्षाच्या डाहाळीं । पक्षी गेला अंतराळीं ॥ १ ॥ तैसी माया वोलांडिली । वृत्ति स्वरूपीं राहिली ॥ २ ॥ खेळकार सूत्र सोडी । गेली आकाशीं वावडी ॥ ३ ॥ भूमंडळीं होता आला । ढीग आकाशीं उडाला ॥ ४ ॥ केलें सिद्धीचें साधन । पाय वेधला गगना ॥ ५ ॥ रामीं रामदास ह्मणे । पाहे दृष्टीं तारांगणें ॥ ६ ॥

॥ ४ ॥ दृश्य सांडुनीयां मागें । वृत्ती गेली लागवेगें ॥ १ ॥ माया सांडूनि चंचळ । झाला स्वरूपीं निश्चळ ॥ २ ॥ कांहीं भासची नाढळे । वृत्ती निर्गुणीं निवळे ॥ ३ ॥ चराचर तें सांडिलें । बहुविध वोलांडिलें ॥ ४ ॥ अवघें एकाचि निर्गुण । पाहे वृत्तीतें आपण ॥ ५ ॥ रामदास सांगे खूण । वृत्ति चातुर्यलक्षण ॥ ६ ॥

१ मिळाला. २ मोक्षरूपी संपत्तीनें युक्त. ३ चाकर. ४ आत्मानुभव. ५ आकाशांत. ६ परब्रह्मस्वरूपीं.

## ज्ञानपंचक.

॥ १ ॥ आह्मी समाधान गावें । तुह्मीं सावध ऐकावें ॥ १ ॥ सकळ सृष्टीचा गोसावी । त्याची ओळख पुसावी ॥ २ ॥ स्वयें बोलिला सर्वेशु । ज्ञानेंविण अवघे पशु ॥ ३ ॥ दास ह्मणे नाहीं ज्ञान । तया नरकीं पतन ॥ ४ ॥

॥ २ ॥ ज्ञानेंवीण जी जी कला । ती ती जाणावी अवकळा ॥ १ ॥ ऐसें भगवंत बोलिला । चित्त द्यावें त्याचे बोला ॥ २ ॥ एक ज्ञानचि सार्थक । सर्व कर्म निरर्थक ॥ ३ ॥ दास ह्मणे ज्ञानेंविण । प्राणी जन्मला पाषाण ॥ ४ ॥

॥ ३ ॥ जेणें ज्ञान हें नेणवे । पशु तयासि ह्मणावें ॥ १ ॥ जेणें केलें चराचर । कोण विश्वासि आधार ॥ २ ॥ ब्रह्मादिकांचा निर्मिता । कोण आहे त्यापरता ॥ ३ ॥ अनंत ब्रह्मांडाच्या माळा । विचित्र भगवंताची कळा ॥ ४ ॥ रामदासाचा विवेक । सर्वांघटीं देव एक ॥ ५ ॥

---

## ध्यानपंचक.

॥ १ ॥ ध्यान लागलें रामाचें । दुःख हरलें जन्माचें ॥ १ ॥ रामपदांबुजावरी । वृत्ति गुंतली मधुकरी ॥ २ ॥ तनु मेघश्याममेळें । चित्त चातक निवालें ॥ ३ ॥ रामचंद्र नाम एकीं । चक्षू चकोर जहाले सुखी ॥ ४ ॥ किर्ति सुगंध तरुवरी । कुजे कोकिळ वैखरी ॥ ५ ॥ रामीं रामदास स्वामी । प्रगटले अंतर्यामीं ॥ ६ ॥

॥ २ ॥ मुगुटकिरीट कुंडलें । तेज रत्नांचें फांकलें ॥ १ ॥ ऐसा राम माझे मनीं । सदा आठवे चिंतनीं ॥ २ ॥ कीर्तिमुखें बाहुवटें । दंडीं शोभती गोमटे ॥ ३ ॥ जडित रत्नांचीं भूषणें । दशांगुळीं विरकुंकणें ॥ ४ ॥ कांसे शोभे सोनसळा । कटीं सुवर्णमेखला ॥ ५ ॥ चरणीं नेपुरांचे मेळे । वांकी गर्जती खळाळें ॥ ६ ॥ राम सर्वांगीं सुंदर । चरणीं ब्रीदाचा तोडर ॥ ७ ॥ सुगंधपरिमळ दुसरे । झेंपावती मधुकरें ॥ ८ ॥ गळां पुष्पांचीया माळा । वामें शोभे भूमीबाळा ॥ ९ ॥ स्वयंभ सुवर्णाची कास । पुढें उभा रामदास ॥ १० ॥

॥ ३ ॥ धनुष्य बाण काय केले । कां कर कटावरि ठेविले ॥ १ ॥ हा कां धरिला अबोला । दिसे वेष पालटिला ॥ २ ॥ किलकिलाट वानरांचे । थवे दिसतना तयांचे ॥ ३ ॥ पंढरीसी जहालें येणें । एक्या हनुमंताकारणें ॥ ४ ॥ दिसे हनुमंत एकला । सैन्यामधुनी फुटला ॥ ५ ॥ रामीं रामदास भाव । तैसा होय पंढरीराव ॥ ६ ॥

॥ ४ ॥ जहाले अजन्माचे पोटीं । मिथ्या ह्मणतां फोडी घांटी ॥ १ ॥ नवल नवल सावज । काय सांगों मी हें चोजं ॥ २ ॥ तयासि मारूं जातां पाहे । जीवा हानी होत आहे ॥ ३ ॥ रामीं रामदासवर्म । कळेना तयाचें हो कर्म ॥ ३ ॥

॥ ५ ॥ आत्मारामाविण रितें । स्थान नाहीं अनुसरतें ॥ १ ॥ पहातां मन बुद्धि लोचन । रामेंविण न दिसे आन ॥ २ ॥ सवडी नाहीं तीर्थगमना । रामें रोधिलें त्रिभुवना ॥ ३ ॥ रामदासीं तीर्थां भेटी । तीर्थ रामेहूनि उठी ॥ ४ ॥

---

१ जगनाला. २ सर्व देहामध्यें. ३ वाणी. ४ भ्रमर. ५ सीता. ६ आश्चर्य. ७ अनुकूल होणारें.

॥ ६ ॥ रूप रामाचें पाहतां । मग कैंचीरे भिन्नता ॥ १ ॥ दृश्यअदृश्यावेगळा । राम जीवींचा जिव्हाळा ॥ २ ॥ वेगळीक पहातां कांहीं । हें तों मुळींच रे नाहीं ॥ ३ ॥ रामदासीं राम होणें । तेथें कैंचें रे देखणें ॥ ४ ॥

॥ ७ ॥ वेळे पाऊस पडेना । नासकवणी उघडेना ॥ १ ॥ ऐसें कुळवाडीयांचें भंड । दुःख जहालें उदंड ॥ २ ॥ बहुपरी आलें शेत । रेव्यापाण्याचें आऊत ॥ ३ ॥ कांहीं केल्यानें पिकेना । धान्य वेळेसी विकेना ॥ ४ ॥ फाळा लाविला उदंड । अवघें जाहलें थोतांड ॥ ५ ॥ वारीं रोगांचीं वाजती । नाना आभाळें फिरती ॥ ६ ॥ टोळ पक्षी मूषकादिकें । खाती श्वापदें आणिक ॥ ७ ॥ दावेदारांची यातना । चोराचोरीं राहवेना ॥ ८ ॥ नित्य पोटाचे मजूर । वेठिखालीं नीघे उर ॥ ९ ॥ घर खोपट मोडकें । एक पटकूर फाटकें ॥ १० ॥ बहु रोगें गुरें गेलीं । धारणीनें मुलें मेलीं ॥ ११ ॥ सर्व संसार बुडाला । दास ह्मणे जोगी झाला ॥ १२ ॥

॥ ८ ॥ वड पिंपळ वाढले । बहुसाल विस्तारले ॥ १ ॥ तरी ते जाणावे निष्फळ । त्यांचें खातां नये फळ ॥ २ ॥ नाना वृक्ष फळेंविण । परि ते जाणा निःकारण ॥ ३ ॥ रामदास ह्मणे विचार । नसतां तसे होती नर ॥ ४ ॥

॥ ९ ॥ चित्त देउनि ऐकारे । पोहणार पडिला धारे ॥ १ ॥ मन मुळयाच्या शेवटें । वाहे जीवनें उफराटें ॥ २ ॥ उगमासी संगम झाला । रामदासीं शब्द निघाला ॥ ३ ॥

॥ १० ॥ बरें चांगलें आणि गोड । ऐकतांचि पुरे कोड ॥ १ ॥ अभिमानापैलीकडे । मन बुद्धीसी नातुडे ॥ २ ॥ रामदास ह्मणे साचें । मूळस्थान या जन्माचें ॥ ३ ॥

---

## सख्यपंचक.

॥ १ ॥ एक लक्ष दीनमणी । तृप्त होतसे कमळिणी ॥ १ ॥ तैसा देव आहे दुरी । परि तो भक्तांचे अंतरीं ॥ २ ॥ दोन लक्ष निशापति । जेणें चकोर तृप्त होती ॥ ३ ॥ रामदास ह्मणे घन । देता चातका जीवन ॥ ४ ॥

॥ २ ॥ बाळक जाणेना मातेसी । तिचें मन तयापासीं ॥ १ ॥ तैसा देव हा दयाळ । करी भक्तांचा सांभाळ ॥ २ ॥ धेनु वत्साचेनी लागें । धांवे त्याच्या मागें मागें ॥ ३ ॥ पक्षी घेतसे गगन । पिल्यांपासीं त्याचें मन ॥ ४ ॥ मत्स्य आठवितां पाळी । कूर्म दृष्टीनें सांभाळी ॥ ५ ॥ रामीं रामदास ह्मणे । मायाजाळाचीं लक्षणें ॥ ६ ॥

॥ ३ ॥ बाळपणीं लोभ करी । माता नाहीं जन्मवरी ॥ १ ॥ तैसा देव हा दयाळ । दासपाळ सर्वकाळ ॥ २ ॥ मनासारिखें न होतां । बाळकासी मारी माता ॥ ३ ॥ दास ह्मणे सांगों किती । बाप लेंकासि मारिती ॥ ४ ॥

॥ ४ ॥ मायबापें सांभाळिती । लोभाकारणें पाळिती ॥ १ ॥ तैसा नव्हे देवराव । त्याचा कृपाळु स्वभाव ॥ २ ॥ चंद्रसूर्य मावळती । घन आकाशीं होरपळती ॥ ३ ॥ रामीं रामदासीं भाव । केली संसाराची वाव ॥ ४ ॥

---

१ घाणेरें पाणी. २ पुष्कळ. ३ उंदीर वगैरे. ४ अनेक प्रकारें. ५ उदक. ६ सूर्य. ७ चंद्र.

॥ ५ ॥ एक सहस्र कोटीवरी । जहाली अन्यायाची परी ॥ १ ॥ तरी देव उपेक्षीना । कधीं निष्ठुर होईना ॥ २ ॥ शरणागत भांबावले । भजन देवाचें चुकलें ॥ ३ ॥ रामीं रामदास ह्मणे । सर्वगुणें भक्तिउणें ॥ ४ ॥

## संवादपंचक.

॥ १ ॥ तुज कैसें पाहूं देवा । तुझी कैसी करूं सेवा ॥ १ ॥ बहु देव पाहुनि आलों । बहुरूपीं भांबावलों ॥ २ ॥ किती दैवळें मोडती । किती देव भंगोनि जाती ॥ ३ ॥ बहुतांच्या बोलें गेलों । तेणें बहुत कष्टलों ॥ ४ ॥ रामीं रामदास ह्मणे । ऐशीं जनांचीं लक्षणें ॥ ५ ॥

॥ २ ॥ देव ह्मणे मी जात नाहीं । आतां चिंता न करी कांहीं ॥ १ ॥ मज पहावा संतांपाशीं । सेवीं जाण त्या भक्तांसी ॥ २ ॥ मज जाणावें विचारें । सगुणाचे भजनद्वारें ॥ ३ ॥ देव ह्मणतो दासासी । रे मी आहे तुजपासीं ॥ ४ ॥

॥ ३ ॥ माझीं ब्रीदें कां विसरतां । आणि व्यर्थ कां चेष्टतां ॥ १ ॥ भक्तवत्सल दीनानाथ । तुह्मां आधार समर्थ ॥ २ ॥ भय दाखवी अनिवारी । तोचि सर्व चिंता करी ॥ ३ ॥ दासासमीप राहतो । योगक्षेमही वाहतों ॥ ४ ॥

॥ ४ ॥ मज गांजिलें तें साहे । परि भक्तांचें न साहे ॥ १ ॥ माझ्या भक्ता शीण व्हावा । मग मजसीं त्यांसी दावा ॥ २ ॥ मज अवतार घेणें । माझ्या भक्तांचे कारणें ॥ ३ ॥ निजदासांसी पाळावें । दुर्जनासी निर्दाळावें ॥ ४ ॥

॥ ५ ॥ आतां बोलावें तें किती । मनीं पाहावी प्रचिती ॥ १ ॥ तुह्मा संकटाचे वेळे । काय झांकितों मी डोळे ॥ २ ॥ सेवकाचा साभिमान । समर्थाचें हें लक्षण ॥ ३ ॥ देव ह्मणे दास जनीं । चिंता न धरावी मनीं ॥ ४ ॥

॥ ६ ॥ रे मी भक्तांचा कोवसा । मनीं धरावा भरंवसा ॥ १ ॥ समर्थाचीये सेवका । काय करवेल रंका ॥ २ ॥ कोप येतांचि ते घडी । घेईन काळाची नरडी ॥ ३ ॥ दास सांभाळावे सदा । मज आणीक नाहीं धंदा ॥ ४ ॥

॥ ७ ॥ काय गावा रे गांव । आह्मां नाहीं सर्व ठाव ॥ १ ॥ बोधमृदंग फूटका । ताळ द्वैताचा तूटका ॥ २ ॥ दास वेडे हो बागडे । नृत्य करिती देवापुढें ॥ ३ ॥ रामभेटीचा समय । रामदासीं सांगतां नये ॥ ४ ॥

## अर्थसार्थपंचक.

॥ १ ॥ पक्षी श्वापद किडा मुंगी । पराधीन जिणें जगीं ॥ १ ॥ तैसा नव्हे नरदेहो । करा भक्तीचा लवलाहो ॥ २ ॥ नीचा योनी चारी खाणी । अवघ पराधीन प्राणी ॥ ३ ॥ रामीं रामदास ह्मणे । ज्ञान ध्यान पशु तेणें ॥ ४ ॥

---

१ खोड्या करतां. २ अप्राप्ताची प्राप्ति व प्राप्ताचें रक्षण. ३ नाश करावा. ४ अनुभव. ५ आधार.

॥ २ ॥ पापपुण्या समता घडे । तरिच नरदेह जोडे ॥ १ ॥ याचें सार्थक करावें । आपणासी उद्धरावें ॥ २ ॥ बहुजन्मांचे शेवटीं । नरदेह पुण्यकोटी ॥ ३ ॥ रामदास ह्मणे आतां । पुढतीं न लागे मागुता ॥ ४ ॥

॥ ३ ॥ देहआरोग्य चालतें । भाग्य नाहीं त्यापरतें ॥ १ ॥ लाहो[1] घ्यावा हरिभक्तीचा । नाहीं भरंवसा देहाचा ॥२॥ देह आहे क्षणभंगुर । तुह्मी जाणतां विचार ॥३॥ रामीं रामदास ह्मणे । अकस्मात लागे जाणें ॥ ४ ॥

॥ ४ ॥ देशकाळ वर्तमान । असे अवघाचि अनुमान ॥ १ ॥ भक्ति करावी देवाची । घडि जातसे सोन्याची ॥ २ ॥ काळ वेळची पहातो । सदा सन्निध[2] राहातो ॥ ३ ॥ रामीं रामदास ह्मणे । देहा आहे जाईजणें ॥ ४ ॥

॥ ५ ॥ पुढें होणार कळेना । समाधान आकळेना ॥ १ ॥ मना सावधान व्हावें । भजन देवाचें करावें ॥ २ ॥ ऋणानुबंधाचें कारण । कोठें येईल मरण ॥ ३ ॥ रामीं रामदास ह्मणे । भजनें अमर[3]चि होणें ॥ ४ ॥

## सुंदरपंचक.

॥ १ ॥ ह्मणे मी एक चांगला । शब्द ठेवी पुढिल्याला ॥ १ ॥ नाक नाहीं कान नाहीं । जिव्हा नाहीं डोळे नाहीं ॥ २ ॥ हात लुले पाय लुले । अवघे दांत उन्मळले[4] ॥ ३ ॥ अवगुणी कुलक्षणी । दास ह्मणे केली हानी ॥ ४ ॥

॥ २ ॥ ज्ञानावीण निर्नासिक[5] । नये संतांचे सन्मुख ॥ १ ॥ असो इंद्रियें सकळ । काय करावीं निर्फळ ॥ २ ॥ नाहीं कथानिरूपण । हेची बधिर श्रवण[6] ॥ ३ ॥ नाहीं देवाचें वर्णन । तगे तोंचि मुकेपण ॥ ४ ॥ नाहीं पाहिलें देवासी । अंध ह्मणावें तयासी ॥ ५ ॥ नाहीं उपकारीं काविले । अहो तेची हात लुले ॥ ६ ॥ नाहीं केलें तीर्थाटण । व्यर्थ गेले ते चरण ॥ ७ ॥ नाहीं काया[7] झिजविली । प्रेतरूपची उरली ॥ ८ ॥ नाहीं देवाचें चिंतन । मन हिंडे जैसें श्वान[8] ॥ ९ ॥ नाहीं परमार्थ बोलणें । जिव्हा नाहीं तेणें गुणें ॥ १० ॥ दास ह्मणे भक्तीवीण । अवघें[9] देहीं कुलक्षण ॥ ११ ॥

॥ ३ ॥ अवघा डोंगर जळाला । आहाळोनी काळा झाला ॥ १ ॥ तरी तेथें बहु रंग । तैसें अवघें हें जग ॥ २ ॥ दुर्जनासी बरें केलें । नाना प्रकारें रक्षिलें ॥ ३ ॥ रामीं रामदास ह्मणे । जिणें वोवाळिलें सुणें ॥ ४ ॥

## व्यर्थपंचक.

॥ १ ॥ आतां सांभाळा आपुला । पाहूं जातां काळ गेला ॥ १ ॥ आतां हित कोण वेळे । पुढें होणार नकळे ॥ २ ॥ देहालागीं नानापरी । कष्ट केले जन्मवरी ॥ ३ ॥ केलें देहाचें भजन । परी देह झाला क्षीण ॥ ४ ॥ देहालागीं जीवेंभावें । वय वेंचलें[10] आघवें ॥ ५ ॥ ह्मणे रामीं रामदास । केला आयुष्याचा नाश ॥ ६ ॥

---

१ लाभ. २ जवळ. ३ मृत्युरहित. ४ पडून गेले. ५ ज्यास नाक नाहीं तो. ६ कान. ७ शरीर. ८ कुत्रा. ९ सर्व. १० खर्चेलें.

॥ २ ॥ वय झालें वाताहात । अविचारें केला घात ॥ १ ॥ देव नाहीं ओळखिला । पुढें विषय देखिला ॥ २ ॥ बाळपण मूर्खपण । कांहीं नेणे हो आपण ॥ ३ ॥ होता तारुण्याचा भार । पुढें झाला कामातुर ॥ ४ ॥ वृद्धपणीं संकोचित । देह जहाला गलीत ॥ ५ ॥ रामीं रामदास ह्मणे । जन्म गेले मूर्खपणें ॥ ६ ॥

॥ ३ ॥ देहालागीं कष्ट केले । परि ते अवघे व्यर्थ गेले ॥ १ ॥ देह देवाचे कारणीं । होतां देव होय ऋणी ॥ २ ॥ प्राणी लोभें गुंडाळला । पुढें अंतकाळ आला ॥ ३ ॥ जे जे कांहीं कष्ट केले । ते ते अवघे व्यर्थ गेले ॥ ४ ॥ नानापरी सांभाळिली । पुढें काया हे जाळिली ॥ ५ ॥ दास ह्मणे मूर्खपण । पुढें जन्मासी कारण ॥ ६ ॥

॥ ४ ॥ शत वर्षांची मर्यादा । तितुका व्यर्थ गेला धंदा ॥ १ ॥ देह संसारीं गोविला । नाहीं देव आठविला ॥ २ ॥ काया वाचा मनोभावें । अवघें प्रपंचीं लावावें ॥ ३ ॥ नीच सेवकाचे परी । सेवा केली जन्मवरी ॥ ४ ॥ दास ह्मणे विषयवेडी । अंतकाळीं कोण सोडी ॥ ५ ॥

॥ ५ ॥ देव संसारीं घालितो । अंतकाळीं सोडवितो ॥ १ ॥ तया देवासी चूकले । प्राणी लोभें भांबावले ॥ २ ॥ केलें जेणें चराचर । देव विश्वासी आधार ॥ ३ ॥ देव जीवाचें जीवन । देव बंधविमोचन ॥ ४ ॥ देव सर्वांचे अंतरीं । सांभाळितो निरंतरी ॥ ५ ॥ रामीं रामदास ह्मणे । जयाचेनी धन्य होणें ॥ ६ ॥

---

## होळीपंचक.

॥ १ ॥ अवघेचि बोंबलती । होळीभोंवते भोंवती ॥ १ ॥ माया होळी प्रज्वळली । सृष्टि वेढारें लाविली ॥ २ ॥ ज्याकारणें गुंडाळती । तेंचि वाचें उच्चारिती ॥ ३ ॥ होळीमध्यें खाजें आहे । तें तूं विचारूनि पाहे ॥ ४ ॥ खाजें खातां सुख होये । परी कठीण हाता नये ॥ ५ ॥ खोल दृष्टीनें पाहिलें । खाजें त्याच्या हाता आलें ॥६॥ एक उडी घालूं जाती । लंडी चुकोनी पडती ॥७॥ एक देहाचे पांगले । तेंचि आगीं हुर्पळले ॥ ८ ॥ उडी अवघ्यांचीच पडे । परि तें हातास न चढे ॥९॥ एकें थोर धीर केला । खाजें घेऊनि पळाला ॥ १० ॥ एक आपणची खाती । एक सकळांतें वांटिती ॥ ११ ॥ एक घेउनी पळाले । तंव त्यावरि पडे जाळें ॥ १२ ॥ रामीं रामदास होळी । केली संसाराची धुळी ॥ १३ ॥

॥ २ ॥ अझुनी कायरे दुश्चित्ता सावधान होईं आतां ॥ १ ॥ नागविलें योनिद्वारें । ह्मणूनि बोंबलती पोरें ॥ २ ॥ सकळ नाडीयेलें वोजें । अवघी एक बोंब गाजे ॥ ३ ॥ धुळी टाकिली मस्तकीं । कोणी दाद देईना कीं ॥ ४ ॥ रांडी ऐसे नर्क होती । ह्मणोनि प्रत्यक्ष दाविती ॥ ५ ॥ झोंबी लोंबी हो घेउनी । जाती टाकिती नेउनी ॥ ६ ॥ नेघे नेघे ह्मणती बळी । बळें घालिती पाताळीं ॥ ७ ॥ धरुनी अकस्मात नेती । अवघीं कौतुकें पहाती ॥ ८ ॥ तेथें असेना मर्यादा । थोर करीती आपदा ॥ ९ ॥ घरोघरीं फेरे करिती । तैशा होती पुनरावृत्ति ॥ १० ॥

---

क्षीण. २ स्थावरजंगमात्मक सृष्टी. ३ मधुर पदार्थ. ४ विषयानें. ५ चिखला प्रमाणें.

## वादपंचक.

॥ १ ॥ ध्यान विषयाचें तुटावें । ह्मणुनी हरिकथे जावें ॥ १ ॥ ऐसी हेचि कथा गावी । तरि तें धांवणें नागवी ॥२॥ विषयांसीं कंटाळले । ह्मणुनी हरिकथे आले ॥ ३ ॥ विषयध्यान सांडावया । आलों कीर्तनाच्या ठायां ॥४॥ काम क्रोध मजपासीं । ह्मणोनि आलों हरिकथेसी ॥ ५ ॥ रामीं रामदास ह्मणे । वाद सांडा निरूपणें ॥ ६ ॥

॥ २ ॥ हरिकथानिरूपणें । तेणें लागलें भांडणें ॥ १ ॥ अमृताचें विष झालें । हें तों प्रचीतीसी आलें ॥ २ ॥ चिंतामणी चिंता करी । परिस जाहला भिकारी ॥ ३ ॥ आनंदानें दुखविलें । कामक्रोधें नागविलें ॥ ४ ॥ कल्पतरूचा फणसा । एकाएकीं भरला कैसा ॥ ५ ॥ रामीं रामदास ह्मणे । हानि घाली निरूपणें ॥ ६ ॥

## भ्रमपंचक.

॥ १ ॥ झाला स्वरूपीं निश्चय । तरी कां वाटतसे भय ॥ १ ॥ ऐसें भ्रमाचें लक्षण । भुले आपणा आपण ॥ २ ॥ क्षण एक निराभास । क्षण एक मी माणूस ॥ ३ ॥ रामीं रामदास ह्मणे । देहबुद्धीचेनी गुणें ॥ ४ ॥

॥ २ ॥ छाया देखोनि आपुली । जीव झाला दिशाभुली ॥ १ ॥ ऐसें भ्रमाचें लक्षण । भुले आपणा आपण ॥ २ ॥ मुखें बोलतां उत्तर । तेथें जालें प्रत्युत्तर ॥ ३ ॥ डोळां घालितां आंगोळी । एकाचीं तीं दोन जालीं ॥ ४ ॥ पोटीं आपण कल्पिलें । तेंच आलेंसें वाटलें ॥ ५ ॥ दास ह्मणे हे उपाधी । शंका धरितां अधिक बाधी ॥ ६ ॥

॥ ३ ॥ पोतें आहे खांद्यावरी । गेलें ह्मणोनि हांका मारी ॥ १ ॥ ऐसें भ्रमाचें लक्षण । भुले आपणा आपण ॥ २ ॥ नेणोनियां जना पुसे । पाहों जातां हातीं असे ॥ ३ ॥ शोक जाहला विकळ । पाहों जातां कंठीं माळ ॥ ४ ॥ वस्तु बांधोनि पदरीं । पुसतसे दारोदारीं ॥ ५ ॥ रामदास ह्मणे जना । जवळी असोनी कळेना ॥ ६ ॥

॥ ४ ॥ कांहीं दिसे अकस्मात । तेथें आलें वाटे भूत ॥ १ ॥ वायां पडावें संदेहीं । मुळीं तेथें कांहीं नाहीं ॥ २ ॥ पुढें देखतां अंधारें । तेथें आलें वाटभरें ॥ ३ ॥ झाडझुडप देखिलें । जीवीं वाटे कोणी आलें ॥ ४ ॥ पुढें रोविलासे झेंडा । भ्रांत्यां ह्मणे कोण उभा ॥ ५ ॥ रामदास सांगे खूण । भितो आपणा आपण ॥ ६ ॥

॥ ५ ॥ वाजे पाऊल आपुलें । ह्मणे मागें कोण आलें ॥ १ ॥ कोण धांवतसे आड । पाहों जातां झालें झाड ॥ २ ॥ भावीतसे अभ्यंतरीं । कोण चाले बरोबरी ॥ ३ ॥ शब्दपडसाद ऊठिला । ह्मणे कोणी रे बोलिला ॥ ४ ॥ रामीं रामदास ह्मणे । ऐसीं शंकेचीं लक्षणें ॥ ५ ॥

॥ ६ ॥ आला आला रे बागुल । ह्मणतां शंका धरी मूल ॥ १ ॥ परी ते शाहाणे जाणती । तैसी माया हे मानिती ॥ २ ॥ मृगें ह्मणती मृगजळ । अवघे दाटलें तुंबळ ॥ ३ ॥ पाहों जातां दृष्टीचें बंधन । मूर्खा होय समाधान ॥ ४ ॥ पाहे स्वप्नींची संपत्ती । सत्य मानी मंदमती ॥ ५ ॥ रामीं रामदास ह्मणे । ऐसीं मूर्खांचीं लक्षणें ॥ ६ ॥

---

१ अनुभवाला. २ देहाभिमानाच्या योगानें. ३ संबंध, उपसर्ग. ४ भ्रमानें. ५ मानतो, कल्पना करतो.

## झडपणीपंचक.

॥ १ ॥ पांचां भूतांची झडपणी । जाली जीवांसी जाचणी ॥ १ ॥ पूर्व स्मरण राहिलें । प्राणी आंगीं घुमारिलें ॥ २ ॥ बाधा जाहली अंतरीं । मन आळाचि तें करी ॥ ३ ॥ बीजें जातां सारासार । त्यासी कळेना विचार ॥ ४ ॥ जड देहाची भावना । संतजन ओळखेना ॥ ५ ॥ रामीं रामदास ह्मणे । सत्य बोलावें शहाणें ॥ ६ ॥

॥ २ ॥ आले संत पंचाक्षरी । शब्द मारिती अंतरीं ॥ १ ॥ पोटीं प्रस्ताव घालिती । अनुतापें पोळविती ॥ २ ॥ दुःखमूळ हा संसार । विवेकाचे फोकें मार ॥ ३ ॥ धिक्काराचा धूर देती । तेणें होतसे विपत्ती ॥ ४ ॥ संसाराची रक्षा भली । त्याचे आंगीं बाणविली ॥ ५ ॥ दास ह्मणे निगुती । प्राणीयांसी बोलाविती ॥ ६ ॥

॥ ३ ॥ कोण कोठील आहेसी । आह्मां सांग निश्चयेंसी ॥ १ ॥ स्थूळ सूक्ष्म कारण । सांग तुझें कोण स्थान ॥ २ ॥ पिंडब्रह्मांडरचना । अष्टदेहविवंचना ॥ ३ ॥ पिंडज्ञान तुझें स्थूळ । किंवा तत्वांचा पाल्हाळ ॥ ४ ॥ सांग मायेचें अरण्य । किंवा तुझें ब्रह्मारण्य ॥ ५ ॥ रामीं रामदास ह्मणे । आतां बोलावें स्मरणें ॥ ६ ॥

॥ ४ ॥ चहूं निगमींचीं बीजें । कानीं फुंकिलीं सहजें ॥ १ ॥ तेणें प्राणी उमजला । पाहे विचार आपुला ॥ २ ॥ नित्यानित्य सारासार । केला विवेक विचार ॥ ३ ॥ संत असतां दाविले । आंत अनंत भाविलें ॥ ४ ॥ नाना साधनीं सायासीं । दृढ केलें निश्चयेसीं ॥ ५ ॥ दास ह्मणे निरूपणीं । केली भूतांची झाडणी ॥ ६ ॥

॥ ५ ॥ कांहीं एक उमजलें । पुन्हां संदेहीं पडलें ॥ १ ॥ ह्मणे मज खाया देणें । मागें संदेह सांडणें ॥ २ ॥ आलें मीपणासरिसें । त्याच विषयें संतोषे ॥ ३ ॥ येणें निष्ठेसी मांडिलें । मग आह्मीं सांडविलें ॥ ४ ॥ देहबुद्धीचें अज्ञान । मागे संशयाचें आन ॥ ५ ॥ रामदासीं उमजलें । भूतापासूनि सोडिलें ॥ ६ ॥

॥ ६ ॥ पंचभूतांचें अज्ञान । गेलें निःशेष निघोन ॥ १ ॥ ह्मणे येथें कोण आलें । जन कासया मिळाले ॥ २ ॥ मी तों आहें सावधान । मज कां केलें बंधन ॥ ३ ॥ पूर्व स्मरण मजला । भूत लागलें जनाला ॥ ४ ॥ मी तो वस्तु केवळ । वायां मिळाले सकळ ॥ ५ ॥ रामीं रामदास ह्मणे । संतकृपेचेनी गुणें ॥ ६ ॥

---

## गंधपंचक.

॥ १ ॥ पांचांमध्यें जें पाहिलें । पाहे तैसेंचि वेहिलें ॥ १ ॥ तीं अक्षरीं उच्चार । त्यासी माझा नमस्कार ॥ २ ॥ सातां जनाचें शेवटीं । आठ करितां होती भेटी ॥ ३ ॥ रामीं रामदास ह्मणे । नवांमाजी पहिल्या गुणें ॥ ४ ॥

॥ २ ॥ पहिल्या गुणें दुसऱ्या पक्षा । तेणें लक्षावें अलक्षा ॥ १ ॥ देवाजवळी चूकला । भक्तिभेद भांबावला ॥ २ ॥ पुढें सांपडतां धन । वायां करावें साधन ॥ ३ ॥ रामदास ह्मणे सार । येथें पाहिजे विचार ॥ ४ ॥

---

१ आवश पावलें. २ एका देहापासून तों यच्चयावत सर्व शरीरांची रचना. ३ वेशांचीं. ४ तत्काल.

## संतपंचक.

॥ १ ॥ मूर्ति त्रिलोकीं सांवळी । दृष्टी विश्वाची चुकली ॥ १ ॥ भाग्यें आले संतजन । जालें देवाचें दर्शन ॥ २ ॥ देव जवळी अंतरीं । भेटी नाहीं जन्मवरी ॥ ३ ॥ रामदासीं योग जाला । देहीं देव प्रगटला ॥ ४ ॥

॥ २ ॥ जन्मोजन्मींचा सांगात । भेटी झाली अकस्मात ॥ १ ॥ आतां सांडितां सुटेना । तंतु प्रीतीचा तुटेना ॥ २ ॥ सदा नित्य निरंतरीं । देह सबाह्य अंतरीं ॥ ३ ॥ त्याग करितां संयोग । नव्हे कल्पांतीं वियोग ॥ ४ ॥

॥ ३ ॥ देव अभक्ता चोरला । आह्मां भक्तां सांपडला ॥ १ ॥ भेटी जाली सावकाश । भक्ता न लागती सायास ॥ २ ॥ पडे विवेकवेत्रपाणी । वरी दृष्टीची दाटणी ॥ ३ ॥ रामदासाचें अंतर । देवापाशीं निरंतर ॥ ४ ॥

॥ ४ ॥ भेटी देईना जनासी । पाठी लागे सज्जनासी ॥ १ ॥ ऐसें प्रीतीचें लक्षण । भेटीवीण नाहीं क्षीण ॥ २ ॥ नसे साधन सायासीं । तो हा आह्मां अनायासीं ॥ ३ ॥ रामीं रामदास ह्मणे । संग संगाचेनी गुणें ॥ ४ ॥

॥ ५ ॥ देव आह्मांसी जोडिला । संतसंगें सांपडला ॥ १ ॥ कडाकपाटीं शीखरीं । धुंडिताती नानापरी ॥ २ ॥ नाना शास्त्रीं धांडोळिती । जयाकारणें कष्टती ॥ ३ ॥ रामदास ह्मणे भावें । वेगीं संतां शरण जावें ॥ ४ ॥

॥ ६ ॥ ब्रह्मादिकांसी दुर्लभ । देव भक्तांसी सुलभ ॥ १ ॥ थोरपणें आढळेना । जाणपणासी कळेना ॥ २ ॥ नाहीं योगाची आटणी । नाहीं तपीं तीर्थाटणीं ॥ ३ ॥ दास ह्मणे साधूंवीण । नाना साधनांचा शीण ॥ ४ ॥

## स्फुट अभंग.

॥ १ ॥ त्याचे पाय हो नमावे । त्याचें कीर्तन हो ऐकावें ॥ १ ॥ दुजियासी सांगे कथा । आपण वर्ते त्याची पथा ॥ २ ॥ कीर्तनाचें न करी मोल । जैसे अमृताचे बोल ॥ ३ ॥ सन्मानितां नाहीं सुख । अपमानितां नाहीं दुःख ॥ ४ ॥ किंचित् दिलें दातयानें । तेंहि घेत आनंदानें ॥ ५ ॥ ऐसा आहे हरिदास । लटकें न वदे रामदास ॥ ६ ॥

॥ २ ॥ वाणी शुद्ध करी नामीं । चित्त शुद्ध होय प्रेमीं ॥ १ ॥ नित्य शुद्ध होय नामीं । वसतांही कामीं धामीं ॥ २ ॥ कर्ण शुद्ध करी कीर्तन । घ्राण शुद्ध करी सुमन ॥ ३ ॥ त्वचा शुद्ध करी रंज । मस्तक नमितां पदांबुज ॥ ४ ॥ करशुद्धी राम पूजितां । पादशुद्धी देउळीं जातां ॥ ५ ॥ नेमें लिंग करी शुद्ध । अंतर निर्मळ करी गुद ॥ ६ ॥ रामापायीं रहातां बुद्धि । रामदासा सकळ शुद्धी ॥ ७ ॥

॥ ३ ॥ माझें सर्व जावें देवानें रहावें । देवासी पहावें भक्तपणें ॥ १ ॥ भक्तपणें मज देवची जोडला । अभ्यास मोडला सर्व कांहीं ॥ २ ॥ सर्व कांहीं जावो एक देव राहो । माझा आतं भावो ऐसा आहे ॥ ३ ॥ जो हेत अंतरीं देव तैसा झाला । हा दीन पाहिला कोणी एक ॥ ४ ॥ कोणी एक पुण्य जें होतें संचलें । दास ह्मणे झालें समाधान ॥ ५ ॥

---

१ आंत बाहेर. २ विवेकरूपी काठी हातांत घेणारा. ३ मार्गानें. ४ घरामध्यें. ५ कातडी. ६ धूळ. ७ पदकमल.

॥ ४ ॥ दीनाचा दयाळू कीर्ति ऐकियेली । ह्मणूनी पाहिली वाट तूझी ॥ १ ॥ अनाथाचा नाथ होशील कैवारी । ह्मणोनियां हरी बोभाईलें ॥ २ ॥ तुजविण कोण जाणे हें अंतर । कोणासी जोजार घालूं माझा ॥ ३ ॥ दास ह्मणे आह्मी दीनाहूनी दीन । करावें पालन दुर्बळाचें ॥ ४ ॥

॥ ५ ॥ आह्मां पतितांची सांड केली जरी । आमचा कैवारी कोण आहे ॥ १ ॥ आह्मीं भरंवसा कोणाचा धरावा । सांगावें केशवा दयानिधे ॥ २ ॥ तूजविण आह्मां नाहीं त्रिभुवनीं । धांवे चक्रपाणी दीनबंधो ॥ ३ ॥ पतितपावन ब्रीद हें बांधिलें । तारावें वहिलें दासालागीं ॥ ४ ॥

॥ ६ ॥ पळशी तूं तरी नाम कोठें नेशी । आह्मी अहर्निशीं नाम घोकूं ॥ १ ॥ आह्मांपासोनियां जातां नये तूज । तें हें वर्म बीज नाम जपूं ॥ २ ॥ देवा आह्मां तुझें नाम हो पाहिजे । मग भेटी सहजें देणें लागे ॥ ३ ॥ भोळे भक्त आह्मीं चुकलोंचि कर्म । सांपडलें वर्म रामदासा ॥ ४ ॥

॥ ७ ॥ गजेंद्र सावज पडला पानवडीं । रामें तेथें उडी टाकियेली ॥ १ ॥ प्रल्हाद गांजितां कोण सहाकारी । स्वयेंची मुरारी प्रगटला ॥ २ ॥ क्षत्रियें ब्राह्मणें गांजिलीं बापडीं । रामें तेथें उडी घातियेली ॥ ३ ॥ तेहतीस कोटी देव पडिले बांदोडीं । रामें तेथें उडी टाकियेली ॥ ४ ॥ दासापायीं पडली देहबुद्धी बेडी । रामें तेथें उडी टाकियेली ॥ ५ ॥ रामदास ह्मणे नका करूं शीण । रामें भक्त कोण उपेक्षिले ॥ ६ ॥

॥ ८ ॥ तुजविण देव मज कोणी नाहीं । माझी चिंता कांहीं असों द्यावी ॥ १ ॥ वैराग्यें अनिष्ट अभावें वरिष्ठ । माझे मनीं नष्ट संदेहता ॥ २ ॥ विवेकें सांडिलें ज्ञानें ओसंडिलें । चित्त हें लागलें तुझे पायीं ॥ ३ ॥ तुझें नाम वाचे उच्चारीत असे । अंतरीं विश्वास धरीयेला ॥ ४ ॥ रामदास ह्मणे मी तुझें अज्ञान । माझें समाधान करी देवा ॥ ५ ॥

॥ ९ ॥ श्वानाचिया पुत्रें कल्होळ मांडिला । कलहो लागला एकसरां ॥ १ ॥ भुंकितां गुरगुरी वासितोचि तोंड । वरती थोबाड करूनियां ॥ २ ॥ एक ते भुंकती एक ते रडती । दास ह्मणे गती निंदकांची ॥ ३ ॥

॥ १० ॥ मेरूचीया माथां ठेवूनीयां पांव । जात असे राव कैलासींचा ॥ १ ॥ कैलासींचा राव एक देव क्षोभला । देशधडी केली लंकानाथ ॥ २ ॥ लंकेच्या चोहाटीं मांडियेला खेळ । अग्नीचा कल्लोळ घरोघरीं ॥ ३ ॥ जाळीयेलीं घरें सुंदर मंदिरें । पावला कैवारें जानकीच्या ॥ ४ ॥ जानकीचा शोक दुरी दुराविला । यशवंत झाला रामदास ॥ ५ ॥

॥ ११ ॥ जाणावा तो नर देवचो साचार । वाचे निरंतर राम राम ॥ १ ॥ सगुणीं सद्भाव नाहीं ज्ञानगर्व । तयालागीं सर्व सारीखचीं ॥ २ ॥ निंदका वंदका संगट सांभाळीं । मन सर्व काळीं पालटेना ॥ ३ ॥ पालटेना मन परस्त्रीकांचनीं । निवत्री वचनीं पुढिल्यासी ॥ ४ ॥ पुढिल्यासि तोचि सुख देत आहे । उपकारीं देह लावीतसे ॥ ५ ॥ लावीतसे देह रामभजनास । रामीं रामदास हरिभक्त ॥ ६ ॥

---

१ ताबडतोब, लगेच. २ विष्णु ( मुर दैत्याचा शत्रु. ) ३ परशुरामानें. ४ कैदखान्यामध्यें. ५ टाकिले. ६ कुत्र्याच्या. ७ पाय. ८ चवाठ्यापर. ९ सारखें.

॥ १२ ॥ भक्तपणें रामनामाचा अव्हेर । करी तो गव्हार मुक्त नव्हे ॥ १ ॥ मुक्त नव्हे काय स्वयें शूळपाणी । रामनाम वाणी उच्चारीतो ॥ २ ॥ राम ह्मणे शीव तेथें किती देव । बापुडे मानव देहधारी ॥ ३ ॥ देहधारी नर धन्य ते संसारीं । वाचे निरंतरीं रामनाम ॥ ४ ॥ राम नाम वाचें स्वरूप अभ्यंतरीं । धन्य तो संसारीं दास ह्मणे ॥ ५ ॥

॥ १३ ॥ मी खरा पतित तूं खरा पावन । आतां अनमान करूं नको ॥ १ ॥ आतां कांहीं मज चिंता तीही नसे । तुझें नाम कैसें वाचे येई ॥ २ ॥ समर्थें घेतला नामासाठीं भार । मज उपकार कासयाचा ॥ ३ ॥ रामदास ह्मणे तुझें तूज उणें । सोयरीं पिशूनें हांसतील ॥ ४ ॥

॥ १४ ॥ पतितपावना जानकीजीवना । वेगीं माझ्या मना पालटावें ॥ १ ॥ मिथ्या शब्दज्ञानें तुज अंतरलों । संदेहीं पडलों मीपणाच्या ॥ २ ॥ सदा खळखळ निर्गुणाची घडे । सगुण नेतुडे ज्ञानगर्वें ॥ ३ ॥ रामदास ह्मणे ऐसा मी पतीत । मीपणें अनंत आतुडेना ॥ ४ ॥

॥ १५ ॥ टाळ धरूं कथा करूं । रामालागीं हाका मारूं ॥ १ ॥ ये रे रामा ये रे रामा । तुझी आवड लागो आह्मां ॥ २ ॥ तुजविण गाईल कोण । ऊठ सांडिलें मीतूंपण ॥ ३ ॥ रामदास पाहे वास । भेटी धावी सावकाश ॥ ४ ॥

॥ १६ ॥ रामभक्तिवीण आन[1] नाहीं सार । साराचें हें सार राम एक ॥ १ ॥ कल्पनाविस्तारू होतसे सत्वरू । आह्मां कल्पतरू चाड नाहीं ॥ २ ॥ कामनेलागोन विटलेंसे मन । तेथें चाड कोण कामधेनु ॥ ३ ॥ चिंता नाहीं मनीं राम गातां गुणीं । तेथें चिंतामणी कोण पुसे ॥ ४ ॥ कदा नाहीं नाश स्वरूप सुंदर । तेथें आह्मां हिरे चाड नाहीं ॥ ५ ॥ रामदास ह्मणे रामभक्तीवीण । जाणावें तें उणें सर्व कांहीं ॥ ६ ॥

॥ १७ ॥ सीतापती राम पतितपावन । गाती भक्तजन आवडीनें ॥ १ ॥ राघवाच्या गुणा न दिसे तूळणा । कैलासींचा राणा लांचावला ॥ २ ॥ देवांचें मंडण भक्तांचें भूषण । धर्मसंरक्षण राम एक ॥ ३ ॥ रामदास ह्मणे धन्य त्यांचें जिणें । कथानिरूपणें जन्म गेला ॥ ४ ॥

॥ १८ ॥ आह्मीं देखिला विठोबा । आनंदें विटेवरी उभा ॥ १ ॥ तेथें दृश्याची जे दाटी । तेचि रुक्मिणी गोमटी ॥ २ ॥ रामी रामदास ह्मणे । जो ओळखे तोचि धन्य ॥ ३ ॥

॥ १९ ॥ लांचावोनि भक्तलोभा । असे वाळवंटीं उभा ॥ १ ॥ पदकीं इंद्रनीलशोभा । प्रभे शोभा उजळती ॥ २ ॥ भक्त पुंडलिकें गोंविला । जाऊं नेदी भांबाविला ॥ ३ ॥ विटे नीट असे ठाकला । भीमातीर वाळुवंटीं ॥ ४ ॥ भाग्य पुंडलिकाचें । उभें दैवत त्रिलोकींचें ॥ ५ ॥ कीं जें तारूं भवसागरीं । भीमातीरीं विनटलें ॥ ६ ॥ एकें पुंडलिकें करूनी जोडी । आह्मांसी दिधली कल्पकोडी ॥ ७ ॥ तुटलीं संसारसांकडीं । रामदास ह्मणतसे ॥ ८ ॥

॥ २० ॥ जीवन्मुक्त प्राणी होऊनियां गेले । तेणें पंथें चाले तोचि धन्य ॥ १ ॥ जाणावा तो ज्ञानी पूर्ण समाधानी । निःसंदेह मनीं सर्वकाळ ॥ २ ॥ मिथ्या देहभान प्रारब्ध अधीन । राखे पूर्णपण समाधानीं ॥ ३ ॥ आवडीनें करी कर्म उपासना । सर्व काळ ध्यानारूढ मन ॥ ४ ॥ पदार्थाची हानी हाता नये कोणी । जयाची करणी बोला ऐसी ॥ ५ ॥ धन्य पैं ते दास संसारीं उदास । तयां रामदास नमस्कारी ॥ ६ ॥

---

१ अप्रयोजक. २ सांपडत नाहीं. ३ दुसरें. ४ जीवित. ५ सुंदर. ६ संसारांतील संकटें.

॥ २१ ॥ संसार देखिला तरी पाहे सार । वायां येरझार पाहूं नको ॥ १ ॥ पाहूं नको दुःखसागरीं आपणा । ह्मणे नारायणा ओळखावें ॥ २ ॥ ओळखावें वेगीं आप आपणासी । संसारीं सुटशी दास ह्मणे ॥ ३ ॥

॥ २२ ॥ विचारें संसार होतो देशधडी । सोनियाची घडी जात असे ॥ १ ॥ दावा तास गेला मोक्षपंथा जातां । विवेकें तत्वतां याशी नांवें ॥ २ ॥ सदा श्रीरामाचें भजन करितां । दास ह्मणे चिंता दूर होय ॥ ३ ॥

---

## पंचीकरण.

॥ १ ॥ ओवीचे आरंभीं वंदूं विनायक । बुद्धिदाता एक लोकांमध्यें ॥ १ ॥ लोकांमध्यें बुद्धिवीण कामा नये । बुद्धीचा उपाये सर्वत्रांसी ॥ २ ॥ सर्वत्रांसी बुद्धि देतो गणनाथ । करीतो सनाथ अनाथासी ॥ ३ ॥ अनाथा नाथाचा नाथ केला जनीं । तो हा धरा ध्यानीं लंबोदर ॥ ४ ॥ लंबोदर विद्याविभवापरता । दास ह्मणे माता सरस्वती ॥ ५ ॥

॥ २ ॥ नमूं योगेश्वरी शारदा सुंदरी । श्रोता प्रश्न करी वक्तयासी ॥ १ ॥ वक्तयासी पुसे जीव हा कवण । शिवाचें लक्षण सांगा मज ॥ २ ॥ सांगा मज आत्मा कैंचा परमात्मा । बोलिजे अनात्मा तो कवण ॥३॥ कवण प्रपंच कोणें केला संच । मागुता विसंच कोण करी ॥ ४ ॥ कोण ते अविद्या सांगे जो जी विद्या । कैसें आहे आद्य स्वरूप तें ॥ ५ ॥ स्वरूप ते माया कैसी मूळमाया । ऐसीं चाळावया कोण आहे ॥ ६ ॥ आहे कैसें शून्य कोणतें चैतन्य । समाधान अन्य तें कवण ॥ ७ ॥ कोण तो जन्मला कोणा मृत्यु आला । भ्रमयुक्त झाला तो कवण ॥ ८ ॥ कवण जाणता कवणाची सत्ता । मोक्ष हा तत्वतां कोण सांगा ॥ ९ ॥ सांगा ब्रह्मखूण सगुण निर्गुण । पंचवीस प्रश्न दासें केले ॥ १० ॥

॥ ३ ॥ नमूं वेदमाता नमूं त्या अनंता । प्रश्न सांगों आतां श्रोतयाचे ॥ १ ॥ श्रोतयाचे प्रश्न जीव हा अज्ञान । जया सर्व ज्ञान तोची शिव ॥ २ ॥ शिवपर आत्मा त्यापर परमात्मा । बोलिजे अनात्मा अनिर्वाच्य ॥ ३ ॥ वाच्य हा प्रपंच माईक जाणावा । घडामोडी देवापासूनियां ॥ ४ ॥ विषय अविद्या त्यागावी ते विद्या । निर्विकल्प आद्या तेंचि रूप ॥ ५ ॥ कल्पना हे माया सत्वमूळमाया । ऐसी चाळावया चैतन्यची ॥ ६ ॥ नकार तें शून्य व्यापक चैतन्य । ईश्वर अनन्य समाधान ॥ ७ ॥ जीव हा जन्मला जीवा मृत्यु आला । बद्ध मुक्त झाला तोही जीव ॥ ८ ॥ ईश्वर जाणता ईश्वराची सत्ता । मोक्ष हा तत्वतां ईश्वरची ॥ ९ ॥ ईश्वर निर्गुण ईश्वर सगुण । हेची ब्रह्मखूण दास ह्मणे ॥ १० ॥

॥ ४ ॥ सत्य राम एक सर्वही माईक । जाणा हा विवेक योगियांचा ॥ १ ॥ योगियांचा देव तया नाहीं खेव । जेथें जीव शिव ऐक्यरूप ॥ २ ॥ ऐक्यरूप जेथें तें पीठ ब्रह्मांड । ब्रह्म तें अखंड निराकार ॥ ३ ॥ निराकार ब्रह्म बोलताती श्रुती । आदि मध्य अंतीं सारिखेंची॥४ सारिखेंची ब्रह्म नभाचियेपरी । बाह्य अभ्यंतरीं कोंदाटलें ॥ ५ ॥ कोंदाटलें परी पाहतां दिसेना । साधूवीण येना अनुभवा ॥ ६ ॥ अनुभवा येतां तें ब्रह्म निश्चळ । जाय तळमळ संसाराची ॥७॥ संसाराचें दुःख सर्वही विसरे । जरी मनीं भरे स्वस्वरूप ॥८॥ स्वस्वरूपीं नाहीं सुख

---

१ जन्ममरणाचे फेरे. २ गणपती. ३ अज्ञान. ४ खोटा. लटका. ५ खरोखर. ६ वेद.

आणि दुःख। धन्य हा विवेक जयापाशीं ॥९॥ जयापाशीं ज्ञान पूर्ण समाधान । त्याची आठवण दास करी ॥ १० ॥

॥ ५ ॥ मन हें विवेकें विशाळ करावें । मग आठवावें परब्रह्म ॥ १ ॥ परब्रह्म मनीं तरीच मिळे । जरी बोधें गळे अहंकार ॥ २ ॥ अहंकार गळे संताचे संगतीं । मग आदीं अंतीं समाधान ॥ ३ ॥ समाधन घडे स्वस्वरूपीं राहतां । विवेक पहातां निःसंगाचा ॥ ४ ॥ संग निःसंगाचा दृढ तो धरावा । संसार तरावा दास ह्मणे ॥ ५

॥ ६ ॥ तुम्ही आह्मी करूं देवाचा निश्चय । जया नाहीं लयं तोची देव ॥ १ ॥ देव हा अमर नित्य निरंतर । व्यापूनि अंतर देव राहे ॥ २ ॥ देव राहे सदा सबाह्य अंतरीं । जीवा क्षणभरी विसंबेना ॥ ३ ॥ विसंबेना परी जीवासी नेणवे । ह्मणोनीयां धांवे नानामतीं ॥ ४ ॥ नानामतीं देव पहातां दिसेना । जंव तें वसेना ज्ञान देहीं ॥ ५ ॥ ज्ञान देहीं वसे तया देव दिसे । अंतरीं प्रकाशे ज्ञानदृष्टी ॥ ६ ॥ ज्ञानदृष्टी होतां पाविजे अनंता । हा शब्द तत्वतां दास ह्मणे ॥ ७ ॥

॥ ७ ॥ रात्रंदिवस मन राघवीं असावें । चिंतन नसावें कांचनाचें ॥ १॥ कांचनाचें ध्यान परस्त्रीचिंतन । जन्माचें कारण हींच दोन्ही ॥ २ ॥ दोन्हीं नको धरूं निंदा नको करूं । तेणें हा संसारू तरसील ॥ ३ ॥ तरसील भवसागरीं बुडतां । सत्येंचि अनंताचेची नामें ॥ ४ ॥ नामरूपातीत जाणा तो अनंत । दास ह्मणे संतसंग धरा ॥ ५ ॥

॥ ८ ॥ ब्रह्मा विष्णु रुद्र जयाचे अवतार । तोचि देव थोर जाण बापा ॥ १ ॥ जाण बापा देव देहासी निर्मिता । तो देव तत्वतां ठाईं पाडीं ॥ २ ॥ ठाईं पाडीं देव साधूचे संगती । दास ह्मणे गती पावशील ॥ ३ ॥

॥ ९ ॥ चंदनासंगतीं चंदनाचि होती । होय काळी माती कस्तूरिका ॥ १ ॥ कस्तूरिका होय कस्तुरीच्या योगें । साधुच्यानी संगें साधुजन ॥ २ ॥ साधुजन होती संगती धरितां । मिळवणीं मिळतां गंगाजळीं ॥ ३ ॥ जेवितां अमृत अमर होइजे । अचळ पाविजे साधुसंगें ॥ ४ ॥ साधुसंगें देव आपणचि होय । लक्षण अद्वय बाणलिया ॥ ५ ॥ बाणलिया तया निःसंगाचा संग । होइजे निःसंग आपणचि ॥ ६ ॥ आपणचि ध्यानीं बैसला आसनीं । जनीं आणि वनीं देव भासे ॥ ७ ॥ देव भासे तेणें आपण भुलला । तेणें गुणें झाला देव अंगें ॥ ८ ॥ देवाचे संगती देवचि होइजे । चतुर्भुजराजे वैकुंठींचे ॥ ९ ॥ वैकुंठींचे राजे ध्याती अहर्निशीं । वंदिति साधूसी दास ह्मणे ॥ १० ॥

॥ १० ॥ दुर्जनसंगती कदा धरूं नये । घडती अपाय बहुविध ॥ १ ॥ बहुविध झाले अपाय बहुतां । तेचिं सांगे आतां सावकाश ॥ २ ॥ कुसंग हे माया धरितां संगती । गेले अधोगती नेणों किती ॥ ३ ॥ चांडाळासंगतीं होइजे चांडाळ । होय पुण्यशीळ साधुसंगें ॥ ४ ॥ कुरुंदासंगतीं झिजला चंदन । कुसंगें जीवन नासतसे ॥ ५ ॥ खाराचेसंगतीं नासे मुक्ताफळ । होतसे तात्काळ कळाहीन ॥ ६ ॥ लाखेच्या संगतीं सोनें होय उणें । दुग्ध हें लवणें नासतसे ॥ ७ ॥ दुर्जनासंगतीं सज्जन ढांसळे । क्रोध हा प्रबळे

---

१ परब्रह्मस्वरूपीं. २ अंत, नाश. ३ आंतबाहेर. ४ सोन्याचें. ५ शंकर. ६ रात्रंदिवस. ७ नरकाला.

अकस्मात ॥ ८ ॥ दास ह्मणे संगत्याग दुर्जनाचा । धरा सज्जनाचा आदरेंसी ॥ ९ ॥

॥ ११ ॥ साधुसंगें साधु भोंदुसंगें भोंदु । वादुसंगें वादु होत असे ॥ १ ॥ होत असे लाभ भल्याचे संगतीं । जाय अधोगेती दुष्टसंगें ॥ २ ॥ दुष्टसंगें नष्ट झाला महापापी । होतसे निःपापी साधुसंगें ॥ ३ ॥ संग जया जैसा लाभ तया तैसा । होतसे आपैसा अनायासें ॥४॥ अनायासें गति चुके अधोगती । धरितां संगती सज्जनांची ॥ ५ ॥ सज्जनाची कृपा जयालागीं होय । तयालागीं सोय परत्रींची ॥ ६ ॥ परत्रींची सोय भक्तीचे उपाय । चुकती अपाय दास ह्मणे ॥ ७ ॥

॥ १२ ॥ दुर्जनाचे संगें होय मनोभंग । सज्जनाचा योग सुख करी ॥ १ ॥ सुख करी संग संतसज्जनाचा । संताप मनाचा दुरी ठाके ॥ २ ॥ दुरी ठाके दुःख होय सर्व सुख । पाहों जातां शोक आढळेना ॥ ३ ॥ आढळेना लाभ तेथें कैंचा क्षोभ । अलभ्याचा लाभ संतसंगें ॥ ४ ॥ संतसंगीं सुख रामीं रामदासीं । देहसंबंधासी उरी नाहीं ॥ ५ ॥

॥ १३ ॥ साधु आणि भक्त व्युत्पन्न विरक्त । तपोनिधी शांत अपूर्व तो ॥ १ ॥ अपूर्व तो जनीं शुद्धसमाधानी । जनाचे मिळणीं मिळूं जाणे ॥ २ ॥ मिळों जाय जना निर्मळ वासना । अंतरीं असेना निंदाद्वेष ॥ ३ ॥ निंदाद्वेष नसे जनिं लेय असे । तेथें कृपा वसे सर्वकाळ ॥ ४ ॥ सर्वकाळ जेणें सार्थकीं लाविला । वंश उद्धारिला नामघोषें ॥ ५ ॥ नामघोष वाचे उच्चारी सर्वदा । संताच्या संवादा वांटेकरी ॥ ६ ॥ वांटेकरी झाला सायुज्यमुक्तीचा । धन्य तो दैवाचा दास ह्मणे ॥ ७ ॥

॥ १४ ॥ ऐसा कोण संत जो दावी अनंत । संदेहाचा घात करूं जाणे ॥ १ ॥ करूं जाणे साधकांचें समाधान । जया भिन्नाऽभिन्न आढळेना ॥ २ ॥ आढळेना जया आपुलें पारिखें । ऐक्यरूपें सुखें सुखावले ॥ ३ ॥ सुखावला ज्याचे संगतीं साधक । साधु तोचि एक धन्य जगीं ॥ ४ ॥ धन्य तेचि जगीं जे गुण बोलिले । दास ह्मणे झाले पुरुष तेचि ॥ ५ ॥

॥ १५ ॥ संतांचेनि संगें देव पाठी लागे । सांडूं जातां मागें सांडवेना ॥ १ ॥ सांडवेना सदा देवसमागमीं । बाह्य अंतर्यामीं सारिखाची ॥ २ ॥ सारिखाची कडे कपाटशिखरीं । गृहीं वनांतरीं सारिखाची ॥ ३ ॥ सारिखाचि तीर्थीं सारिखाचि क्षेत्रीं । दिवस आणि रात्रीं सारिखाची ॥ ४ ॥ सारिखाचि अंत नाहीं तो अनंत । रामदासांकित मावळला ॥ ५ ॥

॥ १६ ॥ दिसे तें नासेल सर्वत्र जाणती । या बोला वित्पत्ति काय काज ॥ १ ॥ कार्य कारण हा विवेक पाहिजे । तरीच लाहिजे शाश्वतासी ॥ २ ॥ शाश्वतासी येणें जाणेंचि न घडे । साकार हें मोडे दास ह्मणे ॥ ३ ॥

॥ १७ ॥ निर्गुणस्वरूपीं मूळमाया झाली । तिच्या पोटीं आली गुणमाया ॥ १ ॥ गुणमायेपोटीं झाला सत्वगुण । सत्वीं रजोगुण उद्भवला ॥ २ ॥ उद्भवला रजोगुणीं तमोगुण । तमोगुणीं जाण व्योम झालें ॥ ३ ॥ व्योमापोटीं तेजें वायुवायु पोटीं । तेजीं तें सहज आप झालें ॥ ४ ॥ आपापामाजियां भूमंडळ होणें । शास्त्रींचीं वचनें दास ह्मणे ॥ ५ ॥

---

१ नरकवासाला. २ परलोकींची. ३ स्थिति. ४ जन्म. ५ नाश. ६ परके. ७ आंतबाहेर. ८ आकाश. ९ अग्नि. १० उदक.

॥ १८ ॥ मायेचें स्वरूप ब्रह्मीं उद्भवलें । तिच्या पोटा आलें महत्तत्त्व ॥१॥ महत्तत्त्वीं सत्त्व सत्त्वीं रजोगुण । तिजा तमोगुण रजापोटीं ॥ २ ॥ पोटीं पंच भूतें तमाचिया आलीं । दास ह्मणे झाली सृष्टी ऐसी ॥ ३ ॥

॥ १९ ॥ शून्यापासूनियां जन्म आकाशासी । आकाश वायूसी प्रसवलें ॥ १ ॥ प्रसवलें वायु तया तेज झालें । तेजाचिया आलें पोटा आप ॥ २ ॥ आपापासूनियां सृष्टि ते जन्मली । ऐसी विस्तारली मायादेवी ॥ ३ ॥ मायादेवी वेळे शून्याकडे पळे । ते काळीं खवळे पंचभूत ॥ ४ ॥ जें जें जया व्यालें तें तेणें भक्षिलें । अंतीं तें उरलें शून्य एक ॥ ५ ॥ शून्याचें स्वरूप पाहातां कांहीं नाहीं । तें शून्य सर्वही जेथें आटे ॥ ६ ॥ आहे हें आटलें त्यांचें शून्य झालें शून्यहि विरालें जे स्वरूपीं ॥ ७ ॥ स्वरूप पाहातां काळ वेळ गेली । निज ठेवी लाधली प्राणीयासी ॥ ८ ॥ प्राणियांचें हित आहे संतांपायीं । वेगीं शरण जाई आलियातें ॥ ९ ॥ आलिया रे संतसंगें मुक्त होसी । रामीं रामदासीं हेंचि वर्म ॥ १० ॥

॥ २० ॥ पृथ्वीतळीं व्याळ व्याळातळीं जळ । त्यातळीं अनळ सत्य जाण ॥ १ ॥ सत्य जाण तयातळीं तो अनिळ । त्यातळीं पोकळ व्योम आहे ॥ २ ॥ व्योमातळीं अहंकार तो केवळ । तेणें ब्रह्मगोळ धरियेला ॥ ३ ॥ धरियेला पुढें महत्तत्त्व असे । सप्तावरण ऐसें निरोपिलें ॥ ४ ॥ दशगुणीं थोराहूनि थोर एक । हे सप्त कंचुक दास ह्मणे ॥ ५ ॥

॥ २१ ॥ अनावृष्टि धरा शत संवत्सर । तेणें जीवमात्र संहरती ॥ १ ॥ संहरती कोणी नसे भूमंडळीं । सूर्य बारा कळीं तपवील ॥ २ ॥ तपवील तेणें जळेल धरणी । काद्रवेयाचे फणी पोळवील ॥ ३ ॥ पोळविल तेणें विषाचे हळाळ । मार्तंडाचे ज्वाळ एक होती ॥ ४ ॥ होती गिरिशृंगें सर्व भस्मरूप । तयांलागीं आप बुडवील ॥ ५ ॥ बुडवील धरा जळचि निखळ । तयासि अनळ विझवील ॥ ६ ॥ शोषियेलें जळ उरला अनळ । तयासि अनिळ शोषूं पाही ॥ ७ ॥ विझविता होय वायु त्या वन्हीसी । विश्राती वायूसी नभापोटीं ॥८॥ नभापोटीं चारी भूतें मावळलीं । नभाकार झाली वृत्ति तेव्हां ॥ ९ ॥ वृत्ति नभें ऐसा नटला अन्वय । पांचवा प्रळय दास ह्मणे ॥ १० ॥

॥ २२ ॥ ह्मणे हें जाणावें आकाशासारिखें । माया हीं ओळखें वायू ऐसी ॥ १ ॥ वायुऐसी माया चंचळ चपळ । ब्रह्म तें निश्चळ निराकार ॥ २ ॥ निराकार ब्रह्म नाहीं आकारलें । रूप विस्तारिलें मायादेवी ॥ ३ ॥ मायादेवी झाली नांव आणि रूप । शुद्ध चित्स्वरूप वेगळेंची ॥ ४ ॥ वेगळेंचि परी आहे सर्वांठायीं । रितां ठाव नाहीं तयाविण ॥ ५ ॥ तयाविण ज्ञान तेंचि तें अज्ञान । नाहीं समाधान ब्रह्माविण ॥ ६ ॥ ब्रह्माविण भक्ती तेचि पैं अभक्ती । रामदासीं मुक्ती ब्रह्मज्ञान ॥ ७ ॥

॥ २३ ॥ ब्रह्म हें निर्गुण मुळीं निराकार । तेथें चराचर कैसें झालें ॥ १ ॥ झालें निराकारीं अहंतास्फुरण । एकीं एकपण प्रगटलें ॥ २ ॥ प्रगटलें कैसें आकार नसतां । निर्गुण अहंता कोणें केली ॥ ३ ॥ कोणीं नाहीं केली सर्वही मायिक । निर्गुण तें एक

१ सर्प. २ अग्नि. ३ वायु. ४ पृथ्वी. ५ शेषाची. ६ लटकी.

जैसें तैसें ॥ ४ ॥ जैसें तैसें सर्व मायिक रचिलें । निराकारीं झालें कोणेपरी ॥ ५ ॥ परी हीं नाथिलीं साच मानू नये । नाहीं त्यासि काये पुससील ॥ ६ ॥ पुसाशील काय वांझेचीं लेंकरें । मृगजळ पूरें भांबावसी ॥ ७ ॥ भांबावसी काय मूळाकडे पाही । मूळीं तेथें कांहीं झालें नाहीं ॥ ८ ॥ नाहीं कां ह्मणतां प्रत्यक्ष दिसतें । सत्यत्वें भासतें चराचर ॥ ९ ॥ चराचर सत्य हें केवीं घडेल । अंधारीं बुडेल रैविबिंब ॥ १० ॥ बिंबतें हें मनीं दिसतें लोचनीं । तें कैसें वचनीं मिथ्या होय ॥ ११ ॥ मिथ्या होय स्वप्न जागृति आलिया । तेंचि निजलिया सत्य वाटे ॥ १२ ॥ सत्य वाटे मिथ्या मिथ्या वाटे सत्य । ऐसें आहे कृत्य अविद्येचें ॥ १३ ॥ अविद्येचें कृत्य तुह्मींच सांगतां । मागुतें ह्मणतां झालें नाहीं ॥ १४ ॥ नाहीं झालें कांहीं दृष्टीचें बंधन । तैसें हें अज्ञान बाधितसे ॥ १५॥ बाधितसे परी सर्वथा नाथिलें । कांहीं नाहीं झालें ज्ञानियांसी ॥ १६ ॥ ज्ञानियांसी दृश्य दिसतें कीं नाहीं । देहींच विदेही कैसे झाले ॥ १७ ॥ झालेती विदेही देहींच असतां । दिसतें पहातां परी मिथ्या ॥ १८ ॥ मिथ्या हें सकळ मज कां वाटेना । संशय तुटेना अंतरींचा ॥ १९ ॥ अंतरींचा संशय तुटे संतसंगें । कृपेचेनि योगें दास ह्मणे ॥ २० ॥

॥२४॥ दृश हे काशाचे कोणें उभारिले । मज निरोपिले पाहिजे हे ॥१॥ पाहिजे हे दृश भूतपंचकाचे । उभारिले साचे मायादेवी ॥२॥ मायादेवी कोण कैसी ओळखावी । जाणोनि त्यागावी ज्ञानबोधें ॥३॥ परी हे मायेची मिथ्या ओळखावी । आणि ती त्यागावी कोणेपरी ॥४ ज्ञानबोधें माया जाणोनि त्यागिले । परी नाहीं गेली काय कीजे ॥५॥ कीजे निरूपण संतांचे संगतीं । तेणें शुद्ध मती होत असे ॥६॥ होत असे परी तैसीच असेना । निश्चल वसेना मनामध्यें ॥ ७ ॥ मनामध्यें सदा विवेक धरावा । निश्चय करावा येणें रीतीं ॥ ८ ॥ रीति विवेकाची पाहतां घडीची । जातसे सर्वेचि निघोनियां ॥ ९ ॥ निघोनियां जाय विवेक आधवा । तो संग त्यागावा साधकानें ॥१०॥ साधकानें संग कोणाचा त्यागावा । दृढ तो धरावा कोण संग ॥ ११ ॥ संग हा आदरें धरी सज्जनाचा । त्यागीं दुर्जनाचा दास ह्मणे ॥ १२ ॥

॥ २५ ॥ कुमारीच्या पोटा ब्रह्मचारी आला । विचारता झाला बाप तिचा ॥ १ ॥ बापचि पुरुष ते तों माया राणी । शब्द विचक्षणीं विचारावा ॥ २ ॥ विचारितां होय नातुहि जामातु । प्रपिताही मातृ मिथ्या नोहे ॥ ३ ॥ मिथ्या नव्हे कदा हा देहसंबंधु । विस्तारे विविधु सोयरीका ॥ ४ ॥ सोयरे संबंधु नाहीं त्या निर्गुणा । शाश्वताच्या खुणा दास ह्मणे ॥ ५ ॥

॥ २६ ॥ हिरियाच्या पोटीं मांदुसाच्या कोटी । सुवर्णाच्या तांटीं काचखडे ॥ १ ॥ काचखडे हेमीं तैसें दृश्य रामीं । स्वरूपविश्रामीं भ्रमु माया ॥ २ ॥ माया हे असार स्वरूपें ते सार । पाहिला निर्धार रामदासीं ॥ ३ ॥

॥ २७ ॥ ताकहि पांढरें दूधहि पांढरें । चवी जेवणारें जाणिजेते ॥ १ ॥ जाणिजे ते चवी गुळासाखरेची । पाहा तो तेथेंची भेद आहे ॥ २ ॥ भेद आहे तैसा अभेदाचे परी । जाणिजे चतुरीं दास ह्मणे ॥ ३ ॥

---

१ सूर्याचें प्रतिबिंब. २ अज्ञानाचें. ३ प्रकार. ४ सर्व. ५ शहाण्यांनीं. ६ सोन्यामध्यें.

॥ २८ ॥ वृक्षाविण छाया गुणाविण माया । बिंबाविण वायां प्रतिबिंब ॥ १ ॥ प्रतिबिंब भासे सिंधुविणें लहरी । सोन्याविण परी अळंकार ॥ २ ॥ अळंकार कृत्य कृत्याविणें कैंवी । कैंची गदा गोवी निर्गुणाची ॥ ३ ॥ निर्गुणासि गुण हेंचि मूर्खपण । दृश्याविण खूण दृष्टांताची ॥ ४ ॥ दृष्टांताची खूण परब्रह्मीं घडे । तेव्हां मौन्य पडे कासयासी ॥ ५ ॥ कासयासी तेव्हां अद्वैत पाहावें । द्वैताचि स्वभावें ब्रह्म झालें ॥ ६ ॥ झालें परब्रह्म अत्यंत सुगम । ब्रह्म आणि भ्रम एकरूप ॥७॥ एकरूप आहे दूध आणि ताक । हंसेविण काक बोलताती ॥ ८ ॥ बोलताती सर्व ब्रह्म ऐसें बंड । सर्वेही थोतांड सत्य जाणा ॥ ९ ॥ सत्य जाणा ब्रह्म निर्मळ निश्चळ । मायेचा विटाळ जेथें नाहीं ॥ १० ॥ जेथें नाहीं गुण त्या नांव निर्गुण । गुरुमुखें खूण ठाईं पडे ॥ ११ ॥ ठाईं पडे सत्य शाश्वत स्वरूप । मग आपेंआप बुझसील ॥ १२ ॥ बुझसील साच धरितां विश्वास । ओवी रामदास सांगतसे ॥ १३ ॥

॥ २९ ॥ रत्नपारखिया रत्नचि परीक्षी । अलक्षातें लक्षी ऐसा नाहीं ॥ १ ॥ ऐसा नाहीं कोणी देवाचा पारखी । आपली ओळखी ठाईं पाडी ॥ २ ॥ ठाईं पाडी निज स्वरूप आपुलें । असोनि चोरिलें जवळीच ॥ ३ ॥ जवळी ना दुरी पाताळीं ना वरी । सबाह्य अभ्यंतरीं कोंदलेंची ॥ ४ ॥ कोंदलेंचि असे परि तें न दिसे । जवळिच कैसें आढळेना ॥ ५ ॥ आढळेना अंगीं असोनि सर्वांगीं । जयालागीं योगी धुंडिताती ॥ ६ ॥ धुंडिताति कडाकपाटीं शिखरीं । समागमें हरी चोजवेना ॥ ७ ॥ चोजवेना एका सद्गुरुवांचूनी । निश्चय हा मनीं पाविजेतो ॥ ८ ॥ पाविजे निश्चयो दृढ स्वरूपाचा । तिहीं प्रचीतींचा एक भाव ॥ ९ ॥ ऐकभाव भक्ति रामीं रामदासीं । विभक्ति विश्वासी दुरी ठेली ॥ १० ॥

॥ ३० ॥ बाह्य नारिकेळ भितरीं नरोटी । तैशापरी दृष्टी स्वस्वरूपीं ॥ १ ॥ स्वस्वरूपीं माया जैसी द्रुमीं छाया । कां तें भासे वायां मृगजळ ॥ २ ॥ मृगजळ भासे मार्तंडोकरितां । स्वरूपीं पहातां बिंब नाहीं ॥ ३ ॥ बिंब नाहीं जेथें कैंचें प्रतिबिंब । एकचि स्वयंभ स्वस्वरूपीं ॥ ४ ॥ स्वस्वरूपीं भास नाथिला आभास । धरिजे विश्वास दास ह्मणे ॥ ५ ॥

॥ ३१ ॥ जडत्व कठिण ते ते पृथ्वी जाण । मृदु ओलेपण असे आपें ॥ १ ॥ आप नाना रस धातु नाना रस । उष्णता तैजस तेंचि तेज ॥ २ ॥ वायु स्तब्ध चळ आकाश निश्चळ । माईक सकळ दास ह्मणे ॥ ३ ॥

॥ ३२ ॥ पृथ्वी आणि तेज वायु आणि आकाश । पांचांचे हे ऐसे पंचवीस ॥ १ ॥ अस्थि मांस त्वचा नाडी आणि रोम । पांचांचें हें वर्म सांगईन ॥ २ ॥ शुक्लित शोणित लाळ आणि मूत्र । मज्जा हीं निश्चित पंच तत्वें ॥ ३ ॥ क्षुधा तृषा जाण आळस शयन । पांचवें मैथुन तेजाचेंची ॥ ४ ॥ चळण वळण आणि प्रसरण । वायुनिरोधन आकुंचन ॥ ५ ॥ काम क्रोध शोक मोह आणि भये । स्थूळदेहाचिये पंचवीस ॥ ६ ॥ पंचवीस तत्वीं स्थूळदेह वर्तत । ऐक सविचत लिंगदेह ॥७॥ अंतःकरण मन बुद्धि आणि चित्त । पांचवा निश्चित अहंकार ॥८॥ प्राण आणि अपान व्यान आणि उदान । समान हे जाण पांच वायु ॥ ९ ॥ चक्षु श्रोत्र जिव्हा आणि घ्राण त्वचा । अंश हा तेजाचा ज्ञानेंद्रियें ॥ १० ॥ वाचा पाणी पाद शिश्न

---

१ लाट. २ परीक्षा करणारा. ३ अनुभवाचा. ४ झाडाखालीं. ५ सूर्यामुळें. ६ उदक. ७ रक्त.

आणि गुद । पांच हीं प्रसिद्ध कर्मेंद्रियें ॥ ११ ॥ शब्द स्पर्श रूप रस आणि गंध । पांचही प्रसिद्ध विषय हे ॥ १२ ॥ ऐसे पंचवीस लिंगदेहीं ऐसें । ऐसीं पंचवीसें तत्वें झालीं ॥ १३ ॥

॥ ३३ ॥ काम क्रोध शोक मोह आणि भय । पंचधा अन्वय आकाशाचा ॥ १ ॥ धावन चळण आणि आकुंचन । वायुप्रसरण निरोधन ॥ २ ॥ चक्षु श्रोत्र जिव्हा मैथुन आळस । तेजाचे हे अंश पंचविधा ॥ ३ ॥ लाळ मूत्र शुक्र रक्त आणि मज्जा । आप जाण वोजा पंचविधा ॥ ४ ॥ अस्थि त्वचा मांस नाडी रोम अंश । दास ह्मणे वास देहातीत ॥ ५ ॥

॥ ३४ ॥ अंतःकरण मन बुद्धि आणि चित्त । पुढें सावचित अहंकार ॥ १ ॥ व्यानु तो समानु उदानु तो प्राणु । पांचवा अपानु वायु जाण ॥ २ ॥ श्रोत्र त्वचा चक्षु जिव्हा आणि घ्राण । तेजाचेंहि गुण पंचविधा ॥ ३ ॥ वाचा पाणि पाद शिश्न आणि गुद । आपाचे प्रसिद्ध पांच गुण ॥ ४ ॥ शब्द स्पर्श रूप रस आणि गंध । पृथ्वीचे हे विशद दास ह्मणे ॥ ५ ॥

॥ ३५ ॥ विष्णु चंद्र ब्रह्मा नारायण रुद्र । आकाशाचे थोर अंश पाहे ॥ १ ॥ ब्रह्मांडीं व्यापक लोकांक वरुण । रुद्र वायू जाण चाळक तो ॥ २ ॥ दिशा वायु रवि वरुणाचा हेतु । अश्विनी दैवत तेज अंश ॥ ३ ॥ वन्हि इंद्र तिजा जाणावा उपेंद्र । ब्रह्मा आणि सार नैर्ऋती तो ॥ ४ ॥ शब्द स्पर्श रूप रस आणि गंध । तन्मात्रा विशद दास ह्मणे ॥ ५ ॥

॥ ३६ ॥ विष्णु चंद्र जाण ब्रह्मा नारायण । पार्वतीरमण सदाशिव ॥ १ ॥ दिशा वायु सूर्य ज्ञानेंद्रियान्वयें । वरुण निश्चयें अरुण तो ॥ २ ॥ तोचि इंद्र वन्हि वामन प्रजाप्रती । पांचवा नैर्ऋती गुदस्थानीं ॥ ३ ॥ स्थानीं वायु एक विषयहि एक । जाहालें कौतुक विषयांचें ॥ ४ ॥ सूक्ष्मीं सूक्ष्म एक आत्माराम । रामदासीं वर्म सांपडलें ॥ ५ ॥

॥ ३७ ॥ भूतपंचकाचे पंचविस गुण । त्यांचें स्थूळ जाण उभारलें ॥ १ ॥ उभारलें स्थूळ पांचा पंचकांचें । तेंचि तूंहि साचें घडे केवीं ॥ २ ॥ घडे केवीं द्रष्टा दृश्य एकरूप । द्रष्ट्याचें स्वरूप वेगळेंची ॥ ३ ॥ वेगळेंची जाण अस्थि मांस त्वचा । विस्तार भूतांचा जाणताहे ॥४॥ जाणताहे द्रष्टा स्थूळाचा जाणता । विदेही तत्वतां दास ह्मणे ॥ ५ ॥

॥ ३८ ॥ कर्ण मनादिक सूक्ष्म पंचक । याचा साक्षी एक तूंचि जाण ॥ १ ॥ जाणें पंच प्राण साक्षी विलक्षण । विषयाचा जाण तूंचि एक ॥ २ ॥ तूंचि एक साक्षी दश इंद्रियांचा । पांचा पंचकांचा लिंगदेह ॥ ३ ॥ लिंगदेह दृश्य द्रष्टा तूंचि एक । बोलिला विवेक सूक्ष्माचा ॥ ४ ॥ सूक्ष्माचा साक्षी सूक्ष्मावेगळा । दास अवलीळा देहातीत ॥ ५ ॥

॥ ३९ ॥ देहद्वयसाक्षी नेणे आपणासी । कारण तयासी बोलिजेतें ॥ १ ॥ देहद्वय जाणे आपणासी नेणे । पुसों जातां ह्मणे कळेना कीं ॥ २ ॥ कळेना कीं मज झालेंचि स्वरूप । झाला साक्षीरूप सहजचि ॥३॥ सहजचि झाला करणाचा साक्षी । स्वयें नेणण्यासी जाणताहे ॥ ४ ॥ जाणताहे सूक्ष्म स्थूळासि कारण । साक्षी विलक्षण दास ह्मणे ॥ ५ ॥

॥ ४० ॥ विदेहासी कैंचें देहाचें बंधन । बोलिलें अज्ञान निरसावया ॥ १ ॥ निरसोनि माया वांजेची कुमारी । मृगजळपूरीं उतरावें ॥ २ ॥ उतरावें विष स्वप्नींच्या सर्पाचें ।

---

१ संबंध. २ पांच प्रकारचे. ३ स्पष्ट, उघड. ४ अग्नि. ५ खरोखर.

आणि निःसंगाचें संगदुःख ॥ ३ ॥ मग दुःख तुटे अजन्माचा जन्म । नाथिलाचि भ्रम बाधितसे ॥ ४ ॥ बाधितसे भ्रम संतसंगेंविण । रामदासीं ह्मण साधुसंगें ॥ ५ ॥

॥ ४१ ॥ स्वरूप सांडोनि देह मीच भावी । तो जीव रौरवीं बुडवील ॥ १ ॥ बुडवील नरकीं देहाचे संबंधें । सज्जनाच्या बोधें सांडवले ॥ २ ॥ सांडोनि विवेक भेद महावाक्य । जीवाशिवऐक्य जयाचेनी ॥ ३ ॥ जयाचेनी तुटे संसारबंधन । तयाचें वचन दृढ धरा ॥ ४ ॥ दृढ धरा मनीं अहंब्रह्म ऐसें । सांगतो विश्वासें रामदास ॥ ५ ॥

॥ ४२ ॥ मुक्त निःसंदेहो बाधतो संदेहो । संदेहाचा देहो कामा नये ॥ १ ॥ कामा नये चित्त दुश्चित सर्वदा । लागती आपदा संशयाच्या ॥ २ ॥ संशयाच्या संगें समाधान भंगें । खेद आंगीं लागे अकस्मात ॥ ३ ॥ अकस्मात सुखीं दुःख कालवलें । साधकासि केलें संदेहानें ॥ ४ ॥ संदेहाचा घात होय एकसरा । दास ह्मणे करा निरूपण ॥ ५ ॥

॥ ४३ ॥ चारी देह पिंडीं चत्वार ब्रह्मांडीं । अष्टदेह प्रौढी बोलिजेल ॥ १ ॥ बोलिजेल श्रोता सावधान व्हावें । दुश्चित नसावें निरूपणीं ॥ २ ॥ निरूपणीं अष्ट देह ते कवण । स्थूळ लिंग जाण कारण तो ॥ ३ ॥ चौथा देह जाण तो महाकारण । पांचवें लक्षण विराटाचें ॥४॥ हिरण्यगर्भ हे आणि अव्याकृत । आठवी निश्चित मूळमाया ॥ ५ ॥ जन्म अष्ट देहीं साक्षी तो विदेही । रामदासा नाहीं जन्ममृत्यु ॥ ६ ॥

॥ ४४ ॥ मीच ब्रह्म ऐसा अभिमान धरी । जाणावा चतुरीं चौथा देह ॥ १ ॥ चौथा देह सर्वसाक्षी आणि अवस्था । ऐसी हे व्यवस्था चौदेहांची ॥ २ ॥ चौदेहांची गांठी सुटतां सुटली । विवेकें तुटली देहंबुद्धी ॥ ३ ॥ देहबुद्धी नाहीं स्वरूपीं पाहतां । चौथा देह आतां कोठें आहे ॥ ४ ॥ कोठें आहे अहं ब्रह्म ऐसा हेत । देहीं देहातीत रामदास ॥ ५ ॥

॥ ४५ ॥ कल्पनेचे पोटीं अष्टविधा सृष्टी । तेंचि आतां गोष्टी सांगईन ॥ १ ॥ सांगईन गोष्टी एक काल्पनिक । दुजी ती शाब्दिक शब्दसृष्टी ॥ २ ॥ शब्दसृष्टी दुजी तिजी ती प्रत्यक्ष । चौथी जाण लक्ष चित्रलेप ॥ ३ ॥ चित्रलेप चौथी पांचवी स्वप्नींची । सृष्टि गंधर्वाची साहावी ते ॥ ४ ॥ साहावी ती सृष्टि गंधर्वनगर । सातवी नवज्वर सृष्टि जाणा ॥ ५ ॥ सृष्टि जाणा दृष्टिबंधन आठवी । सर्वेंहि मानवी काल्पनिक ॥ ६ ॥ काल्पनिक अष्टसृष्टींचें स्वरूप । शुद्ध सत्स्वरूप निर्विकल्प ॥ ७ ॥ निर्विकल्प देह कल्पनेरहित । जाणिजे स्वहित तेंचि बापा ॥ ८॥ तेंचि बापा तूझें संतांचे संगतीं । चुके अधोगती दास ह्मणे ॥ ९ ॥

॥ ४६ ॥ पांचहि प्रळय सांगईन आतां । जाणिजे तत्त्वतां दोनी पिंडीं ॥ १ ॥ दोनी पिंडीं दोनी ब्रह्मांडप्रळय । पांचवा अन्वय विवेकाचा ॥ २ ॥ विवेकाचा पंथ विवेकें जाणावा । योगियांचा ठेवा निरूपण ॥ ३ ॥ निरूपणीं निद्राप्रळय बोलिला । दुजा मृत्यु झाला प्राणियासि ॥ ४ ॥ प्राणियासि पिंडीं हे दोनी प्रळयो । ब्रह्मनिद्राक्षयो ब्रह्मयाचा ॥ ५ ॥ ब्रह्मयाचा क्षयो तो ब्रह्मप्रळयो । व्यतिरेकान्वयो विवेकाचा ॥ ६ ॥ विवेकाचा अर्थ माईक सर्वेंही । स्वस्वरूपीं नाहीं चराचर ॥ ७ ॥ चराचर मूर्ति मायिक प्रसिद्ध । हा विवेक सिद्ध सज्जनाचा ॥ ८ ॥ सज्जनाचा भाव सर्व दृश्य वाव । दृश्यातीत

---

१ लटका. २ मी ब्रह्म. ३ चार. ४ देहाभिमान. ५ आठ प्रकारची. ६ नरकवास. ७ शरीरामध्यें.

देव जैसा तैसा ॥ ९ ॥ जैसा देव आहे तैसा ओळखावा । प्रळय पांचवा दास ह्मणे ॥ १० ॥

॥ ४७ ॥ कण सांडोनियां घेऊं नये भूस । गर्भत्वेंण फणस घेऊं नये ॥ १ ॥ घेऊं नये नारिकेळाची नरोटी । सालपटें खोटीं डाळिंबाचीं ॥ २ ॥ डाळिंबाची त्वचा चवड उसाचा । स्तंभ कर्दळीचा कामा नये ॥ ३ ॥ खातां नये नाना फळाची आटोळी । असो हे वाचाळी वाउगीच ॥ ४ ॥ वाउगें सांडोनि सार तेंचि घ्यावें । येरें तें सांडावें मिथ्याभूत ॥ ५॥ मिथ्याभूत जें जें तत्त्व दृष्टी पडे । ह्मणोनियां घडे त्याग त्याचा ॥ ६ ॥ त्याग ज्याचा कीजे तें मनीं कल्पावें । मग अनुभवें जाणिजेल ॥ ७ ॥ जाणिजेल सार त्यागितां असार । बोलावा विस्तार काय याची ॥ ८ ॥ काय यासी आतां धरावा संदेहो । कल्पनेचा देहो नाशिवंत ॥ ९॥ नाशिवंत आहे नांव आणि रूप ॥ पाहे आपेआप दास ह्मणे ॥ १० ॥

॥ ४८ ॥ खोटें निवडितां खरें नाणें ठरे । तैसेंचि विस्तारे तत्त्वज्ञान ॥ १ ॥ तत्त्वज्ञान खोटें जाणोनि सांडावें । मग ओळखावें परब्रह्म ॥ २ ॥ परब्रह्म बरवें संतसंगें कळे । विवेकें निवळे मार्ग कांहीं ॥ ३ ॥ मार्ग कांहीं कळ परीक्षा जाणतां । दिशाभूली होतां वाट चुके ॥ ४ ॥ वाट चुके मीन ऐसें न करावें । सार्थक करावें दास ह्मणे ॥ ५ ॥

॥ ४९ ॥ जें जें कांहीं दिसे तें तें सर्व नासे । अविनाश असे आत्मरूप ॥ १ ॥ आत्मरूपीं दृष्टि घालितां निवळे । आपेआप कळे मिथ्या माया ॥ २ ॥ मिथ्या माया वाटे साचाचसारखी । स्वरूपा ओळखी जंव नाहीं ॥ ३ ॥ जंव नाहीं झाली संदेहनिवृत्ति । तंव हे प्रचीती जाणवेना ॥ ४ ॥ जाणवेना मनीं निश्चयावांचूनी । निश्चयो श्रवणीं दास ह्मणे ॥ ५ ॥

॥ ५० ॥ देहबुद्धि बहु काळाची जुनाट । नवी आहे वाट सार्थकाची ॥ १ ॥ सार्थकाची वाट भ्रांतीनें लोपली । जवळी चुकली असोनियां ॥ २ ॥ असोनियां देव जवळी चुकला । प्राणी भांबावला मायाजाळें ॥ ३ ॥ मायाजाळ दृश्य तुटे एकसरें । जरी मनीं धरे स्वस्वरूप ॥ ४ ॥ स्वरूपनिश्चयें समाधान होय । रामदासीं सोय स्वरूपाची ॥ ५ ॥

॥ ५१ ॥ बहुकाळ गेले देवासी धुंडितां । देव पाहों जातां जवळीच ॥ १ ॥ जवळीच असे पाहतां न दिसे । सन्निधचि असे रात्रंदिवस ॥ २ ॥ रात्रंदिवस देव सबाह्याभ्यंतरीं । जीवा क्षणभरी विसंबेना ॥ ३ ॥ विसंबेना परी जीव हे नेणती । जाती अधोगती ह्मणोनीयां ॥ ४ ॥ ह्मणोनियां सदा सावध असावें । विन्मुख नसावें राघवासी ॥ ५ ॥ राम पूर्वपुण्यें झालिया सन्मुख । मग तो विन्मुख होऊं नेणे ॥ ६ हांऊं नेदी राम सर्वांगीं सुंदर । नित्य निरंतर मागें पुढें ॥ ७ ॥ मागें आणि पुढें सन्मुख चहूंकडे । भेटी हे निवाडे राघवाची ॥ ८ ॥ राघवाची भेटी झाल्या नाहीं तुटी । मग कल्पकोटी चिरंजीव ॥ ९ ॥ चिरंजीव होय राघवीं मिळतां । जेथें पाहों जातां मृत्यु नाहीं ॥ १० ॥ नाहीं जन्म मृत्यु नाहीं येणें जाणें । स्वरूपीं राहणें सर्वकाळ ॥ ११ ॥ सर्वकाळ मन तदाकार होय । जरि राहे सोय श्रवणाची ॥ १२ ॥ श्रवणाची सोय संताचेनि संगें । विचारेंचि भंगे अहंभाव ॥ १३ ॥ अहंभावें राम भेटला नवजाय । जवळचि होय दुरी कैसा ॥ १४ ॥ दुरि कैसा होय अहंभावें

---

१ तर. २ देहाभिमान. ३ जवळ. ४ आंतबाहेर. ५ परब्रह्मस्वरूपीं. ६ मीपणा.

करी । जवळीच चोरी आपणासी ॥ १५ ॥ आपणासी चोरी सबाह्य अंतरीं । आणि सृष्टिभरी नांदतसे ॥ १६ ॥ नांदतसे अंत नाहीं तो अनंत । जाणतील संत अनुभवी ॥ १७ ॥ अनुभवी जाणे तेथींचिये खुणे । येर विटंबणें वादवील ॥ १८ ॥ वादवील सुख संतसज्जनासी । रामीं रामदासीं भेटी झाली ॥ १९ ॥

॥ ५२ ॥ योगीयांचा देव मज सांपडला । थोर लाभ झाला एकाएकीं ॥ १ ॥ एकाएकीं देव त्रैलोक्यनायक । देखिला सन्मुख चहूंकडे ॥ २ ॥ चहूंकडे देव नित्यनिरंतर । व्यापूनि अंतर समागमें ॥ ३ ॥ समागम मज रामाचा जोडला । वियोग हा केला देशधडी ॥ ४ ॥ देशधडी केला विवेकें वियोग । रामदासीं योग सर्व काळ ॥ ५ ॥

॥ ५३ ॥ जेथें जावें तेथें राम समागमीं । आतां कासया मीं खंती करूं ॥ १ ॥ खंती करूं ज्याची तो समागमेंची । पाहतां सुखाची घडी होय ॥ २ ॥ अहो देव खरा भूमंडळवासी । जातां दिगंतासी सारिखाची ॥ ३ ॥ सारिखाचि जनीं वनीं वनांतरीं । तो गिरिकंदरीं[१] सारिखाची ॥ ४ ॥ सारिखाचि देव कदा पालटेना । राहे त्रिभुवना व्यापुनीयां ॥ ५ ॥ व्यापुनीयां दासा सन्निधची[२] वसे । विचार विलसे रामदासीं ॥ ६ ॥

॥ ५४ ॥ रामेंविण देश तोचि तो विदेश । विदेशाचा देश राम करी ॥ १ ॥ राम भेटे ज्यासी तो नव्हे विदेशी । सर्व देश त्यासी आपुलेची ॥ २ ॥ आपुलेची देश या रामाकारितां । होय सार्थकता जेथें तेथें ॥ ३ ॥ जेथें तेथें राम देखतां विश्राम । संसारींचा श्रम[३] आठवेना ॥ ४ ॥ आठवेना तेंथ आठव विसर । दास निरंतर जैसा तैसा ॥ ५ ॥

॥ ५५ ॥ कल्पनेचा प्रांत तो माझा एकांत । तेथें मी निवांत बैसवीन ॥ १ ॥ बैसवीन सुखरूप क्षण एक । पाहेन विवेक राघवाचा ॥ २ ॥ राघवाचा पार अनंत अपार । नाहीं पारावार स्वरूपासी ॥ ३ ॥ स्वरूप रामाचें अत्यंत कोमळ । जेथें नाहीं मळ मायिकाचा ॥४॥ मायिकाचा मळ जाय ततक्षणें । रामाचे दर्शनें दास म्हणे ॥ ५ ॥

॥ ५६ ॥ विश्रांतीचें स्थळ स्वरूप केवळ । द्वैत तळमळ जेथें नाहीं ॥ १ ॥ जेथें नाहीं काया नाहीं मोहमाया । रंक आणि राया सारिखाची ॥ २ ॥ सारिखेंचि सदा सर्वदा स्वरूप । तेंचि तुझें रूप जाण बापा ॥ ३ ॥ जाण बापा स्वयें तूंचि आपणासि । सोहंस्मरणासी विसरतां ॥ ४ ॥ विसरतां सोहं स्मरण आपुलें । मन गुंडाळलें मायाजाळीं ॥ ५ ॥ मायाजाळीं तुझा तूंच गुंतलासी । यातना भोगिसी म्हणूनियां ॥ ६ ॥ म्हणुनीयां होई सावध अंतरीं । सोहं दृढ धरी दास म्हणे ॥ ७ ॥

॥ ५७ ॥ स्वरूपाची भेटी तेथें नाहीं तुटी । वायांचि हिंपुटी होत आशा ॥ १ ॥ होतसां हिंपुटी नसतां वियोग । असतां संयोग सर्वकाळ ॥ २ ॥ सर्वकाळ ऐक्यस्वरूपीं आलिंगन । जेथें मीतूंपण हारपलें ॥ ३ ॥ हारपलें दुःख द्वैताचें पाहतां । सुखरूप आतां समाधान ॥ ४ ॥ समाधान चळे ऐसें न करावें । विवेकें भरावें स्वस्वरूपीं ॥ ५ ॥ स्वस्वरूपीं नाहीं संयोग वियोग । सर्वकाळ योग सज्जनाचा ॥ ६ ॥ सज्जनाचा योग सर्वकाळ आहे । विचारूनि पाहे अनुभवें ॥ ७ ॥ अनुभवें झाली आह्मां तुह्मां भेटी । तुटीविणें भेटी दास म्हणे ॥ ८ ॥

---

१ पर्वतांच्या गुहामध्यें. २ जवळच. ३ कष्टी.

॥ ५८ ॥ तुह्मां आह्मां मुळीं झाली नाहीं भेटी । तुटीविण भेटी इच्छितसां ॥ १ ॥ इच्छितसां योग नसतां वियोग । तुह्मां आह्मां योग सर्वकाळ ॥ २ ॥ सर्वकाळ तुह्मी आह्मी एकस्थळीं । वायां मृगजळीं बुडूं नका ॥ ३ ॥ बुडूं नये आतां सावध असावें । रूप ओळखावें जवळीच ॥ ४ ॥ जवळीच आहे नका धरूं दूरी । बाह्य अभ्यंतरीं असोनियां ॥ ५ ॥असोनि सन्निध वियोगाचा खेद । नसोनियां भेद लावूं नये ॥ ६ ॥ लावूं नये भेद मायिक संबंधीं । रामदासीं बुद्धि भेटी झाली ॥ ७ ॥

॥ ५९ ॥ नमन लंबोदरा शारदा सुंदरा । सद्गुरुमाहेरा संतजना ॥ १ ॥ संतसंग करी निःसंग होईजे । स्वरूप पाविजे आपुलेंची ॥ २ ॥ आपुलें स्वरूप आपणा नेणवे । तयासि जाणवे राम केवीं ॥ ३ ॥ राम केवीं कळे नाकळे वेदांसी । संगें तयापाशीं पाविजेना ॥ ४ ॥ पाविजेना जंव हा देहसंबंधू । राघवाचा बोधू देहातीत ॥ ५ ॥ देहातीत संत जाणती अनंत । प्रकृतीचा प्रांत निजानंद ॥ ६ ॥ निजानंद पूर्वपक्षाचें बोलणें । सिद्धांतासि उणें आणविलें ॥ ७ ॥ आणविलें उणें शब्दसमुद्रासी । निःशब्द ते ग्रासी मौन्यमुद्रा ॥ ८ ॥ मौन्यमुद्रा ध्यान आणिती समाधी । अविद्या उपाधी मावळली ॥ ९ ॥ मावळली सर्व दासाची आशंका । ज्ञान विनायका देखतांची ॥ १० ॥

॥ ६० ॥ प्रथम ते नमूं संत साधुजन । जयां आत्मज्ञान प्रांजळीत ॥ १ ॥ प्रांजळीत ज्ञान आत्मनिवेदन । हेंचि समाधान योगियांचें ॥ २ ॥ योगियांचें गुज तेंचि सर्व बीज । एकाचि सहज आदि अंत ॥ ३ ॥ आदि अंत सदा निर्मळ निश्चळ । जैसें तें केवळ चिदाकाश ॥४॥ चिदाकाश बाह्य अंतरीं कोंदलें । तैसें तें एकलें स्वस्वरूप ॥ ५ ॥ स्वस्वरूपीं मिथ्या मायेचें पडळ । जैसें तें आभाळ नाथिलेंची ॥ ६ ॥ नाथिलेंचि दिसे साचाचिये परी । ऐसी बाजिगिरी सत्य वाटे ॥ ७ ॥ सत्य वाटे स्वप्न जैसें निजलिया । तेंचि चेवलिया मिथ्याभूत ॥ ८ ॥ मिथ्याभूत माया साच तो ईश्वर । श्रोतीं हा विचार विवरावा ॥ ९ ॥ विवरावा ऐसें रामदास ह्मणे । सद्गुरुवचनें चोजविलें ॥ १० ॥

॥ ६१ ॥ प्रथम नमन संत साधूजना । संवादाचे ज्ञाना बोलावया ॥ १ ॥ बोलावया सार वस्तूचा विचार । जेणें निरंतर सुख वाटे ॥ २ ॥ सुख वाटे मनीं संवाद सज्जनीं । तेणें ध्यानीं मनीं स्वस्वरूप ॥ ३ ॥ स्वस्वरूप मना कदा आकळेना । सुलभ सज्जनाचेनि संगें ॥ ४ ॥ संगें साधूचिया समाधान झालें । स्वस्वरूप लाधलें रामदासीं ॥ ५ ॥

॥ ६२ ॥ सरस्वती विद्या लक्षुमी अविद्या । दोहीं अतीत आद्याचें स्वरूप ॥ १ ॥ स्वरूपीं लक्षुमी नाहीं सरस्वती । संपत्ति विपत्ति दोनी नाहीं ॥ २ ॥ नाहीं शिव शक्ति नाहीं नर नारी । अंतरीं विचारी दास ह्मणे ॥ ३ ॥

॥ ६३ ॥ आमुचे सजन संत साधुजन । होय समाधान तयांचेनि ॥ १ ॥ तयांचेनि संगें पाविजे विश्रांती । साधु आदि अंतीं सारखेची ॥ २ ॥ सारखेची सदा संत समाधानी । ह्मणोनिया मनीं आवडती ॥ ३ ॥ आवडती सदा संत जिवलग । सुखरूप संग सज्जनांचा ॥ ४ ॥ सज्जनांचा संग पाप तें संहारी । ह्मणोनियां धरी रामदास ॥ ५ ॥

---

१ गणपतीला. २ अज्ञान. ३ उपसर्ग, संबंध. ४ आंतबाहेर. ५ पडदा. ६ नाश करतो.

॥ ६४ ॥ संतसंगें जन्म चुकती यातना । आणि जनार्दना भेटी होय ॥ १ ॥ भेटी होय संतसंगें राघवाची । आणिक भवाची शांति होय ॥ २ ॥ शांति होय काळ शांति होय वेळ । मन हें निर्मळ जरी राहे ॥ ३ ॥ जरी राहे भाव राघवीं सर्वदा । संसार आपदा तया नाहीं ॥ ४ ॥ तया नाहीं दुःख तया नाहीं शोक । दास ह्मणे एक राम ध्यातां ॥ ५ ॥

॥ ६५ ॥ संतसंगें तूज काय प्राप्त झालें । सांग पां वहिलें मजपाशीं ॥ १ ॥ मजपाशीं सांग कोण मंत्र तुज । काय आहे गुज अंतरींचें ॥ २ ॥ अंतरींचें गुज काय समाधान । मंत्र जप ध्यान कैसें आहे ॥ ३ ॥ कैसें आवाहन कैसें विसर्जन । कैसें पिंडज्ञान सांगें मज ॥ ४ ॥ सांगें मज आतां काय उपासनें । मुद्रा ते आसनें सांग आतां ॥ ५ ॥ सांग पंचीकरण चित्तचतुष्टय । कैसे ते अद्वय जीव शिव ॥ ६ ॥ जीवशिव ऐक्य झालें कोणे रीतीं । सांग मजप्रती अष्ट देह ॥ ७ ॥ अष्ट देह पिंडब्रह्मांडरचना । तत्वविवंचना सांग मज ॥ ८ ॥ सांग मज भक्ति कैसी ती विरक्ती । सायुज्यतामुक्ती ते कवण ॥ ९ ॥ कोणतें साधन कोणाचें भजन । ऐसे केले प्रश्न रामदासा ॥ १० ॥

॥ ६६ ॥ संतसंगें मज काय प्राप्त झालें । सांगतों वहिलें तुजपाशीं ॥ १ ॥ मंत्र हा तारक रामनाम एक । गुज हरादिक चिंतिताती ॥ २ ॥ ज्ञानें समाधान सगुणाचें ध्यान । निर्गुण अभिन्न आपणचि ॥ ३ ॥ दृश्य आवाहन दृश्य विसर्जन । तेथें पिंडदान आढळेना ॥ ४ ॥ उपासना हरि मुद्रा अगोचरी । सिद्धासनावरी समाधान ॥ ५ ॥ पंचीकरणें पिंडब्रह्मांड आवरण साक्ष तो आपण एकलाचि ॥ ६ ॥ जीवशिवऐक्य झालें येणें रीतीं । प्रकृतीचे प्रांतीं द्वैत कैचें ॥ ७ ॥ अष्ट देह स्थूळ सूक्ष्म कारण । चौथा महाकारण जाणिजे हा ॥ ८ ॥ विराट हिरण्य आणि अव्याकृत । आठवी प्रकृती मूळमाया ॥ ९ ॥ एक तत्त्व जाणे त्याचें नांव भक्ती । जाणावी विरक्ती संगत्याग ॥ १० ॥ सायुज्यता मुक्ति तेचि ते अचळ । साधनाचें फळ गुरुदास्य ॥ ११ ॥ गुरुदास्यें चुके संसारयातना । अनुभवें खुणा जाणतील ॥ १२ ॥ अनुभवेंवीण होय सर्व शीण । निरसले प्रश्न दास ह्मणे ॥ १३ ॥

॥ ६७ ॥ रिसाचिये परी व्हावें एकचित्त । ध्यानीं भगवंत सोडूं नये ॥ १ ॥ सोडूं नये सर्वकाळ निजध्यास । श्रवण अभ्यास असों द्यावा ॥ २ ॥ असों द्यावा सदा सन्निध विवेक । तेणें देव एक चोजवेल ॥ ३ ॥ चोजवेल देव श्रवणें मननें । कुबुद्धि साधनें पालटावी ॥ ४ ॥ पालटावी सर्व हेंचि हे अहंता । शोधावी तत्त्वतां देहबुद्धि ॥ ५ ॥ देहबुद्धी सर्व ज्ञानें शोधूं जातां । निःसंग अनंता भेटी होय ॥ ६ ॥ भेटी होय ज्ञानें निर्गुण देवाची । मग नाहीं छीछी संसाराची ॥ ७ ॥ संसाराची छीछी यातना यमाची । चुकवील तोचि धन्य एक ॥ ८ ॥ धन्य एक जनीं तोचि तो पाहातां । मुक्ति सायुज्यता जया लाभे ॥ ९ ॥ जया लाभे मुक्ति सगुणाची भक्ती । दास ह्मणे शक्ती आगळा तो ॥ १० ॥

॥ ६८ ॥ तुह्मी आह्मी करूं देवाचा निश्चय । जया नाहीं लय तोचि देव ॥ १ ॥ देव

---

१ संसाराची. २ तावडतोब. ३ शरीरज्ञान. ४ वैराग्य. ५ आस्वलाप्रमाणें. ६ नाश.

हा अमर नित्य निरंतर । व्यापुनी अंतर देव आहे ॥ २ ॥ देव आहे सदा सबाह्याभ्यंतरीं । जीवा क्षणभरी विसंबेना ॥ ३ ॥ विसंबेना परी जिवासी नेणवे । ह्मणउनी धांवे नानामतीं ॥ ४ ॥ नानामतीं देव पाहतां दिसेना । जंव तें वसेना ज्ञान देहीं ॥ ५ ॥ ज्ञान देहीं वसे तया देव दिसे । अंतरीं प्रकाशे ज्ञानदृष्टी ॥ ६ ॥ ज्ञानदृष्टी होतां पाविजे अनंता । हा शब्द तत्त्वतां दास ह्मणे ॥ ७ ॥

॥ ६९ ॥ ब्रह्म हें जाणावें निर्मळ निश्चळ । व्यापक पोकळ व्योमाकारें ॥ १ ॥ व्योमाकार ब्रह्म बोलताती श्रुती । पाहों जातां मती तदाकार ॥ २ ॥ तदाकार मनी श्रवणें होईल । संदेह जाईल अंतरींचा ॥ ३ ॥ अंतरींचा भाव निर्मळीं लागतां । होईजे तत्त्वतां निर्मळची ॥ ४ ॥ निर्मळचि होणें निर्मळाचे गुणें । श्रवणमननें दास ह्मणे ॥ ५ ॥

॥ ७० ॥ नमोजी अनंता तूंचि माता पिता । तुझी सर्व सत्ता तूंचि एक ॥ १ ॥ तूंचि एक ऐसा निश्चय मानसीं । झालिया मुक्तीसी काय उणें ॥ २ ॥ काय उणें मुक्ती जया तुझी भक्ती । संसारीं विरक्ती सर्व काळ ॥ ३ ॥ सर्वकाळ जया श्रवणीं आवडी । साधका तांतडी तुझी देवा ॥ ४ ॥ तुझी देवा चाड त्यासि नाम गोड । पुरे सर्व कोड दास ह्मणे ॥ ५ ॥

॥ ७१ ॥ जोडलासि बापा धरिलासी भावें । आतां तुज जीवें विसंबेना ॥ १ ॥ विसंबेना देवा नित्य निरंतर । भेलिया विसर पडों नेदी ॥ २ ॥ पडों नेदी वाचा रामनामाविण । देव हा सगुण रामदासीं ॥ ३ ॥

॥ ७२ ॥ ओवीचेनी मिसें देव आठवावा । हृदयीं धरावा सर्वकाळ ॥ १ ॥ सर्वकाळ मनीं स्वरूपाचा छंद । तेणें भवकंद तूटतील ॥ २ ॥ तुटेल ती व्याधि या जन्मकर्माची । जरी राघवाची भक्ति घडे ॥ ३ ॥ भक्ति घडे भावें सगुणा देवाची । संगति देवाची जंव आहे ॥ ४ ॥ आहे देव तंव सगुणीं भजावें । स्वस्वरूपीं व्हावें आपणची ॥ ५ ॥ आपणचि देव आपणचि भक्त । संतसंगें मुक्त आपणची ॥ ६ ॥ आपणचि सर्व आपणाचि वाव । मीपणाचा ठाव आपणची ॥ ७ ॥ आपण तूरण जयाचे अंतरीं । तंव भक्ती करी सगुणाची ॥ ८ ॥ सगुणाची भक्ति लोभाची विरक्ती । निर्गुणाची भक्ति सायुज्यता ॥ ९ ॥ सायुज्यता मुक्ति फिटला संदेहो । बंधनचि वावो रामदासीं ॥ १० ॥

॥ ७३ ॥ ओविचेनि मिसें स्वरूपासि जावें । सत्वर पावावें समाधान ॥ १ ॥ समाधान नाहीं स्वरूपावांचोनी । ह्मणोनियां मनीं तेंचि असो ॥ २ ॥ तेंचि असो रूप निर्गुण रामाचें । सुख विश्रामाचें समाधानीं ॥ ३ ॥ समाधानी योगी तो हें सुख भोगी । मनीं वीतरागी याचि सुखें ॥ ४ ॥ याचि सुखें नर जो नाहीं निवाला । तोचि आहाळला दुःखशोकें ॥ ५ ॥ दुःख शोक नाहीं राम आठवीतां । अमृत सेवितां मृत्यु नाहीं ॥ ६ ॥ नाहीं जन्ममृत्यु अभेद भक्तासी । रामीं रामदासीं अनुभव ॥ ७ ॥

॥ ७४ ॥ सगुण हा देव धरावा निश्चित । तरी नाशवंत विश्व बोले ॥ १ ॥ विश्व बोले एका भजावें निर्गुणा । परी लक्षवेना काय कीजे ॥ २ ॥ काय कीजे आतां निर्गुण दिसेना । स-

---

१ आंत बाहेर. २ आकाशासारखें. ३ वेद. ४ वैराग्यशील. ५ पोळून भाजून गेला; ६ सर्व लोक.

गुण असेना सर्वकाळ ॥ ३ ॥ सर्वकाळ गेला संदेहीं पडतां । कोणे वेळे आतां मोक्ष लाभे ॥ ४ ॥ मोक्ष लाभे एका सद्गुरूपासून । आत्मनिवेदन रामदासीं ॥ ५ ॥

॥ ७५ ॥ जें पंचभूतिक तें सर्व मायिक । बोलती विवेक संतजन ॥ १ ॥ संतजनीं सर्व मायिक बोलावें । तरी कां फिरावें तीर्थाटणा ॥ २ ॥ तीर्थाटणें देव मायिकाचे पोटीं । तरी आटाआटी कां करावी ॥ ३ ॥ कां करावी पूजा सांडूनि परमात्मा । मूर्खस्य प्रतिमा हें वचन ॥ ४ ॥ हें वचन मिथ्या कैसें हो करावें । काय हो धरावें आतां आह्मीं ॥ ५ ॥ आतां आह्मीं वाक्य मिथ्या ह्मणों नये । देवधर्म काये मोकलावा ॥ ६ ॥ मोकलावा देव ऐसें ह्मणों नये । तरी वाक्य काये मिथ्या आहे ॥ ७ ॥ मिथ्या नव्हे वाक्य मिथ्या नव्हे देव । पडिला संदेह काय कीजे ॥ ८ ॥ कीजे दृढ भाव सगुण देवासी । जंव कल्पनेसी उरी आहे ॥ ९ ॥ कल्पनेचें रूप विवेकें विरालें । मग सर्व झालें गंगाजळ ॥ १० ॥ गंगाजळ झालें निर्विकल्प केलें । सगुण राहिलें सहजचि ॥ ११ ॥ सहजचि कीजे उपाधी न कीजे । एकांतीं बोलिजे गुरुगम्य ॥ १२ ॥ गुरुगम्य आहे कल्पनेवेगळें । कल्पनेच्या मुळें वाद उठे ॥ १३ ॥ वाद उठे जनीं ऐसें न करावें । त्रिकाळ भजावें वेदवाक्य ॥ १४ ॥ वेदवाक्य बोले कर्म उपासना । अंतीं शुद्ध ज्ञाना बोलियेला ॥ १५ ॥ बोलियेला पूर्वपक्ष तो सिद्धांत । केला निश्चयार्थ संतजनीं ॥ १६ ॥ संतजनीं दृढ विश्वास धरावा । मग विसरावा संदेह तो ॥ १७ ॥ संदेह धरिते कल्पना आपुली । निर्विकल्प केली साधुजनीं ॥ १८ ॥ साधुजनीं केला निश्चयो धरावा । तेथें अहंभावा उरी नाहीं ॥१९॥ उरी नाहीं संतसंगें संदेहासी । रामीं रामदासीं निःसंदेह॥२०॥

॥ ७६ ॥ दृश्यहि दिसेना अंधासि पाहातां । परी तया ज्ञाता ह्मणों नये ॥ १ ॥ ह्मणों नये तैसें अज्ञाना विज्ञानें । पूर्ण समाधान वेगळेंची ॥ २ ॥ वेगळेंचि कळे क्षीर नीर हंसा । दास ह्मणे तैसा अनुभव ॥ ३ ॥

॥ ७७ ॥ ज्ञानाचें लक्षण क्रियासंरक्षण । वरी विशेषण रामनाम ॥ १ ॥ रामनाम वाचे विवेक अंतरीं । अनुताप वरी त्यागावया ॥ २ ॥ त्यागावया भोग बाह्य लोलंगता । पाविजे तत्त्वतां अनुतापें ॥ ३ ॥ अनुतापें त्याग बाह्यात्कारीं झाला । विवेकानें केला अंतरींचा ॥ ४ ॥ अंतरींचा त्याग विवेकीं करावा । बाह्य तो धरावा अनुतापें ॥ ५ ॥ अनुतापें भक्ति विवेक वैराग्य । घडे त्याचें भाग्य काय सांगों ॥ ६ ॥ काय सांगों भाग्य अचळ चळेना । महिमा कळेना ब्रह्मादिकां ॥ ७ ॥ ब्रह्मादिकां लाभ ज्ञानाचा दुर्लभ । तो होय सुलभ साधुसंगें ॥ ८ ॥ साधुसंगें साधु होईजे आपण । सांगतसे खूण रामदास ॥ ९ ॥

॥ ७८ ॥ मुक्तपणें रामनामाचा अव्हेरु । करी तो गव्हारु मुक्त नव्हे ॥ १ ॥ मुक्त नव्हे काय स्वयें शूलपाणी । रामनाम वाणी उच्चारितो ॥ २ ॥ उच्चारितो शिव तेथें किती जीव । बापुडे मानव देहधारी ॥ ३ ॥ देहधारी नर धन्य तो साचार । वाचे निरंतर रामनाम ॥ ४ ॥ रामनाम वाचे रूप अभ्यंतरीं । धन्य तो संसारीं दास ह्मणे ॥ ५ ॥

---

देहसमर्पण. २ टाकावा, सांडावा. ३ संशय. ४ अनुभवयुक्त ज्ञान. ५ अप्रयोजक मनुष्य. ६ शंकर.

॥ ७९ ॥ नाम घेतां रामरूप ठायीं पडे । गूज तें सांपडे योगियांचें ॥ १ ॥ योगियांचें गुज सर्वांठायीं असे । परी तें न दिसे ज्ञानाविण ॥ २ ॥ ज्ञानाविण योग ज्ञानाविण भोग । ज्ञानाविण त्याग वाउगाची ॥ ३ ॥ वाउगाचि धर्म वाउगेंचि कर्म । गर्भगीता वर्म बोलियेली ॥ ४ ॥ बोलियेली वर्म ज्ञान हें सार्थक । येर निरर्थक सर्व धर्म ॥ ५ ॥ सर्व धर्म त्यागी मज शरण येई । अष्टादशाध्यायीं बोलियेलें ॥ ६ ॥ बोलियेलें ज्ञान आगमानिगमीं । ज्ञानेंविण ऊर्मी निरसेना ॥ ७ ॥ निरसेना ऊर्मी आत्मज्ञानेंविण । ज्ञानाचें लक्षण निरूपणें ॥ ८ ॥ निरूपणें ज्ञान अंतरीं प्रकाशे । विवेकें निरसे मायाजाळ ॥ ९ ॥ मायाजाळीं जन आत्मज्ञानी झाले । दास ह्मणे गेले सुटोनियां ॥ १० ॥

॥ ८० ॥ नानारंग शेखीं होताती वोरंग[२] । सर्वदा सुरंग रामरंग ॥ १ ॥ रामरंगें कदाकाळीं वोरंगेना । तेथें राहें मना रंगोनीयां ॥२॥ रंगोनीया राहे तद्रूप होवोनी । मग वनीं जनीं समाधान ॥ ३ ॥ समाधान घडे राघवीं मिळतां । मग दुर्मिळता कदा नाहीं ॥ ४ ॥ कदा नाहीं खेद सर्वहि आनंद । सुखाचा संवाद संतसंगें ॥ ५ ॥ संतसंगें जन्म सार्थक होईल । राम सांपडेल जवळीच ॥ ६ ॥ जवळीच राम असोनि चुकलों । थोर भांबावलों मायिकासी ॥ ७॥ मायिकासी प्राणी सत्यचि मानिती । सत्य ते नेणती जाणपणें ॥ ८ ॥ जाणपणें मनीं अज्ञान थारलें । तेंचि विस्तारलें ज्ञानरूपें ॥ ९ ॥ ज्ञानरूपें भ्रांती समावली चित्तीं । संशयनिवृत्ति[३] नव्हे तेणें ॥ १० ॥ नव्हे तेणें रूप ठाउकें रामाचें । जें कां विश्रामाचें माहियेर ॥ ११ ॥ माहेयेरें घडे संशयनिवृत्ती । रामसीतापतीचेनि नामें ॥ १२ ॥ रामनामें रूप सर्वहि निरसे । जो कोणी विश्वासे रामनामीं ॥ १३ ॥ रामनामीं चित्त ठेवूनि असावें । दुश्चित नसावें सर्वकाळ ॥ १४ ॥ सर्वकाळ गेला सार्थकीं जयाचा । धन्य तो देवाचा दास ह्मणे ॥ १५ ॥

॥ ८१ ॥ दर्पणीं[४] पाहातां दिसे सर्व अंग । परी पृष्ठीभाग आढळेना ॥ १ ॥ आपुलीच पाठी आपणा न दिसे । ऐसें बोलतसे सर्व जन ॥ २ ॥ आपशुद्धि नेणे त्या काय करावें । ह्मणोनि जाणावें आपणासी ॥ ३ ॥ आपणासी जाणें संतांचे संगतीं । जया अधोगती[५] जन्म नाहीं ॥ ४ ॥ जन्म नाहीं मृत्यु नाहीं येणें जाणें । स्वरूपीं राहणें दास ह्मणे ॥ ५ ॥

॥ ८२ ॥ भयानक स्वप्न जया वाटे भयें । तेणें निजों नये सर्वकाळ ॥ १ ॥ सर्वकाळ जागा विवेकसंगतीं । तयासी कल्पांती भय नाहीं ॥ २ ॥ भय उठे देहीं तूं तंव विदेहीं । देहातीत पाहीं आपणासी ॥ ३ ॥ आपणा नेणतां वाटे नाना चिंता । ह्मणोनि दुश्चिता राहूं नये ॥ ४ ॥ राहूं नय कदा या देहसंबंधीं । मनीं धरी शुद्धी स्वरूपाची ॥ ५ ॥ स्वरूपाची शुद्धि जया ठाईं पडे । तया नरा घडे समाधान ॥ ६ ॥ समाधान घडे देवा आठवितां । रामदासीं चिंता दूर ठेली ॥ ७ ॥

॥ ८३ ॥ जंव आहे तुज हा देहसंबंध । तंव नव्हे बोध राघवाचा ॥ १ ॥ राघवाचा बोध या देहावेगळा । देहकळवळा तेथें नाहीं ॥ २ ॥ नाहीं सुख दुःख नाहीं येणें जाणें । चिरंजीव होणें रामरूपीं ॥ ३ ॥ रामरूपीं होय जन्म मृत्यु वाव । विश्रांतीचा ठाव राम एक ॥ ४ ॥

---

१ धर्मशास्त्र व वेद यांमध्यें. २ बेरंग. ३ संशयनिरसन. ४ आरशांत. ५ नरकवास.

राम एकरूपीं सर्वरूपीं आहे। अनुभवी पाहे आपुलिया ॥ ५ ॥ आपुल्या अंतरीं बाह्य निरंतरीं। सर्वसृष्टिभरी नांदतसे ॥ ६ ॥ नांदतसे सदा जवळी कळेना। कदा आकळेना साधूविण ॥ ७ ॥ साधूविण राम धांडोळितां श्रम। नव्हेचि विश्राम साधूविणें ॥ ८ ॥ साधूविणें राम कदा आकळेना। संदेह तुटेना कांहीं केल्या ॥ ९ ॥ कांहीं केल्या नव्हे साधुसंतांविण। रामदासी खूण सांगततसें ॥ १० ॥

॥ ८४ ॥ लागतसे मुळीं हा देहसंबंधु। करितसे खेदु अहंभावें ॥ १ ॥ अहंभावें कदा नये पुरवला। भवभ्रम झाला दुःखराशी ॥ २ ॥ दुःखराशी झाल्या देहाचे संबंधें। सर्व ज्ञानबोधें तुटतील ॥ ३ ॥ तुटती संबंध संतांचे राहाणीं। होईल झाडणी पंचभूतां ॥ ४ ॥ पंचभूतां लयो स्वरूपअन्वयो। तुटला संशयो संबंधाचा ॥ ५ ॥

॥ ८५ ॥ पाहातां दिसेना तेंचि बरें पाहें। तेथें रूप आहे राघवाचें ॥ १ ॥ राघवाचें रूप जाणावें अरूप। शुद्ध तत्स्वरूप निराकार ॥ २ ॥ निराकार राम देखतां विश्राम विभ्रांम। दुरीं ठाके श्रम संसारींचा ॥३॥ संसारींचा श्रम राघवीं असेना। मरि तो दिसेना राम डोळां ॥ ४ ॥ राम डोळां आहे अनुभवें पाहें। मीपण न साहे रामरूपीं ॥ ५ ॥ रामरूपीं नाम रूप दोनी नाहीं। तेथें मना राहीं सर्वकाळ ॥ ६ ॥ सर्वकाळ रामदर्शन होतसे। निर्गुणीं विश्वासे मन माझें ॥ ७ ॥ मन माझें रामस्वरूपीं संचरे। तेणें देहीं भरे विदेहता ॥ ८ ॥ विदेहता देहीं अलक्ष लक्षावें। निःशब्दा बोलावें संतसंगें ॥ ९ ॥ संतसंगें घडे निःसंगाचा संग। राघवीं संयोग रामदासीं ॥ १० ॥

॥ ८६ ॥ ओळखतां ज्ञान ओळखी मोडली। भेटी हे जोडली आपणासी ॥१॥ आपणासी भेटी झाली बहुतां दिसा। तुटला वळसा मीपणाचा ॥ २ ॥ मीपणाचा भाव भावें केला वाव दास ह्मणे देव प्रगटला ॥ ३ ॥

॥ ८७ ॥ प्रगटला देव जयाचे अंतरीं। तया नाहीं उरी मीपणाची ॥ १ ॥ मीपणाची उरी तूंपणा भेटतां। आपणा पहातां वाव झाली ॥ २ ॥ वाव झाली देव देखतां दाटणी। दास ह्मणे वाणी वेडावली ॥ ३ ॥

॥ ८८ ॥ वेडावली वाणी देवचि बोलतां। देव बोलूं जातां अनिर्वाच्य ॥ १ ॥ अनिर्वाच्य देव वाचा बोलूं गेली। जिव्हाहि चिरली भूधराची[3] ॥ २ ॥ भूधराची जिव्हा झालीसे कुंठित। दास ह्मणे अंत अनंताचा ॥ ३ ॥

॥ ८९ ॥ नित्य निरंतर सर्वांचे अंतरीं। तोचि निराकारी बोलिजेतो ॥ १ ॥ बोलिजेतो संत महंत जाणती। खुणेसि बाणती विवंचितां ॥ २ ॥ विवंचितां रामनासांचे होईजे। ये गोष्टीची कीजे विचारणा ॥ ३ ॥ विचारणा सार विचारें उद्धार। साधु योगेश्वर विचारेंचि ॥ ४ ॥ विचारेंचि जनीं होतसे सार्थक। धन्य हा विवेक दास ह्मणे ॥ ५ ॥

॥ ९० ॥ करीं घेतां नये टाकितां न जाये। तैसें रूप आहे राघवाचें ॥ १ ॥ राघवाचें

१ विश्रांति. २ स्थिति, असणें. ३ शेषाची.

रूप पाहतां न दिसे । डोळां भरलेंसे सर्वकाळ ॥ २ ॥ सर्वकाळ भेटी कदा नाहीं तुटी । रामदासीं लुटी स्वरूपाची ॥ ३ ॥

॥ ९१ ॥ तत्त्वमसि जाण अहंब्रह्म ऐसें । जाण हें विश्वासें महावाक्यें ॥ १ ॥ अहं आत्मा ब्रह्म आणि ब्रह्मज्ञान । दास ह्मणे वर्म वेदवाक्यें ॥ २ ॥ वेदवाक्यें रामीं रामदास पाहे । मुख्य पद लाहे निवेदनें ॥ ३ ॥

॥ ९२ ॥ तूंचि ब्रह्म ऐसें वेदाचें वचन । तेंचि संतजन दृढ करी ॥ १ ॥ दृढ करी साधु तूंचि ब्रह्म ऐसें । तरि कां विश्वासें धरिजेना ॥ २ ॥ धरिजेना मनीं साधूचें वचन । विदेही अमान्य कां करावा ॥ ३ ॥ कां करावा निश्चय स्वयें स्वरूपाचा । तिहीं प्रतीतीचा ऐक्यभाव ॥ ४ ॥ ऐक्यभावें जरि संतांचे वचनीं । तरी समाधानीं पाविजेल ॥ ५ ॥ पाविजेल निजस्वरूप आपुलें । जरी विश्वासलें मन तेथें ॥ ६ ॥ मनाचा विश्राम तोचि आत्माराम । रामदासीं वर्म संतसंगें ॥ ७ ॥

॥ ९३ ॥ गीताभागवतीं उपदेश केला । अर्जुना दाविला देव कृष्णें ॥ १ ॥ कृष्णें दाखविला देव तो वेगळा । बोलिजे आगळा सर्वांहूनी ॥ २ ॥ सर्वांहूनी सार देव तो सांचार । दास ह्मणे पार कल्पनेचा ॥ ३ ॥

॥ ९४ ॥ कल्पनेचा देव कल्पनेची पूजा । तेथें कोणी दुजा आढळेना ॥ १ ॥ आढळेना देव आढळेना भक्त । कल्पनेरहित काय आहे ॥ २ ॥ आहे तैसें आहे कल्पना न साहे । दास ह्मणे पाहें अनुभवें ॥ ३ ॥

॥ ९५ ॥ अनुभवें वाचे बोलिला न जाय । भाव नेणें काय भाऊं आतां ॥ १ ॥ भाऊं आतां देव कैसा निरावेव । ह्मणोनियां भाव सगुणासी ॥ २ ॥ सगुणासी भाव लावितां स्वभाव । पालटे अभाव दास ह्मणे ॥ ३ ॥

॥ ९६ ॥ भावनेचा देव भावार्थें भाविला । देवभक्त झाला भावनेचा ॥ १ ॥ भावनेचा देव भावनेचा भक्त । भावनेनें मुक्त भावीतसे ॥ २ ॥ भावीतसे मन त्याहूनि तें भिन्न । दास ह्मणे ज्ञान ओळखावें ॥ ३ ॥

॥ ९७ ॥ माझा स्वामी असे संकल्पापरता । शब्दीं काय आतां स्तुति करूं ॥ १ ॥ स्तुति करूं जातां अंतरला दुरी । मीतूंपणा उरी उरों नेदी ॥ २ ॥ उरों नेदी उरी स्वामिसेवापण । एकाकी आपण काय केलें ॥ ३ ॥ केलें संघटण कापुर अग्नीसी । जैसी भिन्नत्वासी उरी नाहीं ॥ ४ ॥ तैसा नाहीं उरी रामीं रामदासा । स्वयें होय ऐसा तोचि धन्य ॥ ५ ॥

॥ ९८ ॥ प्रवृत्ति सासुरें निवृत्ति माहेर । तेथें निरंतर मन माझें ॥ १ ॥ माझे मनीं सदा माहेर तुटेना । सासुर सुटेना काय करूं ॥ २ ॥ काय करूं मज लागला लौकिक । तेणें हा विवेक दुरी जाय ॥ ३ ॥ दुरी जाय हित मजचि देखतां । प्रयत्न करूं जातां होत नाहीं ॥ ४ ॥ होत नाहीं यत्न संतसंगाविण । रामदासीं खूण सांगतसे ॥ ५ ॥

---

१ तें ( ब्रह्म ) तूं आहेस. २ मि[illegible]त. ३ अनुभवाचा. ४ विशेष. ५ खरोखर. ६ अवयवविरहित.

॥ ९९ ॥ अर्थाविणें पाठ कासया करावें । व्यर्थचि मरावें घोकोनियां ॥ १ ॥ घोकोनियां काय वेगीं अर्थ पाहे । अर्थरूप राहें देखोनियां ॥ २ ॥ देखोनियां अर्थ सार्थक करावें । रामदास भावें सांगतसे ॥ ३ ॥

॥ १०० ॥ वस्तूचा निर्धार होय अपरंपार । साधनाचें सार निरूपण ॥ १ ॥ निरूपणा ऐसें सार नाहीं दुजें । जेणें सर्व बीजें हाता येती ॥२॥ हाता येती बीजें ज्ञानाचीं सहजें । निःसंदेह भोजें नाचतसे ॥ ३ ॥ नाचतसे सदा विवेक अंतरीं । मायामोहपूरीं बुडों नेदी ॥ ४ ॥ बुडों नेदी कदाकाळीं निरूपण । रामदासीं खूण संतसंगें ॥ ५ ॥

॥ १०१ ॥ निरूपण सार अद्वैत करावें । तेणें उद्धरावें निश्चयेंसी ॥ १ ॥ निश्चयेंसी पाहे आपुली वोळखी । तोचि एक सुखी जनांमध्यें ॥ २ ॥ जनामध्यें सुखी[1] परत्रसाधनें[2] । संसारबंधनें तया नाहीं ॥ ३ ॥ तया नाहीं देहबुद्धीची[3] अहंता । देहीं विदेहता वस्तुरूप ॥ ४ ॥ वस्तुरूप होय मीपण त्यागितां । शाश्वत भावितां दास मुक्त ॥ ५ ॥

॥ १०२ ॥ निरूपणें भक्ति निरूपणें ज्ञान । अनुताप पूर्ण निरूपणें ॥ १ ॥ निरूपणें योग योगाचा संयोग । निरूपणें त्याग घडतसे ॥ २ ॥ घडतसे सर्व कांहीं निरूपणें । बाणती लक्षणें सज्जनांचीं ॥ ३ ॥ सज्जनांचीं मतें सज्जन जाणती । येर ते नेणती जाणपणें ॥ ४ ॥ जाणत्या नेणत्या होय समाधान । करावें मनन दास ह्मणे ॥ ५ ॥

॥ १०३ ॥ पूर्ण समाधान होय निरूपणें । परी जाणपणें बुडविलें ॥ १ ॥ बुडविलें देहातीत समाधान । देह अभिमान वाढविला ॥ २ ॥ वाढविला तर्क वायां निरूपणीं । जाणावें पापिणी काय केलें ॥ ३ ॥ केलें काय ऐसें जाणत जाणतां । स्वरूपीं अहंता कामा नये ॥ ४ ॥ कामा नये देहबुद्धीचें जाणणें । दास निरूपणें सावधान ॥ ५ ॥

॥ १०४ ॥ गीतेचें लक्षण हेंचि हें प्रमाण । श्रवण मनन सर्वकाळ ॥ १ ॥ सर्वकाळ सारासारविचारणा । वस्तूची चाळणा निरंतर ॥ २ ॥ निरंतर ध्यास लागला अंतरीं । धारणाहि धरी निर्गुणाची ॥ ३ ॥ निर्गुणासंगतीं निर्गुण होईजे । प्रत्यावृत्ति[4] कीजे निरूपणें ॥ ४ ॥ निरूपणें होय अलभ्याचा लाभ । साधन सुलभ दास ह्मणे ॥ ५ ॥

॥ १०५ ॥ निरूपणाऐसें नाहीं समाधान । आणिक साधन आढळेना ॥ १ ॥ भक्ति ज्ञान घडे वैराग्य आतुडे । भावार्थ सांपडे निरूपणें ॥ २ ॥ शांति दया क्षमा नैराश्यता मनीं । आतुडे उन्मनी तेणें गुणें ॥ ३ ॥ रिद्धि सिद्धि दासी होती निरूपणें । श्रवण मननें निजध्यासें ॥ ४ ॥ भ्रांतीचा संदेह तुटे एकसरां । दास ह्मणे करा निरूपण ॥ ५ ॥

॥ १०६ ॥ निरूपणें निज लाभे सर्व कांहीं । दुजें ऐसें नाहीं पाहां जातां ॥ १ ॥ साराचेंहि सार मना अगोचर । तें लाभे साचार निरूपणें ॥ २ ॥ दाखवितां नये बोलिलें न जाय । त्याची कळे सोय निरूपणें ॥ ३ ॥ मनासी न कळे मीपणा नाढळे । तें गुज निवळे निरूपणें ॥ ४ ॥ व्युत्पत्तीचें कोडें तर्काचें सांकडें । तें जोडे रोकडें निरूपणें ॥ ५ ॥ मन हें चंचळ तें होय निश्चळ । साधनाचें फळ दास ह्मणे ॥ ६ ॥

---

१ सुखानें. २ परलोकींच्या साधनानें. ३ देहाभिमानाची. ४ निवारण.

॥ १०७ ॥ केलेंचि करावें पुन्हां निरूपण । तरी बाणे खूण कांहीं एक ॥ १ ॥ कांहीं एक काळ निरूपणें गेला । तोचि एक भला समाधानी ॥ २ ॥ समाधानी भला निरूपणीं राहे । पाहिलेंचि पाहे निरूपणें ॥ ३ ॥ निरूपणें पाहे श्रवण मनन । होय समाधान निजध्यास ॥ ४ ॥ निजध्यास निजवस्तूचा धरावा । संसार तरावा दास ह्मणे ॥ ५ ॥

॥ १०८ ॥ एकदां जेवितां नव्हे समाधान । प्रतिदिनीं अन्न खाणें लागे ॥ १ ॥ तैसें निरूपण केलेंचि करावें । परा न करावें उदासीन ॥ २ ॥ प्रतिदिनीं अन्न प्रत्यहीं जीवन । देहसंरक्षण करावया ॥ ३ ॥ प्रत्यहीं संसारीं बोलावें लागतें । कांहीं केलिया तें सुटेना कीं ॥ ४ ॥ प्रतिदिनीं देह पाळावा लागतो । शुद्ध करावा तो रात्रंदिवस ॥ ५ ॥ प्रत्यहीं देहानें भोगिलें भोगावें । त्यागिलें त्यागावें दास ह्मणे ॥ ६ ॥

॥ १०९ ॥ आपुल्या भोजनीं पोट हें भरेना । लागे उपार्जना दुसऱ्याची ॥ १ ॥ दुसऱ्याची सेवा करितां वेतन । पाविजे तें अन्न लोकांमध्यें ॥ २ ॥ लोकांमध्यें उपासितां देह दारा । मागावा मुशारा कोणापाशीं ॥ ३ ॥ कोणापाशीं काणें काय हें सांगावें । कैसेनि मागावें वेतनासी ॥ ४ ॥ वेतनासी जनीं तरीच पाविजे । जरी सेवा कीजे स्वामीयाची ॥ ५ ॥ स्वामीयाची सेवा करितां उत्पन्न । स्वामी तो प्रसन्न होत असे ॥ ६ ॥ होत असे देव संतुष्ट भजतां । मुक्ति सायुज्यता तेणें लाभे ॥ ७ ॥ लाभे नवविधा तेणें चतुर्विधा[२] । पुसावें सुबद्धा[३] सज्जनासी ॥ ८ ॥ सज्जनासी पूजा देहासी भजतां । भार भगवंता कैसा पडे ॥ ९ ॥ कैसा भार पडे देहाचे भजनें । भक्तीचेनि गुणें देव पावे ॥ १० ॥ देव पावतसे भजतां देवासी । सेवितां देहासी देव कैंचा ॥ ११ ॥ देव कैंचा देव सेविल्यावांचुनी । तत्त्वविवंचनीं दास ह्मणे ॥ १२ ॥

॥ ११० ॥ शौच केलें तेणें शुचिर्भूत झाला । जळस्नानें गेला मळ त्याचा ॥ १ ॥ मळत्यागें झालें शरीर निर्मळ । अंतरींचा माळ कैसा जातो ॥ २ ॥ कैसा जातो कामक्रोधलोभदंभ । नांदती स्वयंभ अंतर्यामीं ॥ ३ ॥ अंतर्यामीं आधीं होईजे निर्मळ । तेणें तुटे मूळ संसाराचें ॥ ४ ॥ संसाराचें मूळ सूक्ष्मीं गुंतलें । मनहि गुंतलें विभ्रमासी ॥५॥ विभ्रमासी बरें शोधोनि वहावें । अंतरीं रहावें निष्ठावंत ॥ ६ ॥ निष्ठावंत ज्ञान पूर्ण समाधान । मग संध्या स्नान सफळित ॥ ७ ॥ सफळित संध्या संदेह नसतां । निःसंदेह होतां समाधान ॥ ८ ॥ समाधान नाहीं स्नान संध्या कांहीं । लौकिकाचे ठाईं लोकलाज ॥९॥ लोकलाजे सर्व लौकिकचि केला । देव दुरावला वरपणें[४] ॥ १० ॥ वरपणें देव कदा सांपडेना । निष्ठेचा घडेना भक्तिभाव ॥ ११ ॥ भक्ति ते भावेंचि भाव तो जायांचा । कर्मलौकिकाचा खटाटोप ॥ १२ ॥ खटाटोपें देव कदा पाविजेना । निश्चय घडेना शाश्वताचा ॥ १३ ॥ शाश्वताचा शोध अंतरीं असतां । सर्व कांहीं पहातां निरर्थक ॥ १४ ॥ निरर्थक तीर्थें निरर्थक व्रतें । दास ह्मणे जेथें ज्ञान नाहीं ॥ १५ ॥

॥ १११ ॥ अनंताचा अंत पहावया गेलों । तेणें विसरलों आपणासी ॥ १ ॥ आपणा आपण पहातां दिसेना । रूप गवसेना दोहींकडे ॥ २ ॥ दोहींकडे देव आपणचि आहे ।

---

१ प्रत्येक दिवशीं. २ चवथी मुक्ति. ३ दृढनिश्चयी जो त्याला. ४ अभिमानानें.

संग हा न साहे माझा मज ॥ ३ ॥ माझा मज भार जाहला बहुत । देखत देखत कळों आला ॥ ४ ॥ कळों आला भार पाहिला विचार । पुढें सारासारविचारणा ॥ ५ ॥ विचारणा झाली रामी रामदासीं । सर्वेहि संगासी मुक्त केली ॥ ६ ॥ मुक्त केली मोक्षा मुक्तीची उपेक्षा । तुटली अपेक्षा कोणीएक ॥ ७ ॥

॥ ११२ ॥ पहिलें प्रथम मूळीं परब्रह्म । व्यापक सूक्षम जेथें तेथें ॥ १ ॥ जेथें तेथें वस्तु आहे निराकार । शुद्ध व्योमाकारें प्रगटित ॥ २ ॥ प्रगटित असे दिसेना ना भासे । विचार विलसे ज्ञानियासी ॥ ३ ॥ ज्ञानियासी ज्ञान कळे निरंजनें । आणि जन वन सारिखेंचि ॥ ४ ॥ सारिखेंचि आहे देव ओळखतां । जेथें तेथें जातां देव भासे ॥ ५ ॥ देव भासे मनीं नित्य निरंतर । बाह्य अभ्यंतर व्यापूनियां ॥ ६ ॥ व्यापूनियां आहे सर्वांचे अंतरीं । अनुभवें हरी ओळखावा ॥ ७ ॥ ओळखावा परी ओळखतां नये । ह्मणोनि उपाये साधुसंग ॥ ८ ॥ साधुसंग धरी श्रवण विवरी । सारासार करी विचारणा ॥ ९ ॥ विचारणा करी देवा निर्गुणाची । आणि सगुणाची उपासना ॥ १० ॥ उपासना कर्म हो आधीं पाळावें । मग सांभाळावें ब्रह्मज्ञान ॥ ११ ॥ ब्रह्मज्ञान नसे ते जन आंधळे । सन्मार्गी पांगुळे क्रियाभ्रष्ट॥१२॥ क्रियाभ्रष्ट कर्मउपासनेविण । नेणतां निर्गुण सर्व मिथ्या॥१३॥सर्व मिथ्या जंव ब्रह्मज्ञान नाहीं। क्रियाकर्म कांहीं सोडवीना ॥१४॥ सोडविना कर्म या कर्मापासोनी । भगवंतावांचोनी तारांबळी ॥१५॥ तारांबळी झाली देवास नेणतां । कर्मी गुंडाळितां देव कैंचा ॥ १६ ॥ देव कैंचा भेटे कर्म उरे पुढें । संशयचि वाढे सर्वकाळ ॥१७॥ सर्वकाळ गेला संदेहीं पडतां । नित्य चोखाळितां काळिवरें ॥१८॥ काळिवर काय नित्य धूत गेला । लावितो कोणाला उपकार॥१९॥उपकार कैंचा सेवक देहाचा । आणि कुटुंबाचा भारवाही ॥ २० ॥ भारवाही झाला देवासी चुकला। लौकिकचि केला जन्मवरी ॥ २१ ॥ जन्मवरी केलें अंतीं व्यर्थ गेलें । कासाविस झालें वायाविण ॥ २२ ॥ वायाविण काळ गेला कीं निर्फळ । कर्म हें सबळ सुटेना कीं ॥ २३ ॥ सुटेना कीं कर्म कोण सोडविता । सोडूनि अनंता कर्में केलीं ॥२४॥ कर्में केलीं देह चालतां निर्मळ । खंगतां ओंगळ देह झाला ॥ २५ ॥ देह झाला क्षीण सदा हगवण । मृत्तिकेचा शीण कोण करी ॥ २६ ॥ कोण करी तेव्हां कर्माचें पाळण । झाली भणभण शरीराची ॥२७ ॥शरीराची जेव्हां झाली भणभण । तेव्हां नारायण भजों पाहे ॥ २८ ॥ भजों पाहे तेव्हां नारायण कैंचा। गेला अभाग्याचा व्यर्थ काळ ॥ २९ ॥ व्यर्थ काळ गेला देवा न भजतां । देह चोखाळितां चोखाळेना ॥३०॥ चोखाळिला देहो वाढला संदेहो । अंतकाळीं पाहो दैन्यवाणा ॥३१॥ दैन्यवाणा पाहे देवा न भजतां । पाहा तुला आतां कोण सोडी ॥३२ ॥ कोण सोडी देव धुंडिल्यावांचुनी । ह्मणोनि भजनीं सावधान ॥ ३३ ॥ सावधानपणें देवासि शोधावें । तेणेंचि साधावे परलोक ॥ ३४ ॥ परलोक साधे संतांचे संगतीं । चुके अधोगती गर्भवास ॥ ३५ ॥ गर्भवास चुके ज्ञान अभ्यासितां । वस्तूसि पाहतां वस्तुरूप ॥ ३६ ॥ वस्तुरूप होणें विवेकाच्या गुणें । नित्य निरूपणें सारासार ॥ ३७ ॥ सारासार घडे असाराचा त्याग । योगिया निःसंग सहज-

---

१ ह्यगय. २ इच्छा. ३ आकाशासारखी. ५ मायाविरहित. ५ देह, शरीर. ६ नरकवास.

चि ॥ ३८ ॥ सहजचि कर्मापासूनि सुटला । बोधें विनटला परब्रह्मीं ॥ ३९ ॥ परब्रह्मीं हेतु लागतां अहेतु । देहें देहातीतु रामदास ॥ ४० ॥

॥ ११३ ॥ कर्में चित्तशुद्धि होऊनियां गेली । मग उपासली उपासना ॥ १ ॥ उपासनामिसें देव ठाईं पडे । संदेहचि उडे एकसरा ॥ २ ॥ एकसरा पंथें सांपडे सुगम । जैसे विहंगम[2] फळावरी ॥ ३ ॥ फळावरी झड जातां अनायासीं । निर्फळ असोसी वायावीण ॥ ४ ॥ वायावीण शीण कासया करावा । निर्फळ जाणावा संसार हा ॥ ५ ॥ संसाराचा सोस कर्मीं निजध्यास । तेणें जगदीश अंतरला ॥ ६ ॥ अंतरला देव अंतरीं न ठावा । विवेक पाहावा सज्जनांचा ॥ ७ ॥ सज्जनांचा योग सर्वांचा वियोग । आणि त्याचा त्याग चमत्कारें ॥ ८ ॥ चमत्कारें त्याग तत्वविवरणें । शीघ्रचि पावणें मोक्षपदीं ॥ ९ ॥ मोक्षपदीं ज्ञान रामदासीं झालें । बंधन तुटलें संशयाचें ॥ १० ॥

॥ ११४ ॥ संशयाचें कर्म संशयीं पडिलें । तें कोणें सोडिलें ज्ञानेंविण ॥ १ ॥ ज्ञानेंविण देव कैंचा ठायीं पडे । अज्ञानें बापुडें गुंडाळलें ॥ २ ॥ गुंडाळलें सर्व लौकिकाकरितां । लौकिक पाहतां उद्धरेना ॥३ ॥ उद्धरेना लोक हे कोणी कोणासी । व्यर्थचि देवासी अंतरावें ॥ ४ ॥ अंतरावें व्हावें बहुत आधीन । बहुतांचें मन राखवेना ॥ ५ ॥ राखवेना मन बहुतां जनांचें । आणि सज्जनांचें वर्म चुके ॥ ६ ॥ वर्म चुके कर्म आडवेंचि आलें । नाहीं ओळखिलें आत्मयासी ॥७ ॥ आत्मयासी जाणे तोचि एक भला । संसारीं सुटला विवेकानें ॥ ८ ॥ विवेकानें लाभ पावावा आपुला । लौकिकें देवाला सोडूं नये ॥९॥ सोडूं नये ज्ञान सगुणीं भजणें । भक्ति निवेदनें ओळखावी ॥ १० ॥ ओळखावी भक्ति सायुज्यता मुक्ती । येणें होय गती दास ह्मणे ॥ ११ ॥

॥ ११५ अस्थीचा विटाळ होतां स्नान केलें । चुंडे[1] दांतवलें कासयासी ॥ १ ॥ आचमन करावें शूद्राच्या विटाळें । हाटांचे[3] चौंडोळे[4] कोण जाणे ॥ २ ॥ नदीचे प्रवाहीं आंत पाहों नये । स्नान संध्या होये अधोदकीं ॥ ३ ॥ ओले चर्मीं सिद्ध होत आहे हिंग । स्वयंपाकीं सांग सेविताती ॥ ४ ॥ रामदास ह्मणे हें कोणी न पाहे । देह मूळीं आहे विटाळचा ॥ ५ ॥

॥ ११६॥ विटाळाचा देह विटाळें वाढला । तुवां शुद्ध केला कोणेपरी ॥१॥ पातकाचा देह पातकें वाढला । विचारतां आला प्रत्ययासी ॥२॥ अस्थीचा पंजर चर्में गुंडाळिला । विष्ठेनें भरला मळमूत्रें ॥ ३ ॥ जंत किडे ओक आंतडीं कातडीं । बाह्यात्कारीं वेडीं भादरलीं ॥ ४ ॥ भादरले केश मागुती निघती । पुन्हां भादरती लागवेगें ॥ ५ ॥ भादरली डोई घेत प्रायश्चित्त । अपानीं घासित मृत्तिकेसी ॥ ६ ॥ भादरिली डोई पळाला विटाळ । मागुता चांडाळ भादरितो ॥ ७ ॥ बरा शुद्ध केला पुन्हां पापी झाला । पुन्हां भादरिला सावकाश ॥ ८ ॥ सावकाश कांहीं विचार पाहावा । जेणें करीं देवा पाविजे तो ॥ ९ ॥ पाविजेतो देवा भक्तिनिवेदनें । शुद्ध ब्रह्मज्ञानें रामदासीं ॥ १० ॥

॥ ११७ ॥ पोट भरावया मांडिला उपास । झाला कासाविस रामाविणें[5] ॥ १ ॥ राजा

१ शोभला. २ पक्षी. ३ हाटांचीं. ४ हग्निदंनाची स्त्रियांचीं हस्तभूषणें. ५ बाजारची गर्दा.

पहावया प्रजा धुंडाळितो। कसाविस होतो वाउगाची ॥ २ ॥ द्रव्य साधावया निर्द्रव्याचा संग। तेथें कैंचें मग द्रव्य मिळे ॥ ३ ॥ ब्रह्म साधावया कर्मामार्गें गेला। तंव कर्में केला कासाविस ॥ ४ ॥ सुटका व्हावया बंधनचि केलें। तेणें ते सुटलें केवीं घडे ॥ ५ ॥ केवीं घडे कुढरोगें आरोग्यता। कुपथ्यानें व्यथा वाढतसे ॥ ६ ॥ एका व्यथा एकीं औषध घेतलें। दास ह्मणे झालें तयापरी ॥ ७ ॥

॥ ११८ ॥ चित्त आहे कैसें मळिण तें कैसें। शुद्ध होतें कैसें विचारावें ॥ १ ॥ वैद्य ओळखीना रोगहि कळेना। औषध मिळेना प्रचितीचें ॥ २ ॥ अनुमानें देव अनुमानें भक्त। अनुमानें मुक्त अनुमानी ॥ ३ ॥ अनुमानें केलें अनुमानें कल्पिलें। निर्फळ जाहलें सर्व कांहीं ॥ ४ ॥ सर्व कांहीं बरें प्रचीति आलिया। दास ह्मणे वाया अप्रचिती ॥ ५ ॥

॥ ११९ ॥ प्रचीतीचा देव प्रचीतीचा भाव। करावा उपाव सप्रचीत ॥ १ ॥ प्रचितीचा वैद्य प्रचीतीची मात्रा। प्रचीतीच्या मंत्रा पाठ कीजे ॥ २ ॥ प्रचीतीनें कोणी एक तें पहावें। जन ओळखावे प्रचीतीनें ॥ ३ ॥ प्रचीतीनें इष्ट प्रचीतीनें मित्र। प्रचीतीनें मूत्र कोणीएक ॥ ४ ॥ कोणीएक काय प्रचीती उपाय। दास ह्मणे सोय प्रचीतीची ॥ ५ ॥

॥ १२० ॥ प्रचितीवेगळें मिथ्या सर्व कांहीं। निर्फळचि पाहीं अप्रचीती ॥ १ ॥ अप्रचीति जेथ फळ कैंचें तेथ। निर्फळचि व्यर्थ कासावीस ॥ २ ॥ प्रचीतीची रीज जया अंगीं नसे। व्यर्थ हेंचि पिसें लोभाविणें ॥ ३ ॥ लोभाविणें लाभ मानिला सुलभ। लाभ नाहीं क्षोभ प्रगटला ॥ ४ ॥ प्रगटला लोभ केलें निरर्थक। प्रचीती सार्थक दास ह्मणे ॥ ५ ॥

॥ १२१ ॥ होते आठवण तेंचि अंतःकरण। आतां सावधान मन ऐका ॥ १ ॥ संकल्प विकल्प होय नव्हे वाटे। तेंचि मन खोटें काल्पनिक ॥ २ ॥ होय नव्हे ऐसा अनुमान झाला। निश्चयचि केला तेचि बुद्धि ॥ ३ ॥ निश्चयचि केला तयाचें चिंतन। तेंचि चित्त जाण निश्चयेंसी ॥ ४ ॥ अहंकारासवें देह चालताहे। दास ह्मणे पाहे अनुभवें ॥ ५ ॥

॥ १२२ ॥ करावें तें काय तेणें होतें काय। अनुमानें काय प्रत्यय होतो ॥ १ ॥ प्रत्यय होतो काय ऐसेंहि कळेना। नये अनुमाना सर्व कांहीं ॥ २ ॥ सर्व कांहीं एका आत्मज्ञानाविण। दिसताहे शीण वाउगाची ॥ ३ ॥ वाउगाचि लाभ प्रचीची केवळा। उगाचि आगळा दिसताहे ॥ ४ ॥ दिसताहे फळ लोकचि ह्मणतां। आपुले प्रचीती कांहीं नाहीं ॥ ५ ॥ कांहीं नाहीं पूर्वजन्मींचें स्मरण होय विस्मरण। सर्व कांहीं ॥ ६ ॥ सर्व कांहीं मागें जाहालें कळेना। ह्मणोनि फळेना केलें कर्म ॥ ७ ॥ केलें कर्म कोणें कोणासी पुसावें। अनुमानें व्हावें कासाविस ॥ ८ ॥ कासविस झाला कर्में जाजावला। व्यर्थ श्रम गेला अंतकाळीं ॥ ९ ॥ अंतकाळीं गेला सर्व सोडूनियां। भ्रमला प्राणिया विस्मरणें ॥ १० ॥ विस्मरण जाय सद्गुरु करितां। दास ह्मणे आतां गुरु करी ॥ ११ ॥

॥ १२३ ॥ प्रत्ययाचें ज्ञान तेंचि तें प्रमाण। येरें अप्रमाण सर्व कांहीं ॥ १ ॥ सर्व कांहीं धर्म आणि कर्माकर्म। चुकलिया वर्म व्यर्थ जाती ॥ २ ॥ व्यर्थ जाती जन्म ज्ञानावांचूनियां।

---

१ अनुभवाचें. २ संशयवृत्ति. ३ श्रम पावला, त्रासला. ४ इतर, दुसरें.

केले कष्ट वायां निरर्थक ॥ ३ ॥ निरर्थक जन्म पशुचिया परी । जंव तें अंतरीं ज्ञान नव्हे ॥ ४ ॥ ज्ञान नव्हे सोपें तें आधीं पहावें । शाश्वत शोधावें दास ह्मणे ॥ ५ ॥

॥ १२४ ॥ आईआधीं पुरुष हेंचि विचारावें । आपुलें करावें समाधान ॥ १ ॥ समाधान होय देव देखिलिया । देवाविण वायां शिणों नये ॥ २ ॥ शिणों नये देव असोनि सर्वत्र । हें तों देहयंत्र नाशिवंत ॥ ३ ॥ नाशिवंत देहो नाहीं त्या संदेहो । दास ह्मणे पाहा हो परब्रह्म ॥ ४ ॥

॥ १२५ ॥ ज्याचें नाम घेसि तोचि तूं आहेसी । पाहे आपणासि शोधोनियां ॥ १ ॥ शोधितां शोधितां मीपणाचि नाहीं । मीपणाचें पाही मूळ बरें ॥ २ ॥ मूळ बरें पाही न रानीं वा राहा । आहा तैसे आहा सर्वगत ॥ ३ ॥ सर्वगत आत्मा तोचि तूं परमात्मा । दास अहमात्मा सांगतसे ॥ ४ ॥

॥ १२६ ॥ सर्वांहोनि थोर देव निराकार । मग हा विस्तार विस्तारला ॥ १ ॥ विस्तारिला जन त्वां नानापरीचा । निर्गुण पूर्वींचा देव आहे ॥ २ ॥ देव आहे सत्य येरें हें असत्य । जाणितल्या नित्य विचारणा ॥ ३ ॥ विचारणा करी शुंडी नानापरी । दास ह्मणे तरी तरशील ॥ ४ ॥

॥ १२७ ॥ पतित ह्मणिजे वेगळा पडिला । पावन तो झाला एकरूप ॥ १ ॥ एकरूप देव आरोप ठाईंचा । तेथें दुजा कैंचा कोण आहे ॥ २ ॥ कोण आहे दुजा स्वरूपीं पहातां । विचारें पाहतां सुख आहे ॥ ३ ॥ सुख आहे मूळ आपुलें शोधितां । मनासी बोधितां रामदास ४

॥ १२८ ॥ तुकाई यमाई नमूं चंडावाई । जाखाई जोखाई सटवाई ते ॥ १ ॥ सटवाई जगदंबा आदिशक्ति अंबा । तुह्मीं त्या स्वयंभा दाखवावें ॥ २ ॥ दाखवावें तुह्मीं सर्व पैलीकडे । देखतांचि घडे मोक्षपद ॥ ३ ॥ मोक्षपद घडे मोक्षासी पाहतां । तद्रूपचि होतां दास ह्मणे ॥४॥

॥ १२९ ॥ नमूं रामकृष्णा आदिनारायणा । तुह्मीं त्या निर्गुणा दाखवावें ॥ १ ॥ दाखवावें निज स्वरूप आपुलें । दिसेनासें झालें काय करूं ॥ २ ॥ काय करूं आतां देवा नरहरी । पुढारी माझारी पांडुरंगा ॥ ३ ॥ पांडुरंगा देवा अगा महादेवा । तुह्मीं मज ठावा ठाव ब्रह्मीं ॥ ४ ॥ ब्रह्मीं ब्रह्मरूप तें मज करावें । रामदास भावें प्रार्थितसे ॥ ५ ॥

॥ १३० ॥ सूर्यनारायणा देवा नमस्कार । तुवां निराकार दाखवावें ॥ १ ॥ दाखवून यावें निज जीववावें । चंद्रा तुज भावें प्रार्थितसे ॥ २ ॥ प्रार्थितसे मही आणि अंतरिक्षा । आह्मां त्या अलक्षा लक्षवावें ॥ ३ ॥ लक्षवावें मज आपोनारायणें । ब्रह्मप्राप्ति जाणें तें करावें ॥ ४ ॥ करावें सनाथ आजि प्रभंजनें । नक्षत्रें वरुणें दास ह्मणे ॥ ५ ॥

॥ १३१ ॥ तुह्मी सर्व देवीं मिळोनि पावावें । मज वेगीं न्यावें परब्रह्मीं ॥ १ ॥ परब्रह्मीं न्यावें संतअनुभवें । मज या वैभवें चाड नाहीं ॥ २ ॥ चाड नाहीं एका निर्गुणावांचुनी । माझे ध्यानीं मनीं निरंजन ॥ ३ ॥ निरंजन माझा मज भेटवावा । तेणें होय जीवा समाधान ॥ ४ ॥ समाधान माझें करा गा सर्वही । तुह्मांसि देह हो विसरेना ॥ ५ ॥ विसरेना देहो चालतो सेववरी । बाह्य अभ्यंतरीं दास ह्मणे ॥ ६ ॥

---

१ संशय. २ इतर. ३ आकाशाला. ४ वायूनें. ५ इच्छा. ६ मायाविरहित.

॥ १३२ ॥ तूं काय झालासी अगा निरंजना । आह्मां भक्तजनां सांभाळावें ॥ १ ॥ सांभाळावें सदा सबाह्याभ्यंतरीं । आह्मां क्षणभरी सोडूं नको ॥ २ ॥ सोडूं नको वाया गुप्त कां झालासी । देवा देखलासी संतसंगें ॥ ३ ॥ संतसंगें गुप्त होऊनि पाहिला । संगत्याग झाला दर्शनेंचि ॥ ४ ॥ दर्शन जाहलें तेंचि तें जाणलें । नसोनि असलें कल्पकोडी ॥ ५ ॥ कल्पकोटी जोडी झाली निर्गुणाची । दास ह्मणे कैंची देहबुद्धी ॥ ६ ॥

॥ १३३ ॥ देवेंविण आतां मज कंठवेना । कृपाळु तो नाना ठाईं वसे ॥ १ ॥ नाना ठाईं देव आहे जेथें तेथें । तयाविण रितें स्थळ नाहीं ॥ २ ॥ स्थळ नाहीं रितें ब्रह्म तें पुरतें । जेथें जावें तेथें मागें पुढें ॥ ३ ॥ मागें पुढें ब्रह्म सर्वत्र व्यापक । दास तो निःशंक तेणें गुणें ॥ ४ ॥

॥ १३४ ॥ देव निर्विकार त्या नाहीं आकार । तरी हा विस्तार कोणें केला ॥ १ ॥ कोणें केला ऐसा शोधूनि पाहावें । पाहोनि राहावें समाधान ॥ २ ॥ समाधान घडे विचार पाहतां । बुजोनि राहतां सर्वकाळ ॥ ३ ॥ सर्वकाळ पूर्वपक्ष हा सिद्धांत । वेदांत भादांत सप्रचीत ॥ ४ ॥ सप्रचीती तरी विकारीं विकार । देव निर्विकार जैसा तैसा ॥ ५ ॥ जैसा तैसा आहे विवेक पहावा । पडों नये गोंवा दास ह्मणे ॥ ६ ॥

॥ १३५ ॥ नमूं वेदमाता जे कां सर्व सत्ता । ब्रह्मज्ञान आतां बोलूं कांहीं ॥ १ ॥ बोलूं कांहीं ब्रह्म जेणें तुटे भ्रम । आणि सुखें वर्म ठायीं पडे ॥ २ ॥ ठायीं पडे देव आणि भावाभाव । प्रकृति स्वभाव सर्व कांहीं ॥३॥ सर्व कांहीं कळे संदेह मावळे । अंतर निवळे साधकाचें ॥४॥ साधकाचें हित होय निरूपणें । श्रवण मननें दास ह्मणे ॥ ५ ॥

॥ १३६ ॥ श्रवण करावें जें तें ब्रह्मज्ञान । ज्ञानेंविण शीण कामा नये ॥ १ ॥ कामा नये येथें सारासार नाहीं । कथेच्या प्रवाहीं कोण साध्य ॥ २ ॥ साध्य तेंचि घ्यावें येर तें सोडावें । विचाराचे नांवें जेथें शून्य ॥ ३ जेथें शून्य ज्ञान सर्व अनुमान । अनुमानें धन्य होईजेना ॥ ४ ॥ होइजेना धन्य निरंजनेंविण । रामदास खूण सांगतसे ॥ ५ ॥

॥ १३७ ॥ राम कैसा आहे हें आधीं पाहावें । मग सुखें नांवें दास्य करूं ॥ १ ॥ दास्य करूं जन देव ओळखेन । देवासि चुकोन दास्य कैसें ॥ २ ॥ दास्य कैसें घडे देवासी नेणतां । वाउगें श्रमतां शीण उरे ॥३॥ शीण उरे साध्य तें कांहीं साधेना । अंतरीं वसेना समाधान ॥ ४ । समाधान देव पाहतां घडेल । येर विघडेल रामदास ॥ ५ ॥

॥ १३८ ॥ शोधूनि पाहावें देवऋषिमूळ । निर्माण सकळ कोठूनियां ॥ १ ॥ कोठूनियां झाली सर्वेहि उपाधी । वरि घ्यावी शुद्धि शाश्वताची ॥ २ ॥ शाश्वताची शुद्धि घेतां दृढबुद्धी । होवोनि समाधी हाता चढे ॥ ३ ॥ हाता चढे सर्व वेदशास्त्रबीज । मुख्य गुह्य गूज योगियांचें ॥ ४ ॥ योगियांचें गूज सहजीं सहज । दास ह्मणे निज ठायीं पडे ॥ ५ ॥

॥ १३९ ॥ देव तो कळेना राहिला चुकोनी । संसारा येऊनि काय केलें ॥ १ ॥ काय केलें बापा आपुलें अनहितें । देखत देखत चुकलासी ॥ २ ॥ चुकलासी धनी या भूमंडळींचा । सर्वेहि देवांचा मुख्य देव ॥ ३ ॥ मुख्य देव आहे तो तुज कळेना । शाहाणा आपणा ह्मणविशी ॥ ४ ॥ ह्मणविशी परी दसऱ्याचें सोनें । उणें कोटिगुणें दास ह्मणे ॥ ५ ॥

---

१ देहाभिमान. २ अनुभवयुक्त. ३ गोंधळ, अडचण. ४ उपसर्ग, संबंध. ५ अकल्याण.

॥ १४० ॥ शाहणें दिसतां ब्रह्मज्ञानेंविण । संसाराचा शीण करोनियां ॥ १ ॥ करोनियां संसार रात्रंदिवस धंदा । कैसे हो गोविंदा चुकलेती ॥ २ ॥ चुकलेती वाया तुह्मीं कां बंधे हो। अंतरीं संदेहो जन्मवरी ॥ ३ ॥ जन्मवरी ओझें वाहिलें वाउगें । व्यर्थ कामरंगें रंगोनिया ॥ ४ ॥ रंगोनिया कार्मी अंतरावें रामीं । दास ह्मणे ऊर्मि कामा नये ॥ ५ ॥

॥ १४१ ॥ नवस पुरवी तो देव पूजिला । लोभालागीं झाला कासावीस ॥ १ ॥ कासावीस झाला प्रपंचाकरितां । सर्वकाळ चिंता प्रपंचाची ॥ २ ॥ प्रपंचाची चिंता करितचि मेला । तो काय देवाला उपकार ॥ ३ ॥ उपकार केला पूर्वजांलागुनी । ते गेले मरोनि पहातसे ॥४॥ पाहतसे पुढें आपणचि मेला । देवासी चुकला दास ह्मणे ॥ ५ ॥

॥ १४२ ॥ लोभ नवसांचा तो देव बद्धाचा । आणि मुमुक्षाचा गुरु देव ॥ १ ॥ गुरु देव जाण तथा मुमुक्षाचा । देव साधकाचा निरंजन ॥ २ ॥ निरंजन देव साधकावे मनीं । सिद्ध समाधानी देवरूप ॥ ३ ॥ देवरूप झाला संदेह तुटला । तोचि एक भला भूमंडळीं ॥४ ॥ भूमंडळीं रामदास धन्य आहे । अनन्यता पाहे शोधोनियां ॥ ५ ॥

॥ १४३ ॥ तुजला तूं थोर मजला मी थोर । तूं थोर मी थोर कामा नये ॥ १ ॥ कामा नये कोणालागीं मीतूंपण । पाहा थोरपण ईश्वराचें ॥ २ ॥ ईश्वराचें रूप पाहतां निरावें । मीतूंपण जावें सांडूनियां ॥ ३ ॥ सांडूनियां जाय ते काय आपणा । शाश्वताच्या खुणा पाहे बापा ॥ ४ ॥ पाहे बापा देव कोण निरावेव । दास ह्मणे भाव तेथें ठेवी ॥५ ॥

॥ १४४ ॥ भाविला न जाय तेथें भाव ठेवी । परि हो गोसावी सांगतसां ॥ १ ॥ सांगतसां परि नये अनुमाना । हें कांहीं कळेना आह्मांलागीं ॥ २ ॥ आह्मांलागीं कळे तें कांहीं सांगा हो । गोसावी आहां हो भले तुह्मी ॥३॥ भले तुह्मी आहां मज उमजवावें । उकलुनी द्यावें सर्व कांहीं ॥ ४ ॥ सर्व कांहीं कळे सद्गुरु करितां । दास ह्मणे आतां गुरु करी ॥ ५ ॥

॥ १४५ ॥ गुरुविण प्राणी त्या होय जाचणी । सत्य माझी वाणी मिथ्या नव्हे ॥ १ ॥ मिथ्या नव्हे सत्य सांगतां तुह्मांला । अंतीं यमवाला चुकेना कीं ॥ २ ॥ चुकेना कीं यमयातना या जना । वेगीं निरंजना ठायीं पाडा ॥ ३ ॥ ठायीं पाडा वेगीं देव निरंजन । लावा तनमन सद्गुरूसी ॥ ४ ॥ सद्गुरूसी नाहीं जयाला ओळखी । तया झोकाझोकी यातनेची ॥ ५ ॥ यातनेची चिंता तुटे एकसरीं । वेगीं गुरु करी दास ह्मणे ॥ ६ ॥

॥ १४६ ॥ ज्याचेनि जितोसी त्यासि चुकलासी । व्यर्थचि झालासी भूमिभार ॥ १ ॥ भूमिभार जिणें तुझें गुरुविणें । वचनें प्रमाणें जाण बापा ॥ २ ॥ जाणे तूं हें गती गुरुविण नाहीं । पडसी प्रवाहीं मायाजाळीं ॥ ३ ॥ मायाजाळीं वाया गुंतलासि मूढा । जन्मवरी ओढा तडातोडी ॥ ४ ॥ कांहीं तडातोडी कांहीं देव जोडी । आयुष्याची घडी ऐसी वेंची ॥ ५ ॥ ऐसी वेंची बापा आपुली वयसा । दास ह्मणे ऐशा काळीं घाली ॥ ६ ॥

॥ १४७ ॥ सर्व काळ गेला संसार करितां । तरी सार्थकता कैसी होय ॥ १ ॥ कैसी घडे

---

१ लहरी. २ संशय. ३ निरवयव, अवयवरहित. ४ एकदम. ५ जगतोस. ६ आयुष्य.

मुक्ति कैसी घडे भक्ति । ह्मणोनियां चित्तीं गोष्टि धरी ॥२॥ गोष्टी धरी मनीं स्वहितालागूनी । बैसे देवध्यानीं क्षणएक ॥ ३ ॥ क्षण एक गेला सुखाचा बोलतां । तेणें कांहीं चिंता वोसरेल ॥ ४ ॥ वोसरेल चिंता संसाराची माया । भजे रामराया दास ह्मणे ॥ ५ ॥

॥ १४८ ॥ प्रपंचीं असोनि परमार्थ करावा । बरा विवरावा निरंजन ॥ १ ॥ निरंजन देव प्रगटे अंतरीं । मग भरोवरी करीना कां ॥ २ ॥ करीना कां परी संसार बाधीना । परि तो साधेना काय करूं ॥३॥ काय करूं देवा लौकिका उपाय । धरवेना सोय शाश्वताची ॥४॥ शाश्वताची सोय समाधान होय । मोक्षाचा उपाय सद्गुरुची ॥ ५ ॥ सद्गुरुची गति चुके अधोगती । दास ह्मणे मती पालटावी ॥ ६ ॥

॥ १४९ ॥ संसार करावा सुखें यथासांग । परी संतसंग मनीं धरा ॥ १ ॥ मनीं धरा संतसंगतिविचार । येणें पैलपार पाविजेतो ॥ २ ॥ पाविजेतो याची प्रचीति पाहावी । निरूपणीं व्हावी अतिप्रीति ॥ ३ ॥ अतिप्रीती तुह्मीं निरूपणीं धरा । संसारीं उद्धरा असोनीयां ॥ ४ ॥ असोनियां नाहीं हे माया सर्वही । विवंचूनि पाही दास ह्मणे ॥ ५ ॥

॥ १५० ॥ करूनी अकर्ते होऊनियां गेले । तेणें पंथें चाले तोचि धन्य ॥ १ ॥ तोचि धन्य जनीं पूर्ण समाधानी । जनीं आणि वनीं सारिखाचि ॥ २ ॥ सारिखाचि जेथें तेथें पालटेना । नये अनुमाना कोणीएक ॥ ३ ॥ कोणीएक लोक देहासि पाहाती । अंतरींची गती कोण जाणे ॥ ४ ॥ कोण जाणे काय परावे मनींचें । जनास जनींचें कळतसे ॥ ५ ॥ कळतसे परी अंतरीं शोधावें । मनासि बोधावें दास ह्मणे ॥ ६ ॥

॥ १५१ ॥ समाधान व्हावें विवेकें पाहावें । वायूच्या स्वभावें सर्व कांहीं ॥ १ ॥ सर्व कांहीं घडे वायूचा करितां । वायु पाहों जातां आढळेना ॥ २ ॥ आढळेना वायू आकाशीं विरोला । कर्ता काय झाला अंतरींचा ॥ ३ ॥ अंतरींचा सर्व विवेकें पाहतां । ब्रह्मरूप आतां सहजचि ॥ ४ ॥ सहजचि झालें विचारानें केलें । माणूस पाहिलें शोधूनियां ॥ ५ ॥ शोधूनियां जीत माणुस पाहावें । वर्म पडे ठावें दास ह्मणे ॥ ६ ॥

॥ १५२ ॥ शरीराचीं तत्वें तत्वांचें शरीर । पहावा विस्तार विस्तारूनी ॥ १ ॥ विस्तारूनी गुणीं तत्वांची मांडणी । सिद्धांतें जावोनी आरंभावीं ॥ २ ॥ आरंभावीं तत्वें तत्वें वेगळालीं । मीपणा गळालीं विवेकानें ॥ ३ ॥ विवेकें पाहतां कोणीचा नाढळे । समजतां कळे सर्व कांहीं ॥ ४ ॥ सर्व कांहीं लाभ होतो निरूपणें । श्रवणमननें दास ह्मणे ॥ ५ ॥

॥ १५३ ॥ माणुसाचें ब्रह्म शोधितां होईल । प्रचीत येईल रोकडीच ॥ १ ॥ रोकडी प्रचीति होती गुरुमुखें । फुका सर्व सुखें हाता येती ॥ २ ॥ हाता येती बीजें सज्जनाच्या गूजें । प्रचीतीच्या भोजें आनंदला ॥ ३ ॥ आनंदला प्राणी सद्गुरु सेवितां । क्षुधार्थी जेवितां जेवीं तृप्त ॥ ४ ॥ तृप्त झाली बुद्धि निर्गुणाची शुद्धी । लागली समाधी रामदासीं ॥ ५ ॥

---

१ नरकवास. २ नाहींसा झाला. ३ वास्तविकपणें. ४ अनुभव.

॥ १५४ ॥ आतां कांहीं बोलों धालों तृप्त झालों । विवेकें राहिलों परब्रह्मीं ॥ १ ॥ परब्रह्मीं जातां ब्रह्मचि तत्त्वतां । विचारें पाहतां आपणचि ॥ २ ॥ आपणचि असे कोणीहि न दिसे । संसाराचें पिसें वाव झालें ॥ ३ ॥ वाव झालें भय सर्व संसारींचें । लाधलें हरीचें निजधाम ॥ ४ ॥ निजधाम बोधें विवेकें पाहावें । दास जीवें भावें सांगतसे ॥ ५ ॥

॥ १५५ ॥ आकाराचें सुख निराकारा नये । निराकारीं काये पाहशील ॥ १ ॥ पाहशील सुख सुखामागें दुःख । शोक आवश्यक अंगीं वाजे ॥ २ ॥ अंगीं वाजे शोक एखादिये वेळीं । सुख सर्वकाळीं सगुणाचें ॥ ३ ॥ सगुणाचें सुख नासोनि जाईल । सगुण होईल नाहीं ऐसें ॥ ४ ॥ नाहीं ऐसें एक निर्गुण दिसतें । रोकडेंचि तेथें कांहीं नाहीं ॥ ५ ॥ कांहीं नाहीं कैसें आहे घनदाट । सर्वांचें शेवट परब्रह्म ॥ ६ ॥ परब्रह्म परी पाहतां दिसेना । नये अनुमाना कांहीं केल्या ॥ ७ ॥ कांहीं केल्या नोहे पाषाणाचें सोनें । तैसें हें अज्ञानें जाणिजेना ॥ ८ ॥ जाणिजेचि जनीं निज परब्रह्म । तंव कैंचा श्रम जाऊं पाहे ॥ ९ ॥ जाऊं पाहे मन ब्रह्मासी पहाया । तंव तेथें माया दिसताहे ॥ १० ॥ दिसताहे माया तंव निरूपासी । येरवीं मायेसी ठाव कैंचा ॥ ११ ॥ कैंचा ठाव तया मायाज्ञानियासी । रामीं रामदासीं संतसंग ॥ १२ ॥

॥ १५६ ॥ ऐसा कोण आहे मुक्तियाचा जाण । कळे ओळखण न सांगतां ॥ १ ॥ न सांगतां जाण अंतरींचा हेत । पुरवी आरत सर्व कांहीं ॥ २ ॥ सर्व कांहीं जाणे चतुराचा राणा । धन्य नारायणा लीला तुझी ॥ ३ ॥ लीला तुझी जाणे ऐसा कोण आहे । विरिंचि तो राहे चाकटेला ॥ ४ ॥ चाकटला मनु देवासी पाहतां । दास ह्मणे आतां हद्द झाली ॥ ५ ॥

॥ १५७ ॥ स्वप्नीं देखिलें तें स्वप्नावरी गेलें । जागृतीनें केलें तेंचि खरें ॥ १ ॥ तेंचि खरें होतें येर सर्व जातें । तैसें ज्ञानियातें संसारीक ॥ २ ॥ संसारमायेचा होईल विलय । वाया चिंता काय दास ह्मणे ॥ ३ ॥

॥ १५८ ॥ चिंता काय आतां स्वप्नींचे सुखाची । सर्व चाले तोचि ब्रह्म दिसे ॥ १ ॥ बरें दिसे तरी ज्ञाते न मानिती । दास ह्मणे चित्तीं पालटेना ॥ २ ॥

॥ १५९ ॥ देव निराकार त्या नाहीं आकार । आकारसंहार होत आहे ॥ १ ॥ होत आहे जें जें सर्वहि जाणारें । जाणारें होणारें सर्व माया ॥ २ ॥ सर्व माया दिसे हें पांचभौतिक । आत्मा आहे एक निरंजन ॥ ३ ॥ निरंजनीं जन वन कांहीं नसे । दृश्य-भार भासे कल्पनेसी ॥ ४ ॥ कल्पनेसी भासे तें सर्व कल्पित । कल्पनेरहित परब्रह्म ॥ ५ ॥ परब्रह्म नाहीं ऐसा ठाव कैंचा । धन्य तो दैवाचा आत्मज्ञानी ॥ ६ ॥ आत्म-ज्ञानी नर पाहे सारसार । पुढें तदाकार होत आहे ॥ ७ ॥ होत आहे जन्म सार्थक तयाचा । जेथें सज्जनाचा अनुग्रह ॥ ८ ॥ अनुग्रह घडे बहुता सुकृतें । साक्षात्कार जेथें रोकडाची ॥ ९ ॥ रोकडाचि मोक्ष साधूचे संगती । चुके अधोगती आत्मज्ञानें ॥ १० ॥

१ खरोखर २ वसतिस्थान ३ इच्छा ४ ब्रह्मदेव. ५ आश्चर्यचकित होऊन. ६ पुण्याचे योगानें. ७ नरकवास.

आत्मज्ञानें होतें आत्मनिवेदन । भक्तीचें लक्षण नवविधा ॥ ११ ॥ नवविधा भक्ति श्रवण करावी । धारणा धरावी श्रवणाची ॥ १२ ॥ श्रवणाची स्थिति ब्रह्म निरूपण । श्रवण मनन निदिध्यास ॥ १३ ॥ निदिध्यास निजवस्तूचा धरावा । विचार करावा आपुलाही ॥ १४ ॥ आपुलाहि ठाव ज्ञानें होतों वाव । जाण ते उपाव श्रवणाचे ॥ १५ ॥ श्रवणाचे भाव जाणते जाणती । तिनीची प्रचीति ऐक्यभाव ॥ १६ ॥ ऐक्यभाव देवभक्तनामांकित । अनन्य अनंत जैसा तैसा ॥ १७ ॥ जैसा आहे लाभ श्रवणभक्तीचा । तेथें विभक्तीचा ठाव नाहीं ॥ १८ ॥ ठाव नाहीं ऐसा श्रवणें जाणावें । कीर्तन करावें हेंचि आतां ॥१९॥ हेंचि हें कीर्तन नित्य निरंतर । ग्रंथाचें अंतर विवरावें ॥२०॥ विवरावें जेणें तोचि तो जाहला । रंक तो पावला राज्यपद ॥ २१ ॥ पदीं पद प्राप्त झालें संतसंगें । सद्गुरु अंतरंगें समाधान ॥ २२ ॥ समाधान झालें श्रवणें कीर्तनें । रामाच्या स्मरणें चित्तशुद्धी ॥ २३ ॥ चित्तशुद्धि झाली जेणें तें धरावें । सेवन करावें सद्गुरूचें ॥ २४ ॥ सद्गुरु करावा तें पादसेवन । सद्गुरूनें ज्ञान होत असे ॥ २५ ॥ होत आहे ज्ञान सद्गुरुकरितां । होय सार्थकता गुरूचेनी ॥ २६ ॥ गुरूचेनी पदें लोक ठायीं पडे । सार तें निवडे प्रत्ययासीं ॥ २७ ॥ प्रत्ययासी बोले तेंचि तें बोलणें । अर्चन करणें गुरुदेवा ॥ २८ ॥ गुरुदेवालागीं कीजे नमस्कार । सहावा विचार भक्ति ऐसी ॥ २९ ॥ सर्वदास्य कीजे ते भक्ति सातवी । सख्य ते आठवी भक्ति जाणा ॥ ३० ॥ नववीचें लक्षण आत्मनिवेदन । सर्वदा अभिन्न परब्रह्मीं ॥ ३१ ॥ परब्रह्म स्वयें आपणचि होणें । ऐसीं हीं लक्षणें सार्थकाचीं ॥ ३२ ॥ सार्थक भजन आत्मनिवेदन । विवेकें अभिन्न देवभक्त ॥ ३३ ॥ देवभक्त ऐसें हें आधीं पहावें । स्थितीनें रहावें सर्वकाळ ॥ ३४ ॥ सर्वकाळ वस्तु आहे जैसी तैसी । देह प्रारब्धासि समर्पिला ॥ ३५ ॥ समर्पिला ॥ त्यासि होणार होईल । जाणार जाईल पंचभूत ॥ ३६ ॥ पंचभूत माया मायिक दिसते । होते आणि जाते स्वप्नाकार ॥ ३७ ॥ स्वप्नाकार माया आपण वेगळा । असोनि निराळा सर्वांमध्यें ॥ ३८ ॥ सर्वामध्यें परि सर्वां बाह्य आहे । आहे तैसें आहे सदोदित ॥ ३९ ॥ सदोदित वस्तु तेंचि तें आपण । रामदासीं खूण सांगतसे ॥ ४० ॥

॥ १६० ॥ विटाळाचा देह विटाळें जाणतां । शुद्ध करूं जातां कोणेपरी ॥ १ ॥ कोणेपरी आतां देह शुद्ध होईल । विटाळ जाईल कैसा याचा ॥ २ ॥ याचा अर्थ येतां या नये शुद्धता । शुद्ध करूं जातां पुन्हां पापी ॥ ३ ॥ पुन्हा पापी झाले पुन्हां शुद्ध केले । आयुष्य वेचलें ऐशापरी ॥ ४ ॥ ऐशापरी देह सर्वदा खुंडिला । दास ह्मणे झाला कासावीस ॥ ५ ॥

॥ १६१ ॥ मृत्तिकेचा ऐसा करी नानापरी । मागुता टवकारी नर्क तेथें ॥ १ ॥ नर्क तेथें आहे कैसा हा कादावा । व्यर्थ वादवावा लोकाचार ॥ २ ॥ लोकाचार केला लौकिकीं देखतां । अंतरीं शुद्धता आढळेना ॥ ३ ॥ आढळेना ज्ञान पूर्ण समाधान । सर्वदा बंधन संदेहाचें ॥ ४ ॥ संदेहाचें पाप झालें वज्रलेप । विचार निष्पाप रामदासीं ॥ ५ ॥

---

१ देहसमर्पण. २ नऊ प्रकारचें. ३ पूजन. ४ देहसमर्पण. ५ खर्च झालें. ६ संशयाचें.

॥ १६२ ॥ प्रपंचीं तें भाग्य परमार्थीं वैराग्य । दोनी यथासांग दोहींकडे ॥ १ ॥ दोहींकडे सांग होतां तो समर्थ । नाहींतरी व्यर्थ तारंबळी ॥ २ ॥ तारंबळी होतां विचार नसतां । दास ह्मणे आतां सावधान ॥ ३ ॥

॥ १६३ ॥ बंधाचा मुमुक्षु[1] प्रबोध करावा । मग उद्धरावा ज्ञानमार्गें ॥ १ ॥ ज्ञानमार्गें यावें मत्य समाधान । तरी मग जन पाठीं लागे ॥२॥ पाठीं लागे त्याचें अंतर जाणावें । आपुलें ह्मणावें दास ह्मणे ॥ ३ ॥

॥ १६४ ॥ पतित हे जन करावे पावन । तेथें अनुमान करूं नये ॥ १ ॥ करूं नये गुणदोष-उठाठेवी । विवेकें लावावी बुद्धि जना ॥ २ ॥ बुद्धि सांगे जना त्या नांव सज्जन । पतितपावन दास ह्मणे ॥ ३ ॥

॥ १६५ ॥ महापापी लोक पूर्वींचे आहेती । तेचि पालटती जयाचेनी ॥ १ ॥ जयाचेनी योगें होतसे उपाय । तुटती अपायें नानाविध ॥ २ ॥ नानाविध जन सुबुद्धाचे होती । साधूचे संगतीं दास ह्मणे ॥ ३ ॥

॥ १६६ ॥ लोखंडाचें सोनें परिसाचे गुणें । साधूचेनि होणें बद्ध सिद्ध ॥ १ ॥ बद्ध सिद्ध होती देखतां देखतां । होय सार्थकता तात्काळचि ॥ २ ॥ तात्काळचि झाला वाला तो वाल्मीक । दास पुण्यश्लोक रामनामीं ॥ ३ ॥

॥ १६७ ॥ पावन असतां पतित झालासी । सोय चुकलासी पावनाची ॥ १ ॥ पावनाची सोय धरितां अंतरीं । स्वरूप विवरी समाधान ॥ २ ॥ समाधान झालें केलें पावनानें । आत्मनिवेदनें दास ह्मणे ॥ ३ ॥

॥ १६८ ॥ आत्मनिवेदन नववें भजन । येणें संतजन समाधानी ॥ १ ॥ समाधानी संत आत्मनिवेदनें । ज्ञान मीतूंपण सांडवलें ॥ २ ॥ सांडवलें सर्व माईक संगामीं । रामीं रामदासीं निःसंगता ॥ ३ ॥ निःसंगता झाली विवेकानें केली । मुक्तिहि लाधली सायुज्यता ॥ ४ ॥

॥ १६९ ॥ आतांचि हे मुक्ति देहीं पावे जना । तरी कां सज्जनां शरण जावें ॥ १ ॥ शरण जातां भावें सज्जनचि व्हावें । शीघ्र उद्धरावें निरूपणें ॥ २ ॥ निरूपणें निजवस्तु ते सांपडे । गुज हातीं[2] पडे अकस्मात ॥ ३ ॥ अकस्मात ठाव न दिसे आपुला । निरंजनीं झाला निरंजन ॥ ४ ॥ निरंजन झाला ये जनीं अमोनी । उन्मनी गिन्नगीं[3] नादळती ॥ ५ ॥ नादळती तेथें कांहीं देहभाव । तत्वज्ञान वाव देहबुद्धी ॥ ६ ॥ देहबुद्धी गेली देखतां देखतां । मी कोण हें आतां सांपडेना ॥ ७ ॥ सांपडेना शुद्धी मीपणें पाहतां । तें मीपण जातां वस्तुरूप ॥ ८ ॥ वस्तुरूप बोधें अरूप[4] होईजे । विवेकाची कीजे विचारणा ॥ ९ ॥ विचारणा झाली रामीं रामदासीं । आतां या जन्मासी ठाव नाहीं ॥ १० ॥ ठाव नाहीं ऐसें राघवाचें देणें । थोराहूनि होणें थोर स्वयें ॥ ११ ॥

॥ १७० ॥ माझें थोरपण देव वाखाणिती । ऐसी हे प्रचीती सिद्ध आतां ॥ १ ॥ सिद्ध आतां बोध[5] देखत देखतां । होय सार्थकता शीघ्रकाळें ॥ २ ॥ शीघ्रकाळें काळ सर्व संहारिला । अनुभव आला रोकडाची ॥ ३ ॥ रोकडाचि आतां तुह्मी तरी पाहा । विवेकानें आहा

१ मोक्ष इच्छिणाऱ्यानें. २ धोके. ३ लटक्या. ४ माया, अज्ञान, त्याविरहित. ५ देहाभिमान. अनुभव.

काय नेणों ॥ ४ ॥ नेणों महिमान विवेकी जनाचें । होय सज्जनाचें मूळस्थान ॥ ५ ॥ मूळस्थान मूळ होइजे केवळ । कोण रे चांडाळ मिथ्या बोले ॥ ६ ॥ मिथ्या बोलवेना पाहा विवंचना । सिद्ध अनुमाना कैसी येते ॥७॥ कैसी येते आत्मप्रचीति आपण । मी तूं ऐसें कोण सांग बापा ॥ ८ ॥ सांग बापा मनीं बरें विचारूनी । तत्वची झाडणी करूनियां ॥ ९ ॥ करूनियां पंचीकरणविवरण । पुढें मीतूंपण कोठें आहे ॥ १० ॥ आहे तैसें आहे प्रत्यक्ष जाणावें । कोणासी ह्मणावें काय आतां ॥ ११ ॥ काय आतां होतें बहु बोलोनीयां । घेतलेसे वाया सर्व कांहीं ॥ १२ ॥ सर्व कांहीं ऐसें दृश्य जाईजेणें । माझें मीच जाणे कोणा सांगों ॥ १३ ॥ कोणा सांगों आतां हें कोण घेईल । वायाची जाईल अभिमानें ॥ १४ ॥ अभिमानें सत्य राम कोणता हें । सिद्धचि न राहे आत्मरूप ॥१५॥ आत्मरूप स्वयें आपण नव्हिजे । तरि वाया कीजे रामदास ॥ १६ ॥ कदाकाळीं राम दासा उपेक्षीना । राम उपासना ऐसी आहे ॥ १७ ॥ ऐसी आहे सार राघोबाची भक्ती । भक्तिची विभक्ती जेथें नाहीं ॥ १८ ॥ जेथें नाहीं कांहीं वाउगें मायिक । रामउपासक दास ह्मणे ॥ १९ ॥

॥ १७१ ॥ मायिकाची भक्ति उधाराची मुक्ती । तैसी नाहीं स्थिति राघवाची ॥ १ ॥ राघवाची कृपा सद्य मोक्षफळ । तुटे तळमळ चमत्कारें ॥ २ ॥ चमत्कारें आतां जो कोणी पाहीना । त्याचा पंथ उणा कोटिगुणें ॥ ३ ॥ कोटीगुणें उणें जिणें त्या नराचें । तेथें विचाराचें वोस घर ॥ ४ ॥ वोस घरीं कोण कामयासि धांवे । व्यर्थचि शिणावें कामाविण ॥ ५ ॥ कामाविण काम राहे आत्माराम । जेथेंचि विश्राम पाविजेल ॥ ६ ॥ पाविजेल परी विवरित जावें । सर्वेहि सांडावें ओळखोनी ॥ ७ ॥ ओळखतां त्याग सर्वांचा घडेल । मार्ग सांपडेल योगियांचा ॥ ८ ॥ योगियांचा पंथ योगीच जाणती । तिन्हींची प्रचीति एक जेथें ॥ ९ ॥ एक जेथें आत्मा शास्त्र गुरुवाक्य । पाहे महावाक्य विवरूनी ॥ १० ॥ विवरूनि ब्रह्मीं ब्रह्म अहंहंसिम । राम आहे रामी रामदास ॥ ११ ॥

॥ १७२ ॥ सप्रचीत वस्ती मिथ्या कोण करी । धन्य जो विवरी विवेकानें ॥ १ ॥ विवेकानें जन भेटतां संकट । त्याची खटपट सुखरूप ॥ २ ॥ सुखरूप संत सत्या साभिमानी । तयांसीच मनीं येरां नाहीं ॥ ३ ॥ येरां नाहीं गती सत्यावांचुनीयां । असत्याचे पायां कोण पडे ॥ ४ ॥ कोण पडे आतां संदेहाच्या डोहीं । कोणाविण नाहीं चाड आह्मां ॥ ५ ॥ आह्मां नाहीं चाड ते कोणाएकाची । दृढ राघवाची कास धरूं ॥ ६ ॥ कास धरूं जेणें पावन हो केलें । तेथें माझें झालें समाधान ॥ ७ ॥ समाधान झालें प्रत्ययासीं आलें । धन्य तीं पाउलें राघवाचीं ॥ ८ ॥ राघवाचीं पदें मानसीं धरीन । विश्व उद्धरीन हेळामात्रें ॥ ९ ॥ हेळामात्रें मुक्त करिन हा जन । तरीच पावन राघवाचा ॥ १० ॥ राघवाचा दास मी झालों पावन । पतित तें कोण उरों शके ॥ ११ ॥ उरों शके ऐसें कल्पांतीं घडेना । जो कोणी पुसेना त्यासि उणें ॥ १२ ॥ उणें न सांगतां माझ्या सूर्यवंशा । कोणाची दुराशा नाहीं आह्मां ॥१३॥ नाहीं आह्मां उणें राघवाच्या गुणें । ब्रीदचि राखणें पावनाचें ॥ १४ ॥ पावनाच बीज आह्मां प्राप्त झालें । प्रचितीस आलें कांहींएक ॥ १५ ॥ कितीएक जन ज्ञानें उद्धरिले । कृतकृत्य झाले

---

१ अशाश्वत, क्षणभंगुर. २ परब्रह्मस्वरूप. ३ हयगय करीत नाहीं. ४ मी आहें. ५ लीलेनें सहज. ६ प्रलयकालिही.

तात्काळचि ॥ १६ ॥ तात्काळचि मोक्ष हें ब्रीद रामाचें । होत आहे साचें येणें काळें ॥ १७ ॥ येणें काळें मोक्ष जरि मी देईन । दास ह्मणवीन राघवाचा ॥ १८ ॥ राघवाचा वर पावलों सत्वर । जनाचा उद्धार करावया ॥ १९ ॥ करावया समर्थ राम सूर्यवंशीं । मज कासयासि रोग आतां ॥ २० ॥ रोग जातां राग येईल समर्था । हे तों कांहीं सत्ता माझी एक ॥ २१ ॥ माझी सर्व सत्ता जानकीजीवना । आतां मी लेखिना ब्रह्मादिकां ॥ २२ ॥ ब्रह्मादिक माये जनकापासूनी । तयासी व्यापूनी राम आहे ॥ २३ ॥ राम आहे जनीं राम आहे वनीं । राम निरंजनीं सारिखाची ॥ २४ ॥ सारिखाचि राम सृष्टि पाहों जातां । तोचि पाहा आतां निरंजन ॥ २५ ॥ निरंजन रामा कां हो अंतरतां । मोहुनीयां जातां एकीकडे एकीकडे जातां तेथें तोहि राम । सांडोनीयां राम बरें पाहा ॥ २८ ॥ बरें पाहा तुह्मी आतांचि पावाल । पावनचि व्हाल रामरूपें ॥ २८ ॥ रामरूपें सर्व रूपें निवारिलीं । आसतांचि झालीं नाहीं ऐसीं ॥ २९ ॥ नाहीं ऐसीं रूपें भिंती चित्राकार । तैसा हा आकार स्वप्न जैसा ॥ ३० ॥ स्वप्नींचा आकार कल्पनेसी भासे । रामरूप ऐसें निर्विकल्प[1] ॥ ३१ ॥ निर्विकल्प राम कल्पितां होईजे । मिळोनि जाईजे रामरूपीं ॥ ३२ ॥ रामरूपीं सर्व साधन जाहलें । पावनचि केलें पावनानें ॥ ३३ ॥ पावन हो राम जो कोणी पावेल । रामचि होईल निजध्यासें ॥ ३४ ॥ निजध्यास निजवस्तूचा धरावा । श्रवण करावा साक्षात्कार ॥ ३५ ॥ साक्षात्कार होतां सत्य निर्गुणाचा । मग या गुणाचा पांग नाहीं ॥ ३६ ॥ पांग नाहीं ऐसें नेमस्त जाणावें । शीघ्रचि सुटावें संवसारीं ॥ ३७ ॥ संसारीं सुटिजे संसार करितां । सर्वहि भोगितां भोगातीत ॥ ३८ ॥ भोगातीत जैसा श्रीकृष्ण दुर्वासा । आत्मज्ञानी ऐसा सर्वकाळ ॥ ३९ ॥ सर्वकाळ देही असतां विदेही । रामदासीं नाहीं जन्ममृत्यु ॥ ४० ॥

॥१७३॥ जाणे सुख दुःख राम माझा एक । येरें तीं मायिकें वैभवाचीं ॥ १ ॥ वैभवाचीं । सखीं वोरगोनी जाती । आत्माराम अंतीं जिवलग ॥ २ ॥ जीवलग नाहीं श्रीरामावांचूनी हाचि माझे मनीं दृढ भाव ॥ ३ ॥ भाव अनन्याचा आहे वरंगाचा । रामेंविण कैंचा अंतरंग ॥ ४ ॥ अंतरींची व्यथा श्रीराम सर्वथा । जाणवल्या चिंता दूर करी ॥ ५ ॥ करितो प्रतिपाळ शरण आलियाचा । राम त्रैलोक्याचा मायबाप ॥ ६ ॥ माय बाप बंधु सज्जन सोयरा । एका रघुवीराविण नाहीं ॥ ७ ॥ नाहीं मज कोणी श्रीराम असतां । सत्वर बाहतां उडी घाली ॥ ८ ॥ उडी घाली मज अनाथाकारणें । राम सर्व जाण अंतरींचें ॥ ९ ॥ अंतरींचें गुज राम सर्व बीज । रामदासीं निज प्रगटलें ॥ १० ॥

॥ १७४ ॥ छत्रसिंहासनीं अयोध्येचा राजा । नांदतसे माझा मायबाप ॥ १ ॥ माझा मायबाप त्रैलोकीं समर्थ । सर्व मनोरथ पूर्ण करी ॥ २ ॥ पूर्ण प्रतापाचा कैवारी देवांचा । नाथ अनाथांचा स्वामी माझा ॥ ३ ॥ स्वामी माझा राम योगियां विश्राम । सांपडलें वर्म थोर भाग्य ॥ ४ ॥ थोर भाग्य त्याचें राम ज्याचे कुळीं । संकटीं सांभाळी भावबळें ॥ ५ ॥ भावबळें जींहीं धरिला अंतरीं । तयां क्षणभरी विसंबेना ॥ ६ ॥ विसंबेना कदा आपुल्या दासासी । रामीं रामदासीं कुळस्वामी ॥ ७ ॥

॥ १७५ ॥ सोडवी जो देव तोचि देवराव । येरें सर्व नांव ठेविलेंची ॥१॥ ठेविलेंचि नांव

---

[1] कल्पनारहित. २ लटका, खोटीं. ३ रक्षण. ४ टाकित नाहीं. ५ खोटें.

लोकांमध्यें पाहें । ठेवी जेथ आहे प्रतापाचें ॥ २ ॥ प्रतापाचें नांव एका राघवासी । रामीं रामदासीं देवराव ॥ ३ ॥

॥ १७६ ॥ पुण्याचें माहेर साधकाचें घर । बहुतांचें छत्र स्वामी माझा ॥ १ ॥ स्वामी माझा राम रायाचें मंडणें । संसार खंडण महाभय ॥ २ ॥ महाभय कैसें अभेदभक्तासी । रामीं रामदासीं धन्य बोला ॥ ३ ॥

॥ १७७ ॥ धन्य सूर्यवंश पुण्यपरायण । सर्वही सगुण समुदाय ॥ १ ॥ समुदाय काय सांगूं या रामाचा । अंतरीं कामाचा लेश नाहीं ॥ २ ॥ लेश नाहीं मनीं तया भरतासी । सर्वंहि राज्यासी त्यागीयेलें ॥ ३ ॥ त्यागियेलें अन्न केलें उपोषण । धन्य लक्षुमण ब्रह्मचारी ॥ ४ ॥ ब्रह्मचारी धन्य मारुति सेवक । श्रीरामीं सार्थक धन्य केलें ॥ ५ ॥ धन्य केला जन्म वालिमकी ऋषीनें । धन्य तीं वचनें भविष्याचीं ॥ ६ ॥ भविष्य पाहात धन्य बिभीषण । राघवीं शरण सर्वभावें ॥ ७ ॥ सर्वभावें रामीं सर्वंहि वानर । शरण अवतार विबुधांचे ॥ ८ ॥ विबुधमंडळीं राम सर्वगुण । अनन्यशरण रामदास ॥ ९ ॥

॥ १७८ ॥ मनुष्याची आशा तेचि पैं निराशा । एका जगदीशावांचुनीयां ॥ १ ॥ वांचुनीयां राम सर्वंहि विराम । नव्हे पूर्ण काम रामेवीण ॥ २ ॥ रामेवीण नव्हे हे कोणी कोणाचे । सर्वंहि मायेचें जायजणें ॥ ३ ॥ जायजणें ऐसें कोणासि नेणवे । वेळेसी जाणवे संकटींच्या ॥ ४ ॥ संकटाचे वेळे निजाचा सांगाती । राम आदिअंतीं रामदासी ॥ ५ ॥

॥ १७९ ॥ काय ते करावे संपत्तीचे लोक । जानकीनायक जेथें नाहीं ॥ १ ॥ जेथें नाहीं माझा श्रीराम समर्थ । त्याचें जिणें व्यर्थ कोटीगुणें ॥ २ ॥ कोटीगुणें उणें जिणें त्या नराचें । जानकीवराचें नाम नाहीं ॥ ३ ॥ नाम नाहीं मनीं नाहीं जो कीर्तनीं । तया कां जननी प्रसवली ॥ ४ ॥ प्रसवली जरी झाला भूमिभार । दुस्तर संसार उल्लंघेना ॥ ५ ॥ उल्लंघेना एका रामनामावीण । रामदासीं खूण प्रेमभावें ॥ ६ ॥

॥ १८० ॥ दासाची संपत्ति राम सीतापती । जीवाचा सांगाती राम एक ॥ १ ॥ राम एक माता राम एक पिता । राम एक भ्राता सहोदर ॥ २ ॥ सहोदर [१]विद्या [२]वैभव कांचन । सर्वंहि स्वजन राम एक ॥ ३ ॥ राम एक ज्ञान राम एक ध्यान । राम समाधान रामदासीं ॥ ५ ॥

॥ १८१ ॥ अनाथाचा नाथ देव तो कैवारी । सिंहासनावरी शोभतसे ॥ १ ॥ शोभतसे राम प्रतापी आगळा । दिसे सौम्य लीळा सत्वगुणी ॥ २ ॥ सत्वगुणी होय सात्विकाकारणें । कोपें संघारणें दुर्जनासी ॥ ३ ॥ दुर्जनसंहार सज्जनां आधार । भाविकांसी पार पाववितो ॥ ४ ॥ पाववितो पार या भवसिंधूचा । राघव दीनाचा दीनानाथ ॥ ५ ॥ दीनानाथ नाम पतितपावन । योगियां जीवन योगलीळा ॥ ६ ॥ लीळाविषधारी भक्ताचें माहेर । ध्यानीं गौरीहर चिंतीतसे ॥ ७ ॥ चिंतीतसे नाम राम पूर्ण काम । पावला विश्राम रामनामें ॥ ८ ॥ रामनामीं हर विश्रांती पावला । हें तें समस्तांला श्रुत आहे ॥ ९ ॥ श्रुत आहे व्यो-

---

१ भूषण. २ देवांचे. ३ उसणें. ४ सोबती. ५ संसारसागराचा. ६ श्रीशंकर.

मयोगाचें मंडण । संसारखंडण महाभय ॥ १० ॥ महाभय कैंचें रामासी भजतां । हें जाणे अन्यथा वाक्य नव्हे ॥ ११ ॥ नव्हे सोडवण रामनामावीण । रामदास ह्मण सांगतसे ॥ १२ ॥

॥ १८२ ॥ रामाचें चरित्र सांगतां अपार । जाहाला विस्तार तिहीं लोकीं ॥ १ ॥ तिही लोकीं हेंच वेहूनी दिधलें । तें आह्मां लाधलें कांहींएक ॥ २ ॥ कांहींएक पुण्य होतें पूर्वजाचें । पापीयासी कैंचें रामनाम ॥ ३ ॥ रामनामें कोटी कुळें उद्धरती । संशय धरिती तेचि पापी ॥ ४ ॥ पापीयाचें पाप जाय एकसरी । जरी मनीं धरी रामनाम ॥ ५ ॥ रामनाम काशी शिव उपदेसी । आधार सर्वांसी सर्व जाणे ॥ ६ ॥ सर्व जाणे अंतीं रामनामें गती । आणि वेदश्रुती गर्जताती ॥ ७ ॥ गर्जती पुराणें आणि संतजन । करावें भजन राघवाचें ॥ ८ ॥ राघवाचें ध्यान आवडे कीर्तन । तोचि तो पावन लोकांमाजीं ॥ ९ ॥ लोकांमाजीं तरे आणि जना तारी । धन्य तो संसारीं दास ह्मणे ॥ १० ॥

॥ १८३ ॥ क्षण एक चित्तीं राम आठविती । तणें उद्धरती कोटी कुळें ॥ १ ॥ कोटी कुळें वाट पहाती तयाची । आवडी जयाची रामनामीं ॥ २ ॥ रामनामें तुटे कुळाचें बंधन । पुत्र तो निर्वाण हरिभक्त ॥ ३ ॥ हरिभक्त एक जन्मला प्रल्हाद । जयाचा गोविंद कयवारी ॥ ४ ॥ कयवारी हरी राखे नानापरी ॥ ऐसा भाव धरी आत्मयारे ॥ ५ ॥ आत्मयारे हित विचारी आपुलें । सर्व नाथियेलें मायाजाळ ॥ ६ ॥ मायाजाळ दिसे दृष्टीचें बंधन । जाणती सज्ञान अनुभवी ॥ ७ ॥ अनुभवी संत सज्जन देखसी- तेथें राघवासी ठाईं पाडी ॥ ८ ॥ ठाईं पाडी राम जीवाचा विश्राम । जेणें सर्व काम पूर्ण होती ॥ ९ ॥ पूर्ण होती तुझे मनोरथ सर्व । राघवाचा भाव मनीं धरी ॥ १० ॥ मनीं धरी सर्व देवांचा कैवारी । ध्यातसे अंतरीं महादेव ॥ ११ ॥ महादेव सर्वजनां उपदेशी । रामीं रामदासी दृढभाव ॥ १२ ॥

॥ १८४ ॥ सोपें सुगम हें नाम राघोबाचें । सर्वकाळ वाचे येऊं द्यावें ॥ १॥ क्षण एक राम हृदयीं धरिजे । तेणें ते पाविजे निजसुख ॥ २ ॥ येऊं द्यावें वाचे नाम निरंतर । तेणें हा संसार तरिजेल ॥ ३ ॥ तरीजेल रामीं रामदास ह्मणें । सावधान होणें रामनामीं ॥ ४ ॥

॥ १८५ ॥ प्रातःकाळ झाला राम आठवावा । हृदयीं धरावा क्षणएक ॥ १ ॥ क्षणएक राम हृदयीं धरिजे । संसारीं तारिजे हेळामात्रें ॥२॥ हेळामात्रें रामनामें होय गती । भाग्यवंत घेती सर्वकाळ ॥ ३ ॥ सर्वकाळ राम मानसीं धरावा । वाचे उच्चारावा नामघोष ॥ ४ ॥ नामघोष वाचे श्रवण कीर्तन । चरणीं गमन देवालयीं ॥ ५ ॥ देवालयीं जातां सार्थक जाहलें । कारणीं लागलें कलिवरें ॥ ६ ॥ कलिवर त्वचा जोडूनि हस्तक । ठेवावें मस्तक राम पायीं ॥ ७ ॥ रामपायीं शिळा झाली दिव्य बाळा । तैसाचि सोहळा मानवांसी ॥ ८ ॥ मानवांसी अंतीं रामनामें गती । सांगे उमापती महादेव ॥ ९ ॥ महादेव सांगे जप पार्वतीसी । तोचि तो विश्वासीं रामदासीं ॥ १० ॥

---

१ सोलावृ. २ ठेवा. ३ खोटें. ४ लीलेनें सहज. ५ शरीर.

॥ १८६ ॥ विश्वासिला जेथें कैलासाचा राव । तेथें एक भाव दृढ धरी ॥ १ ॥ दृढ धरी भाव वाल्मिकाचि परी । सर्व ऋषीश्वरीं जाणिजेती ॥ २ ॥ जाणिजे वाल्मीकऋषिरामायण । तारिले पाषाण रामनामें ॥ ३ ॥ रामनामें उद्धारिली ती गणिका । नेली दिव्यलोका येचि देहीं ॥ ४ ॥ येचि देहीं गति पावली कुंटणी । रामनाम वाणी उच्चारितां॥ ५ ॥ उच्चारितां राम पूर्ण सर्वकाम । संसारींचा श्रम दूरी जाय ॥६॥ दुरीजाय श्रम आनंद मानसीं। रामीं रामदासीं दृढ भाव ॥ ७ ॥

॥ १८७ ॥ हरिभक्ती करी धन्य तो संसारीं । जयाचा कैवारी देवराणा ॥ १ ॥ देवराणा सदा सर्वदा मस्तकीं । तयासी या लोकीं चाड नाहीं ॥ २ ॥ चाड नाहीं जनीं राघवाचा दास। सार्थक वयेस रामदासीं ॥ ३

॥ १८८ ॥ धन्य त्याचें कुळ धन्य त्याचा वंश । जे कुळीं हरिदास अवतरे ॥ १ ॥ धन्य ते जननी धन्य तेचि कुशी । जे हरिप्रियासी प्रसवली ॥ २ ॥ धन्य ते संबंधी संतांचे सोइरे । सत्संगें उद्धरे कुळ त्यांचें ॥ ३ ॥ धन्य पैं तो ग्राम धन्य पैं तो देश । जेथें रहिवास वैष्णवाचा ॥ ४ ॥ धन्य त्यांचें सख्य वैष्णवीं सर्वदा । ते संगें गोविंदा जिवलग ॥ ५ ॥ धन्य ते भाविक वंदिती हरिदासा । तया हृषीकेशा वंदितसे ॥ ६ ॥ धन्य ते निंदक निंदिती सज्जन । येणें भावें ध्यान वडे त्यांसीं ॥ ७ ॥ धन्य दासी दास सज्जनसेवेसी । ते सुरवरांसी वंद्य होती ॥ ८ ॥ धन्य पशु श्वान वैष्णव घरींचे । कळिकाळ त्याचे पाय वंदी ॥ ९ ॥ रामदास ह्मणे तरी धन्य होणें । जरी संग लाधणें वैष्णवाचा ॥ १० ॥

॥ १८९ ॥ हरिभक्तिवीण जाऊं नये क्षण । या नांव लक्षण सार्थकाचें ॥ १ ॥ सार्थकाचें जिणें कथानिरूपणें । श्रवण मननें काळ गेला ॥ २ ॥ काळ गेला हरिभक्तीचेनि योगें । साधूचेनि संगें दास ह्मणे ॥ ३ ॥

॥ १९० ॥ सुपुत्र संसारीं कुळाचें मंडण । वंशउद्धरण हरिभक्त ॥ १ ॥ भक्ती तरताति बेतांळिस कुळें । भक्तांचेनि गुणें जगोद्धार ॥ २ ॥ जगोद्धार करी सुपुत्र संसारीं । येरें[३] अनाचारी पापरूप ॥ ३ ॥ पापरूपी नर अभक्त जाणावे । तयांसी नेणवे देवराणा ॥ ४ ॥ देवराणा वळे देखोनीयां भाव । दास ह्मणे माव कामा नये ॥ ५ ॥

॥ १९१ ॥ धाकुटाचि धुरु तो नव्हे लेंकरूं । जया सर्वेश्वरू प्रगटला ॥ १ ॥ प्रगटला देव तया उपमन्या । भावार्थे अनन्या क्षीरसिंधू ॥ २ ॥ क्षीरसिंधुवासी स्वयें नारायण । प्रऱ्हादरक्षण करितसे ॥ ३ ॥ करितो रक्षण दासासी संकटीं । त्याचें नाम कंठीं असों द्यावें ॥ ४ ॥ असों द्यावें सदा देवाचें चिंतन । गजेंद्र पावन नामघोषें ॥ ५ ॥

॥ १९२ ॥ आलिया देवासी वाट चुकलासी । ह्मणोनी आळसी संवसारीं ॥ १ ॥ संसाराचें दुःख करिसी रुदन । चुकलें भजन राघवाचें ॥ २ ॥ राघवाची भक्ती नेणव्युतां व्युत्पत्ती । तुज अधोगती जन्म झाला ॥ ३ ॥ जन्म झाला परी वेगें सोय धरी ।

---

१ आयुष्य. २ हरिभक्ताला. ३ देवश्रेष्ठांना. ४ वंदनाला योग्य. ५ कुत्रे. ६ इतर. ७ नरकवास.

सत्वर संसारीं मोकळीक ॥ ४ ॥ मोकळीक होय भक्तिपंथें जातां । वाक्य हें तत्त्वतां दास ह्मणे ॥ ५ ॥

॥ १९३ ॥ विषयकरदन सोडूनियां यावें । नित्य नित्य जावें संतसंगें ॥ १ ॥ संतसंगें बापा होई रे निश्चळ । मग तळमळ विसरसी ॥ २ ॥ विसरसी दुःख संताचे संगतीं । चुके अधोगती गर्भवास ॥ ३ ॥ गर्भवास आतां चुकवी आपुले । धरावीं पाउलें राघवाचीं ॥ ४ ॥ राघवाचे भक्त राघवीं मिळती । भेटे सीतापती दास ह्मणे ॥ ५ ॥

॥ १९४ ॥ माता पिता जन स्वजन कांचनें । प्रिया पुत्रीं मन गोवूं नये ॥ १ ॥ गोवूं नको मन राघवावांचूनी । लोकलाज जनीं लागलीसे ॥ २ ॥ लागलीसे परि तुवां न धरावी । स्वहितें करावी रामभक्ती ॥ ३ ॥ रामभक्तीवीण होशील हिंपुटी । येकलें शेवटीं जाणें लागे ॥ ४ ॥ जाणें लागे आतां बाळा सुलक्षणा । ध्याईं रामराणा दास ह्मणे ॥ ५ ॥

॥ १९५ ॥ माझे मनीं सर्व सुख व्हावें तुज । ह्मणोनीयां गुज सांगतसें ॥ १ ॥ सांगतसें हित तें जीवीं धरावें । भजन करावें राघोबाचें ॥ २ ॥ राघोबाचें प्रेम तें करी विश्राम । येर सर्व श्रम जाण बापा ॥ ३ ॥ जाण बापा वचन हें माझें प्रमाण । वाहतसें आण राघवाची ॥ ४ ॥ राघवाची भक्ती ते माझी विश्रांती । असों यावी चित्तीं दास ह्मणे ॥ ५ ॥

॥ १९६ ॥ राघवाचें नाम राखशील जरी । तुज राखे तरी रामराणा ॥ १ ॥ रामराणा माझे जिवींचें जीवन । आवडीनें ह्मण सांगतसें ॥ २ ॥ सांगतसें ह्मण माझे अंतरींची । सर्वहि सुखाची सुखमूर्ती ॥ ३ ॥ सुखमूर्ती राम सांडूं नको कदा । तुज तो आपदा लागों नेदी ॥ ४ ॥ लागों नेदी कष्ट आपुल्या दासासी । रामीं रामदासीं साहाकारी ॥ ५ ॥

॥ १९७ ॥ रानीं मनीं वनीं राम असो यावा । करील कुडावा सेवकाचा ॥ १ ॥ सेवकाचा भार घेतसे साचार । ह्मणोनि अंतर पडों नेदीं ॥ २ ॥ पडों नेदी शब्द माझा भूमीवरी । दृढ चित्तीं धरी देवराणा ॥ ३ ॥ देवराणा सर्व देवां सोडविता । लागलीसे चिंता त्यास तुझी ॥ ४ ॥ तुझी चिंता करी राजा अयोध्येचा । कृपाळु दीनाचा दास ह्मणे ॥ ५ ॥

॥ १९८ ॥ कोणाचें हें घर कोणाचा संसार । सांडुनी शरीर जाणें लागे ॥ १ ॥ जाणें लागे अंतीं एकलें एकटें । व्यर्थ खटपटें जन्मवरी ॥ २ ॥ जन्मवरी देह संसारीं गोविलें । नाहीं कांहीं केलें आत्महित ॥३॥ आत्महित केलें संसाराचे वोढीं । अंतीं कोण सोडी रामावीण ॥ ४ ॥ रामावीण कोणी सोडविना अंतीं । वायांचि रडती जीवलगें ॥ ५ ॥ जीवलग राम दूरी दुरावला । विचार आपुला जाणवेना ॥ ६ ॥ जाणवेना पूर्व सुकृतावांचुनी । पापियाचे मनीं राम कैंचा ॥ ७ ॥ राम कैंचा जया लौकिकाची चाड । पुरविती कोड संसाराचें ॥ ८ ॥ संसाराचें कोड तेंचि वाटे गोड । जया नाहीं चाड अनुतापीं ॥९॥ अनुतापी जाले

---

१ सुवर्ण. २ कष्टी, दुःखी. ३ संकट, दुःख. ४ संरक्षण ५ पुण्यावांचून.

संसारीं मूटले । राजे राज्य गेले सांडोनियां ॥ १० ॥ सांडोनियां गेले वैभव संपत्ती । पुढें यातायातीचेनि भेणें ॥ ११ ॥ भेणें ते शरण निघाले देवासी । नेले वैकुंठासी भक्तराज ॥१२॥ भक्तराज भावें भेटले देवासी । रामीं रामदासीं धन्य वेळ ॥ १३ ॥

॥ १९९ ॥ आपुलीं पारखीं सर्व पारखिलीं । नाहीं कामा आलीं रामविणें ॥ १ ॥ रामविणें जाण सर्वहि पिसुण । मायेचें कारण नाथिलेंचि ॥ २ ॥ नाथिलेंचि आहे जनाचें साजणें । तृणाचें तापणें तयापरी ॥ ३ ॥ तयापरी ऐसा निश्चय जाणावा । सतीचा बोलावा लोक आहे ॥ ४ ॥ लोक बहु रंग जाणुनि बोरंग । रामदास संग सांडियेला ॥ ५ ॥

॥ २०० ॥[१]सुखाचे सांगाती सर्वही मिळती । दुःख होतां जाती निघोनियां ॥ १ ॥ निघोनियां जाती संकटाचे वेळे । सुख होतां मिळे समुदाय ॥ २ ॥ समुदाय सर्व देहाचे संबंधी । तुटली उपाधी रामदासीं ॥ ३ ॥

॥ २०१ ॥ मूर्ख तो संसारीं माझें माझें करी । मृत्यु बरोबरी हिंडतसे ॥१॥ हिंडतसे काळ सांगातीसरिसा । मनीं भरवंसा नेणोनीयां ॥ २ ॥ नेणोनीयां प्राणी संसारासी आला । आला तैसा गेला दैन्यवाणा ॥ ३ ॥ दैन्यवाणा गेला सर्वही सांडूनी । ठेवील जोडूनि जनालागीं ॥ ४ ॥ लागहि लागले दोषचि सुटेना । अभक्ति तुटेना अंतरींची ॥ ५ ॥ अंतरींची मूर्ति अंतरली द्वारीं । कदाकाळीं हरी आठवीना ॥ ६ ॥ आठवीना अंतकाळीं रामाविण । धन्य तें मरण दास ह्मणे ॥ ७ ॥

॥ २०२ ॥ काया हे काळाची घेवोनी जाणार । तूझेनी होणार काय बापा ॥ १ ॥ काय बापा ऐसें जाणोनी नेणसी । मी मी ह्मणतोसि वायांविण ॥ २ ॥ वायांविण शीण केला जन्मवरी । केली लोकाचारी नागवण ॥ ३ ॥ नागवण आली परलोका जातां । स्वहिताची चिंता केली नाहीं ॥४॥ केली नाहीं चिंता नामीं कानकोंडे । अंतीं कोण्या तोंडे जात असे ॥ ५ ॥ जात असे सर्व सांडोनि करंटा । जन्मवरी ताठा धरुनीयां ॥ ६ ॥ धरुनीयां ताठा कासया मरावें । भजन करावें दास ह्मणे ॥ ७ ॥

॥ २०३ ॥ चंद्रासी उद्वेग सर्वकाळ मनीं । माझें पद कोणी घेईना कीं ॥१॥ घेईना कीं कोणी बळिया दानव । घालिना कीं देव कारागृहीं ॥ २ ॥ कारागृह देवादिकांचें चुकेना । तेथें काय जना चुकवेल ॥ ३ ॥ चुकवेल भोग हें कांहीं घडावें । लागेल भोगावें केलें कर्म ॥ ४ ॥ केलें कर्म सुटे जरी भ्रांती फिटे । दास ह्मणे भेटे संतजनां ॥ ५ ॥

॥ २०४ ॥ रावणासारिखी कोणाची संपती । तोहि गेला अंतीं एकलाची ॥ १ ॥ एकलाचि गेला वाळि तो वानर । कपि थोर थोर तेहि गेले ॥ २ ॥ गेले चक्रवर्ती[४] थोरा वैभवाचे । फार आयुष्याचे ऋषेश्वर ॥३॥ ऋषेश्वर गेले मार्कंडासारिखे । इतरांचे लेख कोण करी ॥४॥ कोण करी सर्व शाश्वत आपुलें । सर्व राज्य गेलें कौरवांचें ॥ ५ ॥ कौरव निमाले[५] पांडव गळाले॥ यादवहि गेले एकसरें ॥ ६ ॥ एकसरें गेले राजे थोर थोर । आणिक श्रीधर भाग्यवंत ॥ ७ ॥ भाग्यवंत गेले एकामागें एक । हरिश्चंद्रादिक पुण्यशीळ ॥८॥ पुण्यशीळ गेले कीर्ति ठेऊनिया । पापी गेले वायां अधोगती ॥९॥ अधोगती गेले देवा न भजतां । संसारीं ह्मणतां ह्मणतां माझें

१ उपसर्ग, संबंध. २ सोबत्याप्रमाणें. ३ संकुचित. ४ सार्वभौम. ५ नाहींसे झाले.

॥ १० ॥ माझें माझें करी साचाचिये परी । अंति दुराचाची एकलाची ॥ ११ ॥ एकलाची येतां एकलाची जातां । मध्येंचि दुश्चिता मायाजाळ ॥ १२ ॥ मायाजाळीं पापीजन गुंडाळले । पुण्यशीळ गेले सुटोनीयां ॥१३॥ सुटोनीयां गेले सायुज्यपदासी । रामीं रामदासीं चिरंजीव ॥ १४ ॥

॥ २०५ ॥ स्वप्न हा संसार मायिक वेव्हार । ह्मणोनि साचार मानूं नये ॥ १ ॥ मानूं नये सर्व जायाचें आपुलें । त्याचें त्याणें नेलें दुःख काय ॥ २ ॥ दुःख काय आतां स्वप्नसुख जातां । साच तें तत्त्वतां दृढ धरा ॥ ३ ॥ दृढ धरा मनीं जानकीजीवन । तेणें समाधान पावशील ॥४॥ पावशील सुख स्वरूप आपुलें । जरी तें घडलें रामदास ॥ ५ ॥

॥ २०६ ॥ रामदासा घडे बहुतां सुकृतें । कांहीं पुण्य होतें पूर्वजांचें ॥१॥ स्वप्नींच्या सुखानें सुखावला प्राणी । थोर झाली हाणी जागृतीसी ॥ २ ॥ जागृतीस नाहीं स्वप्नींचें तें सुख । तेणें झालें दुःख बहुसाल ॥ ३ ॥ बहुसाल खेद मानिला अंतरीं । वायां झडकरी जागा जाला ॥ ४ ॥ जागा झाला ह्मणे वायां अवचिता । निजोनी मागुता सुख पाहे ॥ ५ ॥ सुख पाहे पुन्हां स्वप्नीं तें ना दिसे । भयानक दिसे प्राणियासी ॥ ६ ॥ प्राणियासी दुःख जाहलें मागुतें । जागा जालिया तें सर्व मिथ्या ॥ ७ ॥ मिथ्या सुख दुःख स्वप्नींचा वेव्हार । तैसा हा संसार नाथिलाचि ॥ ८ ॥ नाथिलाचि जाय क्षण आनंदाचा । सर्वेंची दुःखाचा क्षण क्षण आहे ॥९॥ क्षण एक मन राघवीं सावध । तेणें नव्हे खेद दास ह्मणे ॥ १० ॥

॥ २०७ ॥ सुख पाहों जातां कांहींची ना दिसे । संसार हा असे दुःखमूळ ॥ १ ॥ दुःखामुळें जन्म नरा आणि नारी । पाहतां संसारीं सुख नाहीं ॥ २ ॥ सुख नाहीं कदा शाश्वतावांचोनी । जाणतील ज्ञानी दास ह्मणे ॥ ३ ॥

॥ २०८ ॥ स्त्रियांचें हो जिणें पराधीन झालें । पुरुषें विकीलें आपणासी ॥ १ ॥ आपण विकीलें या पोटाकारणें । पराधीन जिणें सहजची ॥ २ ॥ सहजची झालें सर्व पराधीन । सत्याचि वचन दास ह्मणे ॥ ३ ॥

॥ २०९ ॥ वासनेची झाडी कुबुद्धि वांकुडी । वाजे हुडहुडी ममतेची ॥ १ ॥ वैराग्याचा वन्हीं[3] विझोनिया गेला । संचित खायाला पुण्य नाहीं ॥ २ ॥ भक्ति पांघरूण तें माझें सांडलें । मज वोसंडीलें[4] संतजनीं ॥ ३ ॥ नामसंजीवनी मुखिं नाहीं पाणी । निंदेची पोहोणी प्रबळेची ॥ ४ ॥ रामदास ह्मणे ऐसियाचें जिणें । सदा दैन्यवाणें रामेंवीण ॥ ५ ॥

॥ २१० ॥ लोभाचे बिराडीं कामी घाली उडी । वायांची वेंगडी वळतसे ॥ १ ॥ सदा भक्तीवीण जालें उपोषण । झड घाली अन्न खावयासी ॥ २ ॥ मायाजाळें आगी सुटली अंतरीं । पराघरीं चोरी करीतसे ॥ ३ ॥ अंगही चोरितां अंगही सुजलें । नाहीं भीजवीलें रामालागीं ॥ ४ ॥ रामदास ह्मणे प्राणी भक्ती उणे । तैयालागीं सूणें आतळेनां ॥ ५ ॥

॥ २११ ॥ रात्रंदिवस मन राघवीं असावें । चिंतन नसावें कांचनाचें ॥ १ ॥ कांचनाचें ध्यान परस्त्रीचिंतन । जन्मासी कारण हेचि दोनी ॥ २ ॥ दोनी नको धरूं नको निंदा करूं ।

---

१ पुण्याचे योगानें. २ जीवित. ३ अग्नि. ४ टाकिलें. ५ कुत्रें. ६ शिवत नाहीं.

तेणें हा संसारु तरसील ॥ ३ ॥ तरसील भवसागरीं बुडतां । मन्य या अनंताचेचि नामें ॥ ४ ॥ नामरूपातीत जाणावा अनंत । दास ह्मणे संतरंग धरा ॥ ५ ॥

॥ २१२ ॥ ब्रह्मा विष्णु रुद्र जयाचे अवतार । तोचि देव थोर जाण बापा ॥ १ ॥ जाण बापा देव देवासी निर्मिता । देव तो तत्त्वतां ठाइ पाडी ॥ २ ॥ ठाईं पाडी देव संताचे संगतीं । दास ह्मणे गती पावशील ॥ ३ ॥

॥ २१३ ॥ मर्यादा सागरा आणि दिनकरा । अंतरिक्ष तारा जयाचेनी ॥ १ ॥ जयाचेनी मेघ पडे भूमंडळीं । पिके यथाकाळीं वसुंधरा ॥ २ ॥ वसुंधरा बहु रंग विस्तारिली । जीवसृष्टी झाली जयाचेनी ॥ ३ ॥ जयाचेनी सर्व सृष्टि चालताहे । तयालागीं पाहे शोधूनियां ॥ ४ ॥ शोधूनियां पाहे देव सर्व कर्ता । तरिजे आवर्ता जयाचेनी ॥ ५ ॥ जयाचेनी भक्ती जयाचेनी मुक्ती । जयाचेनी युक्ती वादतसे ॥ ६ ॥ संतसंग जया मानवा आवडे । तेणें गुणें घडे समाधान ॥ ७ ॥ समाधान घडे सज्जनाचे संगें । स्वरूपाच्या योगें रामदासीं ॥ ८ ॥

॥ २१४ ॥ ज्याच्या निरूपणें संदेह फिटती । त्या गती संगती सज्जनाची ॥ १ ॥ दुर्जनाची कळा सज्जनाचे परी । मर्यादाची सरी ब्राह्मणासी ॥ २ ॥ ब्राह्मणासी नाहीं सर्वदा मत्सर । शुद्ध निरंतर दास ह्मणे ॥ ३ ॥

॥ २१५ ॥ जया जैशी गती तया तैसी संगती । समागमें रीती सर्व कांहीं ॥ १ ॥ सर्व कांहीं घडे संगतीच्या गुणें । साधूंचीं लक्षणें साधुसंगें ॥ २ ॥ साधुसंगें साधू होईजे आपण । रामदास खूण सांगतसे ॥ ३ ॥

॥ २१६ ॥ दुर्लभ हा जन्म विशेष नरदेह । याहीवरी सोय राघवाची ॥ १ ॥ राघवाची सोय सद्भावें भजन । आणि संतजन समागमीं ॥ २ ॥ समागमीं संत श्रवणीं निर्वाण । अनंताचा अंत ठाईं पडे ॥ ३ ॥ ठाईं पडे देव संतसमागमें । आपल्या स्वधर्में पुण्यशीळ ॥ ४ ॥ पुण्यशीळ देह ज्ञानी निःसंदेहें । सर्वकाळ राहे स्वस्वरूपीं ॥ ५ ॥ स्वस्वरूपीं मन गेलिया उन्मन । मन मिथ्या भान आदळेना ॥ ६ ॥ आदळेना कदा मिथ्या मायाजाळ । तोचि तो केवळ समाधानी ॥ ७ ॥ समाधानी साधू जेथें ज्ञानबोध । रामदासीं वेध निर्गुणाचा ॥ ८ ॥

१ साधूंच्या ठिकाणीं प्रीति. २ सूर्याला. ३ पृथ्वी. ४ संसारचक्राला.

*

# रामदासकृत रामायण

## किष्किन्धाकांड

### श्लोक.

गणेशा इशा हा परेशा उदारा । सुरेशा नरेशा सदा सौख्यकारा ।
मनीं चिंतितां कामना पूरताती । असे सत्य नेमस्त माझी प्रचीती ॥ १ ॥
नमो शारदा सर्वसंगीतमूर्ती । महा हंसलीला कळा सर्व कर्ती ।
जयाला दया देतसे स्फूर्ति फूटे । बहू घोर संसारिंचें मूळ तुटे ॥ २ ॥
नमो साधुसंतां महंतां महंतां । सदा निश्चयो वीतरागी सतंता ।
भवीं बूडतां दीन तात्काळ काढी । तया वर्णवेना मला बुद्धि थोडी ॥ ३ ॥
अनिर्वाच्य वाचेसि कैसें वदावें । अतर्क्यासि तर्कें कसें आकळावें ।
अवीनाश कोंदाटलें सर्वठायीं । मुदा ज्ञान होतांचि त्या स्वामिपायीं ॥ ४ ॥
नमो रामराया कथारंग राया । बहू वर्णितां स्फूर्ति दे देवराया ।
मुनीकाव्य हें भव्यशोकापहारी । हरा मानसीं ध्यास हा सौख्यकारी ॥ ५ ॥
चरित्रें रघूनाथजीचीं अपारें । मनोरम्य विस्तारलीं सौख्यकारें ।
तयांमाजिं तूं एक एकाक्षरासी । वदे पार नाहीं तया सुकृतासी ॥ ६ ॥
जगन्नाथ हा राम कैवल्यदाता । घडे वीघडे सर्व याचीच सत्ता ।
जनाचे मनीं हीत तें हेतु जाण । परी वर्तवीतो भवीं थोर मानें ॥ ७ ॥
रघूनाथ लक्ष्मूमणू आणि सीता । वनीं वास तीघांस निःशेष होता ।
पुढें जानकी चोरिली रावणानें । बहू शोक केला रघूनायकानें ॥ ८ ॥
वनीं रामलक्ष्मूमणू हिंडताती । सिता रावणें चोरिली धुंडिताती ।
अकस्मात तेव्हां सुचे राघवासी । विचारूं ह्मणे आदरें सुग्रिवासी ॥ ९ ॥
ऋषीमूख माहागिरी पैल पाहे । कपीराज नीळांगि तेथेंचि आहे ।
कदाचीत त्या पूस आसेल ठावें । सुमित्रा तयालागीं वार्तू पुसावें ॥ १० ॥
चलावें समर्था ह्मणे ब्रह्मचारी । महावीर जाताति ते पंथहारी ।
बहू झाडखंडें प्रचंडें उदंडें । अखंडें अखंडेंचि बंडें उदंडें ॥ ११ ॥
बहू थोर झाडी तयामाजिं आले । त्वरें सर्व लंघूनि पंपेसि गेले ।
तरू सुंदरू रम्य छाया बसाया । ह्मणे शेष यातेंचि या देवराया ॥ १२ ॥
सुकूमार पायीं कदाही न चाले । बहू हिंडतां हिंडतां कष्ट जाले ।
अशा कारणें राम पंथीं निजेले । अकस्मात ते सुग्रिवें देखियेले ॥ १३ ॥
स्वयें योगधारी मना सौख्यकारी । महावीर हा कोण कामाधिकारी ।

---

१ इच्छा. २ अनुभव. ३ राजहंसाप्रमाणें आनंदकारक आहे लीला-क्रीडा जिची अशी. ४ रहावा ह्मणून. ५ पुण्याला. ६ मोक्ष देणारा. ७ संसारांत. ८ वार्ता. ९ पंपासरोवराला. १० लक्ष्मण. ११ मदनाहूनहि सुंदर.

मनीं वाटतें वाळिनें धाडिले हे । भयाभीत होऊनि चक्राति पाहे ॥ १४ ।
हनुमंत बोले तया सुग्रिवासी । नव्हे हो तसे साश्र येते मनासी ।
कळेना लिळा दीसती सौख्यवासी । असें वाटतें साह्य आलें तुह्मांसी ॥ १५ ॥
तें सुग्रीव बोले तरी जाय आतां । मनांतील घेऊनियां बुद्धि आतां ।
तया धाडिलें राम सौमित्र जेथें । स्वयें चालिला शीघ्र तो दूरि पंथें ॥ १६ ॥
हनुमंत दूरूनि येऊनि पाहे । सुमित्रासुतू सिद्ध तो बैसलाहे ।
रघूराय मांडीवरी सौख्यकारी । पुढें बोलतां जाहला तो वनारी ॥ १७ ॥
रुपें योगमूर्ती धनुर्बाण हातीं । वयें बाळलीला फिरा कां दिगंतीं ।
पुढें कोठपर्यंत जाणें तुह्मांसी । अहो कोण ऐसें वदा निश्चयेंसीं ॥ १८ ॥
कपी कोण तूं पूससी कासया रे । मला सांग साकल्य तूं सर्व सारें ।
प्रसंगीं फणी बोलतो तो स्वभावें । प्रिती मारुती जाणवी सर्व भावें ॥ १९ ॥
प्रभू अंजनीमाय बा बा कपीची । पिता तत्त्वतां वायु माझा तसाची ।
पुसाया तुह्मां सुग्रिवें पाठवीलें । समर्थाप्रती सर्व म्यां जाणवीलें ॥ २० ॥
प्रतीउत्तरें बोलता शेष जाला । कपी ऐक रे सांगतों सर्व तूला ।
जनीं सूर्यवंशीं नृपाधीक राजे । बहु कीर्तिचा घोष अद्भुत गाजे ॥ २१ ॥
तया वंशिंचे दोन हे बंधु पाहे । रघूनाथ लक्ष्मूमणू नांव आहे ।
पिता धाडिता जाहला त्यां वनासी। निघालों जनीं पंथिं या सौख्यरासी ॥ २२ ॥
सदा सर्वदा संतसेवा घडावी । अखंडीत वृत्ती पदीं या जडावी ।
सवें चालिलों आवडी राम जातां । जगन्माय हीं जानकी विश्वमाता ॥ २३ ॥
वनीं वास तीघांस कीतेक काळीं । सिता रावणें चोरिली भूमिबाळी ।
तयेकारणें धुंडितों लागवेगें । किती फीरतों शुद्धि कोठें न लागे ॥ २४ ॥
महावीर तुह्मी धनुर्बाणधारी । करूं दीधली रावणा केविं चोरी
तयालागिं तो शेष साकल्य बोले । न चालेचि येऊनि कापत्य केलें ॥ २५ ॥
सुवर्णाचिया त्या मृगालागिं तेणें । चरायासि तें धाडिलें रावणानें
जगन्माय ती बोलली राघवासी । दिजे कंचुकी स्वामिनें आपणासी ॥ २६ ॥
उठे शीघ्र धांवे मृगाच्याच पाठीं । शरें मारि त्या राम कंदर्पकोटी ।
अकस्मात जाला ध्वनीघोष तेथें । मला धाडि श्रीजानकी त्याच पंथें ॥ २७ ॥
महाथोर गुंफा तयेमाजि सीता । त्वरें भोंवतीं घातली रेघ जातां ।
पुढें रावणें याचकी वेष केला । तिथें भीक मागावया शीघ्र आला ॥ २८ ॥
न चालेचि कांहीं पुढें जाववेना । तया जानकीतें कदा नेववेना ।
करूणास्वरें उत्तरें फार बोले । दयें घालितां भीक तत्काळ नेलें ॥ २९ ॥
मृगा मारिलें राघवें बाणघातें । गृहामाजि येतां न देखे सितेतें ।
जरी भेटता रावणू पापरूपी । नसे प्राप्ति ब्रह्मादिकां गोष्टि सोपी ॥ ३० ॥

१ लक्ष्मण. २ हनुमंत. ३ सीता. ४ तपास. ५ संपूर्ण. ६ भिकाऱ्याचा.

महा विक्रमू राघवाचा कळेना । रणामाजि हो ठाण ज्याचें चळेना ।
पुरुषार्थ सांगीतला सर्व कांहीं । वदे मागुती देखिलें त्यासि नाहीं ॥ ३१ ॥
जयें सर्व क्षत्रांस निर्भूत केलें । धरित्रीवरी नांव तेंही न चाले ।
तया भार्गवा राघवें जिंकियेलें । कळेना तुला नेणती तूं कपीरे ॥ ३२ ॥
हनूमंत वीचारितो अंतरेसीं । वयें बाळलीला वदे विक्रमासी ।
तरी यावरी वृक्ष घालूनि पाहूं । असे भाउंनी झेलिला ऊर्ध्व बाहु ॥ ३३ ॥
बहू थोर झाडें झुबाडेंचि खोडें । करी मोडता जाहला तें कडाडें ।
अकस्मात टाकी रघूनाथ जेथें । शरें शीघ्र वारी सुमित्र तयांतें ॥ ३४ ॥
कपी मागुता मागुता थोरथोरें । बळें वृक्ष घेऊनियां भूभुकारें ।
वरी टाकितां शेष वारी तयांतें । विचारी मनीं काय कीजे अशातें ॥ ३५ ॥
रघूनायकाला बहु झोंप आली । कपी मागुता मागुता वृक्ष घाली ।
जया हालतां बोलतां चालतांही । करी प्रेत्न नाना न चालेचि कांहीं ॥ ३६ ॥
म्हणावी दटावी तयातें उठावी । पुढें मागुता वृक्ष पून्हां उठावी ।
धबाबां बहूसाल पाषाण टाकी । वरीच्यावरी वीर बाणेंचि झोंकी ॥ ३७ ॥
बहू वृक्षपाषाण नानापरींचे । कडे टाकिले मोठमोठे गिरींचे ।
परी अल्प रामावरी येउं देना । महावीर हा शेष लक्षीं चुकेना ॥ ३८ ॥
बहु वारितां वारितां ढीग झाले । गिरीचेपरी दूर होऊनि ठेले ।
मनामाजि चक्कीत जाला वनारी । पुरावा करी तीतुकाही निवारी ॥ ३९ ॥
बहू घोष वीशेष कित्येक केलें । कडाडां तरू मोडिले चूर केले ।
न चाले कपीचें नसे वृक्ष माथा । नसे तूळणा तूळितां त्या समर्था ॥ ४० ॥
बहूसाल म्यां मानसीं गर्व केला । भला वीर सौमित्र तो देखियेला ।
पहा एक तो धाकुटा वीर्यसिंधू । प्रभू राम निद्रिस्त हा दीनबंधू ॥ ४१ ॥
कपीही उगा बैसला स्थीर राहे । महावीर लक्ष्मूमणू त्यासि पाहे ।
दिनोद्धारेंणें सांग विश्रांति केली । प्रसंगीं उठाया तया वेळ आली ॥ ४२ ॥
रघूनायकालागिं जागर्ति जाली । कपीवृक्षमाथ्यावरी दृष्टि गेली ।
सुवर्णें कसी कांस वीराजताहे । सुमित्रा ह्मणे राम आश्चर्य पाहे ॥ ४३ ॥
हनूमंत ऐकूनि विस्मीत ठेला । वदे अंजनी तोचि हा स्वामि आला ।
मनामाजि वीचारिलें आदरेंशीं । नमस्कार साष्टांग केला प्रभूसी ॥ ४४ ॥
पदीं मस्तकू ठेविला शीघ्र भावें । वरू दीधला स्वामिदेवाधिदेवें ।
कृपाळूपणें राम बोले तयासी । कपी वज्रदेही चिरंजीव होसी ॥ ४५ ॥
महामस्तकीं हस्त सीतापतीचा । जयाच्या वरा यत्न नाहीं विधीचा ।
शशी सूर्य तारागण सृष्टि आहे। चिरंजीव केलें सदा वज्रदेहें ॥ ४६ ॥
कपीमानसीं सूख ऊदंड जालें । दयासागरें राघवें थोर केलें ।

---

१ पराक्रम. २ क्षत्रियांस. ३ पृथ्वीवर. ४ परशुरामाला. ५ कल्पून. ६ लक्ष्मण. ७ यत्न. ८ मारुति. ९ वृक्ष. १० दीनांच्यां उद्धारकर्त्या रामानें. ११ दैवाचा. १२ चंद्र.

बहुसाल आनंदला राम तोषें । कपी लाधला भाव त्याचा विशेषें ॥ ४७ ॥
पुढें मारुती स्तुति उदंड बोले । ह्मणे धन्य कीं भाग्य हें दीन आलें ।
परी हीन जे दीन त्या उद्धरीलें । रघूनाथ हा ब्रीद साचार केलें ॥ ४८ ॥
दयाळा तुझीये दयेवीण कांहीं । महायत्न केले तुझी भेट नाहीं ।
परी स्वप्नसें भासतें या मनाला । नसे पुण्य कीं सौख्य जालें दिनाला ॥ ४९ ॥
प्रभू अंजनीला पुसे लागवेगें । पुढें अंजनी सर्वहि खूण सांगे ।
तुझी काम जाणेल तो स्वामि तूझा । तयारंभि ऊतावळा प्राण माझा ॥ ५० ॥
गिरीशीखरें थोरथोरें अपारें । वनें भूवनें पावनें सौख्यकारें ।
बहु हिंडलों धुंडिले ओळखाया । परी दिससी तूं न गा देवराया ॥ ५१ ॥
बहू आवडी तांतडी लोचनांला । वदे कार्य कांहीं कळेना जनाला ।
अवस्था मनीं आसतां प्राप्ति नाहीं । न वाटे समर्था प्रभू गोड कांहीं ॥ ५२ ॥
अकस्मात ते मात कित्येक काळीं । प्रभू राम आला ऋषीराजमेळीं ।
अहल्या पदीं दिव्य होऊनि गेली । समर्था बहु कीर्ति विख्यात जाली ॥ ५३ ॥
अहा सत्य हें वाटलें सौख्य जीवा । उभा राहुं पाहें आतां पूर्व ठेवा ।
परी अंतरीं धीर केला धरेना । बहुसाल वीयोग पापी सरेना ॥ ५४ ॥
पहाया समर्था बहू यत्न केला । नव्हे साध्यता सर्वही व्यर्थ गेला ।
अतां पूर आला कृपेचा दयाळा । तरी प्राण हा सर्वहि तृप्त झाला ॥ ५५ ॥
यथार्थेंचि वाक्या वदे तो वनारी । कृपाउत्तरें सौख्य दे रावणारी ।
बहू गोड वाणीं समाधान केलें । प्रसंगीं कपीला सुधापान झालें ॥ ५६ ॥
पुढें शेषपायांवरी शीघ्र माथा । त्वरें ठेवितां ऊठवी रामभ्राता ।
बहुतांपरी उत्तरें गौरवीला । कपी मानसीं हर्ष ऊदंड जाला ॥ ५७ ॥
पुढें राघवालागिं सौमित्र सांगे । कपी सुग्रिवाचा गिरी पैल शृंगें ।
तयें धाडिलें यासि शुद्धीस आहे । पुसाया तयालागीं तो राम बाहे ॥ ५८ ॥
कसा गा कपी तो कपीराज कोठें । कसा शीघ्र आह्मांसि येऊनि भेटे ।
सिता ठाउकी कीं तयालागिं नाहीं । प्रतीउत्तरू बोलतो भीमदेही ॥ ५९ ॥
हनुमंत बोले पुसावें तयाला । श्रुता ती मला नाहीं वार्ता दयाळा ।
परी वर्तमानासि तो दीनबंधू । ह्मणे काय रे काय रे सौख्यसिंधू ॥ ६० ॥
महाभीम बोले रघूनायकासी । करा सौख्य तें आदरें सुग्रिवासी ।
करी सर्वही साह्यता तो स्वभावें । परी साह्य आधीं तयाचें करावें ॥ ६१ ॥
त्वरें जाय घेऊनि ये त्यांसि आतां । भयाभीत होऊं नको सोडि चिंता ।
ह्मणावें तुझें ऊसणें सर्व घेतों । पुढें राज्य कांता तुझी तूज देतों ॥ ६२ ॥
उडाला कपी साक्षपें भीमरूपी । त्वरें सुग्रिवा सर्व वार्ता समर्पी ।
बरा काळ आला तुझा भोग गेला । भलें सांगतों भेट त्या राघवाला ॥ ६३ ॥

१ मारुती. २ राम. ३ अमृतप्राशन ४ पुष्कळ. ५ भयंकर देह धारण करणारा (मारुती) ६ सख्य, मैत्री.

महावीर हे धीर मोठे प्रतापी । रणीं भीडतां दीसती काळरूपी ।
तयाचे पुढें वाळि तो काय कीती । तुला साक्ष होती पहावी प्रेचीती ॥ ६४ ॥
महा विक्रमू सांगती थोर त्यांचा । नसे अल्पही लेश तो दूरिताचा ।
तरी त्यांसि येथेंचि घेऊनि यावें । मनांतील दीसेल सर्व स्वभावें ॥ ६५ ॥
पुन्हां अंजनीसूत येऊनि पाहे । रघूनाथ लक्ष्मण बैसलाहे ।
समर्था दिनालागिं ह्या थोर कीजे । उदासीन त्या सुग्रीवाला न कीजे ॥ ६६ ॥
दयाळू ह्मणे गा बरें जाऊं आतां । त्वरें चालिला त्या गृहाच्यानि पंथा ।
हनुमंत जाऊनि साकॅल्प सांगे । त्वरें बाहिरा येतसे लागवेगें ॥ ६७ ॥
अलंकार भांगार त्या जानकीचा । बहू रम्य लावण्य नानापरीचा ।
दशग्रीव लंकेसि नेते प्रसंगीं । जगन्माउली भूषणें सर्व त्यागी ॥ ६८ ॥
अकस्मात् ते सुग्रिवा प्राप्त झाले । गृहामाजि पेटींत घालूनि ठेले ।
प्रसंगीं रघूनाथभेटी निघाले । अलंकार घेऊनि सन्मूख आले ॥ ६९ ॥
अती आदरें भेटला राघवासी । नमस्कार साष्टांग केला प्रभूसी ।
कृपाळूपणें राघवें ऊठवीला । सुमित्रासुतेंही बहू गौरवीला ॥ ७० ॥
पुढें बैसले सर्वेही स्वस्थ झाले । अती आदरें राम मंजूळ बोले ।
तुला आणि वाळीस वीरोध जाला । कशा कारणें काय अन्याय केला ॥ ७१ ॥
कृपाळूपणें ऐक तूं रामराजा । कपीराज बोले यथार्थेंचि वोजा ।
बहू राक्षस थोर मायावि आला । तयें वाळिशीं थोर संग्राम केला ॥ ७२ ॥
बहु झुंजतां झुंजतां तो पळाला । महा एक गूहेंमधें शीघ्र गेला ।
तया पाठिशीं धांवला शीघ्र वाळी । मला ठेविलें रक्षणा तेचि काळीं ॥ ७३ ॥
पुढें युद्ध दोघांसि ऊदंडें झालें । बहु रक्त तें मांस बाहेर आलें ।
प्रसंगीं तये वोंपें अद्भूत जाला । मला भासलें इंद्रसूंतू निमालों ॥ ७४ ॥
तया ऊपरी कर्म म्यां सांग केलें । पुरीमाजि सर्वांस हें जाणवीलें ।
प्रधानीं समस्तीं मला राय केला । पुढें एक संवत्सरें वाळि आला ॥ ७५ ॥
तयें देखिलें राज्यधारी प्रसंगें । बहू शोभला धांवला लागवेगें ।
मला शीघ्र ताडिन्नलें थोर हातें । पळालों त्वरें चालवेना जिवित्वें ॥ ७६ ॥
कृपाळूपणें पूसिलें राघवानें । तुला ये स्थळीं सोडिलें कां तयानें ।
रवीसूतें साकल्य सांगे प्रभूला । वरी त्याच रे तो ऋषीशाप जाला । ७७ ॥
ऋषी कोण तो कां तयें शापियेलें । कपी सुग्रिवातें रघूराज बोले ।
प्रसंगीं कथा मूळपासूनि सांगे । दिनानाथ साकल्य पूसे प्रसंगें ॥ ७८ ॥
महाराक्षसू स्थूळ अद्भूत होता । बहु थोर ह्मैसा सदा रूपवंता ।
तया दुंदुभी नाम तें देवराया । नसे तूळितां दूसरा त्या तुळाया ॥ ७९ ॥
अती मातला गर्व पोटीं न साहे । समुद्रासि जाऊनि युद्धासि बाहे ।

---

१ अनुभव. २ पापाचा. ३ मारुती. ४ मार्गानें. ५ सर्व. ६ सोनें. ७ रावण. ८ लक्ष्मणानें. ९ रीतीनें. १० दांडगें. ११ गर्जना. १२ वाळी. १३ मरण पावला. १४ सुग्रीव.

भयें भूलला सिंधु बाहेर आला । बहु रत्न देऊनि संतोषवीला ॥ ८० ॥
ह्मणों लागला सागरू पैल पाहे । महाचंड युद्धासि तो थोर आहे ।
तुवांही बहु मानसीं गर्व केला । तिथें लौकरीं जाय झुंजेल तूला ॥ ८१ ॥
पुढें दुंदुभी पर्वतालागिं सांगे । महा थोर पाषाण लोटीत वेगें ।
गिरीही तया लीन होऊनि आला । बहू स्तूति बोलोनि आनंदवीला ॥ ८२ ॥
पहा पर्वतू राक्षसालागिं सांगे । बळी वाळि प्रख्यात हो पैल वामे ।
समक्षा तुझी तोचि तो पूरवीता । तिथें जाय तूं जाय गा शीघ्र आतां ॥ ८३ ॥
पुढें वीर किष्किंधपूरास आला । समाचार वीदीत जाला कपीला ।
रणा दारुणामाजि दोघे बळाचे । महाप्रौढ युद्धीं तये दुंदुभीचे ॥ ८४ ॥
बळें भांडतां भांडतां थोर ह्मसा । तया लाथ मारी कपी काळ जैसा ।
पदें हाणतां देह तो चूर जाला । अकस्मात ऊडोनि येथेंचि आला ॥ ८५ ॥
तपस्वी मुनी बैसला ध्यानकर्ता । तदा एक नेमेंचि सामर्थ्यधर्ता ।
तयें देखिला पर्वतू रक्तमेदा । मतंगू मनीं पावला थोर खेदा ॥ ८६ ॥
असा तो कसा कोण तो मातलाहे । तयालागिं हा शाप माझाचि आहे ।
ऋषीपर्वतीं येतवेळे तयाला । क्षयो प्राप्त होईल नेमस्त त्याला ॥ ८७ ॥
ह्मणोनी समर्था तया येतनेना । किती जाहलेंची तरी मारवेना ।
कृपाळूपणें साह्य माझें करावें । दयासागरा दीन ते उद्धरावे ॥ ८८ ॥
निराधार आधार कांहींच नाहीं । बहू गांजलों पीडलों थोर पाही ।
नये बोलतां काय सांगूनि कोणा । वदों काय मूखें अती दैन्यवाणा ॥ ८९ ॥
जया सांगणें तो तया भीत आहे । महाक्रूर कोणीच तोही न राहे ।
प्रसंगें मला जोडले पाय तूझे । प्रभो पूरवावें तुवां कोड माझें ॥ ९० ॥
तुझा पार आपार कोणा कळेना । कसा मी स्तवूं बुद्धि माझी वळेना ।
तरी सर्व जाणूनियां अंतरींचें । मनीं चिंतिलें पूरवावें दिनाचें ॥ ९१ ॥
दयासागरें राघवें धीर दीला । परी सर्वथा धीर येना कपीला ।
कपीचें महा थोर सामर्थ्य आहे । तयाचे पुढें काळ ऊभा न राहे ॥ ९२ ॥
तया दुंदुभीचें मढें पैल पाहे । समर्था गिरीतुल्य तें दीसताहे ।
असें झोंकि किष्किंधिहूनीच लातें । दुजा कोण याया तया साम्यतेतें ॥ ९३ ॥
दिसे कोटिकंदर्पलावण्य साजे । पुढें देखतां सौख्य ऊदंड माजे ।
जुना घोर कर्कोटे तो वाळि आहे । तयालागिं जिंकावया कोण आहे ॥ ९४ ॥
पुढें राघवें दुंदुभीच्या मढ्याला । पदें ताडिलें धाडिलें सागराला ।
तयीं जाहलें सौख्य तें सुग्रिवासी । वदे आदरें मागुतें या प्रभूसी ॥ ९५ ॥
तयीं रक्त मांसें बहू स्थूळ होतें । आतां सूक्ष्मता प्राप्त झाली तयातें ।
अशानें कदा वाळि तो जिंकवेना । समर्था प्रभू मानसीं धीर येना ॥ ९६ ॥

---

१ पर्वतासारिखें. २ कोटिमदनांचें लावण्य. ३ साप.

प्रभू ताड हे सप्त वीतंड आहे । तया एक बाणेंचि भेदूनि पाहे ।
जरी भेदिले छेदिले ते प्रसंगीं । समर्था तरी वाळिसी जिंकिसी कीं ॥ ९७ ॥
पुढें ते कडोवीकडी ताड आहे । रघूनाथ लक्षूमणालागिं बाहे ।
पदें वाम अंगुष्ठ तो रेटियेला । तेणें सप्त मेळा बरा नीट जाला ॥ ९८ ॥
पुढें राघवें शीघ्र चंद्रार्धबाणें । बळें छेदिला ताड मांडूनि ठाणें ।
गिरीशृंग भेदूनि पृथ्वींत गेला । पुरें धांव पूरूनि भौंता निवाला ॥ ९९ ॥
रवीसूत आनंदला हो मनाला । अती निश्चयो वाटला त्या कपीला ।
कृपाळूपणें राम बोले तयासी । अतां जायगा झुंज तूं त्या कपीशीं ॥ १०० ॥
पुढें वीर सुग्रीव युद्धासि गेला । कडाडीत तो ज्येष्ठ बाहेर आला ।
तुला काय कोठूनि सामर्थ्य आलें । परी पावसी मृत्यु वाईट केलें ॥ १०१ ॥
अतां साह्य बोले विरे थाप मारी । तयालागिं सुग्रीव नेटें धिकारी ।
गिरी थोरला टाकिला वाळिमाथां । तयें वारिला शीघ्र हाणूनि लाता ॥ १०२ ॥
पुढें पाडिला भूतळीं सुग्रिवासी । कठोरें करें ताडिलें बांधवासी ।
रवीसुत खालीं वरी वाळि आहे । रघूराज दूरूनि लक्षीत आहे ॥ १०३ ॥
कळेना रिपू कोण त्याला वधावें । दिसे सारिखा सारिखा त्यासि भावें ।
रघूनंदनें धीर केला प्रसंगीं । त्रिरू सुग्रिवू तो पळे लागवेगीं ॥ १०४ ॥
वदे राघवालागिं हें काय केलें । दयासागरें कां मला मोकलीलें ।
तुह्मांलागिं सांगितले सर्व होतें । तुह्मां देखतां ताडिलें मुष्टिघातें ॥ १०५ ॥
वदे रामराजा विरा ऐक बोजा । कळेनाचि तो कोण शत्रूचि तूझा ।
अकस्मात तूलाचि लागेल जेव्हां । न चाले पुढें सर्वथा यत्न तेव्हां ॥ १०६ ॥
तयाकारणें धीर ऊदंड केला । रघूनायकें हार त्यालागिं दीला ।
गळां हार त्याला कपी खूण जाली । कपी जायगा मागुता धांव घाली ॥ १०७ ॥
बहुतांपरी धाडिलें सुग्रिवासी । गिरीशृंग घेऊनि धांवे त्वरेंशीं ।
उठे शक्रसूतू तयालागिं तारा । न जावें ह्मणे येत नाहीं विचारा ॥ १०८ ॥
प्रितीपात्र हा अंगद सांगताहे । कपीलागिं तो जाहला राम साहे ।
समर्था तरी कासयालागिं जावें । असें जालियां येश नाहीं स्वभावें ॥ १०९ ॥
रघूनाथ हा थोर माहाप्रतापी । अनाथासि देखूनि कृपा समर्पी ।
तयाशीं कदा झुंजतां पूरवेना । पुढें देखतां धीर पोटीं धरेना ॥ ११० ॥
न माने तया सांगतां गर्व केला । बहूसाल वाळीस तो क्रोध आला ।
ह्मणे ऐकतो रे दशग्रीव आला । तयें चोरिलें कीं प्रिये जानकीला ॥ १११ ॥
वधूकारणें सुग्रिवा मेळवीतो । तयाचें शरें आमुचा प्राण जातो ।
असें हें घडों पाहतें तेचि काळीं । गिरीशृंग ते राहती अंतराळीं ॥ ११२ ॥
अशी तूं कशी सांगसी या भयाला । कसा कोण मी दीसतां वाळि तूला ।
बळें पालथें या भुगोळास घाली । करें पोकळीमाजि ब्रह्मांड झेली ॥ ११३ ॥

---

१ बोलावतो. २ सुग्रीव. ३ पुष्कळ. ४ वाळी. ५ वाळीची स्त्री. ६ रावण.

निघाला बळी दीधली हाक मोठी । दिशा दिग्गजां जाहली थोर आटी ।
महा पुच्छ ऊभारिले सव्य बाहो । बहुसाल कोपिन्नला तप्तदेहो ॥ ११४ ॥
अकस्मात तो वाळि सुग्रीव ताडी । बहू कोपला थोर पोटीं कडाडी ।
गळां हार तो मार वेगीं चुकावी । तया शेष देखोनि माथा तुकावी ॥ ११५ ॥
बहू कोपला तापला थोर तापा । पुन्हां मागुता ताडिला वज्रथापा ।
तळीं घातलें शीघ्र त्या सुग्रिवासी । रघूराज दृरूनि लक्षी तयासी ॥ ११६ ॥
पुढें सज्जिलें चाप चंद्रार्धबाणें । भरें लक्षिलें वक्ष तें वज्रठाणें ।
तया वाळिला मूर्छना थोर आली । निचेष्टीत भूमीवरी अंग घाली ॥ ११७ ॥
बहुसाल त्या सुग्रिवें शोक केला । सुकूमार कूमार तो शीघ्र आला ।
पुढें शीघ्र वार्ता पुरीमाजि गेली । अकस्मात तारा भुमीं अंग घाली ॥ ११८ ॥
नव्हे धीर डोळां बहू नीर लोटे । पिटी भाळ हो आजि कल्पांत वाटे ।
त्वरें धांव नारायणा मौसि पाहे । महावीर तो वाळि मूर्छीत आहे ॥ ११९ ॥
समर्था मला कासया मोकलीलें । बहू सुख मार्गील तें आठवीलें ।
अहारे अहा हें असें काय झालें । कसें पूर्व संचीत ठाकूनि आलें ॥ १२० ॥
शिराखालिं घालोनियां वाम जानू । ह्मणे गुण तूझे किती काय वर्णूं ।
बळी तूं बळाचा दुजा स्वामि कैंचा ! वदे विक्रमू सत्य जो सत्यवाचा ॥ १२१ ॥
तरी अंगदें सूचना सर्व केली । यथार्थें तरी मीं बहू जाणवीली ।
रघूनाथ विख्यात पूरुष ज्याचा । मरीचीसि तो घाय वारा जयाचा ॥ १२२ ॥
सुबाहू रणीं पाडिला एक बाणें । अधीं ताटिका मारिली थोर त्राणें ।
शिवें चाप दील तया भार्गवाला । बळें भग्न केलें महा दर्प ज्याला ॥ १२३ ॥
असा राम जो साह्य त्या सुग्रिवासी । बळें ताड छेदूनि छेदी गिरीसी ।
कशी वेळ आली अशा वाळिला हे । इयाऊपरी काळ तो क्षीण आहे ॥ १२४ ॥
किती बोलिल्या कांहीं केल्या न राहे । वदे मागुता मागुता घोर आहे ।
तुजलागिं त्या राघवें मुक्त केलें । परी भाग्य सौभाग्य माझेंचि गेलें ॥ १२५ ॥
बहू ताप संताप ऊदंड केला । रघूराज तो सन्मुखीं देखियेला ।
प्रभूशीं तशी बोलती शीघ्र जाली । असंभाव्य ते स्तूति ऊदंड केली ॥ १२६ ॥
दिनोद्धारणा कारणा भक्तपाळा । रघूनायका दीनकारुण्यलीळा ।
तुझें नाम विश्राम लोकत्रयासी । निजध्यास विश्वास मोठा शिवासी ॥ १२७ ॥
नव्हे न्याय अन्याय दीसूनि आला । कसा साह्य जालासि त्या सुग्रिवाला ।
तया रावणालागिं बांधोनि घाली । तशा वाळिशी मैत्रिकी कां न केली ॥ १२८ ॥
अयोध्येसि तो भरत राज्यकारी । सिता रावणें चोरिली दिव्य नारी ।
तुझा शत्रु जो सोडिलें कां तयाला । कसीं वाळिनें काय अन्याय केला ॥ १२९ ॥
पुढें वाळिची मूर्छना शांत जाली । रवीसूत ऊभा वरी दृष्टि गेली ।

---

१ डोलविनो. २ अत्यंत कठिण. ३ मला. ४ पूर्वजन्मार्जित कर्म. ५ बळानें. ६ परशुरामाला. ७ पुढें. ८ विश्रांतिस्थान. ९ सुग्रीव.

बहुतांपरी सुग्रिवा हीत सांगे । झळंबे मनीं लोभ तेणें प्रसंगें ॥ १३० ॥
जगन्नाथ हा राम कारुण्यसिंधू । कृपाळूपणें भेटला दीनबंधू ।
महासुकृतें जोडले पाय तूझे । बहूतांपरी आदरें साह्य कीजे ॥ १३१ ॥
कपी सर्व घेऊनि जा त्रीकुटासी । रघूनाथ मारील त्या रावणासी ।
सिते विश्वमातेसि आणूनि देई । तयाउपरी तूं पुरीमाजि जाई ॥ १३२ ॥
पुढें सर्वदा सख्य त्याशीं करावें । कदाही अणूमात्र रीतीं नसावें ।
तुला थोर आधार हा जाण भावें । पुरीमाजि त्वां राज्य सूखें करावें ॥ १३३ ॥
महा थोर हें राज्य किष्किंधपूरी । असावें बहू विक्रमें नामधारी ।
परी पाहतां सर्वही तूज आहे । परी युक्तिनें बुद्धिनें नीतिं राहे ॥ १३४ ॥
अरे पद तें मंत्रिया अंगदाला । जसा मी तसा तूंचि आहेसि त्याला ।
किती सांगणें तूं भला दक्ष आहे । बरी कीर्ति जे तेचि ते ऊरताहे ॥ १३५ ॥
अती नीरवूं मी तुला काय कीं तें । असे मृत्यु त्याची तुवां पाळिजेतें ।
प्रवृत्तीजनामाजि हे गोष्ट आहे । परी सांगतों जीव माझा न राहे ॥ १३६ ॥
पुढें अंगदा देखतां कंठ दाटे । बहूसाल नेत्रोदकें पूर लोटे ।
प्रसंगीं महा मोह आला कपीसी । रुदे बोलतां अंगदा कूमरासी ॥ १३७ ॥
अरे अंगदा अंतरीं फार होतें । मज देखतां राज्य देईन तूतें ।
परी कल्पिलें हें कदाही घडेना । विधीसूत्र निर्माण हे लोटवेना ॥ १३८ ॥
बहूतांपरी बोलिला सुग्रिवासी । मशीं साम्य रे मानि तूं आदरेंशीं ।
महासुकृतें जोडली रामसेवा । अखंडीत हा भाव पायीं असावा ॥ १३९ ॥
बहू शीकवीलें तया अंगदाला । पुढें लक्षिता जाहला राघवाला ।
म्हणे धन्य हें भाग्य ती भेटि जाली । करूणास्वरें स्तुति ऊदंड केली ॥ १४० ॥
किती साधनें साधिती योगधारी । गिरीकंदरीं उग्रता पूर्णहारी ।
तयालागिं तूं किंचिती भेट देसी । नसे तूळणा आमुच्या सुकृतासी ॥ १४१ ॥
महापातकी घातकी थोर वाला । किती ब्रह्महत्या वदे कोण त्याला ।
असंख्यात नामें तया भेटलासी । नसे तूळणा आमुच्या सुकृतासी ॥ १४२ ॥
अहल्या शिळा कष्टली त्या वनांतीं । सदा सर्वदा तूज चिंतीत होती ।
बहुतां दिनां दीन तूं उद्धरीसी । नसे तूळणा आमुच्या सुकृतासी ॥ १४३
वनामाजि भिल्ली महाभक्त होती । अखंडीत ते मानसीं पाय चिंती ।
उचिष्टें तरी सेविसी त्या फळांसी । नसे तूळणा आमच्या सुकृतासी ॥ १४४ ॥
कळेना लिला राहिले वेद चारी । बहू शीणला वर्णितां सृष्टिधारी ।
अकस्मात पायींच धांऊनि येसी । नसे तूळणा आमुच्या सुकृतासी ॥ १४५ ॥
नसे अल्पही स्वल्पही पुण्य कांहीं । बहू चंड उदंड पाखंड देहीं ।
महा सूख अद्भूत वालीस देसी । नसे तूळणा आमुच्या सुकृतासी ॥ १४६ ॥
तुझें नाम हेंचीं महा पुण्य भासे । तुझे दर्शनें हेतु तो सर्व नासे ।

---

१ देवगती. २ पुण्यानें. ३ पुष्कळ. ४ उष्टीं. ५ सृष्टीला धारण करणारा शेष.

करें बाण या हृदयीं स्पर्शलासी। नसे तूळणा आमुच्या सुकृतासी ॥ १४७ ॥
परी अल्पही होय देहासि वेथा। कृपासागरा सोडवावें समर्था।
तुझा बाण निर्वाण जाला न सोडी। दयाळा तुझा तूंचि येऊनि काढी ॥ १४८ ॥
प्रसंगें वदे वालि हा दैन्यवाणा। कृपाळूपणें ऊठिला रामराणा।
उरीं पाय देऊनियां बाण काढी। मुखीं रामनामेंचि तो प्राण सोडी ॥ १४९ ॥
सुरांचा नभीं सर्व मेळा मिळाला। बहू तोष तो पुष्पवर्षाव केला।
आनंदें बहू गर्जना रामनामें। बळें वाजली टाळिलें विघ्न रामें ॥ १५० ॥
पुढें सर्व गंधर्व तेथें मिळाले। अकस्मात स्वर्गांगनीं नृत्य केलें।
मनोरम्य आरंभिलें गायनासी। आलापेंचि तो रोध सिंधूजळासी ॥ १५१ ॥
दमानें बहू रंगसंगीतरंगें। फणी तो भ्रमें ऊर्ध्व धांवे प्रसंगें।
स्वरांच्या स्वयें क्रोधल्या देवकोटी। झणीं जाणते त्या कळे स्वर्ग लोटी ॥ १५२ ॥
पुढें नारदादीक कीतेक आले। समस्तां मनें सूख ऊदंड जालें।
कथाभाग तो पाहिजे चालवीला। प्रसंगें तया वालिला मृत्यु आला ॥ १५३ ॥
अती लोळ कल्लोळ कोल्हाळ जाला। महाशब्द नानापरी घोष जाला।
बहू दुःख जालें तया सुग्रिवाला। कृपाळूपणें राम बोले तयाला ॥ १५४ ॥
उभा राम निष्काम लावण्यखाणी। मुनी देव गंधर्व गाती पुराणीं।
धनुष्यासि टेंकोनियां वाम बाहे। कृपाळूपणें सुग्रिवालागिं बाहे ॥ १५५ ॥
विचारें अवीचार कां प्राप्त जाला। उजेडासि अंधार जिंकोनि आला।
महाज्ञानिया तो भवीं बुडवीला। असें दीसतें भासतें या मनाला ॥ १५६ ॥
सुबुद्धा तुवां शीघ्र आतां उठावें। विधीयुक्त तें कर्म सर्वै करावें।
बहू शोक केल्या पुढें काय आहे। जनीं जाणता तूं विचारूनि पाहें ॥ १५७ ॥
असंभाव्य दुःखानळें प्राण फूटे। प्रभू बोलतां वीर तात्काळ ऊठे।
रवीसूनुच्या बोलिले हृदयासी। विधीयुक्त आरंभिलें या विधीसी ॥ १५८ ॥
महा पाप त्या नाम घेतां न राहे। असा राम विश्राम दृष्टीस पाहे।
देहवेशघातासि संपादियेलें। यथासांग जें कर्म तें सांग केलें ॥ १५९ ॥
पुढें रामभेटी कपीराज गेले। उभे हात जोडोनि ऊदीत ठेले।
रघूनायकें सुग्रिवा बैसवीलें। प्रधानाप्रती आदरें वाक्य बोले ॥ १६० ॥
तुह्मी सर्व तात्काळ पूरीसि जावें। कपीलागिं भद्रासनीं बैसवावें।
प्रधानीं तिहीं रामआज्ञेप्रमाणें। महावीर सुग्रीव नेला स्फुराणें ॥ १६१ ॥
समस्तीं विधीयुक्त तो पट्ट दीला। कपीराज भद्रासनीं बैसवीला।
रघूनाथनामेंचि निर्घोष केला। निशाणीं बहु वाद्य कल्लोळ जाला ॥ १६२ ॥
कपी अंगदालागिं प्राधान्य दीलें। समस्तां मनीं सूख ऊदंड जालें।
पुरी सर्व शृंगारमंडीत केली। रघूनाथनामें गुढी ऊभवीली ॥ १६३ ॥

१ आकाशांत. २ अप्सरांनीं. ३ वर, उंच. ४ बहुत. ५ सिंहासनावर. ६ मुकुट. ७ गर्जना. ८ रण-भेरी ह्यांचा.

प्रधानासि घेऊनि ये रामभेटी । त्वरें चालिला जाहली थोर दाटी ।
पुढें राम संनीध[1] येऊनि उभा । वदे राम लक्ष्मूनि कंदर्पगाभा[2] ॥ १६४ ॥
समर्था तुवां दीन उद्धार केले । तयेंची प्रमाणें कृतकृत्य जाले ।
मनीं वाटतें हें जरी भक्तिभावें । दयाळा यथायुक्ति तुला पुजावें ॥ १६५ ॥
अनुपम्य तो राम मंजुळ वाणी । कृपाळूपणें बोलिला चापपाणी ।
व्रतस्थी अह्मीं पट्टणातें न यावें । सदा दंडकारण्यवासी फिरावें ॥ १६६ ॥
कपींद्रा तुवां शीघ्र पूरीस जावें । चतुर्मासपर्यंत सूखीं क्रमावें ।
अह्मीं या ऋषीपर्वतीं निश्चयेंशीं । प्रजन्यासि जातांचि यावें त्वरेंशीं ॥ १६७ ॥
रघूनायका सख्य घेऊनि वेगीं । नमस्कार साष्टांग केला प्रसंगीं ।
कपीराज गेला निरोपें पुरीसी । रघूराज सौमित्र आरण्यवासी ॥ १६८ ॥
बहु सूख जालें तया सुग्रिवासी । पुरी आणि तारा दिली आपणासी ।
प्रभू थोर सामर्थ्य याचें कळेना । श्रुती[3] भांडती त्यां कदा आकळेना ॥ १६९ ॥
चतुर्मासें[4] गेल्या कपी रीसें येती । शिळासेतु बांधोनि लंकेस जाती ।
दशग्रीव मारूनि तेतीस कोडी । रघूराज हा आदरें देव सोडी ॥ १७० ॥
दिनानाथ हा दीन चिंता वहातो । जनीं भक्तिभावार्थ हाही पहातो ।
मनीं दृढता भक्ति केली जयानें । स्वयें घेतले जन्म सर्वोत्तमानें ॥ १७१ ॥
दहाही वरे वेश सर्वोत्तमाचे । पहील्या प्रसंगींच शंखासुराचे ।
दुजा कूर्मरूपें धरी भारधारी । तिजाही जसा दाढ देऊनि वारी ॥ १७२ ॥
चतुर्थामधें भक्त प्रन्हाद पाहे । धरी सूजट्[5] पंचमाभाजि देहे ।
पुढें साहव्यामाजि क्षत्रीच नाहीं । दिलें राज्य विप्रासि सर्वत्र कांहीं ॥ १७३ ॥
बळें सप्तमामाजि तो देव सोडी । पुढें अष्टमा कंस झाडूनि पाडी ।
प्रसंगीं असे बौद्ध मौनावतारी[6] । कलंकी मलेंच्छासि होतांचि मारी ॥ १७४ ॥
दहा सार अवतार सर्वोत्तमाचे । तयांमाजि दोनी प्रसिद्धीस साचे ।
क्रिडा आठव्यामाजि गोपाळपाळीं । रघूराज हा वानरीं रीसमेळीं ॥ १७५ ॥
असे भिन्न नामें परी भक्त त्याचा । चिरंजीव हा दास विख्यात ज्याचा ।
कळेना मला अल्पही बुद्धि नाहीं । दयाळा कृपाळा कृपादृष्टि पाही ॥ १७६ ॥
बहुसाल विस्तारली कीर्ति तुझी । कळेना बळें आकळे[7] वाणि माझी ।
परी राहवेनाचि मी दीन तुझें । किजे हो क्षमा अल्प अन्याय माझे ॥ १७७ ॥
किती पीडिलें वाळिनें सुग्रिवासी । बहुतांपरी राज्य दीलें तयासी ।
कृपाळूपणें पावला राम तेथें । दिलें राज्य कांता तयाची तयातें ॥ १७८ ॥
अशी हे कथा ऐकतां सर्व भावें । तयाला रघूनाथ तात्काळ पावे ।
पुढेंही कदा दुःख होणार नाहीं । सदा छंद आनंद ऊदंड देहीं ॥ १७९ ॥
बहु पापतापासि हें नाम वारी । हरामानसीं[8] गूज तें सौख्यकारी ।
ह्मणोनी कथा राघवाची करावी । सदा सर्वदा सृष्टि सूखीं भरावी ॥ १८० ॥

---

१जवळ. २मदनासारखा सुंदर. ३वेद. ४चार महिने. ५आसवल. ६अवतार. ७करावी. ८शंकराच्या मनामध्यें.

सदा सर्वदा एकएकाचि श्लोकीं । अरे ऐकतां होईजे धन्य लोकीं ।
नसे हो नसे जन्ममाळा तयाला । पुढें संतसंगेंचि तो मुक्त जाला ॥ १८१ ॥
॥ इति श्रीरामदासकृत किष्किन्धाकांड समाप्त ॥

# सुंदरकांड.

नमूं सर्वकर्ताचि तो विश्वभर्ता । गुणी शोकहर्ताचि हर्ता विवर्ता ।
परेहूनि पर्ताचि पर्ता विवर्ता । भुतें भूतधर्ताचि धर्ता उधर्ता ॥ १ ॥
महीमंडळींचे कपी रीसराजे । तयां मध्यभागीं महावीर साजे ।
महारुद्र आज्ञेप्रमाणें निघाला । सिताशुद्धि आणावया सिद्ध जाला ॥ २ ॥
सर्व मंडळी चालिल्या वानरांच्या । नभोमंडळामाजि फौजा विरांच्या ।
गिरीकंदरें देश नानापरींचे । तटाकें नगा ओघ जाती नदींचे ॥ ३ ॥
पुरें पट्टणें अट्टणें धुंडिताती । कपी वीर दाही दिशा हिंडताती ।
सिता शोधितां शुद्धि कोठें न लागे । बळें धुंडितां ते विरें वीर भागे ॥ ४ ॥
वनें भूवनें रम्य नानापरींचीं । वरीं शोधिलीं तीं गिरीकंदरींचीं ।
दरें शृंग पाठार मैदान दारी । कपाटें गव्हा वीवरें तीं भुयारीं ॥ ५ ॥
कपी शोधितां शोधितां सुस्त जाले । नव्हे कार्य तें दैन्यवाणे मिळाले ।
समुद्रातिरीं ते उदासीन जाती । गळाल्या तनू थोर उद्वेग चित्तीं ॥ ६ ॥
कपी बोलती काय आतां करावें । न लागे सिताशुद्धि तेव्हां मरावें ।
ह्मणे मारुती वीर हो स्थीर बैसा । तिन्ही लोक पाहून येतों तमासा ॥ ७ ॥
भयातूर तो भीम सिंधू उडाला । त्रिकूटाचळाहून पैलाड गेला ।
पुढें सर्वही पाणजंजाळ पाहे । हनूमंत विस्मीत होऊनि राहे ॥ ८ ॥
समुद्रामध्यें भेटला तो अतीत् । ह्मणे रे अरे रे अरे कोण रे तूं ।
हनुमंत घाली नमस्कार त्याला । मनामाजि तो थोर संतुष्ट जाला ॥ ९ ॥
मुनी तो त्रिकूटाचळीं शुद्धि सांगे । किरांणें उडे तो कपी वीर मागें ।
अकल्पीत लंकापुरी कांचनाची । पुढें देखिली सौख्यदाती मनाची ॥ १० ॥
गुढ्या गोपुरें देउळें तीं अपारें । हुडे कोठ जाळांधरें थोरथोरें ।
सुवर्णाचळामाजि तें तेज फांके । तया पाहतां कीरणीं दृष्टि झांके ॥ ११ ॥
कपाटें लोहोअर्गळा पंथ मोठे । बळी बैसले थोर आश्चर्य वाटे ।
बहुसाल वाद्यें उडाडां धडाडां । खुसीहाल आवाज होती भडाडां ॥ १२ ॥
पुढें पाहतां जावया रीग नाहीं । न सूचे मनीं मानसीं यत्न कांहीं ।
पुढें भीम तो अंतराळें उडाला । लघूरूप लंकेंत होऊनि गेला ॥ १३ ॥
गृहा गोपुरांचा बहु दाट खोटा । सदा सर्वदा वाहती सर्व वाटा ।

१ जगाचें पालन करणारा. २ भ्रांतींत. ३ पराबाणीहून. ४ उद्धार करणारा. ५ अस्वल. ६ मारुती. ७ तलाव. ८ फिराफिरून. ९ थांग. १० पर्वताचे मरतकावरील सपाट भूमि. ११ पलीकडे. १२ उ-सारून. १३ किल्ले. १४ आकाशांतून.

विंदी हाटें बाजार कुंचे दुकानें । सदा मस्त ते हस्ति जाती गुमानें ॥ १४ ॥
सिलेभार सज्जीत ते राउतांचे । बरें फार संगीत होती त्रिरांचे ।
दिसेना तयांलागिं भुंजार कोणी । बळें जिंकिले पीडिले लोक तीन्ही ॥ १५ ॥
बहू सज्ज तें राज्य लंकापुरीचें । पुरीमाजि तें सैन्य मोठ्या बळाचें ।
उफाळेंचि जाती भुजा फुर्फुरीती । तयां देखतां देव ते थर्थरीती ॥ १६ ॥
त्रिकूटाचळीं ख्याती केली भिमानें । लघूरूप तो हिंडताहे थिरानें ।
गृहें गोपुरें पाहिल्या धर्मशाळा । आकस्मात त्या देखिल्या बंदिशाळा ॥ १७ ॥
हिनासारिखें देव ते दीन झाले । नसे शक्ति ना युक्ति पोटीं गळाले ।
भयाभीतते कांपती दीनवाणे । बहू गांजिलें दुःख तें कोण जाणे ॥ १८ ॥
सुरांकारणें कोप भीमासि आला । मनामाजि आवेश तो थर्थरीला ।
रुपें भर्भरीला तमें गर्गरीला । प्रसंगीं तयें मारुती गुप्त जाला ॥ १९ ॥
मनामाजि आवांकिलें सर्व कांहीं । सिमा सांडिली तूळणा त्यासि नाहीं ।
बहू मातले गर्व मोठ्या बळाचा । तया ओढितां दास मी राघवाचा ॥ २० ॥
त्रिकूटाचळीं ख्याति केली भिमानें । पुढें पत्रिका धाडिली ब्रह्मयानें ।
तिये वाचितां वाचितां राम हांसे । त्रिडाकौतुकें अंतरामाजि तोषे ॥ २१ ॥
नटे नाटकू त्रीकुटामाजि कैसा । महा कांड सुंदर्य जाला तमासा ।
देहे आपुले सर्वही गुप्त केलें । प्रसंगीं तयें पुच्छ तें वाढवीलें ॥ २२ ॥
बहू व्यापिली वेढिली सर्व लंका । कितेकां मनीं वाटली थोर शंका ।
गृहांतूनि अंतर्गृहीं पुच्छ घाली । बहू पाडितां फोडितां हांक जाली ॥ २३ ॥
बळें लांगलें रूधिल्या सर्व वाटा । बहू तुंबला लोक तो दाट खेटा ।
तयाभोंवतें पुच्छ बांधोनि भारें । नभीं पोकळींमाजि नेटें उभारें ॥ २४ ॥
बहू भार ते स्वार मध्येंचि खंडी । महामस्त ते हस्ति नेटें उलंडी ।
गुरें शाकटें राक्षमालागिं पाडी । पदीं पुच्छ बांधोनि पाडी पछाडी ॥ २५ ॥
पडों लागले दैत्य नेटें बदादां । कितीएक ते दीर्घदेहीं भदादां ।
बळाचीं दळें पाडिलीं पुच्छमारें । दिसेना परी गर्जतो भूभुकारें ॥ २६ ॥
धरी पंथ कोणासही जाउं देना । पुरीमाजि पापी कदा येऊं देना ।
चुली पेटल्या वन्हि तेथें विदारी । बळी धांवती त्यांसि तेथेंचि मारी ॥ २७ ॥
गळे पाय बांधी किती हात बांधे । पुरीमाजि हांकेस ते हांक सांधे ।
महावीर चौताळले तें धरेना । बळें वावरे पुच्छ तें आवरेना ॥ २८ ॥
जना ओढितां पाडितां आपटीतां । समस्तां जनांलागिं पाडूनि जातां ।
पशूराक्षसीं सर्वही हांक केली । कितीएक तीं चिर्डचिर्डोनि मेलीं ॥ २९ ॥
कितीएक तीं राक्षसें हाकलीती । कितीएक तीं राक्षसें बोंबलीती ।
कितीएक तीं थोर जालीं रुदंतीं । कितीएक तीं राक्षसें चर्फडीती ॥ ३० ॥
असंभाव्य तेंपुच्छ झाडी उलंडी । कडाफोडि होतांचि येतांचि झोडी ।

१ मार्ग. २ मोठमोठे बाजार. ३ कैदखानें. ४ शेंपटानें. ५ आकाशांत. ६ सैन्यें. ७ रडणारीं.

पुरीमाजि सर्वांसही आट केला । विरें वीर राक्षेस सर्वें बुडाला ॥ ३१ ॥
नसे अन्नपाणी मुखामाजि घाणी । कितीएक ते जाहले दैन्यवाणी ।
पुरीमाजि नानापरी घोळ केला । पुढें अस्तामानासि तो दीन गेला ॥ ३२ ॥
उदासें घरें मंदिरें थोरथोरें । महापुच्छ तें वावरे अंधकारें ।
भुजंगापरी सर्व वेंटाळिताहे । विरें वीर चाकाटला सर्व पाहे ॥ ३३ ॥
मुलां लेंकुरांमाजि तें खेळताहे । निजेल्यामधें पुच्छ तें लोळताहे ।
कुमारीकुमारां गळां हार घाली । भयाभीत अंतःपुरीं हांक जाली ॥ ३४ ॥
त्रिकूटाचळीं सर्व ऊदंड आले । भयाभीत ते सर्वही लोक जाले ।
कळेना बरें सर्व कीं काय आहे । करी तें महामार त्याचा न साहे ॥ ३५ ॥
अकस्मात तें काय होतें कळेना । कळेना वळेना कदा आकळेना ।
सभेमाजि रायापुढें हाक गेली । अहो पाहतां काय लंका बुडाली ॥ ३६ ॥
उगा लोळसा घोळ मोठा करीतो । कराळुनि बांधोनि सर्वां धरीतो ।
बहूतांपरी सांगती रावणाला । बहूतां जणांचा घरीं कोंड झाला ॥ ३७ ॥
नव्हे जी नव्हे सर्व सामान्य मातू । महाघोर हा थोरला पुच्छकेतू ।
सभामंडपीं कोप रायासि आला । ह्मणे सांगती त्यांस मारून घाला ॥ ३८ ॥
तयां मारितां पुच्छ तेथेंचि आलें । सभामंडपामाजि नेटें निघालें ।
दिवे पाडिले दीवटे आपटीले । अकस्मात हीलाल हीरोनि नेले ॥ ३९ ॥
मुखें बोलती दीप रे दीप आणा । दिवे आणितां मूकती दैत्य प्राणां ।
असंभाव्य त्या दीवट्या दीप थावे । बळें लागवेगें समूदाय धांवे ॥ ४० ॥
पुन्हां मागुती दीप घेऊनि आले । बळें धांवतां पुच्छमारें विझाले ।
तया लांगुलें रुंधिलीं सर्व दारें । कपी वीर तो वावरे अंधकारें ॥ ४१ ॥
सभामंडपीं गुदगुल्या तो करीतो । मुखें नासिकें कर्ण छेदून नेतो ।
बळें गाल सर्वांग हीं बर्बडीतो । चिरें फाडितो ओढितो गुर्गुरीतो ॥ ४२ ॥
बळाचे महावीर तेथें मिळाले । परी अंधकारेंचि कांहीं न चाले ।
किती लोटिले कूटिले चूर केले । भयाभीत कोणास कोणी न बोले ॥ ४३ ॥
कपी वीर तो थोर लाहान होतो । धरीतां बळें हात मोडोनि जातो ।
बुक्या मारितो पांपरा वज्रथापा । असंभाव्य तो कोपला राव कोपा ॥ ४४ ॥
ह्मणे वीर हो काय रे काय झालें । कळेना मुखें बोलती काय आलें ।
भयासूर तें गुर्गुरीतें कळेना । करूं काय आह्मांसि तें आकळेना ॥ ४५ ॥
कपी वीर रायाकडे शीघ्र गेला । बळें थाप मारून मुगूट नेला ।
बरे ओसरे मारिले रावणाला । ह्मणे मारितो रे तुझ्या आत्मर्याला ॥ ४६ ॥
चिरें सुंदरें फाडिलीं रावणाचीं । करी भूषणें चूर मुक्ताफळाचीं ।
कपीनें सभा सर्वही नग्न केली । त्रिकूटाचळीं ख्याति ऊदंड जाली ॥ ४७ ॥
हाहाकार जाला सभेमाजि मोठा । बळें मारुती मारिताहे चपेटा ।

---

१ सर्पाप्रमाणें. २ चकित केला गेला. ३ पुच्छरूपी धूमकेतू. ४ वस्त्रें. ५ लाता. ६ रावणाच्या पुत्राला. ७ मोत्यांचीं.

सभामंडपीं फार आकांत झाला । कपीनें पुढें मोकळा मार्ग केला ॥ ४८ ॥
लपाला कपी पुच्छ ओढूनि नेलें । लघू मश्यकाचे परी रूप केलें ।
असंभाव्य त्या दीवल्या चंद्रज्योती । असंख्यात राक्षेस धांवूनि येती ॥ ४९ ॥
सभामंडपामाजि धांवोनि आले । तेणें नागवे लोक लज्जीत जाले ।
महावीर मार्गे पुढें हात देती । कपीनें बहूसाल केली फजीती ॥ ५० ॥
सभामंडपीं वस्त्र कोठें दिसेना । भूतांसारिखे नागवे लोक नाना ।
चिरें आणिलीं नेसले स्वस्थ झाले । मनामाजि लज्जीत कोणी न बोले ॥ ५१ ॥
कपीवीर तेथूनि वेगें उडाला । अशोकावनामाजि वृक्षीं दडाला ।
अधोमूखे तो जानकीलागिं पाहे । कपी राममुद्रा पुढें टाकिताहे ॥ ५२ ॥
सितेनें पुढें मुद्रिका ओळखीली । बहूतांपरी शब्दकारुण्य बोली ।
पुढें मारुती भेटला जानकीला । समाचार सांगोनि आनंद केला ॥ ५३ ॥
क्षुधाक्रांत मी जाहलों फार माते । तन चालतां चांचरी सर्व जाते ।
बहूतांपरी बोलिला जानकीला । समाचार सांगोनि आनंद केला ॥ ५४ ॥
अशोकीं बहू लागले वृक्ष नाना । पहातां असंख्यात संख्या असेना ।
नव्हाटें जुनाटें वनें दाट थाटे । वनें मोडिता जाहला कड्कडाटें ॥ ५५ ॥
फळें भक्षिलीं सर्व नाना परींचीं । बहू स्वाद वर्णे कळाकूसरीचीं ।
कपी वीर तो तृप्त जाला निवाला । पुढें वृक्ष मोडावया सिद्ध जाला ॥ ५६ ॥
तरू मोडिले पाडिले ऊपटीले । किती झोडिले झाडिले चूर केले ।
गिरीसारिखे ढीग सांडूनि टाकी । तयाला असंभाव्य राक्षेस हांकी ॥ ५७ ॥
वनें मोडितां मोडितां हांक जाली । कितीएक ते दैत्यमांदी मिळाली ।
गलोला कमाना करीं भिंडमाळा । बळें हांकितां नाद गेला भुगोळा ॥ ५८ ॥
बहूता बळाचे बहू लोक आले । कितीएक ते धिंग मोठे मिळाले ।
वनें वेढिलीं धांवले काळ जैसा । सभुतां खेंचरां थोर कल्पांत भासे ॥ ५९ ॥
कपी वीर चौताळला वेग केला । कितीएक राक्षेस भंगोनि गेला ।
त्रिकूटाचळीं रावणा जाणवीलें । वनीं वानरें थोर अद्भूत केलें ॥ ६० ॥
बळें धांविला कूमरू रावणाचा । सदा अक्षयी वीर मोठा बळाचा ।
असंभाव्य राक्षेस धांवोनि आले । कपीलागिं मारावया सिद्ध जाले ॥ ६१ ॥
बळें आगळा आवया लक्ष भेदी । चुकावी कपीवीर लागोंच नेदी ।
बहू भागले मारितां भग्न जाले । कितीएक ते दैत्य पोटीं गळाले ॥ ६२ ॥
पहा हो कपी धीट मोठा पळेना । सदा सर्वदा लक्ष याचें चळेना ।
पुन्हां मागुते वीर ते सिद्ध जाले । कितीएक ते पाश घेऊनि आले ॥ ६३ ॥
मुखें बोलती मर्कटा बैसलेंसी । समारंगणामाजि युद्धा न येसी ।
कपी वीर तो गर्जला भुभुकारें । समारंगणीं चालिला घोर मोरें ॥ ६४ ॥

१ खालीं तोंड करून. २ दैत्यमंडळी. ३ गोफणी. ४ आकाशांत संचार करणाऱ्यांस. ५ पन्न. ६ शेष, अधिक.

रिपू झोडिले पाडिले वृक्षघातें । भुमीं लोळती दैत्य होऊनि प्रेतें ।
पुढें देखिलें जंबुमाळया कुटीला । बळें आखया आपटीला पिटीला ॥ ६५ ॥
पळाले फळी फूटली राक्षसांची । पुढें हाक गेली तया आखयाची ।
त्रिकूटाचळीं शोकआरंभ जाला । प्रितीचा बहु आखया तो निमाला ॥ ६६ ॥
पुरीमाजि अंतःपुरीं घोष जाले । सुखानंद मंदोनि गेले विझाले ।
बहु दुःख जालेंच मंदोदरीला । तिनें कूमरालागिं आकांत केला ॥ ६७ ॥
पुसे रावण कायरे काय झालें । तुह्मांलागिं मारावया कोण आलें ।
कपी एकला बैसला तो पळेना । चळेना ढळेना कदा आकळेना ॥ ६८ ॥
तया टाकितां पाश मोठाचि होतो । लघूरूप होऊनि नीघूनि जातो ।
कदाही पडेना कदा सांपडेना । तेणें मारिली दैत्य ऊदंड सेना ॥ ६९ ॥
त्रिधीलागिं बोलाविलें रावणानें । कठीणोत्तरीं गांजिलें दुर्जनानें ।
ह्मणे जाइं रे आणि वेगें कपीला । तया नाणितां शीघ्र ताडीन तूला ॥ ७० ॥
त्रिरंची पुढें घातला चालवीला । असंभाव्य तो लोकमेळा मिळाला ।
वनामाजि येतां नमस्कार घाली । तया मारुतीची बहू स्तूति केली ॥ ७१ ॥
बहूतांपरी कीर्तिचें येश घ्यावें । दयाळा कपी ये घडी शांत व्हावें ।
न होतां मला मारिती ब्राह्मणाला । बहूसाल कल्याण व्हावें तुह्मांला ॥ ७२ ॥
कपी वीर तो थोर कोपें कडाडी । करी गर्जना मेघ जैसा गडाडी ।
परी सांकडीमाजि[1] कांहीं न चाले । मिळाले कपीलागिं घेऊनि आले ॥ ७३ ॥
अरे मर्कटा थोर अन्याय केला । ह्मणे रावणू मारितो शीघ्र तूला ।
तुझा मृत्यु कोठें खरें सांग आतां । मुदा कष्मळा मारितों जात जातां ॥ ७४ ॥
ह्मणे मारुती काळ मारूं शकेना । कृपाळूपणें तोषला रामराणा ।
न वाटे खरें सांगतां रावणाला । ह्मणे वानरूलांगुलीं अग्नि घाला ॥ ७५ ॥
ह्मणे रावणू पाहतां काय आतां । चिरें[6] आणवा सांगताहे समस्तां ।
असंभाव्य ते वीर धांवोनि गेले । त्रिकूटाचळीं लोक ते नग्न केले ॥ ७६ ॥
पुढें पुच्छ ओढोनि गुंडाळिताती । सिमा सांडिली वीर गुंडाळिताती ।
तया वेढितां तें असंभाव्य लांबे । चिरें वीर त्या लांगुलालागिं झोंबे ॥ ७७ ॥
कितीएक तीं आणिलीं आज्यं तेलें । कितीएक तीं मोगरेलें फुलेलें ।
महापुच्छ तें सर्वही भीजवीलें । पहा हो कपी बापुडें व्यर्थ मेलें ॥ ७८ ॥
तया लावितां वन्हि तेथें न लागे । बळें फुंकितां तो विरे वीरु भागे ।
तया देखतां रावणू शीघ्र आला । बळें फुंकितां फुंकितां तो गळाला ॥ ७९ ॥
पुढें रावणू थोर कोपें कडाडी । बळें फुंकितां जाळ नेटें धडाडी ।
जळालीं मुखें भस्मल्या खांड मीशा । बहूसाळ लंबीत होत्या विशेषा ॥ ८० ॥
बळें चेतला वन्हि नेटें तडाडी । कडाडीत ज्वाला दडाडी धडाडी ।
कपी वीर तो वाडें जाला वडाला । पुढें जाळिता जाहला त्रीकुटाला ॥ ८१ ॥

१ मरण पावला. २ मोठी. ३ ब्रह्मदेवाला. ४ संकटामध्यें. ५ पाप्या. ६ वानराच्या शेंपटीवर. ७ वस्त्रें.
८ तूप. ९ अग्नि. १० मोठा.

गृहां गोपुरांमाजि तें पुच्छ घाली । त्रिकूटाचळीं आगि नेटें निघाली ।
विंदीं हाट बाजार चौबार कुंचे । बळें बोंबली नागवा लोक नाचे ॥ ८२ ॥
बहूतांपरीची बहू हांक झाली । पळारे पळारे पळा आगि आली ।
गुरें वासुरें शिंगरें लेंकुरें तीं । शुनीं मार्जरें तैं खरें येसरें तीं ॥ ८३ ॥
किती शेरडें मेंढरें तीं अचाटें । जळालीं किती राक्षसें कल्कलाटें ।
किती शाकटें कुंजरें दिव्य घोडे । महींमंडळीं त्यांसि नाहींत जोडे ॥ ८४ ॥
बहूतांपरींचीं बहू रम्य यानें । बहूसाल छत्रें विचित्रें निशाणें ।
बहूतांपरींच्या बहूसाल शाळा । जळाल्या विवीधा विचित्रा विशाळा ॥ ८५ ॥
बळें लोक तेथें बळें पुच्छ घाली । बहूतां त्रिरांची बहू शांति जाली ।
महा पुच्छ तें जाळ बंबाळ जाला । बहू साक्षपें वन्हि तो चेतवीला ॥ ८६ ॥
पळाले भयासूर ते दूरि थावे । कपी वीर लांगूल घेऊनि धांवे ।
बहू भोंवताहे बहू धांवताहे । उठे वन्हिचें चक्र लांगूल पाहे ॥ ८७ ॥
फिरे गर्गराटें कपी चक्र जैसा । विधी शक्र अव्यग्र पाहे तमासा ।
त्रिरां खेचरां भूचरां अंत झाला । त्रिकूटाचळा थोर कल्पांत आला ॥ ८८ ॥
बहूसाल दारूमधें पुच्छ घाली । उसाळे नभामाजि दारू निघाली ।
तडाडी थडाडी दडाडी धडाडी । शशी सूर्य नक्षत्रमाळा कडाडी ॥ ८९ ॥
बहू धूम्र तेणें कदाही दिसेना । बहूसाल वर्डाणें ते सोसवेना ।
बहू घोष तो शब्द कानीं पडेना । कपी रोषला झाडतांही झडेना ॥ ९० ॥
पुढें धूम्रत्यागी धगागीत आगी । महावन्हि कोंपेंचि जाला विभागी ।
त्रिकूटाचळू कांचनाचा तखाकी । सतेजीक तेजें झकाकी लखाकी ॥ ९१ ॥
महावन्हि लांगूळे कल्लोळ जाला । परी पाहतां रोम नाहीं जळाला ।
गदाईत काया समुद्रांत घाली । निवाला कपी पुच्छज्वाला विझाली ॥ ९२ ॥
समुद्रीं शुचिर्ष्मंत होऊनि आला । नमस्कार घाली तये जानकीला ।
म्हणे जानकी एकला तूं विदेशी । कपी रे बहूतांपरी कष्टलाशी ॥ ९३ ॥
म्हणे मारुती धन्य हे दीस आले । तुम्हां देखतां सर्वही कष्ट गेले ।
प्रभू वाट पाहील तो रामराजा । निरूपाचि मी शीघ्र जाईन काजा ॥ ९४ ॥
सिते मारुती योग वीयोग जाला । बहूसाल नेत्रोदकीं पूर आला ।
म्हणे मारुती लोभ आतां असावा । सुरांचा बळें राम येतो कुंडावा ॥ ९५ ॥
कपी मागुती मागुती वाट पाहे । उदासीन जातां गळा दाटताहे ।
विवेकें जिवामाजि तो धीर केला । पुढें मारुती शीघ्र सिंधू उडाला ॥ ९६ ॥
कपीलागिं सांगे सितेशुद्धि जाली । सुखें ऐकतां मंडळी ते निवाली ।
समस्तां जणांलागिं आनंद जाला । कपी मारुती रामभेटी निघाला ॥ ९७ ॥

---

१ मोठे रस्ते. २ कुत्रीं. ३ गाढवें. ४ हत्ती. ५ इंद्र. ६ चंद्र. ७ घाण. ८ सोन्याचा. ९ झेंपट. १० कैस. ११ पवित्र. १२ परदेशी, परकी. १३ आधार. १४ समुद्र. १५ सीतेचा शोध.

देळेशीं बळें राहिला रामराजा । कपी रीस ते वीर वेष्टीत फौजा ।
स्फुरद्रूप ऊभारिला दिव्य बाहो । रघूनायकें देखिला भीमदेहो ॥ ९८ ॥
कपी लागवेगें मुखें बोलताहे । अशोकीं जगन्माय कल्याण आहे ।
पुढें मारुती तो नमस्कार घाली । मनोवृत्ति ते राघवाची निवाली ॥ ९९ ॥
समस्तांसि देखोनि आनंद जाला । सिताशुद्धि घेऊनियां रुद्र आला ।
बहुतां बहु सांगती एकमेकां । सिता शोधितां सौख्य जालें अनेकां ॥ १०० ॥
सभामंडपीं राम सन्मुख पाहे । उभा दास साकल्यें तो सांगताहे ।
महत्कृत्य व्हावें जनीं पेश यावें । प्रभूसी समस्तांसि कल्याण व्हावें ॥ १०१ ॥

सुंदरकांड समाप्त.

---

# युद्धकांड.

नमूं विघ्नहर्ता मुळीं सैन्यभर्ता[1] । मुदां धूर्तकर्ता विभांडी विवर्ता ।
चतुर्भूज मत्तानन[7] शोभताहे । तया चिंतितां भ्रांति कोठें न राहे ॥ १ ॥
सदा भेदहंती महंती महंता । सदा ज्ञानवंती नियंती नियंता ।
सुविद्याकळास्फूर्तिरूपा अरूपा । नमस्कारिली शारदा मोक्षरूपा ॥ २ ॥
नये बोलतां चालतां रूप कांहीं । नये भावितां दावितां सर्वथाहीं ।
सदा संत आनंदरूपीं भरावें । पदीं लागतां सद्गुरूचे तरावें ॥ ३ ॥
नमस्कारिला राम कोदंडपाणी । पुढें गावया रामरामेति वाणी ।
भविष्योत्तरें बोलिलीं तीं पुराणीं । उमाकांत ध्यातो सदा शूळपाणी ॥ ४ ॥
कथा शंकराची कथा कार्तिकाची । कथा चंडिकेची कथा मोरयाची ।
कथा वेंकटाची कथा विठ्ठलाची । कथा मल्लयाची कथा भैरवाची ॥ ५ ॥
कथा नृसिंह वामना भार्गवांची । कथा कौरव पांडवां माधवाची ।
कथा देव इंद्रादि ब्रह्मादिकांची । समस्तांमध्यें श्रेष्ठ या राघवाची ॥ ६ ॥
जिणें फेडिला पांग ब्रह्मादिकांचा । बळें तोडिला बंध त्या त्रीदशांचा ।
ह्मणोनि कथा थोर या राघवाची । जनीं ऐकतां शांति होते भवाची[13] ॥ ७ ॥
कथा थोर रामायणीं सार आहे । दुजी ऊपमा या कथेला न साहे ।
तिन्ही लोक गाती सदा आवडीनें । भविष्योत्तरें वानिली शंकरानें ॥ ८ ॥
ऋषीमाजि श्रेष्ठ विचारें वरिष्ठ । सदा एकनिष्ठ सगूणीं प्रविष्ट ।
चरित्रें विचित्रें वनामाजि वस्तां । मुखें बोलिला राम नस्तां समस्तां ॥ ९ ॥
कथा राघवाची सदाशीव पाहे । तळीं ऐकतां शेष थक्कीत राहे ।
कथा श्रेष्ठ हे ऐकतां दोष जाती । महांसुकृती ऐकती धन्य होती ॥ १० ॥
कथा संपली कांड सुंदर्य मागें । प्रवाहो पुढें चालिला लागवेगें ।

---

१ सैन्याबरोबर. २ अरवल. ३ जगाची माता, सीता. ४ मारुती. ५ संपूर्ण. ६ भ्रांतीला. ७ मत्तहत्तीच्या मुखाप्रमाणें मुख आहे ज्याचें असा. ८ धनुष्य आहे हातांत ज्याच्या असा. ९ शंकर. १० कार्तिकस्वामीची. ११ परशुरामाची. १२ देवांचा १३ संसाराची. १४ मोठे पुण्यवान्.

स्वयें श्रोतयांतें कवी प्रार्थिताहे । पुढें युद्धकांडीं कथा रम्य आहे ॥ ११ ॥
ऋषीपर्वतीं रामसौमित्र होते । अकस्मात आला हनूमंत तेथें ।
ह्मणे जानकी देखिली रामचंद्रा । क्षमांरूप लंकेसि आहे नरेंद्रा ॥ १२ ॥
सिता रावणें रक्षिली वाटिकेसीं । प्रभू पाहिली म्यां स्वयें निश्चयेंशीं ।
तयें घोर नीशाचरी रक्षगेसी । बळें ठेविल्या कर्कशा गर्वराशी ॥ १३ ॥
पुढें राघवें सुग्रिवाचे निमित्तें । विचारूनियां सर्वही वानरांतें ।
दळेंशीं बळें दक्षिणे चालि केली । विरांची असंभाव्य सेना मिळाली ॥ १४ ॥
कपी सुग्रिवें सर्व भूमंडळींचे । बहू आणिले वीर मेरू बळाचे ।
विरापाठिशीं भार कोट्यानुकोटी । रिसां वानरांची असंभाव्य दाटी ॥ १५ ॥
अती आदरें स्कंधभागीं विरानें । रघूनायका घेतलें मारुतीनें ।
सुमित्रासुतालागिं त्या अंगदानें । प्रभू चालिला ते बळी थोर मानें ॥ १६ ॥
सिता शोधिली भीमराजें विशाळें । दळें लोटिलीं वानरांचीं ढिसाळें ।
गिरीतुल्य झेंपावती वायुवेगें । करापल्लवा झेलिती शैलशृंगें ॥ १७ ॥
अपारें कुरें वानरें सैरे मेळा । कठोरें करीं फोडिती चंडशीळा ।
रिसें कर्कशें भीम भिंगोळेवाणीं । मध्यें सांवळा राम कोदंडपाणी ॥ १८ ॥
पुढें चालतां भार गोलांगुलांचे । कडे लागले थोर विंध्याचळीचे ।
तया पर्वतामाजि चंडें उदंडें । विशाळें बहू लागलीं झाडखंडें ॥ १९ ॥
कपीभार विंध्याचळामाजि आले । असंभाव्य ते झाडखंडीं निघाले ।
वरी वाड झाडें तळीं दाट छाया । कपी सर्वही सिद्ध जाले उडाया ॥ २० ॥
तळीं पोटळे उंच शाखा फुलांचे । वरी लोंबती घोस नाना फळांचे ।
बहूतांपरीच्या बहू पक्षियाती । बहू श्वापदें तीं फळें भक्षिताती ॥ २१ ॥
तयांमाजि ते भार कोट्यानुकोटी । रिसां वानरांची असंभाव्य दाटी ।
झडा घालिती एकमेकां पुढारें । खडाडां बळें वृक्षवल्ली विदारें ॥ २२ ॥
कितीएक ते बैसले वृक्षअग्रीं । वरी वाइलीं वक्र पुच्छें समग्रीं ।
कितीएक मध्येंच ते गुप्त जाले । कितीएक ते वृक्षमाथां मिळाले ॥ २३ ॥
स्वइच्छा फळें भक्षिती आदरेंशीं । बहू वांटती एकमेकां त्वरेंशीं ।
फळें तोडिती टाकिती ते अपारें । वनामाजि ते कीडती भूभुःकारें ॥ २४ ॥
कितीएक हेलाविती वृक्ष आंगें । कितीएक ऊफाळती लागवेगें ।
कितीएक ते झोंबती आंग व्यस्तें । कितीएक ते लोंबती एक हस्तें ॥ २५ ॥
कितीएक पोटाळिती वाड झाडें । किती मोडिती आंगभारें कडाडें ।
बहू मांडिली झाडखंडीं धुमाळी । कितीएक झेंपावती अंतराळीं ॥ २६ ॥
वनें व्यापिलीं वानरें गर्जताती । दिशा लंघिती श्वापदें पक्षियाती ।

---

१ ऋष्यमूक पर्वतावर. २ खुशाल. ३ अस्वलांची ४ मारुतीनें. ५ सैन्यें. ६ मोठीं. ७ पर्वतशिखरें. ८ उग्र, क्रूर. ९ स्वच्छंदी १० ह्यानांनीं ११ भयंकर. १२ वानरांचे. १३ विंध्यपर्वताचे. १४ वृक्षसमूह. १५ आकाशांत.

भुतें खेचेंर थोर धाकें पळालीं । चळीं कांपती दैन्यवाणीं गळालीं ॥ २७ ॥
कपींचीं पुढें चालिलीं दाट थाटें । वनें चालतां सर्व होती सपाटें ।
महा थोर विंध्याचळा लागवेगें । पुढें चालिले सर्व सोडूनि मागें ॥ २८ ॥
तयां चालतां चालतां दक्षणेसी । बहूसाल आवेश माहा विरांसी ।
पुढें देखिलें शृंग मैळाचळाचें । तयामस्तकीं भार गोळांगुळांचे ॥ २९ ॥
गिरीशृंगपाठारें पाहोनि वेगीं । बळें चालिले भार ते दक्षणांगीं ।
पुढें चालतां चालतां अस्तमाना । समुद्रातिरीं लोटली भीम सेना ॥ ३० ॥
कपीसैन्य सिंधूतिरामाजि आलें । असंभाव्य देखोनि चक्कीत जालें ।
जळें मातला सिंधु लाटे धडाडी । करी गर्जना मेघ जैसा घडाडी ॥ ३१ ॥
दिसे पाहतां सर्व आकाश जैसें । कळेना सिमा दाटलें तोयं तैसें ।
बहूपाणजंजाळ देखोनि डोळां । भयासूरें त्यां कंप सूटे चळाळां ॥ ३२ ॥
समुद्रातिरीं राहिली चंडसेना । असंभाव्य तें सैन्य भूमी दिसेना ।
गिरीवृक्ष देखोनि येती फुंराणें । बळें साधिती अंतराळीं किंराणें ॥ ३३ ॥
कपीभार ते सर्वही स्वस्थ जाले । महापर्वतांचे परी ते मिळाले ।
समुद्रातिरीं राहिलें सैन्य जैसें । पुढें वर्तलें त्रीकुटामाजि कैसें ॥ ३४ ॥
सितार्शुद्धि घेऊनियां रुद्रं गेला । तयीं आखयातें क्षयो प्राप्त जाला ।
बहू मानसीं दुःख मंदोदरीला । तिनें शीघ्र पाचारिलें देवरांला ॥ ३५ ॥
ह्मणे देवरालागिं बीभिषणा हो । तुह्मी आजि वेगीं सभेमाजि जा हो ।
मदोन्मत्त तो अंकुशें आवरावा । विवेकें बळें राव तैसा वळावा ॥ ३६ ॥ 2
ह्मणे धन्य हो धन्य तूं राजकांते । मनीं माझिया हीत ऐसेंचि होतें ।
बरी अंतरीं मात घेऊनि पूर्ती । निघाला सभेमाजि तो धर्ममूर्ती ॥ ३७ ॥
तया रावणाच्या गृहामाजि गेला । बहूतांपरी रावणू शीकवीला ।
पुढें दोघेही ते सभेमाजि आले । महावीर राक्षेस सर्वे मिळाले ॥ ३८ ॥
सभे श्रेष्ठ तो रावणू कुंभकर्णू । सभेमाजि बीभीपणू आग्रगण्यू ।
सभे सर्वही पुत्र मंत्री मिळाले । तयालागिं तो रावणू काय बोले ॥ ३९ ॥
तया रावणें सर्व सांडूनि शुद्धी । पुढें प्रेरिता जाहला पापबुद्धी ।
ह्मणे ऐक गा बुद्धिवंता प्रहस्ता । करी रे मला वश्य ते रामकांता ॥ ४० ॥
सितेकारणें म्यां बहू कष्ट केले । परी पाहतां सर्वही व्यर्थ गेले ।
मनीं चिंतिलें कोडे कांहीं पूरेना । उरे शीण तो शोक पोटीं धरेना ॥ ४१ ॥
सिते सुंदरीलागिं संभोग द्यावा । समूळें बळें रामशत्रू वधावा ।
न हें ईतुकें सर्वही कृत्य जालें । सुखें सर्वदा चित्त माझें निवालें ॥ ४२ ॥
अहंकारला रावणू कोटिगूणें । मनीं मानिलें सर्व ब्रह्मांड ऊणें ।
समस्तांमध्यें आगळा मेघवर्णू । पुढें बोलता जाहला कुंभकर्णू ॥ ४३ ॥

१ पर्वतमस्तकावरील सपाटी. २ उदक. ३ भयंकर. ४ स्फुरण. ५ उड्डाण. ६ सीतेचा पत्ता. ७ मा-
... ८ दीर बिभीषणाला ९ इच्छा. १० विशेष.

वदे कुंभकर्णू तया रावणाला । मदें सर्वेही नीतिधर्मू बुडाला ।
अकस्मात लंकापतबुद्धि नासे । पुढें सर्वेही सूख तेणें विनाशे ॥ ४४ ॥
जगीं निंदिलें तेंचि टाकून येतां । पुढें वेळ नाहीं तया दुःख होतां ।
विषें घोळिलें ठेवितां प्रीति तेथें । पुढें सत्वरा जाइजे मृत्युपंथें ॥ ४५ ॥
ह्मणे कुंभकर्णू असें काय केलें । सिता आणितां सर्वही राज्य गेलें ।
पुढें भंगलें चित्त जाणूनि जीवें । मनासारिखें बोलिला तो स्वभावें ॥ ४६ ॥
शुभाशुभ जें मानलें तूजलागीं । घडो तेंचि आतां भलें या प्रसंगीं ।
बळें माझिया सर्व सूखें रहावें । पुढें काय होईल तैसें पहावें ॥ ४७ ॥
कपी मानवी सर्व कैसे मिळाले । क्षुधेकारणें माझिये प्राप्त जाले ।
रिपू घालितों ऊदरामाजि सांठा । नरें वानरें घांस घेतों घटाटा ॥ ४८ ॥
उठेल्या महा घोर माझेनि कोपें । पुढें देखतां तो चळीं काळ कांपे ।
रिसें[१] मर्कटें बापुडीं दैन्यवाणीं । रिपू आमचे थोर वाटे शिराणी ॥ ४९ ॥
तया बोलतां रावणा सूख जालें । स्तुतीउत्तरें आदरें गौरवीलें ।
महावीर पारस्थ ऊठीत वेगीं । पुढें बोलता जाहला ते प्रसंगीं ॥ ५० ॥
अहो कासया मंत्र पूसा रिपूचा । जनीं कोण लेखा तया मर्कटांचा ।
समर्थापुढें दूसरा कोण कैंचा । करूं एकला सर्व संहार त्यांचा ॥ ५१ ॥
सितेची बहू प्रार्थना कां करावी । प्रभू सांगतों बुद्धि पोटीं धरावी ।
ह्मणे वीर पारस्थ त्या रावणाला । बळात्कार राया करावा सितेला ॥ ५२ ॥
ह्मणे रावणू धन्य गा बुद्धिवंता । तुझें बोलणें मानलें दृढ चित्ता ।
परी शाप आहे मला ब्रह्मयाचा । करीना बळात्कार हे सत्य वाचा ॥ ५३ ॥
तयां बोलतां दुःख बीभीषणाला । बहूसाल संतापला क्रोध आला ।
ह्मणे रे रघूनाथ पूर्णप्रतापी । दुरात्मे तुह्मी नष्ट चांडाळ पापी ॥ ५४ ॥
तुह्मी राक्षसें निर्बळें बुद्धिहीनें । मती मंदली पातकाचेनि गुणें ।
सुराकारणें राम आला कळेना । मदें मातला रावणू ओळखेना ॥ ५५ ॥
कपी वीर ते दूरि टाकूनि शंका । मिळाले करायास निर्मूळ लंका ।
त्रिकूटाचळू दृश्य नाहीं तयांला । तंव जानकी भेटवा राघवाला ॥ ५६ ॥
रुपें कर्कशें कोपला वीर गाढा । रणामंडळीं राम वाईल मेढा ।
तया देखतां काळ भीइं शकेना । तुह्मी मश्यकें राक्षसें सर्व सेना ॥ ५७ ॥
रणीं तीव्र त्या राघवाचेनि बाणीं । तुटों लागले नृपचे पादपाणी ।
धडें मस्तकें मेदमांसें चिढाणी । न होतां सिता भेटवा चापपाणी ॥ ५८ ॥
तया बोलतां ते सभा तप्त जाली । सुतां मंत्रियाचे मुखीं तीव्र बोली ।
असंभाव्य तो रावणा कोप आला । कुशब्दें बहू त्रास बीभीषणाला ॥ ५९ ॥
सभेमाजि धिक्कारिलें रावणानें । उठोनी पदें ताडिलें दुर्जनानें ।

१ अस्वलें. २ आवड. ३ नाश. ४ देवांकरितां. ५ पाय व हात. ६ चरबी व मांस. ७ हातांत धनुष्य घेणाऱ्या रामाला.

बहुतांमध्यें एकला धर्ममूर्ती । मनीं खोंचला तो उदासीन चित्तीं[1] ॥ ६० ॥
मन भंगला हो तया धार्मिकाचा । पुढें त्याग तात्काळ केला सभेचा ।
उडाला नभोमंडळामाजि वेगीं । पुरोहीत चत्वारि[2] ते पृष्ठभागीं ॥ ६१ ॥
झळंबे मनीं लोभ त्या सांडि केली । अकस्मात ते वृत्ति भंगूनि गेली ।
पुढें वाक्य बोलोनियां रावणातें । उदासीन तो चालिला व्योमपंथें[3] ॥ ६२ ॥
पुरोहीत चत्वारि ते पृष्ठभागीं । त्वरें उत्तरें चालिले लागवेगीं ।
समुद्रासि लंघूनि पैलाड गेले । नभीं पारखे सुग्रिवें ओळखीले ॥ ६३ ॥
कपींद्र ह्मणे पैल पाहे विशाळू । नभीं येतसे कोण हा पंचमेळू[4] ।
अकस्मात खालावला व्योमपंथें । भिडों पाहती वानरें त्या अनर्थें ॥ ६४ ॥
मिळाले कपी बोलती त्यासि वाचा । अकस्मात आलास तूं कोण कैंचा ।
ह्मणे बंधु मी होय लंकापतीचा[5] । परी दास अंकीत या राघवाचा ॥ ६५ ॥
पुरी त्यागिली सर्व एका निमेशीं । करा हो तुह्मी भेटि या राघवाशीं ।
ह्मणे सत्य बीभीषणू नाम माझें । नव्हे अन्यथा सर्वथा वाक्य दूजें ॥ ६६ ॥
कपी सर्वही जुत्पती धर्ममूर्ती । बहूतांपरी ऐकिली वाड कीर्ती ।
समस्तीं तुह्मीं हीत माझें करावें । कृपाळूपणें राघवा भेटवावें ॥ ६७ ॥
ह्मणे वीर सुग्रीव नावेक[7] बैसा । त्वरें मात हे जाणवीतां सुरेशा ।
कपीराज तो लागवेगें निघाला । अती आदरें भेटला राघवाला ॥ ६८ ॥
समाचार साकल्य[8] तो सांगताहे । ह्मणे भेटी नीचाशरू[9] इच्छिताहे ।
परी अंतरीं कोण कैसा कळेना । तया ठेवितां राजनीती मिळेना ॥ ६९ ॥
समस्तांकडे पाहिलें राघवानें । बहूतांपरी बोलिलें तें सभेनें ।
मनीं पाहतां देखिला दैन्यवाणा । कृपाळूपणें आणवी रामराणा ॥ ७० ॥
उभें राहिलें भाग्य बीभीषणाचें । करी अंतरीं ध्यान पादांबुजाचें ।
भिजे दिव्य सर्वांग त्या अश्रुबिंदीं । मिठी घातली रामपादारविंदीं[10] ॥ ७१ ॥
कृपासागरें ठेविला हस्त माथां । चिरंजीव लंकापती होय आतां ।
मधुरें गिरें राघवें ऊठवीला । पुढें तिष्ठतू हात जोडोनि ठेला ॥ ७२ ॥
बहू स्तूति केली रघूनायकाची । करी आदिनारायणाची विरिंची[11] ।
तयाचेपरी शब्दकारुण्य बोले । पुढें पाउलें लक्षितां अश्रु आले ॥ ७३ ॥
ह्मणे राम बीभीषणा बैस आतां । पुरे स्तूति सांडी तुह्मी सर्व चिंता ।
सुमित्रासुतालागिं[12] संकेत केला । दिजे मंगळस्नान बीभीषणाला ॥ ७४ ॥
त्वरें ऊठला बंधु त्या राघवाचा । घटू आणिला पूर्ण सिंधूदकाचा ।
पुरें शीघ्र बीभीषणालागिं शेषें । विशेषें दिलें सौख्य राज्याभिषेकें ॥ ७५ ॥
ह्मणे राम बीभीषणा सत्य वाचा । प्रतापें वधू जालिया वैरियाचा ।
तुला दीधलें राज्य लंकापुरीचें । चळेना चिरंजीव जैसें ध्रुवाचें ॥ ७६ ॥

---

१ चित्त. २ चार ३ आकाशमार्गानें. ४ परकी. ५ रावणाचा. ६ मल्ल. ७ क्षणभर. ८समग्र.९ राक्षस. १० चरणकमळांचें. ११ ब्रह्मदेव. १२ लक्ष्मणाला.

वरू दीधला रामचंद्रें दयाळें । कृपासागरें दासपाळें नृपाळें ।
प्रसंगीं तये थोर आनंद जाला । दिल्हें अक्षयी राज्य बीभीषणाला ॥ ७७ ॥
कपी सुग्रिवादीक मांदी मिळाली । समस्तीं विरीं आदरें स्तूति केली ।
जगीं धन्य हें भाग्य बीभीषणाचें । प्रितीपात्र जाला रघूनायकाचें ॥ ७८ ॥
रघूनायका देखतां सूख जालें । बहु दुःख मागील सर्वै निमालें ।
जगीं धन्य गा धन्य बीभीषणा तूं । तुला जाहला प्रसन्न श्रीअनंतू ॥ ७९ ॥
समस्तांसि सन्मानिलें आदरेंशीं । नमस्कार केला रघूनायकासी ।
पुढें मंत्रियांमाजि तो बैसवीला । तेणें थोर आनंद बीभीषणाला ॥ ८० ॥
ह्मणे राम बीभीषणा बैस आम्हा । त्रिकूटाचळू सांग साकल्य वार्ता ।
वदे राज्य लंकापुरी सर्व सेना । मनामाजि संतोषला रामराणा ॥ ८१ ॥
पुढें राम बीभीषणा मंत्रै पूसे । कपीभार पैलीकडे जाति कैसे ।
विचारूनियां सुग्रिवाचेनि मतें । ह्मणे हो क्षमा मागिजे मार्ग यातें ॥ ८२ ॥
समुद्रासि देऊनियां श्रेष्ठ मानू । करावा अती आदरें सुप्रसन्न ।
मनीं बोलणें सत्य मानूनि देवें । समुद्रातिरीं बैसिजे शुद्ध भावें ॥ ८३ ॥
त्रिकूटाचळाहून तो हेर आला । पुढें सर्व पाहूनि शार्दूळ गेला ।
समाचार सांगे तया रावणाला । ह्मणे वानरेंशीं बळें राम आला ॥ ८४ ॥
मिळाले कपी रीसँ कोट्यानुकोटी । समुद्रातिरीं जाहली थोर दाटी ॥ ८५ ॥
बळें राहिली ते असंभाव्य सेना । विरांची असंख्यात संख्या असेना ।
शिळाशीखरें झेलिती वृक्षपाणी । सदा सर्वदा तर्जती घोर वाणी ॥ ८६ ॥
तयामाजि ते मानवी वेषधारी । रुपें रम्य लावण्य कामावतारी ।
असंख्यात मेळा रिसांवानरांचा । कपिश्रेष्ठ सुग्रीव राजा तयांचा ॥ ८७ ॥
प्रभू सांगतों सिद्ध आतां असावें । पुरी माजि दुश्चित कांहीं नसावें ।
तयें सांगतां थोर उद्वेग जीवा । ह्मणे मागुता कोण रे पाठवावा ॥ ८८ ॥
पुढें शुक बोलाविला आदरेंशीं । ह्मणे जाय रे बोल त्या सुग्रिवासी ।
ह्मणावें कपी तूं सखा आमुचा रे । अनूचीत हें वाउगें कासया रे ॥ ८९ ॥
बहूतांपरी शुक तो शिकवीला । अलंकार देऊनियां तोषवीला ।
नमस्कार केला तयें रावणासी । निघाला बळें हेर तैसा त्वरेंशीं ॥ ९० ॥
नभोमंडळीं शीघ्र उड्डाण केलें । देहें आपुलें सर्वही पालटीलें ।
रुपें सुंदरू जाहला शुद्ध पक्षी । निराळा नभीमाजि तो सैन्य लक्षी ॥ ९१ ॥
ह्मणे सुग्रिवा ऐक रे ऐक भावें । कपी व्यर्थ आलासि मागें फिरावें ।
त्वरें आपुल्या भूवनामाजि जावें । समारंगणीं वाउगें कां मरावें ॥ ९२ ॥
त्रिकूटाचळा रामकांतेसि नेलें । कपी सांग पां रे तुझें काय गेलें ।

---

१ मंडळी. २ संपूर्ण. ३ मसलत. ४ अस्वलें. ५ हातांत झाडें घेऊन. ६ मदनमूर्ती. ७ आकाशांत.

तयां मानवा साह्य जालासि कैसा । मनीं नेणतां चालिला मूर्ख जैसा ॥ ९३ ॥
बळें हीन झुंजासि त्याच्या न जावें । कदा कृपणाचें कऱ्हाडी न व्हावें ।
महा मूर्ख रे सख्य याचें नसावें । स्वयें हीत तें ज्ञान पोटीं बसावें ॥ ९४ ॥
त्रिकूटाचळ लभ्य नाहीं सुरेशा । नरांवानरां प्राप्त होईल कैसा ।
कपींपुंगवा व्यर्थ आलासि वांयां । समारंगणीं बाणघातें मराया ॥ ९५ ॥
समस्तीं रणामाजि जीवें मरावें । तये मैत्रिकीचें जनीं काय घ्यावें ।
बहुतांपरी हेंचि आतां करावें । तुवां आपुल्या भूवनामाजि जावें ॥ ९६ ॥
शुकें निंदिलें सर्वेहि वानरांतें । बहुसाल धिक्कारिलें हो तयांतें ।
तिहीं पाडिला ताडिला कुस्त केला । पुन्हा सोडिला तो नभामाजि गेला ॥ ९७ ॥
ह्मणे शुक ऐका रिसें वानरें हो । तुह्मां रावणें रक्षिलें निर्बळें हो ।
अरे मूर्ख हो व्यर्थ आलांत येथें । समारंगणीं जावया मृत्युपंथें ॥ ९८ ॥
अरे सुग्रिवा वानरा भूललासीं । रिसांमर्कटांमाजि तूं मूर्ख होशी ।
मुदा व्यर्थ घेऊनि आलासि सेना । तुला रावणू कोण कैसा कळेना ॥ ९९ ॥
पुन्हा बोलता जाहला घोर वाणी । कपी मागुते क्षोभले वृक्षपाणी ।
धरूनी बळें आणिलें पक्षियाला । तिहीं रक्षिलें पाशबंधीं तयाला ॥ १०० ॥
पुढें शीघ्र कोपेल हा रामचंद्र । ह्मणे दास भेटेल भावें समुद्र ।
प्रतापें बळें तारिती चंड शीळा । बळें सेतु बांधूनि घेती सुवेळा ॥ १०१ ॥

---

## द्वितीय प्रसंग.

समुद्रातिरीं राम राजीवनेत्रें[3] । भुमी सेज दर्भासनीं तीन रात्रें ।
बहुतांपरी दीधला श्रेष्ठ मान । परी सागरू तो नव्हे सुप्रसन्न ॥ १ ॥
फळें तोयें सांडूनियां नित्य नेमें । बहुतांपरी प्रार्थिला सिंधु रामें ।
परी नायकें जो बळें धुंद जाला । रघुनायका कोप तात्काळ आला ॥ २ ॥
उभा राहिला काळ कृतांतु जैसा । बळें सिंधु जाळावया राम तैसा ।
दिसे रूप अद्भूत वज्रांग ठाणें । करीं चाप तें सज्जिलें अग्निबाणें ॥ ३ ॥
बळें ओढितां घोरघोषें करारी । दिशा दाटल्या वन्हि शीतें थरारी ।
भयें बैसला काळपोटीं दरारा । चवों[?] लागल्या त्या असंभाव्य तारा ॥ ४ ॥
बहू क्षोभला राम जाळूं निघाला । पुढें सिंधु भेटावया शीघ्र आला ।
ह्मणे स्वामि हो थोर अन्याय झाला । समुद्रासि हो शीघ्र पालाण घाला ॥ ५ ॥
नळाचेनि हस्तें जळीं चंड शीळा । गिरीशृंग तर्तील हो जी नृपाळा ।
वदे निश्चयें आदरें हा समुद्र । तेणें थोर संतोषला रामचंद्र ॥ ६ ॥
बहुतांपरी राम संतोषवीला । पुढें सिंधु तोही जळामाजि गेला ।
नळें वानरांचीं दळें सिद्ध केलीं । गिरीशृंग आणावया शीघ्र गेलीं ॥ ७ ॥

---

वानरश्रेष्ठा. २ भयंकर. ३ कमलनयन. ४ उदक. ५ यम. ६ पहूं लागल्या. ७ पूल. ८ सैन्यें.

त्वरें उत्तरं चालिले भार सैरा । बळी धांवती एकमेकां पुढारां ।
शिळा शीखरें झाडखंडें प्रचंडें । बळाचे कपी चालवीती उदंडें ॥ ८ ॥
कपी धांवती लक्ष कोट्यानुकोटी । बळें गर्जती थोर आनंद पोटीं ।
गिरीकंदरें देश लंघूनि जाती । शिळा शीखरें शीघ्र घेऊनि येती ॥ ९ ॥
निळे पींवळे श्वेत आरक्त काळे । पिके जांभळे गौर जांभे गव्हाळे ।
बहु रंग पाषाण नानापरींचे । उभे वक्र वर्तूळ गाभे गिरीचे ॥ १० ॥
कपीवीर ते शीघ्र घेऊनि जाती । बळें मेघवाचेपरी वर्षताती ।
शिळीं सेतु बांधी नळ लागवेगें । असंभाव्य तीं चालिलीं शैलशृंगें ॥ ११ ॥
कपी मोडिती वाड झाडें कडाडां । कडे पाडती पर्वतांचे खडाडां ।
उड्या घेति आकाशपंथें धडाडां । बळें टाकिती सिंधुमध्यें थडाडां ॥ १२ ॥
विशाळा जडा वर्तुळा त्या उदंडी । बहू मस्तकीं वाहती चंड धोंडी ।
शिळा शीखरें फोडिती ते अभंगें । नभीं भार झेंपावती लागवेगें ॥ १३ ॥
कपी मारुतीसारिखे जे उडाले । गिरी मंदरासारिखे चालवीले ।
कपी साक्षपी देवरूपी बळाचे । कडे लागले ते सुवेळाचळाचे ॥ १४ ॥
बळें सेतु बांधावया वेगु केला । शतें योजनें लांब विस्तीर्ण जाला ।
दश योजनें भव्य रुंदी तयाची । जळीं बांधली सर्व पांचां दिसांची ॥ १५ ॥
कपी सर्व आनंदलें कार्य झालें । बळें गर्जती चित्त सर्वे निवालें ।
सुवेळाचळा सेतु बांधोनि नेला । नळा वानराला जयो प्राप्त जाला ॥ १६ ॥
म्हणे रामराणा तया सुग्रिवातें । दळें चालवा सागराचेनि पंथें ।
निरूपी कपी शीघ्र सेनापतीला । निळें सर्व सेनेसि संकेत केला ॥ १७ ॥
दळें सर्वेही वानरांचीं निघालीं । पुढें चालतां दाटणी थोर जाली ।
कडेचा पडे तो उडे अंतराळीं । सुवेळाचळा पावले शीघ्रकाळीं ॥ १८ ॥
सुवेळाचळाभीतरीं राजभारें । दळें लोटलीं वानरांचीं अपारें ।
बळें घोरघोषें कपी गर्जताती । दिशाचक्र सिंधू गिरी पाहताती ॥ १९ ॥
त्रिकूटागिरीशीखरीं दिव्य जे कां । रघूनायकें देखिली रम्य लंका ।
दिसे तेजबंजाळ लावण्यराशी । तयां देखतां पारणें लोचनांशीं ॥ २० ॥
म्हणे धन्य रे धन्य तो विश्वकर्मा । असंभाव्य या पर्वताचा महीमा ।
सुवर्णाचळासारिखा दीसताहे । सिता सुंदरी या स्थळामाजि आहे ॥ २१ ॥
पुढें राम बोले रिसांवानरांशीं । असावें तुम्हीं सर्व सेनाप्रदेशीं ।
कपीचक्र अव्यग्र तें सिद्ध जालें । निळें वानरें सर्व सन्नद्ध केलें ॥ २२ ॥
कपीभार ते सर्वेही स्वस्थ जाले । पुढें धर्मता उत्तरीं राम बोले ।
म्हणे सुग्रिवा बापुडें शुक सोडा । तया पायिंचे सर्वेही पाश तोडा ॥ २३ ॥
तया आंगदें सोडतां तो उडाला । मुखीं रामनामें नभीं गुप्त जाला ।

---

१ पर्वताच्या गुहा २ चंद्राप्रमाणें. ३ सैन्यें. ४ समाधान. ५ मेरुपर्वतासारखा. ६ तयार. ७ आकाशांत.

बळें चालिला शुक्र मूळें त्वरेशीं । त्रिकूटाचळीं भेटला रावणासी ॥ २४ ॥
ह्मणे रावण गा शुका काय झालें । नव रात्रपर्यंत कोठें क्रमीलें ।
वदे शुक हो लंकनाथा वरिष्ठा । मुखें व्यर्थ बोलों नये अप्रतिष्ठा ॥ २५ ॥
तयां वानरांच्या दळांमाजि गेलों । देहें पालटीलें स्वयें शूक जालों ।
नभोमंडळीं राहिलों अंतराळीं । बळें वानरांचीं दळें तीं न्यहाळीं ॥ २६ ॥
समुद्राचिये उत्तरें भीम सेना । दहा योजनें दाट भूमी दिसेना ।
तिथें मुख्य ते रामसौमित्र बंधू । कपिश्रेष्ठ सुग्रीव राजा अगाधू ॥ २७ ॥
उचिष्टोत्तरें तुमचीं त्या कपीला । मुखें बोलिलों सर्वही सुग्रिवाला ।
मला सांगतां वीर कोपासि आले । कितीएक ते पाठिलागीं उडाले ॥ २८ ॥
कपीवीर धांवोनियां पाठिलागीं । मला ताडिते जाहले ते प्रसंगीं ।
बहु सुख जालें तयां वानरांतें । कठोरें करें ताडिलें या देहातें ॥ २९ ॥
बहु कष्ट जाले प्रभो या जिवासी । नसो वोखटी वेळ ती वैरियासी ।
रिसां वानरांची असंभाव्य मांदी । पुढें घातलें हो मला पाशबंदीं ॥ ३० ॥
प्रभू काय सांगों चमत्कार जाला । समुद्रांतुनी सिंधु बाहेर आला ।
रूपें भव्य तो मूर्तिमंतू निघाला । अती आदरें भेटला राघवाला ॥ ३१ ॥
पुढें बोलतां जाहला तोयराशीं । तयें शुद्धि सांगीतली राघवासी ।
ह्मणे जी बळें सिंधु बांधा दयाळा । नळाचेनि हस्तें जळीं चंडशीळा ॥ ३२ ॥
कपी प्रेरिले त्या रघूनायकानें । शिळा तारिल्या त्या नळा वानरानें ।
कृपीभार ते सर्व ऐलांड आले । सुवेळाचळा मस्तकीं ते मिळाले ॥ ३३ ॥
कृपाळूपणें बोलिला रामचंद्र । कपीला ह्मणे शूक सोका नरेंद्र ।
पुढें वानरीं सोडिलें लागवेगीं ।समर्था तुला भेटलों ये प्रसंगीं ॥ ३४ ॥
प्रभू सांगतों बुद्धि आतां करावी । त्वरें जानकी राघवा भेटवावी ।
सिता पाठवीतां बरें लंकनाथा । न होतां असें प्राप्त होईल वेथा ॥ ३५ ॥
शुकें सांगतां रावणा कोप आला । ह्मणे कोण लेखा नरां वानरांला ।
रणामंडळीं सोडितां बाणवृष्टी । बळें आपुल्या सर्व जाळील सृष्टी ॥ ३६ ॥
बळें पूजितां भूमि आकाश वाणीं । ह्मणे काय तीं लेंकुरें दैन्यवाणीं ।
न होतां असंभाव्य त्या बाणवृष्टी । सुखें सांगती थोर संग्रामगोष्टी ॥ ३७ ॥
अमित्रीं तिहीं एक अद्भुत केलें । समुद्रासि पालाणिलें सैन्य आलें ।
नव्हे पाहतां गोष्टि सामान्य कांहीं । परी राक्षसां शुद्धि अद्यापि नाहीं ॥ ३८ ॥
पुढें हेर बोलिविले आदरेशीं । शुका सारणातें ह्मणे गर्वराशी ।
मिळालीं दळें श्रावणारीसुतोचीं । तुळा रे बळें त्या रिसां वानरांचीं ॥ ३९ ॥
तयें बोलिल्यानंतरें लंकनाथें । बळें चालिले शीघ्र आकाशपंथें ।
सुवेळाचळा देखतां सिद्ध जाले । देहे आपुले ते तिहीं पालटीले ॥ ४०

---

१ सैन्यामध्यें. २ वाईट. ३ जमाव. ४ समुद्र. ५ हिशोब. ६ युद्धाच्या. गोष्टी. ७ शत्रूंनीं. ८ पूल बांधला. ९ रामाचीं. १० अस्वलांचीं.

रुपें जाहले वानरू वेषधारी । कळेना कळा बाणलीसे शरीरीं ।
दळीं कोटिच्या कोटि संख्या असेना । तिहीं राक्षसीं तूळिली सर्व सेना ॥ ४१ ॥
सभे बैसले राम सौमित्र जेथें । शुका सारणाला नव्हे रीघ तेथें ।
पुढें अंतरीं दूर राहून वेगीं । बळें तूळिते जाहले ते प्रसंगीं ॥ ४२ ॥
सभे अंतरें लक्ष लावोनि ठेले । अकस्मात बीभीषणें ओळखीले ।
धरीलें करीं त्या शुका सारणातें । ह्मणे दूत हे धाडिले लंकनाथें ॥ ४३ ॥
तदा बोलिला राम बीभीषणाला । दळें दाखवा सर्वही शीघ्र त्याला ।
तुला जा दळें तीं शुकासारणा हो । तुह्मी आपुलें कार्य सिद्धीस न्या हो ॥ ४४ ॥
स्तुतीउत्तरें सारण शीघ्र बोले । कृपासागरें हेर ते रक्षियेले ।
प्रभू देइजे लेहआज्ञा दयाळा । तुजलागिं कल्याण हो जी नृपाळा ॥ ४५ ॥
निरोपेंचि तात्काळ ते हेर गेले । तया रावणाला नमस्कार केले ।
प्रभू मृत्यु आला बळें लागवेगें । परी मुक्का जाहली थोर भाग्यें ॥ ४६ ॥
दळामाजि बीभीषणें ओळखीलें । धरूनी बळें तें सभेमाजि नेलें ।
उदारें रघूनायकें सोडवीलें । कृपाळूपणें भूपती मुक्त केलें ॥ ४७ ॥
कळेना दळीं कोण संख्या बळाची । असंभाव्य सेना बहू विक्रमाची ।
तयांच्या बळा ऊपमा काय द्यावी । समारंगणीं भेटि त्यांची न व्हावी ॥ ४८ ॥
रघूनाथ सौमित्र बीभीषणानें । कपी सुग्रिवें अंगदें मारुतीनें ।
बळें घेऊं लंका असा नेम केला । घडीनें घडी कोप येतो तयांला ॥ ४९ ॥
मनीं वाटतें बुद्धि ऐशी करावी । सिता आदरें राघवा भेटवावी ।
तया बोलतां कोपला गर्वराशी । ह्मणे तांडिलें काय नेणों तुह्मांसी ॥ ५० ॥
भया सांगतां त्या नरां वानरांचे । सदा सर्वदा भक्ष जें राक्षसांचें ।
मज रावणासारिखा कोण आहे । समारंगणीं काळ भीडों न राहे ॥ ५१ ॥
महा थोर दामोदरीं गर्वराशी । पुढें रावणू वेंघला सारणेंशी ।
तया मस्तकीं उंच आकाशपंथीं । पुढें पाहतां दृष्टि फांके दिगंतीं ॥ ५२ ॥
सुवेळाचळीं दृष्टि घालोनि पाहे । असंभाव्य तें सैन्य पोटीं न साहे ।
पुढें रावणू सारणालागिं पूसे । कपी सांग रे सर्व आहेत कैसे ॥ ५३ ॥
कपीभार पाहूनियां हेर आले । पुसे रावणू सारणू शीघ्र बोले ।
वदे देखिल्यासारिखें सत्य वाचे । पुढें दाखवी भार गोळांगुळांचे ॥ ५४ ॥
ह्मणे सारणू ते कपी वीर जेठी । मिळाले असंभाव्य कोट्यानुकोटी ।
देहे पर्वतासारिखे काळरूपी । रणीं भीडतां शूर संग्रामकोपी ॥ ५५ ॥
ह्मणे लंकनाथा कपी पैल पाहें । समस्तांमधें आगळा बैसलाहे ।
समारंगणीं वीर नेतां विरामा । महा मुख्य सेनापती नीळनामा ॥ ५६ ॥
दिसे दुसरा त्याचिये दक्षिणांगीं । बळें वृद्धतू वीर लोहीत अंगीं ।
धरा हाणतां पुच्छघातें थरारी । कपी अंगदू नाम त्याचें सुरारी ॥ ५७ ॥

---

१ प्रवेश. २ सैन्यामध्यें. ३ लक्ष्मण. ४ वानरांचे. ५ युद्धांत. ६ विशेष, अधिक. ७ मृत्यूला. ८ ल

मिळाले कपी रीसे कोट्यानुकोटी । पुढें बैसला भार घालोनि पाठीं ।
सदा सर्वदा लक्ष ज्यांचें त्रिकूटीं । बहूसाल युद्धा उतावीळ पोटीं ॥ ५८ ॥
करी चंड उड्डाण आकाशपंथें । महामेघ वीतूळती अंगवातें ।
समारंगणीं भीडतां अग्रवादू । बळें आगळा नाम त्याचें कुमूदू ॥ ५९ ॥
देहे सिंधुरासारिखा[1] पैल पाहे । महावीर विंध्याचळामाजि[3] राहे ।
सुपर्णास[4] सांडून उड्डाण ज्यांचें । कपी थोर हा ऋषभू नाम त्याचें ॥ ६० ॥
दिसे पैल पुच्छासनीं वीर भारें । खचे स्वर्ग तें याचिया भूभुकारें ।
कपी शर्भ ऐसें तया नाम राया । उतावीळ हा थोर शत्रू जिताया ॥ ६१ ॥
कपी वीनतू पैल पाहा विशाळू । रणीं धांवतां परिप्रेतां सुकाळू ।
देहे आचळासारिखा[5] ताम्रवर्णी । विरां वानरांमाजि अद्भूत कर्णी ॥ ६२ ॥
भृकूटी भयासूर त्या भीम पाहें । भुमी अंगरोमावळी रूळताहे ।
कपी क्रंदन भूपती नाम ज्याचें । तयासारिखें देह नाहीं बळाचें ॥ ६३ ॥
प्रमाथी कपी वीर कैसा कडाडी । महामेघ गंभीर जैसा गडाडी ।
रणीं झुंजतां थोर कल्पांत मांडे । तयां वानरांशीं बळें कोण भांडे ॥ ६४ ॥
सुवर्णाचळासारिखा देह ज्याचा । मुखें विक्रमू बोलवेना बळाचा ।
गवायू कपी वीर तात्काळ कोपे । उडाणें सवीतारथीं[7] अश्व कांपे ॥ ६५ ॥
विशाळू गजू वानरू पैल पाहो । तुळीतो सदा सर्वदा सख्य बाहो ।
त्रिकूटाचळीं लाविली दृष्टि जेणें । बळें सर्व रोमांच येती फुराणें ॥ ६६ ॥
विरांमाजि हा धूम्रचंड प्रतापी । महापर्वतासारिखा चंडकोपी ।
रिसू कर्कश घोर घोष अगाधू । बळी होय हा जांबुवंतासि बंधू ॥ ६७ ॥
कपींचें बहूसाल सामर्थ्य वानी । मुखें बोलतां रावणू वीट मानी ।
ह्मणे रावणू सारणा मूर्ख होशी । मजदेखतां मर्कटां वर्णितोशी[8] ॥ ६८ ॥
असों हे रिसें मर्कटें या प्रसंगीं । रिपू दाखवी मुख्य तो राम वेगीं ।
अभिप्राय जाणूनि लंकापतीचा[9] । वदे सारणू मागुतीं रम्य वाचा ॥ ६९ ॥
पहा राम तो पैल कोदंडपाणी । रुपें सांवळा रम्य लावण्यखाणी ।
रतीचा[10] पती तूळितां तुच्छ होये । विराजे रिसां वानरांमाजि पाहें ॥ ७० ॥
पहा राम विश्राम आत्मा जगाचा । बळें काळहर्ता विहर्ता अघाचा[11] ।
तुंणीरांबरें[12] कांत माथां लपेटा । झणत्कारिती वाजटा चापघंटा[13] ॥ ७१ ॥
महावीर तो देखतां धाक सूटे । समारंगणीं भीडतां काळ वीटे ।
तयाशीं बळें भीडतां पूरवेना । कदाही जयो प्राप्त होतां दिसेना ॥ ७२ ॥
तया दक्षणे दूसरा बैसला हो । महावीर सौमित्र राया पहा हो ।
असंभाव्य सामर्थ्य याचें कळेना । बळें आगळा जिंकितां जिंकवेना ॥ ७३ ॥

---

१ अस्वकें. २ हत्तीसारखा. ३ विंध्यपर्वतावर. ४ गरुडाला. ५ पर्वतप्रमाणं. ६ बलवान्. ७ सूर्याच्या रथामध्यें. ८ वर्णन करतो. ९ रावणाचा. १० मदन. ११ पापाचा. १२ बाणांच्या भात्याच्या वस्त्रानें. १३ धनुष्याच्या घंटा.

कपी राघवा वामभागींच आहे । त्रिकूटाचळू दृष्टिनें वक्र पाहे ।
कपीनाथ सुग्रीव तो ओळखावा । कळेना असंभाव्य त्याचा उठावा ॥ ७४ ॥
कपी आणिले सर्व भूमंडळींचे । असंख्यात संख्या नसे भार त्यांचे ।
वनीं मैत्रिकी जोडिली राघवांशीं । रघूनायका साह्य जाला जिवेंसी ॥ ७५ ॥
सिता शोधिली मारिलें कुमरासी । वनें मोडिलीं जाळिलें त्रीकुटासी ।
बळें आगळा भूपती पैल पाहे । समस्तांमध्यें मारुती शोभताहे ॥ ७६ ॥
महाभीम भिंगोळ काळा करोळू । विशाळें नखें फोडितो ब्रह्मगोळू ।
रिसां कर्कशांमाजि हा काळकेतू । बळें आगळा पैल जो जांबवंतू ॥ ७७ ॥
उतावीळ मारावया दैत्य पाहे । महा वीर बीभीषणू शोभताहे ।
तयें सांगतां रावणा दुःख जालें । असंख्यात कोपानळें दग्ध केलें ॥ ७८ ॥
करीं खड्ग घेऊनियां सारणाला । प्रसंगीं तये शीघ्र मारूं निघाला ।
ह्मणे सारणू जी पिडा कां करीतां । मुखें बोललों सर्वही सत्य वार्ता ॥ ७९ ॥
तुह्माया दळें पाठवीलें भुपाळें । रिपूचीं दळें पाहिलीं तीं विशाळें ।
तयासारिखें बोलिलों सत्य भावें । समर्थापुढें मिथ्य कैसें वदावें ॥ ८० ॥
प्रभू आमुचा कोण अन्याय जाला । खरें सांगतां कोप येतो तुह्मांला ।
नसे पाहतां अल्प अन्याय कांहीं । नसे मिथ्य आह्मी नसों स्वामिद्रोही ॥ ८१ ॥
पुढें रावणू कोप सांडून ठेला । पुसे आदरें मंत्र माहोदराला ।
सुवेळाचळा कोण रे पाठवावा । रिपूचा विवेकें बरा शोध घ्यावा ॥ ८२ ॥
वदे वीरु माहोदरू रावणातें । सुवेळाचळा पाठवा शार्दुलातें ।४
महा धूर्त हा जाणतो सर्व मत्तें । बळें शीघ्र तूळील रीपूदळातें ॥ ८३ ॥
पुढें दैत्य बोलाविला आदरेंसी । ह्मणे सैन्य पाहोनि यावें त्वरेंशीं ।
अलंकार देऊनियां तोषवीला । बळें हेर तो शीघ्र जाऊनि आला ॥ ८४ ॥
नमस्कारिला राव तो आदरेंशीं । ह्मणे रावणू म्लान कां दीसतोशी ।
अधोमूख राहोनि शार्दूल बोले । ह्मणे हो कपी काळ जैसे उदेले ॥ ८५ ॥
बहू दाटलीसे असंभाव्य सेना । नसे रीघ तेथें कदा जाववेना ।
परी मी तयांमाजि तैसाच गेलों । बहू ताडिलों पाडिलों कुस्त केलों ॥ ८६ ॥
निरोपें तुझ्या शीघ्र गेलों सुरारी । रुपें जाहलों वानरू वेषधारी
मला हिंडतां हिंडतां थोर मार्ने । पुढें लक्षिलें धूर्त बीभीषणानें ॥ ८७ ॥
कपी धांवले दुत त्या सुग्रिवाचे । पुरोहीत चत्वारि बीभीषणाचे ।
धरूनी मला चालवीलें त्वरेंशी । पुढें चालतां देखिलें राघवासी ॥ ८८ ॥
ह्मणे धन्य तो रामराजा दयाळू । मला देखतां शीघ्र सोडी नृपाळू ।
मनीं माझिये वाटतें निश्चयेंशीं । रघूनायका भेटवावें सितेसी ॥ ८९ ॥
समाचार तो सर्वही श्रुत केला । तया सांगतां रावणा क्रोध आला ।
पुढें राक्षसें शीर केलें रिपूचें । वनीं चालिला सत्व घ्याया सितेचें ॥ ९० ॥

१ भयंकर. २ तरवार. ३ शत्रूच्या सैन्याला. ४ खालीं तोंड करून. ५ प्रवेश. ६ चार.

अशोकीं वसे जानकी भूमिबाळा । वदे रामनामावळी सत्वशीळा ।
पहा रावणें शीर मायीक केलें । छळाया सितेकारणें शीघ्र नेलें ॥ ९१ ॥
ह्मणे रावणू व्यर्थ त्वां धीर केला । रणीं वीर भर्तार तूझा निमाला ।
कपीराक्षसांतें महा मार जाला । प्रहस्तू जयो शीघ्र घेऊनि आला ॥ ९२ ॥
रिपू सांगतां ते भयातूर जाली । भयें जानकी शोकसिंधू बुडाली ।
शिरें देखतां मूर्च्छना शीघ्र आली । देहे सांवरेना भुमीं अंग आली ॥ ९३ ॥
भविष्योत्तरें बोलिलीं वाल्मिकाचीं । ह्मणे कायसा बोलिला तो विरिंची ।
पहा आजि तें सर्वही व्यर्थ जालें । कृतांतापुढें मश्यका येश आलें ॥ ९४ ॥
बहू शोक होतां देहेभाव सांडी । ह्मणे रावणू सत्व सीता न सांडी ।
महा प्रेत्न सायास त्यां व्यर्थ केला । पुढें शीघ्र लंकापुरीमाजि गेला ॥ ९५ ॥
दळें सिद्ध केलीं बळें लंकनाथें । प्रतीमल्ल राक्षेस चत्वार पंथें ।
महा वीर ते सर्वही शस्त्रपाणी । बुजूं पाहती भूमि आकाश वाणीं ॥ ९६ ॥
कपीचक्र तेंही बळें सिद्ध जालें । निळें वानरेंशी प्रतीमल्ल केलें ।
महा वीर ते गर्जती मेघ जैसे । भुतां खेचरां थोर कल्पांत भासे ॥ ९७ ॥
सुवेळाचळा राम पाहे स्वभावें । तया मस्तकीं शृंग तें दोन गावें ।
नभीं लागला उंच आकाशपंथें । ह्मणे राम गा सुग्रिवा जाई तेथें ॥ ९८ ॥
ह्मणे वीर सुग्रीव आज्ञा प्रभूची । असंभाव्य सेना रिसां वानरांची ।
महा वीर तात्काळ सर्वै मिळाले । बळें शृंग वेंघावया सिद्ध झाले ॥ ९९ ॥
कथेलागिं श्रोतीं पुढें चित्त द्यावें । ह्मणे दास अर्थांतरीं वीवरावें ।
स्वहीता कथामृत घ्यावें फुकाचें । सदा सेवितां दुःखदारिद्र्य कैंचें ॥ १०० ॥

## तृतीय प्रसंग.

पुढें चालिला शीघ्र तो रामराजा । कपी धांवती वीर वेष्टीत फौजा ।
करीं हस्त घेऊनि बीभीषणाचा । बळें वेंघले शृंग त्या पर्वताचा ॥ १ ॥
कितीएक ते राहिले भार मागें । बळें वेंघलें शृंग तो लागवेगें ।
पुढें शीघ्र आटोपिले जातजातां । मिळाले कपी राम सौमित्र माथां ॥ २ ॥
सुवेळागिरीशिखरीं राम पाहे । अती साजिरा त्रीकुट शोभताहे ।
उभा रावणू गोपुरीं थोर धीट । तिथें पावला सुग्रिवाचा चपेट ॥ ३ ॥
कवे घातली पेटला शीघ्र कोपा । बळें रावणू ताडिला चंड थापा ।
बळें झाडिलीं तोडिलीं दिव्य छत्रें । ह्मणे जानकी आणिली या कुपात्रें ॥ ४ ॥
पुढें देखतां रावणा क्रोध आला । पदीं झाडिलें ताडिलें सुग्रिवाला ।
मदें मातले दूर टाकून शंका । कळा लाविली नीकरें एकमेकां ॥ ५ ॥
बहू कोपले मल्लयुद्धासि आले । रिपू भीडतां अंग अंगीं मिळाले ।

१ नगरा. २ मेला. ३ शोकसमुद्रांत. ४ ब्रह्मदेव. ५ काळापुढें. ६ भयंकर. ७ सुंदर ८ शत्रू.

बळें हाणिती पुच्छिसी वज्रमुष्टी । दणाणीतसे त्रीकुटीं सर्व सृष्टी ॥ ६ ॥
त्रिरश्रीबळें वीर झोंबीस आले । झडा चांचरा भूतळामाजि गेले ।
पुढें रावणें देह संकोचवीलें । अनर्थास भीऊनि गंतव्य केलें ॥ ७ ॥
कपीनाथ तो येश घेऊनि आला । रिपूगर्व हा सर्वही भग्न केला ।
नमस्कारिलें राघवा ते प्रसंगीं । कपीभारें ते सर्व आनंदसंगीं ॥ ८ ॥
कपीशीं सुवेळाचळा राम आला । असंभाव्य तो वीरमेळा मिळाला ।
दळें भूतळीं लोटले भार सैरा । पुढें आणिलें राजनीतीविचारा ॥ ९ ॥
कपी शोधितां शोधितां लक्ष कोटी । तयांमाजि हा अंगद वीर जेठी ।
बळें आगळा दक्ष चातुर्य जाणे । वयें अल्प लावण्य तारुण्य बाणे ॥ १० ॥
स्तुती उत्तरीं राम बोले तयासी । ह्मणे धन्य गा अंगदा गुणराशी ।
मिळालासि तूं आमुच्या स्नेहवादा । विवेकें तुवां सोडिलें पितृद्वंद्वा ॥ ११ ॥
बहूतांपरी राघवें गौरवीला । तेणें शोभला शीघ्र ऊदीत जाला ।
प्रतीउत्तरें अंगदें स्तूति केली । उभा दृष्टि हे रामपायींच ठेली ॥ १२ ॥
पुढें आपुला विक्रमू वाड बोले । महावीर ते सर्व चक्कीत जाले ।
तया अंगदा थोर आवेश आला । तेणें राघवा थोर संतोष जाला ॥ १३ ॥
ह्मणे रामराणा तया अंगदासी । त्रिकूटाचळीं भेट रे रावणासी ।
तयां सांगरे भीम पुरुषार्थ माझा । वदे सर्व संहारिशी कोण काजा ॥ १४ ॥
प्रसंगोत्तरें अंगदा त्वां वदावें । बहूतांपरी रावणा बोधवावें ।
सिताकारणीं युद्ध मागून घ्यावें । परी शेवटीं भाग तोडून यावें ॥ १५ ॥
नमस्कारिलें त्या रघूनायकाला । समस्तांसि सन्मानिलें सिद्ध जाला ।
कपी रामआज्ञेसि घेऊनि माथां । उडाला बळें चालिला व्योमपंथा ॥ १६ ॥
नभामाजि झेंपावला वेग केला । बळें शीघ्र लंकापुरीमाजि गेला ।
अकस्मात खालावला व्योमपंथें । रिपूची सभा बैसली भीम जेथें ॥ १७ ॥
पुढें पावला तो सभेमाजि कैसा । कपी राक्षसां भासला काळ जैसा ।
रिपू शस्त्रपाणी बळें सिद्ध जाले । उगे सर्व कोणासि कोणी न बोले ॥ १८ ॥
कपीनें सभा सर्व आमान्य केली । पुढें रावणू लक्षिला भेटि जाली ।
मनीं पाहतो तो रिपू उच्च होतो । महापुच्छसिंहासनीं बैसला तो ॥ १९ ॥
रिपू सर्वही बैसले स्तब्ध जाले । तयांलागिं हा अंगदू काय बोले ।
पुढें बोलतां बोलतां येरयेरां । बहुसाल धिक्कारिलें थोरथोरां ॥ २० ॥
बहूतांपरीच्या बहू शब्दयाती । महावीर तोंडागळे गर्जताती ।
रिपू घोर तो आपुलाल्या वेगत्रें । बळें मातले हाणिती शब्दशस्त्रें ॥ २१ ॥
बहू बोलती बोल नानापरींचे । महा युक्तिचे भक्ति संख्या रसाचे ।
तयां बोलतां मातला शब्दसिंधू । असंख्यात संख्या नसे तो अगाधू ॥ २२ ॥

१ धडपडत. २ गमन. ३ कपिसमूह. ४ विशेष. ५ पित्याच्या कलहला. ६ आकाशमार्गानें. ८ हातांत शस्त्र घेऊन ८ तोंडानें.

बहुतांपरी रावणू बोधवीला । परी नायके मानसीं गर्व केला ।
ह्मणे काय रे पाहतां धरा कपीला । महावीर तो अंगदू आक्रमीला ॥ २३ ॥
कपीनें बळे थोर उड्डाण केलें । सभामंडपामस्तकीं शीघ्र नेलें ।
रिपू घोर तेही भयातूर जाले । धिराचे बहू स्तंभ झोकें उडाले ॥ २४ ॥
विरें अंगदें त्रीकुटीं ख्याति केली । नभीं अंतराळीं बळें झेंप गेली ।
बळाचे भुजीं मल्ल राक्षेस कैसे । गळाले तळीं मारिले सर्प जैसे ॥ २५ ॥
पुढें अंगदू भेटला रामचंद्रा । नमस्कारिलें आदरें त्या नरेंद्रा ।
कपी सर्वही तो समाचार सांगे । ह्मणे शत्रुचा गर्वताठा न भंगे ॥ २६ ॥
बहू बोलिलों जी तया रावणासी । परी नायके मातला गर्वराशी ।
भिजेना जळामाजिं पाषाण जैसा । धरीना मनीं सांगतां शब्द तैसा ॥ २७ ॥
बहुसाल त्या रावणें गर्व केला । रघूनायका कोप तात्काळ आला ।
ह्मणे राम गा सुग्रिवा ये प्रसंगीं । त्रिकूटाचळू पालथा घालिं वेगीं ॥ २८ ॥
कपींद्रू वदे शीघ्र सेनापतीला । निळें सर्व सैन्यास संकेत केला ।
बळें चालिलीं तीं दळें वानरांचीं । अपूर्वें करीं शैल शृंगादिकांचीं ॥ २९ ॥
कपी क्षोभले गर्जती मेघ जैसे । बळें भार उठावले शीघ्र तैसे ।
महा घोर घोषें भुमीकंप जाला । त्रिकूटाचळा थोर कल्पांत आला ॥ ३० ॥
हुडे कोट आटोपिले लंकनाथें । कपीभार झेंपावले व्योमपंथें ।
महायुद्ध आरंभिलें एकमेका । बळें घेतली वानरीं शीघ्र लंका ॥ ३१ ॥
त्रिकूटाचळीं वानरीं वेग केला । कपीराक्षसांतें महामार जाला ।
बहू कोपले वीर ते चंडकोपा । बळें हाणिती मस्तकीं वज्रथापा ॥ ३२ ॥
ग्रिवा तोडिती मोडिती पंजरांतें । कपी झोडिती पाडिती वृक्षघातें ।
रिपू भांडतां थोर आवेश पोटीं । बळें बोढिती हात घालोनि झोंटीं ॥ ३३ ॥
कपी कोपले गर्जती युद्धकाळीं । शिळा टाकिती पाडिती दुर्गपौळीं ।
गिरी हाणिती थोर नेटें धडाडी । बळें लागतां दिव्य लंका धडाडी ॥ ३४ ॥
त्रिकूटाचळीं लोटली सर्व सेना । असंभाव्य ते भार लंका दिसेना ।
कपी क्षोभले गर्जती काळ जैसे । दळेंशीं बळें धांवती वीर तैसे ॥ ३५ ॥
दळें पायिंची थोर अश्वा गजांचीं । रणीं चालिलीं दाट थाटें रथांचीं ।
बहू भार शृंगारिले राक्षसांचे । महावीर ते घोर नानापरींचे ॥ ३६ ॥
रणीं पातली ते भयातूर सेना । रजें मातलीं चंद्रसूर्यो दिसेना ।
बहूसाल वाद्यें बहूतांपरींचीं । महा कर्कशें वाजती राक्षसांचीं ॥ ३७ ॥
समारंगणीं चालिले राजभारें । दळें दाटलीं वानरांचीं अपारें ।
बळें हाणिती एकमेकां धुबाबां । झरे लागले शोणिताचे थबाबां ॥ ३८ ॥
पुढें धांविले पायिंचे शस्त्रधारी । जयां देखतां रोम आंगीं थरारी ।

---

आकाशांत. २ सैन्यें. ३ शस्त्रें. ४ आकाशमार्गानें ५ माना. ६ हाडांचे पिंजरे. ७ केंसांत. ८ किल्यांचे तट. ९ समूह. १० रक्ताचे.

कपीराक्षसांतें महामार जाला। तेणें शोणिताचा नदीपूर आला ॥ ३९ ॥
रणीं तोडिती वीर वीरां धसासां। भगाडें बहू पाडिती ते घसासां।
बळें टोंचिती शूळ पोटीं भसासां। शिरें फोडिती मुष्टिघातें ठसासां ॥ ४० ॥
पुढें झुंजतां भार तो मृत्यु पावे[१]। करीती बळें वीर मागें उठावे।
कपी कोपले थोर काळाग्नि जाले। रिपू पायिंचे सर्वही भग्न केले ॥ ४१ ॥
निमाले रणीं देह त्या पायिंच्यांचे। बळें ऊठले भार त्या राउतांचे।
देहे टाकिती झुंजती स्वामिकाजा। पुढें धांवती वीर मागील फौजा ॥ ४२ ॥
कपी झुंजतां भंगल्या अश्वघाती[२]। रणीं लोटिलीया बळें भद्रजाती[३]।
गिरीसारिखे थोर कीकोटघोषें। गर्जी वानरां त्रासिलें हो विशेषें ॥ ४३ ॥
कपीराज ते हाणिती मत्त हस्तें। बळें झोडिती कुंजरें खस्तव्यस्तें।
दळें पायिंचीं अश्वरत्नें अपारें। रणीं पाडिलीं कुंजरें थोरथोरें ॥ ४४ ॥
कळेना महामार त्या वानरांचा। रणीं थोरसंहार केला गजांचा।
तया पृष्ठिभागीं पुन्हा भार आले। रिपू वानरीं सर्व संहार केले ॥ ४५ ॥
पुढें चालिले भार नाना रथांचे। बहू बाणजाळें कपीसैन्य[४] खोंचे।
रणीं धांवती चक्रचाली घडाडां। कपी टाकिती चंडशीळा धडाडां ॥ ४६ ॥
रथीं सारथी सर्वही चूर्ण केले। महावीर ते भार मागूनि आले।
रणीं राक्षसांतें क्षयो प्राप्त जाला। जयो वानरां शीघ्र टाकून आला ॥ ४७ ॥
रणीं मारुतें पाडिला जंबुमाळी। सुखेणें विदूणा पुढें तेचि काळीं।
विरें सुग्रिवें क्षिप्र भेटांशि द्वंद्वें। बळें सोडिलें वज्रमुष्टीस मैंदें ॥ ४८ ॥
द्विवीदा करें वज्रस्पर्शे निमाला। बळें ताडिलें शीघ्र प्रातीपनाला।
रणीं लक्ष्मणें भेदिलें वीरुपाक्षा। चतुर्थांशि[५] रामें शरें एक शिक्षा ॥ ४९ ॥
दळीं राक्षसांचे हाहाकार जाला। दळेंशीं नळें वीरुपाक्षू निमाला।
कपी राक्षसांचे बहुसाल सेना। रणीं माजलें युद्ध तें वोहटेना ॥ ५० ॥
निशी प्राप्त जाली रणीं घोर मारें। महावीर ते झुंजती अंधकारें।
बळें हाणती कोण कोणा कळेना। त्रिरश्मीबळें मातले ते ढळेना ॥ ५१ ॥
पुढें शीघ्र चंद्रोदयो शुद्ध जाला। दिसों लागले राक्षसां वानरांला।
रिपू हाणती एकमेकां कडाडां। नद्या वाहती शोणिताच्या भडाडां ॥ ५२ ॥
कपी वीर चंद्रोदयाच्या उजेडे। बळें हाणिती एकमेकां निवाडें।
दळें भांडती राक्षसां वानरांचीं। असंभाव्य भ्यासूर प्रेतें विरांचीं ॥ ५३ ॥
कपी तापले कोपले वीर जेठी। बळें तोडिले दैत्य कोट्यानुकोटी ॥
समारंगणीं आटली सर्व सेना। रणीं राक्षसां येश येतां दिसेना ॥ ५४ ॥
क्षयो प्राप्त जाला बहू राक्षसांतें। पुढें युद्ध आरंभिलें इंद्रजीतें।
दिसे पाहतां सर्वही येश गेलें। तया राक्षसें शीघ्र कापट्य केलें ॥ ५५ ॥

---

१ मृत्यु पावले. २ घोडेस्वारांचें ३ हत्ती. ४ लवकर. ५ वीरांशीं.

अकस्मात तो इंद्रजीत् उडाला । नभोमंडळीं रावणी गुप्त जाला ।
पुढें घोर नीशाचरें तेचि काळीं । कपी पाडिले सर्वेही सर्पजाळीं ॥ ५६ ॥
बहू सर्प झेंपावले व्योमपंथें । बळें धांवती वानरी सैन्य जेथें ।
महा काळ कर्कोट नानापरींचे । रणीं पाडिती भार गोळांगुळांचे ॥ ५७ ॥
कपींची पडों लागली सर्व सेना । पुढें पाहतां युद्धकर्ता दिसेना ।
गमे सर्व आकाश व्यालें विखारीं । बळें झोंबती सर्पकूळें जिव्हारीं ॥ ५८ ॥
कपीभार ते सर्व निर्जीव जाले । निचेष्टीत ते रामसौमित्र केले ।
रिपू पाडिले थोर आनंद जाला । पुढें शीघ्र लंकापुरीमाजि गेला ॥ ५९ ॥
नमस्कारिला राव तो आदरेंसीं । तेणें पुत्र आलिंगिला सौख्यराशी ।
अती आदरें सुंदरें रम्य सारें । पिता अंगिचीं दे अलंकार चीरें ॥ ६० ॥
ह्मणे हो रणीं शांति केली रिपूची । बळें सर्वही त्या रिसां वानरांची ।
बहूतांपरी राव संतोषवीला । निरोपेंचि तो भूवनामाजि गेला ॥ ६१ ॥
बहू सूख जालें तया रावणासीं । तेणें शीघ्र पाचारिलें त्रीजटेसीं ।
ह्मणे हो विमानीं सिता बैसवावी । रिपू मारिले शीघ्र तेथेंचि न्यावी ॥ ६२ ॥
रणीं पाडिले ते तये दाखवावे । सिता वीट मानील ऐसें करावें ।
बहूतांपरी रावणें शीकवीली । वनामाजि ते त्रीजटा शीघ्र गेली ॥ ६३ ॥
पुसे जानकी ते तया त्रीजटेला । सभामंडपीं कोण वृत्तांत जाला ।
ह्मणे त्रीजटा सोडिं चिंता स्वभावें । रणामंडळा राजआज्ञेस जावें ॥ ६४ ॥
अहो जानकी दुःख चिंतीन तूंतें । तरी देह माझा पडो वज्रघातें ।
ह्मणे सोडिं चिंता सिते सर्व कांहीं । तया लंकनाथा जयो प्राप्त नाहीं ॥ ६५ ।
सिता ऐकतां शोक सांडूनि ठेली । तये त्रीजटेची बहू स्तूति केली ।
पुढें बैसल्या शीघ्र दोघी विमानीं । रणामेदिनीं पावल्या घोरबाणी ॥ ६६ ॥
पुढें पाहतां लक्ष कोट्यानुकोटी । रणीं पाडिले हुंबती वीर जेठी ।
धडें तूटलीं राक्षसां वानरांचीं । शिरें दाटली घोर माहाविरांचीं ॥ ६७ ॥
भयामूर हा घोर संहार जाला । रणीं राक्षसां वानरां अंत आला ।
असंभाव्य उत्पाटिले वृक्ष जैसे । रणीं भग्न केले महावीर तैसे ॥ ६८ ॥
असंभाव्य ते तूटले पादपाणी । धडे मस्तकें थोर विकाळवाणी ।
बहू जाहली मेदमांसें चिडाणी । महा दर्प ते माजली वीरदाणी ॥ ६९ ॥
रणीं एक ते छेदिलें सर्व अंगीं । तेणें काळिजें दीसती पृष्ठिभागीं ।
शिरें तोडिलीं मेंदु नीघे बरारां । बहु घाय ते रक्त वाहे झरारां ॥ ७० ॥
कितीएक ते वीर जाले उताणे । किती पालथे दीसती दैन्यवाणे ।
कितीएक ते वीर घालूनि मेटें । भुमी पीटिती थोर दुःखें ललाटें ॥ ७१ ॥
कितीएक भूमी वमीतीं असृदें । कितीएक ते मोडलें माजमध्यें ।

१ रावणाचा मुलगा इंद्रजित. २ सर्प. ३ वानरांचे. ४ वस्त्रें. ५ समरभूमीवर. ६ मस्तकें. ७ ओकनात. ८ रक्तें. ९ कमरेमध्यें.

कितीएक ते वीर चौरंग जाले । कितीएक ते दुधडी भग्न केले ॥ ७२ ॥
कितीएक ते मुंडकीहीन जाले । कितीएक वक्षास्थळीं चूर्ण केले ।
कितीएक तीं तूटलीं जानुघोटीं । कितीएक ते कंठ बोटीं ललाटीं ॥ ७३ ॥
कितीएक वोटारिती तीव्र डोळे । निघाले बहू पोटिंचे मांसगोळे ।
पितें चारटें फोफसें रक्त मेंदु । शिसें आंतडीं कांतडीं मूळ कंदू ॥ ७४ ॥
कितीएक जालीं शिरें चूर चेंदा । बहू दाटलासे रणीं रक्तरेंदा ।
कितीएक हुंकारिती दैन्यवाणीं । कितीएक ते मागती अन्नपाणी ॥ ७५ ॥
कितीएक ते खुडिती पादपाणी । कितीएक ते शब्द कारुण्यवाणी ।
कितीएक ते दंशिती भूमि दंतीं । कितीएक ते लागले मृत्युपंथीं ॥ ७६ ॥
शिरें राक्षसांची धडें वानरांचीं । रणीं लागलीं एकमेकां विरांचीं ।
विरां शाकटां कुंजरांघोडियांचीं । रिसां वानरां सर्व इत्यादिकांचीं ॥ ७७ ॥
नदी शोणिताचे महापूर जाती । धडे कोथळे फूगले वाहताती ।
शिरें पादपाणी बहू मांसमाळा । धन खेटकें भातड्या त्या विशाळा ॥ ७८ ॥
गिधें श्वापदें तीं असंभाव्य आलीं । स्वइच्छा बहू मांस भक्षूं निघालीं ।
भुतें सर्वही औट कोटी मिळालीं । बहूतांपरींचीं बहू तृप्त जालीं ॥ ७९ ॥
पुढें जानकी बोलिली त्रीजटेशीं । रणीं पाडिलें सर्वही वानरांशीं ।
महावीर ते कोण वेळा तयांत । ह्मणे त्रीजटे दाखवीं सर्व मातें ॥ ८० ॥
रणीं त्रीजटा दाखवी जानकीसी । महा वीर ते पाडिले नागपाशीं ।
दिसे राम सौमित्र तोही निमाला । पुढें जानकीनें महाशोक केला ॥ ८१ ॥
बहूतांपरी जानकी शांत केली । तये त्रीजटा शीघ्र घेऊनि गेली ।
समाचार सांगे तया रावणाला । वनामाजि आली सिता रक्षणाला ॥ ८२ ॥
कपी सर्वही पावले मृत्युपंथू । जिती मारुती आणि नैर्ऋत्यनाथू ।
जयालागिं जाली दया राघवाची । पहाया तया शक्ति काळासि कैंची ॥ ८३ ॥
रणें शोधिलीं सर्व बीभीषणानें । विरांलागिं अश्वासिलें थोर मानें ।
पुढें दृष्टिनें पाहिलें राघवानें । गरूडास नीरूपिलें व्योमे जानें ॥ ८४ ॥
तयालागिं प्रायोजिलें शीत्र पंथें । असंभाव्य पावले व्योमपंथें ।
उड्या घालिती पक्षिकूळें झडाडां । बळें तोडिती सर्पकूळें तडाडां ॥ ८५ ॥
विहंगीं तिहीं सर्पसंहार केला । कपीभार तो मोकळा सिद्ध जाला ।
गिरीशीखरीं सर्व सेना घडाडी । त्रिकूटाचळीं घोष तेणें धडाडी ॥ ८६ ॥
ह्मणे रावणू थोर आश्चर्य जालें । कपीचक्र तें सर्व निर्जीव केलें ।
सुतें वैरियां दाविली थोर ख्याती । रणीं मागुती ते कपी गर्जताती ॥ ८७ ॥
रणीं शत्रु जिंकील धूम्राक्षनामा । तया पाठवीजे प्रभू सार्वभौमा ।
पुढें मंत्र ऐकों नका मंत्रियांचा । वदे रावणू आदरें त्यासि वाचा ॥ ८८ ॥
ह्मणे गा विरा शीघ्र तूं ये प्रसंगीं । रिपूलागिं मारावया जाय वेगीं ।

१ हातपाय. २ रक्ताचे. ३ ढाला. ४ साडेतीन. ५ आकाश. ६ पक्ष्यांनीं.

अलंकार देऊनियां तोषवीला । महावीर धूम्राक्ष युद्धा निघाला ॥ ८९ ॥
रणीं वीर धूम्राक्ष तो वज्रदंष्ट्री । तिचा अंकपू चालिला भार पृष्ठी ।
रणामंडळीं थोर संहार केला । पुढें राक्षसांतें क्षयो प्राप्त जाला ॥ ९० ॥
बहू युद्ध केलें तया राक्षसानें । महावीर धूम्राक्ष त्या अंकपानें ।
बळें दोघेही मारिले मारुतीनें । रणीं वज्रदंष्ट्री तया अंगदानें ॥ ॥ ९१ ॥
महा वीर ते झुंजतां भग्न जाले । बहुसाल घायाळ धाकें पळाले ।
तिहीं सर्व सांगीतली युद्धवार्ता । तेणें रावणामानसीं थोर चिंता ॥ ९२ ॥
रणीं राक्षसांतें क्षयो प्राप्त जाला । प्रहुस्तू पुढें शीघ्र युद्धा निघाला ।
कपीराक्षसां थोर संहार जाला । निळें झोडिला पाडिला भग्न केला ॥ ९३ ॥
पुढें रावणू चालिला लागवेगें । तयालागिं मंदोदरी नीति सांगे ।
न मानीत तो चालिला आवरेना । बळें लोटली ते असंभाव्य सेना ॥ ९४ ॥
महा वीर झुंजार ते भार आले । बहूसाल शृंगारमंडीत जाले ।
बळें पुत्रप्रधानमेळा मिळाला । रणामंडळा रावणू शीघ्र आला ॥ ९५ ॥
बहू त्रासिलें सैन्य गोळांगुळांचें । रिपूबाणजाळें बहू सैन्य खोंचे ।
महा वीर तेही बळें भग्न केले । पळाले कपी राघवाआड गेले ॥ ९६ ॥
बहू त्रासिलों राक्षसांचेनि बाणीं । कपीभार ते बोलिले दैन्यवाणी ।
बळें कांपती खोंचती देति धांपा । बळें रक्षिं गा राघवा मायबापा ॥ ९७ ॥
तया देखतां राम कार्मुकें ओढी । पुढें शीघ्र सौमित्र तो हात जोडी ।
म्हणे वीर तो स्थीर व्हावें समर्थें । करीतों बळें भग्न त्या रावणातें ॥ ९८ ॥
रणीं रावणा वीर सामर्थ्य नेलें । नटे नीळ माया तया भग्न केलें ।
पुढें शीघ्र पाचारिलें रावणाला । महावीर सौमित्र युद्धा निघाला ॥ ९९ ॥
सुमित्रासुता रावणा युद्ध आतां पुढें देइजे आदरें चित्त श्रोतां ।
म्हणे दास हा वीर कोदंडपाणी । रणीं रावणालागिं त्रासील बाणीं ॥ १०० ॥

प्रसंग ३ रा समाप्त.

---

## प्रसंग चवथा.

दशशीर सौमित्र युद्धा निघाले । समारंगणीं वीर सन्मूख जाले ।
महावीर संग्राम आवेश पोटीं । पुढें देखिलें एकमेकांसि दृष्टीं ॥ १ ॥
बहूसाल धिक्कारिलें येरयेरां । बहू सोडिलीं बाणजाळें सरारां ।
दळीं टाकिती थोर शस्त्रें शरांचीं । बळें तोडिती एकमेकां विरांचीं ॥ २ ॥
रणीं भीडतां हाणिती एकमेकां । म्हणे रावणू वीर हा थोरु नीका ।
पुढें शक्ति काढूनियां ब्रह्मयाची । बळें सोडिली ओळि विद्युल्लतेची ॥ ३ ॥

---

१ नाश. २ धनुष्य. ३ लक्ष्मण. ४ बोलावलें. ५ धनुष्य हातांत घेणारा. ६ खरोखर.

शरें वारितां बैसली शक्ति अंगीं । रणीं वीर सौमित्र तो देह त्यागी ।
पुढें धांवला रावणू शीघ्र तेथें । बळें ताडिता जाहला मुष्टिघातें ॥ ४ ॥
तया देखतां मारुती कोप आला । अकस्मात तो व्योमपंथीं उडाला ।
कठोरें करें ताडिलें वज्रमुष्टी । वेमूं लागला रावणू रक्तसृष्टी ॥ ५ ॥
रिपू रावणू मागुता शीघ्र गेला । पुढें लक्ष्मणू ऊठला स्वस्थ जाला ।
पुन्हा रावणू कोपला काळरूपी । विरां राक्षसांमाजि चंडप्रतापी ॥ ६ ॥
दहा मस्तकीं त्या दहा दिव्य छत्रें । पताका बहू मत्स्य मार्तंडपत्रें ।
महावैभवेंशीं रथारूढ जाला । तया मागुती थोर आवेश आला ॥ ७ ॥
बहू बाण जुंबाड वाहोनि पृष्ठीं । दहाही धनुष्यें करीं दृढ मुष्टी ।
करूं लागला मागुती बाणवृष्टी । रघूनायकें देखिलें त्यासि दृष्टीं ॥ ८ ॥
उभा राहिला राम वज्रांग ठाणें । करीं सज्जिलें चाप चंद्रार्धबाणें ।
दहा हेममूगूट छत्रें धनुष्यें । बळें तोडिलीं पाडिलीं तीं निमेषें ॥ ९ ॥
पुढें रावणू तो भयातूर जाला । बहुतांपरी राघवें शीकवीला ।
ह्मणे जाइं रे रक्षिलें आजि तूला । रिपू प्राण घेऊनि तैसा पळाला ॥ १० ॥
महा मेघनाद् असे नाम ज्यासी । पळे लंकनाथासवें तो त्वरेंशीं ।
तयासारिखीं मूढ मूढें मिळालीं । रणीं भ्रष्टलीं सर्व मार्गें पळालीं ॥ ११ ॥
न पाहात मार्गें पुरीमाजि गेले । विरांमाजि कोणी कुणासी न बोले ।
पुढें सर्वही मंडपामाजि आले । समस्तांसि तो रावणू काय बोले ॥ १२ ॥
भयातूर लंकापती दैन्यवाणा । ह्मणे ऊठवा हो बळें कुंभकर्णा ।
तयावीण आणीक कोणी दिसेना । रिपू घोर हा थोर संहारवेना ॥ १३ ॥
पुढें धाडिलें शीघ्र माहोदराला । महाघोर वाद्यें दळें सिद्ध जाला ।
किती एक ते धीट मोठे पळाले । कितीएक पोटीं भयातूर जाले ॥ १४ ॥
निजेला दरीभीतरीं कुंभकर्णू । दिसे काळ विक्राळ तो मेघवर्णू ।
शरीरें भयासूर हा घोररूपी । विरां भासला मृत्यु येमस्वरूपी ॥ १५ ॥
तया ऊठवीतां भयातूर जाले । महावीर ते कंप अंगीं उदेले ।
पुढें जाहले धीट ते नेटपाटें । उभीं पाहती सर्व नैर्ऋत्यथाटें ॥ १६ ॥
बहूसाल वाद्यें बहूतांपरींचीं । महा कर्कशें चंड घोरध्वनींचीं ।
तयांच्या पुढें जाहला एक वेळा । नभोमंडळीं नाद गेला भुगोळा ॥ १७ ॥
गदा तोमरें हाणती वज्रघातें । महामार आरंभिला राक्षसांतें ।
कळा लाविती टाकिती वृक्ष नाना । गळाले परी कुंभकर्णू उठेना ॥ १८ ॥
शिळा टाकिती टोंचिती शूळ शस्त्रें । महाघोष संपूर्ण तो कर्णपात्रें ।
बळें लोटलें मस्त ते हस्ति वेगीं । शरीरावरी चालती ते प्रसंगीं ॥ १९ ॥
विरा ऊठवाया बहू यत्न केला । परी नूठतां सर्वही व्यर्थ गेला ।

१ ओकूं. २ रक्ताचा प्रवाह. ३ धनुष्य. ४ सुवर्णमुकुट. ५ क्षणांत. ६ राक्षससमुदाय.

तया मारितां हिंपुटे वीर जाले । उठेना महा वीर सर्वै गळाले ॥ २० ॥
नव्हे कार्य तेणें बहुसाल शंका । पुढें बोलती वीर ते एकमेकां ।
उठेना महा वीर कैसें करावें । तयीं अंतरीं जाहलें वर्म ठावें ॥ २१ ॥
तया किंनरीं रम्य गाती विशेषें । अलापें शिळा वीरती तोय जैसें ।
जयाचेनि नट्वांग लावण्यवेषें । मनीं होय शक्रादिकां कामपीसें ॥ २२ ॥
तयांलागीं बोलाविलें आदरेंशीं । पुढें आलिया गायकी स्वर्गवासी ।
करीं टाळ मृदंग यंत्रें उपांगें । बहु गीत संगीत तें रागरंगें ॥ २३ ॥
सुखें भोगिती देव त्या गायनांचीं । मनें धांवती ऊर्ध्व शेषादिकांचीं ।
सुधा सेवितां त्यापुढें वीष वाटे । खरा सुस्वरें अमृतानंद लोटे ॥ २४ ॥
तिथें गायनाची कळा रम्य जाली । तेणें कुंभकर्णासि जागृति आली ।
भुकेला दिसे बैसला काळ जैसा । बहू भक्षिलें शोणिंता मेदमांसा ॥ २५ ॥
रिपू सिद्ध होऊनि लंकेंत चाले । कपी देखतां ते भयातूर जाले ।
उभा राहतां शीर बाहेर आलें । रघूनायकें थोर आश्चर्य केलें ॥ २६ ॥
पुसे आदरें राम बीभीषणाला । महावीर हा कोण हो सिद्ध जाला ।
कथीं सर्व साकल्य तो मंत्र त्याचा । ह्मणे राघवा बंधु हा रावणाचा ॥ २७ ॥
बळें आगळा वीर हा कुंभकर्ण । महापर्वतासारिखा मेघवर्ण ।
समारंगणीं काळ भीडों शकेना । सखा बंधु हा रावणा होय साना ॥ २८ ॥
पुसे कुंभकर्ण सभेमाजि गेला । नमस्कारिलें भेटला रावणाला ।
ह्मणे भोगणें लागलें कर्म केलें । सिता आणितां दुःख हें प्राप्त जालें ॥ २९ ॥
मनीं भंगला राव जाणोनि नेणें । पुन्हां तोषवीला विरें कुंभकर्णें ।
रिपू मारणें हेचि आज्ञा प्रतिज्ञा । उभा राहिला शीघ्र घेऊनि आज्ञा ॥ ३० ॥
पुढें पावला तो रणीं शीघ्र काळें । दळेंशीं बळें चालिला एक वेळें ।
कपी ग्रासिले त्रासिले घोर मारें । समारंगणीं लागले घायवारे ॥ ३१ ॥
रिसां वानरां मांडिली थोर आटी । कपी गीळिले लक्ष कोट्यानुकोटी ।
उठे सृष्टि भक्षावया काळ जैसा । रणीं वावरे तो महावीर तैसा ॥ ३२ ॥
रिपूभार तो भक्षिला भग्न केला । कपीनाथ काखें दुपाडें उडाला ।
पुरी पावतां पावतां सुग्रिवानें । त्वरेनें पणू सिद्ध केला बीरानें ॥ ३३ ॥
तया सुग्रिवें कर्ण नाशीक नेलें । पुढें पाहतां दर्पणीं दुःख केलें ।
ह्मणे व्यर्थ आतां जिणें रूपहाणी । रणीं लोटला मागुती शूळपाणी ॥ ३४ ॥
बहू कोपला वीर राक्षेस कैसा । कडाडी बळें थोर काळाग्नि जैसा ।
कपीवाहिनीची मनीं सांडि केली । रणीं रामचंद्रा उच धांव घाली ॥ ३५ ॥
तया राक्षसें खडिल्या वज्र दाढा । रणीं राघवें वाहिला चंडमेढा ।
बळें लागतां मेरुमांदार फोडी । रघूनायकू कूर तो बाण सोडी ॥ ३६ ॥
रणामाजि तें तीव्र संधान ऐसें । गिळूं लागला आदरें खाय जैसें ।

---

१कष्टी. २गंधर्वस्त्रिया. ३इंद्रादिकांना. ४अमृत. ५रक्ताला. ६आरशांत. ७कुंभकर्ण. ८वानरांच्या सैन्याची.

वहु सोडिले बाण कोट्यानुकोटी । बळें राक्षसें घातले सर्व पोटीं ॥ ३७ ॥
शुळासारिखे बाण पोटीं निघाले । असंभाव्य मध्येंच ते गुप्त जाले ।
महाघोर संधान या राघवाचें । गिळीतो रणीं कोण सामर्थ्य याचें ॥ ३८ ॥
महाघोर त्या मुद्गलाचेनि घातें । रणीं हाणतां जाहला राघवातें ।
रघूनायकें छेदिला वामबाहो । भुमीं चालिला शोणिताचा प्रवाहो ॥ ३९ ॥
रणीं जाहलें हस्त सव्यांग ऊणें । पुढें दैत्य तो कोपला कोटिगूणें ।
बळें ताळ उत्पाटिला वाम हस्तें । रघूनायलें तोडिलें बाणघातें ॥ ४० ॥
बहु कोपला दैत्य सन्मूख आला । रणीं पाद छेदूनि चौरंग केला ।
पदेंवीण चाले महासर्प जैसा । बळें ऊपरे चालिला वीर तैसा ॥ ४१ ॥
पुढें राघवें शीर छेदूनि नेलें । बहुसाल तें व्योमपंथ उडालें ।
रणीं कोथळा फोडिला बाणघातें । महा वीर तो चालिला मृत्युपंथें ॥ ४२ ॥
तया देखतां वीर मागें पळाले । भयें शीघ्र लंकापुरीमाजि गेले ।
पुढें देखिला रावणू मेघवर्णू । तया सांगती पाडिला कुंभकर्णू ॥ ४३ ॥
करूं लागला रावणू शोक भारी । पुढें त्रीशिरा त्याशि बोधें निवारी ।
ह्मणें हो रणीं आजि युद्धासि जातों । रिपू थोर सामर्थ्य याचें पहातों ॥ ४४ ॥
महावीर तो त्रीशिरा प्राप्त जाला । सुतां आणिकां थोर आवेश आला ।
करूं लागले पुत्र मंत्री प्रतिज्ञा । निघाले बळें शीघ्र घेऊनि आज्ञा ॥ ४५ ॥
महामत्त माहोदरू सिद्ध केला । तुरंगीं नरा अंतकू स्वार जाला ।
बहुसाल तेजाळ तें खड्ग हातीं । बळें चालिले वीर ते राजपंथीं ॥ ४६ ॥
रणीं शूर देवांतकू त्रीशिरा हा । अतीकाय तो वीर पारख माहा ।
बळें चौघहि चौरथीं स्वार जाले । दळें लोटलीं विक्रमेंशीं निघाले ॥ ४७ ॥
निघाले बळें भार साहीजणांचे । महावीर ते गर्जती विक्रमाचे ।
रणामंडळीं पारखे वीर कैसे । दळेंशीं बळें धांवती काळ जैसे ॥ ४८ ॥
महामार दोहीं दळीं एक जाला । कपी वीर राक्षस कीती निमाले ।
पुढें वानरीं घोर घातें निघातें । रणीं भग्न केलें तयां राक्षसातें ॥ ४९ ॥
तयां देखतां लोटला दिव्य घोडा । नरां अंतकू कोपला वीर गाढा ।
बळें हांणतां शस्त्र वाजे घडाडां । तुटों लागले पादपाणी थडाडां ॥ ५० ॥
बहु वेग संहारिती सर्व सेना । कपी पाहती अश्व कोठ दिसेना ।
पुढें पाहतां पाहतां लागवेगीं । अकस्मात तें आदळें खड्ग अंगीं ॥ ५१ ॥
बहुसाल तेणें रिसां वानरांच्या । ग्रिवा कापिल्या थोर माहाविरांच्या ।
कपीवाहिनीचा रणीं आट जाला । भुमीं लोटिले शोणितें पूर आला ॥ ५२ ॥
कपी वीर ते खोंचले भग्न जाले । महामार देखोनि वेगें पळाले ।
कितीएक ते सुग्रिवा आड गेले । पुढें अंगदें सर्वही स्वस्थ केले ॥ ५३ ॥
उणें देखिलें धांवला शीघ्र कोपें । बळें ताडिला अश्व तो वज्रथापें ।

१ रक्ताचा. २ पुत्रांना. ३ घोड्यांवर. ४ तरवार. ५ पराक्रमानें. ६ मरण पावले. ७ हातपाय. ८ वानरसैन्याचा.

नराअंतकाला रणीं अंत आला । बहु मेदमांसें भुमीं गाळ जाला ॥ ५४ ॥
नराअंतका मारिलें अंगदानें । पुढें वीर ऊठावले घोर त्राणें ।
रणामंडळामाजि ते शीघ्र आले । तया अंगदाही कपी साह्य जाले ॥ ५५ ॥
करी नीळ तो युद्ध माहोदराशीं । महावीर देवांतकू मारुताशीं ।
भिडे त्रीशिरा पार्श्व तो ऋषभेशीं । बळें झुंजती चौघे तीघां जणाशीं ॥ ५६ ॥
पुढें मांडिला थोर संहार तेथें । रणीं माजलीं तें बहुसाल प्रेतें ।
महावीर ते धीर संग्रामसैरें । बळें धांवती एकमेकां पुढारें ॥ ५७ ॥
त्रिरश्रीबळें दूर टाकूनि शंका । रणीं हाणती घाय ते एकमेकां ।
महाथोर संग्राम साही जणांचा । पुरीं पूरला अंत त्या राक्षसांचा ॥ ५८ ॥
गजारूढ माहोदरू त्या निळानें । रणामाजि देवांतकू मारुतीनें ।
महावीर पारश्व त्या ऋषभानें । रणीं झुंजतां पाडिलें थोर मानें ॥ ५९ ॥
बळें कोपला तो अती चंडकाया[1] । रथू लोटिला शत्रु तेणें जिताया[2] ।
कपी वीर ते आडवे शीघ्र आले । पुढें चालतां सर्वही भग्न केले ॥ ६० ॥
रथीं बैसला पर्वतासारिखा तो । ह्मणे राम हा कोण युद्धासि येतो ।
वदे शीघ्र बीभीषणू रम्य वाचा । रघूनायका पुत्र हा रावणाचा ॥ ६१ ॥
सखा होय सौमित्र तुह्मासि जैसा । अतीकाय तो मेघनादासि तैसा ।
न लेखी कपीवाहिनीचा उठावा । तुह्मीं कीं सुमित्रासुतें । हा वधावा ॥ ६२ ॥
ह्मणे त्यासि पाहा बरें रावणारी । उभा राहिला शीघ्र कोदंडधारी ।
त्रिरश्रीबळें बाणिली दिव्य शोभा । रणामंडळी ठाण मांडूनि ऊभा ॥ ६३ ॥
पुढें राघवें ओढिला बाण जैसा । वदे आदरें वीर सौमित्र तैसा ।
पहावें घडी एक राजीवनेत्रें[5] । वधीतों बळें दैत्य मूहूर्तमात्रें ॥ ६४ ॥
पुढें पावला तो अतीचंड काया । बहु बोलती एकमेकां छळाया ।
तया एकमेकांस निर्वाण जालें । शरां सोडिलें व्योम[6] संपूर्ण केलें ॥ ६५ ॥
शरां तोडिती एकमेकां विरांचे । पुन्हा मागुती भार येती शरांचे ।
बळें भीडती बाण बाणांस कैसे । पडों लागती छेदिलें सर्प जैसे ॥ ६६ ॥
शरीं राक्षसें व्योम संपूर्ण केलें । त्रिरें लक्ष्मणें शीघ्र छेदूनि नेलें ।
रिपू कोपला मागुते बाण सोडी । बळें वीर सौमित्र तात्काळ तोडी ॥ ६७ ॥
पुढें वीर रामानुजें[7] तेचि काळीं । नभीं मंडपू घातला बाणजाळीं ।
किती चूकले भार येतां शरांचे । देहे खोंचले एकमेकां विरांचे ॥ ६८ ॥
त्रिरश्रीबळें दुःख नाहीं तयांचें । नभीं पाहती देव कौतुक त्यांचें ।
दळें थोकलीं युद्ध होतां खणाणां । तया मस्तकू डोलवी रामराणा ॥ ६९ ॥
भला रावणी वीर हा चंडदेही । दुजा मानवी वीर सौमित्र तोही ।
महावीर दोघे रमामाजि कैसे । बळें मातले भीडती काळ जैसे ॥ ७० ॥
पुढें शीघ्र सौमित्र तो वज्रठाणें । बळें तोडिलें शीर चंद्रार्धबाणें ।

---

१ नाश. २ युद्ध. ३ भयंकर शरीराचा. ४ जिंकण्याकरतां. ५ कमलाप्रमाणें आहेत डोळे ज्याचे अशा रामानें. ६ आकाश. ७ रामाचा कनिष्ठ बंधु लक्ष्मण त्यानें.

रणीं पाडिला तो अतीचंडकाया । बळें लागले दैत्य मार्गे पळाया ॥ ७१ ॥
बहूसाल ते मृत्युपंथेंचि गेले । परी अल्प घायाळ मार्गे पळाले ।
पुरीमाजि जाऊन लंकापतीला । भयें सांगती सर्व संहार झाला ॥ ७२ ॥
बहू झुंजतां झुंजतां भग्न झाले । रणीं सर्वही पुत्रमंत्री निमाले ।
नरां वानरांला जयो प्राप्त झाला । क्षयो राक्षसां शीघ्र ठाकूनि आला ॥ ७३ ॥
पुढें रावणू तो भुमीं अंग घाली । तया ऐकतां मूर्च्छना शीघ्र आली ।
शरीरीं नसे शुद्धि सर्वै उडाली । बहू दैन्यवाणी दशा प्राप्त जाली ॥ ७४ ॥
करी रावणू शोक शंकारहीतू । सभामंडपीं धांवला इंद्रजीतू ।
पिता शीघ्र आलिंगिला मेघनादें । ह्मणे काय जी शीणतां व्यर्थ खेदें ॥ ७५ ॥
बहूतांपरी तो पिता शीकवीला । ह्मणे शीघ्र मारूनि येतों रिपूला ।
तेणें रावणू शोक सांडूनि ठेला । बहूसाल सन्मानिलें त्या सुताला ॥ ७६ ॥
बहू दीस होती गळां रत्नमाळा । तमे पाहतां मोल थोडें भुगोळा ।
करीं घेतली माळिका आवडीनें । सुताच्या गळां घातली रावणानें ॥ ७७ ॥
रणा चालिला वीर संग्रामसैरा । दळेंशीं बळें लोटला भार सैरा ।
रथां घोडिमां कुंजरां[2] मीति[3] नाहीं । बहुसाल वाद्यें पुढें एक घाई ॥ ७८ ॥
महा वैभवेंशीं रणामाजि आला । तया इंद्रजीतें रणीं होम केला ।
यथायोग्य पूर्णाहुतीचेनि तोषें । रथू दीधला अग्निवर्णू हुताशें[4] ॥ ७९ ॥
रथू तोमरू खड्गबाणीं विराजे । वरी रावणी तो महा वीर साजे ।
उडाला रथेंशीं बळें अंतराळें । असंभाव्य सोडी तळीं बाणजाळें ॥ ८० ॥
बळें सूटला बाण त्या राक्षसांचे । बहू खोंचले भार गोळांगुळांचे[5] ।
फूटों लागले कोथळे पादपाणी । भयें बोलती वानरें दैन्यवाणीं ॥ ८१ ॥
कितीएक ते वीर भेगें पळाले । पुढें जातजातांचि चौरंग केले ।
कितीएक धाकें विरां आड जाती । अकस्मात तेथेंचि ते भेदिजेती ॥ ८२ ॥
कपीवाहिनीमाजि आकांत जाला । रणीं तो विरें वीर सर्वै निमाला ।
सुमित्रासुतू बोलिला राघवाला । बहू आट जाला रिसां वानरांला ॥ ८३ ॥
पुढें बोलतां बोलतां तेचि काळीं । अकस्मात ते भेदिले बाणजाळीं ।
निचेष्टीत भूमीं धनुष्यें गळालीं । विरें इंद्रजीतें रणीं ख्याति केली ॥ ८४ ॥
बळी रावणी एकला वीर जेठी । कपी पाडिले लक्ष कोट्यानुकोटी ।
महा वीर ते धीर मेरूबळाचे । प्रतापें सुरांहूनि[6] ते विक्रमाचे[7] ॥ ८५ ॥
रिसां वानरां सर्व संहार केला । पुरीमाजि तो येश घेऊनि गेला ।
नमस्कार केला तया रावणाला । दळेंशीं बळें रामशत्रू निमाला ॥ ८६ ॥
रणीं सर्वही पाडिले प्रेतराशी । बहूसाल आनंद त्या रावणासी ।
महा सूख लंकापुरीमाजि ऐसें । पुढें वर्तलें वानरांमाजि कैसें ॥ ८७ ॥
कपी रीस ते पर्वतातुल्य कैसे । निमाले रणीं पाडिले वृक्ष जैसे ।

---

मेले. २ हत्तींना. ३ माप, मर्यादा. ४ अग्नीनें. ५ वानरांचे. ६ देवांहून. ७ पराक्रमाचे.

तयांमाजि कल्याण दोघांजणाला। कपी मारुती आणि बीभीषणाला ॥ ८८ ॥
रणू माजलें सर्वेही प्रेतरूपी। तयामाजि ते दोघे उद्विग्नरूपी।
विचारूनियां वन्हिशीखाउजेडें। रणा शोधिले सर्व तींहीं निवाडें ॥ ८९ ॥
रणा शोधितां सर्व सेनेसि अंत। तयामाजि तों बोलिला जांबुवंत।
पुढें वीर ते शीघ्र धांवोनि आले। तयां पाहतां बाण अंगीं बुडाले ॥ ९० ॥
बहुसाल तो रीस घायाळ जाला। बळीं बाणजाळीं रणीं आकळीला।
महावीर बीभीषणें उठवीला। बळें बाण ओढूनियां स्वस्थ केला ॥ ९१ ॥
पुढें ऋक्ष बीभीषणालागिं पुसे। महावीर ते मुख्य आहेत कैसे।
ह्मणे जांबुवंतासि नैर्ऋत्यनाथू। विरा पूससी काय जाला अनर्थू ॥ ९२ ॥
महावीर दोघे निचेष्टीत जाले। कपी सुग्रिवादी सर्वै निमाले।
रणामाजि ते शोधिली सर्व सेना। समस्तांमध्यें एक तोही दिसेना ॥ ९३ ॥
प्रसंगीं निरूपी यथातथ्य मातू। मनामाजि तो जांबुवंतू निवांतू।
ह्मणे वीर बीभीषणू जांबुवंता। समस्तांसि कल्याण तें सांग आतां ॥ ९४ ॥
ह्मणे ऋक्ष तो मारुतीविण कांहीं। विरां ऊठवाया दुजा प्रेत्न नाहीं।
क्षिराब्धीतटीं योजनें चारि कोटी। गिरी द्रोण आणील हा वीर जेठी ॥ ९५ ॥
महा रम्य द्रोणाचळू भव्यरूपी। तया मस्तकीं औषधी दिव्यरूपी।
बळें आणितां ऊठती सर्व सेना। कपी मारुतीवीण दूजा दिसेना ॥ ९६ ॥
ह्मणे जांबुवंतासि नैर्ऋत्यनाथू। असंभाव्य तूं सांगशीं दूर पंथू।
गमे प्रेत्न हा सर्वथाही घडेना। गिरी मारुतीचेनिही आणवेना ॥ ९७ ॥
ह्मणे गा विरा काय तूं बोलिलाशी। कपीसारखा मारुती भावितोशी।
परी जाण हा ईश्वरु साक्षरूपी। कळेना जना रुद्र पूर्णप्रतापी ॥ ९८ ॥
बहु स्तुति केली तया मारुताची। तयें तोषली वृत्ति बीभीषणाची।
ह्मणे गा विरा संकटीं धांव घाली। बळें ऊठवीं सर्व सेना निमाली ॥ ९९ ॥
कपी मारुती ऊत्तरें सिद्ध जाला। मनीं चिंतिलें रामपादांबुजाला।
महावीर आणील द्रोणाचळातें। पुढें वीनवी दास तो श्रोतयांतें ॥ १०० ॥

---

## प्रसंग ५ वा.

उभा राहिला वीर मंदार जैसा। मनाहूनि पुढें बळें वेग तैसा।
रुपें कर्कश पाहतां पाहवेना। बहूसाल उंचाट त्या राहवेना ॥ १ ॥
अकस्मात तो व्योमपंथें उडाला। मही झोंकली पन्नगा भार जाला।
बहु झोंकिलें कूर्म वाराह दंतीं। झडा चांचरें ते धरा सांवरीती ॥ २ ॥
स्फुरद्रूप सर्वांग वाजे झडाडां। उडाले नभीं वृक्ष वातें फडाडां।
असंभाव्य पिंजारिलें पुच्छ मागें। नभोमंडळीं जातसे लागवेगें ॥ ३ ॥

---

१ बीभीषण. (राक्षसांचा नाथ–राजा). २ मृत्यू पावले. ३ रामाच्या पदकमलाला. ४ पृथ्वी. ५ शेषाला. ६ आकाशांत. ७ जलदीनें.

बहू लंघिली पोकळ वेग केला । द्विपें पांचही शीघ्र टाकूनि गेला ।
उडाला बळें पांच सिंधू अगाधू । पुढें देखिला साहवा क्षीरसिंधू[१] ॥ ४ ॥
तयाच्या तिरीं उंच आकाशपंथें । दिरें देखिलें रम्य द्रोणाचळातें ।
तया मस्तकीं दिव्य वल्ली अपारा । प्रभा फांकली तेजकल्लोळ सैरा ॥ ५ ॥
पुढें देखतां मारुता सांवरेना । धरीतां बळें तेज हाता चढेना ।
महा औषधी दिव्य शैल्या निशल्या । कपी देखतां सर्वही गुप्त जाल्या ॥ ६ ॥
तया पर्वताची बहू स्तूति केली । परी नायकें सर्वही व्यर्थ गेली ।
बहूसाल त्या आचळें गर्व केला । पुढें मारुता कोप तात्काळ आला ॥ ७ ॥
महा थोर धिक्कार केला तयासी । बळें शीघ्र उत्पाटिलें पर्वतासी ।
गिरी घेतला पुच्छ वेष्टीत माथां । कपीराज तो चालिला व्योमपंथा ॥ ८ ॥
रणीं जाहला सर्व संहार जेथें । महावीर आला अकस्मात तेथें ।
निशा[२] दाटली अंधकारें दिसेना । गिरी ठेवितां देखिली सर्व सेना ॥ ९ ॥
पिता पावला तो बळें मारुतीचा । रणीं वास नेला तया औषधींचा ।
सुगंधेंचि ते वीर आरोग्य जाले । कपी सर्वही मृत्यु मारूनि ठेले ॥ १० ॥
द्रळेंशीं बळें ऊठला रामराजा । स्फुराणें रणीं गर्जती वीरफौजा ।
पुढें मारुतें घेतलें पर्वताला । क्षिराब्धीनटीं शीघ्र ठेवूनि आला ॥ ११ ॥
तुळेना गती शक्ति माहा विराची । कळेना करी कोण संख्या बळाची ।
दिसे पाहतां वानरू वेषधारी । परी जाणिजे सत्य हा त्रीपुरारी ॥ १२ ॥
निशींच्या पदें चारि कोटी उडाला । गिरी दों पदीं[३] शीघ्र घेऊनि आला ।
पुन्हा मागुती तीपदांमाजि नेला । प्रभातेंचि चौथे पदीं प्राप्त जाला ॥ १३ ॥
सहस्रैक गांवें गिरी स्थूळ मोठा । असंभाव्य या मारुतीचा चपेटा ।
उडाला नभीं योजनें कोटि सोळा । नसे शोधितां दूसरा या भुगोळा ॥ १४ ॥
बहू पंथ चाले रवी भार नाना । बहू भार वाहे फणी[४] तो उडेना ।
गरूडासि तो आचळू[५] हालवेना । दूजी साम्यता ब्रह्मगोळीं दिसेना ॥ १५ ॥
पुढें मारुती भव्य आनंदरूपी । नभोमंडळीं भानु[६] जैसा प्रतापी ।
महावीर तैसा दाळामाजि आला । समस्तांसि देखोनि आनंद जाला ॥ १६ ॥
सखा तो जिवाचा असे दूरि देशीं । सदा लागलें चित्त हें त्याजपाशीं ।
पुढें पाहतां तो अकस्मात आला । तयासारिखें जाहलें मारुताला ॥ १७ ॥
कपीनें कसें पाहिलें राघवासी । पुढें देखिलें लोभियानें धनासी ।
तया बाळकें देखिलें जननीला । तयासारिखें जाहलें मारुताला ॥ १८ ॥
नमस्कारिलें त्या रघूनायकासी । उभा राहिला हात जोडोनि पाशीं ।
ह्मणे धन्य गा धन्य वीरा उदारा । कपी काय यावें तुझ्या ऊपकारा ॥ १९ ॥
अगा मारुती तूझिया ऊपकारें । जिवा ऋण जालें बहूसाल भारें ।
सदा सर्वदा आह्मची थोर चिंता । समस्तांसि तूं एकला प्राणदाता ॥ २० ॥

---

१ क्षीरसमुद्र. २ रात्र. ३ प्रहरानें. ४ शेष. ५ पर्वत. ६ सूर्य.

ह्मणे मारुती सर्व स्वामीप्रतापें । प्रभू काय कीजेल म्यां दीनरूपें ।
समर्था तुझेनी कृपेवीण कांहीं । स्वत अल्पही कार्य होणार नाहीं ॥ २१ ॥
बहुतांपरी मारुतें स्तुति केली । मनोवृत्ति ते राघवाची निवाली ।
पुढें राघवें रुद्र संतुष्ट केला । बहुतांपरी आदरें गौरवीला ॥ २२ ॥
प्रसंगें कपीनाथ सुग्रीव बोलें । ह्मणे मारुती प्राण त्वां रक्षियेले ।
कुळामाजि जालासि पूर्ण प्रतापी । कपींचीं कुळें सर्वही श्लाघ्यरूपी ॥ २३ ॥
कपी सर्वही बाणजाळें निमाले । तुझीया प्रतापें पुन्हा जन्म जाले ।
प्रसंगें सखा राघवें निर्मिलासी । कपींकारणें तूं बहु कष्टलासी ॥ २४ ॥
तया बोलतां मारुता सुख जालें । पुन्हा मारुतेंही बहु तोषवीलें ।
असो हे बहुसाल पाल्हाळगोवी । कथा राहिली ते पुढें चालवावी ॥ २५ ॥
कपीनाथ बोले रघुनायकासी । नये रावणू चंडदुःखें रणासी ।
तरी शीघ्र लंकापुरी जाळवावी । समर्थें कपीलागिं आज्ञा करावी ॥ २६ ॥
पुढें बोलिजे सुग्रिवालागिं देवें । तुह्मीं कल्पिलें कार्य सिद्धीस न्यावें ।
कपी रामआज्ञेस घेऊनि वेगीं । विरांलागिं आज्ञा करी ते प्रसंगीं ॥ २७ ॥
तुह्मीं लागवेगें चुड्या पाजळीजे । बळें शीघ्र लंकापुरी दग्ध कीजे ।
करीं घेतले उंच बांधूनि भारे । कपी धांवती एकमेकां पुढारे ॥ २८ ॥
चुड्या पावकें सर्वही दीप्त केल्या । अकस्मात लंकापुरीमाजि नेल्या ।
बळाचे कपी धांवती लक्ष कोटी । चुड्या खेळती थोर आनंद पोटीं ॥ २९ ॥
शिखा लागतां शीघ्र जाले उमाळे । निळे पींवळे श्वेत आरक्त काळे ।
बहु लागला चंड वारा भरारां । पुरीमाजि तो वन्हि धांवे सरारां ॥ ३० ॥
गृहागोपुरा जाहला एक वेळा । असंभाव्य हेलावती तीव्र ज्वाळा ।
दिशा दाटल्या धूम्र आकाशपंथें । पिडा जाहली खेचरां भूचरांतें ॥ ३१ ॥
मळें धूविलीं तीं तया रावणानें । सळें ऊसणें घेतलें पावकानें ।
बळें लागतां थोर कोपें कडाडी । बळें माजला वन्हि पोटीं धडाडी ॥ ३२ ॥
बळें क्रोध आला तया पावकाला । वरी वात वेगीं बळें साह्य जाला ।
शिखा चालिल्या अंतराळीं धडाडां । जळों लागली दिव्य लंका भडाडां ॥ ३३ ॥
अपारें घरें गोपुरें रम्य सारें । बहुसाल दामोदरें थोरथोरें ।
पडों लागलीं दग्ध होतां धबाबां । महा राक्षसी तोंड घेती खबाबा ॥ ३४ ॥
ध्वनी राक्षसांची असंभाव्य जाली । मुखें बोलती आगि रे आगि आली ।
कितीएक राक्षेस धांवूनि आले । अकस्मात ते वीर सर्वै मिळाले ॥ ३५ ॥
बळें धांवली ते असंभाव्य सेना । पुढें जावया लाग कोठें दिसेना ।
शिखा धांवती वन्हिच्या पाठिलागें । पळाले बळी प्राण घेऊनि वेगें ॥ ३६ ॥
बळें सुटलीं वैभवें राक्षसांचीं । बहु दाटलीं वाट प्रेतें विरांचीं ।
कितीएक ते धीट नेटें जळाले । कितीएक ते वीर मार्गे पळाले ॥ ३७ ॥

---

१ करावें. २ आनंद पावली. ३ शंकर. ४ ज्वाला. ५ किंचित् लाल. ६ अग्नीनें. ७ अत्यं सुंदर अशीं गृहें.

त्रिकूटाचळीं थोर आकांत जाला । असंभाव्य राक्षेस कीती निमाला ।
स्त्रिया बाळकें जेथ जेथें पळालीं । शिखा लागतां तेथ तेथें जळालीं ॥ ३८ ॥
पळायासि मार्गें पुढे रीघ नाहीं । जळाले पुरीमाजि ते सर्व कांहीं ।
बहु कुंजरें शाकटें अश्व नाना । निमाले रथी सारथी सर्व सेना ॥ ३९ ॥
सहस्रें दहा भूवनें रावणाचीं । जळालीं बहु संपदा वैभवाची ।
सुवस्ता अळंकार दिव्यांबरांचीं । सुगंधेल आज्यादि नाना रसांचीं ॥ ४० ॥
गुरें वांसरें जाळिलीं पावकानें । बहु हाट बाजार केणींदुकानें ।
बहूतांजणांचें बहू वित्त गेलें । त्रिकूटाचळा पावकें शुद्ध केलें ॥ ४१॥
बहु वेवसायी भले मोठमोठे । भुसारी जरी जोंहरी आणि चाँटे ।
जळालें बहु वित्त हाणोनि घेती । धरेना कदा सांवरेना रुदंती ॥ ४२ ॥
सभामंडपीं राक्षसीं हाक नेली । ह्मणे पाहतां काय लंका जळाली ।
दहा योजनें तीसरा भाग जो कां । बळें जाळिली वानरीं सर्व लंका ॥ ४३ ॥
तया रावणा वाटली सर्व चिंता । ह्मणे पाठवावें रणीं कोण आतां ।
न दीसे मुखीं मंदली सर्व शोभा । पुढें बोलिला शीघ्र कुंभा निकुंभा ॥ ४४ ॥
ह्मणे वानरीं जाळिली सर्व लंका । तयांशीं करा युद्ध टाकूनि शंका ।
तयां सांगतां सर्व ऊदीत जाले । महावीर ते सात युद्धा निघाले ॥ ४५ ॥
बळी कुंभ नीकुंभ जंघ प्रजंघे । दळें सिद्ध केलीं बळें लागवेगें ।
महावीर झुंजार तो वीरुपाक्षू । दळीं चालिला क्रोधन् शोणिताक्षू ॥ ४६ ॥
बळी सातही ते रथारूढ जाले । महावीर राक्षेस सर्वै मिळाले ।
बळें चालिलीं राक्षसांचीं अपारें । भुमी शेष सांडूं ह्मणे थोर भारें ॥ ४७ ॥
बहु दग्ध लंकापुरी होय जेथें । बळें चालिले भार तेणेंचि पंथें ।
निमिष्यांत कुंभे विरें तेचि काळीं । महा मेघ तो पाडिला बाणजाळीं ॥ ४८ ॥
बळें मातला वन्हि तो वीझवीला । त्रिकूटाचळीं लोक आनंदवीला ।
विझाली पुरी शीघ्र तेणेंचि मार्गें । निघाली पुढें वाहिनी लागवेगें ॥ ४९ ॥
रणामंडळा पारखे वीर आले । कपी द्रूमपाणी बळें सिद्ध जाले ।
समस्तापुढें अंगदू वीर रागें । रणीं लोटला क्रोधन् लागवेगें ॥ ५० ॥
बळें फोडिली हाक कल्पांत जैसी । रणीं मांडलें युद्ध दोघांजणांशीं ।
शिरें विंधिलें वानरांलागिं बाणीं । कपी कोपला अंगदू शैलपाणी ॥ ५१ ॥
गिरी टाकितां क्रोधन् गुप्त जाला । महा पर्वताचे तळीं तो निमाला ।
तया साह्यया शोणिताक्षू निघाला । तयें अंगदू भेदिला भग्न केला ॥ ५२ ॥
रणीं वीर लक्षूनियां बाण घाली । बळें गेलियां अंग भेदूनि भाली ।
उणें देखतां शीघ्र मैंदें द्विवीदें । तरू घेतला हाक देऊनि क्रोधें ॥ ५३ ॥
कपी वीर धांवोनि युद्धासि आला । रणीं अंगदालागिं तो साह्य जाला ।
तई शीघ्र येरीकडे लागवेगें । बळें धांवले ते विरश्रींत रागें ॥ ५४ ॥

---

१ हत्ती. २ गाडे. ३ सुंदर वस्त्रांचीं. ४ नाना पदार्थांचीं. ५ किरकोळ धान्य वगैरे विकणारे. ६ मोत्यें हिरे विकणारे. ७ कापड, वस्त्रें विकणारे. ८ रक्ताप्रमाणें लाल डोळे आहेत असा. ९ सैन्य १० मरण पावला.

प्रजंघें युपाक्षें तया शोणिताक्षा । दिल्हें पृट धांवोनि घेऊनि पक्षा ।
त्रिवर्गा त्रिवर्गीं रणीं युद्ध जालें । शरीं राक्षसीं व्योम संपूर्ण केलें ॥ ५५ ॥
शिळा शीखरें वृक्ष पाषाणघातें । कपी वीर ते हाणिती राक्षसातें ।
समारंगणीं दूर टाकोनि शंका । बळी नीकुरें भेदिती एकमेकां ॥ ५६ ॥
तई अंगदें थोर अद्भूत केलें । बळें वाड झुंबाड ते उन्मुळीलें ।
प्रजंघासि हाकूनि क्रोधें बहूतें । रणीं झोडिला पाडिला वृक्षघातें ॥ ५७ ॥
पुढें देखिलें त्या युपाक्षासि मैंदें । बळें गर्जला तो कपी घोर नादें ।
रणीं झुंजतां थोर आवेश मैंदा । शिळा टाकितां जाहला चूर्ण चेंदा ॥ ५८ ॥
द्विवीदें किरें पाडिला शोणिताक्षू । उणा देखिला सर्व नैऋत्यपक्षू[१] ।
तिघां राक्षसां थोर संहार जाला । रणामाजि युद्धासि तो कुंभ आला ॥ ५९ ॥
पिता कुंभकर्ण महावीर जैसा । तयासारिखा लोटला कुंभ तैसा ।
उभा रे उभा तूं रणामाजि मैंदा । अरे अंगदा जाशी कोठें द्विवीदा ॥ ६० ॥
बहू विक्रमें पाडिलें राक्षसांशीं । रणीं ऊसनें शीघ्र घेतों तुह्मांशीं ।
क्षणीं तेचि कोदंड[२] घेऊनि हातीं । कपी मैंद तो भेदिला बाणघातीं ॥ ६१ ॥
नवां बाणघातीं कपी भग्न केला । रणामाजि तो प्रेत होऊनि ठेला ।
द्विवीदासि दाही शरीं तेचि काळीं । विरें राक्षसें पाडिलें बाणजाळीं ॥ ६२ ॥
पुढें पाहतां देखिलें अंगदाला । कपी वीर तो वृक्ष घेऊनि आला ।
बळें हाणितां खीळिले हस्त बाणीं । चळेना कपी वीर तो वज्रठाणीं ॥ ६३ ॥
उभा राहिला बाण झेलीत कैसा । कुठारातळीं[३] छेदिजे वृक्ष जैसा ।
तया अंगदा शीघ्र प्राणांत आलें । रघूनायका वानरीं जाणवीलें ॥ ६४ ॥
मुखें बोलती अंगद् वीर गेला । कपीनाथ सुग्रीव तैसा उडाला ।
रथारूढ होऊनि कोदंड हातें । बळें मोडिलें तोडिलें वृक्षघातें ॥ ६५ ॥
रणीं कुंभ तो मल्लयुद्धासि आला । बळें तोडिता जाहला सुग्रिवाला ।
तया सुग्रिवें दीधली वज्रमुष्टी । रणीं पाडिला कुंभ तो प्रेतसृष्टी ॥ ६६ ॥
महावीर तो धाडिला मृत्युपंथें । निकुंभें रणीं हाकिलें सुग्रिवातें ।
कपीनाथ सुग्रीव घालूनि मागें । पुढें धांवला मारुती लागवेगें ॥ ६७ ॥
तया राक्षसें भेदिलें मारुताला । कपीवीर किंचीत मूर्छीत जाला ।
पुढें ऊठला तो कपी काळ जैसा । मनामाजि आवेश अद्भूत तैसा ॥ ६८ ॥
महापर्वतू घेतला मारुतानें । निकुंभावरी टाकिला थोर त्राणें ।
गिरी टाकितां शांति जाली तयाची । फळी फूटली सर्वही राक्षसांची ॥ ६९ ॥
त्रिकूटाचळामाजि घायाळ गेले । रिपू प्राण घेऊनि तैसे पळाले ।
भयातूर ते सांगती रावणाला । बळी तो विरें वीर सर्वे[४] निमाला ॥ ७० ॥
बहू दुःख जालें तया रावणाशीं । पुढें धाडिलें शीघ्र तीघां सुतांशीं ।
विशालाक्ष मकाक्ष आणी खरातें । रणा पाठविलें तिघां कूमरातें ॥ ७१ ॥

१ राक्षसांच्या पक्षाची मंडळी. २ धनुष्य. ३ कुऱ्हाडीच्या योगानें. ४ युद्धामध्यें.

तिघेही दळेंशीं बळें सिद्ध जाले । असंभाव्य ते भार मागें मिळाले ।
महा विक्रमें झेलिती वीर खेगें । समारंगणीं पावले लागवेगें ॥ ७२ ॥
वडंगें लोहो मूसळें शूळपाणी । कटाऱ्या सुऱ्या तोमरें चापपाणी ।
बहु खेटकें मुद्गलें आणि भाले । महावीर राक्षेस युद्धा निघाले ॥ ७३ ॥
कपीवाहिनीचा असंभाव्य थावा । प्रतापें बळें शीघ्र केला उठावा ।
शिळा शीखरें हाणिती राक्षसांतें । रिपू मारिती वानरां बाणघातें ॥ ७४ ॥
महायुद्ध आरंभिलें एकमेकां । तयां भीडतां तो धरी काळ शंका ।
रणीं राक्षसां पाडिलें घोर मारें । कपी वीर ते गर्जती भूभुकारें ॥ ७५ ॥
रणामाजि मक्राक्ष तो शीघ्र कोपे । पुढें चालिला चापपाणी प्रतापें ।
स्वयें आपुलें सैन्य घालूनि मागें । कपी भेदिता जाहला लागवेगें ॥ ७६ ॥
बळें सोडिलीं राक्षसें बाणजाळें । तुटों लागती वानरांचीं शिसाळें ।
थटाटां रणीं तूटती पादपाणी । शरीरें बहूसाल विक्राळवाणी ॥ ७७ ॥
देहे खोंचलें थोर माहा विरांचे । झरे लागले वाहती शोणिताचे ।
रिपू झुंजतां राक्षसें भग्न केले । कितीएक ते भार मागें पळाले ॥ ७८ ॥
बळें धांवती बाण ते लागवेगें । पळाले बळाचे कपी सर्व मागें ।
कपींचीं दळें भंगिलीं राक्षसानें । तया मस्तकू तूकिला राघवानें ॥ ७९ ॥
रणीं मांडिला थोर कल्पांत सृष्टी । बहूतां विरीं दीधली त्यांसि पृष्ठी ।
रणामाजि कोणासही राहवेना । करी घोर संधान तें साहवेना ॥ ८० ॥
ह्मणे राम हो कोण सामर्थ्य याचें । रणीं भंगिलें सैन्य गोळांगुळांचें ।
वरी अंतराळीं बहू बाणजाळें । क्षणामाजि ते तोडिलें शीघ्र काळें ॥ ८१ ॥
उभा राहिला राम वज्रांगठाणें । गुणीं लाविलें चाप चंद्रार्धबाणें ।
टणत्कारिलें सात कोटीं थरारी । महाचंड ब्रह्मांड घोषें गरारी ॥ ८२ ॥
बळें राक्षसें व्योम संपूर्ण केलें । रणीं राघवें शीघ्र छेदूनि नेलें ।
पुढें घेतला दूसरा बाण रामें । गुणीं लाविला थोर शत्रू विरामें ॥ ८३ ॥
विरें  मागुतें थोर संधान केलें । रिपूचें रणा शीर छेदूनि नेलें ।
महावीर मक्राक्ष तो बाणघातें । निमाला रणीं चालिला मृत्युपंथें ॥ ८४ ॥
पुढें राम पाचारिला त्या खरानें । विशालाक्ष ऊठावला थोर त्राणें ।
ह्मणे राजपुत्रा बरें युद्ध केलें । रणीं विक्रमें शीर छेदूनि नेलें ॥ ८५ ॥
असे सर्वदा तो जयो प्राप्त कैंचा । करी ग्रास राहू रवीमंडळींचा ।
प्रतीउत्तरें बोलिला राम वाणी । बळें गाजिलें भूमिआकाश बाणीं ॥ ८६ ॥
तिहीं राक्षसीं घोर संधान केलें । विरां वाटलें थोर कल्पांत जालें ।
पुढें तोडिले सर्वही बाण रामें । प्रतापें रणामाजि त्या पूर्णकामें ॥ ८७ ॥
प्रतापें रणीं राघवें बाणघातें । रिपू दोघेहि धाडिले मृत्युपंथें ।

---

१ तरवारी. २ ढाली. ३ वानरसैन्याचा. ४ मस्तकें. ५ हातपाय. ६ रक्ताचे. ७ वानरांचे. ८ दृढ उभा राहून.

रणीं राक्षसां थोर संहार जाला । समाचार गेला तया रावणाला ॥ ८८ ॥
पुढें रावणानें बहु दुःख केलें । नसे अंतरीं सौख्य टाकून गेलें ।
दशग्रीव बोले विरा इंद्रजीता । प्रतापें रणामाजि तूं जाय आतां ॥ ८९ ॥
रिसां वानरांची असंभाव्य सेना । तुजवेगळी सर्व संहारवेना ।
उभा राहिला शीघ्र ऊदीत जाला । ह्मणे शीघ्र संहारितों वैरियाला ॥ ९० ॥
दळें चालिलीं राक्षसांचीं अचाटें । पुढें वानिती भाटे वेताळथाटें ।
बळी रावणी तो रथारूढ जाला । बहूसाल वाद्यें दळेंशीं निघाला ॥ ९१ ॥
रणामाजि येवोनियां होम केला । महा भीम कृत्या रथ प्राप्त जाला ।
रथारूढ होवोनि वेगीं उडाला । नभोमंडळामाजि तो गुप्त जाला ॥ ९२ ॥
असंभाव्य तीं मोकळीं बाणजाळें । बळें धांवती प्रेरिले दूत काळें ।
कपींचीं तुटों लागलीं कंठनाळें । रणीं लोटती वीर प्रेतें सुकाळें ॥ ९३ ॥
असंभाव्य सामर्थ्य त्या रावणाचें । कळेना कळा कोण कापट्य याचें ।
कदा नेणती बापुडे देव कांहीं । रणीं पाडितो वीर सन्मुख नाहीं ॥ ९४ ॥
बहु खोंचली ते असंभाव्य सेना । दिशा दाटल्या बाणजाळीं दिसेना ।
कपीवाहिनीमाजि आक्रांत जाला । पुढें मारुतीचा पिता शीघ्र आला ॥ ९५ ॥
निरूपी अती आदरें राघवाशीं । ह्मणे अंगिरा अस्त्र योजी त्वरेंशीं ।
पुढें राम तात्काळ तें अस्त्र घाली । तयें तूटलें शीर कृत्या निमाली ॥ ९६ ॥
पुढें रावणी भूतळामाजि आला । रणामंडळीं मृत्यु जैसा उदेला ।
भयासूर तो वीर घोरप्रतापी । शरा सोडिता जाहला काळरूपी ॥ ९७ ॥
समस्तीं अकस्मात तो देखियेला । तया एक वेळा बहु भार केला ।
कपी वीर ऊठावले शीघ्र काळें । शिळा शीखरें टाकिती बाणजाळें ॥ ९८ ॥
रणीं रावणी एकला वीर जेठी । कपी लोटले लक्ष कोट्यानुकोटी ।
रिसीं वानरीं थोर कल्लोळ केला । बळें ताडिते जाहले राक्षसांला ॥ ९९ ॥
बळें फेंकिला शूळ त्या मारुतानें । गदा घेतली शीघ्र बीभीषणानें ।
परीघासि घेऊनियां शीघ्र धांवे । कुमूद् करीं वेग नेटें उठावे ॥ १०० ॥
कपीऋषभा थोर आवेश आला । शतघ्नीस घेऊनि सन्मूख जाला ।
द्विवीदें बळें सोडिलें चक्र कैसें । महा पर्वतीं चालिलें वज्र जैसें ॥ १०१ ॥
सुगंधें विरें ताडिला शस्त्रघातें । गिरीशृंग तो टाकिला जांबुवंतें ।
शिळा टाकिली चंड त्या अंगदानें । महा खड्ग तें मोकलीलें नळानें ॥ १०२ ॥
बहु गा निळें झोंकिला तो विशाळू । कपी सुग्रिवें टाकिला चंड शैलू ।
सुमित्रासुतें राघवें तेचि काळीं । रिपू रावणी विंधिला बाणजाळीं ॥ १०३ ॥
बहूतांमधीं एकला इंद्रजीतू । रणीं वेढिला काळ जैसा कृतांतू ।
बळें वानरांचा बहु मार जाला । रिपू राक्षसें अंतरीं तुच्छ केला ॥ १०४ ॥

---

१ नाश २ रावण. ३ बंदीवान. ४ सैन्यासहवर्तमान. ५ वानरश्रेष्ठाला. ६ एक शस्त्र. ७ भयंकर.

बहुतां जणांचा बहु एक मेळा । निमिष्यांत तोडूनि नेला स्वलीला ।
पुढें राक्षसें घोर संधान केलें । विरें विक्रमें सर्व सामर्थ्य नेलें ॥ १०५ ॥
रिपूंचीं दैळें पाडिलीं इंद्रजीतें । रणामाजि जालीं असंभाव्य प्रेतें ।
रिसें वानरें राम सौमित्र बाणीं । बळें भेदुनी चालिला चापपाणी ॥ १०६ ॥
पुढें सज्जनीं चित्त द्यावें कथेला । समाचार सांगेल हा रावणाला ।
महा वैर हें ऐकतां वैर नासे । ह्मणे दास निर्वैर सूखें विलासे ॥ १०७ ॥

प्रसंग पांचवा समाप्त.

---

## प्रसंग साहावा.

सभे बैसला राव त्रीकूटवासी । पुढें भेटला इंद्रजीतू तयासी ।
नमस्कार केला तया रावणाला । ह्मणे शत्रुचा सर्व संहार केला ॥ १ ॥
बहु लंकवासी रणीं भग्न केले । कितीएक ते मृत्युपंथेंचि गेले ।
बळें ऊसणें घेतलें हो तयांचें । प्रभू शोधिलें मुख्य त्या वैरियांचे ॥ २ ॥
तया रावणा थोर संतोष जाला । बळें अमृताचे नदी पूर आला ।
अकस्मात संताप सर्वै उडाला । पुढें बोलता जाहला कूमराला ॥ ३ ॥
ह्मणे इंद्रजीता विरा बैस आतां । सुपुत्रा तुवां तोडिली सर्व चिंता ।
बळी चक्रचूडामणी वीर राजा । असाव्या तुझ्या वज्र कल्याण भूजा ॥ ४ ॥
अगा इंद्रजीता सखे गोत्र बंधू । प्रतापें बळें आगळे वीर सिंधू ।
निमाले रणीं वैरियांचेनि हातें । बहुसाल वाटे मनीं दुःख मातें ॥ ५ ॥
त्रिकूटाचळीं वानरीं लाग केला । मुळारंभ राक्षेस कीती निमाला ।
पुढें थोर संग्राम दारूण जाला । विरू राक्षसू सर्वही तो बुडाला ॥ ६ ॥
तयाऊपरी वीर धूम्राक्ष जेठी । तयें जिंकिले देव तेतीस कोटी ।
समारंगणीं त्या विरा अंत आला । रणामंडळीं देह त्यागून गेला ॥ ७ ॥
रणीं वज्रदंष्ट्री दिसे काळरूपी । गिरिसारिखा अंकपन्न प्रतापी ।
महावीर ते दोघे युद्धासि गेले । समारंगणीं युद्ध होतां निमाले ॥ ८ ॥
बळी दक्ष वित्पन्न चातुर्य जाणे । तया देखतां अंतरा सूख बाणे ।
प्रसंगेंचि तो वीर युद्धासि गेला । प्रहस्तू रणीं युद्ध होतां निमाला ॥ ९ ॥
तयाचा बहु क्रोध आह्मांसि आला । रिपू राम जिंकावया वेग केला ।
तयाचें महा युद्ध तें काय बोलों । समारंगणीं भ्रष्टलों भग्न जालों ॥ १० ॥
तयाऊपरी धीर आह्मां धरेना । पुढें ऊठवीलें बळें कुंभकर्णा ।
तयासारिखा कोण आहे बळाचा । समारंगणीं धीर काळासि कैंचा ॥ ११ ॥
महावीर तो घोर युद्धासि गेला । रिसां वानरां थोर संहार केला ।

---

१ क्षणांत. २ शत्रूंचीं. ३ सैन्यें. ४ मृत्यु पावले. ५ कंपरहित, स्थिर.

रिपूनें तया शेवटीं बाणघातें । समारंगणीं धाडिला मृत्युपंथें ॥ १२ ॥
प्रतापी सखा बंधु माझा निमाला । बळें आगळा थोर आधार गेला ।
मला पुसिल्यावीण गंतव्य केलें । नये बोलतां दुःख ब्रह्मांड जालें ॥ १३ ॥
तयाऊपरी चौघेही सूत माझे । अगा इंद्रजीता सखे बंधु तूझे ।
तयांच्या प्रतापानळें सूख लोटे । समारंगणीं भीडतां काळ वीटे ॥ १४ ॥
नरा अंतकाला नरा अंतकानें । बळें पीटिलें देवदेवांतकानें ।
तळीं घातले सर्व त्या त्रीशिरानें । रणीं वानरीं घेतले सर्व प्राणें ॥ १५ ॥
अतीकाय तो वीर मेरू बळाचा । प्रतापें बळें आगळा विक्रमाचा ।
रथारूढ होऊनि युद्धासि गेला । तयाचा सुमित्रासुतें घात केला ॥ १६ ॥
निमाले सखे दुःख ऊदंड जालें । पुढें पाहतां वीर सामर्थ्य गेलें ।
महावीर ते मृत्युपंथेंचि जाती । नरें वानरें बापुडीं येश घेती ॥ १७ ॥
निमाले सखे सूत बंधू बळाचे । प्रतापें सुरांहूनि ते विक्रमाचे ।
रणामंडळीं सर्व सेना निमाली । बहूसाल संहारिली कूळवल्ली ॥ १८ ॥
अगा इंद्रजीता तुवां सूख द्यावें । प्रतापें रणीं सर्व शत्रू वधावे ।
मला सांगसी लाविले मृत्युपंथीं । परी मागुती ते रिपू गर्जताती ॥ १९ ॥
रिपू ऊठती मागुती हें न व्हावें । बळें सर्व निर्मूळ त्यांचें करावें ।
प्रतापें रणीं सर्व पाडून येसी । परी मागुता जीव येतो तयांशीं ॥ २० ॥
बहू वेळ तां युद्धसामर्थ्य केलें । परी पाहतां सर्वही व्यर्थ गेलें ।
प्रतापें रणीं पाडिले बाणघातीं । समारंगणीं मागुते सिद्ध होती ॥ २१ ॥
महीमंडळीं नाम त्यांचें नसावें । त्विरा विक्रमें त्वां मला सौख्य द्यावें ।
पिता बोलतां धीर पोटीं धरेना । असंभाव्य कोपानळू सांवरेना ॥ २२ ॥
उभा राहिला वाक्य बोले पित्याशी । ह्मणे शीघ्र संहारितो वैरियांशीं ।
समारंगणामाजि ऐसें न होतां । तरी जाणिजे भेटि ते हेचि आतां ॥ २३ ॥
बहू कोपला चालिला वीर जेठी । प्रतापें ह्मणे सर्व जाळीन सृष्टी ।
पुढें बापुडीं वानरें दैन्यवाणीं । खिळी तो बळें सर्व ब्रह्मांड बाणीं ॥ २४ ॥
पित्याकारणें वीरभद्रू निघाला । तयां दैत्यजांला धरूं सिद्ध झाला ।
तयाचेपरी कोपला काळरूपी । बळें चालिला शक्रशत्रू प्रतापी ॥ २५ ॥
तुरें वाजती नाद गेला भुगोळा । दळेंशीं बळें पावला होमशाळा ।
तया राक्षसें मागुती होम केला । महावीर मेघासनीं गुप्त झाला ॥ २६ ॥
बळें पूजिलें सर्व आकाश बाणीं । पडों लागलीं वानरें दैन्यवाणीं ।
कपीवाहिनीमाजि आकांत जाला । पुन्हा मागुता थोर कल्पांत आला ॥ २७ ॥
वरी पाहतां युद्धकर्ता दिसेना । धडाडा पडों लागली सर्व सेना ।
महावीर ते घोर मार्गे पळाले । पळाले कपी राघवा आड गेले ॥ २८ ॥
ह्मणे राम तो सुग्रिवा मारुता हो । नभोमंडळीं युद्धकर्ता पहा हो ।

---

१ जाणें, मरणें. २ पराक्रमाचा. ३ त्वां. ४ क्रोधाग्नि. ५ नाश करतो. ६ इंद्राचा शत्रु रावणाचा मुलगा.

प्रतापें बळें वीर सर्व उडाले । असंभाव्य ते पोकळीमाजि गेले ॥ २९ ॥
महा थोर तें युद्धसामर्थ्य गेलें । तया इंद्रजीतें पुढें काय केलें ।
अकस्मात तो भूतळामाजि आला । रणामंडळीं सैन्यसिंधू मिळाला ॥ ३० ॥
खटाटोपिले ते बहु शस्त्रपाणी । रुपें कर्कशे काळ कर्कोटवाणीं ।
बळें चालिला भार वेष्टीत सेना । रजें मातला व्योमें पुढें दिसेना ॥ ३१ ॥
कपी वीर राक्षेस सन्मूख जाले । समारंगणामाजि युद्धा निघाले ।
पुढें राक्षसें रूप केलें सितेचें । महा रम्य लावण्य तें जानकीचें ॥ ३२ ॥
रणीं लोटल्या वीर राक्षेसफौजा । कपीभार ऊठावले स्वामिकाजा ।
दळीं राक्षसांचा बळी इंद्रजीतू । बळी चालिला काळ जैसा कृतांतू ॥ ३३ ॥
तयां देखतां धावला रुद्र तैसा । करीं घेतला शैल ब्रह्मांड जैसा ।
बळें इंद्रजीता उजू धांव घाली । तईं इंद्रजीतें सिता दाखवीली ॥ ३४ ॥
ह्मणे रे कपी हे सिता राघवाची । गुणी स्वामिणी हे तुह्मां मर्कटाची ।
महापापिणी सर्पिणी दुःखदाती । त्रिकूटाचळीं राक्षसीकूळहंती ॥ ३५ ॥
अशोकावनामाजि हे शोकवल्ली । अकस्मात कोठून निर्माण झाली ।
तया दीवसापासुनी दुःख झालें । त्रिकूटाचळा थोर दारिद्र्य आलें ॥ ३६ ॥
बळाचे बहु वीर हे पापिणीनें । सखे आमुचे ग्रासिले सर्पिणीनें ।
कळी मांडली त्यास हे मूळ सीता । करितों इचा शीघ्र संहार आतां ॥ ३७ ॥
तया राक्षसें मारिलें जानकीला । ह्मणे रे कपी सांग त्या राघवाला ।
समारंगणीं शीर छेदूनि नेलें । तया राक्षसें शीघ्र गंतव्य केलें ॥ ३८ ॥
सिता देखतां मारुती अंग घाली । प्रसंगीं तये मूर्छना शीघ्र आली ।
महा शोक आरंभिला त्या कपीनें । ह्मणे काय केलें जगज्जननीनें ॥ ३९ ॥
बहु दुःख मागील तें आठवीलें । उदासीन हें चित्त दुश्चीत जालें ।
ह्मणे काय सांगों तया राघवाला । कपी मारुती शोकसिंधूं बुडाला ॥ ४० ॥
ह्मणे रे कपाळा असें काय केलें । बहु थोर हें पाप माझें उदेलें ।
न सांगों तरी गोष्टि राहों नये कीं । पुढें सांगतां राघवा दुःख हें कीं ॥ ४१ ॥
प्रवाहो बळें चालिला अश्रुपातीं । विलापें करूं लागला तो रुदंती ।
बळें ऊठला चालतां चालवेना । रघूनायका भेटला दैन्यवाणा ॥ ४२ ॥
अधोमूख पाहोनि कांहीं वदेना । दुखें दाटला कंठ त्या बोलवेना ।
ह्मणे जानकीसारिखी शस्त्रघातें । रणीं मारिली राक्षसें इंद्रजीतें ॥ ४३ ॥
तयें सांगतां मांडिला शोक रामें । मिळालीं दळें दैन्यवाणीं विरामें ।
कपीवाहिनीमाजि आक्रांत जाला । सुमित्रासुतें राम तो शांत केला ॥ ४४ ॥
भविष्योत्तरें वाल्मिकी सत्य व्हावीं । देहें सोंगसंपादणी कां करावी ।
ह्मणूनी रघूनायकें शोक केला । तदा वीर बीभीषणू शीघ्र आला ॥ ४५ ॥
ह्मणे जी प्रभू शोक वायां करीतां । असे सत्य नेमस्त कल्याण सीता ।

---

१ आकाश. २ यम. ३ दुःखी. ४ शोक.

अशोकावना दूत ज्यां पाठवीले । प्रसंगीं समाचार घेऊनि आले ॥ ४६ ॥
तया इंद्रजीतें रणीं माव केली । नव्हे सत्य हें मिथ्य होऊनि गेली ।
पुरीं होम आरंभिला मेघनादें । पुरा जालिया कोण घेईल द्वंद्वें ॥ ४७ ॥
तया इंद्रजीतासि आधीं वधावें । वृथा शोक सांडूनियां सिद्ध व्हावें ।
पुरा होम हो जालिया आवरेना । समारंगणीं मारितांही मरेना ॥ ४८ ॥
प्रभू जाहली अंब्रिणी व्योमपंथें । वधावा सुमित्रासुताचेनि हातें ।
तयें सांगतां सर्व आनंद जाला । बहुतांपरी राघवें गौरवीला ॥ ४९ ॥
पुढें राघवाची बहू स्तूति केली । विरांची असंभाव्य मांदी मिळाली ।
सभामंडळीं ते कपी रीसराजे । तयां मध्यभागीं महावीर साजे ॥ ५० ॥
समस्तांसि सोडीलसें इंद्र भावी । समर्था तया ऊपमा काय द्यावी ।
असा राम हा देव ब्रह्मादिकांचा । सुमित्रासुतासी वदे रम्य वाचा ॥ ५१ ॥
म्हणे होम आरंभिला इंद्रजीतें । मुखें बोलिलें सत्य नैर्ऋत्यनाथें ।
पुरा होम होतां कदा आवरेना । समारंगणीं मारितांही मरेना ॥ ५२ ॥
प्रतापें समारंगणीं त्या वधावें । बळें आजि ब्रह्मादिकां सौख्य द्यावें ।
पुढें ऊठिला शीघ्र सौमित्र कैसा । नभोमंडळीं तीव्र आदित्य जैसा ॥ ५३ ॥
जया देखतां काळ कांपे थरारां । सवें दीधिलें राघवें पंचवीरां ।
हनूमंत बीभीषणू जांबुवंतू । सुगंधू कपी ऋषभू वीर्यवंतू ॥ ५४ ॥
महावीर ते पांचही सिद्ध जाले । कपी रीस आणीक कीती निघाले ।
सुमित्रासुतालागिं राजाधिराजें । मुखें बोलली शक्तिसामर्थ्यबीजें ॥ ५५ ॥
त्वरू दीधला स्वामि देवाधिदेवें । म्हणे शत्रु जिंकोनिया शीघ्र यावें ।
करू मस्तकीं ठेविला रामचंद्रें । नमस्कार तैसाचि केला फणींद्रें ॥ ५६ ॥
समस्तीं विरींही नमस्कार केले । पुढें सव्य वाळूनि तैसे निघाले ।
अती आदरें स्कंधभागीं विरानें । सुमित्रासुता घेतलें मारुतीनें ॥ ५७ ॥
निघाले महावीर ते लागवेगें । पिता हिंपुटी मारुती मागमागें ।
पुढें चालतां पंथ नीकुंबळेचा । विरां थोर आवेश काळासि कैंचा ॥ ५८ ॥
महा घोर तो लंघिला मार्ग तींहीं । पुढें पाहतां पाहतां वाट नाहीं ।
तरूंचीं वनें लागलीं तीं वितंडें । प्रचंडें उदंडें बहु झाडखंडें ॥ ५९ ॥
भुमीं दाटले वृक्ष वृक्षां मिळाले । तयां अंतरीं वंश मिश्रीत झाले ।
वरी पाहतां वाड आकाशपंथें । पुढें रीघ नाहीं तया वारियातें ॥ ६० ॥
समें वीषमें झाडखंडें अचाटें । मिळालीं बळें वाजती कर्कराटें ।
कडे तूटले थोर त्या पर्वताचे । झरे वाहती झाडखंडीं विषाचे ॥ ६१ ॥
तया अंतरीं सिंह शार्दूल कैसे । मदें मातले गर्जती काळ जैसे ।
गजांचीं बहू दाट थाटें विशेषें । पळों लागती थोर किंकाटघोषें ॥ ६२ ॥

---

१ माया, कपट. २ आकाशवाणी. ३ मंडळ. ४ सूर्य. ५ लक्ष्मणानें. ६ कष्टी. ७ मोठमोठीं विशाल. ८ वेळू. ९ प्रवेश. १० वाघ.

बहू संकटें धांवती रानह्मैसे । रिसें कर्कशें देखतां जीव त्रासे ।
बहू सांबरें चीतळें रानगाई । शुनी सूकरां मर्कटां मीति नाहीं ॥ ६३ ॥
बहू श्वापदें घोर नानापरींचीं । बहू गर्जताती बहुतां स्वरांचीं ।
भुतें खेचरें शक्ति वेताळ पीसे । बहू धांवती वन्हिचे ज्वाळ जैसे ॥ ६४ ॥
बहू व्याळें वेटाळले झाडखंडीं । वनें व्यापिलीं सर्व कूळीं उदंडीं ।
बहूतांपरींचीं बहू तीं विखारें । विषें घोळती लोळती थोरथोरें ॥ ६५ ॥
वहाती विषाचे महा ओघ तेथें । धुधूकारतां ज्वाळ आकाशपंथें ।
गिरीशीं बळें आदळे तोयराशी । बहूसाल त्या तोडिलें पर्वताशीं ॥ ६६ ॥
गिरीशृंग पाठार दारीं कपाटें । शिळा शिखरें वृक्ष पाषाण थाटें ।
दरे दर्कुटे थोर भ्यासूरवाणे । बहूतांपरीचे तरू ते पुराणे ॥ ६७ ॥
कडे कापले तोय नेटें भडाडी । गिरीकंदरीं घोष तेणें धडाडी ।
धडाडां नद्या लोटल्या व्योमपंथें । भुमी तूटल्या घोर घातें विघातें ॥ ६८ ॥
महारण्य तें घोर नीकुंबळेचें । पुढें जावयालागिं सामर्थ्य कैंचें ।
समुद्रातिरीं दाटले वीस गावें । पुढें जावया वाट नाहीं स्वभावें ॥ ६९ ॥
भुमीपंथ नाहीं पुढें जावयातें । उडाले महावीर आकाशपंथें ।
समुद्रासि सांडूनि वेगें निघाले । बळें शीघ्र नीकुंबळेमाजि गेले ॥ ७० ॥
पुढें काळविक्राळ ते वीर गाढे । बळें राक्षसीं घातले सप्त वेढे ।
तयां मध्यभागीं त्विरें इंद्रजीतें । त्वरें आणिलीं होमद्रव्यें बहूतें ॥ ७१ ॥
घटीं मद्य आज्यादिक मांस नेलें । त्विरें राक्षसें शोणितें स्नान केलें ।
पुढें वेदिकेमाजि हूताशनू तो । महावीर प्रेतासनीं बैसला तो ॥ ७२ ॥
सहस्रैक आहूतिंचा नेम केला । ह्मणे म्यां वधावें नरां वानरांला ।
शतें भक्ति संख्याहुती लागवेगें । विरें घातल्या अग्निमुखीं प्रसंगें ॥ ७३ ॥
रथू नीघतां हिंसती दिव्य घोडे । उदेले मुखीं आगळे घोष गाढे ।
तया धूर्त बीभीषणा श्रूत जालें । सुमित्रासुतालागिं तें जाणवीलें ॥ ७४ ॥
ह्मणे होम पूर्णाहुतीलागिं आला । प्रतापें बळें पाहिजे यत्न केला ।
ह्मणे शेष गा धन्य बीभीषणा तूं । सवें धाडिलें राघवें याचि हेतू ॥ ७५ ॥
वधूं शीघ्र राक्षेस हे बाणघातें । तईं वारिलें त्यासि नैर्ऋत्यनाथें ।
ह्मणे वो प्रभू झुंजतां पूरवेना । पुरा होम होतां रिपू आवरेना ॥ ७६ ॥
तईं बोलिला ऋक्ष तो जांबुवंतू । ह्मणे वीर हो आइका एक मातू ।
तुह्मीं होम विध्वंसिजे लागवेगें । रणामाजि मी पाडितों दैत्यदुर्गें ॥ ७७ ॥
मुखें बोलिला वीर मेरूबळाचा । सुमित्रासुतू गौरवी रम्य वाचा ।
कपी ऋषभू आणि त्या वायुसूतें । बळें घातली धांव आकाशपंथें ॥ ७८ ॥
नभीं मुख्य हे वीर दोघे उडाले । कपी रीस उदंड धांवूनि गेले ।
धबाबां शिळा टाकिती व्योमपंथें । बळें होम विध्वंसिला घोर घातें ॥ ७९ ॥

---

१ मर्यादा. २ सर्प. ३ वृक्ष. ४ तूप वगैरे. ५ रक्तानें. ६ अग्नि. ७ दैत्यांचे किल्ले.

रथ मोडिला फोडिलीं सर्व पात्रें । विरें मोडिलें कुंड संकेतमात्रें ।
पुढें वन्हि वीदारिला वेग केला । कितीएक राक्षेस तेथें निमाला[1] ॥ ८० ॥
रिपू रावणी ध्यान भंगून पाहे । तईं भंगिला होम तो दीसताहे ।
त्वरें इंद्रजीतू नभीं दृष्टि घाली । तईं ऋषभानें दिशा शीघ्र केली ॥ ८१ ॥
बळें होम विध्वंसिला मारुतीनें । देहेधर्म संपादिला ऋषभानें ।
पुढें पाहतां होम भंगून गेला । महावीर राक्षेस युद्धा निघाला ॥ ८२ ॥
बळें कोपला काळ कृतांत[2] जैसा । महावीर ऊठावला शीघ्र तैसा ।
कपीवीर दोघे त्वरेशीं निघाले । बळें आपुल्या ते दळामाजि[3] आले ॥ ८३ ॥
सुमित्रासुतें वाहिला चंड मेढा । पुढें चालिला तो बळें वीर गाढा ।
कपी लोण कल्लोळ कोट्यानुकोटी । दळेंशीं बळें चालिला वीर जेठी ॥ ८४ ॥
महावीर ते थोर राक्षेस होते । कपीवीर ते धांवले शीघ्र तेथें ।
समारंगणीं भार भारी मिळाले । कितीएक ते भीडतां भग्न जाले ॥ ८५ ॥
दळें लोटलीं राक्षसांचीं अचाटें । समारंगणीं चाललीं दाट थाटें ।
बळें हाणिती शस्त्रघातें खणाणां । महीमंडळीं घोष ऊठे दणाणा ॥ ८६ ॥
असंभाव्य राक्षेस मारीत आले । कपी वीर ते भंगले भग्न केले ।
तयां देखतां मारुता कोप कैसा । बळें चालिला काळ कृतांत जैसा ॥ ८७ ॥
गदा घेतली शीघ्र नैर्ऋत्यनाथें । उडाला कपी ऋषभू व्योमपंथें ।
सुगंधू कपी लोटला वीर्यवंतू । बळें आगळा चालिला जांबवंतू ॥ ८८ ॥
कपी काळ कल्पांतिंचे मेघ जैसे । रणीं लोटले गर्जती वीर तैसे ।
बळें घालिती पालथें या भुगोळा । तिहीं मांडिला ऑट[4] राक्षेसकूळा ॥ ८९ ॥
रणीं हाणिती एकमेकां फडाडां । तुटों लागले पादपाणी तडाडां ।
नद्या लोटल्या शोणिताच्या[5] भडाडां । समारंगणीं घोष ऊठे धडाडां ॥ ९० ॥
रणीं पाडिले दैत्य कोट्यानुकोटी । बहुतीं विरीं दीधली त्यासि पृष्ठी ।
पुढें देखतां कोपला काळ जैसा । रणीं लोटला रावणी वीर तैसा ॥ ९१ ॥
तया राक्षसें घोर संधान केलें । कपीवाहिनीमाजि[6] कल्पांत आलें ।
मयूरासि पिंजारिलें पुच्छ जैसें । रणीं पाडिले ते कपी वीर तैसे ॥ ९२ ॥
कपी मारुतीसारिखे भग्न केले । कितीएक ते वीर धाकें पळाले ।
पुढें पाहतां वीर सौमित्र कैसा । गजा देखतां ऊठला सिंह जैसा ॥ ९३ ॥
टणत्कारिलें चाप काळाग्निरोषें । थरारी धरा सप्त पाताळ घोषें ।
भुमीं वर्षती मेघ ऊदंड गारा । चळों लागल्या त्या असंभाव्य तारा ॥ ९४ ॥
भिडाया रणीं ऊठले वीर कोपें । बळें सृष्टि जाळील नेणों प्रतापें ।
तईं शीघ्र बीभीषणें वेग केला । गदा घेउनी वीर सन्मुख जाला ॥ ९५ ॥
सुमित्रासुतालागिं सांडूनि मागें । पुढें धांवला वीर तो लागवेगें[7] ।
रणीं देखिला वीर बीभीषणू तो । तया बोलता जाहला रावणी तो ॥ ९६ ॥

१ मृत्यु पावला. २ यम. ३ सैन्यामध्यें. ४ नाश. ५ रक्ताच्या. ६ वानरसैन्यामध्यें. ७ पुढें.

म्हणे रे बहुतां दिसां देखिलासी । वृथा पुष्ट तूं राक्षसांमाजि होशी ।
नरें वानरें दास जालासि त्यांचा । मन भंगिला रे तुवां पूर्वजांचा ॥ ९७ ॥
तुला ठाउका कोप माझा कृतांतू । मला इंद्रजीता पुढें मश्शकू तूं ।
करूं पाहशी थोर सामर्थ्य येथें । समारंगणीं धाडितों मृत्युपंथें ॥ ९८ ॥
म्हणे इंद्रजीतास नैर्ऋत्यनाथू । बळेंवीण तूं बोलशी व्यर्थ मातू ।
मजलागिं तो काळ मारूं शकेना । वरू दीधला तोषला रामराणा ॥ ९९ ॥
बहु शीकवीलें तुम्हां दुर्जनांसी । परी नायका रे तुम्ही पापराशी ।
मला सांगतां हीत अन्हेर केला । समस्तांसि येणें गुणें मृत्यु आला ॥ १०० ॥
मला ताडिलें वैभवाचेनि तोषें । बुडालेत रे सर्व तेणेंचि दोषें ।
समस्तांसि मारील हा रामराजा । समारंगणीं मीच पाहीन वोजा ॥ १०१ ॥
सभामंडपीं फार तां गर्व केला । कळेना तुला मृत्यू संनीधे[१] आला ।
तुला आजि मारील सौमित्रे[२] बाणीं । मुढा राक्षसा जाण हे सत्य वाणी ॥ १०२ ॥
बहुसाल धिक्कार केला तयातें । प्रतापें सिमा सांडिली इंद्रजीतें ।
पदें ताडितां तो महा सर्प जैसा । रणीं कोपला वीर राक्षेस तैसा ॥ १०३ ॥
म्हणे रे उभा फीर सन्मूख राहें । समारंगणीं धीर संधान साहे ।
बळें सोडिले बाण दारूण आले । सुमित्रासुतें सर्व छेदून नेले ॥ १०४ ॥
रणीं घातला रावणात्मज पाठीं । प्रतापें पुढें चालिला वीर जेठी ।
समारंगणीं अंतकातुल्य भासे । महावीर तो देखतां जीव त्रासे ॥ १०५ ॥
महा युद्ध होईल दोघांजणांशीं । पुढें सज्जनीं चित्त द्यावें कथेसी ।
म्हणे दास उदास श्रोतीं न व्हावें । ऋषी बोलिला तेंचि हें सार घ्यावें ॥ १०६ ॥

---

## प्रसंग सातवा.

रणीं रावणी वीर सन्मूख जाले । बळाचे महाकाळ जैसे उदेले ।
करायास निर्वाण ते एकमेकां । विरश्रीबळें सोडिली सर्व शंका ॥ १ ॥
पुढें बोलता जाहला इंद्रजीतू । कृतांतापुढें निर्बळी मानवा तूं ।
मरायासि कां व्यर्थ आलासि येथें । निमिष्यांत मारीन रे बाणघातें ॥ २ ॥
रणामाजि सन्मूख होतां बळेंशीं । समस्तां तुम्हां पाडिलें नागपाशीं ।
पुन्हां मागुती सर्वही बाणजाळीं । निमालेत माझ्या करें युद्धकाळीं ॥ ३ ॥
अरे काय झाली तुम्ही शक्ति तेथें । पुनः शीघ्र आलासि युद्धास येथें ।
तुवां आणिलें काय सामर्थ्य जाया । बळें दावितां निर्बळें व्यर्थ वायां ॥ ४ ॥
वृथा पुष्ट रे हा बहु राजभ्राता । नृपें ताडिला रे सभेमाजि लाथा ।
समस्तांमध्यें रावणें भ्रष्टवीला । तुम्हां मर्कटांमाजि तो श्रेष्ठ केला ॥ ५ ॥
बळें आपुल्या रे तुम्हे पादपाणी । नभामाजि खंडून धाडीन बाणीं ।
समस्तां तुम्हां ठाउकी शक्ति माझी । रहाया पुढें काय रे प्राप्ति तूझी ॥ ६ ॥

---

१ स्वां. २ जवळ. ३ लक्ष्मण. ४ यमासारिखाच. ५ इंद्रजित. ६ क्षणांत. ७ पाय व हात.

बहु बोलिला वाजटू घोर शत्रू । प्रतीउत्तरें बोलिला तो सुमित्रू ।
मि हा कोण तूं नेणशी काय मूढा । वृथां विक्रमू बोलशी वाड पूढां ॥ ७ ॥
मही रुंद विस्तीर्ण छपन्न कोटी । गिरी दिग्गजांची असंभाव्य दाटी ।
तटाकें नद्या मातले भव्य सिंधू । वरी दाटली जीवसृष्टी अगाधू ॥ ८ ॥
असंभाव्य हा भार कोणा धरेना । न घेतां पुढें जीवसृष्टी उरेना ।
सहस्रां फणींचा असंभाव्य व्याळू । तयांमाजि एकें फणीं हा भुगोळू ॥ ९ ॥
स्वभावें शिरीं ठेविजे पुष्प जैसें । तयाचे परी घेतलें विश्व तैसें ।
तयाहून तो कोण आहे विशेषू । मुढा नेणसी कां स्वयें मीच शेषू ॥ १० ॥
भविष्योत्तरें सर्वही सत्य व्हावीं । बळें वैभवें राक्षसांचीं दिसावीं ।
ह्मणूनी तुवां घेतलें येश युद्धीं । नभामाजि जाऊनि कापट्यबुद्धी ॥ ११ ॥
जनीं हीन त्याला बरी वेळ आली । अकस्मात ते कीर्ति होऊनि गेली ।
बळें आगळा राम आत्मा जगाचा । तयाहूनि रे विक्रमू कोण कैचा ॥ १२ ॥
तुह्मां पापरूपांमध्यें भक्त एकू । महावीर बीभीषणू पुण्यश्लोकू ।
तयाशीं सभामंडपीं गर्व केला । दिसेंदीस राक्षेस सर्वै बुडाला ॥ १३ ॥
रिपू बोलतो जाणरे सत्य वाणी । प्रतापें तुझें शीर छेदीन वाणीं ।
तया बोलितां ताविली भीमदृष्टी । उभा काळ जाळावया जीवसृष्टी ॥ १४ ॥
बळें छेदिता जाहला वोष्ठ दंतीं । सिमा फांकली वैभवाची दिगंतीं ।
करारां रणीं खादल्या वज्रदाढा । शतें सोडिलीं बाण वोढूनि मेढा ॥ १५ ॥
बळें धांविलीं बाणजाळें उफाळें । लखाखीत सौदामिनीचेनि मेळे ।
तडाडीत घोषें कडाडीत आले । सुमित्रासुतें सर्व छेदून नेले ॥ १६ ॥
पुन्हा कोपला तो रिपू कोटिगूणें । शतांचीं शतें सोडिले बाण तेणें ।
नभामाजि ते बाण बाणी सणाणा । कितीएक स्फुलिंग भालीं फणाणा ॥ १७ ॥
असंभाव्य ते जाहली बाणवृष्टी । जळों लागली पावकें सर्व सृष्टी ।
अतीचंड ते दंड अद्भूत कैसे । महाकाळ कल्पांतिंचे मेघ जैसे ॥ १८ ॥
कडाडां खडाडां गडाडां घडाडां । तडाडां थडाडां दडाडां धडाडां ।
बहुतांपरींचे बहू घोष झाले । ग्रहां चंद्रसूर्यादिकां कंप आले ॥ १९ ॥
कितीएक सिंधूदकें तप्त जालीं । कितीएक सिंधूदकें तीं उडाली ।
असंभाव्य त्यां दाटल्या बाणकोटी । बळें सोडिती पाडिती वीर जेठी ॥ २० ॥
नभामाजि कल्पांत ते बाणजाळीं । महा युद्ध तें होतसे अंतराळीं ।
रिपू पेटले दोघही घोर मारा । भूमीं वृष्टि गारांपरी सर्व तारा ॥ २१ ॥
वरी पाहतां बाणबाणीं खणाणां । रिपू एकमेकांसि तो भेदवेना ।
रथारूढ तो रावणी धांवताहे । पदीं चालतां शेषअक्षां न साहे ॥ २२ ॥
पुढें चालिला वीर तो जांबुवंतू । शिळा घेतली धांवता काळकेतू ।

---

१ सर्प. २ सर्व पृथ्वी. ३ ज्याचे नामस्मरणानें पुण्य लागतें असा. ४ तिरकामठा. ५ बाणसमूह. ६ ठिणग्या. ७ अग्नीनें.

बळें हाक देऊनियां चक्रचालीं । उफाळें शिळा तो रथामाजि घाली ॥ २३ ॥
रथा मोडिलें पाडिलें भग्न केलें । सुमित्रासुता रावणी साम्य जालें ।
सुगंधें विरें वैभवें लागवेगें । महा अश्व ते चूर्ण केले प्रसंगें ॥ २४ ॥
कपीनाथ बीभीषणें मारुतीनें । विरांलागिं सन्मानिलें थोर मानें ।
भले हो भले थोर आश्चर्य केलें । रिपूच्या रथा विक्रमें भंगवीलें ॥ २५ ॥
नभीं सर्व आनंदली देवसृष्टी । बहूसाल संपादिली पुष्पवृष्टी ।
समस्तां मनीं थोर आनंद जाला । रिसीं वानरीं घोष अद्भुत केला ॥ २६ ॥
ह्मणे रावणी हा रिपू आवरेना । बहूसाल सामर्थ्य याचें सरेना ।
शरां मारितां सर्व तोडीत आहे । पुढें अग्निअस्त्रासि तो सोडिताहे ॥ २७ ॥
तयें सोडितां अस्त्र तैसें निघालें । धडाडीत ते तेजपुंजाळ आलें ।
नभीं धूम्र दाटे असंभाव्य ज्वाळा । करूं पाहती भस्म नक्षत्रमाळा ॥ २८ ॥
असंभाव्य ते चालिली वन्हिधाडी । मही सर्व आकाश तेणें कडाडी ।
बहूवर्ण ज्वाला शिखी धांवताती । कडाडीत नेटें कपीमाजि येती ॥ २९ ॥
कपी ऋक्ष तेणें भयातूर जाले । कितीएक ते वीर पोटीं गळाले ।
बहू सोडिला धीर नैर्ऋत्यनाथें । ह्मणे गा विरां सर्व गेलां अनर्थें ॥ ३ ॥
सुमित्रासुतें देखिलें अग्निअस्त्रा । पुढें सोडिता जाहला मेघ अस्त्रा ।
तया सोडितां मेघ तैसे उदेले । गिरीचे परी अंबरीं भार आले ॥ ३१ ॥
नभीं दिसती ते हुडे कोट झाडें । महामेघ गर्जोनि गंभीर वाडें ।
नभा व्यापिलें घोर अंधार जाला । दिसेना रणामाजि दोन्ही दळांला ॥ ३२ ॥
नभीं चालिले ते बहू कीट काळे । झकाकीत सौदामिनीचेनि मेळें ।
बळें मेघधारा असंभाव्य गारा । सुटे कंप मूसाट घोषें थरारां ॥ ३३ ॥
प्रसंगीं तये पाणजंजाळ जालें । रणामंडळीं तोय अद्भुत आलें ।
कितीएक झाडें भूमीं चूर्ण होती । पुरें पट्टणें सर्व वाहूनि जाती ॥ ३४ ॥
सुमित्रासुतें थोर अद्भुत केलें । जनांला गमे आजि कल्पांत आलें ।
बुडों लागले भार त्या राक्षसांचे । बहूसाल त्या धीर गेले विरांचे ॥ ३५ ॥
रणीं सोडिलें अस्त्र नेटें विझालें । बहू राक्षसां थोर कल्पांत आलें ।
त्वरें रावणी वायू अस्त्रास सोडी । असंभाव्य तो वात नेटें झडाडी ॥ ३६ ॥
कडाडीत पाडे असंभाव्य झाडें । बळें पाडिलीं वाड झुंबाड झाडें ।
फुटों लागलीं शैलशृंगें खडाडां । कडे चालिले पर्वतांचे भडाडां ॥ ३७ ॥
भ्रमों लागलीं खेचरें प्रेत जालीं । गृहें गोपुरें एक वेळे उडालीं ।
बहूसाल तो वातआवर्त जाला । तया देखतां मेघ नेटें उडाला ॥ ३८ ॥
सुमित्रासुतें देखिला चंड वारा । गिरीअस्त्र सोडूनि केला निवारा ।
असंभाव्य तीं चाललीं शैलशृंगें । बहू वात निर्वात केला प्रसंगें ॥ ३९ ॥
गिरी चालिले ते असंभाव्य कैसे । नभीं धांवती मातले मेघ जैसे ।

---

१ किल्ल्यांचे बुरूज. २ सैन्याला. ३ विजेच्या. ४ उदक. ५ वाऱ्याची वावटळ. ६ पर्वतास्त्र.

महावीर तो वज्रअस्त्रासि सोडी । रणीं रावणी शैल तात्काळ तोडी ॥ ४० ॥
रिपू राक्षसें शैल ते पिष्ट केले । बळें आपुल्या दिग्गजां आड नेले ।
पुढें जाहली ते बहू वज्रदाटी । तया देखता जाहला वीर जेठी ॥ ४१ ॥
पुढें वीर सौमित्र ब्रह्मास्त्र सोडी । तयापासुनी वन्हि नेटें भडाडी ।
गमे कोटि विद्युल्लता एक वेळा । महा लोळ कल्लोळ भासे भुगोळा ॥ ४२ ॥
रणामंडळीं पावकें त्या अचाटें । जळों लागलीं सर्वेहि वज्रथाटें ।
पुढें चालिल्या त्या असंभाव्य ज्वाळा । रणामंडळीं जाहली एक वेळा ॥ ४३ ॥
तया देखतां रावणी तेंचि सोडी । रणामंडळीं एकमेकांसि तोडी ।
रणामाजि तात्काळ सन्मूख आले । महाज्वाळ ते एक होऊनि गेले ॥ ४४ ॥
पुढें घोर रुद्रास्त्र त्या रावणानें । बळें सोडिलें शीघ्र माहाविरानें ।
रणामाजि तें चालिले एकवेळें । भुमीं पाय आकाशपंथीं शिसाळें ॥ ४५ ॥
बळें धांविले ते रणामाजि कैसे । गिळाया भुगोळा महा विघ्न जैसें ।
तयां देखतां कंप माहाविरांसी । भयें मूर्छना घातली वानरांसी ॥ ४६ ॥
तया देखतां तो फणी सिद्ध जाला । पुढें सोडिलें शीघ्र माहेश्वराला ।
उठे मातला काळ कल्पांतकाळीं । दिशा दाटल्या सर्व आकाशज्वाळीं ॥ ४७ ॥
रवी कोटि विद्युल्लता एक वेळां । रणीं धांवती कंप जाला भुगोळा ।
महातेज हेलावलें तेचि काळीं । असंभाव्य तें चालिलें ब्रह्मगोळीं ॥ ४८ ॥
तया देखतां अस्त्र मागें पळालें । बहू कूळ तें खेचराचें जळालें ।
पुढें देखतां रावणी भ्रांत जाला । भयें भूलला वारवेना तयाला ॥ ४९ ॥
मनीं भावितो कोण राखेल गेलों । कळेना मला व्यर्थ येथें जळालों ।
तईं शीघ्र रामानुजें काय केलें । प्रतिज्ञापणाला मनीं आठवीलें ॥ ५० ॥
ह्मणे हो मनीं शीर छेदूनि न्यावें । ह्मणोनि बळें अस्त्र मागें वळावें ।
रणामंडळामाजि वीरें सुमित्रें । बळें वारिलें अस्त्र तें बीजमंत्रें ॥ ५१ ॥
ह्मणे मेघनादू मला विघ्न आलें । परी थोर आश्चर्य कां वांचवीलें ।
भला वीर सौमित्र हा वीर्यवंतू । मनासारिखें युद्ध मोठें करीतू ॥ ५२ ॥
असेना पुढें वीर होणार नाहीं । बहू देखिले पाहिले सुंनतांहि ।
महावीर हे सूर्यवंशी बळाचे । रिपूलागिं रक्षावया कोण कैंचे ॥ ५३ ॥
महावीर दोघे रणीं तेचि काळें । पुन्हां सोडिते जाहले बाणजाळें ।
रणामाजि ते भेदिती एकमेकां । नभीं सोडिल्या बाणभोळीं अनेका ॥ ५४ ॥
रिपूंचीं रिपू तोडिती बाणजाळें । पुन्हां मागुती सोडिती ते उफाळे ।
विरें वीर तो भेदितांही ढळेना । विरश्रीबळें काय होतें कळेना ॥ ५५ ॥
पुढें काय केलें तया मेघनादें । रणीं हाक घेऊनि धांऊनि क्रोधें ।
महातेज पुंजाळ त्या शीघ्रकाळीं । बळें भेदिल्या तीन भाळी कपाळीं ॥ ५६ ॥
महावीर तो रावणी काळरूपी । पुराणा बहु काळ कापट्यरूपी ।

१ अग्नीनें. २ मस्तकें. ३ लक्ष्मण. ४ इंद्रजीतू. ५ बाणसमूह.

सुमित्रासुतू तो दिसे बाळलीला । बळें भेदिला रक्त वाहे कपाळा ॥ ५७ ॥
तया देखतां कोप नैर्ऋत्यनाथा । पुढें चालिला पावला याति वेथा ।
रणीं हाक देऊनि बीभीषणानें । गदा घेतली चालिला थोर त्राणें ॥ ५८ ॥
तया देखतां त्या दशग्रीवसूतें । रणीं विंधिला पाडिला बाणघातें ।
पुढें देखिला कोपला वीर गाढा । सुमित्रासुतें वाहिला चंड मेढा[3] ॥ ५९ ॥
रणीं रावणी लक्षिला तेचि काळीं । बळें भेदिल्या बाणभाळी कपाळीं ।
नवां बाणघातें रिपू स्वस्थ केला । तया मेघनादा बहू खेद जाला ॥ ६० ॥
कपाळीं बळें भेदिले बाण वीरें । प्रवाहो बळें चालिला तो रुधीरें ।
महामस्तकामाजि सर्वै बुडाले । कपाळावरी पिच्छ बाशिंग जालें ॥ ६१ ॥
म्हणे वीर बीभीषणू वीर छात्रा । बरें ऊसणें घेतलें गा सुमित्रा ।
रिपू रावणी तापला वीर कैसा । शुळें टोंचितां ऊठला सर्प जैसा ॥ ६२ ॥
महावीर निर्वाणिंचे बाण सोडी । लघू लाघवें शेर्ष तात्काळ तोडी ।
असंभाव्य कोपानळें तीव्र ज्वाळा । मुखें सांडितां काळ कांपे चळाळा ॥ ६३ ॥
सिमा सांडिली थोर कल्पांत काळीं । महावीर ते खीळिले बाणजाळीं ।
बहू खोंचले देह दोघांजणांचे । झरे लागले वाहती शोणितांचे ॥ ६४ ॥
विरश्रीबळें दुःख नाहीं प्रतापें । रणीं भेदिती एकमेकांस कोपें ।
बहू माजले युद्ध तें ओसरेना । बळें भीडती एकमेकां सरेना ॥ ६५ ॥
पुढें काय केलें सुमित्रासुतानें । गुणीं सज्जिलें त्या रवीचक्रबाणें ।
मुखीं धांवती त्या शिखा पावकांच्या । बहू चंचला कोटि विद्युल्लतेच्या ॥ ६६ ॥
कडाडीत कोपानळें बाणभाळीं । बळें सोडितां शीघ्र तैशी निघाली ।
भयातूर दोन्ही दळीं कंप जाले । ऋषी देव गंधर्व धाकें पळाले ॥ ६७ ॥
ग्रहादीक आकाशपंथीं जळाले । बहु खेचरें भार भूमीं गळाले ।
ध्वनी ऊठला घोर घोषें तडाखा । बळी कांपती ईतरां कोण लेखा ॥ ६८ ॥
सुमित्रासुतें शीघ्र संधान केलें । रणीं रावणीशीर छेदून नेलें ।
समस्तां सुरांलागिं आनंदवीलें । सुरेशामनींचें महा शल्य गेलें ॥ ६९ ॥
रणामाजि तो इंद्रजीतू निमाला । समस्तां सुरांलागिं आनंद जाला ।
महाकंटकू थोर संहार केला । त्रिलोकीं बहू कीर्तिचा घोष गेला ॥ ७० ॥
पुढें शेष सुगंध बीभीषणानें । दळें सर्वहि सिद्ध केलीं विरानें ।
कपीशीं सुवेळाचळा राम जेथें । महावीर ते चालिले सर्व तेथें ॥ ७१ ॥
प्रभू राम तो बंधुची वाट पाहे । उतावीळ पोटीं वियोगा न साहे ।
बहुसाल चिंता करी बांधवाची । म्हणे कोण वेळा सुमित्रासुताची ॥ ७२ ॥
तयां बोलतां भार तैसे उदेले । दळेंशीं बळें येश घेऊनि आले ।
समर्थां प्रभूला नमस्कार केले । रघूनायका भेटले स्वस्थ जाले ॥ ७३ ॥
सुमित्रासुताचा देहे स्वस्थ जाला । पुढें राघवें वैद्य पाचारवीला ।

---

१ रावणाचा पुत्र. २ लक्ष्मणानें. ३ तिरकमठा. ४ रक्ताचे. ५ अखेरचे. ६ अग्नीच्या.

मुखें बोलिला राम तो वीरबाहो । करावा अती आदरें दिव्य देहो ॥ ७४ ॥
रणीं इंद्रजीतासि प्राणांत जालें । कपी ऋषभानें सर्वें शीर नेलें ।
निचेष्टीत काया रणीं स्तब्ध ठेली । प्रियेलागिं सांगावया भूज गेली ॥ ७५ ॥
त्रिकूटाचळीं भूवनें रावणाचीं । तया सारिखीं रम्य नीकुंबळेचीं ।
तया भूवनामाजि सूलोचना ती । सुखें वैभवाची बरी वेळ जाती ॥ ७६ ॥
अकस्मात तेथें ध्वनी घोष जाला । परीचारिका[1] सांगती भूज आला ।
भुमी रम्य राजांगणें पांचबंदी । पडे भूज तेथें स्रवे रक्तबिंदी ॥ ७७ ॥
मनामाजि ते शंकली दिव्य बाळा । रणामाजि भर्तार त्या कोण वेळा ।
असें चित्त दुश्चीत बाहेर आली । फणीचेपरी[2] भूज ते ओळखीली ॥ ७८ ॥
खुणें दाविलें लीहिलें पत्र हातें । ह्मणे चालिलों मी पुढें मुक्तिपंथें ।
तुझ्याकारणें धाडिली मूळ बाहे । प्रिये चाल वेगीं तुझी वाट पाहें ॥ ७९ ॥
तया वाचितां थोर आकांत जाला । दुखामाजि तो सौख्यसिंधू बुडाला ।
मनीं वैभवाची तिनें सांडि केली । त्रिकूटाचळा जावया सिद्ध जाली ॥ ८० ॥
बहू पूतळ्या पिंजरे पक्षियाती । तये भोंवतीं भोंवतीं रूददाती[3] ।
अहो माय आह्मांसि सांडून जाशी । तुझ्या वेगळीं सर्व आह्मी विदेशी ॥ ८१ ॥
तयालागिं संबोखिलें[4] रम्य वाणीं । तुह्मां रक्षिता देव तो शूलपाणी[5] ।
मिळाले बहू लोक ते दाटि जाली । शिबीकेमधें[6] भूज वेगें निघाली ॥ ८२ ॥
विसौरे बहूसाल नानापरींचे । अलंकार भांगार ते सुंदरीचे ।
धनें संपदा पाहतां मीति नाहीं । तिनें वाटिलें लूटिलें सर्व कांहीं ॥ ८३ ॥
पुढें अश्विनीलागिं आरूढ जाली । बहू वेग लंकापुरीमाजि गेली ।
नमस्कार केला तया रावणाला । पुढें टाकिलें पत्र आकांत जाला ॥ ८४ ॥
रणीं झुंजतां इंद्रजीतू निमाला । बहू नायकांचा ध्वनीघोष झाला ।
दुखें व्याप्त लंकापती आंग घाली । नसे मानसीं शुद्धि सर्वै उडाली ॥ ८५ ॥
प्रधानीं बहूतांपरी सांवरीला । पुढें रावणा कोप तात्काळ आला ।
ह्मणे आजि संहारितों वैरियांला । दळेंशीं रणीं जावया सिद्ध जाला ॥ ८६ ॥
ह्मणे सासुऱ्यालागिं सूलोचना ते । घडीनें घडी आमुची वेळ जाते ।
समर्था मला शीर आणून यावें । पुढें काय मानेल तैसें करावें ॥ ८७ ॥
शिरें आणितों आजि आठां जणांचीं । मुखें तीव्र क्रोधानळें रावणाची ।
रिपू दोघे बीभीषणा अंगदाचें । रिसा सुग्रिवा मारुता ऋषभाचें ॥ ८८ ॥
बहूसाल तो कोप रायासि आला । पुढें मंदिरामाजि नेलें सुनेला ।
तियेलागिं मंदोदरी नीति सांगे । रघूनायका भेट वो लागवेगें ॥ ८९ ॥
अहो देखिलें स्वप्न म्यां घोरवाणें । निमाले रणीं सर्व राक्षेस प्राणें ।
नव्हे स्वप्न हें वाटलें सत्य आहे । दिलें राज्य बीभीषणालागिं पाहे ॥ ९० ॥
ग्रह सूटले तूटले पाशबेडी । पुढें सोडिले देव तेतीस कोडी ।

---

१ दासी. २ सर्पाप्रमाणें. ३ रडतात. ४ सांगितलें. ५ शंकर. ६ पालखींत. ७ आश्चर्यकारक. ८ घोडीवर.

त्रिलोकीं उभी राहिली रामगूढी । पुढें साच होईल ऐशीच प्रौढी ॥ ९१ ॥
ह्मणोनि तुवां शीघ्र आतां उठावें । दिनाचे परी रामचंद्रा वदावें ।
करूणास्वरें राघवा आळवावें । बहुतांपरी शीर मागूनि घ्यावें ॥ ९२ ॥
त्वरें ऐकतां ऊठली शब्दनेटें । पुढें वानिती भाटवेताळथाटें ।
कपीवाहिनीनें[1] महाद्भुत केलें । त्वरें बोलती जानकी पाठवीलें ॥ ९३ ॥
ह्मणे राम हें सर्वथाही घडेना । रिपू मारिल्याविण दृष्टी पडेना ।
असंभाव्य सेनासभा दाटली ते । पुढें शीघ्र सूलोचना भेटली ते ॥ ९४ ॥
पुढें देखतां राम सूखें निवाली । कृपा भाकितां ते नमस्कार घाली ।
कृपासागराची बहु स्तूति केली । सुशब्दें रघूनायकें तोषवीली ॥ ९५ ॥
प्रसंगीं तये थोर आश्चर्य जालें । निचेष्टीत शीरें बरें हास्य केलें ।
कृपें पाहिलें रामचंद्रें दयाळें । पती ऊठवीतों तुह्मा शीघ्र काळें ॥ ९६ ॥
खुणा दाविती वो वळावें दयाळा । सभे घालितां एकमेकांसि डोळा ।
कपी वीर ते सांगती कानगोष्टी । पुढें ऊठतां सर्व आटील सृष्टी ॥ ९७ ॥
वदे ऋक्षस्वामी[3] बरेंसें विचारा । रिपू ऊठवावा कदा ऊपकारा ।
वदे मारुती राघवालागिं रागें । रघूनायका सांडिली गोष्टि मागें ॥ ९८ ॥
उदासीन देखोनि सूलोचना ते । नमस्कार केला त्वरें चालिली ते ।
प्रभू सव्य घालूनियां शीघ्र गेली । मनोभावना सर्वही सिद्ध केली ॥ ९९ ॥
समुद्रातिरीं भीमकुंडा प्रचंडा । बळें चेतल्या वन्हिशीखा[4] उदंडा ।
दशग्रीव मंदोदरी राजभारें । सर्वे चालिलीं गांवलोकें अपारें ॥ १०० ॥
ऋषीदेवगंधर्वमांदी मिळाली । समस्तीं तियेची बहु स्तूति केली ।
करी ती ऋषीनायका अक्षवाणें । उडी घातली अग्निमूखीं स्फुराणें ॥ १०१ ॥
मनामाजि होता मनांतील हेतू । पुढें देखिला इंद्रजीतू समर्थू ।
सती आदरें मुक्तिपंथास गेली । कथा राहिली पाहिजे चालवीली ॥ १०२ ॥
फणीगर्भरत्नेंसि हो दग्ध केलें । ह्मणे दास हें राक्षसी कृत्य जालें ।
पुढें सज्जनीं चित्त द्यावें कथेला । महाशक्ति भेदील रामानुजाला ॥ १०३ ॥

---

## प्रसंग ८ वा.

उमित्रार्थतें[6] पाडिला इंद्रजीतू । रणीं ग्रासिला काळ जैसा कृतांतू ।
दळें फूटलीं वीर मागें पळाले । कितीएक घायाळ लंकेंत गेले ॥ १ ॥
सभामंडपीं वीर घालोनि मेटें । भुमीं पीटिती थोर दुःखें ललाटें ।
मुखें बोलती इंद्रजीतू निमाला । पुरीमाजि तो थोर आकांत जाला ॥ २ ॥
त्रिकूटाचळीं मृत्यु आला बहुतां । समस्तांसि संहार हे मूळ सीता ।
सुपारश्व संबोखितां ते प्रसंगीं । पिशाचापरी ऊठला लागवेगीं ॥ ३ ॥

---

१ वानरसेनेनें. २ नाश करील ३ जांबुवान ( अस्वलांचा राजा ). ४ अग्नीच्या ज्वाला. ५ सुचे
चनेला. ६ लक्ष्मणानें. ८ मस्तकें.

तया रावणा मूर्छना सांवरेना । भुमीं आंग घाली कदा आवरेना ।
स्त्रियापुत्रकन्यादिकें तोंड घेती । प्रसंगीं तये थोर जाली रुदंती ॥ ४ ॥
अशोकावनामाजि तो शीघ्र गेला । सितेलागि मारावया सिद्ध जाला ।
पुढें देखतां ते भयातूर जाली । सुपारश्व धांवोनियां आड घाली ॥ ५ ॥
बहुतांपरी राव तो बोधवीला । पुढें रावणू क्रोध सांडून ठेला ।
महावीर दोघे पुरीमाजि आले । रणीं जावयालागि ते सिद्ध जाले ॥ ६ ॥
पुढें ऊठवीलीं दळें सिद्ध होती । रथी सारथी हस्ति घोडे पदाती ।
महाविक्रमें चालिलें राजभारें । दणाणीतसे मेदिनी घोरभारें ॥ ७ ॥
असंभाव्य तीं सोडिलीं बाणजाळें । कपी टाकिती चंड शीळा उफाळें ।
महावीर संघट्टले एकमेकां । बळें भेदिती दूरि टाकूनि शंका ॥ ८ ॥
महाभार आरंभिला वानरांतें । पुढें बाण कार्मुक तें सिद्ध होतें ।
उभा राहिला विक्रमें वीर कैसा । बळें सर्व संहारितो काळ जैसा ॥ ९ ॥
बहुसाल तीं सोडिलीं बाणजाळें । तुटों लागलीं राक्षसांचीं शिसाळें ।
असंभाव्य तीं पोकळीमाजि जाती । पुरे धांव तेथूनियां खालिं येती ॥ १० ॥
बहुसाल संहार केला दळाचा । करी कोण लेखा तया घायळांचा ।
रणीं राघवें लाविलें घायवारे । पळाले पुरीमाजि ते थोर मारें ॥ ११ ॥
भयें बोलती सांगती रावणाला । रणामाजि तो सर्व संहार जाला ।
असंभाव्य तो कोपला पापराशी । पुढें धाडिलें शीघ्र तीघाजणांशी ॥ १२ ॥
विरूपाक्ष विद्युन्मतू आणि मन्तू । रथारूढ होऊनियां लंकनाथू ।
महाशस्त्रसामुग्रिया तो समर्थू । बळें चालिला रुंधिला राजपंथू ॥ १३ ॥
असंभाव्य सेना पुढें आणि मागें । रणामंडळा चालिला लागवेगें ।
बहुसाल वाद्यें पुढें एक वेळां । समारंगणीं नाद केला भुगोळा ॥ १४ ॥
रथां घोडियां कुंजरां दाटि जाली । उफाळे बळें चंड सेना निघाली ।
बहु शस्त्रपाणी बहू छत्रछाया । बळें वोळले मेघ जैसे पडाया ॥ १५ ॥
उभा राहिला रावणू राजभारें । तिघे वीर ते भीडती घोर मारें ।
पुढें देखितां रावणू सांवरेना । उभा राहतां धीर पोटीं धरेना ॥ १६ ॥
बळें वाइलीं रावणें चंड चापें । बहूसाल ते बाण सोडी प्रतापें ।
असंभाव्य तीं सोडिलीं बाणजाळें । तुटों लागलीं पादपांचीं शिसाळें ॥ १७ ॥
कपी सर्वही छेदिले मुख्य शत्रू । रणामंडळीं गर्जला तो अमित्रू ।
कपी खोंचले नेट पोटीं धरेना । पराधिक्य तें सुग्रिवा साहवेना ॥ १८ ॥
बळें हाक देऊन तैसा निघाला । तया पाठिशीं तो त्रिरें वीर आला ।
कितीएक ते वाड जुंबाड हातीं । कितीएक ते धांवती शृंग घेती ॥ १९ ॥
कितीएक घेऊनियां चंड शीळा । कितीएक फीरावितीं भिंडिमाळा ।
कितीएक ते झाडिती शस्त्रधारा । कितीएक घेऊनि आले कुठारा ॥ २० ॥

१ पृथ्वी. २ धनुष्य ३ मस्तकें ४ जलदीनें. ५ पाय व हात. ६ गोफणी. ७ कुऱ्हाडी.

कितीएक ते खड्ग घेऊनि आले । कितीएक ते शूळपाणी मिळाले ।
कितीएक लोहांगळा ते प्रसंगीं । कितीकीं गदा घेतल्या लागवेगीं ॥ २१ ॥
कितीएक घेऊनि आले दशघ्नी । कितीएक घेऊनि आले शतघ्नी ।
किती तोमरें पट्टिशेंशीं निघाले । कितीएक ते शूळ घेऊनि आले ॥ २२ ॥
किती फर्शपाणी किती चक्रपाणी । कितीएक ते वीर खट्वांगपाणी ।
कितीएक आसीलता झाडिताती । कत्यारा सुऱ्या वीर घेऊनि येती ॥ २३ ॥
बहुतांपरींचीं बहुसाल शस्त्रें । हाक देती विशाळें वगत्रें ।
कपीनायका भोंवती दाट थाटें । रणीं धांवती वीर ते कड्कडाटें ॥ २४ ॥
पुढें रावणें देखिला थोर थावा । असंभाव्य तो सुग्रिवाचा उठावा ।
कपीचक्र तें घोर अद्भूत आलें । मनामाजि तें थोर आश्चर्य केलें ॥ २५ ॥
कपीचा रणीं लोळ कल्लोळ आला । गजारूढ महामत् सिद्ध जाला ।
तया रावणा देखतां युद्ध होतें । बहु मांडला आट त्या राक्षसांतें ॥ २६ ॥
गजारूढ माहामत् शैल जैसा । शिळा टाकितो वीर सुग्रीव तैसा ।
गजामस्तकीं ते शिळा चंड आली । गराडून तो कुंजरू आंग घाली ॥ २७ ॥
गजा पाडितां छेदिला उग्रदंतीं । बळें चालिला शूळ घेऊनि हस्तीं ।
ह्मणे साहर साह तूं सुग्रिवाला । सुळा टाकितां वीर वर्ता उडाला ॥ २८ ॥
पुढें शूळ मोडूनियां लागवेगें । गदाघात हाणे तया पृष्ठिभागें ।
महा वीर तो घोर मारें पळाला । रणीं राक्षसां थोर संहार जाला ॥ २९ ॥
विरें वीर राक्षेन ते भग्न केले । कपी धीट ते नीट मारीत आले ।
तयां देखतां वीरूपाक्ष् निघाला । बहुसाल धिक्कारिलें सुग्रिवाला ॥ ३० ॥
पुढें सुग्रिवें वाड जुंबाड हातें । रिपूचे रथीं टाकिलें थोर घातें ।
वरी पाहतां झाड सन्मूख आलें । विरें बाण टाकूनि छेदून नेलें ॥ ३१ ॥
शिळा टाकिली चंड त्या सुग्रिवानें । बळें फोडिली बाणघातें विरानें ।
पुन्हा राक्षसें घोर संधान केलें । कपी सुग्रिवें तुच्छ मानूनि नेलें ॥ ३२ ॥
पुढें सुग्रिवें शृंग त्या आचळांचें । करीं घेतलें अग्र मंद्राचळाचें ।
बळें टाकिली ते शिळा घोर घातें । विरूपाक्ष तो चालिला मृत्युपंथें ॥ ३३ ॥
रणीं राक्षसां पातली मृत्युवेळा । पुढें देखिलें रावणें त्यांसि डोळां ।
अहोर कसें काय जालें कराळा । भयें भूलला पातली कंपवेळा ॥ ३४ ॥
पुढें रावणें देखिलें सव्यभागीं । महावीर विशुन्मत् ते प्रसंगीं ।
तया बोलला पाहसी काय वीरा । महावीर तो पेटला घोर मारा ॥ ३५ ॥
रथारूढ होऊनियां सुग्रिवाला । पुढें शीघ्र पाचारिलें त्या कपीला ।
शरांचीं शतें टाकिलीं राक्षसानें । विरश्रीबळें साहिलें सुग्रिवानें ॥ ३६ ॥
पुढें सुग्रिवें घेतली चंड शीळा । बळें टाकिली त्यासि लक्षूनि डोळां ।
शिळा फोडिली राक्षसें बाणघातें । बहु कोप आला तया सुग्रिवातें ॥ ३७ ॥

---

१ लोखंडी आडसर. २ पर्वताचें. ३ उजव्या बाजूला. ४ बोलाविलें.

शिळा घेतली दूसरी सुग्रिवानें । पुन्हां टाकिली चंड माहाविरानें ।
तयें राक्षसें फोडिलें त्या शिळेला । महावीर तोर धीर देतो दळाला ॥ ३८ ॥
कपीनाथ सुग्रीव देखोनि ऊणें । बहु कोपला वीर तो कोटिगुणें ।
बळें लांगुलें घाव हाणे महीला । गदें झेलिलें तोडिलें त्या रथाला ॥ ३९ ॥
निमाले गदा लागतां दिव्य घोडे । रथ वीघडे चूर्ण होऊनि मोडे ।
पडे सारथी दैन्यवाणा उताणा । विरां राक्षसा मूर्छना सावरेना ॥ ४० ॥
रणीं ऊठला वीर तो सिद्ध जाला । गदा घेतली हांकिलें सुग्रिवाला ।
बळें हाणतां झेलिली त्या कपीनें । पुन्हां हाणिती एकमेकां गदेनें ॥ ४१ ॥
बळाचे महावीर दोघे प्रतापी । गदा हाणिती भीडती काळरूपी ।
गदाघात संघट्टणें वन्हिवृष्टी । जळों लागली पावकें सर्व सृष्टी ॥ ४२ ॥
बळें हाणतां भंगलें सर्व कांहीं । गदा टाकिल्या घेतले शूळ तेही ।
रणीं भीडतां शूळ ते चूर्ण झाले । महावीर ते मल्लयुद्धासि आले ॥ ४३ ॥
दणाणा रणामाजि ते मुष्टिघातें । बळें हाणिती एकमेकां निघातें ।
कपी सुग्रिवें दीधलि वज्रमुष्टी । महावीर तो पाडिला प्रेतसृष्टी ॥ ४४ ॥
तया देखतां मंतु धांवोनि आला । रणामंडळीं हांकिलें अंगदाला ।
बहु त्रासिता जाहला घोर वाणीं । तय अंगदा भेदिलें पंचबाणीं ॥ ४५ ॥
तया मूर्छना देखितां जांबुवंतें । महावीर तो तोडिला वृक्षघातें ।
विरें राक्षसें वृक्ष छेदूनि नेला । रणीं भेदिला ऋक्ष तो भग्न केला ॥ ४६ ॥
रणीं भेदिलें देखिलें त्या रिसालों । गवाक्षा विरा थोर आवेश आला ।
पुढें लक्षिता जाहला राक्षसातें । बळें ताडिले थोर पाषाणघातें ॥ ४७ ॥
विरें शीघ्र पाषाण तो भग्न केला । शरें नीकुरें भेदिलें त्या कपीला ।
गवाक्षू कपी तो भुमीं अंग घाली । तई अंगदें मूर्छना सावरीली ॥ ४८ ॥
करीं सार आसीलतेशीं निघाला । बळें हाक देऊनि सन्मूख आला ।
कठोरें करें ताडिलें राक्षसातें । महामंतु तो चालिला मृत्युपंथें ॥ ४९ ॥
रणामंडळीं शांति जाली रिपूंची । दळें गर्जतीं जाहलीं वानरांचीं ।
उणें देखतां रावणा कोप आला । प्रतापें रणामाजि युद्धा निघाला ॥ ५० ॥
रथू लोटिला रावणें शीघ्र काळें । बहुसाल तीं सोडिलीं बाणजाळें ।
पुढें देखतां राम तत्काळ छेदी । पुन्हां रावणू घोर संधान साधी ॥ ५१ ॥
नभीं सोडिले बाण कोट्यानुकोटी । असंभाव्य जाली बहू थोर दाटी ।
महामेघ तो मोकली मेघधारा । रघूनायकें छेदिले ते सरारां ॥ ५२ ॥
पुढें रावण थोर कोपें कडाडी । करी गर्जना मेघ जैसा गडाडी ।
बहु कोपला तो असूरास्त्र सोडी । तई चालिल्या त्या नभीं चक्रकोडी ॥ ५३ ॥
असंभाव्य तीं चाललीं घोर चक्रें । महा तेज पुंजाळ त्यांचीं वैगत्रें ।
कपीवाहिनीमाजि ते एकवेळे । तुटों लागलीं वानरांचीं शिसाळे ॥ ५४ ॥

---

१ सैन्याला. २ शेपटानें ३ अग्निवर्षाव. ४ जांबवान. ५ अस्वलाला. ६ पुढें ७ तोंडें. ८ मस्तकें.

पुढें देवगंधर्व अस्त्रांस सोडी । तिहीं तोडिल्या सर्वही चक्रकोडी ।
रणीं रावणू रुद्रअस्त्रास घाली । शुळामूसळांची नभीं दाटि जाली ॥ ५५ ॥
धुधाटें कपीच्या दळामाजि यावें । तईं योजिलें तें महाअस्त्र देवें ।
महाथोर माहेश्वरी मूळमंत्रें । तयें सोडिलें सुटलीं वज्रशस्त्रें ॥ ५६ ॥
लोहोमूसळें ते गदा शूळ होते । बळें तोडिले पाडिले वज्रघातें ।
दशग्रीव तो क्षोभला काळ जैसा । तयें भेदिलें पंचबाणीं सुरेशा ॥ ५७ ॥
रिपूबाण सर्वांग भेदून गेले । दळीं रावणाच्या महा घोष जाले ।
वंपू[1] भेदिली रावणें पंच बाणीं । चळेना रणीं राम तो वज्रठाणी ॥ ५८ ॥
रणीं ऊसणें घेतलें राघवानें । दशग्रीव तो भेदिला सप्त बाणें ।
महा दुःख जालें तया रावणाला । सुमित्रासुता थोर आवेश आला ॥ ५९ ॥
तया अग्रजालागीं घालूनि मागें । महावीर तो चालिला लागवेगें ।
सुमित्रासुतें बाणघातें निघातें । रिपूसारथी धाडिला मृत्युपंथें ॥ ६० ॥
पुढें मागुतें थोर संधान केलें । रिपूच्या धनूलागीं छेदून नेलें ।
तया वीर बीभीषणा कोप गाढा । रणीं चालिला चंड वाहून मेढा ॥ ६१ ॥
तयें पाडिलें अष्ट तूरंगमांतें[2] । ध्वजस्तंभ तो छेदिला बाणघातें ।
रथू सारथी सर्वही भग्न केला । दशग्रीव दूजे रथीं स्वार जाला ॥ ६२ ॥
महाशक्ति ब्राह्मी तया रावणानें । अनूजावरी[3] टाकिली तें फुराणें ।
कडाडीत धांवे महावीज जैसी । करी शेष मागें रिपूबांधवांसी ॥ ६३ ॥
सुमित्रासुतें घोर संधान केलें । महाशक्तिनें शीघ्र छेदून नेलं ।
शरें ताडितां पावका वृष्टी झाली । कितीएक राक्षससेना निमाली ॥ ६४ ॥
रणीं रावणू तो कडाडीत कोपें । सिमा सांडली घोर रूपें प्रतापें ।
धुधुःकार सांडीत घर्डीत दाढा । अनर्थासि ऊठावला वीर गाढा ॥ ६५ ॥
महाशक्ति काढूनि मायासुराची । बहू काळ सन्नीध तैशी विरांची ।
तयेलागिं त्या रावणें सिद्ध केलें । जयेमाजि ब्रह्मांड बिंबोन गेलें ॥ ६६ ॥
कडाडीत घोषें धडाडीत ज्वाळा । तडाडी नभामाजि नक्षत्रमाळा ।
महावीर ते थोर धाकें गळाले । विमानाहुनी देव नेटें पळाले ॥ ६७ ॥
सुमित्रासुता[4] लक्षिलें रावणानें । त्वरें टाकिली शक्ति माहावीरानें ।
बळें आदळे ते अकस्मात अंगीं । रणीं वीर सौमित्र तो प्राण त्यागी ॥ ६८ ॥
दळीं वानरांचे हाहाकार जाला । महावीर सौमित्र युद्धीं निमाला ।
कपी वीर नैर्ऋत्य धांवोनि आले । तया भोंवतीं वीर सर्वे मिळाले ॥ ६९ ॥
पुढें शोक आरंभिला राघवानें । तया वारिलें शीघ्र बीभीषणानें ।
ह्मणे काय जी स्वामिया कोण वेळा । उभा रावणू तो पिटावा नृपाळा ॥ ७० ॥
सुमित्रासुता मारिलें तो उभासे[5] । कपीवाहिनी थोर आक्रांत भासे ।
प्रभो शोक सांडोनि वेगें उठावें । धनुर्बाण घेऊनियां सिद्ध व्हावें ॥ ७१ ॥

---

१ शरीर. २ घोड्यांना. ३ बिभीषणावर. ४ लक्ष्मण. ५ जवळ.

रणीं रावणें भेदिला ब्रह्मचारी । मिळाले कपी देखिल्या दैत्यहारी ।
बळें हाक देऊनि क्रोधें नरेंद्रें । सिमा सांडली रामकाळाग्निरुद्रें ॥ ७२ ॥
करीं बाण कोदंड चंड प्रतपी । रणीं रावणा भासला काळरूपी ।
पुढें देखतां पातली कंपवेळा । उभा राम ग्रासील नेणों भुगोळा ॥ ७३ ॥
चळें सूटला रावणा कंप देहीं । भयें भूलला न स्मरे युद्ध कांहीं ।
पडे चांचरे धांवतां थोर धाकें । पुढें पाहतां राम सर्वत्र देखे ॥ ७४ ॥
रणीं पाडिलीं दैत्यकूळें अपारें । तया रावणा लागले घायवारे ।
बळें शोडितां थोर नेटें पळाला । चळीं कांपतो गर्वताठा गळाला ॥ ७५ ॥
रणीं भष्टला तो भयातूर जाला । पुढें रावणू मंदिरामाजि गेला ।
समाचार मंदोदरीलागिं बोले । ह्मणे आजि युद्धीं बहू कष्ट जाले ॥ ७६ ॥
समाचार तो सर्वही सांगताहे । ह्मणे काय होणार तें होत आहे ।
बहूतांपरी तूं मला शीकवीलें । परी मूर्ख मीं सर्वही तुच्छ केलें ॥ ७७ ॥
करूं काय आतां प्रिये सांग वेगीं । बहू बोलता जाहला ते प्रसंगीं ।
त्वरें काळनेमी पुढें पाठवीला । स्वयें शीघ्र ऊठोनि होमास गेला ॥ ७८ ॥
पुढें चालिला वीर तो काळनेमी । बहूसाल तो थोर कापट्यकर्मी ।
हनूमंत जाईल द्रोणागिरीला । पथांमाजि तो बैसला योग केला ॥ ७९ ॥
वनें कर्दळी पोफळी नारिकेळी । वनें आंवळी जांबळी रम्य वोळी ।
बहू वृक्षजाती बहू पुष्पजाती । बहू कूप बावी तळीं ओघ जाती ॥ ८० ॥
वनें पावनें जीवनें भूवनें तीं । सुखें गोमुखें रम्य वृंदावनें तीं ।
तिरें सुंदरें बांधले सारवाटे । अकस्मात ते देखतां सौख्य वाटे ॥ ८१ ॥
रणीं पाडिला वीर सौमित्र जेथें । मिळाले कपी ऋक्ष ते सर्व तेथें ।
समस्तां मनीं लागली थोर चिंता । कपी बोलती नासलें कार्य आतां ॥ ८२ ॥
पुढें राघवा शोक तो आंवरेना । धरीतां बळें धीर पोटीं धरेना ।
मिळालीं दळें भोंवती दैन्यवाणीं । विलापें वदे राम कारुण्यवाणी ॥ ८३ ॥
पुढें बोलता जाहला वैद्य तेथें । प्रभू शोक केल्या पुढें काय होतें ।
ह्मणे औषधी शीघ्र आतां अणाव्या । न जातां निशी सर्व देहीं पिळाव्या ॥ ८४ ॥
बहूसाल तो पंथ दूरस्थ आहे । करा वेग हा काळ जातो न राहे ।
समस्तांकडे पाहिलें राघवानें । कपी बोलते जाहले सर्व मानें ॥ ८५ ॥
बळासारिखी बोलिली सर्व सेना । निशीमाजि तो आंचळू आणवेना ।
रघूनायकें पाहिलें मारुतीला । कपीराज तो शीघ्र ऊठीत जाला ॥ ८६ ॥
ह्मणे राम गा मारुता ये प्रसंगीं । विरांसारखी शक्ति तूं बोल वेगीं ।
वदे मारुती स्वामि देवाधिदेवा । गिरी आणितों शीघ्र सांगाल तेव्हां ॥ ८७ ॥
तयें बोलतां राघवा सुख जालें । करीतें प्रतीउत्तरीं गौरवीलें ।
ह्मणे मारुती जाय गा हे प्रसंगीं । गिरी आणिला पाहिजे रात्रभागीं ॥ ८८ ॥

---

१ धनुष्य. २ मार्गांमध्यें. ३ नारळी. ४ सैन्यें. ५ रात्र. ६ पर्वत.

ह्मणोनि तुवां शीघ्र आतांचि जावें । विरा लक्ष्मणालागिं त्वां ऊठवावें ।
कपी मारुती वीर तैसा उडाला । अकस्मात तो आश्रमामाजि गेला ॥ ८९ ॥
स्थळें निर्मिलीं रम्य नानापरींचीं । बहुसाल तीं भूतनें कूसरीचीं ।
मुनी बोलती हो दयाळा बसावें । फळें तोय सेऊनि सूखें रहावें ॥ ९० ॥
ह्मणे मारुती राहतां पूरवेना । तृषा लागली धीर पोटीं धरेना ।
मुनीनें तडागा जळा दाखवीलें । जळा सेवितां थोर आश्चर्य जालें ॥ ९१ ॥
जळांतूनि धाविन्नली जी विशाळा । विरें मारुतें देखिलें तीस डोळां ।
मिठी घातली मारुतें चूर्ण केली । तिच्या मेदमांसें भुमी तृप्त जाली ॥ ९२ ॥
निघाली तियेंतून तें दिव्य कांता । निरूपी सुखें सर्व साकल्य वार्ता ।
ह्मणे राक्षस बैसला कूडभावें । समर्था प्रभो त्यासि आधीं वधावें ॥ ९३ ॥
नव्हे मिथ्य साचार हें सांगतां मी । प्रभो धाडिला रावणें काळनेमी ।
तयें बोलतां मारुती वाड जाला । ऋषी ऊठला शीघ्र युद्धासि आला ॥ ९४ ॥
महावीर राक्षेस कैसा कुकर्मी । बहुसाल ते जाहले काळनेमी ।
प्रसंगीं तये थोर संग्रामें जाला । कपीच्या करें काळनेमी निमाला ॥ ९५ ॥
विरें सुंदरीलागिं उद्धार केला । उडाला बळें तो नभामाजि गेला ।
गिरीचंद्र टाकूनियां लागवेगीं । कपी वीर द्रोणाचळीं ते प्रसंगीं ॥ ९६ ॥
वटा वेढिता जाहला शेष जैसा । गिरी बांधुनी छेदिला शीघ्र तैसा ।
उडाला नभामाजि तो लागवेगें । बळें जातसे मारुती व्योममार्गें ॥ ९७ ॥
कपी लागवेगें बळें जात आहे । महीमंडळीं तेज हेलावताहे ।
अयोध्यापुरीमाजि रामानुजानें । कपी भेदिला पाडिला एक बाणें ॥ ९८ ॥
मुखीं रामनामावळी बोलताहे । महावीर तो त्यास येऊन पाहे ।
ह्मणे कोण तूं सांग आह्मां कपी रे । बहुसाल तूं दीससी साक्षपी रे ॥ ९९ ॥
मुखीं रामनामें सखा वाटतोसी । विरा कोण तूं कोठपर्यंत जाशी ।
ह्मणे मारुती वोखटें थोर जालें । सुमित्रासुतालागिं देहांत आलें ॥ १०० ॥
समाचार सांगीतला मारुतानें । मुखें बोलिलें शीघ्र रामानुजानें ।
कपी कष्टलासी बहू दूर जातां । सुखें बाणमूखावरी बैस आतां ॥ १०१ ॥
त्वरें पाठवीतों विरा शीघ्र जावें । पुढें राहिलें कार्य वेगीं करावें ।
ह्मणे मारुती हें कदाही घडेना । उडाला नभीं लंघितो देश नाना ॥ १०२ ॥
त्रिकूटाचळीं राम तो वाट पाहे । विरें वीर तो सर्वही बैसलाहे ।
अवस्था बहू लागली आवरेना । बहू रात्र जाली कपी कां दिसेना ॥
बहू राम तेथें उतावेळ जाला । अकस्मात तों मारुती शीघ्र आला ।
कपी सर्व आनंदले गर्जताती । प्रभूलागिं सांगावया शीघ्र जाती ॥ १०४ ॥
मनीं चिंतिलें शीघ्र हातासि आलें । तयासारिखें तें समस्तांसि जालें ।
सुषेणें रस काढिला औषधीचा । क्षतामाजि तो ओतिला अमृताचा ॥ १०५ ॥

---

१ कौशल्यान्नीं. २ कपटानें ३ मोठा. ४ युद्ध. ५ मृत्यु पावला. ६ आकाशमार्गानें.

सुमित्रासुतालागीं आरोग्य जालें । समस्तीं विरीं मारुता गौरवीलें ।
त्वरें ऊठिला वीर सौमित्रबाहो । रघूनाथकें देखिला दिव्य देहो ॥ १०६ ॥
कपी राम सौमित्र मेळा मिळाला । गिरी मारुती शीघ्र ठेऊन आला ।
पुन्हां मागुती भेटती एकमेकां । तया देखतां सूख जालें अनेकां ॥ १०७ ॥
कथा ऐकतां नासतें कार्य होतें । महा विघ्न तें भग्न होऊनि जातें ।
सुखानंद आनंद नाना विलासी । अखंडीत हे प्रांचिती रामदासीं ॥ १०८ ॥

## प्रसंग नववा.

म्हणे वीर सौमित्र स्वामी समर्था । बळें तोडिजे थोर चत्वारि चिंता ।
सुरेशासि त्या मुक्त आधीं करावें । अरिभ्रातया राज्य हें शीघ्र द्यावें ॥ १ ॥
कपीराज हा राज्य त्यागोनि आला । कपींशीं पुन्हां पाहिजे शीघ्र गेला ।
प्रभो नीजबंधूस त्या भेट द्यावी । अयोध्यापुरी सर्व सुखी करावी ॥ २ ॥
पुढें शीघ्र त्या रावणाच्या वधांतीं । समाधान तें पाविजेतें समस्तीं ।
म्हणोनी त्वरें हेंचि आतां करावें । बळें सर्व लोकत्रया सूख द्यावें ॥ ३ ॥
वदे रावणानुज वाक्य प्रमाणें । प्रभो कल्पवृक्षातळीं काय ऊणें ।
परी होम आरंभिला रावणानें । पुरा जालिया भीडिजे त्यासि कोणें ॥ ४ ॥
कपी वीर ते पाठवावे भुपाळें । महा होम विध्वंसिजे शीघ्र काळें ।
अरी रावणू तो रणामाजि येतां । पुढें पाठवावें तया मोक्षपंथा ॥ ५ ॥
प्रभूहेर ते गुप्त लंकेसि गेले । समाचार साकल्य घेऊनि आले ।
कपींद्राकडे पाहिलें राघवानें । विरां जाणवील तया सुग्रिवानें ॥ ६ ॥
पुढें ग्रंथसंख्या कपी सिद्ध जाले । सहस्रें दहा वीर मार्गे मिळाले ।
हनूमंत तारासुतू जाबुवंतू । गवाक्षू सुषेणू बळी वैश्वंतू ॥ ७ ॥
सुगंधू कपी नीळ तो शर्भ नामें । महा मेंद तो द्वीविदू वीरधर्में ।
सहस्रें दहांशीं बळें सिद्ध झाले । महावीर ते व्योमपंथें निघाले ॥ ८ ॥
कितीएक राक्षेस ते रक्षणेशीं । कपींनीं बळें युद्ध केलें तयांशीं ।
मुखें हांकिती हांकिती थोर नेटें । तयां पूसती रे दशग्रीव कोठें ॥ ९ ॥
गुहेचे मुखीं लाविली चंड शीळा । तये भोंवतें जाहले वीर गोळा ।
शिळेनें शिळा फोडिली थोर घातें । कपी चालिले ते गुहेचेनि पंथें ॥ १० ॥
पुढें मारुती चालिला लागवेगें । कपी चालिले सर्वही मागमागें ।
महा योगियाचे परी बैसला तो । नभीं पात्रकूं तो भडाडीत जातो ॥ ११ ॥
तया हाणिते जाहले द्रूमपाणी । मुखीं हाकिती टाकिती घोर वाणी ।
शिळा शीखरें हाणिती तो उठेना । कपी लोटती ध्यान त्याचें सुटेना ॥ १२ ॥
कितीएक ते गर्जती कर्णबीळीं । मुखामाजि ते टाकिती एक धूळी ।

---

१ अनुभव. २ इंद्राला. ३ अरि—शत्रु—जो रावण त्याच्या बंधूला, वीभीषणाला. ४ सुग्रीव. ५ वाल्मिकीरामायण ग्रंथाइतके, २४०००. ६ वालीची स्त्री तारा तिचा पुत्र अंगद. ७ अग्नि.

विरीं वानरीं मांडिलीसे धुमाळी । बहुतांपरी ताडिला होमकाळीं ॥ १३ ॥
बहुतांपरी मांडिले प्रेत्न नाना । परी रावणू कांहिं केल्या उठेना ।
विरें अंगदें थोर वीचार केला । बळें शीघ्र अंतःपुरामाजि गेला ॥ १४ ॥
बहुसाल अंतःपुरीं त्या सुनारी । तयांमाजि मंदोदरी मुख्य नारी ।
तियेलागिं घेऊनि वेगें उडाला । महावीर तेथें अकस्मात आला ॥ १५ ॥
अलंकार चीरें करें चूर्ण जालीं । बहू कंकणें भूषणें भग्न केलीं ।
कपी कंचुकी केश ओढूनि घेती । विटंबूनि लोटूनियां शीघ्र देती ॥ १६ ॥
अरे रावणा घे तुझी नीज कांता । जगज्जननी आणिली व्यर्थ सीता ।
तिचें ऊसणें काढिती द्रूमपाणी । वदे मुख्य मंदोदरी दैन्यवाणी ॥ १७ ॥
अहो प्राणनाथा असें काय केलें । तुह्मादेखतां कीं मला कष्टवीलें ।
महा रम्य नेत्रीं महाओघ जाती । विलापें करूं लागला ते रुदंती ॥ १८ ॥
करूणास्वरें रावणालागिं बाहे । प्रभू धांव रे वानरू नेत आहे ।
प्रसंगीं तये थोर आकांत जाला । भुमीकंप होतांचि पाहों निघाला ॥ १९ ॥
पुढें अंगदा लात हाणोनि पाडी । तया जांबुवंतासि वेगें लथाडी ।
कितीएक ते ताडिले मुष्टिघातें । किती ओढिले पाडिले व्योमपंथें ॥ २० ॥
नभीं ऊर्ध्व पाहोनि वेगीं उडाला । बळें झोडिलें पाडिलें मारुतीला ।
धरी हृदयीं शीघ्र मंदोदरीला । विवेकेंचि संबोखिलें त्या वधूला ॥ २१ ॥
अहल्या सती ते शिळारूप होती । विचारूनि पाहें नळाची दमंती ।
बहु कष्टली मुख्य वृंदा पुलोमा । सिता सुंदरी सांगणें काय तुह्मां ॥ २२ ॥
बहुतापरी ते सती तोषवीली । पती धाडितां भूवनामाजि गेली ।
दळें सिद्ध केलीं रथारूढ जाला । रणीं शूर संग्राम सैरा निघाला ॥ २३ ॥
प्रतापें बळें वाहिनी घोर चाले । कपी वीर ते सर्व पूर्वींच गेले ।
पुढें सोडिता जाहला बाणजाळें । बळें धांवती प्रेरिले दूत काळें ॥ २४ ॥
कपीभार ऊठावले लागवेगें । करीं घेतलीं वृक्ष पाषाण शृंगें ।
बळें टाकिते जाहले द्रूमपाणी । रणीं रावणें भेदिले सर्व बाणीं ॥ २५ ॥
गळाले महा वीर धाकें पळाले । चळीं कांपती राघवा आड गेले ।
उभा राहिला राम तो वीर गाढा । करीं घेतला चंड वाढूनि मेढा ॥ २६ ॥
बहू बाण सोडी महा वीर कैसा । रणीं क्षोभला काळ कृत्तांत जैसा ।
महा वीर ते दोघ सन्मूख आले । बळें सोडिती बाण बाणीं मिळाले ॥ २७ ॥
रणामाजि ते तोडिती बाण बाणीं । बहु मातली ते विरश्री फुराणीं ।
पुन्हां रावणें सोडिल्या बाणकोडी । लिलाविग्रही राम तात्काळ तोडी ॥ २८ ॥
बहु क्षोभले व्योम संपूर्ण केलें । शरीं दाटलेंसे नभीं थाट जालें ।
बळें तोडिती एकमेकां विरांचे । पुन्हां मागुती भार येती शरांचे ॥ २९ ॥

---

१ वस्त्रें. २ चोळी. ३ रुदन, रडणें. ४ हाक मारी. ५ आकाशमार्गानें. ६ उंच. वर. ७ सैन्य. ८ लीलनें पाहिजे तसें शरीर धारण करणारा.

रणीं झुंजती ते महा वीरबाहो । मोहो पावले ते भयें केतु राहो ।
बुधा मंगळा थोर आक्रांत आला । शनी सोम तो आपधाकें पळाला ॥ ३० ॥
ग्रहानें ग्रहो भूतळालागिं आले । विमानाहुनी देव धाकें पळाले ।
दिशा दिग्गजां व्यापिलें अंतकाळें । चळी ढ्रीचळी कांपतां ते चळाळें ॥ ३१ ॥
महावीर ते मातले घोर मारें । दिशा दाटल्या व्यापिलें अंधकारें ।
पुढें पाहतां एकमेकां दिसेना । ध्वनी मातली ऊठले घोष नाना ॥ ३२ ॥
महावीर दोघे रणीं स्तब्ध जाले । पुढें पाहतां बाण बाणीं गळाले ।
पुन्हां मागुती हाणिती एकमेकां । भरें नीकुरें टाकुनी थोर शंका ॥ ३३ ॥
पुढें रावणू पंन्नगास्त्रास[1] सोडी । तयें चालिल्या त्या नभीं सर्पकोडी ।
उभ्या वानरांमाजि आक्रांत जाले । मुखें बोलती सर्प रे सर्प आले ॥ ३४ ॥
गरुडास्त्र तें राम सोडी भडाडां । नभीं चालिलीं पक्षिकूळें झडाडां ।
तिहीं तोडिलीं सर्पकूळें तडाडां । कपी गर्जती नामघोषें घडाडां ॥ ३५ ॥
पुढें रावणें सोडिलीं तीं अचाटें । नभीं चाललीं थोर गंधर्वथाटें ।
भुमीं पाय आकाशपंथीं शिसाळें[3] । बहू भार ते धांवले एकवेळे ॥ ३६ ॥
निवारावया राम तो तेंचि सोडी । नभामाजि तें अस्त्र अस्त्रासि तोडी ।
रणीं रावणू थोर क्रोधाग्निज्वाळा । रुपें जाहला थोर कर्कोट काळा ॥ ३७ ॥
शरा अस्त्र तें सोडिलें लंकनाथें । बहूसाल वर्षाव केला अनर्थे ।
महासिंह नानापरी सर्प जैसे । महामत्त व्याघ्रापरी बाण तैसे ॥ ३८ ॥
अशन्यस्त्र सोडूनि राजीवनेत्रें । असंभाव्य तीं चालिलीं वज्रअस्त्रें ।
तिहीं सर्वही बाण छेदून नेले । कपी वीर ते थोर आनंदवीले ॥ ३९ ॥
तया रावणा कोप पोटीं भडाडी । कडाडीत कोपें रणीं बाण सोडी ।
अकस्मात तो त्यावरी स्पर्श जाला । गडाडीत मेघापरी शब्द केला ॥ ४० ॥
रथारूढ जाला रणीं लंकनाथू । पदीं चालतो रामराजा समर्थू ।
नभीं देव ते देखवेना तयांला । रथू मातली[6] शीघ्र तो पाठवीला ॥ ४१ ॥
बहू अस्त्रमंडीत रत्नीं विराजे । परी अंतकातुल्य तो राम साजे ।
नभीं दुंदुभीघोष आकाश गाजे । तया रावणा अंतरीं क्रोध माजे ॥ ४२ ॥
पुढें बोलतां जाहला घोर वाणी । तुला साह्य जाला रणीं वज्रपाणी ।
उभा रे रिपू खीळितों आजि बाणीं । तुझीं झुंजतां थोर वाटे शिराणी ॥ ४३ ॥
तुझा बंधु म्यां पाडिला एकवेळा । रणामाजि त्या देखिलें त्वांचि डोळां ।
तयासारिखें तुज मारीन आतां । पतंगापरी जाळितों जात जातां ॥ ४४ ॥
पुढें ऐकतां राम बोले तयासी । ह्मणे ऐक रे रावणा गर्वराशी ।
असंभाव्य रे वैभवें मातलासी । मराया रणीं आजि तूं पातलासी ॥ ४५ ॥
ह्मणे राम रे रावणा वीरधर्मे । रणामाजि मी तूज मारीन मेमें ।
पळालासि कोठें तरी हें सुटेना । तुझी मृत्युवेळा कदा पालटेना ॥ ४६ ॥

---

१ सर्पास्त्रास. २ आकाशांत. ३ मस्तकें. ४ सर्प. ५ वज्रास्त्र. ६ इंद्रसारथी. ७ इंद्र. ८ आवड.

रिपू जाण रे तूजला मृत्यु आला। दिल्हें अक्षयीं राज्य बीभीषणाला।
सितेकारणें थोर कापत्य केलें। अभाग्या तुझें सर्वही राज्य गेलें ॥ ४७ ॥
तयें बोलतां कोपला वीर गाढा। रणामाजि त्या घाडिल्या वज्रदाढा।
पुढें शूळपाणी करी सज्ज मेढा। बळें ओढितां चूकला रामयोद्धा ॥ ४८ ॥
कडाडीत घोषें रणीं तेच काळीं। रघूनायका बैसला बाळ भाळीं।
असंभाव्य तो कोपला चापपाणी। दशग्रीव तो छेदिला शीघ्र बाणीं ॥ ४९ ॥
बळें मारीती वारिती बाणजाळें। पुन्हा क्षोभले धांवती ते उफाळे।
रिपू कोपला थोर काळाग्नि जाला। तया रावणा थोर आवेश आला ॥ ५० ॥
प्रतापें रणीं राघवें एकवेळे। बळें फोडिलीं बाणघातें कपाळें।
रथी सारथी पाडिलें अश्व जे कां। विरें नीकुरें भेदिलें एकमेकां ॥ ५१ ॥
बळें छेदिता जाहला ओढ्र दंतीं। बहु बाण ते सोडिले व्योमपंथीं।
कितीएक ते राघवें चूर्ण केले। कितीएक ते बाण अंगीं बुडाले ॥ ५२ ॥
तया देखतां रावणू हाक फोडी। असंभाव्य ते मागुते बाण सोडी।
बळें अश्व ते मातँली भग्न केला। ध्वजस्तंभ तो शीघ्र छेदून नेला ॥ ५३ ॥
भयातूर ते भार गोळांगुळांचे। ऋषी देव गंधर्व इत्यादिकांचे।
रणीं आगळें दाखवी लंकनाथू। भयें बोलती मांडिला कीं अनर्थू ॥ ५४ ॥
पडे मातली अश्व तेही पळाले। ऋषी देव गंधर्व साशंक जाले।
कपी बोलती मांडलें विघ्न हें कीं। रणामाजि त्या रावणें जिंकिलें कीं ॥ ५५ ॥
अगस्ती ऋषी तो रणामाजि आला। रणीं मंत्र सांगे तया राघवाला।
जपे आदरें राम तो मूळमंत्रें। रवी शीघ्र येऊनि दे सारशस्त्रें ॥ ५६ ॥
ह्मणे राघवा जिंकिशी रावणाला। अती काळ हा वेळ नाहीं तयाला।
पुढें राघवें विंधिलें पंच बाणीं। तुरंगू रणीं पाडिले दैन्यवाणी ॥ ५७ ॥
रणीं राघवें चूर्ण केलें रथाचें। बळें ऊसनें घेतलें मातलीचें।
त्रिरें सारथी धाडिला मृत्युपंथें। ध्वजस्तंभ तो पाडिला बाणघातें ॥ ५८ ॥
पुन्हा राघवें मागुती तेचि काळीं। रिपू भेदिला बाणजाळीं कपाळीं।
सुरां देखतां थोर आनंद जाला। महाद्भुत तो वानरीं घोष केला ॥ ५९ ॥
असंभाव्य त्या राक्षसा कोप आला। बळें टाकिलें शीघ्र तेणें शुळाला।
रणीं फोडिली हाक नैर्ऋत्यनाथें। ह्मणे शूळ आला प्रभो व्योमपंथें ॥ ६० ॥
बहु बाणसंभार जातां जळाला। पुढें शूळ पाशुपतें भग्न केला।
पुन्हां राघवें थोर संधान केलें। असंभाव्य ते पोकळीमाजि नेले ॥ ६१ ॥
सुरेशें गिरी फोडिला वज्रघातें। तयाचे परी भेदिलें रावणातें।
देहे खीळिला बाण पैलाडे गेला। महीमंडळामाजि जातां निवाला ॥ ६२ ॥
पुन्हा सोडिलीं राघवें बाणजाळें। बहुसाल सूसाटती अंतराळें।
रथीं खीळिला प्राण व्याकूळ जाला। बहु मूर्छेना सांवरेना तयाला ॥ ६३ ॥

१ धनुष्य. २ रावण. ३ इंद्राचा सारथी. ४ वानरांचे. ५ शिवास्त्रानें. ६ पलीकडे.

रिपू भेदिला थोर लक्षून वर्मे । उभा राहिला राम तो वीरधर्मे ।
रथू सारथी शीघ्र घेऊनि गेला । पुढें शुद्धि जाली तया रावणाला ॥ ६४ ॥
बहू कोप आला तया रावणासी । ह्मणे मंदिधैंर्या तूं भयातूर होसी ।
रथू काढिला कां तुवां लागवेगीं । न येतां उणें दीसतें या प्रसंगीं ॥ ६५ ॥
ह्मणे सारथी स्वामिया हो उदारा । रिपू पेटला तो रणीं घोर मारा ।
रथारूढ राया तुह्मी वीकळांगें । ह्मणोनी रथू काढिला लागवेगें ॥ ६६ ॥
तये बोलतां राव संतुष्ट जाला । समर्पीतसे हातिंच्या कंकणाला ।
बहू वेग केला तया लंकनाथें । रथू फीरविला रणाचेनि पंथें ॥ ६७ ॥
रणीं माजल्या त्या बहू प्रेतराशी । पुढें जावया वाट नाहीं रथासी ।
भुमी दाटली मेदमांसें अचाटें । रथांगें बळें वाजती चर्चराटें ॥ ६८ ॥
समारंगणीं रावणू शीघ्र आला । वदे घोरवाणीं तया राघवाला ।
उलंघी सिमा शीघ्र मृत्यू जयाला । रणीं कोण लेखा तुला मानवाला ॥ ६९ ॥
असंभाव्य तो रावणू बाण सोडी । नभीं वावडीचे परी ते झडाडी ।
उफाळें बळें धावती दिव्य घोडे । रथामाजि संघट्टणीं घोष गाढे ॥ ७० ॥
धुरा ऊलथों पाहती शीघ्र मार्गें । विरीं ओढिले बाण ते लागवेगें ।
रथामाजि तो पैस ऊदंड जाला । विरां मागुता थोर आवेश आला ॥ ७१ ॥
रणीं राघवा रावणा युद्धकाळू । रिपूभारसंहार भूतां सुकाळू ।
करीं चंड कोदंड मंडीत बाणीं । उभे राहिले वीर ते वज्रपाणी ॥ ७२ ॥
रणीं एकमेकांसि ते घोर शब्दें । बहू भाषणें वामती वीर द्वंदें ।
बळें धांवती क्षोभले वीर क्रोधें । पुढें मारिती शस्त्र कोधें विरोधें ॥ ७३ ॥
रणीं लोटला राम हा सूर्यवंशी । महायुद्ध आरंभिलें रावणाशीं ।
उभे राहिले काळकृत्तांत जैसे । महावीर त्यां घोर आक्रांत भासे ॥ ७४ ॥
बळें सोडितां शक्ति नेटें सरारी । महावात प्रळयात पिच्छीं भरारी ।
मही सप्तपाताळ घोषें गरारी । पळालीं भुतें काळ पोटीं थरारी ॥ ७५ ॥
फणी कूर्म वाराह चक्कीत जाले । विमानाहुनी देव ऋषी पळाले ।
ग्रहो सोम सूर्यादि पोटीं गळाले । कपी खेचरां दिग्गजां कंप जाले ॥ ७६ ॥
प्रसंगीं तये थोर उत्पात जाला । नभीं शोणिताचा बळें पूर आला ।
धुमारा बहू दाटलासे दिगंतीं । असंभाव्य ते ऊल्कापात होती ॥ ७७ ॥
बळें कोपले रुद्र कालाग्नि जैसे । अरीराय ते मातले भीम तैसे ।
तया झुंजतां कोण कोणा निवारी । रणीं भीडती काळ कोदंडधारी ॥ ७८ ॥
रिपू सांडिती घोर शस्त्रें झणाणा । बळें वाजती बाणभाळी खणाणा ।
वहूसाल स्फुलिंगें जाती फणाणा । महीमंडळीं घोष ऊठे दणाणा ॥ ७९ ॥
महाशक्ति ते काळरूपें कडाडी । असंभाव्य ते ज्वाळवन्ही भडाडी ।
मही मेरु मंदार घोषें गडाडी । बळें शोषला सिंधु पोटीं तडाडी ॥ ८० ॥

---

१ मार्गीनें. २ रथांचीं चाकें. ३ शत्रूच्या समुदायाचा नाश. ४ रक्ताचा. ५ ज्वालांचें पडणें. ६ बाण-समूह. ७ ठिणग्या.

पुढें राघवें लक्षिलें रावणातें । बळें मस्तकें तोडिलीं बाणघातें ।
गिरीशीखरांचे परी तीं विशाळें । पुन्हां नीघती कंठनाळें दिसाळें ॥ ८१ ॥
शिरें देखतां राम चकीत जाला । ह्मणे मृत्यु नाहीं गमे रावणाला ।
वदे मातली स्वामि देवाधिदेवा । सुधा वक्ष भेदून शत्रू वधावा ॥ ८२ ॥
कुपी फोडिली बाणघातें निघातें । तयें रावणू चालिला मृत्युपंथें ।
ऋषी देव गंधर्व ते सर्व तोषें । विमानीं सुखें गर्जती नामघोषें ॥ ८३ ॥
नभीं दुंदुभी वाजती एकनादें । बहुतांपरींचीं बहूसाल वाद्यें ।
ध्वनी दाटले पूर्ण ब्रह्मांड घोषें । कपी गर्जती नामघोषें विशेषें ॥ ८४ ॥
सुखानंद आनंदली सर्व सृष्टी । विमानाहुनी जाहली पुष्पवृष्टी ।
ऋषी देव गंधर्व सर्वै मिळाले । विणे लाउनी नारदादीक आले ॥ ८५ ॥
मिळाल्या सुखें नायिका अष्ट भावें । करी ताळ मुर्दंग वीणे स्वभावें ।
कळा कौतुकें दाविती ते प्रसंगीं । गुणी नाचणी नाचती रागरंगीं ॥ ८६ ॥
बहू गायनें थोर गंधर्व गाती । कळा ऐकतां देव थकीत होती ।
जयाच्या अलापें देहेभाव जाती । मृगें श्वापदें लाभल्या त्या द्विजाती ॥ ८७ ॥
रुपें सुंदरी किंन्नरी दिव्य यंत्रें । बहूसाल विद्याधरी गुणपात्रें ।
उठे रागकल्लोळ सप्त स्वरांचा । गमे ओळला मेघ हा अमृताचा ॥ ८८ ॥
तुरें वाजती अंबरीं शंख भेरी । जयो पावला राम लीलावतारी ।
सुरांमानसीं थोर आनंद जाला । महा घातकी रावणू तो निमाला ॥ ८९ ॥
समस्तां सुरांमानसीं सौख्य जालें । परी दुःख बीभीषणा प्राप्त जालें ।
रणीं रावणू श्रेष्ठ बंधू निमाला । ह्मणोनि मनीं शोक उत्पन्न जाला ॥ ९० ॥
रुदंती प्रसंगीं ध्वनी घोष जाला । ह्मणोनि मनीं दुःख बीभिषणाला ।
अहा हो अहा हो मुखीं बोलताहे । विलापेंचि तो श्वास टाकीत आहे ॥ ९१ ॥
बहू लोटले ओघ नेत्रोदकाचे । दिनासारिखे शब्द कारुण्यवाचे ।
घडीनें घडी तो भुमीं अंग घाली । अरे भ्रातया ग्रुद्धि सर्वै उडाली ॥ ९२ ॥
देहेभाव सांडून तो रूदताहे । मोहोजाळ होतांचि आक्रंदताहे ।
बहुतांपरींचे बहू सौख्य दीलें । मनामाजि तें सर्वही आठवीलें ॥ ९३ ॥
मुखें श्वास सांडोनि पांणी चुरीतो । भुमीं मस्तकू आपटीतो पिटीतो ।
ह्मणे वीर तो ओखटा काळ आला । त्रिकूटाचळाचा अलंकार गेला ॥ ९४ ॥
नव्हे रावणासारिखा संपतीचा । नव्हे रावणासारिखा वित्पतीचा ।
बहू सांगतां वैभवालागिं कांहीं । प्रतापी तयासारिखा वीर नाहीं ॥ ९५ ॥
मनाचा उदारू धनाचा कुबेरू । बहूसा विचारू जगी दानशूरू ।
गळाला बहू धीर त्या राक्षसांचा । महीमंडळीं धाक गेला सुरांचा ॥ ९६ ॥
बहूतां जनांचें बहू भाग्य गेलें । गमे सर्व ब्रह्मांड हें ओस जालें ।
जयाकारणें देव लीलावतारी । तयाच्या गुणा तूळणा कोण सोरी ॥ ९७ ॥

१ नगारे. २ वेश्या. ३ पक्षी. ४ गंधर्वस्त्रिया. ५ हात. ६ वाईट. ७ विद्वत्तेचा. ८ देवांचा. ९ चांगली.

उदासीन वाटे जनीं पाहवेना । मनीं स्वस्थ नाहीं तया राहवेना ।
गताचे गुणें वीर तो भग्न जाला । तयालागिं वारावया राम आला ॥ ९८ ॥
उभा चापपाणी वेद रम्य वाणी । सदा सर्वदा गाइजे जो पुराणीं ।
ह्मणे गा विरा थोर आश्चर्य जालें । मोहोसागरीं ज्ञानतारूं बुडालें ॥ ९९ ॥
तयासारिखें आजि हें दीसताहे । प्रभू बोलतां वीर तात्काळ राहे ।
करीं घेतलें शीघ्र बीभीषणाला । कृपाळू दिनाचा दळामाजि आला ॥ १०० ॥
ह्मणे राम बीभीषणा बुद्धिवंता । रणीं रावणालागिं देहांत[१] तथा ।
तुह्मीं शीघ्र आतां पुरामाजि जावें । समस्तांसि पाहावया आणवावें ॥ १०१ ॥
समर्थामनीं लागली सर्व चिंता । परी अंतरीं जाणतो सौख्यदाता ।
तयाची कथा ऐकतां दुःख नासे । चरित्रें बरीं अंतरीं दास तोषे ॥ १०२॥

---

## प्रसंग दहावा.

तया रावणालागिं देहांत आलें । प्रधानासि बीभीषणें पाठवीलें ।
तुह्मीं शीघ्र अंतःपुरामाजि जावें । समस्तांसि तात्काळ घेऊन यावें ॥ १ ॥
प्रभू बोलतां वीर तैसे निघाले । पुढें शीघ्र अंतःपुरामाजि गेले ।
समस्तां वधू मार्ग लक्षित होत्या । उदासीन उद्विग्न चिंतातुरा त्या ॥ २ ॥
तया देखिले ते अकस्मात डोळां । भयातूर त्या कंप सूटे चळाळां ।
तयांमाजि मंदोदरी मुख्य नारी । तये सांगती हो निमाला मुरारी ॥ ३ ॥
प्रसंगीं तये थोर कल्लोळ जाला । दुखामाजि तो सौख्यसिंधू बुडाला ।
भुमीं लोळती रूदंती[२] एकवेळा । देहे व्यस्त हाणोनि घेती कपाळा ॥ ४ ॥
समस्तां जणींचे महा शब्द जाले । दुखाचे तया योग सर्वै मिळाले ।
मुखें बोलती थोर कल्लोळ जाला । समस्तां सुखांचा अळंकार गेला ॥ ५ ॥
धुळी टाकिती ऊर हाणून घेती । धरेना असंभाव्य जाली रुदंती ।
चिरें[३] फाडिती ते अळंकार गेले । भुमीं लोळती मोकळे केश जाले ॥ ६ ॥
पुढें सर्व राजांगना[४] त्या निघाल्या । दशग्रीव जेथें रणामाजि आल्या ।
रणीं कांत देखून आकांत केला । बहु पाप हो ओखटा काळ आला ॥ ७ ॥
अकस्मात तें सर्व सौभाग्य गेलें । समर्था प्रभू कां उदासीन केलें ।
समस्तांसि शोकार्णवीं[५] बुडवीलें । असंभाव्य हें दुःख ठाकूनि आलें ॥ ८ ॥
ह्मणे राम बीभीषणा जाय आतां । बहूतांपरी तोषवावें समस्तां ।
निमाल्यावरी वैर कां हो करावें । विवेकेंचि मंदोदरी नीववावें ॥ ९ ॥
कृपासागरें वीर तो पाठवीला । अकस्मात राजांगनांमाजि आला ।
प्रबोधेंचि[६] नानापरी तोष केला । समस्ती जगी भूवना पाठवील्या ॥ १० ॥
पुन्हां मागुती वीर तात्काळ आला । ह्मणे हो प्रभू पाठवील तयांला ।

---

१ मृत्यु पावला. २ रडतात ३ वस्त्रें. ४ राजस्त्रिया. ५ शोकसमुद्रांत. ६ उपदेश करून.

वदे मागुता राम बीभीषणाला । रणीं रावणू अग्नि[1] द्या जा तयाला ॥ ११ ॥
पुढें ऊठला तो रणामाजि आला । हुतार्शी तया रावणा वीधि केला ।
समुद्रीं शुचिष्मंत होऊनि आला । नमस्कार केला तया राघवाला ॥ १२ ॥
वदे राम तैसाचि त्या बांधवातें । कपीनाथ सुग्रीव राजा तयातें ।
तुह्मीं शीघ्र नैर्ऋत्यनाथासि[2] न्यावें । विघायुक्त भद्रासनीं[3] बैसवावें ॥ १३ ॥
महा वीर तींहीं नमस्कार केले । पुढें सव्य घालूनि तैसे निघाले ।
सर्वे चालती ते असंभाव्य सेना । ऋषी देव ते हृष्ट झाले विमाना ॥ १४ ॥
बहूसाल वाद्यध्वनी घोष जाला । बळीं गर्जती नाद गेला भुगोला ।
कपीनाथ सौमित्र ते राजभारें । दळें चालिलीं वानरांचीं अपारें ॥ १५ ॥
महादूत वेगीं पुढें पाठवीले । बळें सिद्ध लंकापुरीमाजि गेले ।
त्वरें लाविले काम पूर्वीच तींहीं । बहू वेग त्या राक्षसां वानरांही ॥ १६ ॥
बहूसाल कामार[4] ते लक्ष कोटी । स्थळें सिद्ध होतां असंभाव्य दाटी ।
प्रसंगीं तया तांतडी फार जाली । पहाया सुखें लोकमांदी[5] मिळाली ॥ १७ ॥
शिड्या पायिंच्या उंच आकाशपंथें । असंभाव्य तें लागलें काम तेथें ।
बहू जाणते वेग मोठ्या बळाचा । पुरीमाजि तो एक मेळा तयांचा ॥ १८ ॥
कपींच्या करें अल्पशी भग्न जाली । पुरी मागुती सर्वही सिद्ध केली ।
त्रिकूटाचळीं भव्य चत्वार[6] द्वारें । विशाळें नभासारखीं थोरथोरें ॥ १९ ॥
दिसे रम्य लंकापुरी कांचनाची । बरी पाहतां हांव पूरे मनाची ।
हुडे कोट गेले नभामाजि उंची । जगीं धन्य निर्माण केली विरंची[7] ॥ २० ॥
पहाया गवाक्षें[8] लघू दीर्घ द्वारें । बहूसाल जाळंधरें[9] थोरथोरें ।
असंभाव्य चर्या गिरी तो विलासे । वरी सर्व रेखाटिलें व्योम भासे ॥ २१ ॥
हुडे कोट दामोदरें थोरथोरें । सजे बाहुल्या चौक नाना प्रकारें ।
महा मंदिरें सुंदरें थोरथोरें । भुयेरें बरीं वोवरें तीं अपारें ॥ २२ ॥
बहू चित्रशाळा बहू होमशाळा । बहू सुंदरा धर्मशाळा विशाळा ।
तके थोर वृंदावनें पार ओटे । सभामंडपीं देखतां सौख्य वाटे ॥ २३ ॥
बिदी[10] हाट बाजार मोठ्या दुकानें । मठ्या पर्णशाळा महा यागस्थानें ।
वनें वाटिका जीवनें ओघ जाती । झरे कालवे वाहती पाट जाती ॥ २४ ॥
ध्वजा गोपुरें शीखरें तीं अपारें । बहू देव देवालयें थोरथोरें ।
तळीं कूप बावी जळें पूर्ण जालीं । बहूतांपरींचीं स्थळें सिद्ध केलीं ॥ २५ ॥
बळी झाडिती लोटती सर्व शाळा । सडे शिंपिती घालिती रंगमाळा ।
सुगंधी बहू गुंफल्या पुष्पमाळा । जळें निर्मळें बैसका त्या सुढाळा ॥ २६ ॥
सुवर्णाचिया रत्नमंडीत भिंती । हिरे पाच गोमेद ते ढाळ देती ।
सडे शिंपिले कस्तुरी केशरानें । बहूसाल तीं रम्य यानें विमानें ॥ २७ ॥
ध्वजा त्या गुढ्या तोरणें ऊभवीलीं । पुरी सर्व शृंगारमंडीत केली ।

---

१ अग्नीमध्यें. २ बिभीषणाला ३ सिंहासनावर. ४ मजूर. ५ लोकसमूह. ६ चार. ७ ब्रह्मदेव. ८ खिडक्या. ९ जाळ्या. १० रस्ते.

पताका निशाणें वरी दिव्य छत्रें । बहु चामरें दिव्य मार्तंडपत्रें ॥ २८ ॥
तया राजद्वारीं बहु दाटि जाली । सभामंडपीं मंडळी ते मिळाली ।
पुढें रावणानूज शृंगारवीला । विधीयुक्त भद्रासनीं बैसवीला ॥ २९ ॥
धमामा नभीं दुंदुभीनाद जाला । सुरीं अंबरीं पुष्पवर्षाव केला ।
रघूनायकें सेवका राज्य दीलें । सुरां सोडिलें थोर आनंदवीलें ॥ ३० ॥
असंभाव्य तो वाद्यकल्लोळ जाला । निशाणावरी तो त्रिरीं घाव केला ।
महावीर संतोषले राज्यतोषें । बहूसाल ते गर्जती नामघोषें ॥ ३१ ॥
समस्तांजणांचें बहु पाप गेलें । सुरांचें महा शल्य निर्मूल केलें ।
यथासांग लंकापुरी ते प्रसंगीं । विरीं वानरीं पाहिली लागवेगीं ॥ ३२ ॥
पुढें सर्वहि वीर तैसे निघाले । रघूनायका भेटले स्वस्थ झाले ।
समाचार ते सर्वही सांगताती । जगन्नायका थोर आनंद चित्तीं ॥ ३३ ॥
ह्मणे राम गा मारुती ये प्रसंगीं । अशोकावना जाय तूं लागवेगीं ।
समाचार सांगे तये सुंदरीला । कपी वीर तो शीघ्र तैसा निघाला ॥ ३४ ॥
अशोकीं वसे जानकी शोक भारी । अकस्मात तेथेंचि आला वनारी ।
नमस्कार घालूनि तो बोलताहे । सुवेळे समस्तांस कल्याण आहे ॥ ३५ ॥
दशग्रीव संहारला लंकवासी । प्रतापें दिलें राज्य बीभीषणासी ।
प्रभूनें समाचार हा सांगवीला । तई जानकी थोर आनंद जाला ॥ ३६ ॥
स्तुतीउत्तरें बोलती एकमेकां । सिता तोषली दूरि टाकूनि शंका ।
ह्मणे मारुती हा समाचार नेतों । पुढें जावया शीघ्र जाऊनि येतों ॥ ३७ ॥
नमस्कार केला तये जानकीसी । ह्मणे रे कपी तूं चिरंजीव होसी ।
त्वरें चालिला भेटला राघवाला । पुन्हां मागुती पाठवीलें तयाला ॥ ३८ ॥
ह्मणे गा विरा सांग बीभीषणातें । वना जाउनी आणिजे जानकीतें ।
दिजे मंगळस्नान नाना प्रकारें । सुगंधें फुलें अलंकार चीरें ॥ ३९ ॥
महा वीर ते शीघ्र तैसे निघाले । पहाया सिता सर्वही सिद्ध जाले ।
बहूसाल वाद्यें दळेंशीं निघाले । कपी लागवेगीं त्रिकूटासि गेले ॥ ४० ॥
सुवेळाचळामाजि तो रामराजा । पहाया तया चालिल्या देवफौजा ।
मदोन्मत्त ऐरावतारूढ जाला । सुरांशीं सुरेश पुढें शीघ्र आला ॥ ४१ ॥
पुढें शीघ्र मेषारुढें पावकानें । करीं शुभ्र शक्ती तया ताम्रवर्णें ।
बहु भूषणें देव तो अग्नि आला । सुखें चालिला राम पाहावयाला ॥ ४२ ॥
पहा दंडपाणी महामेघ जैसा । तयालागिं बैसावया थोर ह्मैसा ।
पती दक्षिणेचा तदारूढ झाला । सुखें चालिला राम पाहावयाला ॥ ४३ ॥
नरारूढ होऊनि नैर्ऋत्यनाथें । त्वरें जाइजे धूम्रवर्णें समर्थें ।
करीं खड्ग घेऊनियां सिद्ध जाला । सुखें चालिला राम पाहावयाला ॥ ४४ ॥
जळाधीश नक्रीं समारूढ जाला । करीं पाश तो शीघ्र घेऊनि आला ।
सवें सागरांचा समूदाव आला । सुखें चालिला राम पाहावयाला ॥ ४५ ॥

१ छत्र्या. २ सिंहासनावर. ३ दुःख. ४ मारुती. ५ रावण. ६ वस्त्रें. ७ मेंढ्यांवर बसलेल्या. ८ यम, ९ वरुण.

निळा वर्ण तो वायु अंकूशपाणी । मृगारूढ होवोनियां नीळवर्णी ।
सुताच्या गुणें आनंदीवें निघाला । सुखें चालिला राम पाहावयाला ॥ ४६ ॥
गदा घेउनी तो प्रभू उत्तरेचा । हयारूढ तो शुभ्र वर्णू तयाचा ।
महा सुंदरू तो सुधारूप आला । सुखें चालिला राम पाहावयाला ॥ ४७ ॥
रुपें कर्दळीसूतें तो शूळपाणी । जपे अंतरीं रामरामेति वाणी ।
महादेव नंदीवरी रूढ जाला । सुखें चालिला राम पाहावयाला ॥ ४८ ॥
गणेशीं गणाधीश अंकूशपाणी । चतुर्भूज तो भव्य सिंदूरवर्णी ।
महास्थूळ तो मूषकारूढ जाला । सुखें चालिला राम पाहावयाला ॥ ४९ ॥
सुरांचा गुरू आंगिरा दूसरा तो । प्रतापें कुबेरू धनाचा बळी तो ।
रथारूढ होऊनि मार्तंड आला । सुखें चालिला राम पाहावयाला ॥ ५० ॥
विधी मुख्य हंसासनीं सृष्टिकर्ता । तयाचेनि उत्पत्ति हा विश्वभर्ता ।
ऋषी देव गंधर्वमेळा मिळाला । सुखें चालिले राम पाहावयाला ॥ ५१ ॥
गुणी नाचणी गायका स्वर्गवासी । अलापें कळा कूशळा त्या विलासी ।
दळें भूतळीं चालिले देव कोटी । बहूतांपरी चालिले रामभेटी ॥ ५२ ॥
सदाशीव तो शीघ्र भेटीस आला । पदीं चालि तो राम सन्मूख आला ।
प्रितीनें सखे भेटती एकमेकां । तया भेटतां सौख्य जालें अनेकां ॥ ५३ ॥
विरंचीस आलिंगिलें राघवानें । बहु सुख तें मानिलें ब्रह्मयानें ।
पुढें भेटला शक्र सूखें निवाला । तया मानसीं थोर आनंद जाला ॥ ५४ ॥
ऋषी देव गंधर्व सर्व मिळाले । पुढें राम आलिंगनीं सिद्ध जाले ।
समस्तांसि तो भेटला रामचंद्र । महीं लोटला सर्वसूखें समुद्र ॥ ५५ ॥
सभा बैसली सर्वही स्वस्थ जाली । कथा राहिली पाहिजे चालवीली ।
रघूनायकें मारुती पाठवीला । त्वरें शीघ्र लंकापुरीमाजि गेला ॥ ५६ ॥
पुढें भेटला शीघ्र बीभीषणातें । बहुसाल सन्मानिलें मारुतातें ।
तयालागिं उंचासनीं बैसवीलें । ह्मणे आजि हें भाग्य माझें उदेलें ॥ ५७ ॥
सखा वाटसी राघवें धाडिलासी । बहूसाल तें सौख्य जालें मनासी ।
प्रभूची मला काय आज्ञा करावी । शिरीं वंदितों मी करन्यास दावी ॥ ५८ ॥
पुढें मारुतें मात ते जाणवीली । ह्मणे जानकी वैभवें आणवीली ।
महावीर ते शीघ्र तैसे निघाले । दळेंशी अशोकावनामाजि गेले ॥ ५९ ॥
बहुसाल यानें गजां घोडियांचीं । सवें चालिलीं दिव्य सूखासनाचीं ।
महावीर ते सर्व येऊनि मार्गे । त्वरें वीर ते चालिले लागवेगें ॥ ६० ॥
पुढें भेटते जाहले जानकीला । नमस्कार साष्टांग केला तिथेला ।
अनुज्ञादिजे शीघ्र नैर्ऋत्यनाथें । तुह्मां न्यावया पाठवीलें समर्थें ॥ ६१ ॥
तरी जननी शीघ्र आतां उठावें । महा मंगलस्नान आधीं करावें ।

१ केळीपासून उत्पन्न झालेला( कापूर )२ बृहस्पति. ३ कलावंतिणी. ४ ब्रह्मदेवास. ५ इंद्र. ६ जलदीनें. ७ राक्षसांचा राजा जो बिभीषण त्यानें.

अळंकार चीरें पुढें सिद्ध केलीं । सुगंधेल तेलें बहु आणवीलीं ॥ ६२ ॥
बहुसाल आनंद तो जानकीला । स्तुतीउत्तरीं गौरवीलें तयाला ।
ह्मणे मारुती जननी मान दीजे । उदासीन बीभीषणाला न कीजे ॥ ६३ ॥
कपी बोलतां मान्य ते गोष्टि केली । सर्वे राक्षसी शीघ्र तैशी निघाली ।
बहुसाल उष्णोदकें सिद्ध होती । बहु कुशळा राक्षसी माखिताती ॥ ६४ ॥
स्तुतीउत्तरीं माखिलें जानकीला । ह्मणे आजिचा दीन हा धन्य जाला ।
चिरें सुंदरें कंचुकी रत्नमाळा । सुगंधी बहु घातल्या पुष्पमाळा ॥ ६५ ॥
अळंकार भांगार जांबूनदाचे । महीमंडळींच्या नृपाळांत कैंचे ।
तया मारुतें बैसका सिद्ध केली । जगज्जननी बैसली सिद्ध जाली ॥ ६६ ॥
पुढें ठेविलें पात्र दुग्धाफळांचें । शकुनार्थ गात्रें ह्मणे रम्य वाचे ।
दिलीं पंचकें दोनि दोघां जणांला । कपी मारुती आणि बीभीषणाला ॥ ६७ ।
जिवाच्या सख्या राक्षसी जानकीच्या । बहु दीस होत्या वनीं संगतीच्या ।
दिलीं पंचकें दोन दोघीं जणींला । महागर्व नामें तये त्रीजटेला ॥ ६८ ॥
ह्मणे जानकी लोभ आतां असावा । उदासीन वाटे बहुसाल जीवा ।
समस्तां जणांतें फळें पाठवीलीं । मुखें जानकीनें बहु स्तूति केली ॥ ६९ ॥
फळें सेविलीं आचमनें शुद्धि केली । पुढें शीबिका ते विरें आणवीली ।
पताका चिरें सुंदरें दिव्य छत्रें । पुढें विंजणे चामरें तें विचित्रें ॥ ७० ॥
दळें चाललीं दाटणी थोर जाली । सिता शीबिकेमाजि तैशी निघाली ।
तरें सुंदरें गंभिरें वाजताती । असंभाव्य वाद्यें ध्वनी गर्जताती ॥ ७१ ॥
महा सुंदरें रम्य दिव्यांबरें ते । वरी सर्व आच्छादिलें शीबिकेतें ।
पुलस्ती कपी वीर सन्नीध जाती । पुढें वारिती वेत्र घेऊनि हातीं ॥ ७२ ॥
अशोकावनींहूनि ते लागवेगें । बहूवीध सन्नीध येती प्रसंगें ।
सर्व चालिले लोक त्रीकूटवासी । पहाया अती आदरें जानकीसी ॥ ७३ ॥
सभे बैसला देव कैलासवासी । गणाधीश तो ईश सर्वां गुणांसी ।
विधी शक्र ते सर्व गंधर्व आले । कपी देव तेतीस कोटी मिळाले ॥ ७४ ॥
मिळाले कपी रीस कोट्यानुकोटी । सिता आणितां जाहली थोर दाटी ।
शतांचीं शतें धांवती वेत्रपाणी । दळें वारिती गर्जती घोर वाणी ॥ ७५ ॥
पहाया सिता वीरमांदी मिळाली । प्रसंगीं तये दाटणी थोर जाली ।
बळें टाकिती एकमेकांसि मागें । कपी रीस ते धांवती लागवेगें ॥ ७६ ॥
अडा घालिती एकमेकां पुढारें । दिसेना परी सर्व सेना उभारें ।
पुढें पाहया घालती मस्तकांतें । महा वीर ते हाणिती वेत्रघातें ॥ ७७ ॥
कितीएक आकाशपंथीं उडाले । कितीएक ते वृक्षअग्रीं दडाले ।
कितीएक ते फीरती अंतराळीं । कितीएक ते चोप उल्हासकाळीं ॥ ७८ ॥
कपींचीं दळें चंचळें फार जालीं । महाभार देखोनि मागें पळालीं ।

१ वस्त्रे. २ सोन्याचे. ३ पालखी. ४ पंखे. ५ मनें. ६ [illegible] ७ वीरसमूह. ८ आकाशांत.

बळी गर्जती थोर घोषें फुराणें । वरी साग्वती अंतराळीं किराणें ॥ ७९ ॥
महाभार देखोनि माहाविरांचे । श्रमीं लागले भार गोळांगुळांचे ।
दिसेना सिता आर्त पोटीं सरेना । उतावीळ त्यां धीर पोटीं धरेना ॥ ८० ॥
कपी धांवती शीघ्र पाहावयाला । परी रीघ नाहीं पुढें जावयाला ।
प्रसंगीं महा भार देखोनि दृष्टीं । रघूराज तो बोलिला एक गोष्टी ॥ ८१ ॥
सितेकारणें वानरीं कष्ट केले । किती वेळ हे बाणघातें निमाले ।
उतावीळ पोटीं पहाया सितेला । दिसे स्पष्ट ऐसें करावें तियेला ॥ ८२ ॥
महोत्साव यात्रा तथा पर्वकाळीं । विवाहीं युधांतीं तथा अंतकाळीं ।
गृहीं सासऱ्याचे तया जनकाचे । नव्हे नित्य ते संगतीं नोवऱ्याचे ॥ ८३ ॥
पुढें धाडिलें शीघ्र त्या अंगदाला । ह्मणे रे तया सांग बीभीषणाला ।
ह्मणावें बळें आपुलें लोक वारा । पुढें शीघ्र येऊनियां दूरि सारा ॥ ८४ ॥
त्वरें धांवला राव त्रीकूटवासी । बहू वारिलें मारिलें राक्षसांसी ।
पुढें काढिले पट्टकूळा सकूळा । दिसों लागली जानकी दिव्य बाळा ॥ ८५ ॥
समस्तीं सिता देखिली आदरेंशी । असंभाव्य सौंदर्य लावण्यराशी ।
तये देखतां सर्व सूखें निवाले । कपी बोलती आजि निःपाप जालें ॥ ८६ ॥
सिता देखती जाहली रामचंद्रा । नमस्कार केला तसाची महेंद्रा ।
तया राघवें पाहिलें जानकीला । पुढें भूलतां वक्र आव्हेर केला ॥ ८७ ॥
उदासीन ते जानकीलागिं केलें । सभामंडळीं सर्व बेरंग जालें ।
सभेमाजि ते बोलती एकमेकां । सितेलागिं आव्हेरिलें राघवें कां ॥ ८८ ॥
अवस्था बहू लागली ते प्रसंगीं । बुडाले कपी धीर सर्वे विरंगीं ।
मुखें बोलती सर्वही कोण वेळा । शिणे मारुती कंप जाला भुगोळा ॥ ८९ ॥
सभा बैसली त्या द्विजांब्राह्मणांची । असंभाव्य सौंदर्यता त्या सितेची ।
कितेकीं मनामाजि संकेत केला । तिहीं अंतरीं कल्पिले दोष तीला ॥ ९० ॥
रघूनाथ हा हेत जाणे मनींचा । सदा सर्वदा साक्ष सर्वां जनांचा ।
जिवांतील जाणे तया चोरवेना । महा पातकी पाप त्याचें सरेना ॥ ९१ ॥
ह्मणोनी प्रसंग उदासीन केलें । जनीं कल्पिलें सर्वही व्यर्थ गेलें ।
ह्मणे राम तो जानकीलागिं जावें । स्वइच्छा सुखें त्वां दिगंतीं फिरावें ॥ ९२ ॥
प्रसंगीं तये शब्दकाठिण्य रामें । मुखें बोलिजे अर्थभेदें विरामें ।
अधोमूख सीता विलोकी भुमीतें । मही भीजली जाहली अश्रुपातें ॥ ९३ ॥
ह्मणे न्याय अन्याय सर्वे बुडाला । दिसे आज कल्पतरू वांज जाला ।
नसे अल्प अन्याय ब्रह्मांड केला । वृथा दंड हा कोण धर्मे मिळाला ॥ ९४ ॥
मनीं अल्प हे कल्पनी कां करावी । ह्मणे कल्पिली बुद्धि पोटीं धरावी ।
बहूसाल बोलोनियां काय आतां । महासौख्य तें पावकें भस्म होतां ॥ ९५ ॥
ह्मणे जानकी त्या रिसां वानरांसी । बहूसाल ते कष्ट जाले तुह्मांसी ।

१ उड्या. २ वानरांचे. ३ आवड, इच्छा. ४ खालीं नेत्र करून. ५ अग्नीनें.

परी मागुती एक जीवीं धरावें । बहुसाल त्या पावका चेतवावें ॥ ९६ ॥
पुढें शीघ्र खाणोनियां कुंड केलें । असंभाव्य त्या पावका चेतवीलें ।
शिखा धांवती ऊर्ध्व आकाशपंथें । पिडा जाहली खेचरा भूचरातें ॥ ९७ ॥
विरंचीं हरादीक देवां समस्तां । मनामाजि ते थोर जाली अवस्था ।
मुखें बोलती सर्वही कार्य जालें । परी मागुती काय हें विघ्न आलें ॥ ९८ ॥
स्वभावेंचि हा वन्हि जाळीत आहे । तयामाजि हे जानकी कैंवि राहे ।
धडाडीत ज्वाळा पुढें पाहवेना । तया अंतरेंही उभें राहवेना ॥ ९९ ॥
मनामाजि पूजा यथासांग केली । पुढें जानकी पावकामाजि गेली ।
तये स्पर्शतां पावकू शुद्ध जाला । निवाला प्रसंगीं तये शांत जाला ॥ १०० ॥
तयामाजि ते जानकी शोभताहे । समस्तीं सभा लोक त्रैलोक्य पाहे ।
पुटीं घालिजे पूतळी कांचनाची । तयेहूनि ते दिव्य काया सितेची ॥ १०१ ॥
अळंकार चीरें बहु पुष्पमाळा । सुगंधें तनू चर्चली दिव्य बाळा ।
जगज्जननी शीघ्र बाहेर आली । सभे देखतां दिव्य सीता निघाली ॥ १०२ ॥
महावीर ते गर्जले नामघोषें । कपीवीर ते तोषले सर्व तोषें ।
सुरीं अंबरीं पुष्पवर्षाव केला । नभीं दुंदुभीनाद कल्लोळ जाला ॥ १०३ ॥
सिता मुख्य ते पावकामाजि होती । वृथा रावणें चोरिली हे वदंती ।
रमा सागरांतूनि नेली हरीनें । तयाचेपरी जानकी राघवानें ॥ १०४ ॥
पुढें जानकी रामअंकीं विराजे । रमा आदिनारायणा जेवि साजे ।
असंभाव्य तो वाद्यकल्लोळ गाजे । कपीवाहिनीमाजि आनंद माजे ॥ १०५ ॥
जनाच्या मनाकारणें धीर केला । कृपेचा कृपासागरा पूर आला ।
कृपादृष्टिनें पाहिलें जानकीला । पुढें शीघ्र आलिंगिलें त्या सितेला ॥ १०६ ॥
ह्मणे दास हे श्लोक रामायणाचे । जरी अल्प सोपेचि नाना गुणांचे ।
कितीएक पाल्हाळ टाकोनि मागें । कथा चालिली ते पुढें सावेगें ॥ १०७ ॥

## प्रसंग अकरावा.

प्रतापें दिनेशू तपाचा हुताश । विरांमाजि ईशू सुरांचा सुरेशू ।
मुनींचा महेशू महादेव धीशू । सदांचा उदासू वनारण्यवासू ॥ १ ॥
पिनाकी शुळी बोलिजे रुद्रवाणी । जटाभार पंचानन् शूळपाणी ।
हरू शैलजावल्लभू भक्तपाळू । धराधार मृत्युंजयो तो कृपाळू ॥ २ ॥
महादेव शंभू गिरीजाविलासी । सुवर्णाचळामाजि कैलासवासी ।
विराजे रुपें गौर कर्पूर जैसा । दिसे धाम डोळा सदाशिव तैसा ॥ ३ ॥
विषें कंठ काळा दिसे चंद्रमौळी । फणीधारकू वन्हि साजे कपाळीं ।
असंभाव्य भोळा गळां रुंडमाळा । पहा मस्तकीं ओघ जाती खळाळा ॥ ४ ॥

---

१ ज्वाला. २ वर. ३ ब्रह्मदेव. ४ शरीर. ५ आकाशांत. ६ वार्ता. ७ वानरसैन्यामध्यें. ८ सूर्य. ९ शंकर. १० तेज.

वसे भस्म अंगीं प्रभू वीतरागी । उदासीन तो सर्व सामर्थ्य त्यागी ।
त्रिधी शक्र हे सर्व ध्याती जयाला । महादेव तो वर्णितो राघवाला ॥ ५ ॥
ह्मणे धन्य रामा विरा पूर्णकामा । असंभाव्य सीमा कळेना महीमा ।
महा थोर अद्भुत सामर्थ्य केलें । प्रतापेंचि ब्रह्मादिकां सोडवीलें ॥ ६ ॥
प्रसन्न तया रावणालागिं आह्मी । विरंचीवरें मातला पापकर्मी ।
ऋषी देव माझे बहु कष्टवीले । समर्था तुवां सर्वही सोडवीले ॥ ७ ॥
अखंडीत घेतों तुझें नाम वाणीं । पुजा अंतरामाजि कोदंडपाणी ।
बहु काळ होतें बहु आर्त पोटीं । प्रसंगेंचि ये जाहली थोर भेटी ॥ ८ ॥
अकस्मात हा भेटिचा लाभ झाला । मनामाजिं अद्भुत आनंद जाला ।
सुराकारणें संकटीं पावलासी । मनोभावना राहिली तुजपाशीं ॥ ९ ॥
भविष्योत्तरें बोलिलीं वाल्मिकानें । पहातां चरित्रें तुझीं आवडीनें ।
त्रिवें पोळला प्राण माझा निवाला । निजध्यास तो लागला पार्वतीला ॥ १० ॥
समस्तां मनीं लागला ध्यास रामा । तुझें रूप ध्यातों सदा योगधामा ।
बहुसाल हें बोलणें काय देवा । अखंडीत हा लोभ आतां असावा ॥ ११ ॥
प्रतीउत्तरें राम बोले महेशा । उदाराधिशा सुंदरा देवधीशा ।
समर्था प्रभू लोकपाळा नृपाळा । लिळें जाळिशी पाळिशी या भुगोळा ॥ १२ ॥
तुझा योग होतांचि आनंद जाला । पुढें देखता प्राण माझा निवाला ।
दयासागरा सर्व सांभाळ केला । सुखानंद हेलावला तृप्त जाला ॥ १३ ॥
पुढें बोलता जाहला तो विरंची । ह्मणे आजि हे धन्य वेळा सुखाची ।
तुझा योग होतां घडी अमृताची । बहू स्तुति केली रघूनायकाची ॥ १४ ॥
किती बंधनें पावलों पूर्व पापें । बहू दीस ओसंडिलें मायबापें ।
बहु कष्ट केलेसि देवाधिदेवा । कृपाळूपणें शीघ्र केला कुडावो ॥ १५ ॥
तुह्मां वेगळे सर्वही दीन झाले । त्रिकूटाचळीं बंदिशाळे मिळाले ।
दिनासारिखे जाहले दैन्यवाणे । प्रभू आमुचें दुःख तें कोण जाणे ॥ १६ ॥
बहू कष्टवीलें तया रावणानें । घडीनें घडी त्रासिलें दुर्जनानें ।
उमे हानि येतां मनामाजि चिंता । समस्तांस कोणी नसे सोडवीता ॥ १७ ॥
बहू ओखटी वेळ येऊन गेली ! कृपासागरा धांवणी शीघ्र केली ।
सुतालागिं झेंपावला व्याघ्र तैसा । जगज्जनका तूं समस्तांस तैसा ॥ १८ ॥
स्तुती उत्तरें बाळकू काय जाणे । बरें ओखटें सर्व कांहींच नेणे ।
मुलें खेळतां मायबापांस चिंता । तयाचेपरी बोलताहे विधाता ॥ १९ ॥
बहु स्तुति केली तया ब्रह्मयानें । कृपाळूपणें वारिलें राघवानें ।
प्रसंगें विधीचें समाधान केलं । मनीं दुःख मागील तें सर्व गेलं ॥ २० ॥
पुढें बोलता जाहला वज्रपाणी । सदा सर्वदा गाइजे जो पुराणीं ।
तया सुकृताचा बरा काळ आला । प्रभू रामचंद्रा तुझा योग झाला ॥ २१ ॥

---

१ इंद्र. २ आवड. ३ देवांकरितां. ४ ब्रह्मदेव. ५ रक्षण. ६ कैदखान्यांत. ७ वाईट.

बहुतांपरी राघवा ऐकलासी । पुरी पूरली लोचनांची असोसी ।
पुढें पाहतां देखता रूप तूझें । जगन्नायका धन्य हें भाग्य माझें ॥ २२ ॥
उणे कोटि कंदर्प हें रूप साजे । सदा सर्वदा योगिध्यानीं विराजे ।
मुनी शोधिती भक्त कोट्यानुकोटी । बहु साधनेंहि नव्हे शीघ्र भेटी ॥ २३ ॥
कितीएक योगी उदासीन जाले । गिरीकंदरीं तूज शोधीत गेले ।
तयां अंतरीं भेटसी अल्प कांहीं । जनीं आमुच्या सुकृता पार नाहीं ॥ २४ ॥
म्हणे इंद्र तो स्वामी देवाधिदेवा । जनीं सेवका आठवावा म्हणावा ।
घडेना मला भक्तिभावार्थ नाहीं । प्रभू सांगिजे जी मुखें कार्य कांहीं ॥ २५ ॥
म्हणे राम गा वज्रपाणी प्रसंगें । रथू मातली धाडिला लागवेगें ।
तुवां कार्य तें सर्व पूर्वीच केलें । रथारूढ होऊनियां येश आलें ॥ २६ ॥
पुन्हां मागुतें एक आतां करावें । निमाले कपी ऋक्ष त्यां ऊठवावें ।
सुधामेघ पाठूनियां लागवेगीं । महावीर ते ऊठवी ये प्रसंगीं ॥ २७ ॥
मुखें बोलता जाहला चक्रपाणी । तयें थोर संतोषला वज्रपाणी ।
प्रसंगीं तये थोर आनंद जाला । नमस्कार केला रघूनायकाला ॥ २८ ॥
जळेशासि आज्ञापिलें तेच काळीं । महा मेघ ते चालिले अंतराळीं ।
असंभाव्य ते जाहली मेघवृष्टी । तिणें भीजली सर्व ते प्रेतसृष्टी ॥ २९ ॥
कपी रीस ते सर्व आले निमाले । नमस्कारिला राम सैन्यीं मिळाले ।
कळेना कळा कोण या राघवाची । मनीं कल्पितां हांव पूरे मनाची ॥ ३० ॥
निमाले कपी पावले दिव्य देहो । मिळाला रिसां वानरांचा समूहो ।
सुवेळाचळामाजि ते भार आले । क्षत्रारूप तैसेचि सर्वै मिळाले ॥ ३१ ॥
मिळाले बहू देव कोट्यानुकोटी । असंभाव्य दोहीं दळांमाजि दाटी ।
मुखें बोलती देव त्या राघवाला । स्तुतीउत्तरीं तोषवीती दयाळा ॥ ३२ ॥
प्रसंगेंचि आज्ञा समस्तांस यावी । पुन्हां मागुती सर्व चिंता असावी ।
तुम्हीं हो अयोध्यापुरीमाजि जावें । विलासें बहू राज्य सूखें करावें ॥ ३३ ॥
प्रतीउत्तरीं राम बोले समस्तां । म्हणे हो बरें जाइजे शीघ्र आतां ।
समस्तीं तुम्हीं भूवनामाजि जावें । विलासे बहू राज्य सूखें करावें ॥ ३४ ॥
मुखें बोलतां राम ते देव तोषें । करीं पीटिती टाळिका नामघोषें ।
नमस्कार केला रघूनायकाला । समस्तां मनीं थोर आनंद जाला ॥ ३५ ॥
रवी पावकें काल नैर्ऋत्यनाथें । जळाधें धनाध्यें रघूनायकातें ।
गुरू अंगिरा देव गंधर्व तेहि । बहू बोलते जाहले सर्व कांहीं ॥ ३६ ॥
ऋषी देव गंधर्व सर्वै मिळाले । स्तुतीउत्तरें बोलती शीघ्र जाले ।
समस्तांसि सन्मानिलें राघवानें । गुणां किन्नरादीक गाती पुराणें ॥ ३७ ॥

---

१ आवड. २ मदन. ३ पुण्याला. ४ अस्वलें. ५ अमृताचे मेघ. ६ वरुणाला. ७ आकाशांत. ८ मेलेले. ९ गंधर्व वगैरे.

निरोपेंचि त्या चालिल्या देवकोडी । पुढें शीघ्र बीभीषणू हात जोडी ।
समर्था मला थोर आतां करावें । घडी एक लंकापुरीमाजि जावें ॥ ३८ ॥
धरावें मनामाजे देवाधिदेवें । जनीं सेवकालागिं कांहीं घडावें ।
करावें समर्थे जिणें श्लाघ्य माझें । घडावें महद्भाग्य हें दास्य तूझें ॥ ३९ ॥
प्रतीउतरीं राम बोले तयासी । ह्मगे धन्य बीभीषणा गुणराशी ।
प्रसंगें सखा बंधु तूं जोडलासी । पुरेना तुझे संगतीची अंसोसी ॥ ४० ॥
प्रितीच्या सुखालागिं कैसें वदावें । गुणाच्या गुणाला किती आठवावें ।
बहूसाल तूं राखिला स्नेहवादु । जनांमाजि तूं धन्य साधू अगाधू ॥ ४१ ॥
स्नेहाळा तुवां आजि एनें करावें । पुरीमाजि त्वां सुग्रिवालागिं न्यावें ।
विलासें बहूतांपरी सुख यावें । कपी ऋक्ष घेऊनि वेगें उठावें ॥ ४२ ॥
सखा सुग्रिवासारिखा कोण आहे । मनामाजि बीभीषणा तूंच पाहे ।
जिवेंशीं सखा आमुचा साह्य झाला । असंभाव्य हा वीरमेळा मिळाला ॥ ४३ ॥
जनीं मैत्रिकी राखिली सुग्रिवानें । बहूसाल हा कष्टला जीव प्राणें ।
स्वयें देखिलें सांगणें काय तुझां । करी पूजितां पावलें सर्व आह्मां ॥ ४४ ॥
पुढें शीघ्र बीभीषणें तेचि काळीं । अती आदरें ठेविलें वाक्य भाळीं ।
करीं घेतलें प्रीतिनें सुग्रिवाला । ह्मणे आजिचा काळ हा धन्य जाला ॥ ४५ ॥
समर्था गुणें तूं सखा जोडलासी । तुझा योग हा पार नाहीं सुखासी ।
कपी ऋक्ष घेऊनि तैसा निघाला । पुढें शीघ्र लंकापुरीमाजि गेला ॥ ४६ ॥
जळें निर्मळें सर्व अभ्यंग केलें । अळंकार चीरें[३] कपी तोषवीले ।
बहूतांपरींचीं सुगंधें फुलेलें । समस्तांसि नाना रसें तृप्त केलें ॥ ४७ ॥
रिसां वानरांला पूजा सांग जाली । बहूसाल बीभीषणें स्तुति केली ।
महावीर विश्रांति पावून तेथें । निघाले पुढें सर्वही राम जेथें ॥ ४८ ॥
सुगंधी बहू घातल्या पुष्पमाळा । अनीळें सुखें वास नेला भुगोळा ।
प्रभूला नमस्कार साष्टांग केले । मिळाले कपी ऋक्ष सूखें निवाले ॥ ४९ ॥
सभेमाजि आली बहूसाल शोभा । पुढें राहिला हात जोडोनि ऊभा ।
प्रसंगीं तये राम बीभीषणाला । स्नेहाउत्तरीं बोलता शीघ्र जाला ॥ ५० ॥
ह्मणे गा विरा त्वां पुरीमाजि जावें । ध्रुवाचे परी राज्य तेथें करावें ।
शशी सूर्य तारांगणें अंतराळीं । असावें सुखें भोगिजे सर्व काळीं ॥ ५१ ॥
पुढें बोलिजे शीघ्र नैर्ऋत्यनाथें । ह्मणे वासना पूरवावी समर्थें ।
प्रभू बोलतां चित्त माझें न राहे । पहावी अयोध्यापुरी वासना हे ॥ ५२ ॥
पुरीमाजि भद्रासनीं तूं नृपाळा । महोत्साह उत्साह पाहेन डोळां ।
उदारा प्रभू सौख्य पाहेन संगें । निरोपेंचि मी शीघ्र येईन मागें ॥ ५३ ॥
सवें घेतलें वीर बीभीषणाला । रघूराज तो वानरेंशीं निघाला ।
असंभाव्य तो वाद्यकल्लोळ जाला । पुढें सिद्ध केलें महा पुष्पकाला ॥ ५४ ॥

---

१ आवड. २ मस्तकीं. ३ वस्त्रें. ४ वाऱ्यानें. ५ गोड भाषणानें. ६ बिभीषणानें. ७ पुष्पक विमानाला

नसे तूळणा रत्नमंडीत याना । महीतुल्य त्या आणवीलें विमाना ।
तयारूढ तो जाहला राम वेगीं । कपी वीर ते आपुल्याला विभागीं ॥ ५५ ॥
विमानावरी रामराजा विराजे । वरी बैसले ते कपी वीस राजे ।
सुमित्रासुत बैसला सव्यभागीं । जगन्मात सीता तया वामभागीं ॥ ५६ ॥
विमानावरी वाजती घंटमाळा । खडे घोष हेलावती मुक्तमाळा ।
समुद्रोदकीं पर्ण नाव्हेंच जैसें । नभापाजि तें चालिलें भव्य तैसें ॥ ५७ ॥
पुढें चालतां बोलतां लागवेगीं । सितेलागिं ते राम सांगे प्रसंगीं ।
रणामंडळीं भाट राक्षेसकूळ । त्रिकूटाचळू दावविली सुवेळा ॥ ५८ ॥
असंभाव्य पालागिला सेतु जेथें । स्वयें वास दर्भासनीं योग तेथें ।
शिवा रत्नमंडीत नानाविळासी । समुद्रातिरीं भेटला तोयराशी ॥ ५९ ॥
बळें आगळा वीर वाळी निमाला । दिलें राज्य तेथें कपी सुग्रिवाला ।
अकस्मात जाली हनूमंत भेटी । तेथें कीं तया दाखवी वीरजेटी ॥ ६० ॥
जटायू पुढें पावला स्वर्गलोकीं । जनस्थान हें रम्य गोदातटाकीं ।
पुढें चालतां राम राजाधिराजें । तया राहवीलें ऋषी भारद्वाजें ॥ ६१ ॥
कपींचीं दळें भूतळीं दृष्टि जाली । तया भारद्वाजें बहू स्तूति केली ।
पुढें धाडिले मारुतीलागिं वेगें । म्हणे गा विरा भ्रातया भेटवावें ॥ ६२ ॥
प्रभू बोलतां वीर तैसा निघाला । तया गूहकानें नमस्कार केला ।
स्तुती बोलतां तो समाचार सांगे । नंदिग्राम तो पावला लागवेगें ॥ ६३ ॥
कपी देखिला भव्य रामानुजानें । नमस्कार केला तया बांधवानें ।
कपी भेटला बैसला स्वस्थ जाला । समाचार सांकल्य सांगे तयाला ॥ ६४ ॥
म्हणे मारुती बांधवाच्या वियोगें । पळें भासती तीं किती काळयुगें ।
महद्भाग्य आलासि येणें प्रसंगीं । रघूनाथ तो भेटवी लागवेगीं ॥ ६५ ॥
उदासीन तो बंधु त्या राघवाचा । वदे मारुतीलागिं कारुण्यवाचा ।
बहू कष्टलों काळ गेला दुखाचा । कधीं राम भेटेल सिंधू सुखाचा ॥ ६६ ॥
वृथा संपदा राज्य हें काय कीजे । उदासीन या राघवाला नमीजे ।
पदें भोगिजे तें मदें बाधिजेतें । दिनेंदीस आयुष्य हें व्यर्थ जातें ॥ ६७ ॥
कितीएक ते भाग्य भोगून गेले । पुन्हा मागुती मृत्युपंथें निमाले ।
कितीएक साधू उदासीन जाले । महीमंडळीं लोक सूवें निवाले ॥ ६८ ॥
भले जाणती संपदा दुःख दाती । स्वहीतापरी त्रास होतो नियंती ।
हरादीक ते तापसी याच लागीं । सदासर्वदा फीरती वीतरागी ॥ ६९ ॥
म्हणोनी मला राघवेंवीण कांहीं । सदा सर्वदा वैभवें चाड नाहीं ।
मला भेटवीं राम आत्मा जगाचा । वदे मारुतीलागिं तो देव वाचा ॥ ७० ॥
म्हणे मारुती धन्य गा धन्य साधू । महाशक्ति वीरक्ति बोधें अगाधू ।
नव्हे साधनें भेटि ब्रह्मादिकांला । तुम्हांलागिं भेटीस तो राम आला ॥ ७१ ॥

---

१ संहार, नाश. २ सतीवरें, तळीं. ३ गोदावरीच्या तीरावर. ४ पूर्ण. ५ वैराग्यशील. ६ आवड.

नमस्कार केला तया मरुतीनें । रजें डौरलें भाळ माहाविरानें ।
प्रिती लागली अंतरीं ते ढळेना । ह्मणे धन्य गा धन्य लीळा कळेना ॥ ७२ ॥
तया देखतां चित्त सूखें निवालें । मनामाजि तें थोर आश्चर्य केलें ।
ह्मणे वीर अद्भुत वैराग्य कैसें । महाभाग्य हें मानिलें तृण जैसें ॥ ७३ ॥
पुढें वीर रामानुजें कार्य केलें । पुरीमाजि शत्रुघ्ना पाठवीलें ।
समस्तां वसिष्टादिकां जाणवीलें । असंभाव्य तें सैन्य पालाणवीलें ॥ ७४ ॥
ह्मणे वीर तो राम येईल आतां । सुखी जाहली मुख्य माता समस्तां ।
प्रसंगें तये थोर आनंद जाला । पुरीमाजि तो लोक सर्व मिळाला ॥ ७५ ॥
पुढें शीघ्र पालाणिले दिव्य घोडे । महीमंडळीं त्यांस नाहींत जोडे ।
असंभाव्य तीं हिंसती दिव्य घोडीं । उफाळे तयां धांवतां भूमि थोडी ॥ ७६ ॥
सुठाळी झुली पाखरा मुक्तमाळा । बहु रत्नमंडीत भासे उफाळा ।
अळंकार भांगार मंडीत केले । बहुभार शृंगारिले सिद्ध जाले ॥ ७७ ॥
गिरीसारिखी चंड वाडें अगारें । बहु मातलीं कुंजरें थोरथोरें ।
पताकां झुली रम्य दिव्यांबरांच्या । बहु रंग लावण्य नानापरींच्या ॥ ७८ ॥
महामस्त ते हस्ति भारें निघाले । त्वरें चालतां भव्य सर्वांग डोले ।
भुमी हाणतां अंदु वाजे खणाणा । बळें वाजती चंड घंटा घणाणा ॥ ७९ ॥
हयारूढ ते वीर कितीक जाले । धडाडीत सेना असंभाव्य चाले ।
शिबीका बहुसाल सुखासनातें । पताका निशाणें फडाडीत वातें ॥ ८० ॥
महावीर शत्रुघ्नु लागवेगीं । सुमंतू प्रधानु तया पृष्टभागीं ।
बहु वाद्य तो घोष गेला दिगंता । ऋषीराज वासिष्ठ त्या मुख्य माता ॥ ८१ ॥
पदीं चालिला मुख्य तो योगिबंधू । सवें घेतला मारुती वीर्यसिंधु ।
महावीर दोघे पुढें शीघ्र आले । असंभाव्य ते भार मागें उदेले ॥ ८२ ॥
पुढें राम तेथूनि वेगीं निघाला । महापुष्पकारूढ होऊनि आला ।
त्वरें पावतां पावतां नंदिग्रामा । करी वीर तो दाखवी शीघ्र व्योमा ॥ ८३ ॥
असंभाव्य तें तेज हेलावताहे । ह्मणे गा करी काय हें येत आहे ।
तया सांगतो मारुती राम आला । नभामाजि तो पुष्पकारूढ जाला ॥ ८४ ॥
पुढें रामभ्राता नमस्कार घाली । सुखाची असंभाव्य ते वेळ आली ।
तया देखतां सौख्य अद्भुत जालें । वरी पाहतां यान सन्नीध आलें ॥ ८५ ॥
पुढें देखिला भव्य तो राजयोगी । असंख्यात सेना तया पृष्ठभागीं ।
त्वरें चालतां धांवतो रामभ्राता । नव्हे धीर त्या भेटिचा काळ येतां ॥ ८६ ॥
बहु रम्य लावण्य कामावतारी । महा वीर दोघे रूपें योगधारी ।
तया देखतां रोम अंगीं थरारी । सुखें पाहतां सर्व सेना थरारी ॥ ८७ ॥
रूपें सारिखे वीर दोघे मिळाले । सुखाचे बहु कोंभ रोमांच आले ।
पदीं ठेविला मस्तकू बांधवानें । तया ऊठवीलें त्वरें राघवानें ॥ ८८ ॥

---

१ बोलाविलें. २ खोगीर. ३ अलंकार. ४ हत्ती. ५ साखळदंड. ६ आकाशाला. ७ जवळ.

स्फुरद्रूप आलिंगनीं वीर गात्रीं । जळें लोटलीं रम्य राजीवनेत्रीं ।
तया रामरामानुजां भेटि जाली । प्रसंगीं तये सृष्टि सुखें निवाली ॥ ८९ ॥
सुमित्रासुता भेटला वीतरागी । नमस्कारिली जानकी ते प्रसंगीं ।
खुणा दावितां रामराजाधिराजें । कपीनाथ आलिंगिला योगिराजें ॥ ९० ॥
पुढें भेटिचा लाभ नैर्ऋत्यनाथा । पदीं ठेविला शीघ्र येऊनि माथा ।
तयालागिं[1] रामानुजें[2] ऊठवीलें । समस्तां विरां राघवें भेटवीलें ॥ ९१ ॥
प्रितीं भेटला अंगदा जांबुवंता । प्रसंगें कपी थोर थोरां समस्तां ।
स्तुतीउत्तरीं बोलती एकमेकां । स्नेह लागला सौख्य जालें अनेकां ॥ ९२ ॥
प्रितीनें तया गुह्का भक्तराजा । कृपाळूपणें भेटला रामराजा ।
नमस्कार केला समस्तां विराला । तयां अंतरीं थोर आनंद जाला ॥ ९३ ॥
पुढें सर्वही पुष्पकारूढ जाले । दळेंशीं महा वीर तैसे निघाले ।
अयोध्यापुरीं देखतां सौख्य जालें । प्रसंगें रघूनायकें दाखवीलें ॥ ९४ ॥
रुद्राच्या मनासारिखें वर्तताहे । महीमंडळीं यान[3] येऊनि राहे ।
भुमीं ऊतरे रामबंधू सितेशीं । कपीनाथ सुग्रीव बीभीषणेंशीं ॥ ९५ ॥
कपी रीस ते भार कोट्यानुकोटी । दिसेना भुमी जाहली थोर दाटी ।
समर्थें विमानासि त्या पाठवीलें । कुबेरासि भेटावया शीघ्र गेलें ॥ ९६ ॥
असंभाव्य तो वाद्यकल्लोळ जाला । कपी पाहतां भार अद्भुत आला ।
रजें व्योमें[4] आच्छादिलें सर्व कांहीं । विरां कुंजरां घोडियां मीति नाहीं ॥ ९७
कपी सर्व चाकाटले[5] पाहताती । गिरीचे परी भार अद्भुत येती ।
कपीभार ते देखिले राजभारें । पहा या दळें लोटलीं तीं अपारें ॥ ९८ ॥
खुणा दाविती एकमेकांस तेथें । मुखें बोलती राहिला राम येथें ।
महा वीर ते मुख्य धांवोनि गेले । कपीभार त्यांमाजि वेगीं मिळाले ॥ ९९ ॥
रघूनायकालागिं शत्रुघ्ननानें । नमस्कार केला तया मंत्रियानें ।
उभा वर्ग ते भेटले राघवाला । तया मानसीं थोर आनंद जाला ॥ १०० ॥
सुमित्रासुता आणि त्या जानकीला । महा वीर तींहीं नमस्कार केला ।
प्रसंगीं समस्तां सिते भेटि जाली । सुखाची नदी अंतरामाजि आली ॥ १०१ ॥
सुमंतू समर्था ह्मणे पैल पाहे । ऋषी जननी मंडळी येत आहे ।
तयें सांगतां राम तो सिद्ध जाला । पदीं चालतां तो पुढें शीघ्र गेला । १०२ ॥
पुढें देखिला तो ऋषी ब्रह्मनिष्ठ । कुळा रक्षिता तो कुळामाजि श्रेष्ठ ।
रघूनाथ तेथें नमस्कार घाली । स्तुतीउत्तरें आदरें भेटि जाली ॥ १०३ ॥
प्रसंगें नमस्कारली मुख्य माता । बहु सौख्य जालें तयां भेटि होतां ।
समस्तां जणींला नमस्कार केले । तया देखतां प्राण त्यांचे निवाले ॥ १०४ ॥
समस्तांस तो भेटला राम जैसा । यथासांग तो वीर सौमित्र तैसा ।
नमस्कार घाली बहु स्तुति केली । तया देखतां मंडळी ते निवाली ॥ १०५ ॥

---

१ बिभीषणाला. २ लक्ष्मणानें. ३ वाहन. ४ आकाश. ५ आश्चर्यचकित होऊन.

सितासुंदरीनें नमस्कार केले । असंभाव्य ते लोक तेथें मिळाले ।
स्तुतीउत्तरें एकमेकांस जालीं । प्रसंगीं तये अंतर तीं निवालीं ॥ १०६ ॥
समस्तां समस्तां जणां भेटि जाली । पहाया सुखें लोकमांदी मिळाली ।
पुरीमाजि तो थोर आनंद जाला । मुखें बोलती हो सुखें राम आला ॥ १०७ ॥
सुखें पाहतां मुख्य माता मिळाल्या । सर्वे सुंदरा त्या असंभाव्य आल्या ।
वधूंची बहू दाटणी थोर जाली । सिता सुंदरी शीघ्र तेथें मिळाली ॥ १०८ ॥
नमस्कारिलें नम्र होऊनि श्रेष्ठां । प्रसंगेंचि भेटी वरिष्ठां वरिष्ठां ।
धडाडां नभीं वाजती चंड भेरी । बहू वारितां जाहली दाटि थोरी ॥ १०९ ॥
महा वैभवाची कथा राघवाची । जुनी सौख्यवार्ताच ब्रह्मादिकांची ।
पुढें रामउपासकें रामदासें । पुरी वर्णिली रम्य नाना विलासें ॥

## प्रसंग बारावा.

पुढें चालिली ते असंभाव्य सेना । रजें मातलें व्योम पूढें दिसेना ।
कितीएक ते भार सन्मूख आले । समर्थांस तींहीं नमस्कार केले ॥ १ ॥
दळें राहिलीं दूरि वेष्टीत पाळों । कपीचक्र एकीकडे चंड मेळा ।
तया मध्यभागीं ऋषी बंधु माता । महावीर ते मुख्य चत्वारि कांता ॥ २ ॥
उभा राहिला राम तो राजभारें । गृहें निर्मिलीं अंबरांचीं अपारें ।
सभामंडपीं धर्मशाळा विशाळा । गृहें रम्य अंतर्गृहें चित्रशाळा ॥ ३ ॥
बहुसाल दिव्यांबरें थोरथोरें । सुचित्रें विचित्रें अमोल्यें अपारें ।
कितीएक त्या लाविल्या स्तंभवोळी । प्रभा रत्नमंडीत तेजें झळाळी ॥ ४ ॥
बहू रत्नमाळा बहू मुक्तमाळा । बहू लागले घोंस नक्षत्रमाळा ।
कितीएक जाळीवरी अंतराळीं । कितीएक मुक्कें निराळीं निराळीं ॥ ५ ॥
सुढाळा किळा मंडपीं ढाळ देती । विशाळा स्थळामाजि त्या दिव्य ज्योती ।
सुवर्णासन दिव्य नानापरींचीं । किती एक सिंहासनें कूसरीचीं ॥ ६ ॥
बहू ते फुलारे बहूतांपरींचे । वरी घोंस हेलावती माणकांचे ।
निळे पाच गोमेद इत्यादिकांचे । बहू रंग नानापरी कांचनांचे ॥ ७ ॥
नभामाजि त्या दिव्य नक्षत्रमाळा । तयाचे परी शोभती मुक्तमाळा ।
विराजे तया मंडपा मध्यभागीं । ऋषी राम माता सखे बंधुवर्गीं ॥ ८ ॥
असंभाव्य ते संपदा वैभवाची । मुखें सर्व बोलावया शक्ति कैंची ।
वरी पाहतां उंच आकाशपंथें । असंभाव्य तें भव्य लावण्य तेथें ॥ ९ ॥
समूदाय तो बैसला स्वस्थ जाला । वधूमेळ अंतर्गृहामाजि गेला ।
ऋषी राम माता सखे बंधुवर्गीं । स्नेहें उत्तरें बोलिजे ते प्रसंगीं ॥ १० ॥
कितीएक तो काळ गेला वियोगें । असंभाव्य तें सौख्य संयोगयोगें ।
सरेना मुखें बोलतां मोह माया । निवालीं मुखें पाहतां सर्व काया ॥ ११ ॥

---

१ लोकसमूह २ स्त्रियांची. ३ नगारे. ४ सैन्यें. ५ समुदाय. ६ चार. ७ वस्त्रांचीं गृहें, तंबू
८ प्रभा. ९ कौशल्यांची. १० सोन्याचे.

कपीनाथ बीभीषणाला भुपाळें। रहाया गृहें दीधलीं तीं विशाळें।
तयांमाजि ते सर्वही स्वस्थ जाले। समर्थें बहु सोहळे दाखवीले॥ १२॥
पुढें मंगलस्नान तेणेंचि काळें। बहूसाल ते चालिलें एक वेळे।
कितीएक ते हाटकाचे तटाकीं। जळें ठेविलीं सेवकें ग्रामलोकीं॥ १३॥
असंभाव्य तीं सिद्ध केलीं फुलेलें। बहूतांपरींचीं सुगंधेल तेलें।
किती चौकिया चौक गंगाळपात्रें। विशाळें पवित्रें सुचित्रें विचित्रें॥ १४॥
सुगंधें रसें चोखण्या कालवील्या। यथासांग सामग्रिया सिद्ध केल्या।
बहु आर्त पोटीं उभा भर्त बंधु। करी प्रार्थना राम कारुण्यसिंधु॥ १५॥
प्रभू बोलता जाहला शीघ्र काळें। किजे मंगळस्नान या लोकपाळें।
अयोध्यापुरीमाजि त्या सर्व लोकां। विरें सर्व संकेत केला अनेकां॥ १६॥
समस्तांसि तात्काळ अभ्यंग जालें। महा लोक ते सर्व सूखें निवाले।
कितीएक सामग्रिया सिद्ध केल्या। कपीनाथ बीभीषणा पाठवील्या॥ १७॥
पुन्हां राम बोले वरिष्ठां वरिष्ठां। किजे मंगळस्नान हो सर्व श्रेष्ठां।
पुढें जननीलागिं देवाधिदेवें। ह्मणे मंगळस्नान तुह्मीं करावें॥ १८॥
समस्तीं यथासांग अभ्यंग केलें। पुन्हां देव तो भ्रातयालागिं बोले।
सखे बोलती स्वामि देवाधिदेवा। तुह्मीं सांग अभ्यंग आधीं करावा॥ १९॥
बहूतांपरी प्रार्थिलें बांधवासी। कितीएक ते सिद्ध जाले विलासी।
उभी मंडळी कूशळां नापितांची। तिहीं मांडिली सांग सेवा प्रभूची॥ २०॥
समश्रू कर्मे जाहली त्या प्रसंगीं। नखें काढिलीं नीळरंगी तरंगी।
जटाजूट ते मोकळे केश केले। स्नेहे घालितां दिव्य चक्षू निवाले॥ २१॥
पुढें दर्पणीं पाहिलें रूप रामें। प्रसंगीं तये कोटिकंदर्पधामें।
कळा बाणली भव्य लावण्य गात्रीं। असंभाव्य सौंदर्य राजीवनेत्रीं॥ २२॥
जळें पादप्रक्षालना सिद्ध जालीं। पदीं लागतां स्वर्गगंगा निवाली।
पदांगुष्ठ भागीरथी ओघ आला। जनें मज्जनें लोक निर्दोष केला॥ २३॥
पुढें तीर्थ वंदूनि बंधूजनानें। निवाले पवित्रोदकें तीर्थ पानें।
बहु लाविलें लोचना आवडीनें। मनीं मानिलें सौख्य या बांधवानें॥ २४॥
बहूसाल आयुष्य हो कल्पकोडी। घडावी सदा सर्वदा भक्तिजोडी।
सुगंधें फुलेलें चवाबीत माथां। महामस्तकीं मर्दिती लोकनाथा॥ २५॥
बहु मर्दना सांग नाना परीची। लिळें काढिली ते मळी निर्मळाची।
जळें निर्मळें घालिती उष्ण धारा। सुखें बोलती तोय आणीक सारा॥ २६॥
शिरीं घालिती तोय नेटें घळाळां। नयां वाहती उष्ण वोघें खळाळां।
सुगंधेंचि दोहीं तिरीं पंक जाला। असंभाव्य तो भृंग तेथें मिळाला॥ २७॥
यथासांग अभ्यंग केलें भुपाळें। पुढें रम्य दिव्यांबरें शीघ्र काळें।
महा तेज पुंजाळ तें लागवेगीं। विरें वल्कलें त्यागिलीं ते प्रसंगीं॥ २८॥

१ सोम्याचे. २आवड ३न्हाव्यांची ४तेल. ५डोळे. ६आरशांत. ७कोट्यावधी मदनाहूनही सुंदर अशा रामानें.

प्रसंगीं तये रत्नमंडीत मानें । पुढें पादुका ठेविल्या बांधवानें ।
वसिष्ठासि रामें नमस्कार केला । महावीर तो बैसला स्वस्थ जाला ॥ २९ ॥
बहु कस्तुरी केशरें तेचि काळीं । ऋषी राम वीलेपवी गंध भाळीं ।
बहु भूषणें रत्नमंडीत रामें । अमूल्यें सुखें घेतलीं पूर्णकामें ॥ ३० ॥
उटी घेतली घातल्या पुष्पमाळा । बहूतांपरींच्या बहु रत्नमाळा ।
महामस्तकीं हेमें मुगूट साजे । असंभाव्य तो तेजकल्लोळ माजे ॥ ३१ ॥
वरी कीरटी कुंडलें वैजयंती । अलंकार नानापरी ढाळ देती ।
रुचिरें सुंदरें घातला भव्य वांटा । कटीं किंकिणी नागरा क्षुद्र घंटा ॥ ३२ ॥
वरी कंकणें मुद्रिका चापपाणी । बिरुदें घातलीं अंदु वांकी झगागी ।
महीमंडळीं सर्वही एक जाले । रघूनायका भव्य लावण्य आलें ॥ ३३ ॥
पहातां नये तूळणा हीं तुळायां । विराजे बहु भूषणें दिव्य काया ।
ऋषी राजबंधू सखे आणि माता । सुखें पाहती राम हा सौख्यदाता ॥ ३४ ॥
प्रितीनें सुखें बोलतां राम जाला । म्हणे स्नान कीजे तया बांधवाला ।
स्नेहें उत्तरें बोलतां शीघ्र तैसें । किजे मंगळस्नान नाना विलासें ॥ ३५ ॥
जटाजूट ते मोकळे सर्व केले । मळें त्यागिले भव्य सुस्नात जाले ।
सुगंधें उटी घेतले पुष्पमाळा । अलंकार दिव्यांबरें रत्नमाळा ॥ ३६ ॥
प्रसंगें समस्तांसि अभ्यंग जालें । सभोंते सखे आप्त सर्वं मिळाले ।
अलंकार दिव्यांबरें दिव्य माता । सुखें राघवा पाहती त्या समस्ता ॥ ३७ ॥
फळें खाद्य नैवेद्य नानापरींचे । फळाहार ते आणिले कूमरीचे ।
बहूतांपरींचे बहु उंच मेवे । म्हणे राम सर्वांस ते पाठवावे ॥ ३८ ॥
समस्तांसि कावडे ते पाठवीले । फळें सेवितां लोक संतुष्ट जाले ।
स्वइच्छा स्वयें सेविलें अल्प कांहीं । जयीं सेवितां तूळणा त्यांसि नाहीं ॥ ३९ ॥
जळें निर्मळें आचमनें शुद्ध केलीं । समस्तांसि पानें बहु पाठवीलीं ।
विडे घेतले सर्वही स्वस्थ जाले । असंभाव्य ते पाकही सिद्ध जाले ॥ ४० ॥
पुढें मंडळी सेवकांची मिळाली । विशाळें स्थळें सर्वही सिद्ध केलीं ।
बहु चित्रशाळा बहू होमशाळा । सडे शिंपिले घातल्या रंगमाळा ॥ ४१ ॥
बहु रत्नमंडीत मोठीं अचाटें । दुकांठीं बहू मांडिलीं दिव्य ताटें ।
कितीएक तीं वतिसा वाटियांचीं । कितीएक विस्तीर्ण नानापरींचीं ॥ ४२ ॥
असंभाव्य तीं रम्य चित्रें विचित्रें । बहूतांपरींचीं बहु तोयपात्रें ।
बहू आसनें दिव्य नानापरींचीं । असंभाव्य तीं घातलीं कूमरीचीं ॥ ४३ ॥
बहुवर्ण दिव्यांबरें पट्टकूळें । बहूरंग नानापरींचीं दुकूळें ।
असंभाव्य तीं सोंवळीं सिद्ध केलीं । कितीएक दिव्यांबरें आणवीलीं ॥ ४४ ॥
पुढें भोजना सर्वही सिद्ध जाले । कितीएक ते लक्षकोटी मिळाले ।
मिळाली ऋषीमंडळी ब्राह्मणांची । बहू दिव्य मार्तंड जैसे विरिंची ॥ ४५ ॥

---

१ सोन्याचा. २ वस्त्रें. ३ वस्त्राचा पट्टा. ४ पुष्कळ. ५ पाण्याचीं भांडीं. ६ रेशमी वस्त्रें.

वयें धाकुटे थोर कोट्यानुकोटी । स्थळें रुंधिलीं जाहली थोर दाटी ।
बहुसाल संतोषले थोर तोषें । असंभाव्य ते गर्जती नामघोषें ॥ ४६ ॥
बहुसाल गंधाक्षता पुष्पमाळा । वरी धौतपात्रें दिल्या रत्नमाळा ।
चिरें सुंदरें रम्य यज्ञोपवीतें । धनें चंदनें दीधलीं ब्राह्मणांतें ॥ ४७ ॥
पुढें वाढिते जाहले शीघ्र काळीं । बहु दाटल्या त्या असंभाव्य ओळी ।
महा मंडपीं बैसला रामराजा । ऋषी मुख्य बंधू सखे आप्त वोजा ॥ ४८ ॥
पुढें रत्नझाऱ्या बहूसाल चंबू । सुवासी तयांमाजि संपूर्ण अंबू ।
स्थळें सर्वही सिद्ध पूर्वींच केलीं । असंभाव्य अन्नें बहू आणवीलीं ॥ ४९ ॥
कपीनाथ सुग्रीव बीभीषणाला । बहु धाडिलीं दिव्य अन्नें नगांला ।
रसें पूर्ण त्या कावडी लक्ष कोटी । पथामाजि नेतां असंभाव्य दाटी ॥ ५० ॥
पुढें वाढिते जाहले पात्रधारी । असंभाव्य ते चालिले एकहारी ।
रुची रायतीं लोणचीं रम्य वोळीं । बहू स्वाद शाखावळी शीघ्र काळीं ॥ ५१ ॥
बहू वाढिला ओदनू तो सुवासें । वरान्नें क्षिरी शर्करा पंच भक्ष्यें ।
कितीएक आणीक नानापरींचीं । बहू वाढिलीं भिन्नभिन्नां रुचींचीं ॥ ५२ ॥
सुगंधें तुपें वाढिती ते खळाळां । पयें घालिती थोर नेटें घळाळां ।
पुढें दिव्य नाना रसें पूर्ण पात्रें । सभा शोभली भव्य राजीवनेत्रें ॥ ५३ ॥
बहूसाल संतोष नाना सुवासें । ऋषीमंडळी गर्जती नामघोषें ।
पुढें सर्व ओंगारिती सावकाशें । सुखें जेविती सर्व नानाविलासें ॥ ५४ ॥
गिरीसारिखा ओदनू शुभ्र वर्णें । बहु भक्षिलीं भक्ष्य संपूर्ण पूर्णें ।
कथा मागुती सांगती एकमेकां । असंभाव्य ते तृप्त जाली अनेकां ॥ ५५ ॥
कढी वर्पिती आवडीनें फरारां । ऋषी जेविती ढेंकरीती डरारां ।
पुरे हो पुरे अन्न उदंड झालें । बहु भोजनें कंठमर्याद आलें ॥ ५६ ॥
पुढें शीघ्र दध्योदनें लागवेगीं । पुन्हां वाढिते जाहले ते प्रसंगीं ।
ऋषी राम बंधु सखे सर्व माता । मुखें बोलती सर्वही तृप्ति आतां ॥ ५७ ॥
सुवासें रुचीचीं असंभाव्य तक्रें । कदाही कधीं नेणिजे स्वाद शक्रें ।
सुखें सेविती जेविती लोक इच्छा । यथासांग संपूर्ण जाले स्वइच्छा ॥ ५८ ॥
यथासांग तीं भोजनें सर्व जालीं । खळाळें वरीं आचमनें शुद्ध केलीं ।
सुपारी विडे दीधले कर्पुराचे । बहू चूर्ण तें शुद्ध मुक्ताफळाचें ॥ ५९ ॥
सुवासी चतुर्भाग मागून घेती । सुखी जाहल्या सर्वही वेदमूर्ती ।
बहूसाल मंत्राक्षता मंत्रघोषें । मुखें बोलती सर्वही विप्र तोषें ॥ ६० ॥
कपी रीस ते सर्वही तृप्त जाले । बहु भक्षिलें अन्न सूलें निवाले ।
गिरीसारिखीं राहिलीं सर्व अन्नें । विडे द्यावया धाडिलीं त्यांसि पानें ॥ ६१ ॥
यथासांग सर्वस्व संतृप्ति जाली । सभामंडपीं मंडळी ते मिळाली ।
पुढें ब्राह्मणीं मांडिली धर्मचर्चा । मुखें बोलती धन्य दीन सुवाचा ॥ ६२ ॥

---

१ वस्त्रें. २ उदक, पाणी. ३ भात. ४ वरण. ५ खिरी. ६ वाढतात. ७ पुष्कळ. ८ इंद्रानें. ९ चुना. १० कात. ११ ब्राह्मण.

पुढें दीनें तो चालिला अस्तमाना । नमायासि आली असंभाव्य सेना ।
कितीएक तीं दीवट्यांचीं अचाटें । सभामंडपीं चाललीं दाट थाटें ॥ ६३ ॥
प्रसंगीं तये वादकल्लोळ जाला ॥ दुरस्ता बहु लोक सूखें मिळाला ।
विराजे सभेमाजि तो रामराजा । पुढें चालिल्या त्या बळावंत फौजा ॥ ६४ ॥
झणाणीत वीणे मनोरम्य नादें । दणाणीत मृदुंग गंभीर शब्दें ।
अलापें कळा दाविती रागमाळा । सुरें सुस्वरें माजली रंगवेळा ॥ ६५ ॥
बहु ताळ कल्लोळ वाजे खणाणां । विणे वाजती तंतुनादें झणाणा ।
बहु गीत संगीत तें कूसरीची । भले जाणती ते घडी अमृताची ॥ ६६ ॥
असंभाव्य तो नृत्यकल्लोळ जाला । सुखें पाहतां शुद्धि नाहीं जनांला ।
गुणीं रातले मातले गायनानें । तदाकार ते वर्तिले केली मनानें ॥ ६७ ॥
अळंकार चीरें पुढें दीग केले । बळावंत ते सर्व संतुष्ट जाले ।
विसर्जी सभा तो पुढें रामराजा । निरोपेंचि गेल्या बहु लोकफौजा ॥ ६८ ॥
समस्तीं घडी एक विश्रांति केली । अकस्मात प्रभात ते प्राप्त जाली ।
पुढें सारिते जाहले नित्य नेमें । महावीर ते आपुलाल्या स्वधर्में ॥ ६९ ॥
सभे बैसिजे स्वामि देवाधिदेवें । लगे आजि वेगीं अयोध्येसि जावें ।
पुरी सर्व शृंगारमंडीत केली । असंभाव्य ते सर्व सेना निघाली ॥ ७० ॥
महीमंडळीं मुख्य आर्षी पुराणीं । सुखें बोलिजे ते रवी वंशखाणी ।
अयोध्यापुरी धन्य हे पुण्यराशी । किती राहिले तापसी तीर्थवासी ॥ ७१ ॥
मुनी संत योगी सदा वीतरागी । उदासीन साधु पराचे विभागी ।
ऋषीमंडळी सात्विकां सज्जनांची । महा योगि व्युत्पन्न विद्वज्जनांची ॥ ७२ ॥
कितीएक ते मंडळी प्रेमळांची । कितीएक ते ब्राह्मणां सूशिळांची ।
मनस्वी किती ते यती ब्रह्मचारी । बहुतांपरींचे बहु वेषधारी ॥ ७३ ॥
सदा सर्वदा योग ध्यानस्थ जाले । कितीएक ते काळ घेऊनि गेले ।
भुयारें मठ्या त्या बहुतांपरींच्या । नदीचे तिरीं पर्णशाला मठाच्या ॥ ७४ ॥
प्रभू देव हा सर्व ब्रह्मादिकांचा । जया वर्णितां शिणल्या वेदवाचा ।
स्वयें वास जेथें जगन्नायकाचा । महीमा वदे कोण त्या हो स्थळाचा ॥ ७५ ॥
कितीएक ते राहिले भक्त ज्ञानी । कृपाळू बहु मुख्य नामाभिमानी ।
बहू सुकृती मूर्त जैसे तपाचे । सदा धर्मचर्चा अखंडीत वाचे ॥ ७६ ॥
नदी चालिली भव्य ते पूर्णतोया । जनांलागिं आधार आली उपाया ।
शिवालयें बहु बांधिलीं थोरथोरें । ध्वजा देउळें शीखरें तीं अपारें ॥ ७७ ॥
तडागें जळें निर्मळें कूप बावी । सदा सर्वदा राहिजे मानुभावीं ।
स्थळें निर्मळें निर्मिलीं पावनानें । कितीएक कल्पतरूंचीं उद्यानें ॥ ७८ ॥
कितीएक त्या लागल्या वृक्षजाती । वनें वाटिका जीवनें पुष्पजाती ।
अयोध्यापुरी रम्य लावण्य नांवें । महारम्य विस्तीर्ण ते बीस गांवें ॥ ७९ ॥

१ दिवस. २ कुशळतेची. ३ वस्त्रें. ४ परब्रह्माचे. ५ पुण्यवान. ६ तलाव, तळीं. ७ बागा.

गृहें बांधिलीं तीं असंभाव्य उंची । कितीएक तीं पंच सप्तां खणांचीं ।
सजे चौक दामे दरें थोरथोरें । विशाळें विचित्रें गवाक्षें अपारें ॥ ८० ॥
बिदी हाट बाजार चौबार कुंचे । असंभाव्य ते भव्य नाना परीचे ।
कितीएक तीं सारखीं दीसताती । महा धूर्त तेही बळें भ्रांत होती ॥ ८१ ॥
गृहें गोपुरांचीं बहु हाट खेटा । हुडे माडिया ऊपरा त्या अचाटा ।
महाभाग्य श्रीमंत ते लोक तेथें । सदा सर्वदा दाटणी थोर पंथें ॥ ८२ ॥
पुरीमाजिचे लोक आरोग्य भारी । मुलें लेंकरें थोरले आणि नारी ।
करंटें तयांमाजि कोणीच नाहीं । नसे द्वेष ना मत्सरू सर्व कांहीं ॥ ८३ ॥
सदानंद उद्वेग नाहीं जनांला । नव्हे वृद्ध ना मृत्यु नाहीं तयांला ।
कुरूपी महामूर्ख तेथें असेना । सुखाचें जिणें दैन्यवाणें दिसेना ॥ ८४ ॥
पुरीमाजि ते सर्वही लोक कैसे । सुवर्णाचळीं नांदती देव जैसे ।
प्रतापी बळाचे सदा सत्य वाचे । पुरीमाजि लावण्यदेहे जनांचे ॥ ८५ ॥
बहु नीतिन्यायें विवेकें उपायें । कदाही तया बाधिजे ना अपायें ।
बहुतां धनांचे उदारा मनांचे । विशेषा गुणांचे गुणी सज्जनांचे ॥ ८६ ॥
पुरीमाजि त्या सर्व चातुर्य मोठें । कदाही मनीं नावडे त्यांसि खोटें ।
विलासें वसे राम आणीक विद्या । कळा सर्व साधारणा सर्व साध्या ॥ ८
अळंकार दिव्यांबरें सर्व लोकां । सदा प्रीतिनें बोलती एकमेकां ।
महा वैभवाचे बहु सुकृताचे । पुरीमाजि ते लोक नानागुणांचे ॥ ८८ ॥
पुरीमाजि ते दाटणी मंदिरांची । रिकामी भुमी ते रहायासि कैंची ।
तया मध्यभागीं असंभाव्य तेथं । महा भुवनें उंच आकाशपंथें ॥ ८९ ॥
गृहें गोपुरें निर्मिलीं कांचनाचीं[3] । बहुसाल विश्रांतिदातीं मनाचीं ।
महारत्नमंडीत तीं थोरथोरें । किती धाकटीं भव्य मोठीं अपारें ॥ ९० ॥
भुमी बांधल्या पांचवंदी विशाळा । मनोरम्य त्या रेखिल्या चित्रशाळा ।
कितीएक दारें लघू थोरथोरें । स्थळें दिव्य तीं पाहतां सौख्यकारें ॥ ९१ ॥
किती अन्नशाळा किती वस्त्रशाळा । कितीएक विस्तीर्ण त्या होमशाळा ।
किती नाट्यशाळा बहु रत्नशाळा । कितीएक त्या धर्मशाळा विशाळा ॥ ९२ ॥
गृहें रम्य अंतर्गृहें हाटकाचीं । बहु हामल्या पूतळ्या नाटकांचीं ।
भुयारें घरें वीवरें गुप्त द्वारें । स्थळें भव्य वैमाविया थोरथोरें ॥ ९३ ॥
सभामंडपीं ते असंभाव्य शोभा । बहू शोभतो हेमकल्लोळ गाभा ।
फुलारे बहु लाविले माणिकांचे । कितीएक ते घोंस मुक्ताफळांचे ॥ ९४ ॥
महीमंडळीं तेज पुंजाळ जालें । असंभाव्य तें सर्व लावण्य आलें ।
विशाळा स्थळां निर्मिल्या भव्य भिंती । निळे पाच गोमेद ते ढाळ देती[4] ॥ ९५ ॥
बहू रत्न पुंजाळलें ज्वाळ जैसे । असंभाव्य हारी उभे स्तंभ जैसे ।
विशाळें स्थळें निर्मिलीं जाड कैशीं । सुवर्णाचळामाजि विस्तीर्णें जैशीं ॥ ९६ ॥

---

१ सुंदर गृहें. २ खिडक्या. ३ सोन्याचीं. ४ प्रभा, तेज.

विचित्रा कळा कूसरी लेखनांच्या । बहुरत्नमंडीत त्या कांचनाच्या ।
सभामंडपीं फांकल्या रत्नकीळा । दिसे रंग तेथें निराळा निराळा ॥ ९७ ॥
कितीएक तीं फत्तरीं दिव्य कोर्णे । बहुतांपरींचीं बहू रंग वर्णे ।
कितीएक हेलावतां हेमपर्णे । कितीएक घंटावळी त्या सुवर्णे ॥ ९८ ॥
स्थळें शोभती रम्य बैसावयाचीं । बहुसाल तीं भिन्नभिन्नां परींचीं ।
कितीएक तीं रत्नमंडात यानें । कितीएक सिंहासनें तीं विमानें ॥ ९९ ॥
बहू बैसका दिव्य रम्यांबरांच्या । विचित्रा बहूरंग नानापरींच्या ।
वरी लोंबती घोंस मुक्ताफळांचे । कितीएक मुक्तावळी जाळियाचे ॥ १०० ॥
कितीएक रत्नावळी रम्य कैशा । कितीएक मुक्तावळी शुक्र जैशा ।
प्रभेचे बहू घोंस हेलावताती । बहूतांपरींच्या बहू रत्नजाती ॥ १०१ ॥
स्थळें निर्मिलीं रम्य विस्तीर्ण नाना । कितीएक बैसावया सर्व सेना ।
कितीएक विस्तीर्ण राजांगणें ते । भुमी पाचबंदी महा रम्य तेथें ॥ १०२ ॥
हुंडे कोठ माड्या सजे मोठमोठे । उभे राहिले भव्य ब्रह्मांड वाटे ।
असंभाव्य चर्या लघू पंथ हारी । नभा भासवी रूप नाना विकारी ॥ १०३ ॥
झरोके कितीएक त्या गुप्त वाटा । किती उंवऱ्या अंतराळीं अचाटा ।
कितीएक त्या भक्ति मंडपारसाच्या । कितीएक त्या उंच तेगा खणांच्या ॥ १०४ ॥
वरी रत्नकळसाचिया रम्य ओळी । रविकिर्णि तैसा कळा अंतराळीं ।
वरी लागल्या सर्व नक्षत्रमाळा । मनीं भासती फांकती दिव्य कीळा ॥ १०५ ॥
रवीवंशिंचे सर्वविख्यात राजे । तयांच्या प्रतापें त्रिधीगोळ गाजे ।
करी कोण संख्या तया वैभवाची । उणी वर्णितां बुद्धि ब्रह्मादिकांची ॥ १०६ ॥
किती कोण लेखा मला मानवाला । मतीमंद मी काय वर्णूं तयाला ।
म्हणे दास त्या अल्पशा भक्तिभावें । प्रभू बोलल्या उत्तरीं तोषवावें ॥ १०७ ॥

---

## प्रसंग तेरावा.

पुरी वर्णिली हो यथासांग येथें । परी पाहतां दीसतें अल्प तेथें ।
मनीं संशयो श्रोतयां प्राप्त जाला । प्रतीउत्तरें काय दील्हीं तयाला ॥ १ ॥
अयोध्यापुरी स्वर्गलोकासि गेली । पुढें ओस होतांचि ते भग्न जाली ।
असेना जना राहणें वस्ति जेथें । खडे माणिकें कोण ठेवील तेथें ॥ २ ॥
पुरें पट्टणें ओस होती कितीकें । पुढें पाहतां दीसती सर्व टेकें ।
युगें लोटतांही वसे अल्प कांहीं । असंभाव्य हें तूं विचारूनि पाहीं ॥ ३ ॥
असो तूटला संशयो श्रोतयांचा । पुढें राहिला ओघ जातां कथेचा ।
अयोध्यापुरा चालिले वीर जेठी । निघाले स्वयंभार कोट्यानुकोटी ॥ ४ ॥
ऋषी राम ते चालिले नीज भारें । दळें चालिलीं पृष्ठभागीं अपारें ।
सिबीका पुढें चालती दिव्य हारीं । सखे लोक बंधू मधें रावणारी ॥ ५ ॥

---

१ कौशल्य. २ वाहनें ३ मुंदर रत्नांच्या. ४ बुरूज. ५ माड्या. ६ आकाशांत. ७ ब्रह्मांड ८ मन्य ९ राम.

पुढें दाटल भार माहारथांचे । दळीं घोष जाले गजां घोडियांचे ।
गिरीतुल्य सेना रिसांवानरांची । बहू दाटि राक्षेस लंकापतीची ॥ ६ ॥
पुरी पावतां रुंधल्या सर्व वाटा । असंभाव्य तो जाहला दाट खेटा ।
शतांचीं शतें धांवती वेत्रधारी । दळें माजलीं कोण कोणास वारी ॥ ७ ॥
कितीएक ग्रामस्थ मध्येंचि गेले । कितीएक ते चूकले भ्रांत जाले
अयोध्यापुरीमाजि ऊर्मी अचाटें । गृहें गोपुरें पाहती दाट थाटें ॥ ८ ॥
करीं रत्नताटें कितीएक हारीं । असंभाव्य त्या चालिल्या दिव्य नारी ।
बहूसाल नीरांजनें लक्ष कोटी । पुरींतूनि येतां पुढें थोर दाटी ॥ ९ ॥
रूपें राजसा सुंदरा त्या प्रितीनें । रघूनाथ ओंवाळिती आवडीनें ।
मनामाजि ते लागलीसे अवस्था । सुखें पाहती एकपत्नीव्रतस्था ॥ १० ॥
करीती बहू सुंदरा अक्षवाणें । कितीएक ओंवाळिती लिंबलोणें ।
असंभाव्य थावे तया नायकांचे । मुखें गर्जती भाट वेताळ वाचे ॥ ११ ॥
पताका निशाणें बहु रंग वर्णें । महातेज पुंजाळ मार्तंडवर्णें ।
वरी दाटलीं तीं असंभाव्य छत्रें । भ्रमों लागलीं दिव्य छत्रें विचित्रें ॥ १२ ॥
पहा हो पहा पैल तो राम आला । असंभाव्य हा वीरमेळा मिळाला ।
दिसेना पुढें पाहतां गर्द जाला । समस्तीं करें ताळिकाघोष केला ॥ १३ ॥
पुढें सर्वही भूवनामाजि गेले । महावीर ते बैसले स्वस्थ जाले ।
पुरीमाजि आनंद सर्वांस जाला । उभे राहिले भाग्य हें राम आला ॥ १४ ॥
ऋषी सांगती हे बरी शुद्ध वेळा । त्वरें बैस भद्रासनीं तूं नृपाळा ।
समस्तांसि आनंद राज्याभिषेकें । ऋषी अक्षता टाकिती मंत्रघोषें ॥ १५ ॥
विधीयुक्त भद्रासनीं रामराजा । यथायोग्य संपादिली सांग पूजा ।
कितीएक पुष्पांजळी वाहताती । सदानंद आनंद सूखें पहाती ॥ १६ ॥
असंभाव्य नानापरी दान केलें । बहूतांपरी याचकां तोषवीलें ।
गिरीचेपरी शर्कराढीग केले । कितेकीं समस्तांसि ते पाठवीले ॥ १७ ॥
नभीं दाटलीं मेघडंब्रें अपारें । कितीएक तीं चामरें थोरथोरें ।
असंभाव्य हेलावती रत्नपुच्छें । बहू डोलती उन्मतें शक्र तुच्छें ॥ १८ ॥
सुचित्रें विचित्रें रवीतेजपात्रें । असंभाव्य तीं दाटलीं भव्य छत्रें ।
विशाळा पताका सतेजें निशाणें । वरी सर्व आच्छादिलें व्योम तेणें ॥ १९ ॥
असंभाव्य ते दाटली भीमसेना । प्रसंगें त्रिरीं घाव केला निशाणा ।
महादिव्य सिंहासनीं रामराजा । पडागा भमों लागल्या वीर फौजा ॥ २० ॥
बरी रामराज्ञ गुढी उभवीली । गजेबी सुखें लोकमांदी मिळाली ।
भडा घालिती राम पाहावयाला । समस्तां मनीं थोर आनंद जाला ॥ २१ ॥
पुरीमाजि तीं वैभवाचीं अचाटें । दुर्ताळीं तिताळीं उभीं लोकथाटें ।
खुणा दाविती सांगती एकमेकां । बहूवीध तो राम वेधी अनेकां ॥ २२ ॥

१ मेळे. २ बंदीजन. स्तुतिपाठक. ३ अपदागिरी. ४ सिंहासनीं. ५ लोकसमूह. ६ दुसऱ्या मजल्यावर.

दमामे धमामे दडाडां धडाडां । बहू वाजवी चंड भेरी भडाडां ।
तुतारे नगारे बहु शंख शृंगें । किती चौघडे ढोल कर्णे बुरंगें ॥ २३ ॥
तुरें गंभिरें तीं बहू गर्जताती । कितीएक पांवे सुर्वी घोष वाती ।
नफेऱ्या बहू दुंदुभी घोष जाला । असंभाव्य तो वाद्यमेळा मिळाला ॥ २४ ॥
कितीएक ते चौघडे वाजताती । कितीएक ते वागडे नाचताती ।
कितीएक ते मागुते मेळ आले । कितीएक ते वेषधारी मिळाले ॥ २५ ॥
कितीएक थोंबे कुळावंत गाती । हरीदास ते कीर्तनीं गर्जताती ।
कितेकी गुणीं नाचणी नृत्यरंगें । अलापें कळा रागरंगें तरंगें ॥ २६ ॥
कितीएक वाखाणिती भाट ब्रीदें । कितीएक ते छंद नाना विनोदें ।
दिंडीगान तें मांडिलें वासुदेवीं । बहू कीनऱ्या लाधले लोक जीवीं ॥ २७ ॥
कितीएक ते भैरवाचे मिळाले । कमाचे कितीएक घेऊनि आले ।
कितीएक ते नाचताती धवावां । सुवें डोलती वाजवीती खवावां ॥ २८ ॥
कितीएक ते गारुडी नाचताती । गळे फूगले घागऱ्या लोळ घेती ।
कितीएक ते लोक नाना गुणांचे । ब्रिदें अंकुशें लाविले भार कुंचे ॥ २९ ॥
कितीएक ते भोंवती भेद नाना । श्रमों लागले पाय भूमीं स्थिरेना ।
कितीएक ते टीपऱ्या खेळताती । मिळाले सभेळे बहू वाजताती ॥ ३० ॥
घनें सुस्वरें नाद कल्होळ जाला । बहूतांपरींचा बहू लोक आला ।
महद्भूत ते माजली रंगवेळा । दणाणी मही नाद गेला भुगोळा ॥ ३१ ॥
निशी प्राप्त जाली असंभाव्य दाटी । बहू दीवट्या लक्ष कोट्यानुकोटी ।
कितीएक ते उंच नेले उमाळे । नळे जाळितां घोष तैसे उफाळे ॥ ३२ ॥
सरारां फुलें धांवती अंतराळीं । कडाडीत घोषें निराळीं निराळीं ।
भुरारां हवाया कितीएक वेळां । बळें पाहती ऊर्ध्व नक्षत्रमाळा ॥ ३३ ॥
बहू औषधें दिव्य नानापरींचीं । कितीएक तेजाळ तीं कूसरींचीं ।
घडीनें घडी तेजपुंजाळ होती । उजेडेंचि ते लोक लोकां पहाती ॥ ३४ ॥
पुढें ऊठिला राम तो ते प्रसंगीं । प्रभू चालिला भूवनामाजि वेगीं ।
समस्तांसि आरोगणा सांग केली । विडे कर्पुरे घेतले तृप्ति जाली ॥ ३५ ॥
गृहें दीधलीं रम्य दिव्यांबरांचीं । दळें स्वस्थ जालीं रिसांवानरांचीं ।
कपी वीर राक्षेस मूखें निघाले । सुखप्तीचिया भूवनामाजि गेले ॥ ३६ ॥
सुवर्णांचिया मंचकीं मृदु शय्या । वरी सूमनें सेज त्या देवराया ।
सभामंडपीं ते निशी अर्ध केली । प्रभूनें यथासांग विश्रांति केली ॥ ३७ ॥
निजेले ऋषी राव तो बंधु माता । यथायोग्य विश्रांति जाली समस्तां ।
कितीएक त्या वीरफौजा समस्ती । असंभाव्य तो वाद्यकल्लोळ वस्ती ॥ ३८ ॥
प्रभातींचि उठोनियां नित्य नेमें । किजे स्नानसंध्यादिकें सांग कर्में ।
कितीएक दानें कितीकां परींचीं । धनें कांचनें भव्य नानापरींचीं ॥ ३९ ॥
अळंकार मुक्ताफळें मुक्तमाळा । कितीएक दिव्यांबरें रत्नमाळा ।

---

१ कलावंतिणी. २ रात्र. ३ चंद्रज्योती. ४ जेवण. ५ शयनगृहांत. ६ फुलें.

कितीएक धोत्रें कितीएक पात्रें । दिलीं ब्राह्मणां दान राजीवनत्रें ॥ ४० ॥
कितीएक कोट्यावधी गोधनांचीं । कितीएक लक्षावधी कुंजरांचीं[1] ।
बळाचे बहु अश्व ते पारखीले । धनेंशीं द्विजां ब्राह्मणां दान केले ॥ ४१ ॥
ऋषीं बांधवीं सारिलीं स्नानदानें । यथायोग्य उंचासनें स्थान मानें ।
सभेमाजि तो बैसला रामराजा । निघाल्या कपी रीस राक्षेस फौजा ॥ ४२ ॥
कपीनाथ तो अंगदू जांबुवंतु । कूमुदू गजू वीनतू वीर्यवंतू ।
महावीर लंकापती मारुती तो । सुमूखू द्विवीदू कपी केसरी तो ॥ ४३ ॥
प्रमाथी गवायू निळू हेमकूटू । सुषेणू नळू मैंद मोठा अचाटू ।
कपी क्रोधनू ऋषभू आणि शर्भू । गवाक्षू दधीमूख स्वेदू शराभू ॥ ४४ ॥
कपी रीस राक्षेस कोट्यानुकोटी । असंभाव्य ते चालिले रामभेटी ।
समस्तीं प्रभूला नमस्कार केले । पुढें सर्वही हात जोडूनि ठेले ॥ ४५ ॥
समस्तीं विरीं रामगूणागराला । बहु प्रार्थिलें त्या दयासागराला ।
समस्तांसि देवें निरोपासि यावें । ह्मणे राम तो शीघ्र जेऊनि जावें ॥ ४६ ॥
नमस्कार केले तया विश्ववंद्या । पुढें शीघ्र संपादिली स्नानसंध्या ।
असंभाव्य तीं दिव्य अन्नें सुवासें । बहू पंगती घातल्या सावकाशें ॥ ४७ ॥
ऋषी राम ते सर्वही बंधुवर्गीं । कितीएक ते बैसले आप्तवर्गीं ।
प्रभा फांकली दिव्य रत्नीं अनर्घीं[2] । कपी रीस ते बैसले जेविं स्वर्गीं ॥ ४८ ॥
हरी[3] ऋक्ष राक्षेस सर्वे मिळाले । असंभाव्य ते भोजनालागिं आले ।
बहु पाकनिष्पत्ति नानापरींची । पक्वान्नें रसाळें कळाकूसरीचीं ॥ ४९ ॥
जगज्जननी जानकी वाढिताहे । सुवासें महा सौख्य तें होत आहे ।
यथासांग संपूर्ण तें अन्न जालें । पुढें शीघ्र तें शर्करा[4] आज्य[5] आलें ॥ ५० ॥
पयादीक नाना रसें पूर्ण पात्रें । त्वरें घेतले ग्रास राजीवनेत्रें ।
समस्तांसि आज्ञापिलें देवधीशें । कपी सर्वही गर्जती नामघोषें ॥ ५१ ॥
तयां जेवितां जेवितां भक्ष्य जालें । पुन्हां मागुती खाद्य ऊदंड आलें ।
घृतें वाढितां वाढितां ओघ गेले । असंभाव्य नानापरी तृप्त केले ॥ ५२ ॥
अपेक्षी तया मागती सर्व शाका । किती एक ते आणवीती [illegible] ।
क्षिरी लोणचीं रायतीं भात भक्षें । खुणा दाविती मागती एक तक्रें ॥ ५३ ॥
जळें शीतळें सर्वही सेविताती । पुन्हा मागुते वीर ते जेविताती ।
समस्तांसि तीं सांग संपूर्ण जालीं । पुढें शीघ्र दध्योदनें आणवीलीं ॥ ५४ ॥
बहू जेवितां जेवितां एक मध्यें । प्रतापें मुखें बोलती श्लोक [illegible] ।
मनीं भासती अर्थ नानापरींचे । मुखें रामनामें [illegible] वाचें ॥ ५५ ॥
समस्तांसि तें सर्व संपूर्ण जालें । महा तृप्तिनें लोक [illegible] ।
वरी आच्मनें शुद्ध केलीं खळाळां । कितीएक ते [illegible] ॥ ५६ ॥
सभामंडपीं सर्वही स्वस्थ झाले । सुगंधी विडे शीघ्र ते आणवीले ।

---

१ हत्तींचीं. २ मोल न करतां येणाऱ्या. ३ वानर. ४ गोड. ५ तूप. ६ कढी.

समस्तांसि संपूर्ण गंधें सुवासें । कपी पूजिले सर्व नाना विलासें ॥ ५७ ॥
समस्तीं विडे घेतले पीतवर्णें । सुपारी बरी कर्पुरू मुक्तचूर्णें ।
बहु वेळ लौंगा सुवासें खदीरें । किती जाति कंकोळ नाना प्रकारें ॥ ५८ ॥
अळंकार चीरें बहु सिद्ध केलीं । असंभाव्य दिव्यांबरें आणवीलीं ।
बहु भूषणांचे बहु ढीग केले । जगज्जत्रकें ते कपी गौरवीले ॥ ५९ ॥
तुरें लाविले घातल्या पुष्पमाळा । कितीएक त्या रत्नमाळा सुढाळा ।
करीं कंकणें मुद्रिका लेववील्या । यथासांग सर्वांग संपूर्ण केल्या ॥ ६० ॥
सभामंडपीं फांकल्या रत्नमाळा । समस्तांसि ते जाहली सौख्यवेळा ।
कितीएक सांगीतल्या गुप्तगोष्टी । महावीर आनंदले सर्व पोटीं ॥ ६१ ॥
स्तुती उत्तरीं सर्व लावण्यखाणी । मुखें बोलिला राम कारुण्यवाणी ।
तुह्मीं कष्ट केले जिवीं सर्व भावें । तुह्मांलागिं म्यां काय उत्तीर्ण व्हावें ॥ ६२ ॥
कपी सुग्रिवा अंगदा जांबुवंता । गजा मारुता आणि नैर्ऋत्यनाथा ।
समस्तांसि सन्मानिलें रामचंद्रें । सुधाउत्तरीं तोषवीलें नरेंद्रें ॥ ६३ ॥
मूखें बोलिजे वैद्यराजासि देवें । कवी तूज ऊचीत म्यां काय द्यावें ।
वरू दीधला रामचंद्रें उचीती । तुझ्या दर्शनें लोक आरोग्य होती ॥ ६४ ॥
समस्तांकडे पाहिलें राघवानें । तयां सर्व रोमांच आले फुराणें ।
नमस्कारिलें स्वामि देवाधिदेवा । ह्मणे राम तो लोभ आतां असावा ॥ ६५ ॥
असंभाव्य केली स्तुती राघवाची । वदों लागली मंडळी राघवाची ।
कपी बोलती सर्व कारुण्यवाचा । स्तुती ऐकतों राम सिंधू सुखाचा ॥ ६६ ॥
गिरीकंदरामाजि आह्मीं असावें । नरां देखतां वानरीं शीघ्र जावें ।
समर्थें सर्वें लाविसी मर्कटाला । महा सूकृतें पार नाहीं सुखाला ॥ ६७ ॥
प्रभू बोलणें चालणें काय जाणें । बरें वोखटें सर्व कांहींच नेणे ।
बहुतांपरी चालवीलें दयाळें । तुह्मां योग्य हें आमुचें तोंड काळें ॥ ६८ ॥
कृपाळूपणें राघवें थोर केलें । बरें वोखटें सर्व साहून नेलें ।
बहु देखिलें सौख्य नानापरींचे । प्रभूच्या पदालागि हें प्राप्त कैचें ॥ ६९ ॥
सभाग्याचिया संगतीनें असावें । बहूतांपरींचें बहु सौख्य घ्यावें ।
तयासारिखें सर्व आह्मांसि जालें । महा वैभवें चित्त सूखें निवालें ॥ ७० ॥
नव्हे भेटि नानापरी योगयोगें । नव्हे भेटि नानापरी भोगत्यागें ।
नव्हे भेटि ब्रह्मादिकां शीघ्रकाळें । त्रिकूटाचिळीं दाखवीलें भुपाळें ॥ ७१ ॥
कपी दीस ते बोलती दैन्यवाणें । कृपासागरू जीविंचा भाव जाणे ।
तयांच्या शिणें देव तो शीणताहे । बहूतांपरी राम संबोखिताहे ॥ ७२ ॥
सर्वें लागली राघवाची सुटेना । प्रिती गुंतली तोडितांही सुटेना ।
बहु दीस गेले सुखाचेनि योगें । अकस्मात तें दुःख जालें वियोगें ॥ ७३ ॥

---

१ मोत्यांचा चुना. २ वेलदोडे. ३ जायफळ. ४ रत्नांची प्रभा. ५ गोड भाषणानें. ६ पुण्यानें. ७ वाईट. ८ समजूत करीत आहे.

प्रभूसंगतीची सवे दृढ केली । अकस्मात कां सर्व छेदूनि नेली ।
तयां बोलता जाहला रावणारी । तुम्हां भेटि देईन कृष्णावतारीं ॥ ७४ ॥
दयाळासि तींहीं नमस्कार केले । प्रभू सव्य घालूनि तैसे निघाले ।
समस्तीं समस्तांसि वंदूनि वेगीं । पुढें नीघते जाहले ते प्रसंगीं ॥ ७५ ॥
मनें वीकले भक्तपाळें भुपाळें । मनामाजि ते खंति केली दयाळें ।
जनीं सेवकांलागिं देखोनि ऊणें । बहु कष्ट घेऊनियां सौख्य देणें ॥ ७६ ॥
मनीं भावना भक्तलोकांसि जैशी । तयासारिखी देवरायासि तैशी ।
जनीं सेवकांकारणें जन्म घेणें । महद्भाग्य सांडोनियां नीच होणें ॥ ७७ ॥
पडे सांकडें सर्वदां सेवकांचें । दिनानाथ हें ब्रीद विख्यात साचें ।
मनामाजि ते जैशि जैशी अपेक्षा । करीना कदा राम त्याची उपेक्षा ॥ ७८ ॥
असंभाव्य अन्याय तो आठवीना । बहु चूकतां देव कांहीं शिणेना ।
तया मानसीं लागली प्रेममाया । करी सेवकालागिं नाना उपायां ॥ ७९ ॥
सदा सर्वदा देव हा साभिमानी । कृपा भाकितां शीघ्र पावे निदानीं ।
तया अंतरीं थोर लहान नाहीं । परी पाविजे दृढ भावार्थ कांहीं ॥ ८० ॥
तया अंतरीं भाव होईल जैसा । तयालागिं तो देव पावेल तैसा ।
यदर्थी कदा संशयोही असेना । अभावें तरी देव तो पालटेना ॥ ८१ ॥
कितीएक अन्याय कोट्यानुकोटी । भ्रमें होय नानापरी बुद्धि खोटी ।
परी पाहतां लोभ त्याचा असेना । कृपासागरू तो कदा वोसरेना ॥ ८२ ॥
कृपाळूपणें देव राजाधिराजें । शिरीं वाहिजे सर्वही भक्तओझें ।
जनीं दास देखोनियां दैन्यवाणा । मनामाजि वोसावतो देवराणा ॥ ८३ ॥
बहुसाल हें बोलणें काय कीती । स्वयें जाणिजे ज्या असे स्वप्रचीती ।
अयोध्यापुरीमाजि तो रामराजा । कृपाळू सुखें राहिला भक्तकाजा ॥ ८४ ॥
कपी रीस गेले स्थळें जेथजेथें । प्रितीं मारुती राहिला राम तेथें ।
रघूनाथ सीता तया बंधुवर्गीं । उभें राहिजे सेवकें पूर्वभागीं ॥ ८५ ॥
समस्तांसि पूजूनि नाना विलासें । नमस्कारिलें सर्व दासानुदासें ।
उदासीन श्रोतीं कदाही न कीजे । बहु भेद भाषा सर्व क्षमा कीजे ॥ ८६ ॥
मनामाजि ऊपासना रामध्यानीं । जनीं दास तो नीववी ब्रह्मज्ञानी ।
अखंडीत त्या राघवाच्या प्रतापें । विवेकें विचारें समाधान सोपें ॥ ८७ ॥
पदीं लागतां निर्गुणी भक्त जाले । बहु संग नीसंग होऊनि गेले ।
विवेकें बरें पाहतां ध्येय ध्याता । विचारें बरें शोधितां ज्ञेय ज्ञाता ॥ ८८ ॥
विवंचूनि तो साधकू साध्य जाला । असंभाव्य तो ब्रह्मबोधें बुडाला ।
पुसावें कळेना तरी सज्जनाला । धरूनी त्यजावें विदेहीपणाला ॥ ८९ ॥
असे हें जनीं प्राप्त तेणें धरावें । अनिर्वाच्य तें वाच्य कैसें वदावें ।
सदा नित्य नीरूपणीं वीवरावें । तुरावें परी कीर्तिरूपें पुरावें ॥ ९० ॥

---

१ इच्छा, आशा. २ हयगय. ३ शेवटीं. ४ कमी होत नाहीं. ५ स्वानुभव.

असो जाणत्याला कळे सर्व कांहीं । जनीं नेणता त्यासि कांहींच नाहीं ।
नसे ज्ञान त्यां सर्वही व्यर्थ गेलें । जळो पांचभौतीक हें काय जालें ॥ ९१ ॥
असो ही कथा बोलिली राघवाची । जनीं सर्वदा ऐकती धन्य त्यांची ।
सुखें ऐकतां ते महा दोष जाती । दुखें नासती लोक ते धन्य होती ॥ ९२ ॥
चरित्रें बरीं उत्तमें राघवाचीं । असंभाव्य विस्तारलीं पावनाचीं ।
कितीएक ते पाहती कोटि होती । जनीं एक एकाक्षरें दोष जाती ॥ ९३ ॥
शतांचीं शतें पूर्ण आरंभ संधीं । कळाया कथा हेतु संकेतसिद्धी ।
पुढें बोलिलें तें बरें वीवरावें । बुजायास हें गद्य पोटीं धरावें ॥ ९४ ॥
मुळारंभ ते स्तूति नाना परींची । गिरी वर्णिला जाहली सागराची ।
पहीले शतीं भेटि बीभीषणाची । पुढें शेवटीं शेज दर्भासनाची ९५ ॥
द्वितीयीं शतीं राम क्रोधासि आला । कथेलागिं तेथूनि आरंभ झाला ।
बळें सिंधु पालाणिला शक्र गेला । अपेक्षा मनीं शृंग पाहावयाला ॥ ९६ ॥
तृतीयीं शतीं शृंग पाहों निघाले । रिपूलागिं तो शिष्ट जावूनि बोले ।
बहू वीर राक्षेस युद्धीं निमाले । कपी सर्वही नागपाशीं निजेले ॥ ९७ ॥
रणीं दाखवीलीं तये जानकीला । तये वीरशीं तो प्रहस्तू निमाला ।
प्रसंगेंचि मंदोदरी नीति सांगे । निघाला दशग्रीव तो लागवेगें ॥ ९८ ॥
चतुर्थीं शतीं युद्ध त्या रावणानें । रघूनायकें सोडिला जीवदानें ।
पुढें कुंभकर्णासि संहार केला । समूदाय तो कूमरांचा निमाला ॥ ९९ ॥
कितीएक ते वीर माहोदरेशीं । प्रतापें रणामाजि ते प्रेतराशी ।
पुढें इंद्रजीतें कपी भग्न केले । महावीर ते बाणजाळीं निमाले ॥ १०० ॥
शता पंचमालागिं आरंभ जाला । कपी वीर द्रोणाचळालागिं गेला ।
महावीर ते ऊठले स्वस्थ जाले । त्रिकूटाचळू सर्व जाळूं निघाले ॥ १०१ ॥
कपी क्षोभले काळ युद्धा निघाले । कितीएक राक्षेस युद्धीं निमाले ।
नभींहूनि तो रावणी वीर आला । समस्तांसि भेदूनियां शीघ्र गेला ॥ १०२ ॥
सहावें शतीं रावणू दुःख सांगे । त्रिकूटाचळीं रावणी लागवेगें ।
पुन्हा इंद्रजीतू रणामाजि आला । विरीं वानरीं होम तो भग्न केला ॥ १०३ ॥
शतीं सातवे त्या विरें इंद्रजीतें । असंभाव्य केलीं रणामाजि प्रेतें ।
सुमित्रासुतें मारिलें बाणघातें । यथासांग तो वन्हि सूलोचनेतें ॥ १०४ ॥
शतीं आठवे वीर घायाळ जाले । कितीएक राक्षेस युद्धीं निमाले ।
सुमित्रासुता रावणें घात केला । गिरी द्रोण आणूनियां स्वस्थ जाला ॥ १०५ ॥
नवामाजि रामासि सौमित्र सांगे । बळें भंगिला होम तो लागवेगें ।
रघूनायकें थोर संग्राम केला । रणामाजि तो मुख्य शत्रू निमाला ॥ १०६ ॥
दहावे शतीं शोक अंतःपुराचा । प्रसंगें महोत्साव बीभीषणाचा ।
रघूनायकें जानकी आणविली । समस्तां सुरां राघवा भेटि जाली ॥ १०७ ॥

---

१ इच्छा, आशा. २ मृत्यु पावले. ३ जलदानें. ४ लक्ष्मण.

शतीं ऐक एकादशी राघवाची । असंभाव्य ते स्तुति ब्रह्मादिकांची ।
महापुष्पकारूढ होऊनि गेले । पुढें भ्रातया भेटले स्वस्थ जाले ॥ १०८ ॥
पुढें द्वादशीं मंदिरें त्या विरांचीं । यथायोग्य मानें समस्तां जणांचीं ।
पुजा भोजनें सांग सर्वांसि जाली । पुरी वर्णितां मानसें तीं निवालीं ॥ १०९ ॥
शतीं अष्टपंचीं पुरीमाजि गेले । रघूराज भद्रासनीं बैसवीले ।
महोत्साव उत्साव नानापरीचा समूदाय तो बोळवीला कपींचा ॥ ११० ॥
करी राज्य तो राम नाना विलासी । जनांमाजि उपासना रामदासी ।
यथासांग तेरा शतें श्लोक झाले । गुणी ऐकतां सर्व सूखें निवाले ॥ १११ ॥

॥ इति श्रीरामदासकृत श्लोकबद्ध युद्धकांड संपूर्ण ॥

---

# रामदासकृत मनाचे श्लोक.

गणाधीश जो ईश सर्वां गुणांचा । मुळारंभ आरंभ तो निर्गुणाचा ।
नमो शारदा मूळ चत्वारिवाचा । गमो पंथ आनंत या राघवाचा ॥ १ ॥
मना सज्जना भक्तिपंथेंचि जावें । तरी श्रीहरी पाविजे तो स्वभावें ।
जनीं निंद्य तें सर्व सोडूनि द्यावें । जनीं वंद्य तें सर्व भावें करावें ॥ २ ॥
प्रभाते मनीं राम चिंतीत जावा । पुढें वैखरी राम आधीं वदावा ।
सदाचार हा थोर सांडू नये तो । जगीं तोचि तो मानवी धन्य होतो ॥ ३ ॥
मना वासना दुष्ट कामा नये रे । मना सर्वथा पापबुद्धि नकोरे ।
मना सर्वथा नीति सोडूं नको हो । मना अंतरीं सार वीचार राहो ॥ ४ ॥
मना पापसंकल्प सोडूनि द्यावा । मना सत्यसंकल्प जीवीं धरावा ।
मना कल्पना ते नको वीषयाची । विकारें घडे हो जगीं सर्व छी छी ॥ ५ ॥
नको रे मना क्रोध हा खेदकारी । नको रे मना काम नानाविकारी ।
नको रे मना सर्वदा अंगिकारू । नको रे मना मत्सरू दंभभारू ॥ ६ ॥
मना श्रेष्ठ धारिष्ट जीवीं धरावें । मना बोलणें नित्य सोशीत जावें ।
स्वयें सर्वदा नम्रवाचें वदावें । मना सर्व लोकांसि रे नीववावें ॥ ७ ॥
देह त्यागितां कीर्ति मागें उरावी । मना सज्जना हेचि क्रीया धरावी ।
मना चंदनाचे परी त्वां झिजावें । परी अंतरीं सज्जना नीववावें ॥ ८ ॥
नको रे मना द्रव्य तें पूढिलांचें । अती स्वार्थबुद्धी नुरे पाप साचें ।
घडे भोगणें पाप तें कर्म खोटें । न होतां मनासारखें दुःख मोठें ॥ ९ ॥
सदा सर्वदा प्रीति रामीं धरावी । दुखाची स्वयें सांड जीवीं करावी ।
देहदुःख तें सूख मानीत जावें । विवेकें सदा स्वस्वरूपीं भजावें ॥ १० ॥

---

१ तेराव्या शतकांत. २ सिंहासनावर, ३ परादि चार वाणींना. ४ वाणीनें ५ आत्मस्वरूपीं.

ज गीं सर्व सूखी असा कोण आहे । विचारी मना तूंचि शोधून पाहे ।
मन :वांचि रे पूर्वसंचीत केलें । तयासारिखें भोगणें प्राप्त झालें ॥ ११ ॥
मन मानसीं दुःख आणूं नको रे । मना सर्वथा शोक चिंता नको रे ।
विवेकें देहबुद्धि सोडूनि यावी । विदेहीपणें मुक्ति भोगीत जावी ॥ १२ ॥
मना सांग पां रावणा काय झालें । अकस्मात तें राज्य सर्वै बुडालें ।
ह्मणोनी कुडी वासना सांडि वेगीं । बळें लागला काळ हा पाठिलागीं ॥ १३ ॥
जिवा कर्मयोगें जनीं जन्म झाला । परी शेवटीं काळ घेऊनि गेला ।
महा थोर ते मृत्युपंथेंचि गेले । असंख्यात ते जन्मले आणि मेले ॥ १४ ॥
मना पाहतां सत्य हे मृत्युभूमी । जितां बोलती सर्वही जीव मी मी ।
चिरंजीव ते सर्वही मानिताती । अकस्मात सांडूनियां सर्व जाती ॥ १५ ॥
मरे एक त्याचा दुजा शोक वाहे । अकस्मात तोही पुढें जात आहे ।
पुरेना जनीं लोभ रे क्षोभ होतो । ह्मणोनि जनीं मागुती जन्म घेतो ॥ १६ ॥
मना मानसीं व्यर्थ चिंता वहाते । अकस्मात होणार होऊनि जातें ।
घडे भोगणें सर्वही कर्मयोगें । मतीमंद तो खेद मानी वियोगें ॥ १७ ॥
मना राघवावीण आशा नको रे । मना मानवाची नको कीर्ति तूं रे ।
जया वर्णिती वेद शास्त्रें पुराणें । तया वर्णितां सर्वही श्लाघ्यवाणें ॥ १८ ॥
मना सर्वथा सत्य सांडूं नको रे । मना सर्वथा मिथ्य भाडूं नको रे ।
मना सत्य तें सत्यवाचें वदावें । मना मिथ्य तें मिथ्य सोडूनि यावें ॥ १९ ॥
बहु हिंपुटी होइजे मायपोटीं । नको रे मना यातना तेचि मोठी ।
निरोधें पचे कोंडिलें गर्भवासीं । अधोमूख रे दुःख त्या बाळकासी ॥ २० ॥
मना वासना चूकवी येरझारा । मना कामना सोडवी द्रव्यद्वारा ।
मना यातना थोर हे गर्भवासीं । मना सज्जना भेटवीं राघवासी ॥ २१ ॥
मना सज्जना हीत माझें करावें । रघूनायका दृढ चित्तीं धरावें ।
महाराज तो स्वामि वायूसुताचा । जनां उद्धरी नाथ लोकत्रयाचा ॥ २२ ॥
न बोले मना राघवावीण कांहीं । जनीं वाउगें बोलतां सौख्य नाहीं ।
घडीनें घडी काळ आयुष्य नेतो । देहांतीं तुला कोण सोडूं पहातो ॥ २३ ॥
रघूनायकावीण वायां शिणावें । जनासारिखें व्यर्थ कां वोसणावें ।
सदासर्वदा नाम वाचे वसो दे । अहंता मनीं पापिणी ते नसो दे ॥ २४ ॥
मना वीट मानूं नको बोलण्याचा । पुढें मागुतां राम जोडेल कैंचा ।
सुखाची घडी लोटतां सूख आहे । पुढें सर्व जाईल कांहीं न राहे ॥ २५ ॥
देहरक्षणाकारणें यत्न केला । परी शेवटीं काळ घेऊनि गेला ।
करी रे मना भक्ति या राघवाची । पुढें अंतरीं सोड चिंता भवाची ॥ २६ ॥
भवाचे भयें काय भीतोसि लंडी । धरी रे मना धैर्य धाकासि सांडी ।
रघूनायकासारिखा स्वामि शिरीं । नुपेक्षी कदा कोपल्या दंडधारी ॥ २७ ॥

१ पूर्वजन्मार्जित कर्में. २ दुसरा. ३ स्तुत्य ४ कष्टी. ५ संसाराची. ६ हयगय करीत नाहीं.

दिनानाथ हा राम कोदंडधारी । पुढें देखतां काळ पोटीं थरारी ।
जनीं वाक्य नेमस्त हें सत्य मानीं । नुपेक्षी कदा रामदासाभिमानी ।। २८ ।।
पदीं राघवाचे सदा ब्रीद गाजे । बळें भक्तरीपू शिरीं कां त्रिराजे ।
पुरी वाहिली सर्व जेणें विमानीं । नुपेक्षी कदा रामदासाभिमानी ।। २९ ।।
समर्थाचिया सेवका वक्र पाहे । असा सर्व भूमंडळीं कोण आहे ।
जयाची लिला वर्णिती लोक तीन्ही । नुपेक्षी कदा रामदासाभिमानी ।। ३० ।।
महासंकटीं सोडिले देव जेणें । प्रतापें बळें आगळा कोटिगूणें ।
जयातें स्मरे शैलजा शूळपाणी । नुपेक्षी कदा रामदासाभिमानी ।। ३१ ।।
अहल्या शिळा राघवें मुक्त केली । पदीं लागतां दिव्य होऊनि गेली ।
जया वर्णितां शीणली वेदवाणी । नुपेक्षी कदा रामदासाभिमानी ।। ३२ ।।
वसे मेरुमांदार हे सृष्टिलीला । शशी सूर्य तारांगणें मेघमाळा ।
चिरंजीव केले जगीं दास दोन्ही । नुपेक्षी कदा रामदासाभिमानी ।। ३३ ।।
सदा सर्वदा देव संनीध आहे । कृपाळूपणें अल्प धारिष्ट पाहें ।
सुखानंद आनंद कैवल्यदानी । नुपेक्षी कदा रामदासाभिमानी ।। ३४ ।।
उपेक्षा कदा रामरूपीं असेना । जिवा मानवा निश्चयो तो वसेना ।
शिरीं भार वाहे न बोले पुराणीं । नुपेक्षी कदा रामदासाभिमानी ।। ३५ ।।
असे हो जया अंतरीं भाव जैसा । वसे हो तया अंतरीं देव तैसा ।
अनन्यासि रक्षीतसे चापपाणी । नुपेक्षी कदा रामदासाभिमानी ।। ३६ ।।
सदा चक्रवाकासि मार्तंड जैसा । उडी घालितो संकटीं स्वामि तैसा ।
हरीभक्तिचा घाव घाली निशाणीं । नुपेक्षी कदा रामदासाभिमानी ।। ३७ ।।
मना प्रार्थना तूजला एक आहे । रघूराज अंकीत होऊनि राहे ।
अवज्ञा कधीं हो यदर्थीं न कीजे । मना सज्जना राघवीं वस्ति कीजे ।। ३८ ।।
जया वर्णिती वेद शास्त्रें पुराणें । तयाचेनि योगें समाधान होणें ।
तयालागि हें सर्व चांचल्य दीजे । मना सज्जना राघवीं वस्ति कीजे ।। ३९ ।।
मना पाविजे सर्वही सूख जेथें । अती आदरें ठेविजे लक्ष तेथें ।
विवेकें कुडी कल्पना पालटीजे । मना सज्जना राघवीं वस्ति कीजे ।। ४० ।।
बहु हिंडतां सूख होणार नाहीं । शिणावें परी नातुडे हीत कांहीं ।
विचारें बरा अंतरीं बोध कीजे । मना सज्जना राघवीं वस्ति कीजे ।। ४१ ।।
बहूतांपरी हेंचि आतां करावें । रघूनायका आपलेंसें करावें ।
दिनानाथ हा तोडरीं ब्रीद गाजे । मना सज्जना राघवीं वस्ति कीजे ।। ४२ ।।
मना सज्जना एक जीवीं धरावें । जनीं आपुलें हीत तूवां करावें ।
रघूनायकावीण बोलों नको हो । सदा मानसीं हा निजध्यास राहो ।। ४३ ।।
मना रे जनीं मौन्यमुद्रा धरावी । कथा आदरें राघवाची करावी ।
नसे राम तें धाम सोडोनि यावें । सुखालागिं आरण्य सेवीत जावें ।। ४४ ।।

---

१ पार्वती. २ चंद्र. ३ जवळ. ४ धनुर्धारी रामचंद्र. ५ सूर्य. ६ मिळत नाहीं.

जयाचेनि संगें समाधान भंगे । अहंता अकस्मात येऊनि लागे ।
तया संगतींची जनीं कोण गोडी । जिये संगतीनें मती राम सोडी ॥ ४५ ॥
मना जे घडी राघवावीण गेली । जगीं ते तुवां आपुली हानि केली ।
रघुनायकावीण तो शीण आहे । जनीं दक्ष तो लक्ष लावूनि पाहे ॥ ४६ ॥
मना लोचनीं श्रीहरी तोचि पाहें । जनीं जाणता भक्त होऊनि राहें ।
गुणीं प्रीति लागो क्रमू साधनाचा । जगीं धन्य तो दास सर्वोत्तमाचा ॥ ४७ ॥
सदा देवकाजीं झिजे देह ज्याचा । सदा रामनामें वदे नित्य वाचा ।
स्वधर्मेंचि चाले सदा उत्तमाचा । जगीं धन्य तो दास सर्वोत्तमाचा ॥ ४८ ॥
सदा बोलण्यासारिखें चालताहे । अनेकीं सदा एक देवासि पाहे ।
सगूणीं भजे लेश नाहीं भ्रमाचा । जगीं धन्य तो दास सर्वोत्तमाचा ॥ ४९ ॥
नसे अंतरीं काम नानाविकारी । उदासीन तो तापसी ब्रह्मचारी ।
निवाला मनीं लेश नाहीं तमाचा । जगीं धन्य तो दास सर्वोत्तमाचा ॥ ५० ॥
मदें मत्सरें सांडिली स्वार्थबुद्धी । प्रपंचीक नाहीं जयातें उपाधी ।
सदा बोलणें नम्र वाचा सुवाचा । जगीं धन्य तो दास सर्वोत्तमाचा ॥ ५१ ॥
क्रमी वेळ जो तत्त्वचिंतानुवादें । न लिंपे कदा दंभ वादें विवादें ।
करी सूखसंवाद जो ऊगमाचा । जगीं धन्य तो दास सर्वोत्तमाचा ॥ ५२ ॥
सदा आर्जवीं प्रीय जो सर्व लोकीं । सदा सर्वदा सत्यवादी विवेकी ।
न बोले कदा मिथ्य वाचा त्रिवाचां । जगीं धन्य तो दास सर्वोत्तमाचा ॥ ५३ ॥
सदा सेवि आरण्य तारुण्यकाळीं । मिळेना कदा कल्पनेचेचि मेळीं ।
चळेना मनीं निश्चयो दृढ ज्याचा । जगीं धन्य तो दास सर्वोत्तमाचा ॥ ५४ ॥
नसे मानसीं दुष्ट आशा दुराशा । वसे अंतरीं प्रेम पाशा पिपाशा ।
ऋणी देव हा भक्तिभावें जयाचा । जगीं धन्य तो दास सर्वोत्तमाचा ॥ ५५ ॥
दिनाचा दयाळू मनाचा मवाळू । स्नेहाळू कृपाळू जगीं दासपाळू ।
जया अंतरीं क्रोध संताप कैंचा । जगीं धन्य तो दास सर्वोत्तमाचा ॥ ५६ ॥
जगीं होइजे धन्य या रामनामें । क्रिया भक्ति ऊपासना नित्य नेमें ।
उदासीनता तत्वतां[३] सार आहे । सदा सर्वदा मोकळी वृत्ति राहे ॥ ५७ ॥
नको वीषयीं वासना वृत्तिरूपें । यदर्थीं[४] जडे कामना पूर्वपापें ।
सदा राम निष्काम चित्तीं वसावा । मनीं कल्पनालेश तोही नसावा ॥ ५८ ॥
मना कल्पना कल्पितां कल्पकोटी । नव्हे रे नव्हे सर्वथा रामभेटी ।
मनीं कामना राम नाहीं जयाला । अती आदरें प्रेम नाहीं तयाला ॥ ५९ ॥
मना राम कल्पतरू कामधेनु । निधीसार चिंतामणी काय वानूं ।
जयाचेनि योगें घडे सर्व सत्ता । तया साम्यता कायशी कोण आतां ॥ ६० ॥
उभा कल्पवृक्षातळीं दुःख वाहे । तया अंतरीं सर्वदा तेंचि राहे ।
जनीं सज्जनीं वाद हा वाढवावा । पुढें मागुती शोक जीवीं धरावा ॥ ६१ ॥

---

१ मनामध्यें. २ उपसर्ग, संबंध, ३ खरोखर. ४ ज्याविषयीं.

निजध्यास तो सर्व तूटोनि गेला। बळें अंतरीं शोक संताप ठेला।
सुखानंद स्वानंद भेदें बुडाला। मना निश्चयो सर्व खेदें उडाला ॥ ६२ ॥
घरीं कामधेनू पुढें ताक मागे। हरीबोध सोडोनि वीवादिं लागे।
घरीं सार चिंतामणी काच खंडें। तया मागतां देतसे तो उदंडें ॥ ६३ ॥
अती मूढ त्या दृढ बुद्धी असेना। अती काम त्या राम चित्तीं वसेना।
अती लोभ त्या क्षोभ होईल जाणा। अती वीपयी सर्वदा दैन्यवाणा ॥ ६४ ॥
नको दैन्यवाणें जिणें भक्तिवीणें। अती मूर्ख त्या सर्वदा दुःख दुणें।
धरी रे मना आदरें प्रीति रामीं। लको वासना हेमधामीं विरामीं ॥ ६५ ॥
नव्हे सार संसार हा घोर आहे। मना सज्जना सर्व शोधोनि पाहे।
जनीं वीष खातां पुढें सौख्य कैचें। धरी रे मना ध्यान या राघवाचें ॥ ६६ ॥
घनश्याम हा राम लावण्यरूपी। महा धीर गंभीर पूर्ण प्रतापी।
करी शेवटीं सेवकाचा कुडावा। प्रभाते मनीं राम चिंतीत जावा ॥ ६७ ॥
बळें आगळा राम कोदंडधारी। महाकाळ विक्राळ तोही थरारी।
पुढें मानवा किंकरा कोण केवा। प्रभातें मनीं राम चिंतीत जावा ॥ ६८ ॥
सुखानंदकारी निवारी भयातें। जनीं भक्तिभावें भजावें तयातें।
विवेकें त्यजावा अनाचार हेवा। प्रभाते मनीं राम चिंतीत जावा ॥ ६९ ॥
सदा रामनामें वदा पूर्ण कामें। कदा बाधिजे नापदा नित्य नेमें।
मदालस्य हा सर्व सोडोनि द्यावा। प्रभाते मनीं राम चिंतीत जावा ॥ ७० ॥
जयाचेनि नामें महा दोष जाती। जयाचेनि नामें गती पाविजेती।
जयाचेनि नामें घडे पुण्यठेवा। प्रभाते मनीं राम चिंतीत जावा ॥ ७१ ॥
न वेंचे कदा ग्रंथिंचा अर्थ कांहीं। मुखें नाम उच्चारितां कष्ट नाहीं।
महा घोर संसार शत्रू जिणावा। प्रभाते मनीं राम चिंतीत जावा ॥ ७२ ॥
देहदंडणाचें महा दुःख आहे। महा दुःख तें नाम घेतां न राहे।
सदाशीव चिंतीतसे देवदेवा। प्रभाते मनीं राम चिंतीत जावा ॥ ७३ ॥
बहुतांपरीं संकटें साधनाचीं। व्रतें दान उद्यापनें तीं धनाचीं।
दिनाचा दयाळू मनीं आठवावा। प्रभाते मनीं राम चिंतीत जावा ॥ ७४ ॥
समस्तांमधें सार साचार आहे। कळेना तरी सर्व शोधोनि पाहें।
मना संशयो वाउगा तो त्यजावा। प्रभाते मनीं राम चिंतीत जावा ॥ ७५ ॥
नव्हे कर्म ना धर्म ना योग्य कांहीं। नव्हे भोग ना त्याग ना सांग कांहीं।
ह्मणे दास विश्वास नामीं धरावा। प्रभाते मनीं राम चिंतीत जावा ॥ ७६ ॥
करी काम निष्काम या राघवाचें। करी रूप स्वरूप सर्वां जिवांचें।
करी छंद निर्द्वंद्व हे गूण गातां। धरीं कीर्तनीं वृत्ति विश्वास होतां ॥ ७७ ॥
अहो ज्या नरा रामविश्वास नाहीं। तया पामरा बाधिजे सर्व कांहीं।
महाराज तो स्वामि कैवल्यदाता। वृथा वाहणें देह संसारचिंता ॥ ७८ ॥

१ विषयेच्छा. २ आयुष्य. ३ सुवर्णगृहाच्या ठिकाणीं. ४ रक्षण. ५ मोक्षसुख देणारा.

मना पावना भावना राघवाची । धरी अंतरीं सोडि चिंता भवाची ।
भवाचे भयें मानवा भूलि ठेली । नसे वस्तुची धारणा व्यर्थ गेली ॥ ७९ ॥
धरा श्रीवरा त्या हरा अंतरातें । तरा दुस्तरा त्या परा सागरातें ।
सरा वीसरा त्या परा दुर्भरातें । करा नीकुरा त्या खरा मत्सरातें ॥ ८० ॥
मना मत्सरें नाम सोडूं नको हो । अती आदरें हा निजध्यास राहो ।
समस्तां मतें नाम तें सार आहे । दुजी तूळणा तूळितां हें न साहे ॥ ८१ ॥
बहु नाम या रामनामीं तुळेना । अभाग्या नरा पामरा हें कळेना ।
विषा औषधा घेतलें पार्वतीशें । जिवा मानवा किंकरा कोण पूसे ॥ ८२ ॥
जेणें जाळिला काम तो राम ध्यातो । उमेसीं अती आदरें गूण गातो ।
बहु ज्ञान वैराग्य सामर्थ्य जेथें । परी अंतरीं रामविश्वास तेथें ॥ ८३ ॥
विठोनें शिरीं वाहिला देवराणा । तया अंतरीं ध्यास रे त्यासि नेणा ।
निवाला स्वयें तापसी चंद्रमौळी । जिवा सोडवी राम हा अंतकाळीं ॥ ८४ ॥
भजा राम विश्वास योगेश्वराचा । जपा नेमिला नेम गौरीहराचा ।
निवाला स्वयें तापसी चंद्रमौळी । जिवा सोडवी राम हा अंतकाळीं ॥ ८५ ॥
मुखीं राम विश्राम तेथेंचि आहे । सदानंद आनंद शोधोनि पाहे ।
तयावीण तो शीण संदेहकारी । निजध्यास तो शोक संतापहारी ॥ ८६ ॥
मुखीं राम त्या काम बाधूं शकेना । गुणीं इष्ट धारिष्ट त्याचें चुकेना ।
हरीभक्त तो शत्रु कामासि मारी । जगीं धन्य तो मारुती ब्रह्मचारी ॥ ८७ ॥
बहु चांगलें नाम या राघवाचें । अती साजिरें स्वल्प सोपें फुकाचें ।
करी मूळ निर्मूळ घेतां भवाचें । जिवा मानवा हेंचि कैवल्य साचें ॥ ८८ ॥
जनीं भोजनीं नाम वाचे वदावें । अती आदरें नाम घोषें ह्मणावें ।
हरी चिंतनीं अन्न सेवीत जावें । तरी श्रीहरी पाविजेतो स्वभावें ॥ ८९ ॥
नये राम वाणी तया थोर हानी । जनीं व्यर्थ प्राणी न ज्या नाम कर्णीं ।
हरीनाम हें वेद शास्त्रीं पुराणीं । बहु आगळी बोलिली वेदवाणी ॥ ९० ॥
नको वीट मानूं रघूनायकाचा । अती आदरें बोलिजे राम वाचा ।
न वेंचे मुखीं सांपडेरे फुकाचा । करा घोष त्या जानकीवल्लभाचा ॥ ९१ ॥
अती आदरें सर्वही नामघोषें । गिरीकंदरीं जाइजे दूरदेशें ।
हरी तुष्टला तोषला नामघोषें । विशेषें हरी मानसीं रामपीसें ॥ ९२ ॥
जगीं पाहतां राम हा अन्नदाता । तयालागिं हो तत्त्वतां सार चिंता ।
तयाचें मुखीं नाम घेतां फुकाचें । मना सांग पां रे तुझें काय वेंचे ॥ ९३ ॥
तिन्ही लोक जाळूं शके कोप येतां । निवाला हरू तो मुखीं नाम घेतां ।
जपे आदरें पार्वती विश्वमाता । ह्मणोनी ह्मणा तेंचि हें नाम आतां ॥ ९४ ॥
अजामीळ पापी वदे पुत्रकामें । तया मुक्ति नारायणाचेनि नामें ।
शुकाकारणें कुंटिणी रामवाणी । मुखीं बोलतां ख्याति झाली पुराणीं ॥ ९५ ॥

---

१ संसाराची. २ मस्तकी चंद्र धारणा करणारा शंकर. ३ गर्जनेनें. ४ खर्च होत नाहीं.

महा भक्त प्रल्हाद हा दैत्यकुळीं । जपे रामनामावळी नित्यकाळीं ।
पिता पापरूपी तया देखवेना । जनीं दैत्य तो नाम मूखीं म्हणेना ॥ ९६ ॥
मुखीं नाम नाहीं तया मुक्ति कैंची । अहंतागुणें यातना ते फुकाची ।
पुढें अंत येईल तो दैन्यवाणा । म्हणोनि म्हणा रे म्हणा देवराणा ॥ ९७ ॥
हरी नाम नेमस्त पाषाण तारी । बहु तारिले मानवी देहधारी ।
तया रामनामीं सदा जो विकल्पी । वदेना कदा जीव तो पापरूपी ॥ ९८ ॥
जगीं धन्य वाराणसी पुण्यराशी । तयामाजि जातां गती पूर्वजांशीं ।
मुखीं रामनामावळी नित्य काळीं । जिवा हीत सांगे सदा चंद्रमौळी ॥ ९९ ॥
यथासांग रे कर्म तेंही घडेना । घडे कर्म तें पुण्य गांठीं पडेना ।
दया पाहतां सर्व भूतीं असेना । फुकाचें मुखीं नाम तेंही वसेना ॥ १०० ॥
जया नावडे नाम त्या येम जाची । विकल्पी उठे तर्क त्या नर्क छी छी ।
म्हणोनी अती आदरें नाम घ्यावें । मुखीं बोलतां दोष जाती स्वभावें ॥ १०१ ॥
अती लीनता सर्वभावें स्वभावें । जना सज्जनांलागिं संतोषवावें ।
देहाकारणें सर्व लावीत जावें । सगूणीं अती आदरेंसीं भजावें ॥ १०२ ॥
हरी कीर्तनीं प्रीति भावें धरावी । देहबुद्धि नीरूपणीं वीसरावी ।
परद्रव्य आणीक कांता परावी । यदर्थीं स्वयें सांड जीवीं करावी ॥ १०३ ॥
क्रियेवीण नानापरी बोलिजे तें । परी चित्त दुश्चित्त तें लाजवीतें ।
मना कल्पना धीट सैराट धांवे । तया मानवा देव कैसेनि पावे ॥ १०४ ॥
विवेकें क्रिया आपुली पालटावी । अती आदरें शुद्ध क्रीया धरावी ।
जगीं बोलण्यासारिखें चाल बापा । मनीं कल्पना सोड संसारतापा ॥ १०५ ॥
बरी स्नान संध्या करी एकनिष्ठा । विवेकें मना आवरी स्थानभ्रष्टा ।
दया सर्व भूतीं जया मानवाला । सदा प्रेमळू भक्तिभावें निवाला ॥ १०६ ॥
मना कोप आरोपणा ते नसावी । मना बुद्धि रे साधुसंगें वसावी ।
मना नष्ट चांडाळ तो संग त्यागी । मना होय रे मोक्षभागीं विभागी ॥ १०७ ॥
सदा सर्वदा सज्जनाचेनि योगें । क्रिया पालटे भक्तिभावार्थ लागे ।
क्रियेवीण वाचाळता ते निवारी । तुटे वाद संवाद तो हीतकारी ॥ १०८ ॥
जनीं वाद संवाद सोडोनि यावा । जनीं सूखसंवाद सूखें करावा ।
जनीं तोचि तो सूख संतापहारी । तुटे वाद संवाद तो हीतकारी ॥ १०९ ॥
तुटे वाद संवाद त्यातें म्हणावें । विवेकें अहंभाव त्यातें जिणावें ।
अहंतागुणें वाद नाना विकारी । तुटे वाद संवाद तो हीतकारी ॥ ११० ॥
हिताकारणें बोलणें सत्य आहे । हिताकारणें सर्व शोधोनि पाहे ।
हिताकारणें बंड पाखांड वारीं । तुटे वाद संवाद तो हीतकारी ॥ १११ ॥
जनीं सांगतां ऐकतां जन्म गेला । परी वादवीवाद तैसाचि ठेला ।
उठे संशयो वाद हा दंभ भारी । तुटे वाद संवाद तो हीतकारी ॥ ११२ ॥

---

१ मीपणानें २ शंकर. ३ देहाभिमान. ४ परस्त्री. ५ टाकून दे.

जनीं हीत पंडीत सांडीत गेले । अहंतागुणें ब्रह्मराक्षेस झाले ।
तयाहूनि व्युत्पन्न तो कोण आहे । मना सर्व जाणीव सोडोनि राहे ॥ ११३ ॥
तुटे वाद संवाद तेथें करावा । विवेकें अहंभाव हा पालटावा ।
जनीं बोलण्यासारिखें आचरावें । क्रिया पालटे भक्तिपंथेंचि जावें ॥ ११४ ॥
फुकाचें मुखीं बोलतां काय वेंचे । दिसंदीस अभ्यंतरीं गर्व साचे ।
क्रियेवीण वाचाळता व्यर्थ आहे । विचारी मना तूंचि शोधूनि पाहे ॥ ११५ ॥
बहू शापितां कष्टला अंबऋषी । तयाचे स्वयें श्रीहरी जन्म सोशी ।
दिल्हा क्षीरसिंधू तया ऊपमानी । नुपेक्षी कदा रामदासाभिमानी ॥ ११६ ॥
ध्रुव लेंकरूं बापुडें दैन्यवाणें । कृपा भाकितां दीधली भेट जेणें ।
चिरंजीव तारांगणीं प्रेमखाणी । नुपेक्षी कदा रामदासाभिमानी ॥ ११७ ॥
गजेंद्र महा संकटीं वाट पाहे । तयाकारणें श्रीहरी धांवताहे ।
उडी घातली जाहला जीवदानी । नुपेक्षी कदा रामदासाभिमानी ॥ ११८ ॥
अजामीळ पापी तया अंत आला । कृपाळूपणें तो जनीं मुक्त केला ।
अनाथासि आधार हा चक्रपाणी । नुपेक्षी कदा रामदासाभिमानी ॥ ११९ ॥
विधीकारणें जाहला मत्स्य वेगीं ॥ धरी कूर्मरूपीं धरा[३] पृष्ठभागीं ।
जना रक्षणाकारणें नीच योनी । नुपेक्षी कदा रामदासाभिमानी ॥ १२० ॥
महा भक्त प्रऱ्हाद हा कष्टवीला । ह्मणोनी तयाकारणें सिंह झाला ।
नये ज्वाळ वीशाळ सन्नीध कोणी । नुपेक्षी कदा रामदासाभिमानी ॥ १२१ ॥
कृपा भाकिता जाहला वज्रपाणी[४] । तयाकारणें वामन चक्रपाणी ।
द्विजांकारणें[५] भार्गव चापपाणी । नुपेक्षी कदा रामदासाभिमानी ॥ १२२ ॥
अहिल्या सतीलागिं आरण्यपंथें । कुढावा[६] पुढें देव वंदी तयातें ।
बळें सोडितां धाव घाली निशाणी । नुपेक्षी कदा रामदासाभिमानी ॥ १२३ ॥
तया द्रौपदीकारणें लागवेगें । त्वरें धांवतो सर्व सोडोनि मागें ।
कलीलागिं झाला असे बौध्य मौनी । नुपेक्षी कदा रामदासाभिमानी ॥ १२४ ॥
अनाथा दिनाकारणें जन्मताहे । कलंकी पुढें देव होणार आहे ।
तया वर्णितां शीणली वेदवाणी । नुपेक्षी कदा रामदासाभिमानी ॥ १२५ ॥
जनाकारणें देव लीलावतारी । बहूतांपरी आदरें वेषधारी ।
तया नेणती ते जनीं पापरूपी । दुरात्मे महा नष्ट चांडाळ पापी ॥ १२६ ॥
जगीं धन्य तो राम सूखीं निवाला । कथा ऐकतां सर्व तल्लीन झाला ।
देहभावना रामबोधें उडाली । मनोवासना रामरूपीं विराली ॥ १२७ ॥
गतीकारणें संगती सज्जनाची । मती पालटे सूमती दुर्जनाची ।
रतीनायकाचा पती भ्रष्ट आहे । ह्मणोनी मनातीत होऊनि राहे ॥ १२८ ॥
मना अल्प संकल्प तोही नसावा । मना सत्य संकल्प चित्तीं वसावा ।
जनीं जल्प वीकल्प तोही त्यजावा । रमाकांत एकांत काळीं भजावा ॥ १२९ ॥

१ भक्तिमार्गानें. २ हयगय करीत नाहीं. ३ पृथ्वी. ४ इंद्र. ५ ब्राह्मणांकरितां. ६ रक्षण.

मना वासना वासुदेवीं वसूंदे । मना कामना कामसंगीं नसोंदे ।
मना कल्पना वाउगी ते न कीजे । मना सज्जना सज्जनीं वस्ति कीजे ॥ १३० ॥
भजाया जनीं पाहतां राम एक । करीं बाण एक मुखीं शब्द एक ।
क्रिया पाहतां उद्धरी सर्व लोक । धरा जानकीनायकाचा विवेक ॥ १३१ ॥
विचारूनि बोले विवंचूनि चाले । तयाचेनि संतप्त तेही निवाले ।
बरें शोधल्यावीण बोलों नये हो । जनीं बोलणें शुद्ध नेमस्त राहो ॥ १३२ ॥
हरिभक्त वीरक्त[1] विज्ञानरासी । जेणें मानसीं स्थापिलें निश्चयासी ।
तया दर्शनें स्पर्शनें पुण्य जोडे । तया भाषणें नष्ट संदेह मोडे ॥ १३३ ॥
नसे गर्व अंगीं सदा वीतरागी । क्षमा शांति भोगी दया दक्ष योगी ।
नसे लोभ ना क्षोभ ना दैन्यवाणा । अशा लक्षणीं जाणिजे योगिराणा ॥ १३४ ॥
धरी रे मना संगती सज्जनाची । जेणें वृत्ति हे पालटे दुर्जनाची ।
बळें भाव हा वृत्ति सन्मार्ग लागे । महा क्रूर तो काळ विक्राळ भंगे ॥ १३५ ॥
भयें व्यापिलें सर्व ब्रह्मांड आहे । भयातीत ते संत आनंत पाहे ।
जया पाहतां द्वैत कांहीं दिसेना । तया मानसीं सर्वथाही वसेना ॥ १३६ ॥
जिवा श्रेष्ठ ते स्पष्ट सांगोनि गेले । परी जीव अज्ञान तैसेचि ठेले ।
देहबुद्धिचा निश्चयो त्या ढळेना । जुनें ठेवणें मीपणें तें कळेना ॥ १३७ ॥
भ्रमें नाडिलें वित्त तें गुप्त झालें । जिवा जन्म दारिद्र्य ठाकूनि आलें ।
देहबुद्धिचें[2] कर्म खोटें टळेना । जुनें ठेवणें मीपणें तें कळेना ॥ १३८ ॥
पुढें पाहतां सर्वही कोंदलेंसे । अभाग्या नरा दृढ पाषाण भासे ।
अभावें कदा पुण्य कांहीं फळेना । जुनें ठेवणें मीपणें तें कळेना ॥ १३९ ॥
जयाचें तया चूकलें प्राप्त नाहीं । गुणें गोविलें जाहलें दुःख देहीं ।
गुणें वेगळी वृत्ति तेही वळेना । जुनें ठेवणें मीपणें तें कळेना ॥ १४० ॥
ह्मणे दास सायास त्याचे करावे । जगीं जाणता पाय त्याचे धरावे ।
गुरूअंजनेंवीण तें आकळेना । जुनें ठेवणें मीपणें तें कळेना ॥ १४१ ॥
कळेना चळेना वळेना टळेना । टळेना ढळेना संशयोही ढळेना ।
गळेना गळेना अहंता गळेना । बळें आकळेना मिळेना मिळेना मिळेना ॥ १४२ ॥
अविद्यागुणें मानवा ऊमजेना । भ्रमें चूकलें हीत तें पाविजेना ।
परीक्षेविना बांधिलें दृढ नाणें । परी सत्य मिथ्या असें कोण जाणे ॥ १४३ ॥
जगीं पाहतां साच तें काय आहे । अती आदरें सर्व शोधून पाहे ॥
पुढें पाहतां पाहतां देव जोडे । भ्रम भ्रांति अज्ञान हें सर्व मोडे ॥ १४४ ॥
सदा वीषया चिंतितां जीव गेला । अहंभाव अज्ञान जन्मासि आला ।
विवेकें सदा स्वस्वरूपीं भजावें । जिवा ऊगमीं जन्म नाहीं स्वभावें ॥ १४५ ॥
दिसे लोचनीं तें नसे कल्पकोडी । अकस्मात आकारलें काळ मोडी ।
पुढें सर्व जाईल कांहीं न राहे । मना संत आनंत शोधोनि पाहे ॥ १४६ ॥
तुटेना फुटेना चळेना वळेना । सदा संचलें मीपणें आकळेना ।

---

१ वैराग्यशील. २ देहाभिमानाचें. ३ मीपणा. ४ अज्ञानानें. ५ खरें.

तया एक रूपासि दूजें न साहे । मना संत आनंत शोधूनि पाहे ॥ १४७ ॥
निराकार आकार ब्रह्मादिकांचा । जया सांगतां शीणली वेदवाचा ।
विवेकें तदाकार होऊनि राहे । मना संत आनंत शोधूनि पाहे ॥ १४८ ॥
जगीं पाहतां चर्मचक्षू न लक्षी । जगीं पाहतां ज्ञानचक्षू निरक्षी ।
जगीं पाहतां पाहणें जात आहे । मना संत आनंत शोधूनि पाहे ॥ १४९ ॥
नसे पीत ना श्वेत ना श्याम कांहीं । नसे व्यक्त अव्यक्त ना नीळ कांहीं ।
ह्मणे दास विश्वासतां मुक्ति लाहे । मना संत आनंत शोधूनि पाहे ॥ १५० ॥
खरें शोधितां शोधितां शोधिताहे । मना बोधितां बोधितां बोधिताहे ।
परी सर्वही सज्जनाचेनि योगें । बरा निश्चयो पाविजे सानुरागें ॥ १५१ ॥
मनीं निर्मिला देव तो ओळखावा । जया पाहतां मोक्ष तात्काळ जीवा ।
तया निर्गुणालागिं गूणी करावें । जनीं संग सोडूनि सुखी रहावें ॥ १५२ ॥
नव्हे कार्यकर्त्ता नव्हे सृष्टिकर्त्ता । पराहूनि पर्त्ता न लिंपे विवर्त्ता ।
तया निर्विकल्पासि कल्पीत जावें । जनीं संग सोडोनि सूखी रहावें ॥ १५३ ॥
बहूतांपरी कूसरी तत्वझाडा । परी अंतरीं पाहिजे तो निवाडा ।
मना सार साचार तें वेगळें रे । समस्तांमध्यें एक तें आगळें रे ॥ १५४ ॥
नव्हे पिंडज्ञानें नव्हे तत्त्वज्ञानें । समाधान कांहीं नव्हे तानमानें ।
नव्हे योग योगें नव्हे भोग त्यागें । समाधान तें सज्जनाचेनि योगें ॥ १५५ ॥
महा वाक्य तत्वादिकें पंचिकर्णें । खुणें पाविजे संतसंगें विवर्णें ।
द्वितीयेसि संकेत जो दाविजेतो । तया सांडुनी चंद्रमा भाविजेतो ॥ १५६ ॥
दिसेना जनीं तेंचि शोधोनि पाहे । बरें पाहतां गूज तेथेंचि आहे ।
करें घेउं जातां कदा आढळेना । जनीं सर्व कोंदाटलें तें कळेना ॥ १५७ ॥
ह्मणे जाणता तो मनीं मूर्ख आहे । अतर्क्यासि तर्कीं असा कोण आहे ।
जनीं मीपणें पाहतां पाहवेना । तया पाहतां वेगळें राहवेना ॥ १५८ ॥
बहु शास्त्र धुंडाळितां वाड आहे । जनीं निश्चयो एक तोही न साहे ।
मती भांडती शास्त्रबोधें विरोधें । गती खुंटती ज्ञानबोधें विरुद्धें ॥ १५९ ॥
श्रुतिन्यायमीमांसका तर्कशास्त्रें । स्मृती वेद वेदांतवाक्यें विचित्रें ।
स्वयें शेष मौनावला स्थीर राहे । मना सर्व जाणीव सोडूनि पाहे ॥ १६० ॥
जेणें मक्षिका भक्षिली जाणिवेची । तया भोजनाची रुची प्राप्त कैंची ।
अहंभाव ज्या मानसींचा विरेना । तया ज्ञान हें अन्न पोटीं जिरेना ॥ १६१ ॥
नको रे नको वाद हा खेदकारी । नको रे नको भेद नानाविकारी ।
नको रे मना शीकऊं पूढिलासी । अहंभाव जो राहिला तूजपासीं ॥ १६२ ॥
अहंतागुणें सर्वही दुःख होतें । मुखें बोलिलें ज्ञान तें व्यर्थ जातें ।
सूखें राहतां सर्वही सूख आहे । अहंतागुणें तूंचि शोधोनि पाहें ॥ १६३ ॥
अहंतागुणें नीति सांडी विवेकी । अनीतीबळें श्लाघ्यता सर्व लोकीं ।

---

पिवळें. २ पांढरें. ३ भ्रमाला. ४ शरीरज्ञानानें. ५ पुष्कळ.

परी अंतरीं सर्वहि साक्ष येते। प्रमाणांतरीं बुद्धि सांडूनि जाते ॥ १६४ ॥
देहंबुद्धिचा निश्चयो दृढ झाला। देहातीत तें हीत सांडीत गेला।
देहबुद्धि ते आत्मबुद्धि करावी। सदा संगती सज्जनाची धरावी ॥ १६५ ॥
मनें कल्पिला वीषयो सोडवावा। मनें देव तो निर्गुणी ओळखावा।
मनें कल्पितां कल्पना ते सरावी। सदा संगती सज्जनाची धरावी ॥ १६६ ॥
देहादीक प्रापंच हा चिंतियेला। परी अंतरीं लोभ निश्चीत ठेला।
हरीचिंतनें मुक्ति कांता वरावी। सदा संगती सज्जनाची धरावी ॥ १६७ ॥
अहंकार विस्तारला या देहाचा। स्त्रिया पुत्र मित्रादिक या मोहाचा।
बळें भ्रांति हे जन्मचिंता हरावी। सदा संगती सज्जनाची धरावी ॥ १६८ ॥
बरा निश्चयो शाश्वताचा करावा। ह्मणे दास संदेह तो नीरसावा।
घडीनें घडी सार्थकाची करावी। सदा संगती सज्जनाची धरावी ॥ १६९ ॥
करी वृत्ति जो संत तो संत जाणा। दुराशागुणें जो नव्हे दैन्यवाणा।
उपाधी देहबुद्धितें वाढवीतो। परी सज्जना केंवि बाधूं शके तो ॥ १७० ॥
नसे संत आनंत संता पुसावा। अहंकार विस्तारला नीरसावा।
गुणेंवीण निर्गूण तो आठवावा। देहबुद्धिचा आठवो नाठवावा ॥ १७१ ॥
देहबुद्धि ते स्वामिबोधें त्यजावी। विवेकें तया वस्तुची भेट घ्यावी।
तदाकार हे वृत्ति नाहीं स्वभावें। ह्मणोनी सदा तेंचि शोधीत जावें ॥ १७२ ॥
असे सार साचार तें चोरिलेंसे। इहीं लोचनीं पाहतां दृश्य भासे।
निराभास निर्गूण तें आकळेना। अहंतागुणें कल्पितांही कळेना ॥ १७३ ॥
स्फुरे वीषयीं कल्पना ते अविद्या। स्फुरे ब्रह्म रे जाण माया सुविद्या।
मुळीं कल्पना दो रुपीं तेचि झाली। विवेकें तरी स्वस्वरूपीं निमाली ॥ १७४ ॥
स्वरूपीं उदेला अहंकार राहो। तेणें सर्व आच्छादिलें व्योम पाहो।
दिशा पाहतां नीशि हे वाढताहे। विवेकें विचारें विवंचूनि पाहे ॥ १७५ ॥
जया चक्षुनें लक्षितां लक्षवेना। भवा भक्षितां रक्षितां रक्षवेना।
भयाभीत तो भक्षयी मोक्ष देता। तया दक्षता साक्षिनें पक्ष घेता ॥ १७६ ॥
विधी निर्मितां लिहितो सर्व भाळीं। परी लीहितो कोण त्याचे कपाळीं।
हरू जाळिना लोक संहारकाळीं। परी सेवटीं शंकरा कोण जाळी ॥ १७७ ॥
जगीं द्वादशादित्य हे रुद्र अका। असंख्यात संख्या करी कोण शंका।
जगीं देव धुंडाळितां आढळेना। जगीं मुख्य तो कोण कैसा कळेना ॥ १७८ ॥
फुटेना तुटेना कदा देवराणा। चळेना ढळेना कदा दैन्यवाणा।
कळेना कळेना कदा लोचनासी। असेना दिसेना जना मीपणासी ॥ १७९ ॥
जया मानला देव तो पूजिताहे। परी देव शोधोनि कोणी न पाहे।
जगीं पाहतां देव कोट्यानुकोटी। जया मानली भक्ति जे तेचि मोठी ॥ १८० ॥
तिन्ही लोक जेथूनि निर्माण झाले। तया देवरायासि कोणी न बोले।

१ देहाभिमानाचा. २ मनामध्यें. ३ नाहींसा करावा. ४ आकाश. ५ डोळ्यानें. ६ ब्रह्मदेव ७ इंद्राला

जगीं थोरला देव तो चोरिलासे । गुरूवीण तो सर्वथाही न दीसे ॥ १८१ ॥
गुरू पाहतां लक्ष कोट्यानुकोटी । बहूसाल मंत्रावळी शक्ति मोठी ।
मना कल्पना चेटके घातपाता । जनीं व्यर्थ रे तो नव्हे मुक्तिदाता ॥ १८२ ॥
नव्हे चेटकू चाळकू द्रव्यभोंदू । नव्हे निंदकू मत्सरू भक्तिमंदू ।
नव्हे उन्मतू व्यसनी संगबाधू । जनीं ज्ञानिया तोचि साधू अगाधू ॥ १८३ ॥
नव्हे वाउगी चावटी काम पोटीं । क्रियेवीण वाचाळता तेचि मोठी ।
मुखीं बोलिल्यासारिखें चालताहे । मना सद्गुरू तोचि शोधूनि पाहे ॥ १८४ ॥
जनीं भक्त ज्ञानी विवेकी विरागी । कृपाळू मनस्वी क्षमावंत योगी ।
प्रभू दक्ष व्युत्पन्न चातुर्य जाणे । तयाचेनि योगें समाधान बाणे ॥ १८५ ॥
नव्हे तेंचि झालें नसे तेंचि आलें । कळों लागलें सज्जनाचेनि बोलें ।
अनिर्वाच्य तें वाच्य वाचें वदावें । मना संत आनंत शोधीत जावें ॥ १८६ ॥
लपावें अती आदरें रामरूपीं । भयातीत निश्चिंत ये स्वस्वरूपीं ।
कदा तो जनीं पाहतांही दिसेना । सदा ऐक्य तो भिन्नभावें वसेना ॥ १८७ ॥
सदा सर्वदा राम सन्नीध आहे । मना सज्जना सत्य शोधोनि पाहे ।
अखंडीत भेटी रघूराज योगू । मना सांड रे मीपणाचा वियोगू ॥ १८८ ॥
भुतें पिंडब्रह्मांड हें ऐक्य आहे । परी सर्वथा स्वस्वरूपीं न साहे ।
मना भासलें सर्व कांहीं पहावें । परी संग सोडूनि सूखीं रहावें ॥ १८९ ॥
देहभान हें ज्ञानशास्त्रें खुडावें । विदेहीपणें भक्तिपंथेंचि जावें ।
विवेकाबळें नित्य सर्व त्यजावें । अती आदरें सज्जनातें भजावें ॥ १९० ॥
देहबुद्धिचा निश्चयो ज्या ढळेना । तया ज्ञान कल्पांतकाळीं कळेना ।
परब्रह्म तें मीपणें आकळेना । मनीं शून्य अज्ञान हें मावळेना ॥ १९१ ॥
मना नाकळे नाढळे रूप ज्याचें । दुजेंवीण तें ज्ञान सर्वोत्तमाचें ।
तयावीण तें हीन दृष्टांत पाहे । तिथें संग निसंग दोन्ही न साहे ॥ १९२ ॥
नव्हे जाणता नेणता देवराणा । नव्हे वर्णितां वेदशास्त्रां पुराणां ।
नव्हे दृश्य अदृश्य साक्षी तयाचा । श्रुती नेणती नेणती अंत ज्याचा ॥ १९३ ॥
जया मुक्तिची वासना पूर्ण आहे । तयाची गुरूचे पदीं वृत्ति राहे ।
लयें लक्षितां तें स्वरूपीं सरावें । स्वयंज्योति पूर्ण प्रकाशें स्वभावें ॥ १९४ ॥
वसे मानसीं देव तो कोण कैसा । पुसे साधकू आदरें प्रश्न जैसा ।
देह टाकितां देव कोठें रहातो । पुन्हां मागुता ठाव कोठें पहातो ॥ १९५ ॥
वसे हृदयीं देव तो जाण ऐसा । नभाचेपरी व्यापकू सर्व तैसा ।
सदा संचला येत ना जात कांहीं । तयावीण कोठें रिता ठाव नाहीं ॥ १९६ ॥
मनासारिखें रूप या राघवाचें । मनीं चिंतितां मूळ तूटे भवाचें ।
तया पाहतां देहबुद्धी उरेना । सदा सर्वदा आर्त पोटीं पुरेना ॥ ९७ ॥
नभें व्यापिलें सर्व सृष्टीस आहे । रघूनायका ऊपमा ते न साहे ।

१ वैराग्यशील. २ आत्मस्वरूपीं. ३ जवळ. ४ वेद. ५ आकाशाप्रमाणें. ६ रिकामा. ७ संसाराचें.
८ देहाभिमान.

दुजेवीण जो तोचि हो हा स्वभावें । तया व्यापकू व्यर्थ कैसें ह्मणावें ॥ १९८ ॥
नभीं वावरे जो अणूरेणु कांहीं । रिता ठाव या राघवावीण नाहीं ।
तया पाहतां पाहतां तेंचि झालें । तिथें लक्ष आलक्ष सर्वं बुडालें ॥ १९९ ॥
अती जीर्ण विस्तीर्ण तें रूप आहे । तिथें तर्क संपर्क तोहि न साहे ।
अती गूढ तें दृढ तात्काळ सोपें । दुजेवीण ते स्तूण स्वामिप्रतापें ॥ २०० ॥
मनींहूनियां टाकिला सर्व हेवा । सदा सर्वदा आचरी नीचसेवा ।
गुरूचे घरीं झाडितो सारवीतो । मला तो गमे भूतळींचा रवी तो ॥ २०१ ॥
भवापासुनी सद्गुरू तारी बापा । सदा सौख्य दे छेदूनी पुण्यपापा ।
घरीं कास मी दास तूझा दयाळा । दिना रक्षि तूं दीनबंधू कृपाळा ॥ २०२ ॥
पदा त्वंपदा तत्पदा कांहिं नेणें । तुवां बोधिलें ध्यान तें एक जाणें ।
खटाटोप आटोप टाकूनि राहें । त्रिकाळीं सदा पाय तूझेचि पाहें ॥ २०३ ॥
न जायें जपासी न जायें तपासी । न जायेंचि काशी न जायें गयेसी ।
गुरूचिंतनेंवीण कोठें न जायें । त्रिकाळीं सदा पाय तूझेचि पाहें ॥ २०४ ॥
कळे आकळे रूप तें ज्ञान होतां । तिथें आटली सर्वसाक्षी अवस्था ।
मना उन्मनी शब्द कुंठीत राहे । तो घेतोचि तो राम सर्वत्र पाहे ॥ २०५ ॥
कदा ओळखीमाजि दूजें असेना । मनीं मानसीं द्वैत कांहीं दिसेना ।
बहूतां दिसीं आपली भेटि झाली । विदेहीपणें सर्व काया निवाली ॥ २०६ ॥
मना गूजरे तूजला प्राप्त झालें । परी पाहिजे अंतरीं यत्न केले ।
सदा श्रवणें पाविजे निश्चयासी । धरीं संगती सज्जनीं धन्य होसी ॥ २०७ ॥
मना संग हा सर्व सोडोनि द्यावा । अती आदरें सज्जनाचा धरावा ।
जयाचेनि संगें महा दुःख भंगे । जनीं साधनेंवीण सन्मार्ग लागे ॥ २०८ ॥
मना संग हा सर्व संगासि तोडी । मना संग हा मोक्ष तात्काळ जोडी ।
मना संग हा साधका शीघ्र जोडी । मना संगही द्वैत निःशेष मोडी ॥ २०९ ॥
मनाचीं शतें ऐकतां दोष जाती । मतीमंद ते साधना योग्य होती ।
चढे ज्ञान वैराग्य सामर्थ्य अंगीं । ह्मणे दास विश्वासतां मुक्ति भोगी ॥ २१० ॥

---

# राममंत्राचे श्लोक.

नको शास्त्र अभ्यास वित्पत्ति मोठी । जडे गर्व ताठा अभीमान पोटीं ।
कसा कोणता नेणवे आजपोर । हरे राम हा मंत्र सोपा जपा रे ॥ १ ॥

नको कंठ शोषूं बहू वेदपाठीं । नको तूं पडूं साधनाचे कपाटीं ।
घडे कर्म खोटें बहू तो दगा रे । हरे राम हा मंत्र सोपा जपा रे ॥ २ ॥

---

१ सूर्य. २ विद्वत्ता.

तुला ही तनू मानवी प्राप्त झाली । बहु जन्मपुण्यें फळालागिं आली ।
तिला तूं कसा गोंविसी वीषयीं रे । हरे राम हा मंत्र सोपा जपा रे ॥ ३ ॥
जरी ही तनू रक्षिसी पुष्ट कांहीं । तरी भोग तो रोग होईल देहीं ।
विपत्ती पुढें ते नये बोलतां रे । हरे राम हा मंत्र सोपा जपा रे ॥ ४ ॥
खुळे हस्तपादादि हे भग्न होती । दिठी[2] मंद होवोनियां कैर्ण[3] जाती ।
तनू कंप सर्वांग होती कळा रे । हरे राम हा मंत्र सोपा जपा रे ॥ ५ ॥
कफें कंठ हा रोध होईल जेव्हां । अकस्मात तो प्राण जाईल तेव्हां ।
तुला कोण तेथें सखे सोयरे रे । हरे राम हा मंत्र सोपा जपा रे ॥ ६ ॥
तुझें बाळतारुण्य गेलें निघोनी । कळेना कसे लोक जाती मरोनी ।
करीसी मुलाची स्वहस्तें क्रिया रे । हरे राम हा मंत्र सोपा जपा रे ॥ ७ ॥
दुराशा नको रे परस्त्रीधनाची । नको तूं करूं नीचसेवा जनाची ।
पराधीन कैसा भला दीससी रे । हरे राम हा मंत्र सोपा जपा रे ॥ ८ ॥
मदें डोलसी बोलसी साधुवृंदा[4] । कसें हीत तूं नेणसी बुद्धिमंदा ।
रिकामाचि तूं गुंतशी वाउगा रे । हरे राम हा मंत्र सोपा जपा रे ॥ ९ ॥
बहु व्याप संताप तो मूळमापा । गतायुष्य द्रव्यें नये कोटि बापा ।
कळेना तुला कोणता तो नफा रे । हरे राम हा मंत्र सोपा जपा रे ॥ १० ॥
तुझे आप्त द्रव्यार्थ तुस्तेंचि होती । तनू हे चितेमाजि कीं बोळवीती ।
असें जाणुनी हीत कांहीं करा रे । हरे राम हा मंत्र सोपा जपा रे ॥ ११ ॥
कुटुंबी स्त्रिया पुत्र ते दासदासी । बहु पोपिसी सोसुनी दुःखराशी ।
त्यजी भार काबाडओझें किती रे । हरे राम हा मंत्र सोपा जपा रे ॥ १२ ॥
बहु इच्छिसी कीर्ति सन्मान कांहीं । सुखाचा तुला अंतरीं लेश नाहीं ।
फुकाचें मुखीं नाम तें कां नये रे । हरे राम हा मंत्र सोपा जपा रे ॥ १३ ॥
रवीसूत[6] ते दूत त्रिकाळ येती । तुझ्या लिंगदेहासि ओढूनि नेती ।
तुला खंडिती मुंडिती दंडिती रे । हरे राम हा मंत्र सोपा जपा रे ॥ १४ ॥
नको वीषयीं फारसा मस्त होऊं । नको मानदंभामध्यें चित्त गोवूं ।
नको भस्म लावूं जटाभार कां रे । हरेराम हा मंत्र सोपा जपा रे ॥ १५ ॥
नको फार मंत्राग्निच्या मंत्रदीक्षा । नको जारणामारणादी अपेक्षा[7] ।
कळायुक्त चातुर्य ते वीकळा रे । हरे राम हा मंत्र सोपा जपा रे ॥ १६ ॥
नको योग अष्टांग तो रोध प्राणा । नको कृच्छ्रचांद्रायणीं हट्ट जाणा ।
अपभ्रंश हा मार्ग कीं वोखटा रे । हरे राम हा मंत्र सोपा जपा रे ॥ १७ ॥
कदापी घडेना व्रतें यज्ञदानें । नसे द्रव्य गांठीं करावें जयानें ।
घडेना घडे यद्यपी कां फुका रे । हरे राम हा मंत्र सोपा जपा रे ॥ १८ ॥
नसे सत्य कांहीं दिसे दों दिसांचें । तुला लुटिती चोरटे लोक साचे ।
स्त्रिया पुत्र कामा न येती तुला रे । हरे राम हा मंत्र सोपा जपा रे ॥ १९ ॥

---

१ शरीर. २ दृष्टी. ३ कान. ४ साधुमंडळीला. ५ नातलग. ६ यम. ७ इच्छा.

नको तूं कदापी करूं तीर्थयात्रा । तनूदंडनीं क्षीणता सर्व गात्रां ।
करी ग्रस्त आयुष्य तूं कोणसारे । हरे राम हा मंत्र सोपा जपा रे ॥ २० ॥
तुला येम पाशीं करी बद्ध जेव्हां । सखा कोणता सोडवी सांग तेव्हां ।
यमाला कदापी दया ते न ये रे । हरे राम हा मंत्र सोपा जपारे ॥ २१ ॥
तपस्वी मनस्वी भले पार गेले । दुजीं सृष्टिकर्ते असे थोर मेले ।
चिरंजीव कल्पायु गेले किती रे हरे राम हा मंत्र सोपा जपा रे ॥ २२ ॥
बहु कामधंद्यांमध्यें धांव घेसी । किती नांवरूपा जगीं मीरवीसी ।
कशाला तुला उंट घोडे नगारे । हरे राम हा मंत्र सोपा जपारे ॥ २३ ॥
ह्मणे देश माझे भुमी गांव वाडे । शिबीकासनीं[1] बैससी उंच लोडें ।
कसा उंच तूं मंचकीं[2] लोळसी रे । हरे राम हा मंत्र सोपा जपा रे ॥ २४ ॥
दशग्रीव[3] लंकापुरीं मस्त झाला । अकस्मात गेला पुरीमाजि घाला ।
चिरंजीव दे राज्य बीभीषणा रे । हरे राम हा मंत्र सोपा जपा रे ॥ २५ ॥
अधोमूख विष्ठेमधें मायपोटीं । पचे पिंड[4] हा सोसुनी दुःखकोटी ।
स्मरेना कसें लाज नाहीं तुला रे । हरे राम हा मंत्र सोपा जपारे ॥ २६ ॥
असे भोगुनी पंचचत्वारिमासीं । पुढें दैवयोगें सख्या जन्मलासी ।
कसा वीसरे ध्यान सोहं पुढें रे । हरे राम हा मंत्र सोपा जपारे ॥ २७ ॥
कळे वायुचा स्पर्श होतांचि जेव्हां । रडे बाळ कोहं ह्मणे जीव तेव्हां ।
पुढें खेळ नानापरी खेळसी रे । हरे राम हा मंत्र सोपा जपा रे ॥ २८ ॥
दिसंदीस माता पिता बंधु जाणे । परी रोग नाना करी तेथ ठाणें ।
जरी दैवयोगें पुढें वांचला रे । हरे राम हा मंत्र सोपा जपा रे ॥ २९ ॥
करी लग्नमुंजी पितामाय त्याचें । करी शाहाणा मारुनी रूप साचें ।
करी पोटधंदा भला चांगला रे । हरे राम हा मंत्र सोपा जपा रे ॥ ३० ॥
बहू पाळिलें पोषिलें मायबापीं । निघे भिन्न निंदूनियां पापरूपी ।
स्त्रियेचे मुळें शेवटीं दुर्गती रे । हरे राम हा मंत्र सोपा जपा रे ॥ ३१ ॥
शतायू नव्हे पूर्ण आयुष्य कांहीं । असें हीत आहीत तें ओघ[5] पाहीं ।
अशाहीमधें बाळ तारुण्य सारें । हरे राम हा मंत्र सोपा जपा रे ॥ ३२ ॥
करीशील धर्माश्रमा अस्त जेव्हां । बहू घातपाती घरीं होय तेव्हां ।
भरी पोट पोषीं कुटुंबा बरा रे । हरे राम हा मंत्र सोपा जपा रे ॥ ३३ ॥
रवीऊदयो अस्त तो पोटधंदा । स्तवी आर्जवी तो करी येरनिंदा ।
कळेना पुढें काय होणार तें रे । हरे राम हा मंत्र सोपा जपा रे ॥ ३४ ॥
बहू ढीग मागें पुढें मोहरांचे । मदोन्मत्त होऊनियां तेथ नाचे ।
असे गर्व त्यालागिं नर्कासि थारे । हरे राम हा मंत्र सोपा जपारे ॥ ३५ ॥
अलंकारस्थानीं तनू[6] सज्जवीतो । मना दर्पणीं[7] पाहुनी रंजवीतो ।
कळेना जळे सर्पणीं रूप तें रे । हरे राम हा मंत्र सोपा जपा रे ॥ ३६ ॥

---

१ पालखीमध्यें. २ पलंगावर. ३ रावण. ४ शरीर. ५ प्रथम. ६ शरीर. ७ आरशांत.

बहु द्रव्य गांठीं पुन्हा मेळवीसी । गुरू विप्र बंधू कसे चाळवीसी ।
दुराशा कशाला मशाला पुढें रे । हरे राम हा मंत्र सोपा जपा रे ॥ ३७ ॥
जरी क्षीण देहापरी वृद्धकाळीं । करिती स्त्रिया सूत नातू दवाळी ।
धना ऊचकी लागतां गूचकी रे । हरे राम हा मंत्र सोपा जपा रे ॥ ३८ ॥
रवी जे घडी हाणितो काळ जेव्हां । श्रुती शब्द हे गर्जती तास तेव्हां ।
म्हणे क्षीण आयुष्य गेलें तुझें रे । हरे राम हा मंत्र सोपा जपा रे ॥ ३९ ॥
कसी जन्मुनी माय त्वां वांझ केली । कसी लाज वंशा कुळा लावियेली ।
भुमीभार धोंडा पशू हा खरा रे । हरे राम हा मंत्र सोपा जपा रे ॥ ४० ॥
कसा कोणता काळ येईल केव्हां । दिनासारखा काळ नेईल तेव्हां ।
तुझें वित्त तारुण्य लोपेल सारें । हरे राम हा मंत्र सोपा जपा रे ॥ ४१ ॥
तुला दंडिती खुंडिती कुंभपाकीं[1] । तुला खंडुनी अग्निकुंडांत टाकी ।
तुला ओढिती सांडसें तोडिती रे । हरे राम हा मंत्र सोपा जपा रे ॥ ४२ ॥
असा उंच भोगूनियां कल्पकोटी । पुन्हां जन्म घे लक्षचौऱ्यांशि कोटी ।
महासंकटीं हिंपुटी[2] जीव सारे । हरे राम हा मंत्र सोपा जपा रे ॥ ४३ ॥
नको सोंग छंदें करूं ढोंग कांहीं । नको शिष्यशाखा मठीं सूख नाहीं ।
महंतीमुळें नाश होतो तपा रे । हरे राम हा मंत्र सोपा जपा रे ॥ ४४ ॥
नको चाउटी वाउगी या जनांसी । हरीचिंतनीं ध्यास लावी मनासी ।
अमोलीक हा काळ जातो वृथा रे । हरे राम हा मंत्र सोपा जपा रे ॥ ४५ ॥
महा घोर हा थोर संसार मोठा । कळे संतसंगें समूळींच खोटा ।
कळे भक्ति मुक्ती विरक्तीच[3] गा रे । हरे राम हा मंत्र सोपा जपा रे ॥ ४६ ॥
त्यजा दुष्टसंगा पहा रे भल्यासी । करा हीत येऊं नका गर्भवासीं ।
जसें अंतिचें दुःख होतें जिवा रे । हरे राम हा मंत्र सोपा जपा रे ॥ ४७ ॥
बहु भोगितां पुढती नर्क आहे । असें जाणुनी त्या सुखामाजि राहें ।
प्रपंचीं उगा मारिसी कां गपा रे । हरे राम हा मंत्र सोपा जपा रे ॥ ४८ ॥
कळे साधनें याविणें सर्व निंदी । हरे राम हा मंत्र जो त्यासि वंदी ।
हरे राम हे माळिका साधका रे । हरे राम हा मंत्र सोपा जपा रे ॥ ४९ ॥

॥ रामदासकृत राममंत्रश्लोक संपूर्ण ॥

१ नरकांत. २ कष्टी. ३ वैराग्य.

# षड्रिपुविवेचन.

## कामनिरूपण.

भल्यासी वैर करिती ते साही ओळखा बरें । षड्रिपू कामक्रोधादी मदमत्सर दंभ तो ॥ १ ॥ प्रपंच साहवा वैरी तयांना जिंकिनां बरें । भल्यासी लाविती वेडा परत्र मार्ग रोधिला ॥ २ ॥ काम आरंभिचा वैरी निष्काम बुडवी सदा । कामेना लागली पाठी काम काम करी जनीं ॥ ३ ॥ काम उत्पन्न होताहे ते वेळे नावरे जना । कामवेड जडे ज्याला तो प्राणी आत्मघातकी ॥ ४ ॥ कित्येक योषितेसाठीं कां तरी मृत्यु पावले ॥ झडाच घालिती नेटें पतंगापरि भस्मती ॥ ५ ॥ आपणा राखणें नाहीं शुद्धि नाहीं ह्मणोनियां । सभाग्य करंटे होती वेश्येसीं द्रव्य नासिती ॥ ६ ॥ कित्येक भोरपी झाले किती गेले उठोनियां । बाटले भ्रष्टले मेले बुडाले कामसेवनीं ॥ ७ ॥ व्याधीनें नासती अंगें नासिकें झडती जनीं । औषधें दंतही जाती रूपहानीहि होतसे ॥ ८ ॥ रूपहानी शक्तिहानी द्रव्यहानी परोपरी । कुलहानी यातिहानी सर्व हानीच होतसे ॥ ९ ॥ कित्येक नाशिले भोगें लोकलाजचि सांडिली । शुभाशुभ नसे तेथें नीचासीं उंच भ्रष्टती ॥ १० ॥ कामाचे व्यसनें गेले मातले रतले जनीं । तारुण्य दोंदिसांसाठीं जन्म दुर्लभ नाशिला ॥ ११ ॥ विधीनें विषया घ्यावें अविधी नसतां बरें । आश्रमीं न्यायनीतीनें प्रपंच करणें सुखें ॥ १२ ॥ लटकें नासती काया चेटकें तीं परोपरी । जारणा मारणादीकें नाटकें चेटकें बहु ॥ १३ ॥ चेटका देवतें भूतें जन्महानीच होतसे । ह्मणोनि काम हा वैरी आकळावा परोपरी ॥ १४ ॥ ऐसा निरूपिला काम क्रोध तो बोलिला पुढें ॥ कोप तो तामसी प्राणी तमोगुणें अधोगती ॥ १५ ॥ इतिश्री काम हा वैरी जेणें पाडियलें भेरीं । तो राही सकळां ठायीं विवेकें जाणिजे बरें ॥ १६ ॥

॥ कामनिरूपण समाप्त ॥ १ ॥

---

## कोपनिरूपण.

कोपआरोपणा खोटी कोपें कोपाचि वाढतो । मोडतो मार्ग न्यायाचा अन्याय प्रबळे बळें ॥ १ ॥ क्रोध हा खेद संपादी जेथें तेथें चहूंकडे । विवेक पाहतां कैंचा शुद्धि तेथें असेचिना ॥ २ ॥ भ्रुकुटी कुटिला गांठी काळिमा वदनीं चढे । कुर्कुरी बुर्बुरी रागें हस्तपायच चोळितो ॥ ३ ॥ कुशब्द वोखटे काढी त्रासकें वचनें वदे । घेतसे बाळटें ढोंलें उणें काढी परोपरी ॥ ४ ॥ बोलतां हिसळे थुंका तगे ताये उसाळतो । तांबडे जाहले डोळे रागें रागाच फुगला ॥ ५ ॥ कंठलल्लाटिंच्या शीरा फुगल्या घाम चालिला । थरथरा । कांपतो रागें रूपें भूताचे जाहला ॥ ६ ॥ धर्ते लोकांसि झिंजाडी

---

१ वासना, इच्छा. २ स्त्रीसाठीं. ३ विषयभोगांमध्यें. ४ नरकवास. ५ संसारामध्यें. ६ वाईट. ७ नसते.

सातांपांचांसि नावरे । कुस्ती लिथाडी पछयाडी मारामारी धबाधबी ॥ ७ ॥ सुटलीं [१]फिटलीं वस्त्रें नागवे दिसती जनां । लाज ते अंतरीं नाहीं गांधलें नीट धांवती ॥ ८ ॥ अनर्थ मांडला मोठा लाथा बुक्या चपेटिका । कोपरें मारिती शीरीं काष्ठपाषाणअर्गळा ॥ ९ ॥ मूसळें मारिती काठ्या खिळी डांगाच दैंकळें । डसती झोंबती अंगा नीखुरें लाविती कळा ॥ १० ॥ एकांहीं धरिल्या शेंड्या वृषणीं लाविती कळा । पाडिले दांत भोंकाडें मस्तकें फोडिलीं बळें ॥ ११ ॥ ताडिले पाडिले पडले रक्तबंबाळ जाहले । घरचीं मारिती हांका हांका बोंबा परोपरी ॥ १२ ॥ दिवाणामाजि ते नेले मारिले दंड पावले । क्रोधें करंटे ते केले क्रोध चांडाळ जाणिजे ॥ १३ ॥ भल्यानें कोप सांडावा शांतीनें असतां बरें । क्षुल्लकें कोप पाळावा भल्याचें काम तो नव्हे ॥ १४ ॥ इतिश्री क्रोधरिपू । जेणें बहुत जाला दर्पू । त्यांचीं लक्षणें अमूपू । निरूपिलीं साक्षेपें ॥ १५ ॥

॥ क्रोधनिरूपण समाप्त ॥ २ ॥

---

## मदनिरूपण.

क्रोध तो बोलिला मागें मद तो आइका पुढें । मदाचीं गुप्त हीं कामें अंतरींचा कळेचिना ॥ १ ॥ मद हा वोखटा मोठा मद हा खेदकारक । मदानें पद लाधेना मद शोध करी भला ॥ २ ॥ देहाचा मद शक्तीचा द्रव्याचा मद अंतरीं । विद्येचा मद राज्याचा मद रूप बहुविधा ॥ ३ ॥ मदानें थोकली विद्या पुढें आणीक होईना । सर्वां माने मना येना आपुले होरटी कडे ॥ ४ ॥ कळेना सृष्टि देवाची बहुरत्ना वसुंधरा । मदाला नावडे कांहीं सर्वेही तुच्छ होतसे ॥ ५ ॥ मदानें भुलला प्राणी विचारें उमजेचिना । पराचें सत्य मानेना विवरेना कदापिही ॥ ६ ॥ वेदशास्त्रादि हो चर्चा नीति हो न्याय हो नव्हे । आपणा पाहणें नाहीं विरंची बोलिला तरी ॥ ७ ॥ इतरा कोण तो लेखा संत साधु महंत हो । आपणें न्याय केला तो आपुलें बोलणें बरें ॥ ८ ॥ चालणें थोर तें माझें माझा मीच बहु भला । न्यायाची गोष्टि मानेना नीतीनें कोप येतसे ॥ ९ ॥ आपणापरतें नाहीं सर्व कांहीं भुमंडळीं । गुणग्राहकता नाहीं पराचें तुच्छ होतसे ॥ १० ॥ कैसेनी उमजावा तो हेंकाड आंधळें गुरूं । दिसेना नाकळे कांहीं वळितां न वळे कदा ॥ ११ ॥ ऐशाचा संग तो खोटा हित तेथें असेचिना । स्वहीत आपुलें नाहीं परहीत कसें घडे ॥ १२ ॥ थोर आयुष्य मोलाचें मदें व्यर्थचि नाशिलें । पापी हा उमजों नेदी शेवटीं दूर होतसे ॥ १३ ॥ मारतां मद कैशाचा पुसे कोण तया मदा । पूर्वीच कळला नाहीं तऱ्हेनें जन्म नाशिला ॥ १४ ॥ देहही बळही गेलें द्रव्य गेलें वृथाचि तें । डंब गेलें स्तोंब गेलें एकला जातसे खळ ॥ १५ ॥ इतिश्री मदरिपू । जेणें वाढविला भवरिपू । तो हा टाकितां साक्षेपू । समाधान पावता ॥ १६ ॥

॥ मदनिरूपण समाप्त ॥

---

१ लाथालाथी करतो. २ आवेशानें. ३ पुष्कळ. ४ ब्रह्मदेव.

## मत्सरनिरूपण.

मद तो तिसरा शत्रू चौथा मत्सर आयका । मत्सरें सत्य मानेना सत्याचें लटकें करी ॥ १ ॥ बऱ्याचें ओखटें सांगे मज नाहीं ह्मणोनियां । पैशून्य नसतें काढी नसतां कुंद लावणें ॥ २ ॥ नस्ते नस्ते ढाल घेणें ऐसी हे जाति मत्सरीं । स्वयें आहे करंटाही समर्था निंदितो सदा ॥ ३ ॥ टोपणा आपण असे सर्वज्ञा न मनी कदा । आपण घातकी आहे पुण्यवंता पडेचिना ॥ ४ ॥ कुकर्मा आपण प्राणी सत्कर्मोच्छेदि तो सदा । आपण चोरटा आहे सकळां चोरटें करी ॥ ५ ॥ आपण भ्रष्टला आहे भल्याला भ्रष्ट भावितो । आपणू घातकी मोठा पराला घातकी ह्मणे ॥ ६ ॥ पोटींचा कपटी मोठा जनाला कपटी ह्मणे । आपणा भक्ति ठाकेना हरिभक्ति उच्छेदितो ॥ ७ ॥ आपणू नीच कुळिंचा कुळवंत मना न ये । आपणू ठायिंचा लंडी रणशूरासि हांसतो ॥ ८ ॥ आपणू भ्याड ठायींचा धारिष्टा कर्कश ह्मणे । आपणू वोंगळू आहे निर्मळा कर्दमू ह्मणे ॥ ९ ॥ आपणू लालुची मोठा वैराग्याची उडावणी । करवेना देखवेना ऐसा तो मत्सरू नरू ॥ १ ॥ आपलें कर्म भोगीतो पराला कर्म लावितो । जें कांहीं आपणा नाहीं तें सर्व उडवीतसे ॥ ११ ॥ भांडे तोंडची तें वेडें भकाळ्या करितो जनीं । अखंड सुजना भांडे तंडे तंडे उद्दंडसा ॥ १२ ॥ धीट तोंडाळ तो प्राणी कांहीं केल्या त्रिटेचिना । लंड तो कोटिगा मोठा लाज त्याला असेचिना ॥ १३ ॥ मत्सरें भाग्यही गेलें मत्सरें बुद्धि नासली । भक्ति ना ज्ञान ना कांहीं अत्रे ना परही नसे ॥ १४ ॥ पाहतां सख्य तो नाहीं लोधला ताड उद्धटू । मत्सरें लाविलें वेडा ज्याचें त्याला कळेचिना ॥ १५ ॥ इतिश्री मत्सररिपू । जाणिजे हा अमृपू । जेणें वेढिला भवसंकल्पू । दुःखसागर ॥ १६ ॥

मत्सरनिरूपण समाप्त ॥ ४ ॥

---

## दंभनिरूपण.

दंभ हा पांचवा जाणा महाशत्रू कळेचिना । यालागीं भांडणें लोकां एकामेकां पडेचिना ॥ १ ॥ दंभ दंभा बरा वाटे यालागीं लोक भांडती । भांडती मरती जाती दंभालागीं निघोनियां ॥ २ ॥ सकळां पाहिजे दंभ परंतू मिळतो कसा । यालागीं चुर्मुरीताती बुडाले दुःखसागरीं ॥ ३ ॥ स्वार्थ हा व्यर्थ जाणावा परंतू जन आंधळे । दंभानें आंधळे केलें ऐसा हा दंभतस्करू ॥ ४ ॥ शरीर मुख्य जायाचें दंभाची कोण ते कथा । शब्दची उमजेना कीं वैर साधी परोपरी ॥ ५ ॥ देहाचा दंभ तो खोटा परंतू आवडे जना । विवेक पाहतां नाहीं दुःखी होती ह्मणोनियां ॥ ६ ॥ ज्ञातया दंभ बाधेना एकाएकीं खडोखडी । उठोनी चालिला योगी दंभ ते कुतरे किती ॥ ७ ॥ वैराग्य पाहिजे अंगीं उदास फिरती लिळा । दंभ उड्डाण तें नेटें लोलंगताचि खुंटली ॥ ८ ॥ निश्चया दंभ बाधीना निश्चयो पाहिजे बरा अंतरें अंतरा भेदी तेथें दंभचि नाढळे ॥ ९ ॥ दंभ तो चोर जायाचा लालची करिती ग्रुदें ।

---

१ वाईट. २ व्यर्थ दोष. ३ चांगल्या कर्मांचा नाश करणारा. ४ चिखल, भ्रष्ट. ५ येथें.

शेवटीं सर्वेही जातें प्रेत होतें भूमंडळीं ॥ १० ॥ मग्याला कासया व्हावें जाणावें पहिलेंचि हो । लावावें कारणीं देहा दंभ कैंचा उरेल तो ॥ ११ ॥ अखंड आठवा राम रामाचें ध्यान अंतरीं । तेव्हां वैराग्यचि उठे दंभ लुटे परोपरी ॥ १२ ॥ मांसाचा मोधळा याचा दंभ तो कोणतो किती । सावधा दंभ बाधीना दुश्चिताला पछाडितो ॥ १३ ॥ नेणतां चोरटें येतें जाणतां पळतें बरें । शून्याचसारखें जाणा कायसें । तें तरी मढें ॥ १४ ॥ धन्य वीवेकि तो राजा वैराग्य बळ आगळें । भक्तिनें ओळला साधू दंभ तेथें दिसेचिना ॥ १५ ॥ इतिश्री दंभरिपू । जेणें वाढविला भवसंकल्पू । तयाचें निर्दळण करी जो साक्षेपू । तोचि धन्य ॥ १६ ॥

॥ दंभनिरूपण समाप्त ॥ ९ ॥

---

## प्रपंचनिरूपण.

प्रपंच हा महा[१] वैरी परत्रें अंतरीं दुरीं । अवघा तोचि तो जाला तेणें देव दुरावला ॥ १ ॥ पदार्थीं बैसली बुद्धी शुद्धि नाहीं परात्रिंची । प्रपंच शेवटीं कैचा गेल्या हा देह हातिंचा ॥ २ ॥ देव तो राहिला दूरीं ऐसा वैरी प्रपंच हा । बाळत्वीं छंद मायेचा खेळतां राहिला दूरी ॥ ३ ॥ लागला छंद पोरांचा क्षणक्षण चुकावितो । सांगते माय मानेना लिहीना ना वरीं असे ॥ ४ ॥ हाणिती मारिती पोरें रडतो पडतो बहू । सोशितो आपुल्या जीवें खेळासाठीं मुलांकडे ॥ ५ ॥ कांहींसा शाहणा झाला शिकविला परोपरी । लोभानें लग्नही केलें वोढला सासऱ्याकडे ॥ ६ ॥ नोवरी आवडे जीवीं नटावेंसें मनीं उठे । तारुण्य वाणतां अंगीं कामलोभेंचि भूलला ॥ ७ ॥ खेळ तो राहिला मागें काम तो पडिला पुढें । मोहिला शक्तिनें प्राणी तिजवांचोनि नावडे ॥ ८ ॥ उदंडें जाहलीं पोरें खर्च तो वाढला पुढें । उद्वेग लागला जीवा मेळवीतां मिळेचिना ॥ ९ ॥ उदंड करंटा जाला हिंडे चहुंकडे फिरे । प्रीति ते राहिली मागें अशक्त जाहला बहू ॥ १० ॥ फिटेना ऋण तें वाढे ताडातोडी चहुंकडे । मिळेना अन्न ना वस्त्र वार्धक्यें खंगला बहू ॥ ११ ॥ कष्टला शेवटीं मेला गेला प्रापंच हातिंचा । घातला मागुती जन्मा ऐसा वैरी प्रपंच हा ॥ १२ ॥ जन्मासि घातलें देवें काय येऊनि साधिलें । भुलले चुकले देवा प्रपंच घातकी पहा ॥ १३ ॥ आधींच सर्व जाणावें काय येतें समागमें । निर्वाणीं अंतिचा देवो कोणीं[२] एकें चुकों नये ॥ १४ ॥ घर गांव स्थान माझें वाडे शेत मळे गुरें । पुत्र कन्या बंधु माझे सर्व सांडोनि चालिला ॥ १५ ॥ माझें माझें ह्मणे वेडा स्वार्थबुद्धी बहुतची । सर्व सांडोनि गेला रे एकाएकीं उठोनियां ॥ १६ ॥ प्रपंचीं भुलला प्राणी व्यर्थ आयुष्य वेंचलें । देव ना धर्म ना कांहीं ऐसा हा साहवा रिपू ॥ १७ ॥ प्रपंचाकारणें कष्टी सर्वस्वें वेंचला जिवें । कांहींच वेंचलें नाहीं शेवटीं हात झाडिला ॥ १८ ॥ अनेशी सर्वदा जाला मायाजाळेंचि भूलला । आपुलें मानिलें जें जें तें तें सर्वत्र राहिलें ॥ १९ ॥ जाहला खोत पापाचा सर्वांचें पाप घेतलें । यातना भोगणें लागे चूकला शाहणा कसा ॥ २० ॥ आधींच जाणिजे सर्व विवेकी त्यास बोलिजे । प्रपंच लाधिला

---

१ फार, मोठें. २ नाश. ३ परलोकीं. ४ सर्व. ५ अनेक. ६ सहावा शत्रु प्रपंच.

वा रे वैरी हा सोडिला कसा ॥ २१ ॥ सर्वांस योग साधेना पुण्य उदंड पाहिजे । सहस्रां-माजि तो एक ज्ञान वैराग्य नेटका ॥ २२ ॥ षड्रिपू जिंकिले जेणें तोचि ज्ञानी महाभला । दीक्षेनें उद्धरी लोकां वैरागी तो उदासिन् ॥ २३ ॥ इति श्रीप्रपंचरिपू । जेणें वाढविला भवसंकल्पू । जाणिजे हा अमूपू । दुःखसागर ॥ २४ ॥

प्रपंचनिरूपण समाप्त ॥ ६ ॥

# भीमरूपी स्तोत्रें.

## श्लोक.

॥ १ ॥ भीमरूपी महारुद्रा । वज्रहनुमान मारुती ॥ वनारी[1] अंजनीसूता । रामदूता प्रभंजना[2] ॥ १ ॥ महाबली प्राणदाता । सकळां उठवी बळें ॥ सौख्यकारी शोकहर्ता । धूर्त वैष्णव गायका ॥ २ ॥ दिनानथा हरीरूपा । सुंदरा जगदंतरा ॥ पाताल देवता हंता । भव्य शेंदूरलेपना ॥ ३ ॥ लोकनाथा जगन्नाथा । प्राणनाथा पुरातना ॥ पुण्यवंता पुण्यशीला । पावना परतोषका ॥ ४ ॥ ध्वजांगें उचली बाहो । आवेशें लोटला पुढें । कालाग्नी कालरुद्राग्नी । देखतां कांपती भयें ॥ ५ ॥ ब्रह्मांडें माइल नेणों । आवळे दंतपंगती । नेत्राग्नी चालिल्या ज्वाळा । भृकुटी ताठिल्या बळें ॥ ६ ॥ पुच्छ तें मुरडिलें माथां किरीटें कुंडलें वरी । सुवर्ण घटि कासोटी । घंटा किंकिणि नागरा ॥ ७ ॥ ठकारे पर्वताऐसा । नेटका सडपातळू । चपलांग पाहतां मोठें । महाविद्युल्लतेपरी ॥ ८ ॥ कोटिच्या कोटि उड्डाणें । झेंपावे उत्तरेकडे ॥ मंद्राद्रीसारिखा द्रोणू क्रोधें उत्पाटिला बळें ॥ ९ ॥ आणिला मागुती नेला । आला गेला मनोगती ॥ मनासी टाकिलें मागें । गतीसी तूळणा नसे ॥ १० ॥ अणूपासूनि ब्रह्मांडा । एवढा होत जातसे । ब्रह्मांडाभोंवते वेढे । वज्रपुच्छ घालूं शके ॥ ११ ॥ तयासी तूळणा कोठें । मेरु मंदार धाकुटे ॥ तयासी तुळणा कैशी । ब्रह्मांडीं पाहतां नसे ॥ १२ ॥ आरक्त देखिले डोळां । गिळिलें सूर्यमंडळा । वाढतां वाढतां वाढे । भेदिलें शून्यमंडळा ॥ १३ ॥ भूत प्रेत समंधादी । रोगव्याधी समस्तहि ॥ नासती तूटती चिंता । आनंदें भीमदर्शनें ॥ १४ ॥ हे धरा पंधरा श्लोकी । लाभली शोभली भली । दृढ देहो निसंदेहो । संख्या चंद्रकळा गुणें ॥ १५ ॥ रामदासीं अग्रगणू । कपिकूळासी मंडणू ॥ रामरूप अंतरात्मा । दर्शनें दोष नासती ॥ १६ ॥

॥ भीमरूपी स्तोत्र संपूर्ण ॥ १ ॥

॥ २ ॥ जनीं ते अंजनी माता । जन्मली ईश्वरी तनू ॥ तनू मनू तो पवनू । एकची पाहतां दिसे ॥ १ ॥ त्रैलोक्यीं पाहतां बाळें । ऐसें तों पाहतां नसे ॥ अतूल तुलना नाहीं । मारुती वातनंदनू ॥ २ ॥ चळे ते चंचळे नेटें । बाळ मोवोळ साजि-

---

१ पुच्छ. २ मारुती. ३ वायो. ४ वानररूप धारण करणाऱ्या. ५ दुसऱ्यास आनंद देणाऱ्या. ६ सुंदर. ७ मनाला वाटेल त्या रीतीनें. ८ आकाशाला. ९ मारुतीच्या दर्शनानें. १० भूषण. ११ मृदु.

रें ॥ चळताहे चळवळी । बाळ लोवाळ गोजिरें[1] ॥ ३ ॥ हात कीं पाय कीं सांगों। नखें बोटें परोपरी ॥ दृष्टीचें देखणें मोठें । लांगूळ लळलळीतसे ॥ ४ ॥ खडीखाडी द-डे तैसा । पीळ पेच परोपरी ॥ उड्डाण पाहतां मोठें । झेंपावे रविमंडळा ॥ ५ ॥ बाळानें गिळिला बाळू । स्वभावें खेळतां पहा ॥ आरक्त पीत वाटोळें । देखिलें धरणीवरी ॥ ६ ॥ पूर्वेसि देखतां तेथें । उडालें पावलें बळें ॥ पाहिलें देखिलें हातीं । गिळिलें जाळिलें बहू ॥ ७ ॥ थुंकोनि टाकितां तेथें । युद्ध जालें परोपरी ॥ उपरी तांडेला तेणें । एक नामचि पावला ॥ ८ ॥ हा गिरी तो गिरी पाहे । गुप्त राहे तरुवरी ॥ मागुता प्रगटे धांवे । झेंपावे गगनोपरी ॥ ९ ॥ पळों राहिना कोठें । बळेंचि घालितां झडा ॥ कडाडां मोडती झाडें । वाडेंवाडें उलंडती ॥ १० ॥ पवनासारिखा धांवे । वावरे विवरे बहू ॥ अपूर्व बाळलीला हे । रामदास्य करी पुढें ॥ ११ ॥

॥ भीमरूपी स्तोत्र संपूर्ण ॥ २ ॥

॥ ३ ॥ कोपला रुद्र जे काळीं । ते काळीं पाहवेचिना ॥ बोलणें चालणें कैंचें । ब्रह्मकल्पांत मांडला ॥ १ ॥ ब्रह्मांडाहून जो मोठा । स्थूळ उंच भयानक ॥ पुच्छ तें मुर्डिलें माथां । पाऊल शून्यमंडळीं ॥ २ ॥ त्याहून उंच वज्राचा । सव्य बाहो उभारिला ॥ त्यापुढें दुसरा कैंचा । अद्भुत तुळणा नसे ॥ ३ ॥ मार्तंडमंडळाऐसे । दोन्ही पिंगाक्ष ताविले ॥ कर्करा घर्डिल्या दाढा । उभे रोमांच ऊठिले ॥ ४ ॥ अद्भुत गर्जना केली । मेघची वोळले भुमीं ॥ तुटले गिरिचे गाभे । फूटले सिंधु आटले ॥ ५ ॥ अद्भुत वेश आवेशें । कोपला रणकर्कशू ॥ धर्मसंस्थापनेसाठीं । दास तो ऊठिला बळें ॥ ६ ॥

॥ भीमरूपी स्तोत्र संपूर्ण ॥ ३ ॥

॥ ४ ॥ अंजनीसुत प्रचंड । वज्रपुच्छ कालदंड ॥ शक्ति पाहतां वितंड । दैत्य मारिले उदंड ॥ १ ॥ धगधगी तसी कळा । वितंड शक्ति चंचळा ॥ चळचळीतसे लिळा । प्रचंड भीम आगळा ॥ २ ॥ उदंड वाढला असे । विराट धाकुटा दिसे ॥ त्यजून सूर्यमंडळा । नभांत भीम आगळा ॥ ३ ॥ लुलीत बाळकी लिळा । गिळोनि सूर्यमंडळा ॥ बहूत पोळतां क्षणीं । थुंकिला तो ततक्षणीं ॥ ४ ॥ धगधगीत बूबळा । प्रत्यक्ष सूर्यमंडळा ॥ कराळ काळमूख तो । रिपूकुळासि दुःख तो ॥ ५ ॥ रुपें कपी अचाट हा । सुवर्ण कट्ट कासतो ॥ फिरे उदास दास तो । खळास काळ भासतो ॥ ६ ॥ झळक झळक दामिनी । वितंड काळ कामिनी ॥ तयापरी झळाझळी । लुलित रोमजावळी ॥ ७ ॥ समस्त प्राणनाथ रे । करी जना सनाथ रे । अतूळ तूळणा नसे । अतूळशक्ति वीलसे ॥ ८ ॥ रुपें रसाळ बाळकू । समस्त चित्त चाळकू । कपी परंतु ईश्वरू । विशेष लाधला वरू ॥ ९ ॥ स्वरुद्र क्षोभल्यावरी । तयासि कोण सांवरी ॥ गुणागळा परोपरी । सतेजरूप ईश्वरी ॥ १० ॥ समर्थ दास हा भला । कपीकुळांत शोभला ॥ सुरारिकाळ क्षोभला । त्रिकूट जिंकिला भला ॥ ११ ॥

॥ भीमरूपी स्तोत्र संपूर्ण ॥ ४ ॥

---

१ सुंदर. २ शेपूट. ३ पृथ्वीवर. ४ मोठमोठीं. ५ आकाशांत. ६ मारुती. ७ भयंकर. ८ दानवांचा राक्षसांचा-शत्रू.

॥ ५ ॥ हनुमंता रामदूता । वायुपुत्रा महाबला ॥ ब्रह्मचारी कपीनाथा । विश्वंभरा जगत्पते ॥ १ ॥ दानवारी कामांतका । शोकहारी दयानिधे ॥ महारुद्रा मुख्य प्राणा । मूळमूर्ती पुरातना ॥ २ ॥ वज्रदेही सौख्यकारी । भीमरूपा प्रभंजना ॥ पंचभूतां मूळ माया । तूंचि कर्ता समस्तहि ॥ ३ ॥ स्थितीरूपें तूंचि विष्णू । संहारक पशुपते ॥ परात्परा स्वयंज्योती । नामरूपा गुणातिता ॥ ४ ॥ सांगतां वर्णितां येना । वेदशास्त्रा पडे ठका शेष तो शिणला भारी । नेति नेतिपरा श्रुती ॥ ५ ॥ धन्यावतार कैसा हा । भक्तांलागिं परोपरी । रामकाजीं उतावेळा ॥ भक्तां रक्षक सारथी ॥ ६ ॥ वारितो दुर्घटे मोठीं संकटीं धांवतो त्वरें । दयाळ हा पूर्ण दाता । नाम घेतांच पावतो ॥ ७ ॥ धीर वीर कपी मोठा । मागें न्हेचि सर्वथा ॥ उड्डाण अद्भुत ज्याचें । लंघिलें समुद्राजळा ॥ ८ ॥ देउनी लिखिता हातीं । नमस्कारी सितावरा । वाचितां सौमित्र अंगें । राम सुखें सुखावला ॥ ९ ॥ गर्जती स्वानंदमेळीं । ब्रह्मानंदें सकळहि ॥ अपार महिमा मोठा । ब्रह्मादिकांसि नाकळे ॥ १० ॥ अद्भुत पुच्छ तें कैसें । भोवंडी नभपोकळीं ॥ फांकलें तेज तें भारी । झांकिलें सूर्यमंडळा ॥ ११ ॥ देखतां रूप पैं ज्याचें । उड्डाण अद्भुत शोभलें । ध्वजांग ऊर्ध्व तो बाहु । वामहस्त कटावरी ॥ १२ ॥ कसिली हेमकासोटी । घंटा किंकिण भोंवत्या ॥ मेखळे जडलीं मुक्तें । दिव्य रत्नें परोपरी ॥ १३ ॥ माथां मुगुट तो कैसा । कोटि चंद्रार्क लोपले ॥ कुंडलें दिव्य तीं कानीं । मुक्तामाला विराजते ॥ १४ ॥ केशर रेखिलें भाळीं । मुख सुहास्य चांगलें । मुद्रिका शोभती बोटीं । कंकणें कर मंडित ॥ १५ ॥ चरणीं वाजती अंदू । पदीं तोडर गर्जती ॥ कैवारी नाथ दीनाचा । स्वामि कैवल्यदायकू ॥ १६ ॥ स्मरतां पाविजे मुक्ती । जन्ममृत्यूसि वारितो ॥ कांपती दैत्य तेजासी । भुभुःकार देतां बळें ॥ १७ ॥ पाडितो राक्षसू नेटें । आपटी महिमंडळा । सौमित्रप्राणदाताची । कपिकूळांत मंडणू ॥ १८ ॥ दंडिली पाताळशक्ती । अही मही निर्दाळिले ॥ सोडिलें रामचंद्राला । कीर्ति हे भुवनत्रयीं ॥ १९ ॥ विख्यात ब्रीद तें कैसें । मोक्षदाता चिरंजिवी । कल्याण त्याचेनि नामें । भूत पीशाच कांपती ॥ २० ॥ सर्प वृश्चिक पश्वादी विष शीत निवारण ॥ आवडी स्मरतां भावें । काळ कृतांत धाकतो ॥ २१ ॥ संकटें बंधनें बाधा । दुःख दारिद्रनाशका । ब्रह्मग्रहपिडाव्याधी । ब्रह्महत्यादि पातकें ॥ २२ ॥ पूरवी सकळही आशा । भक्तकामकल्पतरू ॥ त्रिकाळीं पठतां स्तोत्र । इच्छिलें पावसी जनीं ॥ २३ ॥ परंतु पाहिजे भक्ती । संधी कांहीं धरूं नका ॥ रामदासा सहाकारी । सांभाळीतो परोपरी ॥ २४ ॥

॥ भीमरूपी स्तोत्र संपूर्ण ॥ ५ ॥

॥ ६ ॥ कपि विर उठला तो वेग अद्भुत केला । त्रिभुवनजनलोकीं कीर्तिचा घोष केला ॥ रघुपति उपकारें दाटलें थोर भावें । परम विर उदारें रक्षिले सौख्यकारें ॥ १ ॥ सबळ दळ मिळालें युद्ध ऊदंड झालें कपिकटक निमाले पाहतां येश गेले । परदळ शरघातें कोटिच्यां कोटि प्रेतें । अभिनव रणपातें दुःख बीभीपणातें ॥ २ ॥ कपिरिसवनदाटी जाहली थोर आटी । ह्मणउनि जगजेठी धांवणे चार कोटी । मृतिविरहित ठेले मोकळे सिद्ध झाले । सकळ जनु निवाले धन्य सामर्थ्य चाले ॥ ३ ॥ बहु प्रिय रघुनाथा मुख्य तूं प्राणनाथा । उठवि मज अनाथा दूर सांडूनि वेथा । झडकरिं भिमराया तूं करी दृढ काया । रघुविरभजना या लागवेगेंचि जाया ॥ ४ ॥ तुजविण मज पाहे पाहतां कोण आहे ॥ ह्मणउनि मन माझें

१ पत्राला. २ उंच. ३ मस्तकीं. ४ सांखळ्या. ५ मोक्षदायक. ६ यम.

रे तुझी वाट पाहे ॥ मज तुज विरवीलें पाहिलें आठवीलें । सकळिक निजदासालागिं सांभाळवीलें ॥ ५ ॥ उचित हित करावें उद्धरावें धरावें ॥ अनहित न करावें त्वा जनीं येश घ्यावें । अघटित घडवावें सेवका सोडवा हरिभजन घडावें दुःख तें वीघडावें ॥ ६ ॥ प्रभूवर विरराया जाहली दृढ काया परदळ निवटाचा दैत्यकूळें कुटाया ॥ गिरिवर उगटाया रम्यवेषें नटाया । तुजचि अउगटाया ठेविलें मुख्य ठाया ॥ ७ ॥ बहुत सबळ सांठा मागतो अल्प वांटा । न करित हित कांठा थोर होईल ताठा ॥ कृपणपण नसावें भव्य लोकीं दिसावें । अनुदिन करुणेचे चिन्ह पोटीं वसावें ॥ ८ ॥ जळधर करुणेचा अंतरामाजि राहे । तरि तुज करुणा हे कां नये सांग पां हे । कठिण हृदय झालें काय कारुण्य गेलें । न पवसि मज कां रे म्यां तुझें काय केलें ॥ ९ ॥ वडिलपण करावें सेवका सांवरावें । अनहित न करावें तूर्त हातीं धरावें ॥ निपटचि हटवादें प्रार्थिला शब्दभेदें । कपि घन करुणेचा वोळला रामवेधें ॥ १० ॥ बहुताचे करुणा या लोटली देवराया । सहजचि कंपिकेतें जाहली दृढ कायां ॥ परम सुख विलासे सर्वदा सानुदासे । पवनतनुज तोषें वंदिले सावकाशे ॥ ११ ॥

॥ भीमरूपी स्तोत्र संपूर्ण ॥ ६ ॥

॥ ७ ॥ रुद्र हा समुद्र देखतांक्षणीं उठावला । शिराणिचें किराण सज्ज त्रीकूटास पावला । वात जातसे तसाचि स्थूळ देह राहिला । नावरोनि वीवरोनि तो त्रिकूट पाहिला ॥ १ ॥ हीन देव दीनरूप देखतांचि पावला । गड्गडित घड्घडित कड्कडीत कोपला । लाटि कूटि पाडि फोडि झोडि झोलि झोडला । दैत्यतोक एक हाक सर्व गर्व मोडिला ॥ २ ॥ सानरूप पुच्छ तें स्वरूप गुप्त बैसला । कपीकेत शोध वेत त्रीकूटांत बैसला । गडगडी दिसेविना बुझेल कोण कैसला । वळावळी चळाचळी विशाळ ज्वाळ जैसला ॥ ३ ॥ काळदंडसे प्रचंड ते तितंड जातसे । भारभार राजधार पुच्छभार होतसे । पाडिले पछाडिले रुधीरपूर व्हातसे । दैत्य बोलती बळें पळोन काय ग्यातसे ॥ ४ ॥ काळकूट तें त्रिकूट धूट धूट ऊठिलें । दाट थाट लाट लाट कूट कूट कूटिलें । थोर मार तें भुमार लूट लूट लूटिले । चिर्डिलेचि घर्डिलेचि फूट फूट फुटलें ॥ ५ ॥ दाट थाट आटघाट तें कपाट घातलें । सर्व रोध तें निरोध थोर दुःख पावले । सैन्य कष्ट त्यासि कष्ट कर्करून बांधिलें । थोर घात त्यांस पात चर्कडीत चेंदलें ॥ ६ ॥ वज्र पुच्छ त्यासि तुच्छ मानिलें निशाचरीं । सर्वही खणखणाट ऊठिले घरोवरीं । फुटेचिना तुटेचिना समस्त भागले करीं । लटलटीत कांपती बहुत धाक अंतरीं ॥ ७ ॥ थोर थोर दुर दूर दाट दाट दाटलें । कोट मस्त तंग वस्त थाट थाट थाटलें । मंदिरीं घरोघरीं अचाट पुच्छ वाटलें । दैत्य नासतो घसा सकट काट काटले ॥ ८ ॥ हात पाय मान मांज वोढितें पछाडितें । अडचणींत अडकवूनि पीळ पेंच काढितें । लोहदंडसें अखंड राक्षसासि ताडितें । मूळ जाळ व्याळ जाळ दैत्यकूळ नाडिते ॥ ९ ॥ थोर धाक एक हाक त्रीकुटांत पावलें । घरोघरींच वळ्वळी पुढें उदंड ऊटलें । बैसलें उदंड दैत्य ते सभेंत घूसले । सभा विटंबिली बळेंचि कोणसें न सूचलें ॥ १० ॥ देह मात्र एक सूत्र थोर यंत्र हाललें । पुरोनि ऊरलें बळें सभेमधेंचि चालिले । रत्नदीप तेलदीप तेज सर्व काढिलें । लाटिकूटि धामधूम पाडिलें

---

१ शत्रुसैन्य. २ मेघ. ३ मारुतीनें. ४ शरीर. ५ उडी. ६ रक्ताचा पूर. ७ राक्षसांनीं. ८ कमर. ९पुष्कळ.

पछाडिलें ॥११॥ गुप्तरूप मारुती दशाननाकडे भरे। मुगट पाडिला शिरीं कठोर वज्र ठांसरे। सभा विटंबिली बळेंचि गर्गरीत वावरे। बलाढ्य दैत्य मारिले कठीण पुच्छ नावरे ॥ १२ ॥ हास्तमार दैत्यभार दंडभार होतसे। लंडसे कलंडलें उलंडलेचि भंडसे। येत येत पुच्छकेत दैत्य सव बोलती। गळीत बैसले भुमीं न बोलतीं न चालती ॥ १३ ॥ स्वग्रहेत सौख्य देत दैत्यघात भावला। रुद्र हा उठावला कुडावयासि पावला। जाळिलें त्रिकूट नीट आपटून रावणीं। राक्षसांसि थोर दुःख ऊसनें ततक्षणीं ॥ १४ ॥ दीनरूप देव सर्व हें स्वरूप पाहिलें। काळवळून अंतरीं रघुत्तमासि वाहिलें। एक वीर तोच धीर थोर धीर उठला। तोच तोच तो विशेष अंतरींच दाटला ॥ १५ ॥ उदंड देव आटिले तयांसि भीम आटितो। रामदूत वार्तभूत लाटिलाटि लाटितो। ऊठ आमुचे समस्त कूट कूट कूटितो। धूट धूट दैत्य त्यास लूट लूट लूटितो १६ ॥ समस्त दैत्य आळितो बळें त्रिकूट जाळितो। पुरांत गोपुरें वरीं निशाचरांसि वाळितो। उदंड अग्नि लाविला बहु बळें उठावला। कडाडिला नडाडिला भडाडिला धडाडिला ॥ १७ ॥ उदंड जाळिलीं घरें कितेक भार खेंचरें। किलाल धांवती भरें सुरांस वाटलें बरें। उदंड दैत्य धोवडी तयांत पुच्छ भोंवडी। कडाकडी खडाखडी गडागडी घडाघडी ॥१८॥ बळें चपेट मारिला उदंड दैत्य हारिला। तरारिला थरारिला भयंकरू भरारिला। गद्गदी तनू वितंड सागरी सरारिला। जानकीस भेटला प्रभूकडे सरारिला ॥ १९ ॥ काळसे विशाळ दैत्य त्यांत एकला भरें। थोर धाक एक हाक काळचक्र वावरे। शक्ति शोधिली बळेंचि भव्य देखिले धुरे। वानरांसहीत रामदास भेटले त्वरें ॥ २० ॥

॥ भीमरूपी स्तोत्र संपूर्ण ॥ ७ ॥

॥ ८ ॥ भुवनदहनकाळीं काळ विक्राळ जैसा। सकळ गिळित ऊभा भासला भीम तैसा। दुपट कपिंत झोके झोंकिली मेदिनी हे। तळवट धरि धाकें धोकिली जाऊं पाहे ॥ १ ॥ गिरिवरुनि उडाला तो गिरी गुप्त झाला। घसरत दश गांवें भूमिकेमाजि गेला। उडती झडझडाटें वृक्ष हे नेटपाटे। पडति कडकडाटें अंगघातें धुधाटें ॥ २ ॥ थरथरित थरारी वज्र लांगूल जेव्हां। गरगरित गरारी सप्त पाताळ तेव्हां। फणिवर कमठाचे पृष्ठिशीं आंग घाली। तगटित पवनाची झेंप लंकेसि गेली ॥ ३ ॥ थरकत धरणी हे हाणतां वज्रपुच्छें। रगडित रणरंगीं राक्षसें तृण तुच्छें। सहज रिपुदळाचा थोर संहार केला। अवघड गडलंका शीघ्र जाळून आला ॥ ४ ॥ सहज करतळें जो मेरुमंदार पाडी। दशवदन रिपू हे कोण कीती बराडी। अगणित गणवेना शक्ति काळासि हारी। पवनतनुज पाहा पूर्ण रुद्रावतारी ॥ ५ ॥

॥ भीमरूपी स्तोत्र संपूर्ण ॥ ८ ॥

॥ ९ ॥ लघुशी परी मूर्ति हे हाटकाची। करावी तया मारुतानाटकाची। असावी सदा ताहूतामाजि दंडीं। समारंगणीं पाठ दीजे उदंडी ॥ १ ॥ ठसा हेमधातूवरी वायुसूतू। तथा ताहूताचेपरी रौप्यधातू। तयाची पुजा मंदवारीं करावी। बरी आवडी आर्त पोटीं धरावी ॥ २ ॥ स्वधामासि जातां प्रभू रामराजा। हनुमंत तो ठेविला याच काजा। मना सर्वदा रामदासासि पावे। खळीं गांजितां ध्यान सोडून धांवे ॥ ३ ॥

॥ भीमरूपी स्तोत्र संपूर्ण ॥ ९ ॥

---

१ रावणाकडे. २ रक्षण करण्याला. ३ हृदयांत. ४ मारुती. ५ पृथ्वी. ६ शेपूट. ७ कूर्माचे. ८ सोन्याची.

॥ १० ॥ चपळ ठाण विराजतसे बरें । परम सुंदर रूप साजिरें । धगधगीत बरी उटि सिंदूरें । निकट दास कपी विरहे खरें ॥ १ ॥ कपी वीर जेठी उडे चारि कोटि । गिरी द्रोण दाटी तळातें उपाटी । झपेटी लपेटी करी पुच्छवेटी । त्रिकूटाचळीं उठवा वीर कोटी ॥ २ ॥ रघुविरा समिरात्मज भेटला । हरिजनां भजनांकुर फूटला । कपिकुळें सकळें मिनलीं बळें । रिपुदळें विकळें वडवानळें ॥ ३ कपीवीर तो लीन तल्लीन झाला । प्रसंगेंचि पाहोनि सन्मूख आला । हनमंत हें पावला नाम तेथें । महीमंडळीं चालिलें सर्व तेथें ॥ ४ ॥ नव्हे सौख्य हा भीम पूर्णप्रतापी । देहो आचळातुल्य हा काळरूपी । पुढें देखतां दैत्यकूळें दरारा । भुतें कांपती नाम घेतां थरारां ॥ ५ ॥ सिमा सांडिली भीमराजें विशाळें । बळें रेटिलें दैत्य कृतांत काळें । गजामस्तकीं केसरीचा चपेटा । महावीर तैसा । विभांडी त्रिकूटा ॥ ६ ॥

॥ भीमरूपी स्तोत्रें संपूर्ण ॥ १० ॥

॥ ११ ॥ नमन गा तुज हे भिमराया । निज मती मज दे मज गाया । तडकितां तडकी तडकाया । भडकितां भडकी भडकाया ॥ १ ॥ हरुषला हर हा वरदानीं । प्रगटला नटला मज मानी । वदवितो वदनीं वदवीतो । पुरवितो सदनीं पदवी तो ॥२॥ अवचितां चढला गडलंका पळभरी न धरी मनिं शंका । तडकितां तडकी तडकीतो । भडकितां भडकी भडकीतो ॥३॥ खवळले रजनीचरभारें । भडकितां तडके भडमारें । अवचितां गरजे भुभुकारें । रगडिजे मग कां दळ सारें ॥ ४ ॥ कितियका खरडी खुरडीतो । कितियका नरडी मुरडीतो कितियका चिरडी चिरडीतो । कितियका भरडीं दरडीतो ॥ ५ ॥ बळि महा रजनीचर आले । भिम भयानकसेचि मिळाले । रपटितां रपटी रपटेना । अपटितां अपटी अपटेना ॥ ६ ॥ खिजवितां खिजवी खिजवेना । झिजवितां झिजवी झिजवेना । रिझवितां रिझवी रिझवेना । विझवितां विझवी विझवेना ॥ ७ ॥ झिडकितां झिडकी झिडकेना । तडकितां तडकी तडकेना । फडकितां फडकी फडकेना । कडकितां कडकी कडकेना ॥ ८ ॥ दपटितां दपटीं दपटेना । झपटितां झपटी झपटेना । लपटितां लपटी लपटेना । चपटितां चपटी चपटेना ॥ ९ ॥ दवडितां दवडी दवडेना । घडवितां घडवी घडवेना । बडवितां बडवी बडवेना । रडवितां रडवी रडवेना ॥ १० कळवितां कळवी कळवेना । खवळितां खवळी खवळेना । जवळितां जवळी जवळेना । मळवितां मळवी मळवेना ॥ ११ ॥ चढवितां चढवी चढवेना । झडवितां झडवी झडवेना । तडवितां तडवी तडवेना । गडवितां गडवी गडवेना ॥ १२ ॥ तगटितां तगटी तगटेना । झगटितां झगटी झगटेना । लगटितां लगटी लगटेना । झकटितां झकटी झकटेना ॥ १३ ॥ टणकितां टणकी टणकेना । ठणकितां ठणकी ठणकेना । दणगितां दणगी दणगेना । फुणगितां फुणगी फुणगेना ॥ १४ ॥ चळवितां चळवी चळवेना । छळवितां छळवी छळवेना । जळवितां जळवी जळवेना । टळवितां टळवी टळवेना ॥१५॥ घसरितां घसरी घसरेना । विसरितां विसरी विसरेना । मरवितां मरवी मरवेना । हरवितां हरवी हरवेना ॥ १६ ॥ उलथितां उलथी उलथेतां । कलथितां कलथी कलथेना । उडवितां उडवी उडवेना । बुडवितां बुडवी बुडवेना ॥ १७ ॥ बुकलितां बुकली बुकलेना । धुमसितां धुमसी धुमसेना । धरवितां धरवी धरवेना ।

---

१ पुच्छाचें वेष्टन. २ मारुती. ३ पर्वतासामान. ४ सिंहाचा. ५ अडचणीच्या ठिकाणीं ६ भयंकर.

सरवितां सरवी सरवेना ॥१८॥ झडपितां झडपी झडपेना । दडपितां दडपी दडपेना । तटवितां तटवी तटवेना । फटवितां फटवी फटवेना ॥ १९ ॥ वळवितां वळवी वळवेना । पळवितां पळवी पळवेना । ढळवितां ढळवी ढळवेना । ळळवितां ळळवी ळळवेना ॥ २० ॥ घुरकितां घुरकी घुरकावी । थरकितां थरकी थरकावी । भरकितां भरकी भरकावी । झरकितां झरकी झरकावी ॥ २१ ॥ परम दास हटी हटवादी । लगटला उतटी तटवादी । शिकवितां शिकवी शिक लावी । दपटितां दपटून दटावी ॥ २२ ॥

॥ भीमरूपी स्तोत्र संपूर्ण ॥ ११ ॥

॥ १२ ॥ भिम भयानक तो शिक लावी । भडकला सकळां भडकावी । वरतरू वरता तडकावी । बळकटां सकळां धडकावी ॥ १ ॥ सकळ ते रजनीचरभारे[1] । संकटें बांधत पुच्छ उभारे । रडत बोलती वीरच सारे । न दिसतांचि बळें भुभुकारे ॥ २ ॥ जळतसे त्रिकुटाचळ लंका । धरितसे रजनीचर शंका । उमजती उमजे वर घाला । अवचितां बुडवी सकळांला ॥ ३ ॥ कठिण मार त्रिरांस न साहे । रुधिरपुरें[3] महीवरि वाहे । बहुत भूत भुतावळि आली । रणभुमीवरि येउनि घाली ॥ ४ ॥ अमर ते ह्मणती विर आला । नवल हें पुरलें सकळांला । उदिन काळ बरा दिसताहे । विधिविधान विधी मग पाहे ॥ ५ ॥

॥ भीमरूपी स्तोत्र संपूर्ण ॥ १२ ॥

॥ १३ ॥ बळें सर्व संहारिलें रावणाला । दिलें अक्षयीं राज्य बीभीषणाला ॥ रघूनायकें देव ते मुक्त केले । अयोध्यापुरा जावया सिद्ध जाले ॥१॥ पथामाजि[4] कृष्णातिरीं रामराया । घडे राहणें स्नानसंध्या कराया॥सिता राहिली शीरटें गांव जेथें । रघूराज तो पश्चिमेचेनि पंथें ॥२॥ जप ध्यान पूजा करी रामराजा । तयाचेपरी वीर सौमित्र[5] वोजा ॥ स्मरेना देहीं चित्त ध्यानस्थ झालें । अकस्मात तें तोय अद्भुत आलें ॥ ३ ॥ बळें चालिला ओघ नेटें भडाडां । नभीं धांवती लोट लाटा धडाडां । नदी चालली राम ध्यानस्थ जेथें । बळें विक्रमें पावला भीम तेथें ॥४॥ उभा राहिला भीमरूपी स्वभावें । बळें तुंब तो तुंबिला दोन गांवें ॥ नदी एक वीभागली दोन्हि बाहें । ह्मणोनि तया नाम हें ऊर्णबाहे ॥ ५ ॥ सुखें लोटती देखतां रामलिंगा । बळें चालिली धांवतीं कृष्णगंगा । परी पाहतां भीम तेथें दिसेना । उदासीन हें चित्त कोठें वसेना ॥ ६ ॥ हनूमंत पहावयालागिं आलों । दिसेना सखा थोर विस्मीत झालों । तयावीण देवालय तें उदासे । जळांतून बोभाइलें रामदासें ॥७ ॥ मनांतील जाणोनि केला कुडावा । दिले भेटिचा जाहला थोर थावा ॥ बळें हांक देतांचि तैसा गडाडी । महामेघ जैसा गभीरू घडाडी ॥ ८ ॥ रघूराज वैकुंठधामासि गेले[6] । तथीं मारुती दास हे नीरवीले । रघूनाथ ऊपासकाला प्रसंगें ।सख्या मारुती पाव रे लागवेगें[7] ॥ ९ ॥ प्रभूचें महावाक्य त्वां साच केलें । ह्मणे दास हे प्रत्यया[8] सत्य आलें । जनामाजि हें सांगतां पूरवेना । अवस्था मनीं लागली हे सरेना ॥ १० ॥

॥ भीमरूपी स्तोत्र संपूर्ण ॥ १३ ॥

## त्रयोदश स्तोत्रें समाप्त·

---

१ राक्षससमूह. २ एकाकी. ३ रक्ताचा पूर. ४ मार्गामध्यें. ५ लक्ष्मण. ६ स्वर्गाला. ७ जलदीनें. ८ अनुभवाला.

# प्रासंगिक कविता.

मातोश्रीची भेट झाली तेव्हां तिनें भूतचेष्टा कोठें शिकलास ह्मणून विचारिलें त्या वेळीं तीस दिलेलें उत्तरः—

## पद.

होतें वैकुंठींचे कोनीं । शिरलें अयोध्याभुवनीं । लागे कौसल्येचे स्तनीं । तेंचि भूत गे माय ॥ १ ॥ जातां कौशिकाराउळीं । अवलोकितां भयंकाळीं । ताटिका ते छळोनि मेली । तेंचि भूत० ॥ २॥ मार्गीं जातां वनांतरीं । पाय पडला दगडावरी । पाषाणाची झाली नारी । तेंचि भूत० ॥३॥ जनकाचे अंगणीं गेलें । शिवाचें धनु भंगिलें । वैदेहीअंगीं संचरलें । तेंचि भूत० ॥ ४ ॥ जेणें सहस्रार्जुन वधिला । तो हा तत्काळचि भ्याला । धनु देऊनि देह रक्षिला । तेंचि भूत० ॥ ५ ॥ पितयाचे भाकेशीं । कैकेयीचे वचनासी । मानुनि गेलें अरण्यासी । तेंचि भूत० ॥ ६ ॥ चौदा संवत्सर तापसी । अखंड हिंडे वनवासी । सांगोतें भुजंग पोसी । तेंचि भूत० ॥ ७ ॥ सुग्रीवाचें पालन । वाळीचें निर्दालन । तारी पाण्यावरी पाषाण । तेंचि भूत० ॥ ८ ॥ रक्षी मरणीं बिभीषण । मारी रावण कुंभकर्ण । तोडी अमरांचें बंधन । तेंचि भूत० ॥ ९ ॥ वामांगीं स्त्रियेला धरिलें । धांवुनी शरयुतीरा आलें । तेथें भरतासी भेटलें । तेंचि भूत०॥१०॥ सर्वां भूतांचें हृदय । नाम त्याचें रामराय । रामदास नित्य गाय । तेंचि भूत० ॥ ११ ॥

---

स्वामींनीं एकवार आपलें चरित्र तुकोबास सांगितलें तें:—

## अभंग.

नमो अधिष्ठाता विष्णु मुख्य साधू । तेथूनियां बोधू विधीलागीं ॥ १ ॥ विधीपासूनीयां ज्ञान विधिसुता । तेंचि ज्ञान प्राप्त वसिष्ठासी ॥२॥ वसिष्ठें उपदेश केला रामचंद्रा । तोचि महारुद्रा हनुमता ॥ ३ ॥ हनुमंत कलीमाजी चिरंजीव । झाले देव सर्व बौद्धरूप ॥ ४ ॥ बौद्ध नारायण होऊनी बैसला । उपाय बोलिला व्यासमुनी ॥५॥ व्यास मुनि बोले भविष्यपुराण । जग उद्धरणें कलीमाजीं ॥ ६ ॥ कलीमाजीं गोदातीरीं पुण्य क्षेत्र । तेथें वातपुत्र अवतरे ॥ ७ ॥ अवतरे अभिधानीं रामदास । कृष्णातीरीं वास जगदुद्धारा ॥ ८ ॥ जगदुद्धारासाठीं श्रीरामा सांकडे । केलें वाडेंकोडें भक्तिपंथें ॥ ९ ॥ भक्तिपंथें मोठा केला श्रीरामानें । जंबू अभिधान ग्राम तेथें ॥ १० ॥ तेथें ब्रह्मनिष्ठ अधिष्ठाता पूर्ण । सूर्य नामा जाण द्विजवर्य ॥ ११ ॥ द्विजवर्य सूर्य जैसा तपोधन । अद्भुत विंदान झालें तेथें ॥ १२ ॥ झाली रामनवमी मध्य अष्टमीसी । अर्ध रात्रीं त्यासी दूत आले ॥ १३ ॥ दूत आले पुढें घालोनी चालिले । महाद्वारा आले भीम जेथें ॥१४॥ भीमदेवालयीं नेऊनी तयांसी । तेथें उभयतांसी देखियेलें ॥१५॥ देखियेले राजपुत्र सूर्यवंशी । झांपड नेत्रांसी पडे तेव्हां ॥ १६ ॥ पडे तेव्हां जसा दंडवत भूमीं । मग अंतर्यामीं बो लाविलें ॥ १७ ॥ बोलावूनि माथां ठेवी सव्य पाणी । मंत्र सांगे कर्णीं रामनाम ॥ १८ ॥ ना

---

१ स्त्री. २ जानकीच्या अंगीं ३ बरोबर. ४ देवाचें. ५ मारुती. ६ संकट ७ कुशलता. ८ हात.

सांगुनीयां ताम्रमूर्ति रम्य । पटाभिश्रीराम दिधला तया ॥ १९ ॥ तया दिला वर तुज पुत्र होतील । ध्वज उभारतील रामदास्यें ॥ २० ॥ रामदास्य झालें धन्य वंशोद्धार । बोलेनि सत्वर गैब झाले ॥ २१ ॥ झाला रामनवमीमहोत्सव थोर । मध्यान्हीं सत्वर जन्म झाला ॥ २२ ॥ जन्म झाला झाला देव वंशा आले । उपासना चाले राघवाची ॥ २३ ॥ राघवाची भक्ति सुखाची विश्रांती । पितयाची शांति झाली पुढें ॥ २४ ॥ पुढें ज्येष्ठ बंधु न सांगेचि कांहीं । सुखें देवालयीं निद्रा केली ॥ २५ ॥ निद्रा केली तेथें श्रीरामें उठवुनी । तोचि मंत्र कानीं सांगितला ॥ २६ ॥ सांगितला बोध रामीं रामदासा । गुरूच्याही वंशा निरोपिलें ॥२७॥

---

चांफळामध्यें रामाचें देवालय बांधून उत्सव सुरू केला, तें वर्णनः—

## डफगाणें.

भोंवतां डोंगराचा फेर । मध्यें देवाचें शिखर । पुढें मंडप सुंदर । नवखणांचा ॥ १ ॥ चहुं खांबांची रचना । वरत्या चोवीस कमाना । क्रम कटाव नयना । समाधान ॥ २ ॥ नाना तरु आंबे बनें । दोहींकडे वृंदावनें । वृंदावनें जगज्जीवनें । वस्ती केली ॥ ३ ॥ पुढें उभा कपिवर । पूर्वकडे लंबोदर । खालीं दाटले दरबार । ठायीं ठायीं ॥४॥ दमामे चौघडे वाजती । धडाके भांड्यांचे होती । फौजा भक्तांच्या साजती । ठायीं ठायीं ॥ ५ ॥ माहीमरातबे निशाणें । मेघडंबरें सूर्यपानें । पताका छत्र्या सुखासनें । दिंड्या विंझणे कुंचे ॥ ६ ॥ काहळें कर्णे तुरंग बांकें । नानाध्वनीं गगन झाकें । बहु वाद्यांचे धबके । परोपरी ॥ ७ ॥ टाळ मृदंग उपांग । ब्रह्मविणे चुटक्या चंग । तानमानें माजे रंग । हरिकथेसी ॥ ८ ॥ घंटा घांटा शंख भेरी । डफडीं पांवे वाजंतरीं । भाट गर्जती नागरी । परोपरी ॥ ९ ॥ उदंड यात्रेकरू आले । रंगीं हरिदास मिळाले । श्रोते वक्ते कथा चाले । भगवंताची ॥ १० ॥ नाना पुष्पमाळा तुरे । पाहों जातां भडगे रंगपुरे । स्वर्गीचा उतरे । ठायीं ठायीं ॥ ११ ॥ गंध सुगंध केशरें । उदंड उधळिती धूसरें । जगदांतरें हरिहरें । वस्ती केली ॥ १२ ॥ दिवट्या हिलाल चंद्रज्योति । नळे अरडत ऊठती । बाण हवाया झरकती । गगनामध्यें ॥ १३ ॥ उदंड मनुष्यांचे थाटे । दिसताती लखलखाटे । एकमेकांसी बोभाटें । बोलाविती ॥ १४ ॥ उदंड उजळिल्या दीपिका । नामघोष करताळिका । कित्येक ह्मणती ऐका ऐका । ऐसे शब्द होती ॥ १५ ॥ खिरापतीची वांटणी । तेथें जाहलीसे दाटणी । पैस नाहीं राजांगणीं । दाटी जाहली ॥ १६ ॥ रंगमाळा निरांजनें । तेथें वस्ती केली मनें । दिवस उगवला सुमनें । कोमाइलीं ॥ १७ ॥ रथ देवाचा ओढिला । यात्रेकरां निरोप झाला । पुढें उत्सवयाचा गलबला । ठायीं ठायीं ॥१८॥ भक्तजन ह्मणती देवा । आतां लोभ असूं द्यावा । धन्य सुकृताचा ठेवा । भक्ति तुम्ही ॥ १९ ॥ दास डोंगरीं राहतो । यात्रा देवाची पाहतो । देव भक्तांसवें जातो । ध्यानरूपें ॥ २० ॥

---

शिवाजी महाराज यांस समर्थांच्या भेटीची सारखी उत्कंठा लागून राहिली होती. यासंबंधें समर्थांचें महाराजांस पत्र आलें तें:—

---

१ भरदुपारीं. २ मोठे नगारे. ३ मोठीं उंच. ४ उंच छत्र्या. ५ अब्दागिरी. ६ लोट, पूर. ७ टाळ्या. ८ पुष्पें. ९ पुण्याचा. १० भक्ताबरोबर.

# ओंव्या.

निश्चयाचा महामेरु । बहुत जनांसी आधारु । अखंड स्थितीचा निर्धारु । श्रीमंत योगी ॥ १ ॥ परोपकाराचिया राशी । उदंड घडती जयासी । तयाचे गुणमहत्वासी । तुळणा कैंची ॥ २ ॥ नरपति हयपति गजपति । गडपति भूपति जळपति । पुरंदर आणि छत्रपति । शक्ति पृष्ठभागीं ॥ ३ ॥ यशवंत कीर्तिवंत । सामर्थ्यवंत वरदवंत । पुण्यवंत नीतिवंत । जाणता राजा ॥ ४ ॥ आचारशील विचारशील । दानशील धर्मशील । सर्वज्ञपणें सुशील । सकळां ठायीं ॥ ५ ॥ धीर उदार गंभीर । शूर क्रियेसी तत्पर । सावधपणें नृपवर । तुच्छ केले ॥ ६ ॥ तीर्थक्षेत्रें मोडिलीं । ब्राह्मणस्थानें भ्रष्ट झालीं । सकळ पृथ्वी आंदोळली । धर्म गेला ॥ ७ ॥ देव धर्म गोब्राह्मण । करावया संरक्षण । हृदयस्थ जाला नारायण । प्रेरणा केली ॥ ८ ॥ उदंड पंडित पुराणिक । कवीश्वर याज्ञिक वैदिक । धूर्त तार्किक सभानायक । तुमच्या ठायीं ॥ ९ ॥ या भूमंडळाचे ठायीं । धर्म रक्षी ऐसा नाहीं । महाराष्ट्रधर्म राहिला कांहीं । तुह्मां-करितां ॥ १० ॥ आणीकही धर्मकृत्यें चालती । आश्रित होऊनि कित्येक राहती । धन्य धन्य तुमची कीर्ति । विश्वीं विस्तारली ॥ ११ ॥ कित्येक दुष्ट संहारिले । कित्येकांस धाक सुटले । कित्येकांस आश्रय झाले । शिव कल्याणराजा ॥ १२ ॥ तुमचे देशीं वास्तव्य केलें । परंतु वर्तमान नाहीं घेतलें । ऋणानुबंधें विस्मरण झालें । काय नेणूं ॥ १३ ॥ सर्वज्ञ मंडळी धर्ममूर्ति । सांगणें काय तुह्मांप्रति । धर्मस्थापनेची कीर्ति । संभाळली पाहिजे ॥ १४ ॥ उदंड राजकारण तटलें । तेणें चित्त विभागिलें । प्रसंग नसतां लिहिलें । क्षमा केली पाहिजे ॥ १५ ॥

---

शिवाजीमहाराजांची भेट झाली तेव्हां समर्थांनीं उपदेश केला तोः—

# राजधर्म.

नमो मंगळमूर्ति विघ्नहरू । सरस्वतीस नमस्कारू । सद्गुरु संत कुलेश्वरू । दाशरथी ॥ १ ॥ श्रोतीं मानेल तरी घ्यावें । अथवा टाकूनि सांडावें । प्रपंचाकारणें स्वभावें । बोलिलों मी ॥ २ ॥ सावधपणें प्रपंच केला । तेणें सुखाचे पावला । दीर्घ प्रयत्नें मांडला । कार्यभाग साधे ॥ ३ ॥ आधीं मनुष्य ओळखावे । योग्य पाहूनि काम सांगावें । निकामी[2] तरी ठेवावे । एकीकडे ॥ ४ ॥ पाहोन समजोन कार्य करणें । तेणें कदापि नये उणें । कार्यकर्त्यांच्या गुणें । कार्यभाग होतो ॥ ५ ॥ कार्यकर्ता प्रयत्नीं जाड । कांहींएक असला हेकाड । तरी[3] समर्थपणें पाठवाड । केली पाहिजे ॥ ६ ॥ अमर्याद कितेखोर । यांचा करावा संहार । शोधिला पाहिजे विचार । यथातथ्य ॥ ७ ॥ मनुष्य राजी राखणें । हींचि भाग्याचीं लक्षणें । कठीणपणें दूरी धरणें । कांहीं एक ॥ ८ ॥ समयीं मनुष्य कामीं येतें । तयाकारणें सोशिजे तें । न्याय सांडितां मग तें । सहजचि खोटें ॥ ९ ॥ न्यायसीमा उल्लंघूं नये । उल्लंघितां होतो अपाय । न्याय नसतां उपाय । होईल कैचा ॥ १० ॥ उपाधीस जो कंटाळला । तो भाग्यापासूनि चेवला[3] । समयीं धीर सांडिला । तोही खोटा ॥ ११ ॥ संकटीं कंटाळों नये । करावे अत्यंत उपाय । तरी मग

---

१ राहणें. २ निरुपयोगी. ३ भ्रष्टला.

पाहतां काय । उणें आहे ॥ १२ ॥ बंध बांधावे पेटके । जेणें करितां चतुर तुके । ताव न होतां फिके । कारभार होती ॥ १३ ॥ धुरेनें युद्धासी जाणें । अशीं नव्हेत कीं राजकारणें । धुराच करोनि सोडणें । कित्येक लोक ॥ १४ ॥ उदंड मुंडें असावीं । सर्वही एक न करावीं वेगळालीं कामें घ्यावीं । सावधपणें ॥ १५ ॥ मोहरा पेटला अभिमाना । मग तो जिवास पाहेना । मोहरे मिळवूनि नाना । वरी चपेटे करी ॥ १६ ॥ देखोनि व्याघ्राचा चपेटा । मेंढरें पळती बारा वाटा मस्त जो तो रेडा मोठा । काय करावा ॥ १७ ॥ रायांनीं करावे राजधर्म । क्षेत्रीं करावे क्षात्रधर्म । ब्राह्मणीं करावे स्वधर्म । नाना प्रकारें ॥ १८ ॥ तुरंगशस्त्र आणि स्वार । पहिला पाहावा विचार । निवडूं जातां थोर थोर । शत्रु पळती ॥ १९ ॥ ऐसा प्रपंचाचा विवेक । स्वल्प बोलिलों कांहीं एक । एका मनोगतें स्वामी सेवक । असतां बरें ॥ २० ॥

## क्षात्रधर्म.

अल्पस्वल्प संसारधर्म । मागां बोलिलों राजधर्म । आतां ऐका क्षात्रधर्म । परम दुर्लभ जो ॥ १ ॥ जयास जिवाचें वाटे भय । त्यानें क्षात्रधर्म करूं नये । कांहीं तरी करूनि उपाय । पोट भरावें ॥ २ ॥ विन्मुखमरणीं नर्क होती । वांचून येतां मोठी फजिती । इहलोक परलोक जाती । पाहाना कां ॥ ३ ॥ मारितां मारितां मरावें । तेणें गतीस पावावें । फिरोन येतां भोगावें । महद्भाग्य ॥ ४ ॥ नजरकरार राखणें । कार्य पाहुनी खतल करणें । तेणें रणशूरांचीं अंतःकरणें । चकित होती ॥ ५ ॥ जैसा भांड्यांचा गलोला । निर्भय भारामध्यें पहिला । तैसा क्षत्री रिचवला । परसैन्यामध्यें ॥ ६ ॥ निःशंकपणें भार फुटती । परवीरांचे तवके तुटती । जैसा नळिया घालूनि घेती । भेरी उठतां ॥ ७ ॥ ऐसे अवघेच उठतां । परदळाची कोण चिंता । हरणें लोळवी चित्ता । देखत जसा ॥ ८ ॥ मर्दें तकवा सोडूं नये । म्हणजे प्राप्त होतो जय । कार्यप्रसंग समय ओळखावा ॥ ९ ॥ कार्य समजेना अंतरें । तें काय झुंजेल विचारें । युद्ध करावें खबरदारें । लोक राजी राखतां ॥ १० ॥ दोन्ही दळें एकवटें । मिसळताती लखलखाटें । युद्ध करावें खणखणाटें । सीमा सांडूनी ॥ ११ ॥ देवमात्र उच्छेदिला । जित्यापरीस मृत्यू भला । आपुला स्वधर्म बुडविला । ऐसें समजावें ॥ १२ ॥ मराठा तितका मेळवावा । आपुला महाराष्ट्रधर्म वाढवावा । येविषयीं न करितां तकवा । पूर्वज हांसती ॥१३॥ मरणहांक तों चुकेना । देह वांचवितां वांचेना । विवेका होऊनि समजाना । काय करावें ॥१४॥ भले कुळवंत म्हणावें । तेंही वेगीं हजीर व्हावें । हजीर न होतां कष्टावें । लागेल पुढें ॥ १५ ॥ एक जाती दोन जाती पावला । तो कैसा म्हणावा भला । तुम्हां सकळांस कोप आला । तरी क्षमा केली पाहिजे ॥१६॥ देवद्रोही तितुके कुत्ते । मारूनि घालावे परते । देवदास पावती फत्तें । यदर्थी संशय नाहीं ॥ १७ ॥ देव मस्तकीं धरावा । अवघा हलकल्लोळ करावा । मुलूख बडवा कां बडवावा । धर्मसंस्थापनेसाठीं ॥१८॥ विवेक विचार सावधपणें । दीर्घ प्रयत्न केलाचि करणें । तुळजावराचेनि गुणें । रामें रावण मारिला ॥१९॥ अहो हे तुळजा भवानी । प्रसिद्ध रामवरदायिनी । रामदास ध्यातो मनीं । यन्निमित्त ॥ २० ॥

---

१ डोकीं. २ क्षत्रियांनीं. ३ घोडे. ४ शत्रूच्या सैन्याची. ५ धैर्य, बळ. ६ ज्याकरितां.

# सेवकधर्म.

ऐका प्रपंचविचार । आपली करणी उतरे पार । येथें नाहीं उत्तर । श्रेष्ठाकडे ॥ १ ॥ पूर्वीं दरिद्रें पीडिले । ते समर्थ अंगीकारिले । शिकवूनि शिकवूनि शहाणे केले । नाना प्रकारें ॥ २ ॥ पहिला होता नाचार । श्रेष्ठीं वाढवोनि केला थोर । या वचनीं अनादर । होतां बरवें नव्हे ॥ ३ ॥ जो आपुलें हित न करी । तो आपुला आपण वैरी । येथें कांहीं कोणावरी । शब्द नाहीं ॥ ४ ॥ श्रेष्ठांचें मनोगत राखेना । बळेंच करी वल्गना । युक्ति प्रयुक्ति नाना । प्रकारें करी ॥ ५ ॥ श्रेष्ठांचें केलें मोडावें । आपुलेंचि पुढें प्रतिष्ठावें । तरी मग लागे भ्रष्टावें । वैभवापासूनि ॥६॥ पुढें पुढें काम करी । मागें कांहींच न करी । कार्यातें नसतां उरी । कांहींच पुढें ॥ ७ ॥ उगाच गर्वें मेला । मागील दिवस विसरला । स्वार्थेचि करूं लागला । ह्मणजे गेलें ॥ ८ ॥ वडिलांसि बुद्धि शिकवी । युक्तिबळें जाणीव दावी । तथा मूर्खासि पदवी । प्राप्त कैंची ॥९॥ जो सदांचा चोरटा । जो सदांचा कळकटा । कठीण शब्दें बारा वाटा । मनुष्यें केलीं ॥ १० ॥ आपला इतबार राखावा । मग तो सर्व धणी जाणावा । उदंड वैभवाचा हेवा । करूं नये ॥११॥ कार्य करितां कांहीं न मागे । तयाची चिंता प्रभूस लागे । ऐसें जाणूनि विवेक जागे । ह्मणिजे बरें ॥ १२ ॥ आपणास जपूं लागला । श्रेष्ठांचे मनींचा उतरला । येणें कोण स्वार्थ जाला । विचारावा ॥ १३ ॥ स्वामींनीं जें जें बोलावें । तेंचि सेवकीं प्रतिष्ठावें । वेळ चुकवूनि बोलावें । विनीत होऊनि ॥१४॥ श्रेष्ठापुढें शहाणपण । हेंचि केवळ मूर्खपण । मूर्खपणें नागवण । आली घरा ॥ १५ ॥ कळेल तरी सांगूं नये । वडिलांची बुद्धि शिकवूं नये । नेणपणेंचि उपाय । विवेकीं करावा ॥१६॥ पुढें पुढें निघूं नये । आज्ञेवेगळें वर्तूं नये । न मानितां अपाय । नेमस्त आहे ॥ १७ ॥ आधीं वडिलांसी पुसावें । किंवा आपणचि करावें । समय पाहूनि वर्तावें । विवेकी पुरुषें ॥ १८ ॥ आधीं निश्चय करितो । मग उगेंचि पुसतो । इतका विचार करी तो । शहाणा कैंचा ॥ १९ ॥ मी करितों ऐसें पुसणें । तें पुसणें न पुसणें । करूं न करूं हें विचारणें । हें उत्तमोत्तम ॥ २० ॥ मी शहाणा ऐसें कळलें । तरी स्वतंत्र पाहिजे केलें । स्वतंत्र होतां मिरवलें । न शहाणपण ॥ २१ ॥ हें मनींचे मनीं समजावें । प्रकट कासया करावें । घेऊं ये तरी घ्यावें । चातुर्यासी ॥ २२ ॥ न्याय मानील तो न्यायी । न्याय न मानील तो अन्यायी । दगलबाज चिडाई । सुटेल कैसी ॥ २३ ॥ ज्याचे अंतरीं स्वार्थबुद्धि । तेथें कैंची असेल शुद्धि । बुद्धि सांडितां अवधी । दुःखासी होय ॥ २४ ॥ ज्याकरितां प्राणी वाढले । त्यासीच आडवूं लागले । ते कैसे ह्मणावे भले । नीतिवंत ॥ २५ ॥ सेवकीं सेवाचि करावी । स्वामी आसुदकीं[1] यावी । तरीच पाविजे पदवी । कांहींएक ॥ २६ ॥ समर्थांचें मनोगत । तैसेंचि वर्तणें उचित । तेथें चुकतां आघात । नेमस्त आहे ॥ २७ ॥ सेवक तोचि अडेना । शब्द भूईस पडेना । काम चुकलें हें घडेना । कदाकाळीं ॥२८॥ उंच अश्व वेळेस अडे । तरी पादच्छेद करणें घडे । ऐसें कळोनियां वेडे । अडोचि लागे ॥ २९ ॥ मनोगत राखतां श्रेष्ठ वोळे[4] । मनोगत चुकतां खवळे । ऐसें जयासी न कळे । तो जाणता कैसा ॥ ३० ॥ स्वामीस जें अवश्य व्हावें । तैसें सेवकें न व्हावें । होऊनि आडवावें । कोण्या विचारें ॥ ३१ ॥ आपस्वार्थ उदंड[5] करणें । आणि स्वामिकार्य बुडविणें ।

---

१ मलिन, भ्रष्ट. २ नम्र. ३ फसवणूक. ४ प्रसन्न होतो, पावतो. ५ बहुत.

ऐसीं नव्हेत कीं लक्षणें । सेवकाचीं ।। ३२ ।। सेवकपणाचें मुख्य वर्म । कांहीं नसावें कृत्रिम । कृत्रिम केलिया संभ्रम । कैंचा पुढें ॥ ३३ ।। धनिकाजी जितुका सावधान । सर्वकाळ परिछिन्न । त्यासी चोरितां निदान । बरें नव्हे ।। ३४ ॥ थोडी बहुत लालूच करणें । आणि महत्कृत्य बुडविणें । महत्त्व जातां लाजिरवाणें । जनामध्यें ।। ३५ ।। ऐसे बहुत ऐकिले । कांहीं दृष्टीस देखिले । देखत ऐकत चुकले । ते मनुष्य कैसे ॥ ३६ ॥ कार्य करितां उदंड देतो । चुकतां तो महत्त्व घेतो । ऐसें कळोनि वर्ते तो । प्राणी कैसा ॥ ३७ ॥ सेवक विश्वास दाविती । वैरियाकडे मिळोनि जाती । त्या चांडाळांसी गति । कोठेंचि नाहीं ॥ ३८ ।। सकळ लोक स्वामियाचे । मागें पुढें अवज्ञेचे । सेवक उगेचि मूर्ख नाचे । शब्द बोले ॥ ३९ ।। धूर्तपणें अंतरसाक्षी । नानाप्रकारें परीक्षी । दुरी गेला परी लक्षी । सर्व कांहीं ॥ ४० ॥ ह्मणोनि ऐसें न करावें । करणें तें नेमस्त करावें । नानाकारणें धरावें । अंतर प्रभूचें ॥ ४१ ॥ इति श्रीसेवकधर्मनिरूपणं नाम प्रथम समास समाप्त ।। १ ।।

## समास २.

सुचित्त करूनि अंतःकरण । आतां करावें राज्यकारण । प्रमाण आणि अप्रमाण । समजलें पाहिजे ।। १ ।। अकल ह्मणजे कल नाहीं । अन्यायाचा साभिमान नाहीं । न्याय नीति समर्थ पाहीं । आप्त आणि परावे ।। २ ॥ किती चुकती चाचू घेती । पदरीं घालितां न घेती । अन्याय करूनि ह्मणती । अन्याय नाहीं ॥ ३ ॥ उदंड हांसती दुसऱ्यासी । तेचि गुण आपल्यापाशीं । अखंड वर्णिती आपल्यासी । समर्थादेखतां ॥ ४ ॥ मागील दिवस विसरती । उगेच तालदारी आणिती । अखंड चुकती लालुची करिती । परम अन्यायी ॥ ५ ॥ आपणावेगळें कार्य न व्हावें । अवघें आपणचि असावें । आपलें केलें न मोडावें । ऐशी वासना ॥ ६ ॥ व्याप आटोप करावा । समर्थ वेळेस आडवावा । आपुला हेका वाढवावा । अत्यादरें ॥ ७ ॥ स्वयें आपणासी कळेना । समर्थें सांगितलें ऐकेना । सत्य असलें तरी मानेना । अभिमानें ॥ ८ ॥ वैरियाकडे सख्य लावी । समर्थांचें काम बुडवी । व्यर्थ लालूच उठाठेवी । उदंड करी ॥ ९ ॥ इष्ट मित्र शरीरसंबंधी । व्यापकपणें सूत्रें साधी । वैरी वरी हिताळू कुबुद्धि । अंतरीं वसे । १० ॥ आज्ञेप्रमाणें असतां । बहुत दुःख वाटे चित्ता आपले इच्छेनें वर्ततां । बरें वाटे ॥ ११ ॥ आपले अवगुण लपवी । श्रेष्ठांपुढें जाणीव दावी । धीटपणेंचि दटावी । कोणी एकासी ॥१२॥ जें समर्थासी पाहिजे । तें आपणासि न पाहिजे । आपणासी मानेल तें कीजे कांहीं एक ॥ १३ ॥ काम सांगतांचि अडे । मीस करूनि वेळेसी दडे । कुकर्मीं आदरें पवाडे । नाना यत्नें ॥१४॥समर्थां अडानी ताल केला । गर्वें लेखीना कोणाला । काम नासूनि उडाला । एकीकडे ॥ १५ ॥ जें पाहिजे समर्थासी । त्यासी करणें उरकसी । त्याची गोष्टी हरी कसी । हळु पाडी ॥ १६ ॥ आपुले ठायीं वोठाणी आणिती । श्रेष्ठांसि मागें तुच्छ करिती । कठीण वेळेसि मिळोनि जाती । शत्रूकडे ॥ १७ ॥ समर्थासी वळाचि करणें । मर्यादा सांडूनि चालणें । मनाऐसें न होतां करणें । अप्रमाद ।। १८ ।। मज वेगळें काम न चाले । ऐसें मागेंपुढें बोले । कित्येक लोकांचि फोडिले । ते आपणाकडे ॥१९॥

---

१ मोठेपणा. २ परिणाम. ३ स्वस्थ ४ हृदयांत. ५ शिरतो. ६ निर्दोषता.

समर्थासि कांहीं कळेना । मी सांगतो ऐकेना । शहाणपण दाखवी जना । नानाप्रकार ॥२०॥ श्रेष्ठ समजोनि न पाहे । मजवेगळें कोण आहे । निकामि मिळवूनी काय हे। गळंगळा अवघा ॥२१॥ अवघें ढाळ भाग्यें चालतें । येरवीं मुख्यास काय कळतें । आह्मां लोकांकारितां चळ तें । सकळ कांहीं ॥२२ ॥ आह्मांप्रमाणें काय जाणे । प्रभु होय परी कांहीं नेणे । आह्मांवेगळें कोण शहाणें । आहे एथें ॥ २३ ॥ पोटासाठीं सेवा करणें । उगेचि फुगती रिकामें । थोरपण दिधलें कोणें । सेवकांसी ॥ २४ ॥ ऐसे प्रकारींचे लोक । त्यांस कैसा असेल विवेक । मूर्ख-पणें अविवेक । रक्षिती बळें ॥ २५ ॥ समर्थासि सांडून सेवकजन । सेवकाकडे लाविती मन । ते जाणावे परमहीन । नीच काठीचे ॥२६॥ ऐसें नेणतां चुक पडती । जाणते अवघेचि जाण-ती । निकामी आणि गर्व करिती । मूर्खपणें ॥ २७ ॥ सेवकजनावरी विश्वासिला । तो सेव-कीं जेर केला । समर्थ पराधीन झाला । हेंही अपूर्व ॥ २८ ॥ कामाकारणें ठेविले । काम पाहूनी वाढविले । तेही उगेच गर्वे फुगले । कोण्या हिशोबें ॥२९॥ याकारणें बदलीत जाणें । सेवक आज्ञेच्या गुणें । तरीच समर्थपण जाणे । समर्थासी ॥ ३० ॥ काम नासलें तरी ना-सावें । परी सेवकाधीन न व्हावें । दास ह्मणे स्वभावें । बोलिलों न्याय ॥ ३१ ॥ न्याय अन्या-यासी मानेना । विवेक अविवेकया कळेना । पुण्यमार्ग आवडेना । पापी जनासी ॥ ३२ ॥ सेवक बहुतांसी असती । परी पाहों नये हे प्रचीती । तथापि हे क्षमा श्रोतीं । केली पाहिजे ॥ ३३ ॥ इति श्रीसेवकधर्मनिरूपण नाम द्वितीय समास समाप्त ॥ २ ॥

---

पंढरीस येऊन समर्थांनीं विठोबाची प्रार्थना केली तीः—

## अभंग.

एथें उभा कां श्रीरामा । मनमोहन मेघश्यामा ॥ १ ॥ काय केले धनुष्यबाण । कर कटावरि ठेवून ॥ २ ॥ काय केली सीताबाई । एथें राही रखुमाबाई ॥ ३ ॥ काय केलें वान-रदळें । एथें मेळविले गोपाळ ॥ ४ ॥ काय केली अयोध्यापुरी । एथें वसविली पंढरी ॥ ५ ॥ काय केली शरयू गंगा । एथें आणिली चंद्रभागा ॥ ६ ॥ रामदासीं जैसा भाव । तैसा झाला पंढरीराव ॥ ७ ॥

---

पंढरीहून मातोश्रीस लिहिलेलें पत्रः—

सकळ गुणांचा निधी । निर्गुणाची कार्यसिद्धी । विवेकाची दृढबुद्धि । तुझेनि गुणे ॥ १ ॥
तूं भवसिंधूचें तारूं । तूं भक्तांचा आधारू । तूं अनाथाचे अवसरू । वैष्णवी माया ॥ २ ॥
तूं भावार्थाची जननी । तूं विरक्तास जीवनी । तूं परमार्थाची खाणी । भजनशीळ ॥ ३ ॥
तूं सर्व सुखांची मूस । तूं आनंदरत्नांची मांदूस । तुझेनि चुकती सायास । संसारींचे ॥ ४ ॥
तूं परमार्थाविषयीं आग्रगण । सद्गुरु दासांचें मंडण । समाधानाची खूण । अंतरीं वसे ॥५॥
सत्संगासी सादर । भक्तिमार्गासी तत्पर । धूर्त कुशळ अति सादर । परोपकारी ॥ ६ ॥
श्रीगुरुभजनीं तत्पर । स्वामिकृपा निरंतर । ह्मणोनि गूढ क्रियेचा उद्धार । तुमचे ठायीं ॥ ७ ॥

---

१ सेवकांच्या स्वाधीन. २ अनुभव. ३ वानरसैन्य. ४ अलंकार.

आत्मचर्चेसी मुगुटमणी । अत्यंत सादरता निरुपणीं । बोलणें अमृत वाणी । मृदुवचनीं ॥ ८ ॥ विवेकनिधि केवळ । अंतर शुद्ध निर्मळ । ज्ञानदीप प्रबळ । तुमचे ठायीं ॥ ९ ॥ क्रियाशुद्धि निर्मळ मन । निरभिमानी परम सज्जन । निरंतर अनुसंधान । अंतरीं वसे ॥ १० ॥ भावार्थाचें आगरू । प्रबळ शांतीचा सागरू । पाहतां उपमे मेरू । तोही उणा ॥ ११ ॥

---

पंढरीहून वडील बंधू श्रेष्ठ यांस लिहिलेलें पत्रः—

सकळ तीर्थांचें माहेर । सकळ गुणांचें भांडार । सकळ विद्यांचा सागर । स्वरूप तुमचें ॥ १ ॥ तूं धीरपणें मेरू । तूं उदारपणें जळधरू[1] । तूं गंभीरपणें सागरू । पीयूषाचा[2] ॥ २ ॥ तूं पवित्रपणें वैश्वानरू[3] । तूं समर्थपणें ईश्वरू । तूं प्रतापाचा दिनकरू[4] । धगधगायमान ॥ ३ ॥ तूं सकळ तीर्थांचें यश । तूं उंच आकाश । तूं मायेचा मूळपुरुष । सकळकर्ता ॥ ४ ॥ तूं विष्णूचें मूलस्थान । तूं योगियांचें ध्यान । तूं वेदशास्त्रांचें मथन । सार वेदांताचें ॥ ५ ॥ तूं सकळ सत्तेचा साक्षी । अनंत माया तुझे कुक्षीं । तुमचें निजरूप लक्षी । ऐसा कवण ॥ ६ ॥ झंझावायूसि आकळावें । गगन ओलांडूनि जावें । महातेजासि आच्छादावें । कवणे परी ॥ ७ ॥ सप्तपाताळां तळवटीं । एकवीस स्वर्गांचे शेवटीं । पवाड करीन ऐशीं पोटीं । हांव कैंची ॥८ ॥ वसुंधरोही[5] एकसरी । घालोनियां मस्तकावरी । अंतरिक्षगमन[6] करी । ऐसा कवण असे ॥ ९ ॥ आवरणोदकांचा अंत । कैसा घ्यावा तो अद्भुत । तुमचे स्वरूपाचा निश्चितार्थ । कवण करी ॥ १० ॥

---

परळीस मठस्थापनेचे वेळीं सांगितलेलें:—

# बागप्रकरण.

प्रसंग निघाला स्वभावें । बागेमध्यें काय लावावें । म्हणूनि घेतलीं नांवें । कांहींएक ॥ १ ॥ कांटी रामकांटी फुलेंकांटी । नेपती सहमुळी कारमाटी । साबी चिल्लारी सागरगोटी । हिंवर खेर खरमाटी ॥ २ ॥ पांढरफळी करवंदी तरटी । आळवी तोरणी चिंचोरटी । सिकेकाई चाकेरी घोंटी । करंज विळस समुद्रशोक ॥ ॥ ३ ॥ अग्हाटी बोरांटी हिंगणबेटी । विकळी टांकळी वाघांटी । शरे निवडुंग कारवेटी । कांटेशेवरी पांगेरे ॥ ४ ॥ निरगुडी येरंड शेवरी । कासवेद कासळी पेरारी । तरवड उन्हाळ्या कुसरी । शिवी तिव्हा अंबोटी ॥ ५ ॥ कां तुती काचकुहिरी सराटी । उतरणी गुळवेल चित्रकुटी । कडोची काटली गोमाटी । घोळ घुगरी विरबोटी ॥ ६ ॥ भोंस बरू वाळा मोळा । ऊंस कास देवनळा । लव्हे पानि पारोस पिंपळा । गुंज कोळसरे देवपाळा ॥७॥ वेत कळकी चित्रारी । ताड माड पायरी पिंपरी । उंबरी अंबरी गंभिरी । अडुळसा मोही भोपळी ॥८॥ साव विसवें सिरस कुड । कोळ कुंभा धावडा मोड । काळकुडा भुता बोकड । कुरडी हिरडी लोखंडी ॥ ९ ॥ विहाळ गिळी टेंभुरणी । अविट एणके सोरकीन्ही । घोळी दालचिनी । कबाबचिनी जे ॥१०॥ निंबारे गोडे निंब । नाना महावृक्ष

---

१ मेघ. २ अमृताचा. ३ अग्नि. ४ सूर्य. ५ पृथ्वी. ६ आकाशमार्गें गमन.

तळंब । गोरक्षचिंच लातंब । परोपरीचा ॥ ११ ॥ गोधनी शेलवंटी भोंकरी । मोहे बिब्बा रायबोरी । बेल फणस जांब भरी । चिंच अमसोल अंबाडे ॥ १२ ॥ चांफे चंदन रातांजन । पतंग मलागर कांचन । पोपये खेलेले खपान । वट पिंपळ उंबर ॥ १३ ॥ आंबें निंबें साखरनिंबें । रेकण्या खरजूरी तुतें दाळिंबें । तुरडे विडे नारिंगें । शेत्रे कविट अंजीर सीताफळें ॥ १४ ॥ जांब अननस देवदार । सुरमे खासे मंदार । पांढरे जंगली लाल पुरे । उद्दे चित्रकीं ॥ १५ ॥ केळी नारळी पोफळी । आंवळी रायआंवळी जांभळी । कुणकी गुगुळी सालफळी । वेलफळी महाळुंगी ॥ १६ ॥ भुईचाफे नागचाफे मोगरे । पारिजातक बटमोगरे । शंखासुर कोळे मोगरे । सोनतरवड सोनफुलें ॥ १७ ॥ जाई सखजाई पीतजाई । त्रिविध शेवती मालती जुई । पाडळी बकुली अबई । नेवाळी शेतकी चमेली ॥ १८ ॥ सूर्यकमळिणी चंद्रकमळिणी । जास्वनी हनुमंतजास्वनी । केंशर कुसुंबी कमळिणी । बहुरंग निळ याति ॥ १९ ॥ तुळसी काळा त्रिसेंदरी । त्रिसंगी रायचंचु रायपेटारी । गुलखत निगुलचिन कनेरी । नानाविध मखमाली ॥ २० ॥ काळा वाळा मरवा नाना । कचोरे गवले दवणा । पाच राजगिरे नाना । हळदी करडी गुलटोप ॥ २१ ॥ वांगीं चाकवत मेथी पोकळा । माठ शेपू खोळ बसळा । चवळी चुका वेल सबळा । अंबु जिरे मोहरी ॥ २२ ॥ कांदे मोळकांदे माईनमुळे । लसूण आलें रताळें । कांचन कारिजे माठमुळें । सुरण गाजरें ॥ २३ ॥ भोंपळे नानाप्रकारचे । लहान थोर पत्र वेलीचे । गळयाचे पेंढ्या सांगडीचे । वक्र वर्तुळ लंबायमान ॥ २४ ॥ गंगाफळें काशीफळें क्षीरसागर । सुगरवे सिंगाडे देवडांगर । दुधे गंगारुढे प्रकार । किनऱ्या रुद्रविण्याचे ॥ २५ ॥ वाळक्या कांकड्या चिबड्या । कोहाळे सेंदण्या सेंदाड्या । खरबुजा तरबुजा कलंगडचा । द्राक्षी मिरवेली पानवेली ॥ २६ ॥ दोडक्या पारोशा पडवळया । चवळया कारल्या तोंडल्या । घेवड्या कुहिऱ्या खरसमळ्या । वेली अळुचमकोरे ॥ २७ ॥ अठराभार वनस्पती । नामें सांगावीं किर्ती । अल्प बोलिलों श्रोतीं । क्षमा केली पाहिजे ॥ २८ ॥

---

सामनगडावर किल्ला बांधतांना सांगितलेलें:—

# कारखाने प्रकरण.

## समास १.

ऐका विटांचा प्रसंग । लांबी रुंदी यथासांग । चौक नेमस्त व्यंग । असोंचि नये ॥ १ ॥ वीट लांबी नऊ तसू । आणि रुंदी सात तसू । उंची जाणिजे तीन तसू । पाठपोट नेमस्त ॥ २ ॥ खालीं बरड वरी खळगा । वीट कामा नयेगा । धारेकोरेपाशीं दगा । कामा नये ॥ ३ ॥ भूमीपासूनि नीट करावी । कलबुताची कळाशी धरावी । आंतपावेतों नेमस्त भरावी । खिळे मारुनी ॥ ४ ॥ खडे खापरी कामा नये । थोडें कमावणें कामा नये । थोडी लीद कामा नये आणि बहुत ॥ ५ ॥ राख कोंडा बुळग्या दाणे । घालूं नये दैन्यवाणें । अथवा कांहीं अधिक

---

१ तीन प्रकारच्या. २ माळजमीन.

उणें । करूंचि नये ॥ ६ ॥ घट्ट चिखल कामा नये । पाताळ तरी असूंचि नये । दडपितां कळाशी वाहूं नये । नाथर बुजे ॥ ८ ॥ खणखणीत वाळवाव्या । झणझणीत भाजाव्या । भट्या नेमस्त कराव्या । आणि दरी ॥ ८ ॥ ओलें सरपण कामा नये । कावळकाठ्या कामा नये । मोठे ढोण कामा नये । नेमस्त असावे ॥ ९ ॥ जाळ घालावा नेमस्त । उमास करूं नये व्यस्त । ठाव असावा प्रशस्त । समान भूमी ॥ १० ॥ पूजाविधि चुकों नेदावी । भट्टी बरी निवूं द्यावी । वीट हळू उतरावी । टाकूं नये ॥ ११ ॥ पहिलेपासून शेवटवरी । अंतःकरण बरें विवरी । आळस करील तो वैरी । कामा नये ॥ १२ ॥ कामकर्त्यास गमूं देऊं नये । काम घेतां त्रासूं नये । कठीण शब्द बोलूं नये । क्षणक्षणां ॥ १३ ॥ दिवस उगवल्यावरी येऊं देऊं नये । गमित माणूस कामा नये । आशक्त पोर कामा नये । आणि ह्यातारे ॥ १४ ॥ बळकट लोक निवडावे । काम पाहूनि लावावे । सगंट मुशारे करावे । हें मूर्खपण ॥ १५ ॥ जेवणापुरतें बसों द्यावें । सर्वांचि कामास लावावें । दिवस धारे संभाळावें । क्षणक्षणां ॥ १६ ॥ वेळ गमूंचि नेदावा । खोटा रुका बदलून द्यावा । मुशारा रेवूंचि न द्यावा । तमक खोटा ॥ १७ ॥ हिशेब बरा राखीत जावा । लिहिण्याचा आळस नसावा । मुबदला करीत जावा । उपसामुग्री ॥ १८ ॥ खिळे कुराडी पायळ्या । पहारा संबळ कुदळ्या । सन फावडे लेरसळ्या । तरफा असाव्या ॥ १९ ॥ नाडे साले काचे दोर । कादवेणे कळके ढोलर । उथाळ्या चाळण्या डाळ्या थोर । तक्ते बळकट काथवटी ॥ २० ॥ मांदणे डेरे घागरी । रांजण गाडगीं भारी । पाळीं बहुतां परोपरी । दांडे असावे ॥ २१ ॥ धोंडे गुंडे चिपा चिपरे । खरुस चुना वाळू कंकरे । पाटे वरवंटे बरे । कामगार असावे ॥ २२ ॥ पोशिंदे असावे सावधान । हुन्नरबंदी तुफान । दोघांचें एक चित्त मन । कामा नये ॥ २३ ॥ तिकव्या सूत्रें ओळंबे । काम पाहूनियां मनुष्य झोंबे । तरी मग इमारती खेबडंगे । उभे राहती ॥ २४ ॥

## समास २.

यादी इमारतीकारणें । काय काय लागे करणें । श्रोतीं अवधान देणें । क्षण वक्ता ॥ १ ॥ द्रव्य पारपत्य खबरदारी । सत्तासामर्थ्य वेठ बेगारी । गवंडी पाथरवट लोणारी । बेलदार कोळी ॥ २ ॥ लोहार सुतार कुंभार । कामगार लहान थोर । मांग महार चांभार । नाना याती ॥ ३ ॥ घन कुदळी संबळ । कुराळी पारा गुठी गोल । टांकया हातोडे लोळ । लोहपोलादाचे ॥ ४ ॥ विळे पायळे कुराडी । खुरपीं धाप्या धांवा वेडी । खिळे हलके गांधे गाडी खोरें सनभ पावडी ॥ ५ ॥ तर्फा दांडे मुंगळ्या नाटा । चोपणीं बडवणी धुमस खाटा । चाळण्या पांट्या बंधली साठा । नाना प्रकारींचे ॥ ६ ॥ सर कोंडके कळक चिवे । फळ्या चांफ चौफळे व्हावे । चवरंग चवक्या पाट करावे । नाना गिलाव्याचे ॥ ७ ॥ जातीं शिळा वांटणीं । चाटू डंगारणीं घांटणीं । तस्तें पाळीं लाटणीं । कळक मापें तराजु ॥ ८ ॥ कोळसे भट्या लांकडे । शिरटी फेस झाडेंझुडें । नाना इमारतींचें सांकडें । करतां जाणे ॥ ९ ॥ चुना चिरे वाळू कंकरे । पारड्या चिपा लहान थोर । धोंडे गुंडें माती नीर । रांजण डेरे घागरी ॥ १० ॥ मडकीं कुंडालीं गाडगें । परळ वेळण्या मांडण मोघें । विटा चुना खरुस

---

१ चुकवाचुकवी करूं देऊं नये. २ सरसकट वेतन. ३ लागलेंच. ४ लक्ष्य.

लागे । झेल इमारतीसी ॥ ११ ॥ गूळ कात हिरडे ताग । उडीद नाचण्या डीक याग । वजन हिशेबें यथासांग । केलें पाहिजे ॥ १२ ॥ तीळ राळे आणि भात । चिकणा माता आरक्त । राख लीद बळग्या मिश्रित । कमावून विटा कराव्या ॥ १३ ॥ तिकान्या चौकोन्या लहान थोर । भाजून भिजवून सुंदर । तिकया ओळंबे धरून सूत्र । इमारती कराव्या ॥१४॥ चौकव्या मेहरवा ताकबंदी । विटेबंदी चिरेबंदी । लोहबंदी शिसेबंदी । नीट नेमस्त उभार ॥ १५ ॥ कांचबंदी पांचबंदी । नाना रत्नें सुवर्णबंदी । नाना दर्पणें विचित्र बंदी । नाना चित्रलेखन ॥ १६ ॥ तोंड रचाया बळ कुसरी । चित्रविचित्र वोवरी । कमळें पानें परोपरी । एकाहूनि एक ॥ १७ ॥ कलबुद लावण्या बळकट । जालंधरें झरोके सोनवट । घोटघोटोनि लखलखाट । सुरु सनावदाचे ॥ १८ ॥ धावें देउळें शिखरें । उंच गोपुरें मनोहरें । वापी पोखरणी सरोवरें । हमामे स्थान कारंजीं ॥ १९ ॥ गड कोठे महाल मड्या । गुप्तद्वारें अंतरशिड्या । छत्र्या लादण्याच्या तबकड्या । नाना भुयारीं विवरें ॥ २० ॥ धनधान्यरसखाने । दारूखाने जामदारखाने । नाना आठरा कारखाने । घुमट मशीदी मनोहर ॥ २१ ॥ चित्रशाळा नाटकशाळा । भोजनशाळा होमशाळा । पाठशाळा धर्मशाळा । नाना इमारती ॥ २२ ॥ आटे चौथरे वृंदावनें । कुंचे दारवटे भुवनें । नानाप्रकारचीं स्थानें । चांदवा पट कोट भडकले ॥ २३ ॥ धरणें सांकू कालवे । नदीतीरीं पंथ बांधावे । दीपमाळा चौक बांधावे । हुडे खानगे मदालसा ॥ २४ ॥ गव्हा गुंफा कपाटें लेणीं । देवदैत्यमानवकरणीं । समाधीमाझारीं धरणी । कोणें पाहिली ॥ २५ ॥

---

श्रेष्ठांस चांफळाहून पाठविलेलें पत्रः—

## ओंव्या.

सकळ तीर्थांचें सार । सत्यस्वरूप निर्विकार । तुमचें चित्त तदाकार । निरंतर ॥ १ ॥ विमल ब्रह्मपरायण । सगुणभक्तिसंरक्षण । विशेष वैराग्यलक्षण । तुमचे ठायीं ॥ २ ॥ मुक्त क्रियेचा अनादरु । स्वधर्मकर्मीं अत्यादरु । आग्रहनिग्रहांचा विचारु । तोहि नसे ॥ ३ ॥ नसे कामनेचा लेश । जयंत्या पर्वांचा हव्यास । अंतरीं माने विशेष । हरिकथा निरूपण ॥ ४ ॥ तुमचें देह सार्थकाचें । सर्वदा परोपकाराचें । भगवंतें निर्मिलें बहुतांचें । समाधान ॥ ५ ॥ तुमचेनि वाग्विलासें । बहु पाखंड नासे । संशयातीत प्रकाशे । विमळवस्तु ॥ ६ ॥ सन्मार्गांचा कैवारी । अनमार्ग करणें अलक्षी । लोक पावती प्रत्यक्षी समाधान ॥ ७ ॥ दक्षता आणि चातुर्यता । व्युत्पन्नता आणि लीनता । उत्तमगुण सर्वज्ञता । तुमचे ठायीं ॥ ८ ॥ तुमचें स्वरूप वर्णवेना । म्हणोनि देहाची वर्णना । युक्त अयुक्त मित्रजना । क्षमा केली पाहिजे ॥ ९ ॥

---

१ किंचित् लाल. २ आरसे. ३ जाळ्या. ४ विहिरी. ५ इच्छेचा. ६ नाद, छंद. ७ संशयरहित. ८ परब्रह्मस्वरूप. ९ पक्षपाती.

समर्थांस कफाची व्यथा होऊन प्रकृति फार बिघडली, तेव्हां त्यांनीं मारुतीची प्रार्थना केली तीः—

## श्लोक.

फणिवर उठवीला वेग अद्भुत केला। त्रिभुवन जनलोकीं कीर्तिचा घोष केला। रघुपति-उपकारें दाटले थोरभारे। परम धिर उदारें रक्षिलें सौख्यकारें॥१॥ सबळ दळ[1] मिळालें युद्ध उदंड झालें। कपिकटकें[2] निमालें पाहतां येश गेलें। परदळशरघातें कोटिच्या कोटि प्रेतें। अभिनव रणपातें दुःख बीभीषणातें॥ २॥ कपिरिसघनदाटी जाहली थोर दाटी। म्हणवुनि जगजेठी धांवणें चार कोटी। मृतविर उठवीले मोकळे सिद्ध झाले। सकळ जन निवाले धन्य सामर्थ्य चाले॥ ३॥ बहु प्रिय रघुनाथा मुख्य तूं प्राणदाता। उठवी मज अनाथा दूर सारूनि व्येथा। झडकरि भिमराया तूं करीं दृढ कायां[3]। रघुविरभजना या लागवेगेंचि जाया॥ ४॥ तुजविण मजलागीं पाहतां कोण आहे। म्हणवुनि मन माझें तूझि रे वास[4] पाहे॥ मज तुज निरवीलें पाहिजे आठवीलें। सकाळिक निजदासांलागीं सांभाळवीलें॥ ५॥ उचित हित करावें उद्धरावें धरावें। अनुचित न करावें त्वां जनीं येश घ्यावें। अघटित घडवावें सेवका सोडवावें। हरिभजन घडावें दुःख तें वीघडावें॥ ६॥ प्रभुवर विरराया[5] जाहली वज्रकाया। परदळ निवटाया दैत्यकूळें कुडाया। गिरिवर तुडवाया रम्य वेषें नटाया। तुजचि अलगडाया ठेविलें मुख्य ठाया॥ ७॥ बहुत सकळ सांठा मागतो अल्प वांटा। न करित हित कांटा थोर होईल ताठा। कृपणपण नसावें भव्य लोकीं दिसावें। अनुदिन करुणेचें चिन्ह पोटीं वसावें॥ ८॥ जलधर करुणेचा अंतरामाजि राहो। तरि तुज करुणा हे कां नये सांग पां हो। कठिणहृदय झालें काय कारुण्य केलें। न पवसि मज कां रे म्यां तुझें काय केलें॥ ९॥ वडिलपण करावें सेवका सांवरावें। अनहित न करावें तूर्त हातीं धरावें। निपटचि हटवावें प्रार्थिला शब्दभेदें। कपि घन करुणेचा बोलला राम तेथें॥ १०॥ बहुतचि करुणा हीं लोटली देवराया। सहजचि कफ गेलें जाहली दृढ काया। परम सुख विलासे सर्वदा दासनूसे। पवनज तनुतोषें[6] वंदिला सावकाशें॥ ११॥

---

एके समयीं आपलें सर्व राज्य स्वामीस अर्पण करावें असें मनांत आणून त्याप्रमाणें कागदपत्र केले आणि महाराजांनीं ते स्वामी भिक्षेस आले असतां त्यांच्या झोळींत टाकले, त्या वेळीं केलेला बोधः—

## सावधता प्रकरण.

### ओंव्या.

कोणाचा भरंवसा न धरावा। आपुला आपण विचार पहावा। तकवा उदंड धरावा। हाही एक विषयीं॥ १॥ देहदुःखें कष्टों नयें। उदंडाचि करावे उपाय। मग सर्व सुखाला काय उणें आहे॥ २॥ एकांतीं चाळणा करावी। धारणा उदंड धरावी। नाना विचारणा करावी।

---

१ वानरसैन्य. २ वानर, अस्वलें यांची दाटी. ३ शरीर. ४ वाट. ५ मारुती. ६ बळ, धैर्य.

अरिमित्रांची ॥ ३ ॥ प्रयत्नीं चुकों नये । सुखवासी कामा नये । सुचावे नाना उपाय । अनेक विषयीं ॥ ४ ॥ धुरेनें धीर सोडूं नये । मुख्य प्रसंग चुको नये उद्योगरहित कामा नये । पशु जैसे ॥ ५ ॥ उपाधीस कंटाळा । विचाराचा आळस आला । ह्मणजे जाणावा चेवला । बुद्धीपासूनी ॥ ६ ॥ खबरदारी आणी वेगीं । तेणें सामर्थ्य चढे अंगीं । नानाप्रसंगें कार्यभागीं । अंतरचि न पडे ॥ ७ ॥ कार्यकर्ते दूरी करावे । प्रसंगीं सर्वेचि हातीं धरावे । परंतु शोधोनि पाहावे । कपटाविषयीं ॥ ८ ॥ जेथें बहु विचार । तेथें ईश्वरअवतार । मार्गे झाले थोर थोर । धके चपेटे सोसोनी ॥ ९ ॥ आपल्या मनासी रोधावें । परांतर शोधावें । क्षणक्षणां सांभाळावें । बदलेल ह्मणूनी ॥ १० ॥ पाहिलेंचि पाहावें । केलेंचि करावें । शोधिलेंचि शोधावें । राज्यकारण ॥११॥ इशारतीचें बोलतां नये । बोलायाचें लिहूं नये । लिहावयाचें सांगूं नये जबावीनें ॥ १२ ॥

---

उद्धवगोसावी यांच्या पत्रास उत्तरः—

## ओंव्या.

चिरंजीव ते निश्चळ । निश्चळीं जाहलें चंचळ । चंचळीं जाणावा निश्चळ । निश्चळरूपी ॥१॥ सदासर्वदा निश्चळ । निश्चळींच पाहावें सकळ । सकळ पाहतां केवळ । आपणच वस्तु ॥ २ ॥ वस्तुरूप आपण । अधिष्ठानीं पाहतां कोण । पाहतां पाहाणें ज्यालागून । तोचि तो आत्मा ॥ ३ ॥ आत्मारामीं आत्मा पहा । जाणूनियां सुखी रहा । स्वानंदामृत सेवूनि पहा । निखिल निजरूपा ॥ ४ ॥ रूप तेंचि पाहतां सगुण । सगुण तेंचि आपण । आपणापरतें ज्ञान । वेगळें नाहीं ॥ ५ ॥ वेगळेपणें पहावें । मग तें वेगळेंचि जाणावें । मग मिळेना स्वभावें । मुक्त जैसा ॥ ६ ॥ ह्मणूनि वेगळें न साहें । न साहे ह्मणणेंचि बाहें । बाह्याबाह्य तें अबाह्य । जाण बापा ॥ ७ ॥ ऐसें जें अधिष्ठान । तेथें जावया जाण । जाणजाणोनि परिछिन्न । आपणचि ॥८॥ शरण जावें सद्गुरूसी । ह्मणजे कळे आपणासी । आपपर नाहीं त्यासी । दास ह्मणे ॥ ९ ॥

---

शिष्यांच्या परीक्षेकरितां तरवार घेऊन शिष्यांवर स्वामी गेले त्या वेळचें वर्णनः—

## पद.

पळा पळा ब्रह्मपिसा येतो जवळी । रामनामें हांक देऊनि डोई खांजोळी ॥ ध्रु० ॥ ष्टात्ति सोंडी बंधनेंविण सदा मोकळी । संसाराची धुळी करुनी अंगीं उधळी ॥ १ ॥ प्रपंच उकरड्यावर बैसणें ज्याचें । भोंवता पाळा फिरून पाहे जन अंतरींचे ॥ २ ॥ धांवूनि बैसे उठोनि पळे दृश्य वाटतें अदृश्याचें । राहणें घेतां न चले कोणाचें ॥ ३ ॥ औट हात गज नवां ठायीं विटाळलें । दहावा ठाव ह्मणोनि तेथें ठिगळ दिधलें ॥ ४ ॥ ऐसें मन हें चंचल ष्टत्तींत गुंतलें । परतोनि आलें ह्मणऊनि जिवेंचि मारिलें ॥ ५ ॥ मीपणाचें शहाणपण जळालें माझें । कोण वाहे देहबुद्धिवस्त्राचें ओझें ॥ ६ ॥ नलगे आह्मा मानपानाचें ओझें । तुह्मी शुद्धि घेतां गेलें मीपण

---

१ भ्रष्ट झाला. २ दुसऱ्याचें अंतःकरण. ३ परब्रह्मस्वरूप. ४ अज्ञानाचे. ५ देहाभिमानरूपी वस्त्राचें.

मार्गे ॥७॥ आह्मी जन धन देखोनी वार करितों । आपण ऐसें ह्मणउनी समज धरितों ॥८॥ आतें भेटों येती त्यांस वेड लावितों । रामीं रामदास ऐसें अबद्ध बोलतों ॥ ९ ॥

स्वामी जेजुरीस यात्रेस गेले होते त्यासमयीं खंडोबास केलेलीः--

## आरती.

पंचानन हयवाहन सुरभूषणलीला । खंडामंडित दंडित दानव आवलीला । मणिमल्ल मर्दूनि धूसर जो पिवळा । विरकंकण बाशिंगें सुमनांच्या माळा । जयदेव जयदेव जयजय मल्हारी । वारीं दुर्जन वारीं निंदक अपहारीं । जयदेव ॥ १ ॥ धृ० ॥ सुरवैरीसंहारा वर दे मज देवा । नाना नामीं गाइन मी तुमची सेवा । अखंड गुण गावया वाटतसे हेवा । फणिवर शिणला तेथें नर पामर केवा ॥ जय०२॥ रघुवीरस्मरणें शंकर हृदयीं नीवाला । तो हा मदनांतक अवतार झाला । यालागुनि धांवे आवडिं वर्णीला । रामीं रामदासा जिवलग भेटला ॥ ३ ॥

एके समयीं मार्गांत दोन पक्षांचे शाहीर एकमेकांवर चढ करीत असतां समर्थ आले त्या वेळीं समर्थांनीं डफगाणें करून त्यांस निरुत्तर केलें तो प्रकारः--

## डफगाणें.

किती पृथ्वीचें वजन । किती अंगोळ्या गगन । सांग सिंधूचें जीवन । किती टांक ॥ १ ॥ किती आकाशींचा वारा । किती पर्जन्याच्या धारा । तृण भुमीवरी चतुरा । संख्या सांग ॥ २ ॥ वायुसरसे उडती । सांग अणुरेणू किती । लक्षचौऱ्यांशींची उत्पत्ती । संख्या सांग ॥ ३ ॥ अठराभार वनस्पती । भूमंडळीं पाणी किती । पुष्पें फळें जाती किती । संख्या सांग ॥ ४ ॥ बीज वडीं आणि पिंपळीं । किती आहे भूमंडळीं । सर्व धान्याची मोकळी । संख्या सांग ॥५॥ सर्व सरितांची वाळू किती । सिंधुसागरीं वाळू किती । हरळू आहे किती । संख्या सांग ॥ ६ ॥ सांग माझें डफगाणें । कीं डफ ठेवीं शहाणपणें । देहबुद्धीचें लक्षण । सोडवीन ॥ ७ ॥ ऐक जें जें पुशिलें तुज । तें तें आतां सांगें मज । अनंत ब्रह्मांडें बेरीज । किती जाहली ॥ ८ ॥ रामदासाचा विनोद । सांडी अहंतेचें बीज । मग स्वरूपीं आनंद । सुखी राहें ॥ ९ ॥

समर्थांनीं श्रेष्ठ परंधामास गेले त्या वेळीं त्यांच्या मुलांस पाठविलेलें पत्रः—

## श्लोक.

बरें सत्य बोला यथातथ्य चाला । बहू मानिती लोक येणें तुह्मांला । धरा बुद्धि पोटीं विवेकें मुलें हो । बरा गूण तो अंतरामाजीं राहो ॥ १ ॥ सदा दांत घांसोनि तोंडा

१ पुष्पांच्या. २ नीच, अधम. ३ पाणी. ४ नद्यांची ५ देहाभिमानाचें. ६ मीपणाचें.

धुवावें। कळाहीन तें शूद्र मूर्खीं नसावें। सदा सर्वदा यत्न सोडूं नये रे। बहुसाल हीं खेळ कामा नये रे ॥ २ ॥ दिसामाजि कांहीं तरी तें लिहावें। प्रसंगीं अखंडीत वाचीत जावें। गुणश्रेष्ठ ऊपास्य त्याचें करावें। बरें बोलणें सत्य जीवीं धरावें ॥ ३ ॥ बहू खेळ खोटा सदालस्य खोटा। समस्तांसि भांडेलची तो करंटा। बहुतां जनांलागीं जीवीं भजावें। भल्यासंगतीं न्याय तेथें भजावें ॥ ४ ॥ हिशोबीं सदा न्याय सांडूं नये रे। कदाचीत अन्याय होतां धका रे। जनीं सांडितां न्याय रे दुःख होतें। महा सूख तेंही अकस्मात जातें ॥ ५ ॥ प्रचीतीविणें बोलणें व्यर्थ वाया। विवेकेविणें सर्वही दंभ जाया। बहू सज्जला नेटका साज केला केला। विचाराविणें सर्वही व्यर्थ गेला ॥ ६ ॥ वरी चांगला अंतरीं गोड नाहीं। तया मानवाचें जिणें व्यर्थ पाहीं। वरी चांगला अंतरीं गोड आहे। तया लागिं कोणी तरी शोधिताहे ॥ ७ ॥ सदा अंतरीं गोड तें सांडवेना। कदा अंतरीं ओखटें देखवेना। ह्मणूनी बरा गूण आधीं धरावा। महाघोर संसार हा नीरसावा ॥ ८ ॥ भला रे भला बोलती तें करावें। बहुतां जनांचें सुखें येश घ्यावें। परी शेवटीं सर्व सोडूनी यावें। मरावें परी कीर्तिरूपें उरावें ॥ ९ ॥ बरा ओखटा सर्व संसार झाला। अकस्मात येईल रे काळघाला। ह्मणोनी भले संगतीं सत्य चाला। जनीं दास तो बोधिताहे मुलांला ॥ १० ॥

---

प्रतापगडीं नवस फेडण्याकरितां गेले, तेव्हां समर्थांनीं केलेलें देवीचें स्तोत्रः—

अनुष्टुप्.

प्रपंचीं आमचे कूळीं तुळजा कुळदेवता। नेणता ऐकिलें होतें जाणतां स्मरलें मनीं ॥ १ ॥ श्रेष्ठांची कामना होती पुर्विली मनकामना। नवस जो नवसिला होता त्या पासूनच चूकला ॥ २ ॥ पुत्र जो घेतला त्याचा जोगी करूनि सोडिला। ख्याति ते ऐकिली मोठी न्यायनीति चुकेचना ॥ ३ ॥ वैराग्य घेतलें पूर्ण सर्व संसार सोडिला। तुझिया दर्शना आलों कृपादृष्टिं विलोकिजे ॥ ४ ॥ तुझिया कृपें वांचलों आहें महंत ह्मणती तया। तुझेंचि सर्व हें देणें सर्वही तुजपासुनी ॥ ५ ॥ संसारीं मोकळें केलें आनंदीं ठाव दीधला। सांडिली सर्व ही चिंता माता तूं सत्य जाहलें ॥ ६ ॥ पूर्वील काय मी सांगूं इच्छा पूर्ण परोपरी। मागील आठवें-नासें केलें आश्चर्य वाटतें मनीं ॥ ७ ॥ सदानंदीं उदय झाला सुखसंतोष पावलों। मत्परधीनता गेली सत्ता उदंड चालली ॥ ८ ॥ उदंड ऐकिलें होतें रामासी वर दीधला। दास मी रघुनाथाचा मजही वरदायिनी ॥ ९ ॥ श्रेष्ठांचा नवस जो होता फेडिला तोचि मी ह्मणें। पुष्प देऊनी उतराई ऐसें हें कल्पिलें मनीं ॥ १० ॥ तुळजापुर टाकोनी चालली पश्चिमेकडे। पारघाटीं जगन्माता सध्या येऊन राहिली ॥ ११ ॥ ऐसें हें ऐकिलें होतें हेत एथोंचि पावला। पुष्पाची कल्पना होती पुष्प तेथेंचि वाहिलें ॥ १२ ॥ ऐशी दयाळू तूं माता त्वां हें पुष्पचि घेतलें। संतुष्ट भक्तिभावानें त्रैलोक्यजननी पहा ॥ १३ ॥ थोड्यानें श्लाघ्यता मोठी थोर संतोष पावलों। तुझेंचि तुजला दिलें आणिलें सांग कोठुनी ॥ १४ ॥ रक्षिता देवदेवांचा त्याचा उत्साह इच्छिला। संकटें वारिलीं नाना रक्षिला बहुतांपरी ॥ १५ ॥ जीवींचें जाणती माता

---

१ अनुभवावांचून. २ आयुष्य. ३ वारंट. ४ इच्छा.

तूं माता मज रोकडी । लोकांची चुकती माता अचूक जननी मला ॥ १६ ॥ एकचि मागणें आतां यावें तें मजकारणें । तुझाचि वाढवी राजा शीघ्र आह्मांचि देखतां ॥ १७ ॥ दुष्ट संहारिले मागें ऐसें ऊदंड ऐकिलें । परंतु रोकडी कांहीं मूळ सामर्थ्य दाखवी ॥ १८ ॥ देवांचीं राहिलीं सत्त्वें सत्त्व तूं पाहसी किती । भक्तांसी वाढवी वेगीं इच्छा पूर्णचि ते करी ॥ १९ ॥ रामदास ह्मणे माझें सर्व आतुर बोलणें । क्षमावें तुळजे माते इच्छा पूर्ण परोपरी ॥ २० ॥

---

संभाजीस पाठविलेलें उपदेशाचें पत्रः—

# ओंव्या.

अखंड सावधान असावें । दुश्चित कदापि नसावें । तजवीजा करीत बसावें । एकांतस्थळीं ॥ १ ॥ कांहीं उग्र स्थिति सांडावी । कांहीं सौम्यता धरावी । चिंता लागावी परावी । अंर्तयामीं ॥ २ ॥ मागील अपराध क्षमावे । कारभारी हातीं धरावे । सुखी करून सोडावे । कामाकडे ॥ ३ ॥ पाणवठीं तुंब निघेना । तरी मग पाणी चालेना । तैसें सज्जनांच्या मना । कळलें पाहिजे ॥ ४ ॥ जनाचा प्रवाह चालिला । ह्मणजे कार्यभाग आटोपला । जन ठायीं ठायीं तुंबला । ह्मणजे खोटें ॥ ५ ॥ श्रेष्ठीं जें जें मिळविलें । त्यासाठीं भांडत बैसले । मग जाणावें फावलें । गुलामांसी ॥ ६ ॥ ऐसें सहसा करूं नये । दोवे भांडतां तिसऱ्यासी जाये । धीर धरोन महत्कार्य । समजून करावें ॥ ७ ॥ आधींच पडली धास्ती । ह्मणजे कार्यभाग होय नास्ती । याकारणें समस्तीं । बुद्धि शोधावी ॥ ८ ॥ राजी राखितां जग । मग कार्यभागाची लगबग । ऐसें जाणोनियां सांग । समाधान राखावें ॥ ९ ॥ सकल लोक एक करावे । गलीम निवटून काढावे । ऐसें करितां कीर्ति धांवे । दिगंतरीं ॥ १० ॥ आधीं गाजवावे तडाके । मग भूमंडळ धाके । ऐसें न होतां धक्के । राज्यास होती ॥११॥ समय प्रसंग ओळखावा । राग निपटून काढावा । आला तरी कळों न द्यावा । जनांमध्यें ॥ १२ ॥ राज्यामध्यें सकळ लोक । सलगी देऊन करावे सेवक । लोकांचे मनामध्यें धाक । उपजोंचि नये ॥ १३ ॥ बहुत लोक मिळवावे । एक विचारें भरावे । कष्टें करोनि घसरावें । म्लेंच्छांवरी ॥ १४ ॥ आहे तितुकें जतन करावें । पुढें आणिक मिळवावें । महाराष्ट्र राज्य करावें । जिकडे तिकडे ॥१५॥ लोकीं हिंमत धरावी ।शर्तीची तरवार करावी।चढती वाढती पदवी।पावाल येणें ॥ १६ ॥ शिवराजास आठवावें । जीवित्व तृणवत् मानावें । इहलोकीं परलोकीं राहावें । कीर्तिरूपें ॥ १७ ॥ शिवराजाचें आठवावें रूप । शिवराजाचा आठवावा प्रताप । शिवराजाचा आठवावा साक्षेप । भूमंडळीं ॥ १८ ॥ शिवराजाचें कैसें चालणें । शिवराजाचें कैसें बोलणें । शिवराजाची सलगी देणें । कैसें असे ॥ १९ ॥ सकळ सुखांचा त्याग । करूनि साधिजे तो योग । राज्यसाधनाची लगबग । कैसी असे ॥ २० ॥ त्याहून करावें विशेष तरीच ह्मणावें पुरुष । याउपरी आतां विशेष । काय लिहावें ॥ २१ ॥

---

१ ठार केले. २ उत्सुकतेचें. ३ दुःखी. ४ हृदयांत. ५ शत्रु, वैरी. ६ योग्यता. ७ प्रयत्न,उद्योग.

*

# जुना दासबोध.

## ( एकवीस समासी. )

---

### समास १.

श्रीगणेशाय नमः ॥ श्रीराम समर्थ ॥ एकवीस समासी प्रारंभः ॥ मन मीपणें निर्बुजलें । स्वामींच्या पदीं मिसळलें । ऐक्यरूपें स्वयेंचि जाहलें । पद आपण ॥ १ ॥ स्वामी सेवकपण वावो । जाणावा तो स्वामीरावो । ऐसा निजपदीं ठावो । भाग्यानुसार ॥ २ ॥ शब्दीं निःशब्द जाहलें । उच्छिष्ट श्रवणें खादलें । तें अभ्यंतरीं बैसलं । स्वयंभ बोधरूप ॥ ३ ॥ सुष्टु साराचेंहि सार । फावलें अक्षय अपार । तया सुखाचे उद्गार । येती स्वानुभवें ॥४ ॥ वायूचेनी बळें शब्दासी । सामर्थ्य होय निश्चयेंसी । तैसी सद्गुरु कृपा मानसीं । उद्गार काढी॥ ५ ॥ सद्गुरुकृपेचेनी हांवें । विवेक मूळाकडे धांवे । तेणें ऐक्यसिंधू हेलावे । स्वानंदसुखें ॥ ६ ॥ तया सिंधूच्या आनंदलहरी । शब्दीं निःशब्द भरोवरी । तेणें प्रतापें वैखरी । वदोंचि लागे ॥ ७ ॥ वेष्टित शिष्य तारांगणीं । सद्गुरु पूर्णचंद्र गगनीं । प्रगट झाला निजकिरणीं । दिशा धवळल्या ॥ ८ ॥ मिरवत जातां अंतराळीं । प्रभा फांकली ध्रुवमंडळीं । तेणें सुखें निजकल्लोळीं सिंधू उचंबळू पाहे ॥ ९ ॥ भरितें दाटलें सागरीं । उचंबळोनि फुटल्या तरी । महानदीसि माघारीं । दाटी जाहली ॥ १० ॥ उदक चढलें आळुमाळ । फुटलें वाहती खळाळ । तेणें बळें सरिताजळ । उफराटें वाहे ॥ ११ ॥ तैसी वृत्ति स्वरूपीं मिळाली । मिथ्यात्वें माघारी मुरडली । सिंधूचेनि लोटें आली । जेथील तेथें ॥ १२ ॥ आनंदसिंधु उचंबळला । तेणें ब्रह्मगोळ बुडाला । उडुगणेंसी मयंक जाहला । सिंधूचि अवघा ॥१३॥ स्वर्ग मृत्यु आणि पाताळ । अवघें भरलें अक्षोभ जळ । मंगळमातेचें ढेंकळ । विरोनि गेलें ॥ १४ ॥ कैंचे देव कैंचे दानव । कैंचे जीवपणें मानव । आकार विरोनियां सर्व । निर्विकार जाहला ॥ १५ ॥ बुडविला सिंधूनें सागर । प्राणी पावलें पैलपार । गुरुभक्तांसी उतार । पायवाट जाहली ॥ १६ ॥ जे समूळ बुडाले । तेचि साचार तरले । जे बुडतबुडतां वांचले । ते बुडाले कल्पकोटी ॥ १७ ॥ येथ जो जीवेंचि मेला । तो कल्पकोटी जाहला । जो जिवित्वासी भ्याला । तो मरतचि गेला पुनःपुन्हां ॥ १८ ॥ येथ जे सांकडीं पडिले । तेचि निश्चितार्थें बुडाले । स्वानंदसिंधूंत बुडोन मेले । तयांसीच भय नाहीं ॥ १९ ॥ मी सिंधू ऐसे जडले । तेव्हांचि खंडपण आलें । सिंधू सोडूनि बाहेर पडिलें । कठिणपणें लवण ॥ २० ॥ सिंधूचाचि अंश लवण । परी एकदेशीं पावे शीण । पुन्हा त्या यासी सिंधूविण । विश्रांति नाहीं ॥ २१ ॥ सिंधूमाजि जळचरें । जितोंति तेणेंचि आधारें । परंतु बापुडीं अविचारें । सिंधू होऊं नेणती ॥ २२ ॥ होतों खंडपणें फुटलों । सद्गुरूनें जीवन केलों । आलों गेलों आणि बोलिलों । तो मी नव्हें सर्वथा ॥ २३ ॥ ऐ

---

१ उत्तम साराचें. २ नक्षत्रांसह. ३ चंद्र. ४ जिवंत राहतात.

सा माझा सद्‌गुरुस्वामी । तोडोनि टाकिली माझी मी मी । आपुलिया निजपदयुग्मीं । ऐक्यता केली ॥२४॥ आतां पुढिल समासीं निरूपण । जो भास्करवंशभूषण । तो सर्वात्मा सगुण । वंदीन कोदंडधारी ॥ २५ ॥ स्तवन होतां न धरवे धीर । आठवे रामचंद्र उदार । रघुनाथध्यानीं तत्पर । श्रोते होत आतां ॥२६॥ इति श्रीरामदास राम । पुढें वर्णील पूर्णकाम । मानस पूजेचें वर्म । प्राप्त होय जेणें ॥ २७ ॥ इति प्रथमः समासः समाप्तः ॥ १ ॥

---

## समास २.

श्रीरामदास समर्थ ॥ ॥ ऐसा सर्वात्मा राज्याधीश । सकळ पाहातां सावकाश । तेथें पिसाट रामदास । उभा असे दीनरूपें ॥ १ ॥ रामचंद्रा तुझा वियोग । ऐसा नकोरे प्रसंग । तुजकारणें सर्व संग । व्यक्त केला ॥ २ ॥ रामा तुझिये स्वामीपणें । मी हें ब्रह्मांड मानीं ठेंगणें। स्वामी तुजवीण कोण जाणे । अंतर आमुचें ॥ ३ ॥ तुजवीण मज माया । कांहीं नाहीं रे रामराया । आह्मां अनाथा कासया । उपेक्षिसी ॥ ४ ॥ तुज समुदाय दासांचा । आह्मासि स्वामी आणिक कैंचा । तुज कारणें जिवलगांचा । संग सोडिला ॥ ५ ॥ सगुण रघुनाथ मुद्दल । माझे हेतु हेंचि भांडवल । काम धरूनि ठाकीन पैल । पार भवाचा ॥६॥ आतां वंदीन सकळ श्रोते । ज्या पासाव जाहले वक्ते । जे ब्रह्मसुखाचे वोविते । आदरें करूनी ॥ ७ ॥ जे विवेक रत्नाचे आगर । ज साहित्यासिंधूचे जळचर । जे वृत्तिकिरणाचे दिनकर । सर्वांग श्रोते ॥ ८ ॥ जे तार्किकविषयीं वरिष्ठ । जयांचें सर्वेही उच्छिष्ट । तया पुढें मी कनिष्ठ । काय बोलों ॥ ९ ॥ जें कांहीं स्यां आठवावें । तें जयांस पूर्वींच ठावें । तेथें ज्ञातेपण बोलावें । काय हो आगळें ॥१०॥ जैसा विधीप्रति मुका । करी बोलायाची आशंका । तैसी मज आठविली रंका । बुद्धी वक्तृत्वाची ॥ ११ ॥ परी मज एक आठवलें । जें सर्व सज्जनांचें केलें । तरी माझें काय हो गेलें । पूर्वींच आहे ॥ १२ ॥ आतां धीट अथवा पाठ । आपुलें जाणोनि करिती नीट । माझी चुकली खटपट । मीपणाची ॥१३॥ जें बोलिलें वेदपुराणीं । तें स्यां ऐकिलें सांगणोवांगणीं । एक सांगतों काहाणी । संसाराची ॥ १४ ॥ भोजन करीतें हीं ऐका । हे या प्राकृताची टीका । अन्नाची चाड तरी नका । गर्ही गुंतों ॥ १५ ॥ आज्य ह्मणतां प्राप्त झालें । तूप ह्मणतां तेंचि आलें । तैसें अर्थ इच्छितां चावलें । श्रोतयां ब्रह्म ॥ १६ ॥ अहो प्राकृत बोली । परी संस्कृताची एकता आली । जाणोनि कथा श्रवण केली । पाहिजे श्रोतीं ॥ १७ ॥ ह्मणोनि श्रोतीं सावधान । करावें श्रवण मनन । प्रयत्नेंवीण लाधे निधान । अवश्य घ्यावें ॥ १८ ॥ कांहीं एक गुज गाढें । प्राणियांसी लाभे धडकुडें । जरी घडे निवाडें । श्रवण मनन ॥ १९ ॥ तया श्रवणाची खूण । वक्ते श्रोते यांचें लक्षण । पुढील समासीं निरूपण । हेंचि आहे ॥ २० ॥ इति श्रीरामदास ह्मणे । श्रोतीं अवधान देणें । तुमचीं उभयतांचीं लक्षणें । सांगिजेतील ॥ २१ ॥ इति द्वितीयः समासः समाप्तः ॥ २ ॥

---

## समास ३.

श्रीराम समर्थ ॥ ॥ वंदीन सद्‌गुरु समर्थ । जो अर्थांचाहि अर्थ । जयाचेनि परमार्थ ।

---

१ काव्यशास्त्रादिकांच्या ज्ञानाच्या समुद्रापासून उत्पन्न झालेले. २ मेघ.

प्राप्त जाहला ॥ १ ॥ जयाचेनि स्वरूपप्राप्ती । होऊनि फिटे जीवित्वभ्रांती । जयाचेनि पूर्ण होती । सर्व मनोरथ ॥ २ ॥ जो पूर्णप्राप्तीचा दाता । जो भवसिंधूचा त्राता । तयाचे प्रसादें आतां । करूं वक्तृत्व ॥ ३ ॥ जें वक्त्याचें लक्षण । अत्युत्तम सुलक्षण । क्रिया पालटे निरूपणें । श्रोतियांची ॥ ४ ॥ ऐसें सांगिजेती वक्ते । तेणेंचि प्रसंगीं श्रोते । जे कासेसि लावूनि तारिते । भाविकजनां ॥ ५ ॥ भक्त विरक्त आणि प्रेमळ । शुद्ध ज्ञाते दीनवत्सल । हृदय शुद्ध गंगाजळ । निर्मळ जैसें ॥ ६ ॥ परोपकारी धार्मिक । क्रिया न घडतां साशंक । जयाच्या संनिध विवेक । सिद्धचि आहे ॥ ७ ॥ जैसें बोलणें तैशीच क्रिया । ऐसा वक्ता जोडलिया । तत्काळ बाणे श्रोतया । अंगीं निरूपण ॥ ८ ॥ वक्ता तोचि जो शांत । आणि असे पूर्ण प्राप्त । सर्वकाळ क्रोधें संतप्त । तो वक्ता नको ॥ ९ ॥ वक्ता पाहिजे उदास । जयाचें बोलणें नैराश्य । जयाचे हृदयीं वसे आस । तो वक्ता नको ॥ १० ॥ आशा धरूनि बोले जीवीं । तो तैसेंचि निरूपण लावी । सिद्धी उठावले गोवी । युक्तिजाळ टाकोनी ॥ ११ ॥ एक शिष्याची आस । शिष्याकारणें कासावीस । होऊनियां सावकाश । पसारा सोडिती ॥ १२ ॥ ते समाधान बुडवण । आणि शिष्या चाळवण । शिष्य समुदाय वणवण । वरपडे जाहले ॥ १३ ॥ तीं लुतु बराडीं बापुडीं । शिष्याकारणें कुडकुडी । सर्वकाळ होताती वेडीं । त्यांचें वक्तृत्व नको ॥ १४ ॥ जो गुरु विश्वाचा । जेथें अंकुर नाहीं भेदाचा । तोचि वक्ता अपाडाचा । सकळांसि बोधी ॥ १५ ॥ जो आशंका फेडूं जाणे । जाणपणें हुंबरूं नेणे । श्रोतयांचे शब्दगुणें । साहे विवेक ॥ १६ ॥ सर्वकाळ क्रोधें संतप्त । आशंका घेतां करी घात । वक्तृत्वाचा अर्थ जात । भलतीकडे ॥ १७ ॥ अयुक्ताचे प्रतिपाद्य करी । उच्छेद होतांचि गुर्गुरी । बोलिला शब्द यावरी । बोलेचि अप्रमाण ॥ १८ ॥ बोलतां येती बळा । हात पाय कांपती चळचळां । क्रोधें उठाविता वेळोवेळां । शीघ्रकोपी ॥ १९ ॥ एक विश्वासें बोलताचि राहे । नेत्र भोवंडोनी क्रोधें पाहे । दुसऱ्याचें वक्तृत्व न साहे । आपणा पुढें ॥ २० ॥ होय नव्हे आरंभिली । क्रोधें देहशुद्धी विराली । बहुसाल वृष्टि केली । सन्मुख माथव ॥२१॥ क्रोधें काळवंडली मुखवटी । ऐकतां वक्रता पावली भ्रुकुटी । शिरा कंठीं आणि ललाटीं । प्रकट जाहल्या बळें ॥ २२ ॥ बोलतां बोलतां नीच उत्तरें । ताडित उठले परस्परें । श्रोते वक्ते रुधिरें । उभे नाहले ॥२३॥ कोल्हाळ उठिला एकसरा । केला पुस्तकांचा घुसमारा । थोर तर्वेकें राज्यद्वारा । महापुरुष निवाले ॥ २४ ॥ ऐसे क्रोधी अनावर । देहबुद्धीचे पामर । ऐशियांचें वक्तृत्व चतुरें । वमनप्राय त्यजावें ॥ २५ ॥ आपण क्रियेसी अंतरले । आणि वक्तृत्वाचे भरीं भरले । तया श्रवणें श्रोते जाहले । वक्त्या ऐसे ॥ २६ ॥ आशा धरूनि वक्ता बोले । तेथें श्रोते नागवले । शृंगारिक श्रवणें चेवले । साधक जैसे ॥ २७ ॥ बहु श्रवण घडलें ज्याला । ताडे तोडे शिकोनि आला । तया वक्तृत्वें श्रोतयाला । स्वहित न घडे ॥ २८ ॥ वक्ता पाहिजे अनुभवाचा । ज्ञाता नसावा पुस्तकींचा । पुस्तकज्ञानें श्रोतयांचा । भ्रम तुटेना सर्वथा ॥ २९ ॥ कां वक्ता वक्तृत्वाचे भरीं । भरोनि श्रोता निरोध करी । तेणें श्रोता धाक धरी । पुन्हां नये श्रवणीं ॥ ३० ॥ अतिनिरोधें उपजे आस । मोडे श्रोतयांचा हव्यास । ऐसा वक्ता जो कर्कश । तोहि नको ॥ ३१ ॥ कां जो वर्म लक्षुनि बोले । तेणें

---

१ जें बोलण्यास योग्य नव्हे तें. २ अतिशय क्रोधानें.

श्रोते क्रोधासि आले । आपणहि लक्षूं निघाले । वर्म वक्त्याचें ॥ ३२ ॥ कां जे रुजेना श्रोतयांचे मनीं । तें दाटूनी लावी लावणी । तेणें उपजे अत्यंत काणी । श्रोते उठोनि पळती ॥३३॥ कां आपण वर्ते जयापरी । तेचि क्रिया प्रतिपाद्य करी । आपणा परती दुसरी । मांडोंचि नेदी ॥ ३४ ॥ कां वक्ता जाणिवेनें जिंकिला । उणीव येतां तगमगिला । जाणिवेचा ताठा भरला तो वक्ता नको ॥ ३५ ॥ जो सबळ जाणोनि नेणता । जो श्रोतयांचाहि श्रोता । जेथें अहंतेची वार्ता । निःशेष नाहीं ॥ ३६ ॥ वक्ता भीडसारू जोडे । तरी श्रोतियासी अंधार पडे। ह्मणोनि वक्त्याकडे । भीड तेहि नसावी ॥ ३७ ॥ भिडे सांडूनि वर्म चुकावी । हितार्थे पोटस्थ शिकवी । कुशल वक्ता तोचि उगवी । श्रोतयांसी ॥ ३८ ॥ वक्ता निरभिमानी भेटे । तरी श्रोतियांचा अभिमान तुटे । उभय अभिमान विटे । प्रांजळ निरूपणीं ॥ ३९ ॥ आलें निरूपण अभ्यंतरीं । गुज ह्मणोनि चोरी करी । तो वक्ता नव्हे भिकारी । कृपण वेषें ॥ ४० ॥ जो समाधानी वक्ता । तयासि निरूपणीं समता । आपुली पारखी विभक्तता । नाहींच जयासी ॥ ४१ ॥ असो वक्ता आशारहित । तयाचेंचि वक्तृत्व विहित । दुराशा धरी जयाचें चित्त। तो वक्ता नको ॥ ४२ ॥ आतां असो सद्गुरूवीण । पोटस्थ शिकवील कोण । समदृष्टि जयाची पूर्ण । ऐसा तो विरळा ॥ ४३ ॥ आतां श्रोतयाचा विचार । श्रोता पाहिजे सादर । मननशीळ सारासार । विवेक निवडी ॥ ४४ ॥ श्रोता आदरें श्रवण करी । तेणें उचंबळे आनंदलहरी । श्रोते वक्ते अर्थांतरीं । मिळोनि जाती ॥ ४५ ॥ अर्थभूत श्रोता मिळे । आणि आदरें श्रवणीं निवळे । तेणें सकळिकांचा गळे । देहाभिमान ॥ ४६ ॥ सादरें सर्वांगें सामोरा । आदरें होतसे पुढारा । श्रवणीं पडतांचि उत्तरा । परीक्षोनि सांडी ॥ ४७ ॥ सांडोनि सर्वेचि सादर । पाहे वक्त्यासमोर । ऐसा मनाचा व्यापार । मनें आरंभिला ॥ ४८ ॥ मुखाकडे लक्षी आदरें । बाहेर निघतांचि उत्तरें । प्राशन करी कर्णद्वारें । विवरी स्वयें ॥ ४९ ॥ भिक्षुक देशावरी सादर । कां व्यापारी मिळतां व्यापार । कां भुसारी करितां भुसार । मापासमयीं ॥ ५० ॥ कां जिवलगाची ऐकतांचि वार्ता । अत्यंत श्रवणीं सादरता । कां न्यून बोलत असतां । सादरें ऐके ॥ ५१ ॥ कां शूद्र शेतीं सांचळ पाहे । कान देऊनि उभा राहे । श्वासोच्छ्वास दीर्घ वाहे । ह्मणोनि कोंडी बळें ॥ ५२ ॥ असो संसारीं सादरता । तैसीच करी श्रवण होतां । तोचि एक धन्य श्रोता । होय निरूपणीं ॥ ५३ ॥ संसारविषयीं तत्पर । आणि श्रवण होतां अनादर । तो श्रोता नव्हे खर । मनुष्यवेषें ॥ ५४ ॥ मिथ्यावादी अमंगळ । हरिकीर्तनीं उठे कपाळ । ऐसा जो खळ चांडाळ । त्यासि भगवंत कैंचा ॥ ५५ ॥ अविद्या आणि फुगारा । धरितां जाणिवेचा गारा । बाष्कळ बोलोनि मातेरा । करी निरूपणाचा ॥ ५६ ॥ वक्ता बहुभाष्य वाचाळ । तैसाचि श्रोताहि तोंडाळ । दोही मिळोनि खळखळ । उदंड करीती ॥ ५७ ॥ वक्तृत्व श्रोता ऐकेना । बोलों बैसला आटोपेना । युक्तिजाळ पसरूनियां जना । जाणीव दावी ॥५८॥ उभयतां एकचि गलबला । निरूपणीं हाट भरला । एक शब्दांचा दुमाला । बैसला घेऊनी ॥ ५९ ॥ एका पुढें एक बोले । अवघेचि वक्ते जाहले । जैसे ते जंबुक मिळाले । कोल्हाळ करितां ॥६०॥ जाणीव भरली अभ्यंतरीं । भुलों लागले भलतेचि परी । तेथें कोणासी कोण विचारी । वृथा बोलती सर्वांग ॥ ६१ ॥ श्रोता श्रवणीं जाणीव धरी । वक्त्याचा उच्छेद करी । ऐसा श्रोता

---

१ दुःख, क्लेश. २ चोराची चाहूल. ३ कोल्हें.

मिळे तरी । समाधान केचें ॥ ६२ ॥ जें जें निरूपण ऐकती । तें तें पुढिलासी सांगती । बहुतेक सांगणें चित्तीं । विरळा धरी ॥६३॥ आपण स्वयें क्रिया करी । तेंचि निरूपण थावरी । ऐसा श्रोता दुराचारी । अवश्य त्यजावा ॥ ६४ ॥ कोरडा खणखणीत पाषाण । तैसें हृदय कठीण । कदाचित् आला सत्वगुण । तरी फोडी बळें ॥ ६५ ॥ अंतरीं काळकूट भरलें । गुल्में अभिमानाचें वाढलें । तें निरूपण वितुळलें । परी वितळोंचि नेदी ॥ ६६ ॥ निरूपणीं सावकाश । पाहावे वक्त्याचे गुणदोष । जैसे मिळाले वायस । विष्ठा धुंडिती ॥ ६७ ॥ बैसूनि निरूपण ऐके । वृत्ति गुणदोषीं फांके । अविवेकें गुणदोष देखे । सर्वत्रांचे ॥ ६८ ॥ बैसला दिसे अतिविरुद्ध । मनें करी नाना व्यापार । आवरेना अनावर । उठोनि पळे ॥६९॥ बैसतां निरूपणीं । नेत्रीं भरली घांतघेणी । अत्यंत जाकळिला प्राणी । सुषुप्तीनें ॥ ७० ॥ कडकडां जांभया येती । डकडका डुकल्या देती । घाबरे होऊनि पाहती । क्षणक्षणां दुश्चित ॥ ७१ ॥ नेत्रीं झांपडी पडली । विमल मुखीं विकसली । नावरे सर्वांगीं भरली । निद्रा भरे बळें ॥ ७२ ॥ निःशेष देहभाव गळे । अवचितीं नेत्र उडविले । एक ते कलथोनि पडले । एकीं फोडिली ब्रह्मविणा ॥ ७३ ॥ जागृतीस नाहीं ठाव । जैसे डुलती महानुभाव । मनें मांडिला उत्सव । सुखनिद्रेचा ॥७४॥ निद्रा प्रवेशे अभ्यंतरीं । तेव्हां विवेकाशी कैंची उरी । धारिष्ट पळे दुराचारी । जागृतीविषयीं ॥७५॥ आला निरूपणीं कंटाळा । प्रबळ निद्रेचा उमाळा । निद्रा लोळवी सकळां । बळें श्रोतयांसी ॥ ७६ ॥ निद्रा अज्ञानाची सांवली । निद्रा भ्रांतीची माउली । निद्रा निरूपणीं केली । विवशी ईश्वरें ॥ ७७ ॥ निद्रेकरितां विस्मृति पडे । निद्रेकरितां भ्रांति पडे । निद्रेकरितां मूर्ति मोडे । निद्रा हृदयशून्य ॥ ७८ ॥ निद्रा अविवेचें फळ । निद्रा जन्माचें मूळ । निद्रा सकळांसी व्याकुळ । करून पाडी ॥ ७९ ॥ निद्रा उदास नागवणी । निद्रा आयुष्य बुडवणी । निद्रा अगत्य निरूपणीं । घाला घाली ॥ ८० ॥ निद्रा आळसाची पेटी । निद्रा भ्रमाची कोटी । निद्रा हे परम खोखटी । साधका बाधी ॥ ८१ ॥ निद्रा प्रकाशासी झांपडी । निद्रा विवेकासी विघडी । निद्रा नागवण उघडी । साधकासी होय ॥ ८२ ॥ सांडूनि निरूपण गोड । पुरविती निद्रेचें कोड । ते साधक जाणावे झोंड । संत निजधन नेणती ॥ ८३ ॥ जो सादर अर्थांतरीं । तयासी निद्रा काय करी । जनीं निःसंग दरिद्री । तयासी बाधी ॥ ८४ ॥ ऐसी निद्रा महाविघ्न । बळेंचि श्रोतया करी भग्न । ते न येतां संलग्न । श्रवणें फावे ॥ ८५ ॥ निरूपणाचे आधारें । फिटे निद्रेचें काविरें । तेचि श्रोते गेर पामरें । जितचि मेलीं ॥ ८६ ॥ जे अत्यंत विषयासक्त । जे कुटुंबाचे निजभक्त । जयांपाशीं पाषांड मत । निरंतर वसे ॥८७॥ जे वैराग्यें कनिष्ठ । जे शब्दज्ञानें वरिष्ठ । ऐसे श्रोते परम नष्ट । सर्वथा नकोत ॥८८॥ जो संसारें तापला । जो स्वाहितासी प्रवर्तला । तोचि श्रोता लाधला । परम गुह्य ॥ ८९ ॥ असो ऐसे श्रोते वक्ते । सादर सर्वांग जाणते । जाणीव आणि क्राधातें । आवरूं जाणती ॥ ९० ॥ निरभिमानी जे समर्थ । तयांसी साजे हा परमार्थ । अभिमान वाहे तो पदार्थ । भूमिभार जाहला ॥ ९१ ॥ श्रोते ऐकती आदरें । तरी बोलेन बोबडीं उत्तरें । स्वामी तुमचेनि आधारें । होईन निरभिमान ॥ ९१ ॥ जैसे मायबाप वर्तती । तैसीच क्रिया लेंकुरें धरिती । म्हणोनि श्रोतीं वक्तीं । निरभिमान असावें ॥ ९३ ॥ तुह्मी स्वयें निरभिमान । परी माझे ठायीं अभि-

१ गांठ. २ कावळे. ३ घातकी.

मान । असेल ह्मणोनि हें साधन । पाय तुमचे ॥९४॥ माझ्या अंगीं अभिमान जडे । तरी गोष्टी येईल स्वामींकडे । जैसा परिवार पळतां मोडे । महत्व नृपतीचें ॥ ९५ ॥ तुह्मां सज्जनांची कृपा मज । आणि उरले अभिमानफुंज[1] । तरी हे माझी लाज । तुह्मांसच कीं ॥ ९६ ॥ स्वामी तुमचेनि प्रतापें । कृतांत काळ तोहि कांपे । तुमचेनि वचनमात्रें सोपें । होय परब्रह्म ॥ ९७ ॥ तुमची कृपा जेथें घडे । तयासीच परब्रह्म जोडे । प्राणी सुटती रोकडे । दुःखापासोनि सर्वदा ॥९८॥ तुह्मांसी शरण अनन्यभावें । जातां लुटी आनंद फावे । तया सुखाची मिरवे । तेजशां-ति अंगीं ॥ ९९ ॥ एका भावार्थासाठीं । उघडे शब्दरत्नपेटी[2] । अनर्घ्यरत्नांची गोमटी । मा-ळा वसे हृदयीं ॥१००॥ तुमचेनि उच्छिष्टलेशें । आणि गुरुशिष्यांचेनि मिसें । सांगिजेल जेणें पिसें । झडे जीवपणाचें ॥ १०१ ॥ इति श्रीरामीं रामदास । विनवी संतसज्जनांस । व्युत्पत्ति आणि पदन्यास । क्षमा केली पाहिजे ॥ १०२ ॥ इति तृतीयः समासः समाप्तः ॥ ३ ॥

---

## समास ४.

श्रीगणेशाय नमः । जे करामती दाखविती । तेहि गुरु ह्मणिजेती । परंतु सद्गुरु नव्हेती । मोक्षदाते ॥१॥ सभामोहन भुरीचेटक । शाबरी मंत्र कौटिल्य अनेक । नाना चमत्कार कौतुक[3] । असंभाव्य सांगती ॥ २ ॥ सांगती औषधिप्रयोग । कां सुवर्णधातूचा मार्ग । दृष्टिबंधन लागवेग । अभिलाषाचा ॥ ३ ॥ साहित्य संगीत रागज्ञान । गीत नृत्य तान मान । नानावा-द्यें शिकविती जाण । तेहि एक गुरू ॥ ४ ॥ विद्या शिकविती पंचाक्षरी । ताडेतोडे नानापरी । कां पोट भरे जयावरी । ते विद्या शिकविती ॥ ५ ॥ जे यातीचा व्यापार । शिकविती भराव-या उदर । तेहि गुरु परी साचार । सद्गुरु नव्हेती ॥ ६ ॥ आपुली माता आणि पिता । तेहि गुरूचि तत्त्वतां । परी पैलपार पावविता । तो सद्गुरु वेगळा ॥ ७ ॥ गायत्रीमंत्राचा उच्चार । सांगे तो गुरु साचार । परी ज्ञानेंविण पैलपार । पाविजेत नाहीं ॥ ८ ॥ जो ब्रह्मज्ञान उप-देशी । अज्ञानांधकार निरसी । जीवात्मया परमात्मयासी । ऐक्य करी ॥ ९ ॥ विघडले देव आणि भक्त । जीवशिवपणें द्वैत । तयां देवभक्तां एकांत । करी तो सद्गुरू ॥ १० ॥ भवव्या-घ्रें घालूनि उडी । गोवत्सांस ताडातोडी । केली देखूनी शीघ्र सोडी । तो सद्गुरु जाणावा॥११ प्राणी मायाजाळीं पडिले । संसारदुःखें दुखावले । ऐसे जेणें मुक्त केले । तो सद्गुरु जाणावा ॥१२॥ वासनानदीमहापूरीं । प्राणी बुडाला ग्लानि करी । तेथें उडी घालूनी तारी । तो सद्गुरु जाणावा ॥ १३ ॥ गर्भवास अति सांकडीं । इच्छा बंधनाची बेडी । ज्ञान देऊनी शीघ्र सोडी । तो सद्गुरु जाणावा ॥१४॥ फोडूनि शब्दाचें अंतर । वस्तु दाखवी निजसार । तेचि सद्गुरु माहेर । अनाथांचें ॥१५॥ जीव ऐकदेशी बापुडें । तयासी ब्रह्मचि करी रोकडें । फेडी संसा-र[4] सांकडें । वचनमात्रें ॥ १६ ॥ जें वेदाचे अभ्यंतरीं । तें काढूनि अपत्यापरी । शिष्यश्रवणीं कवळ भरी । उद्गारवचन ॥ १७ ॥ वेदशास्त्र महानुभव । पाहतां एकचि अनुभव । तोचि एक गुरुराव । ऐक्यरूपें ॥ १८ ॥ संदेह निःशेष जाळी । स्वधर्म आदरें प्रतिपाळी । वेदविरहित

---

१ अभिमानाचे ढीग. २ शब्दरूपी रत्नांची पेटी. ३ किमयेची कृति. ४ संसाररूपी वाघानें.

टवाळी । करूंचि नेणे ॥ १९ ॥ जें जें मन अंगीकारी । तें तें स्वयें मुक्त करी । तो गुरु नव्हे भिकारी । झडं आला ॥ २० ॥ शिष्यासी न लाविती साधन । न करविती इंद्रियदमन । ऐसे गुरु अडक्याचे तीन । मिळाले तरी त्यजावे ॥ २१ ॥ जो कोणी ज्ञान बोधी । समूळ अविद्या छेदी । इंद्रियदमन प्रतिपादी । तो सद्गुरु जाणावा ॥ २२ ॥ एक द्रव्याचे विकिले । एक शिष्याचे अंकिले । अतिदुराशेनें केले । दीनरूप ॥ २३ ॥ जें जें रुचे शिष्यमनीं । तैसीच करी मनधरणी । ऐशी कामना पापिणी । पडिली गळां ॥२४॥ जो गुरु भांडसारू । तो अधमाहूनि अधम थोरू । चोरटा मैंद पामरू । द्रव्यभोंदू ॥ २५ ॥ जैसा वैद्य दुराचारी । केली सर्वस्वें बोहेरी । आणि शेवटीं भीड करी । घातघेणा ॥ २६ ॥ तैसा गुरु नसावा । जेणें अंतर पडे देवा । भीड करूनियां गोवा । घाली बंधनाचा ॥ २७ ॥ जेथ शुद्ध ब्रह्मज्ञान । आणि स्थूळक्रियेचें साधन । तोचि सद्गुरु निधान । दाखवी डोळां ॥ २८ ॥ देखणें दाखविती आदरें । मंत्र फुंकिती कर्णद्वारें । इतुकेचि ज्ञानें तीं पामरें । अंतरलीं भगवंता ॥ २९ ॥ जाणे तिहींची खूण । तोचि गुरु सुलक्षण । तेथेंचि रिघावें शरण । अत्यादरें ॥ ३० ॥ अद्वैत निरूपणीं अगाध वक्ता। परी विषयीं लोलंगता । ऐसिया गुरूचेनि सार्थकता । होणार नाहीं ॥ ३१ ॥ जैसा निरूपणसमय । तैसेंचि मनींहि करी वार्य । कृतबुद्धीचा निश्चय । जाहलाचि नाहीं ॥ ३२ ॥ निरूपणीं सामर्थ्यसिद्धी । श्रवण होतां दुराशा बाधी । नाना चमत्कारबुद्धी । दंडळूं लागे ॥ ३३ ॥ पूर्वी ज्ञाते विरक्त भक्त । तैशासी सादृश्य भगवंत । आणि सामर्थ्यहि अद्भुत । सिद्धीचेनि योगें ॥३४॥ ऐसें तयांचें सामर्थ्य । आमुचें ज्ञान नुसतें व्यर्थ । ऐसा सामर्थ्याचा स्वार्थ । अंतरीं वसे ॥ ३५ ॥ निःशेष दुराशा तुटे । तरीच भगवंत भेटे । दुराशा धरिती ते वोखटे । शब्दज्ञाते कामिक ॥३६ ॥ बहुत ज्ञातीं नागविलीं । कामनेनें वेडीं केलीं । कामना इच्छितांचि मेलीं । बापुडीं मूर्खें ॥३७॥ निःशेष कामनारहित । ऐसा तो विरळा संत । अवघ्या वेगळें मत । अक्षय ज्याचें ॥३८॥ अक्षय ठेवा सकळांचा । परी पांग फिटेना शरीराचा । तेणें मार्ग ईश्वराचा । चुकोनि जाती ॥३९॥ सिद्ध आणि समर्थ जाहले । सामर्थ्यें देहास महत्त्व आलें । तेणें बेचाडें बळावलें । देहबुद्धीचें ॥४०॥ सांडूनि अक्षय सुख । सामर्थ्य इच्छिती ते मूर्ख । कामनेसारिखें दुःख । आणीक नाहीं ॥ ४१ ॥ ईश्वरेंवीण जी कामना । तेणें गुणेंचि नाना यातना । पावती होती पतना । वरपडे प्राणी ॥ ४२ ॥ होतां शरीरास अंत । सामर्थ्यहि निघोन जात । शेवटीं अंतरला भगवंत । कामनागुणें ॥ ४३ ॥ ह्मणोनि निष्कामना विचारू । दृढबुद्धीचा निर्धारू । तोचि सद्गुरु पैलपारू । पाववी भवाचा ॥४४॥ मुख्य सद्गुरूचें लक्षण । आधीं पाहिजे विमल ज्ञान । निश्चयाचें समाधान । स्वरूपस्थिति ॥ ४५ ॥ याहीवरी वैराग्य प्रबळ । वृत्ति उदास केवळ । विशेष आचारें निर्मळ । स्वधर्माविषयीं ॥ ४६ ॥ याहीवरी अध्यात्मश्रवण । हरिकथानिरूपण । जेथें परमार्थविवरण । निरंतर ॥ ४७ ॥ जेथें सारासारविचार । तेथें होय जगदुद्धार । नवविध भक्तीचा आधार । बहुत जनांसी ॥ ४८ ॥ ह्मणोनि नवविध भजन । जेथें प्रतिष्ठिलें साधन । हें सद्गुरूचें लक्षण । श्रोतीं ओळखावें ॥ ४९ ॥ अंतरीं शुद्ध ब्रह्मज्ञान । बाह्य निष्ठेचें भजन । तेथें बहुत भक्तजन । विश्रांति पावती ॥५०॥ नाहीं उपासनेचा आधार । तो परमार्थ निराधार । कर्मेंविण अनाचार । ह्मणोनियां ॥ ५१ ॥ वैराग्य आणि भजन ।

---

१ राखरांगोळी. २ डळमळूं लागे. ३ दुबेळकें.

स्वधर्म कर्म आणि साधन । कथा निरूपण श्रवण मनन । नीति न्याय मर्यादा ॥ ५२ ॥ सामर्थ्यें एक उणें असे । तेणें तें विलक्षण दिसे । ह्मणोनि सर्वेंहि विलसे । सद्गुरुपाशीं ॥५३॥ जो बहुतांचें पालन कर्ता । त्यासी बहुतांची असे चिंता । नाना साधनें समर्था । सद्गुरुपाशीं॥५४॥ साधनेवीण परमार्थ प्रतिष्ठे । तो मागुता सर्वेंचि भ्रष्टे । याकारणें दूरदृष्टे । महानुभाव ॥ ५५ ॥ आचार उपासना सोडिती । ते भ्रष्ट अभक्त दिसती । जळो तयांची महंती । कोण पुसे ॥५६॥ कर्म उपासनेचा अभाव । तेथें भक्तां देशीं जाहला ठाव । तो कानकोंडा समुदाव । प्रपंची हांसती ॥५७॥ नीचयातीचा गुरू । तोहि कानकोंडा विचारू । ब्रह्मसभेसी जैसा चोरू । तैसा दडे ॥५८॥ ब्रह्मसभा देखतां । त्याचें तीर्थ नये घेतां । अथवा प्रमाद सेवितां । प्रायश्चित्त पडे॥५९॥ तीर्थ प्रसादाची सांडी केली । तेथें नीचता दिसोन आली । गुरुभक्ति ते सटवली । एकाएकीं ॥ ६० ॥ गुरूची मर्यादा राखतां । ब्राह्मण क्षोभती तत्त्वतां । तेथें ब्राह्मण रक्षूं जातां । गुरुक्षोभ पडे ॥६१॥ ऐसीं सांकडीं दोहींकडे । तेथें पस्तावा घडे । नीचयातीस गुरुत्व न घडे । या कारणें ॥ ६२ ॥ तथापि आवडी घेतली जीवें । तरी आपणचि भ्रष्टावें । बहुत जनांस भ्रष्टवावें । हें तों दूषणच कीं ॥ ६३ ॥ आतां असो हा विचारू । स्वयातीचा पाहिजे गुरु । नाहीं तरी भ्रष्टाकारु । नेमस्त घडे ॥ ६४ ॥ जे जे कांहीं उत्तम गुण । तें तें सद्गुरूचें लक्षण । तथापि सांगों वोळखण । सद्गुरूची ॥६५॥ एक गुरु एकमंत्र गुरू । एक यंत्रगुरू एक तंत्रगुरू । एक वस्ताद गुरु एक राजगुरू । ह्मणती जनीं ॥ ६६ ॥ एक कुलगुरू एक मानिला गुरू । एक विद्यागुरु एक असद्गुरू । एक यातिगुरू । दंडकर्ता ॥६७॥ एक माता गुरु एक पिता गुरु । एक राजा गुरु एक देव गुरु । एक बोलिजे जगद्गुरु । सकळकळा॥६८॥ऐसे हे सत्रा गुरु । यांहि वेगळे आणिक गुरु । ऐक तयांचा विचारु । सांगिजेल ॥ ६९ ॥ एक स्वप्नगुरु एक दीक्षा गुरु । एक ह्मणती प्रतिमागुरु । एक ह्मणती स्वयें गुरु । आपुला आपण ॥७०॥ जे जे यातीचा जो व्यापारू । ते ते त्याचें तितुके गुरू । यांचा पाहतां विचारू । उदंड आहे ॥ ७१ ॥ असो ऐसे उदंड गुरू । नाना मतांचा विचारू । परी मोक्षदाता सद्गुरु । तो वेगळाचि असे ॥ ७२ ॥ नाना सद्विद्येचे गुण । याहीवरी कृपाळुपण । हें सद्गुरूचें लक्षण । जाणिजे श्रोतीं ॥ ७३ ॥ इति श्रीरामीं रामदास ह्मणे । सांगीतलीं सद्गुरुलक्षणें । पुढें सच्छिष्याच्या खुणे । सावध परिसिजे ॥७४॥ इति चतुर्थः समासः समाप्तः ॥ ४ ॥

---

## समास ५.

श्रीगणेशायनमः । मागां सद्गुरूचें लक्षण।विशद केलें निरूपण । आतां सच्छिष्याची वोळखण । सावध ऐका ॥१॥ सद्गुरुवीण सच्छिष्य । तो वायां जाय निःशेष । कां सच्छिष्याविण विशेष । सद्गुरु शिणे ॥ २ ॥ उत्तम भूमि शोधिली शुद्ध । तेथें बीज पेरिलें कीडखाद । कां तें उत्तम बीज परी संबंध । खडकेशीं पडला ॥ ३ ॥ तैसा सच्छिष्य तें सत्पात्र । परंतु गुरु सांगे मंत्र तंत्र । तेथें अरत्र ना परत्र । कांहींच नाहीं ॥४ ॥ अथवा गुरु पूर्ण कृपा करी । परी

---

१ दूरवरविचार करणारे. २ उपजतांच नाहींशी झाली.

शिष्य जाहला अनाधिकारी । भाग्यपुरुषाचा भिकारी । पुत्र जैसा ॥५॥ तैसा एकाविण एक । होतसे निरर्थक । परलोकींचें सार्थक । तें दुरी दुरावें ॥ ६ ॥ ह्मणोनि सद्गुरु आणि सच्छिष्य। तेथें न लागती सायास । त्या उभयतांचा हव्यास । पुरे एकसरां ॥ ७ ॥ सुभूमि आणि उत्तम कण । उगवेना पर्जन्याविण । तैसें अध्यात्मनिरूपण । नसतां होय ॥ ८ ॥ शेत पेरिलें आणि उगवलें । परंतु निगेविण गेलें । साधनेंविण तैसें जाहलें । साधकासी ॥ ९ ॥ जंववरी पीक आपणास भोगे । तंववरी अवघेंचि करणें लागे । पीक आलियाहि उगें । राहोंचि नये ॥१०॥ तैसें आत्मज्ञान जाहलें । परी साधन पाहिजे केलें । एक वेळ उदंड जेविलें । तरी सामुग्री पाहिजे ॥११॥ ह्मणोनि साधन अभ्यास सद्गुरु । सच्छिष्य सच्छास्त्र विचारु । सत्कर्म सद्वासना पारु । पाववी भवाचा ॥ १२ ॥ सदुपासना सत्कर्म । सत्क्रिया आणि स्वधर्म । सत्संग आणि नित्यनियम । निरंतर ॥ १३ ॥ ऐसें हें अवघेंचि मिळे । तरीच विमल ज्ञान निवळे । नाहीं तरी पाषांड संचरे बळें । समुदायीं ॥१४॥ येथें शब्द नाहीं शिष्यासी । हें अवघें सद्गुरुपाशीं । सद्गुरु पालटी अवगुणासी । नानायत्नें करूनियां ॥ १५ ॥ सद्गुरूचेनि असच्छिष्य पालटे । परंतु असच्छिष्यें सद्गुरु न पालटे । कां जें थोरपण तुटे । ह्मणोनियां ॥१६॥ याकारणें सद्गुरु पाहिजे । तरीच सन्मार्ग लाहिजे । नाहीं तरी होईजे । पाषांडावरपडे ॥१७॥ येथें सद्गुरुच कारण । येर सर्व निष्कारण । तथापि सांगों ओळखण । सच्छिष्याची ॥ १८॥ मुख्य सच्छिष्याचें लक्षण । सद्गुरुवचनीं विश्वास पूर्ण । अनन्यभावें शरण । या नांव सच्छिष्य ॥१९॥ शिष्य पाहिजे निर्मल । शिष्य पाहिजे आचारशील । शिष्य पाहिजे केवळ । विरक्त अनुतापी ॥२०॥ शिष्य पाहिजे निष्ठावंत । शिष्य पाहिजे शुचिर्मंत । शिष्य पाहिजे नेमस्त । सर्व प्रकारें ॥ २१ ॥ शिष्य पाहिजे साक्षेपी विशेष । शिष्य पाहिजे परम दक्ष । शिष्य पाहिजे अलक्ष्य । लक्षी ऐसा ॥ २२ ॥ शिष्य पाहिजे अतिधीर । शिष्य पाहिजे अत्युदार । शिष्य पाहिजे अतितत्पर । परमार्थाविषयीं ॥ २३ ॥ शिष्य पाहिजे परोपकारी । शिष्य पाहिजे निर्मत्सरी । शिष्य पाहिजे अर्थांतरीं । प्रवेशकर्ता ॥ २४ ॥ शिष्य पाहिजे परमशुद्ध । शिष्य पाहिजे परम सावध । शिष्य पाहिजे अगाध । उत्तम गुणांचा ॥ २५ ॥ शिष्य पाहिजे प्रज्ञावंत । शिष्य पाहिजे प्रेमळ भक्त । शिष्य पाहिजे नीतिमंत । मर्यादेचा ॥२६॥ शिष्य पाहिजे युक्तिमंत । शिष्य पाहिजे बुद्धिमंत । शिष्य पाहिजे संतासंत । विचार घेता ॥ २७ ॥ शिष्य पाहिजे धारिष्टाचा। शिष्य पाहिजे दृढव्रताचा । शिष्य पाहिजे उत्तमकुळींचा । पुण्यशीळ ॥ २८ ॥ शिष्य असावा सात्त्विक । शिष्य असावा भजक । शिष्य असावा साधक । साधनकर्ता ॥२९॥ शिष्य असावा विश्वासी । शिष्य असावा कायक्लेशी । शिष्य असावा परमार्थाशी । वाढवूं जाणे ॥ ३० ॥ शिष्य असावा स्वतंत्र । शिष्य असावा जगन्मित्र । शिष्य असावा सत्पात्र । सर्वां गुणें ॥ ३१ ॥ शिष्य असावा सद्विद्येचा । शिष्य असावा सद्भावाचा । शिष्य असावा अंतरींचा । परम शुद्ध ॥ ३२ ॥ शिष्य नसावा अविवेकी । शिष्य नसावा गर्भसुखी । शिष्य असावा संसारदुःखी । संतप्तदेही ॥ ३३ ॥ जो संसारदुःखें दुखावला । जो त्रिविधतापें पोळला । तोचि अधिकारी जाहला । परमार्थासी ॥३४॥ बहुत दुःख भोगिलें जेणें । तयासीच परमार्थ बाणे । संसार दुःखाचेनि गुणें । वैराग्य उपजे ॥३५॥ जयासी संसाराचा त्रास । तयासीच उपजे विश्वास । वि-

---

१ श्रीमंताचा. २ धान्य. ३ पवित्र. ४ स्वतःस झीज सोसणारा.

श्वासबळें दृढ कांस । धरिली सद्गुरूची ॥३६॥ अविश्वासें कांस सोडिली । ऐशीं बहुतेकें भवीं बुडालीं । नाना जलचरीं तोडिलीं । मध्येंचि सुखदुःखें ॥ ३७ ॥ या कारणें दृढ विश्वास । तोचि जाणावा सच्छिष्य । मोक्षाधिकारी विशेष । अग्रगण्य ॥३८॥ जो सद्गुरुवचनीं निवाला । तो सायुज्यतेचा अंकिला । संसारपांगें पांगिला । न वचे कदा ॥ ३९ ॥ सद्गुरूहूनि देव मोठा । जयासी वाटे तो शिष्य करंटा । सुटला वैभवाचा फांटा । सामर्थ्य पिसें ॥४०॥ सद्गुरुस्वरूप ते संत । देवास मांडेल कल्पांत । तेथें कैंचें उरलें सामर्थ्य । हरिहरांचें ॥४१॥ म्हणोनि सद्गुरुसामर्थ्य अधिक । जेथें आटती ब्रह्मादिक । अल्पबुद्धि मानव रंक । तयांसी हें कळेना ॥४२॥गुरुदेवांसी बरोबरी । करील तो शिष्य दुराचारी । भ्रांति बैसली अभ्यंतरीं । सिद्धांत नेणवे ॥ ४३ ॥ देव मनुष्यीं भाविला । मंत्रीं देवपणासी आणिला । सद्गुरु न वचे कल्पिला । ईश्वराचेनी ॥ ४४ ॥ म्हणोनि सद्गुरु पूर्णपणें । देवाहूनि अधिक कोटिगुणें । जयासी वर्णितां भांडणें । वेदशास्त्रां लागलीं ॥ ४५ ॥ असो सद्गुरुपदापुढें । दुजें कांहींच न चढे । देवसामर्थ्य तें केवढें । मायाजनित ॥४६॥ अहो सद्गुरुकृपा जयासी । सामर्थ्य न चले तयापाशीं । ज्ञानबळें वैभवासी । तृणतुल्य केलें ॥४७॥ सद्गुरुकृपेचेनि बळें । अपरोक्ष ज्ञानाचेनि उसाळें । मायेसहित ब्रह्मांड सगळें । दृष्टीस नये ॥४८॥ ऐसें सच्छिष्याचें वैभव । सद्गुरुवचनीं दृढभाव । तेणें गुणें देवराव । स्वयेंचि होय ॥ ४९ ॥ अंतरीं अनुतापें तापले । तेणें अंतर शुद्ध जाहलें । पुढें सद्गुरुवचनें निवाले । सच्छिष्य ऐसे ॥ ५० ॥ लागतां सद्गुरुवचनपंथें । जाहलें ब्रह्मांड पालथें । तरी ययाच्या शुद्ध भावार्थें । पालट न धरावा ॥५१॥शरण सद्गुरूसी गेले । सच्छिष्य ऐसे निवडले । क्रिया पालटे जाहले । पावन ईश्वरीं ॥ ५२ ॥ ऐसा सद्भाव अंतरीं । तरी ते मुक्तीचे वांटेकरी । येर मायिक वेषधारी । असच्छिष्य ॥५३॥ वाटे विषयाचें परम सुख । परमार्थ संपादणें लौकिक । देखोवेखीं पढतमूर्ख । शरण गेला ॥५४॥ जाहली विषयीं वृत्ति अनिवार । दृढ धरिला संसार । परमार्थचर्चेचा विचार । मलिन जाहला ॥ ५५ ॥ मोड घेतला परमार्थाचा । हव्यास धरिला प्रपंचाचा । भारवाही कुटुंबाचा । काबाडी जाहला ॥ ५६ ॥ मानिला प्रपंचीं आनंद । केला परमार्थीं विनोद । भ्रांत मूढ मतिमंद । लोधला कामीं ॥ ५७ ॥ सूकर पूजिलें विलेपनें । म्हैसा चर्चिला चंदनें । तैसा विषयी ब्रह्मज्ञानें । विवेकें बोधिला ॥ ५८ ॥ रासभ उकरडां लोळे । तयासी परिमळसोहळे । उलूक आंधारीं पळे । तया केवीं हंसपंक्ति॥५९ तैसा विषयदरीचा बराडी । घाली अधःपतनीं उडी । तयास भगवंतीं आवडी । सत्संग कैचा ॥ ६० ॥ वरती करूनि दांताळी । श्वानपुत्र हाडें चघळी । तैसा विषयी तळमळी । विषयसुखाकारणें ॥ ६१ ॥ तया श्वानामुखीं परमान्न । कीं मर्कटासी सिंहासन । तैसें विषयासक्ता ज्ञान । जिरेल कैंचें ॥ ६२ ॥ रासभें राखतां जन्म गेला । तो पंडितांमध्यें प्रतिष्ठिला । नवचे तैसें अशक्ताला । परमार्थ नाहीं ॥६३॥ मिळाला राजहंसांचा मेळा । तेथें आला डोमकावळा । लक्षूनि विष्ठेचा गोळा । हंस म्हणवी ॥६४॥ तैसें सज्जनाचेनि संगतीं । विषयी सज्जन म्हणविती । विषय अमेध्य चित्तीं । गोळा लक्षिला ॥६५॥ काखेसि घेऊनियां दारा । म्हणे मज संन्यासी करा । तैसा विषयीं सैरावैरा । ज्ञान बडबडी ॥ ६६ ॥ असो ऐसे पढतमूर्ख । ते काय जाणती परमार्थसुख । नारकी प्राणी नरक । भोगिती स्वइच्छें ॥६७॥ वेश्येची करील सेवा । तो कैसा

१ संमार्ग्दारिद्र्यानें. २ वेगानें. ३ मोहपाशांत गुंतला. ४ अपवित्र.

मंत्री ह्मणावा । तैसा विषयदास मानावा । भक्तराज केवीं ॥६८॥ तैसे विषयी बापुडे । तयांस ज्ञान कोणीकडे । वाचाळ शाब्दिक बडबडे । वरपडे जाहले ॥ ६९ ॥ ऐसे शिष्य परम नष्ट । कनिष्ठांमध्यें कनिष्ठ । हीन अविवेकी आणि दुष्ट । खळ खोटे दुर्जन ॥ ७० ॥ ऐसे जे पापरूप। दीर्घद्वेषी वज्रलेप । तयांसी प्रायश्चित्त अनुताप । उद्भवतां आहे ॥७१ ॥ तिहीं पुन्हां शरण जावें । सद्गुरूसी तोषवावें । कृपादृष्टि जालिया व्हावें । पुन्हां शुद्ध ॥७२॥ स्वामिद्रोह जया घडे । तो यावचंद्र नरकीं पडे । तयासी उपायाचि न घडे । स्वामि तुष्टल्यावांचूनि ॥ ७३ ॥ स्मशानवैराग्य आलें । ह्मणोनि लोटांगण घातलें ।तेणें गुणें उपतिष्ठलें।नाहीं ज्ञान॥७४॥ भाव आणिला जायांचा । मंत्र घेतला गुरूचा । शिष्य जाहला दों दिवसांचा । मंत्राकारणें ॥ ७५ ॥ ऐसे केले गुरु उदंड । शब्द शिकला पाखंड । जाहला तोंडाळ तमुंड । महापाखंडी ॥७६॥ घडी, एक रडे आणि पडे । घडी एक वैराग्य चढे । घडी एक अहंभाव जडे । ज्ञातेपणाचा ॥ ७७ ॥ घडी एक विश्वास धरी । सर्वोचि घडी एक गुर्गुरी । ऐसा नानाछंद करी । पिसाट जैसा ॥ ७८ ॥ काम क्रोध मद मत्सर । लोभ मोह नाना विकार । अभिमान कापट्य तिरस्कार । हृदयीं नांदे॥७९॥ अहंकार आणि देवपांग । अनाचार आणि विषयसंग । संसार प्रपंचोद्वेग । अंतरीं वसे॥८०॥ दीर्घसूत्री कृतघ्न पापी । कुकर्मी कुतर्की अविवेकी । अभक्त अभाव शीघ्रकोपी । निष्ठुर परघातकी ॥ ८१ ॥ हृदयशून्य आणि आळशी । अविवेकी आणि अविश्वासी । अधीर अविचार संदेहासी । दृढ धर्ता ॥८२ ॥ आशा ममता तृष्णा कल्पना।कुबुद्धि दुर्वृत्ति दुर्वासना । अल्पबुद्धि विषयकामना । हृदयीं वसे ॥ ८३ ॥ ईषणा असूया तिरस्कार । निंदेस प्रवर्त्ते सादर । देहाभिमानें हुंबरे फार । जाणपणें ॥८४॥ क्षुधा तृषा आवरेना । निद्रा सहसा धरवेना । कुटुंबचिंता वोसरेना।भ्रांति पडली ॥ ८५ ॥ शाब्दिक बोले उदंड वाचा । लेश नाहीं वैराग्याचा । अनुताप धारिष्ट साधनाचा । मार्ग न धरी॥८६॥भक्ति विरक्ति ना शांती । सद्वृत्ति लीनता ना दान्ती । कृपा दया ना तृप्ती । सुबुद्धि असेना॥८७॥ कायाक्लेशी शरीरहीन । धर्माविषयीं परम कृपण । क्रिया पालटेना कठिण । हृदय जयाचें ॥ ८८ ॥ आर्जव नाहीं जनासी । जो अप्रिय सज्जनांसी । जयाचे जीवीं अहर्निशीं । परन्यून वसे ॥८९॥ सदा सर्वदा लटिका । बोले मायिक लापणिका। क्रियाविचार पाहतां एका । वचनीं सत्य नाहीं ॥९०॥ परपीडेविषयीं तत्पर । जैसे विंचू आणि विखार । तैसें कुशब्दें जिव्हार । भेदी सकळांचें ॥९१॥ आपुले झांकी अवगुण । पुढिलासी बोले कठिण । मिथ्या गुणदोषाविण । गुणदोष लावी ॥ ९२ ॥ स्वयें पापात्मा अंतरीं । पुढिलांची कवण न करी । जैसा हिंसक दुराचारी । परदुःखें शिणेना ॥ ९३ ॥ दुःख पराव्याचें नेणती । दुर्जन गांजिलेचि गांजिती । श्रम पावतां आनंदती । आपुले मनीं ॥ ९४ ॥ स्वदुःखें झुरे अंतरीं । आणि परदुःखें हास्य करी । तयासी प्राप्त यमपुरी । राजदूत ताडिती ॥९५॥ असो ऐसे मदांध बापुडे । तयांसी भगवंत कैसा जोडे । जयांसी सुबुद्धि नावडे । पूर्वपातकें करूनी ॥ ९६ ॥ तयांसी देहाचे अंतीं । गात्रें क्षीणता पावती । जिवलग वोसंडती । जाणवेल तेव्हां ॥ ९७ ॥ असो ऐसे गुणा वेगळे । ते सच्छिष्य आगळे । दृढभावार्थे सोहळे । भोगिती स्वानंदाचे ॥९८॥ जये स्थळीं विकल्प जागे । कुलाभिमान पाठी लागे । ते प्राणी प्रपंचसंगें । हिंपुटी होती ॥९९॥ जेणें करितां दुःख जाहलें । तेंचि मनीं दृढ धरिलें । तेणें गुणें प्राप्त जाहलें ।

- ... १ इंद्रियदमन.

पुनः दुख ॥ १०० ॥ संसारसंगें सुख जाहलें । ऐसें देखिलें ना ऐकिलें । ऐसें जाणोनि अनहित कलें । ते दुःखी होती स्वयें ॥१०१॥ संसारीं सुख मानिती । ते प्राणी मूढमती । जाणोनि डोळे झांकिती । ते पढतमूर्ख ॥१०२॥ प्रपंच सुखें करावा । परी कांहीं परमार्थ वाढवावा । परमार्थ अवघाचि बुडवावा । हें विहित नव्हे ॥१०३॥ मागां जाहलें निरूपण । गुरुशिष्यांची वोळखण । आतां वैराग्यलक्षण । सांगिजेल ॥ १०४ ॥ इति श्रीरामीं रामदास ह्मणे । सांगितलीं शिष्यलक्षणें । पुढें वैराग्यलक्षणें । सांगिजेल ॥ १०५ ॥ इति पंचमःसमासः समाप्तः ॥ ५ ॥

## समास. ६

श्रीगणेशाय नमः । संसार ह्मणिजे महापूर । माजीं जलचरें अपार । डंखूं धांवती विकार । काळसर्प ॥१॥ आशा ममता देहीं बेडी । सुसरी करी ताडातोडी । नेऊनि दुःखाचे सांकडी । माजीं घालिती ॥२॥ अहंकारनक्रें उडविले । नेऊनि पाताळीं बुडविले। तेथूनियां सोडविले । न वचती प्राणी ॥३॥ काममगरमिठी सुटेना । तिरस्कार लागला तुटेना । मद मत्सर वोहटेना । भुली पडली ॥ ४ ॥ वासना धामीण पडली गळां । घालूनि वेटाळें वमी गरळा । जिव्हा लळलळी वेळोंवेळां । भयानक ॥५॥ माथां प्रपंचाचें वोझें । घेऊनि ह्मणे माझें माझें । बुडतां न सोडी फुंजें । कुळाभिमान ॥६॥ पडलें भ्रांतीचें आंधारें । नागविलें अभिमानचोरें । आलें अहंतेचें काविरें । भूतबाधा ॥७॥ बहुतेक आवर्ती पडले । प्राणी वाहतचि गेले । जिहीं भगवंतासी बोभाइलें । भावार्थबळें ॥८॥देवें आपण घालूनि उडी । तयांसि नेलें पैलथडी । येर तीं अभाविकें बापुडीं । वाहतचि गेलीं ॥९॥ भगवंत भावाचा भुकेला । भावार्थ देखोनि भुलला। संकटीं पावे भाविकांला । रक्षीतसे ॥ १० ॥ जयांसी भगवंत आवडे । तयांचें देवास सांकडें । संसारदुःख सकळ उडे । निजदासाचें ॥११॥ जे अंकित ईश्वराचे । तयांस सोहळे निजसुखाचे । धन्य तेचि दैवाचे । भाविकजन ॥ १२॥ जैसा भाव जयापासीं । तैसा देव तयासी । जाणे भाव अंतरसाक्षी । प्राणिमात्राचे ॥१३॥ जरी भाव असला मायिक । तरी देव होय महाठक । नवल तयाचें कौतुक । जैशासी तैसा ॥१४॥ जैसें जयाचें भजन । तैसेंचि दे समाधान । भाव होतां किंचित् न्यून । आपणहि दुरावे ॥ १५ ॥ दर्पणीं प्रतिबिंब दिसे । जैशासी तैसेंच भासे । तयाचें सूत्र असे । आपणापासीं ॥१६॥ जैसें आपण करावें । तैसेंचि तेणें व्हावें । जरी डोळे भरूनि पहावें । तरी तेंही टवकारे ॥१७॥ भृकुटीसी घालूनि गांठी । पाहतां क्रोधें तेंहि उठी । आपण हास्य करितां पोटीं । तेंहि आनंदे ॥ १८ ॥ जैसा भाव प्रतिबिंबला । तैसाचि देवहि जाहला । जो जैसा भजे तयाला । तैसाचि वोळे ॥१९॥ भावें परमार्थाचिया वाटा । वाहती भक्तीचिया पेठा । भरला मोक्षाचा चोहटा । सज्जनसंगें ॥२० ॥ भावें भजनीं जे लागले । ते ईश्वरीं पावन जाहले । भावार्थबळें उद्धरिले । पूर्वज तेहि ॥ २१ ॥ आपण स्वयें तरले । जनांसहि उपेगा आले । कीर्तिश्रवणें जाहले । अभक्त भावार्थी ॥ २२ ॥ धन्य तयांची जननी । जे लागले हरिभजनीं । तिहींच एक जन्म जनीं । सार्थक केला ॥२३॥ तयांची वर्णूं काय थोरी। जयांचा भगवंत कैवारी । कांसे लावूनि उतरी । पार दुःखाचे ॥२४॥ बहुतां जन्मांचे शेवटीं । जेणें चुके आटाआटी । तो हा नरदेह भेटी । करी भगवंतीं ॥ २५ ॥ ह्मणोनि धन्य ते भाविक

स्मरण केलं.

जन । जिहीं जोडिलें हरिनिधानें । अनंत जन्मांत दिलें पुण्य । फळासि आलें ॥ २६ ॥ आयुष्य हें रत्नपेटी । माझीं भजन हीं रत्नें गोमटीं । ईश्वरीं अर्पूनियां लुटी । आनंदाची करावी ॥ २७ ॥ हरिभक्त वैभवें कनिष्ठ । परी ते ब्रह्मादिकां वरिष्ठ । सदा सर्वदा संतुष्ट । नैराश्यबोधें ॥ २८ ॥ धरूनि ईश्वराची कांस । केलें संसाराचें नैराश्य । तयां भाविकां जगदीश । सर्वांग सांभाळी ॥ २९ ॥ जयां संसाराचें दुःख । विवेकें वाटे परमसुख । संसारसुखाचेनि पढतमूर्ख । लोधोनि पडती ॥ ३० ॥ जयांचा ईश्वरी जिव्हाळा । ते भोगिती स्वानंदसोहळा । जयांचा जनावेगळा । ठेवा अक्षय ॥ ३१ ॥ ते अक्षयीं सुखें सुखावले । संसारदुःख विसरले । विषयरंगीं वोरंगिले । श्रीरंगरंगीं ॥ ३२ ॥ तयां फावली नरदेहपेटी । ईश्वरीं केली सांठी । येर अभाविकें करंटीं । नरदेह गेला ॥ ३३ ॥ अवचट निधान जोडलें । तें कवडीच्या बदलें नेलें । तैसें आयुष्य निघोनि गेलें । अभाविकांचें ॥ ३४ ॥ बहुत तपांचा सांठा । तेणें लाधला परिस गोटा । परी तो ठायींचा करंटा । भोगूंच नेणे ॥ ३५ ॥ तैसा संसारासि आला । मायाजाळीं गुंडाळला । अंतीं एकलाचि गेला । हात झाडोनी ॥३६॥ या नरदेहाचे संगतीं । बहुत पावले उत्तम गती । एक बापुडे यातायाती । वरपडे जाहले ॥ ३७ ॥ या नरदेहाचेनि लागवेगें । सार्थक करावें संतसंगें । नीचयोनीं दुःख मागें । बहुत भोगिलें ॥ ३८ ॥ कोण समय येईल कैसा । याचा न कळे कीं भरंवसा । जैसे पक्षी दाही दिशा । उडोनि जाती ॥ ३९ ॥ तैसें वैभव हें सकळ । कोण जाणे कैसी वेळ । पुत्रकलत्रादिसकळ । विघडोनि जाती ॥ ४० ॥ पाहिली घडी नाहीं आपुली । वयसा तरी निघोनि गेली । देह पडतांचि ठेविली । पुढें नीच योनि ॥४१॥ श्वानसूकरादि नीचयाती । भोगणें घडे विपत्ती । तेथें कांहीं उत्तम गती । पाविजेत नाहीं ॥ ४२ ॥ मागा गर्भवासीं आटाआटी । भोगतां जाहलासि रे हिंपुटी । तेथूनिया थोर कष्टीं । सुटलासि दैवें ॥ ४३॥ दुःख भोगिलें आपुल्या जीवें । तेथें कैंचीं होतीं सवें । तैसेंच पुढें एकलें जावें । लागेल बापा ॥ ४४ ॥ कैंची माता कैंचा पिता । कैंची बहीण कैंचा भ्राता । कैंची सुहृदें कैंचीं वनिता । पुत्रकलत्रादिक ॥ ४५ ॥ हीं तूं जाण मावेचीं । अवघीं सोयरीं सुखाचीं । हीं तुझ्या सुखदुःखाचीं । सांगातीं न होती ॥ ४६ ॥ कैंचा प्रपंच कैंचें कुळ । कासया होतोसि व्याकुळ । धन कण लक्ष्मी सकळ । जाईल जाण ॥ ४७ ॥ कैंचें घर कैंचा संसार । कासया करिसी जोजार । जन्मवरी वाहोनि भार । सेवीं सांडोनि जासी ॥ ४८ ॥ कैंचें तारुण्य कैंचें वैभव । कैंचे सोहळे हाव भाव । हे सकळहि जाण माव । मायिक माया ॥ ४९ ॥ येच क्षणीं मरोनि जासी । तरी रघुनाथीं अंतरलासी । माझें माझें ह्मणतोसि । ह्मणोनियां ॥ ५० ॥ तुवां भोगिल्या पुनरावृत्ती। ऐसीं मायबापें किती । स्त्री कन्या पुत्र होती । लक्षानुलक्ष ॥ ५१ ॥ कर्मयोगें सकळ मिळालीं । एके स्थळीं जन्मासी आलीं । तीं तुवां आपुलीं मानिलीं । कैसीं रे पढतमूर्खा ॥ ५२ ॥ तुझें तुज नव्हे शरीर । तेथें इतरांचा कोण विचार । आतां एक भगवंत सार । धरी भावार्थबळें ॥५३॥ एका दुर्भराकारणें । नानानीचांची सेवा करणें । नाना स्तुति आणि स्तवनें । मर्यादा धरावी ॥५४॥ जो अन्न देतो उदरासी । शरीर विकावें लागे तयासी । मा जेणें घातलें जन्मासी । त्यासी कैसें विसरावें ॥५५॥ अहर्निशीं ज्या भगवंता । सकळ जीवांची लागली चिंता । मेघ वर्षे जयाची सत्ता । सिंधु मर्यादा धरी ॥५६॥ भूमि धरिली धराधरें । प्रकट होइजे दिन-

---

१ ईश्वर हाच कोणी एक ठेवा. २ आंतबाहेर. ३ दगड. ४ चौऱ्यांयशी लक्ष योनींचे फेरे. ५ क्लेशयुक्त उदर पोषणार्थ.

करें । ऐशी सृष्टि सत्तामात्रें । चालवी जो कां ॥ ५७ ॥ ऐसा कृपाळू देवाधिदेव । नेणवे जयाचें लाघव । जो सांभाळी सकळ जीव । कृपाळूपणें ॥ ५८ ॥ ऐसा सर्वात्मा श्रीराम । सोडूनि धरिती विषयकाम । ते प्राणी दुरात्मे अधम । केलें पावती ॥ ५९ ॥ रामेंवीण जे जे आस । तितुकी जाणावी निरास । माझें माझें सावकाश । शणिचि उरे ॥ ६० ॥ जयास वाटे शीण व्हावें । तेणें विषय चिंतीत जावे । विषय न मिळतां जीवें । तगमग सुटे ॥ ६१ ॥ सांडूनि राम आनंदघन । ज्याचे मनीं विषयचिंतन । त्यासी कैचें समाधान । लोलंगतासी ॥ ६२ ॥ जयासि वाटे सुखचि असावें । तेणें रघुनाथभजनीं लागावें । स्वजन सकळहि त्यागावे । दुःखमूळ जे ॥ ६३ ॥ जेथें वासना झोंबोनि पडे । तेणेंचि अपायें दुःख जडे । ह्मणोनि विषयवासना मोडे । तो एक सुखी ॥६४॥ विषयजनित जें जें सुख । तेथेंचि होतसे परम दुःख । पूर्वी गोड अंतीं शोक । नेमस्त आहे ॥ ६५ ॥ गळ गिळतां सुख वाटे । ओढूनि घेतां घसा फाटे । कां तें बापुडें मृग आपटे । चारा घेऊनि पळतां ॥ ६६ ॥ तैसी विषयसुखीं गोडी । गोड वाटे परी ते कुडी । ह्मणोनियां आवडी । रघुनाथीं धरावी ॥ ६७ ॥ ऐकोनि बोले भाविक । कैसेनि घडे जी सार्थक । सांगा स्वामी यमलोक । चुके जेणं ॥ ६८ ॥ देवास वास्तव्य कोठें । तो मज कैसेनि भेटे । दुःखमूळ संसार तुटे । कोणे परी स्वामी ॥ ६९ ॥ घडपुडीत भगवत्प्राप्ति । होऊनि चुके अधोगति । ऐसा उपाय कृपामूर्ति । मज दीनासि करावा ॥ ७० ॥ वक्ता ह्मणे हो एका भावें । भगवद्भजन करावें । तेणें होईल स्वभावें । समाधान ॥ ७१ ॥ कैसें करावें भगवद्भजन । कोठें ठेवावें हें मन । भगवद्भजनाचें लक्षण । मज निरूपावें ॥ ७२ ॥ ऐसा म्लानवदनें बोले । धरिलीं सुदृढ पाउलें । कंठीं सद्गदित नेत्रीं गळे । अश्रुपात ॥ ७३ ॥ देखोनि शिष्याची अनन्यता । भावें बोलला सद्गुरुदाता । स्वानंद तुंबळेल आतां । पुढिले समासीं ॥ ७४ ॥ इति श्रीरामीं रामदास । सांगितला खरा विश्वास । तेणें होईल तुह्मांस । समाधान ॥ ७५ ॥ इति षष्ठः समासः समाप्तः ॥ ६ ॥

## समास ७.

श्रीगणेशाय नमः । ऐकोनि भाविकाचे प्रश्न । स्वामी देती प्रतिवचन । तेंचि आतां श्रोते जन । परिसोत कां ॥१॥ देव घननीळ सांवळा । मुकुट कुंडलें मेखळा । गळे वैजयंती माळा । आणि पीतांबरू ॥२॥ ऐसा शेषशयनावरी । क्षीरसागरीं निद्रा करी । शंखचक्रगदाधारी । लक्ष्मीसहित ॥३॥ तोचि मूळपुरुष एक । त्यापासूनि अवतारादिक । दश अवतार अनेक । अंशमात्रें होती ॥ ४ ॥ ऐसा हा बोलिला विष्णु । आणि कैलासीं त्रिनयनु । उभयतां एकचि तनु । भिन्नत्व नाहीं ॥ ५ ॥ असो हरि मिळोनि हर । कीं तो सिंधुजेचा वर । येर मुख्य देव इतर । अंश यांचे ॥६॥ एक सागरीं एक कैलासीं । यांची भेटी होईल कैसी । भेटी जाहलिया जीवासी । कोण गति आहे ॥ ७ ॥ एका भावार्थासाठीं । देव लागे भक्तांपाठीं । भाव नसतां जगजेठी । प्राप्त नाहीं ॥८॥ शिष्य ह्मणे गुरुदेवा । भाव तरी कोठें धरावा । कोण उपाय करावा । भाव धरूनी ॥ ९ ॥ भावें घ्यावें हरीचें नाम । हृदयीं धरावें प्रेम । मानसपूजा नित्य नियम । केले पाहिजेती ॥१०॥ धरोनियां सत्वगुण । भावें करावें कीर्तन । अथवा करावें श्रवण । अ-

१ एक देह धारण केलेले. २ समुद्रमंथनांतील चवदा रत्नांपैकीं जी लक्ष्मी, तिचा पती.

त्यादरें करूनी ॥ ११ ॥ सगुणमूर्तीचीं चरित्रें । श्रवण करावीं पवित्रें । ध्यानें विविध विचित्रें । अंतरीं धरावीं ॥ १२ ॥ निग्रहनेमाचें बळ । असतां प्राप्ति तत्काळ । दुराशा करी तळमळ । निग्रहभ्रष्टो ॥ १३ ॥ जेथें निग्रहासी धाष्टर्य वसे । तेथें देव सन्निधचि बसे । सोडी संशयाचें पिसें । एतद्विषयीं ॥१४॥ तरी निग्रह धारिष्ट जडे । हें वैराग्याविण न घडे । दृढ वैराग्य होतां उडे । पांग देहाचा ॥१५॥ देहपांग अनादरें बळें । तेथें धारिष्ट उठोनि पळे । सद्भावपूर्वक ढांसळे । पूर्ण धारिष्ट नसतां ॥१६॥ देह पडे कां देव जोडे । ऐशी हांव आंगीं जडे । तेणें गुणें वैराग्य चढे । महाप्रबळ ॥ १७ ॥ देहपांग निःशेष भंगे । तेव्हां प्राप्तीसी वेळ न लागे । देव भक्तांपाठीं लागे । 'ना भी ना भीं' ह्मणोनी ॥१८॥ बाळक आपणा रक्षूं नेणे । ह्मणोनि मातेसि लागे रक्षणें।तैंचि बाळक शहाणें। होतां माता त्रिसंबे ॥१९॥ तैसा भक्त भगवंतीं प्रेमा। लाहूनि उल्लंघी देहसीमा । तयाचा सांभाळ आत्मयारामा। करणें घडे नेमस्त॥२०॥ सर्वस्वाची आस तुटे। तरीसगुणमूर्ति प्रकटे । तेणें योगें समूळतुटे। दुःख संसारींचें॥२१॥परंतु आशा सोडवेना। ह्मणोनि प्राप्ति घडेना । आशा धरितां सुटेना । प्राणी दुःखापासोनी ॥ २२ ॥ आशा दुराशा दोघी बहिणी । वेडा लाविले सकळ प्राणी । दुःखरूप तया पापिणी । जन्म दाविती मागुता ॥२३॥ आशा दुराशांचीं जाळीं। काळें पसरिलीं भूमंडळीं । घडला प्राणिमात्र आंदोळी । संसारदुःखीं ॥ २४ ॥ आशा वासनेचें बंधन । वासना जन्मासी कारण । वासनेसी आशेविण । थारा नाहीं ॥ २५ ॥ आशा वासनेची पापिणी । आशा दुःखाची खाणी । आशा वासनेची यातवेणी । बळेंचि जन्म दावी ॥ २६ ॥ जयासी ज्याची आस । तयासी त्याचचि अध्यास । निदिध्यासें प्राणियास । तेचि प्राप्ति ॥ २७ ॥ बहुतेक ध्यास मनीं । पूर्वाभ्यासें करूनी । कांता पुत्र आणि धनीं । नेमस्त आहे ॥ २८ ॥ अखंड प्रपंचाचें ध्यान । दृढ लागलें अनुसंधान । तेणें घडेचिना साधन । परत्रींचें ॥ २९ ॥ उपजतांचि लागवेगें । प्राणी प्रपंच करूं लागे । तयासी सांगणेंचि नलगे । प्रपंच करावा ऐसा ॥ ३० ॥ सकळ सृष्टि प्रपंचाकडे । सकळांसी प्रपंच आवडे । जाणतेचि ठकले बापुडे । युगधर्मममत्वें ॥ ३१ ॥ आहे प्रपंचीं आसक्ती । ह्मणोनि नाना आधार घेती । सेवीं सर्व सांडोनि जाती । बापुडे मूर्ख ॥३२॥ चिंतीत असतां प्रपंचजय । एकाएकीं विपरीतसमय । आंगीं आदळतां लय । पावती प्राणी ॥३३॥ अंतीं मति तेचि गती । स्त्री पुत्र आक्रंदती । प्रपंचलोभें यातायाती । पुनः पुनः जन्म ॥३४॥ ऐसाच करी घेरझारा । प्रपंचलोभें आत्महत्यारा । यमयातना निलाजरा । साहिलेंचि साहे ॥३५॥ ऐसा सृष्टीचा दंडक । लोभें वेष्टिला एक एक । जाणत असतांहि कौतुक । माया खेळ खेळे हा ॥ ३६ ॥ देखतां दिवसां नागवण । ठकले आपणासी आपण । होतांहि परम क्षीण । आनंदचि मानी ॥३७॥ महावर्तीं बुडतां । दृढ केली देहाहंता । देहासी येईल न्यूनता । ह्मणोनि सांगे ॥ ३८ ॥ जंव होय देहावसान । तंव न सोडी अभिमान । ऐसा अभिमानी जन । सर्वत्र वर्ते ॥ ३९ ॥ एवं महत्त्वाची आशा । महत्त्व नसतांहि दुराशा । तेणें गुणें जगदीशा । अंतरती प्राणी ॥ ४० ॥ एवं देहाचें थोरपण । तेचि उदास नागवण । देहाचेनि लोभें खूण । चुके परमार्थाची ॥ ४१ ॥ देहासी थोरपण आणितां । क्षीणचि उरे तत्त्वतां । रासभाचा अश्व होतां । परम संकट॥ ४२॥ देहमात्र तितुका निंद्य । एकें मानिला परम वंद्य । तरी तो वंदितांचि खेद । पावेल तेणें ॥४३॥

---

१ कलियुग आणि मायेच्या योगानें. २ प्रपंचरूप भोंवऱ्यांत.

देह विटाळाचा मूळ । देह अशुद्धाचा गाळ । देह नाना अनर्गळ । दुर्गंधीचा वोतिला॥४४॥देह कृमींचा कोठार । देह अस्थींचा पंजर । जंव जिंकिला आहे जर्जर । खंगतां भंगे ॥ ४५ ॥विष्ठा मूत्र वात पित्त । येणेंचि देह चालत । नाना दुःखें आदिअंतीं । ऐसोंचि आहे ॥४६॥देह कुशिळ अमंगळ । देह अत्यंत अनर्गळ । देह वोहळा वोंगळ । वाहती नव नाळी ॥ ४७ ॥ देहीं असे नाना विकार । देह अत्यंत असारीं आसार । ऐसा तोही क्षणभंगुर । अवचिता नासे ॥ ४८ ॥ ऐशा मोधळयाचा अभिमान । माथां वाहती मूढ जन । वस्त्रभूषणें शृंगारून । मी थोर ह्मणती ॥ ४९ ॥ चर्चितां नाना सुगंध । तरी तो नव्हे कदा शुद्ध । अवचितीं सुटे दुर्गंध । उपंदर पडे ॥ ५० ॥ माझीं माझीं ऐसें ह्मणतां । मरोनि गेलें माता पिता । तें जाणतांचि असतां । पुन्हां ह्मणे स्त्री माझी ॥ ५१ ॥ ऐसें ह्मणत ह्मणतां तेही मेलीं । कन्या पुत्र राम झालीं । तरी दुराशा धरिली । आपुल्या शरीराची ॥५२॥ वय वेंचलें जाहला उतार । ह्मणे माझें पिकलें शरीर । भ्रमें मूर्ख अविचार । खंगला अंतीं ॥५३॥ तारुण्यवैभव निघोनि गेलें । मग मानस पस्तावलें । हातींचें रत्न गळोनि पडलें । मग चरफडूं लागे ॥ ५४ ॥ येथें स्वहित तेंचि रत्न । गेलें न करितां प्रयत्न । ह्मणोनि चतुरीं यत्न । केला पाहिजे ॥ ५५ ॥ तों शिष्य ह्मणे स्वामी । सांगा कोण प्रयत्न करूं मी । जेणें प्रयत्नें आत्मया रामीं । पावन होइजे ॥५६ ॥ देहादि प्रपंच नश्वर । पूर्ण कळला हा विचार । तेणें करितां अंतर । चंचळ जाहलें ॥५७ ॥ वाटे सकळहि त्यजावें । कांहीं सार्थक करावें । तरी मज देवाधिदेवें । मार्गीं लाविजे ॥५८॥ ऐसें शिष्याचें अंतर । जाणोनि देती प्रत्युत्तर । पुढील समासीं चतुर । परिसोत कां ॥ ५९ ॥ इतिश्री रामीं रामदास । ह्मणे धरूनियां विश्वास । साधकें अतिसावकाश । श्रवण करावें ॥ ६०॥इति सप्तमः समासः समाप्तः ॥ ७ ॥

---

## समास ८.

श्रीगणेशाय नमः । रेघेचें गुंडाळें केलें ।मातृकाक्षरीं शब्द झाले । शब्द मेळवूनि चाले ।श्लोक गद्य प्रबंध ॥१॥ वेद शास्त्रं पुराणें । नानाकाव्यनिरूपणें । ग्रंथभेद अनुवादणें । किती ह्मणोनि सांगावे ॥ २ ॥ नाना ऋषि नाना मत । पाहों जातां असंख्यात । भाषा लिपी जेथ तेथ । काय उणें ॥ ३ ॥ वर्ग ऋचा श्रुति स्मृती । अध्याय सर्ग स्तवक जाती । प्रसंग मान समास पोथी । बहुधा नामें ॥४॥ नाना पदें नाना श्लोक । नाना वीर नाना कडक । नाना शाखा दोहरे अनेक । नामाभिधान ॥५॥ डफगाणें माचीगाणें । दिंडीगाणें कथागाणें । नाना मान नाना जसन । नाना खेळ ॥६॥ ध्वनि नाद घोष रेखा । बहु वाचा मध्यम देखा । वाचारूपहि ऐका । अनुक्रमें॥७॥ उन्मेष परा ध्वनि पश्यंती । नाद मध्यमा शब्द चोथी । वैखरीपासोनि उमटती । नाना शब्दरत्नें ॥ ८ ॥ अकार उकार मकार । अक्षरमात्राचें अंतर । औटमात्रा तदनंतर । बावन मातृका ॥ ९ ॥ नाना भेद रागज्ञान । नृत्यभेद तालज्ञान । अर्थभेद तत्त्वज्ञान । विवंचना॥१०॥ तत्त्वांमध्यें मुख्य तत्त्व । तें जाणावें शुद्ध तत्त्व । अर्धमात्रा सह तत्त्व । मूळमाया

---

१ व्यक्त होतें. २ वर्णसमुच्चयानें. ३ साडेतीन मात्रांचा ॐ हा शब्द.

॥ ११ ॥ नाना तत्त्व लहान थोर । मिळोनि अष्टहि शरीर । अष्टधा प्रकृतीचें नीर । निघोनि जात ॥ १२ ॥ वारें नसतां जैसें गगन । तैसें परब्रह्म सघन । अष्ट देहांचें निरसन । करूनि पाहावें ॥ १३ ॥ ब्रह्मांडपिंड उभार । पिंडब्रह्मांडसंहार । दोहीं वेगळें साचार । विमल ब्रह्म ॥१४॥ पदार्थ जड आत्मा चंचल । विमल ब्रह्म तें निश्चळ । विवरोनि विवरे तत्काळ तद्रूप होय ॥१५॥ पदार्थ मनें काया वाचा । मी हा अवघाचि देवाचा । जड आत्मनिवेदनाचा विचार ऐसा ॥१६॥ चंचळ कर्ता तो जगदीश । प्राणिमात्र त्याचा अंश । त्याचा तोचि आपणास । ठाव नाहीं ॥ १७ ॥ चंचल आत्मनिवेदन । याचें सांगितलें लक्षण । कर्ता देव तो आपण । कोठेंचि नाहीं ॥ १८ ॥ चंचळ चळे स्वप्राकार । निश्चळ देव निराकार । आत्मनिवेदनाचा प्रकार । जाणिजे ऐसा ॥१९॥ ठावाचि नाहीं चंचळाचा । आधीं आपण कैंचा । निश्चळ आत्मनिवेदनाचा । विवेक ऐसा ॥ २० ॥ तिहीं प्रकारें आत्मनिवेदन । जेथें नाहीं दुजेपण । आपण नसतां मीपण । नाहीं कोठें ॥२१॥ पाहतां पाहतां अनुमानलें । कळतां कळतां कळूं आलें । पाहतां अवघेंचि निवांत जाहलें । बोलणें आतां ॥२२॥ इति श्रीरामीं रामदास ह्मणे । सांगितलें आत्मनिवेदन । तेणें जाहलें समाधान । श्रोतयांचें ॥ २३ ॥ इति अष्टमः समासः समाप्तः ॥ ८ ॥

---

## समास.९

श्रीगणेशाय नमः ॥ वंदीन सद्गुरूचीं पाउलें । मज आपणाऐसें केलें । उदार नाम दीधलें । रामदास ऐसें ॥ १ ॥ रामदास ऐसें नांव । तरी मज कैंचा ठाव । मीपणाचा अभाव । सहजचि जाहला ॥ २ ॥ आतां कर्ता अकर्ता रामदास । इच्छा उद्भवली तयास । नांव दिधलें ग्रंथास । आपण नामरूपा वेगळा ॥ ३ ॥ ॐनमो जी रघुनायका । तुमची स्तुति करितां वाटे शंका । श्रुति शिणल्या मज रंका । पाड काय तेथें ॥ ४ ॥ स्तुति करूं धावे हर्षे मोक्या । जैशीं लेंकुरें मांडिती गारगोट्या । परी देवपण नये त्यांच्या वाटा । खेळ खेळती अज्ञान ॥ ५ ॥ कां लेंकुरें ह्मणती आमुच्या घरीं । सूर्य सांठविला रे दारीं । डोकावूनियां घटाभीतरीं । ह्मणती आहे रे आहे ॥ ६ ॥ कां पिसाटू ह्मणे सांगे गोष्टी । धांवोनियां धरी आकाश मुष्टीं । सुदृढ [१]गिंवसोनियां कंठीं । ह्मणे हिंग रे हिंग ॥७॥ तैसा मी एक पिसाट । उगाचि करितों वटवट । स्वरूप सांगणें हे खटपट । व्यर्थचि जाय॥८॥ जैसा द्रोणागिरीचे पाठारीं । औषधी आणितां रुद्रावतारी । हात पसरूनि पाहे भीतरीं । कांहींच नाहीं ॥९॥ तैसा आत्मा जपोनि सांगणें । सांगतां जाणिवेसी आणि उणें । बोलणें आणि बुरकावणें । हें तयासी चालेना ॥ १० ॥ जरी आंधाराचा गड पडे । आकाश जाऊं नेदी आडे । तरी स्वसुख सांगणें घडे । ज्ञातेपणेंकरूनी॥११॥ तेथें उपमा मात्र चालेना । तर्क भुलीं पडे उमजेना । समजलें तरी सांगवेना । पार तया स्वरूपाचा॥१२॥ ह्मणाल इतुकें तरी मी बोलिलों । तरी माझा अन्याय जाहला मी चुकलों । परी यथार्थ जाण मुकलों । जाणिवेपासूनि ॥ १३ ॥ मी जें बोलतों कांहीं । तें माझें प्र-

---

१ आलिंगन देऊन.

माण नाहीं । मज सकळ लोक कोणीही । न मानिती ज्ञातृत्वें ॥ १४ ॥ ह्मणोनियां मी ब्रह्मपिसा । बडबड करितों भलतैसा । मज बरें ह्मणेल तो पिसा । माणुसकी त्यासि नाहीं ॥ १५ ॥ माझे पोटीं होती हांव । जें जाणोनि घ्यावें वस्तूचें नांव । तंव विचारितां शुद्ध उपाव । खुंटोनि गेला ॥ १६ ॥ ह्मणोनि हें मज बोलवेना । न बोलतां सुख वाटेना । स्वानुभवोद्गार आवरेना । यासी काय करूं ॥ १७ ॥ मी मी बोलणें हाचि अभिमान । सदा सर्वदा मीपणीं मग्न । तें मीपण असतां संलग्न । सर्वेहि बाधी ॥१८॥ तंव शिष्यें विनविलें । ह्मणे स्वामी हें न वचे टाकिलें । हें ऐकतां मानस कमलें । आशंकेचें बिऱ्हाड ॥ १९ ॥ टाकावेंसें माझिये मनीं । हें ढळेना अवलोनि । तरी यासी करावें काय लागूनी । सांगिजे जी स्वामी ॥२०॥ ऐक गा ये शिष्यराया । सावध होयी प्राणसखया । तुझा सर्व संदेह विलया । दवडूं आतां ॥ २१ ॥ अरे तूं भावार्थाचा मेरु । प्रेमळ शांतीचा सागरु । यथार्थ सर्वस्व उदारु । जळधरासारिखा ॥ २२ ॥ तरी मी मागतों तें मज द्यावें । कृपणपणें निष्ठुर न व्हावें । चित्त देऊनि ऐकावें । मी काय मागतों ॥२३॥ मागणें इतकेंच आतां । श्रवणीं बैसों नको दुश्चिता । समय ढळोनि गेला तो मागुता । येणार नाहीं ॥ २४ ॥ आतां सांगतों एक करीं । श्रवण होतां मन हें आवरीं । वणवण करीत दारोदारीं । हिंडूं देऊं नको ॥ २५ ॥ श्रवणाविषयीं आळस नसावा । बहु बोलणियाचा वीट न मानावा । यावां क्रोधाचा आवरावा । विवेकबळें करूनी ॥२६॥ मी जें सांगत कांहीं । येथें कुतर्क घेतां बरें नाहीं । आल्हाटा विचारूनि पाही । ज्या दुःखदायका ॥२७॥ ह्मणसी कुतर्क काय येतो । तरी ऐक तेंहि सांगतों । आणीक एक मागतों । शांतीसी अंतरूं नको ॥ २८ ॥ शांति ह्मणों नये सुलभ । अरे हे ब्रह्मादिकांसी दुर्लभ । शांतीसारिखा लाभ । आणीक कांहींच नाहीं ॥ २९ ॥ शांती आड विघ्न आहेती । ते मी सांगतों तुज प्रति । शांति केलिया आंगावरी येती । लहान थोर जन ॥ ३० ॥ तितकेंहि जरी साहिलें । तरी ह्मणती मोठे वायां गेले । बोलतां बोलतां हिंपुटी जाहले । यासी लाजचि नाहीं ॥ ३१ ॥ तितुकेंहि शांति केली । तरी ह्मणती कानेकोंडा घोणघाली । ते समर्थी यत्नें केली । पाहिजे शांति ॥ ३२ ॥ आतां कुतर्काचें लक्षण । तें तूं जाण आधार घेणें । सकळ ईश्वर जाणून । मन हें आवरावें ॥३३॥ सकळ इंद्रियांचा चाळक । तो हा ईश्वर एक । मी काय बापुडा रंक । मन आवरूं जाणें ॥ ३४ ॥ ऐसा ग्रंथाचा आधार घेसी । आणि मना आलें तेंचि करिसी । तरी पुन्हां मागुता दुःख भोगिसी । मी काय करूं ॥३५॥ ईश्वर इंद्रियसुख देता । आणि तोचि एक परमव्यथा । इतुकेंहि करून अकर्ता । अलिप्तपणें ॥ ३६ ॥ कां ईश्वर चोरी करवितो । आणि मागुता तोचि सुळीं देववितो । परी जो दुःखें आक्रंदतो । तो ईश्वर ह्मणूं नये ॥३७॥ तें दुःख प्राणियांतें । अगत्य भोगणें लागतें । मग दुःखें दुखावतें । बापुडें अविवेकी ॥३८॥ ईश्वरेंचि केलें सुख । आणि तेणेंचि निर्मिलें दुःख । परी दुःख होतां शोक । करी तो ईश्वर नव्हे ॥ ३९ ॥ तरी सावध कासया करावें । यमपुरींच सुख ह्मणावें । जाऊनि रौरवीं पचावें । ईश्वर कर्ता ह्मणोनी ॥४०॥ आतां असो हें बोलणें । लालुची करूनि आधार घेणें । तें आपुलेंच मन काय नेणे । परी डोळेझांकी करावी ॥४१॥ ऐसा कुतर्क आधार । तूं घेसील हो साचार । आळकेपणाचा विचार । करूं नको सर्वथा ॥ ४२ ॥ श्रवणाविषयीं सादर असावें । अभिमानत्रिपुटीवेगळें व्हावें । सत्पुरुषासी शरण जावें । भावा-

---

१ ज्ञानी. २ वेग. ३ लाजिरवाणा. ४ प्रेमाचा.

थेबळें करूनी ॥ ४३ ॥ ह्मणसी अभिमानत्रिपुटी कैसी । तरी ऐक सांगतों तुज ऐसी । सकळ सृष्टीमध्यें आपणासी । तुळे ऐसा ज्ञानी नाहीं ॥ ४४ ॥ मी एक ज्ञाता मोठा । ऐसा अभिमान खोटा । संतांसी पुसतां अंतरीं तोटा । येईल माझे ज्ञानासी ॥ ४५ ॥ मजपासीं काय उणें । म्यां आणि दुसऱ्यासी पुसणें । संतमंडळींत लाजिरवाणें । नव्हे मज ॥ ४६ ॥ कां हो आमचे वोळीचें ज्ञान । वरकड सकळहि अज्ञान । ऐसें बोलतां समाधान । सहसा नव्हे तुज ॥ ४७ ॥ थोर वोळी ते आमुची । बहुत लांब पाहतां मुळींची । वरकड आंखुड वोळीची । अवतारी जाहली ॥ ४८ ॥ कां आमुचे वोळीचे समुदाव । बहुत आहे वैभव । बहुसाल आणि विश्व । कीर्ति जाणे आमुची ॥४९॥ ह्मणों भरिसी ऐशिये भरीं । भरतां समाधानाची बोहरी । होऊनि जाईल क्षणाभीतरीं । अभिमान जडेल आंगीं ॥ ५० ॥ अभिमानास्तव जन्म घेणें । लागतो पुनरावृत्ति भोगणें । तयांसी आणि थारा देणें । हें केवळ मूर्खपण ॥ ५१ ॥ वोळी विचारितां ठावचि नाहीं । ज्ञान विचारितां नुरेचि कांहीं । देह विचारितां विदेही । होऊनि ठेला ॥ ५२ ॥ आभास तितका नासून जाईल । तेथें वैभवास कोण खाईल । ब्रह्मादिकांसी सृष्टि होईल । नव्हतीच जैसी ॥५३॥ तेथें आह्मी तुह्मी संप्रदाव । हें बोलणचि अवघें वाव । एकपणाचाहि भाव । शांत जाहला तेथें ॥ ५४ ॥ राम आणि रामदास । भजन भाव आणि विश्वास । ज्ञान वैराग्य आणि उदास । इतुकेंहि संपलें तेथें ॥ ५५ ॥ शब्दीं तेथें ह्मणों जातां । वोस येथें विचारितां । ह्मणोनि स्वरूप बोलतां । शंका वाटे ॥ ५६ ॥ शंका तितुकी निःशंका जाहली । सत्याचि पाहतां अनुभवा आली । ह्मणोनी इतुकी बडबड केली । वाचाळपण करूनियां ॥५७॥ वाचाळ ह्मणों तरी वाचा नाहीं । नाहीं ह्मणों तरी उपजे कांहीं । नाहीं कांहीं हें सर्वही । आत्माराम॥५८॥ आतां पाहें रामराणा । ना रे बा हें मज कळेना । मज कोणी जरी लेखीना । तरी जनाची चाड नाहीं ॥५९॥ इति श्रीरामीं रामदास । विनवी आपण आपणियास । पुढें होऊनि सावकाश । श्रवणीं सादर असावें ॥ ६० ॥ इति नवमः समासः समाप्तः ॥ ९ ॥

---

## समास १०

श्रीगणेशाय नमः ॥ रामदास येणें नामें । ग्रंथ केला आत्मारामें । श्रवण जालिया नेमें।धोकामात्र तुटती॥१॥ऐक गा शिरोमणी । जेणें बैसावें निरूपणीं । तेणें बाष्कळ चावटीची काहणी । सांडिली पाहिजे॥२॥ अरे हें गर्भवास परम खोटें । ऐकोनि जयाशी दुःख वाटे । तेणें श्रवणीं विषयवटवटे । वेगळें व्हावें॥३॥ जे जे आशंका उद्भवली । ते ते पाहिजे पुसिली । शब्दार्थी वृत्ति भोंविली । पाहिजे धनावरी कृपण जैसें ॥ ४ ॥ मान अथवा अपमान । श्रवणीं बैसावें सावधान । एकाग्र याचा अभिमान । फुंजों नये ॥ ५ ॥ अरे श्रवणीं अभिमान केला। आणि उच्छेदिलें वक्तेपणाला । तेणें अगत्यरूप घाला । पडे स्वहितावरी ॥ ६ ॥ वक्ता बोलिला अप्रमाण भलतें । ऐकतांचि तत्काळ जाणावें तें । प्रगट करूनि वक्ते । शरण जाऊन पुसावें ॥७॥ पुसतांहि अव्यक्त बोलिला । तरी तो बुद्धिमंद न पुसावें तयाला । सत्वगुणी वक्ता अ-

---

१ राखरांगोळी.

सिला । तरी लीनतेनें पुसावें ॥८॥ लीनतेसारिखें रत्न । उद्दंड केल्या जरी प्रयत्न । तरी न जोडे यत्न । केला पाहिजे ॥ ९ ॥ लीनता अखंड जयापाशीं । तेथें ठाव नाहीं क्रोधाशी । लीनतेनें अभिमानाशी । देशधडी केलें ॥ १० ॥ अतिलीनता जिहीं धरिली । त्यांची देहबुद्धि[१] गेली । दिवसेंदिवस गृहासि आली । न पाचारितां शांति ॥ ११ ॥ लीनता महत्त्वाचा थारा । लीनता पाषांडाचा मातेरा । करूनि टाकी एकसरा । नव्हतेंचि जैसें ॥१२॥ कलह अत्यंत मांडिला । ऐसें जाणविलें लीनतेला । तेणें जरी प्राणी सांभाळिला । तरी कलह कैंचा तेथें ॥१३॥ लीनता अंगीं धरावी । देहबुद्धि जीवेंचि मारावी । मग ये शांतीची करावी । न लगे चिंता॥१४॥ पद प्रास आणि व्युत्पत्ति । क्षराक्षरज्ञातीची संपत्ति । यदर्थीं वृत्ति फांकती । त्या फांकों नेदाव्या ॥१५॥ व्युत्पत्ति असलिया तरी आपणाशी काय । आपण धरावी अर्थांची सोय । अर्थ टाकूनि येर न्याय । करूं नये सर्वथा॥१६॥ लाधल्या त्वचाचि खावी । किंवा वस्तूचि टाकूनि यावी । कीं तयाची शोधावी । अंतरकळा ॥१७॥ तरी बाह्यत्वचा ते व्युत्पत्ति । मग दे शब्दज्ञानस्फूर्ति । आणि बीजांतरीं अहंमति । तितुकीहि त्यजावी ॥१८॥ ज्ञानरसायन सेविलें । जाणिवेनें बोलतां वमन केलें । हें इतुकें जरी चुकलें । तरीच बाणे तेज आंगीं॥ १९ ॥ तुवां पूर्वींचे समासीं प्रश्न केला । त्याचें स्मरण आहे मजला । तरी तो आतां तुजला । सांगेन सावध होई ॥२०॥ परी जें तुज मागीतलें । त्याचें उत्तर नाहीं आलें । तरी तुज मागतां कैसें वाटलें । तें यथार्थचि सांग आतां ॥२१॥ देववेल कीं देववेना । किंवा लाजूच वाटते मना । ऐसें यथार्थ सांगवेना । त्याशी बापाची आण॥२२॥ जरी तूं भिडेनें दाटसी । आणि तोंडा प्रचीती हो ह्मणशी । तरी उभय अर्थी नाडसी । मग माझेंहि कांहीं चालेना ॥२३॥ इतुका आग्रह याचि कारणें । जें तूं वैराग्यें उणें । आणि तुज मुक्त करणें । हे प्रतिज्ञा आपली ॥२४॥ एथें श्रोते आशंका घेती । बद्धताचि नाहीं कैंची मुक्ती । ऐसें जरी आक्षेपिती । तरी ऐक सांगतों ॥ २५ ॥ अज्ञान बापुडें काई । त्याची वार्ता एथें नाहीं । परी जे शब्दज्ञानें विदेही । त्यांची देहबुद्धि निंद्य॥ २६ ॥ विदेही ह्मणिजे देहातीत । तैसाचि तो जीवन्मुक्त । देहाशीं युक्त आणि अयुक्त । द्वंद्वीं सहिष्णुता जयाशी।।२७॥आपणाशी विदेही ह्मणावें।ह्मणोनि दान्ति[२] करूनि सोसावें । ऐसे नव्हती ते स्वाभावें ।गुण त्यांचे ॥२८॥ आतां दान्ति ही होणार नाहीं । मा शांति कैंची असेल देहीं । ऐसें ऐकोनि तुवां ही । तैसेंचि न व्हावें ॥२९॥ शब्दीं देहातीत ह्मणावें । आणि अपमान होतां चिणचिणावें । प्रतिष्ठेकारणें झुरावें । दुराशा धरूनी ॥३०॥ जो या देहाचा पांगिला । आणि देहबुद्धि आंखिला । तो बापुडा च्यवला । समाधानापासूनी॥३१॥ वेदशास्त्र सकळहि पाहिलें । मन वैभवीं मग्न झालें । शब्दज्ञान पारंगत आलें । करतळामैळकवत्[३] ॥ ३२ ॥ प्रपंच लटिका ह्मणावा । आणि हव्यास वाटे देखोनि वैभवा । ह्मणावें हा प्रारब्ध ठेवा।आशांशी सोडीना॥३३॥ नाना कुशलतेचीं वचनें।सांगोनि लुलु प्रतिपादणें । जयावरी घातलें घालणें। वैभवें पुढें ॥ ३४ ॥ पंडित आणि ब्रह्मज्ञानी । विभव आणि सकळ मानी।थोर थोर शिष्य जनीं । तेहि वैभवाचे ॥ ३५ ॥ ऐसे वैभवें भुलले । आणि आधार घेऊं लागले । तयांप्रति कांहीं न चाले । ब्रह्मादिकांचेंही ॥ ३६ ॥ जैसा मैंदांचा मेळा । ब्रह्मवर्चस्वाची कळा । अंतरीं पैशाचा जिव्हाळा । उदर भरायालागीं ॥३७॥ परी आपुलें नेणतीच अधःपतन । देहलोभें नागविले

१ हद्दपार. २ इंद्रियदमन. ३ हातावरच्या आंवळयाप्रमाणें.

पूर्ण । दुष्कर्म अतिकठिण । त्यांचें त्यांशीच न कळे ॥३८॥ ब्रह्मादिकांचें न चले जेथें । सज्जनीं काय करावें तेथें । आपआपणा जाले हंते । त्यांशी कोणीं पां निवारावें ॥ ३९ ॥ काव्यकुशल तेचि केले । आणि मन वैभवीं गुंतलें । तयांशी प्रत्यक्ष चाळाविलें । ज्ञान देऊनि ईश्वरें ॥ ४० ॥ जंववरी विषयासक्त मन । तंववरी रामानुसंधान । न घडे सर्वथा जाण । ह्मणोनि ईश्वर वंचिला ॥४१॥ जैसें षड्रस अन्न पचविलें । आणि क्षुधिताशी जेऊं घातलें । आपण शब्दींच भोजन केलें । तेणें काय तृप्ति घडे ॥ ४२ ॥ कां पिंडते अंधार पडला । शब्दीं दीपामागें दीप आणिला । परी किंचित् तत्त्वीं जाला । उजेड तेणें ॥ ४३ ॥ तैसे शब्दज्ञाते लटिके धाले । परी मूर्ख नेणतीच चुकले । आधार घेऊं लागले । ह्मणोनियां ॥ ४४ ॥ आधार घेतां बरें वाटे । परी अंतीं दुःखें जाण फुटे । धोका येऊनि आपटे । क्रिया केली तयेची ॥ ४५ ॥ मग धोका आवरेना । परती केली तरी होईना । तेव्हां कांहींच चालेना । प्राणी भांबावों लागे ॥ ४६ ॥ ते काळीं पस्तावा घडे । आपुलेंचि मन फिरूनि पडे । समाधान समूळ उडे । नव्हतेंचि जैसें ॥ ४७ ॥ या कारणें महानुभावीं । पूर्वींच लालूच न करावी । विवेकबळें तोडावी । आधारबेडी ॥४८॥ श्रोतीं सावध ऐकावें । मजला अभिमानी ह्मणावें । परी आपुलें करूनि घ्यावें । समाधान तुह्मीं ॥ ४९ ॥ राज्यपदवी टाकिली । आणि भिकेची लालूच केली । तेणें राज्यपदवी गेली । झोळी धरितांचि करीं ॥ ५० ॥ जेणें राज्य सांडोनि झोळी घ्यावी । तेणें घरोघरीं फेरी घालावी । तैसें स्वसुख सोडोनि धरावी । लालूच विषयीं ॥ ५१ ॥ जैसा शब्दवृत्तीचा राजा ह्मणती सकळ वाचा । विचार पाहतां तयाचा । तों भिक्षेशीच संबंध ॥५२॥ कां कुबेर नांव ठेविलें । बापुडें मोळया वाहतचि मेलें । विचारितां तें नागवलें । व्यर्थचि पाहीं ॥ ५३ ॥ कां लक्ष्मीच्या नांवाचा सोहळा । मायबापांशीं लाभावा कळवळा । भीक मागती वेळोवेळां । ते अवकळा नव्हे ॥५४॥ तैसें विदेही ह्मणावें । आणि वैभवाकारणें हळहळावें । राजहंसें शेण खावें । हे विटंबना ॥ ५५ ॥ अमर ह्मणवी त्याशी मरणें । सकळ कळा ओनामा नेणे । बत्तीस लक्षणें लाजीरवाणें । नाकेंविण नव्हे ॥ ५६ ॥ आचार्य नांव जयाशी । आचमन करितां नये त्याशी । सुंदर ह्मणावें तयासी । अले कपाळीं कुष्ठतो ॥५७॥ ईश्वर अभिमानाचा गौरव । ज्ञान विचारितां शून्य स्वयमेव । तैसा विदेही ह्मणावा त्याशी हांव । दृढ देहबुद्धीची ॥ ५८ ॥ व्याघनामाचा आळ आला । आणि तो पालीनेंचि भक्षिला । तैसा विदेही ह्मणवी तयाला । देहबुद्धीनें मारिलें ॥५९॥ तैसें परी मुक्त आणि बद्ध । हें बोलणेंचि अबद्ध । परी जे कोणी स्वयें सिद्ध । तयांशी साजे ॥६०॥ साजे परी बोलों नेणती । बोलणें याची कोणी एक व्युत्पती । आहे नाहीं ह्मणावें काय चित्तीं । समजू नये ॥६१॥ आतां असो हें बोलणें । आहे आशंका सांगणें । यदर्थीं तुवां चित्त देणें । शिष्यराया ॥६२॥ इति श्रीरामीं रामदास ह्मणे । पुढें सावध होऊनि परिसणें । अर्थ जीवीं घेतलिया होणें । संदेहा वेगळें ॥६३ ॥ इति दशमः समासः समाप्तः ॥

---

## समास ११.

श्रीगणेशाय नमः ॥ जैसा दशावतारीं माधवी । एक सांगतां एकचि भावी । आणि उफराटें वेढा लावी । मुख्य नायकासी ॥ १ ॥ तैसें तुवां न करावें । मी बोलतों कवण्या भावें । ते

---

१ कोड. २ कोळयाच्या एका जातीचें नांव.

विषयीं मन घालावें । आधार सोडूनी ॥ २ ॥ मी बोलतों परी शंका वाटे । कां जें तुज आधार न तुटे । आधार घेतां सुख वाटे । परी तो दुःखदायक ॥३॥ वैद्यें औषध दिधलें । आणि पथ्यहि सांगितलें । पथ्या सोडूनि कुपथ्य केलें । तरी काय बोल वैद्यासी ॥ ४ ॥ कुलाकुड वांया गेलें । भ्रकमाराया पथ्य मोडिलें । तें औषध मारक झालें । कुपथ्य करितां ॥५॥ तैसे भवरोगी बहुत खंगले । त्यांसी सज्जन वैद्यें आपंगिलें । ज्ञानरसायन दिधलें । जेणें तत्काळ पालटे ॥ ६ ॥ अरे पथ्य चालवावें । विधियुक्त चुकों नेदावें । लालुचेनें कुपथ्य न घ्यावें । आधारबळें भलतेंची ॥ ७ ॥ जरी जीवें धांविन्नला । तरी पाहिजे आवरिला । ऐसें करिसी तुजला । अमरचि करीन ॥ ८ ॥ ऐसें वैद्यें सांगीतलें । चित्त देऊनि ऐकिलें । बरें बरें ह्मणोनि दीधलें । आश्वासन ॥ ९ ॥ वैद्य जवळूनि गेला । आणि जीव कुपथ्या धांविन्नला । आवरी असतांहि झाला । आधार एक ॥ १० ॥ माय धांवूनि कळवळा करी । ह्मणे जीवें धांविन्नला जयावरी । तें जरी खादलें तरी । दुरी होईल व्यथा ॥ ११ ॥ विषयी ह्मणती बरें बरें । तेव्हांचि नाडिलें आधारें । वैद्य सांगूनि गेला तो खरें । न मानितीच कोणी ॥ १२ ॥ तयासि मंदबुद्धीस्तव । वैद्याचा उपजला अभाव । देखोनि कुपथ्याचें वैभव । तेथें निमग्न झाले ॥ १३ ॥ तेणें भवव्यथा जडावली । उफराटी सुजी धांविन्नली । सकळ ह्मणती कां केली । क्रिया ऐसी ॥ १४ ॥ आंग अवघें सुजोन फुटलें । दुर्गंधीनें गळों लागलें । ते समयीं जाणवलें । तो आधार खोटा ॥ १५ ॥ नाना विकल्पाचे किडे । चुळबूळ करिती मागें पुढें । मग भोंवतें पाहे पुढें । केवीलवाणें ॥१६॥ हात ठणठण फुटती । सर्वांगीं तिडका उठती । स्वजन देखोनि पळती । दुर्गंधि घेववेना ॥ १७ ॥ प्राणी कष्टला थोर । हा कुपथ्याचा विचार । काळजीं बैसले बाहेर । धोके आदळती ॥ १८ ॥ तुज सांगतों या कारणें । आधार तुवां न घेणें । पुनः पुनः हेंचि बोलणें । तुजनिमित्त घडलें ॥ १९ ॥ ये कलियुगीं आत्मबोध । तयाचा मांडलासि विनोद । चवढ झाली उदंड खेद । वर्णसंकर आरंभिला ॥ २० ॥ सत्वगुण निःशेष बुडाला । आणि अभिमान प्रकट झाला । शांति क्षमा सद्वृत्ती यांला । कोणीच आपंगीना॥२१॥ दुकाळ पडला भावार्थाचा । विश्वास दृढ कैंचा । विवेक आणि वैराग्याचा । फड मोडोनि गेला ॥ २२ ॥ स्वधर्माचा लोप जाला । अधर्मीं जन प्रवर्तला । स्वइच्छा गोंधळ घातला । कळीनें सावकाश ॥ २३ ॥ सत्य सांगतां अविश्वास । असत्याचा वाटे विश्वास । जैसे राजहंस सांडोनि वायस । आचारशीळ ह्मणती ॥ २४ ॥ भक्ति अवघी बुडाली । आणि अभक्ति ठाकिली । आणि ती येतां निघोनि गेली । नीतिमर्यादा ॥ २५ ॥ निराशेचा अवगमै[३] झाला । आशापाशीं प्राणी गुंतला । विषय न वचे टाकिला । आळकेपणें करूनी ॥ २६ ॥ शब्दज्ञान उदंड झालें । कवित्व घरोघरीं केलें । समाधान निःशेष गेलें । हरपोनियां॥२७॥हरिदाससाहित्य वोढविलें । हरिदास्य सांडोनि कळावंत जाले । देव सांडोनि फिरों लागले । मनुष्याभोंवते ॥ २८ ॥ ज्ञानियासि जाली वादशक्ति । राहिली सप्रेम भक्ति । भक्तिच नाहीं मा मुक्ति । कैंची असेल तेथें ॥ २९ ॥ करूनि नाना उपाव । केला संस्कृतीं रिघाव । तेथें जडला अहंभाव । जाणिवेचा ॥ ३० ॥ भक्त भाविक तितुके निमाले । सत्वाचे सज्जन विश्रांती पावले । ईश्वरेंहि डोळे झांकिले । बौद्ध होऊनि बैसला ॥ ३१ ॥ स्त्रिया भतारासि सदा । सेवा न करिती पेटती द्वंद्वा । पुत्रीं टाकिली मर्यादा । माय-

१ वासना उत्पन्न झाली. २ म्लान वदन करून. ३ नाश.

बापांची ॥ ३२ ॥ अरे जीं मनुष्यें लोपलीं । आणि कातरें तितुकीं उरलीं । समस्या होती ते, निघोनि गेली । नव्हतीच जैसी ॥ ३३ ॥ ऐसें अवघेंचि पालटलें । पूर्वं वर्तमान तितुकें राहिलें । पुढें याहूनि होईल जालें । नाहींच अद्यापि॥३४॥ इतुकें सांगणें याचि कामा । जे तुवां उल्लंघावी आधारसीमा । आणि आपुलिया निजधामा।मार्गस्थ व्हावें॥३५॥ आहे विष आणि अमृत आहे शीतळ आणि संतप्त । आहे मोक्ष आणि बद्धत्व । अज्ञान जें ॥ ३६ ॥ आहे मूर्खत्व आणि विवेक । आहे स्वर्ग आणि नरक । राजपदवी आणि रंक । उंच नीच जे ॥३७॥ आहे पाषाण आणि पेठे । आहेत मनुष्य आणि रानटें । श्वापदें जीं अतिउद्धटें । जीं भक्षिती तत्काळ ॥ ३८ ॥ आहे वाट आणि अव्हाट । आहे वैराग्य आणि विषयचट । आहे समाधान आणि खटपट । पाषांडमत जें ॥३९॥ आहे महातीव्र जाळ।आहे चंदन सुशीतळ । आहे पवित्र आणि अमंगळ । अनाचार जो॥४०॥ आहेति सुपती आणि सराटे । रंभाफळें आणि कांटे । आहे वज्र आणि तुटे । शस्त्रें आंग जेणें ॥ ४१ ॥ असो ऐसें उदंड आहे । एक साहे एक न साहे । हें तूं विचारूनि पाहे । शिष्यराया ॥ ४२ ॥ क्षीरा नीरा वाड करी । राजहंस जीवन अव्हेरी । चंचुवा दुग्धाचि भरी । चातुर्यनिधि जो ॥ ४३ ॥ कां परीक्षावेंलें परीक्षावें । खरें घेऊनि खोटें टाकावें । कां कवंठ त्यजूनि खावें । नारिकेळ जैसें ॥४४॥ कां इक्षुदंड भक्षावा । रस तितुका शोधूनि घ्यावा । बाकस टाकूनि द्यावा । अप्रयोजनी जो ॥ ४५ ॥ कावाडा होती सिद्ध होते । तयाची त्वचा काढितां भाते । लोभें कां तया पावकातें । सेवूं नये सर्वथा ॥ ४६ ॥ पावकेंविण कार्य चालेना । भग्न होतां देह वांचेना । पतंगासी जैसें पतना । दीपा संघटणी होतां ॥४७॥ ऐसें हें किती सांगावें । परी घेवत्रे तेंचि घ्यावें । हें काय आपुल्या जीवें । जाणिजेत नाहीं ॥ ४८ ॥ येथ मोठा आधार प्रारब्धाचा । हाचि थारा प्राणिमात्राचा । धरूनियां प्रयत्नाचा । आळस केला ॥ ४९ ॥ प्रपंचीं प्रयत्न करावा । आणि परमार्थीं आधार घ्यावा । तरमूळपणें प्रयत्न न करावा । हें काय बरें ॥ ५० ॥ प्रारब्धें घडला उत्तम भोग । प्रारब्धेंचि जडला रोग । रोग जडलिया औषधप्रयोग । करणें नलगे ॥ ५१ ॥ व्यथेसी देखोनि कुसमुस वाटे-प्रयत्नाकारणें प्राण फुटे । तेव्हां जरी प्रयत्न करणें सुटे । तरी आधार घ्यावा ॥ ५२ ॥ कां परचक्र आलें गाढें । सकल राष्ट्राचें जालें गुढें । तेव्हां लागवेग नेतां पुढें । कां पां जावें ॥५३॥ कां गृहासी आग लागली । देखोनि कां बोंब केली । लोकांची मांदी मेळविली । आगी विझवाया कारणें ॥ ५४ ॥ तैसी परमार्थीं बोंब मारावी । कांहीं काढाकाढी करावी । हळू हळू सोडवावी । मिठी प्रपंचाची ॥ ५५ ॥ प्रपंच धडका पेटला । मध्यें परमार्थ जळूनि गेला । ऐसें देखोनि तुह्मांला । कैसें बरें वाटतें ॥ ५६ ॥ मुक्ताफळ आणि दिव्यांबर । नाना वस्तूंचें भांडार । भस्म करूनि वैश्वानर । विझोनि जाई जेवीं ॥ ५७ ॥ तैसा प्रपंच हा परमार्थासी।जाळोनि भोगूं नेदी आपणासी । आयुष्य गेलिया प्राणियासी । विमुख होय ॥५८॥जरी हा प्रपंच शाश्वत जाणतों । तरी आह्मी यासीच धरितों । हा अशाश्वत ह्मणोनि रडतों । तुह्मां भोंवतीं ॥ ५९ ॥ तुह्मी केलें रे परमार्थी । परघात आणि आपस्वार्थी । डोळे झांकूनि दोहीं अर्थीं । नागवलेत कीं रे ॥ ६० ॥ परमार्थाचा आळ आला । प्रपंच गळां पडला । वोस कोट झाला । जनक विदेही ॥ ६१ ॥ क्रिया असो भलतैसी । आड करिती तयासी । क्रिया नसतां मान-

---

१ पूर्ण कळत असूनहि.

सीं । शंका धरा ॥ ६२ ॥ विदेहाचा आधार घ्यावा । आणि देह आपुला मानावा । स्तुति बरी वाटे जीवा । देहाची होतां ॥ ६३ ॥ स्तुति होतां आनंदला । तो निंदा होतां रडला । या दोहींमध्यें न सांपडला । तोचि धन्य॥६४॥प्रपंच अवघा करावा । परी क्रोध तरी आवरावा । क्रोधाचा नावरे यावा । तरी मी काय सांगों ॥ ६५ ॥ माझ्या देहासी मान व्हावा । मज अवघींच नमस्कार करावा । नमस्कार न करितां यावा । क्रोधाचा आवरेना ॥६६॥ कासया सांगतां परमार्थगोष्टी । व्यर्थ करितां कपाळकुटी । वृन्दावनफळासारखें पोटीं । कालकूट भरलें असे ॥६७॥ पूर्वी संतसमुदाय होता । त्याची क्रियाहि ऐकतां । परी कांहीं तरी वर्ततां । तयासारिखे तुह्मी ॥ ६८ ॥ अरे बा परमार्थघालमेली । बरें वाटे जरी स्तुति केली । निंदाकरितां हानि आली । आपुले महतीसी ॥ ६९ ॥ येरयेरांची स्तुति करावी । आणि आंगावरी बळेंचि ओढूनि घ्यावी । जैसी विष्ठेसि लावावी । उटी चंदनाची ॥७०॥ देहाची स्तुति करी कीं । तरी तुह्मी देहधारक प्राणी व्हाल कीं । लटकाचि परमार्थ लौकिकीं।महत्त्वाकारण॥७१॥ जरी देह हा निंदिला । तरी काय परमार्थ बुडाला । जवळूनि विवेकाला । देशधडी केलें ॥ ७२॥ तुह्मी शिष्य नव्हे रे परमार्थबुडवण । भुरतां प्रतिष्ठेकारण । शेवटीं प्रतिष्ठा टाकूनि जाण । न घडे नेणवे तुह्मांसी ॥७३॥ आतां कांहीं सार्थक करावें । देहबुद्धीपासोनि सुटावें । देह बुद्धि न जातां स्वभावें । परमार्थी कानकोंडे ॥ ७४ ॥ कठिण ऐकूनि जो चिणचिणिला । तयावरी लंगडा जुलूम झाला । काय करूं मी तयाला । कांहींच न चले ॥७५॥ बोलणें कठीण ऐकिलें । कीं वाईट लागलें । मुखश्रीचें चिन्ह पालटलें । ते देहबुद्धि नव्हे ॥ ७६ ॥ बोलत असो लक्षी अदेखणपणें । तरी हें आत्माराम जाणे । मानवी उत्तरें कठिणें । तितुकेंचि जाणती ॥ ७७ ॥ हित सांगतां दुःख वाटे । तयाचें जाणावें प्रारब्ध खोटें । कांहीं केल्या न सुटे । देहबुद्धि वेडी ॥ ७८ ॥ तूं तरी चौं देहां वेगळा । तरी कां रे स्थूळाचा कळवळा । धांवूनि येतो वेळोवेळां । मैंद माउसी सारिखा ॥७९॥ मागें पदार्थ जाला तो बरा । परी आतां तरी विचार धरा । यदर्थी तटावला तोचि खरा । रामीं रामदास ह्मणे ॥ ८० ॥ डगमगले तिहीं उठूनि जावें । उरले तिहीं सावध ऐकावें । आतां येथुनि लुटावें मोक्षाचें भांडार ॥ ८१ ॥ इति श्रीरामीं रामदास आतां । सांगेल आशंका श्रोतां । एकचित्त होऊनि ऐकतां । सुखदुःखावेगळे ॥ ८२ ॥ इति एकादशः समासः समाप्तः

---

## समास १२.

श्रीगणेशाय नमः ॥ स्वामी बोलले तें बरवें।परी मज एक आठवलें स्वभावें । तें मज आठवतां बोलावें । परी आज्ञा स्वामींची पाहिजे ॥ १ ॥ अरे शिष्या आशंका उद्भवली । ते अगत्य पाहिजे पुसिली । हे आज्ञा आह्मीं दीधली । पहिलीचि तुज ॥२॥ जरी माझी मर्यादा धरिसी । तरी तूं स्वहिता अंतरसी । याकारणें मानसीं । शंका धरूं नको ॥ ३ ॥ आधींच कायसी मर्यादा । सदीस बैसलों संवादा । निरसिलें नाहीं तुझिया भेदा । तोचि मी स्वामी कैसा रे ॥ ४ ॥ तुज समाधान नव्हेल । तुज बरें न वाटेल । कीं जेथें समाधान होईल । तोचि स्वामी

---

१ द्वेष. २ कडु वृंदावन.

तुझा ॥५॥ परमार्थीं विचारितां कांहीं । सर्वथा बळात्कार नाहीं । पाडिलें बळात्कार प्रवाहीं । तरी तो परमार्थ नव्हे ॥६॥ हें बोलणें एतन्निमित्त घडलें । जें तुज शिष्यपण आलें । जेथवां तुज समाधान जालें । तेव्हांचि शिष्य आपुला ॥ ७ ॥ ऐक आम्हुची आज्ञा ऐशी । मर्यादा टाकावी आम्हांसी । काय आठवलें तुझ्या मानसीं । ते आशंका घेई आतां ॥ ८ ॥ स्वामींची आज्ञा प्रमाण । परी माझे ठायीं मूर्खपण । आज्ञाप्रमाण विज्ञापन । करीन चरणांपुढें ॥ ९ ॥ स्वामी मजकारण बोलती । परी येथ संतांचे गुण क्षुद्र दिसती । इतुकीच आशंका होती । ते बोलिलों स्वामी ॥ १० ॥ अरे संतांसी गुण कैंचे । ते निर्गुण ठायींचे । गुणावगुण हे मायेचे । संत निराळे मायेहूनि ॥ ११ ॥ आळ आला संतनामाचा । पार नेणवे त्यांच्या स्वरूपाचा । जेथ खुंटल्या चारी वाचा । तेथ मी रंक कोणीकडे ॥ १२ ॥ स्तवन करी वेदश्रुती ॥ परी न वर्णवे स्वरूपस्थिती । तेथ क्षुद्र मी कैंची दीसती । मज मानवियाचे बोलें ॥ १३ ॥ संत विश्वाचे मायबाप । संतांसी नाहीं पारखे आप । रूप आणि अरूप । यांही वेगळे जे ॥ १४ ॥ संतांसी गर्व नाहीं । संत निंदा न करिती कांहीं । निष्ठुर कधींहि । प्राकृतासारखे नव्हेती ॥ १५ ॥ संत वेदशास्त्रसंपन्न । तयांपुढें बोलतां अज्ञान । श्रवण होतां धरिती मौन । आदरें सादरें ऐकती ॥ १६ ॥ संत दोष आच्छादिती । आपण स्वयें न करिती । मर्यादा उल्लंघितां न येती । देहबुद्धि सर्वथा ॥ १७ ॥ संत शांतीचे सागर । संत सर्वस्वीं उदार । ज्ञानवर्षें ते जलधर । सर्वस्वावरी ॥ १८ ॥ संत अभावाचे काळ । संत वैराग्याचे वडवानळ । संतांसी हा भवमळ । स्वप्नींही लागूं न शके ॥ १९ ॥ अहंकारगज झुल्रती । जंववरी संतसिंहाचे चपेटे न येती । थापा मारूनि विदारिती । गंडस्थळें तयांचीं ॥ २० ॥ स्तुति अथवा निंदा केली । तये मायेसीच लागली । ते ऐकतां देहबुद्धि आली । तरी तो देहधारक प्राणी ॥ २१ ॥ देहमात्र तितुका निंदिला । तेथ स्थूळलोभीं कैंचा वांचला । लंडीच्या युद्धासि गेला । तो मोडतां वेळ नाहीं ॥२२॥ विष्ठा तितुकी दुर्गंध । नृपतीचे विष्ठे सुगंध । ऐसें ऐकतां सुबुद्ध । मानीतना सर्वथा ॥२३॥ वाईट ह्मणतां क्रोधासि यावें । तरी त्याचें रूप तें जाणावें । मग त्यासी काय भिऊनि ह्मणावें । तुह्मी सत्पुरुष ह्मणोनि ॥२४॥ मोठें भय स्थूळासी । तरी स्थूळ कैंचें आह्मांसी । हें जायाचें ह्मणोनि रामासी । अनन्य शरण गेलों ॥ २५ ॥ स्थूळाआंगीं शब्द आदळे । संते त्याहूनि निराळे । त्यांचा अंत मायेसी न कळे । बापुडी लटकीच हे ॥२६॥ आपुलें नव्हे आणि लालुच केली । तरी प्रारब्धें नव्हती पालटली । ऐसेंही जाणोनी स्थूळाशा धरिली । ते पढतमूर्ख जाणावे ॥ २७ ॥ स्थूळाचें पांगिलें नसावें । होईल तैसें कौतुक पहावें । आपण निंदेसि न प्रवर्तावें । आदरें करूनी॥ २८ ॥अरे शिष्या परमार्थ बुडाला । परमार्थवेष प्रपंच जाला । स्थूळ हें निंदितां बहुसालां । विषाद येतो ॥२९॥ विषाद अभिमानाचें मूळ । विषाद अविवेकाचें स्थळ । विषाद येतो तोंचि केवळ । अज्ञान जाणावें ॥ ३० ॥ विषाद आला रावणाला । ह्मणोनि सहपरिवारें निमाला । विषादें तयां कौरवांला । वेड लावूनि मारिलें ॥ ३१ ॥ विषाद प्राणी आवरूं नेणती । विषादेंचि देशधडी होती । विषादें जीवें मारिजेती । परस्परें जिवलग ॥३२॥ विषाद परमार्थ बुडवणा । विषाद आडताळा निरूपणा । विषादें संवादींच्या खुणा । हिरोनि नेल्या ॥ ३३ ॥ शिष्या देह हें लटिकें वाटतें । परी हें बहुत रे वेढा लाविते । आणि अंतीं नासोनि

---

१ स्वत्व. २ स्थूल देहाचा अभिमान. ३ भिंवे.

जातें । रांडिचें अमंगळ ॥ ३४ ॥ तूं जरी विवेकी होसी । तरी देहपांगीहूनि सुटसी । जरी विवेका दुऱ्हावसी । तरी नाटोपे देहपांग ॥ ३५ ॥ जैसा अंकुशेंविण दंती । कां प्रधानाविण भूपति । तैसी विवेकाविण शांती । होणार नाहीं ॥ ३६ ॥ ज्याचा क्रोध अति लाडका । तेथ उरी नाहीं विवेका । जैसें बकवायसउलूकां । मध्यें हंस एकटा ॥ ३७ ॥ तैसें काम क्रोध मद-मत्सर । अभिमान तिरस्कार । ऐसीं अमंगळें मिळतां अपार । विवेकस्थान भ्रष्ट होय ॥३८॥ जेणें हा देह निंदावा । तो आपुला आप्त जाणावा । तो निंदक वानावा । विवेकबळें करूनियां ॥३९॥ आह्मी देहासी निंदितों । आणि आह्मांसि जो साहाय्य होतो । आपणासि जो उपेगा येतो । तो आपुला परमसखा ॥४०॥ विवेक सांगतों तुज मानलें । परी तैसेंचि पाहिजे वर्तलें आपुलिया गुणदोषा जाणीतलें । पाहिजे तुवां ॥ ४१ ॥ गुण देखोनि अंगीकारावे । अवगुण देखोनि आपुले त्यजावे । अध्यात्मग्रंथ श्रवण करावे । आदरें करूनि ॥४२॥ ग्रंथ ऐकतां ऐकतां । निश्चयो पाविजे तत्त्वतां । हेंहि एक साधन आतां । सांगतों तुजलागीं ॥ ४३ ॥ श्रवणीं बैसतां दिवसंदिवस । परमार्थीं उपजे हव्यास । परी श्रवणमनननिदिध्यास । केले तरी हो ॥ ४४ ॥ देखोवेखीं नित्यकर्म । करूनि निरूपण चुकसी वर्म । प्रतिदिनीं आमुचा नियम । जें निरूपण करावें ॥ ४५ ॥ तें वर्म जाण दुणावलें । ईश्वरें ओझें घातलें । कां तें शब्दज्ञान आलें । वाचाळ-पण करावया ॥ ४६ ॥ श्रवण केलिया क्रिया पालटे । दिवसंदिवस देहबुद्धि सुटे । तरीच हें भवमूळ तुटे । अनंतजन्मांतरींचें ॥४७॥ भक्तिज्ञान वैराग्यज्ञान । तोचि ग्रंथ समाधान । शृंगा-रिक ऐकतांचि मन । घालूं नको सर्वथा ॥ ४८ ॥ शृंगारिक ऐकतांचि कांहीं । समाधान होणार नाहीं । हें तूं विचारूनि पाहीं । खरें कीं खोटें ॥ ४९ ॥ शृंगारिक श्रवण करावें । तेथ साधकें काय घ्यावें । सिद्धसमाधानापासूनि च्यवावें । रसवृद्धि लाधलिया ॥ ५० ॥ जन्ममृ-त्यूची यातना । परमदुःख भोगवेना । ह्मणोनि शरण जावें सज्जना । सार्थक करावया ॥५१॥ तेथ शृंगारिक आर्त पोटीं । कां वादविषय कपाळकुटी । जैसी दिव्यांबरास बोरांटी[1] । वरब-डूनि गोवी ॥५२॥ तैसा परमार्थ पोटास आला । उपाय तोचि अपाय झाला । तैसें तया साध-काला । रसवृत्तीनें केलें ॥५३॥ आतां तुझा प्रपंच जे क्षुद्र दिसती । तरी क्षुद्र आभासीं झोंबूनि पडती । आभास निराभास दोहींच्या अंतीं । क्षुद्रासी ठावचि नाहीं ॥५४॥ क्षुद्रा ऐकतां दुश्चि-त मन । तेथें कैंचें समाधान । प्रतिष्ठा वैभव आणि मान । तेथाचे वृत्ति गुंतली ॥ ५५ ॥ सक-ळ सृष्टीची सोसणी । कायसी करावी बैसोनि । परी तितुकें तुजलागूनी । बोलणें घडलें ॥ ५६ ॥ इति श्रीरामीं रामदास । हाका मारितो उदास । विवेकी असती तेंही विशेष । सहसा मानूं नये ॥ ५७ ॥ इति द्वादशः समासः समाप्तः ॥ १२ ॥

---

## समास १३.

श्रीगणेशाय नमः ॥ शिष्या ऐक रे मीपण । पुसिलें तयाची सांगतों खूण । वृत्ति फांकों नेदी तीक्ष्ण । अतिशयेंसी करीं ॥१॥ जेणें मीपणाचें मूळ छेदिलें । तयाशीच स्वसुख लाधलें । मीपणाचें तुटोनि गेलें । अनुसंधान ॥ २ ॥ जैसें रत्न मोलें घ्यावें । आणि बांधोनि उगेंचि

---

१ बोरीचे कांटे.

ठेवावें । परीक्षा न करितां रडावें । लागेल पुढें ॥ ३ ॥ तेंचि रत्न जरी परीक्षिलें । तरी खोटें जाऊनि खरें झालें । खोटें ऐकतांचि टाकिलें । उभाउभीं हातींचें ॥ ४ ॥ कां जैसें आपुलेंचि ठेवणें । पुरिलें असोनि भीक मागणें । उकरायाचा आळस करणें । कोणीं उकरावा ॥५॥ कां धैर्य धरूनि उकरूं जाय । परी अव्हांसव्हाच उकरूनि पाहे । तरी तें कैसें पा या लाहे । भूमि चाळल्या वांचोनी ॥ ६ ॥ कां आळशी जेऊं बैसला । जरी कोणी तोंडांत घांस घातला । तेथ जरी आळस केला । तरी चावावें कोणीं ॥ ७ ॥ त्याशी अन्न असतांचि दुकाळ । उपवासीं मेला असोनि सुकाळ । तैसा तो अविवेकी केवळ । समाधान असोनि नाहीं ॥ ८ ॥ तैसें आळसें नागविलें । नाहीं मीपणाचें मूळ शोधिलें । आहेच दृष्टीनें पाहिलें । झांकाथापा करूनी ॥ ९ ॥ थिल्लरोदकाचे उत्पत्तीचा । कोण जाणे शोध तयाचा । तैसा अंत मीपणाचा । कल्पना असोनि नाहीं ॥ १० ॥ तैसें लटकेंचि मी रे मानिलें । परी त्याचें मूळ नाहीं शोधिलें । परीक्षा न करितांचि धरिलें । मानसीं सुदृढ ॥ ११ ॥ ज्याशी मीपण खोटें वाटलें । तेंही पाहोनि सुख घेतलें । त्याचें बदलूनि दिधलें । मीपण ईश्वरें ॥ १२ ॥ आतां तुह्मीं आह्मी विचार धरूं । मी-पणाची चालना करूं । मीपण तारूं अथवा मारूं । फडफडल्यासारिखा ॥ १३ ॥ पात्रांशी जैसा आकार । आकाश जाहलें तदाकार । उंच नीच लहान थोर । आपणही भासे ॥ १४ ॥ कां पाषाण पाथरें घडिला । देव आणि वरवंटा केला । परी त्याच्या पाषाणपणाला । तोटा नये कीं ॥ १५ ॥ कां लेंकरें खेळ खेळती । मृत्तिकेच्या नाना व्यक्ती । केल्या तरी अंतीं । मृत्तिकाचि आहे ॥ १६ ॥ ऐसें बोलतां उदंड आहे । परी मातीपण सरिसेंचि पाहें । उंच नीच केलिया न साहे । वियोग तयाचा मीपणाशीं ॥ १७ ॥ तैसें मीपण हें ऐकिलें । अवघ्या विश्वाच्या वांट्यास आलें । परी घोटे तरी पालटलें । आहे मातें ॥ १८ ॥ मोळीविक्याहि मीच भावी । तयाशीच राज्यपदवी । तरी मीपणाची उठाठेवी । टाकूंच नेणें ॥ १९ ॥ मी कावाडी मी राजा । मी भिकारी मी प्रजा । मी अनाचारी मी पूजा । आचारशील ॥ २० ॥ मी वोवळा मी सोंवळा । मी प्रपंची मी निराळा । मज भारीच सोहळा । घेतों नाना उपभोग ॥ २१ ॥ मी अमंगळ मी निर्मळ । मी संपन्न मी दुर्बळ । मी मूर्ख आणि सकळ । कळा जाणतां मी ॥२२॥ स्थूळ लिंग कारण । महाकारण मन अंतःकरण । पंचभूत आणि त्रिगुण । माया ब्रह्म तो मी ॥ २३ ॥ परा पश्यंती मध्यमा वैखरी । अवस्था त्याहि मीच चारी । सबाह्य आणि अंतरीं । अवघा मीच आहें ॥ २४ ॥ मी बलाढ्य मी लेंडी मरगळ । मी अभक्त मी प्रेमळ । मी जीव शिव आणि केवळ । आत्मा तोहि मी ॥२५॥ मी बद्ध मी मुमुक्षु । मी भक्त मी मोक्ष । मी लक्ष मी अलक्ष । यांही वेगळा तो मी ॥ २६ ॥ मी पहातां बहु लांबली । मी नेणों कुळींहून आली । विचारितां नेऊनि घाली । जेथील तेथ ॥२७॥ मी बद्धत्वाशी आधार । मी सा मोक्षाचें दार । मी पाववी पैलपार । विचार केला तरी हो ॥ २८ ॥ जैसी ये ग्रंथींची एखादी ओंवी । लांबवोनि वाचितां अगत्य गोंवी । आखूड वाचितां प्रकट दावी । अर्थ येथींचा ॥ २९ ॥ विवेकबळें धांव घ्यावी । मी हे मार्गे टाकूनि यावी । हे मी राहिल्या निज ठेवी । आपणचि होइजे स्वयें ॥ ३० ॥ जैशी जलधरें धांव घेतली । आणि शर्करेचे गुह्याची हांव केली । देह मी टाकितां मिळाली । जाती जेथच्या तेथ ॥ ३१ ॥ ऐक गा शिष्या प्रेमळा ।

---

भलतीकडे. २ डबक्यांतील पाण्याच्या. ३ अशक्त.

जें कांहीं जाणशी तूं त्या वेगळा । आगळा हा शब्दसोहळा । एथें गुंतूं नको ॥ ३२ ॥ अर्थांतरीं मन घालावें । उगेंचि स्तब्ध न व्हावें । तुज मी सांगेन तें परिसावें । चित्त देऊनियां॥३३ आतां तुज वाटतें शिष्य तो मी । आणि मज वाटतें गुरु तो मी । तरी गुरुशिष्य मिळोन मी। एकचि कीं ॥३४॥ तरी आतां तुझी तूं उडाली । आणि माझी थोडिसी थांवली । तेही पाहिजे उडविली । येचि क्षणीं ॥ ३५ ॥ स्वामी बोलिले जे तूं उडाली । आणि पाहिजे उडविली । माझी आशंका राहिली । ते कोणासी पुसों आतां ॥ ३६ ॥ अरे तूं कैंचा तुजपाशीं । विचारूनि पाहें मानसीं । मी मी ह्मणतोशी आपणासी । तरी तूंचि मी नव्हेसि रे ॥ ३७ ॥ अरे विचारितां श्रीराजा जाले । तरी पुरुषासि काय बायको केलें । परी विचार पाहतां आलें । अवयवांचे मस्तकीं ॥ ३८ ॥ अरे पुरुष जयासि ह्मणावें । त्यास कासया पुरुषत्व लागावें । जैसें आकाश भिन्नवावें । बळात्कारें करूनि ॥ ३९ ॥ पुरुषशब्द हेचि प्रकृती । परी कला व्याकरणनाम आसती । तरी पुरुषव्यक्ति अवघी प्रकृती । सहसा चुकेना ॥ ४० ॥ अवघे शक्तीचे जाणावे । तरी काय पुरुषासी योग्य ह्मणावें । हें बोलणें उपाधिस्वभावें । पुरुष तेचि प्रकृति ॥४१॥ ह्मणोनि जें कांहीं बोलावें लागे । तें सहसा पालटावें नलगे । तुज आशंका उद्भवली ते भंगे । ऐसें करूं नको ॥४२॥ तुवां आशंका राखिली । तरी काय सृष्टि बोलों राहिली । हे कुबुद्धि तुज कां आठवली । टाकीं परती ॥४३॥ आठवेल तैसें बोलावें । तुवां संकुचित न व्हावें । तरी येथें ही बोलतां भ्यावें । तरी समाधान कैचें ॥ ४४ ॥ आतां असो हें बोलणें झालें । मीपण पाहिजे उडविलें । या मीपणाशीच एकलें । ठेवूनि कोण काज ॥ ४५ ॥ उडविलें बुडविलें यतोव्युत्पत्ती । परी निरसली पाहिजे तुझी भ्रांती । या लागीं बोलतों चित्तीं । सावध होईं ॥४६॥ तुवां जाणशी त्यावेगळा आसिजे । ऐसें बोलिलों आह्मी सहजें । परी हेंचि तुज पाहिजे । परिछिन्न कळलें ॥४७॥ चारी देहो चारी वाचा । पंचभूत त्रिगुणांचा । इंद्रियचाळक तया मनाचा । जाणता तूं होशी ॥ ४८ ॥ चारी अवस्था पांचवी उन्मनी । वृत्ति निवृत्ति तया लागुनी । यासहि जाणतोसि कीं धनी । लटिकें बोलतोशी ॥ ४९ ॥ आतां बरें मन घालूनियां पाहीं । मीपणासीहि जाणतोस कीं नाहीं । जाणीतल्यासी जाणतोसी नाहीं । उगाचि आतां ॥ ५० ॥ जाणीतल्यासीहि जाणीतलें । तरी ऐसें जरी कळलें । तुज कळल्याहि वेगळें राहिलें । तेंचि स्वरूप तुझें ॥५१॥ आतां सांगरे अनुभव कैसा । स्वामी नाहीं सांगिजे ऐसा । ऐसें बोलतोसी कैसा । फट्ट रे पढतमूर्खा ॥ ५२ ॥ नाहीं सांगिजेल हें कळलें । तरी मी बोलिलों तें व्यर्थ गेलें । अरे वेड्या तुज जें अनुभवा आलें । त्याहि वेगळा तो तूं ॥ ५३ ॥ आतां सांग पां बरें । उगाचि राहिलासि कां रे । मान हालवितो घ्यारे । जीवेंचि यांसी ॥ ५४ ॥ जीविस्व अवघें लोपलें । पाहा हो कैसें जालें । नाम घ्यावयासी उरलें । नाहींच कोणी ॥५५॥ अरे शिष्या सावध होईं । तुज आणिक सांगतों कांहीं । मीपण पाहतां नाहीं । भिऊं नको ॥ ५६ ॥ इति श्रीरामीं रामदास ह्मणे । ऐक वंध्यापुत्राचें बोलणें । चक्षु श्रवण असले तेणें । सावधान व्हावें ॥ ५७ ॥ इति त्रयोदशः समासः समाप्तः ॥ १३ ॥

---

शब्दांचा संग्रह.

## समास १४.

श्रीगणेशाय नमः ॥ वंध्यापुत्राचें बोलणें । हें सांगणें बाष्कळपणें । पुत्रचि नाहीं तेथ कोणें । काय बोलावें ॥ १ ॥ वांझ खरी परी पुत्र आहे । ऐसेंहि एक नवल पाहें । स्वामी हें बोलणें न साहे । लटिकेंचि तुमचें असे ॥ २ ॥ पुत्र आहे निपुत्रवंती । वंध्या ह्मणाल तरी पुत्र असती । दोन्ही बोलतांचि चित्तीं । खरें कैसें मानावें ॥३॥ अरे पुत्रपणें आपणासि व्याली । आपणचि नामेंहि ठेविलीं । ऐसीं घरभरी लेंकुरें जालीं । परी वांझपण आंगीं असे ॥ ४ ॥ भर्तारेंविण सदा एकली । अवघी आपणचि मिरवली । भर्तारास ही प्रसवली । लटिकाचि पाहिजे तो ॥ ५ ॥ हे इतुके प्रसवली आपण । परी सत्य जाण भर्तारेंविण । लटिकें बोलणें तरी आण । मज तुझी रे शिष्या ॥ ६ ॥ स्वामी बोलिले तें यथार्थचि । परी मी गोष्टी सांगतों जीवींची । मज जरी खरें वाटेल तरी पायांची । आण असे ॥ ७ ॥ कां जे पुरुष आणि प्रकृती । ऐसी विश्वतोमुखीं[1] वंदती । हे उभयतांचि मिरवती । मध्यें तिसरें नाहीं ॥ ८ ॥ या दोंमध्यें तिसरें नाहीं आलें । ऐसें बहुतीं असें बोलिलें । परंतु भर्तारें विरहित ऐसें ऐकिलें । नाहीं सर्वथा ॥ ९ ॥ एकलीच आणि आपणासि व्याली । हे नवलवार्ता ऐकिली । असो व्याली तरी जाली । संतति पाहिजे कीं ॥ १० ॥ व्याली तीस जालें काय । ऐसी तरी पाहिजे सोय । अरे शिष्या न होय । आपणासी आपण ॥ ११॥ आपण व्याली जरी ह्मणावें । पूर्वीच होतीसें जाणावें । व्याली नसतां स्वभावें । असतचि आहे ॥ १२ ॥ आतां असो हे हातचांचपणी । किती करूं मी सोसणी । मज हे प्रांजळ होय ऐसी करणी । केली पाहिजे ॥ १३ ॥ भर्तारासी कैसी व्याली । विऊनि वांझ कैसी जाली । आणि पुरुषेंविण एकली । आपणचि कैसी ॥ १४ ॥ ऐक शिष्या सांगतों । तुज सत्य वाटे ऐसें करितों । तरी मी जें काय बोलतों । त्याचें विचारण करावें ॥ १५ ॥ एक प्रकृति आणि पुरुष । तूं जाणतोस कीं या दोहींस । परी विचारूनि पाहतां पुरुषास । ठाव नाहीं ॥१६॥ साकारनिराकार हेतु । तितुकी ही प्रकृति निभ्रांतु । ऐसें जाणोनियां त्वरितु । विचार करीं आतां ॥ १७ ॥ पुरुषशब्द आकारला । तो जाण प्रकृतीनेंचि केला । प्रकृतीपासूनि जाला । तरी पुत्र होय कीं॥१८॥आतां विऊन वांझपण आंगीं। तें सांगतों तुजलागीं । व्याली तरी वोसंगीं[2] । लेंकुरें पाहिजेत कीं ॥ १९ ॥ वोसंगा आहे परी साकार । तरी हा इचाचि विस्तार । निराकार ते साकार । होणार नाहीं ॥ २० ॥ जितुका कांहीं आधार जाला । निराकारहि कल्पनेनें सूचला । एवं निराभास ह्याहि बोला । मायाच आली ॥ २१ ॥ जैसी पृथ्वी कोनीं निघाली । तयांसि द्रुम लता वल्ली । मेरुमांदारें शृंगें जालीं । लेंकुरें तयांसी ॥ २२ ॥ कन्या पुत्र नपुंसकें । नामें ठेवितीं अलोलिकें । ऐसीं जालीं लेंकुरें अनेकें । संख्याचि नाहीं ॥ २३ ॥ गड कोट पुरें पट्टणें । महाल दामोदरें निर्माणें । जालीं असंख्य कोणें । गणना करावी ॥ २४ ॥ लेंकरांस हीं लेंकरें जालीं । नपुंसक कोणी निघालीं । कन्या पुत्र नपुंसकें आलीं । नपुंसकांचे पोटीं ॥२५॥ कां कुलालशाळेसि पात्रें केलीं। नानाव्यक्ती निर्माण जालीं । भिन्नभिन्नपणें नामेंहि ठेविलीं । निर्माण जाल्यानंतर ॥ २६ ॥ ऐसी विस्तारें वाढली । पाहों जातां धरा एकली । तैसी माया ही विस्तारली । परी विचारितां

---

[1]आबाल वृद्धांच्या बोलण्यांत. [2] मांडीवर.

आपणचि असे ॥ २७ ॥ कां जैसा अग्नि प्रकाशला । आपणासी आपण जाला । पाहों जातां एकला । एकाचि आहे ॥ २८ ॥ फुंकोनि दिवा लाविला । पुत्रपणें हिलाल जाला । हवाया चंद्रज्योति पावला । कन्यारूप नामें ॥ २९ ॥ ऐसिया नाना व्यक्ती । परी एक आदिअंतीं । कां बावन मातृकांप्रती । आकार सोडीना ॥ ३० ॥ ऐसी सर्वत्र बोलती माया । स्तब्धता जाली शिष्यराया । ह्मणोनि पुसतां चित्ता माझिया । समाधान न घडे ॥ ३१ ॥ विचार करीना माया सर्व । परी पुरुषाचा दिसतो अभाव । तेणें माझा अंतर्भाव । डगमगला कीं ॥३२॥ अरे शिष्या माया कैंची । हे कन्या वंध्यापुत्राची । पुत्रचि नाहीं मा त्याचे कन्येशी । वार्ता कोठें ॥ ३३ ॥ अरे ऐक कां घाबिरा जालासी । अंतरूं नको विवेकासी । उतावेळ करूं नको आह्मांसी । बोलों दे क्षणभरी ॥ ३४ ॥ जरी आह्मीं तुझें जीवींचें । जाणोनि सांगितलें अंतरींचें । मग बोलावयाचें । कोण काज आहे ॥ ३५ ॥ किंचित् धीरत्व धरावें । तुवां सुदृढ होऊनि ऐकावें । तुझी आशंका स्वभावें । निरसोनि जाईल ॥ ३६ ॥ माया मायिक आभासे । तुझिये कल्पनेसीच दिसे । देहीं देहबुद्धि वसे । ह्मणोनियां ॥ ३७ ॥ तुज जें कांहीं सांगितलें । तें तुज इतुकेंचि कळलें।क्षणामध्यें डगमगिलें । चित्त तुझें ॥३८॥ आधीं आपणासी जाणावें । मग रघुनाथीं मिळावें । आपणासी राखितांचि जीवें । राम कैंचा जोडे ॥३९॥ तुझी वासना जे माया उठोनी जावी । त्यां आपुल्या डोळां पहावी । तुझी देहबुद्धि दवडावी । नलगे रे तुज ॥ ४० ॥ एक या स्थूळासि निंदिलें । अवधिया विश्वावरी आलें । आणि त्याचें कार्य राहिलें । निराळें अनुसुटची ॥४१॥ तैसी त्वां माया निंदावी । आणि कल्पना जतन करावी । गुप्त करूनि लपवावी । आपुली ह्मणोनियां ॥ ४२ ॥ तुझी कल्पना हेचि माया । ते आधीं धाडीं विलया । मग हें स्वसुख पहावया । अधिकारी होसी ॥ ४३ ॥ तूं जरी चक्षु[1] देहांपरता तरी कां भोंवसी स्थूळाभोंवता । तुझें तुज स्वरूप पहातां । माया कैंची रे तेथ ॥ ४४ ॥ जरी तुज स्वहित करणें आहे । तरी तूं कल्पनातीत होऊनि राहे । कल्पना हे सर्वथा न साहे । तुझे स्वरूपीं ॥४५॥ अंध आणि डोळसे कोणी एक । मार्गें जातां भयानक । ते देखोनि साशंक । डोळस सेळोनि पडे ॥ ४६ ॥ अंधासि ठावकेंचि नाहीं । त्यासी भयानक न दिसे कांहीं । तयासि देह असतां कांहीं । बाधूं न शके सर्वथा ॥ ४७ ॥ तैसे तुझे डोळे । क्षण एक ठेवीं पां निराळे । मग हे कैसी आढळे । भयानक माया ॥ ४८ ॥ मोठें भय तुझ्या स्थूळासी । तरी तूं काय स्थूळ होसी । क्षणक्षणा भ्रांत होतोसी । अविवेक संगती ॥ ४९ ॥ तुज कैंचें रे लिंगदेह । मातें बिघडोनि नवजाय । हें तूं विचारूनि पाहें । खरें कीं खोटें ॥ ५० ॥ संग न साहे जेथें । मन बापुडें कैंचे तेथें । तुज पहावया काळातें । शक्ति कैंची रे ॥ ५१ ॥ तूं मज ह्याचें पिलुं । काळ रे बापुडें भालु लुलु । मशक मेरूसी पाहे तोलूं[2] । थडका हाणोनी ॥ ५२ ॥ थिल्लर बालकासी बुडवी खेळतां । आकाश मार्गें उडों जातां । तें केवीं बांधूं शके रामदूता । तया हनुमंतासी ॥ ५३ ॥ पिपीलिकेचिये पक्षघातें । कैसें पडे ब्रह्मांड पालथें । कां दर्दुर[3] उडेल गगनपंथें । सूर्य ग्रासावया केवीं ॥ ५४ ॥ कां बलाढ्य ह्मणे मी तरवार वोढीन । धांवोनि जातांचि आकाश तोडीन । भोंवी घेऊनि ओढून । पाडीन पृथ्वीवरी ॥५५॥ तंववरी नेहळ्यानें[4] हंबरावें । जंववरी त्या पंचाननें नवयावें । का पतंगें जाऊनि भक्षावें । अनलासि जैसें ॥ ५६ ॥ कां जैसा नवनीताचा गोळा । युद्धालागीं उतावेळा । ह्मणे मी या वडवानळा ।

---

१ स्पर्शरहित. २ भिऊन. ३ बेडुक. ४ कोल्ह्यानें.

ग्रासीन सकळ ॥ ५७ ॥ कीं जैसा उदुंबरांतील पक्षी । ह्मणे मी गिळीन ब्रह्मांडासी । तैसें तुझें स्वरूपासी । काळाचा आंवाका ॥ ५८ ॥ अरे तूं निःसंग आणि निर्मळ । तेथें काय रे बापुडें काळ । प्रलयानलासी मृगजळ । केवीं बाधूं शके ॥ ५९॥ काळ मायेचे अंगभूत । तुझे स्वरूपीं रोहिणी जळवत् । आणि स्वरूप तुझें मायातीत । तेहि माया नाहीं ॥ ६० ॥ कर्पूराचे राशीं-तूनी । एक खडा गेला निवडूंनी । अग्निसंगें भस्म होऊनी । गेला नव्हताचि जैसा ॥ ६१ ॥ तूं या मायेंतूनी । स्वरूपीं जातोसि निवडूनी । तेथ तुझी देहबुद्धि भस्मोनी । गेली नाहीं रे ॥ ६२ ॥ जातोसि येतोसि बोलणें न घडे । परी तुज स्वहित कैसें जोडे । ह्मणोनि हें अघटित घडे । बोलणें आह्मांसीं ॥ ६३ ॥ स्वरूप बोलणें न घडे कैसें । यदर्थीं मन घालीं आभासें । हे प्रकृति या विश्वासें । भाषण करीं आह्मांसीं ॥ ६४ ॥ स्वरूप आहे स्वरूपापरतें । सांडूनि टाकीं मातृकांतें । तरी मातृकांवेगळें तयांतें । मातृका कैसें बोलतां स्वामी ॥ ६५ ॥ स्वरूप संकल्पाचा प्रांत । ऐसा तो जाणावा निभ्रांत । या स्वरूपाचा अंत । संकल्पें ठाकेना ॥ ६६ ॥ स्वामी संकल्पा परता । ऐसें शब्दीं कां बोलतां । उठे तो शब्द सर्वथा । बोलोंचि नये ॥ ६७ ॥ माझेंचि बोलणें अबोलणें । हें तूं विचारूनि पाहणें । या शब्दासी होणें जाणें । संकल्पींच असे ॥ ६८ ॥ माझा उद्गार जो निघाला । तो संकल्पींच निमाला । परी आत्मा संचिला राहिला । संकल्पातीत कीं ॥ ६९ ॥ मी जें बोलिलों तें संकल्पेजनित[1] । आणि आत्मा सांगितला संकल्पातीत । बोलतांचि अबोलणें त्याची मात । ऐसी असे ॥ ७० ॥ जरी स्वरूप संकल्पापरतें । तरी तुमचें बोलणेंचि व्यर्थ जातें । तुमच्याचि बोलणें असतें । जालें अनायासें ॥ ७१ ॥ तुह्मीं संकल्पें बोलिलें । तें संकल्पातीत राहिलें । एवं बोलणें तितुकें गेलें । व्यर्थचि कीं ॥ ७२ ॥ अरे शब्द संकल्पीं आटला । परी अर्थ वेगळा राहिला । स्वामी अर्थशब्द प्रकटला । ह्मणोनि तोहि संकल्प ॥७३॥ प्रकट जाला परी नाथिला । परी तैसेंचि सांगणें स्वरूपाला । अर्थाच्याहि अर्थाला । सांगणें न घडे ॥ ७४ ॥ बोलोनि राहे निवांत । विचार घेतां शब्दासि अंत । जाला संवाद भेदरहित । उभयतां एकचि जाहले ॥७५॥ नेत्रीं टकमकां पाहती । परंतु कांहींच न बोलती । देहबुद्धीची भ्रांती । पडोनि गेली ॥ ७६ ॥ पातियासि पातें न लागे । तेणें जळ वाहों लागे । मंद वायूचेनि संगें । ढळती अश्रुपात ॥ ७७ ॥ देहाचें स्मरण नाहीं । निश्चेष्टित जाले विदेही । स्वरूपाभास तोही । मोडोनि गला ॥ ७८ ॥ ते आनंदजळीं बुडाले । गुरुशिष्यपणा वेगळे जाले । प्रपंच सांडोनि मुकले । परमार्थासी ॥ ७९ ॥ ऐसें तटस्थ घटिका चारी । उपरि आले देहावरी । परी स्वसुखाचे अंतरीं । कळा बाणोनि गेली ॥ ८० ॥ दोघे एकरूप चालती । ब्रह्मानंदें करूनि डुलती । ते खूण स्वानुभवी जाणती । येरां अतर्क्य ॥ ८१ ॥ ऐसें सुख सत्संगतीं । शरण गेलिया प्राणी पावती । यातायाती वेगळे होती । संतसंग जोडलिया ॥ ८२ ॥ इति श्रीरामदास ह्मणे । हें मी कांहींच नेणें । एक आत्माराम जाणे । शरयूतीरनिवासी ॥ ८३ ॥ इति चतुर्दशः समासः समाप्तः ॥ १४ ॥

---

१ संकल्पानें उत्पन्न केलेलें.

# समास १५.

श्रीगणेशायनमः ॥ निमासुर सुहास्यवदन । माणिक्याकिळा झळकती दशन । अधर सुरंग बोलतां न्यून । उपमा प्रवाळाची ॥ १ ॥ भ्रुकुटी व्यंकटा धनुष्याकार । अकारण पक्ष्मनयन सुंदर । सकळ नासिक मनोहर । जेथें निगम[1] विसावले ॥ २ ॥ भाळीं केशराचा मळवट । मध्यभागीं मृगनाभि चोखट । दुबोटी वरी अक्षता नीट । कुंकुमाच्या वर्तुल ॥ ३ ॥ श्रवणीं मकराकार कुंडलें । तेणें मिरवलीं कपोळें । अथवा मुखचंद्रचि उजळलें । नेणों त्रिभुवनीं ॥ ४ ॥ ललाट नेपाळलें[2] । चंचार सुमनीं गुंफिले । सुवास देखूनि कूळ आलें । झुंकेरत[3] षट्पदांचें ॥ ५ ॥ मस्तकीं मुकुट किरीटी । मागें बांधिली वीरगुंठी । अनर्घ्य रत्नें परिपाटीं । जडलीं खणांखणीं ॥ ६ ॥ कास कासिली पितांबराची । उटी मिरवे चंदनाची । शोभा बाणली कौस्तुभाची । आणि माळा सुमनाच्या ॥ ७ ॥ आपाद रुळे वैजयंती । ज्ञानमुद्रा सव्यहस्तीं । बाहुभूषणें शोभा देती । त्यावरी कीर्तिमुखें ॥ ८ ॥ रत्नजडित दशांगुळें । आजानुबाहु कर सरळ । वीरकंकणें तेजाळ । चंचल विद्युल्लतेऐशीं ॥ ९ ॥ दीर्घ वक्षस्थल अति सुंदर । जें कीं सिंधूचेंच मंदिर । शोभा वर्णितां उदार । जेथें श्रुति थोटावल्या ॥ १० ॥ नाभिसरोज निर्मळ । जें कां ब्रह्मयाचें जन्ममूळ । कटिप्रदेश देखोनि तत्काळ । सिंहीं हिमाद्रि सेविला ॥ ११ ॥ रत्नजडित मेखला कटीं । क्षुद्रघंटिकाझणत्कार उठती । सानु माज देखोनि उफराटीं । सिंहीं मुखें केलीं ॥ १२ ॥ जैसे कर्दळीस्तंभ । तैसें उरुद्वय स्वयंभ । जानुयुगल सप्रभ । पोटरिया मीनाकृति ॥ १३ ॥ साजिरी घोंटी वर्तुल । जैसे मणिमय जाले नील । सुरंग टाचांची कीळ । अरुणप्रभेसारिखी ॥ १४ ॥ सपोस पातळें दोन्ही पाउलें । जेथें मुनिजन रंगले । साधकही तें चिंतूं लागले । स्वहिता कारणें ॥ १५ ॥ वामभागीं शोभे जनकनंदिनी । सन्निध शरासन ठेवूनी । दक्षिणे उभा कर जोडूनी । सन्मुख मारुतात्मन ॥ १६ ॥ पृष्ठभागीं कैकेयीनंदन । भरत आणि शत्रुघ्न । छत्रचामरेंशीं दोघेजण । आदरें सेविती श्रीराम ॥ १७ ॥ चरणीं वांकी तोडर गर्जती । पाउलें मांडी वर एक क्षिती । तेथें रामदासाची वस्ती । कदा वियोग न साहे ॥ १८ ॥ राम सर्वांगसुंदरू । राम करुणेचा सागरु । दीननाथांचा उद्धारू । एक श्रीराम कर्ता ॥ १९ ॥ वैभव प्रपंचीं वेचावें । आणि अंतीं रामाशीं स्मरावें । रामें तयासी सांभाळावें । कृपाळुपणें ॥ २० ॥ प्राणी क्षीण जाहला देहीं । वेढिला यमदूतांहीं । तेव्हां सोडविता नाहीं । एक श्रीरामावांचूनी ॥२१॥ जेधवां वैभवें हीन व्हावें । जीवलगीं वोसंडावें । ते समयीं अपंगावें । कृपाळुपणें राघवें ॥२२॥ रामाशी कोणीच स्मरेना । परी राम माझा विसंबेना । गुणदोष विचारीना । मायबाप विश्वाचा ॥ २३ ॥ राम जिवाचा जिव्हाळा । राम मनाचा कोंवळा । राम जाणे अंतःकळा । निजदासाची ॥ २४ ॥ राम पुण्यपरायण । राम त्रैलोक्याचा प्राण । रामें दास बिभीषण । चिरंजीव अक्षय केला ॥ २५ ॥ वैभवें रावण माजले । तेणें सकळ देव गांजिले । ऐसें जाणूनि धांवणें केलें । वैकुंठींहूनि राघवें ॥ २६ ॥ वानरें मिळालीं रामाभोंवतीं । राम वानरांचा संगाती । धांव धांवोनि जवळ येती । कोण भाग्य तयांचें ॥ २७ ॥ रामपायीं अहल्या शिळा । दिव्यरूप जाली बाळा । रामें गणिकेसी सोहळा । विमानाचा दाखविला ॥ २८ ॥ राम खाय भिल्लटीचीं

१. वेद. २ नेपाळ देशची कस्तुरी लाविली. ३ गुंजारव करीत.

बोरें । रामप्रतापें वानरेंश्वरें । राज्य केलें सदोदरें । गांजिला होता जो ॥ २९ ॥ राम सुरवरां-
चा कोंवसा । राम मंडन सूर्यवंशा । रामजप भवानीशा । सप्रेम चित रामनामें ॥ ३० ॥ नामें
तारिलें पाषाण । नाम पतीतपावन । नामें मुक्त विश्वजन । शिवाचेनि उपदेशें करूनी ॥ ३१ ॥
नाम जिव्हा जपे जयाची । तेथें प्राती काय काळाची । आदि करूनि विरंची । विपरीत करूं
न शके ॥ ३२ ॥ कोणी मुक्त जाहले । आणिकीं चित्रींचें सीवितलें (?) क्रियामाण गडमगिलें ।
धोका आदाळिजा हृदयीं तेणें ॥ ३३ ॥ तेंही श्रीरामचिंतन । करावें भावार्थे करून । तयांसी
धोक्यापासून । सोडील स्वामी माझा ॥ ३४ ॥ राम माझाचि नाहीं नेमिला । जे जे शरण गेले
त्यांच्याच जाला । परी रामासारिखा स्वामी फावला । तेचि धन्य संसारीं ॥३५॥राम सकलप्रा-
णिमात्रांचा । आणि कैवारी देवांचा । ऋषीश्वरांचा सारथी अढलियांचा । समयीं आपंगी॥३६॥
आतांही जयास वाटे भेटावें । रामें मज सांभाळीत जावें । ऐसें दृढ घेतलें जीवें । तरी ऐका मी
सांगेन ॥३७॥ श्रीरामजयरामजयजयराम । ऐसा कांहीं एक करूनियां नेम । जप कीजे तेणें आ-
त्माराम । जोडेल नियमें ॥ ३८ ॥ परी कोणासी कळों नेदावा । जप अंतरींच करावा । जैसा
कृपणासी धनठेवा । सांपडला एकांतीं ॥ ३९ ॥ राम जपे त्यांचे चित्त पाहतो । जप करितां
शीण येतो । विकल्प अंतरीं प्रवेशतो । तरी ढळेना मेरु जैसा ॥ ४० ॥ कां प्रपंचीं होती थोर
आघात । तेणें चित होय दुश्चित । देहासी आपदा होती अत्यंत । तरी रामाशीं विसरूं नये
॥ ४१ ॥ जप नेमिला तो चुकों नेदावा । त्यावेगळा सर्वदा स्मरावा । मळत्यागीं ही न विसंबा-
वा । कर्मठपणें करूनि ॥ ४२ ॥ ऐसें अखंड नाम स्मरावें । परी दुसरियासी कळों नेदावें । नि-
दिध्यास लागलिया राघवें । पाविजे तत्काळ ॥ ४३ ॥ वैरें निदिध्यास रावणें केला । त्याचा
संकल्प त्याशीं फळला । मा जेणें दासत्वें उपासिला । तो राम कैसा नव्हे ॥ ४४ ॥ कांहीं
साक्षात्कार जाला । तो सांगों नये दुसरियाला । जरी आलेकेपणें सांगितला । तरी पुन्हां हो-
णार नाहीं ॥ ४५ ॥ पुन्हां साक्षात्कार कैंचा । जाला तरी वरपंगाचा । हा मी आपुले जीवाचा ।
अनुभव सांगतों ॥ ४६ ॥ अरे द्रव्यठेवण सांपडलें । तें जरी प्रगट झालें । तरी तत्काळ हिरोनि
नेलें । नाहीं राजदूतीं ॥ ४७ ॥ ह्मणोनि अनंतकोटि ब्रह्मांडनायक । तेथें द्रव्य तें केवढें बापुडें
रंक । साक्षात्कार अलोलिक । प्रकट सहसा करूं नये ॥ ४८ ॥ लोकांपाशीं सांगावें । कां जे
लोकीं बरें ह्मणावें । अल्पासाठीं आपुलें करावें । अनाहित कैसें ॥ ४९ ॥ जयासी रामचि
व्हावा । तेणें लौकिक सोडावा । राम कैवारी करावा । जो संकटीं नुपेक्षी ॥ ५० ॥ जयास
उपासना जैशी । तेणें स्मरावें आपुल्या देवासी । निदिध्यास जालिया नेमेंशीं । साक्षात्कार
होय ॥५१॥ शिष्या सांगतों तुज नेम । तोचि रे तुझा स्वधर्म । ज्ञातेपणें ही माझा राम । विसंबूं
नको ॥५२॥ राम स्वामी जाण माझा । तरी तुज होय आजा । तुझें लडिवाळपण वोजा । चाल
वील आत्माराम ॥५३॥ रामदासीं भिन्नत्व नाहीं । तरी राम होय मीही । तूं त्याचा दास तूंही ।
रामचि होसी ॥ ५४ ॥ शिष्या शब्दज्ञान सोडीं । श्रीरामा ऐसी धूर जोडीं । मग रामचि हा
तडातोडी । करील तुझिया भेदाची ॥ ५५ ॥ समर्थे ज्याचा अंगिकार केला । कोण बोलों शके
तयाला । माझ्या रामाशीं जो शरण गेला । तो कळिकाळासि वंद्य ॥ ५६ ॥ शब्दज्ञान उदंड
बोलती । परी क्रिया कोणीच न करिती । तैसी तूंही गा व्युत्पत्ति । करूं नको ॥५७॥ शब्दज्ञान
व्यर्थचि गाथा । येथें आलें क्रियेच्या माथां । क्रिया न करितां सर्वथा । फोलचि अवघें ॥ ५८ ॥

१ वानराचा मुख्य सुग्रीव यानें. २ आवडीनें. ३ अग्रभागीं राहण्यास योग्य.

सगुण उच्छेदावें । आणि निर्गुण प्रतिपादावें । परी तें निर्गुणचि स्वभावें । सगुण होतें ॥ ५९ ॥ सगुणीं भजन करावें । निर्गुणीं आपणचि व्हावें । तेथें काय बोलावें । ज्ञातेपणें करूनी ॥ ६० ॥ भक्ति सगुणाचीच घडे । निर्गुणीं भेद समूळ उडे । तेथं जो वेगळेपणं रडे । तो मूर्ख जाणावा ॥ ६१ ॥ पूर्वींही बोलेनि गेले । माना दृष्टांत दिधले । परी तं स्वरूप संचलेंच राहिलें । बोलण्यावेगळें ॥ ६२ ॥ बोलण्यावेगळें राहिलें । हेंही बोलणें व्यर्थंचि गेलें । व्यर्थासी व्यर्थ ह्मणतां लांबलें । बोलणें बहुसाल ॥ ६३ ॥ आतां असो हे पारेरा । जे वोलिले तें परोपकारा । बोलतां बोलतां थारा । मोडे अज्ञानाचा ॥ ६४ ॥ जें बोलाशीं आकळेना । वोलिल्याविण कळेना । कळल्यासही आकळेना । स्वरूप जें ॥ ६५ ॥ लटिकेंचि शब्द बोलावे । लटिकेंचि मायेस निवारावें । मग मायेसरिसे स्वभावें । बोलणेंहि गेलें ॥ ६६ ॥ लटिक्यानें लटिकें मारिलें तें खऱ्यानें काय देखिलें । लटिक ह्मणिजे नाथिलें । जें झालेंचि नाहीं ॥ ६७ ॥ जैसें शरानें शरास खंडिलें । कां वायूनें अभ्र फिटोनि गेलें । वायो निवारिलिया जालें । निवांत आकाश ॥ ६८ ॥ विचारितां निवांताचि होतें । परि आहाच पाहतां नेत्रांतें । विस्कालित दिसता परी तें । संचलाची असे ॥ ६९ ॥ तैसे शीत् स्वरूप असतां । चर्मचक्षीं पाहों जातां । तें न दिसे सर्वथा । मायाच दिसे ॥ ७० ॥ ह्मणोनि शब्दवायु सुटला । तेणें मायाढग निवाळिला । वितुळल्या आपण हरपला । नव्हताचि जैसा ॥ ७१ ॥ तैसी माया हे निःशेष विराली । मग कोण स्थिति वर्तली । ते मौनिचे विचारिली । पाहिजे स्वानुभवें ॥ ७२ ॥ प्रपंचवणवा पेटला । परमार्थ जाळूनि विझाला । तेथें रामदास जळोनि गेला । धांवणें करा कोणी ॥ ७३ ॥ इति श्रीरामदास रामीं । विश्रांति पावला निजधामीं । श्रमले दिसतां तुह्मीं । विश्रांति करा ॥ ७४ ॥ इति पंचदश समासः समाप्तः ॥ १५ ॥

---

## समास १६.

श्रीगणेशाय नमः ॥ रामासि इतुकें मागावें । जे आपण रामाचि व्हावें । रामासि दास करावें । आपण ऐसें ॥ १ ॥ तूं ऐसा कां मीच असोन । त्याहून नलगे आम्हासी आन । तुझ्या ठायीं दासपण । आणीन तरी मी होय ॥ २ ॥ तुवां स्वामी होऊनि बैसावें । आणि आह्मांस भोंवतें मेवावें । रागें जनीं बाहतां न यावें । हें काय बरें ॥ ३ ॥ तूं राज्य सांडूनियां जालिया उदास । तरी आह्मीही तुह्मोचि दास । तां काय बोलिजेल बापास । तैसें आह्मीही तुज करूं ॥ ४ ॥ तुवां पाषाण तारिले । तरी आह्मींही जडजीव उद्धरिले । तुवां देव मुक्त केले । बंधनापासूनी ॥ ५ ॥ तरी आह्मीही भाविकांसी । सोडवूनियां मोक्षपदासी । पावविलें तयासी । मागुता जन्म नाहीं ॥ ६ ॥ तुवां जरामरण केलें दुरी । ते मुळींच नाहीं आमुचे घरीं । तूं राजा अकरा सहस्र वरी । तरी आह्मासि संख्या नाहीं ॥ ७ ॥ तुवां पुरी नेली वैकुंठा । आह्मीं वैकुंठींच्या बारा वाटा । करूनि मांडिला चोहटा । तया वैकुंठाचा ॥ ८ ॥ ऐसे बोलती रामदास । निघडे सर्वस्व उदास । वैभव वाटे जयांस । कसपट जैसें ॥ ९ ॥ ऐसें बोलणें ऐकिलें । रामें मंदहास्य केलें । धावोनियां हृदयीं धरिलें । आपुलिया निजदासा ॥ १० ॥ ऐसा भक्ताचा

---

१ खंडन केलें. २ अचेतन व सचेतन वस्तु.

वेळाइत । दासा भोंवता भोंवत । एक क्षणीं न विसंबत । भावार्थ देखोनि भूलला ॥ ११ ॥ राम दासांमधें उभा । तेणें दासांसि आली शोभा । रामस्वरूपाची प्रभा । कोंदाटली सबाह्य ॥ १२ ॥ रामें आपणासारिखे केलें । दासास दासपणें मुकले । रामासि गिळोनि एकाचि जाले । एकपणाही वेगळे ॥ १३ ॥ स्वामी सेवकपणें आनंदले । हर्षे करूनि उचंबळले । परस्परें गिळोनि ठेले । लोभ आला ह्मणोनि ॥ १४ ॥ ऐसें देवां भक्तांचें साजणें । जीव घेणें जीव देणें । पुन्हा मागुतें येणें जाणें । न घडे कदा ॥ १५ ॥ नवविधा भक्ति याचि कारणें । जे आपण स्वयें रामचि होणें । स्वयेंचि रामपणें ठाकणें । स्वानुभवें करूनी ॥ १६ ॥ नवांमध्यें मुख्य नायका । तेथें एकचि पदवी राया रंका । ते जरी घडे तरी आशंका । मात्रे तुटोनि जाती ॥ १७ ॥ तेथें सोवळे होऊनियां जाती । देहबुद्धि वोवाळूनियां टाकिती । भेदरहित एकांतीं । रामाचें रूपडें आहे ॥ १८ ॥ तेथें जे जे पवाडले । ते ते अवघे रामाचि जाले । आपुलीं शरीरें पाहों गेले । तों तें पालटोनि गेलीं ॥१९॥ पालट जाला देवां भक्तांसी । पालट जाला पालटासी । पालट जाला अनुभवासी । भेदा भेदा पालटे ॥ २० ॥ नवां खणांचिये उपरी । राम तयाच्या मस्तकावरी । आठखणें वोलांडिल्या उपरी । नवखण चढे ॥ २१ ॥ जो आठा सोडूनि नवमास गेला । आणि नवममस्तकीं चढला । तयासीच आत्माराम भेटला । परते भोंवते भोंवती ॥ २२ ॥ म्हणोनि शिष्या अभेदभजनें । तुवां करावें आत्मनिवेदनें । भिन्नत्व अर्पूनि एकपणें । अभिन्न होऊनि असावें ॥ २३ ॥ जेणें मीपणें धरावें । तेणें विश्वरूपी व्हावें । तरी विश्वरूपीं तेणें जाणावें । विश्वरूपें अंतर कीं ॥ २४ ॥ जेणें विश्वाचें अंतर जाणावें । आणि सत्याचें वैभव हातासि यावें । जें जें घेतलें जीवें । तें तें करूं शके ॥ ३५ ॥ ऐसें ऐकोनियां मना । अवस्था लागली आवरेना । कां जें विश्वाचें अंतर कळेना । विचारूनि पाहतांही ॥ २६ ॥ मी विश्वरूप शब्द जालें । परी अंतर न कळतांचि वायां गेलें । अंतर न कळतां अंतरलें । परमार्थास कीं ॥ २७ ॥ जैसी मी देशाधिपति म्हणे । आणि देशाचें दरिद्र नेणें । तैसा मी विश्वरूपी परी न जाणें । विश्वाचें अंतर ॥ २८ ॥ तरी स्वामी म्यां काय करावें । विश्वाचें अंतर जाणावें । हरिद्रें न कळतां व्हाव । लटकाच कीं विश्वरूपी ॥ २९ ॥ ऐक गा शिष्या मंदमती । तुझी अद्यापी न फिटे भ्रांती । नसतांचि विकल्प चित्ती । धरिला तुवां सुदृढें ॥ ३० ॥ विश्वाचें अंतर तुज कळलें । आणि सत्यच वैभव हातासि आलें । तरी तुझें स्वरूप जालें । विचारितां सगुण कीं ॥ ३१ ॥ जाणीव तितुकी जाण माया । ते क्षणभंगुर जाईल विलया । तुझें स्वरूप मायातीत वायां । शिणसी अविवेकें ॥३२॥ शिष्या विश्वरूपी तूं म्हणावें । हें परिपाटीं करूनि बोलावें । परी तूं विवेकें करूनि पहावें। विश्वरूपी मी कैसा॥३३॥ रूप तितुकें नाशवंत । विश्वरूपासि होईल अंत । म्हणोनियां तूं संतत। विश्वरूपाही वेगळा ॥३४॥ जाणीव तितुकी विचारितां कांहीं । विश्वरूपी तो दिसत नाहीं । जाणीव हे माया पाहीं । तरी तूं काय माया ॥३५॥ सत्याचि जी स्वामिराया । विचार पाहतां मी तो माया । प्रत्यक्षासि प्रमाण कासया । करावें स्वामी॥३६॥ माया प्रत्यक्षचि आहे । सकळ विश्व दृष्टीस पाहे । नाथिली हा शब्द न साहे । प्रत्यक्षापुढें ॥ ३७ ॥ जैसा आप्त विदेशासी गेला । बहुत दिवस होता राहिला । अवचट भेटी जाला । बैसला सन्निध वार्ता सांगे ॥ ३८॥ सन्निध

१ ज्यांना स्तुती केली. २ मर्म रहस्य.

आहे बैसला । तो एक ह्मणती तो क्रमला । आपुले दृष्टीस देखिला । हें कैसें सत्य मानावें ॥ ३९ ॥ तैसी आह्मी आपुले डोळां । माया पाहतों वेळोवेळां । आणि प्रत्यक्ष या ब्रह्मगोळा । मिथ्या कैसें ह्मणावें ॥ ४० ॥ अरे शिष्या भ्रमलासि वायां । दृश्य अदृश्य तितुकी माया । ऐसा हे तुक पाहावया । सामर्थ्य असे हें ॥ ४१ ॥ तुझें स्थूळ आटे हात । तें मायेचें अंतरभूत । तयासी वाटे माया सत्य । प्रत्यक्षचि आहे ॥४२॥ मन स्थूळाचे संगती । नाना कल्पना उठती । त्या आपआपणा पाहती । वेगळीक दावूनी ॥ ४३ ॥ तुझ्या स्वरूपीं माया आढळे । आणि मायेसीहि सर्वथा न कळे । कळणेंचि नाहीं तेथें कळे । समूळ मिथ्या ॥ ४४ ॥ जितुकी कळ-ली तितुकी माया । दुराग्रह करणें वायां । ह्मणसी प्रत्यक्षासि प्रमाण कासया । विचारेंविण कैसा ॥ ४५ ॥ अरे मायेनें माया पाहिली । तरी तुझी काय गांठोडी गेली । तुझी स्वरूप स्थिति आली । नाहीं अनुभवा तुज ॥ ४६ ॥ दृष्टिबंधन खेळ खेळती । सुवर्णाच्या राशी दाखविती । परंतु आपण भिक्षा मागती । ह्मणोनि तो खेळ मिथ्या ॥ ४७ ॥ दृष्टिबंधनाचा खेळ । शाश्वत असता चिरकाळ । तयासि भिक्षेची हुळहुळ । करणें न लागती ॥ ४८ ॥ स्वरू-पस्थिति अनुभवा येतां । समूळ तुटे मायेची वार्ता । असो हा भ्रमचि सांगतां । अनुभवावां-चूनी ॥ ४९ ॥ तें लटिकेंचि सुवर्ण होतें । लटिकेंसि दिसतें । परी समूळ मिथ्या तेथें । तें कांहींच नाहीं ॥ ५० ॥ तैसी माया हें प्रत्यक्ष दिसे । पाहतां सत्य आभासे । परी जागृति आलिया नसे । स्वप्न जैसें ॥ ५१ ॥ स्वप्न देखोनि निर्बुजला । ब्रह्मारण्यामध्यें पडला । प्राणी मार्ग असे चुकला । आक्रंदे दुःखें ॥ ५२ ॥ स्वप्न सत्यचि वाटे निद्रिता । परी निःशेष लटिका जागृति होतां । जागृती स्वप्नमयवार्ता बोलूंच नये ॥ ५३ ॥ तैसा संसार दीर्घ स्वप्न । मध्यें माया दिसे महाविघ्न । स्वरूपजागृति आलिया निर्विघ्न । मुळींच आहे ॥५४॥ तेथें संसारदुःख आटलें । स्वयें आनंद प्रकटलें । आनंदाचेंही मूळ तुटलें । नव्हतेंचि जैसें ॥ ५५ ॥ तेथें दृश्य अदृश्य नुरे कांहीं । लक्ष अलक्ष निःशेष नाहीं । स्वरूपानुभव सर्वही । निवांत होईल ॥ ५६ ॥ तेथें नवविधा भक्तीचा अंत । देवा भक्तांसी एकांत । विश्रांति पावती सत्य । महानुभव जेथें ॥ ५७ ॥ तेथें रामदास रामीं राम । राम सांडिलें आपुलें नाम । विश्रांतीचें निजधाम । होईजे स्वयें ॥५८॥ इति श्रीरामदास रामाचा । दास विनवी रघुनाथाचा । कुतर्क न घ्यावा मनाचा । रामशब्द वर्णितां ऐसा ॥ ५९ ॥ इति शोडष समासः समाप्तः ॥ १६ ॥

---

## समास १७.

श्रीगणेशाय नमः ॥ आशंका उद्भवली माझे चित्तीं । ते सांगतों स्वामीप्रती । पंडित शास्त्रज्ञ बोलती । संस्कृताचेनि आधारें ॥ १ ॥ हृदयकमळीं दिव्यमूर्ती । तेजःपुंज प्रकाशज्योती । तया-सीच ब्रह्म ह्मणती । केवळ आनंद जो ॥ २ ॥ कां उमटती नाना ध्वनी । त्या प्रत्यक्ष ऐकाव्या कानीं । ऐसें हें विश्वजनीं । बोलिजेत आहे ॥ ३ ॥ कां नेत्रांसी प्रत्यक्ष पहाट । उठतां दिसे लखलखाट । कां मूर्ति प्रमाण अंगुष्ठ । पुढें येऊनि ठाके ॥ ४ ॥ ऐसिया नाना प्रतीती । एकमे-कां बैसोनि सांगती । कां दीपाभोंवते बैसोनि पाहती । हिंग रे हिंग ह्मणोनि ॥ ५ ॥ नव्हे ह्म-णतांचि बलात्कारा । येऊनि बैसती सैरावैरा । प्रतिपादिती वेदशास्त्रा- । चेनि आधारें ॥ ६ ॥

---

१ शरीर.

तरी इतुकी ब्रह्म पाहतां । कैसिया परी येईल हाता । येविषयीं परम चिंता । वाटली मज स्वामी ॥ ७ ॥ संस्कृत तरी न कळे । ब्रह्मचि नाना उमाळे । पाहतांति हेचि डोळे । ह्मणोनि सांगतां ॥ ८ ॥ ऐसें सांगूनि भेडसाविती । नकळे त्यासि बुडाला ह्मणती । ऐसें ह्मणती तयाप्रती । कांहींच न चलेकीं ॥ ९ ॥ तरी काय जी म्यां करावें । कोण्या समाधानें असावें । तयामध्यें जातां व्हावें । कानकोंडें तयासी ॥ १० ॥ ऐक गा शिष्या सद्भावा । तुवां प्रश्न केला बरवा । लक्ष उदंड आहेति गोवा । न चले तुज ॥ ११ ॥ लक्ष हे पूर्वापार आहेती । साधकाच्या जाणावया वृत्ती । वृत्ति तितकिया होती । साधक ते शीघ्र ॥ १२ ॥ हे पिपीलिकामार्गीचे अडताळे । विहंगमीं कांहीं नाढळे । जैसें तें अकस्मात मिसळे । लवण जेथींच्या तेथें ॥ १३ ॥ लक्ष आणि नाना साधनें । हीं करावी जयाकारणें । तयासी चुकोनि मूर्खपणें । लक्षाचि ब्रह्म ह्मणावें ॥ १४ ॥ द्वितीयेचा चंद्रमा दिसेना । ह्मणोनि दाविजे वृक्षापर्णा । पर्ण सांडोनियां देखणा । तेचि न्याहाळी विवेकें ॥ १५ ॥ न्याहाळितां जरी दृष्टी पाडिलें । चाणि पुनः पाहतां पर्ण आढळे । तरी पर्ण न पाहतां गेलें । लक्ष तये कोरेवरी ॥ १६ ॥ मग तळीं सांडोनि निराळें धांवे । देखिलें तयासी तेथूनि फावे । मग पुढिलांस दाखवी जीवभावें । कुडकुडा होऊनियां ॥ १७ ॥ एकीं बोटीं दाखवितांचि देखिलें । एकांसी भितांड अढकलें । एकीं आपणाचि देखिलं । अकस्मात चंद्ररेखेसी ॥ १८ ॥ सकळ सृष्टीसी ठाऊकें । जाणिजेत आहेती सकल लोकें । उभे राहती पाहती कौतुकें । एका पुढें एक होऊनि ॥ १९ ॥ चंद्र दाखवावयाचा कांहीं । वृक्षपर्णाचाचि नियम नाहीं । ज्यासी जैसा तैसा तेही । दाखविला येरेयेरां ॥ २० ॥ येथें चंद्रेंसी कारण । डाहाळी भिंताडा पुसे कोण । तैसी जाणावी लक्षणें निज खूण । ते लक्षाहूनि परती ॥ २१ ॥ चंद्र ह्मणोनि पाराचे भावी । जाणपणें आपणासि दाखवी । जैसा आत्मा चुकोनियां म्हणवी । लक्ष हेंचि गुरुखुणे ॥ २२ ॥ जरी लक्ष्य तेंचि ब्रह्म म्हणती । तरी नेत्र असतांचि स्वरूपप्राप्ती । डोळे गेलिया चरफडती । ब्रम्ह न दिसे म्हणोनियां ॥ २३ ॥ एवं ब्रम्ह देखणें हे तों टवाळी । साच मानिती बुचंबुळी । कल्पवृक्ष म्हणोनि भोंपळी । दाविजेल जेंवी ॥ २४ ॥ कोणी एक वाराणसी निघाला । सीमा उलंघन करूनि गेला । सरनांवाचा गांव पाहिला । हेचि वाराणसी ॥ २५ ॥ पुसे नांव काय हें गांवासी । ग्रामस्थ म्हणती हे वाराणसी । ऐसें जाणोनियां वस्तीसी । ठाव घेतला ॥ २६ ॥ तों म्हणती मागून आले । ते तयासी सांडूनि पुढें गेले । ऐसें देखोनियां पुढें बोले । ग्रामस्थाप्रति ॥ २७ ॥ त्या गांवाचा अभिमान लोकांसी । म्हणती हे जवोगळी काशी । ईपुडें काय वाराणसी । ऐसें सकळ लोक बोलती ॥ २८ ॥ त्यांच्या बोलासि विश्वासला । म्हणोनि तेथेंचि राहिला । म्हणोनि श्लाघ्यता दावी यात्रेला । म्हणे मज तरी काशी लाभली ॥ २९ ॥ म्हणे कां रे पुढें तातां । तुम्हीं मूर्ख मज पाहतां । अरे काशी हेचि आतां । इचे परतें काय आहे ॥ ३० ॥ तैसे नाना मतें देखदेखणी । तेथें भाषेसि पडले प्राणी । असो तयांची सोसणी । कोणें करावी ॥ ३१ ॥ जें शास्त्रमुखें ऐकिलें । तेंचि गुरुमुखें दृढ जालें । आणि आपुल्याही आलें । अनुभवासी ॥ ३२ ॥ तिहींची खूण बाणली । विचारितां एकचि झाली । तयासींच फावली । शाश्वत सद्गुरुकृपा ॥ ३३ ॥ अरे ब्रम्ह झांकावें । संतापासीं कानकोंडें व्हावें । तें सत्याचि जाणावें । केवळ अज्ञान ॥ ३४ ॥ अज्ञानही अडलें । त्याचें

१ सर्वांना. २ थोडीशी श्रेठ.

पाखांड मत जालें । तें जाईना कांहीं केलें । संचित पूर्वपातकांचें ॥३५॥ अज्ञान बापुडें जातें । सांगतांचि ज्ञान होतें । कृपाळूपणें प्राणियातें । आपंगिल्या सज्जनीं ॥ ३६ ॥ सज्जन त्यासी भ्यालें । पाषांड ऐकतां वांज आलें । किता ह्मणोनियां पळाले । मौनमुद्राकपाटीं ॥ ३७ ॥ ह्मणोनि अज्ञान तें बरें । परी नायकावीं पाषांड उत्तरें । मदलंड पाखांडी खरें । तेंचि खोटें क-रिती ॥ ३८ ॥ मध्य लंड आधार बोलती । शास्त्रमतें खटपटती । शब्दज्ञान हें पारि भ्रांति । फिटाली नाहीं ॥ ३९ ॥ वाद्विवादांचीं लक्षणें । तीं तूं जाणें पूर्णपणें । अभिमानें गुंतलं खुणें । स्वानंदाचे नेणती ॥ ४० ॥ ह्मणती शास्त्रमतें जेंहीं बोलावें । त्यांसी लटिकेंचि कैसें ह्मणावें । तरी आतां हेंचि स्वभावें । सांगिजेळ ॥ ४१ ॥ समूळ शास्त्रार्थ पाहतां । तेचि खटपटती ऐक-तां । वेदीं विचारूं जातां । एकविध बोलिलें नाहीं ॥ ४२ ॥ तैसेंचि कवित्व संतसज्जनें । परो-पकारार्थ निरूपणें । केलीं करिताती परीं तूं जाणें । आद्यंतीं एकचि नाहीं ॥ ४३ ॥ दिवसेंदि-वस ज्ञान वाढे । तैसी निरूपणेंही चढे । नाना अभेद शब्द गाढे । दिवसेंदिवस बोलती॥४४॥ तरी आपण विवेकें पहावें । अर्थांतरीं मग्न व्हावें । स्वमुखें पावालिया स्वभावें । ऐक्यचि आहे ॥४५॥ शब्दज्ञानें ऐक्यता मोडे । तरी शब्दज्ञान स्वरूपीं घडे । वेगळेपणें रोकडे । जन्म भोगणें घडती ॥ ४६ ॥ जेथें शब्दज्ञान न साहे । तेथें ऐक्यता बिघडोनि लाहे । सत्य किंवा मिथ्या दाहें । विवेकें करूनी ॥ ४७ ॥ तेथें शब्दज्ञाता कैचा उरेल । मा तुज शब्दीं बुडालासि ह्मणेल । बुडालासि बोलणेंचि बोल । शाब्दिकांचें ॥ ४८ ॥ जैसें तरलासि ह्मणतां तरसी । आणि बु-डालासि ह्मणतांचि बुडसी । कां लाधेनाचि समाधानासी । सर्वथा उरी नाहीं ॥ ४९ ॥ आमु-चा स्वामी पुण्यपरायण । सूर्यवंशाचें मंडन । लीलाविग्रही नारायण । तयासि रजकें [1]निंदिलें ॥ ५० ॥ तेथें मानावें आह्मी किती । कां जन आह्मांसी बोलों भिती । ऐसे जनासी शब्द ठेविती । ते मूर्ख जाणावे ॥ ५१ ॥ जन आणि जनार्दन । यांसीं नाहीं भिन्नाभिन्न । ह्मणो-नियां जनांपासून । अनृत न घडे ॥ ५२ ॥ जन सत्याचि बोलती । जैशास तैसाच म्हणती । गुण असतां ऐकोनि चित्तीं । कां पां दुश्चित व्हावें ॥ ५३ ॥ जरी जनें बाष्कळ म्हणावीं । नस-तीच करिती उठाठेवी । तरी मिथ्या जाणोनि जीवीं । आपण कासया धरावी ॥ ५४ ॥ तुझ्या ठायीं नाहीं विश्वास । आणि जनास ठेविसी गुणदोष । वादविवाद करूनियां सावकाश । देहबुद्धि धरिली ॥ ५५ ॥ जन बोळती याचि भावें । तें तुवां देहबुद्धि म्हणावें । निंदा जाणोनि-यां जावें । आपुलिया निज भावा ॥ ५६ ॥ आणि आमुची आज्ञा ऐसी । जे तुवां नातळावें देहबुद्धीसी । ऐकत असतां तुझे मानसीं । नाना विकल्प ऊठती ॥ ५७ ॥ आतां असो हें बोलणें । जें जें देखसी देखणें । चित्तासि न येतां पेखणें । करूं नको ॥ ५८ ॥ तूं ह्मणसी जें [2]म्यां सांगावें । ते काळीं सत्याचि मानावें । पाषांड सोडोनि व्हावें । पूर्ण समाधानी ॥ ५९ ॥ तरी जन्मांतरींचीं अनंत पातकें । प्राणियांसी घडलीं अनेकें । ह्मणोनि तयांसि विवेकें वोसंडिलें आहे ॥ ६० ॥ त्रास सांगतां सत्याचा । आणि विश्वास बाणला असत्याचा । हा जाणावा पूर्णपातकाचा । ठेवा सोडीना ॥ ६१ ॥ माया खेळते कौतुकें । प्राणी गोविले चट-के । भ्रांति घालुनि अविवेकें । भुलवूनि टाकिला ॥ ६२ ॥ अवघींच मुक्तता पावावीं । तरी हे वाडी कोणें वसवावी । ह्मणोनियां माया गोवी । नाना उपायें करूनियां ॥ ६३ ॥ प्राणी

१ परटांनें दूषण दिलें. २ अनुभव.

करूं जाय उपाय । बलूदे (?) नकरी त्याचाचि अपाय । अंतीं प्राणी पाहूं जाय । तव उपायीं- च ठाव नाहीं ॥ ६४ ॥ ऐसें हें मायेचें करणें । भल्यासीच वेड लावणें । तेथें तुझें कोणीकडे सांगणें । व्यर्थचि कां शिणसी ॥ ६५ ॥ जरी तुज सांगणें आहे । तरी तूं आपुलीच क्रिया पाहें । तुझी क्रिया पालटलिया लाहे । जनासी कांहीं ॥ ६६ ॥ अरे तुज क्रिया न घडे । तुज सांगणें कोणीकडे । शब्दज्ञानबडबडे । वरपडा कां झालासी ॥ ६७ ॥ आपण करून दाखवा- वें । तरीच दुसऱ्यासि सांगावें । ठाकेना तरी रहावें । मेलेंसें आपुले ठायीं ॥ ६८ ॥ झाकावें आपणासीं । आणि शिकावें पुढिलांसी । ऐसा हा सकळ सृष्टीसी । दंडकचि आहे ॥ ६९ ॥ तूंही वर्तसी तया ऐसा । तरी तुज परमार्थ कैसा । नट धावत आणी जैसा । रंजवावया जना- सी ॥ ७० ॥ म्हणोनि आपण क्रिया करावी । मग पुढिलांसी नलगे सांगावी । तुझी क्रिया दे- खोनि जीवीं । तेही तैसी करितील ॥ ७१ ॥ अरे पुढिल्याचें तुज काय । तूं तो समाधानी होय । तुझें समाधान जालिया उपाय । जनासी करणेंचि नलगे ॥ ७२ ॥ अभिमान तुजपाशीं जागतो । तुझें कोण मानूं पाहतो । जनही सकळ जाणतो । तुझे अंतरीं ॥ ७३ ॥ ह्मणोनि जें कांहीं दुसऱ्यासी सांगावें । तें तुवां स्वयेंचि करावें । ऐसें केलिया स्वभावें । समाधान सह- ळिक ॥ ७४ ॥ स्वामी सर्वज्ञ गोसावी । बुद्धि शिकविली बरवी । सुदृढ धरीन मी जंवीं । समाधान हेंचि आतां ॥ ७५ ॥ आतां लौकिकी लोकाचार । आणि सद्गुरुमध्यें एकंकार । तरी या शब्दाचा विचार । कैसा आहे स्वामी ॥ ७६ ॥ इति श्रीरामदास पुढें । आशंका सांगेल निवाडें । चित्त देऊनि ऐकतां उडे । पाषांडमत जेणें॥७७॥इति सप्तादश समासः समाप्तः॥१७॥

---

## समास १८.

श्रीगणेशायनमः ॥ पंचभूतांची आहे एकता । सृष्टि राहे मिळोनि चालतां । परस्परें लपेट पडतां । जाईल ब्रम्हांड विलया ॥ १ ॥ पंचभूतें कल्पांतीं । परस्परें प्राशोनियां विश्रांती । पा- वती भूताचे अंतीं । सृष्टि नाहीं कीं ॥ २ ॥ जैसें कर्पूराशी दीपें भक्षिलें । दीपासी वायूनें झ- डपिलें । वायूचें सबांग वितुळलें । आकाशाचे पोटीं ॥ ३ ॥ तैसा या पंचभूतांचा गोळा । नासोनि जाईल अवलीळा । मग डोळे भरूनिया भूगोळा । कोणें पहावें ॥४॥ ऐशीं पंचभूतें नि- मालीं । आणि त्रिगुणांची शांति आली । महत्तत्त्वेंसि माया गेली । महंमायेचे पोटीं॥५॥महंमाया हे विश्रांती । पावेल गुणसाम्य निगुती । गुणसाम्य निमालिया अंतीं । स्वरूपचि आहे॥६॥ऐसें स्वरूप पाहूं जावें । पाहूं जातां आपणचि व्हावें । तेथें कोणें म्हणावें । एकंकार ह्मणून॥७॥ऐसें कांहीं स्वरूप नावें । तैसा एकंकार शब्दाच्या भावें । परी हें बोलणें अवघेंचि वावें । पाहेरिया सकट ॥ ८ ॥ एकंकार यासी म्हणावें । परी आपण स्वयें अनुभवावें । अनुभव जालिया स्वभावें । समाधान आहे ॥ ९ ॥ याचेचि नांवें भेद तुटला । अभेद शब्द तोहि निमाला । भे- दाभेदातील संचला । आत्मा असतचि आहे ॥ १० ॥ स्वरूपीं तों भेद नाहीं । माया मिथ्या ह्मणतां सर्वही । तरी कांहीं क्रिया केली तेही । बांधूं न शके मज ॥ ११ ॥ अभेदीं आणि क्रिया

---

१ लोंगाची बतावणी. २ वांकडे, द्वेष.

करणें । हें बोलणेंचि लाजीरवाणें । भेदचि नाहीं तेथें कोणें । क्रिया करावी ॥ १२ ॥ मी चहूं देहापरता । मज कळलें जीवीं तत्वता । परी विचारें पाहतां । स्थूळ तो धरी लोकीं ॥ १३ ॥ स्थूळ काय तीं धरिलें । हें सकळ मायेनें केलें । केलें तेंही विचारितां जालें । मायेचेंचि अंग ॥ १४ ॥ तूं मायेहूनि वेगळा । बद्धता मुक्तता मायेचीचि कळा । ऐसें जाणोनि वेळोवेळा - स्थूळें धरिलीं ह्मणसी ॥ १५ ॥ स्वामी बोलिले तें बरवें । परी स्थूळ आहे तो कैसा वर्तावें । हें स्वामीनें मज सांगावें । कृपा करूनी ॥ १६ ॥ ऐक शिष्या साराचेंही सार । जेणें पाविजे पैलपार । सांगतों ये वचनीं आधार । किंचितही नाहीं ॥ १७ ॥ अरे जयासी परमार्थ व्हावा । तेणें प्रपंच त्यजावा । प्रपंचीं परमार्थ करावा । तो ठाकेना सर्वथा ॥ १८ ॥ करितां प्रपंचाची वृत्ती । संसारींचें झोके आदळती । दुःख शोक पडे भ्रांती । मग परमार्थ कैंचा ॥ १९ ॥ संसारीं असोनि अलिप्त ह्मणणें । त्याचें फटकळ बोलणें । आधार धरी टाकावा[1] कोणें । प्रपंच ह्मणोनि ॥ २० ॥ प्रपंच ह्मणिजे उदास नागवण । आणि प्रपंच ह्मणिजे परमार्थबुडकण । परस्परें या दोघां जाण । सर्वथा न घडे ॥ २१ ॥ परमार्थ हा नव्हे सोपा । ज्ञानगोष्टी व्यर्थचि बापा । जरी होय ईश्वरकृपा । तरीच हा प्रपंच सुटे ॥ २२ ॥ अरे शिष्या आह्मी सांगणें । परी तुज लागे क्रिया करणें । परमार्थ जोडिला आणि डगमगणें । केवळ अज्ञान ॥ २३ ॥ जयासि वाटे वैराग्य करावें । तेणें कांहींच न विचारावें । उठोनि वाटेचि लागावें । दिगंताप्रति ॥ २४ ॥ आपण आपाणिया वोळाखिलें । कोणी कोणाचें नव्हेसें कळलें । आणि प्रपंच करितां मेले । ते पढतमूर्ख जाणावे ॥ २५ ॥ परमार्थ सुदृढ जडे । मोहजाळ समूळ उडे । हें प्रपंचीं सहसा न घडे । वैराग्यावांचूनी ॥ २६ ॥ तया वैराग्य आड विवशी । आहे तो सांगतों तुजपाशीं । सावधान होऊनि मानसीं । विचार करावा ॥ २७ ॥ उपजतांचि वैराग्य जोडे । ऐसे परमार्थी थोडे । असो मगही अंतर पडे । किंनिमित्त तें ऐका ॥ २८ ॥ एकासी पत्नी सांपडली । वृत्ति तियेपाशीं गुंतली । असो तेथूनि मोकळीक केली । तरी जन ह्मणे त्यजूं नये ॥२९॥ तितुकाचि आधार पाहिला । प्राणी प्रपंचीं गुंतोनि राहिला । वैराग्याचा नाश केला । होय कीं प्रपंच ॥ ३० ॥ जरी ह्मणे वेद गोवी । तरी त्याची ही आज्ञा ऐकावी । पुत्र जाहल्यानंतर त्यजावी । प्रपंचेंसी भार्या ॥ ३१ ॥ ॥ एकीं प्रपंचाची लालुच केली । एका कुलाभिमानें लाज लाविली । ह्मणती वृत्ति भूमि बुडाली । तरी नांव जाईल वडिलांचें ॥३२॥ एकते लौकिक राखती । ना रे बि निघूनि गेला ह्मणती । एक ते आधार घेती । जनकादिकांचा ॥ ३३ ॥ एक ह्मणती कासयासि जावें । वैराग्य गृहींच करावें । आल्या अतीतासी अन्न द्यावें । शेवटीं तेंही ठाकेना ॥ ३४ ॥ ऐक ह्मणती जीव कां द्यावा । दुसऱ्यासी हात पसरावा । दुकाळ आला तरी यावा । तेंहीं सांवरेना ॥ ३५ ॥ एकाशी देहाची लालुच मोठी । परी हे जाणावी परम खोटी । प्रारब्ध सुटेना शेवटीं । अंतेर वैराग्य ॥ ३६ ॥ एक ह्मणती विवेक असावा । नाहींच तो कोठूनि आणावा । अविवेकें प्रपंच करावा । तैसाचि परमार्थ तो ॥ ३७ ॥ विवेक नाहीं ह्मणूनि डोळे । झांकूनियां अविवेकबळें । विवेक साधी तों काळें । आयुष्य नेलें ॥ ३८ ॥ ह्मणोनि हें कांहीं नसतां । प्रपंच सांडूनि उदास होतां । मग तया साधकाची चिंता । ईश्वराशी आहे ॥ ३९ ॥ एक ह्मणती वैराग्याचे दिवस । येती मग व्हावें उदास । तोंवरी हांव सावकास । प्रपंच भोगावे ॥४०॥ प्रपंचमहत्वाची बेडी । गळां पडतांचि बांधूनि पाडी । मग

---

१ तुवां.

साधकें बापुडीं । गुंतूनि पडती ॥ ४१ ॥ सृष्टि प्रपंचीं गोवी । ऐसा थोडा जो उगवी । ज्ञान सांगोनियां दावी । वाट वैराग्याची ॥ ४२ ॥ जेथें विवकेंसीं वैराग्य जागे । तेथें समाधान पाठीं लागे । प्रतिष्ठेसी ह्मणे उगे । बैस परती ॥ ४३ ॥ प्रतिष्ठा जालिया लालुच न करी । तोचि जाणावी वैराग्यसामग्री । आणि स्वधर्माचा सांभाळ करी । तो विवेक ॥ ४४ ॥ परमार्थ तोचि जो वैराग्य । वैराग्यापरतें नाहीं भाग्य । वैराग्य नाहीं तो अभाग्य । लुले दरिद्री ॥ ४५ ॥ ह्मणोनि त्वां वैराग्य करावें । लौकिकभय सांडुनि द्यावें । तारुण्य गेलिया खंगोवें । लागेल पुढें ॥ ४६ ॥ आतां तरी वैराग्य ठाकेना । आणि प्रपंच हा सुटेना । तरी प्रपंचीं असोनि वासना । परमार्थाकडे वोढवी ॥ ४७ ॥ सांडोनि प्रपंच सोहळा । परमार्थ दाखवावा आगळा । दीन देखोनि कळवळा । आला पाहिजे ॥ ४८ ॥ भक्ति श्रेष्ठ हरिकथा । नेमस्त मेळवीं परमार्था । ते तूं टाकों नको सर्वथा । प्रतिदिनीं ॥ ४९ ॥ जेणें प्रपंचीं असावें । तेणें दों विषयां वेगळें व्हावें । काय ह्मणाल तरी चित्त द्यावें । कनक आणि कांता ॥ ५० ॥ ह्मणसी प्रपंच आणि कांता । हें मी कैसें टाकूं आतां । तरी ईश्वरें दिल्ही ते वनिता । सकळांसी ठाऊकी ॥ ५१ ॥ तैसें कनक पुढिलाचें । अभिलाषूनि आपुलें साचें । ऐसें केलें तरीं कैंचें । समाधान पावसी ॥ ५२ ॥ अरे आहे तैसें नाहीं । गल्या खंती न वाटे देहीं । आलियाचा कांहीं । संतोष न मानीं ॥ ५३ ॥ ऐसें विचारावें त्वां । ठाकेना तरी प्रपंच करावा । नाहीं तरी नेमस्त त्यजावा । हेचि आज्ञा पोटस्थ ॥ ५४ ॥ अरे शिष्या संसारीं सुख वाटे । परी तुज न कळे रे दुःख मोठें । जयाशी न कळे तयाचें खोटें । अदृष्ट जाणावें ॥ ५५ ॥ ऐसें हें विश्वासी कळतें । परी क्रिया घडे जेथें । तयासीच कळे येरें रितें । वाउगें शाब्दिक ॥ ५६ ॥ शब्दींच आत्मा जाला । शब्दींच भेद तुटला । जैसा दुसऱ्याच दिवशीं लाधला । राजपदवी ॥ ५७ ॥ शब्दीं सर्व आत्मा ह्मणावें । आचार सांडूनि भलतेंची करावें । तें पाषांड मत जाणावें । विवेकी असेल तेणें ॥५८॥ भेद आणि प्रपंचीं मोडे । ऐसेंही कांहींच न घडे । डोळे झांकिती ते रोकडे । नागवले स्वहितासी ॥ ५९ ॥ रासभीं सोहळे भोगावे । मनुष्यें उकरडे भुरकसावे । ऐसें घडेल तरीच फावे । अभेद प्रपंचीं ॥ ६० ॥ कां सुरी हातीं घ्यावी । आंगोळीची लेखणी करावी । करितां प्रशस्त वाटे जीवीं । तरी प्रपंचीं भेद नाहीं ॥ ६१ ॥ कां इक्षुदंड जैसा खावा । तैसाचि नेत्रा खोवावा । कां कपाळमोक्ष करावा । नारीकेळ ह्मणोनी ॥ ६२ ॥ हें ऐकतांचि बरें न वाटे । आणि आधार घेतां सुख वाटे । शब्दज्ञानेंचि भेद तुटे । हें काय बरें ॥ ६३ ॥ अरे या शरीराकारणें । ठायांठायीं विचारणें । आणि परमार्थाचीच भंवव करणें । हें बरें नव्हे हो ॥ ६४ ॥ भेद तुटायाचें स्थळ । तें एक स्वरूप निर्मळ । तेथें हा मायेचा खेळ । समूळ मिथ्या ॥ ६५ ॥ तेथें भेद तुटोनि गेला । परी वक्ता तोही निमाला । अभेद शब्द तोही आला । भेदामध्यें ॥ ६६ ॥ प्रपंचीं अभेद हा विनोद । अभेद बोलणें हाचि भेद । जरी न कळे तो मतिमंद । मूर्ख अविवेकी ॥ ६७ ॥ सार्थक करावें जयाचे जीवीं । तेणें जाणीव बांधोनि ठेवावी । आणि आदरें करूनि ऐकावी । संतचर्चा बैसूनी ॥ ६८ ॥ संतसंगतीचें फळ । दुरी करी भवमूळ । संग सोडलिया अमंगळ । वासना तुरे ॥ ६९ ॥ इति श्रीदासपणाचीं करणें । दासीं स्वयें रामचि होणें । ऐसें परम गुह्य ठेवणें । संतसंगतीं आहे ॥ ७० ॥ इति अष्टादश समासः समाप्तः ॥ १८ ॥

---

१ क्षीण व्हावें. २ मनांतील. ३ गौरव.

# समास १९.

श्रीगणेशायनमः ॥ संतसंग भाग्यें लाधला । संतसंग कैंचा अभाग्याला । जयासी संतसंग जोडला । ते संतची होती स्वयें ॥ १ ॥ जे जे संगतीशीं लागावें । ते ते गुण लागती स्वभावें । प्रयत्नेंशीं नलगे जावें । आदरें करूनी ॥ २ ॥ प्राणी असती जये संगती । तैसेचि गुण आंगीं बाणती । पाहणेंही न लगे प्रकट दिसती । जयाचे तयासारिखे ॥ ३ ॥ जैसा कागद एकाचि आहे । परी जे वस्तूचा संग लाहे । ते वस्तूसारिखा पाहे । परिमळ तया कागदाशी ॥ ४ ॥ हाही दृष्टांत गौण जाला । विचार पाहतां अनुभवाशी आला । संतसंगती जो लागला । तो वेगळेपणें उरेना ॥ ५ ॥ कागदाशी परिमळ लागला । नवजाय जरी झडोनि गेला । परी तयाच्या कागदपणाला । तोटा नये कीं ॥ ६ ॥ तैसे नव्हति ते सज्जन । कृपा जालिया प्राणी अभिन्न । होती जैसे ते कांचन । लोहाचें होय ॥ ७ ॥ परीस लोहाचें कांचन करी । परी आपणा ऐसें न करी । ह्मणोनि देऊं नये सरी । परीसाची सज्जनां ॥८॥ नातरी चंदन असे । तो वृक्षासि करि आपणा ऐसें । तेथें पाहतां भेद नसे । तैसे हे सज्जन ॥९॥परां तेथेंही भेद आहे । हें तूं विचारूनियां पाहे । मुख्य चंदनपण न लाहे । तया वृक्षाचे अंगीं ॥ १० ॥ आपण अनायासें आगळा । त्यांशी ह्मणती बारी बावला । तैसा नव्हे संगसोहळा । सत्संगतीचा ॥ ११ ॥ जैसी भिंगोरीनें आळी आणिली । तेचि स्वयें भिंगोरी जाली । परी वेगळेपणें मिरविली । दुसरी भिंगोरी ॥ १२ ॥ आणि तयाशी भयही वाटलें । मागुती पुढेंही ठेविलें । तैसें सज्जनीं नाहीं केलें । शरणांगतांशी ॥ १३ ॥ सुखीं सुखाचा सुकाळु । नाहीं दुःखाचा विटाळू । सकळ अबळा गोवळू । आपणाचि होणें ॥ १४ ॥ पायीं ठेवितांच सद्भाव । आनंदें भरीत ब्रह्मकटाव[1] । संसारभेंय सकळही वाव । होऊनि जाती एकसरी ॥ १५ ॥ देखोनि संतकृपचा यावा । विवेकें भेटोनि गेला मागावा । अंकित होऊनि घालावा । गोंवळ भक्तिपेठेशी ॥ १६ ॥ विवेकाचा फड पडला । शांतीशी थोर आबार जाला । अभिमान पळोन गेला । देहबुद्धि घेऊनियां ॥ १७ ॥ अहंकार वाटपाड्या मैंद । धरूनि केला शिरच्छेद । मोहभ्रांति फांसे दग्ध । केले वैराग्यबळें ॥ १८ ॥ भावार्थाचा उदीम सजला । अज्ञानदरिद्रें वेगळा जाला । प्राणी मोक्षलक्ष्मीनें आपंगिला । ऐसी कृपा सज्जनांची ॥ १९ ॥ प्रपंचाची तीरडेफांकी जाली । परमार्थाची गुढी उभाविली । केवल देखूनि आली । दया आणि सत्कृती ॥ २० ॥ मैंदावें तितुके बंडाळले । मीपण चोरटें पळोनि गेलें । मत्सरातिरस्कारां केलें । देशधडी विवेकें ॥ २१ ॥ क्रोध उचल्या सांपडला । विवेकाशी न कळतां शांतिला । नेयाकारणें होता आला । त्यांशी फोडिलें अंतरीं ॥ २२ ॥ ऐसीं अमंगळें तितुकीं पळालीं । आणि निर्मळें तितुकीं मिळालीं । आनंदे उचंबळलीं । आचारब्रह्मवृंदें ॥ २३ ॥ याकारणें संतसंगती । धरितां प्राणी मुक्त होती । ज्ञानामृत सेविती । जेणें चुके जन्ममृत्यु ॥ २४ ॥ आतां असो हें बोलणें । संतवचनीं विश्वास धरणें । सांगितलें तें मूर्खपणें । असत्य मानूं नये ॥ २५ ॥ ऐक गा भावार्थाची खूण । जेणें चित्ताची वणवण । तुटोनि जाईल पूर्ण । समाधान पाविजे ॥२६॥ ह्मणसी मी भाव धरूं कैसा । तरी ऐक सांगतों ऐसा । भाव तोचि विश्वासा । सुदृढ धरावें ॥ २७ ॥ जो प्राणी संसारीं गांजला । तया आंगीं विश्वास

---

१ ब्रह्मांडरूप कढील.

बाणला । जो देखोवेखीं शरण गेला । तेथें विश्वास कैंचा ॥ २८ ॥ अविश्वासें माया गोवी । गोवूनि मागुता जन्म दावी । मोहजाळ वेढा लावी । यमजाचि नेटी ॥२९॥ अविश्वासें ठकला प्राणी । अविश्वासा ऐशी नाहीं हानी । जेथें आविश्वास तो जाचणी । वरपडा होईल ॥ ३० ॥ जेथें अविश्वासें बिऱ्हाड घेतलें । तेथें ये मायेचें ठाण आलें । प्राणी नेऊनि कोंडिले । गर्भाचिये बंदिशाळे ॥ ३१ ॥ ह्मणोनि आधींच विचारावें । युक्तायुक्त शोधोनि पहावें । आपणाशी नकळे तरी पुसावें । संतसज्जनांशीं ॥ ३२ ॥ विचारेंवीण कार्य काहीं । प्रपंच तोही चालत नाहीं । मा परमार्थतजवीज सर्वही । विचारिली पाहिजे ॥ ३३ ॥ मानेल तरीच अनन्यभावें । सत्पुरुषांशी शरण जावें । शरण गेलिया त्यजावे । दुरी आविश्वासा ॥ ३४ ॥ जें जें स्वामीनें सांगीतलें । तें तें पाहिजे ऐकिलें । ऐकोनि कार्य वर्तलें । पाहिजे तैसेंची ॥ ३५ ॥ तूं स्थूळ नव्हे ह्मणतांची । लुलु धरूं नये तयाची । वार्ता असूंदे चौं देहांची । वायकोळ खटपट ॥३६॥ शिष्या जाणिवेनें बुडाविसें । चौ देहांचें विवरण केलें । आणि वाचाळपणें सांगितलें । सर्वही येचि कारण ॥ ३७ ॥ जे कांहीं पृच्छा केली । ते तत्काळ सांगितली । परी ते तितुकीहि व्यर्थचि गेली । तैसेंचि वर्तल्यावांचूनी ॥ ३८ ॥ तुज सांगतों याकारणें । तुवां व्यर्थ वाचाळ न होणें । स्थूळापासोनि वेगळें होणें । शब्दीं नकोरे ॥ ३९ ॥ तूं ह्मणशी चहूं देहांपरता । तरी आह्मांशी तुझ्या स्थूळाची चिंता । कां जे तुझी स्थुळाशा तुटतां । दिसत नाहीं ॥ ४० ॥ जैसा रायाविनोदाचा परिवार । तैसा तुझा ज्ञानाचा विचार । परी येणें कांहीं पैलपार । पाविजेत नाहीं ॥ ४१ ॥ मजपरीस तूं जाणता । परी मी काय सांगों आतां । ह्मणशी मी सर्वसाक्षीच तत्वतां । तोही नव्हे आपण ॥ ४२ ॥ इतुकेही तुज कळलें । आणि धडधडीत बोलतां आलें । परी हें सत्य जाण जालें । बंधन तुज ॥ ४३ ॥ बंधन जाणिवेची बेडी । तुवां पायीं घातली आवडी । परी हे न करितां तडजोडी । हित नव्हे तुज ॥ ४४ ॥ ज्ञान तेंचि जे जाणीव विरे । देहबुद्धि निःशेष सरे । देहाभिमान हे हुंबरे । तो ज्ञाता नव्हे ॥ ४५ ॥ अरे तुवां जाणिवेनें बोलावें । आणि तुज जनें मुक्त ह्मणावें । तरी तुवां मुक्त व्हावें । न ह्मणतां तूं बद्धचि ॥ ४६ ॥ जो या जनाच्या बोला लागला । त्याचा परमार्थ बुडाला । समाधान असावें तयाला । साक्ष आपुलें मन ॥ ४७ ॥ तुज समाधान व्हावें । कीं लोकीं बर ह्मणावें । लौकिक पाहिजे त्यानें शिकावें । पुस्तकींचें शाब्दिक ॥ ४८ ॥ हें आत्मज्ञान नव्हे सोपें । या आड विघ्नें अमूप । तें मी सांगेन साक्षेपें । ऐक बापा ॥ ४९ ॥ इति श्रीरामदास ह्मणे । श्रोतीं अवधान देणें । पुढिलिये समासीं लक्षणें । सांगिजेती अडताळे ॥५०॥ इति एकोनविंशति समासः समाप्तः ॥१९॥

---

## समास २०.

श्रीगणेशायनमः ॥ मार्गी चोरांचें खाजे । मैंद धांवती पाठी लागिजे । एकाकीं लुटूनियां वोझें घेऊनियां जाती ॥ १ ॥ तैसें आयुष्य हें निधाना । येणेंचि जोडे निधान । तें प्राणियासी भोंदून । माया मोहीं नेतसे ॥ २ ॥ सुवर्णपंथी सुरळ घालिती । घरद्रव्य घेऊनि जाती । लटक्या वरपडे होती । भ्रांत

---

१ राजाचे खुशमस्करे.

प्राणी ॥ ३ ॥ तैसें आयुष्या नाना विघ्न आडताळे । मायादेवी चेटकें खेळ । प्राणी अज्ञानाच्या सांकळे । बांधोनि पाडी ॥ ४ ॥ कलियुगाचे बहुतबळें । जाली मायोपाधि सबळे । जन हे प्रपंची सकळे । मायाजाळें वेष्टिले ॥ ५ ॥ विषयसंगें दुःख पावती । दुःखचि होय अंतीं । त्या प्राणियासि गती । कैसी हो सके ॥ ६ ॥ सुखाकारखें बापुडीं । पडती संसारसांकडीं । धरूनि प्रपंचाची गोडी । दुःखें आक्रंदती ॥ ७ ॥ असतां सुखमय संसार । तरी कां टाकिती थोर थोर । होती दुःखाचे डोंगर । प्रपंचसंगें ॥ ८ ॥ प्रपंचीं आणि परम सुख । पावेन ह्मणेल तो मूर्ख । जैसें परमान्नीं मिश्रित विख । सेवितां मृत्यु पावे ॥ ९ ॥ ऐसा प्रपंच आपुला । मानूनि जन्म गमाविला । सेखीं दोहींकडे अंतरला । प्रपंच ना परमार्थ ॥ १० ॥ प्रपंचलोभाचेनि गुणें । प्राणी स्वहित करूं नेणे । ऐसें मायेचें करणें । उघडेंचि नेदीं ॥ ११ ॥ भुजंगीं वेष्टिला चंदन । कां विवसी पलीकडे निधान । विघ्नीं ठेविलें ब्रह्मज्ञान । तैसिया परी ॥१२॥ स्वहित काय हें कळेना । विषयवासना तुटेना । देहाभिमान गळेना । मंदबुद्धिस्तव ॥१३॥ मुक्तपणें कर्म एक । टाकितां होतें बाधक । कानकोंडी धुकधुक । अंतरीं वसे ॥१४॥ एक ते कर्मठपणें बद्ध । कर्म न घडे यथाविध। तेचिक्षणीं परम खेद। होय जयासी ॥१५॥ जें कर्म देखें देखलें। ते धोकावतची मेले । एक ते आदरें जाले। परम अनर्गळ ॥१६॥ आदरें केली अनर्गलता। ते बांधील हे तत्वतां। कर्मसंशय हृदयीं धरितां । तोही नेमस्त ॥१७॥ स्वधर्मकर्मउडवण । या नांव परमार्थ बुडवण । ह्मणोनी स्वधर्मकरण । अगत्य आधीं ॥ १८ ॥ कर्म करीं यथाविध । अंतर पडतां नुपजे खेद । तरी सोनें आणि सुगंध । निश्चयेंसीं ॥ १९ ॥ आधारें कर्म टाकणें । हें काय आपुलें मन नेणें । ज्याचा जो स्वधर्म तेणें । त्यागूं नये सर्वथा ॥ २० ॥ आदरें भोगावा भोग । आणि स्वधर्माचा कीजे त्याग । या नांव शरीरपांग । केवळ विषयीं ॥ २१ ॥ आतां असो हें बोलणें । स्वधर्म चळला ज्ञातेपणें । ते पाखंड कोटिगुण । विषयासक्त ॥ २२ ॥ नाना मतांचे अडताळे । शब्दज्ञानें क्रिया चळे । तेणें शुद्धज्ञान मावळे । उठती मतांतरें ॥२३॥ जाणे तोचि पुरुष अविचार । धरूनि घेती मतांतर । तेणें संगें इतर । भाविक चळती ॥ २४ ॥ ऐसें हें निरूपण ऐकिलें । अंतरीं जेणें तुच्छ केलें । ते प्राणी नागवले । मी काय करूं ॥ २५ ॥ परद्वार कां तस्कर । सांगितला न मने विचार । परी त्या जाणवेल विकार । कर्ण नासिका छेदितां ॥२६॥ असो शुद्ध क्रियेविण । परमार्थ तरले कोण । देहपांगें नागवण । नेमस्त आहे ॥ २७ ॥ सत्क्रिया नसतां परमार्थ । शब्दज्ञान सांगणें व्यर्थ । असत्क्रियेनें अनर्थ । वोढवेल पुढें ॥ २८ ॥ एवं शुद्ध क्रिया ते प्रमाण । नसतां सर्वेही अप्रमाण । जैसें युद्ध केलियाविण । शूरत्व नाहीं ॥ २९ ॥ असो जयाची तुटली देहाशा । परमार्थ शोभे त्या पुरुषा । देहपांग ते दुर्दशा । परम हीन ॥ ३० ॥ नृपतीनें भीक मागणें । हें निपटचि लाजिरवाणें । तैसा समाधानी तेणें । दुराशा न धरावी ॥ ३१ ॥ एके दुराशेचे पदरीं । विघ्नें आहेति कोटिवरी । एवं दुराशा वसतां अंतरीं । समाधान कैंचें ॥ ३२ ॥ अभिमान महत्वाची आशा । तया अभिमानाची दशा । ऐक तुज सांगतों शिष्या । पुन्हा प्रकट करूनी ॥ ३३ ॥ मी बलाढ्य तरुण सुंदर । मी विद्यावंत जाणता चतुर । मी लक्ष्मीवंत महाथोर । सकलांहूनी ॥ ३४ ॥ मी सर्वप्रकारें मोठा । ऐसा देहीं भरला थाटा । ऐसा ही परम वोखटा । या नांव देहाभिमान ॥ ३५ ॥ माझी माता आणि पिता । सर्व भूमंड-

१ देहभोग. २ अतिशय.

ळीं शोधितां । ऐसीं नसतील सर्वथा । कोण्ही कोठें ॥ ३६ ॥ माझे पुत्र अति शाहणे । त्यांचा महिमा कोण जाणे । माझा महिमा होतां तेणें । सृष्टी वेढावली ॥ ३७ ॥ कुळेंसी थोर माझी कांता । कन्या क्षीरवणी जामाता । मी माझा जो चुलता । थोर होता परी मेला ॥ ३८ ॥ ऐसा जिता मेल्याचा अभिमान । त्या नांव कुळाभिमान । आपुले कुळाचें न्यून । असतांही पडों नेदी ॥ ३९ ॥ कुळाभिमानाचा असो विचार । माझा सांहेब थोर । साहेबाचा परिवार । त्याची स्तुति करी ॥ ४० ॥ माझे जन्मभूमीचा गांव । त्यासारिखा नाहीं ठाव । तेथें पाटलासी उपाव । बहुत आहे ॥ ४१ ॥ असो सांगतां वाढेल कथा । सकल अभिमान वाहे माथां । बापुडे अज्ञानयाची वार्ता । असो एकीकडे ॥ ४२ ॥ आतां जे कां ज्ञाते पुरुष । ह्मणती आम्हां उदंड शिष्य । त्या तितक्यांचाही ईश । तो मी गोसावी ॥ ४३ ॥ सर्वां श्रेष्ठ माझा गुरु । थोर त्याचा चमत्कारु । उभाउभीं साक्षात्कारु । ब्रम्ह दाखवी डोळां ॥४४॥ तैसाचि माझा गुरुबंधु । बहुतांसी केला विनोदु । थोर ज्ञाता परी क्रोधु । बहुत असे ॥ ४५ ॥ तैसाचि माझा पट्टशिष्य । बहुत केला विद्याभ्यास । थोर मानिती त्यास । झोटिंग प्रसन्न ॥ ४६ ॥ माझा होता आजा गुरु । करामती पुरुष थोरु । सभामोहनाचा[2] विचारु । तयासी ठावुका असे ॥ ४७ ॥ थोर थोर गोविलें तेणें । तया मुख्य आविंध जाणे । नटसंगाचेनि गुणें । गुप्त होत असे ॥ ४८ ॥ आमुचे समुदायीं । भेद अणुमात्र नाहीं । अभेद क्रिया सर्वही । मुक्त असे ॥ ४९ ॥ ऐसा वेडनि अभिमान । अवासवा बोलती ज्ञान । सत्क्रियेचें नांव शून्य । साधन अंतरीं असेचिना ॥ ५० ॥ ब्रह्मज्ञाना आड विघ्न । जो साधका करी भग्न । तो हा देहाभिमान । सर्वविषयीं ॥ ५१ ॥ जे स्थळीं अभिमान जागे । जन्ममृत्यु पाठीलागे । शब्दज्ञान वोरंगे । निश्चितार्थ ॥ ५२ ॥ दृढ आहे सर्वाभिमान । ह्मणोनि उपदेश ब्रह्मज्ञान । ब्रह्मज्ञानें निरभिमान । विवेकें व्हावें ॥ ५३ ॥ ऐसे हे नाना अडताळे । तेंहीं शुद्ध ज्ञान मावळे । देहाभिमान आदळे । सदृढ आंगीं ॥ ५४ ॥ ह्मणोनि शिष्या सावधान । दृढ धरीं सद्गुरुभजन । तेणें तुझें समाधान । होईल अनायासें ॥ ५५ ॥ इति श्रीरामदासखूण । कोण समासीं काय निरूपण । पुढिलिये समासीं श्रवण । करावें श्रोतीं ॥ ५६ ॥ इति विंशति समासः समाप्तः ॥ २० ॥

---

## समास २१.

श्रीगणेशायनमः॥पहिलें समासीं निरूपण । लिहिलें आहे मंगलाचरण । गणेश शारदा सद्गुरुखूण । पुढील ऐका ॥ १ ॥ दुसरिये समासीं । वर्णिलें आहे राघवासी । जेणे ध्यानें मानसपूजेसी । दृढता होय ॥ २ ॥ तिसरिये समासींचें निरूपण । श्रोतया वक्त्याचें लक्षण । लिहिलें आहे त्या श्रवणें । सुबुद्धि लागे ॥ ३ ॥ चौथे समासींचा विचारु । लक्षण सांगोनि वर्णिला सद्गुरु । पांचवे समासीं विस्तारु । शिष्यलक्षणाचा ॥ ४ ॥ प्रतिष्ठोनि वैराग्यसार । नश्वर आहे हा संसार । सहावे समासीं विचार । ऐसा असे ॥ ५ ॥ सगुणमूर्तीचें ध्यान । निंद्य आशा देहाभिमान । त्रिविध रे निरूपण । सातवे समासीं ॥ ६ ॥ जेणें संशय निःशेष तुटे । समाधान निःशेष लिगटे । आणि स्वानंद प्रकटे । आत्मनिवेदनीं ॥ ७ ॥ आठवे समासीं गह-

---

१ मालक, यजमान.　२ सभा वश करण्याचा.

न । त्रिविध आत्मनिवेदन । प्रांजळ केलें असें कथन । अनुभवाचें ॥ ८ ॥ ऐक समासीं नवमा। स्तवूनियां आत्मयारामा । शिष्यासी सांगीतलें वर्मा । निराभिमान शांति ॥ ९ ॥ तेचि समासीं पण । आशंका उठली संपूर्ण । तेथें आशंकेचें निरसन । पुढें केलें ॥ १० ॥ दहावे समासीं शिकवण । आहे विविध निरूपण । तया निरूपणें समाधान । शिष्यासि लागे ॥ ११ ॥ अक्रावे समासीं बोलिला । प्रारब्धाधार निर्मिला । आणि प्रयत्न प्रतिष्ठिला । स्वधर्मेंसी ॥ १२ ॥ संत स्तविला द्वादशीं । फेडिलें शिष्याचे आशंकेसी । निवडूनियां देहबुद्धीसी । पुढें प्रवर्तलें ॥ १३ ॥ तेरावे समासीं निरूपण । निर्मूळ केलें मीपण । चवदावे समासीं पूर्ण । समाधान असे ॥ १४ ॥ पंधरावे समासीं उत्तम । रघुनाथचरित्र परम । वर्णोनियां नित्य नेम । जपाचा असे ॥ १५ ॥ सोळावे समासीं बोध । आहे गुरुशिष्यांचा संवाद । सतरावे समासीं उच्छेद । दृश्यदेखण्याचा ॥ १६ ॥ अठरावे समासीं विचार । निरासिला आहे एकंकार । एकोणिसावे समासीं सार । सत्संगमहिमा ॥ १७ ॥ विसावे समासीं अडथळे । जेणें शुद्धज्ञान झांकोळे । तयांचें स्वरूप निराळें । करूनि दाविलें ॥ १८ ॥ एकाविसावे समासीं आतां । निरूपिल्या समूळ कथा । पुढें निरूपणीं श्रोतां । अवधान द्यावें ॥ १९ ॥ मागां निरूपिलें कथन । त्या कथनाचें जें मंथन । तेंचि आतां सावधान । येचि क्षणीं परिसावें ॥ २० ॥ शिष्या ऐक निवांत राहें । समाधान वेगळेंचि आहे । विवेकें जंवि विचारूनि पाहें । बुझसी खुणा ॥ २१ ॥ जें जें कांहीं ग्रंथ बोलिला । येणें मार्गचि दाविला । येणेंप्रमाणें साक्षेप केला । पाहिजे प्राणी ॥२२॥ समाधानाचा अनुभव । शब्दीं सांगेन हे वाव । घालूनियां जीवीं जीव । अंतर घ्यावें ॥ २३ ॥ विवेक घेतां सुखी झाला । आपें आपची निमाला । तोचि समाधान पावला । चळेना ऐसें ॥ २४ ॥ मार्ग सांगतां यात्रा घडे । हें तों सर्वथा न घडे । तेणें प्रयाणें जातां जोडे । फळ यात्रेचें ॥२५॥ तैसें आपण आपलें जीवें । निरूपण विचारावें । मग समाधान पुसावें । न लगे तयासी ॥ २६ ॥ भेद भेदिल्यावीण कळे । वृत्ति निवळल्यावीण निवळे । समाधान शब्दीं आकळे । हें तों घडेना ॥ २७ समाधानाची निज खूण । पुसावी आपणासी आपण । तरीच घडे श्रवण । साक्षेपची ॥ २८ ॥ साक्षेपाचेनि श्रवणें । निरूपण आंगीं बाणे । समाधान पुसणें । हें आठवेंचि ना ॥ २९ ॥ वाराणसी मध्यें गेला । मार्ग पुसणें नलगे त्याला । तैसा समाधान पावला । त्यासी संशयो नाहीं ॥ ३० ॥ ज्याचे हृदयीं संदेह वसे । तेथें समाधान कदा नसे । तया संदेहाचें पिसें । फिटे विवरितां ॥ ३१ ॥ आपुलें मूळ शोधितां । समूळ आपुली मायिक वार्ता । ऐसें हें पाहिलें पाहता । समाधान बाणे ॥ ३२ ॥ पदार्थज्ञान जेव्हां सरे । द्रष्टा द्रष्टेपणें नुरे । ते समयीं उतरे फुंज मीपणाचा ॥ ३३ ॥ जेथें मुरलें मीपण । तेचि अनुभवाची खुण । खुणे पावाया कारणें । डोकावूं लागे ॥ ३४ ॥ ह्मणोनि समाधान तें वेगळे । अनुभवें त्रिपुटी मावळे । ह्मचि शब्द जया विवळे । ससाधान तेथें ॥३५॥ अत्यंत विचाराचे बोल । तरी ते मायिक फोल । शब्द सबाह्य सखोल । अर्थचि अवघा ॥३६॥ शब्दा बोलोनियां राहे । ते शब्दापूर्वीच आहे । शब्दा मौन दोन्ही खाये । आपणासहित ॥ ३७ ॥ जेथें गाळूनि सांडील नभा । जो अनुभवाचा गाभा । ऐसा तोहि उभा । काल्पित केला ॥ ३८ ॥ मिथ्या कल्पनेपासून झाला । खरेपण कैचें असेल त्याला । ह्मणून तेथ अनुभवाला । ठावचि नाहीं ॥ ३९ ॥ दिवसरजनीचें

---

१ मांडला, सांगितला. २ सज्जनाच्या संगतीची थोरवी.

परीमित । करावया मूळ आदित्य । तोचि निमालिया उर्वरितें । त्यासि काय ह्मणावें ॥ ४० ॥ शब्दमौनाचा उच्चार । व्हावया मूळ ॐकार । तो ॐकार नसतां उच्चार । कैसा बोलावा ॥ ४१ ॥ तर्क अनुभव अनुभाविता । सकळ ये मायेचि करितां । ते माया मुळीं नसतां । त्यासी काय ह्मणावें ॥ ४२ ॥ आत्मा साधावया जात । तों साधकाचाचि होय घात । तेणें गुणें निवांत । निःशब्द राहे ॥ ४३ ॥ व्हावया वस्तूची प्राप्ति । साधन साधक करिती । तंव तंव वस्तु आहुती । साधकाचींच मागे ॥ ४४ ॥ जेंहीं विवेकें आपुली । वस्तूसी आहुती दिधली । तयांसीच वस्तु लाधली । येरां अप्राप्त ॥ ४५ ॥ येथींचा विपरीत विचार । करितां आपुला संहार । तेणें अक्षय अपार । सुख लाहे ॥४६॥ जेणें जिवावरी उठावें । तेणें आनंदासी लुटावें । आनंदभोगु लुटोनि असावें । कल्पकोटि ॥ ४७ जो कां आपुली कुरवंडी । ओवाळूनि परती सांडी । तसासीच वस्तूची जोडी । इतरां न घडे ॥ ४८ ॥ येथ मोठा लाभ होतो । आपुल्यासाठीं राम मिळतो । साठी केलिया मग तो । रामचि होय ॥४९॥ जो रामरूपीं झगटातो उमय अंगें पालटे । आशंका मात्र तुटे । स्वस्वरूपी ॥ ५० ॥ जो रामरूपीं मिळाला । तो परतोनि नाहीं आला । जैसा लोह परिसें पालटला । तो लोहखंड नव्हे ॥५१॥ आत्मनिवेदनाच्या अंती । जें कां घडली अभेदभक्ती । त्या नांव सायुज्यमुक्ति । जाण शिष्या नेमस्त ॥ ५२ ॥ जो सद्गुरूसी शरण गेला । अद्वैतनिरूपणें बोधला । मग जरी वेगळा केला । तरी होणार नाहीं ॥ ५३ ॥ वेगळेपणाची जे मात । ते लटिके वंध्येची सुता । म्हणूनि अभिन्नता । मुळींच आहे ॥ ५४ ॥ अजन्मा होता निजेला । तेणें स्वप्नीं स्वप्न देखिला । सद्गुरूसी शरण गेला । संसारदुःखें ५५ ॥ सद्गुरूचे कृपेस्तव । झाला संसार वाव । ज्ञान हार्जोनियां ठाव । फिटे अज्ञानाचा ॥ ५६ ॥ आहे तितके नाहींसें झालें । नाहीं नाहींपणें निमालें । आहे नाहीं जाऊनि उरलें । नसोनि कांहीं ॥ ५७ ॥ शून्यातीत शुद्धज्ञान । तेणें झालें समाधान । ऐक्यरूप अभिन्न । सहजस्थिती ॥ ५८ ॥ अद्वैतनिरूपण होतां । निमाली देहाची वार्ता । ज्ञानचर्चा बोलूं जातां । जागृती आली ॥ ५९ ॥ श्रोतीं व्हावें सावधान । अत्यंत कठीण निरूपण । खुणेसी पावतां समाधान । समाधानीं विरे ॥ ६० ॥ तेणें जितकें ज्ञान कथिलें । तितुकें स्वप्नावरी गेलें । अनिर्वाच्य सुख उरलें । शब्दातीत ॥ ६१ ॥ तेथें शब्देवीण ऐकतां । अनुभव ना अनुभाविता । ऐसा निवासी मागुता । जागृतीसी आला ॥ ६२ ॥ स्वप्नीं स्वप्न देखीला । जागा होऊनि जागृती आला । तेथ तर्क कुंठीत जाला । अंत नलगे ॥ ६३ ॥ या निरूपणाचें मूळ । शोधिलेंच शोधावें प्रांजळ । बुद्धि करोनि विशाळ । सावधान शिष्या ॥ ६४ ॥ इति श्रीरामदास ह्मणे । या समासींचे निरूपणें । अति सूक्ष्म खूण बाणे । समाधानाची ॥ ६५ ॥ इति एकविंशती समासः समाप्तः ॥ २१ ॥

॥ श्री रामचंद्रार्पणमस्तु ॥

समाप्त.

---

१ शेष, शिल्की. २ येथें साधकासच मोक्ष मिळतो असा अर्थ घेणें. ३ संचय.